Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

igitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangot

RVED PATRIKA
1953 G.K.U.

C-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridw

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

07945

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

COMPILED

079415

079415

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

COMPILED

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

(वर्ष ६ वें) नाशिक, ता. १ जानेवारी १९५३ (अंक १३ वा

झांशीच्या आयुर्वेद विश्वविद्यालयास

भारत सरकारची १५००० रु. ची देणगी

सरकारी मान्यता नसतांहि खाजगी प्रयत्नानें भारतांत अनेक आयुर्वेदीय शिक्षणसंस्था र्माण झाल्या व त्यापैकीं ज्यांचें कार्य नेटानें पुढें चालूं राहिलें त्यांत झांशी येथील आयुर्वेद विश्वालयाचें कार्य विशेष कौतुकास्पद आहे. या संस्थेचे निर्माते वैद्य अगर डॉक्टर नसून एक वकील हेत, व आयुर्वेदावरील असीम भक्तीमुळें त्यांनीं ही संस्था स्थापन केली आहे.

या गृहस्थांचें नांव आहे श्री. रघुनाथरावजी धुळेकर. उत्तर प्रदेशाच्या पहिल्या आयुर्वेद ांचे अध्यक्षस्थानीं त्यांची नेमणूक झाली होती. आतां ते भारताच्या लोकसभेचे लोकनियुक्त सदस्य हेत. व आयुर्वेदाविषयींचा भक्तिपूर्ण आवाज ते तेथेंहि उठवित आहेत. त्यांच्या प्रश्नांना समाधानक उत्तरें देणें भारताच्या मंत्र्यांनाहि कठीण जात आहे.

श्री. अमृतकौर यांच्या हस्तें पदवीदान

नुकताच २२ डिसेंबर १९५२ रोजीं या विश्वविद्यालयाचा पदवीदान समारंभ भारताच्या आरोग्यमंत्री ना. अमृतकौर यांच्या हस्तें झाला. त्यावेळीं त्यांनीं विश्वविद्यालयाच्या संशोधनशाळेच्या नव्या इमारतींचा पाया घातला.

अ. भा. आयुर्वेद महासंमेलनाचे अध्यक्ष वैद्यरत्न पं. शिवशर्मा आयुर्वेदाचार्य यांच्या हस्तें उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदव्या देण्यांत आल्या.

प्रांतिक सरकारची मोठी देणगी

या विश्वविद्यालयास उत्तरप्रदेश सरकारकडून दरसाल बरीच मोठी रक्कम देणगीदाखल मिळते. तथापि भारत सरकार-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर श्री. धुळेकरजींचें जें वजन आहे त्यामुळें त्यांना भारत सरकारच्या आरोग्यखात्यानें प्रारंभींची नाममात्र देणगी म्हणून १५००० रुपये मंजूर केले आहेत. शिवाय आणखीहि निरनिराळया प्रयोजनानुसार अन्य देणग्या लौकरच मिळणार आहेत.

प्रांतीय विधिमंडळें व भारतीय लोकसभा यांत आयुर्वेदीय संस्थांचे जाणते प्रतिनिधि गेले तरच आयुर्वेदाच्या कार्याला लवकर प्रोत्साहन मिळण्याची शक्यता आहे. हें श्री. धुळेकरजी यांच्या संसदेतील प्रचारकार्यानें सिद्ध केलें आहे. ठिकाठिकाणचे वैद्य व आयुर्वेदप्रेमी मंडळी या महत्वाच्या प्रश्नाकडे लक्ष पुरवितील अशी आशा आहे.

दोन महत्वाचे समारंभ

झांशी आयुर्वेद विद्यापीठाच्या पदवीदानप्रसंगीं भारताच्या आरोग्यमंत्री श्री. राजकुमारी अमृतकौर म्हणाल्याः—

जनतेला निरोगी अवस्थेंत ठेवणें, आजार झालाच तर लौकर निरोगी करणें, जनता आनंदी कशी राहील व तिचें चांगलें पोषण कसें होईल हें पहाणें हाच सर्व वैद्यकशास्त्रांचा हेतु आहे. हा हेतु साध्य होण्यासाठीं इतर देशांप्रमाणें आपल्या देशांतहि प्रयत्न चालू आहेत.

"वैद्यकशास्त्रांचा समन्वय करण्याचे प्रयत्न फलदायी झाले नाहींत. त्यामुळें केवळ आधुनिक वैद्यकाच्या, केवळ आयुर्वेदाच्या, व संमिश्र शिक्षण देणाऱ्या अशा स्वतंत्र संस्था या देशांत आहेत. संमिश्र शिक्षणानें त्या दोन्ही शास्त्रांतील मूलभूत तत्वें जाणणारे चांगले डॉक्टर तयार होतील कां असा प्रश्न बऱ्याच जणांना अस्वस्थ करतो. तर आयुर्वेद इतका विस्तृत पायावर आधारलेला आहे कीं वैद्यकाची कोणतीहि पद्धत त्यांत अगदीं ठाकठीक सामावेल असेंहि बऱ्याच जणांना वाटतें.

अशा परिस्थितींत देशी वैद्यक पद्धतींत व्यापक प्रमाणावर संशोधन हातीं घेण्यांत यावें असें या संबंधांत विचार करणाऱ्या कित्येक समित्यांचें मत आहे. सरकारनें तें मत मान्य केलें असून जामनगर येथें अेक केंद्र स्थापण्याचें दृष्टीनें उपाययोजना चालू आहेत. परन्तु अेकच केंद्र कांहीं पुरेसें नाहीं व म्हणून या झांशी आयुर्वेद विद्यापीठाला यापुढें संशोधन क्षेत्रांत फार मोठा वांटा उचलावयाचा आहे."

आयुर्वेदास उत्तेजन मिळणारच

एर्नाकुलम् येथील मध्व आयुर्वेदीय महाविद्यालयाच्या इमारतीची कोनशिला भारताचे उपराष्ट्रपति श्री. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनीं ता. २५ रोजीं बसविली. त्यावेळीं ते म्हणाले 'भारतांतील सर्व नागरिकांना आपणास वैद्यकीय सुखसोयी प्राप्त करून द्यावयाच्या तर त्या योजनेंत आयुर्वेदास निश्चित स्थान आहे. या कामीं आयुर्वेद बराच कार्यभाग उरकण्यास समर्थ आहे. कालानुसार त्याचा विकास करावयास हवा आहे. आयुर्वेदाने या देशांत दृढमूल अशी परंपरा निर्माण केली आहे सबब त्यास उत्तेजन मिळणें हें अवश्य आहे व ते मिळणारच!"

धर्मभूषण दा. म. चंद्रात्रे सत्कार

नासिक येथील सुप्रसिद्ध वयोवृद्ध नागरिक व आयुर्वेद पत्रिकेचे मुद्रक धर्मभूषण दामोदर महादेव चंद्रात्रे यांचा, वयाच्या ७१व्या वर्षीं स्वशाखीय मंडळी व इतर अनेक संस्था यांनीं जाहीर सत्कार ता. २७-२८ डिसेंबर रोजीं थाटानें केला. त्यानिमित्त याज्ञवल्क्य मासिकाचा विशेषांक प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

१९५३ ची दिनदर्शिका

आयुर्वेद सेवा संघातर्फे १९५३ ची दिनदर्शिका प्रसिद्ध करण्यांत आली असून प्रत्येक प्रतीची किरकोळ विक्री किंमत ३ आणे आहे. औषधें, पुस्तकें, पत्रिका यांचे पैसे पाठवितांना त्याबरोबरच दिनदर्शिकेसाठीं पैसे पाठवितां येतील. —व्यवस्थापक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अंगीकृत कार्यांतील अपयशाची जाहीर कबुली

सरकारी आयुर्वेद संशोधन बोर्डाचे अध्यक्ष डॉ. कृ. श्री. म्हसकर एम्. ए.; एम्. डी. यांनीं ता. ८ डिसेंबर १९५२ रोजीं एक पत्रक काढून आपण अंगीकारलेल्या कार्याची आजवरची प्रगति निवेदन केली आहे व प्रारंभी योजल्याप्रमाणें कार्य होत नसल्याबद्दल दुःख व्यक्त केलें आहे. ते लिहितातः-



डॉ. म्हसकर

१) मुंबई सरकारनें आयुर्वेदांत संशोधन करण्यासाठीं आपल्या अध्यक्षतेखालीं बोर्ड स्थापन केले आहे व त्या बोर्डाच्या कार्यास तज्ञ वैद्य व डॉक्टर मंडळींनीं सहकार्य द्यावें अशा अर्थाची पत्रकें मी सर्व भारतांतील प्रख्यात १६८ आयुर्वेद तज्ञांना पाठविलीं. त्यापैकीं फक्त ४४ जणांनींच पत्रानें चौकशी केली वा सल्ला दिला. त्यांतून फक्त ११ लोकांनीं क्रमिक आयुर्वेदीय ग्रंथ लिहिण्याचें मान्य केले. तथापि एकानेंहि ते आचरणांत आणलें नाहीं.

२) आधुनिक रसायनशास्त्री नामजोशी यांनीं पोदार कॉलेज प्रयोग शाळेंत कुटजारिष्टावर प्राथमिक संशोधन केलें. त्यासंबंधीची पत्रिका प्रसिद्ध करण्याचा विचार आहे.

३) ‘पदार्थ विज्ञान’ या विषयावरील पुस्तक छापखान्यांत छापलें जात आहे. व आयुर्वेदीय ज्ञान-कोश निर्मितीकडे चांगले लक्ष पुरविलें आहे.

४) आम्ही दिलेल्या सूचनानुसार जबलपूरचे श्री. वी. व्ही. डेग्वेकर त्रिदोषसिद्धांतावर ग्रंथ लिहित आहेत.

बाकीच्या संशोधनाच्या योजना अपुऱ्या आहेत. त्यामुळें त्यासंबंधी विचार चालू आहे.

५) ‘पंचकर्म’ व ‘स्वस्थवृत्त’ या विषयावर आमच्या योजनेप्रमाणें निबंध लिहून देण्याचे वचन मिळालें आहे.

डॉ. म्हसकरांचें अरण्यरुदन

६) मुंबई सरकारनें उदार होऊन संशोधन समितीच्या सूचनेनुसार ३१ मार्च १९५३ पर्यंत खर्च करण्यासाठीं ८६००० रुपये संशोधन बोर्डाकडे दिले आहेत.

वरील मुदतींत आयुर्वेदीय वैद्य व ॲलॉपॅथिक व्यावसायिक यांनीं संशोधन बोर्डाला विचारार्ह संशोधनाच्या योजना दिल्या नाहींत, तर या रकमेपैकीं बराच मोठा भाग सरकारला परत करावा लागेल. हे जाहीर करण्यास आम्हाला अत्यन्त खेद वाटतो.

आम्हाला अनेक विषयावर आयुर्वेदीय पद्धतीनें संशोधनाच्या योजना हव्या आहेत. ते विषय येणे प्रमाणें:-

१) आयुर्वेदांतील व स्वास्थ्य दीर्घायुष्य विचार.

२) आयुर्वेदांतील मानसशास्त्र.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३) निवडक सर्व सामान्य विकारांच्या चिकित्सेचा उपरुग्ण अभ्यास.

४) नाडी विज्ञानाचा अभ्यास.

५) आयुर्वेद शिकविण्याचे अभ्यास ग्रंथ.

६) आयुर्वेदीय औषधांचा पाठ चिंतामणी

७) आयुर्वेदीय औषधीं - वनस्पतींचा अभ्यास

मुंबईस आयुर्वेद होमिओपॅथी व निसर्गोपचार यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठीं युनिव्हर्सल हेल्थ इन्स्टिटयूट नांवाची संस्था तज्ञांच्या देखरेखीखाली स्थापन झाली आहे. तेथें वेगानें संशोधन होईल अशी अपेक्षा आहे.

डॉ. म्हसकर यांनीं शेवटीं भारतांतील आयुर्वेदीयांना स्वतःच्या जबाबदारीवर संशोधन कार्य करण्याची विनंति केली आहे. जर त्याचे कार्य बोर्डाला पसंत पडले तर चालू खर्चासाठीं मदत देणे शक्य होईल असें म्हटलें आहे.

सध्यां चालू असलेल्या संस्थांत, रुग्णालयांत व प्रयोग शाळांतच हें संशोधन करावें लागेल. इमारती व प्रयोगसाधनें यासाठीं रक्कम मिळणार नाहीं.

पूर्व इतिहास

१९५० सालीं मुंबई सरकारनें, (कोणाच्या सल्यानें ?) एक आयुर्वेद संशोधन समिति नेमली. त्यांत डॉ. म्हसकर (अध्यक्ष) डॉ. योध, वैद्य भा. वि. गोखले, वै. पं. कवडेशास्त्री व वैद्य यादवजी त्रिकमजी ही मंडळी होती.

समितीनें सरकारला एक अहवाल सादर केला. तदनुसार काम करण्यासाठीं सरकारनें पुनः त्याच मंडळींना १९५१ सालीं नेमले. फक्त वै. पं. कवडेशास्त्री यांच्याऐवजी पं. शिवशर्माजी यांची नेमणूक केली.

संग्राह्य वैद्यकीय ग्रंथ

१) वैद्यसन्मित्र	(हिंदी)	ले. पां. वि. जायदे	किं. २ रु.
२) रोगविज्ञान जोडभाग	(मराठी)	ले. डॉ. वि. म. भट	किं. १२ रु.
३) स्त्रीरोगविज्ञान	,,	ले. डॉ. वि. म. भट	किं. ५ रु.
४) क्षयरोगचिकित्सा	,,	संघ प्रकाशन	किं. २॥ रु.
५) उपयुक्त ॲलोपॅथिक औषधे	,,	ले. डॉ. गुप्ते	किं. १॥ रु.
६) ॲलोपॅथिक चिकित्सासंग्रह	,,	ले. पं. जगन्नाथशास्त्री	किं. ६ रु.
७) ॲलोपॅथिक औषधीसंग्रह	,,	ले. पं. जगन्नाथशास्त्री	किं. ४॥ रु.
८) सार्थ माधवनिदान	,,	ले. वै. बी. आर. बोरकर	किं. ५ रु.
९) स्टेथॉस्कोप छातीची तपासणी	,,	ले. वा. कृ. जोशी	किं. ६ रु.
१०) क्षयरोगाची आयुर्वेदीय चिकित्सा व आयुर्वेदीय इंजेक्शनें	(मराठी)	ले. वै. ना. बा. कुलकर्णी	किं. ४ रु.
११) घरचा होमिओ डॉक्टर	,,	डॉ. गणपतराव नाईक	किं. ३ रु.

वैद्यकीय व्यवसाय करतांना वरील पुस्तकांचें आपणांस उपयुक्त मार्गदर्शन होईल. या व इतर वैद्यकीय पुस्तकांकरितां आजच लिहा. (ट. खर्च वेगळा.)

वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरकारनें या समितीला संशोधन कार्यार्थ १९५२--५३ सालांत खर्च करण्यासाठीं तिच्या मागणीप्रमाणें ८६००० हजार रुपयाची रक्कम दिली. सरकारनें या समितीला आयुर्वेदीय विश्वकोश व १२ विषयावर १२ ग्रंथ तयार करण्यास, अगर ग्रंथ तयार असल्यास ते मान्य करण्यास परवानगी दिली.

डॉ. म्हसकरांनीं संशोधनाबाबतचें पहिलें पत्रक १७-८-५२ रोजीं १६८ प्रख्यांत लेखकाकडे पाठविलें. २१ फेब्रुवारी १९५२ रोजीं दुसरें पत्रक पाठवून ग्रंथ कसे लिहावेत या विषयींच्या सूचना दिल्या. त्यानन्तर तिसरें पत्रक २ महिन्यापूर्वी निघालें. त्यांत आयुर्वेदीय औषधांची तपासणी एम्. एस्. सी. व एम्. बी. बी. एस्. डॉक्टरांच्याकडे सोपविली असल्याची माहिती दिली. ज्यांना औषधांची नांवें सुद्धां नीट लिहितां व वाचतां येत नाहींत व ज्यांना आयुष्यांत कधीं या विषयाचा गंध नाहीं अशी मंडळी हें सर्व काम सरकारच्या पैशानें आयुर्वेदाच्या प्रगती-साठीं करीत आहेत असें त्या तिसऱ्या पत्रकामुळें वैद्य मंडळींना कळून आलें.

बडोदा विश्वविद्यालयाची आयुर्वेद संशोधन समिती व जामनगर येथें स्थापन व्हावयाची मध्य-सरकारची आयुर्वेद संशोधन समिति यावरहि डॉ. म्हसकरांच्या सुदैवानें (आणि आयुर्वेदाच्या दुर्दैवानें) डॉ. महाशयांची एक प्रमुख जबाबदार सभासद म्हणून नेमणूक झाल्यामुळें त्या समित्यातर्फे व्हाव-याच्या कार्यास अद्याप प्रारंभहि झालेला नाहीं. अशीहि माहिती त्यांत दिली आहे.

ब्रह्मा-विष्णु-महेश

डॉ. म्हसकर यांच्या अध्यक्षतेखालीं सरकारनें नेमलेल्या समितीवर काम करण्यास आचार्य यादवजी यांनीं प्रथमच नकार दिला होता व नंतर पं. शिव-शर्मा यांनीं राजिनामा दिला. यामुळें आतां डॉ. म्हसकर, डॉ. योध व वैद्य भा. वि. गोखले या तिघांचे बोर्ड शिल्लक आहे.

आयुर्वेदाच्या दुर्दैवानें

जामनगरच्या संशोधन संस्थेवर प्रमुख म्हणून वैद्य भा. वि. गोखले यांना बसविण्याचा डॉ. म्हसकर यांचा प्रयत्न चालू आहे, असें बोललें जात आहे. डॉ. म्हसकर यांची वागणूक पक्षपातीपणाची आहे. त्यामुळेंच त्यांना महाराष्ट्रांतील व भारतांतील कार्यक्षम व्यक्ति व संस्था दिसत नाहींत व त्या व्यक्ति व संस्था त्यांच्याशीं सहकार्य करूं शकत नाहींत. व त्याचा परिणाम सरकारनें आयुर्वेदाचे संशोधन करण्यासाठीं डॉक्टरांच्याकडे दिलेली रक्कम परत होणार आहे.

फलश्रुती

असें कळतें कीं, आरोग्यमंत्री श्री. शांतीलाल शहा हे वैद्य वेणीमाधवशास्त्री, वैद्य घामणकर, आचार्य यादवजी, पं. शिवशर्मा व सुरतचे श्री. रणजीत देसाई आदि मंडळींची एक संशोधन समिती नेमून त्यांच्याकडे ही परत येणारी रक्कम संशोधना-साठीं देणार आहेत.

—x—

'आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार'

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्व-प्रकारचीं सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहाः—

आयुर्वेदिक औषधी भांडार

२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी पुणें, २

सचित्र श्रवणपरीक्षायंत्र (स्टेथॉस्कोप)

श्रवणपरीक्षेची अत्यंत सुबोध माहिती

किं. २। रु. ट. ख. निराळा.

(१) वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

(२) सुबोध वैद्यक ग्रंथमाला, कागल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

र. ट्रिब्यूनल ऑफिसमधील

सावळा गोंधळ

गुंजोटी जिल्हा उस्मानाबाद येथील वैद्य रा. ना. शाईवाले कळवितातः- मला रजिस्ट्रेशन ट्रिब्यूनलनें २७-६-५२ रोजीं भेटीस बोलावले. त्याप्रमाणें भेट झाली. नंतर ता. १७-७-५२ तारखेचे पत्र पाठवून मला पुढील प्रमाणें कळविण्यांत आलें The Tribunal has approved your application and has directed the board to enter your name in the list under the Act. (अर्थः—

रजिस्ट्रेशन ट्रिब्यूलननें आपला अर्ज मंजूर केला आहे व आयुर्वेद बोर्डाला अशी सूचना केली आहे कीं आपलें नांव लिस्टमध्यें दाखल करावें.)

त्यानंतर आतां ४ महिन्यांनीं २४-११-५२ तारखेचे रजिस्ट्रेशन ट्रिब्यूनल कडून पत्र आले आहे. व त्यांत तुमचा अर्ज नामंजूर करण्यांत आला आहे असें लिहिलें आहे. तरी त्यांचा अर्थ काय समजावा हें कळेनासे झालें आहे.

(श्री. रा. ना. शाईवाले यांच्या या खाजगी दवाखान्यास हैद्राबाद राज्य सरकारकडून दरमहा ग्रँट मिळत आहे. यांचे वाचकांना स्मरण असेल.)

—×—

१९३८ च्या कायद्यांत सूट

अहमदनगर जिल्ह्यांत श्रीरामपूर येथें पुण्याच्या डिऑसेसतर्फे सुरु करण्यांत यावयाच्या हॉस्पिटलांत नोकरी करणाऱ्या वैद्यक व्यवसायींना १९३८ च्या मुंबई वैद्यक व्यवसायींसंबंधीच्या कायद्याच्या ३२ व्या कलमाबाबत सूट देण्यांत आली असून त्यांना सदरहू कलमानुसार स्वतःचें नांव नोंदविण्याची आतां आवश्यकता नाहीं.

मुंबई राज्यांतील अशाच प्रकारच्या आणखी १९ धर्मादाय संस्थांतील वैद्यक व्यवसायींना यापूर्वीच ही सवलत देण्यांत आली आहे.

—×—

उपचारांची एक योजना

खेडेगांवांतील जनतेला आरोग्य रक्षण आणि रोगोपचार थोडक्या खर्चांत करतां यावा या उद्देशानें गांधी निसर्गोपचार आश्रम केंद्र बेळगांव या संस्थेनें एक योजना ठरविली आहे.

जनतेनें निवडलेले लोक सल्लागार पंच म्हणून राहातील व त्यांनीच संचालकाकडून काम करून घ्यावयाचे आहे.

प्रत्येक कुटुंबास वार्षिक आरोग्य फी दोन रुपये पडेल. त्यांना आरोग्य कार्ड दिलें जाईल. अशा कुटुंबांतील रोग्यांना रोज दोन आणे फी पडेल. व इंजेक्शनबद्दल दोन रुपये पडतील. जागा व फर्निचर गांवानें द्यावयाचे आहे.

औषधें, निसर्गोपचार साधनें, तज्ञ संचालक, नर्सहि देण्यांत येईल.

असा दवाखाना दोन ते चार हजार वस्तीच्या गावांत अगर गांव समूहांत देण्यांत येईल. यापेक्षां लहान खेड्यास आठवड्यांतून दोनदां संचालक भेट देईल.

—×—

पवित्र नेंपाली कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
— तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहाः—नेपाल हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

आयुर्वेद सेवा संघ, नाशिकचीं सर्व अनुभविक गुणकारी औषधें अमरावती येथें मिळण्याचें ठिकाणः—
मे. पाटणे बंधु, बडनेरारोड
अमरावती (मध्य प्रदेश)
एकवेळ अवश्य भेट द्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चुकीच्या विधानाचें निराकरण

डे. डायरेक्टर कुलकर्णी यांचा खुलासा

ता. १ डिसेंबर १९५२ च्या आयुर्वेद-पत्रिकेच्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या माझ्या व्याख्यानाच्या गोषवाऱ्यामध्यें कांहीं चुकीचीं विधानें छापलीं गेलीं आहेत, त्यांचें निराकरण करण्याच्या दृष्टीनें आपण खालील मजकूर पुढील अंकांत प्रसिद्ध करावा अशी विनंति आहे.

दुरुस्त विधानें

१ ह्या प्रदेशांत मोठमोठे सरकारी ऑफिसर लोक सुद्धां बहुधा आयुर्वेदीय किंवा युनानी तिब्ब्चे इलाजच पसंत करतात असें आढळून येतें.

आयुर्वेदासाठीं प्रवेश-कक्षा

२) आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमाकरितां मुंबईच्या आयुर्वेद फॅकल्टीनें ठरविलेली इन्टरसायन्सची कंपलसरी प्रवेश-कक्षा अयोग्य वाटते. ही सक्ति सर्वच आयुर्वेद शिकूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना ठेवण्याची जरूरी नाहीं प्रयोगादाखल एक दोन महाविद्यालयांत ठेवण्यास हरकत नाहीं. यू.पी. मध्यें सुद्धां बनारस व लखनौच्या युनिव्हर्सिटींनीं हा प्रयोग सुरू केला आहे. परन्तु यू. पी. बोर्डाच्या दहाबारा आयुर्वेद व तिब्ब्च्या कॉलेज-मध्यें ही सक्ति नाहीं.

योजना क न द्यावी लागते

३) आयुर्वेदाबाबत कोणतीहि योजना बनवितांना 'संन्याशाची शेंडीपासून तयारी' ह्या म्हणीप्रमाणें सर्वच गोष्टींची योजना सर्वांगपूर्ण अशी बसवून, व नवीनच करून, द्यावी लागते. आणि हें फार जिकीरीचें काम असतें. ह्याच्या उलट ॲलोपॅथीच्या सर्वच योजना ह्या देशांत किंवा परदेशांतसुद्धां 'रेडीमेड' मिळूं शकतात व सरकारलासुद्धां त्या ताबडतोब पसंत पडतात.

आयुर्वेदाचा डायरेक्टर

४) आयुर्वेदाचा स्वतंत्र डायरेक्टर असण्यापेक्षां यू. पी. तील सध्यांची भूमिका अधिक चांगली आहे असें वाटतें, कारण सध्यांच्या भूमिकेंत आयुर्वेदाच्या डे. डायरेक्टराचे अधिकार आयुर्वेद व तिब्ब्च्या बाबतींत सर्वतोपरी डायरेक्टराच्या बरोबरीचे आहेत, आणि त्याला ॲलोपॅथिक दवाखाने तपासण्याचा अधिकारसुद्धां प्राप्त आहे. ह्याचे उलट ॲलोपॅथीच्या डायरेक्टरांनाहि हेच अधिकार प्राप्त आहेत. आयुर्वेदाचें बजेट मात्र सरकारचें संपूर्ण मेडिकल व पब्लिक हेल्थ बजेटमध्यें तें समाविष्ट होऊन पुढें जाण्याच्या दृष्टीनें डायरेक्टरमार्फत पाठवून द्यावयाचें असतें. त्यांत कांहींहि फेरबदल डायरेक्टर स्वतः करीत नाहींत.

आयुर्वेदीय दवाखाने लोकप्रिय

५) यू. पी. मध्यें सध्यां ४४२ आयुर्वेदीय व तिब्बचे ८२ मिळून एकंदर ५२४ सरकारी दवाखाने सर्वत्र प्रांतभर आहेत. ह्यांची लोकप्रियता ॲलोपॅथिक दवाखान्यापेक्षां कोणत्याहि दृष्टीनें कमी नाहीं. वास्तवांत प्रांतांतील सर्वच जिल्हा ऑफिसरांनीं ह्यांच्या कार्याबद्दल आणि उपयुक्ततेबद्दल उत्तम अभिप्राय दिलेले आहेत व त्यांचेकडून सहानुभूतिपूर्वक सर्व प्रकारची मदतहि मिळत आहे

यंत्रशस्त्राबाबत वादळ

अलीकडे चाकू-कात्रीसारखीं कांहीं शस्त्रें अर्धशिक्षित अशा वैद्य-हकीमांच्या अधिकाराखालीं असलेल्या सरकारी दवाखान्यांतून सरकारी हुकुमानें काढून घेतल्यामुळें थोडेसें वादळ उत्पन्न झालेलें आहे. वैद्यांना शस्त्रास्त्रें न वापरूं दिलीं तर आयुर्वेदाच्या लोकप्रियतेला धक्का पोहोंचेल ही गोष्ट दृष्टिआड करून चालणार नाहीं. हें जाणून अशा वैद्यहकीमांना तीन महिन्याचा एक रिफ्रेशर कोर्स ह्याच दृष्टीनें देण्याचा विचार यू. पी. चें सरकार करीत आहे. व त्यांतून यथेष्ट उद्देश सिद्ध होईल अशी अपेक्षा आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रिफ्रेशर कोर्स

६) बोर्डातर्फे रजिस्टर्ड झालेल्या वैद्य-हकीमांपैकीं सुमारें तीन चतुर्थांश लोक समुचित वैद्यक ज्ञान नसलेले असेच आहेत. त्यांच्याकरितां रिफ्रेशर कोर्सचाहि विचार चालू आहे.

व्यापारी स्वरूप अनिष्ट

७) आयुर्वेदाला व्यापारी स्वरूप येणें अनिष्ट आहे. आयुर्वेद सर्व दृष्टींनीं सर्वांगपूर्ण आणि लोकप्रिय कसा होईल ह्या दृष्टीनें विचार आणि प्रयत्न झाले पाहिजेत. तो खरोखरीच तसा सर्वांगपूर्ण आणि लोकप्रिय झाला तर सध्यांच्या लोकनियुक्त राज्यपद्धतीमध्यें त्यांची आबाळ होऊ शकणार नाहीं आणि लोकनियुक्त प्रतिनिधी लोकांच्या आग्रहास्तव आयुर्वेदाबद्दल सहानुभूतीचें धोरण ठेवावयास सरकारलासुद्धां भाग पाडू शकतील ही गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे.

८) "कारण खरें लोकप्रिय सरकार पुढें यावयाचें आहे" अशा मजकुराचें जें वाक्य मागील गोषवाऱ्यांत छापलें गेलें आहे तें चुकीचें आहे.

लखनौ ११-१२-५२ आपला नम्र
द. अ. कुलकर्णी

वैद्यांचें अभ्यास मंडळ, अंमळनेर

अंमळनेर (पू. खा.) येथील वैद्यांनीं मिळून एका अभ्यास मंडळाची स्थापना केली आहे. दर पंधरा दिवसांनीं गांवांतील १२-१५ वैद्य (वैद्य नाईक यांच्याकडे) एकत्र जमून आपल्या वैद्यकीय व्यवसायांतील आलेल्या अनुभवाबद्दल विचार विनिमय इत्यादि करतात.

वैद्य कालिदास सोनार व वैद्य नाईक हे या कार्यांत उत्साहानें भाग घेत असून इतर वैद्यांच्या मदतीनें अभ्यास मंडळाची प्रगति करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

या अभ्यास मंडळांत तज्ञांचीं व्याख्यानें होत असतात. आजवर वैद्यराज एकतारे, सुप्रसिद्ध डॉ. मोने, आयुर्वेदाचार्य करमरकर इ. चीं व्याख्यानें झालीं.

आज ५० वर्षांच्या वयांतदेखील माझे केंस काळेभोर आहेत ! आणि ते
मिश्र यांच्या उंची ब्राह्मी तेलामुळेंच !
कारण हें तेल ताज्या ब्राह्मीच्या रसापासून व इतर औषधीद्रव्यांच्या मिश्रणानें तयार केलें आहे.
किं. १ रु., २ रु., ३॥ रु. ट. ख. वेगळा.
मिश्रा महाराष्ट्र फार्मसी (रजि.)
ब्रह्मपुरी (चांदा) म. प्र.

अनेक ग्राहकांच्या सूचनेवरून
परतवाडा येथें आयुर्वेद सेवा संघ नासिकची
सर्व अनुभविक व गुणकारी औषधें
मिळण्याची सोय आम्हीं केली आहे.
श्री समर्थ स्टोअर्स
परतवाडा (मध्यप्रदेश)

स्नायुबल तेल (रजिस्टर्ड)
अर्धांगवायु, संधिवात, स्नायुशिथिलता व शारीरिक दुर्बलतेवर अप्रतिम
किंमत ३ रु., ५॥ रु., १०.
" वैद्य डॉक्टर्ससाठीं मोठ्या पॅकिंगमध्यें तसेंच सवलतीच्या दरानें मिळेल."
लिहाः-ए.एम्.कुलकर्णी, खटाव बिल्डिंग मुं. २७

पांढऱ्या कोडावर
श्री. अंबाजी धोंडू मोरे पो. वाडे जि. ठाणें लिहितातः- मी पुष्कळ औषधें केलीं. पण गुण आला नाहीं. खरोखर आपले प्रभावी औषधानें माझे मुलीचें संपूर्ण कोड नाहीसें झालें.
किं.५रु. पोस्ट खर्च १५ आणे. माहिती मागवाः-
वैद्य के. आर. बोरकर
पोस्ट-मंगरूळपीर जि. अकोला (वऱ्हाड)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मंत्री महावीर त्यागी व पार्लमेंटचे सभासद श्री. धुळेकर यांची शाब्दिक चकमक

दिल्लीच्या पार्लमेंटमध्यें ज्यावेळीं सल्फा ड्रग्ज-वरील कर कमी करण्याच्या बिलावर चर्चा चालू होती त्यावेळीं मंत्री श्री. महावीर त्यागी व श्री. धुळेकरजी (प्रधान मंत्री, झांशी आयुर्वेद विश्वविद्यालय) ह्यांच्या दरम्यान जोराची शाब्दिक झटापट उडाली ती अशी:-

कोणत्या औषधांवर कर ?

श्री. धुळेकर म्हणाले मंत्र्यांनीं जर उच्च शिक्षण घेतलें असतें तर कोणत्या औषधावर कर बसवावे व कोणत्यावर बसवूं नयेत हें त्यांना कळलें असतें. मी इंग्रजी शिकलो आहे, परन्तु सल्फा ड्रग्ज नसतील तर ३५ कोटींची लोकसंख्या ३४ कोट होईल असें वाटण्याइतकें मात्र तें शिकलों नाहीं.

संधि मिळतांच आयुर्वेदाची बाजू

पार्लमेंटमधील वादविवादाला उत्तर देतेवेळेस श्री. त्यागी म्हणाले-श्री. धुळेकरांनीं मला जी सूचना दिली तीबद्दल मी त्यांचा आभारी आहे. संधि मिळ-तांच ते आयुर्वेदाची बाजू घेऊन उभे रहातात व मला त्यांना प्रत्येक वेळीं निराश करावें लागतें.

यांत जनतेचा फायदा नाहीं

यापूर्वी श्री. र. वि. धुळेकरांनीं असें सांगितलें कीं विदेशीय सल्फा ड्रग्ज् विक्रीकरांतून मुक्त केलीं ही गोष्ट पार्लमेंटच्या प्रतिष्ठेला घातक आहे. जरी चन्द्रोदय वगैरे विशिष्ट आयुर्वेदिक औषधें ह्या करांतून मुक्त केली तरी सल्फा ड्रग्ज् मुक्त करणें योग्य होणार नाहीं. कारण, सल्फा ड्रग्ज् हीं कांहीं सर्व सामान्य औषधें नव्हेत. तीं खास कंपन्यांचीं खास औषधें आहेत. ह्या औषधांच्या विक्रीमुळें जन-तेला फायदा होणार नसून कांहीं खास लोकांचाच फायदा होणार आहे.

आणि हें विसंगत आहे

जर औषधांनाच करमाफी करावयाची तर मलेरिया, कॉलरा ह्या सारख्या सर्व सामान्य रोगावरील सर्व औषधांना ती व्हावी. आजच्या भारताच्या यादींत सल्फा ड्रग्ज् यावींत, परंतु आयुर्वेदीय औषधें मात्र येऊ नयेत हें विसंगत दिसतें. जर लोकांनीं आम्हाला विचारलें कीं तुम्हीं आयुर्वेदाच्या बाजूनें ओरड करतां, पण तुमच्या समक्ष पार्लमेंटमध्यें धणे व काडेचिराईत यावर कर कसा बसला ? तर त्याला आम्हीं काय उत्तर द्यावें ?

गृहखात्याचा रहस्यस्फोट

सरकार आयुर्वेदाला प्रोत्साहन देत नाहीं अशी तक्रार करून व पुढील विधानांची पूर्ण जबाबदारी स्वीकारून श्री. धुळेकर यांनीं एका रहस्याचा स्फोट केला. ते म्हणाले ' मध्यसरकारच्या गृहखात्यानें नुक-तेंच राजस्थान सरकारला पत्र लिहून अशी आज्ञा दिली आहे कीं सरकारी नोकरांना रजा देण्यासाठीं देशी वैद्यकीय व्यावसायिकांनीं जर प्रमाणपत्रें (सर्टिफिकेटस्) दिलीं तर ती स्वीकाराई मानू नयेत .'

फक्त १५ टक्के लोकांना उपचार

सरकारच्या या कृत्याबद्दल अत्यन्त दुःख व्यक्त करून श्री. धुळेकर यांनीं सांगितलें कीं " सरकार आरोग्यखात्यावर ६५ कोट रुपये खर्च करूनहि केवळ १५ टक्के जनतेलाच ॲलोपॅथिक औषधोपचार करूं शकते. अशा स्थितींत ज्यांना महागाईमुळें ॲलोपॅथिक, औषधोपचार घेता येत नाहीं, अशा सरकारी नोकरांना स्वस्त आयुर्वेदिक औषधें घेण्यास सरकारचा विरोध कां असावा ?

सरकार त्याची किंमत सोसतें

धुळेकरांनीं उदाहरण देतेवेळीं असें सांगितलें कीं, ' स्ट्रेप्टोमायसिन आदि कांहीं औषधांची किंमत सरकार स्वतःच सोसतें. ' एका कारकुनाजवळ एका डॉक्टरांनीं २५ रु. फी मागितली. कारकुनानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपल्या अल्पशा पगाराच्या सबबीवर त्या गोष्टीस असमर्थता दर्शविली त्यावेळीं त्याला डॉक्टरांनीं अशी युक्ती सांगितली कीं, तूं मला २५ रुपये दे. मी त्याची पावती देईन. ती पावती तूं सरकारकडे हजर केलीस तर तुला सरकारकडून ते पैसे मिळतील !

त्या डॉक्टरांचें नांव सांगा

ह्यावेळीं मंत्री श्री. त्यागींनीं धुळेकरांना अडवून विचारलें कीं " माननीय पार्लमेंट सभासद त्या डॉक्टरांचें नांव सांगतील काय? मी सभासदांना आश्वासन देतों कीं सरकारतर्फे त्या डॉक्टराचे विरुद्ध विनाविलंब इलाज केला जाईल. "

परमात्म्याला अनेक नांवें आहेत

त्यावर श्री. धुळेकर म्हणाले " ज्या परमात्म्याला अनेक नांवें आहेत, अशा परमात्म्याचें एकच नांव कोणतें म्हणून सांगणार? "

श्री. त्यागी— " सभासदांनीं अशा प्रकारच्या भानगडींत सरकारला सहकार्य द्यावयास पाहिजे. असें केलें तरच वाईट प्रवृत्तींचा नाश होईल. "

सरकारी नियमच असा आहे

श्री. धुळेकर– " मंत्र्यांनीं माझ्या विधानाचा फारच गैर अर्थ केला आहे. मी कोणा एका डॉक्टराची निंदा अगर कोणा एकाबद्दल तक्रार थोडीच केली आहे ! सरकारी नोकर आपल्यासाठीं जो कांहीं ॲलोपॅथिक उपचारावर खर्च करील तो सरकारकडून त्यास भरून मिळेल असा सरकारी नियम असल्याचें, मी सांगितलें एवढेंच.''

श्री. त्यागी –– " जर खोटें असेल तर उघड सांगा." श्री. धुळेकर —" येथें खराखोट्याचा काय प्रश्न आहे. हा तर सरकारी नियमच आहे".

आयुर्वेदासाठीं मौन मोडलें

श्री. धुळेकरांनीं भाषणाच्या सुरवातीला सांगितलें कीं मी दर सोमवारीं उपवास करतो व मौन पाळतो. पण या बिलाचें महत्व जाणून मी आज माझा नियम मोडून हें भाषण करीत आहे.

पायोरेक्सः– पायोरिया आणि दांतांचे सर्व रोगांवर. **दांत मजबूत करतें.**

पाइल्स क्युअरः– कोणत्याही तऱ्हेच्या हट्टी मुळव्याधीवर ताबडतोब गुणकारी

सेक्सोजेम (स्तंभकवटी)–

अत्यंत प्रभावी. एक वेळ खात्री करा.

ओ-नॉट-नाऊ खात्रीचे संततिप्रतिबंधक

— गर्गे मेडिकल स्टोअर्स —

मेनरोड, नासिक

प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत

१	कर्तव्याची मीमांसा	किं. ६ रु.
२	आधुनिक आहारशास्त्र	१॥ रु.
३	आधुनिक कामशास्त्र	४ रु.
४	वेश्याव्यवसाय	२ रु.
५	समाजस्वास्थ्य मासिकांतील निवडक लेख भाग २रा	२ रु.
६	समाजस्वास्थ्य मासिक वार्षिक वर्गणी	३ रु.
७	संततिनियमन (सचित्र)	१। रु.
८	गुप्तरोगांपासून बचाव	१ रु.
९	तेरा गोष्टी	१ रु.
१०	त्वचेची निगा	८ आणे
११	गुरुबाजी (नाटक)	८ आणे
१२	न्यायाचा शो (नाटक)	१ रु.
१३	पॅरिसच्या परी	३ रु.

१ राइट एजन्सी, नवी भटवाडी मुंबई ४

२ वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण ६ वें

अजीर्ण चिकित्सा (पुढें चालू)

(आयुर्वेद पत्रिकेच्या पहिल्या व दुसऱ्या वर्षाच्या अंकांत अनुभविक चिकित्सा नांवाची एक लेखमाला सुरु होती. त्यांत ज्वर, अतिसार, ग्रहणी, अर्श, अग्निमांद्य या चिकित्सा पूर्ण येऊन गेल्या असून अजीर्ण रोगाचें निदान पूर्ण झालें आहे. त्यापुढील भाग या अंकापासून नियमितपणें प्रसिद्ध होणार आहे.

नव्या वाचकांना मागील लेख एकत्र छापलेले मिळूं शकतील. त्यासाठीं त्यांनीं मनिऑर्डरनें दीड रुपया पाठवून आयुर्वेद सेवा संघ पुस्तकमाला पुष्प ७ वें 'अनुभविक चिकित्सा' या पुस्तकाची मागणी करावी. —संपादक)

अलसक व विलंबिका चिकित्सा

मागील प्रकरणांत अलसक व विलंबिका या दोन अजीर्णाच्या प्रकारांचें निदान वर्णन केलें आहे. त्यांत या दोन्हीं अजीर्णांमध्यें वांति किंवा शौच्यास न होतां, अपक्व पदार्थ पोटांत तसाच राहतो, सबब त्याला बाहेर काढण्याचे खालील उपाय करावेत.

ग्लिसरिन वर्ति

आयुर्वेदांत अनेक प्रकारच्या वर्ति वर्णन केलेल्या आहेत. परंतु आजकाल औषधीबाजारांत ग्लिसरिन सपोझिटरी नांवाच्या वर्ति (वाती) तयार मिळतात. त्यांचा उपयोग या अजीर्णांत करावा. ही वर्ति गुदद्वारांत प्रविष्ट केली, म्हणजे तिच्यामुळें आंतील त्वचा व मल या दोन्हींत स्निग्धता उत्पन्न होऊन तिच्यामुळें मल निःसरण होऊं लागतें. गुदद्वारानें विकार बाहेर पडण्याचें कार्य सुरु झालें म्हणजे आवश्यकतेनुसार अनुवासनबस्तिहि देतां येतो.

एरंडतेलाचा मात्राबस्ति

हा अनुवासन बस्ति म्हणजे आजकाल दिली जाणारी ग्लिसरिन सिरिंज हीच होय. या पिचकारींत ग्लिसरिन न भरतां एरंडेलहि भरून देतां येतें. त्या-योगानें स्निग्धता विशेष आंतपर्यंत पोहोंचून मल निःसरणास विशेष मदत होते.

वमनाचा प्रयोग

दुसऱ्या, म्हणजे मुखद्वारानें अपक्व पदार्थास प्रवृत्त करण्याकरितां, तोंडांत बोटें गळ्यापर्यंत घालून वमनाचा प्रयत्न करावा. पपईच्या झाडाची बारीक नळी घेऊन ती गळ्यापर्यंत घालूनहि वमनाचा प्रयत्न करतां येतो.

मदनादिचूर्ण

अनुभविक चिकित्सा पान १२ वर वर्णन केलेले मदनादिचूर्ण कोमट पाण्याबरोबर द्यावें.

गेळफळचूर्ण+कलमीसोरा

गेळफळांच्या बियांच्या चूर्णांत बरोबर प्रमाणांत कलमीसोरा (नायटर) मिसळून, तें चूर्ण कोमट पाण्या-बरोबर द्यावें.

कपिला चूर्ण

कपिला (संस्कृत नांवः-कंपिल्लक) नांवाचें एका वृक्षाच्या फळावरील वाळलेली लव वाण्याकडे उपलब्ध असतें. याचा उपयोग वमन आणि विरेचन अशी दोन्ही कार्यें करण्याकरतां फार चांगला होतो. हें द्रव्य रुचिहीन (Tasteless) असें असतें. त्यामुळें तें घेण्यास विशेष त्रास होत नाहीं. तरुण वयांतील मनु-ष्यास हें चार मासे ते आठ मासे पर्यंत एकावेळीं देतां येतें. यानें निदान चार पांच तरी जुलाब होतात. व कधीं कधीं तर एक दुसरी वांतिहि होते. हें दुधांत मिसळून द्यावें. यांतही बरोबर प्रमाणांत कलमीसोरा मिसळून ठेवावा. व तसें केलें तर मिश्रणाचें प्रमाणहि पहिल्या-पेक्षां दीडपट देतां येतें. या उपायानें वमन विरेचन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होऊन पोटांत आळशासारखा पडून राहिलेला विकारी पदार्थ बाहेर पडतो.

इतके उपाय करूनहि जर वमन विरेचन न झालें तर इच्छाभेदीचाहि प्रयोग करावा. हें फार तात्र विरेचन आहे, आणि म्हणूनच त्याचा जपून उपयोग करावा लागतो. इच्छाभेदी तयार करण्या-करितां खालील द्रव्यांची आवश्यकता असते.

इच्छाभेदी नंबर १

एक भाग हिंगूळ, एक भाग सुंठ, एक भाग टांकणखार, एक भाग पिंपळी, चार भाग चोक, चार भाग शुद्ध जैपाल. या साही द्रव्यांची खलून पूड करावी, आणि एका वेळीं तीन गुंज पूड गाईच्या किंवा इतर दुधांत मिसळून द्यावी. वर थंडपाणी पिण्यास द्यावें. जितके घोट पाणी दिलें जाईल तितकेच रेच होतील, असा साधारण नियम आहे. हें द्रव्य दिल्यानंतर रेच बंद करण्याची इच्छा असल्यास ऊन पाणी पिण्यास द्यावें, किंवा दहीभात खाऊ घालावा. तूपभातहि तेच कार्य करतो.

जैपालाची शुद्धि कशी करावी ?

जैपालास संस्कृतांत दंती-बीज व हिंदींत जमाल-गोटा असें म्हणतात. त्याच्या टरफलासकट बिया वाण्या-कडे मिळतात.त्या फोडून आंतील बिया काढाव्या.बियांची दोन शकलें (बदाम, चारोळी किंवा भुईमुगाप्रमाणें) होतात. बारीक चाकूनें तशी शकलें केली म्हणजे त्या दोन्हीं शकलांमध्यें एक कागदासारखी पातळ जिभली किंवा अंकूर सांपडतो. तो काळजीपूर्वक वगळावा. नंतर ही सर्व शकलें एका कापडाच्या पोटळींत बांधून तीन दिवस म्हशीच्या शेणांत पुरून ठेवावी.

शेण दररोज बदलावें

नंतर कढत पाण्यानें शकलें धुवावीत. दुसऱ्या साफ फडक्यांत घालून फडक्यासकट खलांत ठेवून बारीक करावीत. नंतर एक नवीन लहान कोरें मडकें घेऊन त्याच्या उपड्या भागावर ही खललेली पूड थापून द्यावी. म्हणजे त्यांतील बराचसा तेलाचा अंश मडकें शोषून घेईल. आवश्यकतेनुसार दुसऱ्या दिवशी पुन्हां नवीन तशाच मडक्यावर ती थापावी. या प्रयोगानें तें चूर्ण पूर्णपणें स्नेहरहित असें होईल. तो जैपाल स्नेहरहित झाला, म्हणजे वांति करीत नाहीं व शुद्ध होतो. असल्याचाच उपयोग इच्छाभेदी रसांत करावा.

इच्छाभेदी रस नं. २

या इच्छाभेदी रसाचा दुसराहि एक प्रकार असून तो घेतल्यानें जुलाबानंतर विशेष क्षीणता येत नाहीं.

१ भाग पारा	१ भाग गंधक	१ भाग टांकणखार
१ भाग मिरें	१ भाग सुंठ	१ भाग शुद्ध जयपाल

या सर्वांचें मिश्रण कागदी लिंबाच्या रसांत खल करून तीन गुंजांची गोळी तयार करावी. साधारणतः एकावेळीं एक गोळी दुधांतून द्यावी.

पोटावर एरंडेल चोळावें

या अलसकाजीर्णांत पोटावर एरंडेल चोळणें त्याचप्रमाणें ऊन पाण्याच्या वाफेनें शेकणें (टॉवेल ऊन पाण्यांत भिजवून पिळून पोटावर ठेवणें), उपलब्ध असल्यास गरम पाण्याची पिशवी अथवा मजबूत काचेच्या बाटलींत ऊन पाणी भरून तिनें शेकावें. याप्रमाणें स्नेहन आणि स्वेदन असें दोनहि उपचार सारखे चालू ठेवावेत.

अजीर्ण मंजरी

साधारणतः कोणतेहि खाद्य द्रव्य अधिक प्रमाणांत पोटांत गेलें असतांना त्यापासून अजीर्ण होण्याचा संभव असतो. निरनिराळ्या द्रव्यांचें अजीर्ण पचविणारी निरनिराळी द्रव्यें आहेत. त्यांचे ज्ञान सर्व साधारण लोकांस व विशेषतः वैद्यास असणें फार आवश्यक आहे. त्यामुळें कित्येकदां वैद्यास चमत्कार करून दाखवितां येतात. उदाहरणार्थ, कित्येक रुग्ण त्यांच्या रुग्णावस्थेंतच निरनिराळ्या, परन्तु रोगास अपायकारक अशा खाद्यपदार्थांची अभिलाषा व्यक्त करतात. त्यावेळीं ती अभिलाषा पूर्ण करून अपाय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होऊं न देणें हें या ज्ञानामुळें शक्य होतें. माझे गुरू असले चमत्कार करून दाखवीत असत.

केळ्याचें अजीर्ण

एकावेळीं एका सत्तर वर्षांच्या वृद्ध व्यक्तीस १०४ ताप असतांना त्यानें केळें खाण्याची अभिलाषा प्रकट केली. अर्थातच या अभिलाषेला इतर सर्व वैद्यांचा कडक विरोध होता. असें असतांना देखील एक सुंदर सोनकेळ बाजारांतून आणून त्यांत विलायचीच्या दोन चार दाण्यांचें चूर्ण घालून तें दिलें. त्या केळामुळें कोणताहि अपाय झाला नाहीं. सबब, कांहीं विशेष द्रव्यांच्या अजीर्णावर देण्याकरतां उपयोगी अशी हीं अजीर्ण मंजिरी वैद्यांनीं लक्षांत ठेवावी.

या पदार्थ सेवनाच्या अजीर्णावर हें द्रव्य	या पदार्थ सेवनाच्या अजीर्णावर हें द्रव्य
नारळ- तांदळाचें धुवण.	तूप- लिंबाचा रस
गहूं- काकडी	मक्याचें कणीस- ताक
लिंबाचा रस- सैंधव मीठ	उडीद- ताक
मूग- आंवळा	तूर- कांजी
दूध,खवा,मलई- मुंगाचें कढण	आंबा- दूध
साखर- सुंठ	ऊंस- आलें
श्रीखंड- दूध	केळें- तूप, वेलदोडा
संत्र- गूळ	फणस- केळें
मीठ- तांदळाचें धुवण	चणा- मुळा
बदाम- लवंग	पीठ- थंडपाणी
मासोळी- आंबा	सूरणकंद- गूळ
गूळ- सुंठ, नागरमोथे	मनुका- लवंग

कांजीची कृति

कोरा मातीचा घडा घेऊन त्याला आंतून सरसोंचें मोहोरीचें तेल (सर्षप तैल) लावावें. त्यांत साडे चार शेर पाणी घालावें, व बारीक केलेल्या मोहोऱ्या दोन तोळे, जिरें ४ तोळे, सैंधव मीठ चार तोळे, हिंग सव्वा तीन तोळे, सुंठ चार तोळे, हळद चार तोळे, भात (तांदूळ शिजवून तयार केलेला) चार तोळे, वेळूचा पाला (ओल्या पानांचा) चार तोळे, तांदुळांची पेज दहा तोळे, कुळथी (कुलत्थ) चें वरण दहा तोळे व उडदांचें वडे दहा तोळे हें सर्व पदार्थ घालून त्यांवर झांकण ठेवून संधीला कपडमाती करावी. याप्रमाणें तीन दिवस आंत आसव तयार होऊं देऊन, नंतर त्या मिश्रणाला वस्त्रगाळ करावें. या द्रव्याला कांजी असें म्हणतात. हें द्रव्य भेदक, शौचास साफ करणारें, मूत्र विपुल करविणारें (Which increases the quantity of Urine in the body), उष्ण, तीक्ष्ण, रुचिकर, आंबट, पाचक आणि हलके असें आहे. याचा लेप केला असतां (अंगावर चोळले असतां) दाह आणि ज्वर यांची शांति होते. हें प्यालें असतां कफ, वात, शूल, सूज, भ्रम, दाह मूर्च्छा, पित्तज्वर, अजीर्ण, आध्मान (पोट फुगी) व मलावष्टंभ यांचा नाश करतें.

या कांजींत भिजविलेलें वडे फार रुचिकर, शीतवीर्य, कफकर आणि दाह, शूल आणि अजीर्ण या तिहींचा नाश करतात.

कांजींचा उपयोग नेत्ररोगानें पीडित मनुष्यानें कधींहि करूं नये.

वाचकांचा पत्रव्यवहार

अभिनन्दन

१-१२-५२ च्या आयुर्वेद पत्रिकेंत शिरपूर कागजनगर येथील खादी कार्यालयाची जाहिरात पाहिली. मला अत्यंत समाधान वाटलें. ग्रामोद्योग, ग्रामपंचायत, खादी कार्यालय ह्या संस्थांमधील माणसें उच्च ध्येयानें व सेवाभावानें प्रेरित झालेली असतात. त्यामुळें ह्यांचेकडून विश्वसनीय माल मिळण्याची शक्यता अधिक असते.

उलटपक्षीं ह्या संग्रहाचें निमित्तानें त्यांचे ज्ञानांत व धनांतहि भर पडण्याचा संभव पुष्कळ असतो. असें हें स्वार्थ व परमार्थ साधन खादी कार्यालयानें हस्तगत करून, ताज्या वनस्पती पुरविण्याचा अत्यन्त स्तुत्य असा हा उपक्रम आरंभिला, ह्याबद्दल मी त्यांचे हार्दिक अभिनन्दन करतों.

पनवेल —पु. वि. धामणकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद व ग्रामोद्धार

मुंबई राज्याच्या अंदाजपत्रकांतील एक गोष्ट अत्यंत लक्षांत ठेवण्यासारखी आहे, आणि ती ही कीं सरकारनें आयुर्वेद विद्यालयांना दिली जाणारी ग्रँट (मदत) ही ग्रामोद्धार खात्यांत खर्च दाखविली आहे.

खरें पाहतां ही मदत शिक्षण अगर आरोग्य-खात्यांत नांवें पडावयास पाहिजे. परंतु प्रत्यक्षांत तसें घडत नाहीं.

सहाजिक असा प्रश्न निर्माण होतो कीं आयुर्वेदीय शिक्षणाकडे सरकार ग्रामोद्धाराच्या दृष्टिकोनांतून पहाते कीं काय? आणि तसें असेल तर ग्रामोद्धाराच्या दृष्टीनें खर्च होणारी ही रक्कम अत्यल्प अशीच आहे.

— बाळ देशपांडे

अधिक शिक्षण व संशोधन

मुंबई सरकारनें खाजगी कंपन्या, व्यापारी कंपन्या अथवा मॅन्युफॅक्चरिंग कंपन्या यांतून शास्त्रीय स्वरूपाचें काम करणाऱ्या नोकरांना व इतर खाजगी व्यक्तींना हाफकिन इन्स्टिट्यूटमध्यें फी घेऊन शिक्षण घेण्याची अथवा संशोधनकार्य करण्याची सवलत सुरु केली आहे.

फीच्या दरासंबंधीची सविस्तर माहिती हाफकिन इन्स्टिट्यूट, मुंबई या पत्त्यावर पत्रव्यवहार करून मिळविता येईल.

गांवठी वैद्यकीवर कर

नासिक जिल्हा लोकल बोर्डानें बिगर शेती धंद्यावरील नियम नं. १४ प्रमाणें १९५२-५३ [१] सालासाठीं वैद्यकी [गांवठी] धंद्यावर कर रक्कम रु. ५ बसविला आहे, व त्याप्रमाणें वैद्यांना नोटिसा दिल्या आहेत.

त्याबाबत कांहीं तक्रार असल्यास १५ दिवसाच्या आंत अध्यक्षाकडे अर्ज करावा. अर्जाची चौकशी होऊन तजवीज करण्यांत येईल असें, त्या पत्रांत म्हटलें आहे.

वैद्य पंडितांवर खुनी हल्ला

घोडनदी (जि. पुणें) येथील वैद्य सदाशिवराव पंडित यांजवर सोमवार ता. १५-१२-५२ रोजीं रात्री जंबियाचा खुनी हल्ला झाला. जोडीदार बरोबर होता म्हणून प्राणांत टळला. अंधारांत बुरखा घेतलेल्या एका इसमानें मागून लाठी डोक्यांत हाणली व नंतर जंबियाचा हल्ला केला. हल्लेखोर ओळखला गेला. तो सध्यां फरारी आहे.

वैद्य पंडित यांच्या डाव्या बरगडीखालीं पोटांत २॥ इंच जखम झाली असून सर्जन घारपुरे यांनीं पोटाचें ऑपरेशन केलें आहे.

खेड्यांत वैद्यांनीं व्यवसायासाठीं जावें हे म्हणणें सोपे आहे. पण तेथें किती विपरीत परिस्थितींत जीवन कंठावें लागतें या संबंधीचा एक लेख पत्रिकेंत नुकताच आला आहे. घोडनदी हें तालुक्याचें ठिकाण आहे, व तेथें वैद्य पंडित हे एक प्रमुख नागरिक आहेत. त्यांची पत्नी तेथील म्युनिसिपालिटीच्या सभासद आहेत.

मागील निवडणुकींत डॉ. लागू हे याच विभागांतून मुंबई विधिमंडळांत निवडून आले होते व वैद्य पंडित यांनीं त्यांना चांगलीच मदत केली होती.

राजवट बदलली असली तरी खेड्यांतून अद्याप गुंडाचेंच राज्य चालू आहे व त्याला अधिकारीवर्ग आळा घालू शकलेला नाहीं.

—-०—-

नागपूर येथें

“ आयुर्वेद सेवा संघा ” चीं

सर्व खात्रीलायक औषधें मिळण्याचें एकमेव ठिकाण--

श्रीपरांडे बंधु

महाल रोड, नागपूर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९ व्या कर्नाटक आयुर्वेद संमेलनाचे अध्यक्ष
वैद्य मरुलाराध्यशास्त्री यांचा संक्षिप्त परिचय

वैद्य मरुलाराध्यशास्त्री

(३१ डिसेंबर १९५२ व १ जानेवारी १९५३ या दोन तारखास कर्नाटक प्रांतीय आयुर्वेद संमेलनाचे १९ वें अधिवेशन सोलापूर येथें भरत आहे. त्याच्या अध्यक्षपदीं विजापूर येथील वैद्यभूषण मरुलाराध्यशास्त्री यांची निवड झाली आहे.)

वैद्य मरुलाराध्यशास्त्री शान्तवीरय्या सिरिवाळ-मठ यांचा जन्म रामदुर्ग संस्थानांत इ. स. १९०० सालीं झाला. हे वीरशैव सद्वंशीय माहेश्वर आहेत.

बालपणींच आई वडील परलोकवासी झाल्यामुळें व घरची गरिबीची परिस्थिति असल्यामुळें शिक्षणाची व प्रकृतीची हेळसांड झाली. परन्तु महत्वाकांक्षी व धाडसी स्वभावामुळें अशाहि परिस्थितीला तोंड देऊन त्यांनीं प्राथमिक शिक्षण पुरें केलें. २ वर्षें शिक्षकाची नोकरी केली. पुढें सौंदत्ती तालुक्यांतील हुली गांवीं ज्योतिषाचें शिक्षण घेतलें.

काशीमध्यें वैद्यकीय अध्ययन

ज्योतिषशास्त्र व आयुर्वेदशास्त्र शिकण्याकरितां संस्कृत भाषा आवश्यक असते म्हणून काशीस जाऊन त्याचा अभ्यास केला. प्रथम १९२७ सालीं संस्कृत साहित्य मध्यमा परीक्षा उत्तीर्ण झाले. पुढें साहित्य-तीर्थाचा अभ्यास सुरूं केला. परन्तु प्रकृतीनें त्यांना दगा दिला. नामांकित बंगाली सिव्हिल सर्जन यांनीं फार दिवस जगणार नाहींत असें सांगितलें. परन्तु हिंदु विश्वविद्यालयांतील आयुर्वेद कॉलेजचे प्रिन्सिपल वैद्य पं. सत्यनारायणशास्त्री यांनीं औषधोपचार करून त्यांना बरें केलें व त्यांच्याच प्रेरणेनें त्यांनीं पुढें आयुर्वेदाचा अभ्यास सुरूं केला. ३ वर्षें अध्ययन करून वैद्यभूषण पदवी मिळविली.

मुनवळ्ळी येथें व्यवसाय

मायदेशीं परत आल्यानंतर मुनवळ्ळी येथें औषधालय सुरुं केलें. परंतु त्यांचे सहाध्यायी स्वामीनीं बोलावल्यावरून औषधालय बंद करून विजापूर मुक्कामीं एका संस्कृत वैदिक पाठशालेंत अध्यापक म्हणून गेले.

निराहार सत्याग्रह

प्रथमपासून सार्वजनिक कार्य करण्याची आवड असल्यानें १९३०च्या काँग्रेसचे आंदोलनांत त्यांनीं हिरिरीनें भाग घेतला. प्रथम ६ महिन्याचा व नंतर २॥ वर्षांचा कारावास भोगला. ६।७ दिवस धर्मपत्नी श्री. शिवबायव्वासह आहार न घेतां परदेशी कापडाचे दुकानावर सत्याग्रह केला. त्याचा तेथील व्यापाऱ्यांवर खूप परिणाम झाला. त्यांनीं काँग्रेसचा प्रचार विजापूर जिल्ह्यांत केला. रामदुर्ग संस्थानांतहि कार्य केलें. परंतु पुढें काँग्रेसच्या पुढाऱ्यांची विचारसरणी न पटल्यामुळें सुभाषबाबूंच्या पक्षांत प्रवेश केला. सध्यां ते पुरोगामी पक्षाचे कर्नाटक प्रांताचे अध्यक्ष आहेत. त्यांनीं 'आझाद हिंद' नांवाचें पाक्षिकहि एक वर्षपर्यंत चालविलें होते.

शास्त्री हे निःस्वार्थी, निर्भय, महत्वाकांक्षी व खंबीर वृत्तीचें असल्यानें त्यांच्या नव्या नेतृत्वाचा फायदा कर्नाटकास अवश्य होईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार

लातूर संमेलनाच्या तारखा पुढें ढकलल्या

लातूर येथें म. प्रां. वैद्य संमेलन मार्चच्या २२।२३ तारखास भरविण्याचा विचार झाला आहे असें १६ नोव्हेंबरच्या आयुर्वेद पत्रिकेंत छापून आलें आहे. गेले अधिवेशन पनवेल येथें मेमध्यें झालें. दरसालं संमेलन भरविण्याची पद्धत चांगली आहे, पण एक वर्ष पुरे न होता १० महिन्यांनींच संमेलन भरविणें आवश्यक आहे काय असा मला प्रश्न विचारावासा वाटतो.

यंदा महाराष्ट्रांत सर्वत्र दुष्काळी परिस्थिति आहे. त्यामुळें सर्वत्र व्यवहारांत मंदीचें वातावरण पसरलें आहे. त्याचा वैद्यांच्या मिळकतीवर परिणाम हा होणारच. संमेलन भरविणाऱ्या मंडळींना पण या दिवसांत निधि जमविणें जड जाईल.

संमेलनासाठीं स्वागत मंडळाला सहज ५-७ हजार रुपये खर्च येतो, व जवळ जवळ तितकेच रुपये येणाऱ्या प्रतिनिधि, कार्यकर्ते व प्रेक्षक मंडळींचे खर्च होतात. हा १०-१५ हजाराचा खर्च जर पुढें ढकलला गेला तर बरें.

सबब प्रांतीय वैद्य संमेलनाचें येतें अधिवेशन लौकर न भरवितां दिवाळीच्या अगर नाताळाच्या सुमारास भरवावें असें मला वाटतें. — एक वैद्य

बोर्ड फॅकल्टी प्रतिनिधि संमेलन

पश्चिम बंगालच्या आयुर्वेदीय स्टेट फॅकल्टीनें पुढाकार घेऊन भारतांतील राज्यांतून स्थापन झालेल्या सर्व आयुर्वेदीय बोर्ड व फॅकल्ट्या यांच्या प्रतिनिधींचें एक संमेलन ता. २४ रोजीं कलकत्ता येथें भरविलें. त्यासाठीं मुंबई आयुर्वेदिक बोर्डाचे सभासद वैद्य प्रतापकुमार व वैद्य हिंमतलालमुनी हे गेले होते.

या संमेलनांत मांडण्यासाठीं पेप्सू, दिल्ली आदि आयुर्वेदीय बोर्डांनी निवेदनें तयार केली आहेत. व त्यांत आज होत असलेली आयुर्वेदाची गळचेपी स्पष्टपणें निदर्शनास आणली आहे.

या संमेलनाचें उद्घाटन राष्ट्रपति बाबू राजेंद्र प्रसाद यांनीं केलें.

मोहता आयुर्वेद सदन

आयुर्वेदद्वारा जनतेची सर्वांगीण सेवा करण्यासाठीं राजस्थानांतील उदयपूर येथें मोहता आयुर्वेद सदन झालें आहे. या संस्थेतर्फे मोहता सार्वजनिक औषधालय, रसायन शाळा, अनुसंधान विभाग आणि धन्वतरी आयुर्वेद आसन अशा चार शाखा चालविण्यांत येत आहेत.

बापालालभाईंची व्याख्यानें

ता. २४ नोव्हेंबर पासून ५ डिसेंबर अखेर मुंबई राज्य सरकारच्या सूचनेनुसार अहमदाबाद येथील बी. जे. मेडिकल कॉलेजमध्यें सुरतेच्या ओच्छवलाल नाझर आयुर्वेदिक कॉलेजचे प्रमुख आचार्य बापालाल वैद्य यांची १२ व्याख्यानें झालीं. त्यांनीं आपल्या भाषणांत आयुर्वेदाच्या मूलभूत सिद्धांतांचें स्पष्ट विवेचन केलें, व आयुर्वेदाच्या सर्व अंगाचा परिचय करून दिला.

व्याख्यानांच्या समाप्तीच्या दिवशीं कॉलेजचे प्रिन्सिपाल डॉ. बरवे म्हणाले ‘ जेथें आधुनिक वैद्यकाची कक्षा संपते तेथूनच आयुर्वेदाच्या विज्ञानाचा प्रारंभ आहे. ’ झालेल्या व्याख्यानाबद्दल त्यांनीं संतोष व्यक्त केला.

याच प्रकारची व्याख्यानें २ वर्षांपूर्वी येथें डॉ. प्राणजीवन मेहेता व पुणे येथें वे. पं. गुणेशास्त्री व वैद्य भा. वि. गोखले यांची झाली होती.

ओच्छवलाल नाझर आयुर्वेद महाविद्यालयाचे पदवीधर श्री. जयशंकर पंड्या रेडिओलॉजीचा विशेष अभ्यास करण्यासाठीं २ वर्षांकरितां चिकॅगो आंतरराष्ट्रीय कॉलेजमध्यें दाखल होण्यासाठीं गेले आहेत. या शिक्षणाचा संपूर्ण खर्च अमेरिकेची ती संस्था करणार आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

०२९५१५

आबूपर्वतावर आयुर्वेदाचें विश्वविद्यालय !

मुंबई प्रांतांत आयुर्वेदाचें संशोधन करण्यासाठीं समिति नेमली आहे. तिचे काम विनाविघ्न कसें चाललें आहे तें आमच्या वाचकांना परिचित आहेच.

पाटण (गुजरात) आयुर्वेद महाविद्यालयाच्या निधींतून बडोदा विश्वविद्यालयांत एक संशोधन कार्य चालवयाचें आहे असेंहि प्रसिद्ध झालें आहे.

तिसरें संशोधनकार्य मध्यवर्ति सरकारच्या खर्चानें जामनगर येथें सुरू व्हावयाचें अशा जाहिराती कधींपासून लागलेल्या आहेत व त्यासाठीं डायरेक्टरचा शोध चालू आहे. व ह्या सर्व ठिकाणचें संचालकांची निवड विशेषतः डॉ. म्हसकर यांच्या दृष्टिकोनांतून चालू आहे असें कळतें.

अहमदाबाद येथें प्रसिद्ध होणाऱ्या चरक साप्ताहिकांत एक चांगली विचारणीय सूचना आली आहे. ती अशीः—

मुंबई सरकारनें आयुर्वेद विद्यापिठाची स्थापना आबूपर्वतावर करावी. कारण भगवान् धन्वतरींनीं असें लिहिलें आहे कीं, सोम आदि महत्वाच्या सर्व औषधी अबूपर्वतावर आहेत. (सर्व विन्धियास्त्वौषध्यः सोमश्चापि अर्बुदे गिरौ । चिकित्सास्थान अध्याय ३० श्लोक १३ वा) वसिष्ट आश्रम हें स्थान यासाठीं सर्वोत्तम स्थळ आहे. त्याठिकाणीं जी खुली जागा आहे ती सुमारें २।३ हजार विद्यार्थ्यांना राहण्यास सहज पुरू शकेल एवढी मोठी आहे. सरकार मनांत आणील तर या जंगलांत उत्पन्न होणाऱ्या वनस्पति सर्व मुंबई प्रांताला पुरवितां येतील.

त्याचप्रमाणें प्रांतांतील आजारी लोकांना उपचारासाठीं हें स्थान उत्तम आहे. गुजराथमध्यें उत्तम हवापाण्याचें एकहि रुग्णालय नाहीं. सर्व जगांत हें आदर्श विद्यापीठ होऊं शकेल.

या विद्यापीठांत आयुर्वेद महाविद्यालय, स्त्री पुरुष विभाग असलेलें रुग्णालय, सर्व प्रांतांसाठीं सरकारी आयुर्वेदीय औषधी निर्माण शाळा, विद्यार्थी वसतिगृह, आयुर्वेदीय ग्रंथालय व प्रांतांतील लोकांना व अमलदारांना आराम घेण्यासाठीं रमणीय स्थळ होईल. जनता सेवक व लष्करी अधिकारी यांच्यासाठींहि सर्व आदर्श व्यवस्था ठेवतां येईल.

ही सूचना करण्याचें कारण भगवान् धन्वन्तरी-नीच त्या ३० व्या अध्यायांत आबूपर्वताचें वैशिष्ट्य वर्णन केलें आहे. उंच शिखरें, तीर्थ, सिद्ध ऋषि, सुर यांनीं आपल्या निवासानें पुनीत केलें आहे. सिंह, गज निरनिराळे खनिज धातु व वनस्पति यांनीं हा पहाड समृद्ध आहे.

पण ज्या सरकारी अधिकारी लोकांना व आरोग्य मंत्र्यांना मुंबई खेरीज बाहेरची स्थानेंच आयुर्वेदाचे संशोधन करण्याला निरुपयोगी वाटतात त्यांना वरील सूचना - विचारपूर्ण असली तरी कशी रुचणार ? ‘ चरक ’ साप्ताहिक

आयुर्वेद पत्रिकेनें आतांपर्यंत प्रकाशित केलेले

१ प्राणाचार्य देवधर विशेषांक किं. १ रु.
२ प्राणाचार्य ऐनापुरे विशेषांक ,, १ रु.
३ वैद्यतीर्थ आप्पाशास्त्री साठे विशेषांक ,, १ रु.
४ वैद्यरत्न त्र्यंबकशास्त्री विशेषांक १ रु.

हे चार विशेषांक प्रत्येक वैद्यानें आपल्या संग्रही अवश्य ठेवावेत. आपल्या संग्रही नसल्यास आजच ॲडव्हान्स पाठवून मागणी करा. (ट. ख. वेगळा.)

फारच थोड्या प्रति शिल्लक आहेत. मागाहून मिळणार नाहींत.

वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नासिक शहर आरोग्यदिन

नासिकच्या नागरिकांनीं ता. ३० नोव्हेंबर १९५२ रोजीं लोकांत आरोग्याची भावना व वृत्ति जागृत व्हावी म्हणून एक आरोग्यदिन साजरा केला. रोटरी क्लब, मेडिकल असोसिएशन, नासिक व शहर वैद्यमंडळाचें सदस्य यांनीं नागरिकांच्या सहकार्यानें हा कार्यक्रम पार पाडला.

वॉर्ड कमिट्यांचे निमंत्रक वैद्य

सकाळीं शहराच्या अंकरा भागांना भेटी देऊन आरोग्यदृष्ट्या त्यांची पहाणी करण्यांत आली. या कार्यक्रमास शहर वैद्यमंडळाचा एक एक सभासद होता. त्याचे बरोबर एक रोटेरियन, एक डॉक्टर व एक म्युनिसिपल कौन्सिलर होता. यांची एक एक कमिटी वॉर्डाप्रमाणें तयार केली होती. ह्या कमिट्यांचे बरेचसे निमंत्रक वैद्यांपैकीं होते.

मिरवणुकींत वैद्यांचा भाग

नंतर गांवांतून फारच मोठी मिरवणुक काढण्यांत आली. यांतहि शहरवैद्यमंडळाच्या बऱ्याच सदस्यांनीं भाग घेतला. मिरवणुकींतील घोषणा, फलकें आदि बनविण्याचें काम शहर वैद्यमंडळाच्या सदस्यांनीं केलेलें होतें.

प्रदर्शनांत आयुर्वेद विभाग

मिरवणुक संपल्यावर लगेच प्रदर्शन उद्घाटन अध्यक्षांचें हस्तें झालें. प्रदर्शन येथील म्युनिसिपल हॉलमध्यें भरविण्यांत आलें होतें. प्रदर्शन पाहाण्यास गांवांतील १५ ते १६ हजार प्रेक्षक येऊन गेल्याचें समजतें. प्रदर्शनांत आयुर्वेद विभागाला स्वतंत्र स्थान होतें. यांत आहार द्रव्यें, भाज्या, फळें, नित्योपयोगी घरगुती औषधी द्रव्यें आदि ठेवण्यांत आली होती. पदार्थांची मांडणी व सजावट चांगल्यापैकीं होती. शुष्क द्रव्यें, वगैरे उत्तमपैकीं स्टॅपर्ड बाटल्यांतून ठेवण्यांत आली होती. शहर वैद्य मंडळाचे सेक्रेटरी वैद्य लोखंडे व अध्यक्ष वैद्य दाते यांनीं या कामीं बराच पुढाकार घेतला होता.

आरोग्य विषयक व्याख्यानें व चित्रपट

सायंकाळीं संवाद, भाषणें व आरोग्यविषयक चित्रपट दाखविण्याचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमांत डॉ. खाडिलकर, डॉ. शुक्ल व वैद्य बिंदुमाधवशास्त्री पंडित यांनीं आरोग्यविषयक व्याख्यानें दिलीं. आरोग्यदिनाच्या या कार्यक्रमाची सर्व व्यवस्था वैद्य वि. म. गोगटे यांचेकडे होती.

प्रदर्शन दुसऱ्या दिवशींहि खुले होते. प्रदर्शनाचा आयुर्वेदीय विभाग लोकांच्या दैनंदिन जीवनांतील असल्याकारणानें लोकांना त्याबद्दल अधिक आपलेपणा वाटला.

शहर वैद्य मंडळाचा भाग

आरोग्य दिन समितीच्या एकंदर कार्यक्रमांत नासिक शहर वैद्य-मंडळानें खूपच मोठा भाग उचलला. रुपये पन्नासची देणगीहि वैद्य-मंडळानें दिली. गांवांतून वर्गणी जमविण्याकरितांहि वैद्य-मंडळाचे सदस्य हिंडले व वर्गणी जमविली. शहरांतून लावण्यांत आलेली भिंती पत्रकें, घरांघरांतून वाटण्यांत आलेली सूचनापत्रकें, शाळांच्या प्रत्येक वर्गांतून लावण्यांत आलेल्या सूचना, हॉटेलस् मधून आरोग्यविषयक देण्यांत आलेल्या सूचना, घोषणा, फलकें आदि बनविण्याचें कामीं शहर वैद्य मंडळाचे सदस्य वैद्य गोगटे यांची बरीच मेहनत नासिक आरोग्यदिन समितीला उपयोगी पडली.

आतां नासिक शहराच्या आरोग्याचे दृष्टीनें एक नासिक शहर आरोग्य मंडळ बनविलें आहे. त्याची घटना बनविण्यांत वैद्यांनीं भाग घेतलेला असून स्थापन झालेल्या मंडळांतहि वैद्य सभासद आहेत. या आरोग्य दिनाच्या निमित्तानें जनतेतील आरोग्य प्रचार कार्यासाठीं नासिक शहर वैद्य मंडळास खूप वाव मिळाला व जनसंपर्कहि अधिक चांगल्या तऱ्हेनें साधता आला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय औषधीकरण :

लेखकः—
वैद्य पु. वि. धामणकर
आयुर्वेदभूषण

कल्क-चूर्ण-गुटिका-वटिका-वर्ति

कल्क (वाटलेला गोळा)

स्वरस व रस ह्यांत द्रव्यांतील फक्त द्रवभागच येतो. पण द्रव्यांतील प्रत्येक घटकांस कांहींना कांहीं गुण असतात. ह्या न्यायानें द्रव्यांतील सर्व घटकांच्या गुणांचा लाभ एकसमयावच्छेदें करून घ्यावयाचा असतो, तेथें हा प्रकार योजतात. ह्यांत द्रव्यांतील सर्व अवयव व द्रव्यें येतात. ह्याचीं पर्यायनांवें– प्रक्षेप, आवाप. मराठी नांव– चटणी.

मूळ कल्पना व पुस्ती

'ओल्या वनस्पतीचे रस–पिष्टादिकांचे गोळ्यास कल्क म्हणावें.' ही चरक आचार्यांची मूळ व्याख्या. तीस 'ओल्याप्रमाणें शुष्क द्रव्यांचाहि कल्क करावा;' ही वाग्भटानें पुस्ती जोडली. शार्ङ्गधरानें दोन्ही कल्पना सरसहा मान्य केल्या.

प्रक्रिया

ओलें द्रव्य धुवून पुसून स्वच्छ व कोरडें करावें. सुकें द्रव्य कुटून वस्त्रगाळ करून समभाग पाण्यांत भिजत घालावें. फुगूं द्यावें. हें आर्द्रद्रव्य पाटावर-वंट्यावर वाटून अगर दांतांत रगडून सुसूक्ष्म करावें.

सेवनविधि

गूळ साखर समभाग घ्यावा; मध तूप तैल दुप्पट घ्यावे. पाणी, दूध चौपट घालून सांगितल्याप्रमाणें सेवन करावा.

आयुर्वेदीय औषधीसंशोधन
हिंदी वा मराठी आवृत्ति किं. १ रु.
लेखकः—वै. पु. धामणकर, आयुर्वेदभूषण
वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

प्रमाणः—कल्क व सहयोगी द्रव्य ह्यांची निवड व योग्य मानें दोषदूष्यादि विचारांत घेऊन ठरवावींत. ग्रंथोक्त सामान्य मान १ तोळा आहे.

उपयोगः- १ औषधीप्रक्रियेंत २ औषधीयोजनेंत.

कल्क उपयोग प्रकार

- कल्क
  - १ औषधी प्रक्रिया
  - २ औषधीयोजना
    - आभ्यंतर
      - सार्वदेहिक
      - स्थानिन
    - बाह्य
      - सार्वदेहिक
      - स्थानिन

औषधीयोजनेचीं उदाहरणें:—

१ आभ्यंतर { सार्वदेहिक–रक्तपित्तावर अर्जुनकल्क दुधाबरोबर पिणें.
स्थानिन–अरुचीवर – खजूरकल्क तोंडांत चघळणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२ बाह्यः- सार्वदेहिक-दाह शमण्यास-चंदन, कापूर उगाळून अंगास लावणें
स्थानिक-उंदराचें दंशभागीं-अतिविष कल्क लावणें.

चूर्ण

वाळलेला पदार्थ बारीक केला कीं त्याला 'चूर्ण' ही संज्ञा लागू होते. पर्यायनांवें-रज, क्षोद. मराठी नांव-पूड.

पदार्थ बारीक करण्याचे प्रकार

कुट्टनम् - कुटणें, कांडणें, सडणें इ.
दलनम् - दळणें, भरडणें, इ.
भंजनम् - मोडणें, तोडणें, कापणें, फोडणें, चिरणें, तासणें, चोचवणें इ.
मर्दनम् - रगडणें, मळणें, घांसणें, खलणें, वाटणें, चुरणें, कुसकरणें इ.
विलेखनम् - किसणें, खवणें, खरवडणें इ.

क्रिया-प्रकार

वरील विधींत दोन प्रकारच्या क्रिया प्रामुख्यानें होतात-१ उभी २ आडवी. पहिल्या क्रियेंत प्रामुख्यानें आघात, तर दुसरींत घर्षण असतें. ह्या क्रिया हस्त वा शक्तीयंत्रानेंहि होऊं शकतात.

चूर्णविधींतील माननीय गोष्टी

१जोर Force, २गति Velocity, ३घर्षण Friction, ४ आघात Stroke, ५ वजन Weight, ६ उष्णता Heat, ७ काल Time, हवा Air

पदार्थांमधील सर्व घटक निर्वेध राहतील ह्या बेतानें ह्या गोष्टी विचारांत घ्याव्यात.

चूर्ण-प्रकार

आयुर्वेदांत जवळ जवळ चौसष्ठ प्रकारचे औषधीकल्प आहेत. ते कल्प, त्यांचें कार्य व स्थान लक्षांत घेऊन कोणत्या औषधाचें चूर्ण किती सूक्ष्म करावें, हें ठरवावयाचें असतें. चूर्णाच्या सूक्ष्मत्वाचे पांच प्रकार प्राधान्यानें पडतात. त्यांत हे चौसष्ठ प्रकार बसवावयाचे असतात; उदाहरणार्थ—

संस्कृत	इंग्रजी	मराठी	कल्प	सूक्ष्मत्व
स्थूल	Coarse	भरड	चूर्ण, धूम, कषाय, इ.	१०ते४४
पृथु	Moderate Coarse	भगरा	फांट इ.	२०ते६०
पट	Moderate Fine	सूक्ष्म	कल्क, हिम, लेप इ.	४४ते८५
सूक्ष्मतर	Finer		पर्पटी, गुटिका, वटिका, पोट्टली अंजन, इ.	८५
सूक्ष्मतम	Finest		भस्म-पिष्टी, भस्में	१२०

हे प्रकार करावयाचीं साधनें

सुतीकापड	पत्र्याची चाळणी,	घोड्याचे केसांची चाळणी
रेशमीकापड	तारेची चाळणी	वेताची चाळणी
तागी कापड	दोरीचीं चाळणी	वेळूची चाळणी

ही याची साधनें होत.

ह्या साधनांची निवड चूर्ण्य पदार्थांची जाति व त्याचे सूक्ष्मत्वाची अपेक्षा यावरून करावयाची असते.

वेळूच्या काड्यांनीं केलेली, तारांची विणलेली किंवा दोर (गुण) गांठवून केलेली, अशी तीन प्रकारची चाळण नेहमीं स्थूलद्रव्यें चाळण्याला ठेवावी. आणखी दुसऱ्या देखील (लहान मोठ्या) वेळूच्या चाळण्या असाव्यात; लघु-बाहल्याच्या सालीच्या दोराच्या, सेवरीच्या सालीच्या दोराच्या, किंवा कळकाच्या अकुराच्या चार अंगुळें विस्ताराच्या अशा

यः पिंडो रसपिष्टानां स कल्कः परिकीर्तितः। चरक सू. अ. ४

उपलदशनादि पिष्टस्तु कल्कः। अ. सं. क. अ. ८

कल्कः पिष्टो द्रवाप्लुतः। अ. हृ. क. अ. ६

द्रव्यमार्द्रशिलापिष्टं शुष्कं वा सजलं भवेत्। प्रक्षेपावापकल्कास्ते। शा. म. खंड, तन्मानं कर्षसंमितम्। शा. म. खंड

कल्के मधु घृतं तैलं देयं द्विगुणमात्रया। सितागुडौ समौ दद्याद्द्रवा देयाश्चतुर्गुणाः॥ शा. म. खंड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

युक्तीनें केलेल्या चाळणी उत्तम उपयोगी पडतात. दुरडी मुंडाहात व्यासाची व बोकडाच्या कातड्यानें मढवलेली असावी.

अत्यंत सूक्ष्म चूर्ण (वस्त्रगाळ) होण्यासाठीं घोड्याच्या शेपटीच्या केसांनीं गुंफलेल्या किंवा चाळतां येण्यासारख्या जाड कापडानें ताणून मढविलेल्या चाळणीनें तें गाळून घ्यावें.

प्रक्रियाः-वनस्पतीमध्यें स्निग्ध, रूक्ष, चिवट इ. प्रकार असतात. पावसाळ्यांत चिवट, चापट वनस्पती कुटल्या जात नाहींत. इतर वनस्पतीहि पावसाळा सोडून इतर ऋतूंत चांगल्या कुटल्या जातात.

चूर्णांचे प्रकार

चूर्ण खनिज, उद्भिज्य वा प्राणिज पदार्थांचें असूं शकतें. तसेंच तें एकाकी, मिश्र किंवा भावितहि असूं शकतें. उदा. चित्रकादि चूर्ण, भास्करलवण चूर्ण, लवणत्रितयादिचूर्ण.

भावनाविधिः- सर्व चूर्ण चांगल्या तऱ्हेनें भिजेल इतका द्रव त्यांत घालून तें हालवून सुकविणें याला भावना म्हणतात.

सेवनविधिः- कल्काप्रमाणेंच चूर्णाबरोबर गूळ समभाग घ्यावा. साखर, मध, तूप, तैल हे पदार्थ दुप्पट, तर पाणी किंवा दूध चौपट घ्यावेत.

मात्राः- सामान्यतः ॥ तोळा.

टिकाऊपणाः- चूर्ण साध्या स्थितींत सहा महिन्याहून अधिक टिकत नाहीं. पण तें हवाबंद भांड्यांत ठेवतां आलें, तर टिकाऊ होईलसें वाटतें.

१ शुष्कपिष्टः सूक्ष्मतान्तवपटच्युतश्चूर्णः ॥ तस्य समस्तद्रव्यापरित्यागाद्प्लुतपयोगात्कदभेदः अ. सं. क. अ. ८

२ चूर्णोऽप्लुतः । अ. हृ. क. अ. ६

३ अत्यंतशुष्कं यद्द्रव्यं सुपिष्टं वस्त्रगालितम् । तत् स्याच्चूर्णं रजः क्षोदः । शा.

४ तन्मात्रा कोलसंमिता । शा. म. खं.

५ चूर्णे गुडो समो देयो शर्करा द्विगुणा मता । लिह्याच्चूर्णं द्रवैः सर्वैं घृताद्यैर्द्विगुणो गुड, पिबेच्चतु- र्गुणैरेवं चूर्णमालोडितं द्रवैः ॥ शा. म. खंड

६ द्रवेण यावता सम्यक् चूर्णं सर्वं प्लुतं भवेत् । भावनायाः प्रमाणं तच्चूर्णे प्रोक्तं भिषग्वरैः । द्र. गु. वि.

वैष्णवीभिः शलाकाभिर्निर्मिता ग्रथिता गुणैः!
कीर्तिता सा सदा स्थूलद्रव्याणां गालने हिता ॥
चूर्णचालनहेतोश्च चालन्यन्यापि वंशजा ।
कर्णिकारस्य शाल्मल्या हरिजातस्य कम्बया ॥
चतुरङ्गुलविस्तारयुक्तया निर्मिता शुभा ।
कुण्डल्यरत्निविस्तारा छागचर्माभिवेष्टिता ॥
वाजिवालाम्बरानद्धतला चालनिका परा ।
तया प्रचालनं कुर्याद्वतुं सूक्ष्मतरं रजः ॥

गुटिका-वटिका-वर्ति.

हा कल्प चूर्णाचे पुढचा. चूर्णापेक्षां ह्यांत परिश्रम, टिकाऊपणा नि गुण आधिक. ह्यांत पदार्थांचें मिश्रण चांगल्या तऱ्हेनें करून द्रवाचे साहाय्यानें गोळ्या करणें, ह्याच विधींना प्राधान्य आहे. ह्यांत संरक्षक अगर वीर्यवर्धक अशा पदार्थांना स्थान नसल्यानें हे कल्प उत्तानकार्यकारी व अल्पजीवी ठरतात. पण ते ह्याच कार्याकारितां संयोजिले आहेत.

ह्या कल्पांत गुटि, गुटिका, वटी, वटिका, वटक आणि वर्ति अशा अनेक संज्ञा समाविष्ट आहेत. आकारभिन्नतेवरून ह्या संज्ञा पडल्या असाव्यात. ग्रंथांतरीं ह्या सर्वांचे अर्थ निश्चित केलेले आढळत नाहींत. आज तें काम करावयाचें म्हटलें, तर तें अशक्य आहे असें, नाहीं. उदाहरणार्थ—

गुटिका-लहान आकाराची गोळी.
उदाहणार्थ-अमृतवटी.

गुटि-मध्यम आकाराची गोळी. उदा.-पाचकगुटी

वटिका-अर्धगोल चापट लहान टिकडी.
उदा.-अष्टांगलवण टिकडी.

वटी-अर्धगोल चापट मध्यम टिकडी.
उदा.-लसूणवटी.

वटक-गोल पण उभट चापट गोळी.
उदा.-लूणवटक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मागध मानपरिभाषेंत "माषैश्चतुर्भिः शाणस्याद्वरणः स निगद्यते । टंकः स एव कथितस्तद्द्वयं कोल उच्यते । क्षुद्रको वटकश्चैव द्रङ्क्षणः स निगद्यते ।" असें म्हटलें आहे. त्यावरून वटक अर्ध्या तोळ्याचा असतो हें उघड आहे. तेव्हां सूरणवटक अर्ध्या तोळ्याचा असायला पाहिजे.

वर्ति

वर्ति म्हणजे वात. ही लांबट असते, गोलहि असते. हिची दोन्ही टोकें निमुळती असून मधला गाभा डेरेदार असतो. हिची जाडी व लांबी अनिश्चित असतात. डोळ्यांत फिरविण्याकरितां लहान आकार अपेक्षित असतो. धूपाकरितां वर्ति करतात. त्याचा मधला भाग आंगठ्याएवढासुद्धां जाड असूं शकतो.

प्रक्रियाः— पाटावरवंट्यावर वांटून गोळ्या करतां येतात. एवढी मेहनत ह्या कल्पास पुरेशी होते.

टिकाऊपणा —१ वर्ष

१ वटकाश्चाथ कथ्यंते तन्नाम गुटिका वटी ।
मोदको वटका पिंडी गुडो वर्तिस्तथोच्यते ॥

२ द्रवेण यावता द्रव्यमेकीभूयार्द्रतां व्रजेत् ।
तावत्प्रमाणं कर्तव्यं भिषग्भिर्भावना विधौ ॥
भाव्यद्रव्यसमं क्वाथ्यं क्वाथ्यादष्टगुणं जलम् ।
अष्टांशशेषितः क्वाथो भाव्यानां तेन भावना ॥

३ हीनत्वं गुटिकालेहौ लभेते वत्सरात्परम् । शा.

—×—

समन्वय वैद्यकी

पत्रिकेच्या १।१२।५२ च्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या डॉ. र. कृ. गर्दे M. B. B. S. यांच्या (माझ्या दि. १६।११।५२ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या गुदस्थ वातप्रकोपाच्या चिकित्सा लेखावरील) अभिप्रायाबद्दल डॉ. गर्दे यांना धन्यवाद.

वस्तुथिति तशी नाहीं

मात्र एका बाबतींत डॉ. गर्दे यांचा थोडा गैरसमज झालेला दिसतो. त्यांची समजूत अशी झालेली दिसते कीं रुग्णांस येथें व्हिटामिन बी दिलें गेलें. त्यानेंच मुख्यतः "रोग उतारास लागला." पण वस्तुस्थिति मात्र तशी नाहीं. बी-कॉम्प्लेक्स [B Complex] इंजेक्शन ५ व्या दिवशीं प्रथम दिलें गेलें. पण रुग्णांत लक्षांत भरण्यासारखी सुधारणा ही आधींच्या ४ दिवस जी सर्वस्वी आयुर्वेदीयचिकित्सा झाली त्यामुळेंच होय हें निस्संशय. एकंदर इंजेक्शनें ह्या ८० दिवसांच्या चिकित्सेंत ८ च झालीं.

वैद्याचीं इंजेक्शनें-गुळाचा चहा

सामान्यतः वैद्यांकडे येणारा रोगी आधींच ॲलोपाथिक चिकित्सा व त्या चिकित्सेंत महत्वाचा भाग समजली जाणारीं इंजेक्शनें घेऊन निराश झाल्यावरच येत असतो. व वैद्यानेंहि त्याच्या चिकित्सेची सुरवात पुन्हां इंजेक्शनानेंच करतो म्हणजे ही गोष्ट त्याला रुचत वा पटत नाहीं. कांहीं दिवस शुद्ध आयुर्वेदीय उपचार होऊन निश्चित सुधारणा दिसूं लागल्यानंतरच चालू आयुर्वेदीय चिकित्सेस पूरक अशी अन्नद्रव्यें वा औषधिद्रव्यें इंजेक्शनरूपानें देणें आयुर्वेदीय दोष दृष्टीनेंहि सोईचें, होऊं शकतें (कारण तीं द्रव्यें आहारांत घेण्यास तो राजी नसतो) असें त्याला पटवल्यानंतरच तो वैद्याचें इंजेक्शनास राजी होतो. एरवीं इंजेक्शनें वा पाश्चात्य चिकित्सा जी वैद्यांचें हातून होते त्याकडे पत्रिकेंत मागें एक लेखांत म्हटल्याप्रमाणें "गुळाचा चहा" अशा भावनेनें रोगी पहातात, व हें तर आपणास टाळावयाचें आहे.

हीं पूरक आहारद्रव्यें होत

यकृत्सत्व व व्हिटामिनें यांची गणना मी पूरक आहारद्रव्यें या सदरांत करतो. व मूळलेखांतहि मीं त्यांचा उल्लेख औषधांच्या यादींत न करतां पथ्यापथ्य व आहारविहार यांचेमध्येंच केला आहे. अर्थात चिकित्सेंत या इंजेक्शनांचा उपयोग इतर कोणत्याहि युक्त आहाराइतका झाला असणारच. पण याहून अधिक नाहीं. हीं इंजेक्शनें उपलब्ध नसती तर या रुग्णांत रोज एक ताजा काढा करून द्यावा लागला असतां इतकेंच. युद्धकाळीं जेव्हां चांगल्या जातीचीं इंजेक्शनें मिळत नव्हतीं तेव्हां असें करीतच होतो.

—वैद्य जे. के. सबनीस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पंचवार्षिक योजनेतील आरोग्यविषयक कार्यक्रम

पंचवार्षिक योजनेंत अंतर्भूत असलेला आरोग्यविषयक कार्यक्रम पुढील क्रमवारीनें आहे.

(१) पाणी पुरवठा व आरोग्यरक्षणाची तरतूद
(२) मलेरिया नियंत्रण
(३) स्थिर आरोग्य-केंद्रें व फिरतीं आरोग्य केंद्रें या द्वारां ग्रामीण जनतेच्या आरोग्याची प्रतिबंधक स्वरूपाची काळजी
(४) माता व मुलांकरितां आरोग्य विषयक व्यवस्था
(५) शिक्षण, तयारी शिक्षण व आरोग्यविषयक शिक्षण
(६) औषधें व साहित्य यांबाबत स्वावलंबन आणि
(७) कुटुंब नियोजन व लोकसंख्या-नियंत्रण

वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य योजना सुमारें ९९·५ कोटी रु. खर्चाच्या असून त्यांपैकीं मध्य सरकारचा वांटा १७·८७ कोटी रु. आहे.

मदतनीसांच्या शिक्षणाची सोय

वैद्यकीय कार्यक्रमांच्या एकूण ४७·३८ कोटी रु. खर्चापैकीं ५० टक्यांहून अधिक रुग्णालयें व दवाखान्यासाठीं, आणि सुमारें ४० टक्के वैद्यकीय शिक्षणावर खर्च होईल. वैद्यकीय शिक्षणाच्या योजनांत, अेक अखिल भारतीय वैद्यकीय संस्था स्थापण्याखेरीज, आसाम, मुंबई, मद्रास, मध्यप्रदेश, पश्चिम बंगाल, त्रावणकोर-कोचीन यामध्यें नव्या वैद्यकीय कॉलेजांची स्थापना, सध्यांच्या वैद्यकीय विद्यालयांचा दर्जा वाढविणें आणि परिचारिका, सुईणी आणि कंपाउंडर यासारख्या मदतनीसांच्या शिक्षणाची सोय अधिक करणें, या गोष्टींचा समावेश होतो.

रुग्णालयांची व दवाखान्यांची वाढ

रुग्णालयें व दवाखानें आणि त्यांतील खाटांची संख्या यामध्यें पुढीलप्रमाणें वाढ अपेक्षित आहेः—

	१९५०-५१	१९५५-५६ पर्यंत	वाढ
रुग्णालयांची संख्या	२०१	२०६२	५%
दवाखान्यांची संख्या			
(शहरांत)	१३५८	१६९५	
(ग्रामीण)	५२२९	५८४०	
रुग्णालयांतील खाटा	१,०६,४७८	१,१७,२२२	
दवाखान्यांतील खाटा			
(शहरांत)	२०१३	२२३३	
(ग्रामीण)	५०६६	५५८२	

मलेरिया व क्षयरोग प्रतिबंधक

सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीनें मलेरिया हा भारतात महत्वाचा प्रश्न आहे. मलेरिया योजनेंतील प्रत्यक्ष अंमलबजावणी कार्यक्रमांत सुमारें २० कोटी लोकसंख्येच्या ग्रामीण भागांत जंतुनाशकांचे फवारे मारणें आणि मलेरिया विरोधी औषधांचे उपचार यांचा समावेश होतो. कमी खर्चांत डी. डी. टी. चा पुरेसा पुरवठा व्हावा म्हणून डी. डी. टी. चे दोन कारखाने उभारण्याचा समावेश योजनेंत आहे.

मलेरिया खालोखाल क्षयरोग हा महत्वाचा आरोग्यविषयक प्रश्न आहे. या योजनेंत सामान्यतः आरोग्यालयें, रुग्णालयें व दवाखाने यांची तरतूद, रुग्णांसाठीं असलेल्या खाटांच्या संख्येंत वाढ, बी. सी. जी. लस टोंचण्याच्या तुकड्या यांचा समावेश होतो.

गुप्त रोगांचे नियंत्रण, प्रसूति व बालसंगोपन, वैद्यकीय शिक्षण व संशोधन अित्यादींसाठीं खास शिफारसी करण्यांत आल्या आहेत.

मातेच्या आरोग्याच्या दृष्टीनें व मुलांचें नीट संगोपन होण्याच्या दृष्टीनें मर्यादित कुटुंब असणें अवश्य आहे. कुटुंब नियोजनाच्या योजनांसाठीं ६५ लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे.

पोदार मेडिकल कॉलेज (आयु.) मुंबई

पोदार मेडिकल कॉलेज (आयु.) मुंबई या संस्थेचें स्नेहसंमेलन व वार्षिक उत्सव ता. २९-१२-५२ रोजीं झाला. अध्यक्षस्थानीं आरोग्यमंत्री श्री. शांतिलाल शहा हे होते.

पोदार कॉलेजचे विद्यार्थी औषधी वनस्पति निरीक्षणासाठीं नासिक-त्र्यंबकेश्वर येथें जाण्याचा विचार करीत आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार

कुरुपावर आयुर्वेदीय प्रयोग !

अहमदाबाद शहरांतील विशेषतः गिरण्यांच्या मजूरपेशाच्या लोकांत शेकडा ७० टक्के माणसांच्या पायांना कुरुपें असतात. (मराठी- कुरुपे, गुजराथी- कणी, पायाच्या तळभागाच्या चामडीला मिरी किंवा वाटाण्याएवढ्या जागेंत रक्तप्रवाह बंद झाल्यामुळें त्या जागेची चामडी दगडासारखी घट्ट होते व तेवढाच गोळा वर उपसून येऊन चालतांना खिळे लागल्यासारखा बोचतो.)

या रोगाला डॉक्टर लोक नेहेमींच ऑपरेशनचा उपाय सुचविणार हे निश्चित. परन्तु येथील कांहीं सुप्रसिद्ध वैद्य मंडळीकडूनहि या रोगाला ऑपरेशन-शिवाय दुसरा कांहीं उपाय नाहीं असें सांगण्यांत येतें. आमच्या समजुतीप्रमाणें जसें पत्रिकेंत त्या विषयाची चर्चा झाल्यामुळें सर्पदंशावर द्रोणपुष्पीचें नांव बाहेर आले. त्याप्रमाणें या विषयाला पत्रिकेंतून चालना मिळाल्यास या रोगाला ऑपरेशनशिवाय बरे करणारी " झांकली माणकें " महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून पुष्कळशी पडलेली असतील व याचा योग्य तो उपाय जाहीर होईल.

— ताराबाई दत्तात्रय आणेकर

—— ० ——

महाकुष्ठ विशेषांक

वैद्यकाची व विशेषतः आयुर्वेदाची गेली ५० वर्षें सेवा करीत असलेल्या भिषग्विलास (अहमदनगर) मासिकानें महाकुष्ठ विशेषांक काढून रोग्यांना व समाजाला अनुभवाचा व शास्त्रीय ज्ञानाचा संग्रह सादर केला आहे.

महाकुष्ठाबाबतची रोग्यांची कल्पना व त्या रोग्यांबाबत समाजाला वाटणारी भीति व किळस ही एवढी विकोपाला गेली आहेत कीं त्यामुळें महाकुष्ठ म्हटले कीं अंगास कांटाच उभा राहातो व महारोग्यांचे जीवन अतिशय खडतर होतें.

स्वतःला माणुस समजणारी माणसेहि महाकुष्ठ झालेल्या माणसाला अज्ञानानें व भीतीनें माणसांतून उठवून टाकतात.

पण महाकुष्ठ विशेषांकातील तपस्व्यांचे लेख वाचलें कीं सामान्य जनतेला तर दिलासा वाटेलच; पण रोग्याच्या आत्मिक बलाची वाढही होईल. असा हा उपयुक्त व संग्राह्य विशेषांक काढल्याबद्दल आम्ही भिषग्च्या संपादकांचे अभिनंदन करतो.

वि. म. गोगटे

—— ० ——

मृद्वस्थि (रिकेट्स) वर बाह्योपचार

माझा मुलगा वसंत वासुदेव कुलकर्णी मुक्काम येवलें हा दोन वर्षांपासून रिकेट्स (मुडदूस अगर शिवल्याची बाधा) या रोगानें आजारी होता. प्रख्यात डॉक्टरांचा सल्ला मसलत घेऊन व औषधें घेऊन त्यास पोटांत औषधें देऊन थकलों. परंतु कर्मधर्म संयोगानें किंवा मुलाचें कर्म उत्तम म्हणून मला या रोगावर रंगनाथ स्वामी राहणार वैराग (बार्शी) यांनीं एक सोपें व गुणकारी औषध सांगितलें. त्याप्रमाणें तें तयार करून फक्त एक वेळ अगर दोन वेळां मुलाच्या पायास पोटास व हातास त्या औषधाचा रस लावल्यावर एका आठवड्याच्या आंत मुलगा उड्या मारावयास लागला; व टुण्टुणीत झाला. त्या औषधाचा तपशील पुढीलप्रमाणें आहे.:-

(१) माल कांगोणीचा ओला पाला, (२) विड्याचीं ५ पानें, (३) सुपारी, (४) चुना, (५) कात आणि (६) लवंग.

वरील सर्व जिनसा एकत्र कुटून त्याचा रस काढावा. व तो रस वर लिहिल्याप्रमाणें मुलांचे हातास पोटास व पायास लावावा. त्यानंतर २ तासांनीं मुलांचें अंगास तेल लावावें व आंघोळ घालावी. असें १ अगर २ वेळ केल्यानें रोग नाहींसा झाला. दुसऱ्या मुलांना हेंच औषध मी सांगितलें व त्याचाहि तो रोग गेला, असें मी पाहिलें आहे.

—वासुदेव बळवंत कुळकर्णी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

' योगरत्नाकर ' ग्रंथ कधीं लिहिला गेला ?

श्री. गोडे व श्री. कात्रे यांचें संशोधन

आयुर्वेदांतील प्राचीन ग्रंथ कधी निर्माण झाले, कोठें निर्माण झाले याविषयीं निश्चित माहिती मिळणें कठीण आहे. पण योगरत्नाकरासारखा अलीकडील २-३ शें वर्षांपूर्वी झालेल्या ग्रंथाचा काल व त्याचा लेखक कोण हें कळूं नये ही आश्चर्याची गोष्ट आहे. याला कारण आपल्या लेखन पद्धतीतील कांहीं दोष हें आहे.

स्थलकालाचा अनिर्देश

अनेक लोकांना आपल्या लेखनावर स्थल कालाचा निर्देश करण्याची संवय नसते. साधी पत्रें पाठवितांना सुद्धां तारीख, आपला पत्ता लिहावयास कितीतरी लोक विसरतात व आळस करतात.

पी. के. गोडे यांचा पहिला लेख

१८८८ सालापासून योगरत्नाकर ग्रंथ छापला जात आहे. व तो ग्रंथ सर्व भारतांत मान्यता पावला आहे. भांडारकर प्राच्य संशोधन मंदिराचे प्राचार्य पी.के. गोडे यांनीं 'भारतीय विद्या' चे मासिकांत एक लेख लिहून योगरत्नाकर निर्मितीचा काल इ. स. १६५० ते १७५० या दरम्यान असावा असें म्हटले.

योगरत्नाकरांत तमाखूचे गुणधर्म

तमाखु हा हिंदुस्थानांत प्रथम १६०५ सालीं विजापूर दरबारांत पाहिला असें निर्णयसिंधु लेखकानें १६१२ साली आपल्या ग्रंथांत लिहून ठेवले आहे व तमाखूचे गुणधर्म योगरत्नाकारांत आले आहेत त्याअर्थी त्याच्या गुणधर्मांचा अनुभव येण्यासाठीं ४०।५० वर्षांचा काल लोटला जाणें स्वाभाविक आहे.

लोलिंबराजाचा उल्लेख

योगरत्नाकारांत जुन्नरचे वैद्य लोलिंबराज यांनीं लिहिलेल्या वैद्य जीवनांतील कांहीं उल्लेख आले आहेत. व वैद्यजीवनाचा लेखनकाल १६ व्या शतकांतील अखेर असा आहे.

कात्रे यांचा आधार

भारतीय विद्या त्रैमासिकाच्या नोव्हेंबर १९५२ मध्यें प्रसिद्ध झालेल्या अंकांत श्रीयुत सदाशिव ल. कात्रे यांनीं लेख लिहून योगरत्नाकर हा १६९७ नंतर लिहिला गेला असें सिद्ध केले आहे.

वैद्य विलास ग्रंथाचा काल

योगरत्नाकरांत (निर्णयसागर १९१९ ची आवृत्ति) पान ३९५ वर वैद्य विलास ग्रंथातील एक श्लोक, पिष्टाच (व) सारिवापर्णं दृढ दंतेषु धारयेत् । पतन्ति दन्तकीटाश्च चाञ्चल्यं हरति क्षणात् ॥ (अनंत-मुळाची पानें दांतांत घट्ट धरली असतां दांतांतील किडे पडतात व दांत हलत नाहींत.) दिला आहे. हा ग्रंथ मनोहर आडनांवाच्या रघुनाथ पंडित ऊर्फ राघव राहणार चंपावती (चौल जि. कुलाबा) यांनें नोव्हेंबर १६९७ (कार्तिक शके १६१९) मध्यें लिहिला असें ग्रंथांचे शेवटी लिहून ठेवलें आहे.

सबब योगरत्नाकर हा १६९७ नंतर लिहिला गेला आहे असें सिद्ध होत आहे.

धी अँग्लो आयुर्वेदिक फार्मसी, अंजनगांव (वऱ्हाड)

शुद्ध गुळवेल सत्व १ शेर – १० रु.	प्रवाळ भस्म (चंद्रपुटी १ शेर – ६० रु.	मंडूर भस्म नं. १ १ शेर - रु. ४०	वंग भस्म १ शेर–६० रु.
अभ्रक भस्म १००पुटी १० तोळे – ६० रु.	लोह भस्म १ शेर – ६० रु.	सुवर्ण माक्षिक भस्म १ शेर – ६० रु.	कांतलोह भस्म १ शेर – ८० रु.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वनस्पति-तूप भेसळ समितीच्या शिफारसी

मे १९५१ मध्यें डॉ. थिरुमलराव यांचे अध्यक्षतेखालीं नेमलेल्या तूप भेसळ समितीनें शिफारसी केल्या आहेत त्यापैकीं दोन शिफारसी भारत सरकारनें स्वीकारल्या.

बादोअिन-चांचणी

(१) वनस्पति तूपाची 'बादोअिन टेस्ट' (चांचणी) करतां यावी म्हणून त्यांत तिळाचें तेल मिसळावें. या योगानें रंगांत फरक पडत नाहीं. नगरपालिका व इतर संस्थांनींहि तुपांत वनस्पतीची भेसळ आहे कां हे पहाण्यासाठीं ह्या चाचणींचा उपयोग करावा. कारखान्यांतून बाहेर वनस्पति पडतांना बादोअिन चाचणींत उतरल्याचे प्रशस्तिपत्र द्यावें.

वनस्पतींच्या पोषण मूल्यांची वाढ

(२) वनस्पतींच्या पोषण मूल्यांची वाढ व्हावी म्हणून त्यांत कृत्रिम 'अ' जीवनसत्व घालण्यांत यावें. तें किती प्रमाणांत घालावें, हें प्रमाण सरकारनें ठरवावयाचें आहे.

वनस्पतीला दृश्य रंग

तिळाचें तेलाबरोबर 'कॉंसेन्ट्रेट केरोटिन तेल वनस्पतीमध्यें मिसळावे म्हणजे त्यास नारिंगी रंग येईल, व त्यामुळें वनस्पति ओळखता येईल. परन्तु या शिफारसीला समितीचे सभासद पं. ठाकूरदास भार्गव व डॉ. पटवर्धन यांनीं विरोधी मतें दिलीं आहेत. ते म्हणतात "वनस्पति आरोग्यास हानिकारक नाहीं असें सिद्ध झालें आहे. त्यामुळें तें तयार करण्यावर व आयातीवर सरकारला बन्दी घालता येत नाहीं." केरोटिन तेलाचा रंग तापविल्यानें अगर कांहीं दिवस ठेवल्यानें नाहींसा होतो. शिवाय केरोटिन तेल आणण्यासाठीं डॉलरच्या स्वरूपांत १ कोट रुपये प्रतिवर्षी खर्च येईल. शिवाय किती प्रमाणांत रंग द्यावयाचा हें सरकारनें ठरवावयाचें आहे. व त्यासाठीं सरकारला प्रयोग करून नंतर हें ठरवावें लागेल.

सबब फक्त पाहिल्या दोन शिफारसी सरकारनें स्वीकारल्या आहेत.

अध्यक्षांचा दौरा

म. प्रां वैद्यमंडळाचे अध्यक्ष वैद्य बिंदुमाधव पंडित हे ता. २३ डिसेंबर पासून पूर्व खानदेशच्या दौऱ्यावर गेले. या दौऱ्यांत त्यांनीं नशिराबाद, भुसावळ, फैजपूर, यावल, जळगांव हीं गांवें घेतली. वैद्य मंडळीच्या चिकित्सालयांना भेटी, सभा म प्रां. वैद्य मंडळाचे सभासद नोंदणे, देणग्या मिळविणें इत्यादि कामें झाली. या शिवाय ठिकठिकाणच्या चिकित्सकांच्या चिकित्सेंत विशेष गोष्टी त्यांनीं संवाद रूपानें जाणून घेतल्या. समाजांस डॉक्टरवर्ग, मिश्र चिकित्सक यांचा जसा उपयोग होतो, तसाच केवळ आयुर्वेदीय चिकित्सकापासूनहि लाभ होतो असें आढळून आले. युनानी औषधी प्रयोग वापरणारे कांहीं यशस्वी चिकित्सक त्यांना भेटले. भुसावळचे वैद्य ज. वा. मोकाशी त्यांनीं २५ रुपये देणगी दाखल दिले. मंडळ त्यांचे आभारी आहे.

सोलापूरास भेट

सोलापूर येथें ता. ३१, १ रोजीं भरणाऱ्या कर्नाटक प्रां. वैद्य संमेलनाचे वेळीं म. प्रां. वैद्य मंडळाचे अध्यक्ष वै. बिंदुमाधव पंडित हे हजर राहणार आहेत. तेथून परत येतांना अहमदनगर, संगमनेर, अश्वी या गांवांतील वैद्य मंडळीची ते भेट घेतील.

—ः विक्रेत्यांना सूचना ः—

आयुर्वेद सेवा संघ नाशिक या संस्थेची १९५३ची दिनदर्शिका (कॅलेंडर्स) तयार होत आली असून लवकरच ती सेवा संघाच्या विक्रेत्यांना पाठविण्यांत येणार आहेत. तरी प्रत्येक विक्रेत्यानें आपली मागणी त्वरित पाठवून आपणांस किती कॅलेंडर्स लागतील ते कळवावे. तसेंच औषधी मागणीहि यावी म्हणजे त्यासोबत पाठविणें सोयीचें होईल. मंत्री,

आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर
पहिल्या उजळणी वर्गाचा अहवाल

(लेखकः — उजळणी वर्गांतील एक वैद्य विद्यार्थी)

मुंबई आयुर्वेद फॅकल्टीनें जाहीर केल्याप्रमाणें वैद्यांसाठीं सुरू करण्यांत आलेल्या उजळणी वर्गाचा उद्घाटन समारंभ ता. २२ आक्टोबर रोजीं डॉ. अ. वि. केतकर यांच्या अध्यक्षतेखालीं झाला.

कै. गुणेशास्त्रीबुवांच्या पश्चात् संस्थेची धुरा डॉक्टर केतकरांचे वर आहे व त्या स्थानीं बसण्या-इतपत योग्यता त्यांच्याजवळ आहे. गेलीं २५ वर्षे विद्यालय संस्थेशीं त्यांचा संबंध आहे. कोणत्याहि मानमरातबाची अपेक्षा न करतां कष्ट करण्याची त्यांची तयारी आहे.

डॉ. गो. वि. केतकर व डॉ. विमलाबाई

डॉ. केतकरांचे धाकटे बंधु गो. वि. केतकर M.S., F.C.P.S. हे विद्यालय संस्थेशीं नवीनच परिचित झाले आहेत. त्यांच्या सुविद्य पत्नी मिसेस् विमलाबाई केतकर M. B. B. S., D. G. O. या M. D. च्या परीक्षेला मुंबईला गेल्या असल्यानें त्या पहिल्या दिवशीं उपस्थित नव्हत्या. उभयतांचा आलेला हा संस्थेशीं संबंध मोठा शुभप्रद आहे व त्यांनीं या संस्थेचें अपत्यवत् संगोपन करण्यासारखी त्यांची पात्रता आहे.

उपप्रमुख वैद्यराज एस्. आर. देशपांडे

संस्थेचे व्हाइस प्रिन्सिपॉल श्री. देशपांडे वैद्य हे आयुर्वेदतीर्थच आहेत. आयुर्वेदावर निश्चित श्रद्धा असलेल्या तीक्ष्ण बुद्धीचा विद्वान् ब्राह्मण म्हणून त्यांची गणना करण्यास हरकत नाहीं. त्यांची उपस्थिति व आयुर्वेदाचे निदान चिकित्सा शिकविण्याची पद्धति मोठी अभिनव वाटली.

कोर्सला सुरुवात

डॉ. गो. वि. केतकर यांचीं अस्थिभंग, ॲंटी-बायोटिक्स, सर्जिकल इमर्जन्सी यांवर व्याख्यानें झालीं. ते स्वतः अस्थिविकारतज्ञ असल्यानें हाडांचे सांधे, त्यांचे विकार, अस्थिभंग, ते बसविणें वगैरे विषय त्यांनीं चांगल्या रीतीनें समजावून सांगितले सर्जन असल्यामुळें कांहीं ऑपरेशन्स दाखविलीं.

वरच्या पायरीवरून व्याख्यानें

डॉ. मिसेस् विमलाबाई केतकर या नुकत्याच M. D. ला उपस्थित झाल्या आहेत. त्यांचें ज्ञानहि अद्यावत् आहे. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व चांगलें आहे. परंतु कांहीं इंग्रजी चांगलें न समजणाऱ्या वैद्यांना जरा अडचण भासत असे. तथापि त्या आपल्या व्याख्या-नाचा आशय वरचेवर समजाऊन सांगत. Cord Presentation ची एक प्रसूति करून दाखविली. मूल लवकर रडेना, त्यामुळें बाईसुद्धां गडबडून गेल्या. प्राणवायु वगैरे दिल्यानंतर मूल रडू लागलें. कृत्रिम श्वसन, कोरॅमिन देऊनसुद्धां मूल श्वसन करीना. त्यानंतर ऑक्सिजनचाच खरा उपयोग झाला.

डॉ. अ. विं. चीं २२ व्याख्यानें

डॉ. अ. वि. केतकरांचीं व्याख्यानें २०।२२ तास झालीं. वास्तविक १।१ तासच दररोजच्या कार्य-क्रमांत होता, परंतु वैद्यांच्या आग्रहास्तव व डॉक्टरांच्या चांगुलपणामुळें रोज सतत दोन तास एकच विषय उत्तम रीतीनें समजावून सांगितला जात होता. त्यामुळें फारच चांगली उजळणी झाली. श्वसनसंस्था, पचन-संस्था, रुधिराभिसरणसंस्था या अतिशय महत्वाच्या विषयावर डॉ. केतकरांनीं चांगलें विवेचन केलें. गेलीं २५ वर्षांचा शिकविण्याचा व्यासंग व समोर बसलेला श्रोतृवर्ग हा खराखुरा कळकळीनें आलेला, त्यामुळें वक्ते व श्रोते दोन्ही तन्मय होऊन जात.

डॉ. कुलकर्णी यांचीं सॅनिटेशन व हायजिन यांवर व्याख्यानें झालीं. विषय रूक्ष असूनहि व फार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोठा असतांना थोड्या वेळांत महत्वाचे मुद्दे त्यांनीं विशद करून सांगितले.

प्रत्यक्ष ज्ञानाचा अभाव

वैद्यराज जोग यांचेकडे वनस्पतीबद्दलचें विवेचन दिलें होतें. त्यांनींहि आपल्या पद्धतीनें २० वनस्पतींचें विवेचन केलें. परंतु त्यांची प्रत्यक्ष चिकित्सा रुग्णालयांत व्हावयास पाहिजे व एकेक वनस्पतींचे निश्चित उपयोग ठरविले जाऊन नंतरच यांचें वैद्यांना मार्गदर्शन होऊं शकेल. खरोखर खेड्यापाड्यांतून उपलब्ध असलेल्या वनस्पतीचा उपयोग रोगहर म्हणून निश्चिपणें दाखविला गेल्यास हल्लींच्या महाग Antibiotics जगांत ती चिकित्सा स्वस्त पडेल. परंतु रोग्यांस अशा प्रकारच्या वनस्पतींचा उपयोग करण्यास सांगितलें तर त्याला तें पटत नाहीं व तो त्याकडे तुच्छतेनें पाहतो. इतका जनतेचा व वैद्यांचा दृष्टिकोन बदललेला आहे. तेव्हां हा जो एक सामाजिक दृष्टिकोन निर्माण झाला आहे तो बदलला जाणें जरूर आहे. वनस्पतीची चिकित्सा यशस्वी रीत्या करून दाखविणें हें शास्त्रज्ञाचें व एकाद्या सुसज्ज रुग्णालयांतच अधिक शक्य आहे. त्या दृष्टीनें श्री. करंदीकर वैद्य यांनीं एक पुस्तक लिहिलें आहे. तेव्हां त्यांच्याकडे हा विषय दिला असता तर अधिक बरें झालें असतें. किंवा जे वैद्य वनस्पतींचीच चिकित्सा करतात व ज्यांचा अधिकार तसा आहे त्यांना पाचारण करणें हें वैद्यांच्या दृष्टीनें जास्त उपयोगी ठरलें असतें. अन्यथा एवढा मोठा वेळ खर्च करून तेथें येणाऱ्या वैद्यांचे कांहीं तास व्यर्थ गेल्यासारखें होतें. असो. यापुढील कार्यक्रमांत तरी अशा प्रकारें व्यवस्था करतां आल्यास ठीक होईल.

सौतिकाचें अध्यापन

तोच प्रश्न सौतिकाचा— सौतिक आयुर्वेदीय शिकविलें जावयास व आयुर्वेदाच्या हॉस्पिटलमध्यें त्या पद्धतीनें चिकित्सेचा, पूर्वी (Anti-natal) व पश्चात् उपयोग करून पाहिला पाहिजे. कांहीं विशेष नुकसान होणार नाहीं. परंतु त्यावरील अधिकारी वैद्य सहानुभूतीचा व्यक्तीनें शास्त्राविषयींचा दृष्टिकोन सहानुभूतीचा ठेवावयास पाहिजे. मधुकं शाकबीजं च वगैरे नऊ महिन्यांत सांगितलेले कषाय खरोखरीच यशस्वी होतात किंवा कसें याचा प्रत्यक्ष उपयोग तेथेंच पाहावयास मिळेल, व त्याच्या अवस्थाहि सांपडतील. प्रसूतीनन्तरची चिकित्सा आयुर्वेदाचे पद्धतीनें स्वीकृत केल्यास कांहीं सुपरिणाम, दुष्परिणाम दिसतात कां, याचा निश्चित आराखडा तेथेंच तयार होईल. आम्ही खेड्यांतून चिकित्सा करणारे वैद्य प्रतापलंकेश्वर, सुवर्णसूतशेखर आदि प्रयोगांचा उपयोग करतो तसा प्रसूती वेणा सुरू होण्याकरितां आपल्याकडे सांगितलेले प्रयोग तेथें करून पाहाण्यास प्रत्यवाय नाहीं. समजा, त्यापासून वेणा निश्चितपणें सुरू होतात किंवा नाहीं याचा १०० रुग्णावर काय परिणाम होतो हें कळेल. नाहींतर तुमची पाश्चात्यांची चिकित्सा तुमचें जवळ उपलब्ध आहेच. त्यांत घाबरण्याचें कारण नाहीं. फक्त अशा प्रकारची शास्त्राकरितां चालविली जाणारी सूतिकागृहें हीं आर्थिक दृष्ट्या परावलंबी होऊं नयेत व त्यावरील अधिकारी व्यक्तीला सूतिकागृह चालविण्याकरितां द्रव्याची विवंचना करण्याचा प्रसंग येऊं नये अशा प्रकारची व्यवस्था असावी.

शल्य शालाक्यांतील सुश्रुताचार्य

शल्य-शालाक्याचे बाबतींत तोच मुद्दा उपस्थित होतो. परन्तु त्या दृष्टिकोनांतून दुर्दैवानें पाहिलें जात नाहीं. कदाचित् इंटर-सायन्स घेऊन जे वैद्य आतां जी. ए. एफ. एम्. होतील यांतील एखादा सर्जन निपजल्यास व त्याला हे सर्व प्रयोग करून पाहाण्याची सद्बुद्धि झाल्यास आयुर्वेदीय वाङ्मयांतील कांहीं सूत्रांचा अर्थ निश्चितपणें लावतां येईल. असा एखादा सुश्रुताचार्य निर्माण होण्यावरच सर्व अवलंबून आहे. अन्यथा हे सर्व ग्रंथ ऐतिहासिक विभागांत जमा केल्यासारखें होणार आहे. असो—

गांवांतील तज्ञांचीं व्याख्यानें

येणें प्रमाणें कार्याची सुरवात झाली. गांवांतील प्रसिद्ध वैद्य भास्कर विश्वनाथ गोखले व वैद्यराज देशमुख यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रयत्नानें डॉ. अंडरसन, डॉ. कल्हे, डॉ. रानडे, डॉ. पवार, डॉ. म्हस्के, डॉ. मिसेस् पुंडे, डॉ. मुळे, डॉ. वाळिंबे यांचीं व्याख्यानें करविलीं. डॉक्टर अंडरसन यांचें मोठें हॉस्पिटल आहे व त्यांत निश्चित-पणें अनुभवास येणारे अनुभव ऐकावयास मिळाले. डॉ. रानडे यांनीं Cardiac Failure वर सुंदर विवेचन केलें व Coronary-thrombosis चें रोगी कशा कशा अवस्थेंतून जातात, यांचे वैद्याचें चाचणीसह ज्ञान दिलें. डॉ. पवार यांनीं अस्थिभंग व जलोदराचें रुग्णावर Bed side Clinic दिलें. डॉ. म्हस्के यांनीं Medico-legal विषय सांगितला.

डॉ. मुळे यांनीं प्रत्यक्षांत वैद्यांना येणाऱ्या महत्वाच्या रुग्णांबाबतची चिकित्सा सांगितली. डॉ. मिसेस पुंडे यांनीं वैद्यवर्गाकरितां विशेष परिश्रम घेतले. एक Delivery ची केस उत्तम रीतीनें करून दाखविली. संततिप्रतिबंधक साधनें या विषया-वर एक व्याख्यान दिलें. अतिशय उत्साहानें भरलेले असे त्यांचे तास झाले.

डॉ. कल्हे यांनीं डोळयांचे विकारावरची सहज सुलभ अशीं ४।५ औषधांची चिकित्सा निश्चित आश्वासनासह सांगितली कीं, जिचा उपयोग प्रत्यही डोळयाच्या रुग्णांत येतो.

अशा प्रकारच्या नगरमधील तज्ञ व्यक्तींनीं आमच्यासारख्या खेड्यांतून चिकित्सा करणाऱ्या एक एक वैद्याला ३।३ महिने जर शिकविलें तर ही वैद्य मंडळी आपआपल्या क्षेत्रांत अधिक कार्य निश्चितपणें करूं शकतील, अशा प्रकारचा आत्मविश्वास वैद्यांनीं प्रकट केला व शेवटच्या समारोपाच्या समारंभांत अशा प्रकारचें सहकार्य जिल्ह्यांतील तज्ञ डॉक्टरांनीं दिल्यास नगर जिल्ह्यातील सेंटर्स अधिक प्रभावी यशस्वी करून दाखविलीं जातील असें सांगितलें गेलें.

त्या दृष्टीनें जे वैद्य आयुर्वेदतीर्थ आहेत त्यांना D.A.S.F. चा कंडेंस्ड कोर्स मिळवून दिल्यास ज्यांना शक्य आहे ते तसा घेऊन त्या परीक्षेला बस-ण्याचा प्रयत्न करतील. ज्यांना तें शक्य नाहीं ते वैद्य तीन तीन महिन्याचा एक एक विषयांतील कोर्स घेतील, अशा प्रकारच्या वैद्यांचा दर्जा वाढविला पाहिजे. पूर्वी आयुर्वेद महाविद्यालयांत स्वतंत्र चिकि-त्सालयें नव्हतीं. त्यामुळें कांहीं विषय राहून गेले आहेत, त्यांची परिपूर्णता अशा वर्गामुळें होऊं शकेल. अशा प्रकारें सुमारें २६ दिवसांचा हा कार्यक्रम उत्तम रीतीनें पार पडला.

डॉ. म्हसकरांचा खुलासा

आयुर्वेद पत्रिकेच्या १६ डिसेंबर १९५२ च्या अंकामध्यें पान ३९७ वर 'डॉ. म्हसकरांना हजार कामें ! हा पहा पुरावा' या मथळयाखालीं किन्हईहून भिषग्रत्न ग. कृ. पाटणकर यांनीं कळविलेली माहिती छापली होती.

त्यावर डॉ. म्हसकर यांचेकडून खुलासा आला आहे तो असा:—"पत्रिकेंत छापलेल्या मजकूराबद्दल आभारी आहे. किन्हईचे श्री. गणेश कृष्ण पाटणकर यांचे रजिस्ट्रेशन रद्द करण्यांत नजरचूक झाली आहे. आमचेकडे श्री. गणेश कृष्ण पाटणकर नांवाचा दुसरा अर्ज आला होता व त्यांना रजिस्ट्रेशन नाकारण्यांत आलें आहे. त्या संबंधींचे पत्रावर चुकून किन्हईचे श्री. ग. कृ. पाटणकर यांचा पत्ता लिहिला गेला.

किन्हईचे वैद्य श्री. गणेश कृष्ण पाटणकर यांचें नांव रजिस्ट्रेशन करितां मान्य केलें गेलें असून त्यांचे रजिस्ट्रेशन रद्द केले गेले नाहीं."

आयुर्वेद सेवा संघ-नासिकचीं सर्व औषधें मुंबईत मिळण्याचें आणखी एक नवें केंद्र

रामकृष्ण एजन्सी

३६८ बी ३७० सुपारीबाग रोड

लालबाग, मुंबई १२

* मागणी रोज वाढत आहे. *

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार

पारदबंधासंबंधीं प्रयत्न

" रूमी हिंगुळ आणून लिंबूरसांत तो खलून डमरू यंत्रांतून पारद उठवून घेतला. पुनः त्यांत समभाग शुद्ध गंधक (तुपांत वितळवून गाईचे दुधाऐवजीं माकारसांत गाळलेला) घालून कज्जली केली. तिला कोरफडीच्या रसाचें एक पुट [भावना] देऊन त्या कज्जलीचा रससिंदूर बनविला तो रससिंदूर लिंबूरसांत खलून डमरू यंत्रांतून उडवून पारद घेतला.

पारद २॥ तोळे व भूनाग [गांडूळ] १० तोळे एकत्र खल ४ प्रहर केल्यानंतर त्याचा खलतां येईना इतका घन तयार झाला. नंतर तो गोळा केला. तेव्हां त्यांतून थोडा पारद सुटलेला दिसला. त्या गोळ्याबा आघाड्याच्या १० तोळे मुळ्यांच्या लगद्यानें बंद करून तो चांगलाच वाळविला व २॥ शेर गोवऱ्यांत अग्नि दिला.

आंतील द्रव्य उडून गेलें

गोळ्यावर अर्धा इंच [एक अंगुल] जाडीचा थर सभोंवतीं होता. तो जळून आंतील द्रव्य उडून गेलें. हातीं लागलें नाहीं.

पारद हें उडून जाणारें द्रव्य असल्यानें तें असें राहणार नाहीं. सुमारें १८ वर्षांपूर्वी मी वाजीकरण लोह तयार करतांना त्याला पारद, हरताळ, गंधक सोमल व कापूर यांची पुटें देतांना, हीं सर्वद्रव्यें उडून जाणारीं असल्यानें प्रत्येकाचीं ४।४ पुटें अर्थात् २० पुटें देऊन शेवटीं मला मूळ २० तोळेच लोहभस्म मिळालें. (नगरचे एक डॉक्टर यांना सदर भस्म मी करून दिलें होतें. त्यावेळचा हा अनुभव होता;) परन्तु भूनागांत ताम्र असतें व त्याचा पारदाशीं संयोग झाला म्हणजे खनिजपारद खनिजताम्र (शुद्ध द्रव्यें दोन्हीही) यांच्या संयोगापेक्षां खनिज-पारद (शुद्ध) भूनागांतील ताम्र (जीवनीय) यांचा संयोग कांहींतरी विशेष होत असावा अशा समजुतीनें मी हा प्रयोग केला.

खनिज-पारद व खनिज-ताम्र यांचा (शुद्धद्रव्यें घेऊन) संयोग, १९४३ सालीं श्यामसुंदराचार्य (काशी) यांच्या रसायनसार या पुस्तकांतील ताम्रभस्म करण्याच्या पद्धतीनें ताम्रमारणासाठीं मी केला होता व ताम्रभस्म व रससिंदूर कुपीपक्व करून मिळविलेला होता. नुसत्या ताम्रानें पारद बद्ध होईल पण गंधकानें तो होतो त्याप्रमाणेंच.

जवळ ग्रंथालय नाहीं. विचारविनिमयास कोणी नाहीं. कधीं काळीं विद्वानांपुढें शंका काढल्यास ते वेड्यांत किंवा मूर्खांत काढतात, म्हणून सांगावयाची शरम वाटते पण आयुर्वेदीय रसायनशास्त्र व पाश्चात्य विज्ञान यांत उघड उघड फरक आहे, ही गोष्ट साधा समगुण रससिंदूरहि पुरावा म्हणून सांगू शकेल. २०० पारद+३२ गंधक=हिंगूल =रससिंदूर ? पण आयुर्वेदांत २०० पारद+२००गंधक (समयुक्त) किंवा २०० पारद+४०० गंधक असें कां? आयुर्वेदीय समगुण, षड्गुणरससिंदुरांत विशेष आहे. उष्णतेनें अणुरचनेंत फरक पडत असला पाहिजे.

– वैद्य र. ह. आकळे

निर्वासित वैद्य डॉक्टरांच्या जाहिराती

मुंबई प्रांतांत वैद्य-डॉक्टरांना आपल्या नांवाच्या जाहिराती छापून वैद्यकीय व्यवसाय चालविण्यास वैद्यकीय नीतिनियमानुसार आडकाठी आहे. असें असतां वर्तमानपत्रांत वैद्य-डॉक्टरांच्या जाहिराती छापून आलेल्या दिसतात. त्याकडे देशी वैद्यक बोर्ड कां लक्ष पुरवित नाहीं? असा प्रश्न बोर्डाच्या सभासदास विचारला असतां त्यांनीं पुढील खुलासा केला.

ते म्हणाले ' आमचेंहि या गोष्टीकडे लक्ष आहे. आम्हीं बोर्डाच्या सभेच्यावेळीं याविषयीं चर्चा केली आहे त्यावेळीं अध्यक्ष डॉ. योध यांनीं असें सांगितलें कीं, वृत्तपत्रांत येणाऱ्या या जाहिराती बहुधा निर्वासित वैद्य-डॉक्टरांच्या असतात. व सध्यां त्यांच्या वाटेस जाण्यास सरकार नाखूष आहे. निर्वासिताला आपला देश सोडून यावें लागल्यामुळें या प्रांतांत त्यांनीं कोणताहि पोट भरण्याचा व्यवसाय कसाहि केला तरी तूर्त तिकडे कानाडोळा करण्याचें सरकारी धोरण आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पत्रक १ लें

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन

अधिवेशन नववें, लातूर (हैद्राबाद राज्य)

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाचें नववें अधि-[वे]शन, लातूर येथें मार्च १९५३ च्या शेवटच्या आठ-[व]ड्यांत भरणार आहे. स्वतंत्र लोकशाही कालांतील [है]द्राबाद राज्याच्या मराठवाडा विभागांत हें प्रथमच [भ]रत असल्यामुळें त्यास वैशिष्ट्यपूर्वक महत्व आहे. [य]ावेळीं सर्व वैद्य, आयुर्वेदप्रेमी व हितसंबंधीं यांनीं [ए]कत्र जमून आजची आयुर्वेदाची स्थिति व उत्कर्षो-[न्]मुख भवितव्य याबाबत विचारविनिमय करणें व [नि]श्चित स्वरूपाची योजना आंखणें जरूर आहे.

म्हणून सर्व मंडळींना प्रेमपूर्वक आग्रहाची [वि]नंति कीं, त्यांनीं स्वागत सभासद व्हावें, संमेलनास [आ]तीनें हजर रहावें व संमेलन सुव्यवस्थित यशस्वी [हो]ण्या पार पाडण्यासाठीं सहकार्य द्यावें.

दरसालप्रमाणें स्वागत सभासद फी पांच (५) [रु]पये व प्रतिनिधि फी तीन (३) रुपये ठेवण्यांत [आ]ली आहे. केवळ स्वागत सभासद फी व प्रतिनिधी [फी] यावर संमेलनाचा खर्च भागत नसतो. करितां [वैद्य]बंधूंनीं व आयुर्वेदप्रेमी लोकांनीं स्वागतसदस्यफी-[बरो]बरच यथाशक्ति देणगी देऊन कार्यास हातभार [ला]वावा. कळावें ही विनंति आपले नम्र

वैद्य, रामवल्लभ रामनाथजी व्यास, अध्यक्ष

[संमे]लन कार्यालयाचा पत्ताः—

[भा]रतभूषण औषधालय लातूर बी. एल. रेल्वे

टीपः– वैद्यबंधूंनीं म. प्रां वैद्य मंडळाची [वार्षि]क वर्गणी यासोबत देण्याची कृपा करावी. मंड-[ळा]च्या घटनेतील वार्षिक कालगणना कालांत गेल्या [वे]ळेल अधिवेशनात चैत्र शु. १ ते फाल्गुन वद्य [अ]ऐवजीं १ जानेवारी ते ३१ डिसेंबर असा बदल [झा]ल्यामुळें या खेपेस व्यवहाराच्या सोयीसाठी १ [एप्रि]ल १९५२ ते ३१ डिसेंबर १९५३ पावेतोंची [मंड]ळाची सर्व साधारण सदस्य फी पावणेदोन रुपये [पाठविण्या]बद्दल प्रांतिक कार्यालयाकडून विनंति आहे.

अनुक्रमणिका

विषय	पान
भारत सरकारची १५००० रु.ची देणगी	४०५
दोन महत्वाचे समारंभ	४०६
अपयशाची जाहीर कबुली	४०७
र. ट्रिब्यूनलचा सावळागोंधळ	४१०
चुकीच्या विधानांचें निराकरण	४११
त्यागी व धुळेकर यांची शाब्दिक चकमक	४१३
अजीर्ण चिकित्सा	४१५
वैद्य पंडितावर खुनी हल्ला	४१८
वैद्य मङ्गलाध्यशास्त्री यांचा संक्षित परिचय	४१९
अबूपर्वतावर आयुर्वेदाचें विश्वविद्यालय	४२१
नाशिक शहर आरोग्यदिन	४२२
आयुर्वेदीय औषधीकरण	४२३
पंचवार्षिक योजनेतील आरोग्य विभाग	४२७
योगरत्नाकर ग्रंथ कधीं लिहिला गेला?	४३०
नगरच्या उजळणी वर्गाचा अहवाल	४३१
पारदबंधासंबंधीं प्रयत्न	४३४

खास मराठवाड्यांतील वैद्य व आयुर्वेद प्रेमीलोकांकरितां खास विनंति

सोबत पत्रक नं. १ मध्यें प्रसिद्ध झाले प्रमाणें हें अधिवेशन आपले कडील भागांत भरत आहे. व तें चांगल्या रीतीनें पार पाडण्याची जबाबदारी आपल्याकडील सर्व वैद्य व आयुर्वेदप्रेमी लोकांची सामुदायिक स्वरूपाची आहे. आपल्याकडून तन मन व धन या तिन्ही प्रकारच्या साहाय्याची जरुरी आहे. कार्य मोठें व खर्चाचें आहे, तरी या संमेलन-कार्यास आपुलकीनें यथाशक्ती विशेषतः धन दृष्ट्या हातभार लावावा अशी आग्रहाची नम्रतापूर्वक विनंति आहे. अधिकृत प्रचारक निधी वसुलीसाठीं येतील त्यावेळीं या विनंतीचा स्मरणपूर्वक आदर करावा अशी प्रार्थना आहे. कळावें ही वि.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बेळगांवचे वैद्यरत्न म. भा. वाटवे यांचा अभिप्राय

विविध नवीन औषधी कल्प

"महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचे बैठकीसाठीं नाशिक येथें आल्यावेळीं आयुर्वेद सेवा संघाचें कार्य पहाण्यास मिळालें.

सदरील संस्थेच्या चालकांनीं आयुर्वेदाचे उद्धारार्थ चिकित्सेमध्यें सौकर्य व ती अधिक प्रभावी व्हावी या दृष्टीनें विविध नवीन औषधीकल्प निर्माण केल्याचें दिसलें.

हें अभिनंदनीय आहे

खरोखर अशा कल्पांची अत्यंत आवश्यकता आहे व तें कार्य संघ करीत आहे हें अभिनंदनीय आहे. सेवा संघाचा हा उपक्रम यशस्वी व्हावा अशी इच्छा आहे."

१०।११।५२ (सही) **म. भा. वाटवे** वैद्यरत्न

एक बाटली अवश्य संग्रही ठेवा.

EVEREST G.M.D

आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड, अहमदनगर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

संपादक व प्रकाशकः— वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ६ वें) नाशिक, ता. १ फेब्रुवारी १९५३ (अंक १५ वा

मिश्रप्रवृत्ति से आयुर्वेद की पूर्ण दुर्दशा

कर्नाटक आयुर्वेद संम्मेलनमें वै. श्रीपालजी का स्वागतपर भाषण

" आयुर्वेद में निदान है, शस्त्रकर्म है, बस्तिकर्म है, शालाक्य तंत्र है। सर्व विषय इसमें अन्तर्भूत हैं। इन सब विषयों को सांगोपांग वर्णन करनेवाले शास्त्र हमारे प्राचीन महर्षि वाग्भट चरक, पूज्यपाद, सुश्रुत, समंतभद्र, नागार्जुन, आदि के द्वारा विरचित होकर हमें इस संबंध में मार्गदर्शन कर रहे हैं। उन ग्रंथों को देखनेवाले नहीं हैं। पढनेवाले नहीं हैं। चिकित्सक बुद्धिसे उनपर विचार करनेवाले तो बिलकुल नहीं है। ऐसी परिस्थिति में लोकोपकारक इन शास्त्रोंकी ओर लोगोंकी दृष्टि नहीं है।

सोलापुरनिवासी सुप्रसिद्ध



वै. श्रीपाल ने. उपाध्याय

योग्य आयुर्वेद शिक्षणसंस्थाका अभाव

अभिमानसे उल्लेख करने योग्य आयुर्वेद शिक्षणसंस्था भी नहीं रही। आयुर्वेद विद्याके लिये प्रोत्साहन व सहयोग भी नहीं मिल सका। आयुर्वेद पंडितो को गौरव व आदर नहीं मिल सका। ....इन सब परिस्थिति से भयभीत हमारे शास्त्रज्ञ केवल रोगियोंको तृप्त करने की भावनासे आयुर्वेद पद्धति में ॲलोपॅथिक क्रमका अनुसरण करने लगे। इस मिश्र प्रवृत्तिसे आयुर्वेदकी पूर्ण दुर्दशा हुई। इसके लिये दूसरों को दोष न देकर हमें अपने ऊपरही दोष देना चाहिये। इससे मैं किसी भी चिकित्सापद्धतिपर आरोप नहीं कर रहा हूं। हम अपने पूर्वजों के शास्त्रशुद्ध प्रामाणिक आगम को भूलकर प्रतिनित्य, प्रतिप्रहर, प्रतिसमय बदलनेवाले अनित्य ज्ञानका अनुकरण करने लगे। इस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनित्य ज्ञानके अनुभवका मैं निषेध नहीं कर रहा हूं। परंतु उस अनित्य और अपूर्ण ज्ञानकोही पूर्ण औ प्रामाणिक समझना ठीक नही होगा। आयुर्वेद पूर्ण और प्रामाणिक आगम है। उसके संशोधन और सू निरीक्षण की ओर हमारे वैद्यबंधुओंका लक्ष्य जाना चाहिये। इतनाही मुझे कहना है।

आरोग्यमंत्र्यांचें आश्वासन

सातारा येथील आयाँग्ल वैद्यक महाविद्यालयाचा स्नेहसमेलन—समारंभ व वार्षिक उत्सव नुकताच आरोग्यमंत्री श्री. शांतिलाल शहा यांच्या अध्यक्षते—खालीं झाला. त्यावेळीं त्यांनीं गेल्या ६ महिन्यांत आरोग्यमंत्री या नात्यानें मिळविलेली निरनिराळ्या वैद्यकासंबंधींची माहिती व त्यासंबंधीं झालेलें आपलें मत विस्तृतपणें मांडलें. लोकमान्यांच्या २६ जानेवारीच्या प्रजासत्ताक विशेषांकांत हें समग्र भाषण आलें आहे. भाषणाच्या शेवटीं ते म्हणाले.:—

अशी माझी श्रद्धा आहे

"आयुर्वेदालाच जास्तीत जास्त मदत करण्याचें माझें तरी धोरण राहील, हें मी आश्वासन देतो. आमच्या देशांतील रहिवाशांचीं शरीरें सुदृढ राहिलीं पाहिजेत हें आमचें साध्य आहे. त्यासाठीं आमच्याच देशाच्या परंपरेंत विकसित झालेला आयुर्वेदच उपयोगी पडेल अशी माझी श्रद्धा आहे."

जामनगर संशोधन केंद्र

मध्यवर्ति सरकारतर्फे आयुर्वेदाचें संशोधन केन्द्र जामनगर येथें सुरू करण्याचें मागेंच ठरलें आहे. त्या केन्द्राच्या प्रमुखपदावर कोणाची नेमणूक होणार याकडे लोकाचें लक्ष बरेच दिवसापासून लागलें आहे. असें कळतें कीं या केन्द्रावर डायरेक्टर म्हणून डॉक्टर प्राणजीवनदास मेहेता यांची नेमणूक भारत सरकारनें केली आहे. या नेमणुकीबद्दल आम्ही डॉ. मेहेता यांचे अभिनंदन करतों.

डॉ. प्राणजीवन हे सध्या जामनगर येथील आयुर्वेद महाविद्यालयाचे प्रमुख आहेत. डायरेक्टर या जागेचा पगार १५०० रु. महिना आहे. त्यांना आतां जामनगर आयुर्वेद महाविद्यालयाचे प्रमु राहतां येणार नाहीं. अर्थात् ती प्रमुखपदाची जा योग्य उमेदवारासाठीं रिकामी झाली आहे.

जामनगर संशोधन केन्द्रांत डायरेक्टरां मदतीसाठीं ३ निष्णात वैद्य, १ दर्शनशास्त्री, ३ स यक वैद्य, एक डॉक्टर, १ पॅथॉलॉजिस्ट, १ विज्ञ पदवीधर, लागणार असून गृहचिकित्सक (रेसिडे मेडिकल ऑफिसर) म्हणूनहि कांहीं वैद्य डॉक पदवीधर लागण्याचा संभव आहे.

आयुर्वेद विश्वविद्यालय, झांशीच्या पदव्यांन मुंबई राज्यांत मान्यता ?

झांशी आयुर्वेद विद्यापीठानें दरसाल देशांती प्रमुख वैद्य मंडळीना परीक्षेशिवाय पदव्या देण्याच सपाटा सुरू केला आहे. तथापि या पदव्यांना अद्या उत्तर प्रदेश राज्य सरकार अगर इतर कोणत्या राज्य सरकारनें मान्यता दिलेली नाहीं असें कळतें.

अशा पदव्या घेणें व त्या आपल्या नांवासमो लिहिणें छापणें योग्य आहे काय या प्रश्नाचें उत्त आयुर्वेदजगत्च्या संपादकांनीं पुढीलप्रमाणें दि आहे:—

२५०—५०० रुपये दंडाची सजा

मुंबई सरकारच्या वर्तमान वैद्यकीय कायद्याच्या कलम अ ३५ अनुसार मुंबई सरकारनें मान्य न केलेल्या कोणत्याहि उपाध्या (पदव्या) आपल्या नांवासमोर अगर मागें लावणारे इसम अपराधी ठर तात व त्यांच्या पहिल्या गुन्हासाठीं २५० रुपये व नंतरच्या प्रत्येक गुन्हासाठीं रुपये ५०० दंडाची सजा त्यांना भोगावी लागेल असें कायद्यांत म्हटलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुं. सरकार आयुर्वेदासाठीं खास अधिकारी नेमणार

पनवेल संमेलनांतील ठरावाबाबत सरकारी खुलासा

११।१२ मे रोजीं पनवेल येथें भरलेल्या म. प्रां. वैद्य संमेलनांतील सरकार-संबंधीचे ठराव १२ जून १९५२ रोजीं मुंबई सरकारकडे पाठविले होते. त्याचें उत्तर लोकल सेल्फ गव्हर्मेंट व पब्लिक हेल्थ खात्याकडून ता. २४ जानेवारी १९५३ रोजीं आलें आहे तें असें:-

आयुर्वेदासाठीं स्वतंत्र अधिकारी नेमणार

ठराव ३ रा- आयुर्वेदाचें हें खातें स्वतंत्र करावें.

सरकारी उत्तर- आयुर्वेदाचें स्वतंत्र खातें असणें आवश्यक आहे असें सरकारला वाटत नाहीं. पण सर्जनजनरलच्या ऑफिसांत आयुर्वेदीय चिकित्सापद्धतीसंबंधीं कामकाज पाहाण्यासाठीं एक खास अधिकारी नेमण्याच्या प्रश्नाचा सरकार विचार करीत आहे.

अध्यापक विद्यालय

ठराव ४था- आयुर्वेदीय अध्यापक विद्यालय सुरू करावें.

सरकारी उत्तर- फॅकल्टीनें जो डिग्री कोर्स सुरू केला आहे त्याचाच एक भाग आयुर्वेदाचें शिक्षण देणें हा आहे, सबब असें अध्यापक विद्यालय काढणें आवश्यक नाहीं.

केवळ आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमास नकार

ठराव ५वा- आयुर्वेद फॅकल्टीनें अभ्यासक्रमासंबंधीं आलेल्या सर्व सूचनांचा विचार केला व त्यांतूनच डिग्री अभ्यासक्रम निर्माण झाला आहे. हा पदवी अभ्यासक्रम जून १९५२ पासून सुरू झाला आहे. त्यांत आयुर्वेदीय विषयाला प्राधान्य देण्यांत आलें आहे. एकूण अभ्यासक्रमांत २३७० व्याख्यानें आहेत. त्यापैकीं १५२५ व्याख्यानें आयुर्वेदविषयक व ८४५ व्याख्यानें इतर विषयाचीं आहेत.

जंगलांतील वनस्पति मिळण्याची व्यवस्था

ठराव ६वा- औषधांचें संशोधन, औषधी वनस्पति निघंटु तयार करणें, सरकारी वनस्पतिसंग्रह व भांडार सुरू करणें, इ.

सरकारी उत्तर- सरकारला हा प्रस्ताव मंजूर आहे व त्यासंबंधीं विचार चालू आहे.

वैद्यांचीं प्रमाणपत्रें चालणार

ठराव १०वा- मिलिटरी कचेऱ्यांतून वैद्यांच्या प्रमाणपत्रांना मान्यता मिळावी.

सरकारी उत्तर- ज्या राज्यांत वैद्यांच्या प्रमाणपत्रांना राज्यमान्यता मिळाली असेल त्या राज्यांतील रजिस्टर्ड वैद्यांचीं प्रमाणपत्रें त्या विभागांतील संरक्षणखात्यांतहि मान्य समजलीं जावीत असा हुकूम नुकताच काढण्यांत आला आहे.

पदवीधर-अपदवीधर भेद राहणार

ठराव ११वा- पदवीधर, अपदवीधर वैद्य भेद दूर करावा.

सरकारी उत्तर- ही सूचना स्वीकारार्ह नाहीं.

ट्रिब्यूनलवर अपील नाहीं

ठराव १२वा- नामंजूर केलेले अर्ज ट्रिब्यूनलनें पुनः विचारांत घ्यावेत.

सरकारी उत्तर- रजिस्ट्रेशन ट्रिब्यूनल आपलें काम त्या कायद्याच्या कलमानुसार व नियमानुसार करीत आहे. ट्रिब्यूनलचा निर्णय हा शेवटचा आहे, त्यावर अपील नाहीं.

\+ + +

संमेलन चळवळीचा विजय

वरील सरकारी उत्तरावरून असें लक्षांत येईल येईल कीं म.प्रां. वै.संमेलनानें चालविलेल्या चळवळींना यश येऊ लागलें आहे. सरकारच्या आयुर्वेद विभागावर खास (स्पेशल) अधिकारी नेमला जाणार आहे (व तो अधिकारी वैद्यच नेमला जावा अशी खटपट चालू आहे.)

सरकारनें जरी केवळ आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमास नकार दिला असला तरी सातारा येथें आरोग्य-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मंत्र्यांनीं खाजगीं बैठकींत जे विचार व्यक्त केले त्यावरून असा अभ्यासक्रम सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सरकारनें सूचना स्वीकारली

जंगलांतून मिळणाऱ्या वनस्पति विकत मिळण्याची व्यवस्था सरकारनें वनस्पति भांडार सुरू करून करावी ही सूचना सरकारनें स्वीकारली आहे.

मिलिटरी कचेऱ्यांतून वैद्यांचीं प्रमाणपत्रें चालणार हा मोठाच विजय संमेलनानें मिळवला आहे.

ट्रिब्यूनलच्या निर्णयावर कोर्टात अपील चालणार नाहीं हें खरें आहे तथापि ट्रिब्यूनलकडेच योग्य कारण दाखवून अपील केल्यास ट्रिब्यूनल त्या प्रकरणांचा पुनः विचार करून निर्णय देत आहे असें दिसून आलें आहे.

संमेलनासाठीं ठराव पाठवा

महाराष्ट्र प्रांतिक वैद्य संमेलनाचें पुढील अधिवेशन लातूर येथें भरणार आहे. त्यावेळीं मोठ्या संख्येंत वैद्यांनीं उपस्थित राहून आपले विचार मांडावेत; त्यांबाबत प्रस्ताव करून ते सरकारकडे पाठवावेत; प्रांतीय संमेलनाचे ठराव सरकार काळजीपूर्वक विचारांत घेत आहे. सबब आतां कामाला लागणें वैद्यांचें कर्तव्य आहे.

वाचकांचा पत्रव्यवहार—

एम्. बी. बी. एस्. मध्यें प्रवेश

मला इकडे कांहीं मित्राकडून अशी नवीन बातमी मिळाली आहे कीं विद्यार्थी इंटरसायन्स पास होऊन आयुर्वेदाकडे आले असतील तर त्यांनीं हल्लींचा आयुर्वेदमिश्र ॲलोपॅथी अभ्यासक्रम पुरा केला म्हणजे त्यांना एक छोटा जादा अभ्यासक्रम देऊन त्यांना एम्. बी. बी. एस्. च्या बरोबरीचा दर्जा सरकार देणार आहे.

किंवा जी. एफ्. ए. एम्. परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांना एकदम थर्ड एम्. बी. बी. एस च्या वर्गांत प्रवेश देणार आहे. असें विधान येथील एका डॉक्टर अध्यापकानें प्रगट सभेंत केल्यामुळें विद्यार्थ्यांच्या आयुर्वेदाभ्यासाबाबतची उपेक्षा वाढत चालली आहे.

तरी आपणास या बाबतींत कांहीं माहित असल्यास जाहीर करावें.

आयुर्वेद महाविद्यालय, नडियाद } —श्रीकृष्णपद भट्टाचार्य, आचार्य

(वरील बाबतींत तथ्यांश नाहीं. कारण एम्. बी. बी. चा अभ्यासक्रम विद्यापीठाच्या अधिकारांतील आहे, त्यावर सरकार सत्ता गाजवू शकत नाहीं.

सरकार एक दुसरा आयुर्वेदाचा छोटा कोर्स चालू करू इच्छित आहे व तो साधारणतः निखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठाच्या आयुर्वेदविशारद अभ्यासक्रमाप्रमाणें असेल. ही परीक्षा पास झालेल्या पदवीधरास शल्यशालाक्य प्रसूति यांचा एक छोटा प्रात्यक्षिक कोर्स देऊन नोकरी देण्याच्या विचारांत सरकार आहे असें कळतें. त्या बातमीमुळेंच वरील गैरसमज फैलावला गेला असल्याची शक्यता आहे. —संपादक)

सेवा संघाचीं सर्व औषधें तसेंच खात्रीची सर्व देशी काष्ठौषधी व ताजी वनस्पती आणि शिलाजीत, कस्तुरी, केशर, भीमसेनी कापूर, गोरोचन, वाकेरी भाते, वंशलोचन, नागकेशर, अनंतमूळ, जितसाया, उत्तम महाळेश्वरी मध वगैरे औषधें मिळण्याचें ठिकाणः—

देशी सर्वोषधी संग्रहालय

पोलिस चौकीसमोर, दादर मुंबई २८

नाशिक येथें मेनरोडवर आयुर्वेद सेवा संघाचीं सर्व शास्त्रोक्त पाठाप्रमाणें बनविलेलीं औषधें मिळण्याचें ठिकाणः—

श्री. कृ. वा. फाल्गुने

घ. नं. ३६ मेनरोड, नासिक

अनेकांनीं मुक्तकंठानें स्तुति केली. आपणहि एकवेळ वापरून अनुभव घ्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदाच्या पुनरुज्जीवनासाठीं

तीन अत्यावश्यक गोष्टी

(काँथी– जि. मिदनापूर पश्चिम बंगाल येथील आयुर्वेद सेवक संघाचे संचालक कविराज रघुनाथ माइति वैद्यशास्त्री काव्यतीर्थ यांनीं सद्वैद्यांच्या विचाराकरितां एक इंग्रजी व हिंदी पत्रक प्रसिद्धी-करितां पाठविलें आहे. त्याचा मराठी अनुवाद पुढील-प्रमाणें आहे.– वि. म. गोगटे)

औषधीयोजना पद्धति

१) सर्वसामान्य व सर्वमान्य रूप– पाश्चात्य वैद्यकांतील औषधीयोजना-लेखनपद्धति एका ठराविक साच्याची आहे. तशी ती असल्याकारणानें जगाच्या पाठीवरील कोणत्याहि डॉक्टरला ती योजना समजूं शकते व कोणताहि कल्पद त्याप्रमाणें औषधी बनवून देऊं शकतो. वैद्यांची औषधीयोजनापद्धति मात्र अशी नाहीं. प्रांताप्रांतांतील काय पण एकाच गांवांत, शहरांत राहाणाऱ्या एका वैद्याच्या लेखनपद्धतींतील औषधीयोजना दुसऱ्या वैद्याला कदाचितच समजूं शकेल.

आयुर्वेदाच्या प्रगतीला बाधक

आयुर्वेदाच्या प्रगतीला ही गोष्ट बाधक आहे. याकरितां उत्तम निवडीची व सर्वसाधारण उपायांची एक यादी तयार करण्यांत यावी. याकरितां निरनिराळ्या प्रांतांतील तज्ञ वैद्यांची एक समिति नेमण्यांत यावी.

उत्तम औषधी मिळत नाहींत

२) उत्तम औषधी न मिळणें, मिळाल्यास त्यांत विकृति झालेली असणें, किंवा त्या कृत्रिम मिळणें ही आयुर्वेदाच्या प्रगतींतील दुसरी एक धोंड आहे. या गोष्टीला आळा बसावा याकरितां कायदा होणें ही गोष्ट तर आवश्यक आहेच, पण त्याशिवाय प्रत्येक पार्थिव, जंगम आणि औद्भिद पदार्थांचें पूर्ण वर्णन गुण, दोष, प्रयोग वगैरेसह शक्य तेथें चित्र काढलेला असा संग्रहरूप ग्रंथ प्रकाशित होणें आवश्यक आहे. याकरितांहि एक समिति नेमणें आवश्यक आहे. किंवा आयुर्वेदीय पाठचिंतामणी समितीनें त्यांच्यांत कांहीं द्रव्यगुणतज्ञ घेऊन हें काम करावें.

कांहीं अन्य औषधांचा समावेश

एक गोष्ट याठिकाणीं स्पष्ट करावीशी वाटते ती ही कीं, वरील संकलन करीत असतां शुद्ध आयुर्वेदीय औषधीबरोबरच युनानी व अॅलोपॅथीच्या औषधीपैकीं कांहीं औषधी या संग्रहांत समाविष्ट करणें हें जरूरीचें व व्यवहार्य वाटल्यास त्यांचा समावेश या संग्रहांत करण्यास मागें पुढें पाहूं नये अर्थात् ही गोष्ट घडण्यास अनुभवी वैद्य, डॉक्टर आणि हकीम यांच्या योग्य अशा संयुक्त प्रयत्नांची जरूरी आहे.

अर्वाचीन रोगांचा समावेश

३) आपल्या प्राचीन व शास्त्रोक्त रोगाबरोबरच अर्वाचीन रोगाचें निदान वगैरेचें योग्य संकलन करून त्यावरील उपचार जाहीर होणें जरूर आहे. याकरितां एक नवीन निदान ग्रंथ तयार व्हावयास पाहिजे व यांत सर्व रोगांचे नामभेद, थोडक्यांत विवरण व उपचार असतील. याकरितांहि योग्य अशा प्राच्य व प्रतीच्या शास्त्रज्ञांची एक समिति झाली पाहिजे.

इतर बाबी

आयुर्वेदाच्या प्रगतीकरितां लुप्त ग्रंथांचें प्रकाशन, प्राचीन ग्रंथावर प्रतिसंस्कार करून ते प्रकाशणें, यंत्र-शस्त्रांचा पुनरुद्धार व आवश्यक तो सुधार करणें, संशोधनशाळा, संग्रहालय, महाविद्यालय, चिकित्सा-मंदिर चालविणें आदि गोष्टी करणें आवश्यक आहे. तरीपण वरील तीन गोष्टी जरूरीच्या व तेवढ्याच तांतडीच्याहि आहेत. कारण त्याच गोष्टी बाकी गोष्टींच्या पायारूप आहेत.

वैद्य वेणीमाधवशास्त्री यांचीं व्याख्यानें

पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणें मुंबई येथें वैद्य वेणीमाधवशास्त्री यांचीं वाग्भटावरील २० व्याख्यानें ता. १६–१–५३ रोजीं पूर्ण झालीं. या व्याख्यानाचा लाभ २२ वैद्य व ७ वैद्यकीय विद्यार्थी यांनीं फी भरून घेतला. व्याख्यानें संतोषप्रद झालीं असें कळतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरकारनें प्रयोगशाळा काढावी

नगर:— २३, 'जुनी आयुर्वेदीय औषधी-पद्धति समजावून घेऊन आणि तिला पाश्चात्य ज्ञानाची जोड देऊन संशोधन करणारी प्रयोगशाळा सरकारनें काढली पाहिजे.' असे उद्गार श्री. पां. वा. गाडगीळ यांनीं येथील आयुर्वेद महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनप्रसंगीं अध्यक्षस्थानावरून काढले.

प्रारंभीं विद्यालयाचे उपप्रमुख श्री. शं. रं. देशपांडे यांनीं सर्वांचें स्वागत केल्यावर श्री. गाडगीळ यांच्या हस्तें संमेलनानिमित्त झालेल्या चढाओढींत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसें देण्यांत आलीं.

मराठींत वैद्यक ग्रंथ व्हावेत

— श्री. गाडगीळ आपल्या भाषणांत पुढें म्हणाले:- 'वैद्यांनीं आपल्या व्यवसायांत आधुनिक उपकरणांचा उपयोग करावा. वैद्य व डॉक्टरांनीं एकत्र विचार करून आपल्या देशांत अद्यावत् औषधी करून त्याचाच वापर करावा. संस्कृत भाषा शिकण्याची सक्ति कमी केल्यास व मराठींतून ग्रंथ निर्मिति केल्यास अधिक विद्यार्थी या विषयाचा अभ्यास करतलि असें मला वाटतें. संमेलनाचें निमित्तानें शरीरज्ञानविषयक उद्बोधक प्रदर्शनहि मांडण्यांत आलें होतें. विद्यालयांतील विद्यार्थ्यांनीं "फुलपांखरें" या नाटकाचा प्रयोग करून दाखविला.

———

प्रश्न पाठवा, उत्तरें मिळतील

ज्या कोणास मुंबई प्रांत आयुर्वेदीय व युनानी बोर्ड, फॅकल्टी व रजिस्ट्रेशन ट्रिब्यूनल यांच्या कामकाजासंबंधीं येत्या लातूर अधिवेशन वेळीं कांहीं प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनीं ते कृपा करून महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाच्या कार्यालयाकडे तारीख १ मार्च १९५३ पर्यंत कळवावेत अशी विनंति आहे. ह्या प्रश्नांचीं सविस्तर उत्तरें लातूर अधिवेशनाचें वेळीं देण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे.

वि. म. गोगटे मंत्री
म. प्रां. वैद्य मंडळ, नासिक

डॉ. म्हसकरांच्या पुढील हालचाली !

डॉ. म्हसकर यांना आयुर्वेद संशोधन बोर्डा कामांत अपयश आल्यामुळें त्यांनी पुढील हालचा सुरूं केल्या आहेत. बोर्डाचे दोन सदस्य आच यादवजी व पं. शिवशर्माजी यांनीं असहकार के आहे, म्हणून त्याजागीं नवीन सभासदांची भर करण्याचें काम सुरूं आहे असें कळतें.

नडियाद आयुर्वेद कॉलेजचे नवे प्रिन्सिप श्रीकृष्णपद भट्टाचार्य वेदान्तशास्त्री यांना म्हसकर यांनीं रिचर्स बोर्डासंबंधीं बोलणीं करण्यासा मुंबईस बोलाविलें होतें असें समजतें. तसेंच का महाराष्ट्रीय व गुजराती वैद्यांनाहि अशींच आमंत्र आलीं आहेत असें म्हणतात. पाहूं या कोण कोण जाळ्यांत सांपडतात तें !

कामगार व कर्तव्यनिष्ठा

स्वच्छता-खात्याच्या कामगारांनीं कर्तव्यनिष्ठ तेनें कामें केलीं पाहिजेत व ही कर्तव्यनिष्ठा त्यांच ठिकाणीं पुढाऱ्यांनीं स्वयंसेवेनें जागृत केली पाहिजे.

एक महान् आश्चर्य

"वैद्यकीय शिक्षण क्षेत्रांत एम्. बी. बी. एस् चा ५ वर्षांचा शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर अवघे १ टक्के विद्यार्थीच उत्तीर्ण होतात हें एक अन्यत्र जगां कोठेंहि न आढळणारे महान् आश्चर्य आहे. य शिक्षण पद्धतींतील सदोषता शोधून काढणें अवश्य आहे.

याचा दोष प्राध्यापक, पालक व विद्यार्थी तिघावरहि आहे. कारण, सायन्स व इंजिनियरिंगच अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी मात्र ६० टक्के उत्तीर्ण होतात हे कसे ? वास्तविक इंटर सायन्स परी क्षेत प्रथम श्रेणीत वा तत्सम यश संपादन करून मगच हे सर्व अभ्यासू विद्यार्थी निरनिराळ्या विशे अभ्यासक्रमाकडे जात असतात.

या वैद्यकीय शिक्षणक्रमासाठीं विद्यार्थ्याला सध एकूण खर्च रु. १०,००० येतो. —डॉ. भा. बा. मु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वायगोळ्यावर आळू-क्षार :

लेखक
वै. वसंत बा. सागडे

(पानथरीवरहि या औषधाचा उत्तम उपयोग होतो.)

पोटांत, हृदय आणि बस्ति यांचेमध्यें आंब्याच्या बाठी एवढी फिरणारी किंवा निश्चल अशी मांसमय गांठ होते, तिला गुल्म अथवा वायगोळा म्हणतात.

वायगोळा होण्याचें कारणः– अयोग्य आहार-विहारानें वायु कुपित होऊन हा रोग होतो. या रोगाचे पांच प्रकार आहेत, ते वात, पित्त, कफ, त्रिदोष आणि रक्तज गुल्म हे होत.

वायगोळा व्हावयाचा असतां आरंभीं पुष्कळ ढेंकर येतात, आंतड्यांत गुडगुड आवाज होतो, पोटांत फुगारा धरतो, शौचाला साफ होत नाहीं.

वायगोळ्याचीं सर्वसाधारण लक्षणें

या सर्व प्रकारच्या वायगोळ्यांत साधारणपणें अन्नावर अरुचि, शौचास व लघ्वीस कष्टानें होणें, आंतड्यांत आवाज, पोटफुगी व पुष्कळ ढेंकर येणें, इ. लक्षणें होतात.

डाग, बिब्याच्या फुल्या देतात

या रोगास सर्वसाधारण अशिक्षित लोक किरकोळ आजार समजतात. त्यावर योग्य वेळीं, योग्य तो औषधोपचार करीत नाहींत. खेड्यांत राहणारे कांहीं लोक विस्तवांत खुरपें तापवून अशा वायगोळ्यावर डाग देतात; तर दुसरे कित्येक लोक बिब्याच्या कळ्या वायगोळ्यावर घालतांना दृष्टोत्पत्तीस येतात.

अनुभविक प्रयोग

असले अघोरी उपाय डोळयांनीं समक्ष पाहण्यांत आले म्हणजे मला वाटतें धन्य ते उपाययोजना करणारे वैद्य-हकीम व त्यांचेकडून उपाययोजना करवून घेणारे रुग्ण! असली जिवाला दुःख देणारी उपाययोजना बंद व्हावी व थोडक्यांत त्रास न होतां, आर्थिक मानसिक श्रमसायास विना, झालेला रोग बरा व्हावा, यासाठीं मला स्वतःला ज्या औषधाची पूर्ण प्रचीति आली आहे अशा या स्वानुभवी औषधी-योजनेचा पाठ आपणाकडे प्रसिद्धीसाठीं पाठविला आहे.

औषध तयार करण्याचें साहित्य

(१) बांगडखार चूर्ण २ तोळे (२) सैंधेलोण चूर्ण १ तोळा (३) शिरा व देठ काढून टाकलेलीं अळूचीं पानें (बाजारांत मिळणारी अळूं पानें औषधीयोजनेंत उपयोगी आणल्यास चालेल. मिळाल्यास काळ्या आळूचीं पानें वापरावीत.)

कृतिः– बांगडखार बाजारांतून आणून तसाच औषधीयोजनेंत उपयोगांत आणावा, अथवा तव्यावर टाकून भाजावा आणि मग औषधीयोजनेंत वापरावा.

बांगडखार व सैंधेलोण यांची वस्त्रगाळ करून ठेवलेलीं चूर्णे स्वच्छ दगडाच्या पाट्यावर ठेवावीत. दगडाचा पाटा तत्पूर्वीच स्वच्छ करून ठेवलेला असावा. या चूर्णांना पाट्याची घाण वा इतर कसला वास न येईल अशी खबरदारी घ्यावी.

आळू पानें किती घ्यावींत?

बांगडखाराचें वस्त्रगाळ केलेलें चूर्ण, सैंधेलोणाचें वस्त्रगाळ चूर्ण व शिरा देंठ काढून टाकलेलीं अळूंचीं पानें या तीन जिनसा एकत्र करून पाट्यावर ठेवाव्यात व या औषधांचा एकजीव होईतोंपर्यंत पाट्यावर वाटाव्यात. हे सैंधेलोण व बांगडखाराचें चूर्ण अळूच्या पानाच्या अंगरसानें व चोथ्यानें चांगलें ओलें होईपर्यंत आळूचीं पानें त्या चूर्णांबरोबर वाटावीत. चूर्ण चांगलें ओलें होईपर्यंत व त्याच्या गोळ्या करतां येतील अशी खात्री होईपर्यंत अळूचीं पानें लागतील तेवढी वाटण्यासाठीं घ्यावीत.

गोळ्या घेण्याचें प्रमाण

नंतर त्याच्या हरभऱ्या एवढाल्या मोठ्या गोळ्या करून उन्हांत अथवा सावलींत वाळवून ठेवाव्यात. त्या गोळ्या वाळल्या म्हणजे कांचेच्या बाटलींत भरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठेवाव्यात. मोठ्या माणसानें दोन गोळ्या बारीक करून तें चूर्ण हातावर घ्यावें व चूर्ण भिजेल इतकें त्यांत तूप (शक्य तर गाईचें) घालून तें औषध अनोश्यापोटीं घ्यावें.

पथ्यः - दूध, तूप, अधून मधून गव्हाची पोळी, ज्वारीची भाकरी खावी.

अपथ्यः- वातुळ पदार्थ, कडधान्य व मासे खाऊ नयेत.

महत्वाची सूचनाः- हें औषध घेत असतांना किंवा घेतल्यानंतर कित्येक लोकांना वांति, मळमळ, घशांत तोडणें इत्यादि लक्षणें होतात. परंतु औषध घेण्याच्या नित्य संवयीनें हीं लक्षणें पुढें दोन-चार दिवसांनीं होत नाहींत. जेवणांत दूध-तुपांचा जास्त उपयोग करावा. त्यामुळें वरील लक्षणें होत नाहींत

जी. ए. मिश्रा आयुर्वेदिक फार्मसीला विद्वान् वैद्यांची भेट

झांशी आयुर्वेदिक विश्वविद्यालयाच्या दीक्ष समारोहासाठीं आलेल्या सुमारें ५० विद्वान् मंडळी जी. ए. मिश्रा आयुर्वेदिक फार्मसीच्या कारखान्य भेट दिली. या कारखान्यांत शास्त्रोक्त आयुर्वेदि औषधें व इंजेक्शनें निर्माण केलीं जातात. झां आयुर्वेद विश्वविद्यालयाच्या पदवीदान समारंभ प्रसं डॉ. राधागोविंद मिश्र यांना आयुर्वेद-बृहस (डॉक्टर ऑफ सायन्स) ही पदवी व सुवर्णप देण्यांत आलें.

नवीन हिंदी वैद्यकीय ग्रंथ

पुस्तकाचें नांव		लेखक	किंमत
राष्ट्रीय चिकित्सा सिद्धयोग संग्रह	(हिंदी)	पं. रघुवीरप्रसाद द्विवेदी	१॥ रु.
राजकीय औषधीयोगसंग्रह	"	पं. रघुवीरप्रसाद द्विवेदी	७ रु.
शालाक्य तंत्र (निमितंत्र)	"	श्री. रामनाथ द्विवेदी	८ रु.
भैषज्य रत्नावली (संस्कृत)	(हिंदी टीकेसह)	वै. अंबिकादत्तशास्त्री	१५ रु.
व्यवहारायुर्वेद और विषविज्ञान	(हिंदी)	कविराज युगलकिशोर गुप्त	४॥ रु.
यकृत के रोग और उनकी चिकित्सा	"	वै. सभाकान्तशास्त्री	२ रु.
प्लिहा के रोग और उनकी चिकित्सा	"	श्री. ब्रह्मानंद चंद्रवंशी	५ आ.
मदनविनोद (वैद्यक निघंटु)	"	वै. त्र्यंबकशास्त्री	१ रु.
तुलसीविज्ञान	"	वै. लक्ष्मीपती त्रिपाठी	८ आ.
नाडी विज्ञान	"	वै. प्रयागदत्त जोशी	५ आ.
नाडी परीक्षा	"	चौखंबा प्रकाशन	५ आ.
आसवारिष्टसंग्रह	"	वै. जगदीशप्रसाद गर्ग	१॥। रु.
वनौषधीदर्शिका	"	प्रो. ठाकूर बलवंतसिंह	२॥ रु.
आयुर्वेदप्रदीप (आयुर्वेदिक व ॲलोपॅथिक गाईड)	(हिंदी)	डॉ. राजकुमार द्विवेदी	८ रु.

टपालखर्च निराळा.

वैद्यक ग्रंथ भांडार, आयुर्वेद सेवा संघ, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विचारापेक्षां कृति श्रेष्ठ :

लेखकः-- डॉ. जे. बी. नाईक
एल्. सी. पी. एस्. जैतापूर

सौ. डॉ. अवसरे, यांच्या आयुर्वेदपत्रिकेंत प्रसिद्ध झालेल्या, आरोग्ययोजनेसंबंधींच्या लेखांतील विचार निःसंशय सुसंगत आहेत. मात्र ते अमलांत कसे आणावेत, हें उमजणें कठीण ! देशाच्या सर्वांगीण सुधारणेचे विचारप्रवर्तक अनेक आहेत. परन्तु पुरस्कर्ते क्वचितच आढळतात. याचें कारण हेंच कीं सांघिक सुखनिर्मितींत वैयक्तिक सुखाचा वांटा असतो हें तत्व आबालवृद्धांना पटलेलें नाहीं. स्वावलंबनानें सहकार्यानें आणि फक्त जरूर तेथेंच राजाश्रयानें सुख निर्माण करतां येतें हें तत्व कळलेलें नाहीं. त्या तत्वाची शिकवण बालपणापासून शालेय शिक्षणद्वारा दृढमूल केली तरच भावी काळ उज्वल आहे.

अशा प्रकारचे उपदेशपर बोल व लेख लोकांना आतां कंटाळवाणे वाटत असून देशाच्या सद्यःस्थितींत विचारापेक्षां कृति करणार नेते व त्यांचे अनुयायी यांची आज फार जरूरी आहे.

नेत्यांना खेड्यांत आवाहन

खेड्यांत प्रामाणिक कार्यकर्ते लाभतील. परन्तु त्यांच्यामध्यें स्थानिक कार्य सफलतेनें कसें करतां येईल हा धडा त्यांना घालून द्यावा लागेल. यासाठीं विचारप्रवर्तकानें त्यांना मार्गदर्शन करून अनुयायी निर्माण करावेत. या तऱ्हेनें कार्यास सफलता मिळतांच त्या श्रेयाचे भागीदार होण्यास धनिक, देशसेवक, राजकीय पुढारी व सेवा संस्था पुढें सरसावतील.

तात्कालिक उपायांची जरूरी

आज खेड्यांतून आरोग्यप्रचार आणि तात्कालिक उपाय यांची फार जरुरी आहे. या खेड्यांतून बालसंगोपनाची प्राथमिक माहिती व प्रसूतिप्रसंगींची दक्षता याबद्दल जरी आपुलकीनें प्रचार केला तरी बरेंचसें कार्य होईल.

अभ्युदयाचा एक मार्ग

या आरोग्यकार्यासाठीं वैद्यक वर्गाला पुष्कळ कांहीं करतां येण्यासारखें आहे. वैद्यक व्यावसायिकांत ग्रॅज्युएट्स, लायसेन्शिएट्स्, वैद्य, हकीम इत्यादींचा समावेश होतो. सर्वांचें ध्येय देशसेवेपेक्षां धनसंचयाकडे असते, त्यासाठीं पूर्वपदाधिष्ठित वर्ग इतरांच्या प्रगतींत अडथळे निर्माण करून स्वतःचें कार्यक्षेत्र अबाधित राखण्याच्या यत्नांत असतो. स्वराज्य-संपादनानन्तर मेडिकल ग्रॅज्युएटसच्या हातांत वैद्यक खात्याचे अधिकार आले, परन्तु त्यांनीं देखील ज्ञानसंपादनाचे मार्ग दुष्कर करून टाकले आहेत.

हिंदुस्थानांत कार्यकर्त्यांची वाण

भारताच्या लोकसंख्येच्या मानानें वैद्यकी करणारे (डॉक्टर) ४८००० असून सुमारें ८००० नर्सेस आहेत. आणि ही संख्या गरजेच्या मानानें आज अल्प आहे आज सुमारें दोन लाख डॉक्टर्स आणि सहा लाख नर्सेस असतील तरच आरोग्यप्रचार करणें सुलभ होईल. प्रवेश, शुल्क व शिक्षणमुदत अल्पशी ठेवून समाजाच्या मध्यम व कनिष्ठ वर्गाला हा व्यवसाय करण्यास याप्रकारें उत्तेजन देण्यांत आलें तर हें साध्य हातीं येईल. विद्यार्थ्यांना व्यावहारिक कार्य उरण्याचें प्रात्यक्षिक ज्ञान भरपूर द्यावयास पाहिजे. त्यामुळें जबाबदार इसम निर्माण होतील व नवीन शोधहि लागतील. परदेशांतील रुग्णालयांत वार्ड-बाय् जे करतात ते येथील डॉक्टरांना येत नाहीं अशी स्थिति आपल्या नवीन डॉक्टरांची असते.

अनुभव श्रेष्ठ कीं शास्त्र ?

वार्ड-बॉयचें ज्ञान अनुभवानें आलेलें असतें. अशा अनुभवाला शास्त्राची भरपूर जोड देऊन संशोधन फार तर करावें. व्यवहार-व्यापकतेला सध्यां अनुभवी लोकांची विपुलता हवी. ती न साधल्यास पुढील पिढी पूर्वजांच्या कपाळावर खापर फोडणार ! अधःपात टाळण्यासाठीं अधिकार, संपत्तिमद सोडून देशसेवेच्या स्फूर्तीनें आपल्या हयातींत जे सुखकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करतां येईल तें करावें. मनुष्य अमर नाहीं हें पदाधिकाऱ्यांच्या ध्यानांत येते तर गझनीच्या महंमुदानें संपत्ति लुटण्याचा मोह आवरला असता. मांडवलशाही वृत्तीची पूजा करण्यास लोक झटले नसते आणि ' सर्वे नः सुखिनः सन्तु' हें तत्व कृतींत उतरलें असतें.

संपत्तीमागें लागलेलें जग

स्वराज्यापूर्वीचीं स्वप्नें साकार न झाल्यानें जनतेंत असंतोष, बेदिली, बेविश्वास निर्माण झाला. आदर लोपला. नैराश्यानें लोक बेदरकार, बेमुर्वत झाले. विश्वास कृतीनें व्यक्त होतो; ती कृति नष्ट झाली. संपत्ति व्यवहाराचें परिमाण-साधन, ही कल्पना ध्यानांत न आल्यामुळें उत्पादनाऐवजीं लोक संपत्तीच्याच मागें लागले.

कृतीशिवाय विश्वास नाहीं

कृतीला आरंभ केल्याशिवाय नुसत्या योजनेनें विचारांचें महत्व पटत नाहीं. आरोग्ययोजनेच्या चिरस्थायी यशाचें माप, पदरांत पाडण्याकरितां उपरिनिर्दिष्ट सर्व तत्वांचा विचार करून, सदर योजनेचे सर्वांगीण मार्ग एकाच वेळीं हाताळावे लागतील. सौ. डॉ. अवसरे यांनीं सुचविलेल्या दशग्राम केंद्र, तालुका केंद्र, फिरता दवाखाना वगैरे कार्ययोजना योग्य आहेत, या योजना कोणीतरी कृतींत आणावयास हव्यात.

कार्यकारी मंडळाची स्थापना

कॉंग्रेसस्थापनेला जसा लहान आरंभ होऊन ती विस्तारली, त्याप्रमाणेंच श्रेष्ठ डॉक्टर महाशयांनीं वा विदुषींनीं एकादें कार्यकारी मंडळ स्थापावें, अशी सौ. डॉ. अवसरे यांची कल्पना असावी. कार्यास खेड्यापासून आरंभ करावा. कार्यकारी मंडळानें स्थानिक डॉक्टरांना पत्रद्वारें विचारून ते वर्षांतून किंवा सहा महिन्यांतून किती काळ मोफत कार्य करूं शकतील हें विचारावें. त्यांना प्रमुख कार्यवाही व्यक्तींनीं मार्गदर्शन करावें.

बड्या व्यक्तींकडून अपेक्षा

बड्या व्यक्तींनीं कार्यांत भाग घेतल्याशिवाय त्याकडे जनतेचें लक्ष चटकन् वेधत नाहीं; तसेंच कार्यकर्त्याला उत्साहहि वाटत नाहीं. प्रत्येक वेळीं कार्यांत नाविन्य पाहिजे ! ही लहानशी वैद्य समिति वा मंडळ स्थापण्याचें कार्य सौ. डॉ. अवसरे व त्याप्रमाणेंच अन्य कोणी श्रेष्ठ अंगिकारून तशी सुरवात करतील तर विचार कृतींत उतरून आज ना उद्यां ते सफल होतील. या दृष्टीनें माझेंहि ज्ञान मी सत्कार्यीं लावण्यासाठीं तयार आहे. वानप्रस्थाश्रमाऐवजी निष्काम देशसेवा हें ध्येय जन्माचें साफल्य करण्याकरतां पत्करावें, असें मला वाटतें.

———

स्वर्गीय श्री रामदेवजी पोदार

मुंबईच्या रामविलास आनंदीलाल पोदार आयु. महाविद्यालयाचे प्रमुख देणगीदार दानशूर श्रीमान् सेठ रामदेवजी आनंदीलाल पोदार यांच्या अकाल मृत्यूबद्दल श्री मुंबई उपनगर वैद्य मंडळाची सभा ता. २८।१२।५२ रोजीं वैद्य ईश्वरलाल यांच्या अध्यक्षतेखालीं भरून श्रद्धांजली अर्पण करण्यांत आली असें मंत्री वै. मणिशंकर गजानन हे कळवितात.

धी अँग्लो आयुर्वेदिक फार्मसी, अंजनगांव (वऱ्हाड)

गुळवेल सत्व	प्रवाळभस्म (चंद्रपुटी)	मंडूरभस्म नं. १	वंगभस्म
१ शेर - १० रु.	१ शेर - ६० रु.	१ शेर - ४० रु.	१ शेर - ६० रु.
अभ्रकभस्म१००पुटी	लोहभस्म	सुवर्णमाक्षिकभस्म	कांतलोहभस्म
१० तोळे - ६० रु.	१ शेर - ६० रु.	१ शेर - ६० रु.	१ शेर - ८० रु.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभविक चिकित्सा-प्रकरण ८ वें—

पांडुरोग चिकित्सा

लेखकः— एक वृद्ध वैद्य
(मध्य प्रदेश)

पाण्डुरोग हा शरीरावयवदृष्टया यकृत् (Liver) या अवयवाचा विकार आहे. अर्थात् या विकारांत दोषांच्या प्रकोपामुळें यकृत् हा अवयव विकृत होत असतो. आणि त्यामुळें त्यांतून उत्पन्न होणारे निरनिराळे पाचक पित्त व रंजक पित्तसंज्ञक स्राव विकृत होतात. अन्नाचें पचन व रक्ताचें रंजन (त्याला लाल वर्ण आणणें) या क्रिया क्षीण होतात. रुग्ण दिवसेंदिवस निस्तेज दिसूं लागतो. त्यामुळें शरीरावर फटफटीतपणा (ॲनीमिक कंडिशन) येतो.

माती खाण्याची शंका घ्यावी

हा विकार लहान मुलांस माती खाल्यामुळें विशेषतः होत असतो. त्याच कारणामुळें गर्भिणी स्त्रियांनाहि तो होत असतो. हा विकार दृष्टोत्पत्तीस येतांच मुलें व गर्भिणी स्त्रिया यांच्या बाबतींत माती खात असल्याची शंका वैद्यानें प्रथम घ्यावी. आणि त्याबद्दल निराकरण करून घ्यावें.

मळ पांढरा, मूत्र पिवळें

या व्याधीचें विशेष लक्षण असें होतें कीं, गुदद्वारांतून निघणारा मल पांढऱ्या वर्णाचा होऊं लागून मूत्र मात्र पिवळ्या वर्णाचें होतें. पचन नीट होत नाहीं. डोळ्याच्या कडांना सूज दिसूं लागते. शरीरांत ढिलेपणा व हलकेपणा वाटूं लागतो. आणि कधीं कधीं तर पायावरहि किंचित् सूज दिसते. असें दिसूं लागलें म्हणजे अत्यंत काळजी घेतली पाहिजे. कारण यकृत् हा अवयव, अन्नाचें विपाचन व त्याचें शरीरांत होणारे योग्य प्रकारचें सात्मीभवन, या दोन्ही क्रियांचा मूळ आधार आहे, हें आचार्यांच्या पूर्णपणें लक्षांत आल्यामुळेंच त्या यकृताला नीट ठेवण्याकरतां अनेक प्रकारचीं आसवें निर्माण करण्याची पद्धति अमलांत आणली गेली. सर्व आसवांचा प्रयोग, यकृतास उत्तम स्थितींत ठेवण्याच्या दृष्टीनेंच केलेला आहे.

दीर्घकालीन रुग्णास आसव द्यावें

अग्नि व पित्त यांचा परस्पर घनिष्ट संबंध अथवा एकत्वच लक्षांत घेऊन अग्निमांद्य हें ज्या दृष्टीनें सर्व रोगांचें मूळ कारण समजलें जातें, त्याच दृष्टीनें त्या पित्ताला मूळ कारणीभूत होणारा जो यकृत् अवयव त्याला सदैव जपलें पाहिजे. आणि त्याची स्थिति अत्यंत उत्तम ठेवली पाहिजे हें चिकित्सकानें नीट लक्षांत ठेवावें. आणि तदनुसार चिकित्सा करतांना कोणतें ना कोणतें तरी आसव दीर्घकालीन रुग्णास अवश्य प्रयोजित करीत असावें, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. पांडुरोगाची चिकित्सा सांगण्यापूर्वी वरील विवेचन अत्यंत आवश्यक समजून तें येथें करण्यांत आलें आहे. तें फार महत्वाचें आहे हें त्यावरून ध्यानांत येईल.

व्याधींचा दोष लक्षांत घ्यावा

या रोगामध्यें रक्त दूषित होतें हें वर सांगितलें आहे. रक्त हा धातु व पित्त हा दोष या दोन्हींचा आश्रयाश्रयी भाव वाग्भटानें वर्णन केलेला आहे. त्यामुळें पाण्डुरोग हा प्रधानतया पित्त विकृतीमुळेंच होणारा व्याधि आहे, असें समजावें. आयुर्वेदीय निदानपरंपरेनुसार प्रत्येक व्याधि प्रत्येक दोषामुळें होत असतो, आणि तत्तद्दोषविकृतीचें ज्ञान होणें जरूर असतें; हें जरी चिकित्सेच्या दृष्टीनें खरें आहे तरी पण प्रत्येक रोग हा एखाद्या विशिष्ट दोषाच्या विकृतीनेंच अधिकतया उत्पन्न होत असतो, हेंहि पण अनुभवसिद्ध आहे. उदाहरणार्थ, ग्रहणी, पाण्डुरोग, रक्तपित्त इत्यादि व्याधि विशेषतः पैत्तिक असतात. राजयक्ष्मा, वातश्लेष्मज्वर (इन्फ्लुएन्झा) श्लैष्मिक सन्निपात (न्यूमोनिया), पार्श्वशूल (प्लूरसी) इत्यादि व्याधि कफजन्यच असतात. पक्षाघात (पॅरेलिसिस) सर्वांगवात, संधिवात (Gout) इत्यादि व्याधि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वातजन्यच असतात. सबब प्रत्येक व्याधीचें विज्ञान करून घेत असतांना त्या त्या व्याधींत कोणता दोष अधिकतया विकृत होत असतो हें चिकित्सकानें लक्षांत ठेवलें पाहिजे.

पित्त दोष, रक्त दूष्य

या दृष्टीनें पाण्डुरोग हा पित्तविकृतिजन्य आणि यकृत् अवयवाचा विकार असा असतो. आणि चिकित्सा करतांना पित्तदोषाची विकृति समजून इतर दोषांच्या अस्तित्वाची, तत्तद्‌लक्षणद्वारा, निश्चिति करतां आली तरी पित्तविकृति असणारच आणि दूष्यामध्यें रक्तविकृति असणारच असें निश्चित समजलें पाहिजे.

पाण्डुरोगाचे ५ प्रकार

पाण्डुरोग पांच प्रकारचे आहेत असें माधव–निदानांत वर्णन आहे. (१) वातज (२) पैत्तिक (३) कफज (४) सान्निपातिक व (५) माती खाल्यामुळें होणारा. त्यापैकीं पांचवा हा वास्तविक भिन्न प्रकार नसून पांडुरोगाच्या उत्पत्तीला कारण म्हणून त्याची गणना केलेली आहे. त्याचेहि तीन प्रकार असून, तुरट माती खाल्ली असतांना वातज पाण्डु, खारट माती खाल्ली असतांना पैत्तिक व गोड माती खाल्ली अस–तांना कफज असे हे तीनहि प्रकार वरील भिन्न भिन्न दोषज पाण्डूमध्यें अंतर्भूत करतां येतात. फक्त विशेष ध्यानांत ठेवण्यालायक लक्षण या माती खाल्यापासून होणाऱ्या पाण्डुमध्यें इतकेंच कीं, ही माती, अन्न–रसाबरोबर शारीरसांत व धातूंत पोहोंचून रसरक्तादि संवाहक स्रोतसांमध्यें अवरोध अर्थात् आडकाठी उत्पन्न करते. व त्यामुळें पुढील धातु निर्माण होणें बंद होऊन शरीराची शक्ति, तेज, वीर्य व ओज हे सर्व क्षीण होतात.

चिकित्सेच्या दृष्टीनें तीनच प्रकार

त्याचप्रमाणें सान्निपातिक पाण्डु हा देखील तीन्हीं दोषांच्या प्रकोपामुळें होऊन त्याच्यांत तीन्हींचीं लक्षणें एकाच वेळीं उत्पन्न झाल्यामुळें तो कष्टसाध्य किंवा असाध्य देखील होतो, हेंच त्याचें वैशिष्ट्य होय. चिकित्सेच्या दृष्टीनें वास्तविक तीनच प्रकार महत्वाचे व विचारणीय ठरतात.

पाण्डुरोगाचीं कारणें

प्रत्येक पांडुरोगांत पित्तविकृति ही प्रधान असल्यामुळें त्या सर्वांचेंच मूळ कारण, पित्ताला उत्पन्न करणारा आहारविहार हाच असतो. अम्ल (आंबट), लवण (खार) व कटु (तिखट) हे तीनहि रस पित्ताला वाढविणारे असल्यामुळें यांच्या अधिक सेवनामुळेंच व अधिक व्यवाय (स्त्रीसेवन) हा विहार, तीनहि दोषांना प्रकुपित करणारा असल्या-मुळें या दोन्ही प्रकारच्या आहारविहारांनीं हा व्याधि होण्याचा संभव असतो.

पाण्डुरोगाचीं पूर्वरूपें

याच्या पूर्वरूपांत खाल्लेलें अन्न न पचणें हें प्रधान लक्षण होतें. मल आणि मूत्र हे पिवळसर होऊं लागतात. शरीरामध्यें ढिलेपणा येतो. माती खाण्याची इच्छा होते व डोळ्यांच्या सभोवतालीच्या जागीं किंचित् सूज दिसून येते. हें व्याधीचें पूर्वरूप होय.

दोषभेदानें पाण्डुरोगाचीं लक्षणें

वातज पांडुमध्यें त्वचा, मूत्र, मल, डोळे व चेहरा हे सर्व काळसर-लालसर व स्नेहहीन दिसतात, तर पैत्तिक पांडुमध्यें हेच सर्व अवयव व मल पिवळ्या वर्णाचे असतात; आणि कफज पांडुमध्यें हेच सर्व पांढऱ्या वर्णाचे असतात. वातज पांडूत शरीरांत कंप, पोटांत टोचण्यासारखी पीडा, पोटफुगी व भ्रम हीं लक्षणें होतात. तर पित्तपांडूमध्यें शरीरांत दाह, तहान आणि ज्वर हीं होतात. आणि कफपांडुमध्यें सूज, तोंडांतून लाळ पडणें, झांपड आणि शरीर जड होणें हीं लक्षणें होतात.

पित्तविरोधी चिकित्सा करावी

याप्रमाणें तीन्हींमधील स्पष्ट भेद समजून घेतल्यानंतर चिकित्सा करतांना प्रधानतया पित्तदोष व रक्त दूष्य यांचीच चिकित्सा प्रत्येक प्रकारांत करावी व सोबतच ज्या वात किंवा कफाचीं लक्षणें त्याबरोबर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पित्ताला विरोध न होऊं देतां

दिसतील त्यांचाहि पित्ताला विरोध न होऊं देतां आवश्यक अशी योजना चिकित्सेंत करावी.

कपिलेचें विरेचन द्यावें

हा विकार यकृत्-विकृतिजन्य असल्यामुळें व पित्तप्रधान असल्यामुळें रोगी अशक्त असल्यास प्रथम विरेचन द्यावें. त्याकरतां कपिल्लकाचा उपयोग मागें वर्णन केल्याप्रमाणेंच करावा. रोगी अशक्त असल्यास एरंडेल (दोन तोळे) निजतांना दुधांतून द्यावें. त्यानंतर खालील उपचार सुरू करावेत.

कुमारीआसव कसें करावें ?

(१) कुमारीआसवः-हें एक आयुर्वेदांतील सुप्रसिद्ध आसव आहे व तें सशास्त्र तयार केलें जात असावें असा माझा कयास होता. परंतु अनेक जागीं कुमारी (कोरफड) चा काढा तयार करून केलें जात असलेलें पाहिल्यामुळें आणि निदान आमच्या परंपरेंत तरी ती पद्धति अशास्त्रीय समजली जात असल्यामुळें त्याची कृति थोडी विस्तारपूर्वक वर्णन करीत आहे.

लोखंडाची सुरी वापरावी

कोरफडीचे मोठमोठे तुकडे आणून ते प्रथम पाण्यांत बुडवून चांगले पुसून स्वच्छ करावे. नंतर एक लोखंडाची सुरी किंवा चाकू (इतर कोणत्याहि धातूची नसावी, कारण लोह हें द्रव्य यकृताला लाभदायक असें आहे. सप्तधातूंपैकीं इतर धातु तशा नाहींत.) घेऊन त्यानें त्या कोरफडीच्या दोन्हीं कांटेरी बाजू सोलून काढाव्या. नंतर मधून सबंध लांब तुकड्याच्या दोन फांकी कराव्या. नंतर एखादे लोखंडी डब्याचें बारीक झांकण किंवा लांब रुंद अशी शुक्ति (शिंपले) घेऊन त्यानें फांकीमधील गीर सोलून काढावा. व सोललेला गीर एका मोठ्या लोखंडी कढईत ठेवावा. याप्रमाणें सोलून गीर एकत्रित झाला म्हणज तो, एक विरळ गोणपाटाचा मोठा तुकडा घडवंचीस दोरानें मजबूत बांधून, त्या तुकड्यावर हा गीर ओतावा, व खालीं एक रुंद लोखंडी किंवा चिनी मातीचें भांडें ठेवावें. याप्रमाणें केलें असतां शुद्ध व स्वच्छ असा कोरफडीचा रस एकत्रित होईल.

सहा महिन्यानीं उत्तम आसव

असा रस १०२४ तोळे (द्रोण = १२॥ शेर) त्यांत ५ शेर जुना गूळ व २॥ शेर मध मिसळून हें सर्व मिश्रण पुन्हां एकदा त्याच गोणपाटांतून गाळावें. म्हणजे गुळांत असणारा किंवा इतर कचरा अलग होतो. नंतर हें मिश्रण एका चिनीच्या एका भांड्यांत किंवा त्याच्या अभावीं लाखोटलेल्या मजबूत मातीच्या मडक्यांत घालावें. व त्यांत बत्तीस तोळे धायटीच्या फुलांचें चूर्ण व शार्ङ्गधर ग्रंथांत या आसवाच्या कृतींत सांगितलेल्या चाळीस औषधांचें प्रत्येकीं दोन-दोन तोळे चूर्ण मिसळावें. मडकें फक्त तीनचतुर्थांश भरावें. बाकी रिकामें ठेवावें. कारण आंत वायु उत्पन्न होतो. त्याच्या दाबानें मडकें फुटण्याचा संभव असतो. व मडक्यावर झांकण ठेवून कापडमाती करून बंद करून ठेवावें. कमीतकमी एक महिना हें बंद असावें. परंतु सहा महिने तसें राहिल्यास उत्तम प्रकारचें आसव तयार होतें. त्यानंतर काढून कपड्यांतून गाळून बाटल्यांत भरून ठेवावें. हें मडकें बंद करण्यापूर्वी लोखंडाचे बारीक बारीक पत्रे (पुढें लिहिलेल्या पद्धती-प्रमाणें शुद्ध करून) आंत घालून ठेवावे.

१॥-२ तोळे आसव एका वेळेस द्यावें

या आसवाची मात्रा साधारण तरुण मनुष्या-करतां एकावेळीं दीड ते दोन तोळे अशी द्यावी. परंतु ती नुसतीच न देतां त्याच्यांत खालीं लिहिलेला सर्जिकक्षार किंवा इतर तसेच तयार केलेले क्षार मिसळावेत.

सर्जिक क्षार कसा काढावा ?

बाजारांत वाण्याकडे सज्जी माती नांवाची एक क्षारयुक्त माती मिळते. ती निदान चार शेर तरी घेऊन एका मोठ्या कल्हई केलेल्या गंजांत पाण्यांत भिजत घालावी. सबंध रात्र भिजू द्यावी. दुसऱ्या दिवशीं सकाळीं हाताला थोडें तेल, तूप किंवा इतर स्निग्ध पदार्थ लावून तें पाण्याचें व मातीचें मिश्रण कुवळावें. म्हणजे मातींत असलेला क्षार पाण्यांत मिसळेल. सरासरी चार तास भांड्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तसाच ठेवलेला राहिला म्हणजे माती खाली बसते व क्षार पाण्यांत राहतो. तें पाणी एका स्वच्छ कपड्यांतून दुसऱ्या कल्हईच्या भांड्यांत गाळून घ्यावें व उरलेल्या मातींत पाणी घालावें. याप्रमाणें केलें असतां मातींतील सर्व क्षार पाण्यांत विरून जाऊन माती खालीं राहील.

क्षार जळूं देऊं नये

नंतर हें विरलेल्या क्षारयुक्त पाणी एका लोखंडाच्या मोठ्या कढईत उकळण्याकरतां ठेवावें. खालून तीव्र अग्नि लावावा. बऱ्याच तासानंतर मिश्रण घट्ट होऊं लागतें. मिश्रणामध्यें बुडबुडे येऊं लागले म्हणजे क्षार तयार झाला असें समजावें **व त्या अवस्थेपूर्वीच अग्नि मंद करावा.** मिश्रण सारखें या शेवटल्या अवस्थेंत लोखंडी झाऱ्यानें ढवळत असावें. क्षार जळूं न द्यावा ही काळजी घ्यावी व बुडबुडे आल्यानंतर कढई खालीं उतरून ढवळण्याची क्रिया चालू ठेवावी म्हणजे क्षार हळूहळू घन होऊं लागतो.

तीव्र करण्यासाठीं चुनखडी

या क्षाराला तीव्र करण्याकरतां त्यांच्यांत शिजत असतांनाच भाजलेल्या चुनखडीचे दगड टाकण्याचा प्रघात आहे. परन्तु आज कालच्या कोमल प्रकृतीच्या लोकांना तसला क्षार त्रासदायक होण्याचा संभव म्हणून तो तीव्र न करतांना सौम्यच ठेवणें बरें.

क्षयांत सर्जिक क्षार अवश्य द्यावा

(२) एका वेळीं हा क्षार एक मासा ते दोन मासे दीड तोळा कुमारीआसवांत मिसळून पांडुरोग्यास देतां येतो. असें हें मिश्रण दिवसांतून दोन वेळ म्हणजे दुपारच्या जेवणानंतर दोन तासांनीं व रात्रौ निजतांना असें द्यावें. यानें अन्नपचन चांगल्या प्रकारें होऊन स्रोतसांचा झालेला अवरोध हा क्षार कमी करतो. सबब, केवळ पांडुरोगांतच नव्हे, तर राजयक्ष्मा (क्षय-pthysis) सारख्या स्रोतोरोधजन्य व्याधीमध्यें ह्या मिश्रणाचा अवश्यमेव उपयोग करावा.

(३) लोहभस्म व सुवर्ण माक्षिक भस्म

यकृतांत रंजक पित्त असते, अर्थात् यकृतांतून रंजक पित्त उत्पन्न होत असते, असें आयुर्वेदशास्त्र म्हणते. यत्तु यकृत् प्लीन्होः पित्तं तस्मिन् रंजकोऽग्नि इति संज्ञा । स रसस्य रागकृदुक्तः । हा रक्ताला लाली आणण्याचा परिणाम लोहानें होत असतो, असें आधुनिकशास्त्र म्हणतें आणि अनुभवहि पण तसाच आहे. म्हणून पांडु रोगावर भस्मांचाच प्रयोग करावयाचा असल्यास (कारण तसे करण्याचा प्रघात चरककालीं नव्हता व हें आवश्यक लोह इतर पदार्थांतून काष्ठौषधि, भाज्या इत्यादींतून पुरविलें जाऊं शकते. म्हणून) लोहभस्म व सुवर्णमाक्षिक भस्म उपयोगांत आणावें.

लोहाची शुद्धि

याकरितां प्रथम लोहाची शुद्धि करावी. उत्तम जुनें लोखंड घेऊन त्याचे बारीक पत्रे तयार करवावेत. नंतर ते तीव्र अग्नींत अगदीं लाल होईपर्यंत तापवावे. त्रिफळ्याच्या (सोळापट पाणी घालून अष्टमांश उरविलेल्या) काढ्यांत विझवावे. असे सात वेळां पुन्हां पुन्हां तापवून विझविले असतांना लोखंड शुद्ध होतें. नंतर ते पत्रे ऊन पाण्यानें स्वच्छ धुऊन रेतीनें (रेतवावे) घांसवून त्यांचें चूर्ण करावे.

लोहभस्म कसें करावें ?

लोह कणांच्या दुप्पट लोणी व समभाग शुद्ध गंधक घेऊन चांगला खल करून, मोठ्या मातीच्या गाडग्यांत (मिश्रणाच्या निदान दुप्पट आकाराचे गाडगें असावें) मिश्रण भरून वरून शराव संपुष्टित करून कपडमाती करावी. रानशेण्या मिळाल्यास महापुट करून द्यावें. उपलब्ध नसल्यास लाकडी कोळशांचे गजपुटहि फक्त अर्धे भरून द्यावें. महापुटाचा खळगा घेरांत दोन हात (तीन फूट) व्यासाचा व तितकाच खोल असतो. गजपुटांत खळगा सव्वा दोन फूट व्यासाचा व तितकाच खोल असतो. अशी तीन पुटें दिल्यावर साधारणतः शुद्ध, निश्चंद्र व रेखाप्रविष्ट (दोन बोटांच्या पेरांमध्यें चोळलें असतां रेखांमध्यें भरून जाणारें) असें भस्म होतें. न झाल्यास तशींच दोन तीन पुटें अधिक द्यावींत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या लोहभस्माकरितां तरवारींचे जुने लोखंड ...रून त्याचे पत्रे करावेत. किंवा घड्याळाच्या स्प्रिंग ...व्यात.

१/४ गुंज लोहभस्म + १/४ गुंज सुवर्णमाक्षिकभस्म

वरील कुमारी आसव व क्षाराच्या मिश्रणांत ...येक पुडीबरोबर एकचतुर्थांश गुंज हें लोहभस्म व ... वर्णन केलें जाणारें सुवर्णमाक्षिकभस्म तितक्याच ...णांत (एकचतुर्थांश गुंज) मिसळावें.

सुवर्णमाक्षिकाची शुद्धी व भस्म

तीन भाग सुवर्णमाक्षिक उपधातु व एक भाग ...व मीठ घेऊन, दोहोंचें चूर्ण करून, लोखंडाच्या ...ईत घालून चुलीवर ठेवावें. खालीं जाळ करून ...मिश्रणावर लिंबाचा रस घालावा व लोखंडाच्या ...नें घोटत जावें. कढई लाल वर्णाची होईपर्यंत ...घालण्याची व घोटण्याची क्रिया सारखी चालू ...वी. नंतर कढई खालीं उतरून थंड झाल्यावर ...तील सुवर्णमाक्षिक काढून घ्यावें. या प्रकारें सुवर्ण...क्षिक शुद्ध होतें.

वरप्रमाणें शुद्ध केलेलें सुवर्णमाक्षिक कुळीथाचे ...ढ्यांत, किंवा तिळाच्या तेलांत, किंवा ताकांत, ...ा गोमूत्रांत खलून, शरावसंपुटांत घालून, रान...ऱ्यांच्या गजपुटांत किंवा वाराहपुटांत अग्नि द्यावा, ...जे भस्म होतें.

वातजपांडूवर ज्वरासाठीं महाज्वरांकुश

या प्रमाणें पाण्डुरोगावर देण्याकरतां प्रधान...ांची योजना झाली. या योजनेमुळें यकृताची ...ा नीट होऊन अग्निमांद्य कमी होतें. स्रोतसें शुद्ध ...त. व अन्नरसापासून पुढें होणारे धातु उत्पन्न ... लागतात. विशेषतः रक्त धातु तयार होतो व ...ा लालवर्ण येतो. या बरोबरच तत्तद्दोषविशिष्ट ...रोगाची चिकित्सा करण्याकरितां वात, पित्त व ...नाशक द्रव्यें रुग्णास सकाळ संध्याकाळ द्यावीत. ...हरणार्थ, वातजपांडुमध्यें ज्वर असल्यास महाज्वरां...ा रसाचा उपयोग करावा.

महाज्वरांकुशाची कृति

हा महाज्वरांकुश रस तयार करण्याकरितां पुढील द्रव्यें आवश्यक असतात. पारा (१ भाग) वत्सनाभ (१ भाग), गंधक (१ भाग), धोत्र्याचें बी (३ भाग), सुंठ (४ भाग), मिरे (४ भाग), पिंपळी (४ भाग). यापैकीं पारा व गंधक शुद्ध करण्याचा विधि पान ४७-४८ वर वर्णन केलेला आहे. त्याचप्रमाणें वत्सनाभाची शुद्धि पान १८ वर वर्णन केलेली आहे. धोत्र्याचें बी तीन दिवस गोमूत्रांत भिजत घातल्यानें व दररोज गोमूत्र बदलत असल्यानें शुद्ध होत असतें. याप्रमाणें या सर्व शुद्ध वस्तु घेऊन त्या पैकीं पारा व गंधक खेरीज करून बाकीच्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करावें. व पारा व गंधकाची कज्जली करावी. अर्थात् हीं दोन्हीं द्रव्यें एकत्र खलामध्यें सारखी घोटावी.

लिंबाच्या व आल्याच्या रसाच्या भावना

दोन तास घोटल्यानंतर ती काजळाप्रमाणें काळी होतात वर तयार केलेलें वस्त्रगाळ चूर्ण व ही कज्जली मिसळून त्या मिश्रणास कागदी लिंबाच्या रसाच्या तीन भावना व आल्याच्या रसाच्याहि तीनच भावना द्याव्या. वाळल्यानंतर हा रस सकाळ संध्याकाळ वातज पांडुमध्यें तीन गुंज मधांतून द्यावा. व दुपारीं व रात्रीं वर लिहिलेलें कुमारीआसव व क्षार लोह व माक्षिक यांचें मिश्रण द्यावें.

पैत्तिक पांडुरोगावर प्रवाळ गुळवेलसत्व

पैत्तिक पांडुवर सकाळ-संध्याकाळ एक मासा गुळवेलसत्व व ३ गुंज प्रवाळभस्म (पान ९ वर वर्णन केलेलें) मिसळून दाडिमलेहाबरोबर (पान ८ पहा) द्यावें. दुपारीं व रात्रीं कुमारीआसव व मिश्रण द्यावें.

कफज पांडुरोगावर मृगशृंग

कफजपांडुवर सकाळ–संध्याकाळ आल्याचा रस व मध यांच्याबरोबर शृंगभस्म (पान १५ पहा) व ज्वरांतक (पान १० पहा) या दोन्हींचें क्रमशः दोन व चार गुंजांचें मिश्रण द्यावें. दुपारीं व रात्रीं पूर्वीप्रमाणेंच कुमारीआसव व क्षार-भस्म मिश्रण द्यावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मण्डूर शुद्धि

यात्रमाणें साधारण चिकित्सा वर्णन केल्यावर लोहभस्माऐवजीं मण्डुरभस्म प्रयोगहि गुणकारी ठरतो. सबब, तें तयार करण्याचा विधि येथें देत आहे.

मण्डूरभस्म पद्धति

हिरडा, बेहेडा व आंवळकांठी हीं तिन्हीं द्रव्यें गोमूत्रांत घालून त्यांचा काढा करावा. तिन्हीं द्रव्यें बरोबर प्रमाणांत घ्यावीत. आणि गोमूत्र तिन्हीं द्रव्यांच्या बेरजेच्या सोळापट घ्यावें व काढा अष्टमांश करावा. मण्डूराच्या दुप्पट हा काढा घेऊन त्यांत हा मण्डूर अग्निद्वारा अगदीं लाल झाला म्हणजे विझवावा. तापवण्याकरतां मण्डूर एकाद्या लोहाच्याच वाटींत ठेवावा. याप्रमाणें विझवतां विझवतां तो काढा संपत आला म्हणजे तो अर्धभस्म झालेला मण्डूर खलांत ठेवून घोटावा व पूर्वीच्याच काढ्याच्या भावना दररोज देत असावें व पुन्हां पुन्हां खल करीत असावें. याप्रमाणें सात आठ भावनांत चांगलें भस्म होतें.

या मण्डूरभस्माचा प्रयोग वर ज्या ठिकाणीं लोहाचा प्रयोग करावयास सांगितला आहे, त्याच-ठिकाणीं करावा.

पाण्डुरोगाचें पथ्यापथ्य

मधुर, कडु व तुरट पदार्थ या व्याधीवर उपयोगी असतात. तसेंच, ताक ताजें तयार केलेलें, म्हणजे कषाय व मधुर रसप्रधान असलेलें उपयोगांत आणावें. ताकांत सदैव सैंधव मीठ मिसळावयाचें असतें. तें या रोगावर अत्यंत अल्प प्रमाणांत मिसळून वर आवश्यक असल्यास साखरहि मिसळावी. ताकाला जिऱ्याची फोडणी देऊन व खीर तयार करतांना ज्याप्रमाणें दुधांत तांदुळाच्या कण्या घालतात त्याचप्रमाणें या जिऱ्याच्या फोडणी दिलेल्या ताकांत तांदुळाच्या कण्या घालून पातळ खिरीप्रमाणें तें शिजवावें. हें पांडुरोग्यास फार गुणकारी होतें, विशेषतः उन्हाळ्यांत हा प्रयोग लाभदायक होतो. बेसनाऐवजी तांदुळाचे पीठ लावून केलेली कढी द्यावी.

सर्व प्रकारच्या डाळी वर्ज

पांडुरोग्याला सर्व प्रकारच्या दाळी वर्ज कराव्या. साळीच्या लाह्या, मखाणे, सकाळच्या प्रहरीं मनुका भाजून मीठ, मिरे लावून द्याव्या. गव्हाची पोळी, पालेभाज्या, दुध्या, परवर, तोंडली, मुळा, गिलकी या भाज्या द्याव्या. वांगीं, बटाटे देऊ नये. लसूणहि विशेषतः वातज पांडूवर गुणकारी होत. ती मात्र फार थोड्या प्रमाणांत दिली पाहिजे व त्याच्या कळ्या दह्यांत शुद्ध करून दिल्या पाहिजेत. ऊंसाचा रस द्यावा, किंवा पांडुरोगी तरुण व सशक्त असेल तर त्याला ऊस दांतांनींच खाण्यास द्यावा. दिवानिद्रा वर्ज्य असावी. व्यायाम फक्त चालण्याचा करावा. या सर्व उपचारांनीं यकृतावर चांगला परिणाम होऊन पाण्डुरोग लवकर बरा होतो.

प्रो. र. धों. कर्वे, एम्.ए. कृत

१	व्यभिचाराची मीमांसा	किं. ६ रु.
२	आधुनिक आहारशास्त्र	१॥ रु.
३	आधुनिक कामशास्त्र	४ रु.
४	वेश्याव्यवसाय	२ रु.
५	समाजस्वास्थ्य मासिकांतील निवडक लेख भाग २रा	२ रु.
६	समाजस्वास्थ्य मासिक (वार्षिक वर्गणी)	३ रु.
७	संततिनियमन (सचित्र)	१। रु.
८	गुप्तरोगांपासून बचाव	१ रु.
९	तेरा गोष्टी	१ रु.
१०	त्वचेची निगा	८ आणे
११	गुरुबाजी (नाटक)	८ आणे
१२	न्यायाचा शोध (नाटक)	१ रु.
१३	पॅरिसच्या परी	३ रु.

१ राइट एजन्सी, नवी भटवाडी मुंबई ४
२ वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घट्टयावर पांगाऱ्याचा पाला

डॉ. कैकिणी यांचा अनुभव

रसचंद्रिका पुस्तकाच्या घरगुती औषधें विभागाला डॉ. व्यं. म. कैकिणी यांचा विषयपरिचय प्रारंभीं दिला आहे. त्यांत त्यांनीं साध्या औषधानें असाध्य व दुर्दम्य समजले गेलेले रोग कसे जातात याचें उदाहरण म्हणून 'घट्टयावर (Corn) पांगाऱ्याचा पाला १०।१५ दिवस वाटून लावणें' हा प्रयोग दिला आहे. भिषग्विलास मासिकांत त्याची उतारा पूर्वी (फेब्रुवारी १९४६) प्रसिद्ध केला होता व पनवेल संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांतहि तो आला आहे.

माहिती सत्य आहे

वैद्यराज धामणकरशास्त्री (पनवेल) यांनीं या माहितीची प्रचीति पाहिली असून त्यांना ती सत्य असल्याचें आढळून आलें आहे. ती माहिती येणेंप्रमाणें:-

अयशस्वी शस्त्रप्रयोग

"कांहीं वर्षांमागें एक गृहस्थ उजव्या हाताच्या बोटाला लेखणीच्या घर्षणानें उत्पन्न झालेल्या घट्टयामुळें आपणास फार त्रास होतो व लिहिणें अशक्य होतें असें म्हणाले. व त्यांच्या म्हणण्याप्रमाणें मी तो घट्टा (Cron) चाकूनें कापून काढला. पण त्याच जागीं तसाच किंवा पूर्वीपेक्षां मोठा घट्टा वर्षाच्या आंत पुनः उत्पन्न होऊन त्यांना त्यापासून पूर्ववत् त्रास होऊं लागला. पण शस्त्रक्रियेपासून फायदा न झाल्यामुळें पुनः चाकू वापरण्यांत आला नाहीं.

पाल्यानें घट्टा गेला

तेच गृहस्थ त्यानंतर चार वर्षांनीं दुसऱ्या कांहीं कामाकरितां मला भेटले. त्यांच्या बोटाकडे पाहतां तेथें तो पूर्वीचा घट्टा नाहींसा झालेला असून बोट अगदीं निरोगी असलेलें आढळून आलें. चौकशीअंतीं असें समजलें कीं, त्या घट्टयापासून त्यांना फार त्रास होऊं लागला. शेवटीं त्यांनीं त्यांच्या एका मित्राच्या सल्यानें पांगाऱ्याचा पाला चेंचून तो त्या घट्टयावर दहा पंधरा दिवस बांधला व त्यापासून तो घट्टा अजिबात नाहींसा झाला व पैसे खर्च केल्याशिवाय रोगाचें निवारण झालें."

भारतांतील गंधक उत्पादन

दि जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या मिनरल इन्फर्मेशन ब्यूरोकडून प्रसिद्ध होणाऱ्या दि इंडियन मिनरल्सच्या अंकांत [खंड क्र. ३] 'ए स्टडी ऑफ अवर सल्फर पोझिशन' हा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत या देशांतील गंधक मिळण्याच्या साधनांची माहिती दिली आहे.

भारताची गंधक गरज ६२००० टन

श्री. एस्. एन्. बॅनर्जी यांनीं हा लेख लिहिला असून त्यांचें मतें गंधकाचे बाबतींत भारताची आजची गरज प्रतिवर्षी ६२,००० टन आहे. या देशांत गंधक अनेक ठिकाणीं सांपडत असलें तरी त्यास आर्थिक दृष्टया कांहींहि महत्व नाहीं. आणि म्हणून त्याची आयात करून सर्व गरजा भागवाव्या लागतात. देशाचा औद्योगिक विकास होऊं लागल्यावर निरनिराळ्या धंद्यांतील गंधकाचा खपहि वाढला आणि त्यामुळें त्याची आयात हळूहळू वाढत जाऊन १९३८ मधील २२,९६४ टनांवरून ती १९५० मध्यें ५६,४८८ टनांवर गेली.

भारतांतील गंधकप्राप्तीचीं ठिकाणें

सदरहु लेखकाच्या मतें कल्कगंधक, सुवर्णमाक्षिक, घाटसिला येथील तांबे गाळण्याचे केंद्रांतील फुकट जाणारे वायु, जोधपूर येथील सोडियम सल्फेटचे नैसर्गिक सांठे, काठेवाडांतील खारें पाणी सांचलेलीं ठिकाणें, आसामांतील सल्फरयुक्त कोळसा आणि जव्हार येथील शिसें-जस्ताचे अशुद्ध सांठे हीं गंधक मिळवण्याचीं दुसरीं साधनें आहेत. वरील संस्थेनें शहाबाद (बिहार) जिल्ह्यांतील आमजोर येथील सुवर्णमाक्षिकाच्या उत्पादनांत वाढ सुरू केली असून इतर साधनांचा उपयोग करून घेण्यावरहि विचार चालू आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म. प्रां. वैद्य मंडळ

सोलापूर-नगर जिल्ह्यांतील प्रचार कार्य

ता. ३१ रोजीं डिसेंबर वै बिंदुमाधव सोलापूर येथें पोहोचले. वैद्यराज बागेवाडीकर यांच्या घरीं त्यांचा मुक्काम होता. कर्नाटक प्रांतीय वैद्य संमेलनांत उपस्थित राहून अध्यक्षीय सूचनेस महाराष्ट्रातर्फे त्यांनीं अनुमोदन दिलें व सर्व मातृभाषांतून आयुर्वेदीय ज्ञानाच्या प्रसारास हार्दिक पाठिंबा दर्शविला. ता. १।१।५३ रोजीं दुपारीं सखाराम नेमचन्द धर्मार्थ दवाखान्यांत वैद्यमंडळींची सभा घेऊन मंडळाच्या चालू कार्यांची माहिती दिली. सोलापूर येथें सुमारें पंचवासवर सभासद नोंदले गेले. वैद्य बागेवाडीकर, वैद्य गायकवाड इ. वैद्यांनीं चालू कार्यांची माहिती दिली. कर्नाटक प्रांतीय संमेलनासाठीं आलेली बरीच वैद्यमंडळी भेटल्यामुळें उभयपक्षीं समाधान झालें.

नगर स्टेशनवर सत्कार

ता. २ रोजीं सकाळीं वैद्य बिंदुमाधव नगर येथें आले. स्टेशनवर त्यांचा सत्कार वैद्य मंडळी, व आयुर्वेदाश्रम, धन्वंतरी आदि औषधी कारखाने यांनीं केला. अध्यक्षांचा मुक्काम आयुर्वेदाश्रम फार्मसीच्या अतिथिगृहांत होता. सकाळीं १० वाजतां त्यांनीं आयुर्वेदाश्रम फार्मसी फिरून पाहिली. ता ११ वाजतां आयुर्वेदीय धन्वन्तरी फार्मसीला भेट देऊन दुपारचें भोजन वैद्यराज के. ज. क्षीरसागर (अध्यक्ष नगर कॉंग्रेस कमिटी) यांच्याकडे झालें. दुपारीं ३॥ वाजतां आयुर्वेद महाविद्यालयातर्फे त्यांचा सत्कार करण्यांत आला. तेथें आयुर्वेद विद्यार्थ्यांना उद्देशून त्यांचें भाषण झालें. त्यानंतर चर्चा झाली.

वृत्तपत्र प्रतिनिधींशीं चर्चा

सायंकाळीं ७ वाजतां वैद्यराज करंदीकर यांच्या निवासस्थानीं नगर येथील वृत्तपत्र-प्रतिनिधींस त्यांनीं भेट दिली व म. प्रां. वैद्य मंडळाचा दृष्टिकोन समजावून सांगितला. रात्रीं ९ वाजतां दादा चौधरी मराठी शाळेच्या जागेंत नगर वैद्य मंडळातर्फे सभा व प्रश्नोत्तरें झालीं.

बोटें रुग्णालयास भेट

ता. ३ रोजीं अश्वी येथें वैद्य भा. श्री. देसंडीकर यांच्या लोकलबोर्ड दवाखान्यास भेट दिली व ग्रामीण दवाखान्याची परिस्थिति समजावून घेतली. ता. ३ रोजीं रात्रीं बोटें येथील फिरत्या रुग्णालयांत मुक्काम केला, सर्व तृष्णारोगी व्यक्तिशः पाहिले व तेथील डॉक्टर मंडळींशीं चर्चा केली. परत येतांना ता. ४ रोजीं अध्यक्षांनीं संगमनेर येथील वैद्यमंडळींची भेट घेतली. नगर जिल्ह्यांतील सर्व प्रवासांत कार्यकारी मंडळाचे नगर जिल्ह्यांतील सभासद वैद्यराज देसवंडीवर अध्यक्षांच समवेत होते. त्यामुळे सर्व कार्यक्रम उत्तम रीतीनें पार पडले.

सर्जिकल ड्रेसिंगच्या वस्तू

सार्जिकल ड्रेसिंगसाठीं लागणाऱ्या वस्तूंचा १९४० च्या ड्रग्ज कंट्रोल कायद्यांत नमूद केलेल्या ड्रग या शब्दाच्या व्याख्येंत समावेश होत असल्यामुळें त्या तयार करण्यासाठीं व विकण्यासाठीं लायसेन्स घेतलें पाहिजे, असा सल्ला सर्व लोकांस व विशेषतः या वस्तू तयार करणाऱ्या व विकणाऱ्या लोकांना देण्यांत येत आहे. तेव्हां उपरोक्त वस्तु तयार करणाऱ्या व त्यांचा व्यापार करणाऱ्या कंपन्यांनीं वा व्यक्तींनीं त्यासाठीं तावडतोब लायसेन्स घ्यावें. लायसेन्स न घेतां व्यापार करणाऱ्या वा या वस्तू तयार करणाऱ्या लोकांवर सदरहू कायद्याच्या २७ व्या कलमाखालीं खटला होऊ शकेल.

गुणांत सरस ठरलेलीं 'आयुर्वेद सेवा संघाचीं' अनुभविक औषधें व पुस्तकें मिळण्याचें ठिकाण—

मे. पंडित बंधु
औषधांचे व्यापारी
पो. सटाणा (नाशिक)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पूर्व खानदेश अन्‌रजिस्टर्ड वैद्य सभा

वैद्य बिंदुमाधव, वैद्य प्रतापकुमार, वैद्य गोगटे यांचें मार्गदर्शन

आयुर्वेद पत्रिकेंत पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणें शनिवार ता. १७-१-५३ रोजीं पूर्व खानदेश जिल्ह्यांतील अन्‌-रजिस्टर्ड वैद्यांची एक सभा जळगांव येथें भरली होती. रजिस्ट्रेशनबाबत निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा खुलासा करण्याकरितां मुंबईचे वैद्य प्रतापकुमार पोपटभाई यांना मुद्दाम बोलावण्यांत आलें होतें व ते या सभेस उपस्थित होते. संयुक्त खानदेश वैद्य मंडळाचे श्री. जळूकरशास्त्री व मंत्री श्री. करंजीकर हेहि खास निमंत्रणावरून हजर राहिले होते. ही सभा जळगांव कॉंग्रेस हाऊसमध्यें भरली होती. सभेकरितां जिल्ह्यांतून जवळजवळ ६० अन्‌रजिस्टर्ड वैद्य आले होते. यांत कांहीं स्त्री वैद्य होते.

पाहुण्यांचा सत्कार

दुपारीं ४ वाजतां सभेच्या कामास सुरवात झाली. सुरवातीस वैद्य मधुकर सोनाळकर यांनीं या सभेचा उद्देश सांगितला; वैद्य प्रतापकुमार व वैद्य बिंदुमाधवशास्त्री या सन्मान्य पाहुण्यांचा परिचय करून दिला व त्यांच्या स्वागता निमित्त त्यांना हार-गुच्छ अर्पण केले.

भूमिका विशद केली

नन्तर वैद्य बिंदुमाधव पंडित यांनीं अन्‌रजिस्टर्ड वैद्यांबाबत स्वतः केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख केला व स्वतःची भूमिका विशद केली. ते म्हणाले:—

आतांपर्यंत १९३८ च्या कायद्यान्वयें कितीतरी लोक लायकी नसतां रजिस्टर्ड झाले व कितीतरी रजिस्ट्रेशनला लायक असतांहि राहून गेले. उत्तम अधीत वैद्यहि जे १९४१ सालीं प्रांताबाहेर वैद्यकी करीत होते, व मग या प्रांतांत वैद्यकी करावयास आले, तेहि अनरजिस्टर्ड राहिल्यामुळें त्यांना वैद्यक व्यवसाय करणे अशक्य झालें. ही परिस्थिति ठीक नाहीं, ही बदलावयास पाहिजे असा विचार मनांत आल्यामुळें अन्‌रजिस्टर्ड वैद्य-संघ स्थापन करून त्या दृष्टीनें आपण प्रयत्न करण्यास सुरवात केली.

माझी कार्यपद्धति अशी आहे

सरकारनें या गोष्टीचा फेरविचार करावयास सुरवात केली आहे, व ट्रिब्यूनलचें काम गेलीं २ वर्षे चाललेलें आहे. हें सुरूं झालेलें काम पद्धतीनेंच व्हावयास पाहिजे आहे व तें होत आहे अशी माझी धारणा असल्याकारणानें शक्यतों त्यांच्या कामांत व्यत्यय आणावयाचा नाहीं, त्यांना त्यांचें काम व्यवस्थित करूं देण्यास संपूर्ण सहकार्य आपण द्यावयास पाहिजे म्हणून मी कोणाहि अन्‌रजिस्टर्डची केस घेऊन ट्रिब्यूनलपर्यंत गेलो नाहीं. तरी पण माझ्या दौऱ्यांत अनेकांना भेटावें हा उद्देश मी डोळ्यापुढें ठेविला असल्यानें माझ्या आढळांत रजिस्ट्रेशनबाबत कांहीं अन्याय झाला असें दिसल्यास मात्र मी तो दूर करण्याचा प्रयत्न करीन. असा अन्याय दूर करण्याकरितांच मी हें काम हातीं घेतलें आहे. पुढारीपण मिळविण्याचा हेतु डोळ्यापुढें ठेवून हें काम मी आरंभलेलें नाहीं.

ट्रिब्यूनलचा कायदा सदोष आहे

आज आपणांपैकीं अनेकांना अन्याय झाला असें असेल, पण त्याला कारण ट्रिब्यूनलचें काम ज्या कायद्यानुसार चाललें आहे तो कायदा होय. तो दुरुस्त व्हावयास पाहिजे. कायद्याबाहेर कांहींहि करणें ट्रिब्यूनलच्या हातांत नाहीं. ट्रिब्युनलला अपवाद करतांच येत नाहीं हें लक्षांत ठेवावें.

अन्‌रजिस्टर्ड अस्थिवैद्याला शिक्षा

अस्थिवैद्यांसारखे व्यावसायिकहि आपल्या कायद्यांत येऊं घातले आहेत. नुकत्याच एका अन्‌रजिस्टर्ड अस्थिवैद्यांला व्यवसायाबद्दल शिक्षा झाल्याचें समजतें, सबब आतां कोणतीहि गोष्ट यापुढें सावधपणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करावयास पाहिजे, आणि म्हणूनच योग्य सल्ल्या-करितां वैद्य प्रतापकुमारांना या सभेसाठीं मुद्दाम बोलावणें केलें आहे. आपल्या शंका दूर करण्यास ते मदत करतील, अशी मला खात्री आहे.

शिक्षण घेण्याची संधि मिळणार

रजिस्ट्रेशनसंबंधींचा कायदा जरी असा घडला असला तरी आयुर्वेदाचें शिक्षण घेण्याची ज्यांची योग्यता आहे त्यांचेकरितां एक अभ्यासक्रम आंखला जात आहे व तो लवकरच अंमलांत येण्याची शक्यता आहे. परंतु याकरितां संघटित प्रयत्न व्हावयास पाहिजेत. म्हणून प्रांतीय वैद्य मंडळासारख्या संस्थांना मदत करून त्या संस्थांचे हात बळकट करण्याचा प्रयत्न आपण करावा."

वैद्य प्रतापकुमार यांचें भाषण

यानंतर वैद्य प्रतापकुमार यांनीं ट्रिब्युनलच्या कामकाजाची पद्धति विशद केली. ते म्हणाले:– रजिस्ट्रेशनकरतां आलेले अर्ज कार्यालयांत आल्यानंतर त्यांत ज्या कांहीं प्रश्नांचीं उत्तरें आलेलीं नसतील ती पाहून अर्जदारांकडून तीं भरून मागविलीं जातात व हें काम कार्यालय करीत असतें.

निर्णय कसा घेतला जातो?

असे खुलासे भरून आल्यावर ट्रिब्युनलच्या तीन सभासदांपैकीं एकएकाकडे क्रमानें तो अर्ज जातो व ट्रिब्युनलचा सभासद त्या अर्जाबद्दल आपलें मत निराळें नोंदवून ठेवितो. व नंतर सभेच्या वेळीं तीं सर्व मतें विचारांत घेतलीं जातात. साधारणतः तिघांच्याहि मतें जो अर्ज विवाद्य नाहीं, ज्याबद्दल दुमत नाहीं, त्यांचा निर्णय लगेच लागतो. असे अर्जच ९९ टक्के असतात. राहातां राहिला एकाद्या-बद्दलचा प्रश्न! तोहि शक्यतो सहानुभूतीनेंच सोडविला जात असला, तरी एकाद्याचें मत भिन्न असल्यास तो आपली भिन्न मतपत्रिका त्याला जोडतो. तरीपण दोन मतें एकाबाजूस झालीं कीं, बहुमतानें त्या अर्जाचा निर्णय लागतो.

४ नोव्हेंबर १९४१ रोजीं

अर्ज पाहिल्यानंतर त्या अर्जदाराचा व्यवसा ४ नोव्हेंबर १९४१ ला चालू होता कीं नाहीं, तसें त्याच्या चरितार्थाकरितां कांहीं अन्य साधनें आहे काय? अर्जदाराचें वय किती आहे? फार्मसी रजिस्ट्रेशन ॲक्टखालीं त्यांनीं आपलें नांव नोंदवलें आ काय? इत्यादि गोष्टींची तपासणी करण्यांत येते नंतरच रजिस्ट्रेशनबाबतची योग्यायोग्यता ठरविण्यांत येते

समक्ष भेटीचा उद्देश

कांहींना समक्ष भेटीकरितां बोलाविण्यांत येते त्यांत त्याचेकडून ४ नोव्हेंबर १९४१ला तो व्यवसा करीत असल्याचा पुरा आधार मिळाला नाहीं त त्याला एन्लिस्टमेंट देण्यांत येत नाहीं.

वैयक्तिक प्रश्नाचीं उत्तरें दिलीं

यानंतर तेथें जमलेल्या अन्‌रजिस्टर्ड वैद्यांनी आपआपली तक्रार मांडली व त्या प्रत्येकाला वैद्य प्रतापकुमार व वैद्य पंडित यांनीं योग्य उत्तरें देऊन त्यांचें समाधान केलें. यांतील कांहीं व्यावसायिक वयानें लहान होते, कांहीं १९४५ सालीं धंद्यास सुरवात केलेले, तर कांहीं प्रांताबाहेरील संस्थानांतील होते, कांहींनीं आपली पुरेशी माहिती दिलेली नव्हती, कांहींनीं आपला दुसरा धंदाहि उपजीविकेचें साधन म्हणून दाखविला होता. कांहीं जणांना अज्ञानामुळें, तर कांहीं वैद्यांना अर्ज करूनहि १० रुपये भरण्या-सारखी परिस्थिति नसल्याकारणानें रजिस्ट्रेशन मिळविता आलें नाहीं. सन १९३८ सालापासून व्यवसाय करीत आहेत पण तो व्यवसाय १९४३ पर्यंत बाहेर दुसऱ्या प्रांतांत केला आहे व नन्तर मुंबई प्रांतांत व्यवसायाकरितां आले अशी ही एक व्यक्ति होती. ३५ ते ३९ पर्यंत वैद्यकीय व्यवसाय केला आहे पण नन्तर २ वर्षें माल दुसराच धंदा केला, असे एक वैद्य होते. कांपौंडिंगचें काम १९४१ सालानंतरहि केलेले अनेक लोक होते, तसेंच स्त्रीवैद्याचें व त्यांच्या जोडीला साविकेचें (मिडवाइफ) काम करीत असल्या-बद्दलचा उल्लेख अर्जांत असणारी स्त्रीवैद्य होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या सर्वांना वै. प्रतापकुमार व वैद्य विंदुमाधव पंडित यांनीं उत्तरें देऊन मार्गदर्शन केलें. वैद्यक बोर्डाचे सभासद व महाराष्ट्र प्रान्तीय वैद्य मंडळाचे मंत्री वैद्य वि. म. गोगटे या सभेस उपस्थित होते. त्यांनीं या रजिस्ट्रेशन प्रकरणासंबंधीं निर्माण होऊ शकणारे सर्व प्रश्न एकामागून एक असे विचारले व त्या प्रश्नांनाहि उत्तरें देण्यांत आल्यावर हा कार्यक्रम संपला.

वाचकांचा पत्रव्यवहार—

अशोक साल कोठें मिळेल ?

रक्तप्रदर व त्यापासून उद्भवणारे उपद्रव यांवर अशोकारिष्टांचा फार प्राचीन काळापासून चांगला उपयोग सांगितला आहे व तसा होतोहि. परंतु हल्लीं अस्सल अशोकाची [ज्यास तांबडे फुलांचे घोस येतात] सालच मिळत नसल्यामुळें तें औषध करणें कठीण झालें आहे; तरी तशी साल कोणाकडे मिळत असल्यास त्याचा पत्रिकेमध्यें खुलासा करावा.

काळबादेवीचे जाधवजी लल्लूभाई, पायधुणीचे ए. अमृतलाल कं., माहीमचे परुळेकर ब्रदर्स फोंडा–घाट मधवाले, वगैरे वनस्पतींचे व्यापारी यांना खरो–खरच ही साल ओळखतां येते किंवा काय ? याबद्दल प्रश्नच आहे. या व्यापाऱ्यांना जे लोक ज्या सालीं ज्या नांवानें देतील त्या सालीं ते त्या नांवानें वैद्यांना देतात, व त्यावर अंध विश्वास ठेवून वापरणारे वैद्य जरूर वापरतात. औषधी गुण न आल्यामुळें खरो–खरच आयुर्वेदाची मात्र हानि होते.

नकली औषधांचा वापर

मी या एकाच सालीबद्दल लिहीत नाहीं; अशी दिशाभूल करणाऱ्या पुष्कळ साली व पानें मुळें आहेत. इतरहि कांहीं वादाचीं औषधें आहेत. तरी औषधीकरण चांगलें व्हावयास पाहिजे असल्यास हीं नकली औषधें विकणें व वापरणें बंद झालें पाहिजे असें माझें मत आहे. याबद्दल वैद्यवर्गाचेंहि दुमत असण्याचें कारण नाहीं. सर्व कारखानदार अशोकारिष्ट बनवतात तरी ही साल विपुल मिळते तरी कोठें व मिळत नसल्यास त्याचे अभावीं परिणामकारक अशी दुसरी कुठची साल घ्यावी याचा खुलासा करावा.

काढे टिकाऊ कसे करावेत ?

कांहीं वैद्य ताजे काढेच [३ महिने मुद्रा वगैरे न करतां व टिकण्यासाठीं धायटीफूल वगैरे न वापरतां] टिकाऊ म्हणून करतात, व बाटल्यांत पॅक करून विकतात व तसे ते राहतात. याला काय उपाय आहे. माहित असल्यास वैद्यांच्या ज्ञानांत भर पडण्या–साठीं म्हणून अवश्य पत्रिकेंत जाहीर करावा.

वैद्य आ. वा. साधले

पायोरेक्स :– पायोरिया आणि दांतांचे सर्व रोगांवर. दांत मजबूत करतें.
पाइल्स क्युअर :– कोणत्याहीं तऱ्हेच्या हट्टी मुळव्याधीवर ताबडतोब गुणकारी
सेक्सोजेम (स्तंभकवटी)–
अत्यंत प्रभावी. एक वेळ खात्री करा.
ओ–नॉट–नाऊ खात्रीचे संततिप्रतिबंधक
— गर्गे मेडिकल स्टोअर्स —
मेनरोड, नासिक

तारुण्य कायम टिकविण्यासाठीं
शक्तिवर्धक व धातुपौष्टिक खाद्य
कंदर्प–वृष्य–पाक
तसेंच स्त्रियांचा मासिक धर्म बरोबर व
बिनतक्रार चालू रहाणेसाठीं
पुष्पवटी
हैद्राबादेंत आयुर्वेद सेवा संघाचीं सर्व
अनुभविक गुणकारी औषधें मिळण्याचें ठिकाण :–
* मे. आयुर्धाम मेडिकल हॉल *
सुलतान बझार, कोठी बसस्टँड समोर हैद्राबाद [द.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गिरगांव वैद्य मंडळाची स्थापना

म. प्रां वैद्यमंडळाचे चिटणीस वै. ना. ह. जोशी यांनीं गिरगांव भागांतील वैद्यांची एक सभा सोमवार ता. १२।१।५३ रोजीं दुपारीं ३ वाजतां आरोग्यमित्र कार्यालयांत बोलावली होती. सभेचा उद्देश समजावून सांगतांना वैद्य ना. ह. जोशी म्हणाले:–

'महाराष्ट्र प्रांतिक वैद्य मंडळाच्या आदेशा–नुसार प्रांतांत इतरत्र जिल्हा वैद्य मंडळें स्थापन झालीं असून त्यांचें कार्यहि सुरू झालें आहे. प्रांतिक मंडळाच्या घटनेनुसार मुंबई व उपनगर मिळून एकच जिल्हा कल्पिलेला आहे. तेव्हां अशा तऱ्हेनें म. प्रा. वै. मंडळाच्या घटनेनुसार त्यांच्याशीं संलग्न राहून कार्य करणारें " बृहन् मुंबई जिल्हा मंडळ " स्थापन होणें अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठीं आज जम–लेल्या गिरगांवांतील वैद्यांच्या या सभेनें गिरगांव वैद्य मंडळ स्थापन करून त्याचे तात्पुरते पदाधिकारी निवडावे. त्यांनीं पुढाकार घेऊन " बृहन् मुंबई वैद्य मंडळ " स्थापन करण्यासाठीं फेब्रुवारीच्या ३ ऱ्या आठवड्यांत मुंबई व उपनगरंमधील वैद्यांचें एक संमेलन भरवावें.'

अशा तऱ्हेच्या प्रास्ताविक खुलाशानंतर सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल वैद्य रामभाऊ भोगे यांचें नांव त्यांनीं सुचविलें, त्याला वै. अनंताचार्य घळसाशी यांनीं अनुमोदन दिल्यावर वैद्य रामभाऊ भोगे यांच्या अध्यक्षतेखालीं कामास सुरवात झाली.

तात्पुरतें कार्यकारी मंडळ

ठराव १ला– गिरगांव वैद्य मंडळाचे अध्यक्ष– वै. रामभाऊ भोगे, चिटणीस– १) वै. लक्ष्मीबाई बोरवणकर, २) वै. अनंताचार्य घळसाशी, खजिनदार– वै. ना. ह. जोशी या प्रमाणें पदाधिकारी असावे.

सूचक– वै. आ. बा. देव्हारे
अनुमोदक– ,, सौ. लक्ष्मीबाई परांजपे

कार्यकारी मंडळाचे सभासद

ठराव २रा– गिरगांव वैद्य मंडळाच्या कार्यकारी मंडळांत पुढील व्यक्तींचा समावेश करावा. त्य जे वैद्य हजर राहूं शकले नसतील त्यांची संमति घ्य

१ वैद्य रामभाऊ भोगे, २ लक्ष्मीबाई बोरवण ३ अनंताचार्य घळसाशी, ४ ना. ह. जो ५ आचार्य वेणीमाधवशास्त्री, ६ वामनराव दीनान ७ ग. म. अभ्यंकर, ८ आ. बा. देव्हारे, ९ श्री. चऱ्हाटकर, १० वि. म. पारकर, ११ र. कुळकर्णी, १२ भा. वि. बापट, १३ वि. नार्वेकर, १४ सौ. लक्ष्मीबाई परांजपे, १५ घळसा

सूचक– र. गो. कुळकर्णी
अनुमोदक– वि. म. पारकर

मुंबईतील वैद्यांचें संमेलन घ्यावें

ठराव ३रा– गिरगांव वैद्य मंडळ हें आज गिरगांव पुरतें मर्यादित असलें तरी या मंडळ बृहन् मुंबईतील सर्व वैद्यांचें एक संमेलन फेब्रुवारीच ३ ऱ्या आठवड्यांत बोलवावें व त्या संमेलना सर्वांच्या संमतीनें बृहन् मुंबई वैद्य मंडळाची स्थापन करावी.

वर्गणी

संमेलनाच्या स्वागत सभासदाची वर्ग २ रु., प्रतिनिधि वर्गणी २ रु. आणि जिल मंडळाची वार्षिक वर्गणी १ रु. ठेवण्यांत यावी.

त्यासाठीं विनंतिपत्रकें पावतीपुस्तकें वगै आवश्यक तें प्रचार साहित्य तयार करून घेऊन शक्य तितक्या लवकर कामास सुरवात करावी.

सूचक– लक्ष्मीबाई बोरवणकर.
अनुमोदक– वि. म. पारकर.

कार्यालयाचें स्थान

गिरगांव वैद्य मंडळाचें कार्यालय वैद्य अनंताचार्य घळसाशी यांचे घरीं भुलेश्वर मुंबई नं. २ येथें राहील.

सर्वांनीं सहकार्य करावें व संमेलन यशस्वी करावें अशा आशयाचें निवेदन अध्यक्षांनीं समारोपांत केलें व उपस्थित वैद्यांचे आभार मानल्यावर सभेचें काम संपलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औषधीनिर्माण व औषधिव्यापार यांतील दोष व ते दूर करण्याचे उपाय

(इंडियन फार्मास्युटिकल कॉंग्रेसचें ५ वें अधिवेशन कानपूर येथें ता. ३१ डिसेंबर रोजीं भरलें होतें. त्या कॉंग्रेसच्या आयुर्वेदीय विभागाच्या अध्यक्षस्थानीं उत्तरप्रदेश राज्याच्या चिकित्सा व स्वास्थ्य (आयुर्वेद) विभागाचे उपसंचालक श्री. द. अ. कुलकर्णी एम्. एस्सी. आयुर्वेदाचार्य यांची योजना झाली होती. त्यांच्या अध्यक्षीय भाषणांतील कांहीं महत्वाचा भाग पुढें दिला आहे.– संपादक)

वर्तमान कालमें आयुर्वेदके औषधि निर्माण तथा औषधि व्यापार में भी अनेक दोष आए हुए हैं। उनमें से निम्नलिखित बातों पर तुरन्त ध्यान देना और उन्हे दूर करना जरूरी है।

१ वैद्योंका तथा औषधिनिर्माताओंका अज्ञान

यह अज्ञान दो प्रकार का है। (अ) मूल द्रव्यों के वास्तविक स्वरूप एवं पहचान के सम्बन्ध में अज्ञान तथा। (ब) औषधि निर्माण की विधियों के सम्बन्ध में प्राचीन आयुर्वेदीय एवं आधुनिक व्यापारिक एवं वैज्ञानिक तरीकों के सम्बन्ध में अज्ञान। इन विविध प्रकार के अज्ञानों के कारण ही आयुर्वेदीय औषधियाँ आजकल ठीक ठीक नहीं बनने पाती है और उनका व्यवहार भी ठीक ढंग से नहीं किया जाता है।

मेल मिलावट

२--धूर्त व्यापारी एवं पन्सारियों द्वारा की जानेवाली मेल मिलावट एवं उसी नाम से दिए जानेवाले अन्य द्रव्यों का औषधि निर्माण में उपयोग! इसके कारण वीर्यवान् औषधियाँ शास्त्रीय पाठों के अनुसार ठीक ठीक बनने नहीं पाती हैं।

वीर्य और प्रभावमें कमी

३—तैयार औषधियों के संग्रह एवं पैकिंग के सम्बन्ध में असावधानियों का होना। जिसके कारण उनके वीर्य और प्रभाव में कमी आ जाती है।

निर्बंधोंका अभाव

४—औषधि द्रव्य एवं औषधि निर्माण के सम्बन्ध में आवश्यक सरकारी निर्बन्धों का एवं किसी प्रामाणिक फार्माकोपिया का अभाव, जिसके कारण भिन्न भिन्न निर्माणकर्ताओं की औषधियाँ भिन्न भिन्न प्रकार की बन जाना सम्भव हो जाता है।

अधिकृत कसौटियोंका अभाव

५—कोई औषधि या द्रव्य योग्य है अथवा नहीं इस विषय की अधिकृत कसौटियें का अभाव जिसके कारण अयोग्य और नकली कच्ची औषधियों का तथा उनके अयोग्य अंगों का भी सुयोग्य द्रव्य के नामपर औषधि निर्माण में उपयोग किया जाता है। जिससे कि उचित एवं निश्चित संघटक की औषधियाँ निर्माण ही नहीं होने पाती हैं।

अच्छे और सच्चे द्रव्य

आयुर्वेदीय औषधि निर्माण में जो सबसे बडी कमी आजकल दिखायी देती है वह है अच्छे और सच्चे औषधि द्रव्यों की प्राप्ति में कठिनाई; तथा औषधि कल्पों को शास्त्रीय ढंग से तैयार कराने में लापरवाही, इसी कमी के कारण आयुर्वेद चिकित्सा की उपयोगिता ठीक ठीक साबित नहीं होने पाती है।

सरकार का कर्तव्य

इन कमियों को दूर करने के लिए प्रादेशिक तथा केंद्रीय सरकारों को ही अग्रसर होना पडेगा। भारत में असंख्य औषधि द्रव्य सर्वत्र प्रचुर मात्रा में पाए जाते हैं। यदि उचित रूप से उनका संग्रह, संचय तथा व्यापार किया जावेगा तो सरकार को एक अच्छी आमदनी भी हो सकती है।

सूचि बननी चाहिये

इसके लिए आयुर्वेद, यूनानी तथा एलोपैथिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चिकित्सा में प्रयुक्त होनेवाली भिन्न भिन्न कच्ची औषधियों की एक बृहत् सूची बन जानी चाहिए। इस सूची के आधार पर उन द्रव्यों का निर्णय आधुनिक विज्ञानवेत्ताओं एवं आयुर्वेद शास्त्र के विद्वानों की एक संगठित कमेटी द्वारा किया जाना चाहिए।

संग्रहालय और वाटिका

इस प्रकार निश्चित किए हुए द्रव्यों का एक संग्रहालय (हर्बेरियम्) और बाटिका (बोटेनिकल गार्डन) प्रत्येक प्रादेशिक सरकार द्वारा अपने प्रदेश में कम से कम एक बनायी जावे जहाँ पर नमूने के तौर सभी प्रकार के द्रव्यों के रखे जाने की व्यवस्था हो और वाटिका में असली वृक्ष और पौदों के आदर्श नमूने स्थापित किए जायँ।

लायसेन्स लेना होगा

दुकानदारों को औषधि संबन्धी द्रव्यों को रखने और बेचने के लिए लाइसेन्स लेना होगा तथा उनको स्टाक करने के लिए उचित रूप से व्यवस्था भी करनी होगी।

अन्वेषण पद्धति

आजकल हमारे देश में भारतीय औषधि द्रव्यों पर अन्वेषण प्रारम्भ किया गया है परन्तु मैं अभी यह नहीं कह सकता कि यह अन्वेषण आयुर्वेद चिकित्सा पद्धति के लिए कहाँ तक उपयोग सिद्ध हो सकेगा, क्योंकि वहाँ पर प्रयोग के लिए औषधियाँ आधुनिक शास्त्रों के वर्गीकरण के आधार पर ही संकलित परीक्षा की जाती, हैं, आयुर्वेदशास्त्र के द्रव्यगुण के आधार पर नहीं। बनस्पतिशास्त्र के आधारपर जो वर्गीकरण किया जाता है। उसमे एकहि जाति की कई औषधियाँ उस वर्ग में आ जाती हैं। परन्तु आयुर्वेदिक पद्धति के आधार पर उस प्रत्येक द्रव्य की एक निश्चित पहिचान है तथा उसके औषधीय गुणों एवं कार्यों में भी अन्तर हैं।

प्रयोग करने के लिए वहाँ पर जो द्रव्य लिए जाते हैं उनके विशिष्ट गुणोत्पादक (Active Principles) को निकाल कर उनका अध्ययन किया जाता है। आयुर्वेदशास्त्र के अनुसार इसमें तत्वमें केवल द्रव्य के वीर्य मात्र का ही अन्तर्भाव हो जाता है! इसके आतिरिक्त अत्यन्त आवश्यक उनके रस, गुण, वीर्य, विपाक तथा प्रभाव आदि का विचार बिलकुल ही नहीं होने पाता है।

आयुर्वेदिक औषधियों के निर्माण तथा व्यापार सम्बन्धी यह कमियाँ आयुर्वेदिक चिकित्सा पद्धति की उन्नति के लिये बहुत ही बाधक साबित हो रही हैं। प्राचीन काल में प्रत्येक वैद्य अपनी आवश्यकता के अनुसार अपनी औषधियों को स्वयं तैयार कर लेता था। लेकिन आजकल यह संभव नहीं है। समय की मांग के अनुसार आयुर्वेद और यूनानी तिब्ब में बडी बडी एवं प्रामाणिक फार्मासियों का स्थापित हो जाना आवश्यक हो गया है। इनके कार्य में जो भी बाधाएँ आवेगी उन्हें दूर कर देना होगा। इन फार्मेसियों की स्थिति सुधारने तथा उनका स्तर ऊँचा करने के लिये मेरे निम्नलिखित सुझाव हैं।

प्रमुख वैद्यहकीमो की कमेटी

१— भारत के प्रत्येक प्रदेश में प्रमुख वैद्यों एवं हकीमों की एक कमेटी बनाई जाय जिसमें कुछ प्रतिनिधि पाश्चात्य चिकित्सा पद्धति के एवं औषधि निर्माणशास्त्र के भी ज्ञाता हों। इस समिति द्वारा भिन्न भिन्न प्रान्तों में आमतौर से प्रयोग होनेवाले औषधियों की एक बृहत सूची बनायी जावे।

आयुर्वेदिक फार्माकोपिया

२— इस सूची के आधार पर एक आयुर्वेदिक फार्माकोपिया तैयार किया जावे; जिसमें औषधियों की निर्माणविधियाँ भी निश्चित की जावे। औषधियों की मात्रा में भी आमूल परिवर्तन करना होगा। क्योंकि अनेक औषधियाँ की प्राचीन काल की मात्राएँ इस समय उचित प्रतीत नहीं होती हैं। इसके साथ ही साथ तौल तथा नाप के प्राचीन ग्रंथों के पैमानों को भी बदलकर अखिल भारतीय स्वरूप उन्हें दे देना आवश्यक हो गया है।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३—व्यापारिक ढंगसे प्रचलित सभी फार्मेसियों को केवल उपरोक्त फार्माकोपिया में दी हुई औषधियों को और उसमें बताई हुई विधियों के अनुसार बनाना होगा।

४—इन औषधियों का मूल्य निर्धारण भी हो जाना चाहिए।

निर्मितीके लिये ज्ञानी वैद्य

५—उपरोक्त फार्मेसियों में औषधि निर्माण के लिए ऐसे वैद्य रखे जाय जिन्हें आयुर्वेद के परिपूर्ण ज्ञान के साथ ही औषधि निर्माण सम्बन्धी आधुनिक विज्ञान की बातों का भी आवश्यक ज्ञान हो। ऐसे वैद्य तैयार करने के लिए एक विशेष कोर्स भी बना देना चाहिये।

फार्मसी को लायसेन्स

६—प्रत्येक फार्मेसी को सरकार द्वारा लाइसेन्स दिया जाना चाहिये तथा समय पर योग्य सरकारी कर्मचारियों अर्थात् निरीक्षकों द्वारा इन फार्मेसियों का निरीक्षण भी हो जाना चाहिये।

७—फार्मेसियों में शुष्क द्रव्यों (Raw Drugs) तथा तैयार औषधियों को स्टाक करने का समुचित प्रबन्ध भी होना चाहिये।

८—आसवारिष्टों में मद्यसार (Alcohol) की भी मात्रा निश्चित हो जानी चाहिए।

९—तैयार औषधियाँ रंग, रूप, स्वाद आदि में सभी फार्मेसियों की एक सी होनी चाहिए।

१०—तैयार औषधियाँ पर उनकी निर्माण तिथि अवश्य दी जानी चाहिए जिससे कि उक्त औषधियों की कार्यक्षमता का बोध हो सके।

प्रयोगशाला होनी चाहिये

११—प्रत्येक फार्मेसी के साथ एक प्रयोगशाला (Laboratory) भी होनी चाहिए, जिसमें कच्ची औषधि द्रव्यों एवं तैयार योगों की समुचित परीक्षा करा लेना सम्भव हो सकेगा।

उत्तर प्रदेशने कदम उठाया है

उत्तर प्रदेश की सरकार ने इन सभी बातों के सम्बन्ध में आवश्यक कदम उठाया है। राजकीय आयुर्वेदीय एवं यूनानी औषधि निर्माणशाला, एवं उनके मार्गदर्शन के लिए एक समिति की स्थापना तथा एक सुयोग्य आयुर्वेदीय एवं यूनानी फार्माकोपिया के निर्माण के लिए एक सुयोग्य समिति की स्थापना करके प्रदेशकी सरकार ने इन सभी प्रश्नों को चालना दी है और ये सभी कार्य मेरी अध्यक्षता में ही शुरू हो गए है।

योग्य स्थळांचीं नांवें सुचवा

(आयुर्वेद सेवा संघांतील कार्यकर्त्यांकडे वरांचीं नांवें सुचविण्याबाबत नेहेमींच पत्रें येत असतात. वैद्यांच्या मुलीसाठीं अगर वैद्य जावई मिळावा अशी अपेक्षा बाळगणाऱ्या स्थळासंबंधीं सूचना आयुर्वेद पत्रिकेंत प्रसिद्ध केल्या जातील. —संपादक)

मुलगी— वय १८ वर्षे. यंदा मॅट्रिकला बसत आहे. गोत्र शांडिल्य, रूपानें उजळ. मुलीचे वडील डॉक्टर आहेत.

वराबाबत अपेक्षा-घरंदाज, शिक्षण इंटरपर्यंतहि चालेल, रंग काळासावळा, आयुर्वेदविशारद अगर डॉक्टर मिळाल्यास जास्त चांगलें. उद्योगी व शीलसंपन्न असावा. शहरांतच राहणारा पाहिजे असें नाहीं.

आयुर्वेद सेवा संघ नासिकचीं सर्व गुणकारी
औषधें मिळण्याचें ठिकाण
जनरल सप्लायर्स (हिंद)
११४ बी, जगन्नाथाची चाळ
फणसवाडी, मुंबई २
तसेंच शास्त्रोक्त पाठाप्रमाणें नवीन नवीन
औषधेंहि तयार करून दिलीं जातात.

पवित्र नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहा:-नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिसरें माणूस

" त्या दिवसापासून जोश्यांच्या घरांत जणु तिसरें माणूसच आलें. त्या (कुत्र्याच्या) पिलाच्या अंगावर पिसवा झाल्या होत्या. आणि त्याच्या कानाच्या आंतल्या बाजूला क्षत पडलीं होतीं. तें कुठेंहि चढे आणि घाण करी. एकदा तर काकांचा नवा बूटच त्यानें करडून टाकलान्. काका काकी वैतागून गेलीं.

नवीन विषय

कुत्र्याचा त्रास होत होता यांत शंकाच नाहीं. पण ते आल्यापासून काकींचा रिकामा वेळ भरून होता. काकींना आणि काकांना ज्यांत जोडीनें रस घेता येईल असा नवीन विषय मिळाला होता.

सूक्ष्म आनंद

आपण कोणाच्यातरी तहानभुकेकडे पाहात आहोत कोणत्यातरी जित्या जिवाला वळण लावीत आहोत याचा सूक्ष्म आनंद काकींना होत असावा."

—ना. ग. गोरे

तृष्णारोगांवर पिकलेलें कवठ

तृष्णारोगांवर पिकलेल्या कवठाचा बियासह संपूर्ण गीर खाण्यास द्यावा असा उपाय वै. द. कृ. गोगटे यांनीं सुचविला आहे.

आयुर्वेद पत्रिकेचा
वैद्यराज सांबारे विशेषांक

सांगली येथें सांबारे वैद्य सुप्रसिद्ध होऊन गेले. त्यांची निदानाचीं व चिकित्सेंत द्रव्यें वापरण्याची विशेष पद्धति होती. त्यांनीं कांहीं कांहीं रुग्ण फार चांगल्या रीतीनें बरे केले. ते औषधांचे अर्क काढून वापरीत असत. या सर्व औषधीकरण व औषधीयोजनापद्धतीवर प्रकाश पाडणारा असा अंक प्रसिद्ध करण्याचें आयुर्वेद पत्रिकेनें योजले आहे. तरी ज्यांना त्यांच्या चिकित्सेविषयीं माहिती असेल त्यांनीं ती माहिती, फोटो वगैरे सर्व साहित्य प्रसिद्धीसाठीं आयुर्वेद पत्रिकेकडे अवश्य पाठवावें अशी विनंति आहे.

व्यवस्थापकः– आयुर्वेद पत्रिका, नाशिक

कुरुपावर आघाड्याचा पाला

कुरुपावर आघाड्याचा पाला पाण्याशि वाटून लावावा. व वरून पट्टी बांधावी. तसेच थो आघाड्याचा पाला वाटून अगर चावून खा यांप्रमाणें दिवसांतून ३ वेळ करावें.

एक महिनाभर हा प्रयोग चालू ठेवल्य कुरुपें जागच्या जागीं जिरून जातात असा मा अनुभव आहे. वाचकांनीं अनुभव घेऊन पत्रिके कळवावा. अशी विनंति आहे.

—वैद्य के. तु. ल

कारागीर शिक्षणशाळा

कल्याणजवळ अंबरनाथ येथें 'तरुणांना कुश कारागिरीचें शिक्षण देणारी एक शाळा असें कारखान्याचें एक अंग आहे असा' कारखान ता. १३ जानेवारी रोजीं पंतप्रधान नेहरू यांच हस्तें सुरू झाला आहे. दरसाल १०० नवीन मॅट्रि पर्यंत शिक्षण झालेले विद्यार्थी यांत घेतले जातात.

प्राणिज द्रव्यांच्या नाविन्यपूर्ण चिकित्सेनें आरोग्य मिळवून नवचैतन्य प्राप्त करा. फक्त ७ ते १४ दिवस घेतल्यानंतर चमत्कार पहा. ह्याच त्या गोळ्या "मिश्र शक्तिसागर" १४ गो. २ रु., ४२ गो. रु. ४ ट. ख. वेगळा याबरोबरच "रजि. युनानी तिला" वापरल्यास सोन्यांत सुगंध समजा. लहान बा. २॥ रु. मोठी बा. ४ रु., ट. ख. अलग.

मिश्रा महाराष्ट्र फार्मसी (रजि.)
ब्रह्मपुरी (चांदा) म. प्र.

निवडक रुग्ण चिकित्सा ग्रंथ
(मराठी, भाग १ ला)
आयुर्वेद सेवा संघ प्रकाशन
किं. ४॥ रु., ट. ख. वेगळा
–: वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक :–

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म. प्रां. वैद्य मंडळ अध्यक्षांचा पूर्व व पश्चिम खानदेशांतील दौऱ्याचा वृत्तांत

सोलापूरास ३१ डिसेंबर रोजीं असलेल्या कर्नाटक प्रांतीय वैद्य संमेलनास हजर राहण्यासाठीं खंडित केलेला आपला दौरा म. प्रां. वैद्य मंडळाचे अध्यक्ष वैद्य बिंदुमाधव पंडित यांनीं ता. १४ ते २१ अखेर मालेगांव, धुळे, अमळनेर, जळगांव, रनाळा, नवापूर, नंदुरबार, तळोदे, शिरपूर व नरढाणा असा प्रवास करून पुरा केला. ता. १४ रोजीं मोटारनें मालेगांवीं जाऊन वैद्य पुरोहित, वझे, शर्मा इत्यादि वैद्यांच्या दवाखान्यांत जाऊन व्यक्तिशः भेटी घेतल्या व विचारविनिमय केला. ता. १५ रोजीं धुळें येथें नगरपालिका दवाखान्यास भेट दिली. दुपारीं प्राणिरक्षक संस्थेच्या दवाखान्यांत वैद्याची सभा घेतली. याशिवाय गांवांतील वैद्य-डॉक्टरांच्या दवाखान्यांना भेटी देऊन त्यांच्याकडून वैद्यकीय व्यवसायाच्या सद्यःस्थितीसंबंधीं माहिती मिळविली. वैद्यराज वि. श्री. पाठक व मानेकर यांनीं येथील कार्यांत मनःपूर्वक साहाय्य केलें. धुळें येथें पूर्वीं आयुर्वेदाच्या शिक्षणाची व्यवस्था होती. सरकारनें केवळ आयुर्वेदाच्या शिक्षणास संमति दिल्यास येथें अध्यापन कार्य सुरूं होऊं शकेल काय याबद्दलहि विचारविनिमय केला.

अमळनेर येथील उत्साही वातावरण

अमळनेर येथें वैद्यराज एकतारे, वैद्य कालीदास यांनीं अध्यक्षांच्या बरोबर येऊन सर्व वैद्यांच्या गांठीभेटी करविल्या व वैद्य शांताराम वैद्य यांच्या दवाखान्यांत भरलेल्या वैद्यांच्या सभेंत अध्यक्षांचें भाषण झालें. नंतर विचारलेल्या प्रश्नांना उत्तरें देण्यांत आलीं. अमळनेर येथें वैद्य गदाधरपंत व वैद्य शांतारामपंत या मागील पिढीतील मंडळीनीं म. प्रां. वैद्य मंडळाच्या कार्यांत भाग घेण्याबाबत चांगला उत्साह दर्शविला व आपले अनेक अनुभवी औषधी-प्रयोग सभेसमोर निवेदन केले.

श्रीमान् प्रतापशेट यांची भेट

सायंकाळीं ४ च्या सुमारास अमळनेर येथील प्रताप आयुर्वेदिक रिचर्स इन्स्टिट्यूटचे निर्माते दानशूर श्रीमान् प्रतापशेट यांची भेट अध्यक्षांनीं घेतली, व नव्या आरोग्यमंत्र्याचें आयुर्वेदाबाबतचें धोरण त्यांच्या कानावर घातलें. अमळनेर येथें आयुर्वेदाच्या अध्यापनाची संस्था काढावी असें शेटजींच्या मनांत प्रथमपासून आहे असें कळतें. योग्य संधि मिळतांच अमळनेर येथें अशी संस्था निघण्याची शक्यता आहे.

संयुक्त खानदेश वैद्य-मंडळ कार्यालय

जळगांव येथें झालेल्या सभांचें वृत्त इतरत्र दिलें आहे. संयुक्त खानदेश वैद्य मंडळाचे प्रधानमंत्री वैद्य करंजीकर हे जळगांव येथें अध्यक्षांना येऊन मिळाले. तेथून ते नरढाणे अखेरपर्यंत त्यांच्याबरोबर होते. त्यांच्या सहकार्यामुळेंच हा दौरा इतक्या थोड्या कालांत व इतक्या विस्तृत प्रमाणावर होऊं शकला. रनाळा हे वैद्य करंजीकर यांचें कार्यक्षेत्र. तें ता. १८ रोजीं सकाळीं पाहिलें. सं. खानदेश वैद्य मंडळाचें कार्यालय येथेंच आहे. या गांवीं बोहोरी वस्ती विशेष आहे. वैद्य करंजीकर यांच्या दवाखान्यांत व्याख्यानाचा लहानसा कार्यक्रम झाला.

मेडिकल युनियनमध्यें व्याख्यान

ता. १८ रोजीं रेल्वेनें अध्यक्ष व करंजीकर नंदुरबारकडे रवाना झाले. याच गाडीनें नरढाण्याहून वैद्य श्री. मैंदी आले होते. त्यांनीं अध्यक्षांना पुष्पमाला अर्पण केली. नंदुरबारच्या स्टेशनवर बरीच वैद्यमंडळी चोहोंकडून (तळोदे, नंदुरबार, नवापूर इ.) आली होती. नवापूरचे वैद्य शुक्ल यांच्या विशेष आग्रहास्तव अध्यक्ष इतर वैद्यमंडळीसह त्याच गाडीनें पुढें नवापूरला गेले. तेथें वैद्य जोशी यांच्या घरीं फलाहार झाल्यानंतर नवापूर मेडिकल युनियनतर्फे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेथील सरकारी दवाखान्यांत वैद्य-डॉक्टरांच्या मिश्र सभेंत अध्यक्षांचें भाषण झालें. "आयुर्वेदाची निदान व चिकित्सापद्धति इतर वैद्यकाकडून निराळी व मूल-गामी अशी आहे" असे विचार १। तासाच्या भाषणांत त्यांनीं श्रोत्यासमोर मांडले. त्यानंतर कांहीं रुग्णांची तपासणी झाल्यानंतर नवापूर येथील इंग्रजी शाळेंतील एका व्याख्यानमालेचें उद्‌घाटन अध्यक्षांच्या हस्तें झालें. त्याप्रसंगीं 'कांहीं आरोग्यदायी आचारविचार' या विषयावर त्यांनीं भाषण केलें. त्याचरात्रीं अध्यक्ष वैद्यमंडळीसह नंदुरबार येथें परतले. नवापूर येथें वैद्य विद्याशंकर दवे यांच्याजवळ हस्तलिखित वैद्यकीय ग्रंथांचा फारच उत्तम संग्रह आहे. जिज्ञासू लोकांनीं येऊन सवडीनें तो पहावा अशी त्यांची विनंति आहे.

आयुर्वेद अभ्यास मंडळ, तळोदे

नंदुरबारहून सकाळीं तळोदे येथें जाऊन वैद्य पुराणिक व वैद्य काकडे यांनीं सुरू केलेल्या अभ्यास-मंडळाला अध्यक्षांनीं भेट दिली. वैद्यांना उद्देशून लहानसें भाषण केलें. गांवातील कांहीं रुग्ण तपासून त्यांच्या निदानाची आयुर्वेदीय पद्धति दाखविली. सभेंत कांहीं वैद्यांनींहि आपले विचार अध्यक्षांच्या समोर विचारार्थ मांडले.

नंदुरबार येथें जाहीर व्याख्यान

त्याच दिवशीं सायंकाळचा व्याख्यानाचा कार्य-क्रम नंदुरबार येथें म्युनिसिपल हॉलमध्यें झाला. व्याख्यानाला सुप्रसिद्ध वकील घनःशामभाई मेहेता आदि मंडळी हजर होती. नंदुरबार येथें गुलाबाचीं फुलें विशेष प्रमाणांत मिळतात असें दिसून आलें.

शिरपूर येथील सुप्रसिद्ध वैद्य मंडळी

नंदुरबारहून शिरपुरास जातांना व येतांना नरढाणा येथें लोकलबोर्ड दवाखान्यावरील वैद्य ना. के. मेंढी व तेथील औषधी व्यापारी श्री. सोनार बंधु यांची भेट झाली. शिरपूर येथें पश्चिम खानदेशांतील सुप्रसिद्ध वैद्य कालिदास मधुसूदन यांचेकडे अध्यक्षांचा मुक्काम होता. १९४१ सालीं यांच्याच नेतृत्वाखालीं शिरपूर येथें सं. खा. वैद्य मंडळातर्फे संमेलन भरलें होतें. व्यापारी असोसिएशन तर्फे चालू असले धर्मार्थ दवाखान्यावरील वैद्य अच्युतराव (पोपट यांनीं गोमूत्रचिकित्सेविषयीचे विशेष अनुभव नि दन केले. त्यांच्या वडिलांना गोमूत्रवैद्य असेच म्ह असत. गोमूत्र वाळवून गोळ्या करून त्याहि वापर

शिरपूर हायस्कुलांत व्याख्यान

सायंकाळीं ४॥ वाजतां शिरपूर येथील हायस्कूलमध्यें 'विद्यार्थ्यांचे आरोग्यविषयक प्र या विषयावर विद्यार्थ्यांना मनोरंजक असें व्याख्या झालें. शिवाय सायंकाळीं ६॥ वाजतां म्यु. हॉल 'जनतेचें आरोग्य व आयुर्वेद' याविषयींचे अनु निवेदन केले. दौऱ्यांत सर्वत्र महाराष्ट्र प्रां वैद्य मंडळानें गेलीं ६।७ वर्षे चालविलेले के आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमाबाबतचे अखंड प्र व त्यांना यश येण्याची भावी काळांतील शक्य यासंबंधीं माहिती दिली. सर्वत्र वैद्यमंडळींनीं उत्स पूर्वक सर्व कार्यक्रमांत भाग घेतला व अध्यक्षां दौरा काढून वैद्यमंडळींची भेट घेतली व त्यांच मनांत उद्भवणाऱ्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन समाधा केले याबद्दल आभार मानले.

लांबलांबच्या खेड्यापाड्यांतहि आयुर्वेद सेवा संघ, नाशिकच्या सर्व गुण-कारी औषधांस नित्याची मागणी असते.

श्री अशोक अरुणाचल मंकाल
पो. चिटगोपा (जि. गुलबर्गा)

बृहदासवारिष्ट (हिंदी)
पूर्वार्ध, किं. ४॥ रु. } ट. ख. वेगळा
उत्तरार्ध, किं. ३॥ रु }
लेखकः-वै. पंडित कृष्णप्रसादजी त्रिवेदी
-: वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक :-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रां. वैद्य मंडळाचे सन १९५३ चे सभासद

(मागील अंकावरून पुढें चालू)

पश्चिम खानदेश जिल्हा

वि. ब. काकडे, का. सा. पुराणिक, एन्. जे. साक्रीकर, श्री. रा. करंजीकर, अबूभाई अब्दुलअली, मा. दा. व्यास, पा. रा. पुराणिक, सौ. मंजुळाबेन हसमुखलाल, हसमुखलाल शहा, ए. एल्. के. पठाण, दौलतराम शर्मा पंजाबी, स. घ. साळी, ऑ. मु. तेली, शं. गो. मराठे, बा. रा. नामवाल, शं. ता. बोरसे, अब्बासभाई इसाकभाई, वि. श्री. पाठक, के. कृ. मानेकर, क. रु. शिंपी, ए. बी. मिरजकर, एस्. बी. शिंदे, सौ. अयोध्याबाई मोरे, वि. रा. दवे, गो. शं. शुक्ल, ब. म. वैद्य, मो. दो. लोणारे, का. म. वैद्य, ओ. नं. माळी, धों. छो. मेस्त्री, र. दी. वैद्य, पि. चु. दवे, ना. बा. मांडे, के. रा. शिंदे, न. के. मेंढी, म. मा. जोशी, वि. द. वैद्य, वि. हि. त्रिवेदी, पा. रा. जोशी, नि. र. ठाकूर, अ. द. वैद्य, गो. का. वैद्य, बा. ल. सेवातकर.

कुलाबा जिल्हा

वै. श्री. दा. महाजन, के. ना. कर्णिक, श्री. ना. हर्षे, गो. व्यं. कुळकर्णी, काकासाहेब पुराणिक, नानासाहेब पुराणिक, अप्पासाहेब पुराणिक, न. पां. सामंत, पु. वि. घामणकर, भा. द. गोडबोले, भा. ग. लेंढे, रा. रा. साळवी. कृ. वा. कर्वे, श्री. दा. वेलणकर.

नगर जिल्हा

वै. भाऊराव भीमराव हराळ, बाबुराव अमृत शिंदे, र. द. जोशी, वामनराव ग. कल्याणकर, वि. रा. पाखले, पी. जॉन्सन, गो. गो. भागवत, पां. म. ठकार, गो. ए. शुक्रे, आर. डी. क्षीरसागर, भा. श्री. देसवंडीकर, दा. प. आपटे, ब. वि. साठ्ये, के. ज. क्षीरसागर, आर. वाय. पंडित, रं. का. मुळे, शं. रं. देशपांडे, ना. ग. करकमकर, के. एस. करंदीकर, र. वा. गुणे, वि. शं. दिघे, म. मा. गुणे, शंकरारण्य भवारण्य, ल. शं. मुळे.

नासिक जिल्हा

सो. हं. मुत्था, शिवकुमार शर्मा, गो. वि. वझे, द. पु. चोरडिया, मंगळ चूडामण भावसार, प्र. शं. झेंडे, भ. ह. रजपूत, गो. ना. नायर.

पूर्व खानदेश जिल्हा

व. का. सि. भावे, ल. मो. व्यास, शं. सो. बऱ्हाटे, आसराज सुरजकिरण, इंदुमती देव, द. व. कुळकर्णी, बन्सी श्रीपत चव्हाण, कालिदास वैद्य, रामदास कालिदास वैद्य, रामदास श्रीकृष्ण नाईक, म. शां. सोनाळकर, य. गो. पाटील, बा. ल. फटांगळे, स. शि. लोखंडे, हि. त्रिं. पटेल, देवचंद दगडु कोळीये, म. पु. हरकरे, वा. तु. सुतारे, माणिक श्रीधर मराठे, बा. शं. धारपुरे, झि. ना. मराठे, म. ल. वलेरा, ज. ना. जोशी, नामदेव द. शिंपी, मा. वा. जोशी. अ. बा. जोशी, श्री. कृ. करमरकर, ब्रह्मदत्त शर्मा, ना. ला. इंदूरकर, दत्तात्रयशास्त्री जळूकर, अ. वा. नाईक. भवानीशंकर वैद्य, का. भि. सोनार, पु. कृ. नाईक, ना. गं. जोशी, ह. शा. उपासनी, मा. ना. वैद्य, रा. . जोशी, ग. गो. वैद्य, शेख महंमद करीम, र. व. पालिवाल, ग. गो. कुळकर्णी. क. शि. वर्मा, जी. एफ्. कुमावत (चव्हाण), चिं. का. चौधरी, तो. ल. महाजन, चिं. गु. सोनवणे, ह. वि. सोनार, बा. सु. सोनार, द. सु. पाटील, ए. एस्. लाखे, व्ही. टी. जोशी, जे. एन्. वाणी, गो वि. शुक्ल, व. ना. उपासनी, श्री. ग. वैद्य, मो. ग. वैद्य, शां. गो. वैद्य, चंद्रात्रे, दि. का. चौधरी, टि. द. कोल्हे, वा. शा. कुळकर्णी, भा. शं. जहागिरदार, शंकरसिंह रजपूत, ज. वा. मोकाशी, ह. रा. बराटे, व्ही. व्ही. भांरबे, मु. मा नेमाडे, दे. खु. चौधरी, बा. ना. पाटील, सौ. जानकीबाई कुळकर्णी, कांचनाबाई ठोमरे, रा. मु. पाठक, होरमसजी बलसारा, का. शं. शेंदुर्णीकर. वि. दा. एकतारे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार

केवळ आयुर्वेदाचा अभ्यासक्रम

" मुंबई राज्याचे आरोग्यमंत्री श्री. शांतिलालजी शहा सातारा येथें आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाच्या वार्षिक समारंभानिमित्त गेले होते. आयुर्वेदाचा लहानसा अभ्यासक्रम असावा असें त्यांच्या खाजगी बैठकींतील बोलण्यांत आलें असें जाहीर झालें आहे. कदाचित् लवकरच यासंबंधीं ते आपले विचार जाहीर करतील व प्रांतांतील वैद्यांशीं विचारविनिमय करतील.

सोलापूर येथें भरलेल्या महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनानंतर पुण्यास वैद्यमंडळींनीं जमून असा एक आयुर्वेदीय अभ्यासक्रम ठरविला होता. निखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठाच्या आयुर्वेदविशारद पदवीच्या अभ्यासक्रम ठेवावा व प्रसूति, शल्य यांचें कलात्मक ज्ञान पाश्चात्य वैद्यकांतून घ्यावें असें ठरलें होतें. तरी पुढील प्रश्नावर वाचकांनीं आपलीं मतें कळवावीत. [१] या अभ्यासक्रमासाठीं प्रवेश लायकी काय असावी. [२] हा अभ्यासक्रम किती वर्षांचा असावा. [३] गणनाथसेनांचें प्रत्यक्ष शारीर शिक्षणांत ठेवावें कीं नाहीं. [४] प्रसूति व शल्य यांचें कलात्मक ज्ञान किती व कसें त्याचें निश्चित स्वरूप. [५] गर्भविमोचन, विद्रधिपाटन, संमोहन यांचें केवळ प्रात्यक्षिक पाश्चात्यतज्ञाकडून घ्यावयाचें पण त्याचा पाश्चात्य शास्त्रीय भाग शिकवावयाचा कीं नाहीं ? "

—एक वाचक

डॉ. कुक यांचा ग्रंथ

"मुंबईची रेल्वे लाईन तयार होत असतां मुख्यतः खंडाळा घाट तयार करतेवेळीं घसरून पडलेल्या व्यक्तींना जबर दुखापती होत. त्यावेळीं धोंडू महार नांवाचा वनस्पतीतज्ज्ञ अल्पकाळांत झाडपाल्यांच्या औषधांचा उपयोग करून त्यांना बरें करीत असे. त्याच्या उपचाराचें निरीक्षण शिकाऊ वृत्तीनें डॉ. कुक यांनीं केलें व त्या वनस्पतीसंबंधीं एक उत्कृष्ट ग्रंथ लिहून डॉ. कुक यांनीं तो धोंडू महारास अर्पण केला अशी माहिती मिळत आहे. या पुस्तकाचें सविस्तर नांव, पत्ता, पुस्तक एकच आहे कीं त्याचे दोन भाग आहेत, त्याची किंमत काय आहे, लेखकाचें पूर्ण नांव काय आहे, तें पुस्तक कोठें छापण्यांत आलें यासंबंधींची सर्व माहिती हवी आहे. "

— वै. ग. नी. पटवर्धन

संशोधनासाठीं वैदूंचा उपयोग

संशोधनासाठीं ठिकठिकाणच्या वैद्यांनीं आणि आयुर्वेद विद्यालयांनीं सहकार्य केलें पाहिजे. आयुर्वेद फॅकल्टीनें हें सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

अश्विनीकुमाराचे दूत

तसेंच या कामासाठीं गांवोगांवीं औषधें विकत फिरणाऱ्या वैदूंचाहि उपयोग होण्यासारखा आहे. त्यांच्याजवळहि रामबाण योग आहेत. ज्याप्रमाणें वाङ्मयांत जानपद गीतांचें स्थान आहे तेंच स्थान ह्या वैदूंचे आयुर्वेदाभ्यासांत आहे हें विसरून चालणार नाहीं. खेडोपाडीं फिरणारे असे ते अश्विनीकुमाराचे दूत आहेत.

— बाळ देशपांडे

औषधी भवनाचीं नवीं औषधें

अकीक भस्म	२ रु.	१ तोळा
मुक्ताशुक्ति भस्म	२ रु.	,,
अभ्रकभस्म (६ पुटी)	३ रु.	,,
चिंतामणी रस	३२ रु.	,,
महाकालेश्वर	८ रु.	,,
वृद्धिहर वटी	२ रु.	,,
हजरुलयहूद (दगडीबेर) भस्म	२ रु.	,,
रास्नागुग्गुळ	१ रु.	,,
सप्तपर्णावटी (अ. औ.)	२ रु.	,,
पंचगुणतेल	१। रु.	५ तोळे
रोचना तेल (नस्यासाठीं)	१॥ रु.	१/४ तोळा
रौप्य सुवर्ण सूतशेखर	१० रु.	१ तोळा
शिलाजत्वादिवटी (मधुमेहावर)	६ रु. ,,	,,
खंजनिकारि रस	८ रु. ,,	,,
विषाण भस्म योग	३ रु. ,,	,,
सुवर्णमीरपन्नग	२० रु.	तोळा
गोपगोल	१ रु.	,,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म. प्रां. वैद्यमंडळास देणग्या

म. प्रां वैद्यमंडळाचे अध्यक्ष दौऱ्यावर असतांना कठिकाणीं वैद्यमंडळींनीं त्याच्याकडून आपले कांहीं ष रुग्ण आयुर्वेदीय पद्धतीनें तपासून घेतले. या ग तपासणीनिमित्त मिळणारें द्रव्य अध्यक्षांनीं उदार नें म. प्रां वैद्यमंडळास देणगीदाखल दिलें आहे.

माझी वैद्यमंडळींना अशी विनंति आहे कीं पल्या भागांत अध्यक्ष येतील त्यावेळीं आपणहि ांच्याकडून कांहीं रुग्ण तपासून घेतल्यास ‘एक पंथ ा काज’ असें होणार आहे. केवळ १ रुपया वर्गणी- र मंडळाचें कार्य प्रगति करू शकणार नाहीं. सर्वांना वडावें यासाठीं सभासदाची इतकी कमी वर्गणी वण्यांत आली आहे. सबब म.प्रां. वैद्यमंडळास देणग्या ळविण्याचे शक्य ते अन्य प्रयत्न आपण करणें वश्य आहे.

वि. म गोगटे, मंत्री

म. प्रां. वैद्यमंडळ, नाशिक

म. प्रां. वैद्य मंडळाचे १९५२--'५३ मधील ५ रुपयांवरील देणगीदार

श्री. वि. म. गोगटे	रु. ६०
,, द. ना. रानडे ,, व. ना. रानडे	,, ५१
,, ज. वा. मोकाशी	,, २५
,, रा. अ झोपे	,, ५
,, ग. म. लवंगे	,, ५
,, प्र. ल. क्षत्रिय	,, १५
,, भा. श्री. देसवंडीकर	,, ५
,, द. गो. एकबोटे	,, ५
,, वा. वि. भारंबे	,, १०
,, के. के. मानेकर	,, ११८=
,, आर. जी. मुंदडे	,, ५
,, गो. शं. शुक्ल	,, ५
,, मो. रा. कोठावळे	,, १०
,, काकडे	,, ५
एकूण	२१७८=

अनुक्रमणिका

मिश्र प्रवृत्ति से आयुर्वेद की दुर्दशा	४६५
आरोग्यमंत्र्यांचें आश्वासन	४६६
सरकार आयुर्वेदासाठीं स्वतंत्र अधिकारी नेमणार	४६७
३ आवश्यक गोष्टी	४६९
वायगोळ्यावर आळू + क्षार	४७१
विचारापेक्षां कृति श्रेष्ठ	४७३
पाण्डुरोग (अनुभविक चिकित्सा प्रकरण ८वें)	४७५
घट्ट्यावर पांगाऱ्याचा पाला भारतांतील गंधक उत्पादन	४८१
वैद्य मंडळाचा नगर जिल्ह्यांतील प्रचार	४८२
पूर्व खानदेश अन् रजिस्टर्ड वैद्य सभा	४८३
अशोक साल कोठें मिळेल?	४८५
गिरगांव वैद्य मंडळाची स्थापना	४८६
औषधी निर्माण व औषधी व्यागारांतील दोष	४८७
पूर्व-पश्चिम खानदेशांत अध्यक्षांचा दौरा	४९१
म. प्रां. वैद्यमंडळाचे सभासद	४९३

लातूर वैद्य संमेलनाच्या तारखा ?

लातूर येथें महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाचें ९ वें अधिवेशन भरावयाचें आहे. हें संमेलन नेहेमीं-प्रमाणें मे महिन्यांत न भरतां मार्चच्या २२।२३ तारखास भरवावें असा तात्पुरत्या स्वागतमंडळाचा विचार जाहीर झाला होता.

त्यानंतर जी परिस्थिति महाराष्ट्रांत उत्पन्न झाली त्याचा विचार करून स्वागतमंडळ संमेलन पुढें मे महिन्यांत भरविण्याचा विचार करीत आहे असें कळतें. संमेलनाच्या निश्चित तारखा मागाहून जाहीर होतील.

नैतिक वजन पडते काय ?

सेनापति बापट गेलीं ४० वर्षे जेथें राहतील तेथले संडास, अंगण, शेजारपाजारची जागा यांची साफसफाई करतात, पण शेजाऱ्यावर याचें नैतिक वजन पडत नाहीं. लोक पुनः घाण करतात.

म्यु. नोकर पूर्ण स्वच्छता करीत नाहींत, फक्त दिखाऊ स्वच्छता करतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शार्क लिव्हर आईल—मुंबई ब्रँड

(बी. पी. स्टँडर्डचें व्हिटॅमिनयुक्त तेल)

या दर ग्रॅम शार्क लिव्हर तेलांत 'अ' जीवनसत्व १००० इंटरनॅशनल युनिट्स व 'डी' जीवनसत्व १०० इंटरनॅशनल युनिट्स असतें.

इलॅस्मिन द्रव (लिक्विड)

यांत 'अ' व 'डी' जीवनसत्वें स्वाभाविकरीत्या भरपूर प्रमाणांत असतात. प्रत्येक ग्रॅममध्यें जीवनसत्व 'अ' २०००० इं. युनिट्स् व 'ड' जीवनसत्व २००० इं. युनिट्स असतें.

इलॅस्मिन मोती (पर्लस्)

'अ' व 'ड' जीवनसत्वें स्वाभाविकरीत्या भरपूर प्रमाणांत असलेले जिलेटिन मोती.

यांना चव नसते व वास नसतो.

प्रत्येक मोत्यांत 'अ' जीवनसत्व ३०००इं. युनिट्स व 'ड' जीवनसत्व ३०० इं. युनिट्स असतें.

वरील पदार्थ स्पेक्ट्रो-फोटो-मोजणीपद्धतीनें तपासून घेतलेले आहेत. ते बंद बाटल्यांतून विक्रीसाठीं ठेवले आहेत. मोठ्या अकाराच्या रुग्णालय पॅकिंगमध्येंहि ते मिळण्याची व्यवस्था आहे.

फिजरीज टेक्नालॉजिकल प्रयोगशाळा, मुंबई सरकार, मुंबई ५ यांनीं तयार केलेले पदार्थ

—: या पदार्थांचे भारतासाठीं एकमेव वितरक :—

केम्प आणि कंपनी लिमिटेड

मुंबई, मद्रास, दिल्ली, कलकत्ता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
संपादक व प्रकाशक:— वैद्य [illegible] आयुर्वेद सेवा संघ, नासिक
मुद्रक:— श्री. दामोदर महादेव चन्द्रात्रे, विज्ञान प्रेस, नासिक

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु.   सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ६ वें)   नाशिक, ता. १६ फेब्रुवारी १९५३   (अंक १६ वा

खेड्यांतील कोट्यवधि जनतेचें आरोग्यरक्षण

ही आमची मुख्य गरज आहे -आरोग्यमंत्री शहा

सातारा येथील आर्यांग्यवैद्यक महाविद्यालयाच्या वार्षिक समारंभ प्रसंगीं भाषण करतांना मुंबई राज्याचे आरोग्यमंत्री श्री. शांतिलाल शहा म्हणाले:—

" आमच्या अॅलोपॅथिक डॉक्टरांचें म्हणणें असें कीं, जे रोगचिकित्सक निर्माण व्हावयाचे ते सर्वगुणसंपन्न सर्वांग-परिपूर्ण व्हावेत. समजा, असे १०-१२ महापंडित निर्माण झाले कीं ज्यांच्यामुळें जगाचेहि डोळे दिपावेत, तर तेवढ्यानें आमची गरज भागेल काय ?

आज आमची खरी खरी गरज आहे लाखों खेड्यांतील कोटयवधि जनतेच्या आरोग्यरक्षणाची ! ही गरज अशा १०-१२ जगत्विख्यात पंडिताकडून भागवली जाईल कां ?

म्हणून आयुर्वेदाचा छोटा अभ्यासक्रम हवा

म्हणून छोटा अभ्यासक्रमच हवा. आणि तोहि देशाच्या स्वाभाविक परिस्थितीला अनुकूल असा आयुर्वेदाचाच हवा असें माझें तरी मत झालें आहे. आयुर्वेदाचा असें जेव्हां मी म्हणतो तेव्हां शुद्ध आयुर्वेदाचा असें माझें म्हणणें नाहीं... तर पाया आयुर्वेदाचा, आणि जुन्या व नव्या चिकित्सापद्धतींचा समन्वय करणारा असा. ज्यामुळें खेडोंपाडीं सुलभपणें रोगोपचार करणारे असंख्य लोक निर्माण होतील, व तेहि अल्प मुदतींत व अल्प खर्चांत निर्माण होतील, असा अभ्यासक्रम प्रचलित करणें आवश्यक आहे. "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"आयुर्वेदासाठीं स्वतंत्र उपमंत्री नेमा"

माजी आरोग्यमंत्री बार्लिंगे यांचें पार्लमेंटमधील भाषण

पंचवार्षिक योजना ज्यावेळीं दिल्लीच्या लोकसभेंत (पार्लमेंट मध्यें) सरकारतर्फे विचारार्थ मांडण्यांत आली, त्यावेळीं त्यांत ॲलोपॅथीला दिलेलें अवास्तव प्राधान्य पाहून मध्यप्रदेशाचे संसदेतील प्रतिनिधि डॉ. वा. शि. बार्लिंगे (माजी आरोग्यमंत्री, मध्यप्रदेश) यांनीं आयुर्वेदाच्यातर्फे जोरदार भाषण केलें. ते म्हणाले

प्लॅनिंग कमिशनचा रिपोर्ट

"स्वास्थ्याशिक्षण व आयुर्वेद यासंबंधीं मी आपणास कांहीं सांगू इच्छितो. प्लॅनिंग कमिशनच्या रिपोर्टांत यासंबंधीं जें लिहिलेलें आहे, त्यावरून असें दिसून येतें कीं ज्या लोकांचा आमच्या संस्कृतीशीं परिचय नाहीं अशा लोकांनीं तो निर्माण केला आहे. अशा प्रकारचा रिपोर्ट एक विदेशी गृहस्थ पण लिहू शकेल.

ही गोष्ट नेहमीं विसरली जाते

वैद्यक विषयासंबंधीं बोलतांना साधारणतः ही चूक नेहमीं केली जाते ती अशी कीं या देशांत फार पूर्वीपासून एक फार महत्वाची वैद्यक चिकित्सा विद्यमान आहे व ती पायाभूत धरून आपणास पुढें प्रगति करावयाची आहे ही गोष्ट विसरली जाते. ही पुराणी वस्तू आहे म्हणून उत्तम असली पाहिजे असें माझें सांगणें नाहीं. तसेंच ती जुनी आहे म्हणून टाकाऊ असली पाहिजे असेंहि समजणें चूक आहे. या पद्धतीचा आजहि या देशांत, विशेषेंकरून खेड्यापाड्यांत, खूप व्यवहार चालू आहे. सबब या देशाच्या स्वास्थ्याचा विचार करतांना ही परिस्थिति विसरल्यास मोठी हानि झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

ही एक मोठी भूल आहे

आयुर्वेदाचें समूळ उच्चाटन करून त्याजागीं एक विदेशी चिकित्सापद्धति आणून बसविण्याचा प्रयत्न करणें ही एक मोठी भूल आहे. आयुर्वेदावर या पंचवार्षिक योजनेनुसार जो कांहीं खर्च या पां वर्षांत होणार आहे तो पाहून भयंकर निराशा हो स्वास्थ्यासाठीं ठेवलेल्या पैशांतून फक्त एकशंभ रक्कम आयुर्वेदासाठीं ठेवली आहे. यानें आयुर्वेदा काय प्रगति होणार याचे अनुमान प्रत्येक व्य करू शकते.

स्पष्ट शब्दांत इशारा

शेवटीं मी आपणांस असें स्पष्ट शब्दांत स इच्छितो कीं आयुर्वेदाचें भविष्य जोपर्यंत आम डॉक्टर मित्रांच्या हातांत राहील, तोपर्यंत आयुर्वेदा उन्नति होऊ शकणार नाहीं. मी कोणी एलोपॅथी शत्रु नाहीं. सत्य जेथें कोठें असेल तेथून त्या स्वीकार केला पाहिजे. आज आयुर्वेदाच्या बाब डॉक्टरांच्या जी वृत्ति दिसून येते तिला शा म्हणतां येणार नाहीं.

भारत सरकारला प्रार्थना

सबब माझी भारत सरकारला अशी प्रा आहे कीं सरकारनें आयुर्वेदासाठीं स्वतंत्र वि सुरू करावा व त्याच्यावर एका स्वतंत्र डेप्युटि मि स्टरची नेमणूक करावी.

वैद्यक व्यवसायिकाबाबत तक्रारी

१९३८ च्या वैद्यक कायद्याचें उल्लंघन असल्याच्या लेखी तक्रारी देशी वैद्यक बोर्ड व स सभासद व म. प्रां. वैद्य मंडळ यांजकडे मधून म येत असतात. त्याबाबत मंत्री, महाराष्ट्र प्रांतीय मंडळ यांनीं देशी वैद्यक बोर्डाकडे चौकशी असतां पुढील खुलासा मिळाला आहे.

"१९३८ च्या कायद्यान्वयें गुन्हा घडत अ ल्याची तक्रार ही ज्या जिल्ह्यांत गुन्हा घडत अ त्या जिल्ह्याच्या सिव्हिल सर्जन कडे लेखी कराव असते."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद हें श्रेष्ठ, स्वाभाविक व उपयुक्त शास्त्र आहे

(आरोग्यमंत्री श्री. शांतिलालजी शहा यांचें महत्त्वपूर्ण भाषण)

सातारा येथें १९१३ सालीं आयुर्वेदाचें शिक्षण देण्यासाठीं म्हणून स्थापन झालेली एक लहानशी शाळा तेथील स्थानिक वैद्य–डॉक्टरांच्या निःस्वार्थी प्रयत्नांनीं आज महाराष्ट्रांतील एक नामवंत अशी शिक्षण-संस्था झालेली आहे. तिचा ३९ वा वार्षिक समारंभ यंदाचे सालीं ता. १२ जानेवारी रोजीं स्वास्थ्यमंत्री नामदार श्री. शांतिलाल शहा यांचे अध्यक्षतेखालीं साजरा झाला. त्याप्रसंगीं अध्यक्ष या नात्यानें नामदार श्री. शांतिलाल शहा यांनीं केलेलें भाषण, सरकारच्या पुढील धोरणाच्या दृष्टीनें अत्यन्त महत्वाचें असल्यानें त्याचा विस्तृत गोषवारा आम्ही मुद्दाम देत आहोंत. नामदार शहा म्हणाले:–

आरोग्याचा प्रश्न सोडविणें फार कठीण आहे

" मजूरखात्याच्या जोडीला सार्वजनिक आरोग्य खातेंहि मी सांभाळावें असें ठरलें, तेव्हां मला फारच नवल वाटलें. मला असा प्रश्न पडला कीं ज्या बाबतींत मी कधींच विचार केला नाहीं त्या बाबतींत मी कोणत्या प्रकारचें कार्य करणार ? परन्तु जबाबदारी अंगावर पडलीच आहे तर त्यामध्यें जेवढें करतां येणें शक्य आहे तेवढें करणें आपलें कर्तव्य आहे, या बुद्धीनें मीं हें काम करूं लागलों. परन्तु आरोग्याचा हा प्रश्न सोडविणें फारच कठीण आहे असें माझ्या प्रत्ययाला आलें. या विषयाचा जों जों परिचय करून घेण्याचा प्रयत्न मी करूं लागलों तों तों हा प्रश्न अधिकाधिक गूढ आहे असें माझ्या अनुभवाला येऊं लागलें; कारण ज्याला ज्याला म्हणून कांहीं विचारावयाला जावें तो तो आपलेंच स्वतःचें मत खरें असें आग्रहानें प्रतिपादन करतांना आढळूं लागला.

उपचार क्षेत्रांतील चार पंथ

ॲलोपॅथ हे तर आज या देशांत प्रबळ स्थानीं असलेले लोक. त्यांच्या मतानें रोग बरे करण्याचा मार्ग खरा असा एक फक्त त्यांचाच. इतर शास्त्रें किंवा पद्धति म्हणजे त्यांच्या दृष्टीनें अगदीं निव्वळ थोतांड ! बरें, आयुर्वेदाभिमानी मंडळींशीं चर्चा करावी तर त्यांचें म्हणणें अगदीं यांच्याविरुद्ध. त्यांच्या दृष्टीनें शास्त्र म्हणजे काय तो एक आयुर्वेदच ! त्यानंतर तिसरे शास्त्रज्ञ होमिओपॅथीवाले. त्यांचें म्हणणें रोगनिवारणाची अत्युच्च व बिनचूक पद्धति फक्त होमिओपॅथीचीच. या तीन्ही पद्धतींना सरकारनें मान्यता देऊन उसासा टाकावा म्हटलें तर तेंहि साधत नाहीं. कारण त्यांच्या पाठोपाठ निसर्गोपचार पद्धतीचे पाठीराखे आपलीच पद्धति जास्त उपयुक्त असून तिलाच सरकारी मान्यता मिळाली पाहिजे असा हट्ट करण्यास पुढें सरसावतात.

हा प्रकार पाहिला म्हणजे या विषयांत नवीनच विचार करूं लागलेल्या माझ्यासारख्याचें मन भांबावून जातें. यांत खरें कोण असा प्रश्न पडतो. जो तो आपलीच पद्धति अचूक असें आग्रहानें प्रतिपादून दुसऱ्या पद्धति त्याज्य असें म्हणूं लागला, म्हणजे सत्य कोठें व कशांत आहे याचा गोंधळ पडतो.

आरोग्यमंत्र्यांचें कर्तव्य कोणतें ? रोगनिवारण कीं रोगप्रतिबंध ?

आणि मग असा प्रश्न उत्पन्न होतो कीं आरोग्यमंत्र्यांचें प्रमुख कर्तव्य काय असावें ? या गोष्टीचा जों जों मीं अधिक विचार करूं लागलों तों तों माझें मत असें जास्त जास्त होऊं लागलें आहे कीं रोग झाल्यावर ते बरे कसे करावे याबद्दलची उपाययोजना करीत बसण्यापेक्षां रोग होऊंच नयेत अशी व्यवस्था करणें हें आरोग्यमंत्र्याचें खरें कर्तव्य आहे. आरोग्यखात्याचा जो खर्च करावयाचा तो अशा योजनांवर करावा कीं ज्यामुळें रोग होऊंच नयेत. यासाठीं कसें वागावें हें सर्वांना समजून यावें, त्याप्रमाणें सर्वांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वागावें. असें केलें तर मोठमोठीं इस्पितळें, खूप संख्येनें डॉक्टर–वैद्य, व वेगवेगळ्या पद्धतींच्या चिकित्सा यांचें विशेषसें कारणच पडणार नाहीं. कोणी कितीहि म्हटलें तरी देशांतील आरोग्यखात्याचें हेंच प्रमुख कार्य असलें पाहिजे कीं रोग होणारच नाहींत अशी व्यवस्था करावयाची. आयुर्वेद कीं अॅलोपॅथी या वादांत वेळ, पैसा व बुद्धि खर्च करण्यापेक्षां रोगप्रतिबंधक उपायाकडे सर्वांनीं लक्ष पुरविलें तरच समाजाचें अधिक कल्याण होईल.

हें व्हावें कसें ? पंचवार्षिक योजनेंतील दोष

परंतु हें घडवून आणणें महान् कठिण काम आहे. आतां पंचवार्षिक योजना आंखलेली आहे. परन्तु तिच्यामध्येंहि समाजाच्या आरोग्यप्रवर्तनाकडे फारच थोड्या रकमेची सोय केलेली आहे. स्वतः श्रीमती राजकुमारी अमृत कौर यांनीं अलीकडे ही तक्रार केलेली आपण वाचली असेल. बहुतेक पैसा शेती, उद्योगधंदे, दळणवळण यावर खर्च व्हावयाचा आहे. कांहीं थोडाफार शिक्षणावर. परन्तु हे सर्व ज्या समाजासाठीं व ज्या समाजाचें हातून करावयाचें त्या समाजाचें शरीर धडधाकट व दुरुस्त असण्यावर या पंचवार्षिक योजनेंचे यश अवलंबून आहे, या गोष्टीकडे फारच थोडें लक्ष दिलें जात आहे. जों जों मी विचार करतो तों तों हा प्रश्न मला अधिक अगत्याचा वाटतो.

शिक्षणापेक्षां आरोग्याचें महत्व अधिक आहे

शरीरें धडधाकट नसतील तर जें मोठें श्रमाचें कार्य समाजाकडून व्हावयाचें आहे तें त्यांचेकडून कसें काय पार पडणार ? अगदीं उत्तम शिकलेला मनुष्य, परन्तु ज्याच्या अंगीं कसलेच शरीरश्रम करण्याची हिंमत किंवा ताकद नाहीं, अशा व्यक्तींपेक्षां आज समाजाला कमी शिकलेले असतील परन्तु जे धडधाकट आहेत आणि खूप श्रम करण्याला समर्थ आहेत अशा नागरिकांची खरी गरज आहे. निव्वळ देशाच्या रक्षणाचा प्रश्न घेतला तरी या गोष्टीचें महत्व कळून येईल, म्हणून हें मंत्रिपद घेतल्यानन्तर मला असें वाटूं लागलें आहे कीं शिक्षणाला आम्हीं महत्व देतो तें जरी बरोबर असलें तरी शिक्षणापेक्षां अधिक महत्व आरोग्यरक्षणाचें आहे. त्या कामावर शिक्षणापेक्षांहि अधिक खर्च करण्यांत आला पाहिजे.

पक्षपाताचा आरोप

पण मी असें प्रतिपादन करूं लागलों म्हणजे माझे सहकारी मला विचारतात कीं हें ज्ञान मला कधींपासून झालें ? यापूर्वी हें मी कधीं म्हणत नव्हतों, याचें एकच आणि अगदीं साधें उत्तर आहे, तें हें कीं या खात्याची जबाबदारी अंगावर पडून जेव्हां मी विचार करूं लागलों तेव्हां हें ज्ञान मला झालें. याच्या पूर्वी हा विचार माझ्या मनांत येण्याचा संभवच नव्हता. निरोगी धडधाकट समाज हीच आजची आमची अगदीं निकडीची गरज आहे. शिक्षण थोडेसें त्यानंतर आलें तरी चालेल, हें विचारांतीं माझें जास्त जास्त दृढ मत होत चाललें आहे.

आयुर्वेदाच्या मंडळींना विनंति, रोगप्रतिबंधाची योजना सुचवा

म्हणून आयुर्वेदाच्या अभिमान्यांना मला अशी विनंति करावयाची आहे कीं याबावतींत मला तुम्हीं साह्य करा. रोगनिवारणापेक्षां रोगप्रतिबंधाच्या कामांत आयुर्वेदीय पद्धतीवर आधारलेली योजना मला सुचवा. अशा योजनेवर खर्च करणें, अशी योजना यशस्वी होण्यासाठीं झटणें या गोष्टी करण्यांत मला अधिक समाधान वाटेल. व त्याकरितां होईल ती खटपट मी करीन.

तरी रोगनिवारणहि हवेंच

अर्थात् अशा रीतीनें रोगच होऊं नयेत यासाठीं सर्व प्रकारची खटपट केली, तरी संपूर्णपणें रो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होण्याचें थांबेल असें मुळींच नाहीं. स्वास्थ्यमंत्र्यांचें सांगण्यावरून कांहीं रोगांचें संपूर्ण निर्मूलन होणार नाहीं. कांहींना कांहीं प्रमाणांत रोग हे राहणारच व त्यासाठीं रोग झाले असतां बरे व्हावेत, त्यांचें दुःख कमी व्हावें यासाठीं करावयाच्या ज्या योजना त्या कराव्या लागणारच. त्यामुळें औषधें, दवाखाने, रुग्णालयें, शस्त्रक्रिया वगैरे प्रकारची व्यवस्थाहि करावी लागणारच; रोगप्रतिबंधाबरोबर रोगनिवारणाचेंहि कार्य करावें लागणार. फक्त मुख्य महत्व रोग न होऊं देणें या गोष्टीला असावें; आणि त्यानंतरहि जे रोग होतील त्यांच्या निवारण्याचें कार्य दुय्यम महत्वाचें, परंतु आवश्यक म्हणून हातीं घ्यावें.

रोगनिवारणार्थ कोणती पद्धति स्वीकारावी ?

या दुसऱ्या म्हणजे रोगनिवारणाच्या प्रश्नाचा विचार करूं लागलों कीं माझ्या सारख्याची अडचण अधिकच मोठी होते. गेल्या शेदीडशे वर्षांपासून या देशांत पाश्चात्य वैद्यक पद्धतीचें ठाणें मजबूत झालेलें आहे. त्या मंडळीकडे विचारासाठीं जावें तर त्यांना आयुर्वेद म्हणजे शास्त्र आहे असेंच मुळीं वाटत नाहीं. त्या दृष्टीनें ते आयुर्वेदाचा विचारसुद्धां करावयाला तयार नाहींत. त्याचें हें म्हणणें मला पटत नाहीं. पण ते म्हणणार, या शास्त्राच्या बाबतींत मला काय कळणार ! मोठे मोठे नामांकित डॉक्टर व शास्त्रज्ञ या पक्षामध्यें आहेत आणि त्यांचें मत एकदम धुडकावून लावणें कसें शक्य होईल असा पेंच पडतो.

हें म्हणणें अतिरेकी अभिमानाचें आहे

म्हणून मग आयुर्वेदाच्या अभिमानी मंडळीकडे जावें तर तिकडेही अडचण उत्पन्न होते. कारण आयुर्वेदाच्या अभिमान्यांमध्येंहि आयुर्वेदासंबंधीं एक निश्चित निर्णायक विचार नाहीं. त्यांच्यामध्येंहि केवल आयुर्वेद हाच खरा, त्याशिवाय अन्य रोगनिवारक शास्त्रच मानणें शक्य नाहीं, असें मानणारांची मोठी संख्या आहे. या मंडळींना आयुर्वेदाचे बाबतींत वर्णसंकराची भीति वाटत असते. कोणतीहि नवीन गोष्ट ते विचारांत सुद्धां घेण्यास तयार नसतात. मला त्यांचें हें मत समजूं शकत नाहीं. आधीं खरें म्हणजे ज्ञानाच्या क्षेत्रामध्यें पुराणमित्येव न साधु सर्वम् । न चापि काव्यम् नवमित्यवद्यम् ॥ या न्यायानें जुनें तेवढेंच चांगलें आणि नवे तेवढें टाकाऊ असा भेद करणें हेंच मला योग्य दिसत नाहीं. आयुर्वेदांतच सर्व कांहीं आहे हें म्हणजे अतिरेकी अभिमानाचें आहे.

आयुर्वेदांत विकसित संमोहनशास्त्र नाहीं

आयुर्वेदांत शल्यशास्त्र-शस्त्रक्रियेचें शास्त्र सांगितलेलें आहे. परंतु ज्या प्रकारचें संमोहनाचें शास्त्र आधुनिक जगांत विकसित झालेलें आहे, त्या प्रकारचें संमोहनाचें शास्त्र किंवा उपचार आयुर्वेदांत नाहींत, हें मान्य केलेंच पाहिजे. मग शस्त्रक्रिया अशा ज्या उपचारांच्या योगानें सुलभ होते ते उपचार आयुर्वेदीय शस्त्रक्रियेंतसुद्धां सामील करून घेण्यास कसलाच प्रतिबंध नसावा. प्राचीन आयुर्वेदीय ग्रंथांत आहे तेवढेंच खरें असें म्हणूं लागलें म्हणजे रोगप्रतिबंधक उपचारांच्या बाबतींतील सर्व प्रगतिच थांबेल. असें होणें इष्ट नाहीं. आयुर्वेदाचा खास विशेष, खास ठेवा, त्रिदोषाचा सिद्धांत हा आहे. तो अवश्य मानला पाहिजे. पण तो मानून त्यानंतर आयुर्वेदीय औषधींचें रासायनिक संशोधन, व पृथक्करण करण्यानें काय बिघडणार आहे? त्यामुळें उलट फायदाच होईल.

जों जों मी विचार करूं लागतों तों तों ॲलोपॅथी व आयुर्वेद यांच्यामध्यें विरोध माजणें अयोग्य आहे असें मला वाटूं लागलें आहे. या दोन्ही पद्धतींचा तौलनिक अभ्यास करून त्यांचा समन्वय साधणें आपल्या देशाला अधिक हितकर होईल. त्यासाठीं सर्वांत प्रथम ॲलोपॅथीच्या पदवीधरांनीं पदवीनंतरचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास म्हणून आयुर्वेदाचा अभ्यास करावा हें अधिक इष्ट होईल. कारण त्यायोगें आयुर्वेदाचें श्रेष्ठत्व व उपयोगित्व हें निर्विवाद सिद्ध होईल. त्याशिवाय माझ्यापुढील पेंच सुटणें कठीण आहे.

आयुर्वेद अधिक स्वाभाविक व उपयुक्त आहे

माझ्या दृष्टीनें मला वाटतें कीं आयुर्वेदच श्रेष्ठ आहे व आपल्या देशाच्या दृष्टीनें हेंच शास्त्र अधिक स्वाभाविक व उपयुक्त आहे. परंतु ॲलोपॅथीचे पंडित ही गोष्ट मान्य करावयाला तयार नाहींत म्हणून आयुर्वेद आणि ॲलोपॅथी या दोहोंच्या अभिमान्यांना मला अशी विनंति करावयाची आहे कीं परस्परांना अस्पृश्य मानण्याची ही प्रवृत्ति सोडून देऊन देशोपयोगी असें रोगनिवारणशास्त्र प्रस्थापित करण्याचे कामीं दोन्ही पक्षाच्या अभिमान्यांनीं एकत्र येऊन प्रयत्न करावे.

जसा देश असतो, तसें त्याचें शास्त्र बनतें

कारण या बाबतींत एक गोष्ट निर्विवादपणें मान्य करायला हवी कीं ज्या त्या देशांतील हवामान, राहणी, चालीरीती, संस्कार व परंपरा यामधूनच त्या त्या देशांतील रोगनिवारणाची पद्धति विकसित झाली पाहिजे. ही पद्धति त्या त्या देशांच्या हवामानाशीं व रहाणीशीं सुसंगत असली पाहिजे आणि हें असें अगदीं स्वाभाविकपणेंच घडलें पाहिजे व घडतहि असतें. युनानी किंवा तिब्बी ही जी रोगचिकित्सा जन्माला आली ती अरबस्तानसारख्या अत्यन्त उष्ण हवेच्या देशामध्यें. स्वाभाविकच तेथील रोगचिकित्सेमध्यें उष्णतानाशक अशा सरबतांना फार मोठें स्थान मिळालें. याच्या उलट इंग्लंड व युरोपसारख्या अत्यन्त थंड हवेच्या प्रदेशांत जीं औषधें निर्माण झालीं त्यामध्यें टिंक्चर्स, मद्यार्कयुक्त औषधें प्रामुख्यानें सिद्ध झालीं. कारण शैत्य प्रतिबंधक उपाय या चिकित्सेमध्यें विकसित होणें हें अत्यन्त स्वाभाविक होतें.

या दृष्टीनें भारतांत आयुर्वेदच योग्य होय

या दृष्टीनें विचार करतां भारतामध्यें आयुर्वेदाची चिकित्सा हीच योग्य मानली पाहिजे. ही चिकित्सा पद्धति या देशांत उत्पन्न झाली आहे. स्वाभाविकच या देशाचें हवामान, या देशांतील राहणी परंपरा व संस्कृति व या देशांत उपलब्ध असलेलीं साधनें यामधून ती विकसित झालेली आहे. त्यामुळें या देशाच्या दृष्टीनें ती जास्त अनुकूल मानली पाहिजे. माझ्यासारख्या त्रयस्थ दृष्टीनें विचार करणाराला हें पटतें.

मी सावधगिरीनें पाऊल टाकलें पाहिजे

ही गोष्ट खरी आहे कीं आज मंत्री म्हणून जी सत्ता हातांत आली आहे, तिचा वापर करून आयुर्वेदच एक फक्त आमच्या रोगचिकित्सेचें माध्यम असा निर्णय घेतां येणार नाहीं असें नाहीं. परन्तु केवळ सत्तेच्या जोरावर असा निर्णय करणें मला शहाणपणाचें वाटत नाहीं. यासंबंधीं अधिक साधकबाधक विचार केला पाहिजे, सावधगिरीनें पुढें पाऊल टाकलें पाहिजे असें माझें मत झालें आहे.

मला आयुर्वेदीय मंडळींचें जास्त साहाय्य पाहिजे

त्यासाठीं आयुर्वेदीय मंडळींचें मला जास्त साहाय्य पाहिजे. प्रबल निष्ठावंत असे आयुर्वेदाभिमानी जे आहेत त्यांनीं आपले अनुभव संकलित केले पाहिजेत; तपासले पाहिजेत. निव्वळ परीक्षा पास झाल्यानें चिकित्सेचें पूर्ण कौशिल्य येतेंच असें नाहीं. हा अनुभवाचा, अधिक अभ्यासाचा, संशोधनाचा प्रश्न आहे. आयुर्वेदाच्या अभिमान्यांनीं याबाबतींत अधिक लक्ष घातलें पाहिजे; आपलें ज्ञान त्यांनीं जनसमाजाच्या अधिकाधिक उपयोगी पडेल असें केलें पाहिजे; त्यासंबंधीं जनसमाजांत अधिकाधिक विश्वास निर्माण केला पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरकारतर्फे कांहीं प्रयोग करावेत असें मला वाटतें

या दृष्टीनें कांहीं प्रयोग सरकारतर्फे करावे असें मला वाटतें. असा एक प्रयोग अहमदनगर जिल्ह्यांत सुरू आहे. तेथें एक विचित्र रोग उद्भवला आहे. या रोगाला अजून नांवहि मिळालेलें नाहीं. त्याचें कारण व स्वरूप याचें ज्ञानहि पूर्णपणें झालेलें नाहीं. अत्यंत तहानेनें जीव व्याकुळ होणें हें त्यामधील एक प्रधान लक्षण आहे. त्याठिकाणीं एक रुग्णालय उघडण्यांत आलें असून सर्व प्रकारच्या चिकित्सकांना मुद्दाम तेथें पाचारण केलेलें आहे. आयुर्वेदीय चिकित्सेचाहि प्रयोग तेथें चांगल्या नाणावलेल्या व्यक्तींचेंकडून चालू आहे.

प्रयोग झाले पाहिजेत; त्यांची नोंद ठेवली पाहिजे

असे अनेक प्रयोग झाले पाहिजेत. व या प्रयोगामध्यें ज्या चिकित्सा होतील त्यांची नोंद झाली पाहिजे; त्याचें स्वरूप कोणालाहि नीट तपासून पाहतां आलें पाहिजे. अशा उपचारांत गुप्ततेचा भाग असून चालणार नाहीं. पुष्कळदां असें सांगण्यांत येतें कीं कांहीं कांहीं व्यक्तींजवळ रक्तपितीवर-महारोगावर अत्यंत रामबाण असें आयुर्वेदीय औषध आहे. असें औषध असेल तर आजकाल या भयंकर व्याधीच्या निवारणार्थ अशा औषधाची माहिती होणें ही अत्यंत आवश्यक अशी गोष्ट आहे. परंतु हीं अशीं औषधें गुप्त राहतात वा ठेवलीं जातात. अशीं औषधें गुप्त ठेवण्यानें जनसेवा मुळींच होणार नाहीं. व आयुर्वेदाचेंहि हित होणार नाहीं.

जनसेवा हें प्रमुख ध्येय असलें पाहिजे

कोणत्याहि चिकित्सेच्या पद्धतींत जनसेवा, सामान्य जनतेचा उपयोग, हें प्रमुख ध्येय असलें पाहिजे. त्या दृष्टीनें जे चिकित्सक, डॉक्टर वा वैद्य, तयार करावयाचे ते अधिकाधिक जनतेंत जातील, सामान्य जनतेच्या उपयोगी आपलें जीवन घालवितील असे असले पाहिजेत. त्या दृष्टीनें आतां जो आपल्यासारख्या आयुर्वेदीय शिक्षणाच्या संस्थामध्यें अभ्यासाच्या दीर्घ मुदतीच्या पदवीपरीक्षेचा कार्यक्रम आंखलेला आहे तो कितपत उपयोगाचा होईल ही शंका जी व्यक्त केली जाते ती योग्य आहे. इंटर–सायन्स पर्यंतच्या शिक्षणाचीं दोन वर्षें व पुढचीं साडेचार वर्षें मिळून साडेसहा वर्षेंपर्यंत पुष्कळ खर्च करून शिक्षण घेतल्यावर अशा पदवीधरांची प्रवृत्ति खेड्यांत जाण्यापेक्षां शहरांमध्येंच उपजीविकेचा उद्योग करण्याकडे वाढेल हें खरें आहे. शहरामध्यें उद्योगासाठीं जाण्यांत कांहीं मोठा दोष आहे असें मी मानीत नाहीं. मला तरी असें म्हणतां येणार नाहीं.

लांब मुदतीचा व महागडा शिक्षणक्रम योग्य नाहीं

परंतु हें जरी खरें असलें तरी फार लांब मुदतीचा आणि महागडा शिक्षणक्रम आजच्या आमच्या देशाच्या पद्धतींत योग्य नाहीं असें माझें स्वच्छ मत आहे. व त्या दृष्टीनें पूर्वीचा अभ्यासक्रम होता तो किंवा तशासारखाच एखादा अल्प मुदतीचा अभ्यासक्रम अस्तित्वांत यावा असें मला फार वाटतें. आपल्या देशाची आर्थिक व सामाजिक परिस्थिति लक्षांत घेऊनच जें काय करावयाचें तें केलें पाहिजे. व्यक्तीची काय किंवा समाजाची काय शक्ति पाहूनच सर्व योजना आंखल्या पाहिजेत. प्राथमिक प्रयत्नामध्यें निव्वळ शिक्षणाच्या कालामध्येंच व्यक्तीची शक्ति पूर्ण खर्च होऊन जाऊन ती व्यक्ति पुढें जर निरुपयोगी होणार असेल, तर तसें होणें योग्य नाहीं.

ॲलोपॅथिक पंडितांचें म्हणणें असें आहे

आमच्या अलोपॅथिक पंडितांचें म्हणणें रोगचिकित्सक जे निर्माण व्हावयाचे ते सर्वगुणसंपन्न. सर्वांग-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिपूर्ण व्हावेत. त्यासाठीं त्यांनीं अलोपॅथीचाहि एल्. सी. पी. एस्. चा छोटा अभ्यासक्रम रद्द केला, त्यांचें लक्ष महान् पंडित तयार करण्याकडे आहे. परन्तु अशा रीतीनें जिवापाड खर्च करून पदवी मिळविणारामध्येंहि असे महापंडित कितीसे निर्माण होतात ? आणि समजा, दहा बारा पंडित असे निर्माण झाले कीं ज्यांच्या ज्ञानामुळें जगाचेहि डोळे दिपावेत; तर तेवढ्यानें आमच्या देशाची गरज भागेल कां। आज आमची खरी खरी गरज आहे लाखो खेड्यांतील कोट्यवधि जनतेच्या आरोग्यरक्षणाची ! ही गरज अशा जगद्विख्यात दहाबारा पंडिताकडून भागविली जाईल कां ?

म्हणून छोटा अभ्यासक्रमच हवा आणि तोहि आयुर्वेदाचाच

म्हणून छोटा अभ्यासक्रमच हवा आणि तोहि देशाच्या स्वाभाविक परिस्थितीला अनुकूल असा आयुर्वेदाचाच हवा असें माझें तरी मत झालें आहे. शुद्ध आयुर्वेदाचा असें माझें म्हणणें नाहीं. शुद्ध आयुर्वेदाभिमानी स्टेथास्कोपला सुद्धां अस्पृश्य मानतात. असलें अतिरेकी मत माझें नाहीं. तर पाया आयुर्वेदाचा आणि जुन्या व नव्या चिकित्सकांचा समन्वय करणारा असा. ज्यामुळें खेडोपाडीं सुलभपणें रोगोपचार करणारे असंख्य लोक निर्माण होतील, व तेहि अल्प मुदतींत व अल्प खर्चामध्यें निर्माण होतील असा अभ्यासक्रम प्रचलित करणें आवश्यक आहे.

अनभ्यस्त व्यक्तींचें हें मत आहे

परंतु माझें हें मत रोगचिकित्साशास्त्राशीं अनभ्यस्त अशा व्यक्तीचें आहे. आणि तेंहि ४।६ महिन्यांच्या अभ्यासानंतर व अनुभवानंतर बनलेलें आहे. त्याहूनहि विशेष म्हणजे तज्ज्ञांच्या जों जों गांठी घ्याव्या तों तों माझें मन अधिकाधिक गोंधळून जात आहे. समन्वय बुद्धीनें विचार करणारी मंडळी फारच थोडी भेटतात. जो तो आपल्याच आग्रहाला चिकटून बसतो. ॲलोपॅथ मंडळींना एम्. बी. बी. एस्. पेक्षां कमी प्रती वा शिक्षणक्रम विचारांतसुद्धां घ्यावयास नको. शुद्ध आयुर्वेदाभिमान्यांना मिश्र पद्धतीची हवासुद्धां नको. अशा रीतीनें या सर्व पंडितांच्या सभेमध्यें माझ्यासारख्या अनभिज्ञ माणसास निर्णय घेणें कठीण पडतें.

निर्णय घेतांना सावधपणा पाहिजे

सत्ताधारी म्हणून, मंत्री म्हणून, याबाबतींत निर्णय घेतांना निव्वळ सत्तेचाच विचार करून मला चालणार नाहीं. दहा वेळां विचार करून कोणतेंहि पाऊल पुढें टाकावें लागेल. वैयक्तिक विचार तर यामध्यें आहेच; कारण आयुर्वेदाच्या बाजूनें कांहींएक निर्णय मी घेतला आणि ४।६ वर्षांच्या अनुभवानें तो चुकीचा ठरला तर भलत्याच क्षेत्रांत सत्तेच्या जोरावर लुडबूड करणारा एक उच्छृंखल माणूस म्हणून माझें हसें होईल. पण तेवढ्यासाठीं मी भीत नाहीं जो प्रयोग करावयाचा तो जर फसला तर त्यांत अखेर आयुर्वेदाची नापत होईल, आयुर्वेदच निकामी असा प्रचार होईल; तसें होऊ नये यासाठीं जपणें मला फार आवश्यक वाटतें. व म्हणूनच जो कां निर्णय घ्यावयाचा तो फार फार सावधपणें घेतला पाहिजे.

वैद्याकडे सरकारी रुग्णालयांतील कांहीं भाग

एक सूचना अशी केली जाते कीं हल्लींचे जे सरकारी दवाखाने आहेत त्यामध्येंच कांहीं भाग आयुर्वेदीय मंडळाच्या हातीं द्यावेत. परन्तु याहि बाबतींत मोठा धोका आहे. एकाच दवाखान्यांत किंवा रुग्णालयांत ॲलोपॅथींचे डॉक्टर व आयुर्वेदीय चिकित्सक यांची योजना केली असतां त्यांच्यामध्यें जर परस्पर सहकार्य व सद्भाव नसेल तर आयुर्वेदाच्या दृष्टीनें हा प्रयोग उपकारक न होतां बाधकच होण्याचा संभव आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माझ्यापुढील प्रश्न हर एक प्रकारें बिकट

अशा रीतीनें माझ्यापुढील हा प्रश्न हरएक प्रकारनें अत्यंत बिकट होऊन बसला आहे. त्यातच भरीला भर म्हणजे सरकारची प्रत्यक्ष अडचणीची आर्थिक स्थिति. ही स्थिति किती बिकट आहे याची कल्पना करून घेणें फार आवश्यक आहे. आपली संस्था आज चाळीस वर्षे अत्यंत त्यागपूर्वक कार्य करीत आहे. हें कार्य जनतेला फार उपयोगाचें झालेलें आहे. अशा संस्थेला सरकारकडून साहाय्य व्हावें हें खरें; परन्तु सरकारच्या आजच्या स्थितींत आपणाला मी कोणत्या प्रकारचें आश्वासन देऊं शकेन ?

मुंबई राज्याची जमाबंदी म्हणजे पावसाशीं जुगार

आमच्या राज्याची जमाबंदी म्हणजे निव्वळ पावसाशीं जुगाराचा खेळ आहे, हें अगदीं स्पष्ट आहे. आम्हीं राज्याची धुरा अंगावर घेतली तेव्हां आम्हीं कांहींसे खुषींत होतो. उत्पन्नाबद्दल चांगली आशा करण्याजोगी परिस्थिति होती. म्हणून निरनिराळे बेत आम्ही रचित होतो. आमच्या सुदैवानें प्रथम प्रथम जुगाराचा फासा अनुकूल पडतोसें वाटलें. पाऊस बराच समाधानकारक पडला. पण त्यानंतर जी गोष्ट घडली ती आपलेपुढें आहे. पावसानें मोठा दगा दिला आहे. त्यामुळें आमचे सगळेच अंदाज कोलमडल्यासारखे झाले आहेत. उत्पन्न फारच कमी येऊं लागलें आहे. उत्पन्नांत बरीच मोठी घट पडणार आहे. खर्चांचे पुष्कळ मोठे बेत आंखलेले आहेत. त्यामुळें कमी खर्च करून बचत कोठें व कशी करावी आणि ती इतर आवश्यक कामीं खर्च कशी करावी हा प्रश्न निर्माण झाला आहे. परंतु ठिकठिकाणीं खर्चाला तोंड पडलेलें आहे. कोटिकोटि रुपयांच्या योजना पुऱ्या करावयाच्या आहेत. त्यामध्यें बचत कोठें कोठें करणार ? आगेमागें टाकायला कोठें वाव तरी आहे काय ? अशा परिस्थितीमध्यें आपल्या अधिक अडचणींचा परिहार होईल अशा रीतीनें कांहीं प्रत्यक्ष आश्वासन मी आपल्याला देऊं शकत नाहीं. याबद्दल आपण मला क्षमा करावी.

नवीन सुलभ शिक्षणक्रम आंखणें शक्य होईल

परन्तु आपल्या आजच्याहि अडचणीच्या परिस्थितींत आपण निराश होण्याचें कारण आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. आज चाळीस वर्षें ज्या मंडळींनीं इतक्या स्वार्थत्यागपूर्वक ही संस्था चालविली व तिला इतकें उन्नत स्वरूप प्राप्त करून दिलें त्या मंडळींना एकदोन वर्षें काळ काढतां येण्याजोगी हिंमत किंवा शक्ति नाहीं असें मला वाटत नाहीं. सरकारी प्रतिकूलता असून सुद्धां त्यांनीं संस्थेचा गाडा हिंमतीनें हांकला तेथें निराश होण्याचें आतां कांहींच कारण नाहीं. नवीन नवीन उत्पन्नाचीं साधनें उत्पन्न होतात कीं हें सरकार पहात आहे. आजची विपरीत परिस्थिति अशीच कायम राहणार आहे असें नव्हें. आपण भाग्यवान् असलों तर एकदोन वर्षांत आपली उत्पन्नाची परिस्थिति सुधारेल व मग सगळ्याच अडचणी दूर होतील. जादा मदत देणें शक्य होईल. तोपर्यंत विरोध व गैरसमज दूर होऊन नवीन सुलभ शिक्षणक्रमहि आंखणें शक्य होईल. आपली परिस्थिति मी जाणतो. आपणहि सरकारची परिस्थिति ध्यानांत घ्या.

आरोग्यमंत्र्यांचीं २ निःसदिग्ध आश्वासनें

तथापि एक आश्वासन मी अगदीं निःसंदिग्धपणें देतो कीं आपल्यासारखी इतकी वर्षे त्यागाच्या भूमिकेवरून चालविलेली कोणतीहि शिक्षणसंस्था बंद पडेल असें सरकार होऊं देणार नाहीं. या अडचणीच्या कालांतहि जेथें म्हणून बचत करणें शक्य असेल तेथें बचत करण्याचा प्रयत्न करीत आहों व अशा बचतींतूनच संस्थांना मदत करीन. आयुर्वेदालाच जास्तींत जास्त मदत करण्याचें माझें तरी धोरण राहील हेंहि मी आश्वासन देतो. आमच्या देशांतील रहिवाशांचीं शरीरें सुदृढ राहिलीं पाहिजेत हें आमचें अगदीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राथमिक साध्य आहे. त्यासाठीं आमच्याच देशाच्या परंपरेंत विकसित झालेला आयुर्वेदच उपयोगी पडेल अशी माझी श्रद्धा आहे.

आयुर्वेदीयांनीं निराश होण्याचें कारण नाहीं

आयुर्वेदाच्या मंडळींनीं निराश होण्याचें कारण नाहीं. मला माहित आहे कीं आयुर्वेदाचे अभिमानी मोठे हिंमतवान् लोक आहेत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशीं झगडत त्यांनीं आपल्या संस्था यशस्वी केल्या आहेत. त्यांना जगविणें हें आतां आमच्या सरकारचें कर्तव्यच आहे. नव्या अभ्यासक्रमाच्या दृष्टीनें व नेहमींच्या आवश्यकतेच्या दृष्टीनें शास्त्रीय प्रयोगशाळांची नड आपल्या सर्वच संस्थापुढें आहे. त्याबाबतींत मी जरूर लक्ष घालीन व यासाठीं जी काय जास्तींत जास्त सोय करतां येईल तेवढी मी करीन.

आजच्या परिस्थितींत याहून अधिक जास्त आश्वासन मला देतां येण्यासारखें नाहीं, याबद्दल मला आपण क्षमा करावी. "

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर, मौक्तिक (मोती खाका), शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें आम्ही घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितो !

गुलकंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील !

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

टे. नं. ३१७९९ Telegram AYURVED

रोगनिदान (मराठी)

भाग १ ला, किं. ८ आणे } ट. ख.
भाग २ व ३ (एकत्र), किं. १॥ रु. } वेगळा

प्रकाशकः-वै. वासुदेवशास्त्री कडेगांवकर

—: वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक :—

प्रथमोपचार (मराठी)

लेखकः-डॉ. वासुदेव वि. आठल्ये, एम्. डी. आयुर्विद्यापारंगत

किंमत १॥ रु., ट. ख. वेगळा.

.... वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक ....

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वनस्पति व जिवाणुनाशक-शक्ति

(व्याख्याते:- श्री. चंद्रशेखर गणेशशास्त्री जोशी, एम्. एस्सी.)

(मुंबई येथील इन्स्टिटयूट ऑफ सायन्समधील बायोकेमिस्ट्री सेमिनार-तर्फे दि. ६।२।५३ रोजीं Plant antibiotics या विषयावर श्री. चंद्रशेखर गणेशशास्त्री जोशी एम्. एस्सी. यांचें व्याख्यान झालें. त्याचा सारांश)

पेनिसिलीन हें आपल्या सर्वांच्या चांगल्या परिचयाचें आहे. हें द्रव्य शरीरांतील रोगजंतूचा झपाट्यानें नाश करून रोग नाहींसा करतें अशी याची ख्याति आहे. या दिव्य औषधाच्या शोधामुळें वनस्पतींतूनहि तशाप्रकारचें एकादें जादू करणारें द्रव्य सांपडूं शकेल या आशेनें वनस्पतींचा अभ्यास या दृष्टीनें करण्यांत गेलीं कांहीं वर्षें शास्त्रज्ञ गढून गेले आहेत. पेनिसिलिनचा शोध कसा लागला, पेनिसिलिन कशापासून बनवितात, या शोधाचा उपयोग वनस्पति तपासण्यास कसा होतो व वनस्पति कशी तपासावी ही सर्व माहिती आम्ही ' आरोग्य-मंदिर ' (एप्रिल, १९५२) मध्यें दिली आहे. ती जिज्ञासूंनीं पहावी.

५००० वनस्पति तपासून झाल्या

आजच्या या विषयांत आतांपर्यंत प्रामुख्यानें कोणत्या वनस्पति यासाठीं अभ्यासिल्या गेल्या व त्यांचा उपयोग कितपत यशस्वी झाला हें पाहावयाचें आहे. वनस्पति या फार पुरातन काळापासून रोग नाहींसा करण्यासाठीं वापरण्यांत येत आहेत व बुरशीमध्यें, शेवाळामध्यें जीवाणुनाशक शक्ति (Antibiotic activity) आहे असें दिसतांच वनस्पतींमध्येंहि ती असली पाहिजे असा अंदाज बांधण्यांत आला. कोणताहि रोग हा जंतूमुळेंच उद्भवतो असा पाश्चूरचा सिद्धांत आहे. (All diseases are caused by microscopic organisms.) तेव्हां वनस्पतीमध्यें खासच असलेली जिवाणुनाशक शक्ति वेगळी काढतां आल्यास पहावी म्हणून प्रयोग सुरूं झाले. आतांपर्यंत सर्व जगांत अवघ्या ५,००० वनस्पति तपासून झाल्या आहेत. जगांत असणाऱ्या सुमारें ३०,००,००० इतक्या वनस्पति जातींकडे पाहतां हा आंकडा अगदींच थोडा आहे. अर्थात् अशा प्रकारचा हा अभ्यास सूक्ष्मदर्शक यंत्राचे साहाय्यानें जंतुशास्त्र प्रगत झाल्यावरच गेल्या कांहीं वर्षांत सुलभ झाला आहे.



श्री. चंद्रशेखर गणेशशास्त्री जोशी

कुडा व खैर जन्तुनाशक आहे

सुरवातीस मॉर्फिन, ॲट्रोपिन, ॲकोनिटीन, कोकेन, स्ट्रिचनीन (Stychnin) इत्यादि अल्कलॉइड असलेल्या वनस्पति पाहिल्या. तथापि शास्त्रज्ञांनीं वापरलेल्यापैकीं कोणत्याच जंतूवर त्यांचा परिणाम होऊं शकला नाहीं. त्यांनीं पुष्कळ वन्हांचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जंतु (B. coli, St. aurens, B. typhi, Streptococci) इ. वापरले होते. सिद्दिकी यांनीं अगस्ता, सर्पगंधा यांपासून निघणाऱ्या अल्कलॉइड्‌सची तपासणी केली पण ती निरर्थकच ठरली. मात्र कर्नल चोप्रा यांनीं कुड्यापासून निघणारें अल्कलॉइड मात्र अतिसार (amoebic dysentary) करणाऱ्या सूक्ष्म जतूंचा नाश करतें व त्यावर तें उपयोगी असल्याचें पाश्चात्य पद्धतीनुरूप सिद्ध केलें. ओंव्याचें फूल (अर्क) Thymol, तसेंच खादिर या वनस्पतींपासून निघणारें कॅटेचॉल (Catechol) हेंहि जंतुनाशक असल्याचें लिंक व वॉकर यांस आढळलें.

मिरची, कोबी, लसूण, कांदा

जॉरडेनॉफ यांनीं मिरचीचा अर्क, बॅसिलस् टायफॉइड, बॅ. कोली, बॅ. अॅंटेरिडिटीस या आंतड्यांत सांपडणाऱ्या जंतूंचा नाश करूं शकतो असें पाहिलें. कोबी देखील कांहीं शास्त्रज्ञांस जंतुनाशक असल्याचें दिसलें आहे. लसुणीच्या वाफा स्टॅफिलोकॉकाय जंतु नाहींशा करितात. बंगलोर येथील प्रयोगशाळेंत लसुणींतून क्षयावर उपयोगी पडणारें द्रव्य वेगळें काढण्यांत आलें आहे. कोव्हेन्लॉक या रशियन शास्त्रज्ञांनीं कांद्याच्या वाफा देखील जंतुनाशक असल्याचें सिद्ध केलें आहे.

पानांतील हिरवें तत्व

अगदीं नवीनच सिद्ध झालेलें म्हणजे क्लोरोफिल Chlorophyl (पानांतील हिरवें द्रव्य) हें द्रव्यहि जंतुनाशक असून त्यामुळें जखमा चटकन् भरून येतात. क्लोरोफिल हें विषारीहि ठरत नाहीं. आणि शस्त्रक्रियेची जखम भरून येण्यास पेनिसिलीन बरोबर क्लोरोफिल दिल्यावर ते जास्त फायदेशीर ठरलें आहे. हें द्रव्य कोणत्याहि पानांत मुबलक प्रमाणांत असतें. जीवनसत्व 'सी' सुद्धां जंतुनाशक असल्याचा, एवढेंच नव्हे तर, त्याचा क्षयाच्या जंतूंवरहि परिणाम होत असल्याचा दावा सांगतात. पहा– इंडियन जर्नल ऑफ मेडिकल सायन्स, ६,२५२ (१९५२). मी येथें तपासलेल्या १०० चे वर वनस्पतींपैकीं मुबलक जीवनसत्व 'सी' (३०० मि. ग्रॅमचेवर) असणाऱ्या वनस्पति चांगल्या जंतुनाशक असल्याच्या आढळल्या नाहींत.

कडुनिंब, शेवगा, गारंबी

कांहीं शास्त्रज्ञांनीं वनस्पति तपासून ज्यांत, जीवाणुनाशक शक्ति चांगली आहे, अशा वनस्पतींपासून जीवाणुनाशक द्रव्य वेगळें काढण्याचे आटोकाट प्रयत्न चालविले. कोणी कोणी त्या त्या वनस्पतींपासून काढलेल्या द्रव्यांस नांवेंहि दिलीं आहेत. तथापि अजून अगदीं शुद्ध स्वरूपांत व पेनिसिलीनइतकें प्रभावीपणानें जंतुनाशक असें द्रव्य मिळालेलें नाहीं. निंबिडिन हें कडुनिंबापासून, हेरिंगोस्पर्मिन हें शेवग्यापासून, मोरेलिन हें गारम्बीपासून, टोमॅटिन हें टोमॅटोपासून, मॅड्रोनिन हें शेवाळ्यापासून अशीं एकामागून एक निघत आहेत.

जंतुनाशक वेगळें द्रव्य सांपडत नाहीं

सारांश, वनस्पतीमध्यें जीवाणुनाशक शक्ति (Antibiotic activity) पेनिसिलीनच्या प्रभावी-

सांडू
डायाबेटॉल
मधुमेहावर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
दि सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई
[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स–
बी. पी. बर्वे अॅंड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते–मे. पेंढारकर अॅंड को.
मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पणाबरोबर तुलना करितां फार असल्याचें दिसत नाहीं. गेल्या कित्येक शतकांपासून वनस्पति या अगदीं यशस्वी औषध म्हणून रोग घालविण्यासाठीं आपण वापरीत असलों व त्यांचा चांगला उपयोग होत असला तरी गेल्या कांहीं वर्षांत झालेल्या संशोधनावरून असें म्हणतां येईल कीं वनस्पतींतून जंतुनाशक दृष्टीनें हमखास प्रभाव दाखविणारें व त्याच दृष्टीनें चिकित्सेंत उपयोगी असें वेगळें द्रव्य निघालेलें नाहीं.

आयुर्वेदीय तज्ज्ञांचें मत

आजच्या या विषयांत जीवाणुनाशकाविषयीं आयुर्वेदीय तज्ज्ञांचें काय मत आहे हेंहि समजणें उचित होईल. त्यांचें म्हणण्याप्रमाणें सूक्ष्म जन्तु हे हजारों लाखोंनीं असतील. त्यांचें व मानवाचें युद्ध हें नेहमींच राहणार. शरीरांत मूलतः जन्तु असूं शकतील तथापि जन्तु असेल तरच तो रोग समजावयाचा व नसतील तर रोग नसणारच ही समजूत बरोबर नाहीं. जन्तु हे रोग (दोष) उत्पन्न झाल्यामुळें (शरीररसांचा समतोलपणा बिघडल्यानें) उत्पन्न होऊन वाढतील. शिवाय निव्वळ जन्तुमारकच औषध दिल्यानें ते जन्तु कोडगे बनून त्या औषधास विरोध कसा करावयाचा व तें पचनीं कसें पाडावयाचें हेंच शिकतील. (औषधांच्या साहाय्यानें जन्तु आपलें स्थान, शरीररूप इत्यादि बदलून नव्या रूपांत प्रगट होतात हें सिद्ध झालें आहे. कालच दिल्ली येथें दिलेल्या मुलाखतीमध्यें पेनिसिलीचे मूळ जनक प्रो. फ्लेमिंग यांनीं पेनिसिलिन जपून वापरण्याचा सल्ला दिला आहे.) व वस्तुतः खरा रोग मात्र नाहींसा होणार नाहीं.

४ लाखांत १ दंतवैद्य

मिरज येथील दंतवैद्य संघाचा दुसरा वार्षिक समारंभ प्रसिद्ध सर्जन डॉ. गोडे यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. त्यावेळीं अध्यक्ष म्हणाले,– सध्यां ४ लाखांत १ दंतवैद्य असें प्रमाण या देशांत आहे. सबब अधिक दंतवैद्यांची गरज आहे.

आयुर्वेदाचार्य नानल पुण्यतिथि

सुप्रसिद्ध आयुर्वेदाचार्य पुरुषोत्तमशास्त्री नानल (पुणें) यांची ९ वी पुण्यतिथि ता. ९-२-५३ रोजीं दुपारी ३ वाजतां पुणें आयुर्वेद महाविद्यालयामध्यें डॉ. वि. म. भट यांच्या अध्यक्षतेखालीं साजरी झाली.

वेचक शब्दांत माहिती

श्री. मंत्री आयुर्वेद सेवा संघ, यांछी
स. न. वि. वि.

"आपण पाठविलेलें कॅलेंडर मिळालें, आभारी आहोंत. सदर कॅलेंडरचें निरीक्षण करतां त्यामध्यें आपल्या संस्थेची संपूर्ण माहिती वेचक शब्दांत छापली असलेनें जाहिरात उत्तम झाली आहे.

साधे परन्तु सुंदर अशा तऱ्हेचा आपल्या कॅलेंडरचा उत्कृष्ट नमुना आहे."

आपका 'वैद्य-सन्मित्र' प्रथम खंड (हिंदी) पढकर अत्यंत आनंद हुवा। वास्तविक यह एक वैद्योंका सन्मित्र ही है जो हमेशा उसके हाथसे दूर नही किया जा सकता। समन्वय वैद्यक के तत्वप्रणालीसे लिखा हुवा बहुगुणी अल्पमोली यह पुस्तक है। आपके इस प्रयत्न के लिये धन्यवाद। अगर हिंदी में इस पुस्तक का द्वितीय खंड छप गया हो तो उसकी १ प्रति मुझे व्ही. पी. द्वारा भेज दीजिये। वैद्य भगिनी
गुलबर्गा। सौ. यमुनाबाई कमलापूरकर
वैद्यविशारद

प्राप्तिस्थळः–१) वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक
२) वैद्य पां. वि. जायदे, नारायण चौक, हुबळी

सशास्त्र फलाहार-चिकित्सा (मराठी)
लेखकः–लक्ष्मण नारायण जोशी
किंमत २ रु., ट. ख. वेगळा.
—ः वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक ः—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समाजविकास योजनांतील

आरोग्यविषयक कार्यक्रम

भारतांतील संकल्पित ५५ समाज विकास योजनांवर प्रत्येकीं सुमारें ६५ लाख रुपये खर्च होण्याचा अंदाज असून त्यांतील ७॥ लाख रुपये आरोग्यविषयक कार्यक्रमावर खर्च होणार आहेत. यांतील ४ लाख रुपये पाणी पुरवठा, १ लाख रुपये आरोग्यरक्षण, १॥ रुपये नोकरवर्ग व १ लाख रुपये अिमारती आणि साधनसामुग्री यांवर खर्च होईल. प्रत्येक योजना २ लाख ग्रामीण जनतेसाठीं असून ६७ हजार लोकसंख्येचा अेक असे तिचे तीन विकास गट पाडण्यांत आले आहेत.

प्राथमिक आरोग्य केंद्र

प्रत्येक विकास गटाच्या केंद्रस्थानीं एक प्राथमिक आरोग्य केन्द्र आणि एकूण योजना विभागाच्या केंद्रस्थानीं अेक दुय्यम आरोग्य केन्द्र यांचा अन्तर्भाव करण्यांत आला आहे. सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्रांतूनच प्रत्येक विकासगटांतील आरोग्यकार्यक्रम सुरु होतील.

यांत वैद्यकीय मदत, प्रसूति आणि बाल आरोग्यकार्य, शाळांतील आरोग्य, आरोग्यविषयक शिक्षण, आरोग्यरक्षण व हिंवताप प्रतिबंधक उपाययोजना अित्यादींचा समावेश होतो.

या केंद्रावर दोन वैद्यकीय अधिकारी असतील. यांतील एक अधिकारी फिरत्या दवाखान्याची व्यवस्था पाहील आणि विकास गटांतील विभागांत केन्द्रांहि आवश्यकता लागल्यास उपयोगी पडूं शकतील अशा निवडक ठिकाणीं राहणाऱ्या चार सुईणी व सहा दाअी यांच्या कामाकडे लक्ष देईल.

या आरोग्य केंद्रावर एक दवाखाना असेल व तेथें सल्ला, रोगचिकित्सा आणि ६ खाटांची सोय करण्यांत येईल.

दुय्यम आरोग्य केंद्र

दुय्यम आरोग्य केंद्रावर सार्वजनिक आरोग्याचा अनुभव असलेला अेक वैद्यकीय अधिकारी अ... योजना विभागांतील तिन्ही आरोग्यकेंद्रांची तपासणी करील आणि तेथील कारभारांत आरोग्य संबंधींच्या सर्व बाबींत वरिष्ठ सल्लागार म्हणून ... पाहील. या केंद्रांवरील रुग्णालयांत ४० खाटा, ... पुरुष व अेक स्त्री डॉक्टर असेल. स्त्री डॉक्टर ते... प्रसूति व बाल आरोग्य व्यवस्था पाहील, तर ... सहाय्यक सार्वजानिक आरोग्यतंत्रविशारद, आरो... रक्षणाचें काम करील. लोक नेहमीं राहात असले... ठिकाणच्या आरोग्यकार्यास फार महत्व देण्यांत ... असून वैद्यकीय आणि अितर नोकरवर्गास या वि... गांतील सर्व खेड्यांस नियमितपणें भेटी द्याव्या लागत...

वाचकांचा पत्रव्यवहार—

पदवीबद्दल खुलासा पाहिजे

परीक्षा घेऊनच बडोद्यास सयाजी आ... विद्यापीठातर्फे मला 'भिषग्रत्न' ही पदवी देण्यांत आ... होती. या विद्यापीठाच्या पदव्यांना तूर्तच्या सर... व्यवहारांत मान्यता आहे कीं नाहीं, कळत नाहीं.

सरकार अमान्य पदवी लावणारास २५०-५... रु. दंड असा दंडक प्रसिद्ध झाल्यामुळें ही पृ... करीत आहे. — वैद्य ग. कृ. पाटण...

पायोरेक्सः— पायोरिया आणि दांताचे ... रोगांवर. दांत मजबूत करतें.

पाइल्स क्युअरः— कोणत्याही तऱ्हेच्या हट्टी मुळव्याधीवर तात्बडतोब गुणकारी

सेक्सोजेम (स्तंभकवटी)—

अत्यंत प्रभावी. एक वेळ खात्री करा.

ओ-नॉट-नाऊ खात्रीचें संततिप्रतिबंधक

— गर्गे मेडिकल स्टोअर्स —

मेनरोड, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभविक चिकित्सा, प्रकरण ८ वें, उत्तरार्थ- लेखकः— वृद्ध वैद्य

कामला (Joundice) चिकित्सा

या व्याधीला मराठींत कावीळ असें म्हणतात. पांडुरोग झाला असतांना त्याची प्रारंभापासून काळजी न घेतली असतां पैत्तिक पदार्थ अधिक प्रमाणांत सेवन करण्याची संवय चालूंच राहिली, म्हणजे पित्तदोष अधिक वृद्ध होऊन शरीरांतील रक्त व मांस जाळून टाकून (प्रमाणांत कमी करून) कावीळ उत्पन्न करतो. या व्याधींत त्वचा, नखें, डोळे व चेहरा अगदीं हळदीसारखे पिवळे होतात.

बालयकृत्प्लीहावृद्धि

लहान मुलांना यकृतोदर होऊन व त्या सोबतच प्लीहाहि अत्यधिक वाढली म्हणजे पोटांत हे दोन्ही अवयव कांसवाच्या पाठीसारखे टणक झालेले दिसून येतात. याला आधुनिक शास्त्रांत 'इन्फंटाइल लिव्हर' अशी संज्ञा आहे. या व्याधीच्या शेवटच्या अवस्थेंत कामला अवश्य होते. आणि त्या अवस्थेंत तिचें स्वरूप अगदीं स्पष्टतया दिसून येतें.

कपडे पिवळे होतात

ज्या कपड्यावर हें अभागी बालक निजतें ते कपडेदेखील पिवळे होतात. डोळे तर इतके पिवळे होतात कीं, त्यांतून होणारा अश्रुस्रावहि पिवळया वर्णाचा होतो. मूत्र किती पिवळें असतें तें सांगतांच येत नाहीं. हळद पाण्यांत कुवळली असतां तें जसें पिवळें दिसतें तसेंच हें मूत्र असतें. आणि हा कावीळ व्याधी विशेषतः बालकांत दिसून येतो.

लाल वर्णाचे मल, मूत्र

काविळेंत रुग्ण बरसातीच्या प्रारंभास दिसणाऱ्या बेडूकांच्या वर्णासारखा पिवळा दिसतो. याच्या इंद्रियांची सर्व शक्ति अत्यंत क्षीण होत जाते. व्याधीच्या पुढच्या अवस्थेंत याला होणारा मळ, मूत्र व त्याचें पित्त हे सर्व लाल वर्णाचे होतात. सर्व शरीरांत अत्यंत तीव्र दाह होतो. खाल्लेलें अन्न पचत नाहीं. शरीर दिवसेंदिवस दुर्बल होतें. सर्व अंगावयव ढिले वाटतात. अन्नावर रुचि नसते. आणि एकसारखी क्षीणता येत जाते. या व्याधीमध्यें पित्तदोष, हा स्वस्थानांत म्हणजे कोष्ठांत, आणि शरीरांतील रसरक्तादि धातूंत, अत्यधिक प्रमाणांत वाढतो.

या व्याधींचा दुसरा प्रकार

या व्याधीचा एक दुसराहि प्रकार आहे. त्यांत पित्ताची विकृति विशेष तीव्र नसूनदेखील डोळे, मूत्र, आदि पिवळीं दिसून येतात. याला कारण अंशःयकृत (लिव्हर) व अग्न्याशय (पॅंक्रिअस) या दोन्हींतून उत्पन्न होणारे स्राव एकीकृत झालेल्या नळीद्वारा ग्रहणींत (Duodenum) येऊन पडतात. विशिष्ट कारणामुळें, यकृतांतून येणाऱ्या नळींत जर कांहीं आडकाठी उत्पन्न झाली तर हा व्याधी होतो. विशेषतः संचित झालेल्या कफद्रव्याची एखादी गोळी त्या ठिकाणीं अडून राहिली, पित्ताचा स्राव ग्रहणींत न होतां तें पित्त सर्व शरीरांत, याकृतिक रक्तसंवहनाबरोबर (Portal circulation) पसरतें, त्यामुळें मूत्र, नखें व डोळे हे पिवळे होतात. परंतु मल मात्र पांढरा होतो. कारण त्याच्यांत पित्तद्रव्य मिसळतच नाहीं. त्याची दिशा वर वर्णन केल्याप्रमाणें बदलते.

क्षारद्रव्यांचा उपयोग केला पाहिजे

या प्रकारांत कफाच्या गोळीला पातळ करणारे असे क्षार उपयोगांत आणले पाहिजेत. वर पांडुरोगाच्या चिकित्सेंत वर्णन केलेला कुमारीआसव व सर्जिकक्षाराचा प्रयोग या व्याधींत गुणकारी ठरतो. कारण क्षार हें कफाला पातळ करणारें द्रव्य आहे. हा प्रयोग तीन चार दिवस करतांच, पित्ताला यकृतांतून ग्रहणींत नेणारी नलिका मोकळी होते. आणि तसें झालें म्हणजे मूत्र व नेत्र हे क्रमशः कमी पिवळे दिसूं लागतात. व शकृत् (मल) मात्र पिवळें होऊं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागते. या प्रकाराचें वैशिष्ट्य लक्षांत ठेवून कामलेची चिकित्सा करावी.

गुळवेलसत्व, प्रवाळभस्म, मौक्तिकभस्म

प्रारंभीं वर्णन केलेल्या मूळ कावीळ व्याधींत प्रथम विरेचन देऊन होईल तितके वाढलेलें पित्त शरीराबाहेर काढावें. रुग्णास नुसत्या दुधावर ठेवावें. त्याचप्रमाणें पित्तनाशक अशीं गुळवेलीचें सत्व, प्रवाळभस्म, मौक्तिक भस्म, दाडिमलेह, द्राक्षासव इत्यादि औषधींचे प्रयोग करावे. सकाळ संध्याकाळ एक आणाभर गुळवेलीचें सत्व, तीन गुंज प्रवाळ, व १ गुंज मौक्तिक हें मिश्रण दाडिमलेहांतून द्यावें. दुपारीं व रात्रीं कुमारीआसव व सर्जिकक्षार हें मिश्रण द्यावें. दर आठव्या दिवशीं विरेचन द्यावें.

कडुदुधीबीजनस्य द्यावें

कामलेंत नस्याचा प्रयोग विशेष गुणकारी ठरतो. कडु तुंबी (कडु दुध्याभोपळा) च्या बिया वाळवून त्यांचें चूर्ण करून ठेवावें व ते सकाळ, दुपार व संध्याकाळ सुक्ष्म प्रमाणांत हुंगण्यास द्यावें. हा एक अनुभविक प्रयोग आहे. तो करून त्याचे परिणाम आयुर्वेदपत्रिकेंत प्रसिद्धीकरतां द्यावेंत. म्हणजे संशोधनाकरितां ते उपयुक्त ठरतील. चरकांत सूत्रस्थानांत " अपामार्गतंडुलीय " (दुसऱ्या) अध्यायांत वर्णन केलेलें अपामार्गादि नस्यहि उपयोगी होते. परंतु तुंबी बी नस्य जास्त गुणावह आहे.

कुम्भकामला

कावीळ रोग बरेच दिवस राहिला म्हणजे तो कष्टसाध्य होऊन त्याचें बीज सर्व कोष्ठभर पसरल्यामुळें त्याला कुंभकामला असें म्हणतात. कुंभ शब्दाचा साधारण अर्थ जरी मडकें असा असला तरी या ठिकाणीं कोष्ठ (कोठा) हेच शरीरांतील मडक्यासारखें असल्यामुळें त्याभर पसरलेली म्हणून ' कुम्भकामला ' हें नांव दिलेलें आहे. हिची चिकित्सा कामलेप्रमाणेंच करावयाची असते.

प्रारंभिक अवस्थेंतच चिकित्सा करावी

क्वचित् अवस्थामध्यें पांडुरोगांत त्वचा, मूत्र, नख इत्यादिस आलेला पिवळा वर्ण बदलत बदलत कामलेंत तो हळदीसारखा पिवळा व तिच्या वृद्धावस्थेंत झालेला रक्तवर्णाचा, क्रमशः कुम्भकामलावस्थेंनंतर काळ्या वर्णाचा होतो. आणि सर्व शरीरभर सूज येते, शरीरांतील रक्त, डोळे व चेहरा हे अत्यन्त लाल दिसूं लागतात. आणि वांत्या होतात. अशी अवस्था आली म्हणजे हा व्याधि असाध्य होऊन प्राणनाशास कारणीभूत होतो. म्हणून याचा उपचार प्रारंभिक अवस्थेंतच करण्याची काळजी घ्यावी.

हलीमक असाध्य आहे

पांडुरोग झाल्यानंतर जर वर प्रमाणें इतर कामलादि व्याधी होऊन शेवटीं शरीराचा वर्ण हिरवा, काळा व पिवळा असा दिसूं लागला, शरीरांतील बल, उत्साह हे नष्ट झाले, झांपड येऊं लागली, अग्निमांद्य झालें, आणि थोड्या प्रमाणांत ज्वरहि पण राहूं लागला, अंग अतिशय दुखूं लागलें, सारखी तहान, दाह, अरुचि व बडबड हीं लक्षणें होऊं लागलीं म्हणजे या व्याधीस हलीमक असें म्हणतात. हा वात आणि पित्त या दोन्ही दोषांच्या प्रकोपामुळें होत असतो. हा असाध्य आहे. चिकित्साच करावयाची झाली तर कामलेची करावी. परन्तु प्रत्याख्यान करून करावी. अर्थात् रोग्याच्या नातेवाईकांस स्पष्टपणें सांगून कीं, रोग असाध्य असून कोणत्याहि प्रकारें बरा होण्यासारखा नाहीं. " यावत्कंठगताः प्राणाः तावत्कार्या प्रतिक्रिया " या शास्त्रीय वचनाप्रमाणें उपचार करणें हें वैद्याचें कर्तव्य म्हणून चिकित्सा केली जात आहे. अनुमति असल्यास चालू ठेवली जाईल. अशा प्रकारें नातेवाईकास बजावून देणें, याला 'प्रत्याख्यान' असें म्हणतात.

पानकी

अत्यंत वाढलेल्या कामलेंत ज्या शरीरांत व शरीराच्या बाहेरल्या त्वचेवर भरपूर पिवळेपणा येतो, शौच्यास पुष्कळवेळ व पातळ असें होतें, व डोळे पांढरे फटफटीत होऊन सर्व शरीर व इंद्रियें संतप्त असतात, तेव्हां त्यास ' पानकी ' अशी संज्ञा देण्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आलेली आहे.

पांडुरोगापासून पानकीपर्यंतच्या सर्व व्याधींचें निदान करतांना प्रथम डोळयांची परीक्षा करावी. डोळयांतील कडा उघडून पाहाव्या. या सर्व व्याधींत त्या पांढऱ्या फटफटीत दिसून येतील. हेंच पांडूचें प्रधान लक्षण होय. इतर व्याधींत देखील-उदाहरणार्थ, राजयक्ष्मा, प्रमेह, उदर इत्यादींत पांडु हा उपद्रव रूपानें होत असतो. आणि "बलवंतं उपद्रवं तूर्णं चिकित्सेत्" या नियमाप्रमाणें जर तो बलवान् असा दिसला, अर्थात् मूळव्याधीपेक्षां देखील तो प्राण-नाशक कारणीभूत होईल असें अनुमान करतां आलें, तर, प्रथम त्याचीच चिकित्सा करावी. चिकित्सा करतांना, चिकित्सेमुळें मुळव्याधीला कोणताहि अपाय करणारें असें द्रव्य-मग तें औषधीरूप असो किंवा पथ्य रूप असो- देऊं नये.

पथ्यापथ्य

पांडूपासून पानकीपर्यंतच्या सर्वावस्था या वास्तविक एकाच यकृत् अवयवविकृतीच्या, पित्तदोष व रक्तधातु यांच्या वृद्धीच्या आहेत. सबब, सर्वांकरितां पथ्य एकच प्रकारचें असणार. या सर्व व्याधींत, साध्य झाल्यास, शुद्ध गाईचें (विशेषतः काळ्या वर्णाच्या गाईचें) दूध हेंच एक शरीराला पोषक असें आहे. तेंच फक्त देऊन इतर अन्नादि पदार्थ वर्ज्य ठेवावे. साध्य नसल्यास यव, गहूं व तांदूळ यांपैकीं जें अन्न रोग्याला सात्म्य असेल तें द्यावें. रुग्ण मांसभक्षक असल्यास जांगल प्राणी (हरिण, ससा वगैरे) यांचे मांसाचे शोरवे द्यावेत. विशेषतः यकृत् अवयव मिळूं शकला तर तो याच जांगल प्राण्यांचा घेऊन, किंवा बकरीचा घेऊन त्याचा शोरवा करून द्यावा. डाळी जरी सर्वच वर्ज्य असल्या तरीपण आवश्यकताच असल्यास सालीसकट मुगांच्या डाळीचें वरण करून त्यांतलें गाळलेलें पाणी फक्त द्यावें. पालेभाज्या व दुध्या, परवर हे देखील उकळून त्यांचें पाणी द्यावें. इतर पदार्थ वर्ज्य. तेल, तिखट अजिबात वर्ज्य. बिस्तवाजवळ बसून शेकणें, ऊन सेवन करणें, परिश्रम करणें, मार्ग चालणें, क्रोध व शोक, मैथुन आणि पित्ताला उत्पन्न करणारें असें अन्नपान हें सर्व वर्ज्य करावें.

आमलक्यावलेह कसा करावा ?

आंवळा हें द्रव्य पित्तनाशक आहे. सबब, त्यापासून तयार केलेला एक आमलक्यवलेह नांवाचा योग या सर्व रोगामध्यें व ते बरे झाल्यानन्तर येणाऱ्या अशक्ततेंत गुणकारी असा ठरतो. हा तयार करण्याची पद्धति अशी आहे:—

आंवळयाचा रस (यंत्रांत घालून काढलेला) एक द्रोण (१२॥ शेर) घेऊन त्यांत चौसष्ट ६४ तोळे पिंपळीचें चूर्ण, आठ तोळे जेष्टमधाचें चूर्ण, बिया काढलेल्या मनुका आठ तोळे, आल्याचा रस आठ तोळे, वंशलोचन व अडीचशेर बारीक केलेली खडीसाखर घालून शिजवावें. चांगला घट्ट असा अवलेह (चाटण्यालायक द्रव्य) तयार झाला म्हणजे त्यांत ६४ तोळे मध मिसळावा. हा अवलेह दोन तोळे सकाळीं व तेवढाच संध्याकाळीं घेतला असताना हलीमक, पांडु, कामला वगैरे विकार बरे होतात.

नारुचा वैद्य (मराठी)
श्री. गोविंदराव मोरोबा कार्लेकर कृत
किं. ६ आणे, ट. ख. वेगळा
-: वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक :-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२० टक्के लोकांचें जग

" ज्या जगांत तुम्ही वावरतां तें फक्त २० टक्के लोकांचें आहे. समाजांतील ८० टक्के लोक तुमच्यापेक्षां अगदीं निराळ्या जगांत वावरत आहेत. तुमचें वाङ्मय, तुमच्या योजना, तुमचे प्रयत्न, हीं फक्त तुमच्या या (२० टक्के) जगासाठीं आहेत. पण अशानें कोंडी फुटणार नाहीं. समाजांतील या दोन थरांतील अन्तर कमी झालें पाहिजे.

प्रत्यक्ष कामानें अधिक ज्ञान

पुस्तकी शिक्षणांतून जेवढें ज्ञान मिळेल त्यापेक्षां कितीतरी अधिक ज्ञान समाजांत प्रत्यक्ष काम करून मिळेल. आधीं काम करावें व मग त्याला पूरक असें ज्ञान मिळवावें हें उचित आहे."

-- अण्णासाहेब सहस्रबुद्धे

नगरपालिका हें महिलांचें क्षेत्र

" नगरपालिका हें क्षेत्र पुरुषांनीं महिलासाठीं राखून ठेवावयास हवें. नगरपालिकांच्या कारभारांत लक्ष घालण्याची नसती उठाठेव करण्याचें पुरुषांना कारण नाहीं. स्वच्छता, साफसफाई, बागकाम हीं सारीं महिलांचीं क्षेत्रें आहेत.

पुरुषांनीं आपली शक्ति मोठ्या कामासाठीं वापरावी. सध्यां शहरी महिलांची सारी कर्तृत्वशक्ति फुकट जात आहे. या महिलांना मोकळा वेळ बराच असतो. हा वेळ फुकट जाणें ही राष्ट्रीय हानि आहे.

चीनमध्यें कोणतीहि महिला घरीं बसत नाहीं. खुद्द पंतप्रधानाची पत्निहि काम करते. तेथें असें एकहि क्षेत्र नाहीं कीं जेथें महिला कार्य करीत नाहींत." — सौ. दुर्गाबाई देशमुख

संपादकानें प्रवास केला पाहिजे

नासिक येथें नुकतेंच 'अमृत' या मासिकाचें प्रकाशन झालें. हें मासिक इंग्रजींतील 'रीडर्स डायजेस्ट' या पद्धतीवर काढण्यांत आलें आहे. पृष्ठसंख्या १२५ किंमत १ रु. वार्षिक वर्गणी १० रु.

या मासिकाच्या प्रकाशन समारंभप्रसंगीं भाषण करतांना श्री. वामनराव पुरोहित म्हणाले:- " संपादक हा बैठा उपयोगी नाहीं. त्यानें दरसाल हजार दीड-हजार मैल तरी प्रवास अवश्य केला पाहिजे. तेव्हांच हें वाङ्मय वास्तवाला धरून असें निर्माण होऊं शकेल."

गांजापासून औषधी निर्मिति

गांजाची लागवड होत असलेला बंगालचा भाग आतां पूर्व पाकिस्तानमध्यें गेला, म्हणून पश्चिम बंगालनें ब्रह्मपूरजवळ गांजाची लागवड सुरू केली आहे व सरकारी विक्रीकेंद्र काढलें आहे. ब्रिटनमधून या केंद्राकडे २५ मण गांजाची मागणी आली आहे. एक मण गांजाची किंमत १२ हजार रुपये आहे. ब्रिटनमध्यें या गांजाचा उपयोग औषधी कारखान्यामध्यें औषधी निर्मितीसाठीं केला जातो. मुंबई राज्यांत मात्र वैद्यांना त्याच कारणासाठीं गांजा मिळू शकत नाहीं.

शास्त्रोक्त पद्धतीनें व अत्यंत परिश्रमानें तयार केलेलीं महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसंमेलनानें व ऑल इंडिया आयुर्वेद कॉंग्रेस व प्रदर्शनाकडून प्रशंसित

सहस्रपुटी अभ्रक इ. भस्में व इतर औषधें

प्राइस लिस्ट मागवा.

श्री अमरेश्वर आरोग्यमंदिर

मिराशी बोळ, पो. इचलकरंजी S.M.C.

' आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार '

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्वप्रकारचीं सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापावर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहा:—

आयुर्वेदिक औषधी भांडार

२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी पुणें, २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म. प्रां. वैद्य मंडळ—

कल्याण, ठाणे, कर्जत भागांत दौरा

म. प्रां. वैद्य मंडळाचे अध्यक्ष वैद्य बिंदुमाधव पंडित हे ता. ३१ जानेवारी रोजीं नागपूर एक्सप्रेसनें कल्याण येथें गेले. तेथील वैद्यमंडळी श्री. नी. कृ. भावे, श्री. वि. गो. थावरे, गुर्जरपाध्ये, यांना भेटून त्या भागांतील दौऱ्याची त्यांनीं आंखणी केली. प्रथम ता. १ रोजीं सकाळीं ते कर्जत येथें गेले. तेथें वैद्य वा. र. गांगल आयुर्वेदतीर्थ व वैद्य ग. गो. बापट यांच्या भेटी घेतल्या व व्यवसायाची स्थिति समजून घेतली. वैद्य गांगल व बापट यांची शेती त्याच भागांत जवळ-पास आहे. वैद्य बापट यांची वैद्यकी वडिलोपार्जित आहे. प्रत्येक औषध स्वतः करून मगच वापरावयाचें असा त्यांचा बाणा आहे. तसेंच नवीन कच्ची औषधी द्रव्यें वापरण्याकडेहि त्यांचें लक्ष आहे. उदाहरणार्थ, नारळाच्या करवंट्या कुटून व खलून त्याचें चूर्ण ते मलेरियावर वापरतात. [दुसरीकडे कांहीं वैद्य याचा कोळसा करून तो कोष्ठगत वातावर अनुलोमन-कार्यार्थ देतात, असेंहि प्रवासांत आढळून आलें.] मलेरियावर मल्लसिंदूर, मधुमेहावर हरिद्रादि आठ वस्तूंचें चूर्ण, आम्लपित्तावर ८ पट तिळाचें सौम्य पुट दिलेला सोमल + शुद्ध कुचला, श्वेतकुष्ठावर लावण्यासाठीं निष्णीचा कांदा घातलेलें औषध अशी परंपरेनें आलेलीं पण सर्वत्र रूढ नसलेलीं कांहीं औषधें वापरण्याची पद्धति येथें आढळून आली.

कामशास्त्राचा शास्त्रीय अभ्यास

कर्जत येथें कौटिलीय अर्थशास्त्र, वात्स्यायन कामसूत्र, अनंगरंग रतिशास्त्र इत्यादि पुस्तकें प्रसिद्ध करणारे श्री. गजाननराव मुळे यांची मुलाखत झाली. धर्मशास्त्र, मोक्षशास्त्र (वेदान्त) याप्रमाणेंच एक पुरुषार्थ या दृष्टीनें कामशास्त्राचा विषय शास्त्रीय दृष्टिकोणांतून मांडला गेला पाहिजे व त्याचें पद्धतशीर रीतीनें अध्ययन-अध्यापन झालें पाहिजे असें त्यांचें मत आहे. त्यांच्या वडिलांचें मुंबईस माधवबागेंत ग्रंथ-विक्रीचें दुकान होतें व ते स्वतः प्रो. विजापुरकरांच्या समर्थ विद्यालयाचे विद्यार्थी होते, इत्यादि माहिती समक्ष भेटींत समजली. त्यांची त्या भागांत शेतीवाडी आहे. शेतीची उत्तम मशागत करून सर्व प्रकारची अन्नधान्यें स्वतः निर्माण करून सेवन करण्याबाबत त्यांचा कटाक्ष आहे. औषधें वगैरेंच्या भानगडींत ते अगर त्यांचा मुलगा नाहीं.

नेरळ, अंबरनाथ

कर्जतहून अध्यक्ष नेरळ येथें गेले. बरोबर वैद्य गांगल होते. तेथें पोपट प्रभुराम आयुर्वेदिक कॉलेजचे पदवीधर वैद्य मुळे व साताऱ्याच्या आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाचे पदवीधर वैद्य कर्वे हे आहेत. त्यांना महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाच्या चालू कार्याची माहिती देऊन अध्यक्ष अंबरनाथ येथें आले. बेळगांवच्या डॉ. जठार यांचे चिरंजीव वैद्यराज जठार हे येथें व्यवसाय करितात. हे बनारस हिंदु विश्वविद्यालयाचे पदवीधर (ए. एम्. एस्.) आहेत. त्यांनीं तेथें सूतिकागृहहि चालविलें आहे. बदलापूरला वास्तव्य करणारे पुणें येथील आयुर्वेद महाविद्यालयाचे पदवीधर वैद्य ओक (आ. वि. वि.) यांचाहि येथें दवाखाना आहे. ता. १ रोजीं रविवार असल्यामुळें या उभय वैद्यांचे दवाखाने बंद होते. त्यामुळें भेट होऊ शकली नाहीं. येथील माजी आमदार भाऊसाहेब परांजपे, त्यांची मंडळी, चिरंजीव, सून वगैरे पूर्व परिचित मंडळीची भेट झाली. त्यांनाहि दौऱ्याचा उद्देश सांगण्यांत आला.

मो. ह. हायस्कूल, ठाणें

रात्रींचा मुक्काम कल्याण येथें करून ता. २ रोजीं अध्यक्ष ठाणे येथें गेले. सुप्रसिद्ध वैद्यराज दत्तोपंत वैद्य यांच्या घरीं मुक्काम होता. दुपारीं ३ वाजतां वैद्यराज श्री. बापूसाहेब (ना. ह.) जोशी यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घरी वैद्य मंडळींशी चर्चा झाली. वै. ग. द. वैद्य, वै. ज. बा. मोकाशी, वैद्य भागवत व स्वतः बापूसाहेब ही मंडळी उपस्थित होती. वैद्यराज दत्तोपंत वैद्य हे कोकणांत सहकुटुंब गेले होते. श्री. बापूसाहेब यांनीं दौन्याचा उद्देश विचारला. महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाच्या प्रचारकार्याची व सरकारच्या हालचालींची माहिती देण्यांत आली. त्यानंतर ४॥ वाजतां ठाणे येथील सुप्रसिद्ध मो. ह. हायस्कूलमध्यें विद्यार्थ्यांच्या समोर व्याख्यानासाठीं अध्यक्ष वै. भाऊसाहेब वैद्य यांच्या समवेत गेले. हा व्याख्यानाचा कार्यक्रम चांगला झाला. स्वतः हेडमास्तर श्री. टिल्लू यांनीं सर्व व्यवस्था उत्तम ठेवली होती. 'विद्यार्थ्यांचें आरोग्य-विषयक प्रश्न' हा व्याख्यानाचा विषय होता. वरच्या वर्गांतील मुले मुली व शिक्षक यांनीं सर्व सभागृह पूर्ण भरलेलें होतें. लाउडस्पीकरची व्यवस्था होती. दादरच्या छबिलदास हायस्कूलचीच ही शाखा आहे. याच संस्थेचीं कल्याण, कुर्ला इत्यादि ठिकाणीं विद्यालयें आहेत व तींहि भरभराटींत आहेत. सायंकाळीं अध्यक्षांनीं ठाणे येथील मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे म्युनिसिपल डिस्पेन्सरी व परांजपे आणि मंडळी यांची औषधीशाळा यांना भेट दिली व परिस्थिति समजून घेतली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

ठाणें येथील हे ग्रंथ संग्रहालय फार जुनें असून यांत २७२ ग्रंथ वैद्यक विषयावर आहेत. जिज्ञासू वैद्यमंडळींनीं फुरसत काढून हा ग्रंथ संग्रह नजरेखालून घालणें व त्यासंबंधीं लेख लिहून सर्वांना त्याचा परिचय करून देणें अवश्य आहे. मो. ह. हायस्कूलमध्यें एक जिज्ञासा मंडळ आहे. त्यामध्यें चर्चाद्वारें माहिती मिळविण्याची पद्धति आहे. त्यासाठीं पुनः एकवार आधीं पत्र पाठवून भेट देण्याबाबत शाळेच्या हेडमास्तरांनीं विनंति केली आहे. संस्थेचें 'पराग' नांवाचें नियतकालिक निघतें. त्यांतहि आरोग्यविषयक लेख विद्यार्थ्यांसाठीं वैद्यांनीं लिहावेत अशी त्यांची अपेक्षा आहे.

वैद्य मंडळींचें एकत्र भोजन

कल्याण येथील सर्व कार्यक्रम ता. ३ रोजी झाले. सकाळीं ११ वाजेपर्यंत रुग्णांची तपासणी झाली. नंतर श्री. रमाबाई जोग यांच्या दवाखान्यास भेट देऊन त्यांच्या मुलाबाळांची चौकशी केली. भगिनी वर्गांत चिकित्सक या नात्यानें त्या लोकप्रिय असल्याचें दिसून आलें. वाढत्या कामामुळें दवाखान्यासाठीं राहात्या घरास जोडून नवीन खोल्या बांधण्याचें काम चालू होतें. श्रीमती रमाबाईचे यजमान हे पदवीधर वैद्य होते. १२॥ ते १॥ वैद्यमंडळींच्या सहभोजनाचा कार्यक्रम वैद्यराज भावे यांच्या घरीं झाला. वैद्य भावे, मेहेंदळे, मराठे, पाध्येगुर्जर, वै. विनायकराव जोशी, श्रीमती रमाबाई ही सर्व मंडळी आली होती. बऱ्याच वर्षांनीं असा सर्व वैद्यांच्या एकत्र भोजनाचा योग आला म्हणून सर्वांना आनंद वाटत होता. भोजनाचे वेळीं उपयुक्त चर्चा झाली. एक उपयुक्त कफघ्न द्रव्य म्हणून मिरचीचा समावेश औषधी कार्यांत करावा ही कल्पना अध्यक्षांनीं चर्चेसाठीं मांडली व लवंगी मिरची घालून लघुमालिनीवसन्त आदि कांहीं महत्वाचीं औषधें सेवासंघातर्फे तयार करण्याचा आपला मनोदय त्यांनीं व्यक्त केला. 'आपण स्वतः एकअष्टमांश मिरच्यांचें चूर्ण टाकून उकळलेलें गोडें तेल वातनाशक म्हणून नित्य वापरतो असा अनुभव' वै. विनायकराव जोशी आयुर्वेदाभिषक् यांनीं सांगितला. यांचा वैद्यकीय व्यवसाय फारच मोठा आहे. दोन दवाखाने आहेत. मोटारसायकल आहे व क्षणाची फुरसत नाहीं इतके काम ते करतात. ते म्युनिसिपल मेंबरहि आहेत.

द्रव्यगुणकर्माचें बालशिक्षण मंदिर

भोजनानन्तर प्रथम जातां जातां वाटेंत सौ. इंदुमती देवधर व आपटे मास्तर यांनीं गेलीं ४ वर्षे यशस्वी रीतीनें चालविलेल्या बालक मंदिरास भेट दिली. न्यायशास्त्रांत द्रव्यगुणकर्माविषयीं जो विचार आहे तो बालकांना उपकरणांच्या साधनानें येथें बालपणींच सुबोध रीत्या शिकविला जातो. सर्व गुणांचें प्रत्यक्ष

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिक्षण येथें दिलें जातें. मृदु, खर, लघु, गुरु हे सर्व गुण बालपणीं शिकण्याचीं साधनें आयुर्वेद महाविद्यालयांतून सुद्धां ठेवण्यासारखीं आहेत.

ज. ए. ई. चें हायस्कूल, कल्याण

१॥ वाजतां कल्याणच्या हायस्कूलमध्यें हेड-श्री. केळकर यांच्या देखरेखीखालीं व्याख्यानाचा कार्यक्रम झाला. सर्वांच्या प्रकृति सारख्या नसतात, सबब आपली दोषप्रकृति ओळखूनच विद्यार्थ्यांनीं व्यायाम, आहार, निद्रा, अभ्यास वगैरे ठेवावे ही गोष्ट उदाहरणासह समजावून सांगण्यांत आली.

महिला उत्कर्ष मंडळ, कल्याण

हायस्कूलमधील व्याख्यानानन्तर २ वाजतां वैद्यमंडळीसह अध्यक्ष महिला उत्कर्ष मंडळांत गेले. तेथें मंडळाच्या अध्यक्ष व मंत्री यांच्याबरोबर प्राथमिक चर्चा झाली. या मंडळाचे ३०० सभासद आहेत. बहुतेक सभासद मध्यमवर्गीय आहेत. मंडळातर्फे दर महा मुंबईचे तळवलकर, सुळावे, वगैरे तज्ञ डॉक्टर कल्याणला येतात, स्त्रियांना मोफत तपासतात, व योजना लिहून देतात अशी माहिती मिळाली. वैद्य बिंदुमाधव पंडित यांनीं आपल्या व्याख्यानांत आजारी न पडण्यासाठीं चिकित्सा करून घेण्याची कल्पना मांडली. प्रत्येक मंडळाच्या सभासदांची एक स्वतंत्र आरोग्यवही घालावी. वैद्याकडून त्याची तपासणी करून दोषप्रकृति निश्चित करून घ्यावी व तो दोष वाढणार नाहीं, त्याचें वार्षिक शोधन केलें जाईल अशी योजना करावी इ. सुचविलें. वेळींच घातलेला एक टाका पुढील ९ टाके वाचवितो ही कल्पना स्त्रियांना चांगली पटली. एक भगिनी तर म्हणाल्या, एकेक कुटुंब डॉक्टरपायीं व औषधापायीं १०-१५ वर्षांत एवढे पैसे खर्च करतें कीं जर ते वाचतील तर नवीन प्लाट घेऊन एक स्वतःची इमारत उठेल.

मेडिकल ॲसोसिएशन, कल्याण

सायंकाळीं बरोबर ४॥ वाजतां डॉ. फडके यांच्या प्रशस्त दवाखान्यांत मेडिकल ॲसोसिएशनच्या सुमारें २० डॉक्टर मंडळीसमोर ‘रोगचिकित्सेची आयुर्वेदीय पद्धति’ या विषयावर १ तासभर व्याख्यान झालें. षड्रस, निद्रा, काल, आतपसेवन इत्यादींचा विचार अध्यक्षांनीं मांडला. “ॲलोपॅथी-होमिओपॅथी यांतील रोगाच्या तीव्रावस्था दूर करण्याचीं वैशिष्ट्यें मान्य करून मूलगामी चिकित्सा या दृष्टीनें आयुर्वेद हेंच श्रेष्ठ शास्त्र आहे. कारण त्यांत रोग न होण्यासाठीं वार्षिक दोषशोधनाची व्यवस्था आहे.” व्याख्यानानंतर प्रश्नोत्तरें झालीं. माणसाच्या आवडीनिवडी ह्या संवयीनें जडलेल्या असतात. असा पूर्वपक्ष करण्यांत आला. इंग्लंडांत गेलेल्या माणसाला आवडणाऱ्या गोष्टी निराळ्या असतील. मनुष्यांत निर्माण होणारी रुचि ही त्याच्या शरीरांतील दोषांची अवस्थादर्शक असते. अर्थात् ती आवड रोगहारकच असते असें नाहीं. रोगवर्धकहि असूं शकेल. पण प्रत्येक आवडीनिवडीला अर्थ आहे.

मिश्र शिक्षणामुळें आयुर्वेदाची हानि

नंतर डॉ. मोडक यांनीं नाडीपरिक्षेबाबत प्रश्न विचारला. नाडी हा शब्द स्रोतस् या अर्थानें वैद्यकीय शास्त्रांत आला आहे. प्रचलित नाडीपरीक्षा ही युनानी वैद्यकाच्या संसर्गाचा परिणाम आहे असें उत्तर देण्यांत आलें. डॉ. मोडक, डॉ. फडके इ. डॉक्टरांची मागील पिढी वैद्य व्यवसायी असल्यामुळें त्यांची आयुर्वेदाविषयीं आस्था दिसून आली. सध्यांचा डी.ए.एस्.एफ्. मिश्र कोर्स हा आयुर्वेदाचा नाश करणारा आहे असें त्या मंडळींनीं आपलें स्पष्ट अनुभवपूर्ण मत दिलें. या डी. ए. एस्. एफ्. मंडळींना आयुर्वेदाचें ज्ञान नसतें व ॲलोपॅथीचेंहि नसतें. आमच्यापेक्षां २ इंजेक्शनें जास्तच ही डी. ए. एस्. एफ्. मंडळी देतात. आयुर्वेद हा स्वतंत्र शिकविला जावा अशी योग्यता त्यांत आहे. जनतेनें व सरकारनें केवळ आयुर्वेदाला प्रोत्साहन द्यावें म्हणजे त्यांतून सर्वांचाच लाभ होईल असें त्यांनीं सांगितलें.

डॉ. फडके यांचा समारोप

डॉ. फडके यांनीं समारोप करतांना आयुर्वेदांतील अल्पमोली व बहुगुणी औषधांचा आदरपूर्वक उल्लेख

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केला. डायरिया सारख्या विकारांत दूध देऊ नये हें आपण आयुर्वेदावरूनच शिकलो. आम्ही डॉक्टरमंडळी रोग्याकडून पैसे काढण्याच्या लोभानें पोटांतून औषधें देण्यापेक्षां इंजेक्शनेंच जास्त ठोकतो व रोग्यांना निष्कारण जास्त खर्चांत कसें घालतो इत्यादि आपले अनुभव सांगितले. आयुर्वेदाच्या व शास्त्रशुद्ध अभ्यासाची प्रात्यक्षिकांची व रुग्णालयांची सोय झाल्यास सर्वांस त्याचा लाभ घेतां येईल असें सांगितलें.आजच्या आयुर्वेद महाविद्यालयांतून वैद्यांना प्राधान्य दिलें जात नाहीं. याबद्दल सर्वांनीं असमाधान व्यक्त केलें. त्यानंतर नवीनच झालेल्या नेत्ररुग्णालयांत अल्पाहाराचा कार्यक्रम झाला. त्यावेळींहि अनेक आयुर्वेदीय विषयावर चर्चा चालूच होती.

म्यु. आयुर्वेदीय औषधालयाची शक्यता

कल्याण म्युनिसिपॅलिटींत ह्यापैकीं कांहीं डॉक्टर सभासद आहेत व गतवर्षीच्या बजेटमध्यें आयुर्वेदाचा दवाखाना उघडण्यासाठीं १०००० रुपये अन्दाजपत्रकांत घातले आहेत. केवळ आयुर्वेदीय पद्धतीचे शास्त्रशुद्ध उपचार या दवाखान्यांत व्हावेत अशी या डॉक्टरमंडळींची अपेक्षा आहे. त्यासाठीं योग्य चिकित्सक मिळाल्यास पुनः चालना देण्यास ही मंडळी तयार आहेत असें कळलें. आयुर्वेदाचे काढे, घृतें, बस्ति इत्यादि शास्त्रशुद्ध उपचार अभ्यासपूर्वक करण्याची योग्यता असलेल्या वैद्यांनीं तयारी दर्शविल्यास एक उत्तम आयुर्वेदीय औषधालय कल्याण येथें निघणें शक्य आहे. मात्र तेथील वैद्यानें इंजेक्शनें करुन प्रॅक्टिस वाढविण्याचा लोभ सोडला पाहिजे.

वयाच्या १६ वर्षांपूर्वी व्यायाम वर्ज्य

कुर्ला येथील जनरल एज्युकेशन इंस्टिट्यूटच्या हायस्कूलचे एक अध्यापक कल्याण येथें असतात. त्यांनीं ता. ४ फेब्रुवारी रोजीं आपल्या हायस्कुलांत सकाळीं ११॥ वाजतां व्याख्यानाचा कार्यक्रम ठरविला. मुलांनीं वयाच्या १६व्या वर्षापर्यंत जोर बैठका, कुस्ती रोमनरिंग्ज यासारखे व्यायाम करूं नयेत. सामान्य खेळ खेळावेत, अभ्यंग करावा, झोप प्रकृतिनुसार घ्यावी, इत्यादि माहिती व्याख्यानांत सांगण्यांत आ[ली.] मागाहून प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला. लहान वया[ंत] व्यायाम घेऊ नये हें तत्व शिक्षक मंडळींना [प]टलें. बडोदा येथें लहान वयांत व्यायाम घेतल्यामु[ळे] खुजी राहिलेल्या व्यक्तींचीं त्यांनीं कांहीं उदाहर[णें] अध्यक्षांना सांगितली व पुनः एकवार वरच्या वर्गा[ं]तील विद्यार्थ्यांना व्याख्यान देण्यासाठीं येण्याबद्द[ल] विनंति केली. तेथील शिक्षकांनीं अध्यक्षासमवे[त] फोटो घेतला.

रत्नागिरी जिल्हा दौऱ्याची आंखणी

ता. ४ रोजीं तिसऱ्या प्रहरीं अध्यक्षांनीं मुंब[ई] येथें जाऊन तेथील कांहीं वैद्य मंडळींच्या भेटी घेतल्या व ता. १५ पासून पुढें काढावयाच्या रत्नागिरी जिल्ह्यांतील दौऱ्याची आंखणी केली. या रत्नागिरीच्या दौऱ्यांत लालबागचे वै. वि. म. पारकर हे अध्यक्षा[ंच्या] समवेत राहणार आहेत.

तारेचा पत्ताः—Newbottle

के. के. शहा अँड कंपनी

बाटल्यांचे व्यापारी

(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)

रिकाम्या बाटल्या, बुचे, कॅपसुल्स्
[हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी
इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर
व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे

ठोक व किरकोळ

विक्री करणारे व्यापारी

पवित्र
नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहाः-नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आजच्या बोर्डाची अवस्था अनाथ विधवेसारखी आहे

(बोर्डसदस्य वै. प्रतापकुमार यांचें जळगांव येथील भाषण)

(आमच्या बातमीदाराकडून)

ता. १०-१-५३ रोजीं जळगांव येथें भरलेल्या रजिस्टर्ड वैद्यहकीमांच्या सभेंत भाषण करितांना आयुर्वेद युनानी बोर्डाचे सभासद वैद्य प्रतापकुमार म्हणाले :—

"१९३८ च्या वैद्यकीय कायद्यासंबंधीं गोष्टींना प्रारंभ झाला, त्या दिवसापासून आजपर्यंत १४।१५ वर्षं त्या कायद्याशीं माझा सविस्तर संबंध येत गेला आहे. १९३७ च्या प्रधानमंडळाचें मत आयुर्वेदाला अनुकूल आहे असें वैद्यमंडळींच्या लक्षांत आल्यामुळें मुंबईंतील स्वर्गीय डॉ. पोपट प्रभुराम, वैद्य यादवजी त्रिकमजी, वैद्य ऐनापुरे आदि प्रमुख मंडळींनीं सबंध मुम्बई प्रांतांतील प्रमुख वैद्य मंडळींची एक सभा बोलाविली होती. या सभेचें अध्यक्षस्थान अहमदनगर येथील सुप्रसिद्ध स्व. वैद्यपंचानन गुणेशास्त्री यांना देण्यांत आलें होतें. सभेंत महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटक येथील प्रमुख वैद्य हजर होते. या सभेनें कित्येक ठराव केले. तें आंदोलन पुढें चालू ठेवण्यासाठीं एक समिति नेमण्यांत आली होती. त्याचे अध्यक्ष वैद्य गुणेशास्त्री व मंत्री प्रतापकुमार वैद्य हे होते. या समितीनें पुष्कळ महत्वाचे काम केलें व जवळजवळ एकमतानें मुम्बईच्या आरोग्यमंत्र्याकडे आपलें म्हणणें मांडलें. लक्षांत घेण्याजोगी गोष्ट अशी कीं, मुबईंत भरलेल्या या सभेंत पुण्याच्या आयुर्वेद महाविद्यालयाचे वैद्य बावलशास्त्री, डॉ. लागू हे प्रतिनिधि हजर होते; पण मागाहून काय झालें कोण जाणें, या मंडळींनीं समितीच्या कामांत लक्ष घातलें नाहीं व आपला सवता सुभा स्थापून अलग रस्ता सुधारला.

१९३८ कायद्याचा उद्देश सफल झाला नाहीं

१९३८ च्या वैद्यक कायद्याच्या प्रारंभीं असें सांगण्यांत आलें आहे कीं हा कायदा आयुर्वेद व युनानीचा प्रसार व त्यांच्या अभ्यासक्रमाला उत्तेजन देण्यासाठीं अस्तित्वांत आला आहे. या कायद्यांतील उद्देश, त्याचा गेल्या १४ वर्षांतील अंमल व त्याचा परिणाम पाहतां सर्वांची खात्री होऊन चुकली आहे कीं या कायद्यापासून जी अपेक्षा राखली ती सफल झाली नाहीं. आयुर्वेदाचा वा त्याच्या अभ्यासक्रमाचा प्रसार झाला नाहीं. आयुर्वेदाचा विकास पण झाला नाहीं. युनानी वैद्यकाची तर या प्रांतांत कत्तलच करण्यांत आली आहे. या दृष्टीनें हा कायदा संपूर्ण निष्फळ ठरला आहे.

१९३८ च्या कायद्यान्वयें पहिलें वैद्यकीय बोर्ड १९४० मध्यें अस्तित्वांत आलें. त्याच्या रजिस्ट्रारपदीं नेमणूक करण्याबाबत जी खटपट झाली त्याची माहिती त्यावेळच्या केसरींत सविस्तर प्रसिद्ध झालेली आहे. असें ऐकिवांत आहे कीं पुढें ज्या व्यक्तीची सरकारनें पोस्टखात्यांत मोठ्या पगारावर नेमणूक केली अशा एका व्यक्तीनें या रजिस्ट्रारपदासाठीं अर्ज केला होता. परंतु बोर्डाची सत्तासूत्रें हालवूं शकणाऱ्या डॉ. भडकमकर-नानल-लागू आदि मंडळींच्या मनांत ज्याची नेमणूक करावयाची होती तीच व्यक्ति नेमली गेली. या माणसाच्या नेमणुकीमुळें १९४८ सालीं बोर्डाला जें अनेकविध नुकसान झालें तें सर्वांना विदित आहेच.

अभ्यासक्रमाची जबाबदारी पहिल्या बोर्डावर

आज फॅकल्टीनें पदवी अभ्यासक्रम सुरूं केला आहे. परंतु त्याचा सांगाडा निर्माण करण्याची जबाबदारी पहिल्या बोर्डाची आहे. त्यावेळीं बोर्डातर्फे अभ्यासक्रम तयार करण्याकरितां एक दिखाऊ समिति नेमण्यांत आली होती. वैद्य यादवजी त्रिकमजी यांची समजूत घालून त्यांना असें खूष

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करून ठेवलें होतें कीं, त्यांनीं त्या अभ्यासक्रमाला मान्यता दिली होती. जर त्या कालांत असें घडूं शकलें, तर आज तरी फॅकल्टीकडून अधिक आशा करण्याचा आपणांस काय अधिकार आहे?

आज बोर्डाची अवस्था एखाद्या अनाथ विधवेसारखी आहे. एखाद्या संयुक्त कुटुंबांत अनाथ विधवेला बोलणीं खात खात ज्या प्रकारें, रहावें लागतें, तीच स्थिति बोर्डाची आहे. बोर्डाचे अधिकार अत्यंत हास्यास्पद प्रकारचे आहेत.

बोर्डाचें कामांत अध्यक्षांचें मनापासून लक्ष नाहीं

१९५० च्या ऑगस्ट महिन्यांत नवीन तिसरें बोर्ड अस्तित्वांत आलें त्यावेळीं आपल्या सर्वांच्या आज्ञेनें आम्ही ६ जण– वै. वेणीमाधव, मुनि, हळशीकर, गोगटे, देवासिंग व प्रतापकुमार– मोठ्या हौसेनें व उत्साहानें बोर्डात गेलो. बोर्डाचें प्रमुखपद सरकारनें डॉ. योध यांना दिलें आहे. डॉ. योध माझे गुरु आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखालीं उत्तम कार्य करण्याची आमची सर्वांची धारणा होती. परंतु डॉ. योधांच्या २॥ वर्षांच्या कार्यवाहनपद्धतीवरून हें दिसून आलें कीं, त्यांचें बोर्डाच्या कामांत लक्ष नाहीं. तेथें येऊन बोर्डाचें काम करण्याचें नाटक वाटेल तसे ते करीत आहेत. कोणत्याहि चव्या सूचनेला अगर ठरावाला त्यांचा पाठिंबा मिळत नाहीं. कायद्याचें ज्ञान त्यांना चांगलें असेल पण गम्मत अशी कीं कांहीं काल मी पाठविलेले दोन ठराव त्यांनीं त्यावेळीं 'बेकायदा' (आऊट ऑफ ऑर्डर) ठरविले होते. आणि त्याच भाषेंत तेच ठराव मी पुन: पाठविले, त्यावेळीं त्यांनीं त्यांचा स्वीकार केला. यावरून दिसून येतें कीं बोर्डाच्या कामांत ते योग्य लक्ष पुरवीत नाहींत. पुष्कळ वेळां विचार न करतांच तें पावलें टाकतात. मात्र मग तीं मागें घेतांना सामान्य सौजन्यादाखल पण ते खेदप्रदर्शन करीत नाहींत.

अध्यक्षांची हिटलरशाही

वैयक्तिक रीत्या बोर्डाचा सदस्य या नात्यानें अध्यक्ष डॉ. योध यांच्याशीं माझे पुष्कळ मतभेद झालेले आहेत. मी त्यांचा शिष्य म्हणून अभिमान बाळगीत असलो तरी सैद्धांतिक प्रश्नाबाबत ते ज्या पद्धतीनें बोर्डाच्या सभासदावर हिटलरशाही चालवितात ती पद्धति कोठल्याहि लोकशाही संस्थेंत निभूं शकणारी नाहीं.

रजिस्ट्रार गोडबोले प्रकरणाची चौकशी

रजिस्ट्रार गोडबोल्यांचाच दाखला घ्या. या गृहस्थाच्या विरुद्ध १९४८ च्या बोर्ड निवडणुकींत पोलिस केस करण्यांत आली हें सर्वांना माहित आहे. त्यांच्या नशिबानें त्यांच्या विरुद्ध पुरावा सिद्ध होऊं शकला नाहीं व बोर्डात पुन: ठेवण्याबद्दल त्यांनीं अर्ज केला. मुंबई सरकारचें असें एक म्हणणें आहे कीं कोणी व्यक्ति कोर्टांत सुटली तरी तेवढ्यावरून तीं पूर्ण निर्दोष आहे. असें मानणें युक्त नाहीं. त्यांच्या विरुद्ध खात्यातर्फे तपास करतां येतो. निवडणुकीच्या बाबतींत खरी हकीकत काय घडली हें जाणण्यासाठीं आम्ही खात्यातर्फे चौकशी करण्याची मागणी केली.

डॉ. योध यांचा अनुभव

दुसऱ्या एका प्रकरणांत एका पैशासंबंधींच्या शंकास्पद व्यवहारांत गोडबोले यांनीं दिलेला खुलासा समाधानकारक नव्हता हे खुद्द डॉ. योध यांनींच कबूल केलें होतें. असें असूनहि सरकारनें खात्यातर्फे तपास करण्याबाबत कोणत्याहि प्रकारचें साहाय्य देण्यास बोर्डाला नकार दिला. हा तपास बोर्डानें स्वत:हि केला असता. पण कायदाविष्णात लोकांनीं या तपासाला संमति दिली नाहीं शेवटीं बोर्डाच्या कचेरींत ऑगस्ट १९४८ पूर्वीं चालू असलेल्या गैर कारभारा (इन् एफिशिएन्सी) बद्दल गोडबोले यांनीं क्षमा मागावी व मग त्यांना नोकरीवर परत घ्यावें असें ठरलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अध्यक्षांनीं वचनाचें पालन केलें नाहीं

आम्हीं यावेळीं एकच अट घातली होती कीं गोडबोले यांची पुन: नेमणूक करतांना व त्यांना कामाचा चार्ज देतांना आम्हां सर्वांना हजर ठेवावें व सहकार्याच्या वातावरणांत हें काम व्हावें. यासंबंधीचें खास वचन देणाऱ्या अध्यक्षांनींच त्याचें पालन जाणूनबुजून केलें नाहीं. आणि "घाईनें कोणाला सांगू शकलो नाहीं." असा बहाणा करून त्यांनीं आमची क्षमा मागितली. त्यावेळीं आम्हांस त्यांचा खुलासा खरा वाटला पण गोडबोल्यांच्या नेमणुकीनंतर त्यांचें वर्तन व वळण पाहतां त्यांनीं हें वचन मुद्दामच पाळलें नाहीं असें माझें मत बनलें आहे.

बोर्डांत पुन: प्रकरणें सुरूं झालीं

काकतालीय न्यायानें गोडबोले पुन: बोर्डांत आल्यापासून प्रकरणें सुरूं झालीं. एका स्त्री कारकुनाचा अपमान झाला व ती गोष्ट थेट मुंबई विधिमंडळापर्यंत गेली. आम्ही याबाबत लेखी व टेलिफोन द्वारा खुलासा मागितला. प्रथम अध्यक्षांनीं आम्हांस असें आश्वासन दिलें कीं या प्रश्नाची चर्चा बोर्डाच्या कार्यकारी मंडळाच्या सभेंत करूं पण मागाहून तसें करण्याला नकार दिला व आम्हांस सांगितलें कीं "या गोष्टींत पडण्याचा तुम्हांला अधिकार नाहीं."

६ सभासदांचा सभात्याग

त्याचा परिणाम असा झाला कीं १२।९।१९५२ च्या एक्झिक्युटिक कमिटीच्या सभेंत आम्ही सर्वच्या सर्व ६ सभासदांनीं सभात्याग केला. पण अध्यक्ष स्वत:च्या जागीं हट्टानें राहिले. सामान्य खुलासा सुद्धां करण्यास त्यांनीं नकार दिला. गोडबोले यांना पगार वैद्य हकीम देतात. त्यांचा पगार चालू रहावा म्हणून ५ रु. ची रिन्यूअल फी आपण भरीत आहोत. पण त्यांच्या वर्तणुकीबाबत विचार करण्याला आम्हांस अधिकार नाहीं असें विचित्र म्हणणें डॉ. योध यांचें आहे.

डॉ. योध यांचा अर्थशून्य निर्णय

डॉ. योध हे सरकारनियुक्त अध्यक्ष खरे पण त्यांना या बोर्डाला एक दिडकी पण द्यावी लागत नाहीं. उलट प्रत्येक सभेला हजर राहण्याची फी म्हणून ते १५ रु. बोर्डाकडून घेतात. ज्या गोष्टीची चर्चा मुंबईच्या कायदेमंडळांत होऊं शकते ती गोष्ट ज्या बोर्डाच्या ऑफीसमध्यें घडली असें म्हणतात तेथें त्या गोष्टीची चर्चा होऊं शकत नाहीं अशाप्रकारचा अर्थशून्य निर्णय माझ्या गुरूंनीं दिला आहे. असा निर्णय देण्याची प्रेरणा त्यांना कोणी दिली असेल बरें? —अपूर्ण

दंतवैद्यशास्त्राचा अभ्यास

१५ एप्रिल १९५३ पासून सुरूं होणार

ज्यांचीं नांवें डेन्टिस्टस् ॲक्टाखालील डेन्टिस्ट रजिस्टरच्या भाग (तात्पुरते) मध्यें असतील अशा इसमांना त्याच कायद्याखालील डेन्टिस्ट रजिस्टर भाग (कायम) मध्यें नांवें दाखल करून घेण्यासाठीं १ परीक्षा द्यावी लागते. या परीक्षेची तयारी करून घेण्यासाठीं मुंबईच्या सर सी. ई. एम्. डेंटल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटलमध्यें एक ट्रेनिंग कोर्स सुरूं करण्यांत येत आहे. सदरहू कोर्स येत्या १५ एप्रिलपासून सुरूं होणार असून तो ६ महिने चालेल.

तो वर्ग सर्वांना खुला आहे

भारतांत अशा प्रकारचा हा एकमेव ट्रेनिंग कोर्स असून देशांतील कोणत्याहि ठिकाणच्या उमेदवारास तो खुला आहे. ज्यांची हा कोर्स घ्यावयाची इच्छा असेल त्यांनीं ठराविक फॉर्मवर अर्ज करावा लागेल. हा फॉर्म व कोर्स संबंधींची इतर माहिती प्रिन्सिपाल सर सी. ई. एम्. डेन्टल कॉलेज, भायखळा, मुंबई नं. ८ यांच्याकडे मिळूं शकेल. मात्र अर्जासोबत स्वत:चा पत्ता लिहिलेलें मोठें पाकीट व पुरेसें पोस्ट हशील पाठविलें पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार —

कारखान्यासाठीं सरकारी परवाना ?

आयुर्वेदीय औषधें तयार करून विकण्याचा आमचा विचार आहे. तरी ती तयार करण्यास व विकण्यास लायसेन्स लागतात काय ?

भस्में, रस, गोळ्या, आसवें, अरिष्टें, चूर्णे वगैरे कांहीं औषधें विषयुक्त असतात. कांहीं औषधांत भांग, अफू असते. तरी या व इतर औषधांना सुद्धां तयार करून विकण्यास परवान्याची जरूर आहे काय ? — एक वैद्य

विषयुक्त औषधें तयार करावयाचीं असल्यास विषें (पारा, गंधक, बचनाग इ.) बाळगण्याचा परवाना काढावा लागतो. तो मामलेदारसाहेब अगर कलेक्टरसाहेब यांचेकडे अर्ज केला असतां मिळतो.

भांग, अफूयुक्त औषधांसाठीं त्याचा परवाना काढावा लागतो. त्याशिवाय भांग, अफू मिळत नाहीं व त्यासाठीं एक्साईज ऑफिसर यांचेकडे अर्ज करावा लागतो.

अनियंत्रित आसवारिष्टें तयार करून विकण्यासाठीं परवाना काढावा लागतो. तो एक्साईज ऑफिसकडून मिळतो.

नियंत्रित आसवारिष्टें तयार करावयाचीं असल्यास तीं एक्साईज खात्याच्या देखरेखीखालीं करावीं लागतात. त्यासाठीं त्याचा विशेष खर्च भरावा लागतो.

पाळीव जनावरांना भस्में !

आयुर्वेदानें प्रकृतिस्वास्थ्यासाठीं आतपसेवन, मारुतसेवन आवश्यक सांगितलें आहे. आपण सावलींत वावरतो, अन्नपाणी भरपूर सेवन करतो, पण आरोग्याचे नियम न पाळल्यानें अशक्त व रोगट बनतो.

आपल्यापैकीं कांहींजण आपल्या घरीं करमणुकीसाठीं वा उपयुक्त म्हणून कुत्रा, मांजर, पोपट, कबुतर, शेळी इत्यादि लहान प्राणी हौसेनें पाळतात. त्यांनाहि योग्य अन्न, हवा, पाणी, व्यायाम न मिळाल्यामुळें आपल्याप्रमाणेंच तेहि रोगट व अशक्त बनतात.

गृहस्थ मनुष्याप्रमाणेंच गृहस्थ अशक्त रोगट जनावरेंहि त्यांना अभ्रकभस्म, सुवर्णभस्म, ताम्रभस्म हीं दिलीं असतां लवकर सुधारतात असा डॉ. के. भा. लेले यांचा अनुभव आहे व यासंबंधीं अधिक प्रयोग ते करीत आहेत असें कळतें. या औषधानें लहान मुलेंहि सुधारतात.

८ ते १२ पौंड वजनाच्या प्राण्याला १ महिनाभर पुरेल इतकें वरील औषध प्रयोगादाखल ते फुकट पाठविणार आहेत. औषध व टपालखर्च मिळून ४ आणे त्यांना पुढील पत्यावर पाठवावेत असें त्यांनीं कळविलें आहे. त्यांचा पत्ताः— शालिमार लॉज, नागपूर २. असा आहे.

हैद्राबादेंत दंतयज्ञ

कॉंग्रेसच्या आधीं हैद्राबाद शहरांत ७ दिवस दंतयज्ञ झाला. स्वामी रामानंदतीर्थ यांनीं दि. ७ जानेवारी रोजीं त्याचें उद्घाटन केलें. तेथें ७५० दंतोत्पाटनें झालीं. त्यानंतर १४ पासून १९ पर्यंत कॉंग्रेसच्या नानलनगरमध्यें दंतयज्ञ झाला. त्याचें उद्घाटन सौ. डॉ. शांताबाई किर्लोस्कर, अध्यक्ष हैद्राबाद स्टेट मेडिकल असोसिएशन यांनीं केलें. प्रास्ताविक परिचय डॉ. नाईक सिव्हिल सर्जन, सेक्रेटरी है. मे. असोसिएशन यांनीं केलें. अनेक फॉरेन् रिटर्न्ड डॉक्टर्स व कॉंग्रेसश्रेष्ठींनीं दंतयज्ञास भेट दिली. यू. पी. चे स्पीकर हरगोविंद वल्लभ बी. ए. एलएल्. बी. यांनीं भेट दिली. तसेंच दि. १९ रोजीं डॉ. मेळकोट जी. एस्. अर्थमंत्री यांनीं दंतयज्ञ पाहून समाधान व्यक्त केलें. त्यांच्यासमवेत हिंदुस्थानी सेवादल संस्थापक डॉ. हर्डीकर यांनींहि भेट दिली. सदर यज्ञांत ५५० दंतोत्पाटनें झालीं. — पा. वि. जायदे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वातहर-तेलाच्या चोथ्याचा उपयोग

(लेखकः- भिषग्रत्न ग. कृ. पाटणकर)

वैद्यराज ग. नी. **पटवर्धन** यांनीं १६ डिसेंबर १९५२ च्या आयुर्वेदपत्रिकेंत पान ४०० वर 'सिद्धतेलाचा चोथा' या मथळ्याखालीं पृच्छा केली आहे. सदर संबंधीं माहिती पुढें नमूद करीत आहे:—

कै. **श्यामसुंदराचार्य** हे काशी येथील रस-शाळेचे चालक होते. त्यांनीं हिंदींत **रसायनसार** या ग्रंथाचे पांच भाग (स्वतः संस्कृत श्लोक तयार करून हस्तलिखित प्रति तयार करून ठेविल्या होत्या. १९१५ सालीं त्या छापण्याचे ते ठरवित आहेत, तोंवर त्यांना स्वतःला गृध्रसी या विकारानें पछाडलें. कसावसा एक भाग छापून प्रसिद्ध झाला. विकाराचा जोर अधिक झाला, सर्व देशी विदेशी औषधी-उपाय व इंजेक्शन्स झालीं.

कट्फल तेलाचा प्रयोग

या सर्व क्रियेनें विकाराचा अुपशम न झाल्यामुळें ते निराश झाले व आपोआप मरण आलें तर बरें अशा मनाच्या स्थितींत ते आहेत इतक्यांत त्यांचे स्नेही नेपाळ सरकारचे राजवैद्य श्री पुरुषोत्तमदास महंत हे त्याजकडे आले व कट्फल (कायफळ) याचे तेल, अर्क, घृत व चोथा याचे मदतीनें श्यामसुंदराचार्य यांना त्यांनीं अल्पावधींत बरें केलें.

१९१५ सालीं पुण्याचें वैद्यकपत्रिकेंत स्वतः श्यामसुंदराचार्य यांनीं आपला विकार व त्याचा झालेला अुपशम यासंबंधीं माहिती प्रसिद्ध केली आहे. वाचक व पृच्छक या सर्वांच्या माहितीकरितां कायफळाची विशेष माहिती देऊन त्याचें तेल, घृत, अर्क व चोथा यांचा अुपयोग करण्याची क्रिया कळवीत आहे.

कायफळाच्या सालीचा उपयोग

कायफळ— या फळाचें वृक्षाची अुत्पत्ति मध्य हिमालयावर, ब्रह्मदेशांत तसेच रावी नदीच्या पूर्वेस आणि चीन, जपान, सिंगापूर या बेटांत होते. नेपाळांतील काटमांडू शहरांत हीं फळें विकण्यास येतात. यास नेपाळी लोक **काफल** म्हणतात. याचा स्वाद आंबटगोड असल्यामुळें खाण्यास बरीं लागतात. कायफळाचे सालीचा अुपयोग कातडी रंगविण्यास सिमल्याकडील चांभार करितात. **मिरिस्टिकामलबारिका** नांवाचें वृक्षाचें फळ **कायफळासारखें** पण थोडे लांबट व मोठें असते. याचे तेलाचा **संधिवात** व **व्रण** यावर अुपयोग केला जातो. या फळासहि कांहीं सदृशपणामुळें कायफळ म्हणतात.

कायफळाच्या सालींतील गुणधर्म

हिमालयावर होणारे कायफळाचें सालींत खालील गुण स्पष्ट दिसून येतात. याचीं फळें लंबगोल असून फळाचा रंग तांबडा असतो. फळाची साल कंटकयुक्त असते. फळांत औषधी गुणधर्म नसून तें **फळाचे सालींत** आहेत. पाटणा, मोंघीर-कडून ही साल मुंबईस विकण्यास येते.

गुणधर्म— कट्फलः कफवातघ्नो गुल्ममेहाग्नि-दाहजित् । रुचिष्योज्वरदुर्नामग्रहणीपांडुरोगजित् ॥ कट्फलादिचूर्ण क्षयांतील कफ कमी करण्याकरितां देतात. या फळाचे सालीचें चूर्णाचें ज्वरांत मर्दन केलें असतां हातपायास चांगलाच उबारा येतो. याचे सालींत मुख्यतः टॅनिक अम्ल, ग्लुको साखर, राख वगैरे रासायनिक परीक्षणांत सांपडतात.

अुपयोग— कै. श्यामसुंदराचार्यांनीं या अुपायानें बरें वाटल्यावर त्याचे अुपयोगासंबंधीं श्लोक रचिला तो असा—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वातव्याधितमानुषो व्यवहरेत् संमर्दनं कटफलै ।
स्तैलं सार्षपमल्पवान्हिकाऽकापक्कं घृतं चाशने ॥
तत् किट्टोद्भवपोटलीजनितया तप्त्या च सह्यातपं ।
चैरंडोद्भवतैलतोभ्यवहरेत् योगेश्वरं गुग्गुलुम् ॥

क्रिया— **अर्धा** शेर कायफळाची **साल** घेऊन ती कुटून **चाळणींतून** गाळून घ्यावी. नंतर **कटुतेल** डबल जॅकेटेड कढईमध्यें घालून चुलीवर **ठेवून मंद आच** लावावी, व त्यांत एकएक तोळा चूर्ण थोडथोड्या वेळानें टाकीत जाऊन ४ प्रहरपर्यंत चुलीवर ठेवून पूर्णपणें पचवावें – या तेलाची क्रिया चुलीवर चालू असतां यांतच **२ ते ३** तोळे **अफू** घालावी – याचा उपयोग अधिक चांगला होतो. [डबल जॅकेटेड कढया उद्यम इंजिनियरिंग वर्क्स, **कर्वे** रोड (एरंडवणें) पुणें हे करून देतील.]

तेल कढत असतां पेटूं नये एवढ्याकारितां डबल जॅकेटेड कढई कीं त्याचे बुडाचें २ भागामध्यें वाळू व ॲसबेसस्टास घातला आहे अशी करून घेणें योग्य होय. लोखंडी पत्र्यापेक्षां स्टेनलेसस्टील उत्तम. तेलाची चूर्णासह पचनक्रिया चांगली झाल्या-वर व साधारण थंड झाल्यावर फडक्यावर गाळून तें तेल **चिनी मातीच्या** बरणींत ठेवावें. चोथा हातानें दाबून निघेल तेवढें तेल पुनः फडक्यावर गाळून बरणींत घालावें. **चोथा न फेकतां मोठ्या तोंडाच्या चिनीमातीच्या बरणींत ठेवून झांकण घालावें.**

सदर तेल नोकराचे हात वरचेवर विस्तवावर ऊन करून या तेलानें गृध्रसीनें जखडलेल्या भागास २ तास बेताबेतानें **मर्दन** करावें. नंतर वरील चोथा पुन्हः कढईत वरचेवर हलवून चांगला ऊन करून तो **फडक्यांत** घालून तो भाग शेकून काढावा व **चोथा अधिक त्रास देणाऱ्या भागावर बांधावा.** तो गार होतांच काढून पुन्हः ती क्रिया करण्याकरितां बरणींत घालावा. तेल **लावलेला** व **शेकलेला** भाग उबदार कापडांत ठेवावा. वातहारी–तेलांतील **चोथ्याचा उपयोग कळावा तो टाकला जाऊं नये व तो प्रेसमध्यें दाबण्याचे प्रयोजन पडूं नये म्हणून वरील क्रिया कल्पिली आहे.**

कायफळ घृताचा प्रयोग

घृत– चार शेर पाण्यांत अर्धाशेर कायफळ चूर्ण घालून चुलीवर ठेवून २ शेर पाणी उरवावें. नंतर काढा गाळून घेऊन तो २ शेर तुपांत घालून तूप राहीपर्यंत आटवून तूप गाळून घ्यावें. तें तूप सकाळ संध्याकाळ प्रतिवेळीं निदान २ तोळें तरी खाण्यास द्यावें.

या घृताची चव व गंध कांहीं रोग्यांना आवडत नाहीं. अशा रोग्यांना याचा निदान ३ कान्सेन्ट्रेशनचा अधोर्ध्वगति अर्क द्यावा. अर्क काढतांना त्याला वातहर सुगंधी पुष्पाची अगर वनस्पतींची छाया द्यावी म्हणजे रोग्यास न पटणारा गंध त्या अर्कास येणार नाहीं. हा अर्क प्रतिवेळीं १ ते १ औंस घेणेचा असून त्याबरोबर शामसुंदराचार्यांनी योगराज गुग्गुळाची एक क्रिया दिली आहे त्याप्रमाणें करून तो या अर्काबरोबर किंवा घृताबरोबर घेण्याचे त्यानीं एका **लेखांत** सुचविलें आहे.

ही सर्व क्रिया योग्य रीतीनें चालू केल्यावर कै. शामसुंदराचार्य आपल्या लेखांत गुणासंबंधीं म्हणतात- "तीन दिनमेंहि चमत्कार दिख पडता है" विकाराचें मानानें महिना १॥ महिना ही क्रिया चालू ठेवावी लागते.

डॉक्टरचें नांव रजिस्टरमधून कमी

१९५२ च्या मुंबई मेडिकल कायद्याच्या ... व्या कलमाच्या पोटकलम [२] अन्वयें डॉ. एम्. ... भाटिया यांचें नांव मुंबई मेडिकल रजिस्टरमधून कमी करण्यांत आलें असल्याचें मुंबई मेडिकल कौन्सिलच्या रजिस्ट्रारनीं जाहीर केलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

-: वैद्य प्रतापकुमार यांचे १० ठराव :-

आयुर्वेद व युनानी वैद्यक बोर्डाच्या येत्या सर्व साधारण सभेंत मांडण्यासाठीं बोर्डाचे सदस्य वैद्य प्रतापकुमार यांनीं कांहीं ठराव अध्यक्षांकडे पाठविले आहेत, त्यांचा सारांश असा–

ठराव १ ला– बोनसेटर्स (अस्थि संधानक) मलमपट्टीवाले आणि असेच दुसरे वैद्यक उपचार-विषयक व्यवसाय करणारे लोक ज्यांचे दवाखाने आहेव व त्यांच्याकडून लोक उपचार करून घेतात, यांना वैद्यकीय व्यावसायिकच समजण्यांत यावे व त्यांना १९३८ चा मुं. वै. व्यावसायिक कायदा, कलम ३१ ची १ व २ ही कलमें लागू करावीत व त्यांचे अर्ज त्याप्रमाणें निकालांत काढावेत अशी विनंति रजिस्ट्रेशन ट्रिब्यूनलला करावी.

ठराव २ रा– आयुर्वेद, सिद्ध व युनानी या वैद्यकांचा अभ्यास वाढावा व या चिकित्सा पद्धतींचा प्रसार व्हावा व भरभराटीस याव्यात या उद्देशानें १९३८ चा मुम्बई वैद्यक व्यावसायिक कायदा व त्याला जोडलेल्या पुरवण्या मंजूर करण्यांत आल्या होत्या. हा उद्देश सफल झाला नाहीं असे या बोर्डाचे विचारांतीं मत बनलें आहे. सबब त्या कायद्यांतील २ पासून ३७ पर्यंतचीं कलमें गाळून टाकण्यांत यावींत.

ठराव ३ रा— बोर्डाच्या सध्यांच्या सभासदांपैकीं एखाद्यानें बोर्डाच्या कामकाजासंबंधीं कोणतीहि आवश्यक माहिती मागितल्यास ती बोर्डाच्या अध्यक्षांची परवानगी घेतल्याशिवाय रजिस्ट्रार देऊं शकत नाहीं असें बोर्डाच्या सध्यांच्या रजिस्ट्रारनें सभासदांना लेखी कळविलें आहे. हें विधान बोर्डाच्या सर्वसाधारण सभेस अमान्य आहे. कारण १९३८ च्या कायद्याच्या १४ व्या कलमाप्रमाणें रजिस्ट्रार हा बोर्डाचा नोकर आहे. वैयक्तिक अध्यक्षांचा नाहीं. जर, चालू रजिस्ट्रार आपलें वरील मत बदलण्यास तयार नसेल तर त्यानें बोर्डाच्या कामाचा राजीनामा द्यावा अशी मागणी हें बोर्ड करीत आहे.

ठराव ४ था-- ता. १२।९।५२ च्या बोर्डाच्या कार्यकारी मंडळाच्या सभेंत बोर्डाच्या अध्यक्षांनीं असें विधान केलें कीं रजिस्ट्रार विरुद्ध बोर्डांतील अन्य कारकुन आदि नोकरांनीं जर कांहीं तक्रार केली तर त्याचा विचार करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला नाहीं. हें म्हणणें बोर्डाला मान्य नाहीं. कार्यकारी मंडळाला या तक्रारींचा विचार करण्याचा व त्या बाबत योग्य व न्याय्य निर्णय घेण्याचा अधिकार आहे असें बोर्डाचें मत आहे.

ठराव ५ वा– बोर्डाचे कामकाज व बोर्डाच्या ऑफिसचे कामकाज असें प्रकार पाडण्याची आवश्यकता बोर्डाला वाटत नाहीं. बोर्डाच्या अध्यक्षांनीं असे भेद केले आहेत. त्या दोनहि प्रकारच्या कामकाजाबाबत माहिती घेण्याचा, विचार करण्याचा, त्याबद्दल मत बनविण्याचा व तदनुसार निर्णय देण्याचा अधिकार बोर्डास आहे असें या बोर्डाचें मत आहे.

ठराव ६ वा– ता. १५ व २२ मे १९५२ रोजीं कुमारी फडणीस या स्त्री कारकुनानें जे तक्रार-पत्र अध्यक्षाकडे पाठविलें आहे व त्यावर रजिस्ट्रारनें जो खुलासा दिला आहे त्याचा विचार बोर्डाची ही सभा करूं इच्छिते.

ठराव ७ वा– विचारांतीं या बोर्डाचे असें मत झालें आहे कीं १९३८ च्या वैद्यक व्यावसायिकांच्या कायद्याच्या १८ व्या कलमाप्रमाणें जे लोक एन्लिस्ट केले गेले आहेत, त्यांना जन्म, मृत्यूसंबंधीं दाखले, तसेच कायद्यानें आवश्यक असणारा आजारीपणाचा अगर तन्दुरुस्तीचा दाखला देण्यास परवानगी असावी. सरकारनें याबाबतींत जरूर तें पाऊल टाकावें अशी या बोर्डाची सरकारला विनंति आहे.

ठराव ८ वा-- १९३८ च्या वैद्यक व्यावसायिकांच्या कायद्यांतील कलम ३७ प्रमाणें जे लोक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खेड्यांत व्यवसाय करीत असतील त्यांचीं नांवें बोर्डात एका वहींत (कॅटलॉग) लिहून ठेवण्याची व्यवस्था करावी कीं काय या प्रश्नाचा विचार कर-यासाठीं (१) अध्यक्ष (२) प्रतापकुमार (३) १ सभासद अशा तिघांची एक समिति नेमावी. बोर्डाच्या रजिस्ट्रारनें या समितीच्या सेक्रेटरीचें काम करावें. ३० जून १९५३ च्या पूर्वी या संबंधींचा रिपोर्ट यावा.

ठराव ९ वा-- भारत सरकारनें नेमलेल्या प्रेस कमिशनला या बोर्डाची अशी आग्रहाची विनंति आहे कीं, (१) वैद्यकीय व अश्लील प्रकारच्या जाहिराती, (२) एखाद्या रोगावर रामबाण औषध सुचविणाऱ्या जाहिराती, (३) राज्यांत ज्या वैद्यांना राजमान्यता आहेत त्या खेरीजच्या इतर वैद्यांच्या जाहिराती, (४) आणि अशाच प्रकारच्या इतर सदोष अगर समाजाला घातक जाहिराती, तसेंच (५) आरोग्याच्या सल्याच्या नांवाखालीं जनतेंत वैद्यकीय वस्तूंचा प्रचार करणारे लेख. या सर्वांना बंदी घालावी.

या बाबतींत प्रेसकमिशनकडे योग्य त्या सर्व गोष्टी मांडण्यासाठीं ३ जणांची एक समिति नेमली आहे. अध्यक्ष, प्रतापकुमार, १ सभासद, रजिस्ट्रार सेक्रेटरी. ही समिति जरूर त्या सर्व गोष्टी करील,

ठराव १० वा- मुम्बईत भारतसरकारनें मुम्बई सरकारच्या सहकार्यानें गिरणीकामगार व मजूर यांच्या आजारीपणाच्या विम्याची जी योजना सुरू केली आहे त्यांत १९३८ च्या कायद्याखालीं नोंदलेल्या वै. व्यावसायिकांत योग्य हिस्सा दिली जावा अशी या बोर्डाची मुम्बई सरकारला विनंति आहे.

डॉक्टरच्या फी बद्दल कायदा

डॉक्टर लोक जनतेकडून जबर फी वसूल करून जनतेची नागवणूक करतात. हा अनुभव सर्वत्र आहे. या व्यवहारास आळा घालावा या उद्देशानें डॉक्टरनें जास्तीत जास्त किती फी रोग्याकडून घ्यावी हें ठरविणारा कायदा करण्याचें बिहार राज्य सरकारनें ठरविलें आहे.

गांवठी वैद्यावर धंदेवाईक कर

जिल्हा लोकल बोर्ड नाशिकनें धंद्यावर कर विला आहे व त्या संबंधींचे नियम १९३३ छापून प्रसिद्ध केलेले आहेत. त्यांत गट नंबर ३ कराव पात्र असलेल्या इसमांची वर्गवारी दिली कायदेपंडित, वैद्यकीय व्यवसायी, एंजिनिअर, कॉन्ट्रॅक्टर, सुतार, लोहार हे सर्व या वर्गांत मोडतात.

वैद्यकीय व्यावसायिकांपैकीं रजिस्टर्ड मेडि प्रॅक्टेशनर यांना कराची रक्कम १० रुपये असून रजिस्टर्ड नसलेले हकीम व गांवठी वैद्य यांना ५ कराचा दर आहे.

महाराष्ट प्रांतीय वैद्य मंडळाचे मंत्री वैद्य म, गोगटे यांनीं लोकलबोर्डांकडे पत्र पाठवून 'गांवठी वैद्य' या शब्दप्रयोगाबाबत खुलासा मागविला है.

बोर्डाचे चीफ ऑफिसरनीं नियमांची छापील प्रत पहाण्यासाठीं पाठविली असून गांवठी वैद्य शब्द 'नेटिव्ह फिजीशिअन' या शब्दाचें भाषांतर असें कळविलें आहे.

निमदुष्काळी भागांत फिरती हॉस्पि

मुंबई राज्यांतील निमदुष्काळी भागास औषधांचा व जंतुनाशक औषधांचा पुरेसा पुरवठा ण्याची उपाययोजना करण्यांत आली असून सार्वजनिक आरोग्य खात्याचा नोकरवर्ग तेथील लोकांच्या आरोग्याची काळजी घेत आहे व सांथीच्या रोगप्रातिबंधक उपाययोजना करीत आहे. तसेंच पूर, अहमदनगर आणि पश्चिम खान्देश जिल्ह्यांतील निमदुष्काळी कामावरील कामगारांसाठीं हॉस्पिटल पथकांतील ३ असिस्टंट मेडिकल सरांची नेमणूक करण्यांत आली आहे. अधिकाऱ्यांना मदत करण्यासाठीं ३ नर्स नेमल्या आहेत. याखेरीज निमदुष्काळी खास ४ मेडिकल अधिकाऱ्यांची नेमणूक आली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संस्थानी वैद्यांवर अन्याय

मुंबई सरकारनें ता. २६-११-५१ रोजीं एक पत्रक काढून त्यामध्यें डी. ए. एस. एफ. आयुर्वेदविशारद पदवी असलेल्या वैद्यांना ॲलोपॅथीच्या तिसऱ्या वर्गाच्या दवाखान्यावर वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमावें अशी आज्ञा केली आहे. त्यांत त्यापूर्वीच्या पदवीधराबद्दल उल्लेख नाहीं.

अद्याप संस्थानी पगार चालू

मी सातारा आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाचा १९३६ चा पदवीधर जी. ए. एम्. एस. आयुर्वेद विशारद आहे. त्याच साली मी ××××संस्थानात वैद्यकीय खात्यांत नोकरीस लागलो. व आजतागायत त्या नोकरींत आहे. १९४८ सालीं संस्थानें विलीन झाली, त्यावेळीं आमच्या नोकऱ्या मुंबई सरकारकडे वर्ग झाल्या. आमच्यापैकीं जे ॲलोपॅथीचे पदवीधर डॉक्टर, कांपौंडर, नर्स वगैरे होते त्यांना मुंबई सरकारच्या नियमास अनुसरून पगार वगैरे देऊन कायम केलें गेले; मात्र आयुर्वेदीय दवाखान्याकडील वैद्य वगैरे नोकरांना कायम केलें नाहीं व पगार वाढहि दिली नाहीं. अद्याप आमच्या बाबतींत जुनें संस्थानी स्केलच चालू आहे.

दाद लागत नाहीं

आम्ही सर्जन जनरलकडे अर्ज करून त्यावर या बाबत विचारणा केली; त्यावर वैद्यांचे पगाराबाबत काम सरकारकडे पाठविलें आहे, लिहून आल्यावर कळवू असें उत्तर आलें आहे. याला आतां ४ वर्षे होत आली आहेत, अद्याप कांहींच दाद लागत नाहीं.

पदव्यांत अन्तर नाहीं

डी. ए. एस्. एफ्. वैद्यांचा पगार ठरला आहे. आम्ही डी. ए. एस्. एफ्. नाहीं, हा आमचा दोष नाहीं. आमच्यावेळीं ती परीक्षाच नव्हती. आमची पदवी व डी. ए. एस्. एफ्. यांत काय अंतर आहे? तें तरी फॅकल्टी अगर बोर्ड यांनीं जाहीर करावें. तेथेंहि साताऱ्याच्या महाविद्यालयाचे पदवीधर सभासद असतीलच. सरकारनें अगर फॅकल्टीनें नगर, पुणें, सातारा यांच्या मागील पदव्या या डी. ए. एस्. एफ्. बरोबरीच्या आहेत असें जाहीर करावयास पाहिजे. महाराष्ट्र, तसेंच कर्नाटक व गुजरात प्रांतीय वैद्य संमेलनांत यासंबंधीं ठराव होणें अवश्य आहे.

—एक माजी संस्थानी पदवीधर वैद्य

धात्रीलोहाचा पाठ

आयुर्वेद पत्रिकेच्या १६ जानेवारीच्या अंकांत बेटे रुग्णालयाची हकीकत प्रसिद्ध झाली. त्यांत धात्रीलोहाचा उल्लेख आला आहे. तो वाचून अनेकांनीं धात्रीलोहाचा पाठ काय अशी विचारणा केली आहे.

भैषज्यरत्नावली अनुभविक औषधें

धात्रीलोह या औषधाचा मूळपाठ भैषज्यरत्नावलींत आहे. आयुर्वेद सेवा संघानें प्रसिद्ध केलेल्या अनुभविक औषधें या पुस्तकांत पान ६७ वर शूल-चिकित्सा प्रकरणांत हें औषध प्रथम दिलें आहे. या औषधाचीं घटक द्रव्यें, कृति, देण्याचें प्रमाण अनुपान इत्यादि माहिती पुढीलप्रमाणें आहे.

घटकः- आवळे ३२ तोळे, लोहभस्म १६ तोळे, ज्येष्ठमध ८ तोळे, गुळवेलीच्या रसाच्या ७ भावना.

चांगले पिकलेलें आंवळे दगडानें ठेचून त्यांतील बिया काढून टाकाव्या. नंतर ते सावलींत वाळवावे व त्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करावें. असें तयार केलेलें चूर्ण ३२ तोळे, व लोहभस्म १६ तोळे, चाकूनें वरील त्वचा खरवडून काढलेल्या जेष्टमधाचें चूर्ण ८ तोळे, हीं द्रव्यें घ्यावीं.

हीं सर्व द्रव्यें एकत्र मिश्र करून त्यांचा गुळवेलीच्या स्वरसांत ७ दिवस खल करावा व कडक उन्हांत वाळवून वस्त्रगाळ चूर्ण बाटलींत भरून ठेवावें.

धात्रीलोह देण्याचें प्रमाण व अनुपानः-

५ ते १० गुंजा. धात्रीलोह, मध व तूप या अनुपानाबरोबर द्यावा.

परिणामशूल व आम्लपित्त

धात्रीलोह देण्याचा काल व उपयोगः-

धात्रीलोह जेवणापूर्वी सेवन केला असता

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पित्ताचे व वाताचे रोग शमतात. जेवणाच्या मध्यें सेवन केला असतां बद्धकोष्ठ व अन्नाचा विदाह हे विकार दूर होतात. व जेवणानंतर सेवन केला असतां परिणामशूळ दूर होतो.

परिणामशूळ व आम्लपित्त या विकारावर हा योग उत्तम आहे.

छोटें औषधालय व परिचर्या शिक्षण

ता. १६ फेब्रुवारीपासून मुंबई येथें सुरू होणाऱ्या मुंबई वरिष्ठ विधिमंडळ (कौंसिल) च्या सभेंत डॉ. एस. के. गाळवणकर एम्. एल. सी. हे पुढील ठराव मांडणार आहेत.

"खेड्यांतील गरीब जनतेला वैद्यकीय मदत व सल्ला सहज मिळावा यासाठीं हें विधिमंडळ मुंबई सरकारला अशी शिफारस करतें कीं प्राथमिक शाळांतील शिक्षकांच्या ट्रेनिंग कॉलेजमध्यें आवश्यक विषय म्हणून टेबल डिस्पेन्सरी व नर्सिंग समाविष्ट करावे व त्यासाठीं योग्य असा अभ्यासक्रम निश्चित करावा."

आयुर्वेद पत्रिकेनें आतांपर्यंत प्रकाशित केलेले

१ प्राणाचार्य देवधर विशेषांक किं. १ रु.
२ प्राणाचार्य ऐनापुरे विशेषांक ,, १ रु.
३ वैद्यतीर्थ आप्पाशास्त्री साठे विशेषांक ,, १ रु.
४ वैद्यरत्न त्र्यंबकशास्त्री विशेषांक ,, १ रु.

हे चार विशेषांक प्रत्येक वैद्यानें आपल्या संग्रहीं अवश्य ठेवावेत. आपल्या संग्रहीं नसल्यास आजच ॲडव्हान्स पाठवून मागणी करा. (ट. ख. वेगळा.)

फारच थोड्या प्रति शिल्लक आहेत. मागाहून मिळणार नाहींत.

वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

टाइम्सचा अग्रलेख 'दुर्लक्षित शास्

ता. २८ जानेवारी १९५३ रोजीं मुंबई येथें 'टाइम्स ऑफ इंडिया' या सुप्रसिद्ध इंग्रजी वृत्तपत्रा अग्रलेख लिहून आयुर्वेदासंबंधींचे आपले विचार स शब्दांत मांडले याबद्दल प्रत्येक आयुर्वेदप्रे संपादकांचें मनःपूर्वक अभिनंदनच करील.

विशेष महत्वपूर्ण गोष्ट

आयुर्वेद हें शास्त्र नव्हे, असें मानणारा व इंग्रजी शिक्षणानें निर्माण झाला आहे. त्यामुळें ज कांहीं आजारीपण आलें कीं त्यावर शास्त्रशुद्ध इला म्हणून ॲलोपॅथीकडे पळण्याची वृत्ति सर्वत्र बळाव आहे. ॲलोपॅथीची चिकित्सा मूलग्राही नसली त तात्पुरतेच गुण म्हणूनहि अनेकांचे डोळे दिपले आहेत. अशा काळांत टाइम्सनें 'शास्त्र' म्हणून आयु वेंदाचा गौरवपूर्ण उल्लेख करणें व शिक्षित जनते तिकडे लक्ष वेधणें ही गोष्ट विशेष महत्वपूर्ण आहे.

हें दुःखदायक आहे

हल्लींचें पुढारलेलें वैद्यक हा आयुर्वेदाचा विकास आहे असें म्हणणारे कांहीं लोक आढळतात तेंहि आयुर्वेद शास्त्रावर अन्याय करीत असतात 'आयुर्वेद हें शास्त्र नव्हे असें म्हणणें' हें दुःखदाय आहे असें टाइम्सचे संपादक म्हणतात.

नियंत्रणें वाऱ्याला आलीं

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आयुर्वेदाला आवश्यक अ चालना, प्रोत्साहन, मिळेल अशी आशा सर्वत्र केल जात होती. चोप्रा समितीच्या व तिसऱ्या आरोग्य-मंत्री परिषदेच्या शिफारसी आशादायक होत्या; प त्या सर्वांवरून पाणी फिरविलें गेलें, व आयुर्वेदासाठ कांहींच अनुकूल घडून आलें नाहीं. फक्त क्वचि कांहीं दवाखानें उघडले गेले व नियंत्रणें मा भरपूर वाऱ्याला आलीं. पुढें पुढें तर आयुर्वेदाला दो लावणारीं भाषणेंच जबाबदार व्यक्तींच्या तोंडून ऐ येऊं लागलीं.

अ. भा. आयुर्वेद महासम्मेलनाच्या अध्यक्षां देशांतील सर्व पक्षाच्या प्रमुख नेत्यांना पत्रें पाठव त्यासमोर ही परिस्थिति स्पष्ट शब्दांत मांडली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय व्यावसायिकांपुढें अधिकारी वर्गा-कडून पद्धतशीर रीतीनें सर्व बाजूंनीं अडथळे निर्माण केले जात आहेत. व वरकरणी गोड गोड भाषा बोलून आयुर्वेद मुळापासून उखडून टाकण्याचे प्रयत्न चालू आहेत. सरकारला जर हेंच करावयाचें असेल तर त्यांनीं आयुर्वेदाच्या प्रश्नाला घातलेला हात आवरावा व आयुर्वेदीयांना त्यांना सुचेल त्या मार्गानें स्वतंत्र-पणें जाऊ द्यावें अशी त्यांनीं विनंति केली आहे.

टाइम्सचे संपादक म्हणतात 'अद्याप वेळ गेलेली नाहीं. हैद्राबाद येथें मध्यवर्ति स्वास्थ्य मंडळाची बैठक चालू आहे व तेथें पुनः प्रथमपासून या प्रश्नाचा विचार केला जाणार आहे. तेथें हजर राहणाऱ्या पैकीं कांहीं जबाबदार लोकांना असें मनःपूर्वक वाटत आहे कीं आयुर्वेद हे शास्त्र आहे व त्याकडे आजवर दुर्लक्ष झालें आहे. सबब आतां आयुर्वेदाच्या प्रगतीसाठीं निश्चयात्मक असा निर्वाणीचा प्रयत्न सरकारतर्फे होणें जरूर आहे.

समाजविकास योजनेंत आयुर्वेदाचें स्थान

समाजविकासयोजनेतील आरोग्य विषयक कार्यक्रमाची चर्चाहि हे मध्यवर्ति स्वास्थ्य मंडळ कर-णार आहे. आयुर्वेदाला भक्कम पायावर अधिष्ठान करण्याला ही नामी संधि आहे. ज्या संस्थांत आयु-र्वेदच प्राधान्यानें शिकविला जाईल व ज्या प्रयोग-शाळेंत व रुग्णालयांत आयुर्वेदीय पद्धतीचेच प्रयोग व उपचार होतील अशा संस्थांची व संशोधन केंद्रांची आज गरज आहे. ४।५ समाज विकास केंद्रांत या पद्धतीचा प्रयोग सुरू केल्यास अनुभवाच्या दृष्टीनें त्यांचा विशेष उपयोग होईल.

हें सर्व शक्य आहे पण जोपर्यंत अधिकारी वर्ग साजऱ्याप्रमाणें आयुर्वेदाविषयीं तिरस्कार दर्शवित राहील तोपर्यंत हें शक्य नाहीं. आयुर्वेदाविषयीं सर-कारी निर्णय घेतांना वैद्यांना विश्वासांत घेतले जात नाहीं हें बुद्धीला पटत नाहीं. वास्तविक हा केवळ त्यांचाच प्रान्त आहे. चरकाचार्यांची दृष्टि विशाल आहे. आयुर्वेदाच्या प्रगतीला अडथळा येण्याचें कारण अधिकारारूढ लोकांमधील असहिष्णुता व दुसऱ्याविषयीं तिरस्काराची भावना या आहेत. त्या गेल्या पाहिजेत असे चरकाचार्यांनीं हजारों वर्षांपूर्वी सांगून ठेवले आहे."

स्पष्ट शब्दांत सरकारपुढें आयुर्वेदाची बाजू मांडल्याबद्दल पुनः एकवार टाईम्सकारांना आम्ही धन्यवाद देतो.

फडणीसांना किरकोळ रजा

असें कळतें कीं आयुर्वेद युनानी बोर्डाच्या कचेरींत प्रमुख कारकून श्री. फडणीस यांना रजिस्ट्रार गोडबोले यांनीं ऑफिसांत धमकावल्यामुळें ते बेशुद्ध पडले. त्यानंतर प्रकृतिस्वास्थ्यासाठीं त्यांनीं ४ दिव-सांची रजा घेतली.

जागतिक आरोग्य संस्थेतर्फे १८ प्रयोग भारतांत चालू आहेत

जागतिक आरोग्य संस्थेतर्फे जगांतील ६२ देशांत २०० वर आरोग्य विषयक कार्यें सुरू आहेत त्यापैकीं १८ योजना भारतांत चालू आहेत त्यांत ३८ आंतराष्ट्रीय प्राध्यापक, डॉक्टर्स, नर्सेस, व तंत्रज्ञ यांचा समावेश आहे. हीं १८ कामें अशीं:- क्षय-विषयक शिक्षण व प्रात्यक्षिक (दिल्ली, त्रिवेंद्रम व पाटना), मातावालक आरोग्य योजना (दिल्ली), मलेरिया प्रतिबंधक योजना (तेराई उ. प्र.) गुह्यरोग शिक्षण केंद्र (मद्रास), बी. सी. जी. टोचण्याचा कार्य-क्रम (कित्येक राज्यांत) परिचर्या शिक्षण योजना (कलकत्ता), १ प्लेग नियंत्रण योजना (उ. प्रदेश), २ कुटुंबयोजन केन्द्रांना मदत (म्हैसूर व दिल्ली) ३ पेनि-सिलिन कारखाना (पिंपरी पुण्याजवळ) १ डी.डी.टी. कारखाना दिल्ली, Yaws control योजना (मध्य प्रदेश) २ के. ई. एम. रुग्णालय (मुंबई) फिजिओ थेरपीचे २ तज्ञ, ४ कलकत्ता, मुंबई व त्रिवेंद्रम् येथील सार्वजनिक स्वास्थ्य-संस्थांत व महाविद्यालयांत ४ प्रोफेसर्स.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नेत्रवैद्य एम्. सी. मोदी यांची
कूर्ग व म्हैसूर राज्यांतील कामगिरी

—*—

बेळगांव येथील सुप्रसिद्ध नेत्रवैद्य एम्. सी. मोदी यांनीं आपलें रुग्णसेवा कार्य म्हैसूर व कूर्ग राज्यांत मोठ्या वेगानें चालविलें आहे. नोव्हेंबर महिन्यांत कूर्ग प्रांतांत मर्कारा येथें चालविलेल्या सरकारी मोफत नेत्र-यज्ञांत त्यांनीं १२ प्रकारचीं २५१ शस्त्रकर्में केलीं. त्यांत मोतिबिंदु १३४, तिरळेपणा ८, लॅक्रिमल पिशवी काढणें १५ इ. होतीं. मर्कारा येथें तपासलेले नेत्ररोगी २२०० व कूर्ग प्रांतांतील इतर ७ गांवांत २०९७ मिळून ४२९७ नेत्ररोगी त्यांनीं तपासले व त्यावर मोफत औषधोपचार केला. २५० त्यापैकीं लोकांना चष्मे दिले.

म्हैसूर राज्य सरकारची मदत

म्हैसूर राज्य सरकारनेंहि वैद्य मोदी यांच्या शस्त्रकर्मनैपुण्याचा लाभ डिसेंबर १९५२ मध्यें आपल्या नागरिकांना दिला. म्हैसूर सरकारच्या गृह-खात्याचे सेक्रेटरी श्री. जी. ए. नागराज राव यांनीं बंगलोर येथील सिनीयर सर्जन (सर्जन जनरल) ना व डायरेक्टर ऑफ पब्लिक हेल्थ यांना सरकारतर्फे पत्रें पाठवून डॉ. मोदी यांच्या कार्यांत मदत देण्याची शिफारस केली आहे. ते जेथें जेथें मोफत नेत्रयज्ञ-शिबिरें उघडतील तेथें तेथें सरकारतर्फे मदत करण्याची सूचना दिली आहे.

बंगलोर येथील कार्य

बंगलोर येथें सरकारनें स्वतःच मदत केली आहे. बंगलोर येथील नेत्रयज्ञशिबिरामध्यें ४०८ शस्त्रकर्में झालीं. त्यांत २७८ मोतिबिंदु, १२ तिरळेपणा अशीं होतीं. यासाठीं म्हैसूर राज्यांतील सर्व तालुक्यांतून नेत्ररोगी आले होते.

मुंबई राज्यांत मान्यता नाहीं

कूर्ग राज्याचे चीफ् सेक्रेटरी सी. नरसिंहजी मूर्ति म्हैसूर राज्याचे होमसेक्रेटरी नागराज राव ही मंडळी आपल्या सर्व राज्यांत वैद्य मोदी यांना अधिकृतरीत्या नेत्ररोगावर शस्त्रकर्में करण्यास साहाय्य करीत आहेत. ज्या मुंबई राज्यांत वैद्य मोदी यांनीं शिक्षण घेतलें व इतकें नैपुण्य मिळविलें तेथील आरोग्य खातें मात्र त्यांना मदत करण्यास तयार नाहीं ही गोष्ट कोणालाहि संताप उत्पन्न करणारी आहे. श्री. मोदी हे कर्नाटक आयुर्वेद विद्यापीठाचे पदवीधर आहेत. सरकारी मेडिकल कॉलेजचे पदवीधर नाहींत. म्हणून त्यांच्या ज्ञानाचा लाभ या प्रांतांतील गरीब नागरिकांना मिळूं शकत नाहीं. महाराष्ट्र व कर्नाटक प्रांतीय वैद्य संमेलनांनीं या प्रकरणाची माहिती आरोग्यमंत्र्यांच्या कानावर घालून वैद्य मोदी यांना न्याय मिळवून दिला पाहिजे.

————

प्राणिज द्रव्यांच्या नाविन्यपूर्ण चिकित्सेनें आरोग्य मिळवून नवचैतन्य प्राप्त करा. फक्त ७ ते १४ दिवस घेतल्यानंतर चमत्कार पहा. ह्याच त्या गोळया "मिश्र शक्तिसागर" १४ गो. २ रु., ४२ गो. ६. ४ ट. ख. वेगळा याबरोबरच "रजि. युनानी तिला" वापरल्यास सोन्यांत सुगंध समजा. लहान बा. २॥ रु. मोठी बा. ४ रु., ट. ख. अलग.

मिश्रा महाराष्ट्र फार्मसी (रजि.)
ब्रह्मपुरी (चांदा) म. प्र.

आयुर्वेद सेवा संघ–नासिकचीं सर्व शास्त्रोक्त अनुभविक औषधें, तसेंच आयुर्वेद पत्रिकेचे अंक आमचेकडे मिळूं शकतील.

धातुवर्धक कंदर्प–वृष्य–पाक, टक्कलावर भ. भृंगराज तेल, शक्तिवर्धक अगस्तिप्राश हीं व अशींच नवीन नवीन औषधें वापरा. विशेष माहितीकरितां एकवेळ भेट द्या.

दि सूर्यकिरण फार्मसी लि.
१७३ गिरगांवरोड मुंबई ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म. प्रां. वैद्यमंडळ अध्यक्षांच्या

रत्नागिरी जि. दौऱ्याचा कार्यक्रम

ता. १५-२-५३ मुंबईहून बोटीनें प्रयाण—
ता. १६-२-५३ सकाळीं मालवण (वैद्य पुराणिक देऊळवाडा येथें मुक्काम) दुपारीं इंग्रजी शाळेंत व्याख्यान)
ता. १७-२-५३ सकाळीं बोटीनें वेंगुर्ला (वैद्य मराठे) सायंकाळीं सावंतवाडी (वै.गणपत्ये)
ता. १८-२-५३ सकाळीं कुडाळमार्गे कणकवली (वै. ल. वा. करंबेळकर)
१९-२-५३ फोंडा मार्गें राजापूर (वैद्य गुर्जरपाध्ये)
२०-२-५३ लांजे मार्गें रत्नागिरी (वैद्य जोगळेकर) कॉलेजांत व्याख्यान
२१-१-५३ चिपळूण (वैद्य गोखले, वैद्य वझे)
२२-२-५३ खेड दापोली मार्गें महाड (भालेकर)

रत्नागिरी जिल्ह्यांतील इतर गांवांतील वैद्यमंडळींना ज्या जवळच्या गांवीं येणें सोईचें होईल तेथें त्यांनीं अवश्य येऊन विचारविनिमय करावा अशी विनंति आहे.

वि. म. गोगटे
मंत्री, म. प्रां. वैद्य मंडळ, नाशिक

अशोक साल

अशोक साल निश्चित मिळण्याचें ठिकाण बेळगांव जिल्ह्यांत खानापूर तालुक्यांत रेल्वे स्टेशन गुंजी येथून २ मैलावर भटवाडी हें आहे. बेळगांवहून धारवाडकडे जाण्याच्या लोहमार्गावरील गुंजी हे चौथें स्टेशन आहे. भटवाडी नजीक सुंदर असें अशोक वन आहे. —कल्याणराव आंबेवाडीकर

सरकारमान्य पदव्यांची यादी

१९४१ पर्यंत रजिस्ट्रेशन साठीं कोणत्या वैद्यकीय परीक्षांना मान्यता होती अशी चौकशी केली असतां बोर्डाचे रजिस्ट्रार कळवितात- बोर्डानें प्रसिद्ध केलेल्या वैद्यक व्यवसायिकांच्या रजिस्टरमध्यें सरकारमान्य पदव्यांची यादी छापलेली आहे.

अनुक्रमणिका

खेड्यांतील कोस्यवधि जनतेचें आरोग्यरक्षण	४९७
आयुर्वेदासाठीं स्वतंत्र उपमंत्री नेमा	४९८
आयुर्वेद हे श्रेष्ठ स्वाभाविक शास्त्र आहे	४९९
वनस्पति व जीवाणुनाशक शक्ति	५०७
विकास योजनेंतील आरोग्यविषयक कार्यक्रम	५१०
कामला (Joundice) चिकित्सा	५११
बोर्डाची अवस्था अनाथ विधवेप्रमाणें आहे	५१९
वातहरतेलाच्या चोथ्याचा उपयोग	५२३
वैद्य प्रतापकुमार यांचे १० ठराव	५२५
संस्थानी वैद्यावर अन्याय	५२७
टाईम्सचा अग्रलेख दुर्लक्षित शास्त्र	५२८
नेत्रवैद्य मोदी यांची कामगिरी	५३०

आयुर्वेद सहकारी मंडळ, सांगली

या संस्थेची वार्षिक सभा मकरसंक्रांतीचे दिवशीं होऊन नूतन वर्षासाठीं पुढील निवडणुकी झाल्या व नंतर तिळगूळ समारंभ झाला.

अध्यक्ष- वै. वा. वा. जोशी खानापूरकर
उपाध्यक्ष- वै. ग. मो. वझे
मंत्री- वै. नेजकर व वै. गोपाळशास्त्री वाटवे.

या नव्या कार्यकारी मंडळाची पहिली सभा ता. ३-२-५२ रोजीं होऊन दक्षिण सातारा जिल्हा वैद्य संमेलन भरविण्यासंबंधीं प्रास्ताविक विचार झाला. येत्या मार्च अगर मे महिन्याच्या तिसऱ्या-चौथ्या आठवड्यांत तें भरवावें असा प्रयत्न चालू आहे, असें कळतें.

वैद्यवर्गांत समाधान

" आपण महाराष्ट्र वैद्य संमेलनाचे अध्यक्ष या नात्यानें नगरला नुकतीच जी भेट दिली व आयुर्वेदशास्त्राच्या उन्नतीबाबत विचारपरंपरा वैद्यमंडळासमोर मांडली त्याबद्दल वैद्यवर्ग आपला ऋणी आहे. तसेच पदवीधर वैद्यांच्या प्रांतीय वैद्य संमेलना बाबतच्या शंका आपण समाधानपूर्वक निवारण केल्यास याबद्दल पदवीधरातर्फे मी आपले आभार मानतो. " — वैद्य श्री. गं. देशमुख

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघ ही संस्था प्रत्येक वैद्यानें अवलोकन करण्यासारखी आहे.

" आपण मला आयुर्वेद सेवा संघाचें औषधी भवन दाखवून जें प्रेम व्यक्त केलें त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. आपली वनस्पती ठेवण्याची पद्धति मला फारच आवडली. आपल्या कारखान्यांत औषधें तयार करण्याचे निरनिराळे भाग पाहून व त्यांत काम करणारे स्त्री आणि पुरुष औषधें घुटण्यांत, कुटण्यांत तल्लीन झालेले पाहून समाधान वाटलें. प्रत्येक मनुष्य आपलें औषध तयार करण्यांत एकचित्त झालेला दिसला.

परिश्रमपूर्वक हातांनीं तयार केलेलीं औषधें

परिश्रमपूर्वक हातांनीं तयार केलेलीं औषधें आपल्या कारखान्यांत होत असलेलीं दिसलीं, त्यामुळें आपल्या औषधाला उत्तम गुण येत असेल अशी माझी खात्री झाली. आपल्या कारखान्यांत मात्रा वगैरे सर्व तयार होतात हें सर्व पाहून समाधान वाटलें.

स्वच्छ जागा, मुबलक हवा व भरपूर उजेड

आपली औषधें तयार करण्याची जागा स्वच्छ असून विशाल आहे. त्यांत हवा आणि उजेड मुबलक येतो असें माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें.

आपण आपल्या प्रत्येक विभागावर उत्तम रीतीनें देखरेख ठेवत असल्यामुळें मनाला आनंद वाटतो. औषधें तयार झालेवर तीं ठेवण्याची व तारखेसह योग्य अशा चिठ्या लावण्याची पद्धति आकर्षक आहे.

आपल्या कारखान्यांत भट्या लावण्याची जागा पृथक् असल्यामुळें मनाला आल्हाद वाटतो. आपला आयुर्वेद सेवा संघ ही संस्था प्रत्येक वैद्यानें अवलोकन करण्यासारखी आहे. मी आपल्या कारखान्याची दिवसानुदिवस उन्नति चाहतो. "

विठ्ठल क्रीडा भवन, बडोदा
दिनांक ३-२-१९५३

आपला
ग. य. माणिकराव
(राजरत्न प्रो. माणिकराव)

संपादक व प्रकाशक:—वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक
मुद्रक:—श्री. दामोदर महादेव चन्द्रात्रे, विज्ञान प्रेस, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु.   सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ६ वें)   नाशिक, ता. १ मार्च १९५३   (अंक १७ वा

आयुर्वेदीय सूचिकाभरणास बंदी नसावी !

नागपूर येथील आरोग्यमंदिरसंस्थेचा तिसरा वार्षिक समारंभ गीता मंदिरांत मध्यप्रदेशाचे राज्यपाल (गव्हर्नर) डॉक्टर बी. पट्टाभीसीतारामय्या यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. संस्थेतील मुलांमुलींनीं आसनें, नौली, नेति यांचे प्रयोग करून दाखविले. आयुर्वेद सेवा संघाचे सदस्य वैद्य गोविंदराव परांडे, आयुर्वेदतीर्थ (आरोग्य मंदिर संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष) यांनीं कांहीं आसनें व षट्कर्मांपैकीं २ कर्में करून दाखविलीं. डॉ. काशीकर यांनीं मंदिराचा अहवाल वाचून दाखविला. या संस्थेंत गेल्या वर्षीं १५० स्त्री-पुरुषांनीं योग व आयुर्वेदीय पद्धतीची माहिती घेतली.

आयुर्वेदप्रेमी राज्यपाल

डॉ. पट्टाभिसीतारामय्या

शरीरांतील सर्व भागांना गति मिळण्याची व्यवस्था

आपल्या अध्यक्षीय भाषणांत राज्यपाल डॉ. पट्टाभिसीतारामय्या म्हणालेः— गोडीगोडीनें या विषयाचें शिक्षण दिल्यास योगासनें हीं लोकप्रिय करतां येतील. लहान मुलें योगासनें आवडीनें शिकतात व त्याचा त्यांना फायदाहि होतो. शरीराच्या सर्व भागांना गति मिळेल अशी व्यवस्था योगासनांत आहे. मी शरीररचनाशास्त्र व शरीर-क्रियाविज्ञान यांचा अभ्यास केला आहे, त्यांच्या आधारें मी हें सांगत आहे. पोटाच्या स्नायूंना नौलीनें व्यायाम मिळतो तो महत्वाचा आहे.

आयुर्वेदाचें प्रगत विषविज्ञान

ते पुढें म्हणालेः—आपल्या पूर्वजांनीं मानवी यंत्राच्या अत्यंत गुंतागुंतीच्या क्रियांचाहि शोध लावला आहे. असें प्रसिद्ध झालें आहे कीं उत्तरप्रदेश राज्यसरकारनें आयुर्वेदीय औषधांचीं इंजेक्शनें निर्माण करण्यास व वापरण्यास बंदी घातली आहे. अशी बंदी कां ... इंजेक्शनें तयार करतांना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व तीं रोग्यास देतांना जन्तुसंसर्ग होऊं नये याची काळजी घेतल्यास आयुर्वेदीय सूचिकाभरणें निर्माण करण्यास व वापरण्यास बंदी करण्याचें कांहींहि कारण नाहीं.

चरकाच्या काळीं विषविज्ञानासंबंधीं बराच विचार झाला होता हें मला डॉ. प्राणजीवन मेहता यांनीं जामनगर येथून प्रसिद्ध केलेल्या चरकाच्या इंग्रजी भाषांतरावरून कळून आलें. नाग व नागीण यांच्या विषांतील भेद आयुर्वेदांत दिले आहेत. इतका बारकावा ॲलोपॅथींत सुद्धां नाहीं.

या समारंभप्रसंगीं मध्यप्रदेशाचे आरोग्यमंत्री ना. कन्नमवार उपस्थित राहिले नाहींत, याबद्दल गव्हर्नर डॉ. पट्टाभि यांनीं खेद प्रदर्शित केला व त्यांनीं या उपयुक्त संस्थेच्या कामीं लक्ष घालावें असें जाहीर सूचना केली.

आयुर्वेदाशीं संबंध आल्यानें जीवनाचें सार्थक झालें!

(डॉ प्राणजीवन मेहता यांचे सत्कारप्रसंगींचे उद्गार)

"मी जरी तज्ज्ञ ॲलोपॅथ असलो तरी ज्या क्षणीं आयुर्वेदाशीं माझा संबंध आला त्या क्षणीं माझ्या जीवनाचें खरोखर सार्थक झालें. आयुर्वेदाचे सिद्धांतच अखेरीस भारतांत आणि जगांत स्वास्थ्य निर्माण करूं शकतील अशी माझी दृढ श्रद्धा आहे." अशा आशयाचे उद्गार जामनगर येथें भारत सरकारतर्फे सुरू होणाऱ्या आयुर्वेद संशोधन केंद्राचे प्रमुख म्हणून नियुक्त झालेले डॉ. प्राणजीवन मेहता यांनीं, इंडियन फार्मासिस्टस् असोसिएशनतर्फे ता. २४-२-५३ रोजीं मुंबई येथें त्यांचा सत्कार झाला त्यावेळीं, भाषण करतांना काढले. अध्यक्षस्थानीं मुंबईचे स्वास्थ्यमंत्री श्री. शांतिलाल शहा हे होते.

चरकसंहितेचें भाषांतर करविलें

प्रारंभीं श्री. नानासाहेब पुराणिक यांनीं डॉ. प्राणजीवन मेहता यांच्या व्यासंगाची व विद्वत्तेची ओळख करून दिली. एकाच वेळीं एम्. डी. व एम्. एस् ची परीक्षा उत्तीर्ण होण्याचा मान मिळविणारे हे पहिलेच गृहस्थ असून चरकसंहिता हा आयुर्वेदीय ग्रंथ त्यांनीं भाषांतर करवून नुकताच प्रसिद्ध केला आहे. श्री. नानासाहेबांनीं यावेळीं असोसिएशनच्या कार्याचीहि माहिती दिली.

आयुर्वेदाचा पाठचिंतामणि तयार करावा

डॉ. प्राणजीवन मेहता यांचें अभिनंदन करतांना आरोग्यमंत्री श्री. शांतिलाल शहा म्हणाले- "निव्वळ औषधें तयार करणें व विकून पैसे मिळविणें, येवढ्यानेंच आयुर्वेदाची सेवा होते, असें वैद्यांनीं न मानतां आयुर्वेदाचा पाठचिंतामणी तयार करण्याच्या दृष्टीनें प्रयत्न करावेत."

"आयुर्वेदीय सिद्धांतांना बाध न आणतां आपण आयुर्वेद संशोधन करूं" असें डॉ. प्राणजीवन मेहता यांनीं अभिवचन दिलें.

मराठी आवृत्ति कि १ रु. } **आयुर्वेदिक औषधी संशोधन** { हिंदी आवृत्ति कि. १ रु.

(लेखक:—वैद्यराज पु. वि. धामणकर, आयुर्वेदभूषण)

आयुर्वेदीय औषधांचें संशोधन झालें पाहिजे अशी मागणी सर्वत्र होत आहे. दोन तपाहून अधिक काल संशोधनपूर्वक औषधीकरणांत घालवून तज्ज्ञानें लिहिलेलें हें पुस्तक याबाबतींत सर्वांना मार्गदर्शक असें झालें आहे. टपाल खर्च आठ आणे. — वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय पाठचिंतामणी :

ले.:-श्री. मा. या. व्यवहारे
बी. एसूसी. (फार्म. केम.)

आयुर्वेदीयांचा व ॲलोपॅथीयांचा जसजसा संघर्ष होऊं लागला तसतसा ॲलोपॅथीयांकडून आयुर्वेदामध्यें योग्य पाठचिंतामणी नाहीं व आयुर्वेदीय औषधींचें परिगणन (स्टॅंडर्डायझेशन) हि नाहीं, अशी सारखी ओरड व झोड सुरूं झाली. या टीकेचा पुढें पुढें तर असा परिणाम झाला कीं पुष्कळ आयुर्वेदीय या टीकेकडे सारासार विचार करून पाहू लागले, व त्यांनाहि वरील टीका योग्य असल्याचें पटून त्या दृष्टीनें आयुर्वेदाचा पाठचिंतामणी व परिगणन करण्याच्या प्रयत्नास ते लागले. ही जी गोष्ट आज घडत आहे ती आयुर्वेदाला पोषक व तारकच अशी घडत आहे. या प्रयत्नामुळें कांहीं कालानंतर आयुर्वेदामध्यें औषधी पाठचिंतामणी व त्यांतील द्रव्यांचें परिगणन व इतर शास्त्रीय कसोट्या यांचा अन्तर्भाव होऊन आयुर्वेद आपल्या तेजानें तळपूं लागेल.

पाठचिंतामणीचे २ भाग

आतां, आयुर्वेद पाठचिंतामणी तयार करतांना त्याचे दोन भाग पाडणें अत्यावश्यक आहे. पहिला भाग म्हणजे त्यांत आयुर्वेदीय पाठांतील मूल द्रव्यांची शास्त्रीय माहिती असावी. उ. एकादी वनस्पती असल्यास तिचा वंश, जात, घराणें याचा उल्लेख असून तिची निपज कोठें कोठें होते याचें वर्णन त्यांत असावें. त्यानंतर त्या वनस्पतीचे अन्तर्रचनेचें वर्णन असावें. (Internal Microscopical Morphology) व त्या रचनेचे उभ्या आडव्या छेदाचे नकाशे व वर्णन असावें (Vertical & Horizontal Sections) मग त्यामध्यें मुख्य व गौण क्रियाकारी द्रव्य कोणतें, त्याची शारिरावर काय क्रिया होते वगैरे माहिती देऊन तिचा उपयोग द्यावा. शेवटीं, त्याची मात्रा (डोस) किती हें देऊन ती कोणकोणत्या पाठांत वापरली आहे याची माहिती द्यावी. अशा तऱ्हेनें पाठचिंतामणीचा प्रथम भाग हाताळला गेल्यावर पुढें हें कार्य अधिकाधिक सुकर होईल व त्यांत नवीन नवीन माहितीची सारखी भर पडत जाईल.

दुसऱ्या भागांत औषधींचे पाठ

दुसरा भाग म्हणजे त्यांत औषधींचे पाठ असावेत. पाठ प्रमाणबद्ध कसे असावेत, त्यांतील घटकांचें परिगणन कसें करावें, याची शास्त्रीय पद्धत व इतर शास्त्रीय कसोटींच्या दृष्टीनें त्यांचें वर्णन असावें व शेवटीं त्याची मात्रा व उपयोग द्यावा. असा उपक्रम एकदां सुरूं झाला म्हणजे इतरहि त्यावर प्रयत्न करीत राहतील. व त्यांत सुधारणा व योग्य बदल यांची भर पडत राहून पाठचिंतामणीची शास्त्रीय आधारणी होत जाईल. पुढें पुढें योग्य व अयोग्य, अगर टिकाऊ व टाकाऊ अशा पाठांची निवड होत राहील, म्हणजे (official drugs & non-official drugs) याची निराळी जंत्री होत राहील. शास्त्रीय पाठावर अधिकाधिक लक्ष पुरवलें जाऊन त्यांत सर्व पद्धतीची ठराविक प्रमाणबद्धता बसवितां येईल. ही प्रमाणबद्धता आल्यावर हा आयुर्वेदीय औषधीचिंतामणी इतर देशाप्रमाणें हिंदी आदर्श औषधीपाठ चिंतामणी (इंडियन आयुर्वेदिक फार्माकोपिया) ठरेल.

द्रव्यघटक--दोष-हारकता

औषधीचिंतामणींत प्रथम कोणती गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी असेल तर ती द्रव्यघटक-दोष-मारकता (Incompitabality) होय. जर ही गोष्ट लक्षांत घेतली नाहीं, तर तें औषधीकरणच होणार नाहीं. म्हणून या गोष्टीचा पूर्णपणें विचार करून औषधीकरण करावें.

३ गोष्टींचा विचार

उदाहरणार्थ, आपण कुमारीआसव नं. १ चा विचार करू. या पाठामध्यें तीन गोष्टींचा विचार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करावा लागेल (१) मुख्य द्रव्यें कोणतीं (२) गौण कोणतीं व (३) त्यांची एकमेकावर काय प्रक्रिया होते?

बुळबुळीतपणा कसा घालवावा ?

कुमारीरस हा फार कडू व बुळबुळीत असतो, कारण त्या रसांत म्युसीलेज (पातळ गोंद) फार असतो. तो पचनास फार जड असतो व त्याच्या औषधी गुणधर्मांची अपेक्षाहि नाहीं. त्यांत जे इतर औषधी घटक आहेत ते म्हणजे बोळ (Aloes) व (Aloni) हे होत. यांची क्रिया यकृत् व प्लीहा यावर होतेच, पण याशिवाय तीं उत्कृष्ट सौम्य रेचक आहेत, आंतड्यांत वेठ (Griping) न येतां सुलभ रेचक असल्यामुळें प्रथम श्रेणींतील रेचक मानलें गेलें आहे. आतां उपयोग नसलेला बुळबुळीतपणा कसा घालवावा याचा विचार करितां ज्या पूर्वजांनीं हा पाठ तयार केला त्यांनीं योग्य असा बुळबुळीतपणाहारक संयोजक पदार्थ वापरला व तो म्हणजे सुरवारी हिरडा हा होय. याचा काढा करून तो कुमारीरसांत टाकला म्हणजे हिरड्यांतील कषायाम्ल (टॅनिक ॲसिड) तो बुळबुळीतपणा एकदम नाहींसा करते. हा कषायाम्लाचा मुख्य गुण होय, व म्हणूनच याची कातडी कमावण्याकडे अनादि कालापासून योजना झाली. रसांतील बुळबुळीतपणा नाहींसा झाला म्हणजे कृष्णबोळ सुटा होऊन पचनास सुलभ व कार्यकारी होतो, तेव्हां या दोन वनस्पतींची योजना अगदीं योग्य व शास्त्रीय तत्वावर झालेली आहे असें आढळून येतें.

सुगंधी वनस्पतींचें प्रयोजन

गौण पदार्थांत सुगंधी वनस्पति (प्रक्षेप द्रव्यें) व दोन भस्में वापरलीं आहेत. सुगंधी वनस्पतींचा उपयोग मुख्यतः दीपक, पाचक व उत्तेजक म्हणूनच केला जातो, पण ताम्र व लोह या भस्मांचें प्रयोजन काय याचा अवश्य विचार व्हावयास पाहिजे, व त्याचें शास्त्रीय विवेचन करूनच हा प्रश्न सोडविला पाहिजे, तरच तें अधिक पटणारें ठरेल.

ताम्रयोजनेचें शास्त्रीय विवेचन

प्रथम ताम्राचा शास्त्रीय विचार करूं.—ताम्र हें कोणत्याहि तेज किंवा सौम्य (स्ट्रॉंग ऑर डायल्यूट) आम्लांत कमी अधिक वेळांत विरघळून त्याचे क्षार होतात. उदाहरणार्थ, नत्राम्ल (नायट्रिक ॲसिड) फार तेज आम्ल असल्यामुळें तें तांब्यावर टाकलें असतां तात्रडतोब क्रिया सुरूं होते, व ताम्राचें द्रव तयार होतें व त्यापासून ताम्राचा (Copper-nitrate) हा क्षार तयार होतो. त्याचप्रमाणें सौम्य आम्लामुळेंहि ताम्राचे क्षार तयार होतात, पण त्यांना वेळ लागतो. उदा. लिंबाम्ल (सायट्रिक ॲसिड), असेटिक ॲसिड, चिंचाम्ल (टार्टरिक ॲसिड) इत्यादि बरोबर ताम्राचे कॉपर सायट्रेट, कॉपर ॲसिटेट व कॉपर टार्टरेट हे क्षार बनतात. हे ताम्राचे सर्व क्षार हिरवट निळसर रंगापासून तो हिरव्या रंगाचे असतात हें विशेष होय.

आसवांत होणारे तीन फरक

आतां आसव तयार होत असतांना प्रथमतः त्यांत तीन गोष्टी होतात. १) ॲसिड फरमेंटेशन, २) ॲसिटोन फार्मेशन, ३) अल्कोहोल फरमेंटेशन.

या सर्वांमध्यें अल्कोहोल फरमेंटेशनचा वेग अधिक असल्यामुळें तें इतरांना आपलें कार्य करण्यास प्रतिबंध करतें, पण हें सुरूं होण्यापूर्वीचा जो काल असतो त्या कालांतच ॲसिड फरमेंटेशन सुरूं होऊन आपलें आम्ल बनवितें व तेवढ्या कालांत साधारणपणें १ टक्का ॲसिड तयार करतें. नंतर लगेच अल्कोहोल फरमेंटेशन सुरूं होतें, हें आम्ल म्हणजे ॲसिटिक ॲसिड होय. ॲसिटोन अत्यल्प तयार होतें. या तीन घटना नीट

सेवा संघाचीं सर्व औषधें तसेंच खालीची सर्व देशी काष्ठौषधी व ताजी वनस्पती आणि शिलाजीत, कस्तुरी, केशर, भीमसेनी कापूर, गोरोचन, वाकेरी भाते, वंशलोचन, नागकेशर, अनंतमूळ, जितसाया, उत्तम महाळेश्वरी मध वगैरे औषधें मिळण्याचें ठिकाणः—

देशी सर्वौषधी संग्रहालय
पोलिस चौकीसमोर, दादर मुंबई २८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समजल्यावर ताम्राचा प्रश्न चटकन् सुटतो. कुमारी आसवांत ताम्रभस्म टाकतात. ते टाकल्यानंतर तेथील ॲसेटिक ॲसिडची त्यावर क्रिया सुरू होऊन ताम्राचें कॉपर अॅसिटेट तयार होतें व तें आसवांत विरघळून जातें.

ताम्राचें यकृत्प्लीहेवर कार्य

कुमारीआसवाचा पाठ करतांना निर्मात्यास ताम्राची क्रिया हवी होती, कारण ताम्राची क्रिया यकृतावर, व प्लीहेवर (लिव्हर व स्प्लीन) होऊन तेथील स्राव (बाइल) योग्य प्रमाणांत स्रवतात व यकृत् व प्लीहा हेहि आपलें कार्य नीट करूं लागतात. त्यामुळें पचनक्रियावाढून अन्नपचनास आधिक मदत होते. ताम्राची मात्रा नेहमीं अत्यल्प प्रमाणांत लागते हें मात्र विशेष होय. पाठ-निर्मात्याच्या हेतूबद्दल व उपयोगाबद्दल शंका घेण्याचें कारणच नाहीं हें अगदीं खरें आहे. पण पुढें असा प्रश्न पडतो कीं, मग लोहाचें प्रयोजन काय असावें व तें कितपत योग्यायोग्य आहे. लोहाची क्रिया रक्तरंजनाकडे व रक्तकण वाढविण्याकडे असल्यामुळें रक्ताची शक्ति वाढविणें व त्यामुळें शरीर नेहमीं बलवान् व तेजःपुंज ठेवणें ही होय. ह्या दृष्टीनें लोहभस्माची योजनाहि योग्य आहे.

लोहाचा साका बसतो

पण दुसरें असें कीं लोहभस्माची रासानिक क्रिया कषायाम्लाबरोबर होते व ह्या पाठांत सुरवारी हिरड्याचा काढा वापरला आहे तेव्हां लोहभस्म टाकलें म्हणजे तेथें दोघांची प्रक्रिया सुरू होऊन आयर्न टॅनेट तयार होतें व तें अद्राव्य असल्यामुळें त्याचा साका खालीं बसतो. आतां कषायाम्लाचा विचार करूं. सुरवारी हिरडा, बेहेडा आंवळा ह्या पदार्थांत कषायाम्ल व इतर आम्लें आहेत. कषायाम्ल हें स्तंभक (Astringent) आहे, त्यामुळें ते बद्धकोष्ठता वाढविते, तेव्हां अशा कषायम्ल हिरड्याचा कुमारीआसवांत प्रयोग कसा केला ? हें तर मूळ गुणधर्माच्या विरुद्ध होय, म्हणून येथें लोहभस्माचा उपयोग करून बद्धकोष्ठताकारक द्रव्याचा नाश करण्याचें कार्य तर निर्मात्यानें केलें आहे व तशा तऱ्हेनें शास्त्रीय आधारावर कषायाम्ल वेगळें केलें. लोहामुळें त्याचा साका अच्छ कुमारीआसवापासून तें अलग केलें यावरून रसायनशास्त्र पूर्वजांना अवगत होतें हें सिद्ध होतें. परंतु मध्यंतरींच्या कालांत शास्त्रीय ऱ्हास झाल्यामुळें आपणांस उमज पडू शकला नाहीं. अशा तऱ्हेनें पुन्हा प्रयत्न करीत राहिल्यानें आयुर्वेदशास्त्र हें शास्त्रीय कसोट्यावरच आधारलें आहे हें सिद्ध करून दाखवितां येईल.

त्रिफळांत फोलिक ॲसिड आहे

दुसरें हिरडा, बेहडा, आवळा यांत जीं इतर आम्लें आहेत त्यांत फोलिक ॲसिड आहे, हें अमेरिकन शास्त्रज्ञांनीं संशोधिलें आहे व फोलिक ॲसिडची प्रसिद्धि तर सर्वश्रुत आहे. आयुर्वेदीय दृष्ट्या विचार केला तर त्रिफळाचूर्ण सौम्य रेचक म्हणून अनादिकालापासून देत आहेत.आजहि त्याचा सारखा उपयोग होत आहे. जर त्यांत नुसतेंच कषायाम्ल असतें तर तें सौम्य रेचकाऐवजी बद्धकोष्ठकारक झालें असतें. पण पूर्वजांना त्यांत इतर रेचक द्रव्यें आहेत हें माहित असावें हें सिद्ध होत नाहीं कां ? मग त्रिफळा चूर्णांत फोलिक ॲसिड आहे हें नमूद करण्यास कोणता प्रत्यवाय आहे ?

कुमारीआसव हें उत्कृष्ट औषध

वरील विधानामुळें कुमारीआसवाची गुणवर्धकता वाढली. एकतर बद्धकोष्टकारक पदार्थ वेगळे केले गेले व दुसरें, जे आपल्या देशांत अनादिकालापासून, व पाश्चात्य देशांत व त्यापासून इतर जगास उत्कृष्ट सौम्य रेचक म्हणून गणलें गेलें तें फोलिक ॲसिड यांत आहे हें सिद्ध झाल्यामुळें व कुमारी आसवांत याचा उपयोग केल्यामुळें कुमारी आसव हें उत्कृष्ट औषध गणलें गेलें. याचें कारण वरील विधानावरून सिद्ध होत नाहीं कां ?

ताम्र-लोह संयोग असफल

ह्यानंतर ताम्र-लोहसंयोग हा कितपत योग्य आहे याचा विचार करावा लागेल. धातूमध्यें एक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुसऱ्यास त्याच्या द्रावणांतून अलग करण्याचा धर्म आहे व ते त्याच्या परिमाणूच्या वजनाइतके दुसरा धातु द्रावणांतून जाऊन मूळधातु द्रावणांतून साका-रूपानें खालीं बसतो. उदाहरणार्थ, चांदीच्या द्रावणांत ताम्र टाकलें तर ताम्र द्रावणांत जातें व चांदीचा साका खालीं बसतो. तो निराळा केल्यावर त्या द्रावणांत लोह टाकलें तर लोह द्रावणांत जातें व ताम्राचा साका बाहेर येऊन तळाशीं बसतो. कुमारी आसवांत ताम्र व लोह यांचा संयोग आहे व ताम्र हें लोहामुळें अद्राव्य बनतें व तें तळाशीं बसतें. अच्छ कुमारी-आसवाचें पृथक्करण केलें तर त्यांत ताम्राची कसोटी मिळत नाहीं. पण लोहाची उत्तम तऱ्हेनें कसोटी मिळते. तेव्हां ताम्राचा ज्याकरितां उपयोग करण्यांत आला त्याचा परिणाम आढळणार नाहीं, कारण ज्यांत ताम्रच आढळत नाहीं त्याचा परिणाम कसा मिळणार? तेव्हां कुमारी आसवांत ताम्र-लोहाचा एकत्र संयोग शास्त्रीय दृष्ट्या सफल होणें अशक्यच !

ताम्रभस्म असें टाकावें

परन्तु ताम्रभस्म टाकावयाचेंच झालें तर कुमारी-आसवांत खालील पद्धतीनें टाकावें. आसवांत प्रथम लोहभस्म फडक्यांत बांधून दोलायंत्रानें एक महिना टांगून ठेवावें. नंतर ती पुरचुंडी काढून घ्यावी. आसव गाळून घ्यावें व नंतर ताम्रभस्म वरीलप्रमाणें एक महिना दोला यंत्राने त्यांत टांगून ठेवावे. नंतर ते काढून आसव गाळून घ्यावे. व निवळण्यास ठेवावें व अच्छ कुमारी आसव मग वापरावें. एकदम दोन्ही भस्में टाकण्यापेक्षां निरनिराळ्या कालांत टाकणें ही पद्धत अधिक श्रेयस्कर आहे.

तरी अशा पद्धतीनें आयुर्वेदीय पाठचिंतामणी तयार करण्याचा उपक्रम लवकरांत लवकर सुरू झाला तर त्यांत जास्तींत जास्त सुधारणा होऊन इतर देशा-प्रमाणेंच शास्त्रबद्ध पाठचिंतामणी निर्माण करतां येईल.

डॉ. आघारकरांची भेट

हिंदुस्तान सरकारच्या अन्न, वैद्यक व वनस्पति विषयक अनेक महत्वाच्या समित्यांवर कामें केलेले डॉ. आघारकर (पुणें) यांनीं ता. १७।२।५३ रोजी सकाळीं डॉ. गुप्ते, वैद्य मराठे व गोगटे यांचे समवेत आयुर्वेद सेवा संघ नासिक या संस्थेस भेट दिली. वैद्य श्या. धों. कुळकर्णी यांनीं त्यांना औषधीकरण विभाग दाखविला.

औषधी कारखाना म्हणजे केवळ व्यापारी कारखाना असा त्यांचा आतांपर्यंतचा गैरसमज सेवासंघ पाहिल्यावर नाहींसा झाला. संस्थेबद्दल आस्थापूर्वक चौकशी करून औषधीकरणविषयक कांहीं सूचनाही त्यांनीं केल्या.

संयमानें आनंद

कांहीं लोक संयमानें संततिनियमन करावें असे प्रतिपादन करतात. परन्तु हें ठीक नाहीं. संयमाला स्वतंत्र मूल्य आहे. संतति कमी करण्यासाठीं संय-माला वेठीस धरण्याची आवश्यकता नाहीं.

अपत्यांना देव माना

मुलें कमी किंवा जास्त झालीं यावर संयमाची कसोटी लागत नाहीं. संयमानें आनंद वाढतो. या कारणास्तव लोकांना संयमी बनण्यास सांगितलें तर चालेल. तेव्हां संततिनिष्ठ बना. आपल्या अपत्यांना देव माना. म्हणजे सर्व समस्या आपोआप सुटलेल्या तुम्हांस आढळून येतील. —विनोबाजी

आयुर्वेद सेवा संघ-नासिकचीं सर्व औषधें मुंबईंत मिळण्याचें आणखी एक नवें केंद्र

रामकृष्ण एजन्सी

३६८ बी ३।७० सुपारीबाग रोड

लालबाग, मुंबई १२

* मागणी रोज वाढत आहे. *

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९५२चें विधिमंडळ बिल नं. ३८

१९३८ चा मुंबई वैद्यक व्यावसायिकांचा कायदा दुरुस्त करणें अवश्य आहे. या दुरुस्तीला १९३८ च्या कायद्याची १९५२ ची दुरुस्ती असें नांव द्यावें.

रजिस्टर नसलेल्यानें व्यवसाय केल्यास दंड

(या कायद्याचें कलम ३४ पुढीलप्रमाणें होतें.

१९३८ च्या कायद्याच्या दुसऱ्या भागाप्रमाणें अगर १९१२ च्या कायद्याप्रमाणें नोंदलेला नाहीं अगर ज्याचे नांवें लिस्टमध्यें समाविष्ट झालेले नाहीं, त्यानें स्वतःच्या लाभाकरतां प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष वैद्यकीय व्यवसाय केल्यास व तो गुन्हेगार ठरल्यास, त्यास पहिल्या गुन्ह्यासाठीं १०० रुपयेपर्यंत व पुढील गुन्ह्यासाठीं ५०० रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल.)

(१) १९३८ च्या वैद्यक व्यावसायिकांच्या कायद्यांतील कलम ३४ बदलून त्याऐवजीं पुढील मजकूर घालण्यांत यावा.

१९३८ चा कलम ३२ मधील नियमांचें उल्लंघन जो करील तो गुन्हेगार ठरल्यास त्याला पहिल्या गुन्ह्यासाठीं ५०० रुपये पर्यंत दंड.

दुसऱ्यावेळीं गुन्हा केल्यास ६ महिने कैद वा ५०० रुपये दंड अगर दोन्ही.

तिसऱ्या व त्या पुढील गुन्ह्यासाठीं २ वर्षांपर्यंत कैद वा २ हजार रुपये पर्यंत दंड अगर दोन्ही अशा शिक्षा देण्यांत याव्यात.

खोट्या पदव्या देणाऱ्यास शिक्षा

(२) कायदा कलम ३५ पोटकलम २ मधील मजकूर वगळून त्याऐवजीं पुढील मजकूर कायद्यांत समाविष्ट व्हावा.

कायद्याचें कलम ३५ पोटकलम २ पुढीलप्रमाणें होतें

(जो कोणी या कायद्याच्या कलम ३५ (१) चा नियमभंग करून वैद्यकीय पदवी, प्रमाणपत्र, परवाना देण्याचा गुन्हा करील, अगर असें करणारी व्यक्ति एखादी संस्था असेल तर त्या संस्थेचा प्रत्येक सभासद त्यानें या कार्यास ज्ञानपूर्वक व स्वेच्छेनें अधिकार अगर परवानगी दिली असेल तर त्यास १००० रुपयापर्यंत दंड होईल.)

जो मनुष्य या कलमाचें पोटकलम (१) हें मोडील व हा नियमभंग करणारी व्यक्ति एखादी संस्था असेल तर त्या संस्थेचा प्रत्येक सभासद जो ज्ञानपूर्वक अगर स्वेच्छेनें अशा नियमभंग करण्यास परवानगी अगर अधिकार देत असेल तर तोहि गुन्हेगार ठरल्यास त्यास पहिल्या गुन्ह्यासाठीं १ हजार रुपये पर्यंत दंड व पुढील गुन्ह्यासाठीं ६ महिने कैद वा २००० रुपयेपर्यंत दंड अगर दोन्ही.

(३) १९३८च्या वैद्यकीय व्यावसायिकाच्या कायद्याच्या कलम ३५अ च्या पोटकलम २ ऐवजीं पुढील मजकूर घालण्यांत यावा.

जो कोणी कलम ३५ अ चे पोटकलम १ मधील नियमाचा भंग करील त्यास तो गुन्हेगार ठरला तर पहिल्या वेळीं ५०० रुपयेपर्यंत दंड, व पुढील गुन्ह्यासाठीं ६ महिनेपर्यंत कैद वा १००० रुपयेपर्यंत दंड अगर दोन्ही.

खोटी पदवी लावणाऱ्यास दंड

कलम ३५ अ पोटकलम २ पुढीलप्रमाणें होतें.
ती ती पदवी लावण्याचा अधिकार असल्याशिवाय जो कोणी आपल्या नांवापुढें पदवी, अक्षरें, लावून आपणास वैद्यक पदवी, प्रमाणपत्र, परवाना आहे असें भासवील, त्याला तो गुन्हेगार ठरल्यास पहिल्या वेळीं २५० रुपयेपर्यंत दंड व पुढील वेळीं ५०० रुपये पर्यंत दंडास पात्र होईल.

या कायदादुरुस्तीबाबत आरोग्यमंत्र्यांचें निवेदन

१९३८ च्या मुंबई वैद्यक कायद्यांत दंडाचीं कलमें आहेत पण तीं पुरेशीं नाहींत. फसवून जनतेचें जें अनहित करतात अशा व्यावसायिकांना जबर शिक्षा व्हावी या उद्देशानें वरील कायद्यांतील दंडाचीं कलमें दुरुस्ती करण्यांत येत आहेत.

अशा प्रकारचे गुन्हेगार फार नसतील, पण या प्रकारच्या बेदरकार गुन्हेगारांना परिणामकारक रीतीनें आळा बसविणेसाठीं अशा शिक्षांची आवश्यकता आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या दुरुस्त्यांचा उद्देश पूर्वी कायद्यांत असलेल्या शिक्षाच फक्त वाढविण्याचा आहे. शिक्षा देण्याऱ्या न्यायाधिकाऱ्यांना गुन्हेगारांना अल्प शिक्षेवर सोडतां येऊ नये, म्हणून कमीतकमी दंडाचें व शिक्षेचें प्रमाण स्पष्टपणें निदर्शित केलें आहे.

६ आगस्ट १९५२ —शांतिलाल शहा

हें बिल मुंबई विधिमंडळांत चालू अधिवेशांत पास झालें.

अ. भा. आयुर्वेदिक डेंटल मिशन

(३२८ विठ्ठलभाई पटेल रोड मुंबई ४)

या संस्थेतर्फें वरील ठिकाणीं दांताचा सार्वजनिक दवाखाना सुरू होत असून त्याच्या उद्घाटनाचा समारंभ ता. २६-२-५३ रोजीं सायंकाळीं माननीय आर. एम. हुकेरीकर, चेअरमन, मुंबई राज्य लेजिस्लेटिव्ह कौंसिल यांच्या हस्तें झाला. त्याचवेळीं नि. भा. आयुर्वेद महामंडळाचे सभापति पं. शिवशर्मा यांनीं संस्थेच्या कार्यालयाचें उद्घाटन केलें. हा समारंभ माधवबागेंत झाला.

या संस्थेच्या शाखा सौराष्ट्र, गुजरात, महाराष्ट्र व कर्नाटक या भागांत पसरल्या असून १) दंतवैद्य लाभशंकर फूलशंकर शुक्ल (राजकोट) २) दंतवैद्य रमेशचंद्र दीनमणीशंकर वैद्य (सुरत) ३) वैद्य माधव गणेश शेंड्ये, हाउस सर्जन, ताराचंद रामनाथ रुग्णालय (पुणें) व वैद्य पां. वि. जायदे (हुबळी) हा कार्यकर्तागण संस्थेस लाभला आहे. संस्थेचे प्रमुख दंतवैद्य किशोरदास गुप्ता हे असून त्यांच्या कन्या श्री. चंद्रा गुप्ता या मंत्री आहेत. संस्थेचे प्रयत्न अभिनंदनीय आहेत.

लसूण, कुडा सूचिकाभरणें

सरकारनें इंजेक्शन कारखान्यावर सूचिकाभरणें बनविण्यास बंदी घातली. त्याचा परिणाम म्हणून कांहीं उद्योगी वैद्यांनीं स्वतःच इंजेक्शन द्रव्यें तयार करण्यास सुरवात केली आहे.

रत्नागिरी जिल्ह्याच्या दौऱ्यांत वेंगुर्ला येथें वैद्यराज दि. कृ. मराठे हे लसुणाचें आसव (रसोनासव) बनवितात व ते ४।५ वेळां फिल्टर कागदानें गाळून घेऊन बाटलींत भरून ठेवतात व त्याचें इंजेक्शन १-२ सी. सी.चे देतात. नाजूक प्रकृतीच्या लोकांना तें देणें झाल्यास त्यांत $\frac{1}{3}$ प्रमाणांत ग्लिसरिन मिसळतात, असें कळलें.

कुडामूळसाल, महासुदर्शन काढा यांचीहि त्यांनीं अशींच आसव पद्धतीनें द्रव औषधें बनवून, ४।५ वेळ फिल्टर करून सूचिकाभरणें तयार केलीं आहेत. यांचा उपयोगहि लौकर दिसतो व रोग्याकडून पैसे मिळण्यास त्याचा चांगला उपयोग होतो.

कडुनिंबाच्या तेलाचा उपयोग

साबण आणि औषधी धंद्यांत अत्यंत महत्वाचा कच्चा माल असलेल्या कडुलिंबाच्या तेलाचें, बियांचें जमविणें, तेल काढणें आणि त्यापासून साबण तयार करणें यांकरितां एका संघटनेची स्थापना पंचवार्षिक योजनेंत अन्तर्भूत आहे. साबणाच्या धंद्यांत याचा उपयोग झाल्यास इतर तेलांचा मोठ्या प्रमाणांवर खाद्यपदार्थांसाठीं उपयोग करतां येईल, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेंत केलेल्या संशोधनावरून या तेलाचा इतर धंद्यासाठींहि उपयोग करतां असें दिसून आलें आहे.

गुळवेल सत्व व बांकेरी भाते ५ रु. रत्तल, उत्तम मध दशमुळें व इतर २०० फोंडाघाटच्या वनस्पती व त्यांचीं चूर्णें मागणीप्रमाणें पुरवूं.
परुळेकर ब्रदर्स, मोंगल लेन, मुंबई १६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार—

धात्रीलोहाचा पाठ

ता. १६।२।५३ च्या आयुर्वेद पत्रिकेंत धात्रीलोहाचा पाठ प्रसिद्ध झाला आहे. धात्रीलोहाचे एकंदर तीन पाठ आहेत. आम्ही (आयुर्वेदाश्रम फार्मसी) वॉटा दवाखान्यांस पुरविलेल्या धात्रीलोहाचा पाठ पुढील— प्रमाणें आहे. सदर औषध रसचंडांशु पित्तरोगचिकित्सा पान ३५७ प्रमाणें तयार केलें आहे. त्यांत आवळकंठी चूर्ण ३२ तो. लोहभस्म १६ तो. जेष्ठमध चूर्ण ८ तोळे हीं द्रव्यें असून ह्या सर्वांस आवळकंठीच्या काढ्याच्या सात भावना दिल्या आहेत, व ५ ग्रेनची एक टॅब्लेट आहे. पाण्डुरोगांत लोहकल्प स्वस्त प्रमाणांत देतां यावा म्हणून सदर औषध काढलें आहे.

आपण प्रसिद्ध केलेल्या पाठाला फक्त गुळवेलीच्या रसाच्या भावना आहेत. बाकी सर्व द्रव्यें व पाठप्रमाण एकच आहे. धात्रीलोहाचा तिसरा पाठ भैषज्यरत्नावली ४२४ पान शूलाधिकार ह्यांत आहे, व हा फक्त लेहप्रमाणें असतो.

—श्री. त्र्यं. महाजनी

अहमदनगर } वर्कर्स-मॅनेजर, आयुर्वेदाश्रम फार्मसी

जीवाणुनाशक वनस्पति

आयुर्वेदपत्रिकेंतील ता. १६ फेब्रुवारीच्या अंकांत 'वनस्पती व जीवाणुनाशक शक्ति' या मथळ्याखालील व्याख्याते श्री. चंद्रशेखर गणेशशास्त्री जोशी एम्. एस्सी. यांच्या व्याख्यानाचा सारांश, आमच्या आयुर्वेदामध्यें व्याख्यात्यांच्या मनाजोग्या जंतुनाशक वनस्पती सांपडलेल्या दिसत नाहींत असा आहे. त्याच्यावर मला अल्पबुद्धीनें लिहावेसें वाटतें म्हणून आपणाकडे लिहून कळवीत आहे.

१२ तासांत कीड मरते

आमच्या वडिलांचे वेळेपासून माहीत आहे व आम्ही हल्लीं वापरीतहि आहों, पण ती वनस्पती माणसांचे जंतूवर व ती कोणकोणत्या जंतूंवर उपयोगास येईल याचें संशोधन झालेलें नाहीं, पण आम्ही इतके संशोधन केलें आहे कीं जनावरांच्या क्षतांत (जखमेंत) आळ्या, किडे झाले असतांना त्या जनावरास आम्हांस माहीत असलेली वनस्पती चारली असतां (खावयास दिली असतां) साधारण १२ तासांत किडे मरतात. माणसांना खावयास देऊन त्याचे कोणत्या जंतूवर कसे परिणाम होतात हें जर कोणी पहात असेल तर मी त्या वनस्पतीचें प्रत्यक्ष करून दाखवीन. मी स्वतः ती वनस्पती खाऊन दाखवीन.

वेलींच्या मुळांचा उपयोग करणें

मी ही वनस्पती खाल्लेली आहे, अजूनही खाऊन दाखवीन. वनस्पती नेहमीं डोंगराच्या आश्रयास असते. या वनस्पतीचे वेल आहेत, त्या वेलाचीं मुळें खावयास द्यावयाचीं असतात, इतकीच आम्हास माहिती आहे. त्याचें पंचांग दिलें असतांना काय होईल हें आम्हांस पाहातां आलें नाहीं, तरी त्याचे आपण संशोधन कराल अशी आशा वाटते व मग त्याचे गुणधर्म व प्रमाण पहावयास मिळेल.

आम्ही पडलों द्रव्यहीन, त्यामुळें आमच्या वनस्पतींना पुढें आणावयास मार्ग नाहीं. "

—शि. पां. गणपुले

———

काढे टिकाऊ कसे करावेत ?

तारीख १ फेब्रुवारीच्या "आयुर्वेदपत्रिके"च्या अंकांत वैद्य आ. बा. साधले, यांनीं मुद्रा वगैरे न करतां व धायटीचें फूल न वापरतां काढे टिकाऊ कसे करतात याविषयीं माहिती विचारली आहे. त्याविषयीं मला जी कांहीं थोडी माहिती आहे, ती मी पुढें देत आहे.

रेक्टिफाइड स्पिरिटचा उपयोग

काढे किंवा स्वरस खराब होऊं नयेत म्हणून बहुतेक वैद्यवर्ग त्यामध्यें रेक्टिफाइड स्पिरिट कांहीं प्रमाणांत मिसळून बाटल्या भरून ठेवत असत, असें मी पाहिलें आहे. रेक्टिफाइड स्पिरिट घातल्यास काढे खराब होत नाहींत. —वैद्य जे. बी. सातोसे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार—

जमीन-मालक वैद्याची कहाणी

मी व्यवसायानें जसा वैद्य आहे तसाच मुंबई-कुळकायद्याचे भाषेंत एक जमीन-मालकहि आहे. जमीनमालक ही जात एखाद्या गुन्हेगार जातीप्रमाणें झोडपण्यास पात्र आहे, अशी मुंबई सरकारची या जातीबद्दल भावना झाली असल्याकारणानें या जातीला नेस्तनाबूत करण्याकरितां मुंबईसरकारच्या कायद्याच्या टाकसाळींतून कायद्याचीं नाणीं बाजीरावी पद्धती-प्रमाणें भराभर बाहेर पडत आहेत, व नागरिकांचे मूलभूत हक्कहि या जमीनमालकांना नाकारले जात आहेत. अशा या कायद्याचे वणव्यांत सांपडलेला मी एक प्राणी आहे.

समाजशोषक जळवा

संस्थानिक व जमीनमालक या समाजशोषक जळवा असून त्यांचेकडून होणारें शोषण जितक्या लवकर थांबेल तितक्या लवकर थांबविण्याचा सरकार प्रयत्न करीत आहे, कारण सरकारची भावनाच वरीलप्रमाणें आहे.

कायद्याची विचित्र रचना

कुळकायद्याचे आरंभीं जमीन कसणारे जमीन-मालक यांची संख्या प्रतिशत ५५ ते ६० टक्के होती. आतां ४५ प्रतिशत कुळें ५ ते १० एकराचेहि आंत जमीन धारण करणारीं होतीं व आहेत. ॲबसेन्टि-लॅंड-होल्डर्स वगळले तर बाकीच्या जमीनमालकांना कायद्यानुरूप स्वतःची जमीन कसणेस दिली पाहिजे असें आहे. परिणामतः ९० ते ९५ टक्के शेतकरी हे मजूर व्हावयाची रचना कायद्यानेंच झाली आहे.

विचित्र हिशेब पद्धति

एकाद्या तळयाच्या खोलीचें सरकारी माप अनेक ठिकाणीं गुडघाभर असणाऱ्या खोलीचें माप घेऊन काढावयाचें व तळयाच्या खोलीची सरासरी गुडघाभर निघाली कीं, त्या तळयांतून आपणांस सहज पार होतां येईल असा हिशेब काढण्याची विचित्र पद्धति सरकार अवलंबित आहे.

इकडील जमिनींचा मगदूर

आर्धीच जेमतेम तीन महिन्यांच्या निर्वाहापुरे उत्पन्न होईल अशी जमीन आहे. नऊ महिने बाहे-रून अन्न मिळवून आणावें लागतें अशी रत्नागिरीची पिढीजात परंपरा आहे. अशा परिस्थितींत ह्या काय-द्याच्या कचाट्यांत मी सांपडलों आहे.

बदलती सामाजिक सत्ता

१९१४ चें लढाईनंतर इंग्लंडचा मजूर प[क्ष] जसा सत्ताधीश झाला तसा आमचे जिल्ह्यांतील मजू[र] व शेतकरी अशिक्षितपणामुळें सत्ताधीश होऊं शक[ला] नसला तरी त्यानें आपलें स्थान उंचावलें व जमीन-मालकाकडून अत्याचार पिळवणुक वा जुलूम करून घेण्याच्या परिस्थितींत तो राहिलेला नाहीं. अशांत[च] १९३९ चे लढाईंत व त्यानंतर त्यांच्या सामाजि[क] सत्तेंत निश्चित वाढच झाली.

त्रिविध आक्रमण

लोकशाहीची संवय नाहीं आणि पदरीं अ-शिक्षितपणा यामुळें आमचेकडे अडाण्यांचें सामाजि[क] राज्य निर्माण झालें असून त्याचा परिणाम म्हणू[न] जमीन-मालकांवर तामसी आक्रमण होत आहे. कायद्याचा एकतर्फी अंमल चालवून नवीन सरकार राजसी आक्रमण करीत आहे. व पू. विनोबाजींनीं जमीनमालकांवर सात्विक आक्रमण चालविलें आहे. वैद्यक व्यवसाय संभाळून जो वेळ मिळेल त्या वेळांत हीं तामस, राजस व सात्विक आक्रमणें परतवावीं कशीं या विचारांत मग्न व्हावें लागत असल्यामुळें सार्व-जनिक कार्याला सवडच राहात नाहीं, अशी माझी परिस्थिति झालेली आहे.

—एक विचारमग्न जमीनमालक वैद्य

बालबोध आरोग्य (मराठी)
लेखकः-डॉ. मल्हार वि. आपटे, बी. एस्सी.
किंमत ४ आणे, ट. ख. वेगळा.
-: वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक :-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभविक चिकित्सा प्रकरण ९ वें- लेखकः-एक वृद्ध वैद्य

रक्तपित्त (Hæmorrhage) चिकित्सा

आधुनिक शास्त्रामध्यें या व्याधीला hæmorrhage अशी संज्ञा देण्यांत येते. परंतु त्यांच्या मतें हा कोणताहि स्वतंत्र व्याधी नसून तो दुसऱ्या व्याधीचा उपद्रव किंवा लक्षण गणला जातो. उदाहरणार्थ क्षय झाला असतां मुखावाटें खोकल्याबरोबर अधिक प्रमाणांत कधीं कधीं रक्त येतें. त्याचप्रमाणें शरीरांत उष्णता आधिक झाली म्हणजे शरीरांतली, तोंडांतली किंवा फुफ्फुसांतली एखादी रोहिणी (Artery) फुटून त्यांतून रक्त येतें किंवा नाक फुटून रक्त येतें. अशावेळीं वर दिलेली हेमरेज ही संज्ञा या उपद्रवाला दिली जाते.

कित्येक शेर रक्त जातें

आयुर्वेदांत हा एक स्वतंत्र व्याधि गणला जातो. याचें कारण असें कीं, इतर कोणताहि व्याधि पूर्वी नसतांनासुद्धां हा उत्पन्न होत असतो. शरीरांत असणारीं नऊ छिद्रें (दोन कान, दोन नासिकाद्वारें, दोन डोळे, एक मुख, एक गुद व नववा मूत्रमार्ग) आणि स्त्रियांस विशेष असणारा योनिमार्ग, त्याचप्रमाणें कधींमधीं स्तनद्वय यांतूनहि या रक्ताचा जेव्हां अधिक प्रमाणांत स्राव होऊं लागतो त्यावेळीं त्यास रक्तपित्त अशी संज्ञा देंण्यांत आली आहे. अशावेळीं शरीरांत पूर्वीपासून कोणत्याहि प्रकारच्या उष्णतेसंबंधींचा म्हणजे पित्ताचा विकार नसतांहि एकाएकीं विशेषेंकरून मुख किंवा गुद द्वारा अत्याधिक प्रमाणांत (कित्येक शेर) रक्त बाहेर पडते. चिकित्सा करणारे नवीन वैद्य तें पाहून अतिशय घाबरे होतात. परंतु तसें कांहीं कारण नसतें. पुढें वर्णन केलेले उपचार केले असता तें शांत होतें. म्हणून धैर्यानें चिकित्सा करण्यास प्रवृत्त व्हावें.

पित्तदोषाची व रक्तधातूची विकृति

या व्याधींत रक्त बाहेर पडतें, आणि तें विशेषतः पित्तदोषाची विकृति अधिक प्रमाणांत झाल्यामुळें पडतें, म्हणून त्याला रक्तपित्त अशी संज्ञा दिलेली आहे. पित्त आणि रक्त या दोन्हींचा दोष-दूष्य संबंध तर आहेच परंतु आश्रयाश्रयीभावहि आहे. सबब या ठिकाणीं प्रसंगतः थोडेसें या आश्रयाश्रयीभावाचें वर्णन करूं.

आयुर्वेद प्रगतिपर आहे

चरक आणि सुश्रुत हे दोन्ही अति प्राचीन ग्रंथ असून देखील त्यांच्यांत दूष्यें आणि दोष यांच्या परस्पर आश्रयाश्रयीभावाचें विवरण स्पष्टतया केलेलें आढळत नाहीं. परन्तु वाग्भटांत मात्र तें सांपडतें. यावरून असें सिद्ध होतें कीं, आयुर्वेदशास्त्र हें प्रगतिपर शास्त्र राहिलेलें आहे. आजकाल त्या शास्त्रावर जो अप्रगतिपर (non-progressive) असल्याचा आरोप केला जातो तो अशुद्ध आहे. आधुनिक शास्त्रें प्रगतिपर म्हटलीं जातात. कारण त्यांच्या मूल सिद्धांतांत देखील प्रति दिवस जरी नाहीं तरी प्रति दहापांच वर्षांत सारखें परिवर्तन होत असतें. आणि यालाच प्रगतिशीलत्वाचें लक्षण समजलें जातें. याचें कारण केवळ इतकेंच कीं, सिद्धान्त निश्चितच झालेले नसतात. अर्थात् ही शास्त्राच्या बाल्यावस्थेची स्थिति होय.

राज्यसंस्थेची मदत आवश्यक

आयुर्वेदाचें तसें नाहीं. शेंकडों वर्षांच्या दैनंदिन अनुभवानंतर कित्येक हजार वर्षांपूर्वी त्रिदोष-सिद्धांत निश्चित केला गेला. तेव्हांपासून आजतागायत तोच सिद्धांत कायम असून त्या सिद्धांताला बळकटी आणणारे असे अनेक प्रयोग आज देखील स्वतःसिद्ध आहेत. त्यांचें नीट अध्ययन करून रुग्णावर प्रत्यक्ष प्रयोग करणारे वैद्यहि नाहींत, त्यांना साधनीभूत होणारी रुग्णालयेंहि नाहींत, आणि या सर्वांकरितां नितांत आवश्यक असणारी राज्यसंस्थेची मदत देखील नाहीं. ती प्राप्त होऊं लागल्यास हे सर्व सिद्धांत पूर्णपणें निश्चित असल्यामुळें त्यांच्याद्वारा होणारा अनुभव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हाच घेण्यास कित्येक वर्षे पाहिजेत.

निरनिराळ्या व्याधींवर ६०० बस्ति

उदाहरणार्थ, शास्त्रांत निरनिराळ्या व्याधीवर सहाशें बस्ति वर्णिलेले आहेत. त्यांचा अनुभव घेतल्या-खेरीज या बस्ति-चिकित्सेंत पुढील संशोधन तें काय होऊं शकणार? आयुर्वेदाचीं अशीं कित्येक क्षेत्रें आजमितीला अस्पृष्ट (Un-touched) अशीं आहेत. असें असतांना आयुर्वेदशास्त्राला अप्रगतिपर म्हणणें म्हणजे स्वतःचे तच्छास्त्र विषयक अध्ययन केल्या-शिवायच आरोप करणें ठरतें. असो.

तीन दोष व दहा दूष्यें

चरक, सुश्रुतांत ज्या आश्रयाश्रयीभावाचा नामनिर्देश देखील नाहीं त्याचें वर्णन जें वाग्भटानें केलें तें काय प्रत्यक्ष अनुभवाशिवाय केलेलें असेल? त्यायोगें संपादित ज्ञानामुळें चिकित्साकार्य किती सुलभ झालेलें आहे तें अनुभाविक वैद्यांना सहज सांगता येतें. या आश्रयाश्रयीभावाप्रमाणें वात, पित्त, कफ हे तीन दोष आणि रस, रक्त, मांस, मेद, अस्थि मज्जा आणि शुक्र हे सप्तधातु व स्वेद, मूत्र, पुरीष हे तीन मल मिळून दहा दूष्यें यांचा एक दुसऱ्या संबंधीं आश्रयाश्रयीभाव अर्थात् दूष्यें हीं आश्रय-स्थानें व दोष हे आश्रय करून राहणारीं द्रव्यें अशीं आहेत. त्यांपैकीं वात हा दोष अस्थि धातूचा आश्रय करून राहतो, पित्त हा दोष रक्त व स्वेद या दोन दूष्यांचा आश्रय करून राहतो आणि कफ दोष बाकी राहिलेल्या सात दूष्यांचा (रस, मांस, मेद, मज्जा, शुक्र, मल आणि मूत्र) आश्रय करून राहतो.

एकच आहार दोषधातुवर्धक

याचा अर्थ असा कीं ज्या आहार विहारांनीं पित्तदोष वाढेल किंवा कमी होईल त्याच आहार-विहारांनीं रक्तधातु व स्वेद हा मल वाढतील किंवा कमी होतील. त्याचप्रमाणें ज्या आहारविहारांनीं शरीरांतील कफदोषाची वृद्धि किंवा क्षय होईल त्याच आहारविहारांनीं शरीरांतील रसधातु, मांस, मेद, मज्जा, शुक्र, मल व मूत्र हे पदार्थहि निश्चयेंकरून वाढतील किंवा कमी होतील. शास्त्रांत द्रव्यांचे गुणदोष वर्णन करीत असतांना प्रत्येक द्रव्य कोणत्या दोषांस वाढवितें किंवा कमी करतें हें अनुभव व तर्कसिद्ध प्रमाणांनीं वर्णन केलेलें असतें. त्यांत बहुधा शरीरांतील कोणता धातु किंवा मल तें द्रव्य वाढवील किंवा कमी करील याचें वर्णन क्वचित असतें किंवा नसतें असें म्हटलें असतां देखील चालेल.

दूष्यविकृतिहि जाणणें आवश्यक

शरीराची किंवा रुग्णाची परीक्षा करीत असतांना ज्याप्रमाणें दोषविकृतिविज्ञान करून घेणें अवश्य असतें त्याचप्रमाणें त्या विशिष्ट परिस्थितींत कोणती दूष्यें विकृत झालेलीं आहेत हें जाणणेंहि तितकेंच आवश्यक असतें. त्यासंबंधीं विस्तृत लक्षणें विकृतिविज्ञानीय अध्यायांत वर्णन केलेलीं आहेत. त्यांचें संपूर्ण ज्ञान चिकित्सकेकरतां आवश्यक आहे. याप्रमाणें दोषदूष्यांच्या विकृतींचें ज्ञान झाल्यानंतर चिकित्सा करतांना केवळ एका विशिष्ट दोषाला नाश करणारें एक विशिष्ट द्रव्य वापरून काम भागत नाहीं. तर तें द्रव्य विकृत झालेल्या विशिष्ट दूष्याचाहि नाश करतें किंवा नाहीं हें पहावें लागतें. परंतु शास्त्रांत तर केवळ दोषवर्धक किंवा दोषनाशक गुण दिलेले असतात. अशावेळीं त्या विशिष्ट दूष्याची वृद्धि किंवा क्षय कशी करावयाची हा प्रश्न उद्भवतो. अशावेळीं या आश्रयाश्रयीभावाची चांगली मदत होते.

मेदोधातूचें उदाहरण

अर्थात् तें विकृत झालेलें दूष्य कोणत्या दोषाला सदैव आश्रयभूत असतें तें जाणून त्या दोषाचीहि चिकित्सा केली असतां दोष आणि दूष्य हे दोन्ही समप्रमाणांत आणतां येतात. उदाहरणार्थ, शरीरांत मेद धातूची कमतरता असली तर त्या धातूचा आश्रय घेऊन राहणारा जो कफ दोष त्या कफाची वृद्धि करणारे दूध, तूप, साखर इत्यादि पदार्थ उपयोगांत आणले असतांना तदाश्रयीभूत असणारा धातु मेद अवश्य वाढेल. त्याचप्रमाणें मेद धातु वृद्ध झालेला असेल तर त्याकरतां यवासारखे कफाला कमी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करणारे अन्न आणि व्यायामासारखा कफाला कमी करणारा विहार केला असतां तो मेद कमी होईल. याप्रमाणें हा आश्रयाश्रयीभाव चिकित्सेला फार उपयुक्त असा ठरतो.

विशेष स्मरणीय अपवाद

या आश्रयाश्रयीभावांत जो एक विशेष अपवाद आहे तो वाग्भटानें स्पष्ट केलेला आहे. आणि तो आपणहि पूर्णपणें ध्यानांत ठेवला पाहिजे. तो अपवाद अस्थिधातु व वात दोष या दोन आश्रयाश्रयीभूत द्रव्यांसंबधीं आहे. ज्या द्रव्यांनीं वाताची शरीरांत वृद्धि करितां येईल, (उदाहरणार्थ फुटाणे, वाटाणे) त्यानेंच आश्रयाश्रयीभावाच्या नियमाप्रमाणें अस्थिधातुचीहि वृद्धि झाली पाहिजे. परंतु तसें होत नाहीं. उलट, ज्या द्रव्यांनीं वाताची वृद्धि त्याच द्रव्यांनीं अस्थींचा क्षय होतो. आणि ज्या द्रव्यांनीं वाताचा क्षय होतो (उदाहरणार्थ, तेल, तूप, इत्यादि स्निग्ध पदार्थ तसेंच मद्य, विषें आदि उष्ण पदार्थ) त्यानें अस्थींची वृद्धि होते.

तर्पणानें शरीराची वृद्धि

याला कारण असें कीं शरीराची वृद्धि ही तर्पणक्रिया केल्यानें होते. अर्थात् खाद्य, पेय पदार्थ भरपूर प्रमाणांत शरीरांत पचन झाले म्हणजे सर्व धातूंची व त्या बरोबर अस्थि धातुचीहि वृद्धि होते आणि ही वृद्धि कफदोषाला वृद्ध करण्यास कारणीभूत होते. परंतु वात दोष हा रूक्ष आणि लघु असल्यामुळें धातूंची वृद्धि करणारा आहार विहार गुणानें स्निग्ध व गुरु असल्यामुळें तो वात गुणांच्या विरुद्ध गुणांचा होतो आणि त्यामुळें वाताचा क्षय करतो. म्हणून जेव्हां वाताची वृद्धि करण्याची शरीरांत आवश्यकता असेल त्यावेळीं अपतर्पण म्हणजे लंघन केलें पाहिजे. म्हणून अस्थि आणि वात यांचा जरी आश्रयाश्रयीभाव असला तरी पण शरीरांत अस्थिक्षय झाला असेल (उदाहरणार्थ, लहान मुलांना होणारा कार्श्य रोग- Rickets) तर त्या बालकांस भरपूर पुष्टि देणारा असा आहारच दिला पाहिजे. अशा आहारानें अस्थींची वृद्धि होईल, तर वाताचा क्षयच होईल. आणि क्षीण वात समप्रमाणांत आणण्यास त्या आहाराची मदत होईल. असा हा आश्रयाश्रयीभाव पूर्णपणें समजून घेऊन तदनुसार चिकित्सेस प्रवृत्त झालें पाहिजे. हे नियम प्रत्येक व्याधीमध्यें उपयुक्त ठरतात. परंतु सध्यां वर्णन करीत असलेल्या रक्तपित्त व्याधीमध्यें त्याचा विशेष संबंध आहे म्हणून येथेंच तो आश्रयाश्रयीभाव वर्णन केला.

रक्तपित्ताचे दोन प्रकार

रक्तपित्त व्याधींत रक्त आणि पित्त ही दूष्य दोषांची जोडी प्रधानतया विकृत होत असते. आणि म्हणून हा रोग साधारणतः पैत्तिकच आहे असें म्हणतां येईल. परंतु शरीरांत सर्व रोग उत्पन्न करण्याकरतां सर्वशरीरसंचारी असा जो व्यान वायु तोच पित्त आणि कफ या दोषांना विकृतस्थानीं नेऊन विकार उत्पन्न करीत असतो म्हणून या रक्तपित्ताचे दोन प्रधान प्रकार होतात. एक कफपित्तज व दुसरें वातपित्तज. शारङ्गधर संहितेंत पित्तं पंगुः कफः पंगुः पंगवो मलधातवः । वायुना यत्र नीयन्ते तत्र वर्षन्ति मेघवत् ॥ शा. ५-२५ हें वाक्य आढळतें. यावरून प्रत्येक व्याधीस मूलकारणीभूत वात असतोच. परंतु 'व्यपदेशस्तु भूयसा' या नियमाप्रमाणें ज्या दोषाचें आधिक्य असेल तज्जन्य तो प्रकार आहे असें शास्त्रांत म्हटलें जातें.

ऊर्ध्वग रक्तपित्त कफपित्तज

वर वर्णन केलेल्या कफपित्तज रक्तपित्तास ऊर्ध्वग रक्तपित्त अशी संज्ञा दिलेली आहे. दुसऱ्या म्हणजे वातपित्तज रक्तपित्तास अधोग रक्तपित्त असें म्हणतात. पहिलें उर्ध्वस्थानीं असणाऱ्या सात छिद्रांतून विशेषतः मुख व नासिका यांतून बाहेर पडतें. दुसरें म्हणजे अधोग गुद व मूत्र मार्गांतून बाहेर पडतें. या खेरीज शरीरांत असंख्य रोमरंध्रें आहेत. रक्तपित्ताची अत्यधिक वृद्धि झाली असतांना तें या रोमरध्रांतून देखील (फारच क्वचित् प्रसंगीं) बाहेर पडतें. त्या स्थितींत तें असाध्य असतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पित्ताला वाढविणारे ३ रस

रक्तपित्तामध्यें प्रधानदोष पित्त असल्यामुळें पित्ताला वाढविणारे तीन रस-अम्ल, लवण व कटु यांचे विशेष सेवन केलें असतांना, तसेंच, तीक्ष्ण (मिरचीसारखे) व उष्ण पदार्थ सेवन केलें आणि उन्हांत फार फिरलें किंवा व्यायाम अधिक केला, मार्गसंक्रमण व स्त्रीसेवन अत्याधिक केलें असतांना हा विकार उत्पन्न होतो. पित्ताच्या गुणाशीं समान गुण असणारे असे वर वर्णन केलेलें आहार-विहार प्रथम पित्ताला वाढवितात. आणि तें पित्त ज्या रक्तधातूचा आश्रय घेऊन शरीरांत राहतें. तें रक्तहि पित्ताच्या उष्णतेनें उष्ण झालें व प्रमाणांत वाढलें (कारण उष्णतेनें प्रसरण होतें) म्हणजे तें रक्त शरीरांतील रक्त नलिकांमध्यें समाविष्ट राहण्यास असमर्थ होऊन त्या नलिकांपैकीं एखादीला फोडून, तिच्यांतून बाहेर पडून, तिच्याजवळ असणारे जे शारीरछिद्र त्यांतून बाहेर पडतें. रक्ताचा प्रवाह शरीरभर अविरत सारखा चालू असल्यामुळें या फुटलेल्या नलिकेंतूनहि तो प्रवाह अविरत बाहेर पडतो. आणि म्हणूनच अधिक प्रमाणांत रक्तस्राव होतो. अशावेळीं त्या नलिकेंतील रक्तास गोठून ती बंद करणें आणि पित्ताच्या उष्णतेमुळें पातळ झालेल्या रक्तास पुन्हां शीत उपचारांनीं पूर्वस्थितीस आणणें या दोन क्रिया ज्या ज्या द्रव्यांच्या उपयोगांनीं होऊं शकतात त्या त्या द्रव्यांचा प्रयोग, आणि रुग्णास स्वस्थ पडून राहूं देणें, हा विहार हीच योग्य चिकित्सा ठरते.

पित्ताचे वर्ण

आयुर्वेदांत प्रत्येक दोषामुळें शरीरांत उत्पन्न होणारी लक्षणें व वर्ण यांचें विवरण केलेलें आहे. पित्तदोष स्वतःच पिवळया, हिरव्या व निळया अशा वर्णाचा असल्यामुळें पित्तविकृतिजन्य दोष शरीरांतील त्वचा, मूत्र, मल, नेत्र, नख इत्यादींना पिवळा हिरवा किंवा निळा असे वर्ण उत्पन्न करतात. त्यामुळें केवळ पैत्तिक रक्तपित्तांत बाहेर पडणारे जें रक्त तें पित्ताच्या अत्याधिक वृद्धीमुळें झाल्याकारणानें त्याचा वर्ण कषाय (गेरूवा), काळा, गोमूत्राच्या वर्णाचा, घेरोशाच्या वर्णाचा किंवा सुरम्याच्या वर्णाचा असतो.

कफयुक्त रक्तपित्तांतील रक्ताचा वर्ण पांढरा [पांडु], बुळबुळीत [पिच्छिल] चिक्कण असा असून तें शुद्ध रक्तापेक्षां जरासें सांद्र (दाट) असतें.

रक्तपित्ताचें साध्यासाध्यत्व

वातिक रक्तपित्तांतील रक्ताचा वर्ण लालसर व काळसर, फेंसयुक्त आणि चिक्कणपणारहित असा असतो. यावरून रक्तपित्तांत असणारी साधारणतः दोषविकृति लक्षांत आणावी. आणि तदनुसार चिकित्सा करावी. ऊर्ध्वग रक्तपित्त साध्य असतें. अधोग रक्तपित्त याप्य (पथ्य व चिकित्सा चालू असतां बरें राहणें व तीच बंद केली असतां पुन्हा सुरू होणें) असें असतें आणि दोन्ही मार्गांनीं चालू असलेलें असाध्य असतें. त्याचप्रमाणें केवळ एक दोषज साध्य, द्विदोषज याप्य, आणि त्रिदोषज हें असाध्य असतें. जें रक्तपित्त मंदाग्नि मनुष्यास किंवा अन्य रोगांनी क्षीण झालेल्या मनुष्यास अथवा वृद्धापकालीं झालें असेल, अथवा ज्या मनुष्यास अन्नच जात नाही अशास झाले म्हणजे तें असाध्यच असतें.

तावडतोब चिकित्सा सुरू करावी

या सर्व कारणामुळें रक्तपित्त व्याधीची चिकित्सा तो होताक्षणीं सुरू केली पाहिजे. प्रथम रुग्णास स्वस्थ पडून राहण्यास सांगावें. सर्व प्रकारच्या चलनवलनादि क्रिया अजिबात बंद कराव्या. मलमूत्रोत्सर्ग पडलेल्या जागींच करण्याची व्यवस्था करावी. व सर्व प्रकारचें शीत उपचार करावे. पिण्यास थंड पाणी द्यावें. उन्हाळा असल्यास बर्फांत ठेवून थंड केलेलें पाणी द्यावें.

शास्त्रांत सांगितलेली शोधन क्रिया

रक्तपित्ताकरतां शास्त्रांत शोधनक्रिया सांगितलेली आहे. ती अशी— अधोग रक्तपित्त असल्यास वमनद्वारा साध्य होतें. ऊर्ध्वग असल्यास विरेचनद्वारा साध्य होतें. याचें कारण असें— रक्तपित्त

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्याधि प्रतिलोमक्रियासाध्य आहे. प्रतिलोम म्हणजे उलट. अर्थात् ऊर्ध्वग रक्तपित्त कफदोषयुक्त असल्या-मुळें आणि कफाचें स्थान आमाशय, फुफ्फुसें इत्यादि पक्कामाशयमध्याच्या वरचा शरीराचा भाग असल्या-मुळें कफाचा नाश करण्याकरतां सर्वसाधारण शोधन वमन हें ठरतें. पण तें वमन हें कफाचें अनुलोमन मुखद्वारा करीत असतें. अर्थात् वमन ही कफाची अनुलोमक्रिया होते. त्याच्या उलट, प्रतिलोमक्रिया म्हणजे विरेचन होय. परंतु हें विरेचन करवितांना रुग्णाची शक्ति कितपत विरेचन सहन करण्याजोगी आहे तें प्रथम पाहिलें पाहिजे. तो जर बलवान असेल, तरच संशोधन करावें; नसल्यास पुढें वर्णन केलेले शमन प्रयोग उपयोगांत आणावे. त्याचप्रमाणें अधोग रक्तपित्ताला वमन हीच प्रतिलोमक्रिया ठरते. परंतु तीहि रुग्ण अत्यंत बलवान् असेल तरच उपयोगांत आणावी.

अडुळसा पंचांगाचा काढा

(१) रक्तपित्ताच्या अनेक सुलभ उपायांपैकीं अग्रगण्य असा उपाय म्हणजे अडुळसा (आटरूष) पंचांगाचा उपयोग होय. याच्या पंचांगाचा काढा करून ग्रीष्मऋतुखेरीज इतर ऋतूंत त्यांत मध मिसळून द्यावा.

अडुळसा स्वरस + मध

(२) याच आटरूषांच्या पानांचा स्वरस मधा-बरोबर द्यावा. या पानांना कितीहि बारीक कुटलें तरी त्यांचा रस निघत नाहीं. सबब स्वरस काढण्याची युक्ति अशी:—एका कल्हईच्या गंजांत अर्धें पाणी भरावें. वर एक स्वच्छ कापड झांकून त्यावर स्वच्छ केलेली अडुळशाचीं पानें ठेवावी व त्यावर पुन्हा एक ताम्हण झांकण ठेवावें. हें भांडें चुलीवर ठेवून पाण्याची वाफ वर पानास लागली म्हणजे तीं वाफ-ळतात. अशा स्थितींत ती गरम असतांनाच दोन्ही हातांत ठेवून खूप जोरानें चोळावी, म्हणजे त्यांतून स्वरस निघतो. या क्रियेंत हात थोडे भाजतात खरे, परंतु त्याखेरीज अन्य उपाय नाहीं. हा स्वरस उन्हा-ळ्यांत खडीसाखर मिसळून व इतर ऋतूंत मध मिसळून द्यावा.

अडुळसा पानांचा पुटपाक

(३) अडुळशाचीं पानें वाटून त्यांचा पुट-पाक करावा. पुटपाकांचा विधि पहिल्या ज्वरप्रकरणांत ४७ व्या पानावर दिलेला आहे. तेथें सुंठीच्या ऐवजीं या पानांचा गोळा वापरावा. त्यांत तूप वगैरे कांहींहि मिसळूं नये. स्वांगशीत झाल्यावर हा गोळा दाबावा, म्हणजे त्यांतून जो रस निघेल त्यांत तेवढाच मध मिसळून द्यावा.

पानांचा काढा + लोध्र + कमलकेशर

(४) अडुळशाच्या पानांचा काढा तयार करून त्याच्यांत लोध्रचूर्ण, कमलकेशर, खडीसाखर व मध हे मिसळून द्यावे.

रक्तपित्तावर अडुळशाचा प्रयोग इतका मह-त्वाचा गणला गेला आहे कीं, खालीं दिलेला श्लोक वैद्यांनीं पाठ करण्यासारखा आहे. वासायां विद्यमा-नायामाशायां जीवितस्य च । रक्तपित्ती क्षयी कासी किमर्थमवसीदति ॥

अडुळसा व वाळा यांचा काढा

(५) अडुळसा व वाळा यांचा काढा मध आणि खडीसाखर मिसळून दिला असतांना ऊर्ध्वग रक्तपित्त नष्ट होतें.

(६) वाळा, चन्दन, मनुका, ज्येष्टमध व पिंपळी यांचा काढा मध मिसळून दिला असतांना रक्तपित्त बरें होतें.

पिकलेल्या उंबराच्या फळांचें पाणी

(७) पिकलेल्या औदुंबराचीं फळें बारीक वाटून थंड पाण्यांत त्यांना कोळून गाळलेलें पाणी खडी-साखरेंतून द्यावें.

बोरीच्या लाखेचें चूर्ण + प्रवाळभस्म

(८) बोरीच्या किंवा न मिळाल्यास पळसाच्या लाखेचें चूर्ण तीन मासे व तीन गुंज प्रवाळभस्म मिसळून हें मिश्रण एक तोळा लोणी व तितकीच खडीसाखर घेऊन त्यांत हें चूर्ण मिसळून द्यावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणजे कितीहि तीव्र रक्तपित्त असलें तरी शांत होतें. हें मिश्रण दिवसांतून आवश्यकतेनुसार दीड दीड तासांनीं देखील देतां येतें. आणि एकंदर आठ ते दहा खुराक दिल्यास देखील चालतें व हा प्रयोग प्रत्येक वैद्यानें अवश्य प्रथम करून पहावा. हा प्रयोग ऊर्ध्वग व अधोग अशा दोन्ही रक्तपित्तावर उपयोगी आहे. याचा निर्देश मागें अर्श चिकित्सेंत (अनुभविक चिकित्सा पान ७४ वर) केलेला आहे.

वासापंचांगघृत

(९) वासाघृत– अडुळसा, मूळ, पानें, शाखा व फुलें यासकट घेऊन त्यांत त्याच्या फुलांचाच कल्क घालून तूप तयार करावें. तें मधाबरोबर (अष्टम-प्रमाणांत) दिलें असतां तें रक्तपित्ताचा नाश करतें.

पांढऱ्या कोहळ्याचा पेढा

(१०) पांढरा कोहळा (कूष्माण्ड)– याचा केलेला पेढा हाही अन्न म्हणून रक्तपित्तावर उपयोगी आहे.

कूष्माण्डावलेह कसा करावा ?

पांच शेर कोहळ्याचा गीर घेऊन त्याला चांगला शिजवावा. नंतर त्यांतील पाणी काढून टाकून चौसष्ट तोळे तुपांत तो भाजावा. भाजतां भाजतां त्याचा रंग मधासारखा दिसूं लागला म्हणजे सव्वाशेर खडी-साखरेच्या कच्च्या पाकांत तो घालून त्यांत खालीं दिलेल्या औषधींचें चूर्ण घालावें. पिंपळी, सुंठ, जिरें, दालचिनी, विलायची, तेजपत्र, मिरें, व धनें हें प्रत्येकी दोन तोळे घेऊन तें त्या मिश्रणांत टाकावें. व सर्व मिश्रण विस्तवावर ठेवून चाटण्याजोगें घट्ट होईपर्यंत पळीनें घोटत रहावें. नंतर मिश्रण थंड झाल्यावर त्यांत बत्तीस तोळे मध मिसळावा. आणि नंतर एक तोळा कापूर व तितक्याच लवंगा बारीक चूर्ण करून मिसळाव्यात. हा अवलेह रक्तपित्तपीडित मनुष्यास रक्तपित्ताचा वेग कमी झाल्यानंतर दररोज महिना दोन महिनेपर्यंत नि न एक एक तोळा तरी द्यावा. म्हणजे त्यानें तो विकार पुन्हां उत्पन्न होत नाहीं. हा योग क्षयावरहि उपयोगी आहे. तसेच खोकला, श्वास, वांति, तहान, ज्वर इत्यादि उपद्रव असतांनाहि देता येतो. तो शुक्रवर्धक असून सर्व प्रकारे शक्ति वाढविणारा आहे.

रक्तपित्ताचें पथ्यापथ्य

रक्तपित्तावर दूध, भात व साखर हे अत्युत्तम पथ्य आहे. त्याचप्रमाणें आवश्यकतेनुसार तूप, गव्हाचे पदार्थहि देतां येतात. परंतु तेल, तिखट व व कोणताहि आंबट पदार्थ अजीबात देऊं नये. त्याचप्रमाणें मीठ किंवा इतर क्षारहि अजीबात बंद ठेवावे. डाळिंब, मनुका, अंगुर, केळ वगैरे गोड फळें द्यावीं. परंतु यापैकीं कोणतेंहि थोडे देखील आंबट नसावें ही काळजी घ्यावी. मधुर पदार्थ सर्व देतां येतात.

रक्तातिसार, रक्तार्श आणि अधोग रक्तपित्त या तिन्हींत गुदमार्गें रक्त बाहेर पडतें. सबब या तिन्ही-पैकीं हा विकार कोणता असावा या संबंधी शंका उत्पन्न होण्याचा संभव असतो. तरी यांतील भेद अनुभविक चिकित्सा पुस्तकाच्या ६५ व ६६ पानांवर स्पष्ट केला आहे. तो एकदां पुन्हां पहावा.

रक्तपित्ताकरितां उपयुक्त शोधन

रक्तपित्तावर शोधन क्रिया करावी हें वर सांगितलेलेंच आहे. त्याकरितां खालील योग उप-योगांत आणावे. विरेचना (जुलाब) करितां मनुका, जेष्ठमध व खडीसाखर बरोबर प्रमाणांत द्यावी. बाहव्या (आरग्वध) चा गीर किंवा निशोतराचें चूर्ण दुधां-तून द्यावें. वमनाकरितां नागरमोथा, इंद्रजव, ज्येष्ठमध व गेळफळ यांचें दूध तयार करून तें द्यावें.

पांढऱ्या कोडावर

श्री. अंबाजी धोंडू मोरे पो. वाडे जि. ठाणें लिहितात:– मी पुष्कळ औषधें केलीं. पण गुण आला नाहीं. खरोखर आपले प्रभावी औषधानें माझें मुलीचें संपूर्ण कोड नाहींसें झालें. किं. ५ रु. पोस्ट खर्च १५ आणे. माहिती मागवा:-

वैद्य के. आर. बोरकर

पोस्ट-मंगरुळपीर जि. अकोला (वऱ्हाड)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म. प्रांतीय वैद्य-मंडळाला साहाय्य देण्याचे विविध प्रसंग

वैद्यांच्या घरची मंगल कार्यें

प्रांतांतील अनेक वैद्यांच्या घरीं लग्न समारंभ मौंजिबंधनादि शुभ आनंददायी कार्यक्रम बहुधा कोणाना कोणाकडे सतत चालू असतातच. इंग्लंडच्या राज्यावर सूर्य कधींच मावळत नाहीं. ही उक्ति एक-काल जशी खरी होती तसेंच वैद्यांच्या घरीं लग्न अगर मौंजिबंधन झालें नाहीं असें वर्ष जात नाहीं, ही उक्तिहि जवळ जवळ सनातन आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. अशा कार्याकरितां कमी जास्त खर्च होत असतो. अशा या प्रसंगीं मनांत आणिल्यास वैद्यांना प्रांतीय वैद्य मंडळाची आठवण ठेवून मदत करणें सहज शक्य आहे.

नवीन घरांची वास्तुशांति

गेल्या दहा वर्षांत माझ्या माहितीप्रमाणें अनेक वैद्यांनीं आपल्या नवीन घरांची वास्तुशांत केल्याचें माझ्या आढळांत आलें आहे. ज्या वैद्यांनीं ही कमाई वैद्यक व्यवसायावर केली त्या वैद्यक व्यवसायाचे व आयुर्वेदाचे हिताहित पाहाणाऱ्या वैद्य संघटनेच्या प्रांतिक मंडळाची आठवण जर ठेविली तर अशा आनंददायक प्रसंगींहि भरगच्च मदत आपलें कर्तव्य व ऋणपूर्ति म्हणूनहि ते देऊं शकतील.

लग्न पहावें करून व घर पहावें बांधून या दोन्ही गोष्टींत अंदाजपत्रकापेक्षां अधिक रकमा अपरिहार्य-त्वानें खर्च होतातच. तेव्हां अशा या प्रसंगीं म. प्रां. वैद्य मंडळाची आठवण ठेवावी व आपल्या इच्छेस येईल तशी मदत आपण पाठवावी अशी विनंति आहे.

पुत्रजन्मोत्सव

लग्नमौंजीप्रमाणेंच सोयरहि अनेक वैद्यांच्या घरीं येतें. हेंही मी पाहिलें आहे व असा हा पुत्रजन्मोत्सव मोठाले खर्च करूं शकतो. या वेळींही प्रांतीय वैद्य मंडळाला मदत देणें हें कांहीं अशक्य नाहीं.

दिवंगतांना श्रद्धांजली

सोयराप्रमाणेंच सुतकहि क्रमप्राप्त आहे. दरसाल अनेक प्रथितयश वैद्यांचा दुखवटा आपण ठराव करून मानित आलो. त्यांना श्रद्धांजलीहि आपण अर्पण करीत आलो. त्यांचें स्मारक म्हणूनहि अल्पस्वल्प देणगीपासून मोठाल्या देणग्या याप्रसंगीं माणूस मनांत आणिल्यास देऊं शकतो. व वैद्यक व्यवसायावर ज्यांनीं आपलें जीवन व्यतीत केलें, मुलांबाळांचीं वरच्या दर्जाचीं शिक्षणें, लग्नकार्यें, एक ना अनेक गोष्टी केल्या; घरें, दारें, शेती, इष्टेटी केल्या; नांव लौकिक कमावला, त्या व्यवसायाच्या प्रतिष्ठेकरितां, त्या शास्त्राच्या प्रगतीकरितां, त्या दिवंगत व्यक्तींची स्मृति चिरंतन राहावी म्हणून मोठी देणगी प्रांतीय वैद्य मंडळास देणें हेंहि कौतुकास्पद होईल. अशी देणगी गेल्या वर्षी म. प्रां. वैद्य मंडळाला मिळाली आहे.

अन्नवस्त्राची तरतूद

घर बांधण्याप्रमाणेंच म्हणजे निवाऱ्याप्रमाणें अन्नवस्त्रांची कायमची तरतूद करण्याचे प्रयत्न वैद्यांकडून होत असतात. कोणी शेअर्स घेतो, कोणी थोडी फार जमीन घेत असतो. (आतां हें कठीण झालें आहे हें खरें आहे.) कोणी आणखी कांहीं कायम पुरवठ्याच्या गोष्टी करीत असतो. अशा-वेळींहि देय भाग देण्याच्या प्रवृत्तींत असणें मानवी स्वभावास सोडून नाहीं. प्रांतीय वैद्य मंडळ अशा वेळीं आपली आठवण ठेवण्याची वैद्यांना विनंति करीत आहे.

या सर्व व इतरहि प्रसंगा महाराष्ट्र प्रान्तीय वैद्य मंडळाला आपण मदत करूं शकतां. अगदीं लहानशा देणगीपासून तो ग्रंथ, औषधी, शेअर्स, देणग्या वगैरे स्वरूपांत "मंडळ देणग्या घेऊं शकते." आयुर्वेदाच्या सामान्य व उच्च प्रकारचें अध्ययन कर-णाऱ्या विद्यार्थ्यांकरितांहि मदत देण्याची आपली इच्छा आपणास प्रान्तीय वैद्य मंडळातर्फे सफलतेनें पुरी करतां येईल.

—वि. म. गोगटे, मंत्री

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पत्रिकेस सूचना

१) आयुर्वेद पत्रिका हें ६४ पृष्ठांचें मासिक करण्यात यावें.

२) त्यांत ३ विभाग असावेत ते येणेंप्रमाणें— (अ) शास्त्रीय विवेचन (ब) रुग्णचिकित्सा (क) वैद्यकीय समाचार.

३) वैद्य ज. के. सबनीस यांनीं लिहिलेल्या 'गुदस्थ वातप्रकोप' या धर्तीवर रुग्णचिकित्सा लिहिल्या जाव्यात. त्यांत आयुर्वेदीय औषधाव्यतिरिक्त आधुनिक सल्फाड्रग्ज, इंजेक्शन, एक्सरेज, रक्तमूत्र तपासणी वगैरे माहिती असावी.

४) दरसाल एक विशेषांक काढावा.

५) अँटिसेप्टिकप्रमाणें एक वर्षाची अनुक्रमणिकेसह बांधणी करणें सोईचें व्हावें.

—राधाकृष्ण कुलवाल

उत्तरें

१) मासिक करण्यानें 'वृत्तपत्र' चालविण्याचा उद्देश सिद्धीस जात नाहीं.

२) तीनही प्रकार सध्या चालू आहेत. पण ते स्वतंत्र तसे छापणें तूर्त जुळण्यासारखे नाहीं.

३) अशा निवडक रुग्णचिकित्सा मिळण्याची शक्यता कमी, कारण साधन संपन्न आयुर्वेदीय रुग्णालयें नाहींत.

४) हिंदी मासिकाप्रमाणें विशेषांक काढणें मराठी भाषेंत शक्य नाहीं कारण ग्राहक वर्ग अत्यल्प आहे.

५) ती गोष्ट इंग्रजी मासिकांची. हिंदी, इंग्रजी भाषेंत जास्त प्रति निघू शकतात म्हणून ते परवडते. मराठींत ते परवडत नाहीं. कारण ही भाषा समजणाऱ्या वाचकांची संख्या मर्यादित आहे. —संपादक

———

गुळाच्या दर्जांत सुधारणा

पुणें जिल्ह्यांत पाडेगांव येथील मध्यवर्ति ऊस संशोधन केंद्रामध्यें गुळाचा रंग व त्याचा दर्जा यांत सुधारणा करण्याची एक साधी पद्धति शोधून काढण्यांत आली आहे.

आठ ते दहा औंस सिंगल सुपरफॉस्फेट त्याच्या पांचपट वजनाइतक्या पाण्यांत मिसळावयाचें किंवा दोन ते तीन औंस ट्रिपल सुपर फॉस्फेट त्याच्या १० पट वजनाइतक्या पाण्यांत मिसळावयाचें आणि हें मिश्रण मातीच्या भांड्यांत उकळून मग गाळून घ्यावयाचें. नंतर तें रसाच्या उकळत्या कढईंत रसाची मळी काढल्यावर ओतावयाचें हें प्रमाण केरोसीनचे ४० डबे भरतील इतक्या रसासाठीं आहे.

गुळाचा खारटपणा

क्षारयुक्त जमिनींतील ऊंसापासून तयार केलेला गुळ चवीला किंचित खारट असतो. परन्तु तो या नव्या पद्धतीनें तयार केल्यास त्याचा दर्जा सुधारतो आणि खारटपणाहि नाहींसा होतो असें सिद्ध झालें आहे. यासाठीं रस उकळत असतांना कढईंत चार ते पांच कागदी लिंबांचा आठ ते दहा तोळे रस घालतात.

———

सांड्र टोमॅटो कम्पाउन्ड
• व्हिटॅमिनयुक्त टॉनिक
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द कृ. सांड्र ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई
[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स— बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते—मे. पेंढारकर अँड को. मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद संशोधन हें वैद्यांचें कार्यक्षेत्र आहे

(लेखक- आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी)

आयुर्वेद संशोधन म्हणताच अॅलोपॅथिक डॉक्टर्स, तदनुसारी सुशिक्षित आणि त्यांच्या मतानुसार वागणारीं सरकारें यांच्या डोळ्यापुढें आयुर्वेदीय औषधांचें संशोधन उभें रहातें. तेंहि आयुर्वेदीय पद्धतीनें नव्हे तर आधुनिक पद्धतीनें. आयुर्वेदीय औषधें गुणकारी आहेत याबद्दल सर्वांचें एकमत आहे. हीं प्रभावी औषधें आयुर्वेदाच्या अवनतीबरोबर नष्ट होऊं नयेत, तीं अॅलोपॅथींत समाविष्ट करून घ्यावींत असें त्यांना वाटतें. प्रत्येक द्रव्य लॅबरेटरींत तपासून, रुग्णालयांत अजमावून, गुणधर्म निश्चित करून त्याचा स्वीकार करण्याचें प्रयत्न सुरूं झाले आहेत. अॅलोपॅथीच्या परिपोषाच्या दृष्टीनें हे प्रयत्न स्तुत्य आहेत.

औषधांचें आयुर्वेदीय संशोधन

जगांत असें द्रव्य नाहीं कीं ज्याचा औषधी उपयोग होणार नाहीं ‘ जगत्येवमनौषधम् । न किंचित् विद्यते द्रव्यम् । असें आयुर्वेदहि म्हणतो. आयुर्वेदीय पद्धतीप्रमाणें इतर पॅथींतील औषधांचे गुणधर्म ठरवून वापरण्याचा प्रयत्न केला तर तेंहि एक संशोधन कार्य होईल. हें कार्य करतांना त्या त्या पॅथींचाहि आयुर्वेदीयांना चांगलाच अभ्यास करावा लागेल. तीं औषधें तीव्र व शीघ्र परिणामकारी असतील आणि त्याबरोबर अन्य रोगोत्पत्ति होत असेल तर ते दोष कमी करून तें औषध शरीरांत गेल्यानंतर शरीराला कोणत्याहि रीतीनें त्रासदायक न होतां शरीरांत सात्म्य होऊन रोगनाश करील असें त्याचें स्वरूप बनवावे लागेल. या संशोधनाला औषधांचें आयुर्वेदीय संशोधन म्हणतां येईल.

औषधांचें अॅलोपॅथिक संशोधन

अॅलोपॅथींत समाविष्ट करण्याचे दृष्टीनें होणारें औषधीं द्रव्यांचें संशोधन हें अॅलोपॅथिक संशोधन होतें. आयुर्वेदीय औषधांचें वरील हेतूनें व पद्धतीनें सुरू झालेलें कार्य अॅलोपॅथिक संशोधन समजलें गेलें पाहिजे. आयुर्वेदाचा वाली नसलेल्या कालांत आयुर्वेदाच्या नांवावर मिळविलेला पैसा आपल्या वजनाचा दुरुपयोग करून, सरकारच्या डोळ्यांत धूळ फेकून, आयुर्वेदीय संशोधन हें नांव देऊन नासला जात आहे! आयुर्वेदीय द्रव्यांची आयुर्वेदीय विचारसरणींतून पुरेपूर ओळख न होतां, आयुर्वेदांतले म्हणून घेऊन, त्याला अॅलोपॅथींत समाविष्ट करण्याचा प्रयत्न करणें आणि अगदी नवीन द्रव्याचा समावेश करण्याचा प्रयत्न करणें अगदीं सारखेंच आहे. या संशोधनाचा आयुर्वेदीय संशोधनाशीं अर्थाअर्थी कांहींहि संबंध नाहीं, फक्त आयुर्वेदीय संशोधनाच्या नांवावर मिळणाऱ्या पैशाशीं (अर्थाशीं) त्याचा संबंध आहे.

अन्यापोरेषु व्यापार

अॅलोपॅथीच्या परिपोषक कार्याबद्दल आम्हाला कांहीं म्हणावयाचें नाहीं, पण आयुर्वेदाच्या नांवाखालीं आणि आयुर्वेदाचें सर्वतः संशोधन न करितां आयुर्वेदाकरितां मंजूर झालेल्या पैशावर चाललेल्या ‘अन्यापोरेषु व्यापाराबद्दल’ म्हणावयाचें आहे, कीं हें आयुर्वेदीय संशोधन नव्हे. आयुर्वेदीय महाविद्यालयें, आयुर्वेदीय फॅकल्टी, आयुर्वेदीय संशोधन या आयुर्वेदीय नांवाखालीं अॅलोपॅथीचा पद्धतशीर परिपोष करण्याचें तावडतोब बंद झाले पाहिजे, आणि जर या संस्था आयुर्वेदाच्या नांवाखालीं हें कार्य करीत असतील तर त्यांना अधिकृत जाब विचारला गेला पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय औषधें हवीत आयुर्वेदीय शास्त्र नको

वरील गटाला आयुर्वेदाची औषधें प्रभावी वाटतात पण त्यांचा प्रभाव ओळखणारें त्यांचें ठिका शरीराला त्रासदायक न होतां विकारनाशकक्षमता निर्माण करणारें, त्यांच्या कार्यांची अवस्था ठरवि शास्त्र मात्र प्रभावी वाटत नाहीं. किंबहुना त्या शास्त्राला अशास्त्र म्हणण्यापर्यंत मजल जाते.

पॅथीच्या विचारसरणीनें पॅथीचें औषध होतें

वास्तविक औषधि मूल द्रव्य प्रथम कोणत्याही एका पॅथीचें नसतें. बचनाग (ॲकोनाइट) निसर्गांत उत्पन्न होणारें द्रव्य ॲलोपॅथी, आयुर्वेद, होमीओपॅथी या तीनहि पॅथी हें द्रव्य वापरतात. या ति पॅथींचा, वापरण्यास योग्य असा बचनाग घेतला, तर तो भिन्न स्वरुपांत असतो. डॉक्टर बचनाग ॲक्टि प्रिन्सिपलच्या स्वरुपांत वापरतात, तर वैद्य बचनाग शुद्ध करून, त्यांत हृदयाला अवसादक (डिप्रेशन असलेला धर्म कमी करून नंतर वापरतात; तर होमिओपाथ सूक्ष्म करून –पोटन्सी वाढवून उपयोगांत आ तात. औषधांचें कार्य ज्या तऱ्हेनें शरीरांवर होण्याची त्या शास्त्राची कल्पना असेल त्या तऱ्हेला अनुस मूल द्रव्यावर संस्कार करून त्यांचे स्वरूप बदलून तें घेतलेलें असतें. मूल द्रव्य संस्कार करून जेव्हां त्या पॅथी औषधी स्वरूपांत ग्रहण केलें जातें तेव्हां तें द्रव्य त्या पॅथीचें औषध होतें. आयुर्वेदीय औषध म्हणून बचन घ्यावयाचा असेल, त्यांचे आयुर्वेदोक्त गुण पडताळून पहावयाचे असतील, तर ॲक्टिव्ह प्रिन्सिपल घे चालणार नाहीं. त्याला गोमूत्रांत शुद्ध केलेला व गाईच्या दुधाचा संस्कार केलेला बचनागच वापरला पाहि बचनागावर गोमूत्र व दूध यांचे काय परिणाम झाले हें आयुर्वेदीय तज्ज्ञाकडून समजून घेतले पाहिजेत, समजावून घेतांना त्यांची परिभाषा लक्षांत असली पाहिजे. सामान्य व्यक्तीनें केवळ जिज्ञासापूर्ती क वैद्यांकडून एखादी गोष्ट समजून घेणें निराळे आणि संशोधन कार्याकरितां समजावून घेणें निराळें असतें.

संशोधकाला तें ज्ञान जरूर

कोणत्याही द्रव्याची वापरण्याची रीति, वापरतांना अनुपान म्हणून वापरावयाचें द्रव्य निवा ण्याची रीति, अनुपानाचे गुणधर्म, मुख्य द्रव्याचे गुणधर्म, त्यांचे साधर्म्य, वैधर्म्य, त्या द्रव्याची क करण्याची रीति हें समजावून घेऊन त्याचा उपयोग केला पाहिजे. कांहीं औषधें रसानें कार्य करितात, कां विपाकानें (पचन झाल्यावर), कांहीं वीर्यानें (बलवान व स्थिर धर्मानें), कांहीं इतर गुणांनीं, तर कां प्रभावानें कार्य करितात. ‘ किंचित् (द्रव्यं) रसेन कुरुते कर्म, पाकेन वाऽपरम्। गुणान्तरेण वीर्येण प्रभा वेनैव किंचन ॥ सुश्रुत या रसवीर्यादि परिभाषिक संज्ञा, त्यांचे अर्थ, शरीरांतील त्यांची कार्यक्षेत्रें, पहाण्याची रीति ही सर्व समजली पाहिजेत, नव्हे संशोधकाच्या डोक्यांत स्थिर पाहिजेत. आयुर्वे औषधांचीं कार्यें समजली तरी त्याबरोबर तीं वरील पैकीं कशानें व कोणती होतात हें समजलें पाहिजे. व्र रोपक हा धर्म अनेक औषधांचा धर्म सांगितलेला असतो. जे व्रणरोपक रसानें कार्य करणारे असेल तें औषध गॅस्ट्रिक अलसर किंवा डिओडिनल अलसरवर देतां येईल, जें विपाकानें कार्य करील तेंच टायफा डिसेंट्री इ. रोगांत वापरतां येईल, आणि जें वीर्यानें कार्य करील तें बस्ति, योनीमधील व्रणांवर उपयो आणतां येईल. असें ३६ ते ४० मुद्दे प्रत्येक औषधी द्रव्याच्या अभ्यासाकरतां तपासावे लागतात. त्यावां तें आयुर्वेदीय औषध म्हणून बुद्धींत स्थिर होऊं शकत नाहीं. हें न समजतां संशोधकानें प्रयोग केले औषधांचा सांगितलेला व्रणरोपक धर्म सिद्ध झाला नाहीं, तर त्याचा दोष आयुर्वेदाला दिला जाईल. दिला गेला आहे. आयुर्वेदानें सांगितलेल्या सर्पविषावरील औषधि कुचकामाच्या आहेत असें शिक्कामो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झालें आहे. त्या औषधाच्या मर्यादा न ओळखतां केलेले प्रयोग चुकीचा निर्णय देणारच. आयुर्वेदीय औषधिगुणधर्म हे सूत्रांत सांगितलेले असतात. सूत्रांचा अर्थ लावून त्यांच्या गुणधर्मांचें विवेचन आयुर्वेदीय तज्ज्ञच करूं शकतो. डॉक्टर किंवा इतर शास्त्रांतील तज्ज्ञाला हीं सूत्रें वाचून सम्यक् बोध होत नाहीं. तेव्हां संशोधकाला यथासांग अभ्यासच करावयाला पाहिजे आणि तो आयुर्वेदीय तज्ज्ञांकडे करावयाला पाहिजे.

संशोधकाला आवश्यक असलेलें पायाभूत ज्ञान

हा अभ्यास करण्यापूर्वी ज्या शरीरावर आणि शरीरांतील ज्या रोगावर औषध वापरावयाचें त्या शरीराची व त्या शरीरांतील रोगांची आयुर्वेदीय शरीराप्रमाणें व निदानशास्त्राप्रमाणें संपूर्ण कल्पना असली पाहिजे आणि हें सर्व समजण्याकरितां त्या शास्त्राची पायाभूत तत्त्वें व सिद्धांत समजले पाहिजेत. सारांश संशोधक हा आयुर्वेदांत तज्ज्ञ, तसेंच तो अनुभवी चिकित्सक ही असला पाहिजे.

असा तज्ज्ञ आयुर्वेदीय संशोधन क्षेत्रांत काम करतो आहे व त्यानें किंवा त्यांचे सहाय्यानें कांहीं निर्णय सिद्ध झाले आहेत असें आढळांत नाहीं.

तज्ज्ञांचें अज्ञानमूलक व बेजबाबदार मत

एका गटाला आयुर्वेदीय औषधिशास्त्र वाटत नाहीं, केवळ अनुभवांची जंत्री आहे असें वाटतें. व त्याप्रमाणें आपलें मत म्हणून तें विधानें करीत असतात. ज्यांचा आपण अभ्यास केला नाहीं, त्याबद्दल आपण मत व्यक्त करणें बेजबाबदारपणाचें आहे, हें त्यांचे ध्यानांतही येत नाहीं. ध्यानांत आणून देण्याचा प्रयत्न केल्यास समाजांतील दर्जा, सत्ता, सद्दी, अनुकूल वातावरण यामुळें ते ऐकूनहि घेत नाहींत. ब्राझीलमध्यें मलेरीयावर वापरांत असलेल्या सिंकोना सालींचें उदाहरण एका तज्ज्ञ व जबाबदार डॉ. नीं दिलें, याप्रमाणें अनुभवाचीं आयुर्वेदीय औषधें आहेत असें सांगितलें. क्विनीनच्या मलेरियानाशक गुणाखेरीज तें औषध शास्त्रज्ञांच्या हातांत आल्यानंतर जसे अनेक गुणधर्म प्रयोगानें कळले तसेंच आयुर्वेदीय तज्ज्ञांनीं निश्चित केले आहेत हे ते विसरतात. क्विनीन स्मॉल डोसेसनें दिलें म्हणजे जसें तें स्टमकला टॉन देतें, तसें एरंडतैल मोठ्या प्रमाणांत मोठ्या आंतडीवर रेचक कार्य करतें आणि लहान मात्रेनें दिल्यास मोठ्या आंतडीचें बळ वाढविण्याचें, वातनाशक कार्य करितें. हें आयुर्वेदाचा अभ्यास केल्यावांचून कसें कळेल?

आहार्य द्रव्यांचाहि साधक बाधक गुणकर्म विचार

औषधांचेंच काय पण आहार्य द्रव्यांचेंहि असें स्वरूप दाखविलें आहे. दही हा पदार्थ योग्य प्रमाणांत, योग्य ऋतूंत, योग्य वेळीं, योग्य व्यक्तीनें, योग्य पद्धतीनें खाल्ला तरच तो शरीरास पौष्टिक होतो, पण तें अधिक प्रमाणांत, दररोज, पुष्कळ दिवस आहारांत उपयोगांत आणलें तर रक्तपित्त, कुष्ठ इ. विकार निर्माण करितें.

दोषदूष्य विचार सोडून चालणार नाहीं

एखाद्या रोगावर एक औषध उपयोगी पडतें, एवढें समजून चालत नाहीं, तें त्या रोगाच्या कोणत्या प्रकारांत उपयोगी पडतें हेंहि कळावें लागतें. काविळीवर ऊसाचा रस उपयोगी पडतो हें समजलें. पण तो वाटेल त्या काविळीवर उपयुक्त होत नाहीं. रुद्धमार्ग कामले (ऑब्स्ट्रक्टिव्ह जॉंडीस) मध्यें तो निरुपयोगी ठरतो, नव्हे तो विरोधी होतो, ती कावीळ जोरानें वाढवितो. दोषदूष्यविचार हा आयुर्वेदीय अभ्यासाचा गाभा आहे. आधुनिक आयुर्वेदीय औषधांचें संशोधन करणारानें आयुर्वेदीय विचारांचा गाभाच दृष्टीआड केला तर सर्व आटपलेच. पैशाचा, वेळेचा, श्रमाचा, बुद्धीचा अपव्यय फक्त व्हावयाचा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय संशोधन ही वैद्यांची जबाबदारी

आयुर्वेदीय औषधी संशोधनाची अशी परवड आहे. औषधीज्ञान हा शास्त्राचा एक छोटा भाग आहे. सर्व शास्त्राचें संशोधन कार्यांत त्याचें कांहीं परिमित स्थान आहे. आयुर्वेद संशोधनाचें वावडे असलेल्यांकडून आ. औषधी संशोधन कसें शक्य आहे? याचा विचार केला जात नाहीं. 'आयुर्वेद संशोधनाची दिशा' या शीर्षकाखालीं १९४६-४७ सालचे भिषग्विलासांत दोन लेख प्रसिद्ध करून डॉक्टर व वैद्य यांच्यापुढें आपल्या कल्पना प्रस्तुत लेखकानें मांडल्या आहेत. त्या लेखांत संशोधनाचे प्रकार, संशोधनाचे सोदाहरण विषय, संशोधन कार्यालयाच्या शाखा, संशोधनाची रीति स्पष्ट केली आहे.

आयुर्वेदीय संशोधन कार्य हें वैद्यांचें क्षेत्र आहे. तें त्यांचेकडूनच झालें पाहिजे, त्यांना गरज पडेल तेव्हां ते अन्य शास्त्रज्ञांची मदत घेतील, आणि आपली जबाबदारी पूर्ण करतील.

म. प्रांतीय वैद्यमंडळाशी संबद्धता

महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळ हें अखिल भारतीय आयुर्वेद कांग्रेस या भारतव्यापि संस्थेशीं संबद्ध करावें. या म. प्रां.च्या कार्यकारिणीच्या ठरावाप्रमाणें त्याची संबद्धता शुल्क पाठवून लवकरच संबद्ध करून घेण्यांत येणार आहे. हें संबद्धताशुल्क रुपये पंचवीस आहे.

अशोक साल

आम्ही मुद्दाम अशोकाचीं रोपें मिळवून लावलीं असून त्याची फुलें सँपल पोस्टानें आपणाकडे पाठविलीं आहेत. या झाडांची साल कोणास हवी असल्यास ४॥ रु. रत्तल प्रमाणें २।३ रत्तल देऊं शकू.

कृष्णाशास्त्री पेंडसे, मुर्डी

पतिपत्नींना पसंत पडलेल्या पौष्टिक वड्या

मुंबईहून एक भगिनी कळवितात– "आपला कंदर्पवृष्यपाक ८० तोळे पुढील पत्त्यावर (औषध घेण्याचें प्रमाण अनुपान यासह) पाठवून द्यावा. सोबत म. ऑ. नें औषधी किंमत व टपाल खर्च यासाठीं १४॥ रु. पाठविले आहेत."

सौ. ....

ता. २५।८।५२ सिद्धपुरा बिल्डिंग गोखले रोड नार्थ
दादर -- मुंबई २८

कळविण्यास आनंद वाटतो कीं मध्यंतरीं आपणांकडून जें औषध मागविलें होतें, त्यानें फार फायदा वाटला."

ता. २७।१।५३ सौ. ....

अशीं अनेक समाधान-पत्रें आयुर्वेद सेवा संघाकडे आली आहेत.

आपणहि एक वेळ जरूर अनुभव घेऊन पहा.

कंदर्पवृष्यपाक– १ शेराची ट. ख. सह किंमत १४-८-० रुपये
अर्ध्या शेराची ट. ख. सह किंमत ७-१३-० रुपये

कंदर्पवृष्यवटी– १ तोळ्याची " " " ६-०-० रुपये

आयुर्वेद सेवा संघ, औषधी-भुवन, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रजिस्टर्ड वैद्यांची सभा

ता. १७-१-५३ रोजीं सायंकाळीं ५॥ वाजतां जळगांव येथील कॉंग्रेसभवनांत रजिस्टर्ड वैद्यांना देशी वैद्यक बोर्डाच्या गेल्या २॥ वर्षांतील कामकाजाची माहिती देण्यासाठीं सभा घेण्यांत आली होती. सभेस स्थानिक वैद्यांखेरीज नशिराबाद, रनाळे वगैरे परगांवांहून आलेली वैद्यमंडळीहि उपस्थित होती. वैद्यराज माधव बाळकृष्ण जोशी यांनीं प्रास्ताविक भाषण केलें, सभेचे अध्यक्ष वैद्य बिंदुमाधव पंडित यांनीं सभेचा उद्देश समजावून सांगितला. त्यानन्तर आयुर्वेद युनानी बोर्डाचे सदस्य वैद्य गोगटे यांनीं " बोर्डाच्या व फॅकल्टीच्या कार्यक्षेत्रांत कोणकोणत्या गोष्टी येतात तसेंच राजिस्ट्रेशन ट्रिब्युनलच्या कक्षेंत ट्रिब्युनलला काय करतां येईल याबाबतची माहिती दिली.

नासिक अभ्यास मंडळाचें कार्य

सुरवातीसच नासिकच्या अभ्यास मंडळाच्या कार्यक्रमाविषयींच्या एका प्रश्नाला वैद्य गोगटे यांनीं उत्तर दिलें. नासिकला गेल्या ८ वर्षांपासून स्थानिक वैद्यांनीं परस्पर सहकार्यानें एक अभ्यास मंडळ चालविलें आहे. सुरवातीस दरमहा एक दिवस, पुढें पंधरा दिवसांनी एक दिवस, आणखी कांहीं दिवसांनीं आठवड्यांतून एक दिवस, पुढें पुढें आठवड्यांतून दोन दिवस व सध्यांतर आठवड्यांत तीन दिवस ही मंडळी एकत्र बसून वाचन करतात. परस्परांच्या वैद्यकीय व्यवहारांतील शंका समाधान करतात, तात्कालिक प्रश्नांवर चर्चा करतात.

घटना नाहीं वर्गणी नाहीं

या अभ्यास मंडळाला स्वतंत्र घटना नाहीं. त्याला कोणी पदाधिकारी नाहीं व त्याला वर्गणी नाहीं. कोणाचीहि, कोणत्याहि शास्त्राची व संस्थेची निंदा करावयाची नाहीं हा मोठा दंडक या अभ्यास मंडळांत कटाक्षानें पाळला जातो.

आतांपर्यंत अनेक वैद्य; डॉक्टर्स यांची विविध विषयावरील व्याख्यानें व प्रात्याक्षिके करण्यांत आली. चरकाचें वाचन गेले सहा वर्ष चालूं राहून नुकतेच तें संपलें. रस ग्रंथाचें वाचन म्हणून आयुर्वेद प्रकाश हा ग्रंथहि वाचला व आतां सुश्रुताच्या वाचनास सुरवात होत आहे.

अभ्यास मंडळाचा अप्रत्यक्ष लाभ

वैद्यांच्या परस्पर वैचारिक देवाण घेवाणीस संघटनेस या अभ्यास मंडळामधून होणाऱ्या खुल्या वातावरणांतील चर्चेमुळें चांगलाच फायदा होतो. ज्या गांवांत १।३ वैद्य असतील यांनींहि अभ्यास मंडळ चालविण्यास सुरवात करावी.

औषधी कारखान्याची उपमा

आयुर्वेद व युनानी फॅकल्टी व बोर्डाच्या कामाबद्दल सांगतांना ते म्हणाले कीं, अेकाद्या औषधीच्या कारखान्यांत औषधी-करण विभाग व तयार मालाचा विक्री विभाग हे जसें दोन विभाग असतात तसेंच फॅकल्टीच्या व बोर्डाच्या कामाचे हे दोन विभाग आहेत. वैद्य तयार करण्याकरितां त्याला आवश्यक असणाऱ्या प्राथमिक ज्ञानाची कक्षा ठरविण्यापासून तों थेट त्याला वैद्यक व्यवसायक्षम करण्याची सोय करून देण्याचें काम फॅकल्टीचें आहे. शिक्षण देणाऱ्या संस्थांची तपासणी करावयाची, त्यांना सूचना द्यावयाच्या, मान्यता अमान्यता द्यावयाची, अभ्यासक्रम ठरवावयाचा, त्यांत परिवर्तनें घडवावयाची, परीक्षा कार्यक्रम ठरवून परीक्षा घ्यावयाच्या, प्रमाणपत्रें द्यावयाची व वैद्यक व्यवसायाला योग्य बनवावयाचा हें काम संपूर्णपणें फॅकल्टीचें आहे. दूरवर विचार करणाऱ्या व आयुर्वेदाचें हिताहित ठरविणाऱ्या अभ्यासकांचें हें कार्यक्षेत्र आहे. आयुर्वेदाचे तारक किंवा मारक होण्याचा अधिकार फॅकल्टीचा आहे.

बोर्डाच्या कक्षेंत येणारा वैद्य

असा हा फॅकल्टीनें जगाच्या बाजारांत वावरण्याकरितां तयार केलेला वैद्य मग बोर्डाच्या कक्षेंत येतो. त्याचीं सुख–दुःखें पाहाणें, त्याला रजिस्ट्रेशन देणें, त्याच्या औषधी मिळणें वगैरेंच्या व्यावहारिक गरजा पाहाणें, सरकार दरबारी नोकऱ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व दाखले देण्यास त्याला पात्र बनविणें, वैद्यक व्यवसायाची प्रतिष्ठा तो पाळीत आहे कीं नाहीं हें पाहाणें, नवीन तयार झालेल्या वैद्यांना रजिस्ट्रेशन देणें, वैद्यकाचा धंदा कांहीं कालपर्यंत स्थगित केला आहे असें कळविणारांचें रजिस्ट्रेशन कांहीं काळपर्यंत स्थगित ठेवणें, त्यांना पुन्हां रजिस्ट्रेशन देणें, वैद्यकीय नीति नियमादिकांच्या प्रति वैद्यांना पुरविणें, रजिस्टर तयार ठेवणें, दिवंगत वैद्यांची नांवें रजिस्टरमधून काढणें, वैद्यकीय नीति नियमांचें उल्लंघन करणारास नियमाप्रमाणें प्रथमतः सूचना देणें, पुन्हां पुन्हां त्या नीति नियमांचें उल्लंघन करीत आहे असें आढळल्यास त्याला योग्य तें शासन करणें, मतदारांची यादी तयार करणें, बोर्डाची निवडणुक करणें, फॅकल्टीवर आपले दोन प्रतिनिधी घटनेप्रमाणें पाठविणें, कार्यकारी मंडळाची निवड करणें, बोर्डाची निवडणुक करणें, त्याप्रमाणें कार्यक्रम घडवून आणणें, कारकुनांना पगार वाढ, पट्टेवाल्यांच्या कपड्यांच्या खर्चास मान्यता, रजा मंजूरी, नामंजूरी यासारखी वरीचशी किरकोळ व यांत्रिक कामांची खोगीरभरतीच बोर्डाच्या कक्षेंत येतें. वैद्यांना व हकिमांना पुनर्नोंदणी फी अन्दाज पत्रकाचा अन्दाज घेऊन बसविणें न बसविणें हें काम बोर्डाचें कक्षेंत येतें.

बोर्डाचा कारभार यांत्रिक आहे

फॅकल्टीच्या कामांत बुद्धीला वाव आहे. बोर्डाच्या कामांत यांत्रिकता अधिक आहे. अशा या दोन प्रकारच्या प्रवृत्तींतून हें काम चालत असतें. फॅकल्टी आपले दोन सदस्य बोर्डावर पाठविते व बोर्ड आपले दोन सदस्य फॅकल्टीवर पाठविते असें हें साटे-लोटें आहे. वैद्यक व्यवसायिकांना बोर्डावरील प्रतिनिधींची निवड करतां येते. फॅकल्टीवर मात्र शैक्षणिक संस्था व विद्यमान अध्यापकच आपले प्रतिनिधी पाठवूं शकतात. रजिस्ट्रेशन ट्रिब्युनल, फॅकल्टी व बोर्डाचें काम नित्य स्वरूपाचें आहे व रजिस्ट्रेशन ट्रिब्युनलचें काम नैमित्तिक स्वरूपाचें आहे.

शेवटची मुदत ३ नोव्हेंबर १९४१

१९४१ सालीं ३ नोव्हेंबरला रजिस्ट्रेशन एन्लिस्टमेंट मिळविण्यासाठीं अर्ज करण्याची शेवटची मुदत होती. पण त्या मुदतींत अनेक कारणाकरितां जे अर्ज करूं शकले नाहींत अशा वैद्य हकीमांची योग्यायोग्यता ठरवून त्यांना रजिस्ट्रेशन किंवा एन्लिस्टमेंट देणें न देणेंचा, तसेंच जी संस्थानें मुंबई प्रांतांत विलीन झाली, त्या संस्थानांतील वैद्य हकीमांना आणि मुंबई प्रांतांत येऊन वैद्यक व्यवसाय करूं इच्छिणाऱ्या वैद्य हकीमांची योग्यायोग्यता ठरवून त्यांना रजिस्ट्रेशन किंवा एन्लिस्टमेंट देणें न देणेंचें काम सध्यां रजिस्ट्रेशन ट्रिब्युनल करीत आहे. यावर तीन सदस्य आहेत. पैकीं एक बोर्डानें आपल्या सभासदांतून निवडलेला व दोन फॅकल्टीवरील आहेत.

ट्रिब्युनलचा निर्णय अखेरचा

कोणा वैद्य हकीमांना रजिस्टर्ड वा एन्लिस्टेड करावयाचे याबाबत कायद्यानें कांहीं बंधनें, कांहीं नियम त्यांचेवर घातले आहेत. त्या नियमांत बसणारांचाच विचार ते करूं शकतात. अशी जरी बंधनें सरकारनें त्यांचेवर घातली तरी ट्रिब्युनलच्या होकार-नकारावर सरकारलाहि फेरविचार करण्याचा अधिकार कायद्यानें ठेविलेला नाहीं. अशी ट्रिब्युनलची सत्ता सार्वभौम आहे.

बोर्डावर विधिमंडळाचा अधिकार

याप्रमाणें या तीन मंडळांचें परस्परांहून भिन्न असें कार्य चालूं आहे. पूर्वी हीं सर्व कामें केवळ बोर्ड करीत होतें. पण मध्यन्तरी कायद्यानें विधिमंडळांत हा अधिकार क्षेत्रांतील बदल घडून आणिला आहे. यांची घडण कायद्यानें प्रस्थापित असल्याकारणानें व कायदा हा विधिमंडळांत व्हावयाचा असल्यानें यांच्या घडणेंत, अधिकार कक्षेंत फेरबदल घडून आणावयाचा असल्यास त्याला विधिमंडळाचीच कास धरावी लागेल. बोर्ड अगर फॅकल्टी यांच्या कक्षेंतील गोष्टी चुकल्यास बोर्ड अगर फॅकल्टीला जबाबदार धरावें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याबद्दल दुमत नाहीं. पण त्यांच्या कक्षेंतच कायद्यानें ज्या गोष्टी बसत नाहींत त्याबद्दल बोर्ड अगर फॅकल्टीला दोष देणें चूक होईल याबद्दलहि आपले एकमत होईल असें मला वाटतें.

याप्रमाणें वैद्य वि. म. गोगटे बोर्डाचे सदस्य यांनीं बोर्ड, फॅकल्टि व ट्रिब्युनल यांचें कार्यक्षेत्र, अधिकार पद्धति इत्यादिंबाबत आपले विचार मांडले. नन्तर वैद्य प्रतापकुमार यांनीं या संस्थांच्या कार्यपद्धती वगैरे बाबतच्या गोष्टीवर बराच प्रकाश पाडिला. तो विषय पत्रिकेंत येऊन गेलाच आहे.

म. प्रां. वैद्य मंडळाची सरकारांत नोंदणी

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ ही संस्था घटनाबद्ध असली तरी ती अद्याप सरकारांत नोंदलेली नाहीं. ती नोंदवून घेण्याबाबतचा ठराव म. प्रां. वैद्य-मंडळाच्या कार्यकारी मंडळानें केलेला आहे.

सोलापूर अधिवेशनाचे वेळीं महाराष्ट्र प्रांतिकच्या निधीकरितां अनेकांची आश्वासनें आली. कांहींनीं त्यांची पूर्ती केली व कांहीं ते करण्याच्या तयारींत आहेत.

श्रीमंत पुराणिकांची उदार देणगी

पनवेलच्या श्री धूतपापेश्वर कारखान्याचे श्रीमंत पुराणिक यांनीं त्यावेळीं एक हजार रुपयाचा शेअर महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळास देण्याचें आश्वासन दिलें. यांत एक तांत्रिक अडचण आली ती अशी कीं, म. प्रां. वैद्य मंडळ ही संस्था सरकारांत नोंदविल्याशिवाय श्री धूतपापेश्वरचा शेअर (भाग) प्रांतीय वैद्य मंडळाला देतां येत नाहीं. तेव्हां प्रांतीय वैद्य मंडळ रजिस्टर करून घ्यावयाचें ठरलें. पण रजिस्ट्रेशनला पन्नास रुपयापर्यंत कमींत कमी खर्च लागतो. तेव्हां पैसा नाहीं म्हणून रजिस्ट्रेशन नाहीं व रजिस्ट्रेशन नाहीं म्हणून देणगी नाहीं असा हा प्रसंग-दुष्टचक्र निर्माण झाले.

मंडळास सततचा द्रव्योघ

तेव्हां यांतून बाहेर पडण्याकरितां प्रांतीय वैद्य मंडळाचे मंत्री वैद्य गोगटे यांनीं, पनवेलकरानाच ही रक्कम रुपये पन्नासची रजिस्ट्रेशन करितां देणगी म्हणून द्यावी अशी विनंति केली व उलट डाकेने त्यांनीं तसें आश्वासनहि पाठविलें आहे. आतां वैद्य-मंडळ रीतसर रजिस्टर्ड होईल व श्रीधूतपापेश्वराचा एक हजार रुपयांचा भाग वैद्यमंडळास मिळेल. त्याचा दरसाल मिळणारा डिव्हिडंड म. प्रां. वैद्यमंडळास सतत मिळणारा द्रव्योघ म्हणून राहणार आहे.

वि. म. गोगटे मंत्री

चांगल्या कामगिरीला उत्तेजन

भांडवली स्वरूपाचीं कामें व साहित्य याखेरीज मानवी बाजूहि त्याहून महत्वाची असून तिच्याकडे योग्य लक्ष दिले पाहिजे. आपण देशासाठीं काम करीत आहोंत असें नोकरवर्गाला वाटलें पाहिजे. प्रमुखांनीं नोकरवर्गाच्या सुखसोयींकडे लक्ष दिलें पाहिजे. केवळ खराब नोकरांचे दोष काढण्यावर किंवा त्यांना शिक्षा करण्यावर त्यांनीं समाधान मानूं नये. चांगल्या कामगिरीला उत्तेजन दिलें पाहिजे. ती ओळखली पाहिजे आणि ती कामगिरी व्हावी म्हणून चेतना दिली पाहिजे.

प्राणिज द्रव्यांच्या नाविन्यपूर्ण चिकित्सेनें आरोग्य मिळवून नवचैतन्य प्राप्त करा. फक्त ७ ते १४ दिवस घेतल्यानंतर चमत्कार पहा. ह्याच त्या गोळ्या "मिश्र शक्तिसागर" १४ गो. २ रु., ४२ गो. ६. ४ ट. ख. वेगळा याबरोबरच "रजि. युनानी तिला" वापरल्यास सोन्यांत सुगंध समजा. ल्हान बा. २॥ रु. मोठी बा. ४ रु., ट. ख. अलग.

मिश्रा महाराष्ट्र फार्मसी (रजि.)
ब्रह्मपुरी (चांदा) म. प्र.

पवित्र नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला, हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला, तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहाः-नेपाल हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विदर्भ पदवीधर वैद्यमंडळ, आकोला

पंचवार्षिक अहवाल

सर्व पदवीधर वैद्यांमध्यें परस्पर परिचय होऊन वैद्यकीय व्यवसायांतील वेळोवेळीं येणाऱ्या सरकारी व बिनसरकारी अडचणी दूर करण्यासाठीं आणि आयुर्वेदाच्या उन्नतीचें कार्य करण्यासाठीं या मंडळाची स्थापना ता. १।८।१९४७ रोजीं होऊन आज पांच वर्षें होत आहेत.

या अवधींत मंडळातर्फे बरेंच कार्य झालेलें आहे. त्याचें संक्षिप्त वर्णन देत आहे.

१) केंद्रीय सरकारच्या आरोग्यमंत्री, राजकुमारी अमृतकौर यांचे ता. २६।८।५१ रोजीं स्वागत करून मंडळाची विचारसरणी त्यांचेसमोर स्पष्ट विदित केली. आणि आयुर्वेदाच्या उन्नतीबाबत काय करावयास पाहिजे, तसेंच आयुर्वेदाबाबत सध्यां काय चाललें आहे वगैरे विषयीं मंत्र्यांना दिलेल्या मानपत्रांत विवेचन केलें आहे.

२) ता. १।५।१९५२ रोजीं मंडळानें केलेल्या ठरावानुसार मंडळाचे अध्यक्ष वैद्य शाह गेल्यावर्षीचें उन्हाळ्यांत काश्मीरच्या प्रवासाला गेलें असतांना, काश्मीर राज्याच्या आरोग्यखात्याचें मंत्री डॉ. चोप्रा यांची भेट घेऊन आयुर्वेदशास्त्र, व आयुर्वेद पद्धतीनें औषधी द्रव्यांचें शुद्धिकरण तसेंच संशोधनाचा आधुनिक ज्ञानाच्या कसोटीच्या दृष्टीनें कसा उपयोग होतो हें दाखवून दिलें.

३) गतवर्षी पनवेल येथें 'महाराष्ट्र वैद्य संमेलनाला' मंडळाचे अध्यक्ष वैद्य शाह, उपाध्यक्ष वैद्य गोगटे व वैद्य समुद्र यांनीं जाऊन तेथील अध्यक्षांचें स्वागत केलें.

४) ता. १।५।१९५२ चें मंडळाच्या ठरावानुसार ता. १६।८।१९५२ रोजीं वैद्य शाह, गोगटे वडोदकर व पिंपळे यांनीं नागपूरला जाऊन प्रांताचें आरोग्यमंत्री श्रीमान् कन्नमवारजी यांची भेट घेऊन मंत्र्यांना आयुर्वेदाच्या प्रगतीचा खरा मार्ग सुस्पष्टपणें दाखवून दिला. तसेंच प्रांताचें राज्यपाल डॉ. पट्टाभिसितारामय्या यांना आयुर्वेदाच्या प्रगतीबाबत लेखी पत्रक सादर करून बरीचशी चर्चा केली.

५) प्रांताचे आरोग्यमंत्री ता. १४।११।५२ रोजीं अकोल्याचें मुक्कामांत असतांना मंडळाचे अध्यक्षांनीं त्यांची भेट घेऊन आयुर्वेदाबाबत सविस्तर चर्चा केली व प्रधानमंत्री यांना लेखी पत्रक सादर केलें.

६) महत्वाचें व निश्चित धोरणाचें कार्य मंडळाचें सदस्याकडून झालें तें असें

(अ) अकोला येथील म्यु. आयुर्वेदिक दवाखान्यावर पदवीधर वैद्याची नेमणूक

(ब) नागपूरच्या आयुर्वेदिक व युनानी बोर्डाचें काम (१) मंडळाच्याच धोरणांनीं तेव्हांचें अध्यक्ष व सेक्रेटरी चालले (२) शिक्षण संस्थेच्या निरीक्षण समितीचें कामहि पदवीधर वैद्यांकडेच होतें व त्यांनी या मंडळाचें सदस्यांनीं ज्या पद्धतीचा चार्ट व रिपोर्ट केला तो योग्य व स्तुत्य आहे.

नंतर मंडळाच्या धोरणाला पटलें नाहीं म्हणून त्यांनीं राजीनामा दिला हें विशेष होय.

(क) मंडळाचे कांहीं सदस्य निरनिराळ्या विभागांत पारंगत होण्याचा प्रयत्न करीत आहेत हेंहि मंडळाला भूषणावह आहे.

(i) त्यांत वैद्य गोगटे यांनीं मिळविलेलें अॅनेस्थेटिक म्हणून प्राविण्य व आय्. जी. कडचें सर्टिफिकेट हें होय.

(ii) श्री. वडोदकर यांनीं संशोधनाच्या बाबतींत केलेलें प्रयत्नहि स्तुत्य आहेत.

ह. रा. पिंपळे मंत्री
विदर्भ पदवीधर वैद्यमंडळ, आकोला

गृहवैद्य अथवा क्षारचिकित्सा

लेखकः-डॉ. गर्दे, आय्. एम्. एस्. (रिटायर्ड)

किंमत ३ रु, ट. ख. १० आणे

(१) वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

(२) डॉ. गर्दे, २६ मोगल लेन मुंबई १६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रायपूर येथें वनस्पति संशोधनशाला

(मध्यप्रदेश आरोग्यमंत्री ना. कन्नमवार यांचे विचार)

अमरावती येथील विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयाचें स्नेहसंमेलन व वार्षिक समारंभ मध्यप्रदेश सरकारचे आरोग्यमंत्री ना. कन्नमवार यांच्या अध्यक्षतेखालीं उत्तम रीतीनें साजरा झाला. त्याप्रसंगीं व्हॉलीबॉल, हुतुतु इ. खेळांचे सामने, 'घराबाहेर' नाटकाचा प्रयोग, नकला, कीर्तन, आसनें, चर्चा इत्यादि कार्यक्रम झाले. अध्यक्ष आपल्या भाषणांत म्हणाले:—

सरकारच्या मागें टोंचणी हवी

सरकार आयुर्वेदीयांना मदत करायला तयार आहे, पण ती मिळविण्याकरितां जें कार्य आयुर्वेदीयांकडून व्हावयास पाहिजे, व त्याकरितां त्याची सरकारचे मागें सारखी टोंचणी सुरू व्हावयास पाहिजे, तशी मध्यप्रदेश वैद्यक बोर्डाकडून होत नाहीं. बोर्डामध्येंच एकजिनसीपणा नाहीं. त्यांनीं एकमतानें मदतीची सारखी टोंचणी सुरू केल्याशिवाय, व वैद्यांनीं स्वतः जनतेचे आरोग्याकरितां कांहीं ताण जातीनें मेहनत घेतल्याशिवाय याबाबतींत प्रगति होणार नाहीं.

आरोग्यमंत्र्याजवळ त्रिफळा

ते पुढें म्हणाले "मी कोणत्याहि वैद्यकाचा अभिमानी नाहीं, कारण मी कोणत्याच वैद्यकाचा अभ्यास केलेला नसल्यानें एका विशिष्ट वैद्यकाबद्दल माझी आवड म्हणून सांगूं शकत नाहीं. माझें कार्य मी त्या त्या विषयांतील व्यक्तींना माहिती विचारून करीत असतो. माझ्यावर लहानपणापासून आयुर्वेदाचे थोडेफार संस्कार होण्यास आमच्या आजोबांनीं दिलेली आयुर्वेदीय औषधी, बाळकडु या नात्यानें निमित्त बनली. मी प्रवासामध्यें नेहमीं त्रिफळा जवळ ठेवत असतो. बायो–केमिकची सुद्धां एक बाटली त्यावेळीं जवळ असलेली त्यांनीं दाखविली. एकदोन संग्रहित वनस्पती दाखवून स्वतः त्यांचेबद्दल विचार करित असल्याचें त्यांनीं सांगितलें.

संशोधनशाळा उघडणार

अशा कितीतरी वनस्पती मध्यप्रदेशांत आहेत कीं, त्यांचा उपयोग निश्चित माहीत नसून त्या दृष्टीनें संशोधनाकरितां रायपुरला एक संशोधनशाळा आम्हीं उघडणार आहोत. ही वनस्पती इतक्या मोठ्या प्रमाणावर मिळेल कीं, वाटेल त्या प्रमाणावर इतर प्रांतांना किंबहुना सर्व हिंदुस्थानभर आम्हीं पुरवूं शकूं.

रोगप्रतिबंधनाकडे अधिक लक्ष

रोग होऊन त्यावर उपचार करण्यापेक्षां तो न होण्याची काळजी घेणें अगर प्रतिबंधकवजा उपाय करणें जास्त हितावह आहे. म्हणून त्याला मी श्रेष्ठ स्थान देतों. त्या दृष्टीनें औषधी शक्यतों स्वस्त व कोठेंही सहज उपलब्ध होणारी असल्यास जास्त फायदा होईल. या स्वस्तपणाचे दृष्टीनेंच पहा कीं पाश्चात्य वैद्यक, मिशनऱ्यांद्वारा आपली औषधी येथें आणून फुकट वाटते. त्याबद्दल तुलनात्मक दृष्टीनें विचार करावयास हवा.

थोडेंतरी लोककार्य करा

अशी कितीतरी खेडीं आहेत कीं २०–२५ मैलांच्या टापूमध्यें साधा एखादा डॉक्टर सुद्धां न मिळाल्यानें मनुष्य अगदीं हालहाल होऊन एखाद्या जनावराप्रमाणें मरतो, ही वाईट गोष्ट आहे. त्याकरितां आयुर्वेदीय वैद्यांनीं व इतरांनींसुद्धा आपल्या धंद्याचा थोडासा वेळ काढून आठवड्यांतून एकदां कां होईना खेड्यांत जाऊन रोगपीडितांना त्यापासून मुक्त करण्याचे दृष्टीनें घालवावा. त्यामुळें आयुर्वेदाबद्दल जनतेचे मनांत विश्वास निर्माण होऊन थोडेफार आर्थिक सहकार्य करावें असें सरकारला सुद्धां वाटेल. पण स्वतः–पलीकडे कोणीच बघत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयास मदत !

ते पुढें म्हणाले कीं विद्यार्थ्यांनींसुद्धां याच दृष्टीनें विचार करावा. मध्यप्रदेशांतील एक जुने सुप्रसिद्ध वैद्य पं. दा. मुळे यांच्या तपश्चर्येचें फळ आज आपण प्रत्यक्ष पहात आहोत. त्याबाबतींत सरकारनें मागें वेळोवेळीं कोणत्यातरी पद्धतीनें मदत केली आहेच. आतां सुद्धां मदत करण्याचा सरकारचा विचार आहे. पण निश्चित आंकडा अजून ठरलेला नसल्यानें त्याबद्दल आज कांहींच सांगू शकत नाहीं. "

बोर्ड-फॅकल्टी-ट्रिब्युनल

बोर्ड, फॅकल्टी व ट्रिब्युनल बाबत कोणास कांहीं प्रश्न, माहिती वगैरे विचारावयाची असल्यास म. प्रांतीय वैद्य मंडळाच्या कार्यालयाकडे लेखी प्रश्न अगाऊ द्यावेत. म्हणजे सवडीनें अगर लातूर अधिवेशनाचें वेळीं समक्ष चर्चेंत त्यांचीं उत्तरें देण्याची व्यवस्था होणार असल्याचें मागेंच जाहीर करण्यांत आलें होतें, त्याप्रमाणें कांहींनीं प्रश्न विचारले आहेत. आणखीही बरेच प्रश्न, शंका यांची आपणांकडून– मग आपण वैद्य असा वा नसा– अपेक्षा आहे तरी कृपा करून ते पाठवावेत.

कार्यालय नासिक | वि. म. गोगटे
मंत्री, महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचे सदस्य व्हावे व आयुर्वेदाकरितां व वैद्यांचे उत्कर्षाकरितां साधन म्हणून होणारी महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळाची संघटना उत्तरोत्तर अधिक मजबूत करावी अशी कार्यालयाची आपणांस विनंति आहे.

पनवेल अधिवेशन इतिवृत्त

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाच्या पनवेल अधिवेशनाचें इतिवृत्त छापून तयार झालें असून स्वागत सभासद व प्रतिनिधी यांचेकडे तें लवकरच पाठविलें जाणार असल्याचें समजतें.

सचोटी आणि दानत

सचोटी आणि दानत हे मानवी चारित्र्याचे दोन मूलभूत घटक मुळीं आमच्या रक्तांतच नाहींत. आमच्या बँका, कारखाने, गिरण्या वगैरे जे उद्योग धंदे बुडतात, किंवा सदैव नुकसानींत चालतात, ते या दोन गुणांच्या अभावामुळें !

इन्कम् टॅक्स भरण्याबाबतींतील चुकवाचुकवीचे आणि लपवाछपवीचे जे ओंगळ प्रकार चव्हाट्यावर आलेले आहेत, सगळ्या जीवनोपयोगी वस्तूंत जी आरोग्यघातक भेसळ करण्यांत येत आहे, जीं हजारो खोटीं रेशनकार्डें पकडलीं जात आहेत ते हे सगळे अनैतिक प्रकार एकच गोष्ट सिद्ध करतात, ती ही कीं, आमच्या रक्तांतच मुळीं सचोटी आणि दानत नाहीं.

हें जणूं ठरलेलेंच आहे !

त्यामुळें एकादी संस्था असो, बँक असो, कारखाना असो, गिरणी असो, खाते असो किंवा सर्व देशाचा राज्यकारभार असो, त्यांचीं सूत्रें आमच्या हातीं आलीं, म्हणजे त्यांत भ्रष्टाचार माजून त्यांचा खेळखंडोबा व्हावयाचा, हें जणूं ठरलेलेंच आहे !

आणि जसें आम्हीं, तशाच आमच्या संस्था, सरकार इ.

अनेक ग्राहकांच्या सूचनेवरून परतवाडा येथें आयुर्वेद सेवा संघ नासिकची सर्व अनुभविक व गुणकारी औषधें मिळण्याची सोय आम्हीं केली आहे.

श्री समर्थ स्टोअर्स
परतवाडा (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वनस्पतींचें वर्गीकरण व नामाभिधान

(वनस्पतितज्ञ डॉ. आघारकर यांचें व्याख्यान)

बहिःशाल व्याख्यानमालेतर्फे नाशिक येथें झालेल्या व्याख्यानमालेंत वनस्पतींचें वर्गीकरण व नामाभिधान ह्या विषयावरील ता १०।२।५३ रोजीं आपले विचार मांडतांना प्रसिद्ध वनस्पतितज्ञ डॉ. आघारकर म्हणाले-

सध्याचें वैद्यक ही कला आहे

पायाशुद्ध व पद्धतशीर ज्ञान ज्यांत आहे त्याला शास्त्र अशी संज्ञा देतां येईल. न्याय-मीमांसा-सांख्य-आदि शास्त्रांप्रमाणेंच वैद्यक हें शास्त्र आहे व वनस्पतींचेंहि स्वतंत्र शास्त्र होऊं शकतें. वैद्यकशास्त्राची ओळख आपणांस अद्याप पुरेशी झालेली नाहीं. साधें पडसें काय आहे हेंहि अद्याप उलगडत नाहीं, म्हणून सध्यांचें वैद्यक हें वैद्यकशास्त्र होण्यापेक्षां केवळ रोग बरा करण्याची कला झालेली आहे.

वनस्पतींचें निश्चित वर्गीकरण

वनस्पतींचें स्थूलमानानें वर्गीकरण फार प्राचीन कालापासून केलेलें आहे. दळणवळणाचीं साधनें वाढूं लागलीं व मनुष्याचा दूरदूरच्या वनस्पतींशीं अधिक निकटचा संबंध येऊं लागला, तशी अधिक सूक्ष्म वर्गीकरणाची जरूरी भासूं लागली. त्यांत अनेकांनीं अनेक प्रकारचे वर्गीकरणाची शिफारस केली; पण गोंधळ वाढले म्हणून वनस्पतींच्या वर्गीकरणाचे आंतरराष्ट्रीय नियम १९३५ सालीं निश्चित करण्यांत आले व आज त्या पद्धतीनें वनस्पतींचें वर्गीकरण चालू आहे.

वर्गीकरणाची आवश्यकता

आपण कोणत्या वनस्पतीबद्दल बोलतो हें सांगणारास व ऐकणारास समजावयास पाहिजे. याकरितां वर्गीकरणाची आवश्यकता आहे. वनस्पति व प्राणी यांना आपण जातीय नांवें देतो. पण माणसांना मात्र आपण व्यक्तिगत निरनिराळें नांव देत असतो.

फुलें व फळें वर्गीकरणास उपयोगी

जाती (Species). हा वर्गीकरणाचा पाया आहे. पुढील सर्व वर्गीकरण हें जातीवर अवलंबून असतें. ज्यांच्यांत फार मोठा फरक नाहींत अशा व आनुवंशिक संस्कार धारण करतात अशा फुलांवरून वनस्पतींचें वर्गीकरण केलें जातें. जास्त दिवस टिकणाऱ्या खोड वगैरे अवयवांवर हवामानाचा सतत परिणाम होत असल्यानें वर्गीकरणाकरितां त्यांचा उपयोग होत नाहीं. फुलें, फळें हीं अल्पजीवि असतात, त्यांचाच उपयोग वर्गीकरणाकरितां अधिक करतात. जाती, गोत्र, कुल, श्रेणी, वर्ग, शाखा व कोटी हीं वनस्पती वर्गीकरणांत उत्तरोत्तर अधिक अधिक व्यापक असतात.

वनस्पतींचीं पूर्वीं दिलेलीं नांवेंहि कालांतरानें त्याच्या मूळस्थानाचा व आकारविशेषाचा शोध लागत गेल्यावर बदलत गेलीं आहेत.

वनस्पतींची माहिती वैद्यांकडून मिळविली

हिंदुस्थानांत प्रथम वनस्पतींचा अभ्यास डचांनीं केला. सन १६८२ पासून मलबारचा भाग जिंकल्यावर वनस्पतींच्या अभ्यासास त्यांनीं सुरवात केली व तेथील चांगल्या वैद्यांकडून माहिती मिळविली. त्यांत रंगभट्ट, आपुभट्ट, व विनायक पंडित हे तिघे महाराष्ट्रीय प्रसिद्ध वैद्य होते. पैकीं विनायक पंडित हा पोर्च्युगीज भाषा जाणत होता. ह्या तिघांनीं तयार केलेला ७०० पर्यंत चित्रें असलेला पहिलाच खंड सन १६८६ ते १७१३ या कालांत ॲम्स्टरडॅम येथें प्रसिद्ध झाला.

" हिंदुस्थानांतील उपयुक्त वनस्पति " या विषयावर बोलतांना मानवी जीवनाच्या अन्न, वस्त्र व निवारा या प्राथमिक गरजा वनस्पतींनीं कशा भागूं शकतात याबाबत माहिती त्यांनीं सांगितली.

वनस्पतीबद्दल अपुरी माहिती

रोगोपचार व आरोग्य याकरितांहि वनस्पतींचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उपयोग करतां येतो. हिंदुस्थानांतील कितीतरी वनस्पतींची आपणांस अद्याप ओळख नाहीं. वैद्यालाहि ती नाहीं आणि तज्ञांनाहि नाहीं; मिळणाऱ्या वनस्पती भेसळीच्या असतात. अनेकांना जवळचें शेत गव्हाचें का ज्वारी–बाजरीचें आहे तें माहित नसतें. निघंटूंत वर्णनें आहेत, पण अद्याप पुरेशी निश्चिती नाहीं.

स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिन, कलकत्ता, नॅशनल ड्रग इंस्टिट्यूट लखनौ, बेंगाल इम्युनिटी या संस्था तसेंच जामनगरची संशोधन संस्था, वनस्पतीवर संशोधन करीत आहेत. पूर्वी हाफकिन इंस्टिट्यूटमध्येंहि असें संशोधन होत असे. याशिवाय एकाद्या विद्यापीठांत एकादा प्राध्यापक याबाबत थोडें फार संशोधन करीत असतो पण अधिक पद्धतशीर रीत्या संशोधन व तेंहि अधिक प्रमाणांत व्हावयास पाहिजे आहे.

संपूर्ण वनस्पती कां वापरावी ?

वनस्पतींचें कार्यकारी द्रव्य (Active Principle) काढून वापरण्यापेक्षां त्या वनस्पतींचे पंचांग उपयोगांत आणण्यानें अधिक चांगले परिणाम होतात व त्यांचें कार्यक्षेत्रहि व्यापक होतें. तसेंच त्या वनस्पतीच्या नैसर्गिक घडणेंतील घटक द्रव्यांचें परस्पर प्रमाण अशा उपयोगांत राखलें जातें, त्याचाहि परिणाम अधिक चांगला होतो. पूर्वीची संपूर्ण वनस्पति वापरण्याची पद्धति बदलून मध्यंतरीं कार्यकारी द्रव्यें वापरण्याची पद्धत सुरू झाली. पण आतां पुन्हां पूर्वपदावर हें गाडें येऊं घातलें आहे.

औषधींचा उपयोग करतांना

वनस्पतींच्या कोवळया अगर वृद्धावस्थेंत चांगला उपयोग होत नाहीं. ऋतुमानानें वनस्पतींत फरक पडतो. एवढेंच काय पण सकाळ दुपार सायंकाळ यांतहि फूल–पानादि अवयवांच्या गुणधर्मात फरक पडत असतो. औषधी उपयोगांत आणतांना या सर्व गोष्टींचा विचार बारकाईनें करावा लागतो.

लातूर अधिवेशनाच्या तारख

लातूरचे उत्साही वैद्य श्री. गो. जोहारी आ वैदतीर्थ यांनीं महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळा लातूर येथे भरणाऱ्या अधिवेशनाचा मराठवाड्यां बीड, औरंगाबाद, नांदेड, परभणी वगैरे भागांत प्र करून अधिवेशनाकरितां द्रव्यसाहाय्य मिळ आहे. हैद्राबादलाहि ते नुकतेच जाऊन आले आ मराठवाड्यांत व इतरत्र त्यांना पाठिंबा मिळत आ

ते नुकतेच नासिक येथें येऊन गेले. ये बरेच स्वागत सभासद व प्रतिनिधी त्यांनीं प्रांतीय वैद्य मंडळाच्या कार्यालयाकडील च तारीख २४ व २५ मे १९५३ ह्या तारखा अधि वेशनाकरितां सोयीच्या पडतील, असें मत त्यां व्यक्त केलें असून बहुतेक याच तारखा निश्चि करण्यांत येतील.

प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत

१	कलब्याची मीमांसा	किं. ६ रु.
२	आधुनिक आहारशास्त्र	१॥ रु.
३	आधुनिक कामशास्त्र	४ रु.
४	वेश्याव्यवसाय	२ रु.
५	समाजस्वास्थ्य मासिकांतील निवडक लेख भाग २रा	२ रु.
६	समाजस्वास्थ्य मासिक (वार्षिक वर्गणी)	३ रु.
७	संततिनियमन (सचित्र)	१। रु.
८	गुप्तरोगांपासून बचाव	१ रु.
९	तेरा गोष्टी	१ रु.
१०	त्वचेची निगा	८ आणे
११	गुरुबाजी (नाटक)	८ आणे
१२	न्यायाचा शोध (नाटक)	१ रु.
१३	पॅरिसच्या परी	३ रु.

१ राइट एजन्सी, नवी भटवाडी मुंबई ४

२ वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रां. वैद्यमंडळ

महाराष्ट्र प्रां. वैद्यमंडळाचा रत्नागिरी जिल्ह्यांतील यशस्वी प्रचार

पूर्वी जहीर झाल्याप्रमाणें महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचे अध्यक्ष वैद्य बिंदुमाधव पंडित हे ता. १४ रोजीं दुपारीं रत्नागिरीच्या दौऱ्यासाठीं रवाना झाले, व ता. २३ रोजीं दौरा संपवून परत आले. या दौऱ्यांत त्यांनीं मालवण, वेंगुर्ला, कोलगांव, सावंतवाडी, कणकवली, फोंडा, राजापूर, धोपेश्वर, रत्नागिरी, संगमेश्वर, चिपळूण, खेड, दापोली येथें जाऊन वैद्यमंडळींच्या भेटी घेतल्या व विचारविनिमय केला. या ठिकाणीं आजूबाजूच्या गांवची वैद्यमंडळीहि हजर राहिली होती. सावंतवाडी, कणकवली, राजापूर, रत्नागिरी, चिपळूण या गांवीं नागरिकांच्या सभा घेण्यांत आल्या. रत्नागिरी, चिपळूण येथें भगिनीमंडळाच्या स्वतंत्र सभांत भाषणें झालीं. मालवण, कणकवली, राजापूर येथील हायस्कूलांत व्याख्यानें देण्यांत आलीं. याशिवाय ५ मराठी शाळा व रत्नागिरीचें ट्रेनिंग कॉलेज मधील २५० शिक्षक-विद्यार्थी यांच्या मोर अध्यक्षांची आयुर्वेदाच्या वैशिष्ट्याचा बोध करून देणारीं व आरोग्याचा मार्ग दर्शविणारीं प्रवचनें झालीं. कोलगांव येथील सातवळेकरांचा कारखाना, सावंतवाडी येथील गणपत्ये, धोपेश्वर येथील करंबेळकर, राजापूर येथें लक्ष्मीकेशव औषधीशाळा इ. कारखान्यांना भेटी देण्यांत आल्या. सावंतवाडी व खेड येथील सरकारी व म्यु. दवाखाना आणि सूतिकागृहें पाहिलीं. या दौऱ्यांत ६० वैद्य महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचे सभासद झाले. सावंतवाडी येथें श्री. अण्णासाहेब शिरोडकर (संपादक, वैनतेय), कणकवली येथें सुप्रसिद्ध सर्वोदयवादी श्री. अप्पासाहेब पटवर्धन व चिपळूण येथें श्री. चवें हेडमास्तर ही विद्वान् मंडळी अध्यक्ष म्हणून लाभली होती.

निरपेक्ष सेवा-कार्य

हा दौरा आंखण्यापासून तो पूर्ण करीपर्यंतचीं सर्व खटपट व पत्रव्यवहार लालबाग येथील वैद्य वि. म. भारकर यानीं केला. दौऱ्यांत ते प्रारंभापासून शेवट पर्यंत अध्यक्षासमवेत राहिले, इतकेंच नव्हे तर हें सर्व त्यांनीं स्वतःच्या खर्चानें केलें. याबद्दल महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळानें त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत.

अनुक्रमणिका

आयुर्वेदीय सूचिकाभरणास बंदी नसावी	५३३
आयुर्वेदाशीं संबंध आल्यानें सार्थक झालें	५३४
आयुर्वेदीय पाठचिंतामणी	५३५
डॉ. आघारकराची सेवासंघास भेट	५३८
१९५२ चें विधिमंडळ बिल नं. ३८	५३९
अ. भा. आयुर्वेदिक टेंडल मिशन	५४०
वाचकांचा पत्रव्यवहार	५४१
जमीन मालक वैद्याची कहाणी	५४२
रक्तपित्त (हेमरेज) चिकित्सा	५४३
म. प्रां. वैद्य मंडळाला साहाय्य	५४९
आयुर्वेद संशोधन हें वैद्यांचें कार्यक्षेत्र आहे	५५१
रजिस्टर्ड वैद्यांची सभा, जळगांव	५५५
म. प्रां. वैद्य मंडळाची सरकारांत नोंदणी	५५७
विदर्भ पदवीधर वैद्य मंडळ, अकोला	५५८
रायपूर येथें वनस्पति संशोधनशाला	५५९
वनस्पतींचें वर्गीकरण व नामाभिधान	५६१
लातूर संमेलनाच्या तारखा	५६२

निमदुष्काळी भागांत फिरतीं इस्पितळें

मुंबई सरकारच्या फिरत्या इस्पितळ पथकाचे सर्व (म्हणजे सहा) ॲसिस्टंट मेडिकल ऑफिसर त्यांच्या मोटार लाऱ्यांसह सोलापूर, पश्चिम खानदेश, विजापूर आणि अहमदनगर जिल्ह्यांतील निमदुष्काळी कामावरील कामगारांना वैद्यकीय मदत देण्यासाठीं त्या जिल्ह्यांत पाठविण्यांत आले आहेत. तसेंच पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील निमदुष्काळी कामांवर चार, आणि अहमदनगर जिल्ह्यांत तीन नर्स पाठविण्यांत आल्या आहेत; निमदुष्काळी भागांत सांथीचे रोगप्रतिबंधक उपाययोजना चालू आहेत. तसेंच या जिल्ह्यांत पुरेशी औषधें व जन्तुनाशक द्रव्यें ठेवण्यांत आलीं आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— सरकारी मदतीस पात्र संस्था —

मी आरोग्य-मंदिर या सुंदर संस्थेला आज भेट दिली, व दीड तास वैद्य परांडेकर व त्यांचे शिष्य यांनीं केलेलीं विविध आसनें व कर्में केलेलीं पाहण्यांत घालविला. हीं आसनें विविध प्रकारचीं असल्यानें शरीराचे सर्व स्नायु व अवयव यांवर परिणाम घडवून आणण्यास समर्थ अशीं आहेत. हीं विविध आसनें व कर्में ज्या सहज रीतीनें व कौशल्यानें केलीं जाऊं शकतात त्यांतच त्यांचें वैशिष्ट्य सांठविलेलें आहे. ....

हें स्वास्थ्य महाविद्यालयाचें मध्यवर्ति केंद्र व्हावें

जनतेकडून तसेच सरकारकडून साहाय्य मिळण्यास ही संस्था पात्र आहे. खरोखर मी अशी सूचना करीन कीं शारीरिक व स्वास्थ्यविषयक महाविद्यालयाचा, ही संस्था, मध्यवर्ति केंद्र (हृदय-मेंदू) व्हावी. अशा या महाविद्यालयांत कवायत, खेळ, कुस्त्या, आसनें, योग-क्रिया व शस्त्रास्त्रें या सर्वांचा समावेश व्हावा. याचें प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन असें ३ भाग पाडण्यांत यावेत. अशी योजना होण्यापूर्वीहि सरकारकडून या प्रयत्नास ताबडतोब मदत मिळणें अवश्य आहे.

— बी. पट्टाभिसीतारामय्या २४।१।५३

त्वचा-रोगांचा प्रादुर्भाव होताच विचार करण्यांत वेळ न दवडतां रक्तशुद्धीकरितां प्रसिद्ध असलेलें रक्तदोषांतक घेणें सुरू करा.

"आफाळि" रक्त दोषांतक

आयुर्वेदाश्रम
फार्मसी लिमिटेड, अहमदनगर.

EVEREST K. S.

संपादक व प्रकाशक:—वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक
मुद्रक:—श्री. दामोदर महादेव चव्हाण, विज्ञान प्रेस, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ६ वें) नाशिक, ता. १६ मार्च १९५३ (अंक १८ वा

" त्यांची रुचि बदला "—राधाकृष्णन्

" वृत्तपत्रांनीं लोकांना रुचेल तें देण्याऐवजीं, विचारी वृत्तपत्रें जें पथ्यकर वाङ्मय देतील, त्याची रुचि जनतेला लागली पाहिजे. " असा आदेश भारताचे उपाध्यक्ष श्री. राधाकृष्णन् ह्यांनीं संपादकांना दिला आहे. ते पुढें म्हणाले:- " वृत्तपत्रें हीं लोकशिक्षणाचें प्रभावी साधन आहे व म्हणूनच जीं ध्येयें नि हेतु आपण बाळगले आहेत, त्यासाठीं वृत्तपत्रांनीं जनतेला तयार केलें पाहिजे. वृत्तपत्रें जनतेला भडकवूं शकतात, तथापि त्यांनीं त्यांना संयमच शिकवला पाहिजे. आपण अगदीं परिपूर्ण आहोंत, आणि आपणांत आणखी कांहीं सुधारणा करण्याची आवश्यकता नाहीं, ही समजूत अत्यंत चुकीची आहे. व्यक्तीच्या व राष्ट्राच्या जीवनांत सत्य व विनम्रता हीं नसानसांतून भरून राहिलीं पाहिजेत. वृत्तपत्रांनीं निष्ठा, उच्च पातळी व संयम राखून जनता व सरकार ह्यांना मदत केली पाहिजे. "

(कुर्वते हि रुचिं दोषाः । हें आयुर्वेदशास्त्राच्या निदान-चिकित्सेंतील अत्यंत महत्वाचें सूत्र आहे. शरीर-मनांत वाढलेले शारीर-मानस दोषच, स्वस्थ अगर विकृत रुचि उत्पन्न करीत असतात. जनतेची विकृत रुचि बदलण्यासाठीं जनतेमध्यें वाढलेले दोष प्रथम जाणून घेतले पाहिजेत व ते दोष दूर केले पाहिजेत तरच त्यांची रुचि बदलली जाऊ शकेल — संपादक)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द. सातारा जिल्हा-वैद्य-संमेलन, सांगली अधिवेशन १ लें

सांगली येथें रविवार ता. २९ मार्च १९५३ रोजीं द.सातारा जिल्हा वैद्य-संमेलन भरविणेचें निश्चित ठरविलें आहे. संमेलनाचे अध्यक्ष म्हणून नाशिकचे वैद्य बिंदुमाधवशास्त्री पंडित (अध्यक्ष म. प्रांतीय वैद्य मंडळ, नाशिक) हे उपस्थित राहाणार आहेत.

संमेलन भरविणेचा मुख्य उद्देश द. सातारा जिल्हा वैद्य वर्गाची संघटना करणें हा असून त्यासाठीं संमेलन-कार्यक्रमांत आयुर्वेदविषयक व्याख्यानें, चर्चा, प्रात्यक्षिकें, प्रदर्शन वगैरे गोष्टी ठेवण्यांत येणार आहेत.

संमेलनाबाबत स्वागत सभासद फी दोन रुपये, प्रतिनिधी फी एक रुपया, प्रेक्षक व देणगी शुल्क चार आणे ते एक रुपया अशी ठेवण्यांत आली आहे.

संमेलनाचा कार्यक्रम, स्थळ, वेळ वगैरे माहिती निमंत्रणपत्रिकेसोबत पाठविणेंत येईल. तरी सर्व वैद्य बंधुभगिनींनीं व आयुर्वेदप्रेमी मंडळींनीं संमेलन यशस्वी करणेस सक्रिय सहकार्य द्यावें ही विनंति. संमेलनांत मांडण्यासाठीं ज्यांना कोणास सूचना ठराव वगैरे पाठविणेंचे असतील त्यांनीं ता. २२।३।५३ पर्यंत आमचेकडे पाठवावेत. कळावें.

वैद्य ग. मो. वझे — कार्यकारी चिटणीस
वैद्य वा. वा. जोशी, खानापूरकर — अध्यक्ष

वैद्य पं. रा. कुलकर्णी

आयुर्वेद सहकारी मंडळ

पत्ता:— ३७५ गणपति पेठ, सांगली

मूक सेवा

सेवामें, श्रीयुत संपादक महोदय आयुर्वेद पत्रिका,
आयुर्वेद सेवा संघ, नाशि

महोदय,

मैं यह जानना चाहता हूं की सेवा सं सप्तम पुस्तिका अनुभविक चिकित्सा के लेलकमहो कौन व्यक्ति है और कहां रहते हैं। उनका स्पष्ट प देनेका कष्ट करें।

आपके अनुभूत योगोंमेंसे दो एक की हमें परीक्षा की है। योग अत्युत्तम प्रतीत हो रहे हैं।

इस महाशय की मूक सेवा सराहनिय है।

श्री मृत्युंजय फार्मसी, बतरौली
पो. हेतिमपुर जि. देवरिया
उत्तर प्रदेश
— जगन्नारायण श

या अस्वच्छतेच्या संवयी !

संडास घाणेरडेपणानें वापरणें, जागोजागीं पा खाऊन थुंकणें व बेडके टाकणें, वरच्या मजल्यावरू फूटपाथवर सर्व प्रकारची घाण चालणाराच्या डोक्या वर टाकणें, आगगाड्यांतून सांसर्गिक रोग झालेल्या भिकाऱ्यांना दानधर्म करून उत्तेजन देणें या घाणेरड्या संवयी नागरिकांना लागल्या आहेत, त्यामुळे परमेश्वर स्वतः जरी अवतरला तरी येथें स्वच्छता नांद णार नाहीं. लोकांच्या या संवयी गेल्या पाहिजेत ना

चमत्कारी आयुर्वेदीय इंजेक्शन्सचा नवा शोध

आधुनिक वैज्ञानिक पद्धतीच्या यंत्रांनीं परिपूर्ण अशा रसायनशाळेंत तयार झालेल्या 'मार्तंड'च्या इंजेक्शनांचा प्रभाव तत्काळ दिसून येतो. तीं कधीं खराब होत नाहींत. याच कारणास्तव प्रत्येक वैद्य यांचें तात्वडतोब गुणकारित्व व विशुद्धता यांची प्रशंसा करतात. एकवेळ अवश्य अनुभव घ्या. माहितीपत्रक मागवा, मोफत पाठवू.

मार्तंड फार्मास्युटिकल्स, बडौत, S. S. Rly. यू. पी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'वाग्भटा'वरील उद्बोधक व्याख्यानें

(मुंबई येथें माजी प्रभुराम आयुर्वेदिक कॉलेजच्या हॉलमध्यें ता. ८ डिसेंबर १९५२ पासून २-१-५३ पर्यंत रोज रात्रीं आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी यांची 'वाग्भट' या विषयावर २० व्याख्यानें झालीं, त्यांचा संकलित मतितार्थ वैद्य लक्ष्मीबाई बोरवणकर आयुर्वेदविशारद यांनीं पत्रिकेच्या वाचकांसाठीं लिहून पाठविला आहे. – संपादक)

ग्रंथ कसा लावावा ?

कोणताहि ग्रंथ वाचावयास घेतला कीं प्रथम तो कसा लावावा हें समजणें ही अत्यन्त महत्त्वाची गोष्ट होय. ग्रंथ वाचतांना प्रथम ग्रंथकर्त्याची ओळख करून घ्यावी. या ग्रंथकाराचें मत काय आहे ? हा ग्रंथकार प्राधान्य कशाला देतो ? त्याची लिहिण्याची पद्धत अशी आहे ? ग्रंथाची मांडणी कशी आहे, ग्रंथाचे भाग कसे पाडले आहेत, त्यांचा क्रम कसा आहे इत्यादि गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत. जर अशा रीतीनें ग्रंथकर्त्याची ओळख करून घेतली नाहीं तर ग्रंथ लावणें जड जातें, किंबहुना योग्य अर्थ लागतच नाहीं.

विद्वान् वैद्य, उत्तम कवि, महान् रसिक

वाग्भटाचार्य हा ग्रंथकर्ता विद्वान् वैद्य, उत्तम कवि, महान् रसिक आणि वैय्याकरणी व मीमांसक होता, हें त्याचे ग्रंथ वाचतांना प्रत्ययास येतें. त्याचें कवित्व जागजागीं आढळतें. प्रास-अनुप्रासयुक्त काव्यपंक्ति जागोजाग आहेत. "तप्तं तप्तांशुकिरणैः शीतं शीतांशुरश्मिभिः ।" अशा तऱ्हेचें वर्णन अनेक ठिकाणीं आहे. बागबागिच्यांचें अगर मद्यगृहाचें वर्णन हें त्याच्या रसिकतेचें लक्षण आहे, तर वाजीकरण-प्रयोग सांगतांना त्यानें मुलाचें केलेलें वर्णन कविकुलगुरु कालिदासाची आठवण करून देणारें आहे.

मोजक्या शब्दांत खूप अर्थ

अगदीं थोडक्या व मोजक्या शब्दांत खूप अर्थ आणण्याची त्याची हातवटी विलक्षण आहे. त्याच्या शब्दांचा जोर व सामर्थ्य विशेष असून प्रत्येक गोष्ट क्रमवार व पद्धतशीर सांगण्याची त्याची रीतहि मीमांसकाला शोभणारी आहे. "वयोऽहोरात्रिभुक्तानां तेऽतमध्यादिगाः क्रमात्" या एकाच सूत्रांत त्याची वैय्याकरणी वृत्ति स्पष्ट दृग्गोचर होते. हाच अर्थ सांगण्यासाठीं इतर ग्रंथकारांना दोन तरी श्लोक खर्च करावे लागले असते.

आचार्य वेणीमाधवशास्त्री

सिंहगुप्तसुनु वाग्भटाचार्यांचे ५ ग्रंथ

(१) अष्टांगसंग्रह, (२) अष्टांगहृदय, (३) अष्टांगनिघंटु, (४) अष्टांगसार, (५) सिद्धसार, हे त्यांचे ५ ग्रंथ होत. अष्टांगसंग्रह व अष्टांगहृदयाचा कर्ता एकच आहे. दोन्हीं ग्रंथकर्त्यांच्या पित्याचें नांव एकच असून दोन्ही ग्रंथांची भाषा, विचारसरणी आणि क्रमहि तोच आहे. शिवाय त्याचें स्वतःचेंच विधान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे कीं अष्टांगहृदय हें अष्टांगसंग्रहाचें " नातिसंक्षेप विस्तरम् " असें निराळें रूप आहे. संग्रहाचा बोध हृदय वाचल्यानें होईल.

रसरत्नसमुच्चयाचा कर्ता कोण ?

रसरत्नसमुच्चय हा ग्रंथ वाग्भटाच्या नांवावर विकला जातो, परन्तु त्याची भाषा निराळी असून निदानांत फार फरक आहे. तें दिलें आहे. वाग्भटाचें रचनाकौशल्य त्यांत नाहीं. या ग्रंथाचा टीकाकारांनीं कोठेंहि उल्लेख केलेला नाहीं. ग्रंथाचा कालहि पुढचा आहे, म्हणून रसरत्नसमुच्चयकर्ता वाग्भट, संग्रह-हृदयकार वाग्भटाहून भिन्न आहे.

अष्टांगनिघंटु हा वाग्भटाचा ग्रंथ होता. तो निघंटु निराळा पडला. निघंटु असलाच पाहिजे. सूत्रस्थानांत अन्नद्रव्यविज्ञानीय अध्याय सांगितला आहे त्यांत खाण्याच्या पदार्थांचें वर्णन आहे, पण चिकित्सा-स्थानांत सांगितलेल्या अनेकविध औषधींचे गुणधर्म त्यांत कुठें सांगितले आहेत ? हे गुणधर्म त्या निघंटूंत आहेत. हें पुस्तक मद्रास व तंजावर येथील लायब्ररींत पाहावयास मिळतें.

सिद्धसार हा अतिसंक्षेपाचा ग्रंथ; अष्टांगसंग्रहाचा अतिविस्तार, अष्टांगहृदयांत अतिसंक्षेप नाहीं किंवा अतिविस्तार नाहीं, तर सिद्धसार हा वाग्भटाचा अतिसंक्षेपांत लिहिलेला ग्रंथ !

वाग्भटाची परंपरा

वाग्भटाचे इंदु व जेज्जट असे दोन शिष्य ! इंदूनें संग्रहावर टीका केली. अरुणदत्तानें अष्टांग-हृदयावर टीका केली. तीसटाचार्यांना वाग्भटाचा पुत्र मानतात, पण योग्य पुरावा उपलब्ध नाहीं.

दोषा वाच्या गुरोरपि

अष्टांगहृदयांत शारीराचें वर्णन चांगलें नाहीं. नव्हे त्यांत दोषच आहेत. असे दोष निर्माण होण्याचें कारण शास्त्रांत सांगितलेल्या गोष्टी प्रत्यक्षांत पाहणें, त्यांना शक्य झालें नाहीं. तो काल बुद्धकाल असल्यानें शस्त्रक्रिया आणि शवविच्छेदन हीं नष्टच झालीं होतीं. आयुर्वेद हें प्रत्यक्षाचें शास्त्र आहे. त्यामुळें प्रत्यक्षापासून दूर असलेल्या या ग्रंथकाराला शारीराचें बरोबर वर्णन करतां आलें नाहीं हें स्वाभाविक आहे.

" प्रत्यक्षतो च यद्दृष्टं शास्त्रदृष्टं च यद् भवेत् ।
समासतः तद् उभयं भूयो ज्ञानविवर्धनम् ॥ "

ग्रंथाचा मुख्य भाग, सूत्रस्थान

अशा रीतीनें ग्रंथकार जाणून घेतल्यानंतर ग्रंथ लावतांना ग्रंथाचा मुख्य भाग कोणता, हें पहावें. अष्टांगहृदयांत सूत्रस्थान अत्यंत महत्वाचें आहे. सर्व शास्त्र-नियम सूत्रस्थानांत आहेत. आयुर्वेदाचें सारें तत्वज्ञान त्यांत भरलें आहे. त्रिदोष आहेत, सप्तधातु आणि तीन मळ हे सर्व त्यांत आहेत. आयुर्वेदाचें तत्वज्ञान प्रथम शिकवून मग त्या दृष्टींतून शारीर शिकवावयाचें ही आयुर्वेदाची पद्धत. तर प्रथम अनॅटमी शिकव-ण्याची ॲलोपॅथीची पद्धत ! आयुर्वेदाचें तत्वज्ञान सांगण्यासाठीं प्रथम सूत्रस्थान व नंतर शारीर अशी ग्रंथाची मांडणी केली. त्यांतहि पहिला अध्याय फार महत्वाचा आहे. आयुर्वेदीय तत्वज्ञान नीट समजून घेण्यासाठीं सूत्रस्थान प्रथम अभ्यासावें.

अपूर्व वैद्याची प्रार्थना

नांदीवरून जसें नाटक काय आहे हें कळतें त्याप्रमाणें प्रार्थनेवरून ग्रंथाचें स्वरूप काय आहे हें कळतें. हा ग्रंथ लिहितांना ग्रंथकर्त्याची दृष्टि वैद्यकाची होती. म्हणून त्यांनीं प्रार्थना देखील अपूर्व वैद्याचीच केली. त्यांना दोनच प्रमुख गोष्टी वाटल्या. एक चिकित्सेचें अधिष्ठान शरीर (रोगी), आणि दुसरें चिकित्सेचें साधन म्हणून सारें विश्व; यामुळेंच म्हणतात कीं जगांत अनौषध अशी वस्तूच नाहीं.

चिकित्सास्थान व उत्तरस्थान

वाग्भट हा कायचिकित्साप्रधान ग्रंथ आहे. उत्तरतंत्र वगैरे प्रत्येक ग्रंथांत असलें तरी प्रत्येक ग्रंथाची मांडणी व क्रम भिन्न आहेत. सुश्रुत शल्यचिकित्सक असल्यामुळें त्याच्या चिकित्सास्थानांत शस्त्रक्रियेचे रोग आले आणि ज्वरादि रोग उत्तरतंत्रांत लिहिले, तर वाग्भटानें ज्वरादि चिकित्सास्थानांत घालून शल्यचिकित्सा उत्तरस्थानांत लिहिली. उत्तरस्थान हें सर्व उरल्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुरल्या किंवा गौण गोष्टी सांगण्याचें स्थान. ग्रंथ पूर्ण झाल्यावर राहिलेल्या सर्व गोष्टींची गोठवण करण्याचें स्थान तें उत्तरस्थान !

अध्यायांची संगतवार मांडणी

क्रमवार लिहिणें हें वाग्भटाचें वैशिष्ट्य ! पहिला अध्याय आयुष्कामीय ! निरोगी स्थितींत १०० वर्षे जगावें यासाठींच सर्व प्रयत्न म्हणून प्रथम आयुष्कामीय अध्याय, तर निरोगी राहण्यासाठीं सकाळीं उठण्यापासून रात्रीं झोपेपर्यंत कसें वागावें याची पद्धतशीर माहिती दुसऱ्या अध्यायांत. तसेंच आरोग्याच्या मूलतत्वांचें विवेचन याच अध्यायांत आहे. आरोग्य हें उन्हाळा, पावसाळा व हिंवाळा या कालांवर अवलंबून असल्यानें तिसऱ्या अध्यायांत ऋतूंची माहिती सांगितली आहे. ऋतूंचे सहा रसांवर होणारे परिणाम, शरीरावर होणारे परिणाम व वातावरणावर होणारे परिणाम सांगून त्या त्या वेळीं कसें वागावें व त्याचा प्रतिकार कसा करावा हें तिसऱ्या अध्यायांत सांगितलें. आरोग्य बिघडण्याला मलमूत्रादिकांचें वेगविधारण कसें कारणीभूत होतें हें चौथ्या अध्यायांत सांगितलें. उपयुक्त द्रव्यांचा विचार ५-६ व्या अध्यायांत केला तर अनुपयुक्त द्रव्यें ७ व्या अध्यायांत सांगितलीं. आहाराचें प्रमाण, आहाराचा शरीराशीं संबंध हें आठव्या अध्यायांत सांगितलें. द्रव्यांच्या गुणधर्मांसाठीं ९-१० हे अध्याय सांगितले. अकरा बारा दोषवर्णन, बारा तेरा चौदा दोषचिकित्सा सांगितली. चिकित्सेला उपयोगी पडणारीं औषधें १५ व्यांत सांगून नंतर स्नेहनादि विषय १६।१७।१८।१९।२० यांत सांगितला. सर्वांचे शेवटीं शल्यतंत्र सांगितलें.

त्रिदोष - दोषधातुमलामूलं हि शरीरम् ।

दोष, धातु व मल याखेरीज शरीरांत चवथी वस्तु नाहीं. शरीरांतील सर्व घटकांचा अंतर्भाव या तीन वस्तूंत केला जातो. वातपित्तकफ हे तीन दोष, रसरक्तादि सात धातु आणि मलमूत्रस्वेद हे तीन मल! सम्यक् आहाराचें योग्य पचन झाल्यानंतर प्रथम तयार होणारे घटक म्हणजे दोष. घेतलेल्या आहाराचे विशिष्ट धातु बनण्यापूर्वीं त्याचें जें सर्वसामान्य स्वरूप असतें तें दोषात्मक (दोषगुणात्मक) असतें. हे दोष शरीर धारण करतात तोंपर्यंत त्यांस धातु म्हणतात (धारणात् धातवः) आणि तेच शरीराला शल्यरूप होऊं लागले म्हणजे त्यांस दोष म्हणतात (दूषणात् दोषाः)

आहार धातुसम करणें हें दोषांचें काम

या दोषांचें शरीरधारणेला जितकें प्रमाण आवश्यक आहे तितकेंच शरीरांत असलें म्हणजे ते समदोष! आणि कमी अधिक झाल्यास विषम दोष. हे प्रमाणाहून अधिक बनले तर शरीर दूषित करतात आणि कमी झाले तरी विकृति निर्माण करतात. शरीरांतील पोषण आहारानें होत असतें. हा आहार धातुसम करणें हें दोषांचें काम. सप्त धातूंची सारी भिस्त या दोषांवर आहे. "वायु पित्तं कफश्चेति त्रयो दोषाः समासतः" तीन दोष हे संक्षेपानें आणि विस्तारानें म्हणावयाचे असल्यास ते २० आहेत. ते असेः—

ग्रुप नं. १	ग्रुप नं. २	
१ गुरु	लघु	
२ श्लक्ष्ण	खर	
३ मृदु	कठिण	
४ स्थूल	सूक्ष्म	
५ पिच्छिल	विशद	
६ स्निग्ध —×→	रूक्ष शीत	
७ शीत —×→	उष्ण, सस्नेह	ग्रुप नं. ३
८ मंद	तीक्ष्ण	ग्रुप नं. ३
९ सांद्र	द्रव	ग्रुप नं. ३
१० स्थिर	सर	ग्रुप नं. ३

२० गुणांच्या ३ राशी

वर दर्शविलेल्या २० गुणांच्या ३ राशी होतात. गुरुश्लक्ष्णादि १० गुणांची १ रास ही कफाची. लघुखरादि ही दुसरी राशी वाताची, व उष्णतीक्ष्णादि ३ री राशी ही पित्ताची. कोणताहि विकार झाला तरी तो या तीन राशींच्या बाहेर नाहीं. हेंच त्रिदोष. यांची निर्मिति आहारापासून होते. हे बरोबर शरीराच्या गरजेपुरेसे निर्माण झाले की शरीराची पुष्टि,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गरजेहून अधिक झाल्यास रोगनिर्मिति, आणि गरजेहून कमी झाले तर विकार निर्माण होतील. शरीराची पुष्टि होणार नाहीं. आणि पुष्टीच्या अभावीं नानाप्रकारचे विकार निर्माण होतील. रोग म्हणजे ज्याला व्याधि अवस्था आहेत तो. विकाराला अशा अवस्था नाहींत म्हणजे शरीरधारणेला अवश्य तितकेंच प्रमाण दोषांचें शरीरांत असेल तर त्यास समदोष म्हणावयाचें. निरोगी (स्वस्थ) माणूस समदोष असतो.

वेदना कोणाच्या होतात ?

वीस गुणांच्या ३ समुच्चयामधील ज्या गुणांचे पदार्थ आहारांत अधिक जातील त्या गुणांचा समुच्चय शरीरांत अधिक वाढेल. कफकर आहारानें गुरुमंद या गुणांचा समुच्चय वाढेल, पित्तकर आहारानें उष्णसस्नेह या गुणांची राशी वाढेल आणि वातकर आहारानें खरचल गुणांचा ग्रुप वाढेल. जो ग्रुप वाढेल त्याच्या वेदना निर्माण होतील. जसें वातानें शूल, पित्तानें दाह, कफानें कंडू, जाड्य इत्यादि लक्षणें निर्माण होतील.

द्रव्य ओळखण्याची शास्त्रीय पद्धत

द्रव्य हें गुणकर्मावरून ओळखण्याची जगांतील कोणत्याहि शास्त्राची पद्धत आहे. ते गुण डोळ्यांना दिसलेच पाहिजेत असें नाहीं. जसें ऑक्सिजन डोळ्यांना दिसत नाहीं पण त्याच्या गुणकर्मावरून जसें त्याचें ज्ञान करून घेतां येतें, तसें जे दोष (कदाचित्) सूक्ष्मपणामुळें दिसत नाहींत किंवा जो (वायु) दर्शनप्रत्यक्ष नाहींच, ते त्यांच्या गुणकर्मावरून ओळखावयाचे. प्रत्यक्ष व अनुमान या दोन गोष्टींनीं सर्व जाणून घ्यावयाचें असतें.

हीं मलरूप द्रव्यें होत

बस्तींतून बाहेर पडणारें पित्त, हें मलरूप पित्त; थुंकींतून बाहेर पडणारा कफ हा मलरूप कफ होय. जो शरीरांत राहून शरीर धारण करतो तो धातुरूप दोष; आणि याशिवाय एक प्रसादरूप दोष असतो. जसें अवलंबक कफ हा हृदयाचें धारण करतो. हा धातुरूप दोषाहूनहि अधिक निर्मल प्रसादरूप असतो. मलरूप दोष शरीरांत राहिल्यास शरीर बिघडवतो.

शरीर घटकांतील महत्वाचे घटक

शरीरांतील महत्वाचे घटक म्हणजे धातु होत. "धातुसाम्यक्रिया चोक्तां तंत्रस्यास्यप्रयोजनम्" धातूंची समता राखणें हेंच चिकित्सकाचें प्रमुख कर्तव्य होय. शरीर देखील धातूंनाच अधिक महत्व देत असतें. ज्यावेळीं शरीराचे घटक नष्ट करण्याचें पाळी शरीरावर येईल, त्यावेळीं शरीर प्रथम मल नष्ट करतें, नंतर दोष नष्ट करतें आणि अगदीं नाइलाज होईल तेव्हां धातु नष्ट करूं लागतें. इतकें धातूंचे महत्व आहे.

अपूर्ण

वाचकांचा पत्रव्यवहार–

कफज्वरावर निर्गुंडीचा काढा

कफज्वराचीं लक्षणें–

अंगाला ओलें वस्त्र गुंडाळल्यासारखें होणें, सांधे दुखणें, आळस, जंघा व मांड्या दुर्बल होणें, जडत्व, अपचन, हिंव, अन्नद्वेष, प्रतिश्याय, शिरो-जडत्व, अंगजडत्व, अरुचि, कास, अतिनिद्रा, अंगावर रोमांच उठणें, मधुरास्यता, इत्यादि.

कफज्वराची चिकित्सा–

निर्गुंडीचा पाला आणून काढा करून थो[illegible] मिऱ्यांची पूड मिळवून प्रत्येक वेळीं दोन औंसांप्रमाणे दिवसांतून तीन वेळ देणें. मुदत आठ दिवस अ[illegible] ४ दिवस चांगला गुण येतो. असा माझा अनुभव आहे.

ग्रंथांतरीं मिऱ्यांबद्दल पिंपळीचें चूर्ण घे[illegible] सांगितलें असलें तरी मिऱ्यांची पूडहि चालते असा माझा अनुभव आहे. ग्रंथांत

सिंधुवारदलक्वाथं कणाढ्यं कफजे ज्वरे।
जङ्घयोश्च बलक्षीणे कर्णे च पिहिते पिबेत् ॥

सर्व वाचकांनीं अनुभव घेऊन "आयुर्वेदपत्रिकें[illegible] प्रसिद्ध करावे अशी विनंति आहे.

त्र्यंबक नारायण तुळपुळे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुनर्नोंदणी फी कां बसविली गेली ?

(बोर्डसदस्य वैद्य प्रतापकुमार यांचें जळगांव येथील भाषण)

(आयुर्वेद पत्रिका पान ५२१ वरून पुढें चालू)

"एक दुसरी गम्मत या दिवसांत झाली. आम्ही सभात्याग केला त्यावेळीं डॉ. योध चिडले, व ते आम्हाला उद्देशून म्हणाले "सभा सोडून जा कीं बोर्डांतून राजीनामा देऊन जा, मला त्याची पर्वा नाहीं." हे शब्द एखाद्या नबाबाचे अथवा महाराजाचे नाहींत. ही डॉ. योध यांची भाषा आहे. कोणत्या जोरावर डॉ. योध असे शब्द बोलले असतील ?

सभात्याग म्हणजे अविश्वासच

वैद्य प्रतापकुमार

आयुर्वेदाशीं ज्याचा कोणताच संबंध नाहीं व येत्या २॥ वर्षांनंतर बोर्डाचा प्रमुख हें ज्याचें स्थान जाणार आहे त्या मनुष्यांत इतकी मिजास कशी आली ? मला असें वाटतें कीं एकंदर बोर्डाचें संचालन चांगलें व सरळ व्हावें अशी त्यांची इच्छाच दिसत नाहीं. कारण बोर्डाचें भलेबुरे कांहींहि होवो. त्यांना त्याचें सुयेरसुतक कांहींहि नाहीं. खरें पहातां त्या दिवसाचा सभात्याग हा त्यांच्यावरील अविश्वासाच्या ठरावाप्रमाणेंच होता. पण वैद्यहकीमावर अमर्याद सत्ता चालविण्याच्या इच्छेनें डॉ. योध हे खुर्चीवर बसून राहिले आहेत. दुसऱ्या एखाद्या संस्थेंत त्यांनीं असें वर्तन केलें असतें, तर त्यांची पुरती खबर घेतली गेली असती. पण पूर्वीं सांगितलें त्याप्रमाणें बोर्ड हें अनाथ विधवेप्रमाणें आहे. हिचें पोषण न करणारा सज्जनहि हिला लाथा मारू शकतो. कारण बोर्डाचा प्रमुख म्हणून डॉ. योध यांना मिळालेली सत्ता त्यांच्या कल्पनेप्रमाणें असाधारण प्रकारची आहे.

पुनर्नोंदणी फी वसुलीचा गोंधळ कोणी केला ?

रिन्यूअल फी प्रत्येक वैद्यहकीमाकडून घेण्याबाबत किती गोंधळ झाला त्याची आठवण आपणांस असेल. ही फी वसूल करण्याबाबत आम्ही कार्यकारी मंडळाचे सभासद तेथें असतां कोणतीच खबर आम्हांस न देतां त्यावेळचे रजिस्ट्रार श्री. कर्वे यांनीं उतावळेपणानें पावलें टाकलीं. मी ताबडतोब विरोध केला. इतर सभासदांनीं पण विरोध कळविला. म्हणून पैसे भरण्यासाठीं ३ महिन्याची सवलत मिळाली. पण झालेल्या चुकीबद्दल एक खेदाचा शब्दसुद्धां डॉ. योध अगर रजिस्ट्रार यांनीं उच्चारला नाहीं. वैद्यांच्या झालेल्या अडचणीबाबत बोर्डातर्फे खेद प्रगट करणारा ठराव मीं पुढें केला, तेव्हां अशा ठरावामुळें बोर्डाचें फार नुकसान होईल अशी माझी समजूत घालून तो ठराव पास होऊं दिला नाहीं. मी जाणत होतो कीं या ठरावामुळें कोणाचें नुकसान होणार नव्हतें. आम्हांला लहान लहान गोष्टीबाबत तक्रारी करावयाच्या नव्हत्या, म्हणून आम्ही मुके राहिलो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांत वैद्यांचा गौरव आहे

पुनर्नोंदणी फी भरावी लागली म्हणून आपणांत असंतोष पसरला आहे. पण मी त्याची तरफदारी करणारा आहे. वैद्य आपल्या खर्चानें आपलें बोर्ड चालवतील तर त्यांत वैद्यांचा गौरवच आहे. सरकारी मदत घेतली तर सरकारचा हस्तक्षेप पण मानावा लागेल. सरकारचें प्रमुखपणा आपणास मानावा लागे पण सरकारवर आपण बोजारूप बनू नये तर आपण सरकारचे आश्रयदाते बनावें हें माझें स्वतःपुरतें मत आहे. ३ वर्षांचे ५ रुपये म्हणजे महिन्याचे सुमारें २॥ आणे ही फी जास्त म्हणतां येत नाहीं.

दुसरा मार्ग शिल्लक नव्हता

अलबत् १९५० मध्यें रिन्युअल फी घेण्यासाठीं आम्ही संमति दिली, त्याचें कारण मुख्यतें असे कीं, ही रक्कम वसूल झाली नसती तर बोर्डाजवळ कांहींच शिल्लक राहिली नसती, व बोर्डाचें कार्य खर्चा शिवाय चालूं राहूं शकलें नसतें. सरकार कोणतीच आर्थिक मदत करणार नाहीं, अशा प्रकारची धमकी आमच्यासमोर ठेवण्यांत आली तेव्हां पुनर्नोंदणी फी बसविण्यापलीकडे दुसरा मार्ग शिल्लक राहिला नव्हता.

जाहिरात प्रवृत्ति कमी झाली काय ?

अध्यक्ष डॉ. योध यांचें कांहीं दिवसापूर्वी असें म्हणणें असे कीं बोर्डातील शिस्तपालनामुळें वैद्यांची जाहिरात करण्याची प्रवृत्ति कमी झाली आहे. पण माझें मत मात्र उलट आहे. अतलराय व आझाद यांना कोणी आडवू शकत नाहीं. परप्रांतीय वैद्य पाहिजे तशी जाहिरात करून राहिले आहेत. थोड्याच दिवसांपूर्वी बोर्डाच्या कार्यकारी मंडळांत बसणाऱ्या बडोद्याच्या वैद्य बारोट यांच्यासंबंधीं स्पष्ट जाहिरात एका वर्तमान पत्रांत आली असतां त्यांनीं केलेला 'खुलासा' डॉ. योध यांनीं मान्य करविला व तें प्रकरण गप्प करून टाकलें. मी डॉ. योध यांना असें आव्हान करतो कीं, ज्या प्रकारची जाहिरात वैद्य बारोट यांच्या नांवें आली तशी जाहिरात कोणत्याहि वृत्तपत्रांत आपल्या नांवानें द्या व वैद्य बारोट यांनीं दिला तसा खुलासा मेडिकल कौन्सिलकडे पाठवा व मग त्याचा काय परिणाम येतो तें पहा.

सबब मी तर असेंच मानतो कीं, दारुबंदीचा कायदा अंमलांत आल्यानन्तर मद्याचा अपेय अधिक वाढला असें म्हटलें जातें. त्याचप्रमाणें बोर्डाच्या कडक शिस्तपालना (?) नन्तर जाहिरात वाढली आहे.

रजिस्ट्रेशन सक्तीचें नसावें असें वाटूं लागलें आहे

या सर्वांचा परिणाम म्हणून मला असें वाटूं लागलें आहे कीं, बोर्डाचें रजिस्ट्रेशन सक्तीचें नसावें. अन्‌रजिस्टर्ड व अन्‌लिस्टेट चिकित्सकांना व्यवसाय करण्यास सरकारनें बन्दी करूं नये. १९४० मध्यें या विचाराचा नव्हतो ही गोष्ट खरी आहे. पण त्यानन्तर पुष्कळच गोष्टी घडून आल्या आहेत. भारतांतील कोणत्याहि राज्यांत मुंबई राज्याप्रमाणें नोंदणीची सक्ती नाहीं. विलायतेंतसुद्धां रजिस्ट्रेशन नसलें तरी वैद्यक व्यवसाय करू शकतो. आपल्या कायद्याचा म्हणून जो परिणाम येईल अशी आपली धारणा होती तो घडून आलें नाहीं. म्हणून माझ्या मतांत परिवर्तन झालें आहे. रजिस्ट्रेशन ट्रिब्युनलमधील माझा अनुभव पण याला अंशतः कारणीभूत आहे.

वैद्यांची परंपरा नष्ट होत चालली

दुसरें कारण हें आहे कीं वैद्यांची परंपरा नष्ट होऊं लागली आहे. ही परंपरा सर्व चांगलीच होती असें मीं म्हणत नाहीं. पण या परंपरेंतील चांगलीं तत्वें आयुर्वेदाच्या चालू अभ्यासक्रमांत समाविष्ट केलीं गेलीं नाहींत. रजिस्ट्रेशनची सक्ति दूर होण्यानें सध्यांच्या ... अडचणी नाहींशा होतील, व अद्यापि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्ध आयुर्वेद पध्दतीनें निदान-चिकित्सा करणारे जे थोडे वैद्य आपल्यांत आहेत ते आपल्या पद्धतीनें नवे वैद्य तयार करूं शकतील.

धर्मार्थ व्यवसायावर कायद्यानें नियंत्रण नाहीं

ही गोष्ट सर्वच जाणतात कीं कायदा कलम ३२ प्रमाणें धर्मार्थ व्यवसाय करणाऱ्यास कायदा कांहींच नियंत्रण करू शकत नाहीं. या कलमाची भाषा अगदीं स्पष्ट असतांहि डॉ. योध यांनीं याबाबत माझ्याशीं वाद घातला. खुद्द डॉ. म्हसकरांनीं मी केलेला अर्थ मान्य धरला, पण डॉ योध यांनीं त्याला नकार दिला व कोणीहि धर्मार्थ व्यवसाय पण करू शकणार नाहीं असा हट्ट त्यांनीं धरला. शेवटीं त्यावेळचे आरोग्यप्रधान डॉ. गिल्डर यांच्याकडे मी व डॉक्टर म्हसकर गेलो असतां डॉ. योध यांनीं लावलेला अर्थ आम्ही त्यांच्या कानावर घातला. डॉ. गिल्डर यांनीं, मी केलेला अर्थ बरोबर धरला. असें झाल्यावरहि डॉ. योध यांनीं आपला हट्ट चालूच ठेवला. पण पुढें त्यांना माझा अर्थ कबूल करावा लागला. ही गोष्ट त्यांनीं, सहज पण खेद प्रदर्शन केल्याशिवाय, मान्य केली. डॉ. योध यांचा स्वभाव हा असा आहे.

पुष्कळ अर्ज रद्द कां होतात?

रजिस्ट्रेशन ट्रिब्यूनलकडे रजिस्ट्रेशनसाठीं गेलेले बहुतेक अर्ज नामंजूर होतात ही फिर्याद खरी आहे. परन्तु यांचें कारण तो कायदाच तसा घडला आहे. ट्रिब्युनलला तर तो कायदा व तत्संबंधीं नियम यांच्या मर्यादेंत राहूनच काम करावें लागत आहे. यासंबंधीं दोन गोष्टी समजून घेण्याजोग्या आहेत.

तारखेंत बदल कोणी केला?

कायदा कलम ३१ (२) चा मसुदा ज्यावेळीं तयार झाला त्यावेळीं ता. १० मार्च १९३८ रोजीं व्यवसाय करीत असलेल्या चिकित्सकांचा विचार ट्रिब्यूनलनें करावा असें होतें. मी डॉ. गिल्डर यांना विनंति केली कीं न्यायदृष्ट्या ही तारीख ४-११-१९४१ ही पाहिजे. त्यांनीं माझी ही विनंति मान्य केली नसती तर सध्यांपेक्षांहि अधिक अर्ज रद्द झाले असते.

श्री. डॉ. लागू यांची कायदेमंडळांतील सूचना

शिवाय कायद्याच्या मसुद्यांत ट्रिब्यूनलसाठीं कांहीं नियम मागाहून बनविणार अशी सूचना प्रारंभीं नव्हती. पण श्री. डॉ. लागू यांनीं ती सूचना कायदेमंडळांत पास करविली व त्या अनुरोधानें एक नियम असा करण्यांत आला कीं ४-११-४१ रोजीं ज्यांचा निर्वाहाचा आधार वैद्यक व्यवसायावरच असेल फक्त तेवढ्यांच्याच अर्जांचा विचार ट्रिब्यूनलनें करावा. या नियमासंबंधीं मुद्दां मी डॉ. गिल्डर यांच्या-कडे लेखी तक्रार केली होती व ती माहिती पूर्वी आयुर्वेदपत्रिकेंत येऊन गेली आहे. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. परिणामीं आज जे व्यवसायी आपल्या अर्जांत आपला निर्वाह वैद्यकावर नाहीं असें दाखवि-तात, ते वैद्यकदृष्ट्या कितीहि योग्य असले तरी, त्यांच्या अर्जांचा विचार ट्रिब्यूनल करूं शकत नाहीं.

ट्रिब्यूनल दोषी नाहीं

ही गोष्ट सांगून मी कायद्याचें समर्थन करीत नाहीं. कायदा पास करणाऱ्या विधिमंडळाच्या सभा-सदांना, पुढें असा विचित्र नियम बनविण्यांत येईल, अशी कल्पना पण नसेल. परंतु रद्द होणाऱ्या अर्जांबाबत ट्रिब्यूनलला दोष देणें उचित नाहीं. हा दोष कायद्याचाच आहे.

बोर्डांतील रचनात्मक कार्य

या सर्व विवेचनावरून आपण मंडळींनीं असें समजू नये कीं बोर्डांत सर्व वेळ भांडणांतच खर्च होत असला पाहिजे. आमच्याकडून कांहीं रचनात्मक कार्येंहि झालीं आहेत. वैद्यकीय नीतिनियम अधिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खुलासेवार तयार करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली आहे. व त्याचा चांगला परिणाम येईल अशी आशा आहे. एन्लिस्टेड झालेल्या चिकित्सकांना योग्य प्रकारचे दाखले देण्याचें नक्की झालें आहे. जर सरकार सूचना मानील तर तकलीफ दूर होईल. कायद्यासंबंधींच्या नियमांत सुधारणा सुचविल्या आहेत.

अध्यक्ष मिसळत नाहींत

असें असूनहि सर्व बाजूनें विचार करतां मला असें वाटते कीं डॉ. योध यांचें या कामांत लक्ष नाहीं. त्यांचें सहकार्य आम्हांला मिळत नाहीं.

बोर्डाचे पूर्वीचे अध्यक्ष वैद्यामध्यें मनमोकळे मिसळत असत. डॉ. योध यांच्यामध्यें तें सौजन्य दिसून आलें नाहीं. सभा असेल त्याच दिवशीं ते बोर्डांत येतात व त्याच दिवशीं सभेचे कागद वाचतात व 'माझें हें मत आहे' 'माझें तें मत आहे' असे करून ठराव ताबडतोब पास करवितात. सभेसंबंधींच्या नियमांचा अर्थ वाटेल तसा लावतात. एका वेळीं एक प्रकारचा अर्थ, तर दुसऱ्या वेळीं दुसऱ्या प्रकारचा अर्थ असें चाललेलें असतें.

माझा अपमान केला

बोर्डाच्या सदस्यांनीं पाठविलेल्या पत्रांचीं उत्तरें देण्याचें तर डॉ. योध यांना माहीतच नाहीं. पत्र पाठविलें तर म्हणतात कीं टेलिफोननें विचारून माहिती घ्या. टेलिफोनवर विचारावें तर समाधानकारक उत्तर मिळत नाहीं. राग येऊन एखाद्या वेळीं त्यांनीं माझा अपमान पण केला आहे. पण ते माझे गुरु असल्यामुळें मी त्याचें कांहीं मानलें नाहीं. पण वस्तुस्थिति अशी कीं गोष्टी आतां मर्यादेच्या बाहेर गेल्या आहेत.

डॉ. योध परजन होत

बोर्डात काय किंवा फॅकल्टींत काय डॉ. योध एक परदेशी व परजन होत. बोर्ड व फॅकल्टी या संस्था वैद्यहकीमांच्या आहेत. डॉ. योध तेथें कायम रहाणार नाहींत. वैद्य-हकीमच तेथें कायम रहाणार आहेत. सध्यां आहे अशी परिस्थिति पुनः उत्पन्न न होईल असें आंदोलन आपण सर्वांनीं मिळून करणें युक्त होईल.

भविष्यकालाबद्दल खूप आशा

भविष्यकाळाविषयीं माझ्या मनांत खूप आशा आहे. आपली ज्यांना पर्वा नाहीं असे सांगणारे परदेशी सत्तावाले येथून गेले आहेत, मग एखादी डॉ. योधासारखी व्यक्ति कितीहि अडथळे करील तर त्यामुळें निराश होण्याचें कारण नाही. शेवटीं त्यांना बोर्ड सोडावेंच लागणार. मला व तुम्हांला नाहीं. त्या दिवसाची वाट पहा ! मी पण पहात आहे !

(संपूर्ण)

वाचकांचा पत्रव्यवहार

प्रत्यग्रधातुत्व म्हणजे काय ?

वयस्थानां दृढानां प्राणवतां सत्ववतां दीप्ताग्नीनां च व्रणा सुचिकित्स्याः ।

व्रणचिकित्सा सुखानें यशस्वी होण्यासाठीं व्रणी रुग्णाचे ठिकाणीं वरील लक्षणें असावीं लागतात.

यापैकीं वयस्थानां प्रत्यग्रधातुत्वात् आशु व्रणसंरोहो भवति। या वाक्यांतील प्रत्यग्रधातुत्व म्हणजे काय ?

प्रत्यग्रधातुत्वाचें लक्षण कोणतें, त्याचे संवित्, स्वरूप कसें समजावें याचें स्पष्टीकरण करतां आलें पाहिजे.

विचारार्थ हा विषय जिज्ञासाबुद्धीनें विद्वान चिकित्सकापुढें मांडला आहे. त्याचें विवरण आयुर्वेद शास्त्राच्या दृष्टिकोनांतून झालें पाहिजे.

विषयस्थल- अष्टांगसंग्रह उत्तरतंत्र अध्याय २९

— वैद्य हरिशास्त्री ता...

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभविक चिकित्सा प्रकरण १० वें— लेखकः—वृद्ध वैद्य

—: राजयक्ष्मा-निदान :—

या व्याधीस राजयक्ष्मा, क्षय (पल्मनरी थायसिस) फुफ्फुसांचा क्षय अशीं अनेक नांवें आहेत. शहरांत राहणाऱ्या लोकांपैकीं निदान हजार पांचशेंत एक तरी या व्याधीनें पीडित असतो. आजकाल तर खाद्यपेयादि पदार्थ, विशेषतः स्निग्ध पदार्थ, शहरांत मिळणें अशक्यच झाल्यामुळें हा व्याधि आतिजास्त प्रमाणांत होत असलेला आढळतो. अष्टांगहृदयकारांनीं याचें वर्णन असें केलें आहेः—

अनेकरोगानुगतो बहुरोगपुरोगमः। राजयक्ष्मा क्षयः शोषो रोगराट् इति च स्मृतः॥

लक्ष्यांत ठेवण्याजोगें वर्णन

हें वर्णन अत्यंत लक्षांत ठेवण्याजोगें आहे. साधारणपणें एखादा दीर्घकालिक व्याधि झाल्यानन्तर रुग्णाची योग्य काळजी न घेतली गेल्यामुळें त्याला जीर्णज्वर होऊन हा व्याधि उत्पन्न होतो. रुग्णास असें वाटतें कीं, आपण अगदीं बरें झालो, म्हणून पथ्य वगैरे करण्याची कोणतीच आवश्यकता नाहीं, आणि तो सर्व प्रकारचे आहारविहार स्वैरपणें करूं लागतो. अशक्त स्थितींत याप्रमाणें अपचनादि विकार उत्पन्न करणारे पदार्थ सेवन केल्यामुळें, तसेंच स्त्री-सेवनादि विहार नियमबाह्य प्रमाणांत केल्यामुळें शुक्रक्षय होऊन व्याधि उत्पन्न होतो. याकरितां चरकाचार्यांनीं या व्याधीचीं आदि कारणें सुस्पष्टपणें व विस्तारपूर्वक वर्णन केलेलीं आहेत. तीं चार कारणें अशीं (१) साहस (२) वेगविधारण (३) धातुक्षय (४) विषमाशन, अपथ्यादि पदार्थांचें अधिक सेवन

साहसानें क्षय कसा होतो ?

१) साहसानें क्षय कसा होतो त्याचें विवरण खालीलप्रमाणें:-

जेव्हां एखादा मनुष्य स्वतः दुर्बळ असून आपल्यापेक्षां अधिक बलवान् मनुष्याशीं झुंज घेतो आणि त्यांत यश मिळवण्याकरितां आपली सर्व शक्ति पणास लावितो, अथवा एखादा अधिक वजनाचा पदार्थ लोखंडाचा गोळा, नाल, वगैरे उचलण्याचा प्रयत्न करतो; फार वेळपर्यंत मोठ्या आवाजांत भाषण करितो; डोक्यावर अति वजनदार अशी वस्तु ठेवून पुष्कळ दूरपर्यंत सारखा तो भार वहन करीत जातो; वेगानें वाहणाऱ्या नदीस पार करण्याकरतां म्हणून फार वेळ पर्यंत कसरतीनें पोहतो; तसेंच तासचे तास व्यायाम करीत राहतो; उंच सखल व वेड्यावांकड्या अशा रस्त्यावरून जलद गतीनें चालत जातो; किंवा एखाद्या चोर अथवा शत्रुभूत अशा अनेक लोकांशीं एकाच वेळीं झुंजतांना बराच मार खातो; अथवा अशाच प्रकारच्या वेड्यावांकड्या शरीरचेष्टा, शरीरास सहन न होईल इतक्या अधिक प्रमाणांत करितो; तेव्हां या त्याच्या शरीरशक्ति-बाहेरच्या अप्रमाण व्यायामामुळें त्याचें वक्षःस्थळ (फुफ्फुसें) फाटतें, त्या वक्षःस्थळांत पडलेल्या सूक्ष्म चिरीमध्यें वातद्रव्य प्रवेश करितें आणि फुफ्फुसांत राहणाऱ्या अवलंबक कफाला दूषित करून व त्याचप्रमाणें जवळच असणाऱ्या हृदयांतील साधक पित्तालाहि दूषित करून तो वायु वर खालीं व वेडावांकडा असा सर्व शरीरभर संचार करितो.

कारणभेदानें लक्षणभेद

त्या वायूचा जो अंश शरीराच्या अस्थिसंधिगत भागांत प्रवेश करितो. त्यामुळें त्रास, जांभया, अंग दुखणें आणि ज्वर हे विकार उत्पन्न होतात. जो त्या विकृतवायूचा अंश आमाशयांत (Stomach) प्रवेश करितो, त्यामुळें अरुचि आणि छातींतील विकार उत्पन्न होतात. त्याचा जो अंश गळ्यांत पोचतो, त्यामुळें गळा उद्ध्वस्त होऊन आवाज क्षीण होतो. जो अंश प्राणवहस्रोतसांत प्रवेश करितो त्यामुळें श्वास आणि पडसें हे विकार उत्पन्न होतात. डोक्यांत पोचलेल्या अंशानें डोकें दुखूं लागतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

छातीचा भाग क्षीण झाल्यामुळें व गळा उद्ध्वस्त झाल्यामुळें, वातापासूनच उत्पन्न होणारा खोकला विकारहि होऊं लागतो. आणि तो पण सारखा व कोरडा असा चालतो, त्या खोकल्यामुळें फुप्फुसांच्या आसमंतात् असणाऱ्या मांसखंडां (मसल्स) वर ताण पडून छातींत झालेलें क्षत (फाटलेली जागा) अधिक फाटते आणि त्याच्यांतून रक्त बाहेर पडतें. तें खोकल्यांतील बेडक्यास चिकटून येतें. असें हें रक्त गेल्यामुळें दुर्बलता उत्पन्न होते. याप्रमाणें असल्या साहसापासून वर वर्णन केलेले सर्व उपद्रव उत्पन्न होतात. हे उपद्रव सारखे कायम राहिले म्हणजे मनुष्य दिन-प्रतिदिन वाळत जातो. धातु क्षीण होत गेल्यामुळें मनुष्य शेवटीं मृत्युवशहि होतो. सबब, बुद्धिमान् मनुष्यानें सदैव आपली शारीर शक्ति पाहून त्याप्रमाणें कामें करण्यास उद्युक्त व्हावें कारण या शरीराची स्थिति त्यांत असणाऱ्या बलावरच अवलंबून असते. आणि पुरुषाच्या जीवनाकरिता शरीर हेंच प्रधान कारण आहे.

वेगविधारणामुळें क्षय कसा होतो ?

वेगविधारण म्हणजे प्रवृत्त झालेल्या मल, मूत्र, जांभई, शिंक इत्यादि वेगांचा वेळींच विसर्ग न करतां त्यांना निरनिराळ्या कारणामुळें रोकून ठेवणें. हे वेग कोणते, याचें वर्णन अष्टांगहृदयांत सूत्रस्थानांतील वेगविधारणीय अध्यायांत दिलें आहे. तें अवश्य ध्यानांत ठेवावें.

वेगविधारणामुळें क्षय कसा होतो त्याचें विवरण खालीलप्रमाणें:— जेव्हां कोणताहि मनुष्य राजासमोर, आपल्या मालकासमोर, आपल्या गुरुजवळ अथवा द्यूतसभेमध्यें किंवा अशाच एखाद्या सज्जनांच्या सभेमध्यें अथवा स्त्रियांच्या समुदायांत प्रविष्ट झाला असतांना निरनिराळ्या यानांत (रेल्वे, मोटार, इत्यादि) जात असतांना, प्रसंगवशात् लज्जेनें, अथवा इतर घृणा उत्पन्न न व्हावी म्हणून आलेल्या वात, मूत्र, पुरीष इत्यादींच्या वेगांचा अवरोध करतो, तेव्हां त्या अवरोधामुळें वात दोष प्रकुपित होतो. अर्थात् शरीरांतील धमन्यांवर ताण पडल्यामुळें त्या वाताची उत्पत्ति अधिक प्रमाणांत होते, तसें झालें म्हणजे तो पित्त आणि कफांना उदीरित (अधिक प्रमाणांत) करतो. आणि मग शरीरांत वर, खालीं व वेडावांकडा पसरतो.

स्थानभेदानें विकारभेद

त्याचा कांहीं अंश, वर वर्णन केल्याप्रमाणे निरनिराळ्या भागांत प्रवेश करून शरीरांत (दुःख) उत्पन्न करतो, दुसरा अंश मलाला पा[illegible] करतो, किंवा अधिक वाळवितो. तिसरा [illegible] फासोळयांत पीडा उत्पन्न करतो. तसेंच इतर [illegible] (खांदे आणि मान यांच्यामधील सखोल भा[illegible] मध्यें संताप उत्पन्न करतो. गळा व छाती या दोन्हीं भात्याप्रमाणें ध्वनि उत्पन्न करतो. डोक्यापर्यंत पो[illegible] खोकला, श्वास, ज्वर, स्वरभेद (आवाज बदल[illegible] पडसें उत्पन्न करतो. याप्रमाणें झालेल्या उपद्र[illegible] पीडित होत्साता तो रुग्ण प्रतिदिवस वाळत ज[illegible] म्हणून बुद्धिमान् मनुष्यानें शारीरवेगांचें निरो[illegible] करूं नये. कारण त्या योगानें शरीराचा यो[illegible] बरोबर चालत नाहीं. शरीराचें रक्षण करणें हें [illegible] सर्व गोष्टी सोडून मनुष्यमात्राचें आदि कर्तव्य [illegible] तें नसलें तर सर्वच भाव संपुष्टांत येतात.

धातुक्षयामुळें राजयक्ष्मा

३ धातुक्षय हा पुढीलप्रमाणें राजयक्ष्मा[illegible] कारणीभूत होत असतो:—जेव्हां एखादा मनुष्य शो[illegible] किंवा चिंतेंत अतिकालपर्यंत स्वतःला मग्न ठे[illegible] असतो; ईर्ष्या (हेवा), उत्कंठा (एखाद्या वस्तू[illegible] अत्याधिक अभिलाषा), भय, क्रोध इत्यादि मान[illegible] विकारांनीं फार दिवसपर्यंत पीडीत राहतो; [illegible] असतांना रूक्ष (स्नेहहीन) तूपतेलादि स्निग्ध प[illegible] विहीन) अशा अन्नपानांचें पुष्कळ दिवसपर्यंत से[illegible] करतो, दुर्बल प्रकृतीचा असून आहाररहित [illegible] अल्पाहार करून राहण्याचा त्यास प्रसंग येतो; [illegible] त्याच्या हृदयांत असणारा, अन्नापासून तयार हो[illegible] रसधातु क्षीण होत जातो. आणि त्यामुळें रसाप[illegible] पुढे होणारे रक्त मांसादि धातु क्षीण होत जा[illegible]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि शेवटीं पुढें वर्णन केल्याप्रमाणें त्याला हा राजयक्ष्मा व्याधि होतो.

शुक्रक्षयजन्य राजयक्ष्मा

त्याचप्रमाणें जेव्हां एखादा मनुष्य कामविकाराच्या अत्यन्त आधिक्यामुळें स्त्रीच्या ठिकाणीं प्रसक्त होत्साता अतिस्त्रीसेवन करितो, त्यामुळें शुक्र धातु अधिक प्रमाणांत क्षीण होतो. अशा क्षीणावस्थेंत देखील जर त्याचें मन स्त्रीसंगापासून निवृत्त न होतांना प्रवर्तीत होत राहिलें तर त्या मनःस्थितीमुळें मैथुनास प्रवृत्त झालेल्या त्या मनुष्याच्या शरीरांत शुक्राचा अभाव असल्यामुळें त्याची प्रवृत्ति होत नाहीं. अशा प्रकारें वातवह धमन्यांतर (Nerves) अधिक ताण पडून त्यामुळें वायूची वृद्धि होते. नंतर तो वृद्ध वायु त्या स्त्रीसंगास प्रवृत्त झालेल्या मनुष्याच्या रक्तवहरोहिणी (Arteries) मध्यें प्रविष्ट होऊन त्यांच्या तून रक्तस्राव करवितो. यामुळें शुक्राच्या अभावीं शुक्रमार्गानें रक्ताचीच प्रवृत्ति होते.

शुक्रक्षय व रक्तप्रवर्तन

अशा प्रकारें शुक्रक्षय व रक्तप्रवर्तन असे दोन उपद्रव झाल्यामुळें सर्व शरीरसंधि ढिल्या पडतात. शरीरांत रूक्षता उत्पन्न होते. आणि दुर्बलता अधिक वाढते. त्यामुळें वायु आणखी विकृत होतो. तो प्रकुपित वायु सर्व शरीरांत वेडावाकडा प्रवेश करीत कफ व पित्त या दोन्ही दोषांना उदीरित करतो, मांस व रक्त यांना वाळवितो. तोंडावाटे व गुदद्वारा कफ आणि पित्त या दोन्हींचा स्राव करवितो. पासोळ्यांत पीडा उत्पन्न करतो. अंसांत दुःख व गळयाचा उध्वस्तपणा उत्पन्न करतो. डोक्यातील तर्पक कफाला वाढवितो. शरीरसंधीमध्यें पीडा उत्पन्न करून अंग दुखवितो, अरुचि व अन्नपचन न होणें या क्रिया करतो. पित्त आणि कफांचा उत्क्लेश झाल्यामुळें, आणि वाताच्या उलट गतीमुळें तो ज्वर, खोकला, श्वास, स्वरभेद, आणि पडसें यांना उत्पन्न करतो. कोरडा खोकला जास्त वाढल्यामुळें छातींत क्षय होऊन रक्त तोंडावाटें पडूं लागतें. त्यामुळें दुर्बलता येते व हळूहळू मनुष्य सारखा वाळत जातो. म्हणून बुद्धिमान् मनुष्यानें आपलें रक्षण करण्याकरितां शुक्रधातूचें फार काळजीपूर्वक रक्षण केलें पाहिजे. कारण शुक्र धातु ही आहाराची अंतिम परिणति (फल) आहे.

विषमाशनानें राजयक्ष्मा

जेव्हां एखादा मनुष्य चतुर्विध खाण्याचे पदार्थ (आहार) नियमाप्रमाणें सेवन न करतां प्रकृतिविरुद्ध व अत्यधिक प्रमाणांत सेवन करतो, तेव्हां त्याचे शरीरांतील वात, पित्त कफ हे तिन्ही दोष अधिक प्रमाणांत वाढतात. याप्रमाणें वाढल्यानंतर ते जेव्हां सर्व शरीरभर पसरतात, तेव्हां शरीरांतील तेराहि प्रकारच्या स्रोतसांचीं मुखें बंद करून आंतील सूक्ष्म नलिकांमध्यें अवरोध उत्प करतात. त्यामुळें प्रतिदिवस घेतलेल्या आहाराचें नीट पचन न होऊन त्यापचनापासून उत्पन्न होणारा अन्नरस व रससंज्ञक शरीरधातु योग्य प्रमाणांत उत्पन्न न होतां, या पचनक्रियेंत उत्पन्न होणारे इतर जे मूत्र, पुरीष संज्ञक मल अधिक प्रमाणांत होतात. अशा स्थितींत ती व्यक्ति केवळ मळाच्या शक्तीमुळेंच जगते. म्हणून अशा प्रकारें प्रतिदिवस वाळत चाललेल्या मनुष्याच्या मलाचें विशेष रक्षण करणें आवश्यक असते. तसेंच इतर जे कृश व दुर्बल लोक असतात, त्यांच्याहि मळाचें रक्षण केलें पाहिजे. अर्थात् त्याला कधींहि पातळ शौच्यास न होवो याची काळजी घेतली पाहिजे.

याप्रमाणें रसादि धातु न बनल्यामुळें त्या मनुष्याच्या शरीराची वाढ होत नाहीं. उलट या असल्या विषमाशनामुळें वाढलेले दोष शरीरांत अनेक उपद्रव उत्पन्न करून पुन्हां शरीर वाळविण्यास कारणीभूत होतात. त्या वाढलेल्या दोषांपैकीं वातदोष हा शूल, अंग दुखणें, गळा उध्वस्त करणें, पासोळ्यांत पीडा उत्पन्न करणें, अंसांना संतप्त करणें, आवाज बसविणें आणि पडसें उत्पन्न करणें वगैरे दोष वाढवितो. वाढलेलें पित्त, ज्वर, अतिसार आणि पडसें, डोक्याचें भारीपण, अरुचि व खोकला यांना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्पन्न करतें. त्याला खोकला एक सारखा चालवूं लागला म्हणजे वक्षःस्थलांत व्रण उत्पन्न होऊन त्यांतून रक्त बाहेर पडतें. आणि अशा प्रकारें रक्तयुक्त बेडके निघाल्यामुळें शरीरांत क्रमशः दुर्बलता वाढत जाते. याप्रमाणें विषमाशनानें क्रमशः संचित झालेले तिन्ही दोष राजयक्ष्म्यास उत्पन्न करतात. त्या उपद्रवांनीं पीडित झालेला मनुष्य हळूहळू वाळत जातो. म्हणून शहाण्या मनुष्यांनीं सदैव आहारविधींचे जे ठराविक नियम आहेत त्या नियमाप्रमाणेंच आहार करावा. सदैव पथ्याचे व हितकारक पदार्थ ठराविक प्रमाणांत सेवन करावेत. जेवणाच्या ठरलेल्या वेळींच अन्न ग्रहण करावें. आणि इंद्रियांना आपल्या कह्यांत ठेवावें. रुचकर आहार अधिक प्रमाणांत करूं नये.

याप्रमाणें क्षयाला कारणीभूत होणारे चार प्रमुख हेतु, त्यांच्यामुळें क्रमशः होणारा धातुक्षय व त्या क्षयास कारणीभूत होणाऱ्या संप्राप्ति सकट वर्णन केले. या कारणांनीं प्रकुपित होणारे दोष शरीराला एकसारखें उपशोधन करीत असल्यामुळें हा व्याधि इतर व्याधि सर्व रोगांपेक्षां अत्यन्त कष्ट देणारा असा समजला जातो. रोगांचा राजा म्हणून त्याला राजयक्ष्मा ही संज्ञा दिलेली आहे.

राजयक्ष्म्याचें पूर्वरूप

या रोगाचें ज्ञान पूर्वरूपांतच संपादन करणें आवश्यक असतें, कारण तो थोडाहि अधिक वाढला तर कष्टसाध्य होतो. दिवसभर नित्य नैमित्तिक कार्ये करीत असतां संध्याकाळच्या वेळीं कांहींहि काम करण्याची प्रवृत्ति न होतां स्वस्थ पडून रहावें असें वाटूं लागल्यास हें राजयक्ष्म्याचें पूर्वरूप आहे असें समजावें. आणि तेव्हांपासूनच चिकित्सेस प्रारंभ करावा. डोळ्यांची जळजळ, विशेषतः संध्याकाळचे वेळीं होणें, हातापायांची आग व तळवे जळजळणें, अंग किंचितसें दुखणें इतकीच लक्षणें संध्याकाळच्या वातकाळीं (सायंकाळीं तीन ते सहा वाजेपर्यंत) होऊं लागलीं म्हणजेच या व्याधीचें पूर्वरूप दिसूं लागतें. तोंडांतून थोड्या अधिक प्रमाणांत लाळ पडणें, थोडेसें अधिक चाललें असतां श्वास लागणें, टाळू वाळणें, अग्निमांद्य, किंचित खोकला व संध्याकाळचे वेळीं तोंडांत थर्मा... धरून ९९ अंश फॅ. तापमान हीं सर्व राजयक्ष्म्याचीं प्रारंभिक लक्षणें होत. मांसाहारी लोकांना ... खाण्याची जास्त इच्छा होणें, तसेंच, सर्वसाधारण तरुण मनुष्यांस स्त्री-सेवन जास्त करण्याची इच्छा होणें हीं देखील क्षयाचीं पूर्वरूपें होत.

राजयक्ष्म्याचें स्वरूप

राजयक्ष्म्यांत २४ तास ज्वर कधींच राहत नाही. ज्वर प्रतिदिवस कोणत्या तरी वेळीं विशेषतः संध्याकाळीं वाढणें, व रात्रीं किंचितसा घाम येऊन फिरून तसाच उतरणें हें राजयक्ष्म्याचें प्रधान लक्षण होय. त्याच प्रमाणें असें वाढणें एक दिवसहि खंड न पडतां होणें हेंहि पण त्याचेंच लक्षण होय. असा ज्वर मध्यें दोन चार दिवस न आला तर तो राजयक्ष्मा नव्हे हें निश्चित; कारण, राजयक्ष्म्यांत दोष ते अगदीं बरा होईपर्यंत विकृत असतात आणि त्यांतहि विशेषतः वाताची विकृति असल्यामुळें तो वृद्धिंगत आपल्या स्वाभाविक वाढीच्या काळीं म्हणजे संध्याकाळीं ज्वर निश्चयेंकरून वाढवितो.

त्रिरूप क्षय

योग्य उपचारांनीं दोष कमी होऊं लागे...

तारेचा पत्ता:—Newbottle

के. के. शहा अँड कंपनी

बाटल्यांचे व्यापारी

(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)

रिकाम्या बाटल्या, बुचे, कॅपसुल्स्
[हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे

ठोक व किरकोळ

विक्री करणारे व्यापारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणजे प्रतिदिवस वाढणारा ज्वर हा थोड्या प्रमाणांत कमी होत जातो. आणि त्यामुळें दररोजचें तापमान जर नोंदत गेलें तर ज्वराची वाढ क्रमशः कमी होत असलेली दिसते. परन्तु ज्वर एकहि दिवस मध्यें अजिबात आला नाहीं असें होत नाहीं. यामुळें या व्याधीचें प्रधान लक्षण म्हणजे सदैव येणारा व प्रतिदिवस सायंकाळीं वाढणारा ज्वर हेंच होय. त्याबरोबरच हातापायांची आग होणें, पासोळ्या व अंस (खांद्याच्या बाजूचा खोलगट भाग) यामध्यें आग होणें, हीं तीन प्रधान लक्षणें समजलीं जातात. आणि यालाच त्रिरूपक्षय अशी संज्ञा दिली जाते.

एकादशरूप क्षय

विकार विशेष वाढला म्हणजे तिन्ही दोष मिळून अकरा लक्षणयुक्त क्षयाला उत्पन्न करतात. त्यापैकीं तीन लक्षणें वातामुळें होतात. तीं म्हणजे (१) स्वरभेद (२) शरीरांत दुःख आणि (३) अंस व पासोळ्या यांचा संकोच (यांच्यावर ताण पडणें) होणें. पित्तामुळें चार लक्षणें होतात, (४) ज्वर, (५) दाह (६) अतिसार (शौच्यास पातळ होणें) आणि (७) तोंडांतून रक्त पडणें; कफापासून हि चार लक्षणें होतात (८) डोकें भरल्यासारखें वाटणें. (९) अन्नावर द्वेष, (१०) खोकला व (११) गळा उध्वस्त होणें.

हीं अकराहि लक्षणें होऊं लागली म्हणजे क्षय व्याधि पूर्णपणें जडला असें समजावें.

सहा लक्षणांचा क्षय

वर दिलेल्या अकराहि लक्षणांनीं युक्त असा क्षय असाध्य आहे असें समजावें. परन्तु अकराहि लक्षणें नसतांना केवळ खालीं दिलेलीं सहा लक्षणें जरी असलीं तरी तो असाध्य आहे असें जाणावें. ती सहा अशीं (१) खोकला (२) अतिसार (३) पासोळ्यांत दुःख (४) स्वरभेद (५) अन्नावर अरुचि आणि (६) ज्वर. इतकेंच नव्हे तर केवळ तीन लक्षणांनीं युक्त असलेला क्षय देखील असाध्य होतो. तीं म्हणजे (१) ज्वर (२) कास आणि (३) बेडक्या बरोबर रक्त येणें सबब, ज्या वैद्याला विपुल यश संपादन करणें हेंच एक ध्येय असेल त्यानें वर दिलेल्या एकादशरूप, षड्रूप किंवा त्रिरूप क्षयाचीहि चिकित्सा करण्याचें धाष्टर्य करूं नये. विशेषतः ज्या ठिकाणीं रोग्याची शक्ति अत्यन्त क्षीण झालेली असेल त्या ठिकाणीं वर दिलेली तिन्ही प्रकारच्या क्षयाची चिकित्सा केलेली असतांना कधींहि यश प्राप्त होण्याची आशा नाहीं.

दर १५ व्या दिवशीं वजन करावें

क्षयाची चिकित्सा करितांना जर रोग्याच्या शरीरांतील मांस आणि रक्त हे क्षीण झालेले नसतील, तर, किंवा त्या मनुष्याची शरीरशक्ति चांगली असल्याचा निश्चय असेल, तर वरील सर्व लक्षणांनीं युक्त असलेला क्षय देखील साध्य होण्याची संभावना असते. कारण असा रुग्ण रोगाचा प्रतिकार करण्यास आणि हवी तशी औषधें सेवन करण्यास समर्थ (बलवान्) असतो. अशा स्थितींत सर्व लक्षणयुक्त असलेला व्याधि थोड्या लक्षणांनीं युक्त आहे असें समजावें, आणि चिकित्सेस प्रारंभ करून परिणाम बारकाईनें पहात जावें. शरीरशक्ति क्षीण न झाल्याचें लक्षण म्हणजे त्याचें वजन कायम राहणें हें होय. म्हणून दर पंधराव्या दिवशीं वजन घेत असावें. तापमान दररोजचें, विशेषतः सकाळ व संध्याकाळचें नोंदत असावें. खोकल्याच्या उबळी व दर वेळीं खोकल्याद्वारा निघणाऱ्या कफाचें प्रमाण व त्याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्ण पहात असावें. या व्याधींतील विकृत कफाचा वर्ण निळसर होत असतो. कारण, फुफ्फुसांतील विशिष्ट भाग विकृत होऊन तेथें व्रण होऊन त्यांतूनच विकृत कफ बाहेर पडतो. वास्तविक तो कफ म्हणजे व्रण पिकून, सडून त्या जागीं झालेला पूं हेंच तें द्रव्य होय. हें जर प्रमाणांत कमी झालें तर व्रण भरत येत आहे व बरा होण्याचा संभव आहे असें तापमानाच्या वाढीची कमतरता झाल्यानें सिद्ध होतें.

हें केवळ थोतांड

आधुनिक पद्धतीनें क्षयाचें निदान करण्याकरतां फुफ्फुसांतील कोणता विशिष्ट भाग विकृत झाला आहे हें द्विनलिका यंत्र (स्टेथॉस्कोप) द्वारा जाणण्याचा प्रयत्न केला जातो. वास्तविक पाहिलें असतांना हा प्रयत्न चिकित्सेकरतां विशेष ज्ञान संपादन करणारा असा मुळींच नसतो. कारण फुफ्फुसांतील व्रण खालच्या भागांस झाला अथवा वरच्या बाजूस झाला तरी त्या ज्ञानामुळें त्या भागाची जी विशिष्ट चिकित्सा करावयाची ती भिन्न असत नाहीं. ती तर सदैव एकच असते. आणि ती आंत उपयोगांत आणल्या-गेलेल्या औषधीद्वारा केली जाते. तेव्हां आयुर्वेद दृष्टया हें केवळ थोतांडच ठरतें, फक्त रुग्णास, निदान करणाऱ्या व्यक्तीनें बराच वेळ आपल्या निदानांत घालविला, इतकेंच त्याचें समाधान करण्या-करतां ही निदान पद्धति उपयोगी येते. तसेंच X – Ray द्वारा घेतल्या जाणाऱ्या फोटोनें देखील फक्त फुफ्फुसाचा कोणता विशिष्ट भाग विकृत झालेला आहे हेंच कायतें कळतें. तेव्हां चिकित्सेकरितां त्याचाहि उपयोग नसतो. चिकित्सेकरतां तर फुफ्फुसांत विकृति आहे याचें ज्ञान संध्याकाळीं येणाऱ्या, व सारख्या येत राहणाऱ्या, ज्वरानें आणि खोकल्यानेंच निश्चित होतें. म्हणून हे दोन्ही उपाय केवळ रुग्णाला अधिक खर्चांत घालणारे ठरत असून त्यांचा वास्तविक उपयोग मुळींच नाहीं. रुग्णास होणारीं लक्षणें (Clinical Picture) हेंच

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर, मौक्तिक (मोती खाका), शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें आम्ही घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितो !

गुलकंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील !

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

टे. नं. ३१७९६ Telegram-AYURVED

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निदानाचें प्रमुख साधन होय, असें आजकालचे मोठमोठे पाश्चात्य देशांतील चिकित्साशास्त्र तज्ञ म्हणूं लागले आहेत. तेव्हां याबाबतींत निदान वैद्यांनी तरी या प्रयोगशाळांतील ज्ञानावर अवलंबून न राहतां व रुग्णांना यापायीं व्यर्थ खर्च करण्यास न लावितां केवळ रुग्णाच्या लक्षणावरून रोगाचें निदान करण्याचा प्रयत्न अवश्यमेव केलाच पाहिजे. तरच या गरीब देशांतील जनतेला कांहीं तरी द्रव्यापव्ययापासून वांचविल्याचें श्रेय वैद्यांस मिळवितां येईल. वैद्यसमाजानें चरकांतील "नात्मार्थं नापि कामार्थं अथ भूतदयां प्रति" या वाक्याची विशेष आठवण ठेवून चिकित्सा करण्यास प्रवृत्त झालें पाहिजे.

अर्थासंबंधीं वाद

माधवनिदानांतील खालील श्लोकाच्या अर्थासंबंधीं बराच वाद मासिकांतून झालेला आढळतो. तें वाक्य असें:- ज्वरानुबंधरहितं बलवन्तं क्रियासहम्। उपद्रवैरसंयुक्तं बलमेदात्मवन्तं दीप्ताग्निमकृशं नरम्॥ हें वाक्य बारकाईनें पाहिलें तर चरकांतील खालील वाक्याचाच सारांश असें आहे. तें वाक्य असें:-

तत्रापरिक्षीणमांसशोणितो बलवानजातारिष्टः सर्वैरेव शोषलिंगैरुपद्रुतः साध्यो ज्ञेयः बलवानुपचितो हि सहत्वात् व्याध्यौषधबलस्य कामं सुबहुलिंगोऽप्यल्पलिंग एव मन्तव्यः। च. नि. ६-१६

ज्वररहित क्षय होऊ शकत नाहीं

माधवनिदानांतील वाक्यांत साध्यत्वाकरतां जीं लक्षणें सांगितलीं आहेत—उदाहरणार्थ, बलवान्, क्रियासह, आत्मवान्, दीप्ताग्नि आणि अकृशत्व हीं लक्षणें वरील चरकाच्या वाक्यांत आहेतच. फक्त ज्वरानुबंधरहित हें जें एक विशेष वाक्य त्यासंबंधींच फार घोटाळा उपस्थित केला गेला आहे. या वाक्याचा सरळ अर्थ केला असतांना ज्वराचा अनुबंध म्हणजे ज्वर ज्याचें अंग होतो. आणि तो असणें हें तर क्षयाचें प्रधान लक्षण आहे. तेव्हां ज्वराचा अनुबंध नसणाऱ्या क्षयाची चिकित्सा करावयाची म्हणजे काय? ज्वर नसणारा असाहि क्षय असूं शकतो काय? ही शंका उत्पन्न होते. वास्तविक पाहिलें गेलें तर क्षय हा ज्वररहित कधींच होऊं शकत नाहीं. तेव्हां तो असून त्याचा अनुबंध नसणें म्हणजे तो प्रतिदिवस तेवढ्याच तीव्रतेनें (तापमानानें) न येत राहणें हें अनुबंधराहित्याचें लक्षण होय. चरक विमानस्थान अध्याय ८ याच्यांत अनुबंधाचें लक्षण खालीलप्रमाणें दिलें आहे. "अनुबंधः खलु सः यः कर्तारं अवश्यं अनुबध्नाति कार्यादुत्तरकालं कार्यनिमित्तः शुभो वाऽप्यशुभो भावः"

अर्थात् अनुबंध ही संज्ञा त्याच विशिष्ट गुणास किंवा कार्यास देतां येते जें कार्य झाल्यानंतरदेखील त्या कार्यास अवश्यमेव चिकटून राहतो मग तो गुण किंवा कार्य शुभ असो किंवा अशुभ असो. अर्थात् कार्य शुभ असेल तर अनुबंधहि शुभ असेल, आणि कार्य अशुभ असेल तर अनुबंधहि अशुभ असणार.

वरील 'ज्वरानुबंधरहितं' वाक्यांत कार्य हें क्षयरूप आहे अर्थात् क्षयव्याधि हेंच कार्य होय. त्या कार्यानें पीडित असलेल्या रुग्णास ज्वर हा अनुबंधरूपानें अवश्य विद्यमान असतो तो जर कांहीं काळा-

सांडु
गोल्ड टॅब्लेटस्
क्षयाच्या प्राथमिक अवस्थेवर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांडु ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई.
[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स— बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को. मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नंतर जर राहिला तर तो क्षयी रुग्ण ज्वरानुबंधरहित आहे असें म्हटलें जाईल. अर्थातच कांहीं काळ चिकित्सा केल्यानंतर ज्वर कमी होऊं लागून तो जात चालला असें दिसलें आणि रोगी बलवान्, क्रियासह इत्यादि लक्षणांनीं युक्त असला तर चिकित्सा चालूं ठेवावी हें सांगण्याकरतांच वरील शब्दयोजना आहे. अर्थातच चिकित्सा प्रारंभ करतांना रुग्ण हा ज्वरानुबंधसहितच राहील. परंतु कांहीं काळानंतर तो ज्वरानुबंध कमी होत चालला म्हणजे उपक्रम चालूं ठेवावा. न झाला तर चालूं ठेवूं नये, हें सांगण्याकरितांच वरील शब्दयोजना आहे. हें स्पष्टीकरण शास्त्रकारांच्या मूळ उद्देशास धरून असें करणें योग्य होईल.

महत्वाचीं असाध्य लक्षणें

वरील अर्थ करण्याला विशेष कारण असें कीं माधवनिदानांत हा श्लोक राजयक्ष्म्याच्या साध्या-साध्यत्वासंबंधीं विभागांत आलेला आहे. तेव्हां कोणता रोगी साध्य समजावा या प्रश्नाचें उत्तर म्हणून पहिल्यापासून ज्वर येत असतांना चिकित्सेनंतर तो ज्वर कमी होऊं लागला म्हणजेच ज्वराचा अनुबंध क्रमशः कमी होत चालला हें दर्शविण्याकरितां ज्वरानुबंधरहित ही शब्दयोजना आहे. कित्येक भाषांतरकारांनीं जो "ज्वर नसणें" असा त्याचा अर्थ केला आहे. तो मानल्यास राजयक्ष्म्याचें प्रधान लक्षणच मुळांत नसून त्याला राजयक्ष्मा म्हणणे हें हास्यास्पद ठरतें. असाध्य लक्षणांत इतर कांहीं लक्षणें हीं फार महत्वाचीं आहेत म्हणून त्यांच्याकडे विशेष लक्ष देत राहिलें पाहिजे, तीं अशीं:-

१) प्रतिदिवस भरपूर भोजन करीत असतांना देखील क्षीण होत जाणारा क्षयी असाध्य होय.

२) क्षय असतांना अतिसार होऊन जुलाब होऊं लागले म्हणजे तें क्षयाचें अंतिम असाध्य लक्षण होय. मृत्यु जवळ आला हाच तर्क या लक्षणापासून होत असतो.

३) ज्या क्षयी मनुष्याचें पोट व अंडकोष सुजूं लागले असतील तो पण असाध्य होय.

४) डोळे पांढरे फटफटीत पडले असतां अन्नावर द्वेष व ऊर्ध्वश्वास लागून कष्टानें मूत्रो[त्सर्ग] होऊं लागला म्हणजे शेवटचीच पायरी आली [असें] समजावें.

याप्रमाणें राजक्षयाचें निदान, पूर्वरूप व स्व[रूप] साध्यासाध्य लक्षणांसकट विस्तारपूर्वक वर्णन केलें आ[हे].

क्षयी रोग्याची अंतिम अवस्था

क्षयी रोग्याची अंतिम अवस्था प्राप्त झा[ली] असतांना ज्वरादि सर्व लक्षणें अजीबात कमी हो[ऊन] जाऊन रुग्णास व त्याच्या परिचारकास असें वा[टूं] लागतें कीं आतां रोगी बरा होऊं लागला आ[हे]. परन्तु तसा समज हा पूर्णतया चुकीचा ठरतो. [या] स्थितींत रुग्णाची प्रतिकारशक्ति अजिबात [नष्ट] झाल्यामुळें तीं लक्षणें होत असलीं तरी बाहेर दि[सून] येत नाहींत. अशा स्थितींत रुग्णाची हृदयक्रि[या] कोणत्या वेळीं बंद होईल याचा नियम नसतो. क[धीं] कधीं तर झोपेंत देखील हृदय थांबते. आणि अ[शा] स्थितींत रुग्ण मरण पावल्याचा अनुभव येतो. म्ह[णून] या स्थितीकडे परिचारकांनीं व विशेषतः वैद्यानीं [जरूर] लक्ष द्यावें आणि परिचारकांस त्याप्रमाणें पूर्वसू[चना] देऊन ठेवावी. सर्व लक्षणें क्षीण होऊन देखील रुग्[णास] कोणताहि आहार घेण्याची इच्छा वाटत नाहीं [हें] याचें प्रधान लक्षण होय.

आयुर्वेद सेवा संघ-नासिकचीं सर्व शास्त्रोक्त अनुभविक औषधें, तसेंच आयुर्वेद पत्रिकेचे अंक आमचेकडे मिळूं शकतील.

धातुवर्धक कंदर्प-वृष्य-पाक, टकलावर भ. भृंगराज तेल, शक्तिवर्धक अगस्तिप्राश ही व अशींच नवीन नवीन औषधें वापरा. विशेष माहितीकरितां एकवेळ भेट द्या.

दि सूर्यकिरण फार्मसी लि.

१७३ गिरगांवरोड मुंबई ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मनुष्याला व्यसनें कां जडतात ?

चिपळूण येथील दौऱ्याचा अहवाल

पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें दि. २१।३।५३ रोजीं महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचे अध्यक्ष वैद्य बिंदुमाधव हे संगमेश्वरकडून दुपारीं १२॥ वाजतां चिपळूण येथें आले. त्यांचे बरोबर मुंबई येथील पारकर वैद्य होते. मुक्काम थत्ते वैद्य यांजकडे होता. प्रथम स्थानिक वैद्य व खेडहून आलेले वैद्य यांची बैठक झाली. १०-१२ वैद्य मंडळी हजर होती. 'सरकारचें आयुर्वेदासंबंधीं धोरण' हा चर्चेचा स्वाभाविक विषय होता. अध्यक्षानीं वैद्यांच्या कांहीं शंकांचें निरसन केलें व बाकीचा वेळ अध्यक्षांकडून रुग्णपरीक्षा हा कार्यक्रम झाला.

भगिनीमंडळांत व्याख्यान

नंतर सायंकाळीं ४-३० ला मुलींचे शाळेंत भगिनी मंडळातर्फे स्त्रियांकरितां अध्यक्षांचें सुमारें १। तास भाषण झालें. कुटुंबाचे आरोग्यरक्षणाकरितां ऋतुमानाप्रमाणें जेवणाखाणांत बदल कसे करावे, आज उपलब्ध असलेलें रेशन्‌चे धान्यपरिस्थितींतहि निरोगी जीवन कसें राखावें याबद्दल मार्गदर्शन केलें. सुमारें पन्नासहून अधिक स्त्रिया भाषणाकरितां आल्या होत्या.

नंतर सायंकाळीं ६ वा. चिपळूण नगरपालिकेचे ॲलोपॅथिक दवाखान्यास भेट हा कार्यक्रम अर्धातास झाला. नंतर ६॥ ते ८ वाजेपर्यंत क्षेत्र परशुराम येथें देवदर्शन झालें. पुन्हां रात्रीं ८ ते ९ वैद्यांची बैठक झाली. नंतर चिपळूण नगरपालिकेच्या गांधी सभागृहांत युनायटेड इंग्रजी शाळेंतील हेडमास्तर बर्वे गुरुजी यांचे अध्यक्षतेखालीं ९॥ ते ११॥ जाहीर व्याख्यान झालें.

आठ संस्थांच्या वतीनें जाहीर व्याख्यान

चिपळूण वैद्य मंडळ, साहित्य सेवा मंडळ, मराठी शाळा, सिव्हिल क्लब, चिपळूण नगरपालिका दवाखाना, तालुका कॉंग्रेस कामिटी इ. आठ संस्थांचे वतीनें ही सभा भरविणेंत आली होती. सुमारें दीडशें श्रोतृवर्ग हजर होता. अध्यक्ष बिंदुमाधव यांचें सव्वातास भाषण झालें. "आयुर्वेदांतील व्यक्तिगत आरोग्य-विचार" हा भाषणाचा विषय होता. चहा, विडी, तंबाखू, तपकीर, पानसुपारी हीं समाजांत जीं व्यसनें पसरलीं आहेत तीं व्यक्तींचे प्रकृतींत जो दोषप्रकोप होत असतो, त्याचे प्रतिकारार्थ निर्माण झालीं आहेत असें त्यांनीं समजावून सांगितलें.

स्वास्थ्य टिकविण्यासाठीं व्यसनें

व्यसनें हीं आरंभीं प्रकृतीचें स्वास्थ्य टिकविणें-साठीं म्हणून लागतात. पण समाजाला या व्यसनांची जरूरी नाहीं. आहारांतच योग्य ते बदल करून षड्-रसात्मक आहाराचें योग्य त्या प्रमाणांत सेवन झालें तर समाजाला व्यसनांची जरूरी लागणार नाहीं. अलिकडे गूळ, साखर हा स्वादुरसप्रधान आहार समाजांत अधिक प्रमाणांत वाढत आहे, त्यामुळें अनेक कृमिजन्य विकार आपले समाजांत प्रगट होत आहेत. त्याला प्रतिकारक असा कडूरस (तिक्त) पाहिजे तेवढा खाण्यांत येत नाहीं. कागदी लिंबाचे सालींचे लोणचें, मेथी अशा वस्तु खाणेंत आल्या तर मधुररसाचे विकार जाणवणार नाहींत. ॲलोपॅथीची उपचार पद्धति केवळ विकाराचीं लक्षणें तात्पुरती कमी करणें अशा स्वरूपाची आहे. त्यामुळें समाजा-तील आजार पुन्हां पुन्हां निरनिराळीं रूपें धारण करतात. आयुर्वेदाची उपचार पद्धति मूलगामी आहे. त्याचा अवलंब केला तर समाजांत आजार वाढणारच नाहींत. जो आजार झाला असेल तो मुळापासून नाहींसा होऊन नवा होणार नाहीं.

डॉ. साळवी एम्.बी.बी.एस्. यांनी बिंदुमाधव यांचे कांहीं विधानास विरोध केला. तसेच उपवक्ते म्हणून श्री. वैद्य (कम्युनिस्ट) यांनीं चढ्या आवाजांत भाषण केलें. त्यांचें भाषण विरोधी नव्हतें. आयुर्वेद व ॲलोपॅथी दोन्ही वैद्यकांची समाजाला जरूरी आहे. दोन्हीं पंथांचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समन्वयानें समाजाचें आरोग्य टिकणार आहे असा वैद्यांचें भाषणाचा आशय होता. डॉ. कामळी (म्युनिसिपल दवाखान्यावरील डॉक्टर) हेहि बोलले. इतका जोरदार आक्षेप घेण्यासारखे ॲलोपॅथीचे उपचार सदोष नाहींत असें त्यांचें म्हणणें पडलें.

बर्वे गुरुजींनीं सभेच्या समारोपाचें भाषण केलें. त्यांत त्यांनीं जगांतील वैद्यशास्त्रांचा इतिहास सांगितला. आपल्या स्वतःच्या एका आजारासाठीं डॉक्टरांनीं मोठें ऑपरेशन केल्याशिवाय भागणार नाहीं असें सांगितलें असतां कर्जतच्या बापट वैद्यांच्या ८ दिवसांच्या पोटांत घेण्याच्या औषधानें तो रोग २० वर्षांपूर्वी गेला व पुन्हां त्याचा उगम झाला नाहीं असा अनुभव निवेदन केला.

दि. २२ ला सकाळीं ६॥ ते ८ रुग्णपरीक्षा हा कार्यक्रम पुन्हां झाला. नंतर ८॥ चें एस. टी. नें अध्यक्ष बिंदुमाधव खेडकडे गेले.

डाल्डा व तत्सम वनस्पति (घन तेलें) यांचें पोषणमूल्य

'वनस्पति' नांवानें जो तुपासारखा पदार्थ बाजारांत मोठ्या प्रमाणांत विकला जातो, त्याचे घटक व त्याचें पोषणमूल्य याबाबत संशोधन, कलकत्ता येथील हायजिन ॲन्ड पब्लिक हेल्थ इन्स्टिट्यूटमध्यें प्राध्यापक एस्. स्वरूप यांच्या देखरेखीखालीं झालें.

प्रयोगान्तीं पोषकमूल्याच्या दृष्टीनें खरें तूपच सरस असल्याचें आढळून आलें. कचे शेंगदाण्याचें तेल, शुद्ध केलेलें शेंगदाण्याचें तेल आणि ३७° (सेंटिग्रेट) उत्कलन (उकळणें) बिंदु असलेली वनस्पती या वस्तूंचा क्रम तुपाखालोखाल लागतो. ४१° सें. उत्कलन बिंदु असलेली वनस्पती पोषणमूल्याच्या दृष्टीनें तिसऱ्या क्रमांकाची ठरते.

सदरहु सर्व संशोधन एका पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. किं. ४ रु. मिळण्याचा पत्ताः- शास्त्रीय व औद्योगिक संशोधन मंडळाचा प्रकाशन विभाग, नवी दिल्ली.

आरोग्याचा सल्ला देण्याचा शिक्षणक्रम

अमेरिकेंतील पेन्सिल्व्हिया विद्यापीठाच्या स्कूल ऑफ मेडिसिन या विद्यालयांत निरनिराळे अभ्यासक्रम आहेत त्यांत कौटुंबिक आरोग्याचा सल्ला देण्याचा शिक्षणक्रम हा एक आहे. या अभ्यासक्रमांत विद्यार्थ्यांना कदाचित् शरीरशास्त्राचें फारसें ज्ञान मिळणार नाहीं पण आजारी माणसाविषयीं मात्र अधिक ज्ञान मिळेल.

हा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांस एखाद्या कुटुंबाच्या आरोग्याचा अभ्यास करून सल्ला देण्याचें काम दिलें जातें. दरमहा एकवेळ सल्ला द्यावयास जावयाचें असतें.

मानवतेच्या दृष्टिकोनांतून वैद्यकशास्त्राकडे बघण्याची दृष्टि असलेलीं अशा प्रकारचीं विद्यापीठें आज आपणास हवीं आहेत.

———

काथ काढण्याचा धंदा

ठाणे जिल्ह्यांच्या उत्तर भागांत काथ काढण्याचा धंदा मोठ्या प्रमाणांवर चालतो. सध्यां खैराचें लाकूड महाग मिळते, यासाठीं ३६ इंचावरील घेराचे खैराचें लाकूड योग्य किंमतीस मिळावें व खैराच्या भट्या जंगलापासून १ मैलाच्या पलीकडे लावाव्या ही अट रद्द करावी. अशा मागण्या जंगल अधिकाऱ्याकडे हा व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांनीं केल्या आहेत.

———

केळीच्या खांबापासून कागद

मुंबई राज्यांत दरवर्षी ३ लक्ष टन केळीचे खांब फुकट जातात. त्याच्या निम्यानें जरी हे खांब कागदासाठीं वापरले गेले तरी ६७५० टन कागद तयार होईल. प्रत्येक खांबांत ९३ टक्के पाणी व ७ टक्के सु माल असतो. भारताला दरसाल ११००० टन का परदेशांतून आणावा लागत आहे. केळीच्या खांबापासून उत्तम कागद होऊ शकतो हा शोध श्री. एच. गोधळेकर (पुणें) यांनीं लावला आहे.

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एन्‌लिस्टेड वैद्यांना प्रमाणपत्रें मिळणार !

आयुर्वेद बोर्डाच्या सर्वसाधारण सभेंतील कामकाज

मुंबई राज्य आयुर्वेदिक आणि युनानी बोर्डाची सर्वसाधारण सभा ता. २६ फेब्रुवारी ५३ रोजीं दुपारीं ११ वाजतां बोर्डाच्या कार्यालयांत (१४४ म. गांधीरोड मुंबई येथें) भरली होती. श्री. बारोट (बडोदा) हे सभासद आजारपणामुळें उपस्थित होऊं शकले नव्हते. जामनगरचे कैलासवासी वैद्य बळवंतराय दीक्षित यांचे जागीं फॅकल्टीनें बोर्डावर निवडून दिलेले वैद्य ट. ना. बागेवाडीकर हे या सभेस उपस्थित होते. मागील सभेचें वृत्त मंजूर झाल्यानंतर कै. वैद्य बळवंतराय दीक्षित यांचे सेवेबद्दल आभारदर्शक ठराव करण्यांत आला.

वैद्य सिक्वेरांना माफी

वैद्य सिक्वेरा यांच्या वैद्यकीय नीतिनियमांचे उल्लंघनाबाबतच्या प्रकरणाचा विचारविनिमय होऊन श्री. सिक्वेरा यांनीं, यापुढें नीतिनियमांचें उल्लंघन करणार नाहीं असें लिहून दिल्यामुळें त्यांचें नांव रजिस्टरमधून काढण्यांत येऊ नये, असें सर्वानुमतें ठरलें.

एन्‌लिस्टेड वैद्यांना प्रमाणपत्रें

जुन्यानव्या एन्‌लिस्टेड वैद्यांना देण्यांत यावयाच्या प्रमाणपत्राच्या मसुद्याला मंजुरी देण्यांत आली.

'व्यवसायाची' व्याख्या

मुंबई वैद्यक व्यावसायिक कायद्यांत समाविष्ट करण्याकरितां 'व्यवसाय' (Practice) या शब्दाची व्याख्या संमत करण्यांत आली. बोर्डाच्या नोकरांना देण्यांत यावयाच्या प्रॉव्हिडंड फंडाच्या नियमांतील दुरुस्तींना मान्यता देण्यांत आली.

कांपौंडर्सना रजिस्ट्रेशन नाहीं

'पहिल्या रजिस्टरमध्यें अनेक कांपौंडर्स हे आपण मेडिकल प्रॅक्टिशनर्स आहोत असें दर्शवून रजिस्टर्ड झालेले आहेत, त्यांचीं नांवें ह्या रजिस्टरमधून काढण्यांत यावीत' या वैद्य शास्त्री यांच्या ठरावावर विचार होऊन याबाबतींत निश्चित पुरावा यावा व मग याचा विचार व्हावा असें ठरलें. नवीन रजिस्ट्रेशन देतांना अशे लोक कांपौंडर्सकरितां असणाऱ्या रजिस्ट्रेशनमध्यें नोंदलेले नाहींत हें पाहाण्याची खबरदारी अगोदरच घेण्यांत आली असल्याचा खुलासा यावेळीं करण्यांत आला.

जन्ममृत्यूचा दाखला

एन्‌लिस्टेड वैद्यांना जन्म, मृत्यु, आजारीपण व निरोगीपणा याबाबत दाखले देण्याचा अधिकार देण्यांत यावा अशा संबंधींच्या वैद्य प्रतापकुमार यांच्या ठरावावर विचार होऊन त्यांना केवळ जन्म-मृत्यूचे दाखले देण्यास मान्यता द्यावी अशी सरकारकडे शिफारस करण्यांत आली.

वैद्यकीय जाहिरातीवर निर्बंध

वर्तमानपत्रांत येणाऱ्या वैद्यकीय जाहिरातीतील अवास्तवपणा, अश्लीलपणा, वैयक्तिक व्यवसायाची जाहिरात, तसेंच वैद्यकीय नीतिनियमांत न बसणाऱ्या जाहिराती, आरोग्याच्या सल्ल्याचा बुरखा घेऊन केलेली स्वतःची जाहिरात, वगैरेंना पायबंद घालण्याबाबत भारत सरकारनें नेमलेल्या प्रेस कमिशनला शिफारस करण्यांत आली.

इन्शुअरन्स योजनेंत वैद्य

मध्यवर्ति सरकारनें मुंबई राज्यांच्या सहकार्यानें मुंबईत लागू केलेल्या सिकनेस इन्शुअरन्स योजनेंत वैद्यांना योग्य स्थान मिळण्याबाबत मुंबई सरकारला शिफारस करणारा ठराव मंजूर करण्यांत आला.

बातमीदारांना बंदी नको

बोर्डाच्या सर्वसाधारण सभांस वैद्यकीय वर्तमानपत्रें, मासिकें वगैरेंच्या बातमीदारांना उपस्थित राहण्याची परवानगी देण्यांत येऊं नये अशा आशयाचा एक ठराव, वैद्य ना. व्यं. जोशी (पुणें) यांनीं मांडला. त्यावर बरीच खडाजंगी होऊन तो ठराव परत घेण्यांत यावा असें ठरलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समितीची मुदत वाढविली

वैद्यक नीतिनियमांबाबत दुरुस्ती वगैरेचा विचार करण्याकरितां नेमलेल्या समितीची मुदत ता. ३० एप्रिल अखेर वाढविण्यांत आली.

देणग्या घेतां येत नाहींत!

बोर्डास घटनेप्रमाणें देणग्या घेतां येत नाहींत, त्या दृष्टीनें काय करावयास पाहिजे याबाबत अनौपचारिक रीत्या चर्चा झाली.

बोर्डाच्या या सर्वसाधारण सभेस वर्तमानपत्रें व मासिकें यांचे प्रतिनिधी म्हणून वैद्य ना. ह. जोशी व वैद्य रामभाऊ भोगे हे उपस्थित होते.

श्री शंकर दाजीशास्त्री पदे स्मारक समितीचा खुलासा

श्री शंकर दाजीशास्त्री पदे स्मारक समितीस नोव्हेंबर १९४६ ते आक्टोबर १९५२ अखेर १६३५५-६-६ रु. मिळाले आहेत. ही सर्व रक्कम नि. भा. आयुर्वेद विद्यापीठामार्फत ट्रेझरी सेव्हिंग्ज सर्टीफिकेटांत १०००० रु. व युनायटेड कमर्शियल बँक सर्टीफिकेटांत ५००० रु. याप्रमाणें गुंतविली आहे. बाकी रक्कम पंजाब नॅशनल बँकेंत आहे.

ही रक्कम उत्तर प्रदेशांतून १०४६३-५० रु. मध्य प्रदेशांतून ५४९-४-० रु. राजस्थानांतून ५२४ रु., मध्य भारतांतून ३१६ रु., मुंबई राज्यांतून ७२३ रु., बिहार प्रांतांतून ७८५-५-० रु., बडोदा व अहमदाबाद मधून ५५६ रु., व हैद्राबाद राज्यांतून ३५७ रु., याप्रमाणें जमा झाली आहे.

आयुर्वेद महासंमेलनाचा प्रारंभ

आयुर्वेद महासंमेलनाचा आरंभ महाराष्ट्रांतून एका महाराष्ट्रीयाकडून झालेला आहे. अशा अवस्थेंत महाराष्ट्रानें पुढें येऊन आपला भाग पूर्ण केला पाहिजे. तरी महाराष्ट्रांतील प्रत्येक वैद्यानें आपल्या शक्यतेनुसार यथाशक्ति मदत करून आपला उत्साह प्रगट करावा. अशी जगन्नाथप्रसाद शुक्ल, मंत्री श्री शंकर दाजीशास्त्री पदे स्मारक समिति, ३ संमेलन मार्ग, प्रयाग (यू. पी.) यांची विनंति आहे.

वाचकांचा पत्रव्यवहार

गांवठी वैद्यांवर कर

आपल्या जिल्ह्यांत लोकल बोर्डानें गांवठी वैद्यांवर म्हणजे अनूरजिस्टर्ड वैद्यांवर ५ रु. वार्षिक कर बसविला आहे. याचा अर्थ असा कर देऊन पिढीजात वैद्यांना वैद्यकी करतां येते हें सिद्ध होतें. तरी या गोष्टीचा उलगडा करावा. आम्ही पिढीजात वैद्य आहोत.

— गं. जो. पाटील

(ज्या गांवांत कोणीहि रजिस्टर्ड अगर लिस्टेड वैद्य नाहीं त्या गांवीं अनूरजिस्टर्ड वैद्यास वैद्यकी करण्यास सध्यांच्या कायद्यानें बंदी नाहीं. – संपादक)

संस्कृत विद्यालयांना देणग्या

मध्यप्रदेश सरकारनें गतवर्षीच्या अर्थसंकल्पांत संस्कृत विद्येच्या पुरस्कारार्थ १४॥ हजार रुपये संस्कृत पाठशाळांना देणगी म्हणून घातले होते. ती रक्कम मध्यप्रदेशांतील २५ संस्कृत पाठशाळा व वेदशाळांना वाटून देण्यांत आली आहे.

औषधी धंद्याची चौकशी

भारतांतील ॲलोपॅथिक औषधी कारखान्यांचा धंदा जास्त व्यवस्थित व फायदेशीर कसा होईल याची चौकशी करण्यासाठीं भारत सरकारनें डॉ. भाटिया यांच्या अध्यक्षतेखालीं चौकशी समिति नेमली आहे.

आयुर्वेद सेवा संघ नासिकची सर्व गुणकारी औषधें मिळण्याचें ठिकाण

जनरल सप्लायर्स (हिंद)

११४ बी, जगन्नाथाची चाळ

फणसवाडी, मुंबई २

तसेंच शास्त्रोक्त पाठाप्रमाणें नवीन नवीन औषधेंहि तयार करून दिलीं जातात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लातूर संमेलनाचें अध्यक्षपद

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाचे ९ वें अधिवेशन मराठवाड्यांत लातूर येथें येत्या मे महिन्यांत भरण्याचें जवळ जवळ निश्चित झालें आहे. त्यासाठीं हंगामी स्वागत मंडळाची सभा ता. २६।२।५२ रोजीं भरून स्थायी स्वागत मंडळहि निर्माण झालें आहे व तें आपल्या कार्याला लागलें आहे. आतां म. प्रांतीय वैद्य मंडळाच्या सभासदांची जबाबदारी संमेलनासाठीं सुयोग्य अध्यक्षांची निवड करणें ही आहे.

कार्यालयाकडून सूचना

लौकरच प्रांतीय कार्यालयाकडून अध्यक्षपदासाठीं ३ नांवें सुचविण्याची विनंति करणारीं जोडपत्रें सभासदाकडे रवाना होतील. तीं पत्रें येतांच आपणास उचित वाटतील अशा ३ वैद्यांचीं नांवें (त्यांच्या पत्त्यासह) उत्तर कार्डावर लिहून तीं पत्रें पोस्टांत टाकावींत, म्हणजे कार्यालयास मिळतील. आपला महाराष्ट्र प्रांत हा १४ जिल्ह्यांत पसरलेला आहे व सर्वांनाच सर्व कार्यकर्त्या वैद्यांचा परिचय झालेला असतो असें नाहीं. सबब कांहीं प्रमुख कार्यकर्त्या वैद्यांचा परिचय देणें सभासदांच्या दृष्टीनें सोईचें होईल असें वाटतें.

वैद्यराज दत्तात्रेयशास्त्री जळूकर

गतवर्षी पनवेलचे वैद्य संमेलन झालें त्यावेळीं पूर्व खानदेशांतील नशिराबाद येथील रहिवासी वैद्यराज दत्तात्रेयशास्त्री जळूकर, आयुर्वेदप्रवर, यांचें नांव सर्वांच्या परिचयांत आलें आहे. आपल्या या महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाच्या चळवळीस १९३८ सालीं पूर्वखानदेशांतूनच प्रारंभ झाला आहे व संयुक्त खानदेश वैद्य मंडळ नांवाची प्रभावी संघटना करून ज्या त्रैमूर्तींनीं ती यशस्वीपणानें आजहि चालू ठेवली आहे, त्यांत वैद्यराज जळूकर हे सर्वांत उत्साही, ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध असे आहेत. संयुक्त खानदेश वैद्य मंडळातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या चिकित्सक मासिकाचे ते प्रधान संपादक आहेत.

विचारी आरोग्यमंत्री लाभले

सुदैवानें आज मुंबई राज्यास विचारी आरोग्यमंत्री लाभले आहेत. त्यांचा विचार प्रांतांत आयुर्वेदाचा एक कमी खर्चाचा व कमी मुदतीचा अभ्यासक्रम सुरू करावा असा आहे. अशा वेळीं आयुर्वेदाच्या सिद्धांतांना बाध न येतां जनतेची व सरकारची गरज भागविणारा असा सरकारमान्य अभ्यासक्रम सुरू करतां आला तर सर्वांना आनंद वाटल्याशिवाय रहाणार नाहीं.

दीर्घकालीन व डोईजड अभ्यासक्रम

आज कितीतरी वैद्यमंडळीं अशीं आहेत कीं ज्यांना आपल्या मुलांना व पाल्यांना आयुर्वेदाचा अभ्यासक्रम, तो दीर्घकालीन व डोईजड खर्चाचा झाल्यामुळें देतां येत नाहीं. आरोग्यमंत्र्यांशीं विचारविनिमय करून योग्य असा आयुर्वेदाचा अभ्यासक्रम निर्माण करण्याची जबाबदारी नव्या अध्यक्षांची आहे.ही जबाबदारी पार पाडण्यास वैद्यराज जळूकरशास्त्री हे सर्वथैव योग्य आहेत असें आम्हांस वाटतें.

३ नांवें सुचवा

अध्यक्षपदासाठीं प्रथम ३ नांवें सुचवावयाचीं असतात, तरीं तीं प्रत्येकानें अवश्य सुचवावीत. त्यापैकीं एक नांव वैद्यराज दत्तात्रेयशास्त्री जळूकर (नशिराबाद, पूर्व खानदेश) यांचें सुचवून बाकीची दोन नांवें आपल्या परिचित अशा सुयोग्य व्यक्तींचीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असावीत. सोलापूरचे वैद्यराज नृसिंहाचार्य बागेवाडीकर, (प्रधान चिकित्सक सखाराम नेमचंद धर्मार्थ औषधालय, सोलापूर), साताऱ्याचे गोविंद अप्पाजी फडके, आयुर्वेदाचार्य (प्राध्यापक, आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा) ही अध्यक्षपदाकरितां सुचविण्यास योग्य अशीं नांवें आहेत हें कोणीहि कबूल करील.

अध्यक्षपदासाठीं सुयोग्य व्यक्ति

कोल्हापूरचे यशवंतराव गुणे, बेळगांवचे वारवेशास्त्री, कऱ्हाडचे कासेगांवकरशास्त्री, नाशिकचे विष्णुशास्त्री केळकर, वैद्य विष्णुशास्त्री दाते, आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे, अशी आणखीहि अध्यक्षपदासाठीं सुयोग्य व्यक्ती आपल्या समोर आहेत. उदयोन्मुख असे आणखीहि वैद्य कार्यकर्ते ठिकठिकाणीं आहेत. त्यांतून आपणास योग्य वाटतील तीं नांवें अध्यक्षपदासाठीं सुचवून महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचें कार्य अखंड चालू राहील व हें मंडळ नेटानें आयुर्वेदाला राष्ट्रीय वैद्यकाचें स्थान मिळवून देण्याचें आपलें ईप्सित साध्य करण्यास झटत राहील असा प्रयत्न आपण करावा अशी विनंति आहे.

आपले

वैद्य शं. य. मंगरूळकर — वैद्य ग. म. लोखंडे

वैद्य शरद् शं. परचुरे — वैद्य वसंत ना. रानडे.

वैद्यकीय नियतकालिकांची यादी

आज उपलब्ध असलेल्या १६०० वर वैद्यकीय नियतकालिकांची संदर्भ सूचि भारत सरकारच्या डायरेक्टोरेट जनरल ऑफ हेल्थ सर्व्हिसेस (नवी दिल्ली) यांनीं प्रसिद्ध केली आहे. युनियन कॅटलॉग ऑफ मेडिकल पिरिऑडिकल्स इन् इंडियन लायब्ररीज' हें त्या प्रकाशनाचें नांव आहे. त्यांत अंतर्भूत केलेल्या नियतकालिकांत वैद्यकशास्त्राच्या सर्व अंगांचा समावेश असून, होमिओपाथी आणि निसर्गोपचार या विषयांचाहि त्यांत अंतर्भाव आहे. भारतांत प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांच्या जोडीस त्यात इंग्रजी, जर्मन, फ्रेंच, डच, स्कॅन्डिनेव्हियन, अमेरिकन, ऑस्ट्रेलियन, आयरिश आणि जपानी नियतकालिकांचाहि अंतर्भाव आहे.

दिल्लीस आरोग्यखात्याच्या ग्रंथालयांत सुमारें १५ हजार पुस्तकें असून, त्या ठिकाणीं जगांतील निरनिराळ्या ठिकाणांहून ३१० वैद्यकीय नियतकालिकें येतात. या ग्रंथालयाचा भारतीय वैद्यक संशोधन मंडळ आणि इतर संस्था यांच्या संशोधकांनाहि उपयोग होतो.

वाचकांचा पत्रव्यवहार

संशोधनाची तयारी आहे

"दि. १ मार्च १९५३ च्या आयुर्वेद पत्रिकेंतील श्री. शि. पां. गणपुले यांनीं लिहिलेलें जीवाणुनाशक वनस्पति या शीर्षकाचें पत्र वाचलें. प्रस्तुत लेखक म्हणतात त्या वनस्पतीचें संपूर्ण संशोधन करण्याची जबाबदारी मी घेऊ शकेन. त्यांनीं ती वनस्पति मजकडे पाठवावी. अगर तिचीं प्रचलित नांवें, वर्णन, हंगाम, कोठें मिळेल अशी समग्र माहिती कळवावी. ती वनस्पती आसपास मिळणारी असेल तर मी स्वतः जाऊन ती आणू शकेन.

"व्याख्यात्यांच्या मनाजोग्या जंतुनाशक वनस्पति आयुर्वेदामध्यें सांपडलेल्या दिसत नाहींत' याचा अर्थः— पेनिसिलिन इ. जीवाणुनाशकाप्रमाणें अगदीं थोड्या तासांतच जंतुनाश करणाऱ्या अशा वनस्पति जीवाणुनाशकाचा शोध लागलेला नाहीं. असा समजावा." —चंद्रशेखर ग. जोशी एम्. एस्‌सी.

डॉ. काणे यांचा मराठींतील ग्रंथ

होमिओपाथिक चिकित्सापद्धति

[किंमत २॥ रु. ट. ख. निराळा]

१ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

२ काणे बंधु, टिळक चौक, कल्याण

मे. राय, श्रीकृष्ण व इतर प्रसिद्ध होमिओ औषधी विक्रेत्याकडेहि मिळते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४० वर्षांचा अनुभव सरकारला देण्याची तयारी

(डॉ. डिशेन यांचें व्याख्यान)

हैद्राबाद येथील डीशेन औषधी कारखान्याचे संचालक डॉ. डिशेन (वय ७२ वर्षे) यांचें कोल्हापुरांत श्री. छत्रपति प्रमिलाराजे हॉस्पिटलच्या लायब्ररी हॉलमध्यें कोल्हापूर मेडिकल असोसिएशनतर्फे डॉ. [illegible]कर यांचे अध्यक्षतेखालीं "Co-ordination of various Branches of the Medical Science with reference to the Ayurveda" (वैद्यक शास्त्राच्या निरनिराळ्या शाखांचा आयुर्वेदाशीं समन्वय) या विषयावर उद्बोधक व परिणामकारक असें इंग्रजींत भाषण झालें. ॲलोपॅथी, होमिओपॅथी व आयुर्वेद या तिन्ही वैद्यकीय क्षेत्रांतील बरींच मंडळी उपस्थित होती.

'शास्त्र' शब्दाचा वीट आला

डॉ. डिशेन आपल्या भाषणांत म्हणाले:– 'मी हिंदुस्थानांतील एका प्रसिद्ध डॉक्टरांना भेटावयाला गेलों होतों. ते म्हणाले 'गेल्या ५० वर्षांच्यावर माझ्या कानाशीं घुमत असलेल्या 'शास्त्र' या शब्दाचा मला अगदीं वीट आला आहे. अमक्याचा अमुक परिणाम होतो एवढेंच मला सांगा !

आणि ज्ञानाचा हाच खरा महिमा होय. खऱ्या प्रश्नांना आपणा सर्वांस तोंड द्यावयाचें आहे. सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे सध्यां चालू असलेली गुंतागुंतीची व अत्यंत खर्चाची ॲलोपॅथिक औषधोपचार पद्धति ही आपल्या देशाला परवडणें शक्य नाहीं. पाश्चिमात्य लोक आर्थिक रहाणीनें श्रेष्ठ आहेत. त्यांची नक्कल करून आपलें निभावणार नाहीं. आपला देश दरिद्री आहे. तेव्हां गरीब लोकांना परवडेल अशीच उपचार पद्धति शोधून काढली पाहिजे.

रोग पुढील तीन कारणांनीं होतात:– (१) अयोग्य आहार, अयोग्य पचन अयोग्य शोषण आणि अयोग्य विसर्जन (२) मानसिक आणि मज्जातंतूंची विकृति (३) रक्ताची कमतरता किंवा रक्तदोष.

मर्दनं गुणवर्धनम्

हीं कारणें आणि देशाची गरीबी लक्षांत घेऊन आपल्या देशांत निसर्गानें ज्या वनस्पती निर्माण होतात त्या वनस्पतींची कार्यक्षमता 'मर्दनम् गुणवर्धनम्' या आयुर्वेदांतील सिद्धांताप्रमाणें वाढविल्यास त्या जलद गुणकारी ठरतात. गरीबांना हीं औषधें आणा दोन आण्यांत देण्याघेण्यास परवडतील. आयुर्वेद, अलोपॅथी व होमिओपॅथी या तीन वैद्यक शास्त्रांतील सर्वसाधारण अशा महत्वाच्या सिद्धांताचा समन्वय करून जनतेत सहज उपयोग व्हावा म्हणून आयुर्वेदिक शास्त्राला आधुनिक पद्धतींची जोड दिली पाहिजे. आणि ती कशी देतां येते हें त्यांनीं अनेक उदाहरणें देऊन सुंदर प्रकारें पटवून दिलें. खेडेगांवांतील जनतेला स्वस्त दरांत गुणकारी औषधें पुरविणें हें अत्यंत निकडीचें होऊन बसलें आहे.

औषधीकरणाची गुलामगिरी

'सायन्स' या शब्दापेक्षां परिमाणाकडे लक्ष दिलें पाहिजे. पाश्चिमात्य औषधीकरणाची गुलामगिरी सोडून देऊन आयुर्वेदावर भर द्या. संशोधन वाढवा" असें सांगितल्यानंतर कांहीं प्रश्न विचारण्यांत आले. त्यांचींहि उदाहरणांनीं समाधानकारक उत्तरें देण्यांत आलीं. समारोप करतांना अध्यक्षांनीं समाधान व्यक्त केलें, व हें सरकारला पटवून दिल्यास लौकर कार्यभाग होईल असें सांगितलें.

आयुर्वेदाशिवाय तरणोपाय नाहीं

वरील सभा आटोपल्यावर कोल्हापुरांतील पत्रकारांची बैठक झाली. देशाला आयुर्वेदाशिवाय तरणोपाय नाहीं आणि आधुनिक पद्धतीची जोड आयुर्वेदाला दिल्याशिवाय औषधें स्वस्त, सर्व ठिकाणीं उपलब्ध आणि सुटसुटींत होणार नाहींत. हें कसें तें अनेक उदाहरणांनीं त्यांनीं पटविलें. सरकारनें आयुर्वेदाकडे अधिक लक्ष देऊन संशोधन वाढवावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरकारला तें सहज शक्य आहे. मी माझा ३०।४० वर्षांचा अनुभव देशांकरितां सरकारला देण्यास तयार आहे.

निसर्गनियमाविरुद्ध वागणूक नसावी

संतति-नियमनसंबंधीं विचारलें असतां ते म्हणाले:– हें निसर्गाच्या विरुद्ध आहे. संततीची खरी वाढ श्रमजीवी अशा अफाट समाजांत (खालच्या वर्गांत) होत आहे. तो वर्ग या साधनांचा उपयोग करीत नाहीं. मध्यमवर्गांतच ही चळवळ आहे. या चळवळीनें बुद्धिमान् लोकांची संख्या घटत जाईल. आर्थिक प्रश्न सोडविणें हाच खराखुरा उपाय होय. शंभर गुन्हे केले तरी परमेश्वर दया करील, पण निसर्ग प्रत्येक गुन्ह्यास प्रायश्चित्त भोगायला लावतो. तेव्हां निसर्गाच्या नियमाविरुद्ध जाण्यांत मोठें नुकसान असतें.

निर्गुंड्यादितेलाचा पाठ

"१-१०-५२चे पत्रिकेंत 'कर्णरोगावरील उत्तम औषधी' चा पाठ दिला आहे तो योगरत्नाकरांतील कर्णरोगचिकित्सेमधील निर्गुंड्यादि तेलाचा असून हें औषध कै. वैद्यराज ऐनापुरेशास्त्री वापरीत असत व त्याचा परिणामहि चांगला होत असे.

श्री. वैद्यराज रुद्रभट्ट यांनीं जितसायासंबंधीं अनुभव विचार केला आहे. माझा अनुभव पुढील प्रमाणें आहे:– मधुमेहाचीं गळवें, काळपुळी, भगंदर यांवर जितसाया ही वनस्पती पाण्यांत उगाळून लावली असतां, तसेंच चहाचा चमचाभर गंधासारखी उगाळलेली दिली असतां परिणाम चांगला होतो केवळ पोटांत ह्या वनस्पतीचा एकटीचाच अनुभव मात्र घेतलेला नाहीं. जोडीस वसंतकुसुमाकर, शिलाजीत वंगभस्म वगैरे अवस्था व दोषानुरूप वापरली होती. सामान्य गळवांवर मात्र काम देत नाहीं असा अनुभव आहे. जितसायेचा प्रसूतिज्वरांतील गर्भाशय दुष्टिसाठीं काढा करून तिचा उत्तरबस्तीसाठीं उपयोग केल्याचें व फायदा झाल्याचें श्री. वैद्यराज वागेवाडीकरशास्त्री यांनीं भिषग्विलासमध्यें मागें लिहिलें होतें."

—वैद्य र. गो. कुळकर्णी

तो विचित्र रोग

गेल्या वर्ष-दीडवर्षभर पुणें-अहमदनगर भागा[त] एका विचित्र रोगांचा फैलाव झाला आहे. रोग्या[स] तहान लागते, भूक मंदावते व हळुहळू रोगी क्षी[ण] होत जातो. या रोगाचें निदान करण्याचा य[त्न] ॲलोपॅथिक डॉक्टर्स, वैद्य वगैरेंनीं व्यक्तिशः व सा[मु]दायिकरीत्या केला. पण अजून निश्चित असें निदा[न] झालेलें नाहीं.

ता. २८ रोजीं या रोगावर पुणें येथील स्थानि[क] डॉक्टरच्या असोसिएशनमध्यें चर्चा झाली

डॉ. चंद्रचूड यांनीं अशा अनेक रोग्यांस ससून हॉस्पिटलमध्यें उपचार केलेले असून त्यांच्या मतें "रोगी जें पाणी पितो अगर अन्न खातो त्यां[त] कांहीं सत्वांश कमी असल्यामुळें हा रोग होत असा[वा] हा साथीचा रोग नाहीं असें प्रयोगान्तीं सिद्ध झा[लें] आहे. एका खेडयांतील कांहीं ठराविक कुटुंबांतच [या] रोगाचा प्रादुर्भाव झालेला आढळला, इतर खेड्यांत त्याची बाधा झालेली नव्हती. कुटुंबांतील सर्व मंडळी रोगानें पछाडली नव्हती. हा रोग व्हायरस् फंगस् अगर बॅक्टेरिअल स्वरूपाचाहि नाहीं."

मुंबई राज्याच्या सार्वजनिक आरोग्यखात्याचे मुख्य डॉ. विश्वनाथन यांच्या मतें हा रोग सांथी[]च्याच प्रकाराचा आहे. पण त्यांचा उद्भव कसा होतो याचा पत्ता लागलेला नाहीं. जुनी बाजरी खाल्ल्यानें हा रोग होतो ही समज चूक आहे. आहारांत बद[ल] केल्याने रोग बरा होतो असा अनुभव आहे. वैद्यी[] या रोगाबाबत संशोधन करीत आहेत असें ते म्हणाले.

(या विकाराच्या आयुर्वेदीय चिकित्सेसंबंधी हाती आलेली अधिकृत माहिती लौकरच प्रसि[द्ध] करण्यांत येणार आहे. —संपादक)

पवित्र

नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,

लिहा:–नेपाल हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३१२०००।२००१ नेपाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नि. भा. आयुर्वेद शास्त्रचर्चा-परिषद्

सम्मानीय वैद्यबन्धु वर्ग !

निखिल भारतीय-आयुर्वेद-शास्त्रचर्चा-परिषद् का आगामी अधिवेशन २० मई १९५३ से भारत के सुप्रसिद्ध नगर हरद्वार में प्रारंभ होना निश्चित हुआ है। इस अधिवेशन में समस्त भारत के प्रसिद्ध आयुर्वेद-विशेषज्ञ सम्मिलित होकर समालोच्य विषय "द्रव्य के रस-गुण वीर्य-विपाक प्रभाव के निर्णय का स्वरूप क्या है ?" पर विवेचनपूर्वक समुचित निर्णय करेंगे। जिससें कि सदियों से अवरुद्ध आयुर्वेद-विज्ञान की प्रगति का मार्ग प्रशस्त होगा।

अतः सभी आयुर्वेद-विशेषज्ञों में सानुरोध विनम्र निवेदन है कि इस महत्त्वपूर्ण अधिवेशन में सम्मिलित होकर आयुर्वेद-विज्ञान की प्रगति के निमित्त किये जाने वाले इस पुनीत ज्ञान-यज्ञ में योगदान देने का अनुग्रह करें।

जिन आयुर्वेद-विशेषज्ञों के निबन्धों को समालोच्य विषय निबन्ध-निर्णायक-समिति विवेचनयोग्य समझेगी उन महानुभावों की सेवा में परिषद् की ओर से विशेष निमन्त्रणपत्र भेजा जाएगा तथा उनके निवासस्थान और भोजन-व्यवस्था का प्रबन्ध श्री वैद्यनाथ आयुर्वेद भवन लि. के द्रव्य-व्यय से किया जायगा। अन्य जो महानुभाव दर्शक रूप में सम्मिलित होना चाहें वे अपने खर्चे से निवासस्थान और भोजन व्यवस्था का प्रबन्ध करा सकता हैं।

इस विषय में अध्यक्ष- "प्रबन्ध नियोजन समिति" से पत्रव्यवहार कर उचित व्यवस्था की जानकारी प्राप्त की जा सकती है।

विनम्र निवेदक

वैद्यराज पं. रामनारायण शर्मा वैद्य शास्त्री
अध्यक्ष-प्रबन्ध नियोजन समिति
नि. भा. आ. शास्त्रचर्चा-परिषद्
C/o श्री. वैद्यनाथ आयुर्वेद भवन लि.
गुसाई पुरा, झाँसी (उ. प्र.)

कै. वैद्यगुरु द. कृ. भारद्वाज

बंगलोर येथील वैद्यगुरु दत्तात्रेय कृष्ण भारद्वाज हे ता. २२ फेब्रुआरी रोजीं सकाळीं ८ वाजतां स्वर्गवासी झाले. त्याच्या मागें त्यांची पत्नी ५ मुलगे ३ मुली व मोठा नातेवाईक व मित्रांचा परिवार आहे. त्याचे चिरंजीव विश्वासराव हे वैद्य-विशारद आहेत. त्यांचा पत्ता ७६।२ गांधी-बाजार बंगलोर ४ असा आहे.



(पं. तारानाथजींचे कर्तबगार शिष्य)

वैद्यगुरु डी. के. भारद्वाज हे १८ व्या कर्नाटक आयुर्वेद संमेलनाचे अध्यक्ष होते. हें संमेलन विजापूर येथें भरलें होतें. तुंगभद्रा येथील प्रेमविद्यापीठाच्या पं. तारानाथजीच्या शिष्यवर्गापैकीं ते एक कर्तबगार शिष्य होते. मृत्यूपूर्वी २ महिने त्यांना आमाशयो-क्लेशाचा त्रास होत होता.

आरोग्य मार्गप्रदीप (मराठी)
[आवृत्ति २ री]
लेखकः - श्री. गो. म. चिपळूणकर, एम्.ए.
किंमत ३ रु., ट. ख. वेगळा
-: वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक :-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रांत वैद्य मंडळाचे सन १९५३ चे सभासद

(पूर्वी प्रसिद्ध झालेल्या यादीवरून पुढें चालू)

मराठवाडा [हैद्राबाद]

रामप्रसाद शिवनारायण भूतडा, शंकरराव लक्ष्मण देशपांडे, शंकरदेव गोपाळ पाठक, गोपाळ शंकर देव, रघुनाथ कृष्ण केसकर, सौ. कृष्णाबाई र. केसकर, सदाशिव त्र्यंबक गोडशे.

न. म. केतकर, वासुदेव बळवंत दिवेकर, कमलाबाई शंकर बागाईतकर, अंबादासराव भानुदासराव जोशी, जे. डी. मोरे, शंकर बळवंत दिवेकर, मिसेस चतुरबाई मनोरंजन कोठारी, व्ही. आर. अंदूरकर, सदाशिव बाळकृष्ण जोशी,

काशीनाथ जिवणाजी निराळे, लक्ष्मणराव तुकारामराव कुर्तडीकर, भगवानराव अंबादास खिस्ते, गंगाधर मोहनीराज गाजरे, ए. एस्. ए. घोराजीवाला, गणपत त्र्यंबक बंडेकर, लक्ष्मणपुरी गणेशपुरी गोसावी, गुंडेराव मुकुंदराव कुलकर्णी, ब्रिजमोहनजी शर्मा.

रामराव साकळकर, दत्तात्रय व्यंकटेश आगलावे, नागोराव निरंजन निराळी, लक्ष्मण विठोबा कोमलवार, दत्तात्रेय गंगाराम कडतन, गणपतराव बापुराव भागानगरे, सायन्ना लिंगुजी अळगुंडे, केशव गोविंद देव, प्रभाकर वामनराव जोशी, व्ही. आर. कोराटे, दिनकर लक्ष्मण भंडारी, भगवानशास्त्री माधवशास्त्री खेडकर, संतुकराव आठे, सूर्यकांतरावशास्त्री, एन्. जी. नागोरी, कि. भ. पारठाणकर, नागोराव के. पत्की, श्रीकृष्ण दामोदर गोडबोले, रामकृष्ण वासुदेव गोडबोले.

नगर जिल्हा

रा. गो. जोग.

सोलापूर जिल्हा

गोपाळ जनार्दन दिवाणजी, विनायक महादेव, गोगटे, स्वा. ह. ग्रामोपाध्ये, एस्. जी. बाबानगरे, मोदगी,

बृहन् मुंबई

के. ए. पराडकर, केशरीनाथ सापळे, यू. एल. सावंत, गोविंदप्रसाद लालजी गुप्ता, वामन दिनानाथ बऱ्हाणपूरकर, रामभरोसे उपाध्याय.

रत्नागिरी जिल्हा

वैद्य न. ग. सांतवळेकर, पु. ग. सांतवळेकर, हकीमशेख महमुद सुलेमान, तु. पां. नार्वेकर, परशु हरिश्चंद्र भाऊ, ल. वा. करंबेळकर, सावळाराम रामचंद्र हजारी, नरहरी विश्वनाथ काजेरकर, रघुनाथ अनंत नागवेकर, भास्कर कृष्णाजी आपटे, केशव सिताराम कुलकर्णी, बाळकृष्ण महादेव कडूलकर, सावळाराम रामचंद्र आचरेकर, श्रीकृष्ण गणेश करंबेळकर, आप्पाजी बाबूजी कांबळी, वसंत बाबुराव हर्षे, पी. एम्. भोसले, सौ. प्रतिभा पांडुरंग भोसले, आत्माराम गोपाळ पारकर, सौ. सावित्रीबाई आत्माराम पारकर, भालचंद्र शिवराम करंबेळकर, मोरेश्वर महादेव भांडारकर, पुरुषोत्तम भिकाजी जोशी, रामचंद्र परशुराम अभ्यंकर, पांडुरंग महादेव भिडे, श्रीराम वासुदेव कानिटकर, माधव वासुदेव जोशी, बापुजी विष्णु जोगळेकर, विनायक भिकाजी चिटणीस, स. ग. मालशे, कृ. य. शिरगांवकर, बाळकृष्ण परशुराम खानोलकर, प्रभाकर भास्कर पाध्ये, हिराबाई वेडणेकर, विष्णु रामचंद्र शेवडे, प्रभाकर दामोदर शौचे, राजाराम भालचंद्र करंबेळकर, गजानन भालचंद्र करंबेळकर, गोविंद गणेश सप्रे, अच्युत बाळकृष्ण पाध्ये, सखाराम मोरेश्वर पेंडसे, नारायण वामन पुरोहित, सिताराम त्र्यंबक चितळे, श्रीकृष्ण पांडुरंग बापट, नारायण विठ्ठल मालवणकर, जगज्जीवन राजाराम झांट्ये, सदानंद सदाशिव वझे, दिनकर कृष्णा मराठे, जी. के. केळकर, द. कृ. केळकर, काशीराम बाळकृष्ण खानोलकर, डी. व्ही. परुळकर, ज. ना. कशाळीकर, गं. आ. घाटकर, र. कृ. बिवलकर, ब. श्री. गणपत्ये, शेख ए. आर. जी. रेडकर, कृष्णराव निगळ्ये, बाळकृष्ण सिताराम राणे, विष्णु पांडुरंग माणगांवकर, प्रभाकर श्रीपाद गणपत्ये.

सातारा जिल्हा

रामचंद्र सिताराम शिंदे, ग. कृ. पाटणकर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठाणे जिल्हा

वै. सं. वोंद्रे, श्री. ग. वहुतुले, पु. रा. वेल्हे, प्रा. विचारे, श्री. वा. सांडू, ए. म. चाफेकर, श्री. सांडू, गो. कृ. सांडू, शं. वा. सांडू, एच. डी. क्षेमघे.

बेळगांव जिल्हा

वामन नृसिंह ग्रामोपाध्ये, नागप्पा फल्लप्पा, सौ. पुष्पा माधव ठकार, चंदो हणमंत कुलकर्णी, र. द. नाईक, पां. शि. काजरेकर, व्य. उचगांवकर, स. वि. केतकर, इंदिराबाई खाडे, वि खाडिलकर, म. भा. वाटवे, बी. आर. व्यास, गो. करंबेळकर, रा. प. चौगुले, गो. रं. गाडगीळ, लक्ष्मीबाई सोहनी, आर. एस. पराडकर, व्ही. एच. सहस्त्रबुद्धे, र. गो. गाडगीळ, काशिनाथ चिंतामण दांडेकर.

गटारांचें पाणी नदींत

भारतांत बहुधा सर्वत्र गटारांचें पाणी नदींत सोडून दिलेलें आढळतें. गांवें पाणी, असेल तेथें (म्हणून नदीकांठीं) वसतात व गावाचे सर्व उत्सर्ग नदींत जातात. यामुळें रोगराई पसरते व उत्तम खत वाया जाते —समुद्रास्तृप्यंतु होते.

व मग 'जीवनसत्वासाठीं मासे खा' असें आर्जवून सांगण्याची पाळी येते.

त्याऐवजीं गांवाबाहेर नेलेलें तें पाणी लिफ्ट-इरीगेशन पद्धतीनें वर चढवून शेतांना दिलें तर कितीतरी चांगलें खतपाणी शेतीला मिळेल.

पंढरपूरच्या पवित्र भीमानदींतहि असेंच गटारांचें पाणी सोडलेलें आहे.

बृहन्मुंबई वैद्य संमेलन

मुंबई येथें आचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखालीं बृहन्मुंबई जिल्हा वैद्य संमेलन ता. २७।३।५३ रोजीं भरणार आहे. आरोग्यमंत्री श्री. शांतिलाल शहा हे या परिषदेचें उद्घाटन करणार आहेत.

वाचकांचा पत्रव्यवहार

योषा पुरंध्रिः।

आयुर्वेद पत्रिकेच्या १६ फेब्रुवारी १९५३ च्या अंकांत पान ५१४ वर 'नगरपालिका हें महिलांचें क्षेत्र' हें श्रीमती सौ. दुर्गाबाई देशमुख यांचें मत प्रगट झालें आहे. वैदिक मत सुद्धां असेंच आहे. यजुर्वेद २२।२२ मध्यें 'आब्रह्मन् ब्राह्मणः' इत्यादि प्रसिद्ध मंत्रद्वारा आदर्श राष्ट्राची वैदिक कल्पना प्रगट झाली आहे. यामध्यें, स्त्रियांच्यासाठीं योषा पुरन्ध्रिः। हें पद आलें आहे.

याचा अर्थ असा कीं आमच्या राष्ट्रांत स्त्रिया शहर व ग्राम यांचें धारण-पोषण करणाऱ्या आहेत. यामध्यें आलेला 'ध्रा' धातूचा संस्कृतमध्यें अर्थ धारण (संरक्षण) व पोषण या अर्थीं संस्कृत व्याकरणांत प्रसिद्ध आहे.

वाचकांनीं या गोष्टीवर विशेष विचार करावा.

—वैद्य रणजितराव

वैद्य का. भि. सोनार अंमळनेर

अंमळनेर येथील म्युनिसिपल निवडणुकीस वैद्य कालिदास भिकाजी सोनार वार्ड नं. ४ मध्यें उभे राहिले होते; ते निवडून आले आहेत हें कळविण्यास आनंद वाटतो.

छोटीं वैद्यकीय पुस्तकें

खेड्यांतील दवाखाना	०-६-०
आरोग्याचीं प्रश्नोत्तरें	०-६-०
बालसंगोपन, बाळकडू	०-६-०
घरगुती औषधोपचार	०-४-०
अनुभविक चिकित्सा	१-०-०
उपयुक्त ॲलोपॅथिक औषधें	१-८-०

वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म. प्रां. वैद्य मंडळ
दक्षिण महाराष्ट्रांतील दौरा

म. प्रां. वैद्य मंडळाचे अध्यक्ष वैद्य बिंदुमाधवशास्त्री पंडित हे मार्चच्या अखेरीस दक्षिण महाराष्ट्रांत दौऱ्यावर जाणार आहेत. ता. २७ रोजीं नाशिकहून निघतील. ता. २८ रोजीं त्याचा मुक्काम पुणें येथें (वै. पां. ह. देशपांडे ६३७ शुक्रवार पेठ, पुणें) असेल. त्या २८ रोजीं रात्रीं ते सांगलीस जाण्यास निघतील. व सकाळीं सांगलीस पोहोचतील.

ता. २९ रोजीं सांगली येथें दक्षिण सातारा वैद्य संमेलनाचें कामकाज पुरें करून ता ३० रोजीं त्यांचा मुक्काम कोल्हापूर येथें (वै. गणपतराव गुणे) यांच्याकडे राहील. ता. ३१ रोजीं ते बेळगांव येथें (वैद्य म. भा. वाटवे) असतील.ता. १ रोजीं हुबळी मार्गे ते शिर्शी येथें ता. २ रोजीं वै. ग. नी. पटवर्धन आयुर्वेदतीर्थ यांच्याकडे जातील. हा भाग वेलदोडे वगैरे सुगंधी वनस्पतीसाठीं प्रसिद्ध आहे. त्या मळ्यांचें निरीक्षण अध्यक्ष करतील. त्यानंतर शक्य तर गोव्यांत जाऊन तेथील वैद्यमंडळींना भेटण्याचा व महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचा प्रचार तेथें करण्याचा त्यांचा विचार आहे.

परत येतांना वेळ सांपडल्यास ते कऱ्हाड (वै. गजाननशास्त्री आयुर्वेदाचार्य)व सातारा येथें (वै.म.वा. दीक्षित, आयुर्वेदाचार्य) मुक्काम करतील. त्या त्या ठिकाणच्या आजूबाजूच्या वैद्य व आयुर्वेदप्रेमी मंडळींनीं अध्यक्षांची भेट घेऊन दौऱ्याच्या कार्यक्रम यशस्वी करावा अशी विनति आहे.

अध्यक्षांना भेटूं इच्छिणाऱ्या व्यक्तींनीं कार्यालयाशीं अगर त्या त्या गांवच्या वैद्यांशीं पत्रव्यवहार केल्यास त्यांना भेटीची नक्की वेळ व स्थान कळूं शकेल.

म. प्रां. वैद्य मंडळ नाशिक } वै. वि. म गोगटे मंत्री

मध्यवर्ति आरोग्य मंडळ
(सेंट्रल हेल्थ कौन्सिल)

"राष्ट्राचें आरोग्य — विशेषतः त्यांतील बालकांचें व तरुणतरुणींचें आरोग्य हें एक मोठें भांडवल आहे, त्याचें संगोपन, संवर्धन करण्यासाठींच आपण तुम्ही व मी येथें जमलो आहात." या शब्दांत आरोग्यमंत्री अमृतकुंवर यांनीं हैद्राबाद येथें वरील संस्थेच्या प्रथम बैठकीचें उद्घाटन केलें.

या सभेसाठीं भारतांतील सर्व राज्यांचे आरोग्यमंत्री व प्रमुख आरोग्याधिकारी आले होते. मुंबईचे आरोग्यमंत्री श्री. शांतिलाल शहा व सर्जन जनरल डॉ. दाक्षित उपस्थित होते. सौराष्ट्राचे मंत्री दयाशंकर दवे व आयुर्वेदिक डायरेक्टर वैद्य वासुदेव द्विवेदी हजर होते.

या सभेसाठीं इंडियन मेडिकल असोसियेशनचे प्रधानमंत्री यांना आमंत्रण दिलें होतें व ते हजर होते. मात्र अ. भा. आयुर्वेद महामंडळाच्या प्रतिनिधीस आमंत्रण नव्हतें.

या सभेंत ज्या प्रश्नांचा विचार झाला त्यांत एक प्रश्न होता तो असा:— " भारतांतील सर्व राज्यांत आयुर्वेदासाठीं फक्त पदवीप्रद अभ्यासक्रमच ठेवावा व त्यासाठीं प्रवेश इंटरसायन्स (बी ग्रुप) हाच असावा" हा ठराव डॉक्टर मंडळींनीं आणला होता व तो पास करण्याचा आग्रह चालला होता.

या ठरावास एका राज्याच्या आरोग्यमंत्र्यांनीं विरोध केला व अशा प्रकारचें बंधन स्वीकारण्याची परवानगी आपल्या मंत्रीमंडळाकडून आपणास मिळालेली नाहीं, असें सांगितलें. जर सेंट्रल हेल्थ कौन्सिलनें अशा प्रकारचा ठराव केलाच तर त्याचा अंमल आपल्या राज्यांत होईल अशी खात्री देतां येत नाहीं.

आरोग्यमंत्र्याच्या या जोरदार विरोधामुळें तो प्रश्न अनिर्णीतच राहिला. पुढच्या बैठकींत हा प्रश्न पुनः येण्याचा संभव आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय औषधोपयोगी द्रव्यावरील आयात जकात कमी करा

आम जनतेच्या हितासाठीं पेनिसिलिन वगैरे ॲलोपॅथिक औषधावरील आयात कर नव्या अर्थसंकल्पांत कमी केल्याबद्दल भारत सरकारच्या अर्थमंत्र्यांचें हे मंडळ अभिनंदन करीत आहे त्याचप्रमाणें आयुर्वेदीय औषधीकरणासाठीं लागणाऱ्या पुढील वस्तूंवरील आयात करहि कमी करावेत अशी या मंडळाची अर्थमंत्र्यांना विनंति आहे.

या वस्तु महाग मिळत असल्यामुळें आयुर्वेदीय औषधी कारखाने व वैद्य यांना त्यापासून तयार होणारीं औषधें महाग पडतात व जनतेला तीं त्यांच्या आरोग्यासाठीं योग्य प्रमाणांत वापरणें आज शक्य होत नाहीं. सबब जनतेच्या हितासाठीं ही [illegible] डयूटी कमी होणें अवश्य आहे असें या नाशिक शहर वैद्य मंडळाचें मत आहे.

आयात करामुळें महाग झालेल्या कांहीं वस्तु खालीलप्रमाणें आहेत.:- लवंग, जायफळ, मिरे, वेलची, दालचिनी, गव्हला, वंशलोचन, पारा, हिंगूळ, प्रवाळ-[illegible], गंधक.

वैद्य व औषधी कारखाने यांना नियंत्रित दरानें या वस्तु मिळतील अशी व्यवस्था सरकारनें केली पाहिजे अशा आशयाचें इंग्रजी पत्रक, नाशिक शहर वैद्य मंडळातर्फे अध्यक्ष वैद्य विष्णुशास्त्री दाते व [illegible] खोलेडे व व. ना. रानडे यांनीं छापून तें भारताच्या पार्लमेंटचे प्रमुख सभासद, अर्थमंत्री, व देशांतील प्रमुख वृत्तपत्रें याजकडे पाठविलें आहे. असें कळतें.

आयुर्वेद विद्यालयातील अध्यापन

एक वैद्य, अध्यापक लिहितात:- "मला येथें [illegible], द्रव्यगुणशास्त्र, स्वस्थवृत्त व कौमारभृत्य हे विषय शिकवावे लागतात; शिवाय रुग्णालयांत [illegible] डयूटी १२ तास व औट डोअर डयूटी २ तास असते. त्यामुळें वाचावयाला व विचार करा-[illegible] वेळच मिळत नाहीं."

अनुक्रमणिका

'त्यांची रुचि बदला' -राधाकृष्णन् ५६५
दक्षिण सातारा जिल्हा वैद्य संमेलन, सांगली ५६६
वाग्भटावरील उद्बोधक व्याख्यानें ५६७
कफज्वरावर निर्गुंडीचा काढा ५७०
पुनर्नोंदणीं फी कां बसविली गेली? ५७१
प्रत्यग्रधातुत्व म्हणजे काय? ५७४
अनुभविक चिकित्सा प्रकरण १० वें ५७५
मनुष्याला व्यसनें कां जडतात? ५८३
डाल्डा वनस्पतीचें पोषणमूल्य ५८४
एन्‌लिस्टेड वैद्यांना प्रमाणपत्रें मिळणार ५८५
पदेस्मारक समिति ५८६
लातूर संमेलनाचें अध्यक्षपद ५८७
४० वर्षांचा अनुभव सरकारला देण्यास तयार ५८९
अ. भा. आयुर्वेद शास्त्रचर्चा परिषद ५९१
म. प्रां. वैद्यमंडळाचे १९५३ चे सभासद २९२
म. प्रां. वैद्यमंडळ अध्यक्षांचा दौरा ५९४

संशोधन कार्याची प्रगति

डॉ. म्हसकर ज्या समितीचे अध्यक्ष आहेत त्या आयुर्वेद संशोधन समितीतर्फे दोन पुस्तकें लिहून तयार झालीं आहेत, असा समाचार आला आहे.

शारीर या विषयावरील पुस्तकाचे लेखक वैद्य गणेश विश्वनाथ पुरोहित आयुर्विद्याविशारद (पुणें) हे आहेत. या पुस्तकांत आयुर्वेदांतील या विषया-संबंधीचे मूळ संस्कृत श्लोक व त्यावरील इंग्रजी भाषान्तर इ. विषय आहे.

पदार्थ विज्ञानाचे लेखक

पदार्थविज्ञान हें पुस्तक श्री. चिं. ग. काशीकर वाङ्‌मयपारंगत (पुणें) यांनीं लिहिलें आहे. हे गृहस्थ अवैद्य आहेत. या पुस्तकांत आयुर्वेदांतील पदार्थविज्ञानविषयक संस्कृत वचनें व त्यावरील लेखकानें संस्कृतांत लिहिलेली टीका देण्यांत आली आहे, असें कळतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अमृत



इंग्रजींतील 'रीडर्स डायजेस्ट'च्या धर्तीवर
चालविलेलें एक नाविन्यपूर्ण मराठी मासिक

महाराष्ट्रांतील अनेक नामवंत वृत्तपत्रांनीं आणि व्यक्तींनीं प्रशंसा केलेलें 'अमृत' हें मासिक महाराष्ट्राचें भूषण ठरणार आहे. मराठींतील धंदेवाईक मासिकांपेक्षां हें सर्वस्वी भिन्न आहे. ज्ञान व मनोरंजन हें या मासिकाचें ब्रीद आहे. सुबक छपाई, आकर्षक मथळे आणि सुंदर चित्रें हीं 'अमृत'चीं खास वैशिष्ट्यें आहेत. विविध विषयांचें सारभूत ज्ञान मिळविण्याचें अमृत हें उत्कृष्ट साधन आहे. [वार्षिक वर्गणी रु. १०]

अमृत कार्यालय ७९७ रविवार पेठ, नासिक

कारखान्याच्या फायद्याचा उपयोग

संशोधन-कार्याकडे करण्याची नवी कल्पना

"नासिक येथील आयुर्वेद सेवा संघाचा औषधी तयार करण्याचा कारखाना ता. १७।२।५३ रोजीं पाहिला. या कारखान्याचे एक वैशिष्ट्य म्हणजे तो खाजगी मालकीचा किंवा भागिदारांच्या मालकीचा नसून त्यांत होणारा फायदा आयुर्वेदाचें शिक्षण व संशोधन कार्याकडे लाविला जातो हें होय.

अशा रीतीनें कारखान्याच्या फायद्याचा संशोधन कार्याकडे उपयोग करण्याची कल्पना नवी आहे. हा सेवा संघाचा उद्देश सफल होवो व या निधीतून आयुर्वेदाच्या संशोधनास चालना मिळो हीच इच्छा आहे." डॉ. एस. पी. आघारकर

एम्. ए. पीएच्. डी., एफ्. एल्. एस्.; एफ्. एन्. आय्.

डायरेक्टर महाराष्ट्र असोसिएशन फॉर दि कल्टिव्हेशन ऑफ सायन्स, पुणें ४

संपादक व प्रकाशकः— वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक
मुद्रकः— श्री. दामोदर महादेव चन्द्रात्रे, विज्ञान प्रेस, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ६ वें) नाशिक, ता. १ एप्रिल १९५३ (अंक १९ वा

आचार्य विनोबाजींचा आहार, विहार व आराम

आचार्य विनोबाजी भावे हे आहार–विहारासंबंधीं प्रयोग नेहमीं करीत असतात. सध्यां ते भूदानयज्ञासाठीं पायीं यात्रा बिहार प्रांतांत करीत आहेत. मध्यंतरीं ते कांहीं दिवस विषमज्वरानें आजारी होते. व त्यांची पचनशक्ति बरोबर नव्हती. वजन ७८॥ पौंड झालें होतें. त्यानंतर जानेवारी महिन्यांत ॥ पौंड वजन वाढलें. फेब्रुआरी महिन्यांत त्यांची पचनशक्ति विशेष सुधारली व १७ दिवसांत ५॥। पौंड वजन वाढलें. सध्या त्यांचें वजन ८९॥। पौंड आहे.



आचार्य विनोबाजी भावे

त्यांचा अलीकडील आहार पुढीलप्रमाणें आहे:—

पहाटे ५। वाजतां— प्रार्थना;

नंतर ३२ तोळे दही + २ तोळे मध

सकाळीं ८ वाजतां—

संत्र्याचा रस ३० तोळे + २ तोळे मध.

सकाळीं १० वाजतां—

नरम खिचडी (३ तोळे तांदुळ+२ तोळे डाळ मुगाची) त्याबरोबर तूप १॥ तोळा, भाजीचें कढण १० तोळे व लिंबाचें लोणचें १ तोळा.

दुपारीं १ वाजतां— डाळिंबाचा रस ३० तोळे + २ तोळे मध.

दुपारीं ३॥ वाजतां-- दही ३२ तोळे + २ तोळे मध.

सायंकाळीं ६ वाजतां-- मऊमऊ खिचडी (३ तोळे तांदूळ + २ तोळे मुगाची डाळ), तूप २ तोळे, दूध १० तोळे.

या आहाराची एकूण उष्णता २००० कॅलरी होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विहार—सकाळीं ६ पासून ७-४० पर्यंत मोकळ्या हवेंत येणेंजाणें ५। मैल. दुपारीं व रात्रीं निवासस्थानींच १०-१५ मिनिटें सहल. (ज्या वेळीं तें एकाच मुक्कामीं होतें त्यावेळचें हें वर्णन दिसतें)

मालिश—सकाळीं स्नानापूर्वी अर्धातास हलक्या हातानें मालीश.

निद्रा—रात्रीं सुमारें ६ तास झोप.

विश्रांति—दिवसा जेवणानंतर १॥ तास विसांवा.

वर आचार्य विनोबाजींचा आहारविहार दिला आहे. त्यांतील कांहीं वैशिष्ट्यें पुढीलप्रमाणें आहेत:-

१) पहाटे वातकालीं ते वातदोषशामक दही घेतात.

२) संबंध दिवसाच्या आहारांत ते मधुर द्रव्य म्हणून मध वापरतात.

३) तांदूळ नुसता न खातां संस्कृत करून खातात.

४) लिंबाच्या कडु सुगंधी ज्वरघ्न सालीचा उपयोग लोणच्याच्या रूपानें होतो.

५) 'नित्य अभ्यंग करावा' या सूत्राचें पालन करतात.

६) निद्रेचें प्रमाण (६ तास) तमोदोषवर्धक नाहीं.

मुंबईत आयुर्वेद प्रचार

शनिवार ता. २१ रोजीं रात्रीं ९॥ वाजतां हाजी कासम चाळीमध्यें चाळ कमेटी तर्फे म. प्रां. वैद्य मंडळांचे अध्यक्ष वैद्य बिंदुमाधव पंडित यांचें 'आपले आरोग्य व आयुर्वेद' या विषयांवर व्याख्यान झालें.

रविवारीं सकाळीं व सायंकाळी अध्यक्ष मुंबई व उपनगर वैद्य संमेलनाच्या बैठकीस उपस्थित होते.

रविवारीं रात्रीं त्यांना निखिल भारतीय आयुर्वेद महा मंडळाचे अध्यक्ष शिवशर्मा यांनीं आपल्या घरीं भोजनास नेले व चालू परिस्थितीवर चर्चा केली.

त्याच रात्रीं १०॥ वाजतां लालबाग येथें पेरूची चाळ कमिटीतर्फे त्यांचें सत्यं शिव सुंदरम्। या विषयावर सत्यनारायण समारंभांत व्याख्यान झालें. व्याख्यात्यांनीं यावेळीं निरोगी स्त्री पुरुष व मुलें यांनीं रोग होण्यापूर्वीच दोष नाशक औषधें घेण्याची आवश्यकता प्रतिपादन केली.

अमृतकौर आयुर्वेद संशोधन भवन

ता. २२ डिसेंबर रोजीं राजकुमारी अमृतकौर यांनी ज्याचा पाया घातला त्या इमारतीचे काम चालू आहे. लौकरच त्याच्या दोन खोल्या बांधून तयार होतील व त्यांत कार्यास प्रारंभ होईल.

प्रसिद्ध पहिलवानाचा आहार

मुंबई येथें कुस्तीसाठीं आलेल्या किंगकांग नांवाच्या प्रसिद्ध हंगेरियन मल्लाचा आहार पुढीलप्रमाणें आहे.

सकाळीं— मीठमिरी घालून ३६ अंडी

दुपारीं— ६ कोंबड्या व १ रत्तल लोणी. व ५।६ पौंड फळें.

तिसऱ्या प्रहरीं— फळांचा रस २ पौंड.

रात्रीं— ३ बदकें व २ रत्तल फळें.

सबंध दिवसांत मिळून १ गॅलन (५ शेर) दूध.

म. प्रां. वैद्य मंडळ

लातूर अधिवेशनाच्या तारखा

लातूर येथें होणाऱ्या महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाच्या अधिवेशनाच्या तारखा २४ व २५ या निश्चित झाल्या आहेत.

म. प्रां. वैद्य मंडळाच्या सभासदांकडे लवकरच पत्रे रवाना होतील. त्या पत्रासोबत असणाऱ्या जोड कार्डावर अध्यक्षपदाकरितां प्रत्येक सभासदानें ती नांवे त्यांच्या पत्त्यासह सुचवावीत.

वि. म. गोगटे
मंत्री म. प्रां. वैद्य मंडळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वृंदमाधवचिकित्सेंतील शंकास्थलें

(लेखकः- वैद्य हरीशास्त्री ताटके)

कोणत्याहि शास्त्राच्या अभ्यासकांनीं त्या त्या शास्त्रावरील शक्य त्या उपलब्ध ग्रंथांचें चिंतनपूर्वक वाचन केल्यावांचून त्या शास्त्राच्या ऋणांतून त्यांची सुटका होत नाहीं. भारतीय आरोग्याचा प्रश्न कांहीं प्रमाणानें आर्य वैद्यकाला पूर्णपणें सोडविणें प्राप्त आहे. त्यासाठीं प्रत्येक आयुर्वेदाभ्यासीयानें बद्धपरिकर होऊन या शास्त्राचा विशालपगा व त्या शास्त्रांतील अपरिचित वा अपरिचित स्थलें शोधून काढून आतांच्या समाजाला परिचित करून घेतलीं पाहिजेत. त्यासाठीं अनेक ग्रंथांचें परिशीलन होऊन, परिशीलनाप्रमाणें अनेक विषय निराळा झाला पाहिजे.

अडचणी आणि अज्ञान

हें कार्य १।२ माणसांच्याकडून होणार नाहीं. एकदोगांवीं अभ्यासमंडळेंहि निघणें शक्य नाहीं. याकरितां प्रत्येक अभ्यासकानें स्वतः निरनिराळे ग्रंथ अभ्यासून त्यांत दिसणाऱ्या अडचणी, त्यांतील द्रव्यांविषयीं दिसणारा अज्ञातपणा विचारवंतासमोर ठेवावा. 'वृंदमाधव' ग्रंथ वाचीत असतां मला जें जें असें कांहीं अडलें व उलगडलें नाहीं तें विद्वान् वाचकांसमोर ठेवण्याचा चिकित्साक्रमवार उपक्रम करीत आहे.

ज्वरहरं औषधं अनुलोमनीयम् ।

१ ज्वरातिसार चिकित्सेच्या-प्रारंभी टीकाकारानें 'प्रायेण ज्वरहरं औषधं अनुलोमनीयम् ॥ असें लिहिलें आहे. औषधाचें अनुलोमनीयत्व कसें ठरवावयाचें। अनुलोमनत्वाचें उदाहरण टीकाकारानें दिलेलें नाहीं. अनुलोमन म्हणजे 'रेचनद्वारा ज्वरदोषहरण करणारी औषधी' असा वरील वाक्याचा अर्थ समजावयाचा काय?

तगरपालिका, शीयली छोड

२ ज्वरचिकित्सेंत पानीयकल्याणघृताच्या पाठामध्ये स्थिरा नतं हरिद्रे सारिवे द्वे इत्यादि, यांत 'नतं' या पदावर टीकाकारांनीं तगरपादिका, असा अर्थ सुचविला आहे. याचा अर्थ 'तगराच्या मुळ्या, का? कारण याच्या अभावीं (तदभावे शीयली छोडः) शीयली छोड घ्यावा असा प्रतिनिधी सुचविला आहे. 'शीयली छोड' हा संस्कृत भाषेंतला शब्द दिसत नाहीं. मग हा शीयली छोड कोणत्या भाषेतला व याचा अर्थ काय? जें द्रव्य सार्वत्रिक मिळतें, त्याचा प्रतिनिधि सुचविण्याची आवश्यकता नसते. यामुळें या द्रव्याविषयीं शंका उत्पन्न होते.

सुतप्तकुप्यक्वथित

३ अतिसारांतर्गत प्रवाहिका चि. श्लो ६९ दध्ना ससारेण, इत्यादि या श्लोकांत 'सुतप्तकुप्य क्वथित, हें पद आहे. या पदावर टीकाकारानें उधृत केलेले मतांत 'केचित् कुप्यस्थाने कुप्यां पठंति। कुप्या पाषाणभेदो दक्षिणापथे ख्यातः चंद्रमुद्राकृति रसरसायने प्रयुज्यते ॥ एतदप्रसिद्धम्। टीकालेखकाला हें द्रव्य ऐकून माहित होतें; पण साधनाभावीं स्पष्टीकरण करतां आलें नाहीं. आजच्या वैज्ञानिकाला याचा शोध सहजसुलभ आहे.

उत्पलकोंटिका

ग्रहणी चिकित्सा-बालचांगेरी घृतांत मोचरसिंधूत्पल व्योष लज्जा- या पाठांत उत्पलपदावरील टीकेंत उत्पलउत्पलकोंटिका असा पर्याय सुचविला आहे. कोष्ट किंवा उत्पल यांच्या नामपर्यायांत हें पद आढळत नाहीं. उत्पल कोंटिका हें द्रव्य कोणतें?

वराहक्रांता, गजपिंपळी

'लज्जा' पदावर 'वराहक्रांता' असा पर्याय टीकेंत आहे. लाजाळूस २७ पर्याय आहेत. त्यांत वराहक्रांता नाहीं. वाराहीस लज्जा पर्याय नाहीं. यामुळें लज्जावनस्पती ओळखण्याचें साधन व प्राप्तिस्थळ कळलेलें बरें. चांगेरीघृतांत गजपिंपळी म्हणजे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चवकाचें फल असें सुचविलें आहे. यालाच द्रव्यावली ग्रंथाचा चवीफलस्य हस्तिपिप्पली असा निर्देश केला आहे. चविकायाः फलं प्राज्ञैः कथिता गजपिप्पली, असा उल्लेख शालिग्रामनिघंटूंत आहे.

डॉ. देसाई यांच्या पुस्तकांत वर्णन केलेली गजपिंपळी ती ही नव्हे असे ते म्हणतात. निघंटरत्नाकारांत मिरवेलीच्या फळास गजपिंपळी म्हटलें आहे. स्वामी शरणानंदानीं आपल्या विज्ञानमाधिकांत गजपिंपळी वरच्या दोनीहि नव्हेत असें प्रतिपादिलें आहे. या सर्वावरून सत्य वस्तु (गजपिंपळी) कोणती ?

अवाक्पुष्पी, हेठाहुली

टीकेंत सुनिषण्ण चांगेरीघृतांत 'अवाक्पुष्पी' इत्यादि पाठांत अवाक्पुष्पी (व्रडीशेप) वर 'हेठाहुली' असा पर्याय सुचविला आहे. सदरचा शब्द संस्कृत भाषेतला दिसत नाहीं. हिंदी आहे काय ?

पृश्निपर्णीचा विकल्प

याच पाठांत वीर हें पद आहे. या पदावर 'क्षीरकाकोली वा पृश्निपर्णी, असा पर्याय सुचविला आहे. पृश्निपर्णीच्या ४४ नांवांत वीरा नाहीं. काकोली अर्थक वीरा पद आहे. काकोलीद्वय समानधर्मीय आहे. मूळ द्रव्य प्राप्य असतां पृश्निपर्णीचा विकल्प कां सुचविला ?

एक अनुमान

असें अनुमान निघतें कीं, अष्टवर्गाच्या दुष्प्राप्यतेनंतर तद्धर्मीय तत्प्रतिनिधीभूत द्रव्यें शारंधरानें सुचविलीं तीं या टीकाकाराच्या काळांत नसावींत.

पोंच व अभिप्राय—

मुंबई होमिओपॅथिक कायदा १९५१

वरील नांवाचें पुस्तक श्री. व्ही. एस्. कुलकर्णी वकील (पुणें) यांनीं इंग्रजी भाषेंत लिहिलें असून ते लॉ बुक हाऊस (लक्ष्मीरोड, संभाजी पुलाजवळ, पुणें २) यांनीं प्रसिद्ध केलें आहे. या पुस्तकाची किंमत १ रु. आहे ट. खर्च वेगळा.

या पुस्तकांत मुंबई सरकारनें होमिओपॅथीस मान्यता कां दिली, व १९५१ सालचा ४८ वा कायदा म्हणून बॅांबे होमिओपॅथिक अॅक्ट कोणत्या शब्दांत मंजूर केला यासंबंधीं संपूर्ण माहिती दिली आहे. पुस्तकांत ७ प्रकरणें आहेत. या कायद्यासंबंधी १९५२ सालीं जी दुरुस्ती झाली तीसुद्धां यांत ग्रथित केली आहे. मुंबई राज्यामधील होमिओपॅथीच्या कायद्याची माहिती मिळवू इच्छिणाऱ्यासाठीं हें पुस्तक अतिशय उपयुक्त आहे.

संस्कृते पत्रव्यवहारः

ये वैद्याः वैद्यतरा वा संस्कृतं जानंति तैः पारस्परिकः कार्यालयादि विषयको वा पत्रव्यवहारः संस्कृत एव कर्तव्य इति ।

आयुर्वेदद्वारभूतायाः संस्कृतभाषायाः प्रचारार्थमुपयोगिनी पद्धतिरियम् । —सूत्रको रणजितरायः

प्रो. र. धों. कर्वे, एम्.ए. कृत

१ कर्तव्याची मीमांसा	किं. ६ रु.
२ आधुनिक आहारशास्त्र	१॥ रु.
३ आधुनिक कामशास्त्र	४ रु.
४ वेश्याव्यवसाय	२ रु.
५ समाजस्वास्थ्य मासिकांतील निवडक लेख भाग २रा	२ रु.
६ समाजस्वास्थ्य मासिक (वार्षिक वर्गणी)	३ रु.
७ संततिनियमन (सचित्र)	१। रु.
८ गुप्तरोगांपासून बचाव	१ रु.
९ वेरा गोष्टी	१ रु.
१० त्वचेची निगा	८ आणे
११ गुरुबाजी (नाटक)	८ आणे
१२ न्यायाचा शोध (नाटक)	१ रु.
१३ पॅरिसच्या परी	१ रु.

१ राइट एजन्सी, नवी भटवाडी मुंबई ४

२ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्यकांतील शोध कसे करतात ?

(लेखकः– डॉ. वा. कृ. जोशी एम्. बी. बी. एस्.)

पाश्चात्य वैद्यकांत वनस्पतींचा उपयोग फार पूर्वीपासून होत आला आहे. अर्थात् नुसत्या अनुभवावरूनच त्यांचे गुण ठरविले जात असत. त्याला प्रयोगांचा आधार नसे. एखादी औषधी गुणकारी आहे हे प्रयोग करून निश्चित करावयाची पद्धत या दोन-तीनशें वर्षांतलीच आहे.

डिजिटॅलिसवरील प्रयोग

पाश्चात्य वैद्यकांत डिजिटॅलिस नांवाची एक औषधि वापरली जाते ती वनस्पतिरूपांत किंवा तिच्या सत्वांच्या रूपांत उपयोगांत आणितात. डिजिटॅलिस संबंधानें आजवर इतके प्रयोग झाले आहेत कीं, त्यासंबंधींच्या हकीकतीचे शेकडों ग्रंथ होतील. कित्येक विद्वानांनीं डिजिटॅलिस संबंधींच्या संशोधनांत आपलीं आयुष्यें खर्च केलीं आहेत.

सुरवातीचा इतिहास

या औषधीच्या सुरवातीचा इतिहास विदरिंग यांनीं एका लहानशा चोपड्यांत १७८५ सालीं प्रसिद्ध केला. विदरिंग हे अत्यन्त बुद्धिमान् होते, प्राणवायूचा शोध लावणारे प्रीस्टले, आगगाडीच्या इंजिनचे संशोधक जेम्स वॉट, विकासवादाचें तत्त्व मांडणारे डार्विन हीं मंडळी यांच्या मित्रवर्गापैकीं होतीं.

जलोदरावर झाडपाल्याचा चहा

श्रॉपशायरमधील एका खेड्यांतील एक स्त्री जलोदरावर एका झाडपाल्याचा चहा करून देते असें विदरिंग यांनीं ऐकलें होतें. त्यांचा या गोष्टीवर अगोदर विश्वास नव्हता. पण ऑक्सफोर्डचे डीन आजारी होते. त्यांना जलोदर झाला होता. मोठ्या मोठ्या नामवंत डॉक्टरांनीं हात टेकले. या श्रॉपशायरमधील स्त्रीचा काढा घेण्यासंबंधीं सूचना करण्यांत आली. तो काढा देण्यांत आला व डीनसाहेब बरे झाले.

त्यामुळें उत्सुकता वाढली

हें सर्व पाहून विदरिंग यांची उत्सुकता वाढली. काढ्यांत औषधी द्रव्यें काय आहेत हें जाणून घेण्याचा त्यांनीं निश्चय केला. पण ही सोपी गोष्ट नव्हती. त्या वैद्यबाईचें जीवन या काढ्यावरच होतें व तिच्या नांवासहि या काढ्यामुळेंच प्रसिद्धि आली होती. त्यामुळें काढ्यांतील द्रव्यें त्या स्त्रीनें अत्यन्त गुप्त राखलीं होतीं यांत आश्चर्य नाहीं.

दोन हुशार माणसामधील लढा

काढ्याचा पाठ जाणून घेण्याचा विदरिंग यांनीं जसा कांहीं विडाच उचलला. दोन हुशार माणसामधला तो एक लढा होता. शेवटीं विदरिंग यांनीं जिंकलें. त्यासाठीं त्यांनीं कोणची युक्ति केली हें त्यांनीं नमूद केलें नाहीं. त्या बाईच्या नोकरांना खूप द्रव्य देऊन विदरिंग यांनीं आपलें काम साधलें असावें.

भरतीचीं औषधें

काढ्याच्या यादींत अनेक वनस्पती होत्या. कांहींची भरती उगीचच आहे, हें त्यांच्या तेव्हांच लक्षांत आलें. कांहींचे गुणधर्म त्यांनी आंदमासून पाहिले. शेवटीं डिजिटॅलिस ही त्यांतील मुख्य प्रभावी वनस्पती आहे असा त्यांनीं निष्कर्ष काढला.

पांचहि अंगें वापरून पाहिलीं

त्यानंतर डिजिटॅलिससंबंधीं आणखी कांहीं प्रयोग करण्यांत त्यांनीं काल घालविला. त्याचें मूळ, खोड, फांद्या, पानें, फुलें हीं सर्व वापरून पाहिलीं. या त्यांच्या प्रयोगांत सुदैवानें कोणी दगावलें नाहीं. मात्र एक रोगी डिजिटॅलिसच्या अतिमात्रेनें मरतां मरतां वांचला, असें त्यांनीं मोकळेपणानें लिहून ठेवलें आहे. अशा अनेक प्रयोगानंतर डिजिटॅलिसचीं पानें सर्वांत प्रभावी आहेत, असें त्यांनीं आपलें मत ठरविलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभव नमूद करून ठेवले

विदरिंग यांच्यानंतर डिजिटॅलिससंबंधीनें हजारों प्रयोग झाले आहेत व त्यांचा निष्कर्षही वेगळा नाहीं. त्यानंतर विदरिंग यांनीं डिजिटॅलिसच्या पानांच्या मात्रेसंबंधीं प्रयोग केले व कांहीं नियम बांधले. नाडी जास्त सावकाश झाली, उलट्या व जुलाब होऊं लागले तर, डिजिटॅलिस् बंद करावें, या व इतर अनेक गोष्टी त्यांनीं नमूद करून ठेवल्या. आपल्या म्हणण्याच्या पुष्ठयर्थ त्यांनीं अनेक रोग्यांचा वृत्तांतहि प्रसिद्ध केला.

एक पायरी पुढें

वैद्य स्त्री व विदरिंग यांच्यामधील फरक लक्षांत घेण्याजोगा आहे. एखाद्या औषधी–संबंधींचें ज्ञान मिळविण्याच्या कामांत ते त्या स्त्रीच्या मानानें एक पायरी पुढें होते. एकाद्या विशिष्ट पद्धतीनें डिजिटॅलिसचा केलेला काढा जलोदरावर गुण देतो, एवढेंच त्या स्त्रीला माहित होतें. तिनें त्या पाठांत फरक करून काय परिणाम होतो, याचा कधींच विचार केला नाहीं. तो विदरिंग यांनीं केला.

कांहीं अज्ञात गोष्टी

तरी पण त्यांच्या डिजिटॅलिस्संबंधींच्या ज्ञानांतील कांहीं जागा अद्याप अज्ञातच होत्या. जलोदराच्या स्वरूपाची त्यांना फारशी माहिती नव्हती. डिजिटॅलिस्ची क्रिया हृदयावर होते याची त्यांना कल्पनाहि नव्हती. हृदयाच्या सूक्ष्म रचनेसंबंधानें ते अंधारांतच होते. त्यावेळीं सूक्ष्मदर्शकयंत्राचा जन्म झाला नव्हता.

बेताल अनियमित नाडीवर डिजिटॅलिस्

एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीस, डिजिटॅलिस् हृदयास शक्ति देणारी औषधी आहे, ही कल्पना बहुतेक विद्वानांना आली होती. साधारणपणें १९०० शतकाच्या सुमारास आणखी एका बुद्धिमान् डॉक्टरांचें लक्ष डिजिटॅलिस्कडे वळलें. त्यांचें नांव जेम्स मॅकेंझी असून ते मध्यम वस्तीच्या शहरांत प्रॅक्टीस करीत असत. हृदयविकार हा त्यांचा आवडता विषय. नाडीचा अनियमितपणा या लक्षणाचा त्यांनीं विशेष अभ्यास केला होता. तो अनियमितपणा दाखविण्याचें त्यांनीं एक यंत्रहि तयार केलें होतें. अनियमित नाडींतहि अनेक प्रकार असतात त्यांपैकीं बेतालपणें अनियमित झालेल्या (Absolutely irregular Pulse नाडीवर डिजिटॅलिस आपला गुण विशेष रीतीनें दाखविते असें त्यांना आढळून आलें.

इतका अभ्यास झाला आहे

हृदयाचे तज्ज्ञ या नात्याचें मॅकेंझी पुढें लंडनला आले. सुरवातीस लंडनमधील तज्ज्ञ यांच्याकडे ढुंकूनहि पहात नसत. पण पुढें हृदयक्रियेसंबंधीं नवीन नवीन शोध लागूं लागले. आणि मॅकेंझींचें म्हणणें तज्ज्ञांना पटूं लागलें. यानंतर डिजिटॅलिसचीं अनेक सत्वें निघालीं. त्यांच्या हृदयावरील परिणामाचा सूक्ष्म अभ्यास झाला. डिजिटॅलिसच्या सत्त्वांच्या मात्रा सूक्ष्मपणानें ठरविण्यांत आल्या. डिजिटॅलिसचें एकादें सत्व, कोणच्या मार्गानें किती प्रमाणांत दिल्यास हृदयावर किती मिनिटांत परिणाम घडून आलेला दिसून येतो, हें आज निश्चितपणानें सांगतां येतें इतका डिजिटॅलिसवर आज अभ्यास झाला आहे.

यावरून घ्यावयाचा बोध

डिजिटॅलिसच्या इतिहासावरून आपणांस पुष्कळ बोध घेतां येण्याजोगा आहे. वैद्यक अपूर्ण आहे. त्यांत अनंत गोष्टीवर प्रकाश पडावयाचा आहे. पाश्चात्य वैद्यक बाल्यावस्थेंतून हळूहळू पुढें जात आहे. आयुर्वेदपद्धतींतहि अद्याप पुष्कळ शोध व्हावयाचे आहेत. आतांपर्यंतच्या शोधावर प्रकाश पाडावयाचा आहे. हिंदुस्तानांतील वनस्पतींचे कांहीं अद्भुत गुण आहेत असें आम्ही ऐकतों, मध्यंच एकादेवेळेस प्रत्ययासहि येते. पण पुढें ती वनस्पती लुप्त होऊन जाते.

अनुभव नोंदून ठेवा

तेव्हां वैद्यकाचा अनुभव असणाऱ्यांनीं चिकित्सक बुद्धीनें रोग्यांच्याकडे पहावे, एकाद्या महत्त्वाच्या वनस्पतीसंबंधींचा अभ्यास करण्यांत आपलें आयुष्य घालवावें. आपले अनुभव नमूद करून ठेवावे. अशानें शोधकाचें नांव तर अजरामर होईलच, पण मनुष्यजातीवरहि उपकार होतील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मधुमेहावर असन (असाण्याचें खोड)

इन्सुलिनपेक्षां अधिक गुणकारी आहे.

(वाग्भटामध्यें सूत्रस्थानाच्या पंधराव्या अध्यायांत असन - तिनिश - भूर्ज या श्लोकांत असनादि गण (श्लोक १९-२०) दिला आहे. त्वचारोग, कफरोग, क्रिमिरोग, पांडुरोग, प्रमेह-मधुमेह विकार व मेदोधातु-दुष्टिजन्य रोग यांवर त्याचा उपयोग सांगितला आहे. नागपूरच्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या रुग्णालयांत काम करीत असतांना माझ्या मनांत मेदो (धातु), मूत्र (मल), कफ (दोष) या त्रयीवर कार्य करणाऱ्या या गणाचा उपयोग करण्याचा विचार आला म्हणून मी असन (असाणा) या वनस्पतीची मागणी केली, पण मला त्यावेळीं ती वनस्पती मिळू शकली नाहीं, व त्यामुळें तो विचार तसाच राहिला.

असनगांवला असाण्याचीं झाडें

पुढें नाशिकला आल्यावर नाशिक - मुंबई प्रवास करतांना वाटेंत असनगांव नेहमीं लागे. वाटे या गांवाला असनाचीं झाडें असलीं पाहिजेत. पुढें एकदां वै. शं. व. गोळवलकर यांच्या बोलावण्यावरून त्यांच्या शेतकरी शिबिरांत व्याख्यान देण्यासाठीं असनगांव स्टेशनवर उतरून शहापूर (ठाणें) येथें गेलों. त्यावेळीं चौकशी केली, तेव्हां टांगेवाल्यानें जातां येतां रस्त्याच्या बाजूने असलेलीं असनाचीं झाडें दाखविलीं त्यामुळें आपली असनगांव नांवासंबंधींची कल्पना खरी ठरली हें पाहून आनंद वाटला. वडगांव, पिंपळगांव, उंबरगांव, बोरगांव, आंब्रेगांव अशी झाडावरून गांवांचीं नांवें ठेवण्याची पद्धति आहेच. सावंतवाडी जवळचें कुडाळ हें कुडालयच आहे. त्या पंचक्रोशींत कुडाचीं झाडेंच खूप आहेत.

जंगलखात्याकडील यादी

पुढें वनोमहोत्सवाचे कार्यक्रम झाले त्यावेळीं जंगलांत मिळणाऱ्या झाडाच्या रोपांच्या जंगलखात्याच्या यादींत असन वृक्षाचें नांव प्रारंभींच आढळलें, त्यामुळें असन हें लाकूड मिळावयास दुर्मिळ नाहीं हें स्पष्ट झालें. तथापि तें मिळवावें कसें व त्याचा प्रथम कसा-काय उपयोग करावा हा विचार डोक्यांत असतांनाच आयुर्वेद साप्ताहिकांतील पुढील लेख वाचावयास मिळाला. वाचकांच्या माहितीसाठीं तो संपूर्ण लेख येथें देत आहे. —बिंदुमाधव पंडित)

कोठीवान यांचा अनुभव

नागपूर येथील एक नागरिक श्री. शं. कृ. कोठीवान् लिहितातः— जवळजवळ ६ महिने झाले मी इन्सुलिनच्या ऐवजीं असाण्याच्या लाकडाचें (खोडाचा) पाणी मधुमेही रोग्यांना देत आहे. गेल्या ११॥ वर्षांपासून माझी पत्नी रक्तदाब या विकारानें आजारी आहे. रोगाच्या आरंभींच मला समजून आलें कीं तिला मधुमेह हा रोगसुद्धां झाला आहे. व मूत्रांतील साखरेचें प्रमाण जवळ जवळ ४ टक्के आहे. हें प्रमाण कमी करण्यासाठीं उपचार म्हणून रोज इन्सुलिनचा प्रयोग केला जात होता.

रायपूरच्या डॉक्टरांचा लेख

या रोगावरील अन्य प्रकारच्या उपचाराविषयीं मी संपूर्ण अज्ञानांतच होतो; पण सुदैवानें रायपूरच्या एका डॉक्टरांनीं आगस्ट महिन्याच्या एका वर्तमानपत्रांत एक पत्र प्रसिद्ध करून मधुमेहावर असाण्याच्या (बीजाच्या) खोडाचा प्रयोग सुचविला होता, तो वाचनांत आला. स्वतःच्या घरांतच रोगी असल्याकारणानें मी या खोडाचें पाणी त्याला पाजण्यास प्रारंभ केला. व गेल्या ६ महिन्यांत मी तिला एक वेळसुद्धां इन्सुलिनचें इंजेक्शन दिलें नाहीं. या कालांत साखरेचें प्रमाण शून्य किंवा १ टक्का राहिलें. कधीं साखर, बटाटे व भात घेतला तर तें शेकडा २ पर्यंत वाढतें पण असाण्याचें पाणी घेतांच तें पुनः शून्य होऊन जातें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बिवळ्याचे दोन प्रकार

बिवळ्याचें लाकूड दोन प्रकारचें असतें. एक साधा 'बिवळा' व दुसरा 'तेलिया बिवळा'. हे तेलिया बिवळ्याचें लाकूड मधुमेहांत उपयुक्त आहे. माझ्या अनुभवावरून माझ्या अन्य मित्रांनीं सुद्धां बिवळा जल घेण्यास प्रारंभ केला आहे. या मित्रांत एक अॅलोपॅथिक डॉक्टर पण आहेत. ते व त्यांची पत्नी मिळून दरमहा ३० रुपयांचें इन्शुलीन घेत असत. परंतु गेल्या तीन महिन्यापासून तीं इंजेक्शनें बंद करून बिवळाजल घेण्यास प्रारंभ केला आहे. व आज तीं दोघें मधुमेहरोगमुक्त आहेत.

अनुभव घेणारी मंडळी

दुसऱ्या एका डॉक्टरांनीं आपल्या रोग्याला हे बिवळा-जल देऊन यश मिळविलें आहे. या रोग्याला मधुमेह व मधुमेहपिटिका (कार्बंकल) झालेली होती. माझ्या तिसऱ्या एका मित्राच्या पायाला मार लागून जखम झाली होती, हें जल पिण्यानें त्याला आराम वाटला. ४।६ दिवसांत ते पूर्ववत् हिंडू फिरू लागतील. एक न्यायमूर्ती मित्र या बिवळा-जलानें मधुमेह चिकित्सा करू लागले आहेत. या प्रकारें बिवळा-जलाची उपयोगिता सिद्ध होऊं लागली आहे.

वैद्य गुलराजशर्मांची मदत

सुरवातीला माझे अनुभव ऐकून माझी मित्र-मंडळी हा प्रयोग करण्यास कचरत होती. कारण मला स्वतःला या वनस्पतीविषयीं कांहींच शास्त्रीय ज्ञान नव्हतें. पण माझे वैद्यमित्र श्री. गुलराजशर्मा आयुर्वेदाचार्य यांनीं आयुर्वेदशास्त्राचा आधार माझ्या प्रयोगाला दाखवून दिला, व मला मोठी मदत केली.

इन्शुलिन-बिवळा तुलना

ॲलोपॅथीप्रमाणें मधुमेह हा कधीं बरा न होणारा विकार आहे. इन्शुलिनच्या प्रयोगानें साखरेचें प्रमाण फक्त कमी होऊ शकतें. त्याच्या तुलनेनें बिवळा-जलाचा गुण अधिक श्रेष्ठ आहे, कारण यामुळें शर्करा न्यूनता (हायपोग्लायकीमिया) होण्याची भीति नाहीं. इन्शुलिन प्रयोगांत ती भीति नित्य असते.

सेंट्रल ड्रग रिसर्च, लखनौ

मध्यप्रदेशांत बिवळा लाकूड भरपूर मिळूं शक व शहरी लोकांना हें लाकूड औषधासाठीं खरे करण्यास मासिक ४ आण्यांपेक्षां ज्यादा खर्च पड नाहीं. या लाकडासंबंधीं संशोधन करण्याबाबत सेंट्रल ड्रग रिसर्च इन्स्टिट्यूट, लखनौ यांना लिहिलें आहे व उत्तराची वाट पहात आहे.

पत्र परत पाठविलें

प्रथम मी माझे हे अनुभव इंडियन केमि लॅबोरेटरीला कळविले. व या लाकडावर संशो करण्याची विनंति केली. माझें पत्रच त्यांनीं मला प पाठवून दिलें व लखनौच्या संस्थेकडे पत्रव्यवहा करण्यास सुचविलें.

संपादकांची टिप्पणी

श्री. शं. कु. कोठीवान् यांच्या या लेखावर संपादकांनीं पुढील टिप्पणी जोडली आहे:- बीजक संस्कृतमध्यें असन, विजयसार, बीजक, हिंदीमध्यें बीजा व मराठींत बिवळा म्हणतात. याचा उपयो मधुमेहावर आम्ही कित्येक वर्षे करीत आहोत, व तो शंभर टक्के यशस्वी होतो असा आमचा अनुभ आहे. त्याचप्रमाणें आम्हीं याचा उपयोग रक्तविकार, खाज, आदि रोगावरहि स्वतंत्रपणें केला आहे व तो फलदायी झाला आहे.

हा नवीन शोध नाहीं

हा कांहीं आमचा नवीन शोध नाहीं. आयु

शास्त्रोक्त पद्धतीनें व अत्यंत परिश्रमानें तयार
केलेलीं महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसंमेलनानें
व ऑल इंडिया आयुर्वेद कॉंग्रेस
व प्रदर्शनाकडून प्रशंसित
सहस्रपुटी अभ्रक इ. भस्में व इतर औषधें
प्राइस लिस्ट मागवा.
श्री अमरेश्वर आरोग्यमंदिर
मिराशी बोळ, पो. इचलकरंजी S.M.C.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वेदप्रवर्तक ऋषिमुनींनीं याचे गुणधर्म अनुभवपूर्वक लिहून ठेवले आहेत. विसर्प-कुष्ठ-श्वित-मेह-गुह्यरोग कृमि-कफ-रक्तपित्तघ्नः। त्वच्यः रसायनश्च (भावप्रकाश). त्याचप्रमाणें अष्टांगहृदयांत असनादि गण व त्यांचे हे गुणधर्म दिले आहेत. सबब आयुर्वेदाचा हा शोध मूलगामी आहे. ८।१० वर्षांत खोटा ठरणारा असा तो शोध नाहीं. तथापि आमचें सरकार यास एकदम मानण्यास तयार नाहीं. आमच्या सरकारनें भारतीय दृष्टिकोनांतून विचार करण्यास प्रारंभ केला पाहिजे. या दृष्टींत सत्याची पारख करण्याची प्रचंड शक्ति सांठविलेली आहे.

असनाचा सेवनविधि

तोळ्या बीजाच्या २ तोळे लांकडाचा चुरा चिनीमातीच्या भांड्यांत ठेवावा व त्यावर ७-८ तोळे गरम पाणी वरून ओतावें. व रात्रभर भिजूं द्यावें. सकाळीं जेवण पूर्वी अर्धा तास हातानें कुस्कर गाळून घ्यावें. व मग तें पाणी प्यावें. जर साखर जास्त जात असेल तर सकाळीं भिजूं घातलेलें औषध संध्याकाळीं गाळून तें पाणी प्यावें. साखरेचें प्रमाण कमी असेल त्यांनीं एक वेळच हें पाणी प्यावें.

आतांपर्यंत आम्हीं फक्त हिमाचाच (जलाघात) उपयोग केला आहे. काढा, अर्क, घन, सत्व, चूर्ण, यांनींसुद्धां फायदा झाला पाहिजे. वाचकांनीं अनुभव घेऊन ते प्रसिद्ध करावेत.

मे. कुमार मेडिकल स्टोअर्स
पो. वालचंदनगर (पुणें)
(प्रोप्रा.—कांतिलाल एस्. गांधी)
आमच्याकडे "आयुर्वेद सेवा संघ" नासिक यांची सर्व औषधें, त्याचप्रमाणें देशी विलायती औषधें, स्टेशनरी व वॉचेस मिळतील. हमखास गुणकारी औषधें अगस्तिप्राश व कंदर्पवृष्यपाक एकदां वापरून खात्री करून घ्या.

गणांतील इतर वनस्पतींचा उपयोग

(या लेखांत फक्त बीजाचा अनुभव सांगितला आहे. पण असनादि गणांतील इतर वनस्पतींचा असाच उपयोग होणें शक्य आहे. असनादि गणांत पुढील वनस्पती आहेत, त्यापैकीं मिळतील त्या लाकडांचा चुरा वरील प्रकारें वापरून पहावा.

तिनस, भूर्ज, खैर, शिसव, मेषशृंगी, चंदन, रक्तचंदन, पळस, धावडा, अजकर्णी, अश्वकर्णी इ.

या सर्व वनस्पतींमध्येंहि बीजाप्रमाणेंच गुण आहेत, असें आयुर्वेदाचें म्हणणें आहे. प्रयोग करून अनुभव घेणें हें वैद्य व रोगी यांचें काम आहे.

—त्रिंदुमाधव पंडित)

डिग्री कोर्सला लायक संस्था

आयुर्वेद फॅकल्टीतर्फे नेमण्यांत आलेल्या तज्ञसमितीनें दुसऱ्या वेळीं केलेल्या निरीक्षणानंतर सुरत येथील ओच्छवलाल आयुर्वेद महाविद्यालय, व मुंबई येथील सरकारी पोदार आयुर्वेद महाविद्यालय हीं, पदवी अभ्यासक्रम शिकविण्यास कायमची मान्य महाविद्यालयें, म्हणून शिफारस केली आहेत.

डिग्री कोर्स चालविण्यास सातारा, अहमदनगर व नाडियाद येथील आयुर्वेद महाविद्यालयांना पूर्वींच तात्पुरती मान्यता दिली गेली आहे.

अगदीं पहिल्या निरीक्षणांत जामनगर व पुणें येथील आयुर्वेद महाविद्यालयांना डिग्री कोर्स चालविण्यास कायमची मान्यता मिळाली होती. तथापि जामनगरनें गेल्या वर्षी तो कोर्स सुरू केला नाहीं. व यंदाहि करील अशीं लक्षणें दिसत नाहींत असें कळतें.

रायपूर स्कूलचें कॉलेज होणार!

रायपूर येथें ३ वर्षाच्या वैद्यकीय अभ्यासक्रमाचें जें स्कूल सध्यां सुरू आहे, त्याचें रूपांतर गव्हर्नमेंट आयुर्वेदिक कॉलेजमध्यें करण्याचें घाटत आहे, असें कळतें. उत्तर प्रदेशाप्रमाणेंच मध्यप्रदेशांतहि आयुर्वेदाच्या क्षेत्रांत बदल होत जातील असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुंबई राज्य पंचवार्षिक विकास-योजना

या विकासयोजनेंत आयुर्वेदाचा उल्लेखहि नाहीं.

पंचवार्षिक योजनेखालील वैद्यकीय कार्यक्रमांत (१) वैद्यकीय कार्याबाबतचें शिक्षण देण्याची सोय करणें आणि (२) औषधोपचाराबाबतच्या सोयी वाढविणें या गोष्टी समावेश होतो.

५ ग्राम इस्पितळें

दवाखान्यांचें कॉटेज हॉस्पिटलांत रूपांतर करण्यासंबंधीची योजना अंमलांत येत आहे. अशा प्रकारची आणखी पांच इस्पितळें सुरू करण्यासाठीं २१'४८ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

आणखी एक क्षयरोग रुग्णालय

पुण्याजवळ औंध येथील क्षयरोग्याच्या इस्पितळांत निर्वासित लोकांसाठीं आणखी ५० खाटांची सोय करण्यांत यावयाची आहे. या अिस्पितळांत खास प्रकारच्या औषधोपचारांची सोय आहे. अशा प्रकारचें आणखी अेक अिस्पितळ सुरूं करण्यासाठीं व औंधच्या अिस्पितळाचा खर्च भागविण्यासाठीं ३०.८९ लक्ष रुपयाची तरतूद करण्यांत आली आहे.

महारोग्यांची वसाहत

सोलापूर येथील महारोग्यांच्या वसाहतीची वाढ करण्यासाठीं आणि जेथें महारोग्यांना उपयुक्त व उत्पादक स्वरूपांचें काम करतां येईल अशी अेक त्यांची वसाहत स्थापन करण्याठीं १५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

६० नवीन एस्. एम्. पी. केंद्रें

विलीन प्रदेशासुद्धां सबंध राज्यांत सरकारी मदत मिळणाऱ्या वैद्यक व्यवसायींचीं आणखी ६० केंद्रें सुरू करण्यांत येणार असून त्यासाठीं ६१-५७ लक्ष रुपयांची तरतूद केली आहे.

सार्वजनिक आरोग्य

सार्वजनिक आरोग्यासंबंधींच्या कार्यक्रमांत पुढील गोष्टींचा समावेश होतोः- सार्वजनिक आरोग्याबाबतची संघटना प्रभावी करणें, शिक्षणाच्या सोयी वाढविणें, पाणीपुरवठ्यांचीं व ड्रेनेजचीं कामें करणें, खेडेगांवांना पाणीपुरवठा करणें व मलेरिया प्रतिबंधक योजना हातीं घेणें.

प्रत्येक जिल्ह्यांत आरोग्यसंघटना

सध्यां प्रत्येक जिल्ह्यांत जिल्हा-आरोग्य-संघटना असून ती प्लेग, कॉलरा वगैरे सारख्या सांथीच्या रोगांना प्रतिबंधक करण्याचें काम करीत असते. मलेरिया-प्रतिबंधक योजनेच्या कार्यासाठीं १२७.९२ लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली असून मुंबई राज्यांत डी डी. टी. चा कारखाना काढण्याच्या दृष्टीनें उपाय योजण्यांत येत आहेत. यासाठीं ४० लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे.

पाणी पुरवठा व ड्रेनेज

पाणीपुरवठा व ड्रेनेज याबाबतच्या १२ योजना अंमलांत यावयाच्या आहेत. यापैकीं सात कामें यापूर्वीच सुरू झालीं आहेत. हीं कामें पुरी करण्यासाठीं व नवी सुरू करण्यासाठीं योजनेंत २६९'२७ लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

खेडेगांवांना पाणी पुरवठा

खेडेगांवांना पाणी पुरवठा करण्यासंबंधीच्या योजनेसाठीं ४१५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. या योजनेनुसार मुंबई सरकारनें १,७६१ विहिरीचें बांधकाम पुरें केलें असून १,०८३ विहिरींचें काम चालू आहे. तसेंच ३५८ तळयांचें काम पुरें झालें असून ५७ तळयांचें काम चालू आहे, एका बंधाऱ्याचें काम पुरें झालें असून दोन बंधाऱ्याचें काम चालू आहे. जिल्हा लोकल बोर्डांनीहि अशाच प्रकारचें काम हातीं घेतलें असून ७२८ विहिरींचें काम पुरें झालें आहे व ७६४ विहिरींचें चालू आहे. ३३१ तळयाचें व एका बंधाऱ्याचें काम पुरें झालें असून ८५ तळयाचें व एका बंधाऱ्याचें काम चालू आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आनुभविक चिकित्सा, प्रकरण १० वें (पुढें चालू)

शोषरोगाचे ७ प्रकार :

लेखकः- वृद्ध वैद्य
(मध्यप्रदेश)

राजयक्ष्म्याप्रमाणेंच शरीर शुष्क होण्याचीं कारणें इतर अनेक असतात. आणि त्यामुळें त्या सर्वांना शोष अशी विशिष्ट संज्ञा शास्त्रज्ञांनीं दिलेली आहे. असे शोष ७ प्रकारचे आहेत.

१) व्यवायशोष २) शोकशोष ३) वार्धक्यशोष ४) व्यायामशोष ५) अध्वशोष ६) व्रणशोष आणि ७) उरःक्षत.

१ व्यवायशोषीचीं लक्षणें

व्यवाय अर्थात् स्त्रीसेवन अधिक केल्यामुळें शुक्रधातु फार अधिक प्रमाणांत बाहेर जातो. आणि त्यामुळें क्षयाच्या आदि कारणांत जें तिसरें धातुक्षय-रूप कारण, विस्तारपूर्वक मागें वर्णन केलें, त्यांतील सर्व लक्षणें व तज्जन्य उपद्रव ह्या व्याधींत होतात. त्याच्या शरीराचा वर्ण फिक्कट (पांडु) होतो. आणि याचे सर्व धातु प्रतिलोम पद्धतीनें अर्थात् शुक्रानंतर मज्जा, मज्जेनंतर अस्थि, इत्यादि रसापर्यंत क्षीण होत जातात.

व्यवायबंदीची व्यवस्था करावी

अशा स्थितींत चिकित्सेची पहिली पायरी म्हणजे व्यवाय अजीबात बंद होईल अशी व्यवस्था करणें आणि त्यानंतर धातुपोषक व स्निग्ध असे आहार क्रमशः पचत जातील इतक्या प्रमाणांत देऊन रस-रक्तादि क्रमानें धातु वाढविणें हीच असते. या शोष-प्रकारांत ज्वर, कास, इत्यादि राजयक्ष्म्याचीं लक्षणें उत्पन्न झालीं नसतील तरच वरील उपक्रम उपयोगी असतात. राजयक्ष्म्याचीं लक्षणें दिसूं लागल्यास पुढें वर्णन केली जाणारी राजयक्ष्म्याची चिकित्साच केली पाहिजे.

२ शोकशोषीचीं लक्षणें

अत्यंत शोकाकुल होण्यास जीं अनेक कारणें होतात—उदाहरणार्थ, आपणास फार प्रिय असलेल्या अशा पुत्र, स्त्री इत्यादि जवळच्या आप्तांचें निधन झाल्यामुळें— त्यापासून शोक उत्पन्न होऊन मनःस्वास्थ्य उत्पन्न करणारे अशा दर्शनशास्त्रज्ञानाच्या अभावीं ती व्यक्ति दिवसरात्र शोकमग्न असते. आणि त्यामुळें एकसारखें विशिष्ट चिंतन, गेलेल्या व्यक्तींसंबंधीं केलें जातें. त्यामुळें अन्न जात नाहीं. व सर्व शरीरधातु वाळत जाऊन त्याला वर वर्णन केलेली व्यवायशोषी मनुष्याचीं सर्व लक्षणें (शुक्रक्षय खेरीज-करून) होत असतात.

आधीं परलोकविचारानें शोकहरण

अशा परिस्थितींत प्रथम आत्मा, जीव, परलोक, पाप, पुण्य आदि विचारांचा त्या मनुष्यास उपदेश करून तो शोक दूर करण्याचा प्रयत्न करावा. आणि नंतर हलका परंतु पुष्टिकर असा दूध, तूप इत्यादि पदार्थांचा आहार क्रमशः वाढून त्या धातु पुन्हां पूर्वस्थितींत आणाव्या. कारण, चिकित्सा ही सदैव मूलकारणाचा नाश करणारी अशी असावी लागते. शोक दूर न होतां आहारविहारांचा आग्रह केल्यानें कधींहि शोकशोषी बरा होऊं शकत नाहीं.

३ जराशोषीचीं लक्षणें

वार्धक्य आल्यानें क्रमशः आहाराचें पचन होत नाहीं. व न झाल्यानें रस-रक्तादि धातु फार कमी प्रमाणांत उत्पन्न होतात. सबब, ती व्यक्ति कृश होत जाते. त्याचप्रमाणें शरीरांतील शुक्रधातु सर्वधातूंत असणारें जें ओज, बुद्धि आणि शारीरबल व शेवटीं इंद्रियांची तद्विषयक ग्रहणशक्ति हे सर्वच मंद अर्थात् क्षीण होत जातात. शरीर सदैव कांपत असतें. अन्नावर रुचि कमी होते. त्याचा आवाज फुटलेल्या कांचेच्या भांड्यावर आघात केला असतांना त्यांतून ज्या प्रकारचा ध्वनि उत्पन्न होतो, तद्वत्‌ [illegible] असून त्यांतून कफ-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द्रव्य मुळींच येत नाहीं. सबब तो कोरडा असतो. शरीर भारी असतें. आणि सर्व प्रकारच्या खाद्य पदार्थांचा द्वेष वाटत असून ते रुचिहीन होतात.

गळणाऱ्या स्रावामुळें शोष

तोंड, नासिका आणि डोळे यांच्यांतून त्या त्या स्थानीं उत्पन्न होणाऱ्या द्रव्यांचे स्राव सारखे चालूं राहतात. आणि असे हे स्राव पुष्कळ प्रमाणांत शरीराबाहेर गेल्यामुळें त्याची कांति रूक्ष होऊन चेहरा फिक्का व अस्वच्छ, मलयुक्त असा दिसूं लागतो. हें सर्व वार्धक्याचें स्वाभाविक लक्षण जरी असलें तरीपण त्याचें आधिक्य होणें हें जराशोषित्वाचें लक्षण होय. स्वभावतः येणाऱ्या वार्धक्यांत एकाएकीं हीं लक्षणें होत नसून तीं इतक्या सूक्ष्म प्रमाणांत वाढतात कीं, तीं प्रत्ययास येत नाहींत. हाच या दोन्हींतील भेद होय. जराशोषी मनुष्यास तूप दुधासारखे स्निग्ध पदार्थ नियमितपणानें मिळत गेले म्हणजे हा शोष कमी होऊन स्वाभाविक जरेचीं लक्षणें प्रत्ययास येतात.

४ अध्वशोषीचीं लक्षणें

एकाएकीं फार मार्गक्रमण करण्याचा प्रसंग आला असतांना हा अध्वशोष होत असतो. त्यामुळें त्याचीं सर्वच शरीरांगें विशेषतः हात व पाय हे ढिले पडतात, शरीराचा वर्ण भाजलेल्यासारखा आणि चिक्कणपणा ऐवजीं त्याच्या उलट असा खरखरीत दिसूं लागतो. चेहरा काळा ठिक्कर असा दिसूं लागतो. सर्व शरीराचे अवयव, सुन्न, बहिरे (बधिर- Sensationless) असे वाटूं लागतात. आणि त्याचें तोंड, गळा आणि पिपासास्थान हीं सर्वच अतिशुष्क होतात.

काळ्या तिळ तेलाची मालिश

अशा स्थितींत त्या व्यक्तीस पुष्कळ दिवस स्वस्थपणें आराम करण्यास सांगून क्रमशः स्निग्ध व पुष्टिकर पदार्थ पचतील इतक्या प्रमाणांत खाण्यास द्यावे. सर्व शरीरास प्रतिदिवस शुद्ध काळ्या तिळीच्या तेलाची मालिश करवावी. कोमट पाण्यानें प्रतिदिवस बराचवेळ आंघोळ करून भरपूर झोप घेतां येईल अशी व्यवस्था करावी. अंगमर्दन (अंग चोळणें व दाबणें) हें दररोज करावें म्हणजे अतिमार्गक्रमणामुळें शरीरा[ला] झालेली वातवृद्धि कमी होऊन मनुष्यास पूर्वस्थिति प्राप्त होते.

५ व्यायामशोषीचीं लक्षणें

वर वर्णन केलेलीं अध्वशोषीचीं सर्व लक्षणें या व्यायामशोषानें पीडित मनुष्यास होतात. परंतु त्याला कारण व्यायामाचा अतिरेक हा होतो. एकदा आखाड्यांत जाऊन व्यायाम करण्याची संवय झाली म्हणजे तासचे तास तेथेंच व्यतीत करून त्या वेळीं अनेक प्रकारच्या भिन्न भिन्न कसरती करण्याची हौस वाटते, आणि तोच एक अंगीकृत व्यवसाय असा होतो. तसें झाल्यासहि जर तो करण्यापूर्वीच्या काळांत व केल्यानंतरच्या काळांत भरपूर असा स्निग्ध आणि पुष्टिकर आहार मिळाला तर हा व्यायामशोष होत नाहीं.

या आहारांत बदाम, पिस्ते इत्यादि स्निग्ध मेवा, तूप, दूध इत्यादि स्निग्ध आहार्य पदार्थ आणि मलाई, हलुआ वगैरे व्यायामजन्य क्षीणता नाश करणारे असे आहार भरपूर प्रमाणांत मिळाले पाहिजेत. साधारण लोकांना ते उपलब्ध नसतांना वर वर्णन केलेला व्यायाम अधिक काळ केला गेला म्हणजे राजयक्ष्माच होतो. तत्पूर्वी पुढें उरःक्षतासंबंधीं जें वर्णन करण्यांत येईल तीं लक्षणें होतात. मात्र उरामध्यें (छातीमध्यें) क्षत होत नाहीं. याची चिकित्सा उरःक्षत चिकित्सेसारखीच करावयाची असते.

६ व्रणशोषीचीं लक्षणें

एखाद्या मनुष्यास व्रण होऊन त्यांतून पुष्कळ रक्तस्राव झाल्यामुळें आणि तो व्रण फार दिवस राहिला असतां तन्नाशार्थ केल्या जाणाऱ्या आहारनियंत्रणामुळें (पथ्य केल्यामुळें) त्या व्रणी मनुष्यास शोष होतो. दुधासारखे पुष्टिकर पदार्थ दररोज मिळत असतांना देखील त्या व्रणांतून जाणाऱ्या धातुक्षयामुळें तो दिवसेंदिवस वाळतच जातो. असा हा व्रणशोष असाध्य होतो. कारण तो दुष्ट व्रण (Sceptic wound) भरून येत नाहीं. तज्ञ शल्यचिकित्सज्ञ (Surgeon) अशा वेळीं तें दूषित अंग कापून काढण्याचा उपदेश

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…हेत असतात. तो पाळला तर रुग्ण जगतो. नाहीं तर शोष दिवसेंदिवस वाढत जाऊन प्राणनाश होतो.

७ उरःक्षताचीं कारणें, संप्राप्ति व लक्षणें

राजयक्ष्म्याच्या प्रथम म्हणजे साहसजन्य प्रकारांत या उरःक्षतासंबंधीं वर्णन आलेलें आहे. ज्यावेळीं एखादा पारधी किंवा योध्दा धनुष्यावर प्रत्यंचा लावून ती फार जोरानें ओढतो; किंवा फार वजनदार पदार्थ डोक्यावर ठेवून पुष्कळ दूरपर्यंत चालत जातो; आपल्यापेक्षां जास्त बळवान् मनुष्याची झुंज घेतो; फार उंच जागेवरून उडी मारतो; पळत असलेल्या बैलास किंवा घोड्यास अथवा इतर हत्ती इत्यादि प्राण्यास आपल्या शक्तीनें रोखण्याचा प्रयत्न करतो; दगड, लाकूड, किंवा बरची-भाला इत्यादि शस्त्रें आपल्या वेगावर मोठ्या शक्तीनें फेकण्याचा प्रयत्न करतो; फार उच्च अशा स्वरांत अध्ययन करतो; दूर ठिकाणीं लवकर पोहोंचण्याच्या उद्देशानें फार जलद चालतो; मोठमोठ्या पाटांच्या नद्यांत पैल तीरावर जाण्याच्या उद्देशानें पोहतो. दौडत्या घोड्याबरोबर सतत धावतो; कोलांटउड्या पुष्कळशा एकानंतर एक मारतो, किंवा नाचण्याचें दृश्य सुन्दर दिसावें म्हणून अतिवेळपर्यंत व जलद असा नाचत राहतो अथवा याचप्रमाणें शरीरास अपाय करणारीं आणि म्हणून क्रूर अशीं इतर कर्में पुष्कळवेळपर्यंत करीत राहतो तेव्हां त्या शक्तीच्या बाहेर केलेल्या कर्मांनीं छातींतील फुफ्फुसाच्या आंतरावरणांत इजा पोंचून तें आवरण दुभंगतें. आणि त्या ठिकाणीं हा उरःक्षत-संज्ञक व्याधि उत्पन्न होतो.

रूक्ष, अल्प अन्नसेवन व व्यवाय

जो मनुष्य प्रतिदिवस रूक्ष, अल्पप्रमाणांत आणि एकाच प्रकारच्या अन्नाचें सेवन करीत असून स्त्रीसेवन मात्र अधिक प्रमाणांत करतो, त्याच्या उरांत अत्यन्त तीव्र अशी पीडा प्रथम होऊन नंतर फुफ्फुसांतील अन्तस्त्वचा फाटते. व तिच्यांत मोठ्या शिरा उत्पन्न होतात. त्यामुळें पासोळ्यांत फार तीव्र पीडा उत्पन्न होते. सर्व शरीर वाळू लागतें. आणि शरीरांगें कांपतात. त्यामुळें शरीराचें बल वर्ण आणि तजेला हे सर्व कमी होऊं लागतात. अग्निमांद्य होतें. व अरुचि उत्पन्न होऊन ज्वर येऊं लागतो. सर्व शरीरास कष्ट देणारी अशी पीडा होते. मन अत्यन्त अस्वस्थ होऊन मनुष्य दीन झालेला वाटतो. अग्निनाश झाल्यामुळें शौच्यास पातळ होऊं लागतें. खोकला चालू होऊन तो पुष्कळ वेळ कोरडा असा चालव-ल्यानंतर थोडासा कफ रक्त मिश्रित, काळ्या वर्णांचा, दुर्गंधयुक्त, पिवळा, गांठाळलेला आणि पुनः पुन्हां असा बेडक्याबरोबर पडतो. याप्रमाणें होत असतां शरीरांतील शुक्र आणि ओज हे क्षीण होत जाऊन तो उरःक्षतपीडित मनुष्य अत्यन्त क्षीण होत जातो.

उरःक्षताचें पूर्वरूप

या उरःक्षताचें पूर्वरूप म्हणजे कोरडी ढांस पुष्कळ वेळ चालून देखील कफ न येणें आणि छातींत दुःख होणें हें असतें. अशा अवस्थेंत तात्काळ त्या व्यक्तीस भरपूर आराम व स्वास्थ्य मिळेल अशी व्यवस्था करावी. तरच तो व्याधि पुढें उत्पन्न होणार नाहीं. कारण हा उरःक्षत रोग बलवान् मनुष्यास आणि ज्याचा अग्नि प्रदीप्त आहे अशा नवीनच झाला असून वर वर्णन केलेलीं त्याचीं लक्षणें जर अत्यन्त कमी प्रमाणांत असतील तरच तो साध्य असतो. एक वर्ष झाल्यानंतर तो याप्य होतो. अर्थात् अत्यन्त काळजी घेत राहिल्यास व आहारविहार व्यवस्थित ठेवल्यास तो वाढत नाहीं. परन्तु जर वर वर्णन केलेलीं सर्व लक्षणें होऊं लागलीं, छातींत पीडा सारखी होत असली रक्ताची वांति व कोरडा खोकला हीं कायम राहिलीं, लघ्वींत रक्त येऊं लागतें, पासोळ्या पाठ व कंबर हीं जखडलेली अशी परिस्थिति येण्या-पूर्वींच प्रारंभिक पूर्वरूपावस्थेंत चिकित्सा सुरूं करावी.

वांति व अतिसार (मराठी)
लेखकः-वै. वासुदेवशास्त्री कडेगांवकर
किंमत ८ आणे, ट. ख. वेगळा
-: वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक :-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्य ग्रामोपाध्ये यांचे

विसंगत विचार

सोलापूर जिल्हा आयुर्वेदिक सम्मेलनांतील अध्यक्ष वैद्य वामन नृसिंह ग्रामोपाध्ये यांनीं प्रगट केलेले विचार वाचून पहातां त्यांत परस्पर फार विसंगति दिसते ती अशीः- "आयुर्वेद व अ‍ॅलोपॅथी दोन्ही जाणणारे वैद्यच आयुर्वेदाचीं तत्वें आधुनिक विद्वानासमक्ष रुजूं करूं शकतील. पुण्याचे वैद्य गणेशशास्त्री जोशी समान वैद्य जर अ‍ॅलोपॅथीचा अभ्यास करतील तर ते आयुर्वेदाचें महत्व जगतांत वाढवू शकतील." असें वैद्य ग्रामोपाध्ये यांचें म्हणणें आहे. वैद्य ग्रामोपाध्ये यांनीं पुण्याच्या आयुर्वेद महाविद्यालयांत दोन्ही शास्त्राचा अभ्यास केलेला आहे. मग त्यांनीं हें काम स्वतः करावयाचें सोडून वैद्य गणेशशास्त्री यांजवर कां ढकलावें? एखादी बाई स्वतः कडेवर आपलें मूल असतांना जर आपलें मूल हरवलें म्हणून आक्रोश करूं लागली तर तसें हें नाहीं कां होत?

"पाश्चात्य वैद्यकांत त्रिदोष कल्पना नाहीं. त्याच्यांत इंद्रियांच्या प्रकृत व विकृत व्यापारांवर रोगांचें निदान व चिकित्सा हीं अवलंबून आहेत." मग पाश्चात्य औषधें— (सॅन्टोनाइन, किनाइन, क्लोरोफार्म वगैरेचा उपयोग त्रिदोष-सिद्धांतानुसार करावयाचा, असें जें वैद्य ग्रामोपाध्ये म्हणतात तो कसा? त्यांतील एखाद्या तरी औषधाचें त्यांनीं त्रिदोष-सिद्धांतानुसार विवेचन करून सांगितलें असतें तर बरें झालें असतें; नाहीं कां? पाश्चात्य डॉक्टर्स आयुर्वेदिक किंवा अन्य औषधें वापरतात, तीं त्या त्या औषधांच्या गुणधर्मांवरून असतात. वैद्य ग्रामोपाध्ये यांनीं त्रिदोषसिद्धांतानुसार असें मोघम न सांगतां तें कसें तें अधिक स्पष्ट करून (ते स्वतः अशी पाश्चात्य औषधें वापरीत असतील त्यांतील) सांगावें अशी माझी त्यांस सूचना आहे. वैद्य लोक ज्या रोगांवर पाश्चात्य औषधें वापरतात, तीं विशेष प्रभावी म्हणूनच कीं नाहीं? जर आपल्या आयुर्वेदांत तशीं कि[ंवा] त्याहून जास्त प्रभावीं औषधें असतीं तर ते आयुर्वेदी[य] सोडून पाश्चात्य औषधें कां वापरते?

नि. भा. विद्यापिठाचे पदवीधर

"निखिल भारतीय विद्यापीठाचे भिषग्विशारद व आयुर्वेदाचार्य हे केवळ पुस्तकपंडित आहेत. ते क्रियावान् नाहींत. चांगल्या कंपौंड[रां]पेक्षां ते कमी दर्जाचे असतात? असें वैद्य ग्रामोपाध्ये यांचें म्हणणें आहे. मग ते ज्या ट्रिब्यूनलमध्यें आहे[त] त्यांत अशा कमी दर्जाच्या वैद्यांना कशी मान्यता देतात? व त्याहून चांगल्या म्हणणाऱ्या कंपौंडरांना कां वगळतात? याचा खुलासा करतील तर बरें, दोन्ही बाजूनें वाजविण्याचें हें मृदंग आहे काय?

"मुंबई इलाख्यांस सुमारें बारा हजार वैद्य रजिस्टर झाले आहेत. त्यापैकीं लायक वैद्य सा[त]-आठशेंच असतील" असें जे वैद्य ग्रामोपाध्ये म्हणत[ात] त्याचा अर्थ, इतर अकरा हजार दोनशे वैद्य नालायक ठरतात असा होतो. वैद्य ग्रामोपाध्ये यांच्या सारख्या मुंबई सरकार नियुक्त सभासदानें, व रजिस्टर ट्रिब्यूनल वरील सभ्यानें असें इतरांबद्दल नालायकीचे उद्‌गार काढणें कसें शोभते तेंच आम्हांस समज[त] नाहीं. एखाद्या बाईचे किंवा पुरुषाचें लग्न झाल्या[वर] त्याच्याबद्दल मागाहून अनुदार बोलणें जसें [तसें] असें हें रजिस्टर्डबद्दलचें बोलणें नाहीं काय?

किराणा दुकानदार, औषधी कारखान्यांतील गडी, औषधें आणणारा धनगर, कारकून [हो]-शाळामास्तर, कंपौंडर्स यांना म्हणे वै. यादवजी त्रिकमजी आचार्य व वैद्य गणेशशास्त्री जोशी [यां]सारख्या विद्वान् लोकांना एकाच माळेंत गोवलें. पण वैद्य ग्रामोपाध्ये या सारखे (वरील ७-८ [हे] मोडणारे) हा भेद सांगणारे असतांना त्यास [हा] घाबरण्याचें कारण नाहीं, त्यांचेंही कुटुंब रजिस्टर[ड] आहे. त्यास तें कोणत्या माळेंत गणतात याचा खुलासा करतील काय?

— ना. मो. व्यास, मुंबई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आजकाल आयुर्वेदीय चिकित्साच होत नाहीं !

(व्याख्याते:-- आचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी) (मागील अंकावरून पुढें चालू)

आयुर्वेदाची लॅबोरेटरी म्हणजे मानवी शरीर. …दालांत माणूस समप्रकृतीचा आणि तरुण असाच …धरावयाचा. गुरु, लघु इत्यादि गुण सापेक्ष …आणि त्यांना समप्रकृतीच्या तरुण माणसाची …आहे. मानवी स्त्री-दुग्ध हें तरुण माणसाला …आहे, तेंच बालवैद्यकांत बालाला तें सम व सात्म्य …इतर आधुनिक शास्त्रज्ञांची भिस्त लॅबोरेटरीवर …आयुर्वेदाची सारी भिस्त रोग्याच्या शरीरावर …लक्षणांवर आणि चिकित्सकाच्या ज्ञानेंद्रियांवर. …झालेला रोग शरीरावर होणाऱ्या लक्षणांनी …जाणून घ्यावयाचा. रोग्याची परीक्षा दर्शन-…प्रश्नानें करावयाची; आणि निदान, पूर्वरूप, रूप, …व संप्राप्ति यांनीं रोगाचें स्वरूप जाणावयाचें.

शरीराची गुणकर्मात्मक परिभाषा

शरीराची एक ठराविक परिभाषा आहे. तिचा, …नैसर्गिक अर्थ ग्रहण करून रोगानिदान ठर-…वावें असतें. रोग निर्माण करणारें कोट्यवधि …आहारांतून शरीरांत गेले आणि त्यांपासून …प्रकारच्या विकृति निर्माण झाल्या तरी त्या …व्यक्त करण्याची शरीराची परिभाषा परि-…मित असते. (विकारोत्पादक द्रव्यें असंख्य असलीं तरी …शरीराची रोगविषयक परिभाषा परिमित असते.) विकार …निर्माण करणाऱ्या त्या द्रव्याचें आधिक्य (दोषत्व) …करण्याची शरीराची परिभाषा परिमित असून …कर्मात्मक असते.

गुणकर्माचें मापन, शरीरावरच

द्रव्यांच्या गुणकर्मांचें मापन शरीरावरच व्हाव…, लॅबोरेटरींत कांचेच्या नळींत नव्हे. कुटकी ही …आहे. हा तिचा गुण कांचेच्या नळींत प्रत्ययास …नव्हे. कांचेच्या नळींत विष्ठेचे खडे टाकून …कुटकीचा काढा घातला व ते खडे विरघळले …नाहीत, म्हणून कुटकी भेदन नव्हे हें म्हणणें खरें नाहीं. कारण, कुटकीचा भेदन गुण शरीरांत नित्य अनुभवास येत असतो. आयुर्वेदीय गुणधर्म हे शरीरसापेक्ष आहेत आणि ते पूर्ण निरीक्षणानें ठरविले आहेत. अल्ब्युमिन हें जसें प्राणिजांतच सांपडावयाचें, खनिजांत नाहीं; तसे दोष हे शरीरांतच मिळावयाचे. ते दूषित झाले, त्यांचा प्रकोप झाला म्हणजे त्यांची लक्षणें शरीरावरच उमटावयाचीं आणि तीसुद्धां एका ठराविक परिभाषेंतच. ती भाषा जाणणें म्हणजेच निदान करणें होय, आणि हेंच चिकित्सकाचें काम !

नैसर्गिकता हा आयुर्वेदाचा विशेष

शरीरांत स्निग्धता वाढली कीं दूध तूप नकोसें होऊन चण्याफुटाण्यासारखें रूक्ष अन्न खावेंसें वाटतें, तर शरीरांत अत्यन्त रूक्षता वाढल्यावर माणूस एरंडेलहि आवडीनें चाटून खातो. अंगाला तेल लावल्यानें त्याला बरें वाटतें. शरीरांत शीताधिक्यानें शीतगुण अधिक वाढल्यास थंड पदार्थ नकोसे वाटावे. (प्रद्वेषो वृद्धिहेतुषु) ही शरीराची नैसर्गिक भाषा होय, आणि जे गुण वाढले त्यांच्या विरुद्ध गुणांची इच्छा होणें (विपरीतगुणेच्छा च) हेंहि नैसर्गिक होय. नैसर्गिकता हा आयुर्वेदाचा विशेष आहे.

ज्वरांतील नैसर्गिक मलावरोध

ज्वरांतील मलावरोध हा नैसर्गिक होय. दोषाचें पचन झालें कीं मलप्रवृत्ति आपोआप होऊं लागते. (मलप्रवृत्तिरुक्लेशो पच्यमानस्य लक्षणम्) दोषाचें पचन होण्यापूर्वी एनिमा देणें हें आयुर्वेददृष्ट्या चूक आहे. अवरोधामुळें निर्माण झालेली व आंत कोंडली गेलेली उष्णता, शरीरांत निर्माण झालेलीं विषें पचवून नाहींशीं करते.

शुद्धबुद्धीची मागणी हवी

शरीराच्या नैसर्गिक मागणीकडे लक्ष दिल्यास रोगांचें भय सहसा राहणार नाहीं. मात्र शरीराची ही मागणी शुद्धबुद्धीची हवी. अजीर्ण झाल्यावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मांजर गवत खातें ही शुद्धबुद्धि! माणसाच्या बुद्धीचा विकास झाला पण त्याची बुद्धि शुद्ध राहिली नाहीं. तेथें इंद्रियलौल्याचा प्रभाव अधिक पडून माणूस सतत अपथ्य करीत राहतो.

होणाऱ्या लक्षणांचा अर्थ

'दूधतूप आवडत नाहीं' याचा अर्थ शरीराची नैसर्गिक मागणी रूक्षतेची आहे. ही शरीराची नैसर्गिक भाषा चिकित्सकानें जाणून घेतली पाहिजे. झोंप पुरेशी झाली कीं आपोआप जाग येणें, आळसानें जाड्य आलें तर आळोखे पिळोखे देऊन शरीराला हालचाल हवी आहे, हें व्यक्त करणें, ही शरीराची नैसर्गिक परिभाषा. शरीरांत कोणत्या गुणांची वाढ झाली आहे, दोषांचा कोणता ग्रुप वाढला आहे हें शरीराची मागणी स्पष्ट करते. आणि त्या त्या ग्रुपच्या वेदना शरीराला होऊं लागतात. शीतता वाढल्यावर शरिराला शीत नको, उष्ण हवें आहे, हें शरीर आपल्या मागणीनें व्यक्त करतें. हीच शरीराची नैसर्गिक भाषा रोगविनिश्चय करण्यास मदत करते.

आयुर्वेद हें शास्त्र पूर्ण आहे

मानवी शरीराचा विकास पूर्ण आहे. मुलाचा सारखा विकास होऊन माणूस तयार होतो. सर्वांचा विकास सारखा आणि एका विशिष्ट पद्धतीनेंच व्हावयाचा, म्हणून माणूस पूर्ण आहे. वनस्पति शरीर पूर्ण नाहीं. शरीराचें मापन करण्याची आयुर्वेदाची पद्धत म्हणजे ते त्याच्याच अंगुलीनें करावयाचें. इंचांत अगर फुटांत नाहीं. शरीरांतील वस्तूंचें वर्गीकरण दोष, धातु व मलांत केलें. याखेरीज जो पदार्थ आढळेल तो वरील वर्गीकरणांत बसावयाचा. जसें धातु-उपधातु, वसा म्हणजे मांसाचा स्नेह इत्यादि.

१३ वस्तूंचें शरीर

रंग ७ आहेत. चवथा रंग नाहीं. चवथा रंग हें मिश्रण होय. सर्व अंकगणित एकापासून शून्यांत, किंवा रागदारी जशी सप्तसुरांतच आहे. त्याप्रमाणें सर्व शरीर हें १३ वस्तूंचेंच बनलें आहे. हें वर्गीकरण पूर्ण आहे.

सर्वांना एकच नियम लागू नाहीं

सर्वांना एकच, हा नियम आयुर्वेदा[...] तीन दोषांचा तीन प्रकृति आहेत. प्रत्येक [...] माणसाचा आहार निराळा व विहार निराळा[...] प्रकृतीच्या माणसाला उन्हांत हिंडण्यानें त्रास नाहीं, पण पित्तप्रकृतीच्या माणसाला उन्हा[...] होईल. कृश माणसाला व्यायाम नको, स्थूला[...] कृशाला भरपूर झोंप हवी, तर स्थूलाला रात्री जागरण करावयास हवें. दांत घासण्याच्या देखील रुई, वड, खैर अशा दोषानुरूप वापर[...] एकच टूथपेस्ट सर्वांना सारखी चालणार नाहीं[...] ही निरुपयोगीच, कारण मुख हें कफाचें स्थान, कडू तुरट रसाचींच द्रव्यें हवींत; गोड चालणार[...]

आहार किती घ्यावा?

आहार किती घ्यावा? सर्वांना एकच [...] नाहीं, जितका सुखानें पचेल इतका घ्यावा. [...] यावत् विजीर्यति) हेंच आहाराचें प्रमाण। [...] (स्वभाव गुरु) कमी खावे. हलके देखील प्र[...]

सांड
प्रेग-युटेरो
गर्भिणी-गर्भ-रक्षक
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द.कृ.सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई
[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. पी. बर्वे अँड को., [...]
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक [...]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खावें, पचतांना कोणत्याच प्रकारचा त्रास होणार नाहीं इतकें खावें. पुनः आहार किती घ्यावा, याचा विचार करतांना प्रत्येक पदार्थाचें प्रमाण किती घ्यावें व सर्व मिळून आहार किती घ्यावा, याचा विचार केला पाहिजे. प्रत्येक पदार्थाचें पचन समजून घेतलें पाहिजे. तसेंच कोठ्याचा विचार केला पाहिजे. एकाद्याच दूध पचतें, एकाद्याला जुलाब होतात, तर एकाद्याच्या पोटांत वात धरतो.

प्राणिज पदार्थ शरीराला जवळचे

दूध, तूप, मांस इत्यादि प्राणिज पदार्थ हे शरीराला सर्वांत जवळचे पदार्थ; वनस्पती या त्याहून दूरच्या, तर शरीराला सात्म्य करून घेण्याच्या दृष्टीनें खनिज पदार्थ हे सर्वांत अधिक लांबचे, म्हणूनच भस्में वगैरे हीं संवयींच्या असलेल्या अशा मध, तूप दूध इ. अनुपानांतून घ्यावयाचीं. या वस्तूंची शरीराला संवय आहे. माणूस मांसाहार व वनस्पत्याहार दोन्हीं पचवूं शकतो. त्याचा जठराग्नि तशा प्रकारचा तयार झालेला आहे, परंतु मांसाहारी हिंस्त्र जनावरें वनस्पत्याहार पचवूं शकणार नाहींत. कारण मांसापेक्षां वनस्पति-अन्न हें शरिराच्या दृष्टीनें दूरचेंच आहे. मांसांत देखील वनस्पत्याहारी जनावराच्या मांसापेक्षां मांसाहारी जनावरांचें मांस हें अधिक जवळचें. म्हणून शरीरपुष्टीला मांसादमांस हें अधिक प्रशस्त.

आल्याचे रसवीर्यविपाक

द्रव्यांचे गुणधर्म समजून घेणें फार महत्त्वाचें आहे. रस, वीर्य, विपाक आणि प्रभाव प्रत्येक द्रव्याचा समजून घेतला पाहिजे. कांहीं द्रव्यांतील रस हा कार्यकारी असतो, कांहींचा विपाक कार्यकारी असतो, कांहीं द्रव्यांतील वीर्यानें कार्य होत असतें. द्रव्य पचून विपाक झाला कीं रसाचें कार्य संपतें. आल्याचा रस तिखट असून, विपाक मधुर आहे, म्हणून रसानें कफघ्न असलेलें आलें, विपाकानें वातपित्तघ्न होतें. आल्यातील तिखट रस बलवान् नव्हता म्हणून त्याचा विपाक बदलला.

रसवीर्यविपाकविचार

द्रव्य खाल्यापासून पचन होईपर्यंत रसाचें कार्य, पचल्यापासून शोषण होईपर्यंत विपाकाचें कार्य, आणि तें द्रव्य शरीरांत असेपर्यंत वीर्याचें कार्य (वीर्य यावत् अधिवासात्). प्रभाव म्हणजे त्या द्रव्याचा आचिंत्य, अनाकलनीय असा विशिष्ट गुण; त्याला नियम नाहीं. तो गुण त्या द्रव्यांत कां याची कल्पना करतां येत नाहीं. कारण दंती आणि चित्रक रसवीर्यानें सारख्या गुणांची असून त्यांच्या कार्यांत फरक आहे. दंतीमूळ रेचक आहे तर चित्रक दीपक आहे. तूप हें अग्निवर्धक आहे, इतकें कीं (स्नेहमेव परं विद्यात् दुर्बलानलदीपनम्) असें त्याचें वर्णन, तर दूध हें आमवर्धक आहे. म्हणूनच चिकित्सकाचें द्रव्यगुणशास्त्र तयार हवें.

शरीराच्या दृष्टीनें औषधी कल्पांचा निरनिराळा उपयोग होतो. कल्क हा आमाशयावर कार्य करतो. काढा हा आंत्रावर उपयोगी आहे, तर आसवारिष्टें हीं मध्यम मार्गावर उपयोगी पडतात.

शोधन चिकित्सा ही खरी चिकित्सा

नुसत्या पुड्या देणें ही आयुर्वेदीय चिकित्साच नव्हे. शोधन चिकित्सा ही खरी चिकित्सा. आजकाल आयुर्वेदीय चिकित्साच होत नाहीं. आयुर्वेदाची खरी चिकित्सा म्हणजे पंचकर्म चिकित्सा.

प्राणिज द्रव्यांच्या नाविन्यपूर्ण चिकित्सेनें आरोग्य मिळवून नवचैतन्य प्राप्त करा. फक्त ७ ते १४ दिवस घेतल्यानंतर चमत्कार पहा. ह्याच त्या गोळ्या "मिश्र शक्तिसागर"
१४ गो. २ रु., ४२ गो. रु. ४ ट. ख. वेगळा यावरोबरच "रजि. युनानी तिला" वापरल्यास सोन्यांत सुगंध समजा. लहान बा. २॥ रु. मोठी बा. ४ रु., ट. ख. अलग.
मिश्र महाराष्ट्र फार्मसी (रजि.)
ब्रह्मपुरी (चांदा) म. प्र.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्नेहनानें दोष सैल होतात

स्नेहन-स्वेदन करून वमनविरेचनादिकांनीं शरीरांतील दोष बाहेर काढून टाकावयाचे आणि त्यानंतर उरलेल्या दोषांचें शमन करावयाचें. स्नेहनानें धातूंत (टिशू, सेल, सेलचें शरीर यांमध्यें) चिकटून बसलेले दोष सैल होतात आणि स्वेदनानें ते पातळ होऊन कोठ्यांत आणले जातात. आजहि मलतपासणींत रक्ताचे पांढरे तांबडे कण सांपडतातच. अशा रीतीनें स्नेहन-स्वेदनानें कोठ्यांत आणलेले दोष आमाशयस्थ असल्यास वमन द्यावयाचें. वास्तविक वमन हें नैसर्गिक नव्हे, परन्तु दोष शक्य तितक्या लवकर शरीराबाहेर टाकले पाहिजेत, म्हणून वमन द्यावयाचें. शरीरानें एकदां नको म्हटलेला दोषरूप, शल्यरूप झालेला पदार्थ शरीरांत राहिल्यास विकृति निर्माण होतात म्हणून शोधन चिकित्सा ही महत्त्वाची. वमन देतांना आशयाचा, धातूचा, प्रकृतीचा विचार करून दिलें तें पाहिजे, सर्वांना एकच औषध वा योजना आयुर्वेदांत नाहीं. वमनाचें कार्य आमाशयावर, विरेचनाचें व बस्तीचें कार्य पक्वाशयावर, व नस्याचें कार्य मस्तकावर होतें.

लंघन केव्हां द्यावें ? व किती द्यावें ?

लंघन दिल्यानें प्रथम आमाशयांतील अन्न पचतें आणि नंतर आम पचतो. आमपचन झाल्यावर लंघन बंद केलें पाहिजे; नाहीतर धातुपचनाला सुरवात होईल. (आहारमग्निः पचति, दोषान् आहारवर्जितान् । धातून् क्षीणेषु दोषेषु). धातूंचें पचन होणें इष्ट नाहीं, कारण शरीरांतील अत्यन्त महत्वाचा पदार्थ म्हणजे धातु. त्यांना धक्का लागतां कामा नये. धातूंचा क्षय झाल्यास जीवितच नष्ट होईल, इतकें धातूंचें महत्त्व आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

वाग्भटाचा काल, बुद्धकाल

वाग्भटाचा काल हा बुद्धकाल असल्यानें अहिंसाधर्मामुळें शस्त्रक्रिया व शवविच्छेदन हीं आजिबात नष्ट झालीं. अर्थातच शरीराची अंतर्रचना डोळ्यांनीं प्रत्यक्ष दिसण्याचें साधन नष्ट झालें आणि याचाच परिणाम वाग्भटाच्या शारीररचनेवर झाला. प्रत्यक्षापासून अशा रीतीनें दूर केल्यामुळें त्यांचें शारीरस्थान चांगलें नाहीं. शास्त्रांत आढळून आलेली माहिती प्रत्यक्षांत पडताळून पाहणें अशक्य झाल्यानें शारीर हा विषय पुढें पुढें नुसता सांगण्याचाच राहिला.

वाग्भटाच्या शारीरांत दोष आहेत

राजाज्ञेनें शस्त्रक्रियेला बंदी झाल्यामुळें त्यावेळी शस्त्रक्रियेचा रोगी आल्यास वैद्यांना सांगावें लागे कीं "बाबारे, हा विकार शस्त्रसाध्य आहे, परंतु राजाज्ञेमुळें मला मात्र शस्त्रक्रिया करतां येणार नाहीं. माझा नाइलाज आहे." या सर्वांचा परिणाम प्रत्यक्ष शारीर शास्त्रांतून अजिबात गळलें. वाग्भटाचें शारीरस्थान उत्तम नाहीं, येवढेंच नव्हे तर त्यांत दोष निर्माण झाले आहेत.

माहिती देण्याचे दोन प्रकार

शरीराची माहिती दोन प्रकारें सांगतां येईल, जसें नाक हें (बाहेरील शुद्ध हवा आंत घेण्याचें व आंतील वाईट हवा बाहेर टाकण्याचें साधन आहे) फुफ्फुसद्वार आहे. हें जें दिसलें तें सांगितलें, पण नाक हें मस्तकाचें द्वार आहे (नासा हि शिरसो द्वारं) हें चिकित्सेच्या दृष्टीनें सांगितलें. ऊर्ध्वजत्रुगतविकारांत नस्याचें कार्य होतें; तेथील औषधोपचार नाकांतून करावयाचा. चिकित्सकाला शारीराचें व शारीरक्रियेचें संपूर्ण ज्ञान असेल तरच त्याला रोगविनिश्चय करता

'आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार'

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेली सर्वप्रकारचीं सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहाः—

आयुर्वेदिक औषधी भांडार

२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

योग्य औषधोपचार करतां येईल. वैद्यकांत शारीराचें इतकें महत्व आहे.

निसर्ग व मानव यांचा झगडा

निसर्ग व मानव यांचा सतत झगडा चालू आहे. माणूस पराभूत होतो तेव्हां त्याचेवर व्याधींचें आक्रमण होतें.

लक्षणें हे रोगमार्गावरील कंदिल होत

दोषनिरूपण म्हणजे निदान. निदान म्हणजे रोग्याचें शरीर वाचणें. लक्षणें हे रोगमार्गावरचे कंदिल आहेत. त्यांच्या अनुरोधानें जाऊन रोग आणि रोग-मार्ग निश्चित करावयाचा. प्रथम रोगाची परीक्षा (रोगमादौ परीक्षेत) नन्तर औषधोपचार (ततोऽनन्तरमौषधम्) अर्थातच शरीरावरचीं लक्षणें वाचण्या-इतकें, त्याचें योग्य ग्रुपिंग करण्याइतकें शास्त्र तयार असेल तरच निदान करतां येईल. पूर्वी वर्णन केलेल्या कोणत्या ग्रुपमधील कोणत्या दोषांचीं लक्षणें आधि-क्यानें आहेत? रोगाला सुरवात कधींपासून झाली? कशी कोणतीं झालीं? विकार कोणता आहे? त्याची प्रमुख लक्षणें कोणतीं आहेत? तसेंच होणाऱ्या विकारांत दोष-चिन्हें कोणतीं? धातुचिन्हें, उपधातु-चिन्हें, अवयवचिन्हें, मलचिन्हें यापैकीं कशाकशाचीं चिन्हें अधिक आहेत हें पहावें. दाह हें पित्तदोष-चिन्ह, शूल हें वायुदोषचिन्ह, अंगमर्द मांसधातु-चिन्ह, उलटी हें अवयवचिन्ह (आमाशय), कंप हें उपधातु (स्नायु) चिन्ह. याप्रमाणें वर्गीकरण करून कोणतीं चिन्हें अधिक आहेत तें पाहावें. ग्रुपिंगचें महत्व फार आहे. दोषांचा ग्रुप ठरविण्यासाठीं त्या ग्रुपमधील ३।४ हून आधिक चिन्हें हवींत, तेव्हां तो विकार त्या ग्रुपचा आहे असें म्हणतां येईल.

रोगाची अवस्था ठरविणें महत्त्वाचें

चिकित्सकाला रोगाची अवस्थाच ठरवावयाची असते. रोगाचें प्रमुख चिन्ह रोगी बहुधा सांगतच येतो. ताप आला आहे. अतिसार झाला आहे. परन्तु त्याची अवस्था कोणती आहे, हें वैद्यानें ठरवावयाचें आणि तेंच महत्वाचें होय.

धातूंचें सारासारत्व

रोग्याच्या शरीराचें सारासारत्व पाहावें. कारण जो धातु अबल असेल त्याचेच रोग होतात. रोग होण्यापूर्वीचें शरीर व त्याची स्थिति, आणि नंतर पडलेला फरक लक्षांत घ्यावा. रोगानें शरीरावयवाच्या नैसर्गिक आकारांतहि फरक पडतो.

निदान कसें करावें?

निदान करतांना रसरक्तादिक दूष्यें, त्यांचीं स्वाभाविक कार्यें, त्यांत झालेले बदल हे नीट पहावे. देशाचा विचार करावा. आनूपदेश असेल तर कफ-विकार जोरदार असणार, त्याला इष्ट गुण येणार नाहीं. तसेंच ऋतुकालाचा विचार केला पाहिजे. शरद् ऋतु हा पित्तप्रकोपाचा काल असल्यामुळें (पित्तं शरदि कुप्यति) या कालांत रक्तपित्ताचा विकार लवकर बरा होणार नाहीं. कदाचित् वाढेलहि. त्याचप्रमाणें रोग्याचें बल, त्याच्या अग्नीचें बल, रोगाचा जोर, त्याप्रमाणें रोग्याचें वय, त्याची प्रकृति वगैरेंबद्दल अत्यन्त बारकाईनें विचार करून निदान ठरवावयाचें असतें.

रोगोत्पादक दोषांची सुरवात

रोगोत्पादक दोषांची सुरवात कोठून झाली आहे हेंहि पाहावें लागतें. जसें अतिव्यायाम करून थकवा आला तर आपणांस असें म्हणतां येईल कीं, स्नायूं-पासून दोषांच्या बिघाडाला सुरवात झाली. तर अपचन झालें असतां प्रथम दुष्टि आंत्रांत होईल. याप्रमाणें सर्वतोपरी पूर्ण विचार करून रोगाच्या अवस्थांचा विचार करून नंतर औषधीयोजना करावयाची.

गुणांत सरस ठरलेलीं 'आयुर्वेद सेवा संघाचीं' अनुभविक औषधें व पुस्तकें मिळण्याचें ठिकाण—

मे. पंडित बंधु
औषधांचे व्यापारी
पो. सटाणा (नाशिक)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार–

दंतधावन व मुखधावन

" आपलें १५।३।५३ च्या रविवारच्या गांवकरी साप्ताहिकांतील दंतधावनविषयक लिखाण येथील ××× जींना फारच आवडलें. इतकें सूक्ष्म विवेचन-दोषदर्शन व षड्रस आहार चिकित्सा निवेदन कोणी हि केल्याचें आमच्या वाचण्यांत नाहीं....

पुढेंमागें या लेखांचें पुस्तक तयार झाल्यास लोकांचा फार फायदा होईल. —वैद्य के. कृ. मानेकर

मिश्रकाचा वेळ व त्रास

" आपणास नेहमीं लागणाऱ्या एक अथवा अनेक औषधांच्या मोठ्या माणसास ३।३ व लहान मुलास ४।४ अशा पुड्या एकत्र बांधून एक खोक्यांत खाने करून त्यांत ह्या पुड्या ठेवाव्यात, आणि त्या त्या खणावर त्या त्या पुड्यांचीं नांवें (शक्य तों आद्याक्षरें) लिहावीं म्हणजे वाचणाऱ्या रोग्यास तीं समजू नयेत.

अशा पुड्या करून ठेवल्यानें औषधें देतांना मिश्रकाचा वेळ आणि त्रास बराच वाचतो. आणि आणि रोग्यालाहि दवाखान्यांत अधिक वेळ बसावें लागत नाहीं. —एक चिकित्सक

उन्हाळा व विंचू

उन्हाळ्यांत खेडेगांवामधून विंचूदंशाचा उपद्रव फार तापदायक असतो. यावरील औषधें फारच थोडे लोक संग्रहीं ठेवतात. विंचू चावण्याची वेळ बहुधा रात्रीची असल्यामुळें त्यावेळीं झाडपाल्याची औषधी आणणेंसुद्धां शक्य नसतें.

खरे मांत्रिक दुर्मिळ

कांहीं मांत्रिक मंत्र घालून विंचू उतरविण्याचा प्रयत्न करतात; पण तो प्रयोग यशस्वी होईलच अशी खात्री देतां येत नाहीं. खरे मांत्रिकहि दुर्मिळ, बहाणा करणारेच फार.

विंचूविषांत फॉर्मिक ॲसिड

विंचूदंशांत फार्मिक ॲसिड आहे. निरनिराळ्या विंचवांत तें कमी जास्त प्रमाणांत असतें, ज्यामुळें हें ॲसिड निर्बल होऊ शकेल तो उपाय गुणकारी ठरेल.

तरी पत्रिकेच्या वाचकांपैकीं कोणास अनुभविक व संग्राह्य उपाय माहित असतील तर त्यांनीं ते प्रसिद्धीसाठीं पाठवून दुःखी जनांचा दुवा घ्यावा अशी नम्र विनंति आहे.

वैद्य— ग. कृ. पाठणकर

यंदाचा कडक उन्हाळा बाधक न होण्यासाठीं

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नाशिक या शिक्षण-संशोधन संस्थेंत झालेलीं—

उंची गुलकंद, डाळिंब पाक, मोरावळा, कंदर्पवृष्यपाक, प्रवाळभस्म (चंद्रपुटी), चंद्रकला, मौक्तिक भस्म, उशिरासव, चंदनासव इत्यादि उपयुक्त पित्तशामक औषधें सेवन करा.

रोग झाल्यावर दसपट औषधें खाण्यापेक्षां रोग न होण्यासाठीं प्रतिकारशक्ति वाढविणारीं एकपट औषधें सेवन करणें अधिक हितावह आहे.

रोगप्रतिकारशक्ति वाढविणारीं औषधें तयार करणें
हें आयुर्वेद सेवा संघाचें वैशिष्ट्य आहे.

आपल्या गांवांतील औषधि विक्रेत्याकडे " आयुर्वेद सेवा संघाच्या " औषधांची मागणी करा.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म. प्रां. वैद्य मंडळाचा दौरा —

रत्नागिरी प्रवासांतील कांहीं आठवणी

(लेखकः– वैद्य वि. म. पारकर)

रत्नागिरी जिल्ह्याच्या दौऱ्यास आम्ही मालवण-पासून प्रारंभ केला. कारण या गांवीं वैद्य बिंदुमाधव हे बालपणीं वयाच्या १३–१४ व्या वर्षी होते. तेथें ते अनंत शिवाजी टोपीवाला हायस्कूलमध्यें इंग्रजी चवथ्या-सहाव्या इयत्तेंत शिकले होते. आपण त्या शाळेंत पुनः जावें व तेथील अध्यापक व विद्यार्थी यांच्याशीं आयुर्वेदाबाबत चार शब्द बोलावेत अशी त्यांची इच्छा होती. मालवण येथें आम्ही सकाळीं ९। वाजतां पोहोचलो. बोटीवर आमच्या स्वागतासाठीं स्वयंसेवक उपस्थित होते. पहाटे ५ वाजतां यावयाची ती बोट सकाळीं ९ वाजतां आली.

मालवणांत वैद्य फारच कमी

मालवण येथील स्थानिक रहिवाशी वैद्य सदानंदपंत [illegible] आयुर्विद्याविशारद (पुणे) हे एकच विद्यालयीन पदवीधर वैद्य आहेत. दुसरे वैद्य जगज्जीवन झाल्ये हे निखिल भारत आयुर्वेद विद्यापीठाचे आयुर्वेद-[illegible] आहेत. याखेरीज या गांवीं असलेली वैद्य-मंडळी म्हणजे १९३८च्या कायद्यान्वयें रजिस्टर [illegible] झालेली. पण एकूण वैद्य फारच कमी आहेत असें आढळलें. या गांवीं १९१० पासून ॲलोपॅथिक प्रॅक्टिस करणारे डॉ. आजगांवकर हे भिषग्विलास आदि मासिकांचे ग्राहक व कांहीं आयुर्वेदीय औषधें वापरणारे असे आहेत. अध्यक्षांनीं त्यांच्याकडे जाऊन त्यांची भेट घेतली व दौऱ्याचा उद्देश सांगितला. मेडिकल ॲसोसिएशनची सभा घेण्यासाठीं पूर्वसूचना [illegible] होती व सरकारी मुलींच्या शाळेची इन्स्पेक्शन चालू होती, त्यामुळें हे कार्यक्रम होऊं शकले नाहींत.

दोन व्याख्यानें

त्याऐवजीं भरडावर मराठी सातवीच्या शाळेंत श्रीमती शांताबाई सावळे यांच्या अध्यक्षतेखालीं 'आरोग्य कसें राखावें !' यासंबंधीं व्याख्यान झालें. तसेंच सायंकाळीं ४ वाजतां टोपीवाला हायस्कूलमध्यें प्रिन्सिपाल सामंत यांच्या अध्यक्षतेखालीं दुसरें व्याख्यान झालें. शाळेच्या माजी विद्यार्थ्यानें बाहेरच्या जगांत प्रतिष्ठा मिळवून पुनः शाळेचें स्मरण ठेवून शाळेकडे आपण होऊन केलेलें आगमन या दृष्टीनें सर्वांनाच विशेष कौतुक वाटलें. दुःखाची गोष्ट अशी कीं ३३ वर्षांपूर्वीची इमारत याखेरीज पूर्वीचे ओळखीचे असे तेथें कोणीहि नव्हतें. आजचे तेथील मुख्याध्यापकहि अध्यक्षांच्यापेक्षां वयानें बरेच लहान होते.

वैद्य मंडळीशीं चर्चा

रात्रीं १२॥ वाजेपर्यंत वैद्यराज वझे यांच्या दवाखान्यांत वैद्यमंडळीशीं चर्चा झाली. यशस्वी आयुर्वेदीय चिकित्सेसाठीं चालू औषधीकरणांत बदल करावयास हवा आहे ही गोष्ट अध्यक्षांनीं वैद्यमंडळीच्या निदर्शनास आणली. आज उपलब्ध असलेलीं औषधें वैद्याच्या सर्व गरजा पुऱ्या करू शकत नाहींत. व निरनिराळी आशुकारी (विष) द्रव्यें शुद्ध करून त्यांचें औषधीकरण करून त्याचा प्रचार करण्याचा आपला मनोदय अध्यक्षांनीं व्यक्त केला. मालवण येथील कार्यक्रम यशस्वी करण्यास वै. वझे पतिपत्नींचें उत्तम साहाय्य व आदरातिथ्य लाभलें.

श्री. वसंत लाडोबा म्हापणकर

या मुक्कामांत मालवण येथील सुप्रसिद्ध ज्योतिषी वसंत लाडोबा म्हापणकर यांची अध्यक्षांनीं मुलाखत घेतली. श्री. म्हापणकर हे मालवणच्या राष्ट्रीय शाळेंत विद्यार्थी होते. व त्यांच्या वर्गांत अध्यक्षांचे धाकटे बंधु वैद्य सदाशिवराव पंडित (घोडनदी) हे १९२२ सालीं होते. मालवण येथील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुप्रसिद्ध वैद्य महेश्वरशास्त्री पुराणिक यांच्या सहवासांत श्री. म्हापणकर यांनीं १८ वर्षें घालविलीं आहेत व वै. महेश्वरशास्त्री यांची अध्यापनपद्धति, औषधीकरण, औषधीकरण इत्यादि संबंधीं माहिती आयुर्वेद पत्रिकेच्या वाचकांना लेखरूपानें करून देण्याचें आश्वासन त्यांनीं दिलें आहे.

वेंगुर्ल्याचा कार्यक्रम

पहाटे ५ वाजतां उठून आम्ही मालवण बंदरावर येऊन बसलो व बोट १०॥ वाजतां बंदरांत आली. वेंगुर्ल्याला पोचण्यास १२ वाजले. बंदरावर वैद्यराज वेंगुर्ल्यांचे दि. कृ. मराठे व कोलगावचे श्री. सातवळेकर स्वागतार्थ आले होते व बोटीला विलंब लागला तरी उन्हांत थांबले होते. दौऱ्याच्या कार्यक्रमांत सकाळीं वेंगुर्ला व सायंकाळीं सावंतवाडी अशी योजना होती. वेंगुर्ल्यास वैद्यराज केळकर यांच्या दवाखान्यांत वैद्य मंडळींची बैठक १२ ते २ झाली. त्यासाठीं आजूबाजूच्या खेडेगांवाहून वैद्यमंडळी आली होती. फराळहि झाला. येथें संजीवनीगुटीमध्यें बिब्बयाचें तेल घालून केलेल्या आमवातारि गोळ्या आम्ही पाहिल्या. वैद्यराज मराठे यांच्या आसवारिष्टांच्या इंजेक्शनाबाबतची मिळालेली माहिती पत्रिकेंत मागें येऊन गेली आहेच.

कोलगांवची उत्साही सातवळेकर मंडळी

दुपारीं २॥च्या मोटारीनें आम्हीं कोलगांव येथें गेलो. कोलगांव हें सावंतवाडीच्या अलीकडे २ मैल असलेलें खेडें आहे. येथें सातवळेकरांचें पिढिजात वैद्यकीय घराणें आहे. त्यांचेपैकीं एकजण वैद्य पु. ग. सातवळेकर पुण्याचे आयुर्विद्याविशारद झाले आहेत. दुसरेबंधु रजिस्टर्ड आहेत. यांची एक अँग्लो आयुर्वेदिक फार्मसी आहे. कारखाना लहान पण फारच नीटनेटका आहे. आसवारिष्टांचीं पिंपें ठेवण्याची, तीं बंद करण्याची वगैरे सर्व व्यवस्था अनुकरणीय आहे. पिंपें बंद करण्यासाठीं त्यांनीं रबरी वाशर्स वापरले आहेत. त्यांना गोपीचंदन अगर कापड-मातीचा उपयोग करावा लागत नाहीं.

औषधी वनस्पतींची लागवड

सातवळेकरांचा विशेष म्हणजे त्यांनीं केलेली औषधी वनस्पतींची पद्धतशीर लागवड! कोरफड, चित्रक यांचे व्यवस्थित वाफे, त्यांना पाणी देण्याची व्यवस्था हें पाहून मन अगदीं प्रसन्न झालें. विकतच्या वाळलेल्या वनस्पती घेऊन केलेलें औषधीकरण यापुढें अगदीं फिकें वाटतें. भरपूर मोकळी जागा व निसर्गाच्या सान्निध्यांत औषधीकरण हें सर्वच मन वेधून घेणारें आहे. अधिक वेळ तेथें गमवावा असें वाटत असूनहि पूर्व नियोजित स्थानीं सभेच्यावेळीं तरी पोहोचावें म्हणून अगदीं जड पावलानें तेथून निघालो.

राणी जानकीबाई सूतिकागृह

सावंतवाडीस वैद्यराज गणपत्ये यांनीं सर्व कार्यक्रम आखून तो वृत्तपत्रांतून जाहीरहि केला होता. आमच्या मोटारींत जातां जातांच सर्व डॉक्टर-वैद्यमंडळींना घेऊन आम्ही प्रथम तेथील सुप्रसिद्ध सूतिकागृहांत गेलो. या सूतिकागृहाची व्यवस्था उत्तम आहे. मोफत, अर्धमोफत, पूर्ण फी देणारे व स्पेशल असे सर्व प्रकार येथें ठेवले आहेत. कामाला मदत म्हणून शिकाऊ मुलीहि येथें घेतात. त्यामुळें 'एक पंथ दो काज' याप्रमाणें सूतिकागृहाची प्रगति होत आहे.

सरकारी रुग्णालय, सांवतवाडी

सूतिकागृहाशेजारीसच तेथील सरकारी रुग्णालय आहे. पूर्वीं संस्थानचें मुख्य रुग्णालय म्हणून त्याचें महत्त्व होतें. आतां एक तालुका दवाखाना असें त्याचें स्वरूप राहिलें आहे. दवाखान्यावर एम्. बी. बी. एस. डॉक्टर आहेत पण रुग्णालयांत २।३ पेक्षां जास्त रोगी नव्हते. व तेहि पोलिस केस-साठीं माराहाण वगैरे प्रकाराचे असें कळलें. उत्तम सर्जन असल्याशिवाय ॲलोपॅथीचें रुग्णालय नुसत्या नवीन अननुभवी एम्. बी. बी. एस डॉक्टरांकडून चालूं शकत नाहीं असाच येथील सूर दिसला.

सार्वजनिक व्याख्यान, सावंतवाडी

तेथून आम्हीं व्याख्यानाचे जागीं (पूर्वीचे (राणी पार्वतीदेवी कॉलेज) गेलों. सभेचा हॉ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थानच पण पूर्ण भरलेला होता. त्यांत स्थानिक निवडक मंडळी, प्रमुख नागरिक, वकील, डॉक्टर, वैद्य, शिक्षक, संपादक अशी होती. अध्यक्षस्थानीं वैनतेय या साप्ताहिकाचे संपादक श्री. मे. द. (आबासाहेब) शिरोडकर हे होते. त्यांनीं प्रास्तविक भाषणांत सरकारनें मान्य केलेल्या मिश्र शिक्षणाची स्तुति केली व त्यामुळें आयुर्वेदाची प्रगति होत आहे असें सुचविलें. वै. बिंदुमाधव यांनीं आयुर्वेदाचा दृष्टिकोन ॲलोपॅथी व होमिओपॅथीपेक्षां निराळा व मूलगामी कसा आहे, तें सविस्तर मांडलें व मिश्र शिक्षणपद्धतीमुळें आयुर्वेदाची अपरिमित हानि झाली आहे, असें सांगितलें. समारोपात्मक भाषणांत अध्यक्षांनीं आपला समज चुकीचा होता हें कबूल केलें. सभेनंतर वैद्य बिंदुमाधव पंडित यांनीं कांहीं महत्वाचे रुग्ण तपासले व त्यापैकीं कांहीं डॉक्टर मंडळींच्या आप्तापैकीं होते.

एकत्र वैद्य भोजनाचा कार्यक्रम

रात्रीं ११॥ वाजतां वैद्य गणपत्ये याच्या घरीं परगांवहून आलेल्या वैद्यमंडळींचा एकत्र भोजनाचा कार्यक्रम झाला. दुपारीं १२ पासून रात्रीं १ पर्यंत सर्व वेळ अगदीं क्षणाची फुरसत नाहीं असा कामांत गेला.

पाडवा व कडुनिंब

वर्षप्रतिपदेच्या दिवशीं रोगनिवारणार्थ कडुनिंब व इतर पदार्थ यांचें भक्षण विहित सांगितलें आहे. याचे निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे पाठ दिसतात. पण प्रमाण मात्र कोणत्याच पाठांत दिलेलें नाहीं.

हिंदूंच्या सांस्कृतिक व वैद्यकीय दृष्टया हा प्रश्न फार महत्वाचा आहे. तरी याचा योग्य तो पाठ व प्रमाण कोठें सांगितलें आहे तें साधारण कळविण्याची कृपा करावी.

—कल्याणराव

ड्रग्ज कंट्रोल ॲक्टाची अम्मलबजावणी

१९५२ च्या बॉम्बे ड्रग्ज (कंट्रोल) ॲक्टाची अम्मलबजावणी करण्याचें काम आतां डायरेक्टर ऑफ एक्साइज ॲण्ड प्रोहिबिशन यांच्याकडे सोपविण्यांत आलें आहे.

ज्यांच्याजवळ नोटिफाईड औषधांचा ठराविक प्रमाणापेक्षां अधिक सांठा असेल अशा संबंधित व्यक्तींनीं, उत्पादकांनीं आणि विक्रेत्यांनीं ड्रग्ज कंट्रोलरांना सादर केलेलें डिक्लेरेशन आतां डायरेक्टर ऑफ एक्साईज ॲण्ड प्रोहिबिशन यांच्याकडे पाठविण्यांत आलें आहे. तेव्हां, यासंबंधींचा पत्रव्यवहार यापुढें डायरेक्टर ऑफ एक्साईज ॲण्ड प्रोहिबिशन यांच्याशीं करावा.

मुंबई राज्याचे ड्रग्ज कंट्रोलर, सर्व ड्रग्ज इन्स्पेक्टर आणि सर्व पोलिस इन्स्पेक्टर यांच्याशिवाय डायरेक्टर ऑफ एक्साइज ॲण्ड प्रोहिबिशन, मुंबई, यांचे खाजगी चिटणीस तसेंच सुपरिंटेंडेंट ऑफ एक्साईज आणि सब-इन्स्पेक्टर ऑफ एक्साइज या आणि याहून वरच्या दर्जाचे सर्व अबकारी अधिकारी यांचीहि सदरहू कायद्याखालीं इन्स्पेक्टर म्हणून नेमणूक करण्यांत आली आहे.

वैद्य-डॉक्टर्स व दुकानदार यांना
आयुर्वेद सेवा संघ नाशिकची
अनुभविक गुणकारी औषधें व पुस्तकें
कोल्हापूर येथें मिळण्याचें ठिकाण—
अंबा मेडिकल स्टोर्स
महाद्वार, कोल्हापूर

सातविणसाल
कडूपडवळ, दशमूळमरडा, मध, धायटीफुल व वनस्पतींचीं चूर्णें मिळतील.
सह्याद्रीतील वनस्पतींचा मोठा संग्रह. परुळेकर ब्रदर्स, मोंगललेन, मुंबई नं. १६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुंबई उपनगर वैद्य संमेलन, मुंबई

आयुर्वेदाला सरकारी प्रोत्साहन हवें, पैसा न दिला तरी चालेल।

पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणें रविवार ता. २२ रोजीं सकाळीं मुंबई येथें हिराबागेतील सभागृहांत मुंबई उपनगर वैद्य संमेलनाचें दुसरें अधिवेशन थाटानें पार पडलें. या संमेलनांत वैद्यरत्न शिवशर्माजी, वैद्य प्रतापकुमार, वै. गजाननजी शर्मा, वै. दामूभाई रामप्रसाद, वै. हिंमतलाल मुनी, वै. देव्हारे, वै. श्रीरामशर्मा, वै. ना. ह. जोशी, वै. दे. ल. आनंदे जे. पी., वै. आंबे, वै. शिंदे, वै चंद्रशेखर ठकर, वैद्य जयंतीलाल ठाकर, वै. हेमचन्द्र नरसीभाई वगैरे मंडळींनीं उत्साहानें भाग घेऊन कार्यक्रम यशस्वी केले व मुंबईतील वैद्यांची एकजूट करण्याचा प्रयत्न सुरू केला याबद्दल कोणालाहि आनंद झाल्याशिवाय राहणार नाहीं.

धन्वतरीपूजन व स्वागत

संमेलनाच्या प्रारंभीं धन्वन्तरीपूजनाचा कार्यक्रम झाला. नन्तर स्वागतगीत झालें. संमेलनाचें उद्घाटन करण्याची आरोग्यमंत्र्यांना विनंति वैद्यरत्न शिवशर्मांजी (अध्यक्ष नि. भा. वैद्य-संमेलन) यांनीं केली.

हें आमचें सौभाग्य आहे

पं. शिवशर्माजी म्हणाले— आपल्या इच्छा व आपलें कर्तव्य एकच आहेत असें क्वचित घडतें. आपल्या हृदयांत जें आहे तेंच मुखावाटें बोलावयास मिळणें नेहमींच शक्य होत नाहीं. पण मुंबई राज्यास लाभलेल्या आरोग्यमंत्र्यांना भाषणाची विनंति करतांना त्याच्याबद्दल माझ्या मनांत असलेला भाव व मुखांतून बाहेर पडणारे शब्द यांत तसू इतकेंहि अंतर नाहीं. मुंबईचे सॉलिसिटर्स हे भारतांतील सर्वांत हुषार असा बोलबाला आहे. त्यांत शान्तिलालजी हे शांतिपूर्वक ऐकून घेऊन आपल्या सूक्ष्म बुद्धीनें त्याचें ग्रहण करून न्याय देण्यांत कसूर न करणारे आहेत त्यांच्या हातून आयुर्वेदाला अन्याय होणार नाहीं.

पूर्वीच्या आरोग्यमंत्र्यांचा प्रसाद

पूर्वीच्या आरोग्यमंत्र्यांनीं इतक्या कांहीं विपरीत गोष्टी आधींच करून ठेवल्या आहेत कीं त्या पाडून त्या जागीं नवीन गोष्टी उभ्या करणें नव्या आरोग्यमंत्र्यांना सहजासहजीं जमण्यासारखें नाहीं.

रोग रूप बदलत आहेत

आजच्या ॲलोपॅथीच्या उपचारानें रोग समूळ दुरुस्त होत नाहींत. फक्त ते रूप बदलत आहेत. पूर्वी ते जन्तुजन्य रोग म्हटले जात, उपचारानन्तर आता ते धातु विघटनात्मक (डिजनरेटिव्ह) विकार असे स्वरूप धारण करीत आहेत. पेनिसिलिन, सल्फाड्रग्ज यामुळें मूत्रपिंड यकृत् हे अवयव न दुरुस्त होण्याइतपत बिघडतात.

पदवीधर वैद्यांची अनुकंपनीय दशा

आज आयुर्वेदाच्या सरकारमान्य कमिट्यांतून जे पदवीधर वैद्य नेमले जातात, ते आयुर्वेदाला तेथें होत असलेला अन्याय दूर करू शकत नाहींत. ते त्यांतील डॉक्टरांच्या तोंडाकडे (इशाऱ्याकडे) पाहूनच मतें देतात अगर वक्तव्य करीत असतात.

आयुर्वेदाला प्रोत्साहन हवें

आम्हांला सरकारकडून पैशाची अपेक्षा नाहीं. प्रोत्साहनाची आहे. एका चित्रकारानें एक चित्र काढून राजाच्या दरबारीं पाठविलें. राजानें चित्र न पाहतांच सर्व चित्रकारांना १०।१० हजार रुपये द्यावेत असा हुकूम सोडला. तेव्हां त्या चित्रकारानें आपलें चित्र परत नेलें. चित्र न पाहतां व त्यांतील माधुरी न चाखतां दिलेले पैसे त्याला नको होते. पुढें राजाला तें चित्र एका गरीबाच्या घरीं पहावयास मिळालें. त्या चित्रकारानें त्या गरिबाला ते चित्र का दिलें ? तर त्यानें तें चित्र पाहून 'क्या कमाल किया है' असें चित्रकाराला धन्यवादात्मक उद्गार काढले होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्रकाराचें कौशल्य !

एक तरुण स्त्री डोक्यावर पाण्याचा भरलेला घडा घेऊन जात आहे. व तिला वाटेंत पायाला काटा बोंचला आहे, घडा डोक्यावर तसाच ठेवून पायांतील कांटा काढण्यासाठीं तिनें शरीर कमरेंत वाकविलें. तें एक चित्र पाहतांच प्रेक्षकाच्या तोंडून वरील उद्गार निघाले. पैशापेक्षांहि अशा प्रोत्साहनाची आज आयुर्वेदाला जरूर आहे. "

गर्जंति न तु वर्षंति ।

आरोग्यमंत्री आपल्या उद्घाटनाच्या भाषणास प्रारंभ करतांना म्हणाले:- "वैद्यमंडळी म्हणत असतील कीं, हा मंत्री नुसता बोलतो. करीत कांहींच नाहीं 'गर्जंति न तु वर्षंति'. (कोरडे मेघ ज्याप्रमाणें गर्जना करतात पण पाऊस मात्र पडत नाहीं.) पण आयुर्वेदाविषयीं शाब्दिक सहानुभूति दाखविणें सोपें आहे. आयुर्वेदाला त्याची योग्य मानाची जागा मिळणें अवश्य आहे. त्यासाठीं मी प्रयत्न करीत आहे. जर तोंपर्यंत तुम्हांस त्याचें फल दिसत नाहीं तर सरकारला दोष देण्याचा तुम्हांस हक्क आहे.

एका मुंबईंत अनेक वैद्यसंस्था

५।७ दिवसापूर्वीं मला मुंबईतील दुसऱ्या एका वैद्यमंडळाचे लोक भेटले व त्या संमेलनाचें उद्घाटन करण्याची विनंति करूं लागले. एका मुंबईंत अनेक मंडळें व त्यांचीं अलग सम्मेलनें हें ठीक नाहीं. काठेवाडांत पूर्वीं १०० संस्थानें व २०० दिवाण होते. तसें हें आहे. पण आयुर्वेदाच्या क्षेत्रांत वैष्णव, शैव अगर प्रांतीय भेद असण्याचें कारण नाहीं.

एकच अखिल भारतीय संस्था असावी

सुरवातीला अनेक ठिकाणीं प्रारंभिक उपक्रम होतात पण पुढें त्या सर्वांनीं एकत्र येऊन संघटित झालें पाहिजे. सर्व हिंदुस्थानांत डॉक्टरांचें एकच मेडिकल असोसियेशन आहे तशीच वैद्यांची अखिल भारतीय एकच संघटना हवी. डॉक्टरांच्या संघटनेच्या प्रतिनिधीला आरोग्यमंत्र्याच्या परिषदेंत आमंत्रण दिलें जातें. तसेंच आमंत्रण मिळण्यासाठीं वैद्यांनीं संघटित प्रयत्न केला पाहिजे.

संशोधनाची दिशा ठरवून द्या

आयुर्वेदाचा दुसरा प्रश्न संशोधनाचा आहे. यासाठीं सरकारी मदत मिळणें अवश्य आहे, कारण १०० प्रयोग वाया जातील, त्याचा खर्च कोणती व्यक्ति अगर संस्था स्वतः सोसू शकेल ? पण वैद्य संघटनेला संशोधनाची दिशा ठरवून देण्याचें काम करतां येईल. संशोधन हें काम वैद्यांचें आहे. त्यासाठीं ब्राह्मणवृत्तीनें काम करणारे वैद्य हवेत. त्यांत पैसे कमावण्याची वृत्ति असून उपयोग नाहीं.

ब्राह्मणवृत्तीनें कार्य करा

पेनिसिलिन ज्यानें शोधून काढलें त्यानें पेटन्ट नाहीं घेतलें. चरकाचार्यांनीं आपल्या औषधाचें पेटन्ट घेतलें नव्हतें. हुशार वैद्यांनीं केवळ पैसे कमावण्याची दृष्टि ठेवू नये. संशोधनाची दृष्टि ठेवावी. जगांतील १२-१४ संशोधक सध्या भारतांत आले आहेत. तें विशाल दृष्टीनें काम करीत आहेत. त्यांना आयुर्वेद माहित नाहीं.

रोगप्रतिबंधक शास्त्र वाढवा

भारतांतून परदेशांत वैद्यकीय शिक्षणासाठीं जे डॉक्टर जातात ते फक्त क्लिनिकल मेडिसिन (रोग्यांना औषधें देऊन बरे करण्याचें शास्त्र) शिकतात पण रोग न होणाऱ्या शास्त्राचा अभ्यास करणारा एकहि भारतीय विद्यार्थी आढळत नाहीं, असें इंग्लंडहून आलेल्या एका जबाबदार अधिकाऱ्यानें सांगितलें. प्रिव्हेन्टिव्ह मेडिसिनचे संशोधन करणारे लोक सरकारला हवे आहेत.

आयुर्वेदाला सरकारी पाठिंबा हवा

रोग न होतील अशी युक्ति सुचविण्याची शक्ति आयुर्वेदांत आहे अशी माझी श्रद्धा आहे. व आमच्या देशांत तरी आयुर्वेद हाच उपयुक्त ठरेल अशी माझी समजूत आहे. गेलीं २०० वर्षे पाश्चात्य वैद्यकाच्या वाढीला सरकारचा पाठिंबा मिळत गेला, आयुर्वेदाला तशी संधि न मिळाल्यामुळें आयुर्वेद मागें आहे असें मला वाटतें. माझ्या हातून तें काम पूर्ण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होईल असें मी मानत नाहीं. कारण ते एक दोन वर्षांचें काम नव्हे.

तुम्हा वैद्यांचें कर्तव्य

मात्र तें तुम्हा वैद्यांचें कर्तव्य आहे. राज्य सरकारतर्फे सर्व वैद्यकाबाबत समभाव ठेवणें एवढेंच माझ्या सरकारचें कर्तव्य आहे. आपल्या संघटनेतर्फे उत्तम लोक निवडून बोर्ड वगैरेवर पाठविले पाहिजेत. त्यांना कोणाचा विरोध होता कामा नये. निवडणुकीस कॅन्व्हासिंग यांची गरज पडतां कामा नये. असे उच्च कोटीचे लोक पाठविले पाहिजेत.

सर्व भारतांत एकसारखा अभ्यासक्रम हवा

आयुर्वेदाचा अभ्यासक्रम भारतांतील सर्व राज्यांतून एकच प्रकारचा राहिला व त्याला राज्य मान्यता मिळाली म्हणजे कोठलाहि मनुष्य कोठेंहि जाऊन काम करू शकेल. यासाठीं निखिल भा. आयुर्वेद महामंडळाच्या प्रतिनिधींनीं निरनिराळ्या राज्यांतील बोर्ड, फॅकल्टी व आरोग्यमंत्री यांची भेट घेऊन सर्वत्र एकच प्रकारचा अभ्यासक्रम मान्य होईल अशी खटपट केली पाहिजे.

आयुर्वेदीय फार्माकोपिया

औषधाच्या प्रामाण्यासाठीं औषधीपाठचिंतामणी बनविला पाहिजे. त्यालाहि सरकारची मदत लागेल, पण औषधी कारखानदारांनीं या कामीं मदत करून पुढाकार घेतला पाहिजे. औषधी कारखानदारांचें काम भागीदारांना नफा वाटणें एवढेंच नाहीं. दरसाल ५।५ हजार रुपये या कारखानदारांनीं दिले तरी काम होण्यासारखें आहे.

आयुर्वेदीय औषधांची अब्रू

आयुर्वेदीय औषधी द्रव्यांना ड्रगॲक्ट लागू केला जातो अशी तक्रार केली जाते. पण आयुर्वेदीय कारखानदार आपल्या कॅटलॉगमध्यें वनस्पतींचीं लॅटिन नांवें देतात, व त्यांत व्हिटॅमिन्स आहेत अशी जाहिरात करतात. त्यामुळें आयुर्वेदीय औषधांची अब्रू वाढतें, असें मला वाटत नाहीं. माझी वैद्य व फार्मसी यांना विनंति आहे कीं त्यांनीं आपलीं औषधें परकीय वैद्यकाच्या अब्रूवर विकू नयेत. आपण औषधांना इंग्रजी पद्धतींचीं नांवें देऊ नका. जुन्या वैद्यक ग्रंथांतील ज्या पाठाप्रमाणें औषध केलें असेल त्याचा उल्लेख करावा म्हणजे ड्रग ॲक्टचा त्रास होणार नाहीं.

आयुर्वेदाची प्रतिष्ठा कमी होते

तुम्हीं यंत्रांचा उपयोग केला तर त्यांच्यावरील सर्व निर्बंधांचा स्वीकार केला पाहिजे. टॅब्लेट (ती पोटांत विरघळली पाहिजे) चे नियम पाळावे लागतील. तुम्ही पेनिसिलीन, सल्फाड्रग्ज या माझी ना नाहीं. पण मी आपणास वैद्य मानणार नाहीं व ही औषधें वापरल्यानें आयुर्वेदाची प्रतिष्ठा कमी होते व अलोपॅथीची प्रतिष्ठा वाढते अशी माझी समजूत आहे.

गरीब राहिलो तरी चालेल

मी गरीब राहिलो तरी चालेल पण आयुर्वेदीय पद्धतीनेंच चिकित्सा करीन, अशा धैर्याचीं माणसें आज देशाला हवी आहेत. तरच आयुर्वेदीय संशोधन व आयुर्वेदाची प्रगति होऊं शकेल. अशा नेत्यांचे कार्यकर्ते लाभले तरच आपणास कांहीं काम करून दाखविणें शक्य होईल.

सरकार हें एक तंत्र आहे

सरकार हें एक तंत्र आहे. तें तसेच चालू रहावें लागतें. तें एकदम बदलणें शक्य नसतें. मी तें सहन करीत आहे. तुम्हीपण सहन करा. मात्र या संमेलनांत नुसत्या सरकारी कायद्याबद्दल चर्चा करीत राहू नका. इतर महत्त्वाच्या गोष्टीकडे लक्ष पुरवा.

एक अधिकृत नियतकालिक

आपल्या सर्व वैद्यांचें एक अधिकृत असें नियतकालिक असलें पाहिजे. अनेक नियतकालिकें वाचण्यास वेळ मिळत नाहीं. सध्यां अनेक आयुर्वेदाचीं मासिकें मजकडे येतात. नियतकालिकाचे लेख भारदस्त असावे. त्यासाठीं एक सर्वमान्य संपादकमंडळ नियुक्त करावें.

त्यानंतर स्वागताध्यक्ष व अध्यक्ष यांचीं भाषणें झालीं.

— — —

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दक्षिण सातारा जिल्हा वैद्य संमेलन, सांगली

अध्यक्ष वैद्य बिंदुमाधवशास्त्री पंडित यांचें भाषण

संगच्छध्वम् । संवदध्वम् । सं वो मनांसि जानताम् ।

श्री. स्वागताध्यक्ष व बंधुभगिनींनो— आज येथें भरणाऱ्या दक्षिण सातारा वैद्य संमेलनाचें अध्यक्षस्थान देऊन आपण माझा गौरव केला व मला आपली सेवा करण्यास पाचारण केलें याबद्दल मी आपला ऋणी आहे.

म. प्रां. वैद्य मंडळातर्फे काढलेल्या दौऱ्यांत मला एक गोष्ट स्पष्टपणें दिसून आली ती अशी कीं, १९४४ नंतर सरकारमान्य आयुर्वेद महाविद्यालयांतून पास झालेले डी. ए. एस्. एफ्. पदवीधर हे आपल्या चिकित्सेंत ॲलोपॅथिक विचारसरणीचा व औषधांचा प्राधान्यानें उपयोग करतात. त्यांच्या दवाखान्यांत आयुर्वेदीय औषधें आढळून येत नाहींत. "आम्हांला आयुर्वेद शिकविला जात नाहीं, त्या पद्धतीनें आम्हांस निदान करतां येत नाहीं, आयुर्वेदीय औषधें वापरण्याची माहिती नाहीं व त्यांचा गुणहि येत नाहीं" असें ते पदवीधर सांगतात. याचा अर्थ असा कीं, ॲलोपॅथी व आयुर्वेद एकाच वेळीं शिकविण्याचा महाराष्ट्रांत गेलीं ५० वर्षें चाललेला प्रयोग संपूर्णपणें फसलेला आहे. या शिक्षणसंस्थांतून नामांकित तर राहोच, पण सामान्य असे आयुर्वेदीय चिकित्सक सुद्धां निर्माण होऊं शकले नाहींत. गतवर्षापासून सुरू झालेल्या, इंटरसायन्सनंतर ॲलोपथीशिक्षणप्रधान डिग्री कोर्सनें ही स्थिति आणखी विपरीत होणार आहे. आज वैद्यांचीं मुलें आयुर्वेदाचा शिक्षणक्रम घेऊं शकत नाहींत. ज्यांना ज्यांना एम्. बी. बी. एस्. च्या कॉलेजमध्यें प्रवेश मिळत नाहीं अशी आर्थिक दृष्ट्या संपन्न मुलेंच ॲलोपॅथिक डॉक्टर बनण्याचा एक आडमार्ग म्हणून आयुर्वेद महाविद्यालय हें नांव धारण केलेल्या संस्थांत जातात.

सर्व बाजूनीं विचार करतां आयुर्वेदाला सध्यां फारच विपरीत अशी स्थिति प्राप्त झाली आहे. केवळ आयुर्वेदाचा संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण करून चिकित्सा व्यवसाय करण्यास या प्रांतांत बंदी आहे. ब्रिटिश राजवटींत खालसा प्रांतांतून नाहीं तरी शेकडों संस्थानिकाकडून आयुर्वेदास आश्रय मिळत होता. तोहि आतां नष्ट झाला आहे. व सर्व देशावर डॉक्टरांच्या चिकित्सा—कौशल्यानें भारल्या गेलेल्या जनतेची राजसत्ता सुरू आहे. अशावेळीं या देशाचें वैद्यक म्हणून ॲलोपॅथीचा स्वीकार करावयाचा काय, व आयुर्वेदाला एक विस्मरणीय चिकित्साशास्त्र ठरवायचें कीं काय असा प्रश्न आपल्यापुढें आहे.

भारताच्या व मुंबई प्रांतांच्या पंचवार्षिक विकास योजनेंत आयुर्वेदाला स्थान नाहीं, सबब प्रांतीय अगर मध्यवर्ति सरकार आयुर्वेदाच्या प्रगतीकरितां कांहीं करील अशी आशा आपण करणें व्यर्थ आहे. जनतेच्या आरोग्यासाठीं आयुर्वेदीय चिकित्सकांची आवश्यकता सरकारला वाटत नाहीं. व त्यावर थोडाहि खर्च करण्यास तें तयार नाहीं. आज जो खर्च आयुर्वेदावर म्हणून दाखविला जातो तो सर्व पैसा डॉक्टरांच्या अध्यक्षतेखालीं नेमलेल्या समित्यांना दिला जातो, व त्याचा उपयोग ते ॲलोपॅथी पुष्ट करण्याकडे करतात. खेड्यांत डॉक्टर एस्. एम्. पी. मिळत नाहींत म्हणून नाइलाजानें अन्‌रजिस्टर्ड व अन्‌लिस्टेड लोकांना एस्. एम्. पी. च्या जागा दिल्या आहेत. वैद्यांना सरकारी दृष्ट्या एवढेंच महत्व आहे. त्याहि खेड्यांतील लोकांसाठीं वैद्यकीय साहाय्यक (ॲलोपॅथिक) तयार करण्याचा मध्य सरकारनें बेत केला आहे असें कळतें.

अशावेळीं आयुर्वेद हें जनतेच्या स्वास्थ्याचें शास्त्र आहे हें सिद्ध करण्याची जबाबदारी आपणावर आहे असें मला वाटतें. आज या देशांत एकहि नांव घेण्याजोगें आयुर्वेदीय चिकित्सालय अगर औषधालय नाहीं, हें सांगण्यास मला अत्यंत दुःख होतें. दिवसेंदिवस आपण अवनत होत आहोत व आयुर्वेदाच्या शास्त्रीय व्यवहाराची पीछेहाट होत आहे. या स्थितींतून मार्ग काढण्यासाठींच आपण येथें जमलों आहोत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारताच्या आरोग्यासाठीं ॲलोपॅथी हें वैद्यक शास्त्रच योग्य व पुरेसें आहे अशी आपली समजूत असल्यास, सरकारनें चालविलेल्या ॲलोपॅथीच्या प्रचारास हातभार लावणें, अगर उदासीन राहणें, एवढेंच आपलें काम राहील. पण जर आपली श्रद्धा अशी असेल कीं भारतासाठीं आयुर्वेद हेंच उपयुक्त आरोग्यशास्त्र आहे व त्याचें अध्ययन, अध्यापन व संशोधन मोठ्या प्रमाणावर या देशांत झालें पाहिजे, तर आपण त्यासाठीं नेटानें प्रयत्न केले पाहिजेत.

आयुर्वेदाच्या पद्धतीनेंच श्रेष्ठ दर्जाच्या स्वास्थ्याचा लाभ करून देणें शक्य होईल अशी माझी श्रद्धा आहे. भविष्य काळांत केवळ ' रोग्यांना औषधें देणारा तो वैद्य ' ही परिभाषा विसरली जाईल, व इतःपर देशाला स्वस्थ जनतेचें स्वास्थ्य टिकविण्यासाठीं मदत करणाऱ्या मंडळींचीच (Health Service) अधिक गरज लागणार आहे. अशा वेळीं आयुर्वेदाच्या ऋतु, अहोरात्र, वय, आहारद्रव्यें, निद्रा, मैथुन व रसायन-कल्प यांच्या विषयींच्या शोधांचा जनतेला फार मोठा उपयोग होणार आहे. ॲलोपॅथीला ज्यांचा शोध अद्याप लागलेला नाहीं अशा पथ्यापथ्यासारख्या किती तरी गोष्टी आजहि आयुर्वेदांत आहेत, व तशाच आणखी शोधण्याची बुद्धिहि—जी गेल्या हजारो वर्षांच्या मुसलमानी व आंग्ल पारतंत्र्यांत आवृत झाली होती ती-आमच्या ठिकाणीं आहे व तिचा उपयोग आम्हांस करावयाचा आहे.

आयुर्वेदाच्या उत्कर्षासाठीं दुसऱ्यावर विसंबून न राहतां आयुर्वेदीयांनीं पुढील गोष्टी अविलंबानें केल्या पाहिजेत.

१ मिश्रशिक्षणपद्धतीचा नाद संपूर्णपणें सोडला पाहिजे.

२ केवळ आयुर्वेदाच्या शिक्षणाच्या सोयी, आयुर्वेदाचीं उत्कृष्ट रुग्णालयें, शुश्रुषालयें, सूतिकागृहें, व प्रभावी औषधीनिर्मितिशाला सुरू केल्या पाहिजेत व त्या चालविण्यासाठीं जनताजनार्दनाकडून सर्व प्रकारचें साहाय्य मिळविणारे निष्ठेचे आयुर्वेदप्रचारक आपल्यांतून पुढें आले पाहिजेत.

३ आपण आपली संघटना बलवान् केली पाहिजे. योग्य नेत्याची निवड करून आपण आपल्यांतील फुटीर वृत्तीचा त्याग केला पाहिजे.

४ आयुर्वेदाच्या पायाशुद्ध अध्ययनासाठीं त्याच्या पायाभूत शास्त्रांचें, न्याय–मीमांसा–सांख्य यांचें, शिक्षण आवश्यक केलें पाहिजे.

५ डॉक्टरमंडळी कितीहि अनुकूल भासली तरी त्यांना या चळवळीच्या नेतृत्वापासून दूर ठेवलें पाहिजे.

६ आयुर्वेदांतील स्वास्थ्यसंवर्धक विचारांचा प्रसार जनतेंत लेख, व्याख्यानें, चर्चा, कीर्तनें, उत्सव, इत्यादिद्वारा केला पाहिजे.

७ केवळ सर्व सामान्य वैद्य निर्माण न करितां, उपस्थाता, कल्पद, सेविका, साविका, शुश्रूषिका, सूपकार, इत्यादि प्रकारचे आयुर्वेदीय विचारसरणीचे लोक तयार केले पाहिजेत. व ते जनतेंत पसरले पाहिजेत.

८ आयुर्वेदांत दोषधातुमलविचाराला विशेष प्राधान्य आहे, सबब पित्तदोषचिकित्सक, रक्तधातुचिकित्सक, स्वेदमलचिकित्सक असे एकेक विषयाचे तज्ञ निर्माण करण्याचा व त्यांना त्यांना आवश्यक तीं सर्व औषधें, यंत्रें, शस्त्रें, गृहें निर्माण करून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

९ केवल ताप खोकल्याचीं औषधें देण्यांत भूषण न मानतां आयुर्वेदांतील क्षारकर्म, अग्निकर्म, रक्तस्रुति, बस्तिकर्म, आश्च्योतनाविधि इत्यादि विविध कर्मांचें विशेष अध्ययन करून त्यांच्या सोयी जनतेला करून दिल्या पाहिजेत.

१० आधुनिक शस्त्रचिकित्सेनें वैद्यांनीं बुजून जाऊ नये. आयुर्वेदीयांनीं आपलें शल्यतंत्र विकसित करून तें जनतेच्या गरजा दूर करण्यास समर्थ बनविलें पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

११ आपल्याला परमेश्वरानें जी शक्ति, बुद्धि व काल दिला आहे तो आयुर्वेदाच्या उत्कर्षाकडेच उपयोगांत आणीन असा निश्चय केला पाहिजे.

१२ कोणाहि कार्यकर्त्यांचे पाय न ओढतां संघटना कशी वाढेल इकडेच आपल्या बुद्धीचा उपयोग केला पाहिजे.

१३ केवल ग्रंथांतरींच्या ज्ञानावर अवलंबून न रहातां जनतेंत जें औषधोपचाराचें ज्ञान बिखुरलेलें आहे, तें मिळविण्याचा व शास्त्रीय परिभाषेंत प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

१४ आपलें आयुर्वेदविषयक ज्ञान नित्य वाढावें यासाठीं रोज आयुर्वेदाचा स्वाध्याय, निदान ५ श्लोक, वाचल्याशिवाय अन्नग्रहण करावयाचें नाहीं असा निश्चय केला पाहिजे.

१५ आपल्या सान्निध्यांत असलेल्या बंधुभगिनींना आयुर्वेदाचे सिद्धांत वेळोवेळीं समजावून दिले पाहिजेत.

१६ सरकारनें खेडेगांवांतून वैद्यकीय व्यवसाय करण्यास परवानगी ठेवली आहे. प्रत्येक खेड्यांत एक आयुर्वेदीय चिकित्सक, त्या गांवच्या स्वास्थ्यासाठीं झटेल असा निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

१७ ग्रामसफाई, योग्य कालीं दोषांचें पाचन व शोधन, व दोषानुरूप रसायनकल्पांचें सेवन इत्यादि आयुर्वेदीय उपायांनीं जनतेच्या स्वास्थ्याची वृद्धि केली पाहिजे.

१८ जनतेची खरी सेवा करून तिचें प्रेम, विश्वास संपादन केला पाहिजे.

१९ आपल्याभोंवती नैसर्गिकपणें विपुल असलेल्या वनस्पतींच्या औषधी गुणधर्मांचा पूर्ण अभ्यास करून त्यांचा आपल्या चिकित्सेंत अधिकाधिक उपयोग केला पाहिजे. त्यामुळें जनतेला स्वस्त औषधें देणें वैद्याला परवडेल व वैद्य गरिबांना मोफत औषधें देऊं शकेल.

२० स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर इंग्रजी भाषा, पेहेराव वगैरे अनवश्यक गोष्टींचा त्याग केला, व हिंदी भाषा, भारतीय संगीतकला यांच्या उत्कर्षासाठीं आपण झटूं लागलों, त्याचप्रमाणें भारताच्या उत्कृष्ट व स्वाधीन वैद्यकासाठीं झटणें हें आपलें कर्तव्य आहे, असें आपण मानलें पाहिजे.

२१ ॲलोपॅथी व होमिओपॅथीचा उत्कर्ष करण्यासाठीं दुसरे देश आहेत. आयुर्वेदाचा उत्कर्ष आयुर्वेदाच्या मातृदेशांतच अधिक लौकर होऊ शकेल. आई ज्याप्रमाणें अशक्त, आजारी मुलाकडे विशेष लक्ष देते त्याप्रमाणें आपण मातृभावानें आयुर्वेदाची सेवा केली पाहिजे.

२२ जो ॲलोपॅथींत नाहीं वा होमिओपॅथींतहि नाहीं असा उत्कृष्ट पथ्यापथ्यविचार आयुर्वेदांत आहे. त्याचा अभ्यास करून प्रचार केल्यास आयुर्वेद सर्वमान्य होण्यास विलंब लागणार नाहीं.

२३ शहरांतूनहि धर्मार्थ औषधालयें चालविण्यास कायद्यानें बन्दी नाहीं. ही गोष्ट लक्षांत घेऊन उत्कृष्ट केवल आयुर्वेदीय चिकित्सकांना जनतेच्या उदार आश्रयावर शहरांतून धर्मार्थ औषधालयें चालवितां येतील असा प्रयत्न आपण केला पाहिजे.

२४ ग्रामपंचायती, नगरपालिका, जिल्हा लोकलबोर्ड, कायदेमंडळें व लोकसभा इत्यादि प्रातिनिधिक संस्थांत वैद्यांनीं प्रवेश केला पाहिजे.

'आयुर्वेदाची प्रगति करणें हें सरकारच्या हातीं नाहीं, ते आयुर्वेदीयांच्या हातीं आहे' असा इषारा केंद्राच्या आरोग्यमंत्र्यांनीं नुकताच मुंबई येथें दिला आहे. यांतील तत्व लक्षांत घेऊन आपण पुढें पाऊल टाकावें अशी माझी आपणास विनंति आहे.

अध्यक्षस्थान देऊन मला आपले विचार आपल्यासमोर मांडण्याची संधि दिली व आपण माझें भाषण शांतपणें ऐकून घेतलें याबद्दल मी आपला मनःपूर्वक आभारी आहे.

आयुर्वेदीय चिकित्सक रूपानें जनतेंत वावरणाऱ्या पुनर्वसु आत्रेयांना नमस्कार करून मी माझें भाषण संपवितो.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काढे टिकाऊ करण्याचा उपाय

तयार केलेले काढे टिकाऊ करण्यासाठीं आम्ही १ बाटली काढ्यामध्यें ४ वड्या कापूर टाकून ठेवतो. त्यानें काढा खराब होत नाहीं.

कर्पूरादि मिश्रण

ओव्याचें फूल (थायमॉल) १ भाग, पेपरमिंटफूल १ भाग, व कापूर १ भाग या तीन वस्तु बाटलीमध्यें एकत्र ठेवल्यास त्याचें पातळ द्रव्य तयार होतें. या अर्काचे ४ थेंब १ बाटली काढ्यांत टाकून ठेवल्यास काढा खराब होत नाहीं.

--वैद्य कृ. गो. माहिमकर

काळया तिळांचें तेल

अलीकडे शेंगदाण्याच्या तेलाचा वापर वाढता आहे व तिळाच्या तेलाचा वापर बराच कमी झाला आहे. सेवा संघ तिळाचें तेल स्वतः तीळ निवडून घेऊन तेल काढवितो व तें औषधीकरणांत वापरतो. पांढऱ्या तिळाप्रमाणेंच काळे तिळाचें तेल मुद्दाम काढण्याची सोय सेवा संघानें केली असून ते ५ रु. शेर या भावानें बाटलीतून विकलें जातें.

लोकाकडून काळया तिळाच्या तेलाबाबत चौकशी आल्यावरून वरील माहिती प्रसिद्ध केली आहे.

—आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

राजस्थानांत कर

राजस्थान राज्यामध्यें बाहेरून जी देशी आयुर्वेदीय औषधें विक्रीसाठीं येतात त्यावर राज्य-सरकार आज कर घेत आहे. हा कर घेतला जाऊ नये अशी विनंति आचार्य नित्यानंदजी यांनीं सरकारकडे केली आहे.

राजस्थानमधील जंगलांत निर्माण होणारी कची द्रव्यें विकत मिळण्यासाठीं कोटा, उदयपूर व सवाई माधवपूर येथें विक्रीकेंद्रें सरकारतर्फे काढावीत अशी मागणी करण्यांत आली आहे.

कर्पूरादि मिश्रणाचे अन्य उपयोग

उलटी, झाडा, कॉलरा यावर कर्पूरादि मिश्रणाचे ३।४ थेंब साखरेवर टाकून १।१ तासाच्या अंतराने २।३ वेळा अगर रोग बंद होईपर्यंत द्यावेत हटकून फायदा होतो.

अतिसार

२ अतिसारावर हे कर्पूरादि मिश्रण कुटजारिष्टा-मधून द्यावें २ तोळे कुटजारिष्टांत ३।४ थेंब टाकावेत.

दाढदुखी, खोकला

दाढदुखीवर कापसाच्या बोळ्यांतून लावल्यास तें दुखणें थांबतें. साधारण खोकल्याच्या उबळीवर साखरेतून ३।४ थेंब द्यावेत ३ उबळी थांबतात.

वाचकांचा पत्रव्यवहार—

माहिती हवी आहे

मी येथील सरकारी हॉस्पिटलमध्यें ॲनेस्थेटिस म्हणून काम करीत असतो. मला ॲनेस्थेशियाचा एखादा कोर्स पुरा करावयाचा आहे, तेव्हां माझे सर्व शिक्षण लक्षांत घेऊन जेथें मला प्रवेश मिळू शकेल असा एखादा कोर्स मुंबईस अगर अन्यत्र असल्यास माहिती हवी आहे. आयुर्वेदीय पदवीधरास प्रवेश देणारी अशा प्रकारच्या शिक्षणाची व्यवस्था कोठें असल्याचें माहीत असल्यास कळवावें.

—एक आयॉग्लवैद्यक पदवीधर

शेंदुर्णी येथें

श्री. मु. ग. राजहंस

यांजकडे आयुर्वेद सेवा संघ नासिकची सर्व अनुभवसिद्ध शास्त्रोक्त गुणकारी औषधें मिळूं शकतील. आपणहि एकवेळ वापरून गुणाची खात्री करून घ्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय औषधावरील आयातकर कमी करा

नासिक शहर वैद्य मंडळानें चालविलेले प्रयत्न

नासिक शहर वैद्य मंडळाचे अध्यक्ष वैद्य विष्णुशास्त्री दाते यांनीं पाठविलेल्या औषधी वस्तू-वरील आयात कराबाबतच्या पत्रकाला पुढील नेत्यांकडून उत्तरें आलीं आहेत:— १) राष्ट्रपति डॉ. राजेंद्र-प्रसाद यांचे सेक्रेटरी २) हिंदी पार्लमेंटचे सभापति श्री. मावळंणकर ३) श्री. काकासाहेब गाडगीळ ४) सातार्‍याचे पार्लमेंटमधील प्रतिनिधि श्री. अळतेकर वकील ५) डॉ. शामाप्रसाद मुखर्जी ६) बॅ. एन्.सी. चतर्जी ७) श्री. दुर्गाबाई देशमूख ८) डॉ. खरे ९) श्री. गोविंदराव देशपांडे १०) प्लॅनिंग कमिशन मिनिस्टरचे सेक्रेटरी ११) श्री. मुरारजी देसाईंचे सेक्रेटरी १२) आरोग्यमंत्री, मुंबई.

बहुतेकांनीं पाठिंबा दिला

बहुतेक सर्व जणांनीं या पत्रकाला आपला पाठिंबा दर्शविला असून त्याप्रमाणें त्यांनीं अर्थमंत्री देशमूख यांना कळवित असल्याचें लिहिलें आहे. नामदार मावळंणकर बाहेरगावी आहेत, तथापि एक सार्वजनिक कार्यकर्ता म्हणून या पत्रकास पाठिंबा देणें आपलें कर्तव्य आहे असें त्यांनीं म्हटलें आहे. मंत्रिमंडळांतील लोक या विनंतीला योग्य मान देतील अशी आशा त्यांनीं व्यक्त केली आहे. श्री. गाडगीळ यांनीं अर्थमंत्र्यांना हा प्रश्न समजाऊन सांगत असल्याचें लिहिलें आहे. श्री. अळतेकर वकील यांनीं अर्थमंत्र्यांशीं बोलणें करून मगच उत्तर पाठविलें आहे. याबाबतींत एक लेखी निवेदन त्यांनीं अर्थमंत्र्यांना सादर केलें आहे व पार्लमेंटमधील चर्चेच्यावेळीं यावर ते बोलणार आहेत असें त्यांनीं कळविलें आहे. केवळ औषधोपयोगी असलेल्या वस्तूंवरील आयात कर कमी होण्याची आवश्यकता या पत्रकानें उत्पन्न केलेल्या पार्लमेंटमधील वातावरणानें निर्माण झाली आहे.

शिष्टमंडळ व खलिता

"औषधी द्रव्यावरील आयात कर [illegible] सर्व आकडे व येणाऱ्या औषधी वस्तूंचें प्रमाण यासंबंधीं सर्व माहिती गोळा करावी व त्यांचें एक पत्रक तयार करून त्या खात्याच्या मंत्र्यांची शिष्टमंडळानें भेट घ्यावी. शक्यतो माहिती अखिल भारतीय स्वरूपाची असावी, निदान प्रांतीय असली तरी चालेल." अशी सूचना डॉ. श्यामाप्रसाद यांनीं केली आहे. त्यांच्या-कडे असें माहितीपूर्ण पत्रक आल्यास ते स्वतः याकामीं लक्ष घालण्यास तयार आहेत.

श्री. आळतेकर यांचें दुसरें पत्र

बॅ. चतर्जी हे याविषयीं विचार करून शक्य ते करण्याचा प्रयत्न करणार आहेत. प्लॅनिंग कमिशनच्या श्री. दुर्गाबाई देशमुख यांनीं तें पत्रक अर्थमंत्र्याकडे पाठविल्याचें कळविलें आहे. हा विषय मध्यसरकारच्या कक्षेतील असल्यामुळें मुंबई सरकार याबाबत तिकडून विचारणा आल्याशिवाय कांहींहि शिफारस करू शकत नाहीं असें मुख्यमंत्र्यांच्या सेक्रेटरींनीं लिहिलें आहे. 'आपण अर्थमंत्र्यांना केलेल्या विनंतीला मीहि आपला

अनेकांनीं प्रशंसलेलीं " आयुर्वेद सेवा संघ "
नासिकचीं सर्व गुणकारी औषधें आतां
कऱ्हाडांत मिळूं लागलीं.
चौकशी करा.
औषधी भांडार
गुरुवार पेठ, पो. कऱ्हाड (सातारा)

गृहवैद्य अथवा क्षारचिकित्सा
लेखकः- डॉ. गर्दे, आय्. एम्. एस्. (रिटायर्ड)
किंमत ३ रु., ट. ख. १० आणे
(१) वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक
(२) डॉ. गर्दे, २६ [illegible] लेन, मुंबई १६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टेकू दिला आहे.' असें डॉ. खरे लिहितात. श्री. गो. ह. देशपांडे यांनींहि प्रयत्न करीत असल्याचें पत्र पाठविलें आहे. श्री. अळतेकर यांचें दुसरें पत्र आलें असून केलेल्या लेखी सूचनांची नक्कल पाठविली आहे.

अर्थमंत्र्यांना लेखी सूचना

"आयुर्वेदीय औषधीकरणांत अवश्य लागणाऱ्या कांहीं कच्या द्रव्यावरील आयात कर कमी करावा. अशा ११ वस्तूंची यादी मी मागें पाठविली आहे. ती विनंति आपणाकडे आली आहेच. ॲलोपॅथिक औषधावरील आयातकर आपण जसा कमी केला तशीच कृपा आयुर्वेदीय औषधाबाबतहि व्हावी.

जर तीं द्रव्यें अनौषधि कारणासाठीं सुद्धां मोठ्या प्रमाणांत वापरलीं जातात असें आपल्यास कळून आलें तर, जीं केवळ औषधीकरणासाठीं लागतात त्यावरील आयात कर बराच कमी करावा; व ज्यावरील आयात कर कमी करणें शक्य नसेल तीं द्रव्यें वैद्य व औषधी कारखाने यांना नियंत्रित दरानें सरकारनें पुरवावीत."

श्री. विष्णुशास्त्री दाते यांनीं पुढाकार घेऊन केलेल्या या प्रयत्नाबद्दल सर्व वैद्यवर्ग त्यांना धन्यवाद दिल्यावाचून राहणार नाहीं. श्री. आळतेकर वकील यांनीं आयुर्वेदाच्या प्रभावाबत आपुलकीनें लक्ष घातलें याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

झांशी आयुर्वेद विश्वविद्यालयास भेट

उत्तरप्रदेशांतील कायदेमंडळाचे अध्यक्ष श्री. आत्माराम गोविंद खेर, मंत्री श्री. सय्यद अली जहीर व उपमंत्री श्री. चतुर्भुज शर्मा यांनीं झांशी आयुर्वेद विश्वविद्यालयास भेट देऊन समाधान व्यक्त केलें.

पवित्र नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला, हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला, तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहाः—नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

मुंबई संमेलनांत पास झालेले ठराव

१) मुंबई राज्य सरकारतर्फे बोर्टे येथें उघडण्यांत आलेल्या फिरत्या रुग्णालयांतील तृष्णा-रोग्यांना आयुर्वेदीय पद्धतीनें उपचार करून प्रयोग करण्याची संधि दिली याबद्दल मुंबई राज्याचे आरोग्यमंत्री व डायरेक्टर ऑफ हेल्थ यांचें अभिनंदन.

२) आयुर्वेद बोर्ड, आयुर्वेद स्टेट फॅकल्टी, आयुर्वेद रिसर्च बोर्ड, इत्यादि आयुर्वेदविषयक समित्यावर डॉक्टरांची नेमणूक अध्यक्ष अगर सभासद म्हणून करण्यांत येऊ नये.

३) निखिल भारतवर्षीय आयुर्वेद विद्यापीठाच्या परीक्षा निरीक्षण करून मुंबई सरकारनें मान्यता द्यावी, व अशा पास झालेल्या कायचिकित्सकांना प्रांतांत चिकित्सा करण्यास परवानगी द्यावी.

४) १९३८ च्या मुंबई वैद्यक व्यवसायिकांच्या कायद्याचें संशोधन करण्यासाठीं समिति नेमावी.

५) कामगार विभागांत मोफत चिकित्सा करण्यासाठीं वैद्यांना सरकार तर्फे नेमण्यांत यावें.

६) जामनगर येथें मध्यवर्ती सरकारतर्फे जें देशी वैद्यकाबाबत संशोधन केले जात आहे ते डॉक्टरांच्या हातीं रहाणार असल्यास त्याला वैद्यमंडळीचा तीव्र विरोध आहे. या पद्धतीनें होणारें संशोधन आयुर्वेद पोषक न होतां ॲलोपॅथीचें पोषकच होईल.

७) आयुर्वेदीय औषधावरील दारुबंदीची असलेलीं बंधनें काढून टाकावीत अशी सरकारला विनंति आहे.

८) शाळांतील विद्यार्थ्यांची तपासणी आयुर्वेद पद्धतीनें करण्यांत यावी. इत्यादि

सूर्य कुकर

सूर्याच्या उष्णतेवर चालणारे ल्हान व मोठे कुकर भारत सरकारच्या औद्योगिक संशोधन संस्थेनें तयार केले असून ते केवळ दुपारींच नव्हे तर सकाळीं व सायंकाळींहि अन्न शिजविण्याचें काम साधमानकारक पणें करीत आहेत. असें जर्नल ऑफ दि सायंटिफिक ॲंड इंडस्ट्रियल रीसर्च या मासिकांत म्हटले आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय संशोधनाची एक योजना

झांशी आयुर्वेद विश्वविद्यालयाच्या संशोधन ...नें संशोधनाबाबत एक नवी रचनात्मक योजना ...ली आहे. झांशी गांवांत नित्य आढळणाऱ्या ...पैकीं ४ रोग निवडून त्यांच्या १०० रोग्यावर ...-२५ रोग्यासाठीं एक याप्रमाणें) ३।४ आयु- ...ची औषधें देऊन पहावयाचीं व मग त्याचे परिणाम ...रोज विश्वविद्यालयांतील प्राध्यापकानीं नोंदून ...वाचे व पुढें ते प्रसिद्ध करावयाचे.

१) श्लीपद व हात पाय वगैरे एकांग सुजणें ...मेह-मधुमेह ३) देवी (मुलांच्या) ४) गाठियावात ...हे ४ रोग निवडले आहेत. या रोगांचे ...नेहमीं घरींच औषधें खातात. त्यासाठीं रुग्णा- ...ते राहात नाहींत. औषधें खात असतात व ...ल्याला जातात, या कार्याचे ३ भाग केले आहेत.

१) संशोधक लोक रोगी निवडून औषध- ...करतील व ते वेळोवेळीं नोंदी करून ठेवतील.

२) दुसरा विभाग हे रोग न होण्याचें ज्ञान ...देण्याचें कार्य करील. रोगप्रतिबंधक द्रव्यें ...निवडक कुटुंबांतील परिणामाचें रेकॉर्ड ठेवील.

३) तिसरा विभाग झांशी गांवचें हवापाणी; ...भाज्या, अन्य खाद्यपदार्थ व रहाण्याच्या ...ची स्थिति यांचें शास्त्रीय संशोधन करील.

यामुळें रोगाचीं कारणें व त्यांचें निराकरण ...सोपें होईल.

अभिनंदनाच्या ठरावास नकार

...टे येथील फिरत्या रुग्णालयांत तृष्णारोगावर ...र्वेदीय पद्धतीनें उपचाराचे प्रयोग करण्याची ...दिल्याबद्दल आरोग्यमंत्र्यांचें अभिनंदन कर- ...ण्याचा ठराव वैद्य प्रतापकुमार यांनीं आयुर्वेदीय ...त आणला असतां अध्यक्ष डॉ. योध यांनीं त्यास ...परवानगी नाकारली.

याच बोर्डानें साहावे जार्ज वारले असतां ...त्याबद्दल दुखवट्याचा ठराव केला होता.

अनुक्रमणिका

आचार्य विनोबाजींचा आहारविहार	५९७
अपामार्गासवाचा पाठ	५९८
वृन्दमाधवाचिकित्सेतील शंकास्थळें	५९९
वैद्यकांतील शोध कसे करतात ?	६०१
मधुमेहावर असाण्याचें खोड	६०३
डिग्रीकोर्सला लायक संस्था	६०५
मुंबई राज्य विकास योजना	६०६
अनुभविक चिकित्सा– शोषरोगाचे ७ प्रकार	६०७
वै. ग्रामोपाध्ये यांचे विसंगत विचार	६१०
आजकाल आयुर्वेदीय चिकित्साच होत नाहीं	६११
वाचकांचा पत्रव्यवहार	६१६
रत्नागिरी प्रवासांतील आठवणी	६१७
मुंबई व उपनगर वैद्य संमेलन	६२०
दक्षिण सातारा वैद्य संमेलन, सांगली	६२३
आयुर्वेदीय औषधावरील आयातकर कमी करा	६२७

लातूर संमेलनाचें अध्यक्षपद

लातूर संमेलनाच्या अध्यक्षपदासाठीं झांशी आयुर्वेदीय विश्वविद्यालयाचे निर्माते श्री. धुळेकर अगर लखनौ येथील आयुर्वेदाचे डायरेक्टर श्री. द. अ. कुळकर्णी यांची निवड करणें उचित होईल असें आम्हांस वाटतें. वैद्य बागेवाडीकर व फडके ह्यांची विचारसरणी महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनांच्या आजवरच्या कार्यपद्धतीशीं कितपत जमणारी आहे ? याचा विचार मतदार समासदांनीं अवश्य करावा असें एक मतदार सभासद सुचवितात.

म. प्रा. वैद्य मंडळ
दौऱ्याच्या कार्यक्रमांत बदल

ता ३० कोल्हापूर, ता. ३१ गडहिंग्लज, ता. १ बेळगांव, ता. २ हुबळी, ता. ३।४ सिरस, ता. ४।५ श्री. घोपेश्वरकर फोंडा–गोवा असा कार्यक्रम तूर्त निश्चित आहे. परत येतांना जमल्यास ता. ७ कऱ्हाड, व ८ सातारा करून ता. ९ नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघ औषधी भवनाचें नवें औषध

अपामार्गासव

आज रूढ नसलेलीं पण उपयुक्त असलेलीं औषधें तयार करून तीं वैद्य चिकित्सा व्यवहारासाठीं उपलब्ध करून देणें हें आयुर्वेद सेवा संघाचें एक अंगीकृत आहे. याप्रमाणें दोन वर्षांपूर्वी बिब्ब्यापासून 'भल्लातकासव' तयार करण्यांत आलें व तें औषध वैद्यवर्ग व जाणती जनता मोठ्या प्रमाणांत उपयोगांत आणूं लागली आहे.

महाराष्ट्रांत सर्वत्र मिळणारी वनस्पति

बिब्ब्याप्रमाणेंच आघाडा (अपामार्ग) ही वनस्पति सर्वत्र मिळणारी व असं अशी आहे. आघाड्याचा समावेश धार्मिक आचारांतसुद्धां झाला आहे. त्यावरून वैद्यकीय उपयुक्तता लक्षांत घेण्यासारखी आहे.

आघाडा मूत्रल, कफदोषहर, रक्तशोधक आहे

आघाडा ही वनस्पति मूत्रल व कफदोषहारक अशी आहे. आघाडा जा त्याची राख करण्याची व त्यापासून काढलेला क्षार वापरण्याची रूढी आहे. पण क्षार नेहमीं वापरण्यास सोईस्कर पडत नाहींत. त्यापेक्षां ही आसव--कल्पना घेण्यास सो होईल हा विचार लक्षांत घेऊन हें अपामार्गासव तयार करण्यांत आलें आहे.

चक्कर येणें, चालतांना झोक जाणें

हल्लीं जनतेंत 'चक्कर येणें' या विकाराचा प्रादुर्भाव विशेष झाला आहे. 'डोकें हलणें, चक्कर येणें, चालतांना सरळ चालण्यास अडचण पडणें' या प्रकारच्या विकारावर आघाडा उपयुक्त आहे असें कै. वैद्यतीर्थ अप्पाशास्त्री साठे ह्यांनीं घरगुती औषधें पुस्तकांत म्हटलें आहे. रक्तदाब या रोगावर कोणतें औषध द्यावें असा प्रश्न वैद्यमंडळींसमोर आहे. त्यांनीं अपामार्गासव वापरून अनुभव घ्यावा अशी आमची विनंति आहे.

प्लीहावृद्धि, यकृत्वृद्धि

स्त्रियांच्या आर्तवशूलाच्या विकारावर अपामार्ग गुणकारी आहे. आर्तवशुद्धीसाठीं अनुपान म्हणून अपामार्गासव द्यावें. प्लीहावृद्धि, यकृत्वृद्धि या विकारावर रोहितकादि पुनर्नवासवाबरोबर अपामार्गासव देण्यास हरकत नाहीं.

अपामार्गासव कफदोषहारक, रक्तधातुशोधक, मस्तकांतील गर्मी, डोळ्यांतील गर्मी व शरीरांतील कोणत्याहि भागांतून होत असलेला रक्तस्राव बंद करणारें आहे. मुळव्याधीमध्ये रक्त पडत असतां लाभदायक आहे. हें मेंदूची ताकद वाढविणारें आहे.

संपादक व प्रकाशक:— वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, नासिक
मुद्रक:— श्री. दामोदर महादेव चन्द्रात्रे, विज्ञान प्रेस, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ६ वें) नाशिक, ता. १६ एप्रिल १९५३ (अंक २० वा

९ वें महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन

लातूर (बार्शी लाईट रेल्वे, हैद्राबाद राज्य)

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य सम्मेलनाचें ९ वें अधिवेशन लातूर येथें दिनांक २४ व २५ मे, रविवार व सोमवार १९५३ रोजीं होण्याचें निश्चित झालें आहे.

या सम्मेलनांत खालील गोष्टी प्रामुख्यानें राहतील.

(अ) शास्त्रीय चर्चा व तज्ज्ञ वैद्यांनीं आपल्या विषय प्राविण्यावर स्वयंस्फूर्तीनें लिहिलेले निबंध.
(आ) प्रदर्शन—वनौषधी व तयार आयुर्वेदिक औषधी यांचें.
(इ) रुग्ण प्रात्यक्षिकें.
(ई) अखिल भारतीय कीर्तीच्या ख्यातनाम विद्वान् वैद्यांचीं भाषणें.

सर्व वैद्यक व्यवसायी, कारखानदार आणि आयुर्वेदप्रेमी जनता यांनीं आपुलकेपणानें सहाय्य आणि सहयोग देऊन कार्य यशस्वी रीत्या निभावण्यास मदत करावी.

आपापल्यापरी सुचणाऱ्या आवश्यक सूचना कार्यालयाकडे दिनांक १।५।५३ पर्यंत जरूर पाठवाव्यात.

औषधी कारखानदारांनीं आपापले स्टॉल जरूर प्रदर्शनांत ठेवावेत. स्टॉलकरितां साधारणपणें १२० स्क्वेअर फूट जागेस ३० रुपये भाडें ठेवण्यांत आलें आहे. तरी १ मे १९५३ पर्यंत पैसे पाठवून कारखानदारांनीं आपापले स्टॉल्स राखून ठेवणेंबद्दल विनंति आहे.

प्रवासाचे सोईस्कर मार्ग

लातूर हें बार्शी लाइट रेल्वेचें टर्मिनस स्टेशन आहे. दक्षिण महाराष्ट्रांतील लोकांना मिरजेपासून थेट लातूर पावेतो रेल्वेची (बी. एल्. आर.) सोय आहे. मुंबई व मध्यमहाराष्ट्रांतील लोकांनीं सेंट्रल रेल्वेच्या कुर्डूवाडी स्टेशनवर येऊन, लातूरकरितां गाडी बदलावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टीप:– अवधी थोडा आहे. कार्य मोठें, महत्त्वाचें व खर्चाचें आहे. समितीतर्फे प्रत्य निधि वसूलीसाठीं कार्यकर्ती मंडळी फिरत आहेत. शक्यतो ज्यास्तींत जास्त लोकांना भेटण्य प्रयत्न केला जात आहे. तरी सर्व आयुर्वेद व्यवसायी व प्रेमी मंडळींनीं, कार्यकर्ती मंडळी अथवा न भेटो, या जाहीर निमंत्रणाचा व विनंतीचा समक्ष भेटीइतकाच आपुलकेपणाच्या भा आदर व स्वीकार करावा अशी नम्र विनंति आहे.

प्रतिनिधी फी रुपये तीन व स्वागत सभासद फी पांच रुपये नेहमींप्रमाणें ठेवली आ याशिवाय यथाशक्ति देणगी देऊन साहाय्य करावें अशी स्वागत मंडळाची विनंति केली आहे.

वाचकांचा पत्रव्यवहार—

आयुर्वेदीय औषधें सुचवा

एक एम्. बी.बी.एस्. डॉक्टर बाई लिहितातः—

"×× येथील स्त्रियांच्या रुग्णालयावर स्त्रीडॉक्टर म्हणून माझी नेमणूक झाली आहे. मला येथें खालील रोगाच्या स्त्रिया बऱ्याच आढळल्याः–

१) ३ ऱ्या व ४ थ्या महिन्यांत गर्भपात होणें २) मासिक धर्म आल्यावरहि रक्तस्राव २ महिने चालूच राहणें, ३) मुलें मुलींच झालीं नाहींत अशा, ४) फार मुलें होऊन शरीर-प्रकृति बिघडून गेली ५) गर्भधारणेनन्तर निर्माण झालेली पांडुता, ६) गर्भाशयाचा कॅन्सर, ७) गर्भाशयांत ग्रंथि, ८) मासिक पाळीच्यावेळीं त्रास व विटाळ थोडा जाणें वगैरे.

या रोगावर जर कोणी अचुक म्हणजे ८० टक्के गुण आणणारी औषधें सांगितलीं व ती देण्याची प्रमाणें व त्यावरोबर करण्याचें पथ्यपाणी याची माहिती दिली तर मी त्या औषधांचें रेकार्ड ठेवून अनुभव घेऊन कळवू शकेन..

आमच्याकडे ॲलोपॅथींत गोळ्या, इंजेक्शनें आहेत, पण त्यांचा गुण फार थोड्यांना येतो व त्यांना खर्चहि फार लागतो."

(आयुर्वेदपत्रिकेच्या वाचक वैद्यांपैकीं कोणी वरील विकारावरील अनुभविक औषधें सुचविल्यास ती पत्रिकेंतून प्रसिद्ध करण्यांत येतील. लेखकाचें नांव प्रसिद्ध करणें वा न करणें लेखकाच्या इच्छेवर ठेवण्यांत येईल. —संपादक)

संधिवातावर माजूम सुरंजान

(लेखक– वैद्य व. श्री. चव्हाण)

रोगनिवारणार्थ ज्या कांहीं पॅथ्या आहेत त्य युनानी ही एक पॅथी आहे. त्यांतील नव्या व जु संधिवाताकरतां माजूम सोरंजान म्हणून एक अ भविक औषध आहे. त्याचा उपयोग वैद्यवर्ग जनतेस होईल या दृष्टीनें प्रसिद्ध करीत आहे. त्याचा उपयोग करून अनुभव घ्यावा.

माजूम सोरंजान तयार करण्याची कृति पु प्रमाणें आहे:– (माजूमपाक, अवलेह)

सोरंजान शिरीन २ तोळे, सुंठ २ तोळे, त २ तोळे, शहाजिरे २ तोळे, सोनामुखी १ तो लेंडीपिंपळी २ तोळे या सर्वांचें चूर्ण करून औषधांचे तिप्पट म्हणजे ३३ तोळे मधांत तें टाकून घोटावें म्हणजे च्यवनप्राशावलेहाप्रमाणें पदार्थ तयार होईल. शुष्क राहिल्यास पुन्हा मध घालावा.

अवलेह घेण्याचें प्रमाण. ५ मासे. अनुपान अर्ध कोमटपाणी. असें सकाळीं व रात्रीं दिवसांतून वेळ घ्यावें. गव्हाचे पदार्थ, कोबी, बटाटे, रता स्टार्चमय पदार्थ वर्ज करावेत.

पांच वर्षांचे आंतील मुलास व गरोदर स्त्रि हें औषध देऊं नये. मुलांस वयोमानाप्रमाणें द्यावें.

ज्या रोग्याचा कोठा हलका असेल, साधारण औषधानें रेच होत असतील अशा रोग्या वरील औषध तयार करतांना सोनामुखी घालूं न

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुंबई आयुर्वेद संशोधन बोर्डाचें नवें वळण

आरोग्यमंत्र्यांच्या सूचनानुसार अंगिकारलेलीं नवीं कामें

आयुर्वेदांत लक्ष घालणाऱ्या वैद्यकीय व्यवसायांतील लोकांना उद्देशून वरील संशोधन समितीच्या अध्यक्षांनीं क्रमांक सातचें परिपत्रक ता. २८ मार्च १९५३ रोजीं प्रसिद्ध केलें असून यापुढें संशोधनाचें स्वरूप, व्याप वगैरे कसा काय राहाणार आहे याचा विस्तार त्या पत्रकांत दिला आहे. हें काम या समितीनें करावयास माननीय आरोग्यमंत्र्यांनीं सूचना दिली आहे, असें त्यांत म्हटलें आहे.

रुग्णालयांतून आयुर्वेद संशोधन

१) मुंबई, पुणें व अहमदाबाद या तीन ठिकाणीं प्रत्येकीं २० रुग्णशय्या ठेवण्यांत येणार असून त्या आयुर्वेदीय दृष्ट्या संशोधन करण्याची योग्यता असणाऱ्या प्रसिद्ध वैद्यांच्या ताब्यांत द्यावयाच्या आहेत. हें करण्यांतील मुख्य उद्देश रोगांचें तत्व व उपचार या दोन्ही दृष्टिकोणांतून संशोधन व्हावें हा आहे.

ग्रामीण वैद्यकीय मदतीची योजना

२) सर्वसामान्य रोग व त्यावरील उपचार यांबाबत मुंबई प्रांतातील सर्व भाषेंत पत्रकें काढून तीं प्रकाशित करावयाचीं. ह्या पत्रकांत दिलेल्या औषधींची एक पेटी प्रत्येक गरीब कुटुंबाला विनामूल्य किंवा सवलतीच्या दरानें पुरवावयाची, व त्या त्या कुटुंबाच्या जरूरीप्रमाणें पुनः पुन्हां त्यांना त्या औषधी पुरवावयाच्या.

सरकारी औषधी कारखाना निघणार

३) वरील हेतूंच्या सिद्धीकरतां एक औषधी कारखाना मोठ्या प्रमाणांत वरील औषधी तयार करण्याकरितां चालवावयाचा. याच कारखान्यांत मोती, सोनें, हिरा, दुर्मिळ वनस्पति युक्त, दुर्मिळ व किंमती वस्तु असलेल्या अत्यन्त उपयुक्त पण खात्रीशीर रीत्या अन्यत्र उपलब्ध नसलेल्या, तयार करण्यास कठीण असा, औषधी तयार करण्यांत यावयाच्या आहेत. असें असतांहि आज मुंबई प्रांतांतील किंवा भारतांतील विद्यमान औषधी कारखान्यांशीं निर्माण व विक्री यांचेबाबत हा सरकारी कारखाना स्पर्धा करणार नाहीं. याच कारखान्यांत औषधीनिर्माण व औषधी-प्रामाण्य (Standardization) यांच्याबाबत संशोधन होणार असून औषधींच्या भेसळीबाबत विचारहि यांत होणार आहे.

सरकार वनस्पतिसंग्रह उघडणार

४) वरील उद्देशाच्या पूर्तीकरितां एक वनस्पति-संग्रह तयार करण्यांत येणार असून त्यांत ओल्या व सुक्या अशा वनस्पतींचे अधिकृत नमुने ठेवण्यांत येतील. हें शक्य होण्याकरितां बागा, व शेतें उपयोगांत आणिलीं जातील, किंवा जंगलखात्याकडून त्या मागविल्या जातील. ज्या ज्या औषधी कारखानदारांना मोठ्या प्रमाणांत खात्रीच्या औषधी पाहिजे असतील त्यांना त्या पुरविण्याची व्यवस्था करण्याबद्दल जंगलखात्याला विनंति करण्यांत येणार आहे. मुंबई राज्यांत प्रचारांत असलेली आयुर्वेदीय गुप्त औषधीपरंपरा व अनुभूत औषधी विकत घेण्याचा हें बोर्ड प्रयत्न करील.

आयुर्वेदीय पाठचिंतामणीची व्यवस्था

५) आयुर्वेदीय पाठचिंतामणि तयार करणें हें अत्यंत आवश्यक झालें असून बोर्ड त्याच्या प्रकाशनाचें कार्य हातीं घेणार आहे.

संशोधनाच्या माहितीचें नियतकालिक

६) वेळोवेळीं औषधी संशोधनाबाबतची माहिती नियतकालिकाच्या द्वारें प्रसिद्ध करण्यांत येईल. सदर नियतकालिकांतील लेख मुंबई राज्य व भारतांतील इतर राज्यें यांतील जनतेलाहि उपयुक्त असे असतील.

पाश्चात्य दृष्टिकोणांतून अभ्यास

संशोधनाच्या बोर्डानें अधिकृतरीत्या घेतलेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२१ कार्यक्रमांतील ९।१०।११ व १२ या क्रमांकाच्या बाबींचा सध्यां पाश्चात्य दृष्टिकोणांतून अभ्यास होत आहे. पूर्वीच्या रोगांच्या यादींत आणखी सात रोगांचा सखोल अभ्यास व संशोधन यासाठीं समावेश करण्यांत येत आहे.

बोर्डाच्या संशोधनाचा कार्यक्रम प्रत्यक्षांत आणण्याच्या कामीं पंडित शिवशर्माजी हें सहकार्य देणार आहेत हें जाहीर करण्यास आनंद वाटतो.

सहकार्यासाठीं हार्दिक विनंति

७) अद्यापहि बरेचसें काम हातीं घ्यावयास पाहिजे आहे आणि आयुर्वेदीय व्यावसायिकांनीं बोर्डाच्या कामांत त्यांच्या उद्देशपूर्तीसाठीं सहकार्य द्यावें अशी मी त्यांना हार्दिक विनंति करतो. काम जसें प्रचंड आहे, तशीच त्याबाबत प्रत्येकावर पडणारी जबाबदारीहि मोठीच आहे.

८) मुंबई शहर, मुंबई राज्य आणि भारतीय इतर राज्यें यांच्यांतून तज्ञ माणसांचें सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न बोर्डानें केला आहे. अशा तज्ञांना त्यांच्या राहत्या गांवांतच उपरोक्त कार्य करण्याबद्दल बोर्डानें विनंति केली आहे. हें कार्य करण्याकरतां बोर्ड स्वतंत्र संस्था स्थापन करणार नाहीं. उपरोक्त संशोधनाच्या बाबतींत मदत करावयाची इच्छा असणाऱ्या कोणत्याहि तज्ञ माणसाकडे वरीलपैकीं कोणताहि संशोधनप्रकार सोंपविण्याचा प्रयत्न बोर्डाकडून करण्यांत येईल. राज्यांतील तज्ञां कडून वरील कामें करण्यास मदत मिळेल अशी बोर्डाला खात्री वाटते आणि अशा कार्य कर्त्यांना त्यांच्या इच्छेनुसार समाधानकारक आर्थिक मदत करता येईल.

या पत्रकाच्या खालीं समितीचे अध्यक्ष डॉ. म्हसकर यांची सही आहे.

आयुर्वेद संशोधन समितीचें पत्रक क्रमांक ६
ता. २४।४।५३

समितीनें हातीं घेतलेलीं संशोधनकार्यें

१ आयुर्वेदीय शब्दकोश निर्मिति
२ आयुर्वेदीय वनस्पति नामकोशनिर्मिति
३ पदार्थविज्ञानशास्त्र ग्रंथनिर्मिति
४ त्रिदोष सिद्धांत ... ,,
५ स्वस्थवृत्त ... ,,
६ शालाक्य तंत्र ... ,,
७ शरीर रचना ... ,,
८ वाजीकरण व रसायन ,,
९ कुटजारिष्टाचा अभ्यास
१० औषधिनिर्माणक्रियेचें संशोधन व औषधी प्रामाण्य निश्चिति
११ वंशलोचनाचा अभ्यासः—
१२ भस्मांचें संशोधन
१३ पुढील रोगांचा तुलनात्मक अभ्यास

१) अस्थिसंधिपीडा २) फुफ्फुसावरणशोथ ३ मधुमेह ४) श्वसनक ५) मूत्रपिंडशोथ ६) इसब ७) दमा ८) हृदयरोग ९) पाण्डुरोग (लोहकल्पानें बरा होणारा पांडुरोग सोडून इतर १०) जुनाट अतिसार व संग्रहणी ११) सर्वांगशोथ व जलोदर १२) संधिवात, तीव्र आमवात १३) कृमिरोग १४) अपस्मार १५) हृदयशूल १६) स्थौल्य १७) कार्श्य १८) सर्वांगरोग १९) अर्दित २०) एकांगरोग २१) भ्रम (रक्तदाब)

१४ आयुर्वेदाच्या प्रगतीचा अभ्यास
१५ आयुर्वेदाच्या तत्वज्ञानाचा अभ्यास
१६ योगवाही द्रव्यांचा अभ्यास
१७ औषधी द्रव्यें व वनस्पति यांचा अभ्यास
१८ संयुक्त कल्पांचा अभ्यास
१९ संयुक्त उपचारांचा अभ्यास
२० मानसप्रकृति व जीवन पद्धति
२१ अनैच्छिक हालचालीचें नियंत्रण

अंगिकारावयाचीं संशोधन कार्यें व अभ्यास

१) ग्राम आरोग्यासाठीं --
,, आयुर्वेदीय घरगुती उपचार
,, फिरतीं आयुर्वेदीय विद्यालयें
२) आयुर्वेदांतील देशकाल परिस्थिति विचार
३) गुप्त औषधीज्ञानाची प्राप्ति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४) आयुर्वेदीय संशोधनविषयक नियतकालिक
५) आयुर्वेदीय उपरुग्ण पद्धतीनें त्रिदोष सिद्धांताचा अभ्यास
६) आयुर्वेदांतील मानसशास्त्र
७) आयुर्वेदीय औषधीवनस्पतींच्या गुणधर्मांचा अभ्यास
८) आयुर्वेदीय औषधीपाठचिंतामणी तयार करणें
९) आहारसंशोधन, पथ्यापथ्यविचार, (आयुर्वेदीय, उपरुग्ण इत्यादि विविध पद्धतीनें)
१०) द्रव्य-गुण-रस यांचा उपरुग्ण पद्धतीनें अभ्यास
११) त्रिदोषांचा अभ्यास (आधुनिक प्रयोगशाळा व उपरुण पद्धति यांच्या द्वारा)
१२) निदान-पंचकाचा अभ्यास
१३) संप्राप्तिविज्ञानाचा अभ्यास
१४) पंचकर्मांचा अभ्यास
१५) आयुर्वेदीय निदान पद्धतीचा अभ्यास
१६) नाडीविज्ञानाचा अभ्यास

म. प्रां. वैद्य मंडळाचें

पुणें येथील प्रचार-कार्य

[आमच्या बातमीदाराकडून]

महाराष्ट्र प्रांतिक वैद्य मंडळाचे अध्यक्ष वै. विंदुमाधवशास्त्री पंडित यांचें शनिवार ता. २८।३।५३ रोजी सायंकाळीं ५ वाजतां पुणें वैद्य मंडळांत व्याख्यान झालें. आजवरच्या खानदेश व कोंकणच्या दौऱ्याची सविस्तर माहिती सांगतांना परंपरागत वैद्यांची सरकार आणि समाज यांच्या उपेक्षेमुळें कशी दुर्दशा होत चालली आहे, पण त्यांतूनहि टिकून राहिलेलें जे थोडे वैद्य कोठें कोठें दृष्टीस पडतात त्यांची परंपरागत औषधनिर्मितीची पद्धति, निदानाचा बारकावा आणि रुग्णांचा त्यांच्यावर असणारा विश्वास, याची त्यांनीं सांगितलेली माहिती उत्साहवर्धक वाटली.

आयुर्वेदीय चिकित्सा प्रभाव

चोंडे [जि. नगर] येथील तृष्णापीडित रोग्यांविषयी बोलतांना ते म्हणाले, " तेथील पन्नास पैकीं दहाच खाटा आयुर्वेदीय उपचाराखालीं चालू आहेत. या रुग्णांमधील सुधारणा निःसंशय उत्साहवर्धक आहे. अधिकृत अहवाल पुढें प्रसिद्ध होईल त्यावेळीं आयुर्वेदीय चिकित्सेचा प्रभाव लोकांच्या नजरेस प्रत्यक्ष पुराव्यानें येईलच. वैद्यांनीं संघटित राहून आयुर्वेदाचें सखोल अध्ययन करावें, उघड्या डोळ्यांनीं जगांत राहून आत्मसात् करतां येईल तें ज्ञान संपादन करावें, पण तें करतांनाहि आपलें वैशिष्ट्य कायम राखावें, आणि आयुर्वेद हेंच राष्ट्रीय वैद्यक व्हावें यासाठीं शिकस्तीचे प्रयत्न करावेत." व्याख्यानाचें शेवटीं पुणें वैद्य मंडळानें पुष्पहारानें त्यांचा यथोचित गौरव केला. अध्यक्षस्थानीं वै. पं. कवडेशास्त्री होते.

निसर्गोपचार व आयुर्वेद

त्याच दिवशीं सकाळीं उरळीकांचन येथील निसर्गोपचार आश्रमाचे संचालक श्री. बाळकोबा भावे यांची भेट घेऊन 'आयुर्वेद व निसर्गोपचार' यासंबंधीं अर्धातास चर्चा केली.

पुण्याचे मुक्कामांत वै. विंदुमाधवशास्त्री यांनीं वैदिक संशोधन मंडळामार्फत श्री. चिं. ग. काशीकर यांच्या नेतृत्वाखालीं चाललेलें आयुर्वेदीय शब्दकोशाचें व श्री. काशीकर यांनीं स्वतः लिहिलेल्या पदार्थविज्ञान या संस्कृत व इंग्रजी ग्रंथाचें अवलोकन केलें. श्री. वै. ग. वि. पुरोहित यांनीं मुद्दाम भेटून स्वतः लिहिलेल्या आयुर्वेदीय शारीर या ग्रंथाची माहिती दिली.व सर्व आयुर्वेदीय व्यवहाराला पुरेसें आपलें शरीर असल्याचा त्यांनीं अभिप्राय व्यक्त केला, ही नमूद करण्यासारखी गोष्ट आहे.

पुढील संमेलनाचे आमंत्रण

केसरीचे उपसंपादक वै. ह. भा. भिडे यांनीं अध्यक्षांची भेट घेऊन पुढील महाराष्ट्र प्रांतिक वैद्य संमेलन पुण्यास बोलावण्याचें व त्याबद्दल पुढाकार घेण्याचें आश्वासन दिलें. श्री. विंदुमाधवशास्त्री त्याच दिवशीं रात्रीच्या गाडीनें सांगलीद्वारा दक्षिण भागाच्या दौऱ्यावर रवाना झाले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाडवा व कडुनिंब

वर्षप्रतिपदेस वसंत ऋतुजन्य (उन्हाळयाच्या) रोगानिवारणार्थ कडुनिंब व इतर पदार्थ, पाडव्याच्या शुभ पूजा केल्यानंतर भक्षण करण्याची प्रथा शतकानुशतकें चालू आहे. याचा पाठ कोणता याची विचारणा पत्रिकेच्या वाचकांनीं केल्यावरून पुढील पाठ आज कित्येक शतकापासून आमचे घरीं चालू आहे तो देत आहेः—

पाठः- मध शुद्ध ३ तोळे.
साळीच्या लाह्या -॥- तोळा.
कडुनिंबाचा फुलोरा -।- तोळा.

यांचें एकत्र मिश्रण करून त्याचें २।३ चाटण प्रत्येक जण घेत असतो. कडुनिंब कडू असल्यामुळें खाणें कठीण जातें म्हणून त्याबरोबर अनुपानार्थ (मधुद्रव्य) मध वापरला आहे. साळीच्या लाह्या पचनसुलभ असल्यामुळें तिन्हींच्या संयोगामुळें कडुनिंबांतील रोगजंतुनाशक व रोगप्रतिकारक द्रव्य रक्तांत सुलभ मिळते त्यामुळें उन्हाळ्यांत होणारे विषमज्वर, ऊन लागणें, हवामानांत सारखे बदल होत असल्यामुळें डोकेंदुखी, खोकला व इतर ज्वर इत्यादीवर त्याचा योग्य उपयोग होतो व त्यामुळें रोगनिवारणार्थ याचा उपयोग होतो. पण फक्त पाडव्याचे दिवशींच निंबाचा फुलोरा भक्षण करून फारसा उपयोग नाहीं, तर निंबास जोपर्यंत फुलोरा आहे तोपर्यंत रोज तो भक्षण करणें अगत्याचें आहे, म्हणजे साधारणपणें चैत्र महिनाभर भक्षण केल्यास हमखास वरील फायदा लाभेल.

—मा. या. व्यवहारे
बी. एस्‌सी. (फार्म, केम)

———

विंचूदंशावर घरगुती उपाय

विंचूदंशावर तात्काळ उपाय खालीं देत आहे. व त्यांतील औषधी प्रत्येक मनुष्य घरीं फक्त एक दिडकी खर्चून ठेवू शकतो. तरी प्रत्येकानें खालील औषधी संग्रहीं ठेवल्यास तात्काळ उपाय योजतां येईल व विंचूविषवेदना नाहींशी करतां येईल.

संग्राह्य औषधी— १) विड्याच्या पानास लावण्याचा ओला चुना. २) सज्जीखाराचा एक दिडकीचा खडा.

लावण्याची रीत— सहाणीवर अगर फरशीवर किंवा गुळगुळीत दगडावर प्रथम नखावर मावेल एवढा चुना घ्यावा, त्यावर थोडें पाणी टाकून कालवून घ्यावें व मग सज्जीखार उगाळावा. मिश्रण काळें व गंधासारखें झालें म्हणजे त्याचा एक ठिपका विंचूदंशावर लावावा, अर्धा मिनिट ठेवावा व मग ओल्या फडक्यानें पुसावा; पुन्हा ठिपका द्यावा, पुन्हा अर्धा मिनिट ठेवावें, पुन्हा पुसावें असे ४-५ वेळां करितांच विंचूदंश उतरतो.

लेखकानें अनुभव घेतला आहे व रोगी आल्यास हा उपाय तो करीत असतो.

—मा. या. व्यवहारे, बी. एस्‌सी. (फार्म,केम)

———

अखिल भारतीय आयुर्वेदिक डेंटल मिशनतर्फे

दिल्ली येथें दंतयज्ञ

नवी दिल्ली येथें श्यामसुंदरलाल म्युनिसिपल आयुर्वेदिक औषधालयांत (३७ लेडी हार्डिंज रोड कनाट सर्कस नवी दिल्ली) ता. १ एप्रिल १९५३ पासून धर्मार्थ दंतयज्ञ सुरू झाला आहे. भारतीय प्राचीन दंतोत्पाटन कलेचें प्रत्यक्ष प्रदर्शन हा या दंतयज्ञाचा उद्देश आहे.

या दंतयज्ञाचा उद्‌घाटन समारंभ व्यापार-उपमंत्री माननीय डी. पी. करमरकर यांच्या हस्तें ता. ८।४।५३ रोजीं दिल्ली येथें झाला.

या दंतयज्ञासाठीं वै. किशोरदास गुप्ता व वै. पां. वि. जायदे ता. १३ मार्च पासून दिल्ली येथें गेले असून त्यांनीं तेथें महाराष्ट्र मंडळ (सभाध्यक्ष काकासाहेब गाडगीळ), सत्यधर्म मंडळ (पटेलनगर) तिब्बी कॉलेज, इंद्रप्रस्थ वैद्य सभा इ. ठिकाणीं व्याख्यानें दिलीं.

पार्लमेंटचे सभासद, केंद्र सरकारचे मंत्री व उपमंत्री येऊन दंतयज्ञाचें निरीक्षण करीत आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आनुमानिक चिकित्सा प्रकरण १० वें पुढें चालू — लेखकः- वृद्ध वैद्य

—: राजयक्ष्मा-निदान :—

राजयक्ष्मा हें निदान निश्चित झाल्यावर जर रोगी चांगला बलवान् असेल तर, आणि दोष (विशेषतः कफ) उचंबळलेला असेल तर प्रथम स्नेहन आणि नंतर स्वेदन कर्म करवून त्याला वमन आणि विरेचन द्यावें. बहुधा शहरांतील रुग्ण या स्थितींत वैद्यास सांपडणें कठीण. कारण प्रचलित विज्ञान पद्धतीप्रमाणें जोपर्यंत रुग्णाची कफ, रक्त, मूत्र, X-Ray इत्यादि अनेक प्रकारांनीं परीक्षा होत नाहीं, तोपर्यंत तो रुग्ण वैद्यांच्या हातीं चिकित्सेकरतां येणें- विशेषतः श्रीमंत मनुष्य-असंभवच आहे. तसें असल्यामुळें तो बलवान् अवस्थेंत मिळणें कठिण. कारण या सर्व परीक्षा होण्यासच निदान एक, दोन महिने तरी लागतात. आणि त्यानंतर ज्यांच्याद्वारा हें निदान होत असते त्यांची चिकित्सा चालू करणें हें रुग्णास एक प्रकारें अवश्यच असल्यामुळें तो रुग्ण क्षीण अवस्थेंतच वैद्यांच्या हातीं येणार! तशा स्थितींत तो बलवान् नसल्यामुळें वमन विरेचन देऊं नये. यदा कदाचित् एखादा रुग्ण त्या अवस्थेंत आलाच तर वमनाकरतां गेळफळाचें चूर्ण दुधांत मिसळून किंवा मधुर अशा मांसरसांत तें घालून द्यावें. तांदळाची पेज तयार करतांनाच त्यांत गेळफळ टाकून ती वमनार्थ द्यावी.

विरेचनाकरतां निशोत्तराचें चूर्ण अथवा बहाव्याचा मगज, साखर, मध आणि तूप यांच्या मिश्रणांत अथवा दुधांत घालून द्यावा. अंगूर किंवा वाळलेल्या मनुका यांच्या रसांत तींच द्रव्यें घालून द्यावीं.

याप्रमाणें कोष्ठशुद्धि झाल्यानंतर अग्निदीपन करणारीं, शरीराला बृंहण करणारीं, हृदयाला हितावह, वातनाशक आणि हलकीं अशीं अन्नपानें उपयोगांत आणावीं. जुने तांदूळ, साठी तांदूळ, गहूं, मूग हे हलके आणि लवकर पचन होण्याजोगे असल्यामुळें त्यांचा उपयोग शक्ती वाढवण्याकरतां होत असतो, मात्र हे पदार्थ कोणत्याहि प्रकारें हीन वीर्य झालेले नसले पाहिजेत. शेळीचें दूध, शेळीचें तूप, मांस हे सर्व पदार्थ क्षयी मनुष्यास फार उपयोगी असतात. रुग्णास शुद्ध हवा येत असेल अशा खोलींत ठेवण्याची व्यवस्था असावी. साध्य होत असल्यास रुग्णाच्या खोलींत एक, दोन किंवा चार देखील चांगल्या तरुण शेळ्या बांधून ठेवाव्या. त्यांचेच दूध, तूप, रुग्णास द्यावें. आणि त्यांच्याच शरीरांतून निघालेल्या मलमूत्रानें ती खोली सारवावी. शेळीच्या शरीरांतून निघालेला मलमूत्रांतील दर्प हा श्वासोच्छ्वासद्वारा क्षयनाशक असतो. धनगर (शेपर्डस्) यांना कधींहि क्षय होत नाहीं, असा या शास्त्राचा सिद्धांत आहे. शेळ्या सदैव हलक्या अशा झाडांच्या पाल्यास खाऊन राहात असतात. तो पाला कडु, तिखट व तुरट या रसांनीं युक्त असतो. हे तीनहि रस पचन कार्याच्या दृष्टीनें लघु अर्थात् हलके आहेत. यामुळें शेळीचें दूध, तूप, मांस हे पदार्थ पचनास फार हलके असतात. शेळ्या फार कमी पाणी पितात. यामुळें हीं द्रव्यें कफनाशक असतात. अशा सर्वगुणयुक्त शेळींतून निघणारे पदार्थ असल्यामुळें क्षयावर त्याचाच उपयोग करावा असें शास्त्र आहे.

मांस खाणाऱ्या प्राण्याचें मांस क्षयनाशक

मांस खाणाऱ्या प्राण्यांचें मांस हेंहि क्षयनाशक असतें. चरकाचार्यांनीं शारीरस्थानाच्या सहावा अध्याय-दहाव्या सूत्रांत असें म्हटलें आहे कीं,

तस्मान्मांसमाप्ययते मांसेन भूयस्तरमन्येभ्यः शरीरधातुभ्यः, तथा लोहितं लोहितेन, मेदो मेदसा, वसा वसया, अस्थितरुणास्थ्ना, मज्जा मज्ज्ञा, शुक्रं शुक्रेण, गर्भस्त्वामगर्भेण।

त्याचप्रमाणें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वृद्धिःसमानैः सर्वेषां विपरीतैर्विपर्ययः ।

या दोनहि सूत्रांत वर्णन केल्याप्रमाणें जेव्हां क्षयी मनुष्याच्या रक्तमांसादि धातूंचा क्षय होतो तेव्हां त्यास अन्य प्राण्यांचें तेंच रक्तमांसादि पदार्थ आहारास देण्यानें त्यांची वृद्धि होते म्हणून क्षयी मनुष्यास हे रक्तमांसादि पदार्थ युक्तीनें त्याला न कळत अशा पद्धतीनें देण्यांत आले पाहिजेत. म्हणून मांसाहार करणाऱ्या प्राण्यांचें मांस अशा रीतीनें क्षयी मनुष्यास द्यावें. या प्राण्यांत कावळा, घुबड, लांडगा, गाय, घोडा, मुंगुस, सर्प, गिधाड, भास, गाढव आणि उंट देण्यांत येतात. यापैकीं जे उपलब्ध होईल तें मांस द्यावें. पित्त-कफज-लक्षणें अधिक असलीं तर हरिण, कोंबडा, तित्तूर इत्यादि प्राण्यांचें मांस द्यावें. वातलक्षणें अधिक असलीं तर वाघ वगैरे मांसभक्षक प्राण्यांचीं मांसें द्यावीं. त्या मांसाचे शोरवे तयार करावे व त्यांना सरसूचें तेल किंवा तूप यांच्या फोडण्या द्याव्या.

आसवें, मद्यें व मालिशची आवश्यकता

बकरीच्या मांसरसांत पिंपळी, सुंठ, डाळिंब व आंवळा हे घालून नियमानें पिण्यास दिल्यास षड्रूप क्षय बरा होतो. क्षयामध्यें आसवें आणि मद्यें (wines) द्यावींत, विशेषतया मध्वारिष्ट व फळापासून तयार केलेलीं निरनिराळीं द्राक्षासव, कुमारीआसवादि आसवें हीं द्यावींत. क्षयामध्यें दोषवृद्धि होऊन ते दोष सूक्ष्म अशा शरीर स्रोतसांत शिरून त्या स्रोतसांचे मार्ग अवरुद्ध करितात. अशा स्थितींत आंतून मद्यपान करविणें आणि वरून संस्कृत अशा लाक्षादि तेल, नारायण तेल, प्रसारिणी तेल वगैरे तेलांची मालिश करणें हें फार हितावह होतें. कारण हीं दोन्ही द्रव्यें उष्णवीर्य असल्यामुळें ती त्या स्रोतसांचे मार्ग मोकळे करतात. आणि तशी तीं स्रोतसें मोकळीं झालीं म्हणजे अन्नरसापासून तयार होणाऱ्या रक्तादि धातू पुनश्च बनूं लागतात. याकरितां मांस घालून तयार केलेले कांहीं विशिष्ट योग या क्षयावर फार उपयोगी आहेत.

मांससर्पि कसें तयार करावें ?

(१) मांससर्पि– बकरीचें मांस पांच शेर घेऊन तें एकवीस शेर पाण्यांत शिजवावें. पाणी अष्टमांश म्हणजे सरासरी अडीच शेर उरलें म्हणजे त्या काढ्यांत प्रत्येकी चार तोळे अशा जीवनीय गणाच्या औषधी व ६४ तोळे तूप घालून तो शिजवावा. नुसतें तूप उरलें म्हणजे औषध तयार झालें. या द्रव्याचा उपयोग मांसरसाबरोबर केला असतांना क्षयांत होणारे कास, श्वास, स्वरभ्रंश, शोथ, हृद्रोग आणि पार्श्वशूल हे विकार नष्ट होतात.

(२) सुवर्णवसंतमालिनी

क्षयावर ज्याप्रमाणें मांस व मद्य यांचा उपयोग हितावह आहे, त्याचप्रमाणें सुवर्णाचे अनेक योग हेहि फुफ्फुसांत झालेल्या व्रणास भरून काढणारे व शुद्ध करणारे असें आहेत. विषावर ज्याप्रमाणें सुवर्ण हें निश्चित गुणकारी असतें असें

न सज्जते हेमपांगे पद्मपत्रेऽम्बुवद्विषम् ।
जायते विपुलं चायुर्गरेऽप्येष विधिःस्मृतः ।

अ.-हृ. सू. ७-२८

या वचनावरून निश्चित होतें, त्याचप्रमाणें क्षयजन्य व्रण हा देखील विषजन्य व्रणाप्रमाणें असल्यामुळें सुवर्णाचा प्रयोग क्षयावर गुणकारी होतो. या सुवर्णयोगापैकीं सुवर्णवसंतमालिनी हा अग्रगण्य योग

तारेचा पत्ता:—Newbottle
के. के. शहा अँड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)
रिकाम्या बाटल्या, बुचे, कॅपसुल्स
[हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी
इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर
व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे
ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होय. हा जरी खर्चाचा असला तरीपण प्रत्येक वैद्यानें तो आपल्या संग्रहीं ठेवावा. व होतां होईल तों स्वतःच तयार करावा. म्हणजे त्यांत घातलेल्या द्रव्या- संबंधी आपली निश्चिति राहील. याच्यांत १ तोळा सोन्याचा वर्ख, २ तोळे शुद्ध केलेल्या मोत्यांचा चूर, १ तोळे शुद्ध हिंगूळ, ४ तोळे पांढरे मिरें, आणि ८ तोळे कल्लापरी अशा पांच द्रव्यांची जरूरी असतें. यांपैकीं सोन्याचा वर्ख पनवेलसारख्या कारखान्यांत किंवा जयपूरमध्यें तयार केलेला मिळतो. तेथूनच मागवावा. सुवर्णाबद्दल खात्री असावी. मोत्यांचा चूर किंवा बारीक मोत्यें (कल्चर्ड नसलेली) अशी दुकानांत उपलब्ध होतात. त्यांना ताकांत शिजवली म्हणजे ती शुद्ध होतात. हिंगूळही मुंबई किंवा कलकत्याहून मागवितां येतो. त्याचें चूर्ण करून गाईच्या दुधांत आठ दिवस दररोज नवें दूध घालून दररोज दोन दोन तास तरी घोटून उन्हांत वाळवावा. पांढरी मिरें ऊन पाण्यांत चांगलीं धुतली म्हणजे शुद्ध होतात. आणि कल्लापरी आठ दिवस गोमूत्रांत भिजत ठेवली आणि दररोज गोमूत्र बदलत गेलें म्हणजे शुद्ध होते. याप्रमाणें सोन्याचा वर्ख खेरीज करून बाकींची चार शुद्ध केलेलीं द्रव्यें घेऊन त्यांचे वस्त्रगाळ चूर्ण करून त्या मिश्रणांत सोन्याचा वर्ख व २॥ तोळे गाईचें लोणी घालून एक दिवस नुसतेंच खलावें. व त्यानंतर बेचाळीस दिवसपर्यंत लिंबाचा रस दररोज घालून निदान ४ तास तरी घोटावें. याप्रमाणें ही मात्रा तयार झाली म्हणजे क्षयी मनुष्यास ती एक ते दोन गुंज सकाळ संध्या- काळ मध व पिंपळी मिसळून द्यावी. पथ्याकरितां दूधभात हेंच अत्युत्तम पथ्य होय.

साइ
डायाबेटॉल
मधुमेहावर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द कृ. साइ ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई
[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

अग्निमांद्यावर कुमारीआसव, पिप्पल्यासव

राजयक्ष्म्यांत अग्निमांद्य हें एक प्रधान लक्षण असतें. त्यामुळेंच खाल्लेल्या अन्नापासून निरनिराळया रसरक्तादि धातु तयार होत नसतात. म्हणून तो अग्निप्रदिप्त करणें आवश्यक असतें. अग्निमांद्यांत यकृतापासून उत्पन्न होणारा पाचकपित्तस्राव हा कमी प्रमाणांत होत असतो. अर्थात यकृताला उत्तेजित (Stimulate) केल्यानें तो स्राव वाढण्याचा संभव आहे. यामुळेंच शास्त्रांत वर्णन केलेली कुमारीआसव, पिप्पल्यासव व द्राक्षासव हीं शुद्ध शास्त्रीय पद्धतीनें केलेलीं औषधें फार उपयोगी होतात. यापैकीं कुमारी- आसव तयार करण्याची कृति पांडुरोग चिकित्सेंत विस्तारपूर्वक वर्णन केलेलीं आहे. पिप्पल्यासव व द्राक्षासवाची कृति शारङ्गधर मध्यमखंड अध्याय १० यांत सांगितलेली आहे. त्याप्रमाणें ही तीनहि आसवें तयार करावींत.

राजयक्ष्म्याची प्रधान चिकित्सा

चिकित्सा प्रारंभ केल्यावर सकाळ संध्याकाळ वर वर्णन केलेली सुवर्णवसंतमालिनी देत असतां जेवणानंतर दुपारीं दोन तासानंतर व रात्रीं निजतांना अशा दोन वेळ दीड दीड तोळा कुमारीआसव द्यावें. या आसवांत पांडुरोग चिकित्सेंत वर्णन केल्याप्रमाणें अर्धा गुंज लोहभस्म, अर्धा गुंज माक्षिकभस्म आणि तीन गुंज सर्जिकक्षार अवश्य मिसळावा. या क्षारानें यकृत् उत्तेजित होतें व लोह, माक्षिक भस्मामुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यकृतांतून निघणाऱ्या स्रावांत रंजकपित्त अधिक प्रमाणांत उत्पन्न होतें. असें दोन वेळ वसंत व दोन वेळ आसव दररोज याप्रमाणें चार वेळची औषधी-योजना अवश्य असावी. ही क्षयाची प्रधान चिकित्सा होय.

स्रोतोरोधकनाशक मालिश

या सोबतच जे जे उपद्रव असतील त्या त्या उपद्रवांना शांत करण्याकरितां कासनाशक, रक्त-पित्तनाशक, अवरुद्ध स्रोतसांना खुलीं करण्याकरतां संबंध शरीरास लाक्षादि तेल आदि क्षयनाशक सिद्ध तैलांची दररोज निदान एकदां तरी किंवा साधल्यास दोन वेळ हलुहलु अर्धा तें पाऊण तास तेल आंत जिरेल अशा रीतीनें सावकाश मालिश करावी.

प्रारंभिक अवस्थेंत सितोपलादिचूर्ण

४) राजयक्ष्म्याच्या प्रारंभिक अवस्थेमध्यें गुण-कारी ठरलेलें असें सीतोपलादि चूर्ण आहे. या चूर्णांत खडीसाखर १६ भाग, वंशलोचन ८ भाग, पिंपळी (लेंडी पिंपर) ४ भाग, विलायची २ भाग व दालचिनी १ भाग अशीं हीं द्रव्यें घेऊन त्यांचें वस्त्र-गाळ चूर्ण करावें. १ते२ मासे हें चूर्ण घेऊन त्यांत एक मासा गुळवेलीचें सत्त्व आणि ३ गुंज प्रवाळ भस्म (अनुभविक चिकित्सा भाग १ मध्यें वर्णन केलेलें) मिसळावें या मिश्रणाच्या पुड्या तयार करून तें रुग्णास तूप व मध (बरोबर प्रमाणांत न मिसळलेलें) यांच्या मिश्रणाबरोबर सकाळ संध्याकाळ चावें. दुपारीं व रात्रीं पिप्पल्यासव दीड दीड तोळा किंवा त्याच प्रमाणांत द्राक्षासव हें द्यावें.

अमृतप्राश घृत फार उपयोगी

(५) अमृतप्राशघृत नांवाचा एक योग क्षया-करितां फार उपयोगी असा आहे. याची तयार कर ण्याची पद्धति अशीः- पुढें लिहिलेल्या ३६ औषधी प्रत्येकी एक एक तोळा घेऊन त्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करावें. त्या औषधी अशा जीवक, ऋषभक, क्षीर-काकोली, काकोली, मेदा, महामेदा, जीवन्ती, शतावरी, सुंठ, कचूरा, शालिपर्णी, पृश्नीपर्णी, मुद्ग-पर्णी, माषपर्णी, रिंगणी, बृहती, पांढरामूळवाला वसू व लालमूळवाला वसू (पुनर्नवा), ज्येष्ठमध, खाज खुइलीचें बीज, ऋद्धि, फालसा, मारंगमूळ मनुका, शिंगाडा, भूईआवळी, पिंपळी, लेंडी पिंपळी, बला, नागबला, बोर, अक्रोड, खारीक, बदाम, पिस्ता, आतिबला. नंतर ६४ तोळे आंवळ्याचा रस, तितकाच विदारी कंदाचा रस, आणि शेळीचें मांस घेऊन १६ पट पाणी घालून चतुर्थांश उरविलेला असा ६४ तोळे मांस रस आणि ६४ तोळे दूध हे सर्व पदार्थ एकत्रित करून त्यांच्यांत ६४ तोळे गाईचें तूप घालून हें सर्व मिश्रण फक्त तूप उरेपर्यंत शिजवावें. थंड झाल्यानंतर त्याच्यांत ३२ तोळे मध अडीच शेर खडीसाखरेचें चूर्ण आणि प्रत्येकी दोन तोळे असें तेजपत्र, विलायची, नागकेशर, दालचिनी, आणि काळे मिरें यांचें चूर्ण मिसळावें. या मिश्रणां-तून सकाळ संध्याकाळ एक एक तोळा घेऊन त्यांत एक एक गुंज सुवर्णमालिनीवसंत मिसळून घ्यावें, याला अमृतप्राशघृत असें म्हणतात. हें क्षयी मनुष्या-वर अमृतासारखें कार्य करतें. हें घेत असतांना रुग्णानें दूध व मांसरस यांचेंच सेवन करावें. या प्राशाचा उपयोग केला असतांना क्षय तर बरा होतोच, परन्तु त्या बरोबरच इतर अनेक रोग, उदा-हरणार्थ शुक्रक्षीणता, उरःक्षत, खोकला, उचकी, ज्वर, श्वास, दाह, तृष्णा, रक्तपित्त, वांत्या, मूर्च्छा, हृद्रोग,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूत्ररोग हे नष्ट होतात. स्त्रियांचे योनिरोग यानें बरे होत असून तें वंध्या स्त्रियांना देखील पुत्रप्राप्ती करून देतें. स्त्री सेवन अति केल्यामुळें क्षीण झालेल्या दुर्बळ शरीराचा वर्ण बदललेल्या व स्वरभंग झालेल्या लोकांना गुणप्रद आहे.

द्राक्षारिष्ट नांवाचा अवलेह

(६) क्षयांत कास हा उपद्रव फार कष्ट देणारा असतो. त्याकरितां कांहीं विशेष अवलेह व गोळया उपयोगांत आणाव्यात. त्यापैकीं द्राक्षारिष्ट नांवाचा अवलेह उपयोगी आहे. या अवलेहाचें वर्णन अनुभविक चिकित्सा भाग १ मध्यें पान १३ वर केलेलें आहे. या द्राक्षारिष्टांतून कांहीं विशिष्ट क्षार मिसळून त्या खोकल्याच्या उबळी बरोबर चाटविलें असतांना कफ पातळ होऊन खोकला कमी होतो. हे जे क्षार तयार करावयाचे ते वास्तविक क्षाररूप नसून केवळ कोळसारूप असावें. म्हणजे त्यांच्याकरतां लागणारीं द्रव्यें राख होईपर्यंत न जाळतां फक्त कोळसा होईपर्यंत जाळावीं. यापैकीं कांहींचें वर्णन करूं.

कोहाळ्याच्या फोडींचा कोळसा

(अ) कोहाळ्याच्या फोडी उन्हांत वाळवून त्यांना कोळसा होईपर्यंत जाळावें. आणि कोळसा त्यांचा बारीक वाटून वस्त्रगाळ चूर्ण करून ठेवावें. कैफिक कास असतांना हेंच द्रव्य द्राक्षारिष्टांतून चाटवावें.

वेलदोड्यांच्या टरफलांचा कोळसा

(ब) विलायच्यांतून दाणें काढल्यानंतर उरलेली टरफलें अशीच कढईत ठेवून वर झांकण घालून, खालीं अग्नि देऊन त्यांचा कोळसा तयार करावा. उत्तम वस्त्रगाळ पूड केलेला हा कोळसा दाडिमावलेहांतून (अनुभविक चिकित्सा भाग १ पान ८) चाटवावा हाहि पित्तजकासावर उपयोगी असतो.

गृहवैद्य अथवा क्षारचिकित्सा
लेखक:-डॉ. गर्दे, आय्. एम्. एस्. (रिटायर्ड)
किंमत ३ रु., ट. ख. १० आणे
(१) वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक
(२) डॉ. गर्दे, २६ मोंगल लेन, मुंबई १६

मक्याच्या-बुरखुंडाचा कोळसा

(क) कणसांतील मक्याचे दाणे काढून घेतल्या-नंतर उरलेला भाग चांगला उन्हांत वाळवून त्याचाहि कोळसा वर वर्णन केल्याप्रमाणें तयार करावा. याची वस्त्रगाळ पूड ही वातकफजन्य खोकल्यावर मधांत मिसळून चाटवावी.

टांकणखाराची लाही

(ड) टाकणखाराची भाजून लाही तयार करावी. ती मधांतून चाटविली असतांना कफज कास कमी होतो. याप्रमाणें हे अत्यन्त कमी खर्चांत तयार होणारे परन्तु अनुभवानें सिद्ध ठरलेले असे योग आहेत. ते क्षुद्र न समजतां त्यांचा अवश्य अनुभव घ्यावा.

कफावर कोळसा मिश्रित द्रव्यें

या कोळशाच्या चाटविण्यांत जें तत्व भरलेलें आहे तें आधुनिक शास्त्रज्ञांच्या लक्षांत आल्यासारखें वाटतें. कारण त्यांचे मत आजकाल असें होऊं लागलें कीं या कोळशांत कफाला संशोषित करण्यांचा धर्म असतो आणि म्हणूनच कफावर कोळसा मिश्रित द्रव्यें (परंतु तो कोळसा किंमती वस्तूंचा तयार करून) वापरण्यास प्रारंभ करूं लागले आहेत. असें त्यांच्या एतद्विषयक सिद्ध व विक्रीस ठेवलेल्या औषधांवरून कळतें.

तालिसादि गुटिका

तालीसपत्र, मिरें, सुंठ, पिंपळी, हीं प्रत्येकीं क्रमशः एक दोन तीन व चार भाग घेऊन त्यांत दालचिनी व विलायची अर्धा अर्धा भाग घालून खडीसाखर ३२ भाग घालावी. हें चूर्ण वस्त्रगाळ करून मधाबरोबर चाटवावें. चूर्णांतील खडीसाखर निराळी ठेवून तिचा पाक करावा. व तो पाक एक-तारी झाला म्हणजे त्यांत बाकीच्या औषधींचें वस्त्रगाळ चूर्ण घालून त्याच्या तीन तीन मासे वजनाच्या गोळ्या तयार कराव्या. यांना तालिसादि गुटिका असें म्हणतात. या गोळ्या तोंडांत धरून रस गिळत गेल्यानें खोकला व कफ दोन्हीहि कमी होतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द्राक्षादिवटी

बिया काढलेली वाळलेलीं द्राक्षें (मनुका) चार-भाग, बी काढलेल्या खारका ४ भाग, खडीसाखर ४ भाग, पिंपळी २ भाग, वाळलेली मोहाची फुलें १ भाग, तेजपत्र १ भाग, दालचिनी १भाग व विलायची १ भाग, हीं सर्व द्रव्यें एकत्र करून त्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून त्या चूर्णात गोळ्या तयार करतां येतील इतका मध घालावा व चार-चार माशे वजनाची एक गोळी याप्रमाणें गोळ्या तयार कराव्यात. गोळ्या तोंडांत धरल्या असतांना खोकल्याचा वेग कमी होऊन कफ पातळ होतो.

एलादिवटी

विलायची १ भाग, दालचिनी १ भाग, तेजपत्र १ भाग, बिया काढलेल्या मनुका ६ भाग, खडीसाखर ४ भाग, खारीक ४ भाग, ज्येष्ठमध ४ भाग व पिंपळी २ भाग या सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करून त्यांत मध मिसळून गोळ्या तयार कराव्या. याहि वरप्रमाणेंच क्षयाच्या कासावर उपयोगी होतात.

च्यवनप्राश

च्यवनप्राश नांवाचें रसायन आयुर्वेदांत प्रसिद्ध असें रसायन आहे. तें चरक ग्रंथांत रसायनाध्यायांत अध्याय १ श्लोक ६२-७४ वर वर्णन केलेलें आहे. हें वर वर्णन केलेलें अमृतप्राश प्रमाणेंच सरासरी ४० औषधींबरोबर आंवळे शिजवून त्या आवळ्यांचा गीर वस्त्रांतून फेसून काढून त्यापासून तयार केलें जातें. हें प्रत्येक वैद्यानें स्वतः तयार करावें. आणि क्षयच नव्हे तर इतर अनेक विकार ज्यांचें वर्णन वर अमृत-प्राशाच्या विवेचनांत केलें आहे त्या सर्वांवर उपयोगांत आणावें. हें सेवन करतांना राजयक्ष्मा-खेरीज करून-इतर व्याधींत कोणतेंहि पथ्य करण्याची जरूर नसते. याच्या सेवनानें च्यवनऋषी वृद्धावस्थेंत देखील तरुणाप्रमाणें बुद्धियुक्त होऊन आमित आयु प्राप्त करते झाले असें वर्णन आहे.

मालिशसाठीं लाक्षादितेल

(११) राजयक्ष्म्यांत शरीरास दररोज मालिश करण्याकरतां लाक्षादि तैलाचा उपयोग करावा. हें तैल तयार करण्याचा विधि असाः- प्रथम उपलब्ध झाल्यास बोरीची किंवा न झाल्यास पळसाची लाख घेऊन तिच्यांत १६ पट पाणी घालून १/८ काढा तयार करावा. ६४ तोळे शुद्ध काळ्या तिळीचें तेल घेऊन त्यांत वर तयार केलेला लाखेचा काढा २५६ तोळे घालून शिजविण्यापूर्वी त्यांत खालीं दिलेल्या एक एक तोळा औषधींचा कल्क (पाणी घालून चटणीसारखें वाटलेलें द्रव्य) मिसळावा. त्या औषधी अशाः- ज्येष्ठमध, देवदार, दारुहळदी, नागरमोथा, मुरडशेंग, कुटकी, शोप, पिंपळी, चंदन आणि रास्ना. नंतर तें सर्व मिश्रण शिजवावें. शिजतां शिजतां तेलांत बुडबुडे येऊं लागले म्हणजे तें उतरून गाळून बाटलींत भरून ठेवावें. याला लाक्षादितैल असें म्हणतात. याची दररोज सकाळ संध्याकाळीं रुग्णास मालिश करावी. याचप्रमाणें चंदनादि तैल, चन्दनबलालाक्षादि तैल, लक्ष्मीविलास तैल इत्यादि तैलांचें विवरण योगरत्नाकरांत राजयक्ष्माचिकित्सेंत केलेलें आहे. तरी ती तयार करून त्यांचाहि उपयोग करावा.

याप्रकारें राजयक्ष्म्यावर अनुभवानें सिद्ध झालेली अशी चिकित्सा वर्णन केली.

महत्वाच्या लक्षांत ठेवण्याच्या बाबी

ही चिकित्सा करीत असतांना कांहीं महत्वाच्या बाबी लक्षांत ठेवल्या पाहिजेत. त्या अशा-

डॉ. वा. कृ. जोशी M.B.B.S.(गुलबर्गा) यांचे ग्रंथ स्टेथॉस्कोप व छातीची तपासणी (पूर्वार्ध) पृष्ठें २५०; आकृत्या १५० किं. ६ रु. ट. ख. अलग.

कफक्षय व त्यावरील उपचारांची दिशा. यांत उपचाराची आजतागायत माहिती आहे. पृष्ठें ४००; किंमत ७ रु. ट. ख. अलग.

पुस्तकें ग्रंथकर्त्याकडे अगर वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक यांच्याकडे मिळूं शकतील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तापमानाचा आलेख ठेवावा

१ रुग्णाच्या ज्वरासंबंधी ज्ञान प्रतिदिवस झालें पाहिजे, म्हणून आजकाल उपलब्ध असलेल्या थर्मामीटरद्वारा दिवसांतून चार चार तासांनीं घेतलेल्या तापमानाचा आलेख (Chart) तयार करण्यास विसरूं नये. त्यायोगें रुग्णांत होणारे सूक्ष्म परिवर्तन समजून जातें.

कफाचा वर्ण व प्रमाण

१. रुग्णाच्या कफाच्या वर्णाकडे विशेष लक्ष द्यावें, त्याचा निळसरपणा कमी होऊन पांढरेपणा येणें व हळूहळू घट्ट झाल्यानन्तर तो प्रमाणांत कमी निघूं लागणें हें शुभ लक्षण आहे. परन्तु त्याबरोबरच त्याचा आहार वाढून त्याला शक्ति वाटूं लागणें हें अत्यन्त आवश्यक आहे.

आहार काय असावा

(३) आहार सदैव स्निग्ध व पुष्टिकर परंतु पचेल इतक्या प्रमाणांत देत राहिलें पाहिजे. याकरितां रोज सकाळ संध्याकाळ लोणी आणि खडीसाखर (दोन्ही एकएक तोळा) त्यांत सोन्याचा वर्ख योग्य प्रमाणांत घालून द्यावा.

जेवणांत दररोज घेण्याचे पदार्थ (पोळी, जुन्या तांदळाचा भात, तुरीचें व मुगाचें वरण भरपूर तूप घालून (भाज्यांत) दुध्या, परवर, तोंडली, गिलकी, पडवळ या भाज्या विशेष करून द्याव्या. क्वचित् प्रसंगीं बटाटा रताळी, व पालक या भाज्याहि द्याव्या. तेल व तिखटास स्पर्श शिवूंहि देऊं नये. दूध, तूप पचेल तितक्या प्रमाणांत गाईचें व शेळीचें द्यावें. म्हशीचें अजिबात देऊं नये. मधुर पदार्थ तयार करतांना खडीसाखर उपयोगांत आणावी. कारण खडीसाखर ही कफनाशक असून साखर कफकारक आहे. आहार नियमित वेळीं व नियमित प्रमाणांत द्यावा. मोकळी हवा जितकी सेवन करतां येऊं शकेल तितकी घ्यावी. पाणी चांगल्या विहिरीचें ताजें उपयोगांत आणावें, परंतु हिवाळ्यांत तें देखील उकळून थंड करून द्यावें. स्नान जास्त असतांना रुग्णास प्रतिदिवस स्नान घालूं नये, उन्हाळ्यांत मात्र घालावें. कफ थुंकण्याची भांडीं दररोज ऊन पाण्यानें स्वच्छ घासावीं. व वस्त्रप्रावरणें प्रतिदिवस होतील तितकीं धुवून वापरावीं. रुग्णाच्या निजण्याच्या स्थानीं सकाळ संध्याकाळ गुग्गुळ, लोबाण इत्यादि धूप व अगरबत्त्या जाळीत असावें. हें सर्व धूप कृमिघ्न असावेत.

द्रव्य क्षय करणारी चिकित्सा

राजयक्ष्मा व्याधींत ज्याप्रमाणें रुग्णाच्या धातूंचा क्षय होतो, त्याचप्रमाणें त्याची चिकित्साहि द्रव्याचा क्षय करणारी अशी आहे. द्रव्य अधिक प्रमाणांत खर्चून देखील घरच्या लोकांस रुग्ण बरा झाल्याचें क्वचितच नशिबीं असतें. म्हणून हा व्याधी न होईल अशी खबरदारी घेणें प्रत्येक कुटुंबांतील अध्यक्षास व व्यक्तीस आवश्यक आहे. त्याकरतां आयुर्वेदांत वर्णन केलेली दिनचर्या, ऋतुचर्या व रात्रचर्या फार काळजीपूर्वक (scrupulously) व निष्ठापूर्वक शंका कुशंका मनांत न आणतां पाळणें हेंच श्रेयस्कर ठरतें. ईश्वरावर निष्ठा, घरांतील वृद्धांची सेवा, आज्ञापालन इत्यादि व्यवस्थित केल्यानें मनुष्याच्या वृत्ति व आचरण शुध्द होऊन त्यास कोणताहि रोग होण्याचा संभव कमी असतो. म्हणून आयुर्वेदांत वर्णन केलेल्या सद्वृत्तांचें आचरण अवश्य करावें.

डॉ. वि. म. भट

यांचे ३ ग्रंथ

रोगविज्ञान (जोड पुस्तक)	भाग १ ला / भाग २ रा	१२ रु.
स्त्रीरोगविज्ञान	आवृत्ती २ री	५ रु.
प्रसूतितंत्र	आवृत्ति २ री	७ रु.

टपालखर्च निराळा

वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९ वें महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन

म. प्रां. वैद्य संमेलनाच्या लातूर येथें भरावयाच्या अधिवेशनाचे स्वागतमंडळ आतां तयार झाले असून पुढीलप्रमाणें लोक स्थानापन्न झाले आहेत असें कळतें.

स्वागताध्यक्ष व कोषाध्यक्ष — वै. बैजनाथजी झंवर

स्वागतोपाध्यक्ष — वै. वि. पं. महाजन (पैठण)
वै. रामवल्लभ व्यास
डॉ. नीळकंठराव कुलकर्णी
डॉ. नारायणराव कुलकर्णी
श्री. किसनराव बागायत मास्तर

स्वागतकार्याध्यक्ष — वै. डी. आर. दास

मंत्री — वै. श्री. गो. जोहारी
वै. ग्रा. श्री. शिरसीकर
वै. अरविंद
वै. आंबसेकर
वै. गोपाळ देव (नांदेड)
वै. धर्मराज जोशी (बीड)

संमेलनाच्या तारखा ता. २४-२५ मे १९५१

अपामार्गासवाचा पाठ

अपामार्ग पंचांग-१० शेर, पाणी १२ शेर काढा करून गाळून शिल्लक २५ शेर नंतर त्या साखर २५ शेर व मध १० शेर.

आवाप द्रव्यें-धायटी फूल १०० तोळे, वेखंड १० तोळे, मिरे १० तोळे, दालचिनी १० तोळे, पिंपळी १० तोळे, नागकेशर १० तोळे, तमालपत्र १० तोळे.

वैद्य सावंत मॅजिस्ट्रेट झाले

पांचगणी येथील सर्वोदय कार्यकर्ते वैद्य भाऊ सावंत यांनीं खेड्यांतून सार्वजनिक आरोग्याचें उत्कृष्ट काम केल्याबद्दल मुंबई सरकारनें त्यांना ऑनररी सेकंड क्लास मॅजिस्ट्रेट नेमलें आहे.

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर, मौक्तिक (मोती खाका), शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें आम्ही घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितो!

गुलकंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील!

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य!

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

टे. नं. ३१७९६ Telegram AYURVED

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रजिस्ट्रेशन ट्रिब्युनलच्या कामकाजाबाबत प्रश्नोत्तरी

प्रश्न– १९४१ ला अर्ज करून जे एन्लिस्टेड झाले आहेत त्यांना यापुढें रजिस्ट्रेशन मिळणारच नाहीं कां?

उत्तर–सध्य जो कायदा अस्तित्वांत आहे तदनुसार रजिस्ट्रेशन मिळण्याची कांहीं व्यवस्था नाहीं. असेंब्लींत बिल आणून तसा कायदा करून घेतला तर रजिस्ट्रेशन मिळूं शकेल.

प्रश्न– रजिस्ट्रेशन ट्रिब्युनलपुढें रजिस्ट्रेशन किंवा एन्लिस्टमेंटकरितां करावयाच्या अर्जांत रजिस्ट्रेशनकरितां किंवा एनलिस्टमेंटकरितां पात्र ठरण्यास अनुक्रमें कमींत कमी किती वयोमर्यादा आवश्यक आहे?

उत्तर– १९४१ सालीं धंदा करण्यास योग्य असें वय (१८) असेल तर एन्लिस्टमेंटकरतां ती व्यक्ति वयानें पात्र ठरेल. रजिस्ट्रेशनसाठीं त्यापेक्षां १० वर्षे जास्ती म्हणजे २८ वर्षे वय पाहिजे. म्हणजे त्या व्यक्तीचें वय १९५२ सालीं ३९ तरी पाहिजे. धंदा करण्यास योग्य वय कोणतें यावर हें सर्व गणित अवलंबून आहे. पूर्वी १८ ऐवजीं २०।२१ ही वयोमर्यादा आवश्यक मानीत.

प्रश्न– दंतवैद्यक वगैरेचें रजिस्ट्रेशन घेतलेल्यांना काय-चिकित्सक वगैरेचा व्यवसाय करतां येतो काय?

उत्तर– दंतवैद्यकाचें रजिस्ट्रेशन घेतल्यानें कायचिकित्सक असण्याला बाधा येत नाहीं पण फार्मसी (कंपौंडर) रजिस्ट्रेशन घेणाऱ्याला वैद्य म्हणून व्यवसाय करतां येणार नाहीं.

प्रश्न– केवळ अस्थिवैद्यक करणारांना रजिस्ट्रेशन (१९३८ चे) घेणें आवश्यक आहे काय?

उत्तर– केवळ अस्थिवैद्यक (हाडें बसविणें) करणाऱ्यांनाहि १९३८ चें राजिस्ट्रेशन घेणें आवश्यक आहे. कारण त्यांत रोगनिदान व तदनुसार चिकित्सा करावयाची असते.

प्रश्न– आतां ज्यांचें रजिस्ट्रेशन किंवा एन्लिस्टमेंट रजिस्ट्रेशन ट्रिब्युनलनें नाकारलें आहे त्यांनीं काय करावें? त्यांना हें मिळविण्याचा कांहीं मार्ग आहे काय?

उत्तर– त्यांनीं तें न देण्याला जें कारण दाखविलें असेल तें निराकरण करण्याचा प्रयत्न करावा सध्यांचा कायदा व त्यावरील नियम बदलण्याचा कायदेशीर प्रयत्न करावा. रजिस्टर्ड वा एन्लिस्टेड डॉक्टर, वैद्य, हकीम नसेल त्या भागांत व्यवसाय करण्यास मुभा ठेवली आहे, त्या भागांत व्यवसाय करावा.

प्रश्न– रजिस्ट्रेशन ट्रिब्युनलकडे पाठविलेले व रजिस्ट्रेशन ट्रिब्युनलनें घेतलेले निर्णय वगैरे कागदपत्रांची नक्कल पैसे भरून मिळेल काय?

उत्तर– पैसे भरून नक्कल मिळाली पाहिजे. चौकशी करावी लागेल.

प्रश्न– इतर प्रांतांतील रजिस्ट्रेशन मुंबई प्रांतांत चालतें काय?

उत्तर– नाहीं.

प्रश्न– मुंबई प्रांतांत रजिस्ट्रेशन सक्तीचें आहे काय?

उत्तर– होय.

प्रश्न– सन १९४१ मध्यें ४ नोव्हेंबरच्या आंत रजिस्ट्रेशनकरितां अर्ज केला परन्तु आर्थिक परिस्थिति अनुकूल नसल्याकारणानें १० रुपये रजिस्ट्रेशन फी म्हणून पाठवितां आले नाहींत, अशांचा विचार ट्रिब्युनल कसा करते?

उत्तर– आर्थिक परिस्थिति प्रतिकूल होण्याची कारणें सबळ असतील तर विचार करूं शकेल. स्वाभाविक स्थितींत मात्र विचार करणार नाहीं.

प्रश्न– मुंबई प्रांतांत विलीन झालेल्या संस्थानांतील वैद्यांप्रमाणें प्रांताबाहेरील संस्थानांतील वैद्यांना रजिस्ट्रेशनबाबत कांहीं सवलती आहेत कां?

उत्तर– नाहींत.

प्रश्न– रजिस्ट्रेशन ट्रिब्युनल साधारणपणें रजिस्ट्रेशन कोणाला देतें व एन्लिस्टेड कोणाला करते?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्तर–ज्यांचें जीवन वैद्यकी याच व्यवसायावर अवलंबून असेल अशा १९४१ पूर्वी १० वर्षे व्यवसाय करणाऱ्याला रजिस्ट्रेशन व ४ नोव्हेंबर रोजीं व्यवसाय करीत असलेल्याला एन्‌लिस्टमेंट देतें.

प्रश्न– कलम ३७ प्रमाणें राहाण्याचें ठिकाण शहर पण प्रॅक्टिस मात्र वैद्य नसलेल्या जवळच्याच खेड्यांत असली तर कांहीं बाध आहे कां ?

उत्तर– रहाण्याचें ठिकाण कोठें हा प्रश्न नाहीं. प्रॅक्टीस मात्र वैद्य, डॉक्टर नसलेल्या खेड्यांत असल्यास बाधा येणार नाहीं.

प्रश्न– सन १९३८ सालापासून १९४२ पर्यंत वैद्यकीय व्यवसाय पर प्रांतांत करतो आहे. आतां मुंबई प्रांतांत वैद्यक व्यवसाय करूं इच्छितो अशानें काय करावें ?

उत्तर– व्यवसाय कोठें करत होता हा प्रश्न नाहीं. तो ४ नोव्हेंबर रोजीं व्यवसायांत असेल तर एन्लिस्टमेंट व १९४१ सालीं १० वर्षे झालीं असल्यास व त्यानें मुदतींत अर्ज केला असल्यास रजिस्ट्रेशन मिळेल.

प्रश्न– सन १९४१ सालीं ४-११ ला वैद्यक व्यवसाय करीत आहे याला आधार कोणकोणता व कशा स्वरूपाचा दाखवावयास पाहिजे. ?

उत्तर– त्यावेळचीं रोग्यांचीं पत्रें, प्रिस्क्रिपशन पेपर्स, वैद्यकीय पैसे जमा झाल्याची हिशेबवही इ. शक्यतों त्या वेळेचा लेखी पुरावा हवा.

प्रश्न– रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनर आहे पण धंदा दुसराच करतो तर कायद्यानें रजिस्ट्रेशनला कांहीं बाध येईल कां ?

उत्तर– असें असूं नये असें कायद्याचें म्हणणें आहे. दुसरा धंदा करणें असेल तर तेवढ्यावेळापुरतें आपलें रजिस्ट्रेशन तहकूब करून ठेवतां येतें.

प्रश्न– सन १९३५ ते १९३९ पर्यंत वैद्यक व्यवसाय पण पुढें ३ वर्षें दुसराच व्यवसाय केला आहे. ता. ४।११।५३ ला तो वैद्यक व्यवसाय करीत नव्हता. आज पुन्हां त्याला वैद्यक व्यवसाय करावयाचा आहे, त्यानें काय करावें ?

उत्तर– रजिस्ट्रेशन अगर एन्‌लिस्टमेंट [illegible] शकत नाहीं. खेड्यांत धंदा करावा.

प्रश्न– एखाद्या विशिष्ट हेतूनें वा तशा [illegible] मिळाल्यामुळें किंवा चुकीनें म्हणा अगर अन्य [illegible] कारणानें, वैद्यक व्यवसाय करीत असतांही फार्मसी रजिस्ट्रेशन ॲक्टखालीं रजिस्टर करून घेतलें [illegible] अशांना फार्मसी रजिस्ट्रेशन घेतल्यामुळें [illegible] स्ट्रेशन अथवा एन्‌लिस्टमेंट मिळूं शकलें नाहीं अशांनीं काय करावें ? ते फार्मसी रजिस्ट्रेशन सोडून दिलें व मग इकडे प्रयत्न केला तर चालेल काय ?

उत्तर– चुकीच्या सल्ल्यामुळें ज्यांनीं फार्मसी रजिस्ट्रेशन घेतले त्यांनीं तें प्रथम कॅन्सल ([illegible] करून घ्यावें व मग ट्रिब्यूनलला आपली चूक कळवून दुरुस्ती मागावी.

प्रश्न– मुंबई प्रांताच्या बाहेरील कोणकोणत्या पदव्या धारण करणारांना मुंबई प्रांतांत रजिस्ट्रेशन मिळूं शकते ?

मुंबई प्रांताबाहेरील बनारस व मद्रास येथील आयुर्वेदासंबंधीची सरकारमान्य पदवी असणाऱ्यांना A. M. S. (बनारस) L. I. M. (मद्रास) यांना मुंबई राज्यांत रजिस्ट्रेशन मिळतें.

प्रश्न– ट्रिब्युनलच्या सभासदांना फळ वगैरे भेट पाठविणें हा शिक्षार्ह गुन्हा आहे काय ?

उत्तर– शिक्षा झाली आहे त्याअर्थी तो शिक्षार्ह गुन्हाच मानावा लागेल.

लांबलांबच्या खेड्यापाड्यांतहि

आयुर्वेद सेवा संघ, नाशिकच्या सर्व गुणकारी औषधांस नित्याची मागणी असते.

श्री अशोक अरुणाचल मंकाल

पो. चिटगोपा (जि. गुलबर्गा)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजयक्ष्मा-निदान आधुनिक साधनें व ज्वर

[लेखक : डॉ. प्र. शं. गुप्ते, एम्. बी. बी. एस्]

ता. १६ मार्च १९५३ च्या आयुर्वेद-पत्रि-केंतील "श्री. वृद्धवैद्य" ह्यांनीं राजयक्ष्मा-निदान ह्या विषयावर लिहिलेला लेख वाचला. आधुनिक वैद्यक शास्त्राच्या साधनांचा क्षयरोगाचें (फुप्फुस-क्षय) निदान करण्यांत होत असलेल्या उपयुक्ततेवर जो उल्लेख केला, त्या संबंधानें व राजयक्ष्म्याच्या निदानांत ज्वराविषयीं लिहिलेल्या मजकुरावर दोन शब्द लिहिणें जरूर आहे.

एक्स्रेची आवश्यकता

नुसत्या बाह्य लक्षणावरून क्षयरोगाचें पूर्वस्वरूप ओळखणें कठीण व धोक्याचें असतें. ज्वर या लक्ष-णावर विशेष लक्ष दिल्यानें चूक होण्याचा संभव असतो. क्षयरोग, मलेरिया म्हणून पुष्कळ वेळां समजला जातो. अन्तर्गत इंद्रियांत जन्तूचा उपद्रव झाल्यानें नियमित ताप येतो; उदाहरणार्थ- वृक्कद्रोणदाह (पायला-यटीस) वगैरे. तसेंच क्षयरोगांत नियमित ताप असलाच पाहिजे हें विधान चुकीचें आहे. फायब्राईड (तन्तुभूत) प्रकारांत नियमित ताप येईलच असें नाहीं. (Price's Text Book of Medicine पान १२१५ सातवी आवृत्ति १९४६). कांहीं रोग्यांना श्रम पडलें तरच ज्वर येतो. क्षयरोगाचें 'हल्मन वर्गीकरण' ह्या ज्वर तत्त्वावर केलेलें आहे. रोग्याला क्षयरोग झाला आहे हें कित्येक वेळां रक्तष्ठी-वनानंतर किंवा वातवक्ष (न्यूमोथोरॅक्स) झाल्यावर समजून येतें. म्हणून क्ष किरणांनीं प्रत्येक रोगी तपासणें फार महत्वाचें आहे. कारखान्यांतून वगैरे कामावर असणारांना 'स्टेट इन्शुअरन्स' कायदा अमलांत अस-ल्यास प्रत्येक कामगाराचा एक्स-रे फोटो घेणें जरूर असतें. ह्यावरून तो नोकरीवर घेण्यापूर्वीं क्षयानें पीडित झाला आहे किंवा नाहीं हें समजून येतें.

स्टेथोस्कोपचा उपयोग

द्विनलिकेचा (स्टेथॉस्कोप) उपयोग राजयक्ष्म्याच्या निदानांत बराच होतो. फुप्फुसाच्या [illegible] क्षयरोगाचा उद्भव झाला असल्यास त्याचें पूर्व-स्वरूपांत निदान करतां येतें. तसेंच दुसऱ्या उपाधी असल्यास त्याहि समजून येतात. उदाहरणार्थ:— फुफ्फुसावरणदाह (प्ल्यूरिसी); फुफ्फुसनलिका विस्तार (ब्रॉन्किएक्टसिस); वातवक्ष (न्यूमोथोरॅक्स) वगैरे. त्यांवरून पृथक् निदान करण्यास मदत होते.

फरक जाणण्यास साधनांची जरूरी

चिकित्सा सुरूं होण्यापूर्वीं व चालू असतांना फुप्फुसांची अवस्था कशी काय आहे व त्यांत फरक कशारीतीनें आणि किती होत आहे हें समजणें महत्त्वाचें आहे. तें ह्या आधुनिक साधनांनींच होऊं शकेल. सर्व उपलब्ध साधनांचा उपयोग जरूर पडेल त्यावेळीं करणें वैद्याच्या व रोग्याच्या दृष्टीनें हितावह आहे.

लक्षणरहित राजयक्ष्मा

लक्षणरहित राजयक्ष्मा असूं शकतो हें वैद्यानें ध्यानांत ठेवावें. "रुग्णास होणारीं लक्षणें (Clinical picture) हेंच निदानाचें प्रमुख साधन होय असें आजकालचे मोठमोठे पाश्चात्य देशांतील चिकित्सा शास्त्रज्ञ म्हणूं लागले आहेत." ह्या विधा-नाला "श्री. वृद्धवैद्य" ह्यांनीं स्पष्ट आधार दिला असतां तर बरें झालें असतें. लेखकानें दिलेलीं लक्षणें रोगाचा शरीरांत संपूर्ण प्रादुर्भाव झाल्यावर दिसूं लागतात. पूर्वस्वरूपांत रोग ओळखण्यास आधुनिक साधनांचें महत्व फार आहे हें मात्र निश्चित.

———

पवित्र नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहाः-नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि नं. ३।२०००।२००१ नेपाळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार-

सरकारनें वैद्यासाठीं काय करावें ?

मागें आयुर्वेद पत्रिकेंत " सरकारनें वैद्यांसाठीं काय करावें " अशाबद्दल वैद्यांच्या काय काय अपेक्षा आहेत तें कळविण्याविषयीं लिहिलें होतें. तें पुढें कळवीत आहे.

१) एकदां रजिस्टर्ड झाल्यानंतर वैद्याकडून पुन्हां रजिस्ट्रेशन फी घेऊं नये.

२) अफू, भांग, गांजा, आसवारिष्टें यावर नियंत्रण असूं नये.

३) डॉक्टर वैद्यांच्या पगारांत विषमता नसावी.

४) सर्वत्र वैद्यांचें सर्टिफिकिट मान्य करावें.

५) सरकार ज्यांना आज अन्‌क्वालिफाईड समजतें त्यांना शिक्षण देऊन क्वालिफाईड करून घ्यावें.

६) प्रत्येक जिल्ह्यांत ठिकठिकाणीं असलेल्या वनस्पतींचीं जंत्री करण्यासाठीं सरकारी खर्चानें वैद्य हिरामण जंगले यांच्यासारख्या जाणत्या वैद्यांची समिति नेमावी. म्हणजे मिळणारी माहिती कायमची दप्तरीं राहील. मदतीला स्थानिक माहितगार वैद्य घ्यावे. यायोगें अमुक वनस्पती कोठें मिळेल याची अडचण पडणार नाहीं.

७) आयुर्वेदीय दवाखाने येथून तेथून सर्व एकाच अधिकाऱ्याच्या ताब्यांत असावें.

८) सर्व नोकर-वैद्यांची बदलीची पद्धत ठेवावी म्हणजे वैद्याला सर्वकडील अनुभव येईल व लोकांनाहि निरनिराळया वैद्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ होईल.

९) जिल्हा व तालुकावार वनस्पतींचें कायमचें प्रदर्शन असावें.

१०) आयुर्वेदीय हॉस्पिटल वैद्य गणेशशास्त्री जोशी यांच्यासारख्या अनुभवी व जुन्या वैद्यांच्या हातांत असावें. म्हणजे प्रयोग करण्यांत वेळ न जातां हमखास शास्त्रीय चिकित्सा होऊन लवकर रोगमुक्ती होईल. अशी केलेली चिकित्सा प्रसिद्ध करावी.

११) कॉंग्रेसप्रमाणें आयुर्वेदाच्या नांवानें वार्षिक वर्गणी ठेवावी. वैद्य असो वा वैद्येतर असो त्यास मेंबर होतां यावें.

१२) त्याच्या शाखा तालुक्यापर्यंत, गांवापर्यंत व्हाव्या. व या कार्यासाठीं पगारी आयुर्वेदज्ञ असावे.

१३) वास्तविक सब्सिडाइझ्ड मेडिकल प्रॅक्टिशनर्स अशा गांवीं नेमावें कीं तेथें त्यांना द्रव्यप्राप्ति होऊं शकेल आणि खरें म्हटलें तर सरकारनें संपूर्ण धर्मार्थ दवाखानें ठेवणें युक्त आहे. व वैद्याला खाजगी प्रॅक्टिस करण्याची इच्छा होऊं नये इतका भरपूर पगार द्यावा.

१४) खेड्यांत राहणाऱ्या वैद्यांचाच काय पण इतर मास्तर, तलाठी, कारकून वगैरेंच्या मुलांच्या शिक्षणासाठीं बोर्डिंग काढावें म्हणजे हे लोक खेड्यांत जाण्यास नाखूष होणार नाहींत.

चेंबूर, सोलापूर, कोल्हापूर, पनवेल येथील सम्मेलनाध्यक्षांच्या भाषणाचा जर आजपर्यंत सरकारनें विचार केला असतां तर आतापर्यंत पुष्कळ सुधारणा दिसली असती.

का. वि. पुराणिक

होमिओपाथिक चिकित्सापद्धति
[किं. २॥ रु. ट. ख. निराळा]
१ वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक
२ मे. काणे बंधु, टिळक चौक-कल्याण

सेवा संघाचीं सर्व औषधें तसेंच खात्रीचीं सर्व देशी काष्ठौषधी व ताजी वनस्पती आणि शिलाजीत, कस्तुरी, केशर, भीमसेनी कापूर, गोरोचन, वाकेरी भाते, वंशलोचन, नागकेशर, अनंतमूळ, जितसाया, उत्तम महाळेश्वरी मध वगैरे औषधें मिळण्याचें ठिकाणः—
देशी सर्वौषधी संग्रहालय
पोलिस चौकीसमोर, दादर मुंबई २८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुंबई आणि उपनगर वैद्य संमेलन अधिवेशन २ रें

वैद्य वेणीमाधवशास्त्री जोशी यांच्या भाषणाचा सारांश

मुंबई राज्यांतील आयुर्वेदास फांशीची शिक्षा

ऐतिहासिक कालांतील शेंकडों वर्षें आणि पारतंत्र्यांतील दीड शतक आयुर्वेदाची अवनति होत होती, आयुर्वेदाच्या नांवानें डिग्रीकोर्स ज्या दिवशीं कौन्सीलच्या एक्झिक्युटिव्ह कमिटींत मंजूर झाला त्या दिवशीं आयुर्वेदाला फांशीची शिक्षा झाल्याचें दुःख आम्ही अनुभविलें. चौपाटीवरील एका आश्रमांत दुःखी जन एकत्र आले तेव्हां सरकारच्या शैक्षणिक कमिटींतील सन्मान्य सदस्य, आयुर्वेदाचे ऋणानुबंधी आम्हांस गुरुतुल्य असलेल्या एका महान् व्यक्तीनें उद्गार काढले कीं, 'मुंबई राज्यांत आयुर्वेदाचा नाश पूर्णपणें झाला!' त्यावेळचें तें भकास, भयाण व निराश वातावरण, सर्वांचें शुष्क व निस्तेज डोळे, बधिर कान, गलित गात्रें, सुन्न व उद्विग्न मन, कुंठित मति, अशी ती आमची निराधार, दीन, खचलेली, चिंतातुर अवस्था मोठी केविलवाणी होती.

आरोग्यमंत्री डॉक्टर नसावा

वैद्यवर्गाची कमीतकमी अपेक्षा अशी होती की, आरोग्यमंत्रीपदावर निदान डॉक्टर नसलेली व्यक्ति यावी. ती व्यक्ति पूर्वग्रहदूषित असणार नाहीं; आमचें म्हणणें शांतपणानें ऐकून घेऊन विचार करील. श्रीमान् शांतिलालजींच्या नियुक्तीनें ही आशा सफल झाली व सर्व वैद्यवर्गानें समाधानाचा पहिला सुस्कारा टाकला.

श्रीमान् मुरारजींनीं व शांतिलालजींनीं मदत करण्याचें आश्वासन दिलें. गेल्या चार महिन्यांत पेठे या गांवीं निघालेल्या सरकारी रुग्णालयांत वैद्यांना आपल्या शास्त्राप्रमाणें चिकित्सा करण्याची योजना श्री. शांतिलालजींनीं निर्माण केली.

कामास लागा

आपणाला काय करावयाचें याची निश्चित कल्पना वैद्यांना पाहिजे. आज आपण थोडें कां होईना, पण भक्कम कार्य केलें पाहिजे. आज आपण शिक्षण, व संशोधन या कार्याला कायद्याच्या दृष्टीनें अनुकूल परिस्थिति कशी निर्माण करावयाची याचाच विचार करूं.

आयुर्वेदीय शिक्षण

आयुर्वेद या शब्दाचा अर्थ जरी आयुष्याचें ज्ञान असा असला तरी तो शब्द उच्चारतांच त्यांच्या अर्थात ॲलोपॅथी इ० पॅथींचें ज्ञान समाविष्ट असल्याचा बोध होत नाहीं. तर चरक-सुश्रुतादि ग्रंथकार ऋषींनीं ३ दोष, ७ धातु व मल इत्यादि शरीर घटकांच्या दृष्टीनें मांडलेल्या विचारसरणीचें ज्ञान असा होतो. आयुर्वेदांत दोषादि घटकांशीं, त्यांची वाढ, त्यांचा क्षय, त्यांची विकृति यांच्याशीं, सभोंवतालच्या सृष्टींतील वनस्पति, स्थूल सूक्ष्म प्राणी, देशकाल, स्वतःच्या शारीरमानसक्रिया यांच्या संबंधांचे नियम, आणि त्या नियमांचा मानवाचें शारीर मानस विकार शमविणें, ते होऊं न देणें, शरीर व मन निरोगी राखणें, बलवान करणें, दीर्घायुषी होणें, इत्यादिकरितां कसा करून घ्यावयाचा याचें विवेचन आहे. हें ज्ञान म्हणजे आयुर्वेद. आयुर्वेदीय शिक्षण म्हणजे वरील पद्धतीचें शिक्षण. दोष धातुमलविज्ञानाचें शिक्षण.

आयुर्वेदीय व अनायुर्वेदीय शिक्षण

दोषधातुमलविज्ञानानें दिसणारें पूर्णवाढीचें, तरुण, समप्रकृति, समधातुमलक्रिय शरीर असलेला व प्रसन्नात्मेंद्रियमना पुरुष विचारक्षेत्राच्या मध्यबिंदूंत ठेवून भोंवतालच्या चराचर सृष्टीचे इष्टानिष्ट परिणाम व तिचा उपचारांमध्यें उपयोग शिकविणारें शिक्षण म्हणजे आयुर्वेदीय शिक्षण होय. तद्व्यतिरिक्त पद्धतीचें शिक्षण अनायुर्वेदीय होय. आयुर्वेदीय शिक्षण देत असतां अनायुर्वेदीय शिक्षण देणें अत्यन्त मोठी चूक आहे. ॲलोपॅथीचें ज्ञान कितीही चांगलें असलें किंवा अन्य पॅथी कितीही उत्कृष्ट असली तरी तिचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्ञान आयुर्वेदाच्या प्राथमिक शिक्षणाच्या वेळीं जोडीजोडीनें देणें हें घातुक आहे. त्या पॅथीवर अधिक प्रेम असेल तर तिचें ज्ञान अगोदर करून देऊन नंतर हवें तर आयुर्वेदाचें ज्ञान द्यावें. पण आयुर्वेदाचें शिक्षण चालू असतां ॲलोपॅथीचें शिक्षण देणें अत्यन्त अनिष्ट आहे आणि ही अनिष्टता गेल्या ५० वर्षांच्या मिश्र शिक्षणाच्या प्रयोगानें सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट रीतीनें सिद्ध झाली आहे.

डिग्रीकोर्समध्यें जे ॲलोपॅथिक विषय ठेवले आहेत त्यांचें संपूर्ण आयुर्वेदीयकरण करून ते ठेवावेत, म्हणजे आयुर्वेदीय विचारसरणी विद्यार्थ्यांच्या मनांत अखंड घोळत राहील व पक्की होईल.

आयुर्वेदाला जोडच द्यावयाची असेल तर युनानीची चालेल पण ॲलोपॅथीची नको. कारण युनानी वैद्यक आयुर्वेदाचेंच किंचित् निराळें स्वरूप आहे.

मिश्र शिक्षणसंस्थांची खरी जबाबदारी

केवळ आयुर्वेदीय शिक्षणक्रम प्रथम सुरूं करण्याची खरी जबाबदारी मिश्र शिक्षणसंस्थांची आहे.

मिश्र शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या चालकांनीं गेल्या शतकार्धांत निर्माण झालेल्या फलावरून योग्य तो बोध घेऊन विचार करणें जरूर आहे. मुळांतच सुधारणा करणें योग्य आहे.

मिश्र शिक्षणाच्या अभिमान्यांनीं वृथा अभिमानाला व खोट्या इभ्रतीला बळी न पडतां प्रामाणिकपणानें केवळ आयुर्वेदाचा अभ्यासक्रम फॅकल्टीमध्यें पास करून घेऊन तो कार्यवाहींत आणावा आणि सदसद्विवेकबुद्धि जागृत ठेवून, निष्ठुर सत्य पाहून, योग्य पण कठोर निर्णय घेऊन प्रामाणिकपणा व मोठें मन दाखवून आयुर्वेदाच्या उत्कर्षाची मुहूर्तमेढ पन्नास वर्षांपूर्वी प्रथम रोवल्याचा तो मान यावेळींहि अग्रभागीं राहून राखून घ्यावा अशी आशा अखिल आयुर्वेदजगताला वाटत आहे.

आम्हांस काय पाहिजे

मिश्र शिक्षण हें आयुर्वेदास मारक आहे हें सिद्ध झालें आहे. अशावेळीं हें शिक्षण बन्द करा अशीच मागणी वैद्यांनीं करावयास पाहिजे.

आम्हांला केवळ स्वरूपांत जगूं द्या, वाढूं द्या. आम्हांस आमची उन्नति आमच्या मार्गानें करून घेण्याचें स्वातंत्र्य असूं द्या.

लोकशाहीच्या या युगांत आमचे हक्क आम्ही मिळवूं अशी आम्हांस आशा आहे. पण वैद्यबंधूंनो हें संघटनेवर अवलंबून आहे म्हणून संघटना मजबूत बनवावी अशी माझी विनंति आहे.

ॲलोपॅथीनंतर आयुर्वेद शिकण्यापेक्षां आयुर्वेदानंतर ॲलोपॅथी शिकणें हें आयुर्वेदाच्या दृष्टीनें अधिक चांगलें. ॲलोपॅथीनंतर आयुर्वेद शिकतांना ॲलोपॅथीच्या विचाराशीं सम किंवा विषम तसें च्यास योग्य किंवा अयोग्य अशी तुलना चालते. दृष्टि ॲलोपॅथीची असते. त्या दृष्टिकोनांतून आयुर्वेदाकडे पाहिलें जातें व त्यादृष्टीनें काटछाट सुरूं होते. विचारक्षेत्रांत मध्यबिंदूत ॲलोपॅथी असते व तिच्या भोंवती आयुर्वेदीय ज्ञान कमी जास्त त्रिजेच्या अन्तरावर स्थिर केलें जातें. शरीर ॲलोपॅथीचें, परिपोष आयुर्वेदाचा असतो. याच्या उलट परिस्थिति आयुर्वेद बुद्धींत स्थिर झाल्यानंतर ॲलोपॅथीच्या अभ्यासानें होईल.

शिक्षणाचा पहिला आधार—गुरुपरंपरा

आज केवळ आयुर्वेदाच्या कल्पना सांगणारे, शब्दन् शब्द फोडून सांगणारे वैद्य थोडे आहेत, वयानें जास्त आहेत. ते एकत्र येऊन शिकविणारी परिस्थिति राहिली नाहीं, तेव्हां त्यांना स्वतंत्र रीतीनें विद्यार्थी तयार करण्याची परवानगी देऊन या विद्यार्थ्यांना निखिल भारतवर्षीय विद्यापीठाच्या परीक्षांना बसण्याची परवानगी द्यावी. या विद्यापीठाच्या परीक्षांचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्याचें शिफारसपत्र या अध्यापकानें दिलें कीं, त्या विद्यार्थ्यांना परीक्षेला परवानगी द्यावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संशोधनसंस्था पाहिजे

विद्यालयें, दवाखानें, रुग्णालयें, रसशाळा इ. आयुर्वेदाच्या अनेक संस्था निर्माण करून आयुर्वेदाच्या उन्नतीचें, प्रसाराचें कार्य करितां येतें. ...अशा संस्था निर्माण करण्याकरितां ...दानाचा उपयोग करितात.

या सर्व संस्था प्रगतीपर चालावयाच्या असल्यास, त्यांच्यांत खरा प्राण ओतावयाचा असेल, आणावयाचा असेल तर त्यांना संशोधनात्मक ...पुरवठा व्हावयास पाहिजे. संशोधनानेंच या संस्थांचा व शास्त्राचा परिपोष होत असतो. संशोधन संस्था ही इतर संस्थांची ...संस्था आहे.

आयुर्वेदीय संशोधन म्हणजे कोणत्याहि आहार ...द्रव्यांचे तसेंच शारीरकर्मांचे देशकालादिकांचे ...शरीरावर होणारे आरोग्यास साधक वा बाधक ...आयुर्वेदीय पद्धतीनें तपासून त्यांचा उपयोग ...आरोग्यरक्षणास तें वाढविण्यास आणि रोग ...करून घेणें होय.

आयुर्वेद प्रात्यक्षिकावर भर देणारा आहे वैद्यही प्रत्यक्षवादीच आहेत

आयुर्वेदशास्त्र प्रत्यक्षावर आधारलेलें आहे. प्रत्य...त्यानें पहिलें स्थान दिलें आहे. प्रत्यक्षतोहि ..., शास्त्रदृष्टंच यद्भवेत्। समासतस्तदुभयं भूयो ...विवर्धनम्। संशोधनाचा प्रधान हेतु ज्ञानाविवर्धनच ... संशोधन हें त्याचें साधन आहे. प्रत्यक्षांत ... जें जें असेल तें तें शास्त्राच्या विचार...पद्धतीनें पहाणें आणि शास्त्रदृष्टीनें जें जें दिसतें तें प्रत्यक्षांत दिसतें कीं नाहीं तें पहाणें, अशी प्रत्यक्ष व शास्त्र या उभयतांची सांगड घालण्याचा, ज्ञानविवर्धनाकरितां उपयोग करणें म्हणजेच संशोधन होय.

वैद्यांची जबाबदारी

अशी संशोधनाची जबाबदारी घेऊन ती पार पाडणें अत्यन्त कठीण आहे. त्याला शास्त्राचा सतत अभ्यास, खूप वाचन, सतत चिंतन, क्रमानें योजनांची आंखणी, रुग्णालयें, रसशाळा, रसायनशाळा इ. संस्थांत त्या आंखणीप्रमाणें सतत शास्त्रीय प्रयत्न, त्या प्रयत्नांचा आढावा, त्यांचा अभ्यास व पुन्हां पुढील योजना अशा क्रमानें वर्षांनुवर्षें सारखे श्रम करण्याची आवश्यकता आहे. ही जबाबदारी घेऊन, संधि मिळेल तेथें संशोधनाची आवड असणाऱ्यांनीं प्रयत्न केले पाहिजेत. आपले अल्प कां होईना संशोधनक्षम, संशोधन विचार लेखद्वारां प्रसिद्ध करून प्रगट झाले पाहिजेत.

संशोधन कार्याची पूर्वतयारी

आज असलेल्या सामुग्रीवरच पूर्व तयारी करावी लागेल. आजच्या डी. ए. एस्. एफ्. पैकीं आयुर्वेदांत अधिक गुण मिळवून पास झालेल्या व आयुर्वेदाची आवड असलेल्या विद्यार्थ्यांना सहा महिने अवसर देऊन संशोधनात्मक एखादा छोटासा मुद्दा देऊन त्यावर निबंध लिहिण्यास सांगावें, त्याची तयारी कशी करावयाची तें सांगावें व ती तयारीहि निबंधास परिशिष्ट म्हणून जोडण्यास सांगावी. निबंधपरीक्षणानें योग्य वाटणाऱ्या ५।१० विद्यार्थ्यांस स्कॉलर्शिप्स् देऊन त्यांना दोन वर्षांचा कोर्स ठेवून, आयुर्वेदांतील विषयवार संशोधनादि मुद्दे कोणते हें सांगून व संशोधनाची दिशा दाखवून रुग्णालयांत, रसशाळा,

गुळवेल सत्व व वाकेरी भाते ५ रु. रत्तल, उत्तम मध, दशमुळें व इतर २०० फौंडाघाटच्या वनस्पती व त्यांचीं चूर्णें मागणीप्रमाणें पुरवूं.
परळेकर ब्रदर्स, मोंगल लेन, मुंबई १६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रसायनशाळा, प्रयोगशाळा यांत जरूरीप्रमाणें प्रात्यक्षिकाची मदत देऊन त्यांना संशोधनाच्या दृष्टीनें तयार करावें. यापैकीं अध्यापनाची कला असणाऱ्यांकरवी याच विषयांच्या अध्यापनाची व्यवस्था करावी. असे संशोधक तयार झाल्यावर योजनेप्रमाणें संशोधनास सुरवात करावी. प्रथम संशोधक तयार करणें ही पहिली तयारी होय.

संशोधनाचे मुख्य दोन प्रकार

आयुर्वेद संशोधनाचे मुख्य दोन प्रकार आहेत. १ पुराण संशोधन व २ नवसंशोधन. पुराण संशोधनांत पुन्हां दोन प्रकार होतात-एक उपलब्ध शास्त्रसंशोधन व एक अनुपलब्ध शास्त्रसंशोधन. उपलब्ध शास्त्रांतील सिद्धांत व विधानें हीं अनेक प्रमाणें व प्रयोग यांनीं सिद्ध करून, सिद्धांत व विधानें यांच्याशीं सुसंगत मेळ घातलेले वाङ्मय निर्माण करणें हें उपलब्ध शास्त्रसंशोधन होय. शास्त्रांत असलेल्या त्रुटींची पूर्ति जुनें आयुर्वेदीय तसेंच अन्य वाङ्मय यांतून उपयुक्तांश एकत्र करून पुन्हां उपलब्ध शास्त्रसंशोधनाप्रमाणें त्याची सिद्धि करावी. कांहीं प्रमाणांत ही तयारी झाल्यावर नवसंशोधन होईल-या सर्व संशोधनकार्याकरितां मोठे ग्रंथालय, महाविद्यालय, रुग्णालय, शवच्छेदनशाला, रसशाळा, रसायनशाळा, वाङ्मयकार्यालय, वनस्पतिप्रदर्शिनी व उद्यान, शारीरद्रव्यप्रदर्शिनी, खनिज द्रव्यें व इतर औषधिकल्पप्रदर्शिनी इत्यादि अनेक शाखोपशाखांची आवश्यकता आहे.

आधुनिक शास्त्रसंबद्ध तौलनिक वाङ्मय

आधुनिक शास्त्राचा विकास दिनानुदिन वेगानें होत आहे. त्या शास्त्रांच्या ज्ञानाचा पुरेपूर उपयोग आयुर्वेद परिपोषाकरितां करून घेतलाच पाहिजे. आधुनिक शास्त्रज्ञांनीं संपादन केलेल्या माहितीचा, प्रयोगांचा आयुर्वेदाच्या सिद्धांतांची उपपत्ति लावण्याकरितां, निदान, भेदकानिदान इ. करितां फार चांगला उपयोग होतो. आयुर्वेदीय निदानादि शाखांचें उपबृंहण चांगलें करतां [illegible]

दोषधातुमलदृष्ट्या विचार करून तीं आयुर्वे... समाविष्ट करून घ्यावींत. वनस्पति, धातु या... गुणधर्मांच्या सविस्तर कल्पना मांडण्याकरितां हो... ओपॅथिच्या गुणधर्मांचा उपयोग करून घेतां ये... बायोकेमिक चिकित्सा-पद्धति डोळ्यापुढें ठेवून प... चिकित्सा विकसित करितां येईल.

कायदा

आम्हां वैद्य-हकिमाकरितां १९३८ चा बॉं... मेडिकल कायदा निर्माण केला. प्रॅक्टिशनर्स... इन्डियन सिस्टीम्स् ऑफ मेडिसिन असें आयु... म्हटलें जातें. इंडियन मेडिकल सिस्टीम्स् ऑ... मेडिसिनची व्याख्या पार्ट २ (२) मध्यें दिली आ... " इंडियन सिस्टीम्स् ऑफ मेडिसिन " मीन्स... आयुर्वेदिक (इन्क्ल्युडिंग दि सिद्ध) ॲण्ड दि युना... तिब्बी सिस्टीम्स् ऑफ् मेडिसिन, व्हेदर सप्लिमे... ऑर नॉट् बाय सच मॉडर्न ॲडव्हान्स अ... फॅकल्टी मे फ्रॉम् टाईम टु टाइम हॅव्ह डिटर्मिन...

या व्याख्येप्रमाणें मॉडर्न ॲडव्हान्स विषयांची ... न दिलेला आयुर्वेद आणि युनानीहि इंडि... सिस्टीम्स् ऑफ् मेडिसिन या शब्दसमुच्चयानें घेतां ... फॅकल्टीला मॉडर्न ॲडव्हान्स ॲलोपॅथीच्या विष... स्पर्श न करितांहि अभ्यासक्रम आंखण्यास स्वा... आहे.

या लोकशाहीच्या काळांत लोकांच्या माग... धुडकावून कारभार करणाऱ्या संस्था सरकारनें आ... अधिकारानें वठणीवर आणल्या पाहिजेत. वैद्य लोक... आज १४ वर्षांपासून केवळ आयुर्वेदाच्या अभ्या... क्रमाची मागणी पायाखालीं तुडविली जात ... यांचें कारण, मागील सरकारचें धोरण तसें ... सरकार पाठीशीं होतें, त्यामुळें वैद्यांच्या माग... केराची टोपली मिळत असे. सरकारला विनंती ... कीं, आमची मागणी मान्य करण्याकरितां का... बदलण्याचीही आवश्यकता नाहीं. लोकांच्या मा... णीच्या आड कायदा येत असेल तर कायदा ब... हें सरकारचें कर्तव्य ठरतें. तर कायद्याची अं...

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...आवगी लोकांच्या इच्छेनुसार घडवून आणणें ...र्तेंव काम सरकारला करावयाचें आहे. तें काम ...हज होईल अशी आम्हांस आशा आहे.

कायद्याचा हेतु साफ फसला

अॅन् अॅक्ट टु रेग्युलेट दि क्वालिफिकेशन्स अॅण्ड ...प्रोव्हाइड फॉर दि रजिस्ट्रेशन ऑफ् इंडियन ...सिस्टिम्स ऑफ् मेडिसिन वुइथ ए व्ह्यू टु एन्करेज ...स्टडी अॅण्ड स्प्रेड आफ् सच् सिस्टिम्स अॅण्ड... ...कायद्याचें भरतवाक्य आहे. कायदा १९३८ ...झाला. कायद्यापूर्वी ३५–४० वर्षे अॅलोपॅथी ...असलेले (मिश्र) शिक्षण चालूं होतें. कायद्या... ...आज तपाचें वर काळ लोटला. या काळांत ...र्वेद नसलेले, अॅलोपॅथी कशीवशी ओळखीची ...आयुर्वेदाचे शत्रू निर्माण झाले आहेत ...सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट असतां, आयुर्वेदाची ...होत नाहीं; तर आयुर्वेदाचा अभ्यास ...हा कायद्याचा हेतु कोठें पळाला सांगतां येत ...आयुर्वेदाचा अभ्यासच नाहीं तर आयुर्वेदाचा ...कसा होणार? कायद्याचा हेतू साध्य तर झाला ...पण अॅलोपॅथीचा प्रसार मात्र झाला. काय-...च्या हेतूला पूर्ण हरताळ फासला. असें असतांही ...सरकार फॅकल्टीला वठणीवर आणणार नसेल तर ...कायदा व त्या कायद्याचा स्तुत्य हेतू कशाला? ...आयुर्वेदाला, कायद्यानें बंदी घालावी. ...फॅकल्टीचें चंबुगवाळें आटोपतें घ्यावें, आणि ...बी. पी. एस्. ची छोटी आवृत्ति सरकारला ...पाहिजे असेल तर या बोर्ड फॅकल्टीचा उपद्व्याप ...करितां १९१२ च्या मेडिकल बोर्डाकडे अॅलोपॅथी ...डॉक्टरच्या आवृत्त्या काढण्याचें काम सोपवावें. ...इतका अधिक खर्च व खटाटोप कशाला पाहिजेत ...वैद्यांना वाटतें कीं, कायदा, त्याची अंमल-...बजावणी, त्याचे इष्टानिष्ट परिणाम यांची योग्य ...दखल कोणीच घेणारे नाहींत काय? वैद्यांचें म्हणणें ...ऐकणारे कोणीच का नाहीं? असतील तर त्यांना ...हें ज्ञात नाहीं काय? काय? आहे काय स्थिति? आम्ही हतबुद्ध आहोंत!

कायद्याच्या मर्यादा पाळावयाच्या नाहींत, कायद्याचा हेतु साध्य झाला कां नाहीं हें पहावयाचें नाहीं, असा बेलगामी कारभार चालला आहे. सरकारला विनंति आहे कीं या कारभाराकडे लक्ष द्यावें व चौकशी करावी.

आर्थिक साहाय्य

स्वातंत्र्यानंतर अनेक आपत्तींना सरकारला तोंड द्यावें लागलें याची जाणीव आम्हांला आहे. सरकारनें जर केवळ आयुर्वेदशिक्षण संस्था, यांना कांहीं भरीव आर्थिक मदत केली नाहीं तर हीं कार्यें चालणें कठीणच आहेत. अर्थात् या कार्याबद्दल सहानुभूति असणाऱ्या धनिकांकडून व सामान्य नागरिकांकडूनही मदत मिळविण्याचे प्रयत्न वैद्यवर्ग करील यांत संशय नाहीं. सरकारनें आयुर्वेदाचा प्रश्न नीट रीतीनें हाताळावयाचा असें ठरविलें तर त्या दृष्टीनें आर्थिक व्यवस्था करणें फारसें कठीण होणार नाहीं. संशोधनाची बाब तर धनपति व सरकार यांच्या आश्रयावांचून मूर्त स्वरूप घेणेंही शक्य नाहीं. तेव्हां सरकारनें या गोष्टींचें महत्व जाणून योग्य आर्थिक तरतूद करावी अशी विनंति आहे.

बंधूंनो, आपण आतांपर्यंत शिक्षण, संशोधन आणि कायदा या बाबतींत विचार केला. आयुर्वेदीयांच्या जीवनाचे हे तीन आजचे जरूरीचे आधार आहेत. त्रिसूत्र आयुर्वेदाप्रमाणें आयुर्वेदीयांचें जीवनही या तीन सूत्रांवर अवलंबून आहे हीं संभाळलीं पाहिजेत. आपण जागरूकतेनें व बलवत्तर संघटनेनें व सतत परिश्रमानें आपलीं साध्यें साध्य कराल व आयुर्वेदाची उन्नति कराल अशी मी आशा करतो.

पाचोरें येथील नवीन विक्रीकेंद्र

श्री गजानन स्टोअर्स, पाचोरें (पू. खा)
यांचेकडे आयुर्वेद सेवा संघ, औषधीभवनांत तयार झालेलीं सर्व औषधें मिळतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय वैद्यक व्यवसायींसाठीं
रिफ्रेशर कोर्स (उजळणी वर्ग)

मुंबईच्या फॅकल्टी ऑफ आयुर्वेदिक अ‍ॅण्ड तिब्बी सिस्टिम्स ऑफ मेडिसिन तर्फे पुढील ठिकाणीं व त्या त्या भाषेंत ४ मे ते ३० मे पर्यंत चार आठवड्याचा एक रिफ्रेशर कोर्स चालविण्यांत येणार आहे.

(१) आयुर्वेद महाविद्यालय, पुणें (मराठी) (२) आर. ए. पोदार मेडिकल (आयुर्वेदिक) कॉलेज, वरळी (हिंदी); आयुर्वेद विद्यालय, जामनगर, सौराष्ट्र (गुजराती); आर्यांग्ल महाविद्यालय, सातारा (मराठी); जे. एस्. एम्. जी. आयुर्वेदिक कॉलेज नडियाद, (गुजराती); आणि ए. एन्. नाझर आयुर्वेदिक कॉलेज, सुरत (गुजराती).

सरकारी, म्युनिसिपल आणि जिल्हा लोकल बोर्डाच्या संस्थांतून काम करणारे वैद्यक व्यवसायी व १९४८ च्या मुंबई वैद्यक व्यवसायींसंबंधींच्या कायद्याखालीं ज्यांचीं नांवें नोंदविलेलीं आहेत असे वैद्य एवढ्यांनाच या कोर्ससाठीं प्रवेश मिळेल.

सबंध कोर्स ८० व्याख्यानांचा असून त्याची फी ३० रु. आहे.

डॉक्टरांसाठीं वागणुकीचे नियम

मुंबई मेडिकल कौन्सिलच्या नुकत्याच भरलेल्या एका बैठकींत, वार्निंग नोटिसाच्या पहिल्या भागातील तिसऱ्या कलमांत दुरुस्ती करण्यांत येऊन त्या कलमांत आणखी दोन टिपणांची (नोटस्) भर टाकण्यांत आली आहे.

या टिपणानुसार ज्या रोग्यांना डॉक्टरांनीं मेडिकल सर्टिफिकेटें दिलीं असतील त्यांचीं त्यांनीं सर्टिफिकेट दिल्याच्या तारखेपासून नोंद ठेविली पाहिजे. तसेंच मरण पावलेल्या रोग्याच्या बाबतींत त्या रोग्याला त्याच्या शेवटच्या आजारांत ज्या डॉक्टरांनीं औषधोपचार केले असतील त्यांना मृत्यूचें सर्टिफिकेट द्यावें लागतें. तसें सर्टिफिकेट देण्याबद्दल न्याय्य फी घेण्याचा डॉक्टरांना अधिकार आहे; मात्र तें सर्टिफिकेट जर स्थानिक संस्थांना मृत्यूची नोंद करण्यासाठीं हवें असेल तर तशी फी आकारतां येणार नाहीं. अशा सर्टिफिकेटांत एखाद्या साक्षीदाराची सही घेतली पाहिजे असें डॉक्टरांवर बंधन नाहीं.

बंगलोर येथील अधिवेशनें

ता. २४।२५ व २६ एप्रिलला बंगलोर येथे निखिल भारतीय आयुर्वेदिक कॉंग्रेसच्या गव्हर्निंग कौन्सिलची दुसरी बैठक व अखिल म्हैसूर आयुर्वेदिक कॉंग्रेसचें अधिवेशन होणार आहे. याचे अध्यक्ष पंडित शिवशर्माजी हे आहेत.

म. प्रां. वैद्यमंडळास आमंत्रण

या अधिवेशनाबाबत स्वागताध्यक्ष श्री व्ही. पार्थनारायण पंडित यांनीं म. प्रां. वैद्यांकरितां निमंत्रण पाठविलें आहे. उत्तर व दक्षिण हिंदुस्तानांतील वैद्यांनीं एकत्र येऊन वैचारिक देवाण घेवाण करण्यास ही एक सुसंधि आहे असेंहि त्या पत्रकांत म्हटलें आहे.

या अधिवेशनाचे वेळीं एक प्रदर्शन भरणार आहे. त्यांत कुपिस्थ रसायनें, त्रिदोष, धातु, पंचमहाभूतें यांच्या संबंधीं तक्ते, दुर्मिळ वनस्पती इत्यादि ठेवण्यांत येणार असून सर्व वैद्यांना यांत भाग घेण्याची विनंति केली आहे. याबाबतींत सर्व पत्रव्यवहार सेक्रेटरी प्रदर्शन समिति, २४४ तिसरा मेनरोड, चामराज पेठ, बंगलोर २ या पत्त्यावर करावा.

नागपूर येथें
" आयुर्वेद सेवा संघा " चीं
सर्व प्रकारचीं गुणकारी औषधें मिळण्याचें
एकमेव ठिकाण--
श्रीपरांडे बंधु
महाल रोड, नागपूर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विंचूदंशावरील ग्रामीण उपाय

लेखकः—भिषग्रत्न ग. कृ. पाटणकर

विंचवाच्या जातीप्रमाणें मंद, मध्यम, तीव्र, प्राणघातक असे या विषाचे प्रकार आहेत. आयुर्वेदाच्या ग्रंथांतून या दंशावर अनेक उपाय दिलेले आहेत. उन्हाळ्यांत अनेकांना विंचू-दंश होतात. ऐनवेळीं खेडुतांच्या या नाहीं त्या घरीं उपलब्ध होतील अशा वस्तूंचे व वनस्पतींचे उपाय केले जातात. अशा उपायांपैकीं कांहीं उपाय पुढें दिले आहेत.

दंशाच्या विषपरत्वें वेदना

पुढील उपायांनीं मंद व मध्यम विषदंशास ... १५ मिनिटांत तर कोणास २० मिनिटांत आराम पडूं शकेल. दंशाचे जागेवरची फुणफुण ... १२ तास, तर कोणाची २४ तास राहूं ... शरीरांतील नैसर्गिक प्रतिकारशक्ति तसेच विंचवाचे नांगीचा खोल अगर निसटता प्रहार या ... व उपायाचे गुणधर्मांप्रमाणें वेदनांचा अगर ...चा उपशम कमी अगर अधिक वेळांत होऊं शकतो.

तीव्र विषनाशास अधिक प्रखर उपाय करावे ... दंश झालेल्या इसमास आराम मिळण्यास ... अर्धा तास तर कोणास १ तास लागतो. अशा ... दंशाचे उपशमाची सर्व सिद्धता लागते. हें न ... क्वचित् प्रसंगीं दंश झालेल्या इसमाचा प्राण- ... शकतो.

खालील गोष्टी आधीं करा

वेदना चढलेल्या जागेच्या दोन चार बोटे वर ...ची चिंधी सोसेल अशी घट्ट आंवळून ...वी.

गोड दूध पाजावें

दंश झालेल्या इसमास म्हैस, शेळी व गाय ... जें मिळेल तें दूध पावशेर तें अर्धाशेरपर्यंत साखर घालून पिण्यास द्यावें.

गुदमार्गांत तूप लावावें

मोठ्या माणसास बाजूस नेऊन त्याचे करंगळीनें गुदद्वाराचें आंत थोडें तूप लावण्यास सांगावें. (निदान संध्येच्या अर्धी पळीइतकें)

लहान मुलासाठीं त्याचे आईस अथवा बरोबर आलेल्या बाईला तिच्या करंगळीनें हळुवार पद्धतीनें मुलाचें गुदद्वाराचें आंत थोडें तूप लावण्यास सांगून त्यासहि साखर घालून वयमानाप्रमाणें दूध पाजावें.

क्रमानें पुढील उपाय करावेत

गोड शब्दानें धीर देत स्वतःचे घरांत अगर शेजाऱ्याचें घरांत खालील पैकीं जे जिन्नस मिळतील त्याचे मदतीनें पुढील उपाय क्रमानें करावेत.

अफूचा औषधी उपाय

अफू-लहान तीन वर्षपर्यंत वय असलेल्या मुलास पाव ते अर्धा गुंज, त्यापुढें १० वर्षपर्यंत १ गुंज आणि मोठ्या माणसास २ गुंजा अफू दूध देतांना दिल्यास औषधाचा गुण लवकर येतो. अफूवर सरकारी नियंत्रण आहे. पण अशा प्रसंगीं प्रत्येक खेडेगांवांत ती सरकारनियुक्त ठराविक इसमाकडे योग्य दरांत मिळण्याची सोय सरकारनें करून त्याची नोंद ठेवण्याची व्यवस्था असावी. अफू न मिळा-ल्यास फड्यानिवडुंगाचे मुळाचें चूर्ण वयमानाप्रमाणें १ ते ३ गुंजाप्रमाणें गुळांत मिश्र करून द्यावें. यानें झोप येते.

चिंचोका

१) चिंचोका- घरांत अगर शेजारीं चिंचोका खास सांपडेल. चिंचोक्याचें एक बाजूचें टरफल चाकूनें काढून तो हातांत धरून सहाणेवर १ मिनिट चांगला जोरानें घासावा (सहाण कोरडी असावी.) घासल्यावर तो चांगला गरम होईल. हें करीत असतां दंश झालेल्या जागेवर कोणासतरी नेमकें बोट ठेव-ण्यास सांगावें. चिंचोका घासून गरम होतांच तो त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जागेवर नेमका गरम झालेल्या बाजूकडून दाबावा, व तो दाब १ मिनिट ठेवून हात काढून घ्यावा. चिंचोका त्या जागीं चिकटतो.

तुरटी

२) तुरटी (फटकी)– हीहि खेडेगावीं दुकानांत मिळेल, अगर खेडूतांनीं उन्हाळा येतांच २ आणे किंमतीचा खडा घरांत आणून ठेवावा. दिव्यावर तुरटी ऊन करून ती दंशाचे जागेवर किंचित् दाबून धरावी. तुरटीचा खडा सुपारीएवढा घ्यावा म्हणजे तो चिटकेल. खडा फार ऊन करू नये किंवा कोमट ठेवूं नये.

विड्याचीं पानें

३] विड्याचीं पानें– विड्याचें पानाच्या शिरा व डेखें काढून तीं नीट एका वाटींत अगर कागदावर ठेवावीं. (जमिनीवर ठेवू नयेत.) नंतर पाटा वरवंटा स्वच्छ पाण्यानें धुवून पानें त्यावर आधीं ठेवून व नंतर वाटून गोळा करावा. पाण्यांत भिजवून घट्ट पिळलेल्या फडक्यांत घालून तो गोळा खालीं वशी ठेवून त्यांत पिळावा. पानें थोडीं सुकलेलीं असल्यास पानें वाटतांना थोडें पाणी शिंपडावें व नंतर वाटून गोळा करून वरप्रमाणें पिळावें. परन्तु पाण्याचा शिंतोडा दिलेल्या रसानें गुण येण्यास थोडा अवधि लागतो. हा रस वेदना चढलेल्या जागेपासून ती शीर धरून खालीं चोळीत जावें (उलटें चोळूं नये). १०–२० वेळां अशा रीतीनें करून खालीं रस लावित यावें. वेदनाची जागा खालीं आली असल्यास तेथून खालीं रस चोळीत यावें.

"वैद्य सन्मित्र"

[ले.– वैद्य पां. वि. जायदे, आ. ती. हुबळी]

* पनवेलच्या परिषदेंत प्रसिद्धि पावलेला *

* विद्वान वैद्य-डॉक्टरांनीं प्रशंसिलेला *

* शिक्षणाधिकारी व शिक्षणसंस्था *

यांनीं गौरविलेला सर्वांस उपयुक्त व अवश्यमेव संग्राह्य ग्रंथ. किंमत २ रु. ट. खर्च ८ आणे

मिळण्याचीं ठिकाणें } वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक
वै. पां. वि. जायदे, हुबळी

पानांचे डेख, शिरा

४) विड्याचे पानाच्या शिरा व डेखें-शिरा व डेखें पाट्यावर ठेचून त्याचा संध्येच्या पळी, अर्धपळी रस काढावा. गोडेतेल रसाचे मानानें संध्येची अर्ध. पळी अगर पळीभर घेऊन तें लहान वाटींत घालून विस्तवावर ठेवून कडकडलें म्हणजे त्यांत हा रस घालावा. नंतर वाटी विस्तवावरून खालीं उतरून ठेवावी. पळींत किंवा झाऱ्यावर निर्धूम विस्तव घेऊन त्यावर हें मिश्रण घालून त्याची धुरी दंश झालेल्या जागेस २-४ मिनिटें द्यावी.

तंबाखू

५) तंबाखू— तंबाखूच्या झाडाचें ओलें पान मिळाल्यास त्या दोन अगर एक पानाचा (तें पाट्या-वर वरवंट्यानें ठेचून व वाटून) हातानें दाबून त्याचा रस काढावा. तो कानांत २-४ थेंब घालावा. ओलें पान न मिळाल्यास वाळलेली तंबाखू थोडी घेऊन ती चुरून त्यांत थोडें पाणी घालून, ती तंबाखू पाण्यांत दोन बोटानें चांगली कुसकरून तें पाणी फडक्यावर गाळून कानांत १-४ थेंब घालावें. कानांत अधिक आग होऊ लागल्यास कान (तें पाणी डोळ्यांत न जाईल अशा रीतीनें) धाकडा करून काढून टाकावें. कान पुसून त्यांत थोडें दुधाचे अगर तुपाचे थेंब टाकतांच आग बंद होईल.

मध, तूप, चुना

६) मध, तूप, चुना— मध संध्येची पळी, तितकेंच तूप व त्यामानानें खाण्याचा चुना अं वशींत घालून तें बोटानें एकजीव करावें. नंतर दंश झालेल्या जागेवर २-४ मिनिटें किंचित् लावावें. दंशाची जागा सुईच्या टोकानें जरा मोकळी करून मग हें मिश्रण घर्षण केल्यास २० ते २५ मिनिटांत आराम मिळतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कडूदोडका बी

७) कडू दोडका बी— दोन तीन खेडेंगांवचें दरम्यान कोणतें तरी गांवीं कडुदोडका याची उत्पत्ति असते. खेडूतांनीं चौकशी करून शक्य असेल त्यांनीं हे बी घरांत आणून गांवांत ७-८ ठिकाणीं जपून ठेवावें. स्वतःचें घरांत व इतर खेडूतास विंचूदंश झाल्यावेळीं याचा उपयोग खास होईल.

बिया पाण्यांत सहाणेवर उगाळून वेदना चढलेल्या जागेपासून वरून खालीं लावित येऊन दंशाचे जागीं चांगला लेप द्यावा. पांचदहा मिनिटांत वेदना कमी होतात.

चौधारी निवडुंग

८) चौधारी निवडुंग- चौधारी निवडुंगाचें वाळलेलें मूळ पाण्यांत (फार पातळ नाहीं व फार घट्ट नाहीं असें भराभर सहाणेवर) उगाळून वेदना चढलेल्या जागेपासून दंश झालेल्या जागेपर्यंत वरून खालीं गंधाप्रमाणें लावीत यावें. सांध्यावर व दंशाचे जागेवर लेप जाड लावावा.

चंदन व कापूर

९) चन्दन व कापूर--देशी खेडयांतून उगलेला चंदन याचें खोड अगर चंदन म्हणून मुरलेल्या ... आंतील गाभ्याचे खोड या दंशाचे कामीं ... नाहीं. मुंबईस म्हैसूर सरकारचें चंदनाच्या ... खोड वगैरे विकण्याचें दुकान आहे त्यांतील ... मल्यागिरी चंदनाचें खोड या कामीं उपयोगांत ..., खेडयाचे पुष्कळ लोक मुंबईस जातात. त्यांनीं ... स्ट्रीटवरील दुकानांत जाऊन पाचसहाजणाचे ... हें खोड आणून ठेवावें. त्यामुळें गांवांतील अनेक लोकांना उपयोग होऊं शकेल.

खोड पाण्यांत सहाणेवर भराभर उगाळून तें ... अर्धापावशेर उगाळावें. शेवटीं तें उगाळतां उगाळतां कापराच्या २-३ वडयांची पूड सहाणेवर थोडथोडी टाकीत पाणी घालून त्यावर खोड उगाळून तें सर्व वाटींत घालून त्याचें बोटानें मिश्रण करावें. वेदना चढलेल्या जागेपासून तें खालीं चोपडीत येऊन दंशाचे जागेवर लावावें. तें वाळण्यास १०-१५ मिनिटें लागतील तेवढ्या मुदतीत वेदना कमी होऊन फक्त फुणफुण जाग्यावर राहील.

सांभरमीठ + पाणी

१०) सांभरमीठ (सांबरलोण) याची तोळ्याची पूड करून बाटलींत भरून बूच घालून ठेवावें. मुंबईस जाणाऱ्या खेडुतानें तें आणून संग्रहीं ठेवावें. तें स्वस्त मिळणारें आहे. सांबरमिठाची पूड २ तोळे व फडक्यावर गाळलेले पाणी ६ तोळे याचें मिश्रण करून तें पुनः फडक्यावर गाळून नंतर विंचूचा दंश शरीराच्या ज्या बाजूस झाला असेल त्याचे उलट बाजूचे कानांत त्यापैकीं ३-४ थेंब घालावें. २ मिनिटें तसेंच निजवून नन्तर, वेदना चढलेल्या जागेपासून खालपर्यंत सरळ तें पाणी ४-५ वेळ लावित यावें. नंतर पुनः एकवेळ त्याच कानांत हें पाणी वरीलप्रमाणें घालावें.

पंक्चर सोल्युशन

१०) पंक्चर सोल्यूशन- खेड्यांत अलिकडे धंद्याचें व नोकरीचें निमित्तानें अनेक लोक सायकली ठेवितात. पंक्चर काढण्याकरितां (दुरुस्त करण्याकरितां) सायकलवाले वरील सोल्यूशन जवळ ठेवतात. वेदना चढलेल्या जागेपासून धीर धरून तें बोटानें खालीं घाशींत येऊन दंश झालेल्या जागेवर १-१॥ मिनिट जिरवावें.

मेथिलेटेड स्पिरिट

११) मथिलेटेड स्पिरिट- अलिकडे खेडेगांवीं

आयुर्वेद सेवा संघ-नासिकचीं सर्व औषधें
मुंबईंत मिळण्याचें आणखी एक नवें केंद्र
रामकृष्ण एजन्सी
३६८ बी ३।७० सुपारीबाग रोड
लालबाग, मुंबई १२
* मागणी रोज वाढत आहे. *

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किटसन लाईटच्या हातबत्त्या असूं शकतात. या बत्तीचा बर्नर गरम करण्याकरितां वरील स्पिरिटचें लायसेन्स घेऊन कांहीं जणाजवळ स्पिरिट असूं शकते वेदना चढलेल्या जागेपासून खालपर्यंत सरळ हातानें २-३ वेळ घर्षण करीत तें लावीत यावें. नंतर एनॅमलच्या बॉउलमध्यें अगर खोलगट तसराळ्यांत तें ओतून चावलेला भाग बुडेल असा आंत १० ते २० मिनिटें ठेवावा. अगर कापडाची दुहेरी पट्टी स्पिरिटमध्यें बुडवून दंशाचें भागावर लावावी व त्यावर ४।४ थेंब स्पिरिट दर सेकंदास १० मिनिटें सोडित राहावें.

धोत्रा !

१२) धोत्रा (पिवळ्या अगर काळ्या फुलाचा) याची सहज लागवड होते. या धोत्र्याची ताजी मुळी काढून तिचे अडकित्यानें बारीक तुकडे करून लहानास १ गुंज व वयोमानाप्रमाणें मोठ्यास ३ गुंजापर्यंत [डेखें व शिरा काढलेल्या] पानाचें विड्यांतून [सुपारी, कात, चुना वगैरे घालून) खाण्यास द्यावें. विड्याचा रस सावकाश गिळण्यास सांगावा. लहानास २ पानाचा व मोठ्यास ४ पानांचा विडा उपयोगांत आणावा.

पांढरी सावरी

१३) शुभ्र सावरी कंद ॥ विंचुचे विष उतरी ॥
उदकीं बुडवी दावी ॥ वेदना हरती त्वरें ॥

पांढऱ्या शेवरीचें झाड खेडोपाडीं असतें. उषःकालीं स्नान वगैरे सर्व विधि आटोपून शुभदिवशीं शुभवेळीं कामापुरतें पूजासाहित्य नेऊन पूजा करून पूर्वेकडे तोंड करून सदर झाडाची (साधारण जाडसर) मुळी प्रसन्न मनानें काढून तिला जमिनीचा स्पर्श न होईल अशी दोरीनें टांगून ठेवावी. कोणास दंश होतांच मुळी पाण्यांत बुडवून हातांत धरून (लंबूनच) वेदना चढलेल्या जागेपासून खाली उतरावी. पुनः पाण्यांत बुडवून तोंच प्रकार २-३ वेळ करावा. सांध्यावरील वेदना खालीं न आल्यास सांध्यापासून पुनः २-३ वेळ पाण्यांत बुडवून खाली पर्यंत आणावी. वेदना जागेवर येतांच मुळी पाण्यांत बुडवून झाडून जमिनीचा स्पर्श न होतां पुनः टांगून ठेवावी. फुणफुण असलेल्या जागीं मलयागिरी चंदन सहाणेवर पाण्यांत उगाळतांना त्यांत कापराच्या दोन वड्यांची पूड घालून त्यावर चंदन घासून तें एकत्रित करून बोटानें २ मिनिटें घासून लेप द्यावा.

आमच्याकडे 'आयुर्वेद सेवा संघा'ची भल्लातकासव, कंदर्पवृष्यपाक, कुमारीआसव, ग्राईप मिक्श्चर, एरंडेल, बालशूलार्क, इ. सर्व प्रकारचीं औषधें, गुलकंद, मोरावळा, सरबतें मिळतील. मागणीप्रमाणें पुरवूं.

लिहा:-- मे. सोनार ब्रदर्स

पो. नरडाणे (प. खान्देश)

शिकेकाई

१४) शिकेकाई— खेड्यांत हा जिन्नस घरोघरीं असूं शकतो. बिया काढून शिकेकाई पूड करून उन्हाळ्याचे दिवसांत बाटलींत भरून ठेवावी. मागें कळविल्याप्रमाणें वयमानाप्रमाणें पानाचा विडा करून अगदीं लहानास अर्ध्या गुंजेपासून तो मोठ्यास चार गुंजेपर्यंत पहिला विडा खाण्यास देऊन त्याचा सावकाश रस गिळीत तो खाण्यास सांगून रस संपतांच थुंकून टाकण्यास सांगावा. मंद, मध्यम विंचवाचा दंश पहिल्या विड्यांतच जागेवर येईल. दंशाच्या वेदना जागेवर येतांच तेथें चंदन व कापूर यांचा लेप द्यावा. इंगळी या काळ्याभोर प्रखर विषारी विंचवाचे दंशास याचा उपयोग कसा करणें भाग पडलें याची विस्तृत हकिगत पुढें देणार आहे. या विड्यानें खाणाराचें तोंड थोडें खोलल्यासारखें होते. याकरितां रस गिळून विडा थुंकून टाकतांच खोबऱ्याचा तुकडा सावकाश खाण्यास द्यावा. म्हातारे माणसास विडा अगर खोबरें ठेंचून द्यावें.

स्त्री-दुग्ध

१५) स्त्री दुग्ध- हॅपी मॅरेज व डेस्टिनेशन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…र्सन एम्. डी. डॉक्टरचीं दोन पुस्तकें वाचीत असतां स्त्रीदुग्धाचा क्षय, रक्तपिती, सर्पदंश या-सारख्या अनेक विकारावर त्यानें उपयोग करून विकारांचा उपशम केल्याचें माझे वाचनांत आलें आहे. त्या विकारांत विंचूदंशावर उपयोग केल्याची माहिती नव्हती. पण मला तो करण्याचा प्रसंग कां व …ला आला व पुढें त्याच मार्गानें ३०-४० लहान मुलांच्या (पाच-पाच, सहा-सहा महिने ते १ वर्ष …च्या मुलांच्या) केसीसमध्यें या उपायानें आश्चर्य …क उपयोग कसा झाला-हेंहि विस्तारभयास्तव पुढील लेखांत कळविणार आहे.

आकृतियंत्र, वेदनाहर यंत्र, स्नेहविधि, …प्रभाव यांचे दंशावर होणारे अनुभविक उपाय …नें कळविणेची इच्छा आहे. परन्तु ती माझेसारखे …च्या हातून पुरी करून घेणें हें आतां भगवान् …च्या इच्छेवर अवलंबून आहे.

उपाय कळू देऊ नये

यापैकीं कोणत्याहि उपायास सुरवात कर-…पूर्वी ज्या गोष्टी करणेंस सुचविलें आहे, त्या सर्व …री करून नंतर कोणता उपाय आपण करणार हें …ळूं न देतां प्रसंगाप्रमाणें या पैकीं चार दोन मार्ग …ठ ठेवून उपयोग करणारानें हात पाय धुवून …श्वरास नमस्कार करून श्रद्धा असलेल्या विकारी …उपायाचच उपयोग करावा. उपायाचा मार्ग कळतांच …कारी मनुष्याची श्रद्धा कमी होते, आणि त्या …मुळें त्याचेवर कोणत्याहि प्रयोगाचा उपयोग …हवा तसा होत नाहीं.

ॲम्प्यूल्स तयार करावेत

शिकेकाई व शुद्ध स्त्रीदुग्ध यांच्या भारतांतील …क्शन्स तयार करणाऱ्या कंपन्यानीं इंजेक्शन …म्प्यूल्स तयार करून विक्रीस ठेवल्यास फार उपयोग …णार आहे.

स्त्रीदुग्धाच्या पांचपांच सी. सी. इंजेक्शनच्या …म्प्यूल्स तयार झाल्यास व प्रसंगाप्रमाणें काल-…सारखें औषध पोटांत देऊन हीं इंजेक्शन्स

आयुर्वेदाचार्य शुक्ला यांचें अकालीं निधन

दुर्गा आरोग्य मंदिर, सितावर्डी नागपुरचे अध्यक्ष आयुर्वेदाचार्य वै. विद्याविलास शुक्ला यांना ता. २९।३।५३ ला रात्रौ १॥ वाजतां संततज्वराच्या आजारामुळें वयाच्या अवघ्या ३४ व्या वर्षी देवाज्ञा झाली. वै. विद्याविलास शुक्ला हे मध्यप्रदेश आयुर्वेद बोर्डाचे सभासद तसेच नागपूर आयुर्वेद महाविद्यालयाचे प्रिन्सिपाल होते. प्रांतांच्या बऱ्याचश्या वैद्यकीय व सामाजिक संस्थांशीं त्यांचा घनिष्ठ संबंध होता. त्यांचा शिष्यसंप्रदाय महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशामध्यें पसरलेला आहे.

त्यांचें संक्षिप्त जीवनचरित्र आयुर्वेद पत्रिकेच्या १६ डिसेंबर १९५१ च्या अंकांत प्रसिद्ध झालें आहे.

---

३ ते ४ वेळां पंधरा पंधरा मिनिटांनीं केलीं गेल्यास सर्पदंशावर याचा विलक्षण आश्चर्यकारक उपयोग होऊन हजारों व लाखो लोकांचे प्राण वाचूं शकतील. आमच्या आर्यवैद्यांनीं या इंजेक्शनची मागणी करून असे प्रयोग प्रत्यक्ष करून अनुभव प्रसिद्ध केल्यास पुढील वैद्यक पिढीवर त्यांचे उपकार होणार आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाश्चात्यांचा बोलबाला झाला—
तो प्राणिज द्रव्यांच्या चिकित्सेनेंच !

का र ण

हीं प्राणिज द्रव्यें प्रकृतीस चटकन् मानवतात—आणि तीं रोगांची पटकन् हकालपट्टी करतात. अशा या चमत्कारी व बहुगुणकारी औषधाचा सर्वांना लाभ घेतां यावा म्हणूनच ही अपूर्व सवलत !

—: खास सवलतीच्या किमती :—

	१ तो.	५ तो.	१० तो.	२० तो.	४० तो.
अकीक भस्म नं. १	१॥ रु.	६। रु.	१२ रु.	२२॥ रु.	४२॥ रु.
,, ,, (साधा)	—	४ रु.	७॥ रु.	१४ रु.	२५ रु.
अभ्रक भस्म अजारक्तभावित (सहस्रपुटी) ...	५१ रु.	(३ मासे १३ रु.,		१॥ मासा ७ रु.)	
,, ,, ,, (शतपुटी) ...	१० रु.	(६ मासे ५॥ रु.,		३ मासे ३ रु.)	
अजायकृत् भस्म (रक्तवर्धक)	३ रु.	१४ रु.	२७ रु.	—	—
अजाफुफ्फुस भस्म (क्षयकासहर) ...	३ रु.	१४ रु.	२७ रु.	—	—
अजाअस्थिभस्म (अशक्ततेवर) ...	२॥ रु.	१२ रु.	२४ रु.	—	—
कपर्दिक भस्म	—	१ रु.	१॥। रु.	३ रु.	५। रु.
कासव (कच्छप) भस्म	—	३ रु.	५॥ रु.	१०। रु.	२०। रु.
कुक्कुटांड भस्म	—	३॥ रु.	६। रु.	१२ रु.	२२॥ रु.
खेकडा (कर्कट) भस्म	—	२॥ रु.	४ रु.	७॥ रु.	१३ रु.
गांडूळ (भूनाग) भस्म	४ रु.	१६ रु.	३२ रु.	६४ रु	—
जहरमोहरा (खताई) भस्म	४रु.	१६ रु.	३१ रु.	६१ रु.	—
,, (साधा) भस्म	—	१। रु.	२ रु.	३॥ रु.	—
ताम्रभस्म (वनस्पतिमारित)	१॥ रु.	७॥ रु.	१५ रु.	३० रु.	५५ रु.
नागभस्म (मधुमेहावर)	१॥ रु.	६। रु.	११ रु.	२१ रु.	४२ रु.
पन्नाभस्म (अपूर्व टॉनिक)	१५ रु.	२५ रु.	—	—	—
प्रवाळभस्म सूर्यपुटी	१ रु.	४ रु.	७॥ रु.	१४ रु.	२७ रु.
,, अग्निपुटी	१ रु.	४ रु.	७॥ रु.	१४ रु.	२७ रु.
पोलाद भस्म (अत्यंत वाजीकर) (रक्तवर्धक)	४ रु.	१५ रु.	—	—	—
बेरपथ्थर भस्म (हजरतबेर)	—	३ रु.	५ रु.	९ रु.	१६ रु.
,, ,, (विंचूयोगेन)	१॥ रु.	७ रु.	१३ रु.	२५ रु.	—
मण्डूर भस्म	—	१। रु.	२। रु.	४ रु.	७॥ रु.
माणिक भस्म (हार्ट टॉनिक)	६ रु.	२५ रु.	—	—	—
मोतीशिप (मौक्तिक भस्म)	—	१॥। रु.	३। रु.	६ रु.	११ रु.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

	१ तो.	५ तो.	१० तो.	२० तो.	४० तो.
राजावर्त (लाजवर्द) भस्म	५ रु.	२१ रु.	—	—	—
लोहभस्म (रक्तवर्धक)	—	५ रु.	९ रु.	१७ रु.	३२ रु.
शंख भस्म (कुमारी, निंबुयोग) ...	—	१ रु.	१॥। रु.	३। रु.	६ रु.
शंवरहूग भस्म	—	१ रु.	१॥। रु.	३। रु.	६ रु.
संगी यशब भस्म	१॥ रु.	७ रु.	१३ रु.	२५ रु.	४५ रु.
सुवर्णमाक्षिक भस्म अमेरिका नं. १, ...	१॥ रु.	७ रु.	१३ रु.	२५ रु.	४५ रु.
हरताळ गोदन्ती भस्म (कुमारी भावित)...	—	१ रु.	१।॥ रु.	३ रु.	५॥ रु.
गुळवेलसत्व नं. १ असली (कडुनिंबावरील)	—	२ रु.	४ रु.	७ रु.	१४ रु.
गुळवेल घनसत्व, असली (कडुनिंबावरील)	—	२ रु.	४ रु.	७ रु.	१४ रु.
त्रिफळाचूर्ण (वस्त्रगाळ)	१ शेर ८० तोळ्यास १ रु. फक्त.			-॥- रु.	-॥।- रु.

ही सवलत फक्त १ महिन्याकरितांच (ता. १६।५।५२ पर्यंतच) आहे.

मिश्रा महाराष्ट्र फार्मसी (रजि.) ब्रह्मपुरी (जि. चांदा म. प्रदेश)

लातूर संमेलनाचें अध्यक्षपद

नाशिक ता. १३-लातूर येथें भरावयाच्या ९ व्या महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाच्या अध्यक्ष-पदासाठीं आलेल्या पहिल्या तीन नांवांत वैद्यराज दत्तात्रेयशास्त्री जळूकर नशिराबाद, वै. वि. म. गोगटे नाशिक व वै. बिंदुमाधव पंडित नाशिक हीं नांवें बहुमतें सुचविलीं गेलीं आहेत असें कळतें.

आवश्यकता आहे

आयुर्वेद सेवा संघांत रुग्णांचा पत्रव्यवहार, आयुर्वेद पत्रिकेंतील लेखांचीं मुद्रितें तपासणें इत्यादि कामें होशीनें करूं शकेल अशा आयुर्वेदप्रेमी कार्य-कर्त्यांची आवश्यकता आहे. सुबोध अक्षर, व्याकरण-शुद्ध लेखन, व निर्व्यसनी जीवन असलेल्या उमेद-वारांनीं माहितीसह अर्ज पाठवावेत.

-मंत्री, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक.

पुणें येथें

आयुर्वेद सेवा संघाचीं औषधें मिळण्याचें ठिकाण

किरण मेडिकल सर्व्हिस

नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें

अनुक्रमणिका

९ वें महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन, लातूर ६३१
मुंबई राज्य आयुर्वेद संशोधन बोर्ड पत्रक ७ वें ६३३
म. प्रां. वैद्य मंडळाचें पुणें येथील प्रचार कार्य ६३५
पाडवा व कडुनिंब ६३६
दिल्ली येथील दंतयज्ञ ६३६
राजयक्ष्मा निदान–चिकित्सा ६३७
अपामार्गासवाचा पाठ ६४४
रजिस्ट्रेशन ट्रिब्यूनल प्रश्नोत्तरी ६४५
राजयक्ष्मानिदान आधुनिक साधनें व ज्वर ६४७
सरकारनें वैद्यासाठीं काय करावें ? ६४८
वैद्य वेणीमाधवशास्त्री यांचें भाषण ६४९
वैद्यक व्यवसायीसाठीं रिफ्रेशर कोर्स ६५४
बंगलोर येथील अधिवेशनें ६५४
विंचूदंशावरील ग्रामीण उपाय ६५५

"फक्त वैद्यासाठीं" इंजेक्शन ट्रेनिंग क्लास मे महिन्याचे सेशनसाठीं प्रवेश देणें सुरू आहे. विशेष माहितीसाठीं २ आणे पोस्टेज पाठवा.

डॉ. जिल्हेदार C.T.S. यवतमाळ (मध्यप्रदेश)

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झांशीच्या जी. ए. मिश्रा आयुर्वेदिक फार्मसीमध्यें

आयुर्वेदीय इंजेक्शनें निर्माण करण्यास पुनः प्रारंभ !

आयुर्वेदामध्यें सर्वप्रथम आधुनिक पद्धतीनें आयुर्वेदीय औषधांचीं सूचिकाभरणें तयार करण्याची पद्धति झांशीचे डॉक्टर राधागोविंद मिश्र, डी. एस्सी. ए. यांनीं आपल्या ५८ वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या जी. ए. मिश्रा आयुर्वेदिक फार्मसी या वैज्ञानिक रसायनशाळेंत सुरू केली.

एकवर्षांपूर्वी उत्तर प्रदेश सरकारच्या वैद्यकीय खात्यानें या रसायनशाळेवर निर्बंध घालून आयुर्वेदीय इंजेक्शनें निर्माण करण्यास बंदी केली, यांचें वाचकांना स्मरण असेलच. इंडियन मेडिसिन बोर्ड, वैद्य संमेलनें व आयुर्वेद क्षेत्रांतील बहुतेक सर्व प्रमुख पुढारी व चिकित्सक यांनीं या प्रतिबंधाला तीव्र विरोध केला.

या सर्वांचा परिणाम होऊन उत्तरप्रदेश सरकारचा तो प्रतिबंध आतां दूर झाला असून एक एप्रिलपासून आयुर्वेदीय इंजेक्शनें तयार करण्यास पुनः प्रारंभ झाला आहे.

भारतीय वैद्य हकीमांना हा समाचार ऐकून आनंद झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

सुवर्णवसंतमालिनी

आयुर्वेद सेवा संघाच्या औषधीभवनांत सुवर्णमालिनीवसंत तयार केला जातो, त्यांत केवळ सुवर्ण न वापरतां सुवर्णभस्म (रक्त) हें घालण्यांत येत असतें. हें आपणास माहित आहेच. हा सुवर्णमालिनीवसंतहि गुणदायी असल्याचा अनुभव सर्वांना आहेच.

तथापि सुवर्णमालिनीवसंताच्या मूळपाठांत भस्म वापरण्यास सांगितलेलें नाहीं, तर शुद्ध सुवर्ण वापरावें असें म्हटलें आहे. या अंकांत राजयक्ष्मा–निदान चिकित्सेसंबंधी वृद्ध वैद्यांचा लेख आहे. त्यांतहि सुवर्ण धातु वापरून केलेला सुवर्णवसंतमालिनी वापरण्याविषयीं शिफारस केली आहे. म्हणून आयुर्वेद सेवा संघानें तो मुद्दाम तयार केला असून लौकर तो विक्रीस ठेवण्यांत येणार आहे.

सुवर्णभस्म (रक्त) घातलेला सुवर्णमालिनीवसंत व सुवर्णधातु घालून केलेला वसंत यांच्या गुणांचा तुलनात्मक अभ्यास करणें आतां वैद्यांना शक्य होणार आहे.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नाशिक

संपादक व प्रकाशकः— वैद्य [illegible] पंडित, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक
मुद्रकः—श्री. दामोदर महादेव चन्द्रात्रे, विज्ञान प्रेस, नाशिक
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होते.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ६ वें) नाशिक, ता. १ मे १९५३ (अंक २१ वा

गुरुकुल कांगड़ी

अर्थमंत्री ना. देशमुख यांचें आश्वासन

आयुर्वेदीय औषधीद्रव्यावरील आयातकर माफक करण्याचा विचार

दिल्लीच्या पार्लमेंटमध्यें नव्या वर्षाचे अन्दाजपत्रक मांडतांना अर्थमंत्री ना. देशमुख यांनीं ...ॲलोपॅथिक औषधावरील आयात-कर कमी केले असल्याचें घोषित केलें. हें वृत्त प्रसिद्ध ...च नाशिक शहर वैद्य मंडळाचे अध्यक्ष वैद्य विष्णुशास्त्री दाते यांनीं नामदार अर्थमंत्र्यांना पत्र ...न त्यांचें अभिनंदन केलें, व जनतेच्या हितासाठीं तीच विचारसरणी परदेशांतून येणाऱ्या ...ही आयुर्वेदीय औषधोपयोगी द्रव्याबाबतहि लागू करावी अशी विनंति केली.



अर्थमंत्री ना. देशमुख

विनंति परिणामकारक व्हावी म्हणून

ही विनंति अधिक परिणामकारक व्हावी म्हणून त्यांनीं ...पत्राच्या अनेक छापील प्रति काढून त्या सर्व केंद्रीय ...प्रांतीय मंत्री, व पार्लमेंटचे सरकार पक्षाचे सभासद, अध्यक्ष, ...विरोधीपक्षाचे नेते, राष्ट्रपति, पंतप्रधान वगैरे बऱ्याच जबाब-...दार सद्गृहस्थांना पाठविल्या. त्याचा इष्ट परिणाम होऊन ...कांहीं लोकांनीं अर्थमंत्री ना. देशमुख यांची भेट ...घेतली व बाकीच्यांनीं त्यांना स्वतःचा अभिप्राय लेखी कळविला.

कऱ्हाड (उत्तर सातारा) येथील सुप्रसिद्ध लोकप्रिय ...पुढारी व पार्लमेंटचे सदस्य श्री. गणेश सदाशिव ...ल्लेकर एम्. ए. एल्एल्.बी. यांनीं या प्रश्नांत विशेष ...लक्ष घातलें व अन्दाजपत्रकावरील आपल्या भाषणांत ...नाशिक शहर वैद्य मंडळाचें म्हणणें पार्लमेंटच्या सभासदा-...पुढें स्पष्ट शब्दांत मांडलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नामदार अर्थमंत्र्यांचें उत्तर

अन्दाजपत्रकावरील या विषयाची चर्चा पुरी झाली असून त्याला नामदार अर्थमंत्र्यांनीं उत्तर दिलें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. आपल्या उत्तरांत श्री. देशमुख यांनीं नाशिक शहर वैद्य मंडळाच्या या मागणीचा उल्लेख केला असून त्यांत त्यांनीं इतर व्यवहार व व्यापारासाठीं लागणाऱ्या वस्तुवरील आयात जकात माफक करण्याचें परीक्षण व विचार चालू असल्याचें सांगितलें आहे व केवळ आयुर्वेदीय औषधींच्या बाबतींत शक्य तें सर्व करूं असें आश्वासन दिलें आहे.

या प्रश्नाच्या निमित्तानें वैद्यांनीं आपले प्रश्न कसे सोडवावेत याची माहिती झाली आहे. सरकार अमूक करीत नाहीं, तमूक करीत नाहीं, असे दोष देण्यापेक्षां सरकारच्या त्या त्या खात्याकडे लेखी स्वरूपांत वैद्यांनीं आपल्या अडचणी संघटितपणें कळविल्या पाहिजेत व त्याच वेळीं त्या प्रश्नांची इत्थंभूत माहिती लोकप्रतिनिधि व विरुद्ध पक्षाचे नेते यांना दिली पाहिजे. त्यापैकीं कांहीं प्रतिनिधींनीं मनापासून लक्ष घातलें तरी तो प्रश्न समाधानकारकपणें सुटण्याच्या मार्गास लागल्याशिवाय रहाणार नाहीं.

कार्यकर्त्यांचें अभिनंदन

या आयातकर प्रश्नांत नाशिक शहर वैद्य मंडळाचे अध्यक्ष वैद्य विष्णुशास्त्री दाते यांनीं पुढाकार घेऊन पत्रव्यवहार केला याबद्दल त्यांचे, व श्री. आळतेकर यांनीं निरलसपणें दिल्लीमध्यें खटपट केली याबद्दल त्यांचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतो. अर्थमंत्री नामदार देशमुख हा व असेच दुसरे आयुर्वेदविषयक आर्थिक प्रश्न समाधानकारकपणें सोडवितील अशी आम्हास खात्री वाटते.

आमच्या आयुर्वेदीय इंजेक्शनांवर कोणत्याहि प्रकारचे प्रतिबंध नाहींत

भारतांत सर्वांत प्राचीन व पूर्ण वैज्ञानिक प्रणालीयुक्त—

झंडा आयुर्वेदिक इंजेक्शन्स

व आयुर्वेदिक औषधींचे सुरासार

आयुर्वेदीय इंजेक्शनें निर्माण करण्याच्या क्षेत्रांत ही पहिली उच्च कोटीची प्रयोगशाळा आहे. हिनें विशिष्ट निवडक योगांचीं इंजेक्शनें निर्माण केलेलीं आहेत. हिनें आयुर्वेद जगतांत प्रमाणबद्धता (स्टँडर्ड) निर्माण केली आहे, व आयुर्वेद जगतांत पसरलेली निराशा दूर केली आहे. ही दुःसाध्य रोगांची सरल व स्वस्त चिकित्सा आहे.

प्रत्येक गांवीं एजंट्स् नेमणें आहेत. अधिक माहितीसाठीं वैज्ञानिक निर्देशपत्रिका (सूचिपत्र) मागवा. मोफत पाठवूं.

आमच्या तज्ञांनीं, आमच्या इंजेक्शनांचा उच्च दर्जा, आयुर्वेदीय शास्त्रीयता, व विशुद्धता, केंद्रीय व प्रांतीय औषधी अधिकाऱ्यांच्या समक्ष सिद्ध केली आहे. सबब यावर ड्रग्ज ॲक्ट लागू शकत नाहीं. प्रत्येक चिकित्सक वैद्यहकीम हीं इंजेक्शनें स्वतन्त्रपणें स्वतःजवळ बाळगू शकतो व व्यवहारांत वापरूं शकतो.

निर्माते-- आचार्य बाबुराम मिश्र रिसर्च इन्स्टिटयूट

[झंडा आयुर्वेदिक फार्मास्युटिकल वर्क्स] हापुड (उत्तर प्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खेडेगांवांत वैद्यकीय मदत

(लेखकः- वै. वा. न. ग्रामोपाध्ये, सदस्य, आयुर्वेद व युनानी फॅकल्टी, मुंबईराज्य)

वै. वा. न. ग्रामोपाध्ये

हिंदुस्थानांत शेकडा ८० टक्के लोक खेड्यांत रहातात. त्यांना वैद्यकीय मदत मिळण्याच्या दृष्टीनें डिप्लोमा कोर्सची उपयुक्तता याविषयीं मीं चर्चा करणार आहे. शहरांत डॉक्टर व वैद्यांची फार गर्दी झाली आहे. याच्या उलट खेड्यांची स्थिति आहे. तेथें वैद्यकीय मदत दुर्लभ झाली आहे. खेडेगावांत वैद्यकीय मदतीची व्यवस्था करणें सरकारचें कर्तव्य आहे.

आरोग्यमंत्र्यांचें म्हणणें असें आहे

सातारा येथील आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय वार्षिक समारंभ-प्रसंगीं भाषण करतांना मुंबई-राज्याचे आरोग्यमंत्री श्री. शांतिलाल शहा म्हणालेः- "खेड्यांतील कोट्यवधि जनतेचें आरोग्य रक्षण करणें ही आजची मुख्य गरज आहे. ही गरज डिग्री कोर्सनें भागणार नाहीं. म्हणून आयुर्वेदाचा छोटा अभ्यासक्रम (डिप्लोमा कोर्स) पाहिजे."

डिग्री कोर्स कसा निर्माण झाला ?

प्रथमतः डिग्री कोर्ससंबंधीं विचार करूं या. मुंबई सरकारनें आयुर्वेदाला उत्तेजन देण्याच्या दृष्टीनें १९३८ सालीं देशी वैद्यक कायदा केला. सरकारी परवाना (Licence) शिवाय वैद्यकीय व्यवसाय करणें गुन्हा ठरविला व त्याची व्यवस्था पाहण्याकरितां एक बोर्ड नेमिलें. शिक्षणाचें धोरण, नियमन व परीक्षा यांच्याकरितां फॅकल्टी नेमली. फॅकल्टीनें पूर्वींचा डिप्लोमा (D. A. S. F.) चा कोर्स बंद करून इंटरसायन्सनंतरचा ४॥ वर्षांचा [G. F. A. M.] नांवाचा डिग्रीकोर्स चालू केला व त्याला सरकारी मान्यता मिळाली.

डिग्री कोर्सनें आयुर्वेदाची प्रगति

त्याचप्रमाणें मुंबई सरकारनें पूर्वींचा ॲलोपॅथिक डिप्लोमा कोर्स (एल्. सी. पी. एस्.) बंद करून एम्. बी. बी. एस. चा डिग्री कोर्स चालू ठेविला. वैद्यक व्यवसायांतील विषमत्व (न्यूनगंड) नाहींसा करण्याच्या दृष्टीनें हें योग्य झालें. आयुर्वेदाच्या शास्त्राच्या वाढीच्या दृष्टीनेंहि ठीक झालें. यापुढें चांगले विद्वान् वैद्य बाहेर पडतील. आयुर्वेदाचें संशोधन करण्याच्या दृष्टीनें यांचा चांगला उपयोग होईल. आयुर्वेदाचा व वैद्यांचा दर्जा वाढेल. आयुर्वेद-शास्त्राची प्रगति होईल यांत शंका नाहीं.

शहरांतील गर्दी कमी होईल

शहरांतील वैद्यकीय मदतीच्या दृष्टीनें हें ठीक आहे. शहरांत डॉक्टर व वैद्यांची जी गर्दी झाली आहे, ती यायोगें कमी होईल. वैद्यक व्यवसायाला जें बाजारी स्वरूप येत चाललें आहे तें बंद होईल. वैद्यक धंद्यांतील हीन दर्जाची स्पर्धा कमी होईल. पण यायोगें खेड्यांतील वैद्यकीय मदतीचा प्रश्न सुटणार नाहीं. एवढेंच नव्हे तर उलट अवघड होईल. वरील प्रकारचे पदवीधर वैद्य व डॉक्टर खेड्यांत जाणें शक्य नाहीं. यावर असें उत्तर देण्यांत येईल कीं, सरकारनें अशा वैद्यांची खेड्यांतून नेमणूक करावी. परंतु सरकारला मोठ्या पगाराचें लोक नेमणें आर्थिक दृष्ट्या परवडणार नाहीं. थोड्या पगारावर हे लोक मिळणार नाहींत.

डिप्लोमाकोर्ससंबंधीं विचार

देशी वैद्यकाचा कायदा झाल्यामुळें यापुढें भोंदु वैद्य कमी होतील. कारण परवाना (Licence) शिवाय प्रॅक्टिस करितां येणार नाहीं. वैद्यकीय मदतीच्या दृष्टीनें शहरापुरता विचार करून भागणार नाहीं. खेड्यांतील वैद्यकीय मदतीच्या दृष्टीनें डिप्लोमा कोर्स ठेवणें हाच त्यावर उपाय आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भोंदू वैद्यांना फावेल

सध्या लोकलबोर्ड, म्युनिसिपॅलिटी, व एस्. एम्. पी. दवाखान्यावर जे वैद्य नेमले आहेत त्यांत बरेच नामधारी वैद्य आहेत. डिप्लोमाकोर्स इतके शिकलेले सध्यांच दुर्मिळ आहेत. असें असतांना एकदम डिप्लोमाकोर्स बंद करणें शहाणपणाचें होणार नाहीं. एवढेंच नव्हे तर अशानें भोंदू वैद्यांचें फावेल.

दुसरा एक तोटा

डिप्लोमाकोर्स बंद केल्यानें दुसरा एक तोटा होणार आहे. मध्यम वर्गांतील लोकांना वैद्यकीय शिक्षण घेणें अशक्य होईल. सध्यां वैद्यकीय शिक्षण घेणें मोठें खर्चाचें झालें आहे. श्रीमंतांना देखील अशक्य होत चाललें आहे. वैद्यकीय कॉलेजीस कमी असल्यामुळें इंटर सायन्स मध्यें प्रथम वर्गांत पास होऊनहि प्रवेश मिळणें दुर्लभ झालेलें आहे. मध्यम वर्गांतील लोकांना वैद्यकीय शिक्षणाला मुकावें लागतें. पिढीजात वैद्यकीय धंदा बंद करणें प्राप्त होतें. असें होणें अन्यायाचें आहे.

दवाखाने रिकामे पडत आहेत

डिप्लोमाकोर्स बंद झाल्यामुळें सरकारला खेड्यांत वैद्यकीय मदत देणें मोठें खर्चाचें होणार आहे. सध्यां एस्. एम्. पी. दवाखान्यावर डिप्लोमा घेतलेले वैद्य मिळत नाहींत. त्या जागा रिकाम्या पडत आहेत. खेड्यांतील लोकांच्या दृष्टीनें वैद्यकीय मदत घेणें मोठें खर्चाचें होणार आहे.

एक आक्षेप

डिप्लोमाकोर्स संबंधीं एक आक्षेप आहे, त्याचाहि विचार करणें जरूर आहे. तो आक्षेप असा आहे कीं, डिप्लोमाकोर्स घेतलेले वैद्य खेड्यांत जातील कशावरून ? म्हणून नुसता डिप्लोमा कोर्स काढून खेड्यांतहि वैद्यकीय मदतीचा प्रश्न सुटणार नाहीं. वरील आक्षेप विचार करण्यासारखा आहे.

वरील आक्षेपावर उपाय

परवान्या (Licence) शिवाय वैद्यकी करणें कायद्यानें बंदी केल्यानें यापुढें पूर्वीप्रमाणें मुंबई प्रान्तांत वैद्यांची संख्या वाढणार नाहीं. खेड्यांत भोंदू वैद्यकी कमी होईल. डिप्लोमाकोर्स घेतलेल्या वैद्यांना व्यवसाय करण्यास वाव मिळेल. म्हणून मॅट्रिक नंतरच्या ४ वर्षांच्या (D. A. S. F.) डिप्लोमा कोर्सला मान्यता द्यावी. म्हणजे खेड्यांच्या वैद्यकीय मदतीचा प्रश्न सुटेल. लोकलबोर्ड म्युनसिपालटी व एस्. एम्. पी. दवाखान्यावर त्यांची नेमणूक करावी. सरकारलाहि ह्या पद्धतीची वैद्यकीय मदत महाग पडणार नाहीं.

अथवा दुसरा उपाय

मॅट्रिक नंतरचा ३ वर्षांचा एक डिप्लोमा कोर्स काढावा. सेंट्रल गव्हर्नमेंटनें १९४८ सालीं चोप्रा कमेटी नेमली होती, त्या कमेटीनें अशा तऱ्हेचा कोर्स सुचविलेला आहे. त्याप्रमाणें डिप्लोमा कोर्स चालू करावा. त्यांना म्युनिसिपालिटी असलेल्या शहरांत वैद्यकीय व्यवसाय करण्यास परवानगी देऊं नये. अशा तऱ्हेचें बंधन घातल्यास तें खेडेगांवांत वैद्यकीय व्यवसाय करूं लागतील. शहरांत त्यांची गर्दी होणार नाहीं. खेडेगांवांत वैद्यकीय मदतीचा प्रश्न सुटेल. हें बंधन चार वर्षांच्या डिप्लोमा कोर्सला नसावें. कारण त्यांची संख्या ३ वर्षांच्या डिप्लोमा कोर्स इतकी वाढणार नाहीं. कोणती तरी एक पद्धत स्वीकारावी, डिप्लोमाचे दोन कोर्स नसावेत.

अथवा तिसरा उपाय

सॅनिटरी इन्स्पेक्टर्स, व्हॅक्सिनेटर्स याशरला एक तीन वर्षांचा कोर्स काढून त्यांना पगारी नोकर म्हणून नेमावें. त्यांना खाजगी प्रॅक्टिस करण्याची परवानगी देऊं नये.

तीन वर्षांचा अभ्यासक्रम

तीन वर्षांच्या डिप्लोमाकोर्सची सूचना पसंत पडल्यास त्याचा तपशीलवार अभ्यासक्रम सुचविता येईल. म्हणून सध्यां तात्त्विक प्रश्नांचा विचार मांडलेला आहे.

आमचा विरोध नाहीं

डिग्रीकोर्सला आमचा विरोध नाहीं. तो आव-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आवश्यक आहे. डिप्लोमाकोर्स जो बंद केला आहे त्याला आमचा विरोध आहे. दोन्ही कोर्स चालू ठेवावेत. मी वर सुचविल्याप्रमाणें केल्यास शहरांतील व खेड्यांतील वैद्यकीचा प्रश्न सुटेल. मध्यम वर्गाच्या वैद्यकीय शिक्षणाचाहि प्रश्न सुटेल; म्हणून फॅकल्टीनें व मुंबई सरकारनें याला मान्यता द्यावी अशी विनंति आहे.

मेहता आयुर्वेदासन

राजस्थान विद्यापीठ, उदयपूर, यामध्यें मोहता आयुर्वेदसदन नामक विभाग आहे. त्यातर्फे हें मोहता आयुर्वेदआसन निर्माण करण्यांत आलें आहे. या आसनातर्फे दरसाल एखाद्या भारतीय विद्वान् वैद्याला बोलावून जनतेच्या सर्वांगीण लाभासाठीं व आयुर्वेदांत संशोधन व्हावें या दृष्टीनें ३ दिवस भाषणें करविलीं जातात.

या वर्षी जामनगर येथील सुप्रसिद्ध डॉ. प्राणजीवन मेहता यांचीं ३ लेखी भाषणें ता. २८।२९। ३० मार्च रोजीं उदयपूर येथें झालीं. आयुर्वेदशास्त्राच्या प्रगतीच्या दृष्टीनें ही व्याख्यानपद्धति निःसंशय प्रशंसनीय व मार्गदर्शक आहे.

पोंच व अभिप्राय

कुष्ठपत्रिका:- त्रैमासिक (हिंदी). संपादक मनोहर बळवंत दिवाण. पुरी येथें भरलेल्या चवथ्या अखिल भारतीय कुष्ठ संमेलनातील अधिकारी व्यक्तींची भाषणें, ठराव व कांहीं स्वतंत्र लेख यांत दिले आहेत पृष्ठसंख्या (या अंकाची) ६० या अंकाची किंमत १ रु.

होमिओपॅथीस उज्वल भविष्य

'होमिओपॅथीस नजीकच्या भविष्यकाळांत उज्वल भवितव्य आहे,' असे उद्गार मध्यप्रदेशचे माजी राज्यपाल श्री. मंगलदास पक्वासा यांनीं डॉ. हनुमान जयंतीच्या प्रसंगीं मुंबई येथें भरलेल्या सभेंत काढले.

जम्मी वेंकटरमणय्या ॲन्ड सन्स
"जम्मी बिल्डिंग", मयलापूर, मद्रास ४ मुंबई शाखाः 'पारेख मॅन्शन', सॅन्डहर्स्ट रोड (पश्चिम)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येत्या म. प्रां. वैद्य संमेलनाचे निर्वाचित अध्यक्ष

वै. दत्तात्रयशास्त्री जळूकर यांचें त्रोटक आत्मवृत्त

जन्मः- शके १८२१ आषाढ शुद्ध १३.

जन्मस्थानः- एरंडोल, पूर्व खानदेश.

वडीलः- वतनदार कुळकर्णी.

वै. दत्तात्रयशास्त्री जळूकर

प्राथमिक शिक्षणः- १९१४ सालीं व्ह. फा. परीक्षा उत्तीर्ण व लागलीच पितृवियोग.

१९१४ ते १९१७:- मराठी शाळेंत रावेर, पूर्व खानदेश येथें अध्यापक.

१९१७-१९२२:- पुण्यास मधुकरी वृत्ति व वार लावून आयुर्वेदाचें अध्ययन. महाराष्ट्र वैद्यक पाठशाळेचे संचालक वै. पं. कृष्णशास्त्री कवडे व भिषग्रत्न गंगाधरशास्त्री जोशी यांचेकडे, शिवाय अन्य वेळीं प्राणाचार्य नानलशास्त्री यांचेकडे संस्कृत-काव्य-नाटक वाचन व वैद्यकीय अध्ययन.

१९२१-२२:- पुणें वैद्यक मंडळाचें धर्मार्थ औषधालयांत चिकित्सक.

१९२२:- नशिराबाद, ता. जळगांव पूर्व खानदेश येथें वैद्यक व्यवसाय प्रारंभ.

१९२४:- विवाह.

१९२२-१९३०:- नशिराबादेंत सार्वजनिक कार्य, व्यायामशाळा संस्थापन, गणेशोत्सव, शेतकरी संघटन, हिंदु संघटन.

१९३०:— मुसलमानाकडून आक्रमण, त्यांचें वैधानिक शाश्वत पारिपत्य.

१९३०:- संयुक्त खानदेश वैद्य मंडळाचे संघटनेनें प्रांतीय संमेलनासाठीं केलेले प्रयत्न अयशस्वी झाले.

१९३४:-कुकुरमुंडे येथें श्री संतोजी महाराजांचे प्रेरणेनें तेथील तरुण व होतकरू वैद्य प्रभाकर शंकर पूरकर आयुर्वेदतीर्थ यांचे अपूर्व परिश्रमानें संयुक्त खानदेश वै. मं. स्थापना व प्रथम वैद्य संमेलन, अध्यक्ष वैद्यभूषण हिर्लेकरशास्त्री.

१९३५:-सं.खा.वै. मं.चें द्वितीय वैद्य संमेलन फैजपूर व तेथेंच प्रांतीय प्रथम वैद्य संमेलन घडवून आणण्याचा संकल्प.

१९३८ म. प्रां. प्रथम वैद्य संमेलनाधिवेशन चाळीसगांव. सं. खा. वैद्य मं.चीं एकूण ५ अधिवेशनें झालीं.

१९४०:- चिकित्सक त्रैमासिक संपादकत्व आतांपर्यंत चालू.

१९४८—: भुसावळ व्यवहार वैद्यक वर्ग, आयुर्वेद सेवामंडळ मंत्रीपद.

लेखः—मराठी-आरोग्यमंदिर, आयुर्मीमांसा, भिषग् विलास, आरोग्यमित्र, आयुर्वेदपत्रिका, पुरुषार्थ, लोकमान्य.

लेखः—हिंदी आयुर्वेद (नागपूर)

भाषा परिचयः— मराठी, संस्कृत, हिंदी, उर्दू, गुजराथी, थोडें इंग्रजी.

इतर अभिरुचिः— व्यायाम, गायन

कौटुंबिक आपत्तिः— पत्नी मृत्यु १९४५

चिकित्सावैशिष्ट्यः— पथ्यापथ्यावर विशेष भर. विदेशी औषधें व सूचिकाभरणाचा उपयोग केला नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभविक चिकित्सा प्रकरण ११ वें—

लेखकः- वृद्ध वैद्य

कास (खोकला) निदान व चिकित्सा

वातदोषदुष्टिजन्य व्याधि

आधुनिक शास्त्रांत या व्याधीस कॉफ् (Cough) असें म्हणतात. कोणी 'कटार' (Catarrh) असें म्हणतात. यावरून अशी कल्पना येईल कीं, या व्याधीशीं केवळ कफदोषाचा संबंध असावा. परंतु वास्तविक तसें नाहीं. हा वातदुष्टिजन्य व्याधि आहे. आणि म्हणूनच आयुर्वेदांत त्याची संप्राप्ति सांगत असतांना, अनेक कारणांनीं प्राणवायु दुष्ट अथवा विकृत होऊन तो तशाच विकृत अशा उदानवायूशीं संबद्धित होऊन मुखावाटे जेव्हां बाहेर पडूं लागतो, तेव्हां फुटलेल्या काशाच्या भांड्यांतून निघणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज करीत बाहेर पडतो, अशावेळीं जो एक विशिष्ट ध्वनि उत्पन्न होतो त्यास 'कास' असें म्हणत असतात, असें सांगितलें आहे.

धुरामुळें खोकला

या अशा प्रकारच्या प्राण व उदान वायूच्या विकृतीकरतां मूळ कारणें अनेक होऊं शकतात. उदाहरणार्थ, कांहीं प्रसंगामुळें मनुष्य धुराच्या लोंढ्यांत सांपडला जाऊन तो धूर नासिका व तोंडावाटे आंत श्वासोच्छ्वास-क्रियेंत बाधा उत्पन्न करतो, आणि जोंपर्यंत तो संपूर्णतया फुफ्फुसाच्या किंवा गळ्याच्या बाहेर होत नाहीं, तोंपर्यंत छातीच्या भोवतालच्या स्नायूंची (Musclesची) एकसारखी धडपड त्याला बाहेर फेकण्याकरतां चालूं राहत असून त्या धडपडीमुळेंच हा खोकला (कास) चालूं राहतो. तो धूर संपूर्णपणें बाहेर झाला म्हणजे खोकलाहि बंद होतो.

धुळीचे कण, रूक्षान्न

तसेच, धुळीचे कांहीं कण श्वासोच्छ्वास क्रियेंत बाहेरच्या वायूंतून फुफ्फुसांत किंवा गळ्यांत पोहोंचले म्हणजे देखील तोच परिणाम होतो. व्यायाम जास्त केल्यामुळें फुफ्फुसाच्या व गळ्याच्या भोवतालच्या स्नायूंवर ताण पडून तसलीच प्रतिक्रिया होऊन खोकला येतो. रूक्षान्न (ज्याच्यांत तूप, तेल, इत्यादि स्नेह पदार्थांचा संसर्ग नसतो) सेवन केल्यानें त्या अन्नाचे कण गळ्याखालीं लवकर न उतरतां चारीकडे चिकटून राहतात. त्यामुळें श्वासोच्छ्वासक्रियेंत बाधा येऊन खोकला चालतो.

ठसका कां लागतो ?

गळ्यांत अन्ननलिका आणि श्वासोच्छ्वास नलिका अशा दोन नलिका एकामागें एक अशा ईश्वरनिर्मित असतात. पैकीं श्वासोच्छ्वास-नलिकेस क्लोम नलिका (Trachea) असेंहि नांव आहे. अन्ननलिका मागच्या बाजूस असून क्लोम-नलिका त्याच्यापुढें असते. या अन्न-नलिकेवर एक पडदा असतो. तो अन्न गिळण्याचे वेळीं क्लोम-नलिकेवर आच्छादित होत असल्यामुळें अन्न गिळ-ण्यांत मदत करतो, आणि अन्न-नलिकाद्वार उघडे करतो. कधीं कधीं अन्नग्रहण करीत असतांना या पडद्याचें हें कार्य थोडेंसेंहि चुकलें तर अन्नाचा एखादा दुसरा कण क्लोमनलिकेंत म्हणजे श्वासो-च्छ्वासक्रियेच्या मार्गांत पोहोंचतो. तसें झालें म्हणजे तो कण त्या श्वासनलिकेंतून बाहेरपडेपर्यंत मनुष्यास सारखा खोकला चालतो. यासच ठसका लागणें असेंहि म्हणतात. ही क्रिया देखील तो कण बाहेर काढण्या-करतां भोवतालच्या स्नायूंच्या गळ्याकडे प्रवृत्त झालेल्या गतीमुळें होते. यालाच 'भोजनस्य विमार्ग-गत्वात्' अर्थात् अन्न आपला मार्ग सोडून दुसऱ्या मार्गांत जाणें या क्रियेमुळें होणारा खोकला असें म्हणत असतात.

निरनिराळ्या वेगांचा अवरोध

निरनिराळ्या वेगांचा अवरोध केल्यामुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विशेषतः शिंकेचा अवरोध केल्यानें पण असाच खोकला चालतो. हीं सर्व साधारणतः खोकल्यास कारणीभूत होणारी विशेष कारणें सांगितलीं. परंतु याचप्रमाणें सर्दी होऊन किंवा इतर कफाचे विकार फुप्फुसांत उत्पन्न होऊन त्या त्या स्थानीं झालेल्या कफद्रव्याला बाहेर काढण्याकरितां असल्याच प्रकारचा जो स्नायूंचा प्रयत्न होतो त्यालाहि 'खोकला' असेंच म्हणतात. क्षय, श्वास रक्तपित्त इत्यादि विकारांत किंवा वातबलासकज्वर (Influenza), श्वसनक संनिपात (Pneumonia) आदि विकारांतहि कफ बाहेर काढण्याकरितां हीच क्रिया होते आणि त्यास हेंच कास असें नांव दिलें जातें. केवळ बाह्य कारणामुळें तो उत्पन्न झाला म्हणजे त्यास स्वतंत्र कास व्याधि असें नांव देतात. परंतु क्षय-श्वासादि विकारांत तो त्या व्याधींचा उपद्रव असा म्हटला जातो.

खोकल्याचे ५ प्रकार

कास पांच प्रकारचे आहेत. पैकीं पहिले तीन एका कक्षेंत येत असून, दुसरे दोन दुसऱ्या कक्षेंत येतात. पहिले तीन म्हणजे, वातज कास, पैत्तिक कास आणि श्लेष्मज कास. हे तात्काल उपचार केले गेले असतां साध्य कोटींत अन्तर्भूत होतात. आणि पुढें चिकित्सेंत वर्णन केलेले उपचार तावडतोब सुरू केले गेले तर ते सहज साध्यहि पण होतात. दुसरे दोन म्हणजे क्षतज कास आणि क्षयज कास हे मात्र फार कष्टानें बरे होणारे असे आहेत, आणि त्यांच्या-करितां पथ्याचे कडक निर्बन्ध पाळून उपचार केले पाहिजेत. खोकला हा अनेक रोगांचें मूळ कारण होय असतो, अशी एक प्रचलित म्हण आहे. आणि ही पण अक्षरशः खरी आहे. या व्याधीची उपेक्षा केली म्हणजे वेळींच त्याचे उपचार न केले तर शेवटी त्यामुळें क्षय होतो. आणि म्हणूनच ते क्रमशः म्हणजे वातापेक्षां पैत्तिक, त्यापेक्षां कफज, त्यापेक्षां क्षतज आणि शेवटीं क्षयज हे उत्तरोत्तर बलवान् विकार आहेत असें जाणावें.

अनेक ग्राहकांच्या सूचनेवरून
परतवाडा येथें आयुर्वेद सेवा संघ नासिकची
सर्व अनुभविक व गुणकारी औषधें
मिळण्याची सोय आम्हीं केली आहे.
श्री समर्थ स्टोअर्स
परतवाडा (मध्यप्रदेश)

खोकल्याचं पूर्वरूप

कास होऊं लागला म्हणजे प्रथम गळा व मुखकुहर हे दाटल्यासारखे होतात आणि त्यांच्यांत कुसळें भरल्याप्रमाणें वाटतें. गळ्यांत खाज उत्पन्न होते. आणि मनुष्य अन्न ग्रहण करूं लागला म्हणजे अन्न गिळण्याचें क्रियेंत अवरोध होतो.

वात पित्त कफ कासाचीं लक्षणें

१) वातज कासांत कोरडा खोकला येतो. खोकला सारखा चालतो. आणि आवाज फुटक्या मडक्यासारखा येतो. आवाज बसल्यासारखा वाटतो. डोकें दुखतें. आणि खोकला सारखा चालल्यामुळें पासोळ्यांत दुःख होतें.

२) पैत्तिक कासांत खोकतां खोकतां कडू रसाची व पिवळ्या वर्णाची वांति होते. तहान अत्यंत वाटते. तोंड वाळतें. छातीच्या भागांत दाह होतो. आणि ज्वर असतो.

डांग्या खोकला-पित्तकासाचा एक प्रकार

याचाच एक प्रकार डांग्या खोकला आहे याला आधुनिक शास्त्रांत (Whooping Cough) असें म्हणतात. हा बहुधा लहान मुलांसच होतो याची उबळ आली म्हणजे खोकला सारखा चालतो रुग्णाचें तोंड लाल वर्णाचें होतें व उबळ सारखी कित्येक मिनिटें रहाते. हा झाला म्हणजे मुलें सारखी वाळत जातात. हा अतिशय लागट (Contagious) व्याधी आहे. घरांत एका मुलास झाला म्हणजे इतरांस होतो, अवश्य होणार असें समजावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[ढ]कशासारखें खोकल्यानंतर, विशेषतः जेवण झाल्यानंतर उबळ आली म्हणजे खाल्लेलें सर्व अन्न पडून जातें. हा बहुधा, थोड्या प्रमाणांत तरी, तीन महिने असतो. ही याची मुदतच समजावी. उपचार केला म्हणजे त्याची तीव्रता कमी होते. परंतु मुदत मात्र कमी होत नाहीं.

कफकासांत घट्ट कफ

३) कफज कासांत घट्ट असा कफ प्रत्येक खोकल्याबरोबर येतो. गळा, फुफ्फुसें कफानें भरलीं आहेत व डबडबलीं आहेत असें वाटतें. अन्नावर रुचि नसते. तोंड आंतून कफानें सारवल्यासारखें असतें. आणि खोकला पुष्कळ वेळ येत राहून डोकें दुखतें.

क्षतज कास - कारणें व लक्षणें

४) क्षतज कासांत मनुष्यानें अति स्त्री-प्रसंग केल्यामुळें किंवा आपल्यापेक्षां जास्त शक्तीशीं कुस्ती केल्यामुळें; घोडे, हत्ती, मोटार इत्यादि वाहनांचा वेग जबरदस्ती रोकल्यामुळें, छातीच्या अन्तरावरणांत क्षत (घाव) होऊन त्यांत वातदोष शिरून तो खोकल्यास उत्पन्न करतो.

थुंकीबरोबर रक्त येतें

अशा परिस्थितींत प्रथम खोकला कोरडा असा येतो, परंतु नंतर थुंकीबरोबर रक्त येऊं लागतें. छातींत तीव्र पीडा होते. आणि छातींत ज्या जागीं क्षत झालें असेल तेथें तीव्र अशा सुया टोचल्यासारखें दुःख होतें. सर्व शरीराच्या अस्थिसंधि दुखूं लागतात. ताप येतो. श्वास वाढतो. आणि स्वर बसतो. असल्या या कासानें मनुष्य कबुतरासारखा घुंघुं शब्द करूं लागतो. याचा उपचार तावडतोब केला पाहिजे.

क्षयज कास--कारणें व लक्षणें

५) क्षयास उत्पन्न करणारीं जीं कारणें राजयक्ष्मा-चिकित्सेंत वर्णन केलीं तीच या क्षयज कासाला कारणीभूत होतात. यांत तीनहि दोष विकृत असतात. शरीर दिवसेंदिवस क्षीण होत जातें. सर्व शरीरांत वेदना, ज्वर, दाह व मोह आणि शेवटीं प्राणनाश हे याचे परिणाम होतात. दिवसेंदिवस दुर्बलता वाढत जाते. शरीरांतील मांस क्षीण होऊन शेवटीं पूं युक्त असें रक्त खोकल्याबरोबर पडायला लागतें. हा चिकित्सा करण्यास फार कठीण विकार आहे. तो क्षीण मनुष्यांचा तर निश्चयेंकरून प्राणनाश करतो. बलवान् मनुष्यांचा कदाचितच साध्य होतो. क्षतज आणि क्षयज हे दोन्ही कास नुकतेच झाले असले तर आणि चतुष्पाद संपत्ति म्हणजे योग्य वैद्य, उत्तम औषधी, चांगला परिचारक आणि पथ्य पाळणारा रोगी असे असले तर कदाचित् साध्य होतात.

उतार वयांत वृद्धांना झालेला जराजन्य कास हाहि याप्य म्हणजे चिकित्सा व पथ्य केलें असतांना त्रास न देणारा असा असतो.

कास (खोकला) चिकित्सा

कास किंवा खोकला हा सदैवच कोणत्याना कोणत्या इतर उपद्रवाबरोबर असतो. नुसता खोकला हा स्वतंत्र व्याधि नव्हे. प्रारंभीं दिलेल्या त्याच्या संप्राप्तीवरून कांहीं कारणामुळें वाताच्या गतीस अवरोध आला म्हणजे त्या कारणास दूर करण्याकरतां हा स्वाभाविक प्रयत्न असतो.

कारण दूर करणें आवश्यक असतें

या दृष्टीनें पाहिलें असता खोकला बरा करणें म्हणजे ज्या कारणामुळें त्या वायूची गति अवरुद्ध झाली असेल तें कारण दूर करणें आवश्यक होतें.

स्वभावतः होणाऱ्या दोषकोपाला ऋतु कारणीभूत होतात हें खालील श्लोकावरून स्पष्ट होतें.

आयुर्वेद सेवा संघ नासिकची सर्व गुणकारी
औषधें मिळण्याचें ठिकाण
जनरल सप्लायर्स (हिंद)
११४ बी, जगन्नाथाची चाळ
फणसवाडी, मुंबई २
तसेंच शास्त्रोक्त पाठाप्रमाणें नवीन नवीन
औषधेंहि तयार करून दिलीं जातात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्रीष्मे संचीयते वायुः प्रावृट्काले प्रकुप्यति ।
वर्षासु चीयते पित्तं शरद्काले प्रकुप्यति ॥
हेमंते चीयते श्लेष्मा वसंतान्ते प्रकुप्यति ।

या नियमाप्रमाणें कफाचा प्रकोप वसंत ऋतूच्या शेवटीं होत असतो. अर्थातच फेब्रुवारी व मार्च हे महिने त्याच्या प्रकोपाचे आहेत. या दिवसांत बहुदा वातकफज्वर (Influenza) होतो. अशा वेळीं त्या विकारावर ज्वर व खोकला दोन्ही कमी होण्याकरतां अनुभविक चिकित्सा पान ९, १० वर वर्णन केलेली औषधें उपयोगांत आणावी. त्याच ठिकाणीं खोकल्यावरील चाटणें (अ), (ब), (क) वर्णन केलीं आहेत तीं उपयोगांत आणावीं. कफज खोकल्यावर आर्द्रक लेह (पान १२) वर द्राक्षारिष्ट (पान १३) हे उपयोगी ठरतात. या योगानें ऋतुज व तात्कालिक होणारे

प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत

१ कलेच्याची मीमांसा	किं. ६ रु.
२ आधुनिक आहारशास्त्र	१॥ रु.
३ आधुनिक कामशास्त्र	४ रु.
४ वेश्याव्यवसाय	२ रु.
५ समाजस्वास्थ्य मासिकांतील निवडक लेख भाग २रा	२ रु.
६ समाजस्वास्थ्य मासिक (वार्षिक वर्गणी)	३ रु.
७ संततिनियमन (सचित्र)	१। रु.
८ गुप्तरोगांपासून बचाव	१ रु.
९ तेरा गोष्टी	१ रु.
१० त्वचेची निगा	८ आणे
११ गुरुबाजी (नाटक)	८ आणे
१२ न्यायाचा शोध (नाटक)	१ रु.
१३ परिसच्या परी	३ रु.

१ राइट एजन्सी, नवी भटवाडी मुंबई ४
२ वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

साधारण खोकले बरे होतात. सर्व साधारण खोकल्यावर उपयोगांत येणाऱ्या औषधी खालील आहेत.

१ लवंगादिवटी

या औषधाचा पाठ अनुभविक चिकित्सा पुस्तकाच्या पान २८ वर पहावा.

२ द्राक्षादिवटी

अनुभविक चिकित्सा पान २९ पहा.

३ बिभीतकी लेह

चांगल्या बेहड्यांत आठपट पाणी घालून अष्टमांश पाणी उरेपर्यंत शिजवावें, व काढा गाळून घ्यावा. नंतर त्या गाळलेल्या पाण्यांत दुप्पट खडी साखर घालून दाट पाक तयार करावा. त्या पाकांत शिजविलेले बेहडे व थोडी पिंपळीची पूड घालून रावलेल्या मडक्यांत भरून ठेवावा.

ज्या व्यक्तीस फार जुना खोकला असेल तिला या बेहड्यांपैकीं एक बेहडा खाण्याकरतां किंवा त्याचें टरफलें तोंडांत धरून ठेवण्याकरतां द्यावीं, व रस गिळण्यास सांगावें. त्याचप्रमाणें कित्येक वेळ चाटण म्हणून त्या लेहांतील घट्ट पाकहि द्यावा.

४ बृहती क्षार

बृहती किंवा रिंगणी हें एक जंगलांत किंवा शहरांतहि रहदारी नसलेल्या जागीं उत्पन्न होणारें काटेरी झुडूप आहे. याला हिंदी भाषेंत कटारी असें म्हणतात. त्याचें पंचांग घेऊन व त्याला वाळवून त्याची राख व क्षार हे दोन्ही तयार करावे. राख साधारणपणें तरुण मनुष्यास तीन गुंज सकाळ संध्याकाळ मधांतून चाटण्यास द्यावी. व क्षार एक गुंज, विड्यांत (तयार केलेल्या) ठेवून रात्रीं निजतांना खोकला अधिक येतो म्हणून तोंडांत दाबून धरण्यास सांगावें म्हणजे खोकला कमी होतो.

५ अपामार्ग क्षार

आघाडा समूळ उपटून क्षार पद्धतीनें त्याचा पांढरा क्षार तयार करावा. तोहि वर वर्णन केल्याप्रमाणें विड्यांत ठेवून दावण्यास द्यावा. यानेंहि श्वास, खोकला (विशेषतः वातकफज) बरा होतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६ अलर्क (रुई) पुष्प लेह

(लाल फुलें ज्यास येतात ती रुई) मंदार ... ची फुलें वाळवून नंतर फुलांच्या चौपट गुळाच्या ... ती अर्धी कुचलून घालावी व साधारण चाटण्या- ... घट्ट असा लेह तयार करावा. याचें प्रमाण अर्धा ... तोळा दरवेळ द्यावें.

७ आर्द्रक लेह (आलेपाक)

हा तयार करण्यास खालील वस्तूंचा उपयोग ...

आल्याचा रस	—१० तोळे
खडीसाखर	—४० तोळे
काळीं मिरें	— १ तोळा
जायफळ	— १ तोळा
जायपत्री	— १ तोळा
केशर	— १ तोळा
विलायची	-- १ तोळा
पाणी	—१० तोळे

प्रथम आल्याचा रस, पाणी आणि बारीक ... खडीसाखर एकत्र शिजवून साधारण चाटण्या- ... घट्ट मिश्रण झालें म्हणजे त्यांत उरलेल्या ... औषधांचें वस्त्रगाळ चूर्ण मिसळावें. थंड ... बरणीत भरून ठेवावें.

८ सीतोपलादि चूर्ण

याचें विवरण राजयक्ष्मा-चिकित्सेंत आलेलेंच आहे.

९ तालीसादि चूर्ण व गुटिका

यांचें विवरण मागें क्षयचिकित्सेंत आलेलेंच ... मधांत मिसळून चाटण म्हणून खोकल्यावर ... उपयोग करावा.

१० कंटकारी घृत

हें तयार करण्याकरितां कंटकारी म्हणजे रिंगणी ... शेर घेऊन आठपट पाणी घालून शिजवावें. ... शेर काढा उरला म्हणजे त्याच्यांत ३२ तोळे ... घालावें. आणि एकेक तोळा पिंपळी, चित्रक, ... पिपळामूळ, वेखंड, धमासा व रास्ना या औषधी घालून तें शिजवावें. नुसते तूप उरल्यावर गाळून उपयोग आणावें.

डांग्या खोकल्यावर जटामांस्यादि गुटिका

(१) हा झालेल्या मुलास खालीं दिलेल्या जटा-मांस्यादिगुटिका द्याव्या. याकरितां जटामांसी, वावडिंग लोध्र, डंची अगर, तगर, कंपिल्लक, रास्ना, वाळहिरडे, व वंशलोचन हीं ९ द्रव्यें समभाग घेऊन त्यांचें वस्त्रगाळ चूर्ण मधांत मिसळून गोळया कराव्या. प्रत्येक गोळी पाव तोळा असावी.

विषम प्रमाणांतील तूप मधांत एक गोळी मिसळून तें चाटण सर्व दिवस व रात्रींत ढबळ आली म्हणजे एकेक बोट चाटवावें.

(२) दररोज दिवसांतून तीनदां

गुळवेलीचें सत्व ६ गुं. }
प्रवाळ भस्म २ गुं. } मिळून १ पुडी

सरासरी ४ वर्षांच्या मुलास दाडिमलेहावरोवर द्यावी.

(३) व पथ्यास दूधभात व साखर हे तीनच पदार्थ द्यावे. म्हणजे आठ दिवसांत उबळी कमी होतात.

१२ च्यवनप्राश-गोळया

हा अवलेह चरकांत रसायनाध्यायांत वर्णन केलेला तयार करावा. व तो चांगला घट्ट गोळया होतील एवढा शिजवावा. त्याच्या तोळयाच्या चार अशा गोळया करून तोंडांत धरण्यास द्याव्या. यानें

प्राणिज द्रव्यांच्या नाविन्यपूर्ण चिकित्सेनें आरोग्य मिळवून नवचैतन्य प्राप्त करा. फक्त ७ ते १४ दिवस घेतल्यानंतर चमत्कार पहा. ह्याच त्या गोळया "मिश्रा शक्तिसागर"

१४ गो. २ रु., ४२ गो. रु. ४ ट. ख. वेगळा याबरोबरच "रजि. युनानी तिला" वापर-ल्यास सोन्यांत सुगंध समजा. लहान बा. २॥ रु. मोठी बा. ४ रु., ट. ख. अलग.

मिश्रा महाराष्ट्र फार्मसी (रजि.)
ब्रह्मपुरी (चांदा) म. प्र.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षतज व क्षयज असे दोन्ही कास बरे होतात.

क्षयचिकित्सा मार्गे राजयक्ष्मा अध्यायांत वर्णन केलेलेच आहे. त्यांत येणाऱ्या खोकल्यावर अनेक योग वर्णन केलेले आहेत. त्या सर्वांचा उपयोग करावा. त्याचप्रमाणें पुढील अध्यायांत वर्णन केल्या जाणाऱ्या श्वास विकारावर सांगितलेले श्वासनाशक असे उपाय, हे कासनाशनाकरतांहि उपयोगी होतात; सबब, त्याचाहि उपयोग करावा.

पथ्यापथ्य

खोकल्यावर तेल, तिखट व आंबट आजिबात वर्ज्य असावें. दररोज शौचास नीट होईल, मल पोटांत राहणार नाहीं अशी व्यवस्था करावी. त्याकरितां आवश्यकतेनुसार रात्रीं एरंडेल किंवा विरेचनाकरतां अनुभवसिद्ध असें खालीं लिहिलेलें अभयादि चूर्ण द्यावें.

विरेचनासाठीं अभयादि चूर्ण

हिरडा, सोनामुखी, रेवाचिनी, प्रत्येकीं चार तोळे, सैंधव मीठ दोन तोळे, काळें मीठ, मिरे व सुंठ प्रत्येकीं एक तोळा या सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करावें. व रात्रीं निजतांना चार ते सहा मासे द्यावे. म्हणजे सकाळीं उत्तम विरेचन होऊन पोटांतील आम व इतर अपक्व पदार्थ बाहेर पडतात. हें चूर्ण कोणत्याहि विकारावर मळशुद्धीकरतां देता येतें. यापासून अपाय होण्याचा कधींहि संभव नसतो.

खोकल्यावर तांदुळ वर्ज्य

खोकल्यावर तांदूळ, दूध व साखर हे पदार्थ वर्ज्य; परन्तु तुळशीचा काढा दूध घालून किंवा सुंठ, मिरे, पिंपळी व दालचिनी यांचें चूर्ण चहाप्रमाणें उकळून त्यांत दूध, खडीसाखर घालून देतां येते. साखर कफकारक असून खडीसाखर मात्र कफनाशक आहे हें लक्ष्यांत ठेवावें. खोकल्याकरितां नुसत्या खडीसाखरेचा खडा तोंडांत दाबण्यास दिला तर खोकला कमी होतो. याकरितां या विकारांत खडीसाखरेचा उपयोग भरपूर करतां येतो. फळांचे रस यांच्यांत देऊ नये. फक्त गोड डाळिंबाचा रस मात्र हवा तितका व हवा तेव्हां (अर्ध्या रात्रीं सुद्धां) देतां येतो. डाळिंब हें फळ शीतवीर्य नाहीं हें लक्षांत ठेवावें.

खोकल्यावरील पथ्य

साधें वरण, पोळी, ताज्या ताकाची कढी, तुपाची फोडणी दिलेल्या व जिरे, मिरे इत्यादि घातलेल्या अशा दुध्या, परवर, गिलकी, शिजविलेला मुळा, लसूण हे पदार्थ कोणत्याहि खोकल्यावर उपयोगी असतात. मिठाई वगैरे मधुर पदार्थ व पचनास कठीण असे अजीबात वर्ज्य समजावे. कांहीं दिवस सारखा असलेल्या खोकल्यास जर त्याबरोबर श्वास असेल तर दर आठव्या दिवशीं किंवा पंधराव्या दिवशीं विरेचन अवश्य द्यावें. या विरेचनास कंपिल्लकाचें चूर्ण वस्त्रगाळ करून तरुण मनुष्यास अर्धा तोळा पर्यंत एका वेळीं द्यावें. अनुपानास दूध द्यावें व तें सकाळच्या प्रहरीं एकदा शौचास जाऊन आल्यानंतर द्यावें. अनुपानास दूध द्यावें. व जुलाब झाल्यानंतर मात्र तूप घातलेली खिचडी किंवा तूपभात हें द्यावें. त्यानंतर औषध सुरू केलें म्हणजे भात वर्ज्य ठेवावा. श्वासयुक्त खोकला, या जुलाबाचा एक खुराक देतांच अर्धा कमी होतो, असा अनुभव आहे.

दर १५ व्या दिवशीं विरेचन

या प्रमाणें दर पंधराव्या दिवशीं विरेचन व वरील पथ्य पाळलें असतां सर्वसाधारण खोकले व त्याबरोबर असणारा श्वास हे बरे होतात. क्षयज व क्षतज कासांत मात्र विरेचन अजीबात देऊ नये.

नाशिक येथें मेनरोडवर आयुर्वेद सेवा संघाचीं सर्व शास्त्रोक्त पाठाप्रमाणें बनविलेलीं औषधें मिळण्याचें ठिकाणः—

श्री. कृ. वा. फाल्गुने

३६ मेनरोड, नासिक

अनेकांनीं औषधांची मुक्तकंठानें स्तुति केली. आपणहि एकवेळ वापरून अनुभव घ्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आंबट लिंबाच्या सालींची उपयुक्तता

सालींतील 'क' जीवनसत्वाचें प्रमाण वाढत जाते

(लेखकः—वैद्य बिंदुमाधव पंडित)

आंबट लिंबाच्या साली आरोग्याच्या दृष्टीनें अत्यन्त उपयुक्त आहेत. सबब लिंबाचा रस भातावर, भाजी-आमटींत पिळून, पिवळीं सुंदर सालें पानाबाहेर टाकण्याची जी प्रथा आहे, ती गैर आहे, याविषयीं मागेंच आयुर्वेदपत्रिकेंत लेख येऊन गेला आहे. व नागपूरचा उद्यम व मुंबईचा नवशक्ति यांनीं तो लेख आपल्या नियतकालिकांत उद्धृत करून आपली गुणग्राहकता प्रगट केली आहे.

लिंबाच्या सालीपासून दीपकवटी

आयुर्वेद सेवा संघांत दरसाल मोठ्या प्रमाणांत आंबट लिंबाच्या साली रस काढल्यानंतर राहतात, त्या मिठांत मुरवून त्याचें लोणचें करून ते विक्रीस ठेवलेलें आहे. व तें फार चवदार म्हणून विकलेंहि जात आहे. ज्यांना हें लोणचें खाणें जमत नाहीं त्यांच्यासाठीं, त्याच्या गोळ्या तयार करून विक्रीस ठेवल्या आहेत. आवळ्यापासून ज्याप्रमाणें पाचकगुटी बनविली जाते त्याप्रमाणेंच लिंबाच्या सालीपासून दीपकवटी बनविली आहे. ती प्रवासांतहि जवळ बाळगण्यास सोईची आहे.

श्री. कृष्णचन्द्रजींचा लेख

या आंबट लिंबाच्या सालींत आरोग्यदृष्ट्या किती अधिक गुण सांठविलेले आहेत याची माहिती उरळीकांचन निसर्गोपचाराश्रमाचे श्री. कृष्णचन्द्रजी अग्रवाल एम्. एस्सी. यांनीं आपल्या एका लेखांत दिली आहे, ती अशी:—

सालींत 'सार' आहे

"सर्वत्र असें मानलें जातें कीं, कोणत्याहि भाजीच्या अथवा फळाच्या रसांत त्याचें सर्व 'सार' असतें, व बाकीचा भाग 'असार' असतो. दुधाचें सर्व सार तुपांत आहे व ताकांत कांहींच सत्व नाहीं असें कांहीं मानतात; पण हें खरें नाहीं. ताकांत गुण आहेत हें सर्व लोकांना पटलेलें आहे, पण निंबू, संतरे, मुसंबी, आंबे या फळांच्या सालीस व मधल्या चोथ्यास किती महत्व आहे तें लोकांना अज्ञात आहे.

जीवनसत्व वाढत जातें

"संतरे, लिंबू आदि फळांच्या रसांत क जीवनसत्व असतें असें लोक समजतात. पण त्यांच्या सालींत व चोथ्यांत जीवनसत्व क चें प्रमाण त्याहूनहि अधिक आहे हें त्यांना माहीत नाहीं. लिंबू व संतरी जसजशी पिकत जातात, तसतसें त्यांच्या रसांतील जीवनसत्वाचें प्रमाण कमी होऊन सालींत तें वाढत जातें.

	रस	साल
कच्चें निंबू जीवनसत्वाचें शेकडा प्रमाण	६८	६३
पक्के निंबू ,, ,, ,,	३९	११५
पूर्ण पिकलेलें ,, ,, ,,	२३	१२०

साल सुटलेलें संतरें

ज्या संतऱ्याचें साल पूर्ण सुटलेलें असतें, त्या सालींत चिकटलेल्या सालींतील जीवनसत्वापेक्षां दीडपट 'क' जीवनसत्व असतें.

२॥ पट जीवनसत्व

समजा, एका पिकलेल्या आंबट लिंबाचें वजन ४ तोळे आहे. त्यापैकीं रस २ तोळे, साल व चोथा पावणे दोन तोळे व बी पाव तोळा अशीं वजनें आहेत. तर त्या रसांत जेवढें 'क' जीवनसत्व असेल त्याच्या २॥ पट 'क' जीवनसत्व त्या साली--चोथ्यांत आढळून येईल.

गूळ घालून गोडें लोणचें

लिंबाच्या अगर संतऱ्याच्या साली नुसत्या खाण्यास चांगल्या लागत नाहींत, म्हणून आपण त्यः

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टाकून देतो. पण शेळ्या व गाई-म्हशी त्या आवडीनें खातात. या साली चाकूनें तुकडे करून रात्रीं पाण्यांत भिजत घातल्या व सकाळीं त्यांत थोडा गूळ घालून तें पाणी प्यालें तर फायदाच होईल. अगर रस काढून घेतल्यानंतर बिया काढून टाकून लगेच तिखट-मीठाबरोबर चावून खाल्या तर रसापेक्षां दुप्पट जीवनसत्व मिळेल. ताबडतोब साल व चोथा कोळून प्यालें तरी ६० टक्के 'क' सत्व मिळेल.

क्षार व सुगंधी द्रव्यें

निंबू मिठांत घालून लोणचें बनविण्याची हिंदी पद्धति आहे. यामुळें जीवनसत्व पुष्कळच टिकून राहते. जीवनसत्वाचा विचार लक्षांत घेतां निंबाच्या नुसत्या रसापेक्षां लिंबाचें लोणचें खाण्याचे गुण निःसंशय अधिक आहेत. जीवनसत्व तर अधिक मिळेलच, पण सालींत जे इतर क्षार व सुगंधी द्रव्यें आहेत त्यांचाहि लाभ मिळेल. 'वैद्यलोक रसापेक्षां संपूर्ण लिंबू खाण्याचे गुणधर्म अधिक चांगले–' असें सांगतात, असें पू. विनोबाजींनीं नुकतेच एके ठिकाणीं म्हटलें आहे. लिंबाच्या ताज्या साली शिजवून पण खाणें शक्य आहे. मीठ घातल्यानें त्यांतील कडूपणा कमी होतो.

लिंबाच्या सालींत कल्शियमचें प्रमाण पण बरेच आहे. साली खाण्यांत आणण्यानें त्याचाहि लाभ मिळेल.

वरील सर्व गोष्टी लक्षांत घेऊन वैद्य व जाणती मंडळी रसाबरोबरच साली खाण्याकडे अधिक लक्ष देतील अशी आशा आहे.

छोटा डॉक्टरी अभ्यासक्रम

देशांतील आयुर्वेदाच्या प्रसाराला आळा घालण्यासाठीं व छोटे डॉक्टर तयार करून ते खेड्या-पाड्यांतून भरण्यासाठीं एक छोटा डॉक्टरी अभ्यास-क्रम या देशांत सुरू करण्याचा विचार, स्वास्थ्य परि-षदद्वारा, केंद्र सरकार करीत आहे. आयुर्वेदासाठीं मात्र पांच वर्षांपेक्षां छोटा अभ्यासक्रम चालू द्यावयाचा नाहीं असा त्यांचा डाव आहे. त्यामुळें वैद्य खेड्यांत राहूच शकणार नाहींत.

जानेवारी महिन्यांत हैद्राबाद येथें आरोग्य-मंत्री अमृतकुंवर यांच्या अध्यक्षतेखालीं अशी स्वास्थ्य परिषद भरली होती. त्यावेळीं हा ठराव पास होऊ शकला नाहीं. आतां जूनमध्यें भरणाऱ्या सभेंत तो पुनः पुढें विचारार्थ येईल असें कळतें.

महासंमेलन-विद्यापीठ कार्यालय

अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन व अखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठ यांच्या कार्यालयाचा नवा पत्ता पुढीलप्रमाणें आहेः-

महालक्ष्मी मार्केट, चांदनी चौक, दिल्ली ६

गृहवैद्य अथवा क्षारचिकित्सा

लेखकः- डॉ. गर्दे, आय्. एम्. एस्. (रिटायर्ड)

किंमत ३ रु., ट. ख. १० आणे

(१) वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

(२) डॉ. गर्दे, २६ मोंगल लेन, मुंबई १

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-

बी. पी. बर्वे अँड को., जळगांव

[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.

मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द. सातारा जिल्हा संमेलन, सांगली, अधिवेशन १ लें

संमेलनांत संमत झालेले ठराव

ठराव १ ला-द. सातारा जिल्ह्यांतील अकालीं निधन झालेल्या पुढील वैद्यबंधुबाबत या सभेस अत्यंत दुःख होत आहे. कै. वैद्य गोविंदराव नांदणीकर सांगली, कै. वै. वि. स. जोशी सांगली; कै. राजवैद्य वा. ना. वझे, येडुर.

ठराव २ रा-महाराष्ट्र प्रांतिक वैद्य मंडळाचें मुख्य कार्यालय एके ठिकाणीं ठेवून त्याच्याच शाखा म्हणजे जिल्हा वैद्य मंडळ, तालुका वैद्य मंडळ, शहर वैद्य मंडळ व ग्राम वैद्य मंडळ असे विभाग असावेत व या सर्व विभागांना प्रांतिक वैद्य मंडळाची घटना व नियम लागू करून कार्यपद्धति सुकर व सुसंघटित असावी असें या सभेचें मत आहे.

ठराव ३ रा-परप्रांतीय वैद्यांच्या रजिस्ट्रेशनला मुंबई प्रांतांत मान्यता मिळावी आणि मुंबई प्रांतांतील रजिस्ट्रेशनला इतर प्रांतांत मान्यता असावी असें या सभेचें मत आहे.

ठराव ४ था-मुंबई देशी वैद्यक बोर्ड व आयुर्वेदविषयक इतर समित्या यांचें अध्यक्षस्थान ॲलोपॅथिक डॉक्टराकडे असलेमुळें आयुर्वेदाची मुस्कटदाबी होत आहे. तरी ही जागा वैद्यांस मिळावी असें या सभेचें मत आहे.

ठराव ५ वा-जे वैद्य अन्रजिस्टर्ड आहेत व जे रजिस्टर्ड प्रॅक्टिशनर नाहींत अशा खेडेगांवीं ते वैद्यकीय व्यवसाय करणार असतील तर अशा वैद्यांची यादी मुंबई आयुर्वेदिक बोर्डाचे ऑफिसमध्ये नोंद स्वरूपांत ठेवण्यांत यावी, असें या सभेचें मत आहे.

ठराव ६ वा-जिल्हानिहाय ज्या ज्या ठिकाणीं सरकारी रुग्णालयें आहेत त्या त्या ठिकाणीं सरकारनें वैद्य नेमला जाऊन प्रवेशित रुग्ण व बाह्यरुग्ण यांच्या तपासणेंची व उपचारांची सोय आयुर्वेदिक पद्धतीनें व्हावी.

ठराव ७ वा- सध्यांच्या जी. एफ्. ए. एम्. कोर्स खेरीज शुद्ध आयुर्वेदीय अभ्यासक्रमाचा कोर्स-सुद्धां सरकारनें चालू करावा अगर करण्यास परवानगी द्यावी असें या सभेचें मत आहे.

ठराव ८ वा- मुंबई सरकारचें पुढील वर्षाचे अंदाजपत्रकांत आयुर्वेदासाठीं रु. ३४०००० इमारत व डिग्री कोर्ससाठीं साधनसामुग्री इत्यादि-करितां इलाख्यांतील सर्व आयुर्वेदीय संस्थांना संस्था वाढीसाठीं व साधनसामुग्रीसाठीं मदत म्हणून खर्ची घातली आहे. याबाबत मुंबई सरकार व माननीय आरोग्यमंत्री यांचें हें संमेलन अभिनंदन करीत आहे. अशीच आर्थिक मदत केवळ आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमासाठींहि सरकारनें करावी अशी या संमेलनाची आरोग्यमंत्र्यांना विनंति आहे.

ठराव ९ वा- विलीन संस्थानांमधील कांहीं वैद्यांचे अर्ज ट्रिब्यूनलनें नामंजूर केलेले आहेत. त्यांनीं पुन्हा फेरतपासणीसाठीं अर्ज केल्यास स्थानिक चौकशी करून त्यांचा सहानुभूतिपूर्वक विचार करावा व कोणावर अन्याय न होईल अशा तऱ्हेची योजना करावी अशी हे संमेलन ट्रिब्यूनलला विनंति करीत आहे.

ठराव १० वा- सांगली नगरपालिकेच्या आयुर्वेदिक दवाखान्याचें रूपांतर रुग्णालयांत करण्यांत यावें व तसेंच नवीन निघणारें प्रसूतिगृहसुद्धां आयुर्वेदिक तत्वावरच चालावें.

ठराव ११ वा- मिरज मिशन हॉस्पिटलमध्यें आयुर्वेदिक कायचिकित्साविभाग सुरू करावा असें या सभेचें मत आहे.

ठराव १२ वा- मुंबईच्या आरोग्यमंत्र्यांनी सातारा येथील आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनप्रसंगीं आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमाबाबत जे विचार प्रगट केले त्याबाबत ही सभा त्यांचें अभिनंदन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करीत आहे. ही सभा त्यांच्याशीं सहमत आहे. त्यांनीं लवकर अशा शुद्ध विचाराचा आयुर्वेदीय अभ्यासक्रम चालू करण्याची व्यवस्था करावी, अशी आग्रहाची विनंति आहे.

ठराव १३ वा- औषधांसाठीं अफू, भांग, मोहाचीं फुलें मिळण्यास वैद्यांना त्रास होतो व त्यामुळें चिकित्सेला अडचणी निर्माण होत आहेत. तरी सरकारनें या प्रश्नाचा फेर विचार करावा, त्या अडचणी दूर कराव्यात अशी या संमेलनाची नामदार आरोग्यमंत्र्यांना व दारुबन्दीमंत्र्यांना विनंति आहे.

ठराव १४ वा (अ)- आयुर्वेद व अॅलोपॉथिक या दोन स्वतंत्र तत्वावर उभारलेल्या व आपापल्या तत्वप्रणालीप्रमाणें स्वास्थ्यसंरक्षणपूर्वक, प्रकृति संवर्धन, आणि रोगनिवारण करणाऱ्या दोन स्वतंत्र पद्धति आहेत. त्या स्वतंत्र रीतीनें अव्वलदर्जाच्या उत्कर्षास न्याव्यात त्याला आमची हरकत नाहीं. कारण सर्व विद्या अग्रेसरत्वानें येथें असाव्यात, अशीच भारताची परंपरा आहे.

(ब) त्यांतल्यात्यांत आयुर्वेदीय पद्धति ही या भारतवर्षांत हजारों वर्षे अखंड चालत आली अ त तिनें पठणपाठणपूर्वक व परंपरासंरक्षणपूर्वक हें कार्य उत्तम रीतीनें केलें आहे.

(क) त्यामुळें ती पद्धति स्वतंत्रतया चालू ठेवून व उत्कर्षास लावून तींतील पद्धतीप्रमाणें पूर्वाचार्यतुल्य आचार्य निर्माण होतील असें ध्येय पुढें ठेवून ती पद्धति उत्कर्षास नेली पाहिजे.

(ड) व त्याकरितां प्रथम आयुर्वेदीय पद्धतीनें आत्मविश्वासपूर्वक रोग निवारण करणारे विशारद व आचार्य निर्माण करून त्यांच्यापैकीं आवड असणाऱ्या लोकांना शल्यशालाक्य शास्त्राकरितां म्हणजे आयुर्वेदाच्या धन्वंतरी परंपरेकरितां योग्य मुदतीचा ऐच्छिक कोर्स ठेवावा व त्याची सोय करून द्यावी.

(ई) आयुर्वेद शास्त्राची पठणपाठण पद्धति पूर्वीप्रमाणेच गुरुकुलपद्धतीनें ठेवून निखिल भारतीय संस्थे प्रमाणें परीक्षा ठेवून जनतेस वैद्यांचा पुरवठा करून आरोग्य संपादनास मदत करावी व पूर्वकालप्रमाणे धर्माचाराप्रमाणें कुटुंबापासून राष्ट्रापर्यंत आरोग्यशास्त्र आचरणांत आणावें अशी सरकारास विनंति आहे.

आयुर्वेद सेवा संघ पुस्तक माला

पुष्प २ रें

निवडक रुग्ण चिकित्सा

भिषग्विलास व संघवृत्त मासिकांत १९४१ पूर्वी प्रसिद्ध झालेल्या ४० निरनिराळ्या चिकित्सकांच्या २२९ रुग्ण चिकित्सांचा संग्रह म्हणजे रजिस्टर्ड व पदवीधर वैद्यांना आयुर्वेदीय निदान औषधीयोजना करण्यासाठीं असलेला उत्तम मार्गदर्शक वाटाड्या आहे.

यांत वैद्यपंचानन गुणेशास्त्री, वै. वेणी. माधवशास्त्री वै. बिंदुमाधवशास्त्री व वै. वि. म. गोगटे इत्यादि चिकित्सकांनीं लिहिलेल्या, विकट रोगावरील अनुभविक चिकित्सा दिल्या आहेत. प्रति फारच थोड्या शिल्लक आहेत. त्वरा करा.

किंमत ४॥ रु., टपाल खर्च १३ आणे

वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

तारुण्य कायम टिकविण्यासाठीं
शक्तिवर्धक व धातुपौष्टिक खाद्य

कंदर्प-वृष्य पाक

तसेंच स्त्रियांचा मासिक धर्म बरोबर व बिनतक्रार चालू रहाणेसाठीं

पुष्पवटी

हैद्राबादेंत आयुर्वेद सेवा संघाचीं सर्व अनुभविक गुणकारी औषधें मिळण्याचें ठिकाण-

*** मे. आयुर्धाम मेडिकल हॉल ***

मुलतान बझार, कोठी बसस्टँड समोर हैद्राबाद (द.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोव्यांतील वैद्यकीय व्यवसाय

---+---

वर रत्नागिरी, बाजूस बेळगांव व खालीं कारवार या जिल्ह्यांनी वेढलेला पश्चिम किनाऱ्यावर मराठी भाषा बोलणारा असा गोवा हा एक लहानसा जिल्ह्याएवढा प्रांत आहे. पण त्यावर भारताची सत्ता नाहीं. पोर्तुगीज लोकांची आहे. तेथील कायदेकानू, शिक्षण-पद्धति, सर्व निराळ्या प्रकारची आहे.

पूर्वी भारतावर ज्याप्रमाणें इंग्लंडची सत्ता चालत होती त्याप्रमाणें त्या गोवें भागावर पोर्तुगाल देशाची सत्ता चालते. पोर्तुगालची राजधानी लिस्बन. गोव्यांतील लोकांना अधिक शिक्षणासाठीं लिस्बनला जावें लागतें.

गोव्यांत प्राथमिक शिक्षण पोर्तुगीज भाषेच्या द्वारें; नंतर एकदम कॉलेजशिक्षण ७ वर्षें; व नंतर डॉक्टरी, अगर कांपौंडरी (फार्मसी) शिक्षण ५ वर्षें असा अभ्यासक्रम आहे.

गोव्यांत डॉक्टराला औषधें देण्याचा दवाखाना ठेवण्यास बंदी आहे. डॉक्टरानें रोग्याला तपासून औषधें लिहून द्यावींत. मग रोग्यानें ती फार्मसी (म्हणजेच औषधें मिश्र करून देणारें दुकान) मधून आणावीत अशी पद्धति आहे. अशी फार्मसी चालविण्यासाठीं फार्मसी कोर्स पास व्हावें लागतें. शिवाय एखाद्या गांवांत फार्मसी किती असाव्यात त्यावरहि बंधन आहे.

औषधें विकण्यास बंदी

पोर्तुगीज सरकारनें दुकानांतून औषधें विकण्यास केमिस्ट व ड्रगिस्ट यांना बंदी केली आहे, त्यांना औषधें विकणें असेल तर ती त्यांनीं फार्मसींनाच विकली पाहिजेत, असा नवा कायदा केला आहे.

आयुर्वेदाला राजमान्यता नाहीं

गोव्यांत आयुर्वेदाला राजमान्यता नाहीं! इतकेंच नव्हे तर ॲलोपॅथीखेरीज इतर कोणत्याहि पद्धतीच्या निदान चिकित्सा पद्धतीस बंदी आहे. बाहेरील औषधेंहि जाऊं शकत नाहींत. कांहीं थोड्या कंपन्यांचीं कांहीं ठराविक औषधें सरकारच्या परवानगीनें तेथें जातात. एरव्हीं सर्व बंदी आहे. तिकडे आयुर्वेदीय वैद्य आजवर औषधविक्रेत्याच्या नांवाखालीं वैद्यकी करीत. पण तेंहि आतां बंद पडलें आहे. औषध विक्रेत्यांची दुकानें ओस पडलीं आहेत. ३० - ३२ वर्षें व्यापार औषधी करणारे लोक आज रिकामी कपाटे करून बसले आहेत. कारण व्यापाऱ्यांना बंद सील बाटली विकण्यास बंदी आहे. व केवळ फार्मसीवालेच डॉक्टराच्या प्रिस्क्रिप्शनप्रमाणें औषधें तयार करून देऊ शकतात.

स्वयंपाक घरांत अगर गोठ्यांत औषधें

गोव्यांत आयुर्वेद पद्धतीनें औषधें देणारे कांहीं लोक सध्यांहि आहेत, पण ते आपलीं औषधें गोठ्यांत अगर स्वयंपाक घरांत हिंग, जिरे, मिरे मसाल्यांतच औषधाच्या बाटल्या ठेवून व्यवहार करीत आहेत. त्यांच्यादारावर वैद्य अगर दवाखान्याचा बोर्ड असणार नाहीं. बाहेरच्या खोलींत दवाखान्याचें दृश्य दिसणार नाहीं. सहज समाचाराला आल्याप्रमाणें लोक वैद्याकडे येतात. गोष्टी बोलत प्रकृतीसंबंधीं विचारविनिमय करतात. मग वैद्य माजघरांत अगर गोठ्यांत जाऊन औषधें आणून मुकाट्यानें रोग्याच्या नातेवाईकास देतात व पैसे घेतात. तेथील आर्यवैद्यक जनतेच्या पाठिंब्यावरच चालू आहे.

गोव्यांत आयुर्वेदीय व्यवसायास बंदी

गोव्यांत वैद्य आयुर्वेदीय पद्धतीनें कोणासहि उपचार करूं शकत नाहींत. तसे केल्याचें सरकारच्या निदर्शनास आल्यास त्याच्यावर खटले होतात व जबर शिक्षा होतात. त्यामुळें गोव्यांत आयुर्वेद अध्ययन, अध्यापन व व्यवसाय बंद आहे.

महाराष्ट्र प्रां. वैद्यांचें कर्तव्य

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळानें लातूर संमेलनांत याबाबत ठराव मांडून आंदोलन सुरू केलें पाहिजे. गोव्यांतील वैद्य या दिवसाची वाट पहात आहेत. गोव्यांत आयुर्वेदावरील बंदी उठली, हें आपल्या आयुष्यांत तरी पहावयास मिळेल काय अशी आशा तेथील वैद्यांना लागली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार

तृण ज्योतिष्मती सांपडली

' राष्ट्रपति डॉ. राजेन्द्रप्रसाद ता. २५-२६ मार्च रोजीं मंडला जिल्ह्यांतील प्रसिद्ध अभयकानन (Sanctuary) कान्हाकिसली पहावयास आले होते. कान्हाचें सुरक्षित वन रमणीयतेंत जगविख्यात आहे. नाना प्रकारच्या औषधि वनस्पति येथें मिळतात.

डॉ. राजेन्द्रप्रसादांना दाखविण्यासाठीं डिंडोरी येथील प्रसिद्ध वैद्य पं. जगत्‌महाराज यांनीं एक दिव्यौषधि आणली होती. हा एक प्रकारचा गवताचा प्रकार असून, आर्द्र केला असतां त्यांतून रात्रीच्या अंधःकारांत रेडियमप्रमाणें प्रकाश निघतो. या तृणाचें नांव ग्रंथांतरीं तृणज्योति हें आढळतें. इकडील वनवासी यांना 'बनहोमी' असें त्याचें नांव ठाऊक आहे.

तृणज्योतीचे औषधि गुण काय आहेत हें मात्र जगत्‌महाराजांना माहीत नाहीं. त्यांची इच्छा आहे कीं, या औषधीचें संशोधन व्हावें. आपल्या पहाण्यांत ही दिव्यौषधि आली असल्यास आम्हांस कळवावें.

पावसाळ्यांत भिजल्यामुळें दूरवर प्रकाश पडतो व त्याचवेळीं हिचें स्थान माहीत होतें.

संशोधन करण्याची आपली अथवा कोणा अनुभवी वैद्यांची तयारी असल्यास या तृणाचा नमुना पाठविता येईल.

वनवासी धाम मंडला, म. प्रां. | नाना बापट

(श्री. वै. ग. कृ. पाटणकर यांचे या गवता-संबंधीचे लेख मागें आयुर्वेदपत्रिकेंत प्रसिद्ध झाले आहेत.— संपादक)

३५००० रु. स्वाधीन केले

मुंबई राज्य आयुर्वेद संशोधन समितीचे अध्यक्ष डॉ. म्हसकर यांनीं आयुर्वेद महासंमेलनाध्यक्ष पं. शिवशर्मांजी यांच्या स्वाधीन चालू सालीं ३५००० रुपये अलग काढून दिले असून मुंबई येथील युनिव्हर्सल हेल्थ इन्स्टिट्यूट संस्थेच्या आयुर्वेद विभागांत पं. शिवशर्मांजी त्याचा व्यय करणार आहेत, असें कळतें.

दिल्लीच्या पार्लमेंटमधील चर्चा

दिल्ली येथील लोकसभेंत अंदाजपत्रकावर चर्चा चालू असतां उत्तर सातार्‍याचे प्रतिनिधि श्री. ग. स. आळतेकर यांनीं आयुर्वेदीय औषधोपयोगी वस्तू-वरील आयात करासंबंधीं पुढील विचार व्यक्त केले:

" ॲलोपॅथीच्या औषधी द्रव्यांना ज्या सवलती दिल्या त्या आयुर्वेदीय औषधोपयोगी वस्तूंनाही द्याव्यात अशी विनंति मी अर्थमंत्र्यांना करतो. या संबंधींची एक योजना मी पूर्वीच अर्थमंत्र्यांना सादर केली आहे. औषधीकरणाला लागणार्‍या वंश-लोचन, प्रवाळ आदि द्रव्यांवर कमी आयात कर घेतला जावा अशी सूचना आयुर्वेदीय वैद्य-मंडळीकडून आली आहे. मला असा विश्वास आहे कीं नामदार अर्थमंत्री या प्रश्नाकडे लक्ष पुरवितील व आवश्यक त्या सवलती देतील.

कांहीं झालें तरी आयुर्वेदीय औषधीकरणाला अवश्य लागणार्‍या वस्तु वैद्यांना व आयुर्वेदीय औषधी कारखान्यांना (कोयनेलप्रमाणेंच) नियंत्रित भावानें पुरविण्याची व्यवस्था सरकारनें केली पाहिजे."

अ. भा. आयुर्वेद महासंमेलन

३९ वें अखिल भारतीय आयुर्वेद संमेलन ब्यावर (अजमेर) येथें भरणार आहे. त्या संमेलनाच्या तारखा १५-१६-१७ नोव्हेंबर १९५३ या राहतील असा अन्दाज आहे.

आयुर्वेद सेवा संघ-नासिकचीं सर्व शास्त्रोक्त अनुभविक औषधें, तसेंच आयुर्वेद पत्रिकेचे अंक आमचेकडे मिळूं शकतील.

धातुवर्धक कंदर्प-वृष्य-पाक टकलावर भृंगराज तेल शक्तिवर्धक अगस्तिप्राश हीं व अशींच नवीन नवीन औषधें वापरा. विशेष माहितीकरितां एकवेळ भेट द्या.

दि सूर्यकिरण फार्मसी लि.

१७३ गिरगांवरोड, मुंबई ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दक्षिण सातारा जिल्हा वैद्य संमेलन, सांगली—

सरकारनें आयुर्वेदाला प्रोत्साहन द्यावें

स्वागताध्यक्ष वै. जोशी खानापूरकर यांचें भाषण

श्रीगजाननाच्या कृपेनें सर्व विद्यांचें माहेरघर …लेल्या पुण्यनगरी (पुणें) च्या खालोखाल श्री- …लवतीचें, वास्तव्य होऊं पहात असलेल्या या सांगली …गरीमध्यें, आपणा सर्व वैद्यबंधूंचें स्वागत करण्यास …त्या माझ्या आयुर्वेद सहकारी मंडळाच्या वतीनें …पूर्वक आनंद होत आहे. अशा या सांगली …नगरीमध्यें आयुर्वेद महाविद्यालयाची भर लौकरच …तो अशी त्या जगन्नियंत्याचें चरणीं नम्र प्रार्थना आहे.

सांगली जिल्ह्याचा लौकिक

सांगली हें आयुर्वेद चिकित्सेसंबंधीं केवळ या …पुरतेंच नव्हे तर अखिल महाराष्ट्रांत सुप्रसिद्ध …े शहर आहे. आणि असा हा लौकिक आमच्या …रे घराण्यानें पटकाविला आहे. सांवारे घराण्याचें …राणें हें ईश्वरपूरचें (इस्लामपूरचें) बोरकर घराणें …. याप्रमाणें या आमच्या दाक्षिण सातारा म्हणजेच …ली जिल्ह्यांमध्यें ईश्वरपूरचें बोरकर घराणें, सांगलीचें …रे घराणें, मिरजेचें करमरकर घराणें, तासगांवचें …कर घराणें व कडेगांवचें व्यास घराणें, यांनीं …पल्या परीनें नांवलौकिक मिळविला आहे. सांगली …हरामध्यें सांवारे घराण्याबरोबरच काष्ठौषधींचें …कर घराणेंहि सुप्रसिद्ध आहे. या घराण्यांतील …चे चालक श्री. बळवन्तरावजी वेलणकर यांनीं …ची संघटना करण्याचा प्रथम प्रयत्न केला.

१९२८ सालीं धर्मार्थ दवाखाना

याच सभागृहाच्यां शेजारच्या खोलीमध्यें इ. स. १९२८ च्या एप्रिलमध्यें सांगली नगरपालिकेचा …ें आयुर्वेदिक दवाखाना, श्रीमंत सांगली सरकार …मनराव आप्पासाहेब यांचे हस्तें उघडला गेला. …र्मसंयोगानें वैद्य या नात्यानें तेथें प्रारंभीं काम …ण्याची संधि मला मिळाली. इ. स. १९२८ चे संक्रातीस सर्व वैद्य व आयुर्वेदास सहानुभूति असलेले कांहीं सद्गृहस्थ यांना जमवून आम्ही या आयुर्वेद सहकारी मंडळाची स्थापना केली. सहकारी मंडळ असें नांव ठेवण्याचें कारण एवढेंच कीं वैद्यांव्यतिरिक्त आयुर्वेदास सहानुभूति असलेल्या मंडळींनाहि त्यांत भाग घेता यावा.

आयुर्वेदाचें रुग्णालय हवें

सांगली नगरपालिकेचा दवाखाना प्रथम पासूनच चांगला चालू असून आज तर तो उत्तम चालला असल्याचें आपले नियोजित अध्यक्ष व सन्माननीय मंत्री यांनीं प्रत्यक्ष पाहिलें आहे. या धर्मार्थ दवाखान्याचें रूपांतर रुग्णालयांत व्हावें अशी वैयक्तिक माझी व आमच्या आयुर्वेद सहकारी मंडळाची तीव्र इच्छा आहे.

विद्युत् उपचार शाखा

त्याचप्रमाणें सांगली नगरपालिकेनें विद्युत्उपचार शाखा सुरू केली असून त्यावर माझे मित्र व आजचे सेक्रेटरी श्री. वै. पांडितराव कुळकर्णी हे विनावेतन व अतिशय उत्साहानें काम करीत आहेत.

आज सांगली शहरापुरतें काम करीत असलेल्या या आयुर्वेद सहकारी मंडळाचें रूपांतर सांगली जिल्हा आयुर्वेद सहकारी मंडळामध्यें होत आहे ही अत्यंत आनंदाची गोष्ट होय.

दुसऱ्याचें गोजिरवाणें मूल

आयुर्वेदास चोहोंकडून अनुकूल असे दिवस येत आहेत व त्या दृष्टीनें हालचाली होत असल्याचें दिसून येत आहे. आज भारतास आयुर्वेदाइतकें लोकांचें आरोग्य टिकविण्यासाठीं व रोग-निवारण करण्यासाठीं उपयुक्त शास्त्र मिळणार नाहीं. ॲलोपॅथीसारखी दुसरी विलायती महागडी शास्त्रें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व पद्धति कितीहि आकर्षक व उठून दिसणारी दिसली तरी ती दुसऱ्याचें गोजिरवाणें दिसणाऱ्या मुलाइतपत योग्यतेचीं होत. आपलें स्वतःचें मूल कितीहि शेमडेमेकडें आणि अस्वच्छ दिसत असलें तरी ते स्वतःचें आहे ही कल्पना सोडून चालणार नाहीं. स्वतःचें आमचें शेमडेमेकडें मूलच कुळाचा उद्धार करील हें त्रिकालाबाधित सत्य आहे. स्वतःचें मूल असें अस्वच्छ झाल्याचें कारण म्हणजे आपणच आहोंत. आपण त्याला स्वच्छ व नीटनेटकें करून त्याचें योग्य रीतीनें लालनपालन केलें तर तेंहि मूल कांहीं दिवसांत सुंदर व गुटगुटीत होईल व त्याच्यावर सर्व लोक प्रेम करूं लागतील, हें खास.

सरकारचें विपरीत व विचित्र प्रयत्न

आज आपल्या भारत सरकारची आयुर्वेदास नीटनेटकें करण्याची इच्छा असल्याचें व तशा रीतीनें तें प्रयत्न करीत असल्याचें दिसून येत आहे. परंतु ते प्रयत्न इतके विपरीत व विचित्र आहेत कीं, ज्यांस आयुर्वेदाचें मुळांत ज्ञान नाहीं अशा लोकांचे हातीं आयुर्वेदसंशोधनाची सर्व सत्ता देऊन टाकीत आहे. त्यामुळें आयुर्वेदीय शास्त्र बाजूलाच राहातें व कांहीं-तरीच घडतें. ज्यांचे हातीं सरकार अशी सत्ता देत आहे ते स्पष्टपणें कबुली देतात कीं "माझें हातून कांहीं झालें नाहीं, होऊं शकत नाहीं." तेव्हां सरकारनें आयुर्वेद तज्ञांची एक कमेटी नेमून आयुर्वेदाचें संशोधन म्हणजे काय व तें कसें करावयास पाहिजे याची मूळ रूपरेषा आंखून घ्यावी. त्यावर डॉक्टर नेमावयाचा झाल्यास तो सर्व सत्ताधारी असूं नये.

डॉक्टर म्हणील ती पूर्व

आतांपर्यंत आयुर्वेदासंबंधीं ज्या ज्या कमिट्या नेमल्या गेल्या, त्यामध्यें आयुर्वेद जाणणारे असे वैद्य नांवालाच असत व डॉक्टर म्हणील ती पूर्व दिशा अशीच एकंदर परिस्थिति होत गेली आहे. तेव्हां ही प्रथा सोडून वैद्यमंडळीवरच विश्वास ठेवून आयुर्वेद-संशोधनाची जबाबदारी टाकावी व रूपरेषा आंखून घ्यावी; व या रूपरेषेपैकीं जेवढे बजेट असेल त्यास अनुसरून व तेवढाच भाग संशोधनाच्या दृष्टीनें हातीं घ्यावा. हल्लींचें चाललेलें काम व खर्च होणारा पैसा अगदीं व्यर्थ आहे.

जिल्हा रुग्णालयांत आयुर्वेदीय विभाग

जिल्हानिहाय जेथें जेथें सरकारी खर्चानें चालणारीं मोठमोठीं रुग्णालयें आहेत त्यामध्यें एक एक अधिकारी वैद्य नेमून आयुर्वेदिक पद्धतीनें निदान चिकित्सा करण्याचे दृष्टीनें कांहीं कॉट्स् त्या वैद्याचे हातीं द्याव्या. आयुर्वेदिक दवाखान्यांचें रुग्णालयांत रूपांतर करावें. तसेंच लोकलबोर्डाकडून चाललेले आयुर्वेदिक दवाखाने आयुर्वेदिक औषधांवरच सर्वस्वी चालले जावेत अशी सक्ति करावी; व ते तसे चालले जात आहेत यावर सक्त नजर ठेवावी.

आयुर्वेदीय औषधांचें संशोधन

या सगळ्यापेक्षां आयुर्वेदिक औषधांचें संशोधन व त्यांचे सरकारी दवाखान्यांतून दिसून येणारे प्रमाण जनतेच्या नजरेस येणें व आणून देणें अत्यन्त महत्वाचें आहे.

मध्यम प्रतीचा कोर्स हवा

आयुर्वेदाचें शिक्षण अत्यंत महागडें न होतां पूर्वी एम्. बी. बी. एस्. व एल्. सी. पी. एस्. अशा उच्च व मध्यम पद्धतींचें शिक्षण जसें ठेवलें होतें त्याप्रमाणेंच आयुर्वेद शिक्षणाचें बाबतींतहि थोडा भेद ठेवून साध्या मॅट्रिकच्या माणसास शेपेक्ष असा मध्यम प्रतीचा कोर्स मुद्दाम ठेवावा. असा कोर्स न ठेवल्यास वैद्यांची संख्या कमी होईल व राष्ट्राची गरज संपूर्णतया भागणार नाहीं. करितां थोडक्या खर्चांत आयुर्वेद शिक्षण घेतां येईल अशी पूरक व्यवस्था सरकारनें अवश्य करावी.

बक्षिसें व बढती द्यावी

आयुर्वेदिक औषधांचें संशोधन होऊन, प्रभावी औषधाचे कल्प बनवून शास्त्रशुद्ध रीतीनें आयुर्वेदिक औषधें वापरून ती किती प्रभावी ठरतात हें विद्यार्थ्यांचे नजरेस आल्यास त्यांचें लक्ष्य अॅलोपॅथीकडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...विभागी वळणार नाहीं. आयुर्वेदिक औषधांचे ...प्रकाश उत्तेजन मिळण्याचें दृष्टीनें बक्षिसाचें ...नें, नोकर असल्यास बढतीच्या रूपानें, तसेंच ...द्वारा अत्यन्त महत्वाचा रुग्णालयांतील रुग्ण ...त आयुर्वेदिक पद्धतीनें बरा करून दाखविल्यास ...ला प्रत्यक्ष बक्षिस व बढती देऊन त्याचा गौरव ...वा व अशा नाना तऱ्हेनें उत्तेजनार्ह गोष्टी अव-...ल्या. एवंच आयुर्वेदाचे दृष्टीनें सरकारनें द्रुत ...नें पावलें टाकावींत.

सहकारी तत्वावर वैद्यकीय मदत

आयुर्वेद सहकारी मंडळापुढें तसेंच लोकल-...पुढें एक "सहकारी तत्वावर वैद्यकीय मदत" ...नांवाची योजना मी ठेविली आहे. ती योजना ...पंचायती, म्युनिसिपालिट्या व सरकार यांनीं ...त घ्यानीं घ्यावी व त्यांत येणाऱ्या व येऊं ...ऱ्या अडचणींचा विचार करून थोड्याशा ...रानें अमलांत आणावी. ती योजना अमलांत ...ण्याचा प्रयत्न झाल्यास सरकारला ठिकाठिकाणीं ...लाने उघडण्याचा खर्च न येतां लोक स्वावलं-...नें आपापली सोय आपण स्वतःच करण्यास ...तील.

वनस्पतींचा शास्त्रशुद्ध अभ्यास

तसेंच आयुर्वेदाचा मनःपूर्वक व सखोल अभ्यास ...न आपल्या प्रदेशांत उत्पन्न होणाऱ्या परन्तु ...र्वा निर्माल्यवत् ठरणाऱ्या वनस्पतींचा विचार ...क व शास्त्रशुद्ध अभ्यास करून वरील सारख्या ...नामध्यें त्यांचा प्रत्यक्षांत उपयोग करावा व ...युर्वेदिक औषधाचे संशोधनास हातभार लावावा.

आयुर्वेदानें विश्वाचा लाभ होईल

"डॉक्टरांचा मुख्य धर्म रोगी लोकांना आराम ...णें एवढाच नाहीं; उलट लोकांना आजारी पडूं न ...णें हा आहे. डॉक्टरींचा व्यवसाय पैसे कमाविण्याचा ...ही. तो सेवेचा असला पाहिजे.

आपल्या देशांत चिकित्सेच्या अन्यपद्धतिपण ...लब्ध आहेत. पुष्कळ लोक बोलून जातात कीं या चिकित्सापद्धति शास्त्रीय पायावर अधिष्ठित नाहींत. परंतु मला माहीत आहे कीं या अन्य चिकित्सा-पद्धतीमुळें जनतेला अधिक लाभ मिळाला आहे.

डॉक्टरांनीं दुसऱ्या चिकित्सापद्धतींचा सुद्धां अभ्यास केला पाहिजे. कोणत्याहि गोष्टींची माहिती न घेतां ती टाळणें अगर तिचा तिरस्कार करणें हें वैज्ञानिक नाहीं. आमच्या प्राचीन चिकित्सा पद्धतीनें उपचारांचे छोटे छोटे सोपे चुटके सांगितले आहेत. छोट्या छोट्या सालीमुळयांनीं आमचा पुष्कळसा कार्यभाग होऊन जातो. आम्ही या गोष्टीचा तिरस्कार करता कामा नये.

जर शोधक बुद्धीनें आम्हीं याचा उपयोग करू तर यामुळें केवळ आमच्या देशाचाच नव्हे तर सर्व विश्वाचा फायदा होणार आहे. सध्यां आम्हांस डॉक्टर कमी पडत आहेत. रोग नसते तर व लोकांचें स्वास्थ्य चांगलें असतें तर हा प्रश्न पडला नसता."

हे उद्गार राष्ट्रपति राजेंद्रप्रसाद यांनीं नागपूर येथील मेडिकल कॉलेजच्या नवीन बांधलेल्या विशाल भवनाचें उद्घाटन करतांना काढले.

आयुर्वेद सेवा संघाचें ४ थें पुष्प

अनुभविक औषधें

(सिद्धयोगसंग्रह)

लेखकः-वैद्यवाचस्पति यादवजी त्रिकमजी

आयुर्वेद सेवा संघानें हा चिकित्सा व औषधीकरणविषयक ग्रंथ प्रसिद्ध केल्याबद्दल स्वतः औषधें तयार करून वापरणाऱ्या वैद्यांनीं सेवा संघाला धन्यवाद दिले आहेत.

फोंडा (गोवा) येथील वैद्य घोपेश्वरकर कळवितात-"अनुभविक औषधें आम्हीं स्वतः तयार करून वापरलीं. त्यामुळें अपेक्षेप्रमाणें चिकित्सेंत यशप्राप्ति झाली."

किंमत ४ रुपये, टपाल खर्च १० आणे

वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राणिरक्षक संस्था औषधालय, धुळें

सन १९०६ सालीं कै. शेट नथूभाई शिवजी यांच्या प्रयत्नानें स्थापन झालेल्या या संस्थेस आज ४७ वर्षें पूर्ण होत आहेत. संस्थेचें धर्मार्थ औषधालय सन १९१४ सालीं एका लहानशा भाड्याचें खोलींत स्थापन झालें. त्यावेळीं श्री. वैद्यराज वासुदेवशास्त्री निम्बरकर हे आरंभापासून १९२८ सालपर्यंत औषधालयाचें काम पहात होते. त्यांच्या वृद्धापकाळामुळें १९२९ सालीं श्री. मानेकर वैद्य यांची नेमणूक करण्यांत आली.

रुग्णसंख्या हळुहळूं वाढत होती. व भाड्याची जागा पुरेनाशी झाली. म्हणून संस्थेच्या कार्यकारी मंडळानें संस्थेची स्वतःची इमारत बांधली.

संस्थेचा सर्व सेवकवर्ग सेवाभावी असल्यामुळें संस्थेचे औषधालयांत ३०० ते ४०० पर्यंत रोजची रुग्णसंख्या वाढून वार्षिक रोग्यांची एकूण हजेरी एक लाखपर्यंत गेली आहे.

संस्थेचा खर्च वाढत आहे व जमाखर्चाची तोंड मिळवणी होईना म्हणून, दिनांक १ ऑगस्ट १९४८ पासून दर आठवड्यास चार आणे प्रवेश मूल्य ठेवण्यांत आलें. संवत् २००३ मध्यें श्री. अंबाशंकर भाई यांनीं विजेच्या किरणाचा दिवा (Ultra Violet) घेण्याकरितां १००१ ची देणगी दिली. त्यामुळें संस्थेचें सेवाकार्याचें नवीन दालन उघडण्यांत आलें. औषधालयाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे. संस्थेचे औषधालयांत लागणारीं औषधें तयार करण्याकरितां एक रसशाला आहे. त्या रसशालेंत साधारणतः १५० प्रकारचीं औषधें तयार केलीं जातात.

संस्थेचे औषधालयांत तयार झालेल्या महामारीवरील गोळ्या फारच उपयुक्त व परिणामकारक आहेत व त्याबद्दल शेंकडों प्रशंसापत्रें आलेलीं आहेत.

संस्थेचे वैद्य श्री. मानेकर यांना आधुनिक अद्यावत् ज्ञानाची माहिती व्हावी म्हणून, पुणें येथें ता. रा. हॉस्पिटलमध्यें २ वेळ २।२ महिने व मुंबई येथें के. ई. एम. हॉस्पिटल, जे. जे. हॉस्पिटल व नायर हॉस्पिटलमध्यें डॉ. पुरंदरे यांनीं काढलेल्या रिफ्रेशर कोर्सकरितां पाठविलें होतें. संस्थेची आर्थिक परिस्थिति पाहून, त्या धोरणानें संस्थेचे कार्याचा हळूं हळूं विकास होत आहे.

देणग्यावर चालणारीं संस्था

संस्थेचा खर्च धनिक लोकांनीं दिलेल्या लहान मोठ्या देणग्यावर चालवावा लागतो; व दिवसेंदिवस औषधी द्रव्यांच्या किंमती फारच महाग झाल्यामुळें दरसाल तूट येते; हल्लीं २ वर्षांपासून संक्रांतीनिमित्त गांवातील समस्त व्यापारीमंडळ, संस्थेच्या तुटीस हातभार लावावा म्हणून वर्गणीरूपानें देणगीदाखल रकम देतात. संस्थेचा जमाखर्च दरसाल सरकारमान्य ऑडीटरसाहेब यांचेकडून तपासला जातो.

आयुर्वेद सेवा संघ प्रकाशन

रोगविज्ञान भाग १ व २

लेखकः-डॉ. वि. म. भट

बी. ए., एम्. बी. बी. एस्.

मराठी भाषेंत आधुनिक पद्धतीच्या निदान-चिकित्सेची अद्ययावत् माहिती मिळण्याची सोय डॉ. भट यांच्या रोगविज्ञान या ८०० पृष्ठांच्या विस्तृत ग्रंथामुळें झाली आहे. पाश्चात्य रोगविज्ञान या नांवाचा ग्रंथ पूर्वी याच लेखकांनीं लिहून प्रसिद्ध केला होता. तो मराठी वैद्यांना फार उपयुक्त म्हणून पसंत पडला होता. या निदानाबरोबरच पाश्चात्य, आयुर्वेदीय व होमिओपॅथिक उपाय पण सुचविले आहेत हे या ग्रंथाचें वैशिष्ट्य आहे. आपली प्रत मागवून घ्या.

फक्त थोड्याच प्रति शिल्लक आहेत. पुनः लौकर छापले जाण्याची शक्यता नाहीं.

किंमत १२ रु., ट. ख. १। रु.

वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदाला चांगले दिवस यावेत, असें मला वाटतें !

सांगली येथें भरलेल्या द. सातारा जिल्हा वैद्य संमेलनाचे उद्‌घाटक नामदार डॉ. त्रिं. रा. नरवणे, यांचें भाषण

संमेलनाचे अध्यक्ष, सन्मान्य वैद्य व नागरिक बंधुहो

आपण मला या द. सातारा जिल्हा वैद्य संमेलनाचे उद्‌घाटक म्हणून निमंत्रण दिलेत याबद्दल मी आपले आभार मानतो. पण आपण मला कां बोलावलें हें मला कळत नाहीं. मी विद्वान् पदिक वैद्य नाहीं. मी आयुर्वेदाचा चाहता आहे. आयुर्वेदाचें पुनरुज्जीवन व्हावें, आयुर्वेद हें राष्ट्रीय वैद्यक व्हावें असें मी इच्छितो. मी आयुर्विद्याविशारद असलो तरी आयुर्वेदाचा माझा अभ्यास फार थोडा आहे. कारण मी नॅशनल मेडिकल कॉलेजमध्यें होतो. आयुर्वेदाला चांगले दिवस यावेत, त्या शास्त्राला योग्य स्थान मिळावें असें मला वाटतें. १९४६-४७ सालापासून मुंबईमध्यें एका प्रमुख आयुर्वेदीय संस्थेशीं माझा संबंध आला आहे. येथें ६-७ एकर जागा मिळवून २५ लाख रुपये खर्चून एक विद्यालय व रुग्णालय सुरूं करावें असे प्रयत्न चालू आहेत. आज मी आयुर्वेदासंबंधीं माझे विचार मोकळेपणानें मांडूं इच्छितो.

वैद्यसम्मेलनांतील भाषणें-संभाषणें

आज आयुर्वेद शिकून धंदा करणाऱ्या वैद्यामध्यें दोन भाग पडतात; एक जुन्या पद्धतीनें आयुर्वेद शिकलेले, व दुसरे ॲलोपॅथीयुक्त आयुर्वेदाचें शिक्षण घेतलेले. पण अलिकडील सम्मेलन-संभाषणांतील अध्यक्षांचीं व वक्त्यांचीं भाषणें वाचलीं, व कांहीं कांहीं डॉक्टरांचीं भाषणें वाचलीं तर मनाचा गोंधळ उडून जातो. आयुर्वेदीयांना आयुर्वेदासंबंधीं प्रत्यक्ष काय पाहिजे तें मला नीट समजत नाहीं. "आयुर्वेदीय शिक्षण हें केवळ आयुर्वेदीय शिक्षण असावें, संमिश्र शिक्षण नको. संमिश्र शिक्षण आयुर्वेदास मारक ठरणार आहे. आयुर्वेदाचें बाबतींत डॉक्टरांना सर्वाधिकारी नेमणें घातक आहे. सरकारनें आयुर्वेदाचाच पुरस्कार करावा. " सोऽयं आयुर्वेदः शाश्वतः " वगैरे म्हणजे आयुर्वेद शास्त्र हें नित्य, सनातन, पूर्ण शास्त्र आहे, त्यांत इतर पॅथींची भेसळ नको " असें वारंवार आयुर्वेदाभिमानी व्यक्तींकडून बोललें जातें. पण मला पूर्ण विचारांतीं आपल्यास असें सांगावेसें वाटतें कीं आयुर्वेद हें एक जीवनाचें शास्त्र आहे. आणि त्याबद्दलचा आपला अभिमान अगदीं योग्य आहे.

शास्त्राची प्रगति कशी होते ?

पण कोणतेंहि शास्त्र पूर्ण असत नाहीं. त्यांत कालमानाप्रमाणें बदल होणें शक्य आहे. आतां आयुर्वेद हें जीवनाचें शास्त्र आहे असें म्हटलें कीं जीवन कसें अधिकाधिक निरोगी व संमृद्ध होईल या दृष्टीनें सर्वांनीं प्रथमतः सतत, आणि योग्य प्रयत्न करणें जरूर आहे. शास्त्राची प्रगति, संघर्ष अगर झगड्यामधून च होत असते. तेव्हां आयुर्वेदशास्त्राचे बाबतींतहि हा नियम लागूं आहे. आज हिंदुस्तानाबाहेर सर्वत्र ॲलो-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पॅथी पद्धतिच चालू आहे. येथेंहि आयुर्वेदीय पद्धतीबरोबर, ती व्यवहारांत आहे. येथेंहि आयुर्वेदाभिमानी यानीं या ॲलोपॅथिक पद्धतीबरोबर सामना देऊन आपलें शास्त्र टिकविणें जरूर आहे. आपलें शास्त्र वाढवून आपलें सामर्थ्य वाढवूनच हा सामना दिला पाहिजे. ॲलोपॅथीबरोबरचा हा संघर्ष आपणांस टाळतां येणार नाहीं. आपण खंबीर बनून सर्व सामर्थ्यानिशीं ॲलोपॅथीशीं टक्कर दिली पाहिजे. आपली शक्ति वाढविणें हा सामना देण्याचा उपाय आहे.

आयुर्वेद हा एक प्रवाह आहे

आपलें आयुर्वेदशास्त्र हें सांठलेलें पाणी नव्हे, तो एक प्रवाह आहे. तेव्हां आयुर्वेदशास्त्राचा प्रवाह सतत चालू राहिला पाहिजे. त्यांत नवनवीन भर पडली पाहिजे व ती तशी पडतच आली आहे. भारतांत पूर्वकालीन ऋषी फक्त वनस्पतींचाच वापर चिकित्सेसाठीं करीत. पण नंतर चिकित्सेसाठीं धातु, उपधातु व त्यांचीं भस्में, प्राणिज पदार्थ यांचा उपयोग संशोधनपूर्वक करण्यांत आला. औषधीकल्पांत कषाय, गोळ्या, मात्रा, खल्वी रसायनें व कुपिस्थ रसायनें अशी सुधारणा होत आली आहे. तेव्हां आयुर्वेद शास्त्र हें विचाराच्या पायावर आधारलेलें शास्त्र असून तें प्रगतिपरहि आहे हें सिद्ध होतें.

नवे विचार आत्मसात् करा

आपण दुसऱ्यांना नांवें ठेवण्यापूर्वी आपली आजची स्थिति काय आहे याचा विचार केला पाहिजे. तसेंच सध्यांचे नवनवीन विचार व शोध आत्मसात् करण्याच्या दृष्टीनें त्याचें परिशीलन अर्थात् त्याचा अभ्यास केला पाहिजे. तद्दत आपल्या शास्त्रांतील ही एकेक गोष्ट होऊन, ती नीट अभ्यासून, आजच्या जगाला पटेल अशा तऱ्हेनें समजून सांगण्याचा, मांडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नवीन विचार व कल्पना योपवून धरून चालणार नाहीं, उलट त्यांना मोकळीक ठेवून त्यांतून आपण प्रगतिपथावर जाण्यासाठीं, आपलें उद्दिष्ट साधण्यासाठीं सतत झटलें पाहिजे.

आयुर्वेद मानवावर उपचार करतो

इतर पॅथीज् रोगांवर उपचार करतात, पण देशी वैद्यक मानवांवर उपचार करतें. जन्तु सर्व ठिकाणीं आहेत, पण ते सर्वांना सारखे उपद्रवकारक ठरत नाहींत. माणसांच्या प्रकृतीवर, त्रिदोषांच्या साम्य-वैषम्यांवर–जंतूंचा शरीरावर परिणाम होणें न होणें बव्हंशीं अवलंबून आहे असें आयुर्वेद शास्त्र मानतें. पण त्रिदोष अगर त्रिधातु ही काय चीज आहे ? याचें स्वरूप काय ? याचें स्पष्टीकरण अद्याप कोणीहि वैद्य नीटपणें करूं शकत नाहीं, असें आज तरी दिसून येतें. पूर्वी गुरुपरंपरेनें तें स्पष्टीकरण शक्य होत असेल, पण सध्यांच्या युगांत तें समजून सांगतां आलें पाहिजे.

आयुर्वेद हें राष्ट्रीय वैद्यक होणार असेल तर ते फक्त हिंदुस्तानांत शक्य आहे. आणि म्हणून आयुर्वेद शास्त्र हें हिंदुस्तानचें राष्ट्रीय वैद्यक बनवावयाचें असेल तर तसे प्रयत्न होणें जरूर आहे.

आयुर्वेद ही स्वतंत्र पॅथी आहे

औषधोपचार या दृष्टीनें पाहिलें तर मूलतत्त्वें सारखीच आहेत, पण पॅथी–शास्त्र पद्धतीच्या दृष्टीनें पाहिले तर आयुर्वेद सुद्धां एक स्वतंत्र पॅथीच आहे.

आपलें कायचिकित्साशास्त्र पुढारलेलें असलें तरी शस्त्रकर्मापुरतें तरी आजच्या परिस्थितींत आपण ॲलोपॅथीची कास धरणें अवश्य आहे. सर्वरीत्या अभ्यास करावयाचा तर शरीररचनेचा (ॲनॉटमीचा) अभ्यास करणें जरूरच आहे. गंगेच्या पाण्यास यमुनेचें पाणी मिळतें, पण तें गंगामयच बनून जातें. तद्दत नवीन गोष्टी, कीं ज्या आपल्यांत नाहींत या घेण्यास भिण्याचें कारण नाहीं. त्या गोष्टी आपलें तत्त्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होडतां आत्मघात् करण्याची पराकाष्ठा केली म्हणजे झालें. आपल्या शास्त्रांतीलहि एकेक गोष्ट घेऊन त्यांवर बुद्धिसर्वस्व व लक्ष केंद्रित करून आपल्या शास्त्रपध्दतीप्रमाणेंच तशा तऱ्हेनें मांडल्या पाहिजेत. चालू परिस्थितीला जुळेल अशीच दिनचर्या व ऋतुचर्या सांगितली गेली पाहिजे.

आजची वस्तुस्थिति अशी आहे

आपण ही जबाबदारी घेऊं शकतो कां ? तसा आत्मविश्वास आपल्यामध्यें आज आहे कां ? वैद्याचे स्वतःचा मुलगा आजारी पडला तर तो वैद्य डॉक्टरकडेच धांव घेतो. वैद्य आपल्या दोन मुलांपैकीं हुषार मुलास एम. बी. बी. एस्. कडे पाठवितो व मध्यम बुध्दीच्या मुलास वैद्यकीकडे धाडतो, असें आपणांस दिसून येतें, हें कशाचें द्योतक आहे ? आयुर्वेदावर आमचा स्वतःचाहि पूर्ण विश्वास नाहीं. मग आयुर्वेद हें सर्वपूर्ण शास्त्र आहे, असें नुसतें म्हणण्यांत कोणता लाभ आहे ! जोपर्यंत ही परिस्थिति आहे तोपर्यंत आपण कांहींहि करूं शकणार नाहीं. आपल्यांत जें नाहीं तें जिज्ञासू वृत्तीनें घेऊन, आयुर्वेदशास्त्राला प्रगतिपथावर नेण्याचा प्रयत्न करावा.

विचार करून मार्ग आखा

ह्या जीवनाच्या झगड्यांत आपण मागें पडत आहोंत असें आपणांस वाटत असेल तर आपण त्याचा सखोल अभ्यास करणें जरूर आहे. तेव्हां आपण विचार करून मार्ग आंखावा. आपण जिल्हा सम्मेलन भरविलेलें आहे. आपण आपलें आयुर्वेदशास्त्र जगन्मान्य कसें होईल असा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या संस्था बलवान् करा. तसेंच आपलें शास्त्र सोज्वल व प्रभावी होईल असे प्रयत्न करा. आपलें सम्मेलन यशस्वी होवो. आपली प्रगति झपाट्यानें व्हावी अशी इच्छा प्रदर्शित करून मी माझें भाषण संपवितों.

भारताची मुख्य चिकित्सा पद्धति
आयुर्वेद हीच आहे

"आयुर्वेद हीच भारताची मुख्य चिकित्सा–पद्धति आहे. ॲलोपॅथीप्रमाणें याला सरकारी आश्रय व पुरस्कार अद्याप मिळालेला नाहीं. पण आतां आम्हांस खेडेगांवांत चिकित्सेची सोय करण्यां–साठीं आयुर्वेदाच्या विकासाकडे लक्ष पुरविलें पाहिजे. शहरी लोक व संपन्न व्यक्ति कोणत्याहि प्रकारें चिकि-त्सेच्या सोयी प्राप्त करून घेऊ शकतात, परंतु ग्रामीण लोकांना आयुर्वेद हा एकच सहारा आहे.

अंदाजपत्रकांत वाढ

आयुर्वेदाची उपयुक्तता ध्यानांत घेऊनच राजस्थान सरकारचें या वर्षाच्या आंदाजपत्रकांत १ लाख रुपयाची वाढ मंजूर केली आहे. यामुळें राजस्थानांतील आयुर्वेदविकास योजनांना मूर्तस्वरूप प्राप्त होईल अशी आशा आहे. अशावेळीं वैद्य–समुदायाचें हें कर्तव्य आहे कीं सेवेची भावना समोर ठेवूनच शास्त्राचा प्रचार व प्रसार यामध्यें ते अनुरक्त राहतील."

वरील विचार राजस्थान राज्याचे प्रधानमंत्री श्री. जयनारायणजी व्यास यांनीं मारवाडी आयुर्वेद प्रचारिणी सभेंत व्यक्त केले.

प्राणिज द्रव्यांच्या नाविन्यपूर्ण चिकित्सेनें आरोग्य मिळवून नवचैतन्य प्राप्त करा. फक्त ७ ते १४ दिवस घेतल्यानंतर चमत्कार पहा. ह्याच त्या गोळ्या "मिश्रा शक्तिसागर"
१४ गो. २ रु., ४२ गो. ६. ४ ट. ख. वेगळा
याबरोबरच "रजि. युनानी तिला" वापर. त्यास सोन्यांत सुगंध समजा. ल्हान बा. २॥ रु. मोठी बा. ४ रु., ट. ख. अलग.
मिश्रा महाराष्ट्र फार्मसी (रजि.)
ब्रह्मपुरी (चांदा) म. प्र.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार

अमूल्य औद्भिद संपत्ति

राजगड किल्ल्याचे परिसरांत अमूल्य औद्भिद संपत्ति वाया जात आहे हें पाहून श्री. अप्पासाहेब (शं. रा.) भागवत, भूतपूर्व संचालक सर्वोदय केंद्र, यांस हळहळ वाटत असल्यानें ते मजपाशीं बोलले. या वन्य संपत्तीचा आपणांस किंवा अन्य कोणास कांहीं उपयोग करून घेतां येईल कां? तेथील कार्यकर्ते एतदर्थ शक्य ते करण्यास सिद्ध आहेत. गुळवेल, बिब्बा, बहावा, अडुळसा, उपळसरी, शतावरी, हरडा, बेहडा, आवळा, एरंड, भारंग, गेळ इत्यादि औषधी वनस्पति या डोंगरावर होतात. बिब्बा तेल, गुळवेलसत्व अशासारखे कांहीं ते तयारहि करून देण्याची सिद्धता दर्शवितात. वैद्याचे देखरेखीनें इतरहि कांहीं औषधें सिद्ध होऊ शकतील. तरी आपणास कांहीं आवश्यकता असेल कां? वाया संपत्तीचा सदुपयोग होईल अशी अन्य योजना कांहीं सुचते कां?

बाहावा पुष्प गुलकंद

बाहवा पुष्प सारक असल्याचें अप्पासाहेबांचे अनुभवास आलें आहे. त्याचा गुलकंद करावा असें ते म्हणतात. कांहीं क्षारहि तयार करतां येतील.

—वा. न. पराडकर

———

सल्फा ड्रग्ज व अँटि बायोटिक्स

उत्तरप्रदेश वैद्यक विभागानें आयुर्वेदीय पदवीधरावर सल्फाड्रग्ज व ॲन्टी बायोटिक्स वापरण्याला बन्दी घातली आहे. त्याविरुद्ध विद्यार्थ्यांनीं आंदोलन सुरू केलें आहे. आयुर्वेद महाविद्यालयांतून दोन्हीं वैद्यकांचें शिक्षण दिलें जात असतां अशीं बंधनें लादणें युक्त नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे.

महाराष्ट्रीय वैद्यांना निवेदन

स्वर्गीय श्री. शंकर दाजीशास्त्री पदेजींनी ५० वर्षांपूर्वी त्रिदोषपद्धतीसंबंधीं एक कमिशन नेमलें होतें व त्या कामिशनच्या रिपोर्टातील विषय त्रिदोषविचार व त्रिदोषपध्दति या नांवाने ३।४ भागांत प्रकाशित केला होता. तोच विषय हिंदी टीकेसहित प्रकाशित करण्याचा माझा विचार आहे.

पुस्तकाची प्रत पाहिजे

इन्दूर संमेलनांतून परत येतांना माझी प्रवासी पेटी चोरीला गेली. त्यांत त्या पुस्तकाची मजजवळची प्रत गेली. जर महाराष्ट्रांत कोणा वैद्याजवळ त्या पुस्तकाची प्रत असेल तर त्यांनीं ती मजकडे पाठविण्याची कृपा करावी. तें पुस्तक छापून होताच त्यांची मूळप्रत व त्यावरून छापलेली हिन्दी अनुवादसहित प्रत धन्यवादपूर्वक पाठविली जाईल.

३ संमेलन मार्ग प्रयाग	आपला वैद्य जगन्नाथप्रसाद शुक्ल

———

विंचुदंशावर घेटुळी-मूळ

घेटुळीची मुळी आणून ती पाण्यांत उगाळून चावल्या जागीं लावली असतां ५–६ मिनिटांत वेदना रहातात. त्याच घेटुळीच्या मुळींचे लहान तुकडे करून पानाच्या विड्यांतून खाण्यास देतात.

—के. टी. लांगोरे

"फक्त वैद्यासाठीं" इंजेक्शन ट्रेनिंग क्लास मे महिन्याचें सेशनसाठीं प्रवेश देणें सुरू आहे. विशेष माहितीसाठीं २ आणे पोस्टेज पाठवा.
डॉ. जिल्लेदार C.T.S. यवतमाळ (मध्यप्रदेश)

गुळवेल सत्व व वांकेरी भाते ५ रु. रत्तल, उत्तम मध, दशमुळें व इतर २०० फौंडाघाटच्या वनस्पती व त्याचीं चूर्णें मागणीप्रमाणें पुरवि
परुळेकर ब्रदर्स, मोंगल लेन, मुंबई १६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म. प्रां. वैद्य मंडळाचें प्रचारकार्य —

दक्षिणमहाराष्ट्र-गोवा-कारवारचा दौरा

कोल्हापूर येथील कार्यक्रम

सांगली येथील जिल्हा सम्मेलन ता. २९ रोजीं रात्रीं आटोपल्यानंतर ता. ३० रोजीं पहाटे म. प्रां. वैद्य मंडळाचे अध्यक्ष वैद्य बिंदुमाधव पण्डित हे जयसिंगपूरमार्गें कोल्हापुरास वै. गुणे यांच्याकडे गेले. प्रवासांत बरोबर कागलचे वैद्य नाटेलीकर होते. कोल्हापुरांत सकाळीं वैद्य ताम्हणकर, वैद्य दुधगांवकर वैद्य धर्माधिकारी आदि मंडळींच्या भेटी घेतल्या. व आयुर्वेदाश्रम फार्मसीचा कोल्हापूर येथें नवीन उघडलेला डेपो आणि अंबा मेडिकल अँड जनरल स्टोअर्स यांना भेटी दिल्या. भोजनानंतर गुरुवार पेठेतील वृद्धवैद्य नारायण जयराम पाध्ये यांची भेट घेतली व दौऱ्याचा उद्देश सांगितला. सायंकाळीं वैद्यराज यशवंतराव गुणे यांच्या दवाखान्यांत सभा झाली. अध्यक्षस्थानीं वैद्यराज स. ब. दुधगांवकर होते. नव्या आरोग्यमंत्र्यांचा विचार व त्या दृष्टीनें त्यांनीं उचललेलीं पाऊलें यांची माहिती वैद्य बिंदुमाधव यांनीं दिली. व कोल्हापूर हें पूर्वीचें प्राचीन विद्याचें शिक्षण-केंद्र आहे. आयुर्वेदाच्या दृष्टीनें पुनः तें स्थान प्राप्त करून घेण्याची संधि वैद्यमंडळींनीं घेतली पाहिजे, अशी सूचना व्याख्यानाचे शेवटीं त्यांनीं दिली. "कोल्हापुरास कोकणांतील ताज्या वनस्पति नेहेमीं विक्रीसाठीं येतात. वैद्यांना वनस्पतींचा पुरवठा करण्याच्या दृष्टीनें सरकार व्यवस्था करणार आहे, त्या दृष्टीनेंहि कोल्हापुरला महत्व येण्याचा संभव आहे."

व्यापारी औषधालय, शाहुपुरी

व्याख्यानानंतर वैद्य बिंदुमाधव यांनीं शाहुपुरींतील व्यापारी आयुर्वेदीय औषधालयास भेट दिली. येथें वैद्य बी. बी. उपाध्ये हे पदवीधर वैद्य काम करतात. दवाखान्यासाठीं उत्तम इमारत बांधली असून लौकरच येथें सूतिकागृहहि निघणार आहे. आयुर्वेदीय संस्थांच्या वाढीस कोल्हापूर-शाहुपुरी हें उत्तम क्षेत्र आहे. पदवीधर वैद्य बिंदुमाधव कुळकर्णी घोसरवाडकर ह्यांनीं अलीकडे कोल्हापूर येथें व्यवसाय सुरू केला आहे. त्यांचीहि भेट झाली. कोल्हापुरचा कार्यक्रम यशस्वी करण्यांत वै. ग. य. गुणे यांनीं विशेष परिश्रम घेतले. येथें म. प्रां. वैद्य मंडळाचे सभासद नोंदले गेले.

संकेश्वरचें आयुर्वेदभवन

ता. ३१ रोजीं सकाळीं मोटारनें अध्यक्ष संकेश्वरास वैद्य लक्ष्मण गुंडाप्पा वैद्य यांच्याकडे गेले. तेथें माळावर इमारत बांधून त्यावर आयुर्वेदभवन अशीं अक्षरें कोरलीं आहेत. येथें औषधीकरणासाठीं वापरण्यांत येणाऱ्या कांहीं जंगली औषधी वनस्पति पाहावयास मिळाल्या व औषधीकरणाच्या नव्या नव्या कल्पना समजल्या. आयुर्वेदाच्या चरक सुश्रुत वाग्भटादि ग्रंथावरच सर्व भर न देतां या विशाळ खंडप्राय देशांत गांवोगांवीं जे औषधीकरणाचें व चिकित्साकल्पाचें ज्ञान विखुरलेलें आहे तें जमा करण्याचें काम तातडीनें झालें पाहिजे. पण हें डॉ. म्हसकर, डॉ. योध या मुंबईतच आपलें सर्व आयुष्य व्यतीत करणाऱ्या डॉक्टरमहाभागाच्या कसें लक्षांत येणार ! आयुर्वेद संशोधन समितीला लाभलेल्या द्रव्याचा विनियोग कसा करावा हें त्यांना कळणें शक्य नाहीं. कारण त्यांची उभी हयात परदेशीयांचे औषधीकल्प लिहिण्यांत खर्च झाली आहे.

शंकराचार्यांचा मठ व उत्पन्न

संकेश्वर हें शंकराचार्यांच्या मठासाठींहि प्रसिद्ध आहे. तो मठहि त्यांनीं पाहिला. या मठाला लक्षावधि रुपयांचें उत्पन्न आहे. प्रशस्त देवालय व इमारत आहे. पूर्वीं शंकराचार्यांचे मठ हीं विद्यास्थानेंच होतीं. पुनः तें विद्या वैभव आणणें हें नव्या पिढीचें काम आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गांधीवधानंतर वैद्यांचे हाल

संकेश्वराहून त्याच दिवशीं तिसऱ्या प्रहरीं निघून गडहिंग्लजला भेट दिली. येथें दोन पदवीधर वैद्य आहेत. गांधीवधाच्या काळांत इकडील डॉक्टर-वैद्य मंडळींना किती भयंकर नुकसान सोसावे लागले याची माहिती ऐकावयास मिळाली. वैद्य जोशी यांची आयुर्वेदीय औषधीकरणाच्या वैशिष्ट्यावरील भक्ति व तदनुसार चिकित्सा करण्याची हातोटी वाखाणण्याजोगी आहे. आधुनिक पद्धतीनें रुग्णपरीक्षा करूनहि आयुर्वेदीय पद्धतीनें चिकित्सा करण्याकडे ते विशेष लक्ष पुरवितात. हें सबंध दौऱ्यांत येथेंच पहावयास सांपडलें. या गांवांत डॉ. गुणे एल्. सी. पी. एस्. यांनीं स्वतःचें उत्तम रुग्णालय व सूतिकागृह बांधलें आहे. व ती संस्था अखंड चालू रहावी अशी व्यवस्था करण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे. लहान गांवांत यशस्वी व्यवसाय कसा करावा यासंबंधीं त्यांचे विचार अनुभवाचे व मोलाचे आहेत.

बेळगांव पत्रप्रतिनिधींशीं चर्चा

ता. १ रोजीं सकाळीं ११च्या सुमारास अध्यक्ष वैद्य पंडित बेळगांव येथें पोहोंचले. एस्. टी. स्टँडवर वैद्य वाटवे व वैद्य जोशी उपस्थित होते. प्रथम वैद्य जोशी यांच्या व नंतर जवळच असलेल्या म्युनिसिपॅलिटीच्या दवाखान्यास भेट देऊन मुक्कामासाठीं ते टिळकवाडींत वैद्य वाटवे यांच्या घरीं गेले. वैद्य वाटवे हे सांगली संमेलनास हजर होतेच. दुपारीं ४ वाजतां श्री. साठे यांच्या घरीं अध्यक्षांनीं बेळगांव येथील वृत्तपत्र प्रतिनिधींस भेट दिली. गेल्या १४ वर्षांत प्रांतांतील आयुर्वेदाच्या शिक्षणाच्या व चिकित्सेच्या दृष्टीनें किती पिछेहाट झाली आहे याची कल्पना अध्यक्षांनीं पत्रकारांना दिली. इंटरसायन्सच्या पायावर आयुर्वेदाच्या शिक्षणाची इमारत उभारण्याचें काम आयुर्वेदाच्या पायाचें ज्ञान नसलेली डॉक्टरमंडळी करीत आहेत. गेलीं ५० वर्षे चाललेला मिश्र शिक्षणाचा हा प्रयोग फसलेला आहे व म्हणून पुनःश्च पहिल्यापासून नवीन प्रयत्न करण्याचा म. प्रां. वैद्य मंडळाचा विचार चालू आहे. गेलीं ६ संमेलने या दृष्टीनें पाऊलें टाकीत आहे व त्याचा परिणाम राज्यसरकारवर होऊं लागल्याचीं चिन्हें दिसू लागलीं आहेत. ही मुलाखत सुमारें १ तास चालली होती.

वैद्यांची सभा

त्यानंतर वैद्यराज वा. म. चाके यांच्या घरीं वैद्यांची सभा झाली. प्रथम वै. चाके यांनीं अध्यक्षांचा परिचय करून दिला. त्यावेळीं महाराष्ट्रांत वैद्य-संघटना यशस्वी झाली असल्याचा निर्वाळा त्यांनी दिला. अध्यक्षांनीं चालू कार्यांची माहिती दिली. नंतर डॉ. जठार यांनीं चालविलेल्या प्रसूतिगृहास भेट दिली व त्या संस्थेची माहिती घेतली. त्यानंतर डॉ. चित्रगार यांनीं आपण करीत असलेल्या निसर्गोपचारासंबंधीं प्रयत्नाची माहिती सांगितली.

आयुर्वेदविद्याकेंद्र, हुबळी

त्याच दिवशीं रात्रीं आगगाडीनें अध्यक्ष हुबळी येथें वै. हळसीकर यांच्याकडे गेले. तेथें मि. भा. आयुर्वेद विद्यापीठाच्या परीक्षा चालू होत्या. वैद्य हळसीकरांचें निवासस्थान हें गेलीं कित्येक वर्षे आयुर्वेद-विद्याकेन्द्रच आहे. तेथें जमलेल्या विद्यार्थ्यांशीं चर्चा झाली. शिवाय गांवांतील वैद्य पुराणिक, रायबागकर आदि मंडळींच्या गांठी भेटी झाल्या. सरकारनें मान्यता दिल्यास हुबळी येथें आयुर्वेदाच्या पठनपाठनाची व्यवस्था होणें शक्य आहे, असें दिसून आलें.

शिरसीचें वैशिष्टय

ता. ३ रोजीं सकाळीं मोटारनें हुबळीहून निघून दुपारीं १२ च्या सुमारास अध्यक्ष शिरसी (कारवार) येथें वै. नीळकंठराव पटवर्धन यांच्या निवासीं पोहोचले. औषधी वनस्पतींच्या सुंदर प्रांगणानें वेष्टित अशी ती जागा अतिशय रम्य आहे. त्यांचे एक चिरंजीव नगरचे पदवीधर (आयुर्वेद-तीर्थ) व दुसरे एम्. बी. बी. एस्. डॉक्टर आहेत. डॉक्टरांच्या ठिकाणींहि आयुर्वेदीय सिद्धांताबा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खूप आदर व निष्ठा आहे असें आढळून आलें. सर- कारला अगर एखाद्या संस्थेला आयुर्वेदाच्या कार्या- साठीं डॉक्टर शिकवून तयार करणें असेल तर त्यांनीं डॉ. अ. नी. पटवर्धनांच्या सारख्याच व्यक्ति धुंडाळल्या पाहिजेत. तरच त्याचा कांहीं उपयोग होऊं शकेल.

वनस्पतिसमृद्ध देश

वै. गणपतराव पटवर्धन हे केवळ आयुर्वेदीय औषधाचाच वापर करतात व त्यांच्याकडे दुरुन दुरुन लोक औषधें घेण्यासाठीं येतात. ते औषधें स्वतःच अभ्यासपूर्वक तयार करतात. शिरसी–कारवार हा भाग वनस्पतिदृष्ट्या अगदीं समृद्ध आहे. महा- राष्ट्राचा इतर खडकाळ भाग व तो उत्तुंग वृक्षांनीं भरलेला भाग यांची तुलनाच होऊ शकत नाहीं. वृक्षांची उंची व घनदाटपणा पाहून आनंद होतो.

शिरसि म्हणजे डोक्यावर

दक्षिण महाराष्ट्रांत बेळगांव पलीकडे खालीं गोवा काढण्याचा त्यांचा उद्देश शिरसीला भेट देणें हाच होता. शिरसीविषयीं त्यांनीं बरेच ऐकलें होतें. ते प्रत्यक्ष पहावयास मिळालें. शिरसीच्या आसपास सर्व जंगलच आहे. येथें लागवड मुख्यतः सुपारी, मिरें व वेलदोडे यांची आहे. तेथील बाजार-पेठ मुख्यतः याच तीन गोष्टींची आहे. सुपाऱ्या, मिरे, वेलदोडे यांच्या जाती पहावयास मिळाल्या. त्यांच्या अवस्थांची त्यांनीं माहिती घेतली. मिरा पिकला म्हणजे लाल होतो. ते वरचे साल सार्धे चोळून निघतें. तें गेलें कीं राहते ती पांढरी मिरें. येथें सुपारी, वेलदोडे वगैरे सर्वांना गंध- काची धुरी देतात. ती त्यांनीं पाहिली. शिरसीच्या मुक्कामांत त्यांनीं मिळविलेल्या माहितीचा एक स्वतंत्र लेखच होऊं शकेल इतकी ती विविध आहे.

गिरसप्पाचा धबधबा

ता. ४ रोजीं सकाळीं स्वतंत्र मोटारीने श्री. पटवर्धन मंडळींनीं अध्यक्षांना गिरसप्पा (जोग) धबधबा दाखविला. बरोबर डॉ. पटवर्धन एम. बी. बी. एस. होते. मोटारींतून जातां येतां आयुर्वेद सिद्धांताबाबत व सूक्ष्म विचार पध्दतीबाबत खूप उपयुक्त चर्चा झाली. धबधब्यावर म्हैसूर सरकारनें वीज निर्माण करण्याची प्रचंड यंत्रसामुग्री बसविली आहे व म्हैसूर संस्थानाला पुरून राहिलेली वीज मुंबईस लवकरच पुरविली जाणार आहे.

कारवारांत थांबण्याचा आग्रह

शिरसीहून ता. ५ रोजीं निघून कारवारचा प्रवास केला. कारवारचा समुद्र किनारा नैसर्गिक सौंदर्यानें परिपूर्ण आहे. गांव अगदीं समुद्राच्या काठावर आहे. सर्वत्र मराठी भाषा आहे. गोवा–कारवार हा महा- राष्ट्राचा मराठी भाषीयांचा भाग आहे. यांत शंकाच नाहीं. कारवारांतील वृत्तपत्रप्रतिनिधि, वकील, वैद्य, डॉक्टर आदि मंडळींच्या भेटी घेऊन दौऱ्याचा उद्देश सांगण्यांत आला. तेथील मंडळी व्याख्यान देण्यासाठीं राहण्याचा आग्रह करीत होती. परंतु पुढें गोव्यांत वैद्य- मंडळींना भेटण्याचा दिवस आधीं निश्चित झाला असल्यामुळें त्यांना निराश करावें लागलें. तथापि उत्तर महाराष्ट्रांतील रहिवासी येऊन भेटल्याबद्दल त्या सर्वच मंडळींना अत्यंत आनन्द झालेला दिसला.

भयंकर अडथळ्याचा प्रवास

कारवारहून गोव्यांत जावयाचा मार्ग बराच अडथळ्याचा आहे. २ मैलावर एक नदी, ती नावेंतून पार करावयाची. पुढें दुसरी मोटार, पुनः भारताची हद्द संपून गोव्याची हद्द लागते तेथें मोटार बदलणें, दोन्ही राज्यातर्फे स्वतंत्र तपासणी, यांत फार वेळ मोडतो; संपूर्ण ६ तारखेचा दिवस पणजीपर्यंत पोहों- चण्यांत संपला. त्यानन्तर तेथील मंडळीकडून वैद्यांच्या परिस्थितीची माहिती अध्यक्षांनीं घेतली.

ता. ७ रोजीं सावंतवाडीचे वैद्य धूपकर यांच्या समवेत अध्यक्षांनीं भारत सरकारच्या गोव्यांतील कचेरीस भेट दिली व तेथील भारत प्रतिनिधीशीं गोव्यांतील वैद्यांच्या व आयुर्वेदाच्या भवितव्याबाबत चर्चा केली.

गोव्यांतील वाचनालयांत सत्कार

पणजी येथें श्री सरस्वती मंदिर नांवाचें उत्कृष्ट सार्वजनिक वाचनालय डॉ. खाखरदांडे यांनीं चाल-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विले आहे. गोव्यांत मराठी भाषेवर सर्वत्र पोर्तुगीज भाषेचें आक्रमण चालू आहे. कोणत्याहि दुकानदारानें न्हाव्या-धोब्यानेंसुद्धां आपल्या दारावरील पाटी पोर्तुगीज भाषेंतच लावली पाहिजे असा तेथें निर्बंध आहे. त्यामुळें या वाचनालयावर पाटीच नव्हती. पूर्वीची मराठी भाषेंतील पाटी काढून ठेवल्याचें समजलें. सायंकाळीं ६ वाजतां या वाचनालयांत डॉ. साखरदांडे यांनीं अध्यक्षांचा सत्कार केला. (भाषणें, पुष्पहार, अल्पाहार इ. कार्यक्रम झाला.)

गोव्यांत वैद्यांना व्यवसायास बंदी

ता. ८ रोजीं सकाळीं पणजीहून निघून फोंडा (गोवा) येथील वैद्य धोपेश्वरकर यांच्याकडे अध्यक्ष गेले. आयुर्वेदीय वैद्यांना किती विपरीत परिस्थितींत वावरावें लागतें यांची कल्पना येथें चांगलीच आली.

साताऱ्याचें गालबोट

वास्तविकपणें तारीख ७।८ ही उत्तर सातारा जिल्ह्यासाठीं ठेवली होती, पण मोटारीचा लांबीचा पल्ला व गोव्यांत वारंवार जाण्याची अशक्यता यामुळें गोव्यांतील मुक्काम थोडा वाढवून साताऱ्याचा कार्यक्रम रहित करणें भाग पडलें.

बोटें रुग्णालयास भेट

परत येतांना ता. ९ रोजीं दुपारीं अध्यक्षांनीं पुणें नगर सरहद्दीवर असलेल्या बोटे येथील फिरत्या रुग्णालयास भेट दिली व आयुर्वेदीय आणि ॲलोपॅथिक उपचारांची समक्ष माहिती घेतली. अध्यक्षाची बोट्यास ही दुसरी भेट होय. बोटे येथील प्रगतीबाबत प्रसिद्धि देण्यास डायरेक्टर ऑफ हेल्थ यांनीं मना केली असल्यामुळें आजच त्यासंबंधीं अधिक माहिती प्रसिद्ध केली जात नाहीं. तथापि एकंदरींत प्रयोग आशादायक आहे असें समजावयास हरकत नाहीं.

१४ दिवसाचा अखंड प्रवास

याप्रमाणें ता. २७ मार्च रोजी सकाळीं प्रारंभ झालेला प्रवास ता. ९ एप्रिल रोजीं सायंकाळीं समाप्त झाला. या चौदा दिवसांत सुमारें ७००-८०० मैलांचा प्रवास घडला.

नाशिक जिल्हा वैद्य संमेलन

नाशिक जिल्हा वैद्य संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार ता. १२-४-५३ रोजीं दुपारीं ३ वाजतां वैद्य रानडे यांचे घरीं वैद्य श्री. शिवशंकरशास्त्री शौचे यांचे अध्यक्षतेखालीं झाली.

सभेस वैद्य मंगरुळकर उपाध्यक्ष, वै. वसंतराव रानडे खाजिनदार, वैद्य शरद् परचुरे चिटणीस, श्री. मुळे चिटणीस, वैद्य द. नि. जोशी सभासद, (निफाड) श्री. शंकरदत्त ब्रम्हचारी (दिंडोरी) वै. दत्तात्रय हिरे (गिरनारे), श्री. धोंडीरामजी शिंपी [सुकेणे] हे सभासद मंडळी हजर होती. या सभेस निमंत्रित म्हणून वैद्य बिंदुमाधव पंडित, वै. विष्णुशास्त्री दाते अध्यक्ष शहर वैद्य संघ, वैद्य श्री. तरटेशास्त्री, वैद्य लोखंडे, आदि मंडळी उपस्थित होती.

नासिक जिल्हा वैद्य संमेलनाचें ४ थें अधिवेशन ता. १७ मे १९५३ रोजीं निफाड येथें घेण्याचें निश्चीत झालें आहे.

जिल्ह्यांतील सर्व वैद्यांनीं व आयुर्वेदप्रेमी मंडळींनीं हें अधिवेशन यशस्वी करण्यांत मदत करावी अशी अध्यक्षांनीं विनंति केली आहे.

संमेलनाचें अध्यक्षस्थान

निफाड येथें ता. १७।५।५३ रोजीं भावयाच्या नाशिक जिल्हा वैद्य संमेलनाच्या अध्यक्षपद स्वीकारण्याबाबत अंमळनेर येथील प्रताप आयुर्वेदिक रिसर्च इन्स्टिट्यूटमधील अधिकारी चिकित्सक वैद्य वि. दा. एकतारे आयुर्वेदतीर्थ, यांना विनंति करण्यांत आली असून, त्यांनीं ती स्वीकारली आहे असें कळतें.

मोफत निसर्गोपचार शिक्षणवर्ग

गांधी निसर्गोपचार आश्रम शहापूर (बेळगांव) तर्फे मोफत निसर्गोपचार शिक्षणवर्ग ता. १।५।५३ पासून सुरू करण्याचें श्री. शामराव हणमंतराव चित्रगार यांनीं ठरविलें आहे. कोर्स १ महिन्याचा आहे. वेळ दोन प्रहरीं २ ते ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयु. महाविद्यालयांना देणग्या

चालूं खर्चासाठीं

मुंबई राज्यांतील सरकारमान्य आयुर्वेद महा-
…यांना चालूं खर्चासाठीं १९५२—५३
…साठीं पुढीलप्रमाणें रकमा देण्यांत आल्या आहेत.

…र्वेद महाविद्यालय, पुणें	६८८१२
…वैद्यक महाविद्यालय, सातारा	३२५८२
…र्वेद महाविद्यालय, अहमदनगर	२०७३५
…द. आ. मे. कॉलेज, नडियाद	३२३२
…ना. आयुर्वेद महाविद्यालय, सूरत	२२२३४
	१.४७,५९५

विशेष खर्चासाठीं

…शिवाय त्या त्या वर्षांत करावयाच्या विशेष
…साठीं पुढीलप्रमाणें देणग्या दिल्या आहेत.

…र्वेद महाविद्यालय पुणें	१५६५१
,, सातारा	४८७५७
,, नगर	५,८३०
,, नडियाद	६९१३४
सूरत	४२५००

इमारतीसाठीं

…द महाविद्यालय, पुणें	४८०००
,, नगर	१०००००

यंत्रें वगैरे साधनसामुग्रीसाठीं

…आ. महाविद्यालय, पुणें	२२५००
,, ,, नडियाद	१३२०९

…वी अभ्यासक्रम चालूं करण्यासाठीं

…र्वेद महाविद्यालय, पुणें	१६१५०
,, सातारा	१२५००
,, अहमदनगर	९२५०
,, नडियाद	८०९८
,, सूरत	१२१५०
	५८१४८

अनुक्रमणिका –

नामदार अर्थमंत्र्यांचें आश्वासन	६६३
खेडेगांवांत वैद्यकीय मदत	६६५
वै. दत्तात्रयशास्त्री जळूकर यांचें आत्मवृत्त	६६८
कास (खोकला) निदान व चिकित्सा	६६९
आंबट लिंबाच्या सालींची उपयुक्तता	६७५
द. सातारा जिल्हा संमेलन–ठराव	६७७
गोव्यांतील वैद्यकीय व्यवसाय	६७९
दिल्लीच्या पार्लमेंटमधील चर्चा	६८०
सरकारनें आयुर्वेदाला प्रोत्साहन द्यावें	६८१
प्राणिरक्षक संस्था धुळे	६८४
आयुर्वेदाला चांगले दिवस यावेत	६८५
अमूल्य औद्भिद संपत्ति	६८८
म. प्रां वैद्य मंडळाचें प्रचारकार्य	६८९
आयुर्वेद महाविद्यालयांना सरकारी देणग्या	६९३

प्रांतीय वैद्यबंधूस विनंति

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाच्या लातूर येथें होणाऱ्या अधिवेशनासाठीं व पुढील वर्षभराकरितां एक प्रमुख कार्यवाह (अध्यक्ष) म्हणून आपण मतदारानें माझी निवड केली, याबद्दल मी आपणा सर्वांचा ऋणी आहे. संमेलनांत बहुसंख्येनें उपस्थित राहून आपण तें यशस्वी करावें अशी विनंति आहे.

नशिराबाद
२८–४–५३

सर्वांचा कृतज्ञ
वैद्य दत्तात्रयशास्त्री जळूकर

ह्या सर्व देणग्या एकत्र केल्या म्हणजे त्या त्या संस्थांना यावर्षी पुढील रकमा मिळाल्या असें होतें.

आयुर्वेद महाविद्यालय, पुणें	१,७१११३
,, ,, सातारा	९३८४९
,, ,, नगर	४५८१५
,, ,, नडियाद	९३६७३
,, ,, सूरत	७६८८४
देणगीची एकूण रक्कम	४८१३३४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देवांचे वैद्य अश्विनीकुमार तारुण्यप्राप्तीसाठीं



'च्यवनप्राश' देत आहेत

धूतपापेश्वर च्यवनप्राश

शक्ति—स्मृतिवर्धक
शामक, सारक
पाचक, पौष्टिक

धूतपापेश्वर इंडस्ट्रीज् लि.
पनवेल-मुंबई

वैद्यांना घरगुती औषधीकरणासाठीं

थोडया प्रमाणांत लागणारीं शुद्ध विषें, शुद्ध खनिजें द्रव्यें व केशर, कस्तुरी, अंबर आदि किमती खात्रीच्या वस्तु योग्य भावानें पुरविण्याची व्यवस्था आयुर्वेद सेवा संघानें केली आहे.

वैद्यांनीं ज़रूरीप्रमाणें पत्र पाठवून मागणी करावी.

वैद्यांना त्यांच्या खाजगी व्यवसायांत उपयोगी पडणें हेंच आयुर्वेद सेवा संघाचें ध्येय आहे.

आयुर्वेद सेवा संघ, औषधीभवन, नासिक

संपादक व प्रकाशक:— वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, नासिक
मुद्रक:— श्री. दामोदर महादेव चन्द्रात्रे, विज्ञान प्रेस, नासिक
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक मुखपत्र

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ६ वें) नाशिक, ता. १ जून १९५३ (अंक २३ वा

नि. भा. आयुर्वेद-शास्त्र-चर्चा परिषद, हरिद्वार

१८ वर्षांपूर्वी नोव्हेंबर १९३५ मध्यें बनारस हिंदुविश्वविद्यालयांत वै. भू. वामनशास्त्री दातार व आयुर्वेदमार्तंड **यादवजी त्रिकमजी आचार्य** यांच्या प्रयत्नामुळें पंचमहाभूत व त्रिदोष - चर्चा परिषद

भरली होती. त्याचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. त्यानंतर १९५० सालीं पाटणा येथें श्रीमान् यादवजीभाईंच्या अध्यक्षतेखालीं नि. भा. आयुर्वेद - शास्त्र - चर्चा परिषदेचें पहिलें अधिवेशन भरलें. त्या संमेलनाचे संयोजक आयुर्वेदबृहस्पति पं. रामरक्ष पाठक प्रिन्सिपल आयु. कॉलेज, बेगुसराय हे होते.

हिमालयाच्या शुभ पार्श्वांवर

प्राचीन काळीं पुण्यकर्मे ऋषि-मुनि जनतेच्या आरोग्यशास्त्राचा विचार करण्यासाठीं हिमालयाच्या पार्श्वांवर जमत असत, असा चरकसंहितेंत सूत्रस्थानांत उल्लेख आला आहे. म्हणून या शास्त्र - परिषदेचें एक अधिवेशन हिमालयाच्या परिसरांत भरवावें अशी पाटणा येथें जमलेल्या वैद्यवर्यांची मागणी होती. तदनुसार गेल्या २० मे १९५३ पासून २९ मे १९५३ अखेर १० दिवसपर्यंत हरिद्वार येथें परिषदेचें दुसरें अधिवेशन भरलें असून त्यांत द्रव्याचे रस, गुण, वीर्य, विपाक, प्रभाव याबाबत चर्चा झाली. अध्यक्ष[illegible] आयुर्वेद काँग्रेसचे [illegible] त्रिकमजी हेच होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द्रव्यगुण परिषदेसाठीं आलेले ४५ निबंध

या परिषदेसाठीं वरील विषयावर निबंध मागविण्यांत आले होते. आजवर आलेल्या निबंधांची संख्या ४५ असून त्यापैकीं ११ निबंध छापून त्यांचा निबंधसंग्रहग्रंथ श्रीवैद्यनाथ आयुर्वेद भवन लिमिटेड कलकत्ता, यांनीं प्रकाशित केला आहे. २७४ पानांच्या या ग्रंथाची किंमत नाममात्र (१॥६.) ठेवण्यांत आली आहे. आचार्य यादवजी यांनीं पूर्वीच लिहून प्रसिद्ध केलेल्या ' द्रव्यगुणविज्ञान ' पूर्वार्ध या पुस्तकाचा वरील चर्चेच्यावेळीं प्रामुख्यानें उपयोग होणार आहे.

विधायक कार्याबद्दल धन्यवाद

निखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनांत प्रामुख्यानें शास्त्रचर्चा होऊं शकत नाहीं, हें लक्षांत घेऊन आचार्य यादवजीभाई यांनीं या संमेलनांतूनच शास्त्रचर्चा परिषदेस जन्म दिला आहे. व या परिषदेच्या व्यवस्थेची सारी जबाबदारी आपले सच्छिष्य वैद्यराज पं. रामनारायणजी शर्मा वैद्यशास्त्री (अध्यक्ष श्रीवैद्यनाथ आयुर्वेद भवन लि.) यांच्याकडे सोंपविली आहे. ज्या तत्परतेनें वरील परिषदेचें कार्य चालू आहे तें पाहिलें म्हणजे वरील उभय व्यक्तींना धन्यवाद दिल्याशिवाय रहावत नाहीं.

न तेन वृद्धो भवति येनास्य पलितं शिरः। केस पांढरे झाले म्हणजे मनुष्य वृद्ध झाला असें होत नाहीं. जो मनानें व कृतीनें तरुण तो तरुण अशी जी व्याख्या केली आहे, ती आपल्या आचारानें आचार्यांनी यथार्थ केली आहे. आचार्यजी शरीरानें वृद्ध दिसत असले तरी आचारानें तरुण आहेत कर्मयोगी आहेत.

केवळ आयुर्वेदाचा अभ्यासक्रम

ता. २३ मे च्या लोकमान्यांत आयुर्वेदीय संशोधन व आयुर्वेदीय अभ्यासक्रम यासंबंधीं एक बातमी प्रसिद्ध झाली आहे, तिचा सारांश—

मुंबई राज्याचे आरोग्यमंत्री यांनीं ता. २२ रोजीं दुपारीं ४ वाजतां सेक्रेटरीएटमध्यें आरोग्य-खात्याची कांहीं अधिकारी मंडळी, वैद्य व डॉक्टर यांच्याशीं अनौपचारिक चर्चा केली. या प्रसंगीं स्थानिक स्वराज्य व सार्वजनिक आरोग्यखात्याचे चिटणीस श्री. मेहेर; सर्जन जनरल डॉ. दीक्षित, डॉ कु. श्री. म्हसकर, वैद्यरत्न पं. शिवशर्मा, वैद्यराज वामनराव व्यास बऱ्हाणपूरकर, वैद्य नाना जोशी व वैद्य बापालाल्जी (सूरत) ही मंडळी उपस्थित होती.

या चर्चेचा उद्देश संपूर्णतः केवल आयुर्वेदीय विचारपद्धतीप्रमाणें अभ्यासपूर्वक रोगनिदान व रोगचिकित्सा करण्यास या प्रांतांत व्यवस्था निर्माण करणें हा आहे असें कळतें. त्यासाठीं उपयुक्त आयुर्वेदीय ग्रंथ निर्माण करणें, आयुर्वेदीय चिकित्सेसाठीं लागणाऱ्या वनस्पती जमविण्याची व त्या उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करणें व गुरुशिष्य परंपरा चालू रहाण्यास अनुकूल परिस्थिति निर्माण करणें इ. गोष्टींचा विचार झाला.

गृहवैद्य अथवा क्षारचिकित्सा
लेखकः-डॉ. गर्दे, आय्. एम्. एस्. (रिटायर्ड)
किंमत ३ रु., ट. ख. १० आणे
(१) वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक
(२) डॉ. गर्दे, २६ मोंगल लेन, मुंबई १

— सन्मान समारंभ —

ता.२४ मे रोजीं दुपारीं दादर येथील आयुर्वेदीय विद्यार्थी संघानें वैद्यराज वेणीमाधवशास्त्री जोशी यांची नागपूर विश्वविद्यालयांत आयुर्वेदाभ्यासी म्हणून नेमणूक झाल्याबद्दल सन्मान केला असें कळतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

.... सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें ...

लेखकः- आयुर्वेदभूषण
वैद्य पु. वि. धामणकर

२ एकांगवीर

एकांगवीर हें एक हुकमी काम देणारें औषध ... एकांगवीर दिला आणि गुण दिसला नाहीं ... सहसा कधीं आढळत नाहीं. मला ह्याचा चांगला ... आहे. म्हणून त्याचा, वैद्यबंधूंना, परिचय ... देत आहें.

डोळा मिचकवणें, गाल उडवणें

... नं. १- वय वर्षें १६।१७ कुमारिका—

... थंड हवेच्या ठिकाणीं गारठ्यांत वावरल्यानें ... डोळा, गाल, हात व पाय ह्यांवर वातानें आक्र... केलेलें दिसलें. मधून मधून एकच डोळा ...वणें, गाल उडवणें, हात पाय वेटाळून टाकणें ... होतीं. प्रथम दुसऱ्या एका वैद्यानें महायोग... गुग्गुल व सहचरतैल मधांतून दिला होता. १४ ... कांहीं गुण दिसला नाहीं. म्हणून ।।- गुंज ...गवीर + १ गुंज मृगशृंग ह्याप्रमाणें सकाळ ... ११।१ पुडी आल्याचा रस तूप व मधांतून ... मीं सांगितलें. चौथ्या दिवसापासून फरक पडूं ... ७ व्या दिवशीं सर्व लक्षणांचा उपशम झालेला ...

हस्तकंप, वाताचा झटका

... नं. २- वय ७० स्थूल पुरुष, रक्तदाब सम.

सायंकाळीं पांच वाजतां चहा पीत असतांना हात ... लागून हातांतील वशी खालीं ठेवावी लागली. ... राहण्याचा प्रयत्न केला तो विफल ठरला. मला ...-श्री-चो-वा-क-डे न्या असें जेमतेम उद्गारले; ... वाजतां उचलून टांग्यांत घालून वैद्याकडे ...

उपचारः—

उपचार क्रमांक १- प्रथम स्वस्थ निजवून ...न सर्व अंगास टरपेंटाइन चोळलें व गरम पांघरूण ... घातलें.

उपचार क्रमांक २-२ गुं. एकांगवीर + २ गुं. सूतिकाभरण पुडी १ आल्याचा रस, मध व तुपांत १।१ बोट चाटविलें. ९ वाजतां दुसऱ्याचे मदतीनें ते वृद्ध गृहस्थ फरफटत, फरफटत घरीं गेले. घर एक फर्लोगा-वरच होतें. नंतर २ आठवडे नुसता एकांगवीर रुग्ण नं. १ प्रमाणें दिला, तेव्हां हात पाय जीभेंत कांहींहि दोष उरला नव्हता. मग मात्र त्यांना दुसरा झटका येऊं नये (प्रतिबंधक) म्हणून सहचरतैल १। तो. रात्रीं निजतांना दुधांतून घेण्यास सांगितलें. आज २ वर्षें झालीं फिरून वाताचा कांहींहि त्रास झाला नाहीं.

एकांगवीराचा संस्कृत पाठ

शुद्धं गंधं मृतं सूतं कांतं वंगं च नागकम्।
ताम्रं चाभ्रं मृतं तीक्ष्णं नागरं मरिचं कणा ॥
सर्वमेकत्र संचूर्ण्य भावयेच्च पृथक् त्र्यहम्।
वरा–व्योषक–निर्गुण्डी–वन्हि–शुद्धार्द्रकैर्द्रवैः।
शिग्रु-कुष्ठ-द्रवेणापि ततो धात्र्या द्रवेण च ।
विषमुष्ट्यार्कहाटैश्च आर्द्रकस्य रसैस्तथा ॥
रसश्चैकांगवीरोऽसौ सुसिद्धो रसराड् भवेत्।
पक्षाघातं चार्दितं च धनुर्वातं तथैव च ॥
अर्धांगं गृध्रसीं वापि विश्वाचीमवबाहुकम् ॥

(५८५ भा. भै. र. ४४३ र. यो. सा.
बृ. नि. र. । वा. व्या.)

नांवः— कार्यबोधक (एकांगरोगावर वस्ताद.)

पाठनिश्चितिः– मूळ पाठ शुद्ध व ठीक आहे.

द्रव्यसंग्रहः- १) रससिंदूर, १) गंधक, १) कांत-लोहभस्म, १) नागभस्म, १) ताम्रभस्म, १) अभ्रक-भस्म, १) तीक्ष्णलोह भस्म, १) वंगभस्म, १) सुंठ, १) मिरी, १) पिंपळी.

द्रव्यनिर्णयः- सुंठ न सोललेली. मिरी-काळी. पिंपळी-लेंडी व जुनी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

द्रव्यशोधनः- गंधक—एरंडतैलशोधित.

पिंपळी-चित्रक स्वरस शोधित

प्रक्रियाः- खालील भावना क्रमाक्रमानें देणें.

द्रव्य	अंग	कल्प
हिरडा	फळ—फोल	काढा
बेहडा	,, ,,	,,
आंवळा	,, ,,	,,
सुंठ	कंद—शुष्क	फांटा
मिरें	फळ ,,	,,
पिंपळी	,, जुनें	काढा
निर्गुडी	पान	रस
चित्रक	मूळ—नवें	काढा
आलें	कंद—ताजे	रस
शेवगा	साल—ताजी	,,
कोष्ठ	कंद—शुष्क	काढा
आंवळा	ओला—ताजा	रस
कुचला	बी—शुष्क	काढा
रुई	त्वक्—पत्र	क्षीर
कांडवेल	ताजी—नवी	रस
आलें	कंद—ताजा	रस

काल मर्यादाः- मर्दन ५ महिने.

साधन कालः -शरद व हेमंत ऋतु.

सिद्धिप्रमाणः- मूळ द्रव्यें ३३ तोळ्यांचा तयार ४८ तोळे होतो.

परिगणनः- १) ३ तोळे रससिंदूर घेतला असतां ४८ तो. वर औषध तयार होते. तेव्हां पाठांतले प्रत्येक द्रव्य तयार कल्पांत १/१६ प्रमाणांत असतें.

२) भस्मांची प्रमाणें बरोबर असल्याची खात्री करून घ्यावी.

रोगः- पक्षाघात, अर्दित, धनुर्वात, अर्धांग, गृध्रसी, अवबाहुक, विश्वाची इ. वातरोग.

मात्राः- ॥- ते ३ गुंजा.

अनुपानः- आल्याचा रस + तूप + मध.

टिप्पणीः- द्रव्यनिर्णयः- भावना द्रव्यांत 'हाट' शब्द आहे. त्याचे तीन अर्थ केलेले आढळतात.

हाट = धोतरा-भा. भै. र. भाषाटीका.

हाट = अक्कलकारा-र. यो. सा. भाषाटीका

हाट = कांडवेल-औ. गु. शा. मराठी अनु

हाट असा शब्द संस्कृतांत नाहीं. पण हाटकम् धरून त्याचा अर्थ 'धोला' असा केले दिसतो. हाटसंज्ञा अक्कलकाऱ्यास नाहीं, पण कर आहे. त्याचा हा संक्षेप दिसतो. हाट = कांडवेल अ अर्थ कोठेंच आढळत नाहीं. पण धोतरा, अक्कलक आणि कांडवेल ह्यांचे गुणधर्म लक्षांत घेतां येथें कां वेल घेणें श्रेयस्कर ठरतें.

उदाहरणार्थ—

धोत्रा-कटु, उष्ण, वातकृत्, भ्रांतिद.

अक्कलकारा-उष्ण, तीक्ष्ण, वातकफहर, बल्य, दीपन,

कांडवेल-कटु, उष्ण, तिक्त, त्रिदोषघ्न, अग्निदीपन,

वातनाशक गुणसंपन्न भस्में

ह्या पाठांत आठ भस्में आहेत. कांहीं कां पाठांमधून विशिष्ट भस्म विशिष्ट पद्धतीनें मारलेलें व भावित केलेलें घ्यावें; असें सांगितलेलें असतें. येथे तसें सांगितलेलें नसलें तरीपण हें औषध केवळ वातदोषावर कार्य करणारें आहे. हें लक्षांत घेऊन भस्में वातनाशक गुणानें संपन्न अशी घेतलेलीं बरीं.

प्रत्येक भस्माचे तीन प्रकार करावेत

ह्या निमित्तानें असें सुचवावेंसें वाटतें कीं, प्रत्येक भस्माचे वात, पित्त, कफदोषपरत्वें तीन तीन प्रकार करून ठेवावेत व जेथें जो योग्य तेथें तो प्रकार योजावा. असें केल्यानें तो योग अधिक गुणसंपन्न होण्याची शक्यता आहे.

एकांगवीराची प्रक्रिया

मूळपाठांत १।१ भावना द्यावयास सांगितलें आहे. पण तेवढ्यानें नीटसें काम लाभत नाहीं. त्याकरितां ३।३ भावना देणेंच आवश्यक ठरतें.

प्रत्येक पदार्थाची भावना पृथक् द्यावी. शक्य तर क्रमहि साधावा. क्षीर, रस ह्यांचे अभावीं हिमफांट, कषाय इ. कांहींहि घालूं नयेत. ते कार्यक्ष ठरत नाहींत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औषधि निर्मितीचा काल

तीन तीन भावना द्यायच्या तर त्या ४८ ...तात, आणि ह्या भावना जिरविण्यास कमींत- ...ी १४४ दिवस लागतात. आंवळयांचा रस, ...वा चीक इ. पदार्थ हिवाळ्यांत उत्तम मिळतात. ...हिशेबानें हा योग शरदऋतूंत करावयास घालणें ...ठरतें.

औषधावर होणारा खर्च परवडण्यास औषधांतील ...द्रव्य कमींत कमी ३।३ तोळे प्रमाणांत घालणें ...वश्यक ठरतें.

प्रतिज्ञेवर द्यावयाचें औषध

अशीं औषधें वरचेवर होत नसतात. पुनः हीं ...औषधें अगदीं आणीबाणीचे प्रसंगीं किंबहुना प्रतिज्ञे- ...त द्यायचीं असतात. ह्यांचे परिणामहि हुकमी ...व्हावेत, अशीहि अपेक्षा असते. ह्या दृष्टीनें ह्या ...औषधांवर कसोशीनें मेहनत घ्यावी हें उत्तम.

विवेचनात्मक सूचिवेध-पद्धति

इंजेक्शन थेरपी (सचित्र)

हापूड (उत्तर प्रदेश) येथील आचार्य बाबूराम ...द रिसर्च इन्स्टियूटनें प्रकाशित केलेलें व डॉ. ...शंकर मिश्र एम्.एस्सी., डी.आय्.एम्.एस्. यांनीं ...लिहिलेलें वरील पुस्तक अभिप्रायार्थ आयुर्वेद पत्रिकेकडे ...आलें आहे. समाजांत औषधें खाण्यापिण्यापेक्षां तीं ...टोंचून घेण्याची प्रथा हल्लीं वाढली आहे. त्यामुळें ...वैद्यकीमांना औषधें टोंचण्याचें सविस्तर ज्ञान देण्या- ...साठीं व कोणतीं औषधें कोणत्या रोगावर टोंचावीत ...याची माहिती होण्यासाठीं अशीं पुस्तकें सर्वच भाषां- ...तून बऱ्याच प्रसिद्ध होत आहेत. अशा पुस्तकामुळें ...विषयाची माहिती तर मिळतेच, पण पुढें दैनंदिन ...व्यवहारांत सुद्धां त्याचा लाभ घेतां येतो.

ॲलोपॅथिक व आयुर्वेदीय इंजेक्शनें

या 'विवेचनात्मक सूचिवेधपद्धति' पुस्तकाचा ...विशेष हा आहे कीं, यांत प्रथमाध्यायांत औपसर्गिक रोग कां होतात, एथपासून प्रारंभ केला आहे. ज्वरामुळें शरीरांतील निरनिराळ्या संस्थांमध्यें काय विकृति घडून येतात यांची माहिती दिली आहे. रोगांचीं निदानें व पूर्वरूपें दिली आहेत. दुसऱ्या अध्यायांत इंजेक्शनचें पूर्वकर्म दिलें आहे. तिसऱ्या अध्यायांत प्रधानकर्म दिलें आहे. रक्तदान पद्धतीची माहिती चवथ्या अध्यायांत आहे. पांचव्या अध्यायांत अपासून हपर्यंत शेंकडों सूचिऔषधांची माहिती आली आहे. सहाव्या अध्यायांत (२७५ ते ३९६) उपदंश-विकाराच्या सर्व बारीकशरीक अवस्था व त्यांवर उपयोगीं पडणारे सोमल व इतर कल्प यांची माहिती दिली आहे. सरतेशेवटीं १८ आयुर्वेदीय महत्वाच्या इंजेक्शनची माहिती देऊन हा ग्रंथ पुरा केला आहे.

हिंदी भाषेंतील ग्रंथ

पुस्तकाची छपाई बांधणी सर्व चांगलें आहे. हिंदी भाषा समजणाऱ्या लोकांना पुस्तक उपयुक्त आहे. प्रत्येक औषधीच्या घटकांची देवनागरी व इंग्रजी या दोनहि लिपींत व भाषेंत नांवें दिलीं असल्यामुळें मोठी सोय झाली आहे. विशेषतः कांहीं आयुर्वेदीय विश्वसनीय इंजेक्शनें वापरूं इच्छिणाऱ्या लोकांनीं या पुस्तकाचा अवश्य लाभ घ्यावा.

डॉ. प्रभाकर मिश्रा यांची आमची भेट इंदूर येथें निखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनांत झाली. त्यांची मनमोकळपणानें कांहींहि लपवून छपवून न ठेवतां विषयाची संपूर्ण माहिती देण्याची पद्धति वाचकांना लाभदायक आहे. (किंमत ५॥ रुपये)

हें पुस्तक वैद्यकग्रंथ भांडारांत मिळण्याची व्यवस्था केली आहे.

विंचूदंशावर पांगारा

विंचूदंशावर 'पांगारा' नांवाच्या वृक्षाच्या कोंवळया तुऱ्या वाटून लावल्यावर बरें वाटतें. ६ केसिसमध्यें मी उपयोग करून पाहिला आहे. गुण येतो असें डॉ. वसंतराव अनसरे, एम्. बी. बी. एस्. यांनीं कळविलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ड्रॅक्युलॅन्

हिंदुस्थानांतील कांहीं भागांत नारूचा प्रादुर्भाव सार्वत्रिक व प्रतिवर्षी होत असतो. कित्येक गांवांत तर घरोघरीं ह्या चिवट आणि वेदनाकारक रोगानें ग्रासलेली माणसें आढळतात. ह्यामुळें रोगी पांगळा बनून त्याची कार्यक्षमता खालावते.

डॉ. भाजेकरांचें संशोधन

आजपर्यंत नारूवर निश्चित गुणकारी औषध नव्हतें. ही उणीव आतां ड्रॅक्युलॅननें भरून निघाली आहे. डॉ. मा. वि. भाजेकर, M.A., M.B.B. ch., F.R.C.S. ऑनररी सर्जन, सेंट जार्जिस् हॉस्पिटल, मुंबई, ह्यांच्या नारूवरील संशोधनाच्या आधारें, अनेक वर्षे शेंकडों रोग्यांवर नामांकित डॉक्टरांनीं व वैद्यांनीं वापरून गुणकारी ठरविल्या-नन्तरच हें तयार केलें आहे.

औषध घेण्याची रीत व पथ्य

उपचारः- ड्रॅक्युलॅनच्या दोन गोळया अनशन पोटीं सकाळीं पाण्याच्या घोटाबरोबर सतत दहा दिवस घ्याव्या. औषध घेतल्यापासून सुमारें तासानन्तर नेहमींप्रमाणें जेवण, चहा, वगैरे घेण्यास हरकत नाहीं. माल मासे, मांस, दारू तसेंच तेलकट व तिखट पदार्थ वर्ज्य करणें आवश्यक आहे.

दहा वर्षांखालील मुलांना रोज फक्त एक गोळी द्यावी.

४ थें दिवशीं ताप येतो

लक्षणेंः- कोणत्याहि अवस्थेंतील नारूंवर ड्रॅक्युलॅन् हमखास उपयोगीं पडतें. औषध सुरूं केल्या-पासून चवथे दिवशीं कांहीं रोग्यांना ताप येतो. सहाव्या दिवसापासून त्यास उतार पडून गुण पडूं लागतो. ह्या काळांत एकूण रोगाचीं लक्षणें जास्त प्रमाणांत दिसूं लागतात. सातव्या दिवसानन्तर आराम पडतो. साधारतः दहा दिवसांच्या औषधानें रोगी रोगमुक्त होतो; अर्थात् त्यास दोन-तीन आठवडे पूर्ण बरा होण्यास लागतात.

पुनः १० दिवस औषध

क्वचित् दोन-तीन आठवड्यांतहि पूर्ण गूण न आला तर पुन्हां ड्रॅक्युलॅन् दहा दिवस द्यावें. ड्रॅक्युलॅन् घेत असतांना अन्य कोणतेंहि औषध घेऊं नये.

व्रणावरील उपचार

नारूमुळें झालेले व्रण रोज स्पिरिटनें वा स्वच्छ पाण्यानें साफ धुवून नंतर त्यावर जंतुरहित कापड बांधावा.

पॅकिंगः- २० गोळयांची ट्यूब.

[डॉ. भाजेकरांचे नारूविषयक संशोधना-बाबतचा लेख आयुर्वेद-पात्रिकेंत पूर्वी (१-८-५२) देऊन गेल्याचें वाचकांच्या स्मरणांत असेलच.—संपादक]

देशी औषधीपद्धतीची

सरकारी मध्यवर्ति संशोधनसंस्था, जामनगर

या संस्थेतर्फे पुढील जागा भरावयाच्या आहेत. त्यासाठीं संस्थेच्या ठराविक अर्जपत्रकावर १० जून पूर्वी पोहोंचतील असे अर्ज पाठवावेत.

आयुर्वेदीय संच

२ वैद्य (पगार रु. ६००–४०–१००)
१ दार्शनिक (पगार रु. ३५०–२५–७५०)
३ मदतनीस वैद्य (पगार रु. ३५०–२५–७५०)
१ आयु. औषधिकरणतज्ञ, (रु. ३५०–२५–७५०)
३ स्थायी वैद्य (पगार रु. १६०–१०–३०)

आधुनिक संच

१ डॉक्टर (पगार रु. ६००–४०–१०००)
१ पॅथालॉजिस्ट व बॅक्टेरियालॉजिस्ट (पगार रु. ६००–४०–१०००)
१ बायोकेमिस्ट (पगार रु. २७५–२५–५००)
१ फार्मासिस्ट (पगार रु. २७५–२५–५०० एफीन्सीबार ३०–५१०)
३ स्थायी डॉक्टर (पगार रु. १६०–१०–३३०)

वरील पगाराशिवाय महागाईभत्ता कायद्याप्रमाणें मिळेल. अर्जपत्रक मागवावयाचा व अर्ज पाठविण्याचा पत्ताः—डायरेक्टर, सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च इन इंडिजिनस सिस्टिम्स ऑफ मेडिसिन, जामनगर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय अन्नपानविधि :

—: व भोजनासंबंधीचे दहा नियम :—

लेखकः— वृद्ध वैद्य

सर्व साधारणतः असा प्रघात पडलेला दिसून ...ही, कोणाहि व्यक्तीस आपण जेवावयास बोला... म्हणजे त्याला आग्रह करकरून पुष्कळसें अन्न ... घालावयास लावावयाचें. मूळ उद्देश फारच ... आहे. कारण जगांत तृतीचें स्थान कोणतें ... तर तें भोजनांतच आहे. इतर कोणत्याहि ...व्यवहारांत तृतीला स्थानच नाहीं. परन्तु ज्यांना आधिक ...आहार करण्याचे प्रसंग वारंवार येत असल्यामुळें ...या प्रकारची संवय होते त्यांना त्यापासून अपाय ...होत नाहीं. परन्तु सर्वांची स्थिति सारखी नसते.

कुक्षीचे ३ भाग

...चरकांतील त्रिविधकुक्षीय विमानाध्यायांत ...हें वाक्य आढळतें:—

त्रिविधं कुक्षौ स्थापयेदवकाशांशमाहारस्य ...उपयुंजानः। तद्यथा–एकमवकाशांशं मूर्तानां ...आहारविकाराणामेकं द्रवानामेकं पुनः वातपित्तश्लेष्म... ...णाम्। एतावती हि आहारमात्रां उपयुंजानः नामा... ...मात्राहारजं किंचिदशुभं प्राप्नोति। च. वि. २–३

यावरून प्रत्येक मनुष्यानें आहार करीत असतांना आपल्या कोष्ठावकाशाचे (विशेषतः आमाशयाचे) ...तीन विभाग करावे. पैकीं, मूर्त म्हणजे, साधारणतः ...घन अशा आहार्य द्रव्यांना राहूं देण्याकरतां एक भाग, ...द्रव (पाणी, दूध इ०) पदार्थांस राहण्याकरतां दुसरा ...भाग असावा, व वातपित्तकफसंज्ञक स्राव व ...वायुरूप पदार्थ राहण्याकरतां तिसरा भाग, रिकामा ...ठेवावा. या प्रमाणें कोष्ठाचे म्हणजेच महास्रोतसाचे ...तीन विभाग करवून आहार करावा तसें केलें असतांना अप्रमाणांत केलेल्या आहारापासून उत्पन्न होणारे ...कोणतेहि विकार होत नाहींत, आणि त्यामुळेंच अन्नजा (...आहाराच्या अप्रमाणापासून उत्पन्न होणारी) उचकीहि ...होत नाहीं.

तिसरा भाग वातपित्तकफाकरितां

वर वर्णन केलेल्या विभागांत वातपित्तश्लेष्मांच्या संचाराकरितां तिसरा भाग रिकामा ठेवावा, असें जें म्हटलेलें आहे तें जरा विस्तारपूर्वक समजून घेण्याची आवश्यकता आहे.

उत्पन्न होणारीं ३ द्रव्यें

'कफ पित्त व वात हीं तिन्ही शरीरांतून उत्पन्न होणारीं द्रव्यें आहेत' असें वाग्भटांतील सूत्रस्थानांतर्गत पहिल्या अध्यायांत "शरीरजानां दोषाणां क्रमेण परमौषधम्"। या वचनावरून सिद्ध होतें; आणि अन्नपरिणमन क्रियेंत हीं द्रव्यें उत्पन्न होतात, हें 'फेनभूत उदीर्यते', 'पित्तमच्छमुदीर्यते', 'वायुस्यात्कटुभावतः' हें चरक चिकित्सा अध्याय १५-९,१०, ११ यांतील वाक्यांवरून निश्चित होतें. आणि अन्न पोटांत गेल्यावर यांचें उदीरण अर्थात् अत्यधिक प्रमाणांत उत्पत्ति होत असते हें ठरतें. सबब, या महास्रोतसांत किंवा त्यांतील महत्वाचा भाग जो आमाशय त्यांत या द्रव्यांना राहण्याकरतां अवकाश (स्पेस) न उरूं दिला तर, एकतर त्यांच्या उत्पत्तींत बाधा उत्पन्न होईल आणि उत्पन्न झाल्यावर त्यांचा अन्नावर दाब फार जोराचा पडून आमाशयांतील व महास्रोतसांतील नलिका आंतून जोरानें फुगविल्या जाऊन त्याचे दुष्परिणाम शरीरावर होतील म्हणून तृतीयांश भाग दोषांकरितां रिकामा ठेवला पाहिजे हें ठरतें.

आठ आहारविधिविशेषायतनें

असें केलें असतांना 'अमात्राहारज' अर्थात् प्रमाणाबाहेर भोजन केल्याचे दुष्परिणाम होणार नाहींत, हें खरें, परंतु आहार केल्यापासून त्याचे परिणाम शरीरावर नीट होऊन अंतिम फल योग्य व्हावें याकरितां केवळ प्रमाणशीर आहारच उपयोगी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठरत नाहीं; तर शास्त्रांत वर्णन केलेल्या आठ आहारविधिविशेषायतनांचाहि विचार करणें आवश्यक असतें. हीं आयतनें म्हणजे आहार नीट प्रकारें शरीराशीं समरस व्हावा म्हणून बारकाईनें विचार करण्यास योग्य अशीं कारणें होत. तीं (च. वि. १-१४) १) प्रकृति २) करण ३) संयोग ४) राशि ५) देश ६) काल ७) उपयोग संस्था व ८) उपयोक्ता. या नांवानें वर्णन केलेलीं आहेत. त्या सर्वांचेंच प्रमाणांत असणें, आणि मग त्याप्रमाणें आहार करणें, हें आहारापासून दुष्परिणाम न व्हावेत व 'अन्नजा' सारख्या उचक्या न याव्यात म्हणून आवश्यक असतें.

आहार्य द्रव्यांचा स्वभाव

१) प्रकृतिः— प्रकृति म्हणजे स्वभाव, अर्थात् आपण जें अन्न आहारांत उपयोगांत आणतो तें स्वभावतः पचनास हलकें किंवा भारी आहे काय याचा विचार करणें. उदाहरणार्थ, उडीद व मूग या दोन खाद्य द्रव्यांपैकीं उडीद हें स्वभावतः पचनास जड आहेत; उलट मूग हे हलके आहेत, त्याचप्रमाणें रानडुकराचें मांस हें स्वभावतः गुरु, तर काळवीटाचें हलकें, इत्यादि द्रव्यांसंबंधींचें जें ज्ञान त्याचा विचार करून आहार घेतला पाहिजे.

करण म्हणजे संस्कार

२) करणः— करण म्हणजे स्वाभाविक द्रव्यांवर केलेले इतर संस्कार. संस्कार म्हणजे गुणांतराधान. अर्थात् ज्या द्रव्यांत जो गुण नाहीं, तो त्यांत उत्पन्न करणें. याला व्यवहारांतील उदाहरण म्हणजे, आपण पांच सात वर्षांच्या बालकाचें उपनयन करीत असतो. उपनयनाचा अर्थ वास्तविकतः बालकास गुरुजवळ नेणें (उप=निकट + नयन=नेणें); अर्थात्, विद्यासंपादन करण्याकरितां गुरुजवळ पोंचविणें असा आहे. 'जन्मना जायते शूद्रो संस्कारात् द्विज उच्यते'। अर्थात् बालक हा जन्मतः शूद्र असून उपनयन संस्कार केल्यामुळें तो द्विज अर्थात् दुसरा जन्म प्राप्त झालेला असा म्हणवितो. यावरून जें द्विजत्व पूर्वी नव्हतें तें आणणें म्हणून यास संस्कार असें म्हणत असतात.

दही सूज उत्पन्न करतें

याप्रमाणें वस्तूमध्यें नसलेला गुण उत्पन्न करणें म्हणजेच करण किंवा संस्कार होय; हे गुण अनेक निरनिराळया प्रकारांनीं द्रव्यांत उत्पन्न केले जातात. उदाहरणार्थ, पाणी आणि अग्नि या दोन्हींच्या संयोगानें शिजविलेला भात हा गुणानें लघु अर्थात् हलका होत असून नुसते तांदुळ हे गुणानें गुरु अर्थात् पचनास भारी असतात. याला तोयाग्नि-संनिकर्षजन्य संस्कार असें म्हणत असतात. तसेंच, दही हें स्वभावतः सूज उत्पन्न करणारें आहे. परन्तु तेंच चतुर्थांश पाणी टाकून त्याचें मंथन केलें म्हणजे तें सूजनाशक होतें. हा मंथनज संस्कार होय.

वावडिंगाला गोमूत्राच्या भावना

आसव तयार करून तें निदान एक महिना मडक्यांत बंद करून ठेवलें म्हणजे पिण्याजोगें गुणकारी असें होतें. याला कालप्रकर्ष संस्कार असें म्हणतात. वावडिंगचूर्णाला एकवीस वेळ गोमूत्रांबरोबर पुन्हां पुन्हां घोटून दरवेळ उन्हांत वाळवीत गेलें म्हणजे तें एक अत्युत्तम कृमिनाशक द्रव्य होतें अशा या एकवीस वेळ केलेल्या संस्कारास भावनाजन्य संस्कार असें म्हणत असतात. याच प्रमाणें निरनिराळया द्रव्यांच्या फोडण्या व मसाले घालून त्या पचनास कठीण व्हाव्यात असें संस्कार आपण

सेवा संघाचीं सर्व औषधें तसेंच खात्रीचीं सर्व देशी काष्ठौषधी व ताजी वनस्पती आणि शिलाजीत, कस्तुरी, केशर, भीमसेनी कापूर, गोरोचन, वाकेरी भाते, वंशलोचन, नागकेशर, अनंतमूळ, जितसाया, उत्तम महाबळेश्वरी मध वगैरे औषधें मिळण्याचें ठिकाणः—

देशी सर्वौषधी संग्रहालय

पोलिस चौकीसमोर, दादर मुंबई २८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…ोन करितो. अर्थात् द्रव्यांच्या स्वाभाविक अवस्थे-
…ं निराळी अवस्था उत्पन्न करणें यालाच करण
…ी संस्कार म्हणत असतात. आणि अशाच या
…ारित जड द्रव्यांपासून अन्नजा हिक्का उत्पन्न
…ाचा संभव असतो.

दूध-मासोळीमुळें रक्तविकार

३) संयोगः— संयोग म्हणजे, दोन किंवा
…क द्रव्यें एकत्रित केलीं असतांना त्या एकत्रित
…ा शरीरावर होणारा जो परिणाम तो निर-
…ा द्रव्यांच्या परिणामापेक्षां नवीन असा
…व होत असतो. उदाहरणार्थ, दूध आणि
…ी हे दोन्ही पदार्थ एकत्रित करून खाल्ले असतांना
…े कुष्ठादि रक्तविकार उत्पन्न होत असतात.
…दूध निराळें पिऊन मासोळ्यांचें सेवन निराळें
…तर हे दुष्परिणाम होत नाहींत. म्हणून असले हे
…े आहारद्रव्यांत टाळले पाहिजेत. बरोबर प्रमा-
…घेतलेले मध आणि तूप विकारी असून एक
…व दुसरे जास्त असें असले तर कधींहि अपाय
…नाहीं.

सर्वग्रह व परिग्रह

४) राशिः— राशि म्हणजे प्रमाण. याचे दोन
…र असतात. १) सर्वग्रह, व २) परिग्रह. आहार्य
…त्या वस्तु असतील त्या सर्व एकत्रित मिसळून
…त्यांचा एकेक ग्रास घेणें याला 'सर्वग्रह' म्हणतात.
…चा उलट, म्हणजे आहार्य द्रव्यांपैकीं भात हा
…ठ प्रमाणांत, वरण त्यापेक्षां कमी प्रमाणांत, तूप
…ांहि कमी प्रमाणांत, अशा प्रकारें केलेला जो
…र त्याला 'परिग्रह' असें म्हणतात. उदाहरणार्थ,
…ी हा चार घरीं भिक्षा मागून एकत्रित झालेले
…मिसळविलेलें अन्न त्या सर्वांचा एक गोळा करून
…असतो. तो सर्वग्रह होय. आणि गृहस्थाश्रमी,
…ांत निरनिराळे पदार्थ निरनिराळ्या जागीं ठेवलेले
…न त्यांपैकीं प्रथम भात, नंतर पोळी, त्यानंतर
…ह वगैरे असे जे निरनिराळे ग्रास घेतो त्याला
…ग्रह म्हणतात. सर्वग्रहांतील अन्न हें पचनास गुरु
असून परिग्रहांतील हलकें असतें. सर्वग्रह रोगाला कारणीभूत होण्याचा संभव असतो.

ताकभात, वरणपोळी

५) देशः— निरनिराळ्या देशांत निरनिराळीं अन्नें सात्म्य झालेलीं असतात. उदाहरणार्थ, दक्षिणेस राहणाऱ्या लोकांस ताकभात आणि उत्तरेकडील लोकांस वरणपोळी. दक्षिणेंतील लोकांस उत्तरेंतील वरणपोळी खाण्याचा प्रसंग आला तर विकार होण्याचा संभव असतो; त्याचप्रमाणें उत्तरेंतील लोकांस ताकभात खाण्याचा प्रसंग आला तरी पण तसेंच होतें. तसेंच, मरुस्थलांत उत्पन्न झालेली वस्तु ही हलकी असून गुणवान् असते. तर उलट दलदल असलेल्या देशांत झालेली तीच वस्तु दोषकर होत असते.

कालाचे २ प्रकार

६) कालः— काल दोन प्रकारचा आहे. १) नित्यग आणि २) आवस्थिक. पैकीं नित्यग काल हा चालू असलेले, दिवस, रात्रि इत्यादि होय.

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आवश्यिक काल म्हणजे वयाच्या निरनिराळ्या, बाल, तरुण, वृद्ध या अवस्था, किंवा रोगाच्या निरनिराळ्या अवस्था पैकीं बाल्यादि कालावस्थांमध्यें पचन होणारीं द्रव्यें निरनिराळीं असतात. जसें, बालवयांत दूध किंवा पातळ भात. त्याच प्रमाणें वार्धक्यांत हलकें व वाताला उत्पन्न न करणारें असें मुगाचें वरण, पोळी, दुध्याची भाजी इत्यादि; तारुण्यांत मात्र जिलबी, श्रीखंड, इत्यादि हवें तसे भारी पदार्थ पचूं शकतात. रोगाच्या दृष्टीनें मंथर ज्वर (Typhoid) झाला असतांना पहिल्या आठवड्यांत नुसत्या तापलेल्या पाण्याखेरीज कांहीं न देणें. दुसऱ्या आठवड्यांत फळांचे रस व ज्वर उतरूं लागल्यानंतर साळीच्या लाह्या इत्यादि हलके पदार्थ सेवन करणें हें कालाच्या व व्याधीच्या अवस्थांवर अवलंबून असतें. नित्यग काळांतहि थंडीच्या दिवसांत तिळाचे लाडू, गुळाच्या पोळ्या इत्यादि उष्ण पदार्थांचें सेवन, वर्षाऋतूंत फक्त ताकभात आणि उन्हाळयांत शरबतें इत्यादि. हें सर्व कालानुसार नियमानें सेवन करणें योग्य ठरतें.

आहाराच्या उपयोगासंबंधीं नियय

७) उपयोग संस्थाः— म्हणजे आहारद्रव्याच्या उपयोगासंबंधींचे नियम. हे बहुधा पूर्वी केलेला आहार जीर्ण झाल्यावर पुन्हां करणें हेंच प्रधान नियमांत अंतर्भूत होतें. परन्तु त्या बरोबरच आतांच पुढें वर्णन केले जाणारी आहार्य द्रव्यांची (उष्णं, स्निग्धं इत्यादि सूत्रद्वारा केली जाणारी) परिस्थिति हीहि उपयोगसंस्थेंत अन्तर्भूत होत असतें.

अभ्यासामुळें पचन

८) उपयोक्ताः— उपभोग घेणारी व्यक्ति. या व्यक्तीला जे जे पदार्थ बरेंच दिवस आहार्य द्रव्यांत घेतल्यामुळें सात्म्य झालेले असतात, ते, तेच पथ्यकर किंवा अपथ्यकर असलेले देखील अभ्यासामुळें पचतात. म्हणून त्याला वरील नियमांपैकीं बरेचसे टाळतांहि पण येतात. कारण त्याची शरीरप्रकृतीच मुळीं त्या त्या आहारांना पचन करणारी अशी बनते.

याप्रमाणें केवळ प्रमाणांत केलेल्या आहारानेंच आहाराचें फल योग्य प्रमाणांत मिळतें असें नसून प्रकृत्यादि आठहि हेतूंकडे आहार करतांना लक्ष देणें आवश्यक असतें. तरच मनुष्य निरोगी राहूं शकतो.

१० प्रकारच्या नियमांचा विचार

वर वर्णन केल्याप्रमाणें आहार योग्य प्रमाणाचा व आठहि गुणांनीं युक्त असला तरी तो सेवन करीत असतांना पुन्हां दहा प्रकारच्या नियमांचा विचार करावा लागतो.

चरकाचार्य वि. १–३५ सूत्रांत म्हणतातः— 'उष्णं स्निग्धं मात्रावत् जीर्णे वीर्याविरुद्धं इष्टे देशे इष्टसर्वोपकरणं नातिद्रुतं नातिविलंबितं अजल्पन् अहसन् तन्मना भुञ्जीत आत्मानं अभिसमीक्ष्य सम्यक्'। या सर्व नियमांच्या पालनानें केलेला आहार उत्तम परिणामकारी होत असतो. सबब त्या प्रत्येकाचें निरनिराळें विवरण करूं.

गरम गरम जेवावें

१) उष्णं अश्नीयात्ः— जेवण सदैव ऊन असलेल्या अन्नाचें करावें. कारण, गरम पदार्थ खाल्ला असतांना तो तोंडास स्वादयुक्त वाटतो, खाल्लेलें अन्न ऊन असल्यामुळें तें पाचक पित्तास जास्त प्रमाणांत उदीरित करतें. कारण, 'वृद्धिः समानैः सर्वेषाम्' या नियमाप्रमाणें शरीरांत पोंचलेल्या समानगुणी द्रव्यानें दुसऱ्या समानगुणी द्रव्याची वाढ होते.

मे. कुमार मेडिकल स्टोअर्स

पो. वालचंदनगर (पुणें)

(प्रोप्रा.–कांतिलाल एस्. गांधी)

आमच्याकडे "आयुर्वेद सेवा संघ" नासिक यांची सर्व औषधें, त्याचप्रमाणें देशी विलायती औषधें, स्टेशनरी व वॉचेस मिळतील. हमखास गुणकारी औषधें अगस्तिप्राश व कंदर्पवृष्य-पाक एकदां वापरून खात्री करून घ्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

… अन्न उष्ण असले म्हणजे उष्ण वीर्य असणारें … पित्ताहि जास्त प्रमाणांत उत्पन्न होतें. याप्रमाणें … पित्ताची उत्पत्ति अधिक झाली म्हणजे त्या … पचनकार्य (Bio-Chemical action) … लवकर होऊन पचनक्रिया त्वरित (Brisk) … लवकर झाल्यामुळें सारभाग संशोषित … अन्नांना उत्पन्न होणारा जो वायु (च. चि. …) तो त्या अन्नांतील उष्णतेमुळें शरीरा- … लवकर निघतो. अर्थातच त्याचें अनुलोमन … प्रकारें होतें, आणि शेवटीं, कफद्रव्य हें … शीतवीर्य असल्यामुळें आहारांतील … त्याचें शरीरांतील प्रमाण कमी होतें. अर्थात् … होतो. इतके सर्व गुण उष्ण आहारांत … सदैव गरम गरम भोजन सेवन करावें.

प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत

१ कळँग्याची मीमांसा	किं. ६ रु.
२ आधुनिक आहारशास्त्र	१॥ रु.
३ आधुनिक कामशास्त्र	४ रु.
४ वेश्याव्यवसाय	२ रु.
५ समाजस्वास्थ्य मासिकांतील निवडक लेख भाग २रा	२ रु.
६ समाजस्वास्थ्य मासिक (वार्षिक वर्गणी)	३ रु.
७ संततिनियमन (सचित्र)	१। रु.
८ गुप्तरोगांपासून बचाव	१ रु.
९ तेरा गोष्टी	१ रु.
१० त्वचेची निगा	८ आणे
११ गुरुबाजी (नाटक)	८ आणे
१२ न्यायाचा शोध (नाटक)	१ रु.
१३ पॅरिसच्या परी	३ रु.

१ राइट एजन्सी, नवी भंटवाडी मुंबई ४

२ वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

स्निग्ध भोजन करावें

२) स्निग्धमश्नीयात्:- भोजन सदैव स्नेह-युक्त अर्थात् तूप, तेल, आदि स्निग्धपदार्थयुक्त असें करावें. कारण स्निग्ध भोजन सदैव रुचतें. त्याचें सेवन केल्यानंतर जर पित्ताचें उदीरण झालेलें नसेल, तर त्यांत असणाऱ्या अग्निवर्धक अशा तुपामुळें पित्ताचा स्राव अधिक होतो आणि त्यामुळें अन्न लवकर पचतें, वाताचें अनुलोमन होतें, शरीरांतील धातूंची वाढ होते, ज्ञानेंद्रियें स्नेहानें तृप्त होऊन मजबूत आणि कार्यक्षम बनतात, शारीरबल वाढतें, आणि शरीराचा वर्ण सुंदर बनतो व प्रसन्नता वाटते. म्हणून सदैव स्निग्ध विशेषतः घृतयुक्त असें भोजन करावें. 'आयुर्वै घृतम्' असें वेदांत म्हटलेलें आहे.

प्रमाणांत जेवावें

३) मात्रावदश्नीयात्:- जेवण प्रमाणांतच सदैव करावें. तसें केल्यानें शरीरांत उत्पन्न होणाऱ्या वातपित्तकफसंज्ञक द्रव्यांवर त्या अन्नाचा दाब न पडतां तें आयुष्य वाढविण्यास मदत करतें, पचन झाल्यावर गुदभागापर्यंत सुखानें पोहोंचतें. पाचक-पित्त प्रमाणांतच उत्पन्न झाल्यामुळें अग्नीच्या उत्पत्तींत कोणतीहि बाधा आणीत नाहीं. [अधिक प्रमाणांत घेतलें असतांना त्या अधिक अन्नाचा दाब पाचक पित्त स्रवणाऱ्या नलिकेवर पडून अवरोध करण्याचा परि-णाम करतो. आणि म्हणून पाचकपित्ताची उत्पत्ति कमी प्रमाणांत होते. यालाच अग्नीचा नाश करणें असें म्हणतात.] तसें झालें म्हणजे, प्रमाणांत घेतलेल्या अन्नाचा पाक आंतड्यांत कोणत्याहि प्रकारची व्यथा न होतांना संपन्न होतो, म्हणून सदैव प्रमाणांतच भोजन करावें.

पहिलें पचन झाल्यावर जेवावें

४) जीर्णे अश्नीयात्:— पूर्वी केलेला आहार पूर्णपणें पचल्यानंतर पुन्हां जेवण करावें. कारण, पूर्वीचा आहार जर पचला नसला, आणि तशाच अवस्थेंत नवीन आहार केला, तर पूर्वीच्या आहारा-पासून उत्पन्न झालेला रस हा अपक्वावस्थेंत, अर्थात्

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पूर्णपणें रसांत परिणत झालेला नसून तो नवीन केलेल्या आहाररसाबरोबर संमिश्रित होतो, आणि त्यामुळें सर्व दोषांना प्रकुपित करतो. कारण या अवस्थेंत परिणत आणि अपरिणत अशा दोषांचें संमिश्रण होऊन ते दोष प्रकुपित होतात. परंतु पहिला आहार पूर्णपणें पचल्यानंतर नवीन आहार केला असतांना पूर्वीच्या आहारक्रियेंत उत्पन्न झालेले दोष आपापलीं कार्यें करून स्वस्थानांत स्वस्थ असे पुढील आहाराची आकांक्षा करीत बसलेले असतात. त्यामुळें पाचकाग्नि हा उदीरित असतो. अशावेळीं भूक जोरांत लागते. अन्नवह व इतर प्रकारचीं तेराहि स्रोतसें (च. वि. ५ अ. पहा) विवृत असतात. अर्थात् त्या स्रोतसांतील नलिकांमध्यें कोणतेंहि अवरोध करणारें द्रव्य नसल्यामुळें त्या स्रोतसांचीं मुखें उघडीं असतात. आणि त्यांतून पुढें होणारें रसादि सप्तधातूंचें परिवर्तन नीट प्रकारें होतें. तशा स्थितींत येणाऱ्या ढेंकरा ह्याहि अगदीं शुद्ध अशा वायूच्या असतात. हृदय अवयव अगदींच शुद्ध असतो. कारण त्यांत होणाऱ्या रसरक्तांचा संचार योग्य प्रमाणांत उत्पन्न झालेल्या रसरक्तांमुळें योग्य रीतीनें होत असतो. वाताचें अनुलोमन होत असतें. याप्रमाणें वात, मूत्र व मल यांचे वेग निघून जाऊन, ही मलरूप द्रव्यें शरीरांतून बाहेर गेल्यामुळें त्यानंतर केलेला आहार सर्व शरीरधातूंना कोणत्याहि प्रकारें दूषित न करतां आयुष्याच्या वाढीस कारणीभूत होतो. म्हणून सदैव जो आहार करावयाचा तो पूर्वीचा आहार पचल्यावरच करावा.

५) वीर्याविरुद्धमश्नीयात्— आहार जो करावयाचा त्यांत विरुद्धवीर्यवान् द्रव्यांचें मिश्रण (क्षीर, मत्स्य इत्यादि) कधींहि नसावें. म्हणजे विरुद्धवीर्य आहारापासून उत्पन्न होणारे जे कुष्ठ, आंध्य, विसर्प इत्यादि विकार ते होत नाहींत.

मनपसंत स्थळीं जेवावें

६) इष्टे देशे इष्टसर्वोपकरणं च अश्नीयात्-जेवण जें करावयाचें तें रम्य अशा स्थानीं आणि सर्व प्रकारच्या आवश्यक अशा उपकरणांनीं युक्त असें करावें. त्यामुळें मनावर दुष्परिणाम करणारे आणि चित्ताला संताप उत्पन्न करणारे असे मानसिक परिणाम होत नाहींत. उपकरणें नसलीं म्हणजे देखील मनावरच दुष्परिणाम होतो, आणि मन व शरीर यांचा परस्पर घनिष्ट संबंध असल्यामुळें मनावरील परिणाम हा शरीरावरहि आघात उत्पन्न करतो.

घाईनें जेवूं नये

७) नातिद्रुतमश्नीयात्:— जेवण फार जलद करूं नये. कारण तसें केलें असतांना अन्नाचा कांहीं अंश मागें कासचिकित्सेंत वर्णन केल्याप्रमाणें श्वासवह नलिकेंत (Trachia) जाण्याचा संभव असल्यानें कासादि विकार उत्पन्न होतात. अन्न जितक्या वेळपर्यंत आमाशयांत-तेथील क्लेदक कफ चांगल्या प्रमाणांत उत्पन्न होऊन मिसळूं न शकल्यामुळें-राहावयास पाहिजे तितकें न राहिल्यानें तें पातळ होत नाहीं आणि त्यामुळें पाचकपित्ताचा संस्कार त्याच्या प्रत्येक कणावर न होऊन पचनकार्य बिघडतें. आणि अन्नापासून उत्पन्न होणारा जो उत्साह त्याऐवजीं अनुत्साह व अंगढिलेपणा पदरीं येतो. अन्नांत चुकीनें मिसळून गेलेले केस किंवा काड्याहि त्या जलदीच्या जेवणाबरोबर गिळल्या जातात, आणि त्यामुळें अनेक रोग उत्पन्न होण्याचा संभव असतो, म्हणून फार जलद जेवण करूं नये.

तारुण्य कायम टिकविण्यासाठीं
शक्तिवर्धक व धातुपौष्टिक खाद्य
कंदर्प-वृष्य पाक
तसेंच स्त्रियांचा मासिक धर्म बरोबर व
बिनतक्रार चालू रहाणेसाठीं
पुष्पवटी इ.
आयुर्वेद सेवा संघाचीं सर्व अनुभविक
गुणकारी औषधें हैद्राबादेंत मिळण्याचें ठिकाण.-
* मे. आयुर्धाम मेडिकल हॉल *
सुलतान बझार, कोठी बसस्टँड समोर हैद्राबाद [द.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फार रेंगाळत जेवूं नये

८) नातिविलंबितमश्नीयात्:— जेवण फार हळूहि करूं नये. तसें केल्यानें अन्नापासून होणारी एक तृप्ति ती प्राप्त होत नाहीं. अन्नाचें प्रमाण अधिक असें पोटांत जातें. समोर असलेलें द्रव्य फार थंड असें होऊन जातें आणि मग तेंच घेतलें गेल्यामुळें त्याचें पचन नीट होत नाही. म्हणून फार हळूं जेवण करूं नये.

न बडबडतां, जेवावें

९) अजल्पन् अहसन् तन्मना भुञ्जीतः—जेवण करतांना तोंडानें बडबड करूं नये, हंसूं नये, व मन व लक्ष्य जेवणाखेरीज इतर ठिकाणीं लावून जेवण करूं नये. तसें केलें असतांना लवकर लवकर जेवण्यापासून जे दुष्परिणाम होतात (नं. ७) तेच परिस्थितीतहि होतात.

स्वतःचा विचार करून जेवावें

१०) आत्मानमभिसमीक्ष्य भुञ्जीत सम्यक्:— आपल्या शारीरस्थितीकडे लक्ष देऊन आपण जेवण करावें. अमका पदार्थ मला पचतो, अमका पचत नाहीं, अशा प्रकारचें जें ज्ञान मनुष्यास अनुभवानें होत असतें, त्याचा योग्य विचार करून प्रत्येक मनुष्यास जें सात्म्य झालेलें अन्न असेल तेंच त्यानें सेवन करावें.

एकूण १८ गोष्टींचा विचार

याप्रमाणें आठ अशी आहारविधिविशेषायतनें आणि भोजनासंबंधींचे इतर दहा नियम या सर्व अठराहींचा योग्य विचार करून केलेला आहार हा सदैव शरीरास पुष्टि देणारा असा होतो, आणि त्यामुळें अन्नजा हिक्का कधींहि होण्याचा संभव नसतो.

पवित्र नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहा:-नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

ग्रामीण वैद्य परीक्षा बोर्ड

मद्रास येथें सरकारतर्फे जें ग्रामीण वैद्य परीक्षा बोर्ड स्थापन झालें आहे, त्या बोर्डातर्फे ६ महिन्याचा वैद्यकीय शिक्षणक्रम आखलेला आहे. हें शिक्षण प्राथमिक स्वरूपाचें आहे. तथापि तें खेडेगांवाच्या दृष्टीनें फार उपयुक्त आहे.

या वैद्यांनीं गांवांच्या स्वास्थ्यविकासासाठीं स्थानिक दलाचें सहाय्य घ्यावें.

मद्रास प्रांतांत या प्रकारच्या शिक्षणाचीं केंद्रें अगदीं थोडींच आहेत. शिक्षणासाठीं फार दूर जावें लागते व तें खार्चिक पडतें. ही योजना त्यामुळें पुरी सफळ झाली नाहीं. अशा प्रकारचीं शिक्षणकेंद्रें सर्व भारतांत निर्माण झालीं पाहिजेत. म्हणजेच जनतेची गरज पुरी होऊं शकेल.

बडोदें येथील सयाजी विद्यापीठाची

आयुर्वेदविशारद परीक्षा

बडोदें येथील महाराजा सयाजीराव विद्यापीठाचा 'आयुर्वेदविशारद' हा डिप्लोमा धारण करणाऱ्या व्यक्तींना १९३८ च्या मुंबई मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्टाच्या ३२ व्या कलमाच्या बाबतींत सूट देण्यांत आली असून अशा लोकांना आतां वैद्यकीचा व्यवसाय करतां येईल.

तेंच माझें खरें शिक्षण

धुळें येथें भाषण करतांना पं. नेहरू म्हणाले, "कॉलेजांतलें शिक्षण म्हणजे विद्या नव्हे. खूप शिक्षण घेऊनहि कांहीं लोक कायमचे अज्ञानी रहातात. मी स्वतः बी. ए., एम्. ए. च्या परीक्षा दिल्या. पण माझें खरें शिक्षण मी पदव्या घेतल्यावर सुरू झालें.

तुरुंगांत आणि जगाच्या प्रत्यक्ष धकाधकींत जें ज्ञान मला मिळालें, तेंच माझें खरें शिक्षण होय."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार—

नागपुरचें आयुर्वेदासन

नागपूर युनिव्हर्सिटीमध्यें आयुर्वेदीय संशोधनासाठीं निर्माण झालेल्या जागेवर आचार्य वै. वेणीमाधवशास्त्री जोशी यांची नियुक्ति झाल्याचें ऐकून सर्वांस संतोष होईल. हें फार दिवस कुचंवत राहिलेलें काम अखेर निकालांत निघालें व योग्य व्यक्तींची निवड झाली हें आयुर्वेदीयांचें भाग्य होय. या प्रकरणीं सर्व संबंधितांस धन्यवाद देणें उचित आहे.

बराच आर्थिक त्याग

मात्र या प्रसंगीं एक गोष्ट सर्वांच्या माहितीसाठीं मुद्दाम नमूद करून ठेवणें आवश्यक वाटतें, व ती अशी कीं, ही जागा रु.७०० दरमहावर स्वीकारण्यांत आचार्यांना बराच आर्थिक त्याग करावा लागणार आहे. मुंबई येथें त्यांच्या व्यवसायांत (Practice मध्यें) त्यांना त्यापेक्षां अधिक मिळकत होत असून नागपूरला जातांना, बसलेली धंद्याची घडी त्यांना मोडावी लागणार आहे. व नुकतेंच दादर येथें रु. १५०००-१६००० खर्चून घेतलेल्या नव्या जागेचीहि अन्य व्यवस्था (कदाचित् थोडेंफार नुकसान सोसूनही) करावी लागणार आहे.

नागपूरची रहाणी

खर्चाच्या दृष्टीनें पहावें तर नागपूरचा राहणीचा खर्च मुंबईपेक्षां कमी नाहींच पण कांकणभर जास्त हें मी स्वानुभवावरून सांगूं शकतो. (नागपुरास धान्य चांगल्या प्रतीचें मिळतें हें खरें पण मुंबईच्या इतर सोई फारच कमी आहेत.) पूर्वींहि आयुर्वेदशास्त्राच्या सेवेसाठीं आचार्यांनीं अनेकवेळां स्वार्थत्याग पत्करला आहे. व याप्रसंगीं व पुढेंहि जरूरीनुसार असाच त्याग ते पुन्हां पत्करतील हें निःसंशय. पण या अशा गोष्टींची कृतज्ञतापूर्वक जाणीव ठेवणें वैद्यसमाजाचें कर्तव्य आहे.

कार्यकर्ते आधींच थोडे

आपणामध्यें त्यागपूर्वक शास्त्रकार्य वा वैद्यसमाजासाठीं सार्वजनिक उपयुक्त कार्य करणारे आधींच थोडे ! जे कांहीं थोडे आहेत त्यांच्या त्यागाचें वा कार्यांचें चीजहि जरूर तेवढें होतांना दिसत नाहीं. ही परिस्थिति नवनवीन कार्यकर्ते निर्माण होण्याच्या दृष्टीनें उत्तेजन देणारी नव्हे ! याचा विचार वैद्यमंडळींनीं ठेवणें सर्व आयुर्वेदीयांच्या हिताचें आहे.

नागपूर　　　　—वैद्य ज. के. सबनीस

निदाघोत्सव, रानीखेत

आपल्याकडे वसंतोत्सव करतात त्याप्रमाणें रानीखेत (हिमालय) या भागांत ग्रीष्मोत्सव करण्याची पद्धत आहे असें समजतें. ता. २५ मे पासून ८ जूनपर्यंत हा उत्सव तेथील नागरिक व अधिकारी साजरा करणार आहेत. उत्तरप्रदेशाचे राज्यपाल श्री. कन्हैयालाल मुनशी या उत्सवांत भाग घेणार आहेत.

ऋतुचर्येचें ज्ञान द्यावें

आपापल्या भागांत चिकित्सकांनीं असा एखादा समारंभ घडवून आणण्याची व त्या प्रसंगीं ऋतुचर्येचें ज्ञान जनतेस करून देण्याची प्रथा सुरू केली तर ती प्रतिबंधक उपचार या दृष्टीनें फारच उपयुक्त ठरेल.

सुईणीचें शास्त्र किं ४ रु.
लेखक —डॉ. द. वा. चाफेकर
-: वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक :-

गुळवेल सत्व व वाकेरी भाते ५ रु. रत्तल. उत्तम मध, दशमुळें व इतर २०० फौंडाघाटच्या वनस्पती व त्यांचीं चूर्णें मागणीप्रमाणें पुरवूं.
परुळेकर ब्रदर्स, मोंगल लेन, मुंबई १६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेखकः—वृद्ध वैद्य

तुलनात्मक चिकित्सा प्रकरण १२ वें—

उचकी (हिक्का) निदान व चिकित्सा

या व्याधीमध्यें बाह्यतः जें लक्षण दिसतें तें १) वायु हा बेंबीपासून निघून वर येत असतो. पूर्वोक्त काळाच्या संप्राप्तींत वर्णन केल्याप्रमाणें प्राण व उदान या दोन्हींचा संयोग होऊन उदानवायु वरच्या प्रकारचा 'हिक् हिक्' असा आवाज करीत असतो. म्हणून त्यास (हिक् हिक् ध्वनिं करोतीति हिक्का) या विग्रहाप्रमाणें नामकरण केलेलें आहे.

२) या व्याधींत रुग्णास अशी धास्ती वाटते कीं, यकृत्, प्लीहा आणि अंत्र हे तिन्ही अवयव जणुं कांहीं बाहेरच पडण्याचा बेतांत आहेत.

३) याच्यामध्यें होणारा ध्वनि हा कोणत्यातरी स्थानांतून वर वायु येत असतांना जसा होतो तसा होत असतो.

४) ही उचकीची क्रिया सतत चालूं असल्या-मुळें मनुष्यास एक क्षणहि विश्राम मिळत नाहीं.

५) अशा स्थितींत ती क्रिया क्रमशः वाढून परंतु फारच लवकर (दोन चार दिवसांत) प्राणघातक होतो.

अशा या दुर्धर, अत्यन्त कष्टदायक आणि प्राणघातक व्याधीस 'हिक्का' असें म्हणतात; आणि कोष्ठांतील वायूच्या विकृतीमुळें ती उत्पन्न होते, म्हणून उष्ण व स्निग्ध पदार्थांचें सेवन करीत असतां वातविकृति न होवो अशी खबरदारी घेत राहिलें पाहिजे. कारण उचकी विकार एकदां झाला म्हणजे बरा करणें हें फार कठीण आहे.

हिक्केचे पांच भेद

हिक्का पांच प्रकारची असते. १) अन्नजा, २) यमला, ३) क्षुद्रा, ४) गंभीरा आणि ५) महती. दोषदृष्ट्या पाहूं गेलें असताना ही विकृति मुख्यतः वाताची असून त्यांत कफदोषाच्या विकृतीचा संयोग असतो. पित्तविकृति कधींहि नसते. आणि म्हणूनच उष्ण व स्निग्ध उपचार हवे तितके तीव्र केले तरी चालतात. चिकित्सा करतांना वातनाशा-कडेच प्रधान लक्ष द्यावें.

हिचकीचें पूर्वरूप व उपचार

बहुधा कोणतीहि हिचकी होण्यापूर्वीं पोटांत विकार होऊन अन्नादींचें पचन होण्यांत बाधा येते. परिणामतः पोट फुगतें. गळा व छाती हे भाग भरून आल्यासारखे वाटतात. आणि तोंड चिकट व तुरट रसानें युक्त असें होतें. तात्काल पोटाचा उप-चार केल्यास हा व्याधि होऊं शकत नाहीं. म्हणून ताबडतोब पाचकचूर्णें, बस्ति (Enema) देऊन विशेषतः गोमूत्रसेवन करवून पोटांतला विकार दूर करावा.

१) अन्नजा— आयुर्वेदीय अन्नपानविधि या लेखांत वर्णन केल्याप्रमाणें आहार व द्रवपदार्थ अतिप्रमाणांत सेवन केले असतांना वातद्रव्यावर जोराचा दाब पडून त्या द्रव्याची गति उलट होऊन हिचकी उत्पन्न होते. ज्याप्रमाणें एखाद्या नळिकेंत वायु भरला असतांना त्याच्यावर भलत्या मार्गानें दाब पडला म्हणजे Action and Reaction are equal and opposite या नियमाप्रमाणें त्याची गति उलटी होते. त्याचप्रमाणें पक्वाशयांतील वाताचीहि गति होते. या उचकीस अन्नजा उचकी असें म्हणत असतात.

(२) यमला— ज्या उचकींत एकाच वेळीं दोन दोन उचक्या येतात आणि ही जोडी पुष्कळ वेळानंतर पुनःपुन्हां आपले वेग दाखविते, आणि जिच्यामुळें डोकें आणि मान हे एकसारखे कांपतात, तिला यमला असें म्हणतात. यमल म्हणजे दोन आणि एकाच वेळीं दोन वेग येतात म्हणून तिचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नांव यमला असें ठेवलें आहे.

(३) क्षुद्रा—जी उचकी मंद वेगानें आणि पुष्कळ वेळानंतर पुनःपुन्हां येते, त्याचप्रमाणें जिचा उगम बेंबीजवळील पोटाच्या भागांत होऊन मानेच्या मुळापर्यंत वर जातो, तिला क्षुद्रा म्हणतात.

४) गंभीरा- जी उचकी नाभिप्रदेशापासून उत्पन्न होऊन खोल असा मोठा ध्वनि उत्पन्न करते, आणि जिच्यांत श्वासकासादि अनेक उपद्रवहि असतात, तिला गंभीरा असें म्हणतात.

५) महती- जी हिचकी एकसारखी दिवस रात्र चालू असते. जिच्यामुळें शरीरांतील सर्व मर्मस्थानें-विशेषतः हृदय (Heart), मस्तिष्क (Brain) आणि बस्ति (Bladder) हीं तीन मर्मस्थानें पीडित होतात आणि शरीराचीं सर्व अंगें सारखी कांपत राहतात, तिला महाहिक्का असें नांव आहे.

उचकीचीं साध्यासाध्य लक्षणें

ज्या मनुष्याचे १) उचकीमुळें शरीर ताणलें गेल्यासारखें वाटतें. २) डोळे सदैव ताठरलेले व वर पाहत असलेले असे दिसतात. ३) जो अत्यन्त क्षीण झालेला असतो. ४) ज्याची अन्नावर मुळींच रुचि नसते, आणि ५) ज्याला शिंका फार जास्त येतात, तो असाध्य समजावा. त्याचप्रमाणें शेवटच्या दोन म्हणजे गंभीरा आणि महती या उचक्यांनीं पीडितहि असाध्य समजावा.

ज्या मनुष्याच्या शरीरांत (१) वातपित्तकफ हे तिन्ही दोष अत्यंत संचित झालेले असतील, आणि (२) अन्न न जात असल्यामुळें व पूर्वी झालेल्या व्याधीमुळें ज्याचें शरीर कृश व क्षीण झालेलें असेल, तसेंच (३) म्हातारपणीं उत्पन्न झालेली आणि (४) स्त्रीसेवन अति करणाऱ्यास झालेली, अशा या चारहि प्रकारच्या हिक्का प्राणनाशास कारणीभूत होतात.

वर वर्णन केलेली यमला नांवाची हिचकी झाली असतांना त्या रुग्णास जर तहान फार लागत असेल, सर्व शरीरांत तीव्र असें दुःख होत असेल, बेशुद्धि असून बडबड करीत असेल तर ती असाध्य समजावी. ही यमला क्षीण नसलेल्या मनुष्यास किंवा जो कोण त्याहि प्रकारें हीनदीन झालेला नाहीं आणि ज्याचे सप्तधातु आणि इंद्रियें हीं स्थिर असून पूर्ण जोमांत असतील अशास झालेली साध्य होते. तसें नसल्यास ती असाध्यच जाणावी.

उचकी रोगाची चिकित्सा

हिचकीच्या निदानांत वर्णन केल्याप्रमाणें हा व्याधि वातकफजन्यच विशेषतः वातज असा आहे, म्हणून जे जे वातनाशक उपाय करतां येतील ते सर्व उपयोगांत आणावें.

१) बृहत्पंचमूल आणि लघुपंचमूल मिळून होणारी जीं दशमुळें त्यांचा काढा व चूर्ण ही याच्यावर द्यावीं.

बिल्वोऽग्निमंथः श्योनाकः काश्मरी पाटला तथा।
शालिपर्णी पृश्णिपर्णी बृहतीद्वयगोक्षुरम् ॥
दशमूलमिदं श्वाससन्निपातज्वरापहम्।

यांत वर्णन केलेलीं दहाहि मुळें वातनाशक असल्यामुळें त्यांचा उपयोग करावा. या मुळांचा काढा तयार करून त्यांत तूप व वत्सनाभाचें चूर्ण घालून द्यावा. वत्सनाभाची शुद्धि अनुभविक चिकित्सा प्रथम भाग पा. १७ वर दिलेली आहे. प्रयोग करतांना काढा दररोज तयार करावा. एक तोळा एकंदर दाही दशमुळांच्या संमिश्र वजनांत २० तोळे पाणी घालून १ ते १॥ तोळे उरवावा. त्यांत १ तोळा तूप व ·॥- गुंज ते १ गुंज शुद्ध वत्सनाभाचें चूर्ण मिसळावें. अशा प्रकारें दोन मात्रा सकाळ संध्याकाळ द्याव्या.

शेंदुर्णी येथें
श्री. मु. ग. राजहंस
यांजकडे आयुर्वेद सेवा संघ नासिकचीं सर्व अनुभवसिद्ध शास्त्रोक्त गुणकारी औषधें मिळूं शकतील. आपणहि एकवेळ वापरून गुणांची खात्री करून घ्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोरपिसाचें ताम्र

२) मोरपिसांतील मधला भाग ज्यांत ताम्रवर्ण ...प्रमाणांत दिसून येतो तो वजनांत बराचसा ...जवळजवळ एक शेर घेऊन एका गाडग्यांत ...रून त्याला तीव्र आंच द्यावी. म्हणजे आंतील ...वडून त्यांतील तांबें एकत्रित होतें. अशा प्रकारें ... ताम्र उपलब्ध होईल तें काढावें. हें फार ...ी द्रव्य आहे.

गांडूळांतील ताम्र

...त्याचप्रमाणें गांडूळ जितके उपलब्ध होऊं ...तितके मिळवून त्यांना वाळवून वर प्रमाणेंच ...यांत ठेवून बंद करून त्यालाहि तीव्र आंच ...ी, म्हणजे त्यांतील ताम्र निराळें होतें.

मोरचुदांतील ताम्र

...तसेंच, तुत्थ (मोरचूद-Copper sulphate) ...मडक्यांत ठेवून बंद करून त्यालाहि तीव्र आंच ...ी, म्हणजे त्यांतील ताम्र निराळें होतें.

तिन्ही ताम्राची आंगठी

...याप्रमाणें मिळवलेलीं तिन्ही ताम्रें बरोबर प्रमा- ...घेऊन त्याची एक आंगठी तयार करून सदैव ...ा हातांत वाळगावी. ही आंगठी दगडावर ...सहानेवर मध घेऊन त्याच्यांत दहा वीस वेढे ...ावी. तें उगाळलेलें द्रव्य चाटविलें असतां ...की बंद होते. अर्थातच तें तीव्र उचक्या येत ...ांना दिवसांतून कित्येक वेळ चाटवावें लागतें.

मोरपंखाचें भस्म + पिंपळी

३) हें तिन्ही प्रकारचें ताम्र उपलब्ध नसल्यास ...चें भस्म करून त्याच्यांत बरोबर प्रमाणांत ...चें वस्त्रगाळ चूर्ण मिसळून ठेवावें. हें मिश्रण ...त चाटविलें असतांना हिचकी, श्वास आणि ...क वांति हे सर्व बरे होतात.

सोमनाथी ताम्रभस्म

४) सोमनाथी ताम्रभस्म-पारा व गंधक हीं दोन्ही ...बरोबर प्रमाणांत घेऊन त्यांत अर्धा भाग शुद्ध ...ळ व चतुर्थांश मनःशिला घालावी. या सर्वांना पुष्कळ वेळ घोटून त्याची कज्जली करावी. नंतर लिंबाच्या रसांत ही कज्जली भिजवून त्यानें पान्याच्या बरोबर प्रमाणांत घेतलेल्या तांब्याच्या बारीक पत्र्यांना लेप करावा. त्यानंतर वालुकायंत्रांत हे पत्रे ठेवून त्यांना क्रमशः वाढणारा असा अग्नि द्यावा. याप्रमाणें दोन प्रहरपर्यंत अग्नि दिल्यानंतर त्या यंत्रास आपोआप थंड होऊं द्यावें. थंड झाल्या-नंतर त्यांतील ताम्रपत्रांचें झालेलें भस्म काढून घ्यावें. याला सोमनाथी ताम्रभस्म असें म्हणतात. १/८ ते १/२ गुंज हें भस्म आल्याचा रस व मधाबरोबर दिलें असतांना हिचकी बंद होते.

ताम्र हें विष आहे

५) ताम्रासंबंधीं शास्त्रकार जें म्हणतात, तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

'न विषं विषमित्याहुः ताम्रं तु विषमुच्यते ।
एको दोषो विषे, ताम्रे त्वष्टौ दोषाः प्रकीर्तिताः ॥
भ्रमो मूर्च्छा विदाहश्च स्वेदक्लेदनवांतयः।
अरुचिश्चित्तसंताप एते दोषा विषोपमाः ॥
तस्मात् संशोधयेत् ताम्रं तद्दोषविनिवृत्तये ।"

यावरून सर्व धातूंत ताम्र हाँच धातु अनेक विषाहून देखील अधिक दोष उत्पन्न करणारी आहे हें समजून त्याचें शोधन व मारण फार काळजीपूर्वक करावें. कारण, ताम्र उत्तम प्रकारें भस्म झालें म्हणजे तें अमृतासारखे व तात्कालिक गुण करणारें असें होतें.

ताम्रशोधनः— त्रिधारी निवडुंगाचें दूध व सैंधवमीठ हे दोन्ही मिसळून त्यानें तांब्याच्या पत्र्यांना लेप करावा. आणि ते विस्तवांत लाल तापवून निर्गुंडीच्या रसांत विझवावे किंवा पत्रे लाल तापवून निवडुंगाच्या व रुईच्या दुधांचें त्यांच्यावर सिंचन करावें, अथवा एक प्रहर तांब्याचे पत्रे, यवक्षार गोमूत्र आणि लिंबाचा रस या तिन्हींच्या मिश्रणांत तीव्र अग्नि देऊन शिजवावे. म्हणजे ते शुद्ध होतात.

ताम्रमारण

शुद्ध केलेल्या ताम्राचें चूर्ण करून बरोबर प्रमाणाचा पारा घेऊन आणि थोडासा लिंबाचा रस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घालून घोटावें. त्यानंतर तेवढ्याच प्रमाणाचें गंधक मिसळून गजपुट द्यावें म्हणजे भस्म होतें. जरूरी-प्रमाणें अधिक पुटेंहि द्यावींत.

तिलपर्णीचा रस घेऊन त्यांत तांब्याचे पत्रे बुडून राहतील इतका तो रस घ्यावा. आणि हीं दोन्हीं द्रव्यें मडक्यांत ठेवून, त्याला पुट द्यावें म्हणजे पांढऱ्या रंगाचें भस्म होतें.

उचकीवर ताम्र उत्तम

या ठिकाणीं ताम्रभस्म करण्याचा इतका विस्तार-पूर्वक विधि लिहिण्याचें कारण असें कीं, तीव्र उचकीवर त्याचाच उत्तम उपयोग होतो.

उचकीवर भस्म मिश्रण

६) सुवर्णभस्म, मोतीभस्म, ताम्रभस्म आणि लोहभस्म या चारींचें बरोबर प्रमाणाचें मिश्रण करावें. मोठ्या लिंबाच्या रसांत मध, काळें मीठ, आणि एक गुंज हें भस्ममिश्रण दिलें असतां तावडतोब हिचकी थांबते असा अनुभव आहे.

७) भारंगमूळ आणि सुंठ या दोन्हींचें बरोबर प्रमाणांत वस्त्रगाळ चूर्ण करून तें आल्याचा रस व मधाबरोबर चाटविलें म्हणजे हिचकी बंद होते.

सर्पविष हें उत्तम औषध

८) सर्पाचें विष हेंहि हिचकीवर एक उत्तम औषध आहे. तें मिळवून वाळवून घ्यावें, आणि एक तोळा वंशलोचनांत एक गुंज प्रमाणानें मिसळून या मिश्रणाचें एक गुंज प्रमाण मधांतून चाटवावें. हा योग अनेक व्याधींवर विशेषतः श्वास, हिचकी, आणि सन्निपातज्वर यांवर उपयोगी आहे. हें मिळ-विण्याची खटपट करणें हें वैद्याचें काम आहे.

उचकीवर सोमल

९) सर्पविष न मिळाल्यास सोमल शुद्ध करावा. आणि तोही वर दिलेल्या प्रमाणांत वंशलोचनांत मिसळून त्याचाहि तसाच उपयोग करावा.

उचकीवर धूम्रपान

१०) हिचकीवर धूम्रपानहि कधीं कधीं तात्काळ गुण देते. सबब, हळद जाळून ती जळत असतांना त्यावर एक कागदाची पुंगळी धरून धूर नाकावाटे किंवा तोंडावाटें फुफ्फुसांत जाऊं द्यावा. असाच धूर धोत्र्याच्या बियांचाहि घ्यावा.

उचकीवर नस्य

११) नस्यद्वाराहि हिचकी बंद होत असते. सैंधवमीठ आणि लिंबाचा रस चांगलें घोटून त्याचें नस्य द्यावें. पांढरें गंध स्त्रीदुग्धांत उगाळून त्यांत थोडें सैंधव घालून किंचित् कोमट असतांना नस्य द्यावें. पिंपळीचें चूर्ण साखर मिसळून नस्य करावें. ज्येष्ठमधाचें चूर्ण मधाबरोबर हुंगावें. त्याचप्रमाणें सुंठ आणि गुळ मिसळून तेंहि हुंगावे.

१२) पारदभस्म, अभ्रकभस्म, सुवर्णभस्म आणि वैक्रांत (हिरा) भस्म बरोबर प्रमाणांत घेऊन त्यांत त्याच्या पांचपट शंखभस्म मिसळून एक प्रहरपर्यंत चांगलें घोटावें. हें मिश्रण तीन गुंज, मधाबरोबर चाटविलें असतांना सर्व प्रकारच्या हिक्का बंद होतात.

पथ्यापथ्य

हिक्कांवर विरेचन, धूम्रपान आणि वमन हीं तिन्हीं शोधनकर्मे करावीं. रुग्णास निद्रा येईल असे प्रयत्न करावे. गहूं, तांदूळ, विशेषतः साठी तांदूळ, जव हीं अन्नें द्यावींत. सदैव गरम असलेलें पाणी पाजावें. पिकलेलें कवठ, लसूण आणि मध हे द्यावेत.

पावट्यासारखे वातुळ पदार्थ, मासोळ्या, दुध्या, निरनिराळे कंद, भारी पदार्थ व थंड अन्नपान हे उचक्या लागलेल्या मनुष्यानें वर्ज्य ठेवावे.

अनेक ग्राहकांच्या सूचनेवरून परतवाडा येथें आयुर्वेद सेवा संघ नासिकची सर्व अनुभविक व गुणकारी औषधें मिळण्याची सोय आम्हीं केली आहे.

श्री समर्थ स्टोअर्स

परतवाडा (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाशिक जिल्हा वैद्य संमेलन

अधिवेशन ४ थें, निफाड

आयुर्वेदतीर्थ वैद्य विनायक दामोदर एकतारे, आयुर्वेदभूषण यांचें

अध्यक्षीय भाषण

॥ श्री ॥

श्रीगणेशाय नमः। श्रीसरस्वत्यै नमः। श्रीयमुनादामोदराभ्यां नमः। श्रीगोदावर्यै नमः। श्रीविष्णवे ...। श्रीब्रह्मदक्षाश्विदेवेशभरद्वाजपुनर्वसुहुताशवेशचरकप्रभृतिभ्यो नमः। श्रीगंगाधरशास्त्रिणे नमः। ...वाकुलोत्पन्नगोपालाय नमः। श्रीप्रतापश्रेष्ठिने नमः।

...वैद्यवर्य हो!

...शास्त्रपरायण, शास्त्रप्रवीण, तंत्रकुशल, दक्ष, सर्व भारतांत आयुर्वेदाचा ध्वज फडकविणारे श्री. ...ी, देवधरशास्त्री, दातारशास्त्री असे वैद्यवर ज्या जिल्ह्यांत झाले व हल्लींहि आहेत, अशा जिल्ह्याच्या ...जिल्ह्याच्या अध्यक्षपदाचा मान देऊन आपण मला फारच उपकृत केलें आहे. वस्तुतः आपली आज्ञा ...शिरसावयाची; परन्तु "आज्ञा गुरूणां ह्यविचारणीया" या उक्तीप्रमाणें आपणांसारख्या शिष्टांचा तो ...अनादर होणार म्हणून, तें नाकारण्याचें धाष्टर्य मीं केलें नाहीं.

आक्षेपकांचा प्रश्न, आयुर्वेद शास्त्र आहे काय ?

आयुर्वेद शास्त्र आहे काय ? असा प्रश्न उपस्थित केला जातो. स्वातंत्र्याच्या पूर्वी तें शास्त्र नाहीं, ...सरकारानें सांगितलें जात होतें. हा निर्णय करतांना आयुर्वेद समजून घेण्याची, त्याचा अभ्यास ...ची, आवश्यकता आक्षेपकांना भासत नव्हती. आतांहि अभ्यास करून आक्षेपक बोलतात, असें नाहीं. ...शहाणपण चालत नाहीं, अशा प्रकारचा तो व्यवहार असतो. स्वातंत्र्य मिळविण्यापूर्वी आम्ही हिंदी ...स्वातंत्र्याला कोठें लायक होतो ?

सन्माननीय बाळासाहेब खेर यांचा सवाल

सन्माननीय बाळासाहेब खेरांनीं आम्हां वैद्य मंडळींना हिंदी राष्ट्राचें आरोग्य रक्षण करण्याचें ...सामर्थ्य आमच्यांत आहे कां ? असा प्रश्न केला आहे. न्यूनगंडानें, विनयानें, अगर "बलवदपि शिक्षि- ...तानामात्मन्यप्रत्ययं चेतः।" या न्यायानें आम्हीं त्याला उत्तर न देतां मूग गिळले !

कल्पना येण्यासाठीं डॉ. पुरंदरे यांचं भाषण पहा

सन्मान्य बाळासाहेब अगर तज्जातीय लोक पाश्चात्य वैद्यकांत हें सामर्थ्य आहे, असें यांत ध्वनित ...त, तें सामर्थ्य, त्या वैद्यकांत, या एक दोन दशकांतच आलें आहे, अशी त्यांची श्रद्धा नाहीं. प्रथम- ...पासून तें शांत आहे असें ते मानतात. परंतु ही श्रद्धा अंधश्रद्धा आहे हें थोड्या विचारानें कळून येणार ...हे. चार दशकापूर्वी "अँटी-सेप्सिस्" चें प्राबल्य शल्यतंत्रांत होतें. हल्लीं "असेप्सिस्" वर भर आहे. ...अँटिसेप्टिक कॅर्बालिक लोशननें किती प्रसूतांना (बाळंतिणींना) यमसदनीं धाडून नूतन अर्भकांनाहि तोच रस्ता ...दाखवावा लागला असेल याची कल्पना येण्याकरितां अहमदनगर येथें भरलेल्या महाराष्ट्र कर्नाटक डॉक्टर ...संमेलनाचे अध्यक्ष डॉ. पुरंदरे यांचें भाषण पहावें. हें सर्व अशास्त्रीय वर्तन 'शास्त्र' या नांवाखालीं चालू

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतें. आमची बुद्धिवादी, परंतु यथार्थतेनें परप्रत्ययनेय प्रामाण्यवादी मंडळी, ॲलोपॅथी हें शास्त्रच समजत होती. द्विविधास्तु खलु भिषजो भवन्त्याग्निवेश, प्राणानामभिसरा एके हन्तारो रोगाणाम्, रोगाणामेकेऽभिसरा हन्तारः प्राणानाम् इति । हें चरकवचन अशावेळीं कोणाच्या लक्षांत येणार नाहीं !

त्याहूनहि अधिक कायचिकित्सेची दुर्दशा

शल्यतंत्राची ही स्थिति, तर कायचिकित्सेची यापेक्षांहि दुर्दशा होती. स्प्रू " अनुलोमक्षय अगर संग्रहणी " याचे रोगी वैद्यमंडळी हमखास बरे करीत असत, तर ॲलोपॅथीला त्याची धड चिकित्सा करतां येत नसे. इन्फ्ल्युएन्झाच्या साथींत डॉक्टरमंडळींनीं इमारती उठविल्या, परंतु किती लोकांचे प्राण वांचविले ? हल्लींहि पेनिसिलीन, स्ट्रिप्टोमायासिन, क्लोरोमायसिटीन इ. चा उपयोग कितपत विचारपूर्वक सावधगिरीनें चालू आहे ? " यमस्तु हरते प्राणान् वैद्यः प्राणान्धनान्यपि । " ही परिस्थिति आज कित्येक ठिकाणीं आपणांस पहावयास मिळत नाहीं काय ?

ही सर्व प्रगति ! ही शुद्ध शास्त्रीय कल्पना नाहीं

ही सर्व प्रगति म्हणून म्हटली जाते. सारखा बदल होतो म्हणून ही प्रगति " Change or die is the watchword of Nature " ही शुद्ध शास्त्रीय कल्पना नाहीं ! त्यांत बरेंचसं काव्य भरलें आहे ! परन्तु ही परागति कशावरून नाहीं ? चुकीच्या कल्पना बदलतात. यथार्थ ज्ञानाच्या बदलत नाहींत. अशास्त्रतेंत चुका असतात, शास्त्रांत चुकांना वाव नाहीं !! कारण शास्त्र म्हणजे भावस्वभावाचें ज्ञान. अग्नीचा दाह करण्याचा स्वभाव कधींहि बदललेला नाहीं ! त्यांत अजून तरी बदल अगर उत्क्रान्ति झालेली नाहीं. आणि व्यवहार जर करावयाचा असेल तर तो बदलणार नाहीं असेंच म्हणावें लागेल, नाहींतर " संशयात्मा विनश्यति " दुसरें काय ?

शास्त्र म्हणजे काय ? हें तरी माहित आहे काय ?

परन्तु जे विद्वद्रत्न शास्त्र शास्त्र म्हणून बडबडत असतात, त्यांना शास्त्र म्हणजे काय, हें तरी माहीत असतें काय ? शास्त्राच्या ह्या कसोट्या आणि त्याला हें उतरत नाहीं म्हणून हें अशास्त्रीय, असा साधार आक्षेप घेतलेला कोठेंच आढळत नाहीं. आमचे बुद्धिवादी डॉक्टर क्लोरोमायसेटीन इ. औषधें प्रत्यक्ष प्रमाणानें सिद्ध आहेत असें म्हणतात, परन्तु मला त्यांच्या असें लक्षांत आणून द्यावयाचें आहे कीं, त्यांचा व्यवहार प्रत्यक्ष प्रमाणावर होत नसून आप्तवाक्य अगर शब्दप्रामाण्यावर होत असतो ! याप्रमाणें परीक्षा करण्याकरितां उपयुक्त असलेला प्रमाणवाद ज्यांना ठाऊक नाहीं असे हे लोक ' आयुर्वेद अशास्त्रीय ' असें म्हणतात ! अपरीक्षितमेव तदुच्यते यद् आयुर्वेद अशास्त्रीय इति । उन्मत्तवदेव सर्वं तत्प्रलपितमिति उपेक्षणीयमेव।

डॉ. ढमढेरे यांचा विपरीत दृष्टांत

अशा डॉक्टरांकडून म्हणें आमच्या आयुर्वेदाचें संशोधन होईल ! दृष्टांत देऊन केसरीकारांना तरी ही गोष्ट पटलेली मला आढळली. तो सुन्दर दृष्टान्त असाः— " ताजमहालाच्या सौंदर्याच्या संशोधनाचें कार्य, परंपरागत विटा उचलणाऱ्या मजुराकडे न देतां आधुनिक स्थापत्यविशारदाकडेच देणें योग्य नाही काय ? " बंधूंनो पटला कां तुम्हाला हा दृष्टांत ? यावर मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, आमचे आधुनिक संशोधक डॉक्टर स्थापत्यविशारद नसून परंपरागत विटा उचलणारे पाश्चात्य मजूर होत ! डॉक्टर मंडळीहो ! स्पष्टोक्तीबद्दल क्षमा करा.

आमच्यांत प्रत्युत्पन्नमति चिकित्सक आजहि आहेत

सन्मान्य बाळासाहेबांना उत्तर द्यावयाचें राहिलें, तें असें कीः—आमच्यांत जसे बुद्धिमान्, राज-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...रंधर लोक होते व आहेत; इंग्रज निघून गेल्याबरोबर, जबाबदारी अंगावर घेऊन काम करावयास ...मिळाल्याबरोबर, चुका करीत, अडचणी सोसीत, आपल्या सामर्थ्यांचा प्रत्यय त्यांनीं जगास आणून ...; तद्वत् बुद्धिमान्, प्रत्युत्पन्नमति चिकित्सक आजहि आम्हां वैद्यमंडळांत आहेत. शल्यतंत्रांत हात ...नसल्यामुळें अडचणी येतील; परन्तु Necessity is the mother of invention साधन-...ी, बुद्धि यांखेरीज प्रसंगाहि पण हवा असतो. तो आल्यास वैद्यमंडळींच्या सामर्थ्याचाहि प्रत्यय येईल.

आमचे शिक्षित लोक शरीरानें हिंदी, पण मनानें पाश्चात्य

शिवाय दोन हजार वर्षांपूर्वी सुश्रुत काळीं, पन्नास वर्षांपूर्वी जेवढें शल्यतंत्र पाश्चात्य वैद्यकांत होतें, ...आयुर्वेदांत होतें. पारतंत्र्यांच्या काळांत त्यांत वाढ झाली नाहीं. परन्तु कायचिकित्सेंत मात्र पारतंत्र्यांतहि ...भर पडत गेली आहे. परंतु त्याकडे आमच्या आधुनिक शिक्षितांचें लक्ष कोठें आहे? ते शरीरानें, ...हिंदी आहेत, पण मनानें म्हणजे विचारानें व ज्ञानानें पाश्चात्य आहेत; म्हणूनच परकीयांप्रमाणें ...ते असा प्रश्न विचारतात, आणि आमच्या असाहाय्यतेचा उपहास करतात! असो.

आयुर्वेदाचें ज्ञान व्यापक व निश्चित आहे.

वैद्यबंधूंनो, आपणांमधील बुद्धिभेद, न्यूनगंड घालविण्याकरितां हे विचार मांडावे लागले. आतां ...र्वेदाचें तत्त्वज्ञान कसें व्यापक व निश्चित आहे त्याची थोडक्यांत उजळणी करतो.

रोग म्हणजे काय? स्वास्थ्य म्हणजे काय? रोगाचीं कारणें कोणतीं? रोगाची चिकित्सा कशी ...ावी? हे आपले नेहमींचे प्रश्न!

व्याधिसंबंधींचें त्रिकालाबाधित तत्त्वज्ञान

मानवी प्राण्याच्या रोगाची चिकित्सा आपणांस करावयाची असते, तेव्हां मानवी प्राण्याचें स्वरूप ...याचा विचार करणें जरूर आहे. यांसच आयुर्वेदांत पुरुष ही संज्ञा दिलेली आहे. हृदय, यकृत्, प्लीहा, ...वृक्क, शिर, ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें, रसरक्तादिधातु यांचा समुदाय म्हणजे पुरुष असें म्हटलें, तर चेतना ...ज्ञान या समुदायाला होतें, असें दिसत नाहीं. मृत शरीरांत हीं सर्व असून त्यांत ज्ञान असत नाहीं. ...या सर्व अवयवांचा सुसूत्र संबंध (Co-ordination) घडवून आणण्याकरितां दुसऱ्या द्रव्याची ...आहे; त्या द्रव्यास 'मन' ही संज्ञा दिलेली आहे. तेव्हां सत्त्व, आत्मा आणि शरीर यांचा समुदाय ...पुरुष होय. यज्जः पुरुषीयाध्यायांत "आत्मेंद्रियमनोऽर्थानां पुरुषसंज्ञको योऽयं राशिः अस्यामयानां ...तिविनिश्चये इदं कथा प्रादुरासीत्" असें म्हणून महर्षींची कथा म्हणजे वाद वर्णन केला आहे. ...वरील प्रश्नांचीं उत्तरें दिलीं आहेत. तीं अशीं:— येषामेव हि भावानां संपत्संजनयेन्नरम्। तेषामेव ...द् व्याधीन्विविधान्समुदीरयेत्॥ हें व्याधिसंबंधींचें तत्त्वज्ञान त्रिकालाबाधित आहे. पाश्चात्य वैद्यकांत ...र अवयवांची विकृति (functional and organic disorder) म्हणजे रोग, एवढीच कल्पना ...दिसते. ही कल्पना अभ्यास आहे.

जन्तूंच्या शोधावर अवास्तव भर

पाश्चात्य वैद्यकांत रोगकारणांचा विचार करतांना difficiency diseases, metabalic ...diseases माहीत असतांना प्रत्येक व्याधीच्या जंतूंचा शोध लावण्याकडेच फार लक्ष वेधलें गेलेलें दिसतें. ...ंच्या शोधावर अवास्तव भर दिल्या कारणानें चिकित्सेची गति कुंठित झाली आहे. याकरितां पुनर्वसु ...त्रेयांचा उपदेश ध्यानांत घेण्यासारखा आहेः— "तथर्षीणां विवदतामुवाचेदं पुनर्वसुः। मैवं वोचत ...नं हि दुष्पापं पक्षसंश्रयात्। वादान्सप्रतिवादान् हि वदन्तो निश्चितानिव। पक्षान्तं नैव गच्छन्ति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिलपीडकवद्गतौ ॥ चिकित्सा करतांना ज्या भावांची विपद् रोगाला कारणीभूत झाली असेल त्या सर्वांचे ज्ञान करून घेऊन त्यांची संपद् कशी निर्माण होईल, याचा विचार करून त्याकरितां उपयोगी पडणाऱ्या सर्व द्रव्य-अद्रव्यांचा उपयोग करण्याकडे चिकित्सकांचें लक्ष वेधलें आहे.

पथ्याची व्यवस्था हा आयुर्वेदाचा विशेष

" कथं शरीरे धातूनां वैषम्यं न भवेदिति । समानां चानुबन्धः स्यादित्यर्थे क्रियते क्रिया ॥ त्यागाद्विषमहेतूनां समानां चोपसेवनात् । विषमा नानुबध्नन्ति जायन्ते धातवः समाः ॥ समैस्तु हेतुभिर्यस्माद् धातून् संजनयेत्समान् । चिकित्साप्राभृतः तस्माद्दाता देहसुखायुषाम् " ॥ चिकित्सा करतांना पथ्याची व्यवस्था हा आयुर्वेदाचा विशेष या तत्वज्ञानामुळें आलेला आहे. मीठ वर्ज केल्यानंतर उदर, शोथ, कुष्ठ यांची चिकित्सा लवकर फलदायी होते असा आपला अनुभव नाहीं कां ?

युक्तिप्रमाणाचें लक्षण

अनेक कारणांनीं रोग होतो म्हणून अनेक उपायांनीं त्याची चिकित्सा व्हावयास पाहिजे, हें पट-विण्याकरितां आयुर्वेदांत आचार्यांनीं युक्ति हें प्रमाण मुद्दाम सिद्ध केलें आहे, आणि ठिकठिकाणीं त्यावर जोर दिला आहे. " बुद्धिः पश्यति या भावान्बहुकारणयोगजान् ॥ युक्तिः सा " । असें युक्तीचें लक्षण देऊन युक्तियुक्ता चतुष्पादसंपद् व्याधिनिबर्हणी " असें स्पष्ट विधान केलेलें आहे.

रोगावर चौफेर हल्ला चढवावयाचा ही आयुर्वेदीय दृष्टि

आयुर्वेदाचें रोगहेतूंचें व चिकित्सेचें तत्वज्ञान वरीलप्रमाणें आहे. तेंहि त्रिकालाबाधित आहे. रोगावर चौफेर हल्ला चढवावयाचा ही त्यांत दृष्टि आहे. याचें संशोधन पाश्चात्य वैद्यकांतील संशोधक कसें करणार ? फादर कायस आणि डॉ. म्हसकर यांनीं कृमिचिकित्सेच्या बाबतींत केलेल्या उद्योगाचें उदाहरण माला पुरेसें आहे. आयुर्वेदांतील कृमिचिकित्सा पाश्चात्य वैद्यकाच्या दृष्टीनें फारच निराळ्या प्रकारची परंतु वरील तत्वज्ञानावर आधारलेली आहे.

कृमीसंबंधीं एक महत्वाचा अनुभव

यासंबंधीं आमचा एक अनुभव आपणांस सांगतो. गंडूपद कृमींनीं एक दहा वर्षांचा मुलगा आजारी होता. वैद्यराज गोपाळराव वाईवार यांचा तो रोगी. मी व डॉ. मराठे एम्. बी. बी. एस्. सह-चिकित्सक होतो. पुरीषजकृमींकरितां विडंगभावित अश्वशकृत् आम्हीं तयार केलें. त्याची योग्य ती मात्रा आदल्या दिवशीं रोग्याला देण्यांत आली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं बस्ति देण्यांत आला. बस्तीनंतर बें शौचास झालें, त्यांत बाहेर पडलेले कृमि मेलेले आढळले. पाश्चात्य वैद्यकाच्या दृष्टीनें गंडूपद कृमिनाशक प्रभावी द्रव्य वरील योगांत मुळींच नाहीं !

निराळ्या विचारसरणीचा अंगिकार करावयास पाहिजे

याच संबंधीं आणखीहि एक गोष्ट विशेष लक्षांत येते. शल्यतंत्रांत अँटिसेप्टिक औषधांचा दोष थोडाफार लक्षांत आला व असेप्टिक तंत्र कांहीं बाबतींत रूढ झालें, परंतु तें पूर्णांशानें झालें नाहीं. कारण जंतुहेतूनें संशोधकांना फारच झपाटलेलें आहे. त्यांतून सुटका होण्याकरितां निराळ्या विचारसरणीचा अंगिकार करावयास पाहिजे; ती विचारसरणी आयुर्वेदाचा धातुसाम्य आणि धातुवैषम्य वाद होऊं शकेल.

जन्तुनाशक औषधें म्हणजे विषेंच !

पक्वसंश्रित जंतुहेतूंना नाहींसें करण्याकरितां जन्तुनाशक औषधें शोधून काढण्याचा प्रयत्न आज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...आहे. ही औषधें म्हणजे विषेंच होत. आयुर्वेदांत विषें वापरलीं आहेत, पण तीं जशींच्या तशींच ...ती नाहींत; त्यांवरहि संस्कार करून त्यांचा विकाशीपणा कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. पाश्चात्य ...मात्र त्यांतील कार्यकारी द्रव्य निराळें करून त्याचा घातकपणा वाढविला जातो, आणि नंतर तीं ...जातात. या द्रव्यांनीं चिकित्सा करणें फार जबाबदारीचें होतें.

म्हणूनच पाश्चात्यवैद्यक शिकण्याकरितां लायकी आणि शिक्षणकाल अधिकाधिक वाढविण्याकडे ...कल आहे. परन्तु त्या दृष्टीनें राष्ट्राची चिकित्सकांची गरज कशी पुरी करतां येणार ? याकरितां ...विविधशिष्यबुद्धिगम्य अभ्यासक्रम पाहिजे. जंतुघ्न औषध शरीरधातूवरहि हिंसक असेंच असणार ! तरी ...असें पाहिजे कीं, तें जंतूंना प्रतिकूल असतांना शरीरधातूंना अनुकूल व्हावें. पाश्चात्य वैद्यकांत रोग- ...आणि चिकित्सा याप्रमाणें एकांगी आहेत. आयुर्वेदांत असा एकांगी विचार नाहीं, म्हणूनच आयुर्वेद ...आहे, म्हणजे आयुर्वेदाचें तत्वज्ञान पूर्ण आहे, असें म्हटलें जातें.

आयुर्वेदीय व्यवहारांची वाढ करणें आवश्यक आहे

अशा रीतीनें आयुर्वेदाचे तत्त्वज्ञान पूर्ण असलें तरी " न हि विस्तरस्य प्रमाणमस्ति । न चैव ह्यस्ति ...आयुर्वेदस्य पारम् । तस्मादप्रमत्तः शश्वदभियोगमस्मिन् गच्छेत् ॥ कृत्स्नो हि लोको बुद्धिमतामाचार्यः । ...बुद्धिमतामेव ॥ हें सर्व आपण जाणतांच आहां. शास्त्राचा विस्तार व व्यवहार यांची वाढ आपण ...व्हाव पाहिजे. आयुर्वेदाचीं आठहि अंगें आज व्यवहारांत नाहींत. कायचिकित्सा आणि त्यांतच ...होणारा कौमारभृत्याचा भाग एवढींच दोन अंगें अर्धवट चालू आहेत. पाश्चात्यवैद्यक आज काय, ...शालाक्य, कौमारभृत्य, भूत आणि विष या सहा अंगांत व्यवहार करीत आहे. त्यामुळें लोकांत त्याचा ...होत आहे. आयुर्वेदाचा आठहि अंगांत व्यवहार व्हावयास पाहिजे. तो करतां आला तरच ...वेदीयांचें कर्मसामर्थ्य पाहून तो अशास्त्रीय आहे, जुनाट मागासलेला आहे इत्यादि आजचे आक्षेप ...कोठें लुप्त होतील !

आयुर्वेदीय चिकित्सामंदिराचा संकल्प

आयुर्वेदाचें कर्मसामर्थ्य वाढावें याकरितां आपलीहि अविश्रांत धडपड चालू आहे. आपल्या ...चा आश्रय आयुर्वेद सेवा संघानें घेतल्यापासून आपल्यांतील विचार कार्यान्वित होत आहेत. आपण ...आयुर्वेदवादी आहां. मिश्रशिक्षणवादींचा आपणांवर एक मोठा आक्षेप आहे तो म्हणजे आपण वडे ...वीर आहां. कृतीनें म्हणजे विद्यालय काढून शास्त्रशिक्षणाची व्यवस्था करणें अगर चिकित्सामंदिर उभारून ...शिक्षणाची सोय करणें यासारखें कांहींहि आपण केलेलें नाहीं. तें करण्याचा संकल्प आपण करूं या !

त्याला जोडून प्रसूतिविभाग काढावा

प्रथम आपण कायचिकित्साप्रधान चिकित्सामंदिर काढा. त्या चिकित्सामंदिरांतच प्रसूतिविभाग ...असल्यास उत्तम. नाहींतर निदान प्रसूतिनोंदणी विभाग तरी ठेवावा. दोन वैद्या आणि कांहीं ...केलेल्या सविका यांना नोकरीस ठेवून घरोघरीं जितकीं बाळंतपणें आणि बालकोपचार करतां येतील ...करण्याचा उपक्रम करावा. नंतर शुद्ध आयुर्वेदाच्या शिक्षणाची आंखणी करून आयुर्वेद विद्यालय ...ले, अंग, प्रत्यंग, आशय, इंद्रियें इ. प्रत्यक्ष ज्ञानाकरितां शवच्छेदनाची व्यवस्था करावी.

अभ्यास-मंडळें चालवावींत

दुसरा उपक्रम अभ्यासमंडळें चालविण्याचा. आयुर्वेदांतील निरनिराळे विषय निवडावे; त्या ...वर मंडळांतील सदस्यांनीं निबंध लिहावे. ते सर्वांनीं मिळून वाचून संधायसंभाषापद्धतीनें चर्चा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करावी. चर्चेनें ग्राह्य झालेला भाग मासिकांतून प्रसिद्ध करावा. शारीराचे, गुणधर्मांचे, चिकित्सेचे अनेक विषय ह्या तऱ्हेनें हाताळण्यासारखे आहेत.

आरोग्यरक्षणाचें स्वातंत्र्य मिळवावयाचें आहे.

आम्हाला राजकीय स्वातंत्र्य मिळालें. आरोग्यरक्षणाचें स्वातंत्र्य मिळवावयाचें आहे. कोणताहि स्वतंत्र देश आरोग्यरक्षणाकरितां फार काल दुसऱ्या देशावर अवलंबून राहणें इष्ट नाहीं. तत्वनिष्ठ बनून, स्वार्थत्यागपूर्वक काम करून, जसें राजकीय स्वातंत्र्य मिळविलें, तसेंच हेंहि स्वातंत्र्य आपणांस मिळविलें पाहिजे. याकरितां स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, बहिष्कार यांचाच अवलंब आपणास करावयास पाहिजे. " माझें आरोग्य मी बिघडूं देणार नाहीं; बिघडल्यास माझ्या देशांत तयार होणाऱ्या औषधांनींच मी तें सुधरवीन " असे शपथ घेणारे लोक निघावयास पाहिजेत. एक काल असा होता कीं, म्हाताऱ्या बाया, सनातनी लोक परदेशी औषधें वर्ज्य मानीत. परंतु खेदाची गोष्ट कीं हीं स्थिति आज राहिलेली नाहीं ! हल्लींच्या तरुणांचेंहि लक्ष स्वदेशीकडे मुळींच नाहीं. भोगपरायणता फार वाढली आहे. वेळींच नेत्यांनीं इकडे लक्ष पुरवावें.

आयुर्वेदासाठीं संस्कृतिरक्षणाची आवश्यकता

प्रत्येक देशाचें वैद्यक त्या त्या देशाच्या संस्कृतीवर वाढलेलें असतें. संस्कृति जसजशी बदलेल तसतसें वैद्यकहि व्यवहारांत आणावयास अडचणी उपस्थित होतात. आमची संस्कृति धर्मावर आधिष्ठित होती; आतां ती अर्थाधिष्ठित होऊं पहात आहे. त्याचे परिणाम आपल्या समाजावर घडत आहेत. आयुर्वेदाचा उद्धार करावयाचा, तर संस्कृतीकडे लक्ष दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं. गाईचें दूध, तूप, तिळाचें तेल यांची जागा आर्थिक कारणामुळें म्हशीचें दूध, तूप, आणि भुईमुगाचें तेल यांनीं घेतली आहे. म्हशीच्या तुपाचीहि जागा वनस्पति झपाट्यानें घेत आहे; खात्रीचें मुलाला पचेल असें निर्भेळ गाईचें दूध, शहरांतूनच काय पण खेड्यांतूनहि मिळणें दुरापास्त झालें आहे. शेतीला बैल लागतात म्हणूनच गाईची जोपासना होते. आमची बुद्धि मंद न होतां आम्हांला बलशाही व्हावयाचें असल्यास आपणांस गोरक्षणाकडे लक्ष द्यावें लागेल.

हें इंजेक्शनचें युग आहे

चिकित्सेंत हल्लीं इंजेक्शनचें युग आहे. खेड्यापर्यंत तें पोहोंचलें आहे. त्यानें खेडूतांत कुतूहल निर्माण केलें आहे. आपणांस तें केव्हां घ्यावयास मिळेल याची ते प्रतीक्षा करीत असतात. इंजेक्शन घेणारा स्वतःस सुधारलेला समजतो. ही स्थिति आपण लक्षांत घेतली पाहिजे. कृत्स्नो हि लोको बुद्धिमतामाचार्यः। शत्रुश्चाबुद्धिमतामेव। हें पाहून इंजेक्शनचें तंत्र आपण आत्मसात् केलेंच पाहिजे. वनस्पतींचे गुणधर्म आसवारिष्टांत, कषायांत, गुटिका–वटिका, इ. कल्पांत जसे आणले तसेच ते इंजेक्शनच्या द्रवांत आणिले पाहिजेत. इंजेक्शनची मात्रा कमी पुरते; गुण तावडतोब दिसतो; एवढेंच नव्हे तर रोगाच्या बलामुळें कषाय, आसवारिष्टें, गुटिकावटिका इ. योजना फलद्रूप होत नाहींत, तेव्हां इंजेक्शनाच्या बलामुळें चिकित्सा फलद्रूप झालेली प्रत्ययास येते. अगर त्यानें रोगाचा जोर कमी होऊन पूर्वीचीं कार्य न करणारीं औषधेंच ध्रुव आरोग्य प्राप्त करून देण्यास उपयोगीं पडतात. आपल्या सुदैवानें आपले वैद्यबंधु या क्षेत्रांत प्रयत्न करीत आहेत; ते समजून घेऊन त्यांना प्रोत्साहन देणें आपले काम आहे.

वादाचा विषय, आयुर्वेदाचें शिक्षण

आयुर्वेदाचें शिक्षण फार काळापासून वादाचा विषय होऊन बसलें आहे. स्वराज्यापूर्वी सरकार उदासीन होतें. आणि आयुर्वेदाचें शिक्षण पूर्ण वैद्यतंत्र होतें. प्रत्यक्षशारीरापुरतें त्यांत मिश्रण झाल्याचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देतें, बाकीच्या विषयांत आयुर्वेदालाच महत्त्व होतें. विषयवार तसेंच ग्रंथप्रधान असें दोन्ही प्रकारचे व्हावें, असें त्यांचें धोरण असल्याचें दिसतें.

मुंबई प्रांतांत प्रथम आयुर्वेद शिक्षणाकडे सरकारनें लक्ष दिलें. दुर्दैवानें सरकारला त्यावेळचे आयुर्वेदाचा अभ्यास न केलेले आणि पाश्चात्यवैद्यकाचें मात्र उत्तम शिक्षण घेतलेले असे लाभले. वैद्यकाचें बोर्ड स्थापन झालें. देशी वैद्यकाचा गंध नसलेले अगर फारतर गंध (बुक्का) असलेले पाश्चात्य-असे अध्यक्ष, 'इष्टं धर्मेण योजयेत्' प्रकारचा वैद्यहकीमांचा संयोग आणि हमखास सरकारी अशाप्रकारची त्याची रचना झाली. वैद्यकावर राजकीय नियंत्रण करणारें असें तें मंडळ तयार एक बोर्ड जाऊन दुसरें बोर्ड निवडलें गेलें, तेव्हां बोर्डाचें आयुर्वेदिक शिक्षणावरील नियंत्रणच नाहींसें असें कां केलें तें सरकार आणि त्यांच्या सल्लागारासच ठाऊक!

प्रथमपासूनच इंग्रजी कां नको ?

इंग्रजी भाषा सर्व जगभर पसरली आहे; सर्व विषयांवर अनेक उत्तमोत्तम पुस्तकें त्यांत आहेत; सर्व परिभाषा रूढ आहे; तेव्हां आमच्या मुलांना मराठी शिकवितांनाच प्रथमपासून इंग्रजी शिक-व्यवस्था केल्यास आमचा फायनलचा मुलगा अधिक ज्ञानवान् आणि लायक नागरिक नाहीं कां परंतु प्राथमिक शिक्षणांत इंग्रजीचा अंतर्भाव करण्यांत येत नाहीं. तसें केल्यास दोन्ही भाषा सच्च्या विद्यार्थ्यांच्या बुद्धीवर विलक्षण ताण पडेल. जी स्थिति प्राथमिक शिक्षणाची, तीच स्थिति वैद्यक हें कां समजूं नये ?

एकाकी आयुर्वेदावर बंदी कशासाठीं ?

एकाकी आयुर्वेदिक शिक्षण आमच्या समाजाला हितकर नाहीं, असें सरकारला वाटत असेल तर म्हणून तें शिक्षण अजिबात बंद करावें. १९३७ सालपर्यंत आयुर्वेदानें काय असे अनर्थ केले कीं, एकाकी शिक्षण देण्याची सरकारनें बन्दी करावी ? आसवारिष्टांवर जसें निरर्थक बंधन घालण्याचा प्रयत्न केला, तद्वत्‌च हें बंधन झालें आहे. फायनल झालेला विद्यार्थी आपल्या मगदुराप्रमाणें सेवा करून आपलें जीवन व्यतीत करतो, तद्वत् आयुर्वेदीयाला समाजसेवा करण्याची मुभा कां ? समाजाला त्याची गरज नसेल तर आपोआपच तें शिक्षण बंद पडेल !

दोन अभ्यासक्रम असावेत

आयुर्वेद शिक्षणाचे दोन अभ्यासक्रम असावेत. एक तीन वर्षांचा, दुसरा चार वर्षांचा (D. A.) अगर हल्लींचा सरकारला आवडणारा (G. F. A. M.) मॅट्रिकनंतर साडेसहा वर्षांचा.

— तीन वर्षांचा अभ्यासक्रम —

तीन वर्षांचा अभ्यासक्रम पुढीलप्रमाणें असावा:-

योग्यता— संस्कृत व्याकरण, काव्य, न्याय, सांख्य यांचा अभ्यास केलेला.

१ लें वर्ष:- १ शारीर–शवविच्छेदनपूर्वक (अंग–प्रत्यंगे, इंद्रियें, रक्तवाहिन्या इ. च्या रचना आणि परस्पर संबंधासह)

२ गुणधर्म:– वनस्पती निघंटु व रसतंत्रांतील सर्व द्रव्यें रस, वीर्य, विपाक, प्रभाव.

३ औषधीकरण:– चूर्ण, कषाय, आसवारिष्टें, रसायनें, गुटिका वटिका इ. औषधी-शाळेंत प्रात्यक्षिक शिक्षण.

४ स्वस्थवृत्त.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्ष २ रें:- सूत्रस्थान, निदान-चिकित्सा, चिकित्सामंदिर व दवाखान्यांत प्रात्यक्षिक.

वर्ष ३ रें:- निदान-चिकित्सा, कौमारभृत्य, ऊर्ध्वांग, विषचिकित्सा, चिकित्सामंदिर व दवाखान्यांत प्रात्यक्षिक.

दोन स्वतंत्र विभाग

याच अभ्यासक्रमाचे कायचिकित्साप्रधान व शल्यचिकित्साप्रधान असे विभाग दुसऱ्या वर्षापासून पाडतां येतील. हें शिक्षण पुरें झाल्यावर औषधीकरण, कायचिकित्सा, शल्यतंत्र, कौमारभृत्य इ. विषयांचा विशेष अभ्यास करून त्या त्या विषयांत प्राविण्य मिळवितां यावें व त्याकरितां परीक्षा ठेवण्यांत याव्यात.

वैद्यबंधूनो, संपलें माझें भाषण; आपण शांतचित्तानें तें ऐकलेंत याबद्दल आणि आपण मला अध्यक्षपद दिलेंत त्याबद्दल आपलें पुन्हां एकदां आभार मानतों.

इमा॰ रुद्राय तवसे कपर्दिने क्षयद्वीराय प्रभरामहे मतिम्। यथा नः शमसद् द्विपदे चतुष्पदे विश्वं पुष्टं ग्रामे अस्मिन्ननातुरम्। अशी त्या चन्द्रमौलीश्वराची करुणा भाकून आपली रजा घेतों.

ॐ शांतिः शांतिः शांतिः।

आमच्या आयुर्वेदीय इंजेक्शनांवर कोणत्याहि प्रकारचे प्रतिबंध नाहींत.

भारतांत सर्वांत प्राचीन व पूर्ण वैज्ञानिक प्रणालीयुक्त—

झंडा आयुर्वेदिक इंजेक्शन्स

व आयुर्वेदिक औषधींचे सुरासार

आयुर्वेदीय इंजेक्शनें निर्माण करण्याच्या क्षेत्रांत ही पहिली उच्च कोटीची प्रयोगशाळा आहे. हिनें विशिष्ट निवडक योगांची इंजेक्शनें निर्माण केलेलीं आहेत. हिनें आयुर्वेद जगतांत प्रमाणबद्धता (स्टँडर्ड) निर्माण केली आहे, व आयुर्वेद जगतांत पसरलेली निराशा दूर केली आहे. ही दुःसाध्य रोगांची सरळ व स्वस्त चिकित्सा आहे.

प्रत्येक गांवीं एजंट्स् नेमणें आहेत. अधिक माहितीसाठीं वैज्ञानिक निर्देशपत्रिका (सूचिपत्र) खालील पत्त्यावर मागवा. मोफत पाठवूं.

आमच्या तज्ञांनीं, आमच्या इंजेक्शनांचा उच्च दर्जा, आयुर्वेदीय शास्त्रीयता, व विशुद्धता, केंद्रीय व प्रांतीय औषधी अधिकाऱ्यांच्या समक्ष सिद्ध केली आहे. सबब यावर ड्रग्ज ॲक्ट लागू शकत नाहीं. प्रत्येक चिकित्सक वैद्यहकीम हीं इंजेक्शनें स्वतंत्रपणें स्वतःजवळ बाळगू शकतो व व्यवहारांत वापरूं शकतो.

निर्माते-- आचार्य बाबुराम मिश्र रिसर्च इन्स्टिटयूट

[झंडा आयुर्वेदिक फार्मास्युटिकल वर्क्स] हापुड़ (उत्तर प्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय इंजेक्शनांचा इतिहास

(मागील अंकावरून समाप्त)

इंजेक्शनकरितां वापरावयाच्या रसद्रव्यांचें अनेक आयुर्वेदिक ग्रंथांतून आढळून येतें. ...शास्त्री यांनीं आपल्या रसयोगसागर (...खंड) या ग्रंथांत अनेक रसद्रव्यांचे उतारे ...केले आहेत.

...वरील रसयोगांना (मूलाक्षरक्रमवारीनें) त्या औषधी नंबर ४५६, ४६२, ४६३, ४६४, ...४६७, ४६८, ४७१, ४७२, ४७३, ...व (४७८, ४७९ सूचिमुखरस) हे दिले ...

...शास्त्रीजी म्हणतातः- अशा प्रकारचे हे बारा ...खालीं दिल्याप्रमाणें उपयोजावयाचे आहेत.

मूर्ध्नि	रक्तभेषजसंयोग
ब्रह्मरंध्रे	,,
नाभौ	,,
हृदये	,,
...लौ	,,
बाहुमूले	,,
स्तनांतरे	,,
दंतांतरे	,,
जिव्हाग्रे	,,
...देशे	,,
अंगुष्ठमूले	,,

वरील बारा रसयोगांचीं इंजेक्शनें खालील ...उपयोगीं पडतात.

१) सन्निपात २) संज्ञानाश ३) सर्पदंश ...अवस्था ५) मूर्च्छा ६) कंप ७) बाधिर्य ...नाश ९) मूकता १०) शीतांग ११) प्रलाप ...विषम नाडी १३) इंद्रियबाधा १४) अपमृत्यु ...धनुर्वात १६) मलमूत्रबंध १७) ऊर्ध्वश्वास ...शोष १९) हिक्का २०) श्वास २१) अरुचि ...उन्माद २३) अपस्मार २४) अल्पायुष्यम् २५) शीतस्वेद २६) स्मृतिभ्रंश २७) हास्यनिर्तत्वम् २८) कौब्ज्यम् २९) दंतग्रह ३०) जिव्हाग्रह गलग्रह ३१) भूतग्रह ३२) तंद्रा.

खालील ग्रथांतून व इतरहि कांहीं ग्रंथांतून सूचिभरणरसाचीं वर्णनें आलीं आहेत.

(१) शारंधरसंहिता (२) बृहत्‌योगतरंगिणी (३) योगचिंतामणी (४) रसप्रकाशसुधाकर (५) रसेंद्रचिंतामणी (६) रससंकेतकलिका (७) रसायनसंग्रह (हस्तलिखित) (८) रसराजसुंदर (९) धन्वंतरी (१०) निघंटु रत्नाकर (११) भैषज्यसारामृतसंहिता (१२) रसायनपरीक्षा (१३) रसेंद्रकल्पद्रुम (१४) तोडरानंद (१५) रसप्रदीप (१६) बसवराजीयम् (१७) रसेंद्ररत्नकोश (१८) रसकामधेनु (१९) योगमहार्णव २०) वैद्यविलास (२१) रसकल्पलता

(१३ ते २१ हे ग्रंथ हस्तलिखित आहेत)

चरक-संहिता, सुश्रुत-संहिता व शारंधर-संहिता या ग्रंथांतूनहि रक्ताशीं तावडतोब संयोग होण्याकरितां औषधांचा वापर इंजेक्शन पद्धतीनें करण्यांत येत असे, अशाविषयीं उल्लेख आहेत. त्यांचे उतारे खालीं दिले आहेत.

चर्मकषायाकल्कं बिल्वसमं मूर्ध्नि काकपदमस्य ।
कृत्वा दध्यात्कटभी कटु कट्फल प्रधमनं च ॥६६॥
छागं गव्यं माहिषं वा मांसं कुक्कुटमेव वा ।
दद्यात्काकपदे तस्मिंस्ततः संक्रमते विषम् ॥६७॥

(चरक चिकित्सा अ. २३)

तास्वप्रसिच्यमानासु मूर्ध्नि शस्त्रेण शास्त्रवित् ।
कुर्यात्काकपदाकारं व्रणमेवं स्रवन्ति ताः ॥४५॥
सरक्तं चर्म मांसं वा निक्षिपेच्चास्य मूर्धनि ।
चर्मवृक्षकषायं वा कल्कं वा कुशलो भिषक् ॥४६॥

(सुश्रुतसंहिताकल्प अ. ५)

यावत्सूच्या मुखे लग्नः कूप्या निर्यातभेषजम् ।
तावन्मात्रो रसो देयो मूर्च्छिते सन्निपातिनि ॥१२३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षीरेण प्रस्थिते मूर्ध्नि तत्रांगुल्या च घर्षयेत् ।
रक्तभेषजसंपर्कान्मूर्च्छितोऽपि हि जीवति ।।१२४।।
(शारंगधरसंहिता अ. १२ द्वितीय खंड)

तालुनि प्रच्छायित्वाथ रसमेनं विनिक्षिपेत् ।
सूच्यातिसूक्ष्मया तोयभिन्नयातिप्रयत्नतः ।।७४।।
(रसरत्नसमुच्चय अ. १२)

रसायन पारिजात (आसुरचिकित्सातंत्र या नांवानेंहि संबोधिला जाणारा) या संस्कृत ग्रंथांत इंजेक्शनें तयार करण्याच्या कृति व त्यांचा वापर याविषयीं बरीच माहिती आहे, परंतु तो ग्रंथ उपलब्ध न झाल्यामुळें त्यांतील उतारे येथें देतां आले नाहींत.

व्यापारी तत्त्वावर इंजेक्शनें बनविणें

झांशी आयुर्वेदिक विश्वविद्यालयाचे सिलेक्ट कमिटीनें वरील बाबतींत एकमुखी निर्णय घेऊन, त्यास आधुनिक साहित्याची व यंत्रसामुग्रीची मदत घेण्याचें ठरविलें. भारतांतील बहुतेक सर्व प्रसिद्ध आयुर्वेदिक कारखान्यांतून आधुनिक पद्धतींचा व यंत्रांचा वापर करण्यांत येत आहे; जसें पिष्टयंत्र, वटिकायंत्र, गुटिका यंत्र, बाष्पीभवनयंत्र, रसनिर्मूलनयंत्र वगैरे. यावरून अशीं अद्यावत् साधनें वापरण्यास हरकत नाहीं असें ठरलें. कारण अशीं इंजेक्शनें मनुष्याच्या रक्तांत प्रत्यक्ष भिनवावयाचीं असल्यामुळें तीं अत्यंत शुद्ध असलीं पाहिजेत व कोणत्याहि अपायकारक द्रव्यापासून अलिप्त असलीं पाहिजेत. अशीं सर्व इंजेक्शनें पॅकिंग होण्यापूर्वीं मान्यवर तज्ञांकडून नीट तपासली गेलीं पाहिजेत. तसेंच त्यांच्या शुद्धतेचा व गुणकारित्वाचा दर्जा अबाधित राहिला पाहिजे. अशी इंजेक्शनें तयार करणाऱ्या कारखान्यांना आवश्यक अशा प्रयोगशाळा असल्या पाहिजेत व योग्य तज्ञांची त्यांवर देखरेख पाहिजे.

वैद्य व डॉक्टरांना सूचना

बंद केलेल्या इंजेक्शनाबरोबत त्याची वापरण्याची पद्धति दिली पाहिजे. आयुर्वेदिक शास्त्राप्रमाणें त्या त्या इंजेक्शननें शरीरावर, स्नायूंवर, रक्तवाहिन्यांवर व रक्तावर होणारे परिणाम निर्देशित केले पाहिजेत.

वैद्यांना इंजेक्शनचें शिक्षण

ज्या वैद्यानें मान्यता असलेल्या एखाद्या आयुर्वेदिक संस्थेंत इंजेक्शन देण्याचें शिक्षण घेतलें नसेल अशा वैद्यानें इंजेक्शन देऊं नये. अनभिज्ञ माणसानें दिलेल्या इंजेक्शनमुळें अत्यन्त विघातक परिणाम झाल्याचीं उदाहरणें आहेत.

सिलेक्ट कमेटीनें खालील इंजेक्शनऔषधींचें परीक्षण केलें असल्याचें या रिपोर्टांत शेवटीं नमूद केलें आहेः—

(१) शरपुंखा (२) पुनर्नवा (३) वासा (४) कंटकारी (५) चिरायता (६) अर्जुन (७) गुडूची.

प्रसिद्ध झाला ! प्रसिद्ध झाला !!

नामांकित चिकित्सकांच्या चिकित्सेस अनुसरून, अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिलेला रोगवार इंजेक्शन चिकित्सेचा अभिनव मराठी ग्रंथ—

इंजेक्शन चिकित्सा किं. ६ रु. ट. ख. निराळा

२९ प्रकरणें, ३०० वर रोगांची अद्यावत् चिकित्सा, २७० पृष्ठे, जाड बांधणी.

सचित्र इंजेक्शनविज्ञानाप्रमाणें हाहि ग्रंथ लौकरच दुर्मिळ होण्याची शक्यता आहे. मराठींतच काय पण अन्य भाषेंतसुद्धां अशा धर्तीचा ग्रंथ क्वचितच पहावयास मिळेल, असे उद्गार नामांकित चिकित्सकांनीं काढले आहेत.

मिळण्याचीं ठिकाणें १ सुबोध वैद्यक ग्रंथमाला, कागल जि. कोल्हापूर
२ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक सिटी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुष्ठरोगनिवारणकार्यकर्ते शिबिर

बोर्डी जि. ठाणे येथें मुंबई इलाख्यांतील कुष्ठरोगनिवारणकार्यकर्ते यांचें शिबिर ता. २०।५।५३ ते २२।५।५३ अखेर झालें. शिबिरास गुजराथ, कर्नाटक व महाराष्ट्रांतील कार्यकर्ते व कांहीं कार्याध्यक्ष आले होते.

९५ लाख रु. खर्चणार

संमेलनाचें उद्घाटन डॉ. श्री. वारदेकर, गांधी स्मारक लेप्रसी फौंडेशन यांचे हस्तें झालें. त्यांनीं अमेरिका, जपान इत्यादि देशांतील परिस्थिति सांगितली. कार्यकर्त्यांच्या अडचणी समजून त्यांना समर्पक उत्तरें दिलीं. कुष्ठरोग हा 'असाध्य' रोग आहे असें सर्वत्र मानतात, असेंहि सांगितलें, गांधी स्मारक निधीतर्फे होणाऱ्या कामाची माहिती त्यांनीं दिली. गांधी स्मारक निधींतून पंचाण्णव लाख रुपये या कार्यासाठीं मिळणार असून भारतांत १५ ठिकाणीं सेंटर्स उघडण्यांत येणार आहेत. महाराष्ट्रांत बहुधा खानदेशांत एक केंद्र निघेल. त्या केंद्रांत ४० खेडेगांवांपुरता कार्यक्रम सुरूं करावयाचा. तेथील रोगी हुडकून काढून त्यांवर उपचार करावयाचें. असें काम चालेल.

प्रत्येक केंद्राची व्यवस्था

याकरितां १ डॉक्टर, १ सार्वजनिक कार्यकर्ता, १ गाडी, १ सायकल, १ बैलगाडी व इमारत त्यांत रोगी ठेवणेची व्यवस्था राहील. या एक युनिटला सालीना १ लाख खर्च येईल. म्हणजे ६-७ वर्षांत या कामाचे अनुभव येतील. या पैशांतून (औषधांचें) संशोधन होणार नाहीं. जीं औषधें परदेशांतून या रोगावर चांगलीं म्हणून ठरलीं आहेत, तीं येथें आणून उपयोग करावयाचीं असें डॉक्टर मंडळींनीं ठरविले आहे.

डॉ. वारदेकर हे अत्यन्त उमदे गृहस्थ असून सर्वांचें सर्व ऐकून घेऊन समर्पक उत्तरें स्पष्ट शब्दांत देण्याची त्यांची हातोटी मोठी वर्णनीय आहे.

आरोग्यमंत्र्यांचें आश्वासन

ता. २१।५ ला नामदार आरोग्यमंत्री शांतिलाल शहा हे शिबिरांत दुपारीं १॥ वाजतां आले. प्रारंभीं दे. म. दांडेकर यांनीं ठाणें जिल्ह्यांतील कार्यांची माहिती देऊन नामदार आरोग्यमंत्रीसाहेब यांचा सत्कार केला, नंतर अण्णासाहेब दास्ताने यांनीं कार्याची इलाख्यांतील माहिती दिली. व कार्यकर्त्यांचा परिचय करून दिला. अडीअडचणी सांगितल्या.

नंतर नामदार साहेब यांचें भाषण झालें. त्यांत त्यांनीं या रोगावर मनुष्य करील तेवढा प्रयत्न कमीच पडणार आहे. बाकीचे रोग उघड होतात पण हा रोग गुप्त राहूं शकतो. तेव्हां सर्वांनीं सहकार्यांनीं तो घालविला पाहिजे. डॉ. वारदेकर यांचेमार्फत सर्व काम सुरूं होईल, असें सांगितले.

वैद्य कासेगांवकरांचा प्रश्न

नंतर कासेगांवकर वैद्य ह्यांनीं सरकार शुद्ध आयुर्वेद पद्धतीनें यावर उपचार करून पहाणार काय ! असा प्रश्न विचारला तेव्हां "योजना तयार करून मजकडे द्या, पैसे मिळतील." 'पैसे मागा' बाकीचे सर्व तुम्ही पहा असें आरोग्यमंत्र्यांनीं सांगितलें. श्री. पाटील या कार्यकर्त्यांनीं 'कुष्ठनिवारक कार्यकर्ते जे सरकारनें नेमले आहेत, त्यांचेशीं सिव्हिलसर्जनांनीं आदरानें वागावें, अशी इच्छा प्रगट केली. त्यावर श्री. शहा म्हणाले, सर्वांनीच एकमेकांशीं नम्रपणानें व आदरानें व्यवहार केला पाहिजे. हें सर्व व्यक्तिव्यक्तीवर अवलंबून असतें."

———

शास्त्रोक्त पद्धतीनें व अत्यंत परिश्रमानें तयार
केलेलीं महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसंमेलनानें
व ऑल इंडिया आयुर्वेद कॉंग्रेस
व प्रदर्शनाकडून प्रशंसित
सहस्रपुटी अभ्रक इ. भस्में व इतर औषधें
प्राइस लिस्ट मागवा.
श्री अमरेश्वर आरोग्यमंदिर
मिरासी बोळ, पो. इचलकरंजी S.M.C.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रजिस्ट्रेशन

ज्यांनीं आयुर्वेद अगर युनानी वैद्यक पद्धतीचें शिक्षण घेतले आहे व जे वैद्यकीय व्यवसाय आज प्रत्यक्ष करीत आहेत. त्यापैकीं ज्यांना रजिस्ट्रेशन अगर एन्लिस्टमेंट मिळालें नाहीं असें जे असतील, त्यांनी तूर्त मध्यप्रदेशाचे रजिस्ट्रेशन घेऊन ठेवणें युक्त होईल. कारण भाषावार प्रांतरचना होईल त्यावेळीं नागपूरचा भाग महाराष्ट्रांत येईल व तेथील रजिस्ट्रेशनला आपोआप इकडे मान्यता प्राप्त होईल.

नागपूरच्या महाराष्ट्रांत पुढील वृत्त प्रसिद्ध झाले आहे.

वैद्य नोंदणी-मुदतींत वाढ

मध्यप्रदेश सरकारनें आयुर्वेद आणि युनानी औषधोपचार पद्धतीला मान्यता दिल्यामुळें प्रान्तामधील वैद्यांची आणि युनानी पद्धतीनें औषधोपचार देणाऱ्या वैद्यांची नांवें रजिस्टर करणें सुरू आहे. आतांपर्यंत ३००८ वैद्यांची नांवें व ३२३ युनानी हकीमांचीं नांवें रजिस्टर झालीं असून आयुर्वेदिक बोर्डाकडे आणखी ५०० अर्ज आले आहेत. वैद्यांची नांवें रजिस्टर करण्याच्या मुदतींत एका वर्षानें वाढ झाली असून अखेरची ता. ३१ मार्च १९५४ आहे. युनानी पद्धतीनें औषधोपचार देणारे जे ३२३ वैद्य आहेत, त्यांत बहुसंख्य सिंधी निर्वासित[८०टक्के] आहेत.

पत्ताः-रजिस्ट्रार, दि बोर्ड ऑफ आयुर्वेद अँड युनानी सिस्टिम्स ऑफ मेडिसिन, नागपूर मध्यप्रदेश.

खुलासा

डॉ. चौधरी यांचें 'माझी वैद्यकीय जीवनांतील २५ वर्षें, हें पुस्तक वाचनासाठीं मागविण्याचा पत्ता;- वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक' असा आहे. लेखकाकडे तशी व्यवस्था केलेली नाहीं.

त्वरित गुणदायी इंजेक्शनांचा शास्त्रीय शोध

१) आमच्या इंजेक्शन्सवर कोणत्याहि प्रकारचा प्रतिबंध नाहीं.

२) आमच्या इंजेक्शनांची आयुर्वेदीय शास्त्रीयता, विशुद्धता, व पूर्ण गुणकारिता केंद्रीय व प्रांतीय सरकारी अधिकाऱ्यांच्या समक्ष सिद्ध केली गेली आहे.

३) आमचीं आयुर्वेदीय सूचिकाभरणें व पेय औषधांच्या बंद कुप्या (अँप्यूल्स) वैद्य हकीम डॉक्टर कोणीहि स्वतंत्रपणें वापरूं शकतात.

४) आमची रसायनशाळा ही भारतांतील सर्व श्रेष्ठ शास्त्रीय साधनसंपन्न रसायनशाळा आहे. हिनें आयुर्वेदीय इंजेक्शनांची प्रमाणबद्धता निर्माण करून आयुर्वेदीय जनतेमध्यें पसरलेली निराशा, आपल्या त्वरित गुणकारी सूचिकाभरणांनीं नाहींशीं केली आहे.

५) आमच्या इंजेक्शनाच्या उपयोगानें असाध्य व कठिण रोगांची सफल व स्वस्त चिकित्सा केली जाऊं शकते.

६) आम्हांला सर्वत्र गांवें, कसबे, व शहरें यांतून एजंट नेमणें आहेत.

—: १९५२ च्या मे मध्यें प्रसिद्ध केलेलें नवें सूचिपत्र मागवा. मोफत पाठवूं. :—

निर्मातेः- मार्तण्ड फार्मास्युटिकल्स

(रिसर्च इंस्टिट्यूट आफ् इंडियन मेडिसिन) बड़ौत S. S. R. (उत्तर प्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हें ब्राह्मण्याचें लक्षण

"प्राचीन कालीं ब्राह्मण शेतीचें पवित्र काम असत. आम्हीं ब्राह्मण आहोत व ब्राह्मणांची वादावी असें आम्हांस वाटतें. ब्राह्मणांकडून जास्त त्यागाची, जास्त सेवेची, अपेक्षा ठेवतो. लोभ नको. लोभ नसणें हेंहि ब्राह्मण्याचें जो लोभी आहे तो ब्राह्मणच नव्हे. ब्राह्मण असावा, असें शास्त्र आहे.

ब्राह्मण लोभ ठेवतील तर सोबतचें सुख गमा- आतां आपल्या शेतावर काम करावयास वेणार नाहींत हें मी स्पष्टपणें सांगूं इच्छितो. सर्वस्व दान करून आतां भिक्षेचें पात्र घेऊन हेंच ब्राह्मणांना शोभादायक आहे.

मिळालेली जमिन उजाड असली तरी आमचे मजबूत आहेत. आम्ही खडक फोडूं आणि तो नंतर आम्हाला स्वच्छ निर्मळ पाण्याचें दर्शन आमचा विचारावर विश्वास आहे, तितका अन्य नाहीं. आणि म्हणूनच आम्हीं ब्राह्मण आहोत; ब्राह्मणाच्या पोटीं जन्म घेतला म्हणून नव्हे. विचारावर विश्वास आहे तो ब्राह्मण आहे. अज्ञान टिकत नाहीं हें मी चांगल्या ओळखतो.

माझा सर्व प्रयत्न आपणांत जे कांहीं सत्व गुण त्यांना बाहेर येण्याची संधि दिली जावी असतो. आजची हिंदुस्थानची जनता तमो- होऊन राहिली आहे. अज्ञान आळस वगैरे जे अनंत दुर्गुण आहेत तें सर्व तमो- पैदास होय.

खेड्यांतील लोक गरिबींत राहतात याचें कारण होय. कारण ती गरिबी लादली गेली आहे. व मोठ्या लोकांवर मात्र रजोगुणाचा झाला आहे. ते आपली बुद्धि, शक्ति व दुसऱ्यांना लुटण्यांत खर्च करतात. सेवेसाठीं खर्च करत नाहींत.

२१-५-५३

—विनोबा भावे

अनुक्रमणिका

नि. भा. आयुर्वेद शास्त्र-चर्चा परिषद हरिद्वार	७२७
एकांगवीर	७२९
विवेचनात्मक सूचिवेध पद्धति	७३१
मध्यवर्ती संशोधनसंस्था, जामनगर	७३२
आयुर्वेदीय अन्नपानविधि	७३३
ग्रामीण वैद्य परीक्षा बोर्ड	७३९
नागपूरचें आयुर्वेदासन	७४०
उचकी (हिक्का) निदान व चिकित्सा	७४१
नाशिक जिल्हा वैद्य संमेलन अध्यक्षीय भाषण	७४५
आयुर्वेदिक इंजेक्शनांचा इतिहास	७५३
कुष्ठरोगनिवारण कार्यकर्ते शिबीर	७५५
रजिस्ट्रेशन	७५६

सरकारी धोरणांत बदल हवा

"आयुर्वेद सेवा संघाचा औषधी कारखाना आज सकाळीं चालकांच्या निमंत्रणावरून पाहिला. शास्त्रोक्त औषधें या कारखान्यांत तयार करण्यांत येतात, व नफेबाजीकरितां हा कारखाना चालविला जात नाहीं, असा चालकांचा दावा आहे. या कारखान्याच्या भरभराटीच्या आड कोणत्या गोष्टी येतात, याबद्दल चालकांशीं थोडा विचारविनिमय झाला. राज्य-कारभारांत व कारभार करणाऱ्यांत अधिक प्रामाणिक-पणा उत्पन्न झाल्याशिवाय असल्या कारखान्यांची भरभराट होणें कठीण आहे. शुद्ध आयुर्वेदाच्या शिक्षणाविषयींचा सरकारी दृष्टिकोन बदलणेंहि आयु-र्वेदाच्या उन्नतीच्या दृष्टीनें आवश्यक आहे, असें मला वाटतें. हल्लींचें सरकारी धोरण जर असेंच चालू राहील, तर आयुर्वेदाची व असल्या कारखान्यांची उन्नति व भरभराट होणें कठीण आहे. सरकारी धोरणांत योग्य तो बदल लौकर व्हावा, व या कार-न्याचीहि भरभराट व्हावी, असें मी इच्छितो."

दि. ११ मे १९५३ —रामचंद्र नारायण मंडलीक

[रा. पेण]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

र. नं. बी, ५०७९

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अखेर शोध लागला !

ग्रामीण जनतेला जर्जर करणाऱ्या

नारूच्या सांथीवर

खात्रीलायक उपाय सांपडला.

मुंबईचे सुप्रसिद्ध डॉ. भाजेकर यांनीं परिश्रमपूर्वक सिद्ध केलेलें व नारूच्या कोणत्याहि अवस्थेंत त्वरित व हमखास प्रभावी ठरलेलें

'बी. बी. सी.' चें ड्रॅक्युलॅन त्वरित मागवा.

सोल डिस्ट्रिब्यूटर्सः—धूतपापेश्वर सेल्स कॉर्पोरेशन लि., मुंबई

चेहऱ्यावरील पुळ्या !

रक्तशुद्धीकरितां

नांणावलेलें "रक्तदोषांतक" घेऊन

आपणांस हा त्रास वांचवतां येईल.

रक्त-दोषांतक

"आफालि"

आपल्या विश्वासाचें प्रतीक

आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड. (आफालि) अहमदनगर.

EVEREST R. 53.4

संपादक व प्रकाशक:—वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

मुद्रक:—श्री. दामोदर महादेव चन्द्रात्रे, विज्ञान प्रेस, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ६ वें) नाशिक, ता. १६ जून १९५३ (अंक २४ वा

केवळ आयुर्वेदाचें शिक्षण व व्यवसाय
हा वैद्यसमाजाचा जन्मसिद्ध हक्क आहे !

" गेल्या १४ वर्षांपासून आम्हीं वैद्यलोक आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमाची मागणी करीत आहोंत. परंतु आमच्या मागण्यांना केराच्या टोपलीचें स्थान आजपर्यंत मिळत आलें आहे. ' कायद्यासाठी लोक कीं लोकासाठीं कायदा ' असें विचारण्याची पाळी आली आहे. जो कायदा लोककल्याणाच्या आड येत असेल तो तत्क्षणीं बदलणें हें आजच्या लोकशाही सरकारचें तरी कर्तव्य ठरतें.

ही आम्हां वैद्यांची मागणी आहे

केवळ आयुर्वेदाचें शिक्षण मिळविणें व देणें हा वैद्यसमाजाचा जन्मसिद्ध हक्क आहे. स्वतंत्र भारताच्या घटनेनेंहि मिळालेला तो हक्क आहे. जर सरकार आम्हाला तो हक्क बहाल करणार नसेल तर वैद्यबंधूंनीं संघटनेच्या बळावर तो मिळविलाच पाहिजे. सरकारनें सध्यांचा कायदा बदलून फॅकल्टीला हें शिक्षण देण्याला परवानगी देण्यास भाग पाडलें पाहिजे. नाहींतर कायदा कलम २२ प्रमाणें सरकारनें स्वतः या शिक्षणास मान्यता दिली पाहिजे. ही आम्हां वैद्यांची मागणी आहे. "

— वैद्य दत्तात्रेयशास्त्री जव्हेकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुणेंकर मंडळींचे संघटनाविघातक प्रयत्न सुरूं झाले

ता. १८ मे रोजीं कांहीं वैद्य-मंडळींच्या नांवें एक टंकमुद्रित इंग्रजी परिपत्रक अकस्मात् आलें. त्यावर कोणाचीच सही नव्हती. फक्त वर एका कोपऱ्यांत आयुर्वेद महाविद्यालय, २२ नागेशपेठ, पुणें २ असा रबरी शिक्का होता. त्यावरून त्याचें उगमस्थान समजण्यास मदत झाली. खालच्या एका कोपऱ्यांत सेक्रेटरी एक्झिक्युटिव्ह कमिटी, बाम्बे स्टेट आयुर्वेद परिषद असा रबरी शिक्का होता. पण ही परिषद भरविण्याचें कोणी ठरविलें? त्याकरितां प्राथमिक सभा कोणी बोलाविली, त्या सभेसाठीं मुंबई राज्यांतील कोणा प्रमुख वा इतर व्यक्तींना आमंत्रणें दिली ? व मग त्यांतून ही कार्यकारी समिति व तिचा मंत्री (?) नेमला गेला, तें त्यावरून समजलें नाहीं व अद्यापहि तें सर्व गूढच आहे.

त्यानन्तर तेंच पत्रक आयुर्विद्या मासिकांत कांहीं वैद्यांनीं पाहिलें, त्याखालीं बी. व्ही. गोखले अशी मोघम सही होती. त्यावरून या उपक्रमाचें अध्वर्यु वै. मामा गोखले आहेत हें उघड झालें. त्यानंतर ता. २० जून रोजीं आयुर्वेद सेवा संघाच्या पत्त्यावर डॉ. पंडित बी. जी. या नांवाचें पाकीट आलें. त्यांत नं. २चें परिपत्रक होतें. वैद्य बिंदुमाधव यांना वैद्य न संबोधतां डॉ. या नांवानें संबोधणारी व्यक्ती कोणत्या मनोविकारानें दूषित झाली असेल याची कल्पना वाचकांनीं करावी.

आवश्यकता कां भासली ?

मुंबई राज्यांत कर्नाटक, महाराष्ट्र गुजरात व मुंबई उपनगर अशीं संमेलनें नियमितपणें भरत असतां, पुणें आयुर्वेद महाविद्यालयास एकदम स्वतंत्र अशी मुंबई राज्य आयुर्वेद परिषद बोलावण्याची गरज कां पडली, याचा खुलासा त्या परिपत्रकावरून होत नाहीं. नि. भा. आयुर्वेद संमेलनानें शास्त्रीय संशोधनासाठीं एक स्वतंत्र शास्त्रचर्चा परिषद दिल्ली येथील अधिवेशनांत ठराव मंजूर करून सुरू केली आहे, त्याप्रमाणेंच वरील प्रांतीय संमेलनांच्या सह… कार्यानें हें काम कोणाहि संघटनाप्रेमी वैद्याला कर… आलें असतें. पण तसें न करण्यांत या पुणेकर मंडळींच… कांहीं डाव असावा असें वरवर पाहाणाऱ्यांनाहि वाटे…

या पुणेकर मंडळींनीं पूर्वी अशाच फुटी… पणाच्या उद्देशानें पुणें-कोल्हापूर येथें प्रयत्न कर… पाहिले होते. पण ते यशस्वी होऊं शकले नाहींत.

परिषदेसाठीं जो कार्यक्रम दिला आहे त्यां… रक्तप्रवाहिका व उदर या विकारासंबंधीं चर्चा… विषय प्रथम लिहिले आहेत. पण खरा उद्देश तिसऱ्… विषयांत प्रगट झाला आहे व परिषदेंत जे ठरा… होतील, त्यावरून ते अधिक स्पष्ट होतील.

गोंडस पण फसवें नांव

'नांव सोनुबाई हातीं कथलाचा वाळा' … म्हणीप्रमाणें परिषदेनें 'मुंबई राज्य आयुर्वेद परिषद' हें गोंडस व फसवें नांव घेतलें आहे. मात्र विद्यालयांतून शिक्षण प्राप्त न झालेल्या रजिस्टर्ड आयुर्वेद व्यवसायिकांना त्यांत येण्यास प्रतिबंध घातला आहे व जे आयुर्वेदेतर शास्त्राचे पदवीधर आहेत त्यांना प्रवेश ठेवला आहे. ब्राह्मणेतर चळवळींत ज्याप्रमाणें मुसल… मान, ख्रिश्चन चालत असत, तशाच पद्धतीचा … प्रकार दिसतो.

निफाड येथें भरलेल्या नाशिक जिल्हा वैद्य संमेलनानें या संघटना विरोधी प्रयत्नाचा निषेध केला आहे.

उद्देश सफल झाला नाही

मुंबई राज्य आयुर्वेद परिषद भरविण्याचा मुख्य उद्देश म्हणजे शाळांत शिकून पदवी घेतलेल्या वैद्यांची स्वतंत्र संघटना स्थापन करणें हा होता. पण तो यशस्वी झाला नाहीं. असें कळतें कीं वै. ह. वा. परांजपे आयुर्विद्या विशारद यांनीं त्याला विरोध केला व शेवटीं १९३८ च्या वैद्यक कायद्याच्या…

(कव्हर पान ३ पहा)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद पत्रिका, ता. १६ जून १९५३

आचार्य वेणीमाधवशास्त्री यांचा परिचय

नागपूर आयुर्वेदासनावर येथें नियुक्त झालेले वैद्य वेणीमाधवशास्त्री यांचा जन्म तारीख ३ जुलै १८९६ रोजी पिंपळनेर (ता. साक्री, जि. प. खानदेश) ग्रामीं झाला. त्यांचें शालेय शिक्षणहि तेथेंच झालें. सातवींत असतांनाच हेडमास्तर यांनीं स्वतःच्या महिन्याच्या रजेच्या मुदतींत छात्र—शिक्षक (pupil-teacher) म्हणून त्यांची नेमणूक करून, त्यांच्या जागीवरच शिक्षक म्हणून नेमिलें होतें. त्यांच्या अध्यापकीय आयुष्याचा हाच प्रारंभ. घरची भिक्षुकी, दारिद्र्य, इंग्रजी शिक्षणाची सोय नसलेलें खेडेगांव यामुळें त्यांना इंग्रजी शिक्षण मिळालें नाहीं व विना-इंग्रजी ट्रेनिंग कॉलेजचें शिक्षण घेणें जरूर झालें. १९१६ सालीं शिक्षकांच्या परिषदेंत अध्यापनाच्या परीक्षेंत 'नीतिशास्त्रा' सारखा अगदीं रूक्ष विषय घेऊन ३ रा नंबर मिळविला. परीक्षकांनीं त्यावेळींच वेणीमाधवांच्या भावी अध्यापकीय आयु-ष्याबद्दल प्रशंसोद्गार काढले. १९१८ सालीं ते थर्ड इयर ट्रेंड झाले. सन १९१९ सालीं महात्माजींच्या खादीकार्यांत समाविष्ट होण्याकरितां बडोद्यास खादी-शिक्षणास ते गेले, पण तेथें सोय नव्हती.

ध्येयनिष्ठा, खादीकार्य

इ. सन १९२० सालीं नागपूर कॉंग्रेसच्या ठरावाप्रमाणें त्यांनीं सरकारी नोकरी सोडली व अमळनेरच्या राष्ट्रीय प्रताप हायस्कूलमध्यें अध्यापनाचें काम केलें. त्या संस्थेनें सन १९२२ मध्यें सरकारी ग्रँट घेतली, म्हणून तीहि संस्था सोडली, व राष्ट्रीय शाळा व खादीकार्य यांत २।३ वर्षे काढलीं. कापडणे (जि. प. खानदेश) हें खादीकेंद्र स्वतः निर्माण करून, उत्कृष्ट दर्जाची खादी निर्माण केली. 'कापडण्याची मलमल' म्हणून ती खादी विकली जात असे.

आयुर्वेदप्राविण्य

१९२५ सालच्या जानेवारींत त्यांनीं सातारा आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयांत वैद्यकीय शिक्षणास आरंभ केला व फक्त अडीच वर्षांत चार वर्षांचा शिक्षणक्रम पुरा केला. डॉ. मोरोपंत आगाशे यांचेकडून आयुर्वेदाच्या बोधक कल्पना घेतल्या. नंतर अहमदनगर येथें जवळजवळ दोन वर्षे वैद्यराज श्री. बापवारु व कै. वैद्यपंचानन गंगाधरशास्त्री गुणे यांचेकडे आयु-र्वेदाचे धडे घेतले. यावेळीं डॉ. मोरोपंत आगाशे

यांनीं स्कॉलरशिप दिली होती. पुढें सन १९३१ पर्यंत साताराला अध्यापक म्हणून कार्य केलें, व त्याच सालीं बडोद्याची 'आयुर्वेदरत्न' परीक्षा ते पास झाले.

आयुर्वेद सेवासंघाचे जीवसदस्य

सन १९३२ सालापासून अहमदनगरला आयु-र्वेद सेवा संघाचे सदस्य, व आयुर्वेद महाविद्यालयाचे अध्यापक म्हणून त्यांनीं काम केलें. सन १९३४ मध्यें ते 'आयुर्वेदाचार्य' पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले.

आयुर्वेदाचें प्रचारकार्य व अध्यापन

१९३५ सालीं यांनीं अहमदनगर आयुर्वेद महाविद्यालयांतील कार्याच्या प्रचारार्थ, अकोला ते बेळगांवपर्यंत सर्व महाराष्ट्रांत श्री. बिंदुमाधवशास्त्री

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पंडित यांचेसह दौरा काढला होता. १९४० साली ते महाराष्ट्र प्रांतिक वैद्य संमेलनाचे अध्यक्ष झाले. त्याच साली यांनीं सर्व महाराष्ट्र प्रांतांत अध्यक्षीय दौरा काढला. या दोन्ही दौऱ्यांत डॉक्टर्स, सुशिक्षित स्त्रिया, विद्यार्थी, सामान्य जनता व वैद्य यांच्यापुढें त्यांच्या त्यांच्या जरूरीप्रमाणें विषय निवडून आयुर्वेदीय दृष्टिकोन मांडला. सन १९३७ ते १९४३ पर्यंत आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा या संस्थेमध्यें प्रिन्सिपॉल म्हणून काम केलें. सन १९४२-४३ ला टिळक विद्यापीठाच्या परीक्षक कमेटीवर काम केलें. साताऱ्याच्या अर्कशाला लि. डायरेक्टरबोर्डाचे अध्यक्ष, नगरच्या धन्वतरी फार्मसीचे अध्यक्ष, आयुर्वेदाश्रम फार्मसीचे डायरेक्टर म्हणून त्यांनीं औषधीकरणकार्य केलें आहे. सन १९४४ ला ते मुंबईस आले. १९४६ मध्यें बोर्ड ऑफ इंडियन सिस्टिम्स् ऑफ मेडिसिन, मुंबई, यांनीं पोस्टग्रॅज्युएट कोर्स कमेटीचे सदस्य म्हणून त्यांची नियुक्ति केली. १९५० साली वरील बोर्डांत सर्वांत अधिक मतानें ते निवडून आले, शिवाय फॅकल्टींतहि त्यांची निवड झाली.

अभ्यासाचीं व चिकित्सेचीं वैशिष्ट्यें

त्यांनीं ॲलोपॅथीचा चांगला अभ्यास केला; व बायोकेमिक, होमिओपॅथी, नॅचरोपॅथी, क्रोमोपॅथी, हैड्रोपॅथी व कायरोप्रॅक्टिसचीं मूलतत्वें समजावून घेतलीं. आयुर्वेद हा मानवी शरीर, निसर्ग व सृष्टि यांच्या परस्पर संबंधाच्या नियमांचा आदर्श आहे, ते उत्कृष्ट निसर्गोपचारक शास्त्र आहे, या दृष्टीनें आयुर्वेदीय नियमांचा बोध करून देणें, दोषविचाराबरोबर दूष्यविचार किंबहुना अधिक महत्वपूर्ण दूष्यविचार करून निदान चिकित्सा करणें,:हीं त्यांचीं वैशिष्ट्यें होत.

नुकतेच ता. २२ मार्च १९५३ ला मुंबई येथे भरलेल्या मुंबई उपनगर वैद्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. जुलै १९५३ पासून नागपूर युनिव्हर्सिटींत रीडर म्हणून आयुर्वेदसंशोधन कार्याकरितां त्यांची नियुक्ति झाली आहे.

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका), शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें आम्ही घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितो !

गुलकंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील !

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

टे. नं. ३१७९६ Telegram-AYURVED

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद पत्रिका, १६ जून १९५२

नाशिक जिल्हा वैद्य संमेलन, निफाड

नामदार हिरे यांच्या हस्तें उद्घाटन

पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणें निफाड येथें शनिवार ता. ३० रोजीं नाशिक जिल्हा वैद्य संमेलन, अमळनेर ...र इन्स्टिट्यूटमधील अधिकारी वैद्य आयुर्वेदतीर्थ ...विनायक दामोदर एकतारे यांच्या अध्यक्षतेखालीं ...व्यवस्थित रीतीनें पार पडलें. प्रारंभीं सकाळीं १०। ...वाजतां मुंबईचे वैद्य नानासाहेब जोशी आयुर्वेद-...विशारद यांच्या हस्तें आयुर्वेदीय ध्वजावंदन झालें. ...ध्वजा पांढरी शुभ्र असून त्यावर पिवळया रंगाचा ...व रक्तवर्णाचें स्वस्तिकचिन्ह काढलेलें होतें.

आयुर्वेदीय प्रदर्शनाचें उद्घाटन

त्यानंतर आयुर्वेदीय प्रदर्शनाचें उद्घाटन ...संमेलनाध्यक्ष वैद्य बिंदुमाधव पंडित यांच्या हस्तें झालें. ...ते म्हणाले "अशीं प्रदर्शनें केवळ वैद्य संमेलनासोबत ...नव्हे तर इतर संमेलनाबरोबर हीं भरविण्यांत यावींत. ...आपल्या भोवतालीं पसरलेला निसर्ग हेंहि एक विशाल ...प्रदर्शनच आहे. त्याकडे आपल्या हिताच्या, कल्या-...णाच्या, दृष्टीनें कसें पहावें हें अशा प्रदर्शनामुळें ...समजतें. प्राचीन काळीं विद्यार्थी आपला भावी ...व्यवसाय लहान वयांतच निश्चित करीत. त्यामुळें ...व्यवसायापयोगी गोष्टींचें निरीक्षण करण्यांत १०-१२ ...वर्षांचा दीर्घकाल सहज लाभत असे. आज वयाच्या १८-२० वर्षांपर्यंत सुद्धां त्यांचा व्यवसाय निश्चित ...होत नाहीं. त्यामुळें ४-५ वर्षांत मिळविलेलें पुस्तकी ...ज्ञान त्यांना धंद्यांत यशस्वी होण्यास पुरें पडत नाहीं."

चर्चात्मक अभ्यास

यानंतर प्रदर्शनांतील ओल्या वनस्पति, सामु-...दायिक पद्धतीनें चर्चा करून पाहण्याचा कार्यक्रम ...झाला. वैद्यराज बि. म. गोगटे यांनीं या कामीं ...पुढाकार घेतला होता. उपस्थित अनेक वैद्यांनीं आपले ...उद्बोधक प्रयोग व अनुभव मधूनमधून सांगितले.

ना. हिरे यांची वैद्यांशीं मुलाखत

दुपारीं २ वाजतां वाचनालयांत ना. भाऊसाहेब हिरे यांची निवडक वैद्य मंडळींशीं चर्चा झाली. यावेळीं "पनवेल संमेलनाचे अध्यक्ष वैद्य बिंदुमाधव-शास्त्री पंडित यांचें भाषण आपण संपूर्ण वाचलें आहे" असें यांनीं सांगितलें. "मिश्र-वैद्यकाचीं विद्यालयें काढण्यांत पुढाकार वैद्य डॉक्टरांनींच घेतला होता, सरकारनें नव्हे. सबब या शिक्षणांतून चांगले वैद्य निर्माण झाले नसल्यास तो दोष त्या संस्थाचालकांवर येतो" असें ते म्हणाले.

नामदार हिरे यांचें भाषण

दुपारीं बरोबर ३ वाजतां जैन मंदिरांत स्वागत-पर प्राकृत संस्कृत पद्यगायन व स्वागताध्यक्ष वै. सि. त्र्यं. मुळे यांचें स्वागतपर भाषण झाल्यावर उद्घाटक भाऊसाहेब हिरे यांचें सुमारें अर्धातास भाषण झालें. ते म्हणाले "मला आयुर्वेदशास्त्राविषयीं कांहीं माहिती नाहीं. मुंबई सरकारमध्यें या विषयासंबंधीं विचार-विनिमय चालू आहे व आपल्या म्हणण्याप्रमाणें त्याला वळण मिळण्याचा संभव आहे, असें मला वाटतें.

आयुर्वेदाची दीर्घकाल अनास्था

आपल्या राष्ट्रांत आयुर्वेदाचा उपयोग फार मोठ्या प्रमाणावर घेतला जात आहे, ही गोष्ट खरी आहे. मोगल राज्याच्या कालांत या देशांत युनानी वैद्यकाला राजाश्रय मिळाला व इंग्रजांनीं अलोपॅथीचें शिक्षण दिलें व राजाश्रयहि दिला; आयुर्वेदाला मात्र या देशांत दीर्घकालपर्यंत राजाश्रयाला मुकावें लागलें आहे.

सुशिक्षितांची परंपराप्रियता

या देशांत राष्ट्रीय भाषेचें ज्ञान द्यावें. इंग्रजीला प्राधान्य नसावें असें आपणापैकीं बहुतेकांस वाटतें पण इंग्रजी सोडणें बरें होणार नाहीं असें आपलेच सुशिक्षित म्हणतात. तरुणापुढें आपल्या थोर पुरुषांचीं चरित्रें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठेवावीत असें आम्हांस वाटतें, पण १५० वर्षांत या देशांत जी शिक्षणपद्धति रुळलेली आहे ती चाकोरी आपल्यांतील सुशिक्षितांना सोडवत नाहीं. राज्य-चालविण्याची पद्धति, पोशाखाची पद्धति इत्यादि समाजाच्या निरनिराळ्या अंगावर इंग्रजांच्या कर्तृत्वाचा प्रभाव पडला आहे. त्यांत बदल करण्याची आपली तयारी होत नाहीं. तीच गोष्ट वैद्यकाची; आयुर्वेदाची महती मान्य असूनहि आधुनिक पद्धतीची उपचार–पद्धति राज्यकर्त्यांनीं केलेल्या प्रसारामुळें सुशिक्षित लोकांत मान्यता पावली आहे व ती परंपरा त्यांना सोडावी असें वाटत नाहीं. याला माणसाची परंपरा-प्रियता हीच कारण आहे.

प्रचार सुशिक्षितांत हवा

एक गोष्ट मान्य करावयास हवी कीं आयु-र्वेदाच्या अभ्यासासांठीं पोषक अशी व्यवस्था या देशांत नाहीं, ती व्हावयास पाहिजे. खेड्यांतील लोक (९० टक्के) परंपरेनें आयुर्वेदीय औषधेंच वापरीत आहेत. अगदीं हातघाईवर आल्याशिवाय खेड्यांतील मनुष्य डॉक्टरकडे जात नाहीं. प्रथम तो कंदमुळया जाण-णाऱ्या वैद्याकडेच जातो. त्याची त्याच्या उपयोगावर श्रद्धा असते. सबब आपण आयुर्वेदाच्या उपयुक्तते-विषयींचा प्रचार खेड्यांत करण्याची आवश्यकता नाहीं. तो शहरांतील सुशिक्षितांतच करावयासच हवा आहे. सबब शहरांतील लोकांना आपल्या बाजूला करण्याचे प्रयत्न आपण करा.

पद्धतींतील दोष दूर करा

त्यासाठीं आपल्या उपचार पद्धतींतील जे कदाचित कांहीं दोष असतील तेहि दूर करण्याचा प्रयत्न वैद्यांनीं केला पाहिजे. शौचाला साफ होण्यासाठीं एनिमा व एरंडेल असे दोन उपचार माझ्यासमोर आले तर मी एनिमा पसंत करीन. ठेच लागली तर मी आयोडिन लावीन. ठेच लागली तर त्यावर काय उपाय आयुर्वेदांत आहे तें मला माहित नाहीं.

आयुर्वेद सोयीचा करा

आधुनिक पद्धतींत इंजेक्शन, टॉनिक, बॉइल्स फोडणें व पट्ट्या बांधणें इत्यादि ज्या उपयुक्त पद्धति आहेत तशा प्रकारच्या सोई आयुर्वेदांत असल्या पाहिजेत. अलोपॅथी व्यवहाराला जशी सोईची आहे तसा आयुर्वेद वाटत हाहीं.

डॉक्टर कां म्हणतात ?

आजच्या आयुर्वेदाच्या शिक्षणसंस्थांतून बाहेर पडलेल्या पदवीधराला डॉक्टर म्हणतात, वैद्य म्हणत नाहींत. तोहि स्वतःला डॉक्टर म्हणवितो. कारण मला वाटतें त्यामुळें त्याला प्रतिष्ठा व पैसे जास्त मिळवितां येतात. तथापि आज ज्या शिक्षणसंस्था चालू आहेत, त्यांना जी मान्यता दिली आहे ती जनतेनें व म्हणूनच सरकारनें तिच्या आयुर्वेदावरील प्रेमानेंच दिली आहे.

दोष कोणी काढावेत ?

आजच्या शिक्षणसंस्थांत जे दोष शिरले आहेत ते काढण्याला ज्ञानी माणसेंच पाहिजेत. सरकारांतील अनभिज्ञ माणसें तें काम करू शकणार नाहींत. व ते दोष दूर झाले नाहींत म्हणून अनभिज्ञांना (सरकारला) दोष देणें युक्त होणार नाहीं.

तज्ञांच्या सल्ल्यानें कारभार

लोकांनीं निवडून दिलेलीं माणसें राज्यकारभार चालवू लागलीं तरी तीं त्या त्या खात्याचीं तज्ञ नस-तात. सबब त्यांना त्या त्या खात्यांतील लोकांच्या सल्ल्यानुसारच चालावें लागतें. तगाई अगर सारा

गुळवेल सत्व व बाकेरी भाते ५ रु. रत्तल. उत्तम मध, दशमुळें व इतर २०० फौंडाघाटच्या वनस्पती व त्यांचीं चूर्णे मागणीप्रमाणें पुरवूं.
परुळेकर ब्रदर्स, मोंगल लेन, मुंबई १६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...ची द्यावयाची तर मामलेदार व कलेक्टर यांच्या ...नेंच तें करावें लागतें. चालू व्यवस्थेंत ढवळाढवळ ...तके मंत्री हे सर्वज्ञ नसतात, असूं शकत ...त. सबब तुमच्यांतील ज्ञानी लोकांचें हें कर्तव्य ...कीं समाजांतील सुशिक्षित जनतेला त्यांनीं ...वेदाची उपयुक्तता पटवून दिली पाहिजे.

वैद्य अज्ञानी मनुष्य वाटतो

आजचा सुशिक्षित हा वैद्याकडे अज्ञानी मनुष्य ...न पाहतो. डॉक्टर त्याला सुशिक्षित वाटतो. कारण ...ची राहणी सुशिक्षिताप्रमाणें असते. वैद्यांनींहि ...ची राहणी सुधारली पाहिजे. आयुर्वेद हा इतर ...शास्त्रांच्या टेकूशिवाय जिवंत राहू शकेल अशी ...क्षित लोकांची खात्री तुम्ही पटविली पाहिजे.

आयुर्वेदासाठीं रिझर्व खाटा

कॅबिनेट सिक्रेट सांगावयाचें तर सरकारनें ...र्वेदासाठीं मुंबई, पुणें, अहमदाबाद येथील ...ल्यांतून आयुर्वेदासाठीं खास (रिझर्व्ह) खाटा ...न ठेवण्याचें ठरविलें आहे. रोगी आयुर्वेदिक ...नें उपचार घेऊ इच्छित असेल तरच त्याला ...खाटांवर प्रवेश मिळेल. त्या खाटावर आयु-...क पद्धतीखेरीज अन्य पद्धतीचे उपचार दिले ...जाणार नाहींत, व ते उपचार तज्ज्ञ आयुर्वेदीय वैद्या-...कडून दिले जातील. इतरहि कांहीं ठिकाणीं अशी ...आयुर्वेदीय उपचारांचीं रुग्णालयें चालविण्यांत ...ल, त्यांना सरकारी मदत दिली जाईल.

दवाखाना हवा, वैद्य नको

लोकलबोर्डाचा अध्यक्ष असतांनाच माझा अनुभव ...आहे, कीं खेड्यांतील लोक आपल्या गांवीं ...खाना मागतात. पण दवाखाना या शब्दाचा ...र्थ 'आयुर्वेदाचा' असा नव्हे; तर ॲलोपॅथीचा. ही ...णी त्या खेड्यांतील जे सुशिक्षित आहेत तेच करीत ...तात. मग याला आपण त्यांची प्रगति म्हणा कीं ...गति म्हणा. सबब माझ्या मतें आयुर्वेद जगणार ...सेल, त्याला प्रतिष्ठा मिळणार असेल तर त्या शास्त्रांत ...ही मूलभूत स्वाभाविक सद्गुण (Intrinsic Values) असतील तर व ते लोकव्यवहारांत सिद्ध झाल्यावरच मिळणार आहे.

उपचारांचें अवडंबर

आजचे ॲलोपॅथिक उपचारांचें अवडंबर साधनसामुग्री किती असते ती पाहिली कीं माणसाचा एकदम विश्वास बसतो. आयुर्वेदिक दवाखान्यांत फक्त मुळ्या-जाळ्या असतात अशी लोकांची समजूत आहे. आयुर्वेदाला लोकांत मान्यता मिळवून देण्यासाठीं आयुर्वेदीय पद्धतीचीं साधनें लोकांच्या डोळ्या-समोर आलीं पाहिजेत. लोक जेव्हां दोन पावले चालू शकतील तेव्हां सरकार ३ पावलें चालू शकेल. सरकार व जनता यांत महदंतर पडलें तर राज्यकर्ते यशस्वी होऊ शकणार नाहींत.

राज्यकर्त्यांना मार्गदर्शक व्हा !

सबब आज आहे तशाच आयुर्वेदाला मान्यता द्या अशी मागणी करण्यापेक्षां आयुर्वेदाच्या प्रगती-मधील ज्या किरकोळ अडचणी आहेत त्या आपण दूर करण्याचा प्रयत्न करा. आपल्याला मग नाराज अगर नाउमेद होण्याची पाळी येणार नाहीं, असें मी आश्वा-सन देतो. आपलीं हीं संमेलनें व आपल्यांतील ज्ञानी मंडळी यांनीं राज्यकर्त्यांना मार्गदर्शक व्हावें. राज्य-कर्त्यांची आयुर्वेदाच्या प्रगतीच्या कार्यांत मदतच होईल अशी खात्री बाळगा."

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुरुंगांत काविळीची सांथ

व त्यावर रामबाण आयुर्वेदीय उपचार

संग्राहकः-वैद्य पां. वि. जायदे

" माननीय श्री. आर. एस. हुकेरीकर (चेअरमन, कौन्सिल आफ स्टेट, मुंबई) यांच्याशीं दिल्ली येथें दंतयज्ञासंबंधीं विचारविनिमय करीत असतांना खालील उपयुक्त माहिती उपलब्ध झाली.

आयुर्वेदीय उपचाराचा सल्ला

एकदां········· च्या तुरुंगांत कामलेची सांथ (Epedemic) सुरू झाली. सांथ फार झपाट्यानें पसरली. शेंकडों लोक आजारी पडले व कित्येक दगावले. एकहि उपचार यशस्वी होईना. तज्ञ डॉक्टरांनीं शिकस्त केली पण व्यर्थ; जेलचे डॉक्टर किंकर्तव्यमूढ झाले.

तुरुंगांत आलेल्या कोणी आयुर्वेदतज्ञानें आयुर्वेदीय उपचार सुचविले व त्या उपायानें हमखास रोगी बरे होतील असा सल्ला दिला.

जेलची शिस्त

पण कायद्यानुसार कैद्यांनीं तुरुंगाच्या डॉक्टरांचेच उपचार घेतले पाहिजेत. मरण ओढवलें तरी बेहेत्तर, पण त्यांनीं दुसरें औषध घेतां कामा नये! यामुळें अनेक राजबंदी यमसदनाला गेले.

अखेर जेलचे डॉक्टर गडबडले. त्यांनीं नियम ढिले केले. कांहीं राजबंद्यांना आयुर्वेदीय औषध स्वतःच्या जबाबदारीवर (Personal Risk) घेण्यास परवानगी मिळाली.

अद्‌भूत चमत्कार

आयुर्वेदीय उपचारांनीं रोगी भराभर रोगमुक्त झाले. प्राणसंकट टळलें. थोड्याच दिवसांत कामलेच्या सांथीची नामनिशाणीहि राहिली नाहीं. सर्वत्र आनंदीआनंद झाला.

सरकारचा खुनशीपणा

तत्कालीन ब्रिटिश सरकारच्या खुनशीपणामुळें सदर प्रकारास कोठेंच प्रसिद्धि मिळाली नाहीं इतकेंच नव्हे तर प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पनेमुळें सदर आयुर्वेदीय उपचारांची नोंदहि जेलच्या दप्तरांत नसावी.

कामलेवर रामबाण उपाय

तत्कालिन कामलेवर रामबाण ठरलेलें हें औषध म्हणजे 'कडू दोडका' रात्रीं भिजत घालून त्याचे हिम सर्व राजबंदी घेत असत.

पथ्यः—उसांचा रस अथवा ऊस खाणें.

———

कर्णरोगावर संजीवनी

मान्यवर हुकेरीकरांनीं कर्णरोगावर आपला खास अनुभव सांगितला तो असाः—

कर्णशूल (Otitis Media) यांवर सबजाचा रस अत्यंत अनुभविक उपचार आहे. अनेक कर्णरोग्यावर त्यांनीं हा उपचार करून यश मिळविले आहे.

———

सांड
डायाबेटॉल
मधुमेहावर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर, मुंबई
[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कै. डॉ. ह. व्यं. सावनूर

बेळगांव येथील सुप्रसिद्ध डॉक्टर व आयुर्वेदाचे ... डॉ. हणमंतराव व्यंकटेश सावनूर एल्. एम्. ... ता. ३ जून रोजीं आपल्या घरीं कॅन्सर या ... वयाच्या ७४व्या वर्षी परलोकवासी झाले.

... एप्रिल महिन्याच्या अखेरीस काढलेल्या म. प्रां. ... मंडळाच्या प्रचार दौऱ्याचे वेळीं बेळगांव येथें ... घरीं जाऊन आम्हीं त्यांची भेट घेतली होती ... कॅन्सरवर घेतलेले डीप एक्सरे हे उपचार ... मुळापर्यंत पोहोचणारे नव्हेत याची चर्चेंत ... करून दिली होती. आयुर्वेदीय विचारसरणी- ... कफप्रकृतीला अनुसरून या विकारावर ... आहारविहार ठेवणें हें कसें आवश्यक आहे याचीहि ... त्यावेळीं झाली होती. प्रत्यक्षांत अनुभवहि ... आला.

सौराष्ट्रचें संस्कृतला उत्तेजन

सौराष्ट्र (राजकोट) सरकारनें आपल्या राज्यांत संस्कृत पाठशाळांची पुनर्रचना करण्याचें ठरविलें आहे. या सर्व पाठशाळांचें कामकाज शिक्षणखात्यांत केन्द्रित करण्यांत येणार आहे. ज्या पाठशाळांत शास्त्री व आचार्य पदवीपर्यंतचें शिक्षण दिलें जातें त्या पाठशाळा 'अ' वर्गांत व ज्यामध्यें मध्यमा परीक्षेपर्यंतचें शिक्षण दिलें जातें त्या पाठशाळा 'ब' वर्गांत समाविष्ट करण्यांत येतील.

इतर विषयांचा समावेश

पाठशाळेच्या शिक्षणक्रमांत संस्कृत व्यतिरिक्त इतर विषयांचाहि समावेश करण्यांत येईल. संस्कृतचा अभ्यासक्रम बनारस संस्कृत कॉलेजप्रमाणें ठेवण्यांत येईल.

त्वरित गुणदायी इंजेक्शनांचा शास्त्रीय शोध

१) आमच्या इंजेक्शन्सवर कोणत्याहि प्रकारचा प्रतिबंध नाहीं.

२) आमच्या इंजेक्शनांची आयुर्वेदीय शास्त्रीयता, विशुद्धता, व पूर्ण गुणकारिता केंद्रीय व प्रांतीय सरकारी अधिकाऱ्यांच्या समक्ष सिद्ध केली गेली आहे.

३) आमचीं आयुर्वेदीय सूचिकाभरणें व पेय औषधांच्या बंद कुप्या (ॲम्प्यूल्स) वैद्य हकीम डॉक्टर कोणीहि स्वतंत्रपणें वापरूं शकतात.

४) आमची रसायनशाळा ही भारतांतील सर्व श्रेष्ठ शास्त्रीय साधनसंपन्न रसायनशाळा आहे. हिनें आयुर्वेदीय इंजेक्शनांची प्रमाणबद्धता निर्माण करून आयुर्वेदीय जनतेमध्यें पसरलेली निराशा, आपल्या त्वरित गुणकारी सूचिकाभरणांनीं नाहींशी केली आहे.

५) आमच्या इंजेक्शनाच्या उपयोगानें असाध्य व कठिण रोगांची सफळ व सत्त्वर चिकित्सा केली जाऊं शकते.

६) आम्हांला सर्वत्र गावें, कसबे, व शहरें यांतून एजंट नेमणें आहेत.

—: १९५३ च्या मे मध्यें प्रसिद्ध केलेलें नवें सूचिपत्र मागवा. मोफत पाठवूं. :—

निर्माते:- मार्तण्ड फार्मास्युटिकल्स

(रिसर्च इंस्टिटयूट आफ् इंडियन मेडिसिन) बड़ौत S. S. R. (उत्तर प्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" या औषधी भवनाचा उत्कर्ष होणारच ! "

[सोलापूर, पुणें, मुंबई येथील मोटार विक्री व्यवसायांत श्री. माणिकचन्द वीरचन्द शहा हे प्रसिद्ध आहेत. तसेंच बँक ऑफ महाराष्ट्र, सांगलीचें इंजिनियरिंग कॉलेज, या संस्थांच्या उभारणींत व प्रगतींत त्यांचा मोठा भाग आहे. नुकतेच ते श्रीमान् ब्रह्मचारी जीवराज गौतमचन्द यांच्यासह नाशिक येथें आले असतां, न बोलावतां आपण होऊन आयुर्वेद सेवा संघाचा शोध घेत आले व त्यांनीं आपलेपणानें सर्व संस्था पाहून माहिती घेतली. सेवा संघाच्या चालकांनींहि आपली कार्यपद्धति त्यांना निवेदन केली व कांहीं व्यवसायोपयोगी माहिती त्यांच्याकडून मिळविली.

त्यांनीं लिहिलेला अभिप्राय विस्तृत आहे, तथापि तो व्यवहारकुशल पण स्पष्टवक्त्या मनुष्याचा असल्यामुळें येथें समग्र दिला आहे. —व्यवस्थापक]

चालकांतील आपलेपणा

आज आयुर्वेद संघानें चालविलेलें औषधीभवन पाहिलें. संघाचे सभासद (सभासदांपैकीं कांहीं मंडळी) जुन्या आयुर्वेदाश्रम फार्मसी अहमदनगर, या संस्थेचे व्यवस्थापक मंडळांतील असल्यानें जुन्या ओळखीमुळें कारखाना पाहतांना आपलेपणा होता व दाखवितांना तोच आपलेपणा त्यांनीं दाखविला.

त्यागपूर्वक एखाद्या संस्थेंत बरींच वर्षें काम केल्यानन्तर, मतभेदामुळें ती संस्था सोडून, नवीं उभी करून ती नांवारूपास आणणें, हें व्यापारी दृष्टीनें बरेंच अवघड कार्य आहे. त्यांत तत्वांस धरून कार्य करणें व त्याला मूर्त स्वरूप आणणें हें जास्तच कठीण! पण हें कार्य माझे समजुतीनें ७-८ वर्षांत नव्या उत्साहानें व नव्या जागेंत पुष्कळच प्रमाणांत मूर्तस्वरूपांत आणलेलें दिसून आलें.

निश्चित औषधी योजना

श्री. गुणेशास्त्रीं यांचेकडे वैद्य म्हणून आकर्षण, ज्या त्यांचे माहिती व अनुभवामुळें होतें, तेंच आकर्षण या चालक मंडळीकडे ! ज्यांचा आयुर्वेदावर विश्वास आहे व ज्यांचा देशी औषधावरच विश्वास आहे, त्यांना येथें नव्यानें पूर्ण काळजीपूर्वक केलेलीं नवीन औषधें मिळतीलच, पण त्यासोबत जरूर तर चिकित्सा व औषधांचे गुणधर्म व प्रकृतीशीं कार्यकारणभाव यासह या मंडळीकडून निराश रोग्यांना निश्चित औषधयोजना मिळेल, अशी जी जुन्या अनुभवानें खात्री होती, तीच व्यवस्था या मंडळीकडून यापुढेंहि मिळेल असा विश्वास वाटला.

लोकविश्वासपात्र औषधें

शिवाय, अलिकडे देशी औषधांच्या कारखान्यांत (मास प्रॉडक्शन) म्हणजे पुष्कळ मोठ्या प्रमाणांत औषधें करण्यासाठीं यंत्रें व लवकर करण्यासाठीं जरूरीपेक्षां जास्त घिसाडघाई होते व कमी गुणकारी औषधें निर्माण केलीं जातात. तसेंच कांहीं पेटंट औषधें करण्याकडे प्रवृत्ति फार वाढल्यानें, मूळ उद्देश त्यांचेकडून कांहीं प्रमाणांत डावलला जात आहे. या कारखान्यानें परत लोकविश्वासपात्र औषधें जुन्याच पद्धतीनें करण्याचें चालू केलें असलेलें पाहून समाधान वाटलें.

अशी माझी खात्री आहे

माझा आयुर्वेदावर विश्वास आहे, गरीब जनतेला आयुर्वेदांतीलच औषधें देणें व घेणें शक्य आहे, व हिंदुस्थानांतील दरिद्री जनतेला देशी औषधेंच घेणें सोईचें व शक्य आहे. या दृष्टीनें या संस्थेचा चालक वर्ग करीत असलेलें कार्यच उपयोगी आहे, व जरूर आहे, असें मी मानणारा आहे. त्या दृष्टीनें या औषधीभवनाचा उत्कर्ष इच्छितो, नव्हे तो होणारच असा माझा विश्वास आहे, व येथील चालक मंडळींच्या त्यागानें त्यांना राष्ट्रांतील वैद्यकीय कार्यांत लवकरच मानाचें स्थान मिळाल्याशिवाय राहाणार नाहीं, अशी माझी खात्री आहे.

ता. ९।५।५३ माणिकचंद वीरचंद शहा

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन

अधिवेशन ९ वें, लातूर

आयुर्वेदविशारद वैद्यराज दत्तात्रेयशास्त्री जळूकर, नशिराबाद यांचें अध्यक्षीय भाषण

"नमोऽस्तु अश्विभ्याम्।"

शशिरुचिरहरार्धव्यक्तसक्तार्धदेहो।
दिशतु घनघनाभः पद्मनाभः श्रियं वः।
त्रिदशसरिदधीतद्योतजावारिमध्य।
भ्रमिभवमिव नाभौ वारिजं यस्य रेजे ॥ १ ॥

× × ×

शंखं चक्रं जलौकां दधदमृतघटं चारुदोर्भिश्चतुर्भिः।
सूक्ष्मस्वच्छातिहृद्यांशुकपरिविलसन् मौलिमंभोजनेत्रम्।
कालाम्भोदोज्ज्वलांगं कटितटविलसत् चारुपीतांबराढ्यम्।
वन्दे धन्वन्तरिं तं निखिलगदवनप्रौढदावाग्निलीलम् ॥२॥

× × ×

कवडे कृष्णशास्त्रीति वैद्यपंचाननो गुरुः।
कार्यादौ नानलोपाव्ह आचार्यश्च प्रणम्यते ॥ ३ ॥

सन्माननीय स्वागताध्यक्ष, स्वागत समितीचे कार्यकारी सदस्य, सन्मान्य सभासद, प्रतिनिधी ...हो, आणि आयुर्वेदाभिमानी लातूर नगरवासी प्रेक्षक बंधुभगिनींनो!

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाच्या ह्या नवम अधिवेशनाच्या अध्यक्षपदीं माझी योजना करतांना ...च्च पदाला भूषित करण्याजोगे कोणते गुण म. प्रां. वैद्य मंडळाच्या सभासदांनीं लक्षांत घेतले आहेत ...मला कळत नाहीं. मी तर निश्चित असेंच समजतो कीं, गेलीं १८-२० वर्षें आमच्या संयुक्त खानदेश ...मंडळानें आयुर्वेदक्षेत्रांत जी अल्पस्वल्प सेवा केली आहे तिचा गौरव करणें हेंच असें करण्यांत त्यांचें ...हेतु असलें पाहिजे.

म. प्रांतीय वैद्य संमेलनास जन्म देण्याचें सौभाग्य ज्या संयुक्त खानदेश वैद्यमंडळास प्राप्त झालें ...मंडळालाहि "आत्मा वै पुत्रनामाऽसि" या न्यायानें आपल्या एका घटकाला प्रांतीय वैद्य मंडळानें ...वर उचलून धरून त्याची उंची वाढविली याचा विशेष आनंद व अभिमान वाटल्यास आश्चर्य ...ण्याचें मुळींच कारण नाहीं. कशाहि प्रकारें कां होईना, आपण मला अध्यक्षस्थानीं नियुक्त करून ...वर प्रांतीय आयुर्वेद सेवाकार्याचें उत्तरदायित्व सोंपविलेंत आणि प्रेम व्यक्त केलेंत याबद्दल मी ...आपणां सर्वांचा नितांत ऋणी आहे.

स्वाधीन भारताच्या राजवटींत त्याच्या पराधीनावस्थेंतील काळापेक्षांहि त्याच्याच जन्म-...हक्काच्या आयुर्वेदशास्त्राची नौका डांवाडोल होऊं लागून आयुर्वेदशास्त्र, तदुपजीवि वैद्यवर्ग ...आणि संपूर्ण समाजाचें जीवित साशंक व्हावें, हा एक दैवदुर्विलासच नव्हे तर काय? आणि अशा ...कठीण काळांत प्रांतीय आयुर्वेदक्षेत्राची धुरा आपण मजवर सोंपवीत आहांत. ह्या कार्याचा भार सहन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि वहन करण्याचें सामर्थ्य नानाविध आधिदैविक आणि आधिभौतिक प्रतिकूल घटनांच्या आघातानें जीर्णशीर्ण झालेल्या या देहांत नाहीं; ही जाणीव असतांहि गुरुजनांचे आशीर्वाद आणि आपणांसारख्या कृतकार्य व अनुभववृद्धांचें सहानुभूतिपूर्ण तळमळीचें सहकार्य, माझे ठिकाणीं चैतन्यचिंतामणिमात्रेचें कार्य करील असा मला आत्मविश्वास वाटतो.

अखिल भारतीय व प्रांतीय वैद्य-संमेलनांना धन्यवाद

इंदूर येथें यशस्वी म्हणून संपन्न झालेल्या अ. भा. वैद्यसंमेलनापर्यंतच्या सर्वहि आणि वेळोवेळी प्रतिवर्षी संपन्न होणाऱ्या निरनिराळ्या प्रांतीय संमेलनांचा इतिहास दृष्टीपुढें ठेवल्यास त्या त्या प्रतिकूल परिस्थितीशीं झगडून आपलें उद्दिष्ट साधण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे, याबद्दल ह्या कार्यकर्त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. तरीपण राजा व जनताहि आयुर्वेदासंबंधीं प्रतिकूल व उदासीन असल्यानें संपूर्णतया हीं संमेलनें सफलोद्दिष्ट झालीं असें म्हणतां येत नाहीं. संमेलनांची यशस्विता मिष्टान्न भोजनाच्या आतिथ्यानें, आवेशपूर्ण भाषणांनीं वा संमत झालेल्या प्रस्तावांच्या लांबी-रुंदीनें मापायची नसून, त्या संमेलनांतील या सर्वहि प्रकारसमुच्चयानें आयुर्वेदोक्त किती जटिल समस्यांचा उलगडा आम्हीं करूं शकलों, किती संदिग्ध खनिज, उद्भिज्ज वा प्राणिज द्रव्यांच्या गुणधर्मस्वरूपाविषयीं आम्ही निःसंदिग्ध झालों, नवी नवनवीन नांवानें पुढें येणाऱ्या किती रोगांविषयीं व्यवच्छेदक निदान व चिकित्साकार्याची भर आम्हीं घालूं शकलों, आमचे असूनहि आमच्यापासून केवळ दूरच नव्हे तर विरोधाच्या परमसीमेला जाऊन पोंचलेल्या किती साशंकहृदयींजनांना आम्ही आमच्या अधिक जवळ आणूं शकलों, त्यांची ती विरोधी वा साशंकवृत्ति नष्ट करण्यांत आम्ही कोणते यशस्वी प्रयत्न केले, इ. प्रश्नांच्या यथार्थ उत्तरांवरच ह्या वैद्यसंमेलनांची यशस्विता निश्चित मापली जाणार आहे. त्या दृष्टीनें ' याचको याचकं दृष्ट्वा श्वानवत् गुर्गुरायते ' ची एके काळची आम्हां वैद्यांमधील वृत्ति जाऊन आम्हीं एखाद्या रुग्णाविषयीं, व्यावसायिक वा शास्त्रीय अडी-अडचणींविषयीं परस्परांजवळ बसून मोकळ्या मनानें चर्चा करूं लागलों आहोंत, याचें श्रेय बहुतांश ह्या संमेलनांसच द्यावयास हवें. परंतु असें करीत असतांहि शुद्ध-मिश्र-आयुर्वेदपक्ष, पदवीधर-बिनपदवीधर पक्ष इ. निमित्तानें आम्ही वैद्यवर्ग मनानें एकमेकांस दुरावत आहोंत, हें पाहिलें म्हणजे आयुर्वेदाचा ऊर्जित काळ अजून दूर आहे असें वाटून चित्त उदासीन होते.

" विघ्नभूता यदा रोगाः प्रादुर्भूताः शरीरिणाम् । तपोपवासाध्ययनब्रह्मचर्यव्रतायुषाम् ॥
तदा भूतेष्वनुक्रोशं पुरस्कृत्य महर्षयः । समेताः पुण्यकर्माणः पार्श्वे हिमवतः शुभे ॥ चरकसंहिता ॥

प्राणिमात्राविषयीं 'अनुक्रोश' म्हणजे दया ज्यांचे अन्तःकरणांत अहोरात्र असे, असे तपोधन महर्षी वारं-वार एकत्र येऊन रोगांची उत्पत्तीच होऊं नये आणि झालेल्या रोगांपासून जनता मुक्त व्हावी ह्या पवित्र हेतूनें मनमोकळेपणें चर्चा करीत, प्रश्नोत्तरें होत, शंका मांडल्या जात, त्यांचें निरसन केलें जाई व त्यांतून अमोल व शाश्वत सिद्धांत प्रस्थापित होत असत. हींच खरीं संमेलनें ! आकाशाच्या विशाल मंडपाखालीं पंच-महाभूतांचे साक्षित्वानें होणारे ह्या संमेलनांचे निर्णय म्हणजेच आमच्या जीवनाधार शास्त्रसिद्धांतप्रथित चरक-सुश्रुतादि संहिता होत. अशा त्या महर्षींच्या ठिकाणीं तपःसामर्थ्याचें तेज होतें. सर्वश्रेष्ठ ब्रह्मज्ञानाचें ते निधान होते; व यम-नियमांचे ते सर्वहि ऋषिश्रेष्ठ पूर्ण अधिकारी होते. त्यांचीं संमेलनें पद्धतशीर होत असत, त्यांच्या परस्परचर्चा व वादविवाद नियमबद्ध व परस्परांच्या अधिकाराच्या मर्यादेची पातळी राखून होत असत. त्यांत अकांडतांडव नसे. ' बालादपि सुभाषितं ग्राह्यम् ' या वृत्तीचा अवलंब असे, व म्हणून तीं संमेलनें यशस्वी संपन्न होत, व त्यांतील निर्णयाचे सिद्धांत हे त्रिकालाबाधित असेच ठरले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विचार, उच्चार व आचार प्रवर्तक संमेलनें

सध्यां होत असणारीं संमेलनें यापुढेंहि होत राहणें अत्यावश्यक आहे. आम्ही आतां स्वाधीन ...वे वारस आहों. आमच्या भाग्याचे विधाते आम्ही आहोंत. "उद्धरेत् आत्मनाऽऽत्मानम्" ...कर्मयोगी भगवान् श्रीकृष्णप्रभूचा संदेश प्रत्यक्षांत आणण्याचा काळ आतां आला आहे. व म्हणून ...तर आमची उन्नति कां होऊं शकली नाहीं, याविषयीं व्यर्थ चर्चा वा काथ्याकूट न करतां, आतां आम्हीं ...ठरावयास हवें हें निश्चित हेरून योग्य मार्गानें पाऊल टाकण्याच्या दृष्टीनें विचार, उच्चार व आचार प्रवर्तक ...हीं संमेलनें होणें इष्ट आहे.

आयुर्वेद व तदुपजीवि वैद्यवर्गाची सर्वांगीण उन्नति हेंच आजच्या आमच्या संमेलनाचें ...आहे. ही सर्वांगीण उन्नति म्हणजे चौखांबी इमारतच होय. (१) आयुर्वेदशास्त्र (२) तदुपजीवि ...वर्ग (३) आयुर्वेदाची राजमान्यता व (४) आयुर्वेदाचें लोकमान्यत्व हे ते चार खांब होत. यांच्या ...पायावरच ही उन्नतीची इमारत उभारली जाणार असल्यानें ह्या चार गोष्टींबद्दलच, अतिसंक्षेपानें नाहीं ...श्रोत्यांच्या श्रवणभक्तीचाहि अंत न पाहातां विचार प्रदर्शित करणें हाच माझ्या भाषणाचा ...हेतु आहे.

(१) आयुर्वेदशास्त्र

आयुर्वेदशास्त्राची उन्नति व्हावयास हवी असें जेव्हां जेव्हां आम्हीं म्हणतों तेव्हां तेव्हां त्या ...च्या आजच्या स्थितीविषयीं आमचें असमाधानच आम्हीं व्यक्त करीत असतो, ही गोष्ट न्यायसंगत ठरते. आयुर्वेदाचे शास्त्रीय ग्रंथ हे सूत्रबद्ध असून विशिष्ट परिभाषा त्या ग्रंथांतून अंगिकारलेली आढळते. ...कोणताहि शास्त्रीय ग्रंथ—मग तो पौर्वात्य वा पाश्चात्य कोणत्याहि शास्त्राविषयींचा असो—हातीं घेऊन ...वाचावयाचा म्हणजे त्या ग्रंथांतलीं फक्त अक्षरें वाचणें नव्हे, तर त्या प्रत्येक अक्षरामागें त्याच्या योजकाची ...दृष्टि कोणती आहे, ग्रंथाची परिभाषा काय आहे, विषयप्रतिपादनाचा रोख व धोरण काय आहे हें ...सर्व नीट समजून घेतलें पाहिजे. तसें तें नीट समजून न घेतल्यामुळेंच अत्यल्प संस्कृत व कांहीं इंग्रजी शिक्षण ...घेतलेले पंडित, ढेंकर अथवा अपानमार्गें व्यक्त होणारा तो वायु, वांतीवाटें पडणारें आंबट-कडवट हिरवें-...पिवळें पाणी म्हणजे पित्त, व खोकून खोकून घशांतून बाहेर येणारा चिकट पदार्थ तो कफ, असा आयु-...र्वेदीय त्रिदोषांचा अर्थ लावून मोकळे होतात. व मग त्यांना एखाद्या व्रणाची चिकित्सा करणारा वैद्य आयुर्वेदशास्त्रदृष्ट्या 'वातज, पित्तज, कफज असे व्रणाचे भाग पाडून त्याचीहि आम, पच्यमान व ...अवस्था पाहून चिकित्सा व्हावयास हवी' असें सांगतो तेव्हां यांना त्याचा मुळींच बोध होत नाहीं व ...'आयुर्वेदांत त्रिदोषांचें उगीच बंड माजवलें आहे' 'त्रिदोष हें एक थोतांड आहे' असे अभिप्राय भराभर ...करून ते मोकळे होतात. आज दुर्दैवानें परिस्थितिसुद्धां अशीच आहे कीं, अशांची समजूत पटवून ...देणाऱ्यांची संख्याहि आमचेजवळ भरपूर नाहीं. "तातस्य कूपोऽयमिति ब्रुवाणः क्षारं जलं कापुरुषाः पिबन्ति" ...हा काळ आज नाहीं. 'बाप दाखव नाहीं तर श्राद्ध कर' असें निर्भीडपणें बजावणारा, रोखठोक सवाल ...करणारा आजचा सुशिक्षित समाजांतील बहुसंख्य वर्ग आहे. मलेरिया, टायफॉइड, इन्फ्लुएंझा, कॉलरा, सारखे ...रोगनामक शब्द आज घरोघरीं आजीबाईंनाहि परिचित असल्यानें नाडीपरीक्षा करून वैद्यबुवांनीं यांपैकीं ...एखाद्या रोगाचा उल्लेख रोगनिदान सांगतांना केला नाहीं कीं त्यास 'रोगपरीक्षा झाली नाहीं' असा शेरा ...निश्चित मिळतो. याचे उलट, आज मलेरिया ठरवून ४।२ इंजेक्शन्स क्विनीनचीं दिल्यावर ताप न उतरला ...तर टायफॉइड, त्यांत खोकला कफ झाला कीं इन्फ्लुएंझा, न्यूमोनिया इ. नांवें त्या तापाचीं बदलत जाऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नवीन नवीन उपलब्ध अशा ऑरोमायासिन, क्लोरोमायसिटीन, एम्. बी., पेनिसिलीन, इ. द्रव्यांचा भरमसाट उपयोग केल्यावरहि रोगी जमिनीवरचा अस्मानांत पोंचला तरीसुद्धां 'रोगनिदान चुकलें, भलतीच औषधें दिलीं गेलीं' असें न म्हणतां 'खूप खटपट केली डॉक्टरांनीं, पाण्यासारखा पैसा खर्च करून भारी भारी औषधें वापरलीं, पण आपलें नशीबच खोटें, तेथें डॉक्टर बिचारे काय करणार?" असे उद्गार ऐकूं येतात. 'कालस्य कुटिला गतिः' ती हीच!

आजची वैद्यकी म्हणजे केवळ व्यापार

रोगी हातीं सांपडल्यानंतर त्याचेकडून अधिकांत अधिक पैसा कसा काढतां येईल हीच दृष्टि व्यवहारांत जेव्हां डॉक्टर-वैद्य ठेवतात, तेव्हां त्यांचेकडून चिकित्साकार्यांत शास्त्रीय सूक्ष्मासूक्ष्म विचाराची अपेक्षा करणें व्यर्थच नव्हे तर काय? "नात्मार्थं नापि कामार्थं अथ भूतदयां प्रति। वर्तते यश्चिकित्सायां स सर्वमतिवर्तते" हा आयुर्वेदमहर्षींचा आदेश कोठें व अशाप्रकारें वैद्यकीचा व्यापार करणारे हे डॉक्टर वैद्य कोठें? सांगण्याचें तात्पर्य हेंच कीं, केवळ 'पोटभरू विद्या' म्हणून वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग करणारां-कडून आयुर्वेदशास्त्राची उन्नति होऊं शकत नाहीं, त्यासाठीं संशोधनैकतत्पर बुद्धीच्या अधिकारी व्यक्ति सरकारनें हातीं धरून, त्यांचे मागील पोटाची फिकीर मिटवून त्यांना ह्या आयुर्वेदशास्त्रोन्नतीच्या कामीं नियुक्त करणें हाच सर्वोत्तम उपाय आहे.

स्वराज्यांत आयुर्वेदाची सुंदर समाधि

ब्रिटिशांच्या अमदानींत पाश्चात्य वैद्यकाचा उदोउदो होऊन तो आयुर्वेदास मारक ठरला. योगा-योगानें राष्ट्रीय आंदोलनाच्या काळांत डॉक्टरबंधूंचें आर्यवैद्यकाकडे लक्ष गेलें. त्याची उन्नति व्हावी असें त्यांस वाटूं लागलें. व त्या दृष्टीनें त्यांनीं प्रयत्न सुरूं केले. त्या प्रयत्नांत आयुर्वेदविषयक वैचारिक भूमिका त्यांचे जवळ नव्हती; वस्तुतः त्यांनीं स्वतः आयुर्वेदशास्त्राचें यथार्थ ज्ञान प्रथम करून घ्यावयास हवें होतें. किंवा केवळ पाश्चात्य वैद्यकाचें ज्ञान वैद्यांना तरी शिकवावयास हवें होतें. पण तसें न झाल्यामुळें आयुर्वेदाचे उन्नतीसाठीं त्यांनीं सुरूं केलेल्या शाळा ह्या थोडासा आयुर्वेद व थोडी अॅलोपॅथी शिकलेले 'कडबोळे' विद्यार्थी निर्माण करण्यास कारणीभूत झाल्या. मिश्र शिक्षणपद्धतीचा हा खरा इतिहास आहे. गेल्या ५० वर्षांत ह्याच मिश्र शिक्षणांतून खऱ्या अर्थानें वैद्य फारच थोडे पुढें आले; हें समाधान थोडें कां होईना 'आहे' असें म्हणतां येतें, पण त्यापेक्षां ह्याच पद्धतींतून बहुसंख्य बाहेर पडलेला शिक्षित वर्ग हा धड वैद्यहि नव्हे आणि धड डॉक्टरहि नव्हे अशा झाल्यामुळें आयुर्वेदाची शास्त्रोन्नतीचे दृष्टीनें फार मोठी हानीच झाली आहे, असें खेदानें म्हणावें लागतें. कारण अॅलोपॅथीपेक्षां हा वर्ग आयुर्वेदालाच मारक ठरला आहे व ठरत आहे. प्रत्यक्ष चिकित्साकार्यांत ह्या वर्गाची स्थिति "इदं च नास्ति परं न लभ्यते" अशी झाली व होत आहे. आयुर्वेद विद्यालयांतून शिकून बाहेर पडल्यामुळें डॉक्टरवर्ग यांना आपलेपेक्षां कमी दर्जाचे मानतो, आणि हे स्वतःला वैद्य म्हणवून घेण्यांत आणि वैद्यांकडून आयुर्वेदीय शास्त्रतत्वें समजून घेण्यांत कमीपणा मानतात, इतकेंच नव्हे तर प्रसंगोपात् त्यांचें वैमनस्य पत्करून त्यांची टिंगल करण्यांतच वैशिष्ट्य मानतात. स्वराज्य मिळाल्यावरसुद्धां 'आयुर्वेद उन्नत झाला पाहिजे' अशी आमच्या सरकारनें घोषणा केली; परंतु ती घोषणा सफळ करण्यासाठीं आयुर्वेदाचीं सूत्रें नेमकीं ज्यांना आयुर्वेदाची शास्त्रीय दृष्ट्या यत्किंचितहि कल्पना नाहीं आणि आयुर्वेदाच्या मृत्यूचें सुतक येण्याची मुळींसुद्धां फिकीर नाहीं, अशा पाश्चात्य वैद्यविद्या-विभूषितांच्या स्वाधीन केलीं. त्यामुळें मग 'भक्ष्यभक्षकयोः प्रीतिः विपत्तेरेव कारणम्' असा परिणाम होऊन आयुर्वेदाच्या उन्नतीऐवजीं त्याची समाधि सुंदर कशी बांधली जाईल इकडेच त्या सूत्र-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...कांचें लक्ष वेधलें असेल तर आश्चर्य काय ? अर्थातच आयुर्वेदाची शास्त्रीय हानि करण्यास जबाबदार म्हणून जर कुणास धरतां येणार असेल तर तें थोड्या पशांत पोटाचा व्यवसाय करूं पाहाणाऱ्या स्नातकवर्गाला न धरतां आयुर्वेदाचा पद्धतशीर गळा घोटण्याचें कार्य करणाऱ्या सरकारी यंत्रांतील सध्यांच्या जबाबदार संस्थारूपी देशी वैद्यक बोर्ड, आयुर्वेद स्टेट फॅकल्टी व ... सरकार ह्या तीनहि चक्रांनाच धरावें लागेल.

मिश्रशिक्षण आयुर्वेदास मारक आहे

जर आयुर्वेदाचा खरा उद्धार व्हावा अशी पोटतिडीक आमच्या म्हणून म्हणविल्या जाणाऱ्या ...ला खरोखर असेल तर ज्या संस्थांतून नांवापुरतें आयुर्वेदीय शिक्षण अपवाद म्हणून आणि ॲलोपॅथीचें ...न त्याहून कितीतरी अधिक प्रमाणांत दिलें जातें अशा संस्थांना आयुर्वेदाचा कुंकुमतिलक लावून नियोग-...तें वंशवृद्धीच्या पातकास मुळींच बळी पाडूं नये, असें स्पष्ट सांगण्याची पाळी आली आहे. मात्र याबरोबर ...हें सुचवावेंसें वाटतें कीं असें सांगण्यांत आम्हा वैद्यवर्गाचें मनांत ॲलोपॅथीबद्दल द्वेषभावना असल्यानें ...म्ही असें म्हणतों असें मुळींच समजूं नये. 'जगा आणि जगूं द्या' ही भारतीय संस्कृति असल्यानेंच ...र्वेषां अविरोधेन' आमचें प्रत्येक कार्य होत राहाणें आम्हांस आवडतें. 'अनुयायात् प्रतिपदं सर्वधर्मेषु ...ममाम्' ही आमची शिकवण आहे. अर्थातच 'ॲलोपॅथी नको' असें आम्ही म्हणतों तेव्हां तिच्या ...च झगझगाटानें डोळे दिपून त्या डोळ्यांना आयुर्वेदाचें सत्यं शिवं सुंदरं रूप दिसेनासें झालें आहे, तें ...दावें हाच आमचा हेतु असतो. 'आयुर्वेदाला त्याच्या शुद्ध सोज्वळ स्वरूपांत जगूं द्या' हेंच ...आमचें मागणें आहे. नव्हें तो आमचा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो संपादन करण्यासाठीं ...सरकार आमचें आहे म्हणून आम्ही हक्कानें भांडूं सुद्धां! 'उपेक्षा पुरवली, पण ही जीवघेणी सहानुभूति ...को' असें म्हणण्याची पाळी सरकार आमचेवर येऊं देणार नाहीं अशी आम्हांस आशा वाटते. सध्यांचें ...लोकशाहीचें युग आहे; अर्थात् आमचे हक्क संघटनेच्या बळावर आम्हीं निश्चित मिळवूं शकूं असा ...विश्वास आहे. व यासाठीं महाराष्ट्र प्रांतांतील वैद्यबंधूंनीं आपली संघटना अभेद्य बनवावी अशी माझी ...विनंति आहे. तसेंच आईच्या पवित्र मांडीवरील आयुर्वेदाच्या बाळंत्यांतच बाळघुटी घेऊन पुष्ट झाल्यावर, ...नंतर जन्मभूमीच्या सेवेंत पदार्पण करणाऱ्या आमच्याच प्रांतीय लोकशाही राज्याच्या सर्वाधिकारी व ...आरोग्याधिकारी माननीय मुरारजीभाई व शांतिलालजींनाहि 'त्यांनीं आतां आश्वासनापेक्षां प्रत्यक्ष कार्यास ...रंभ करूनच आयुर्वेदाला शास्त्र या दृष्टीनें जगविण्याचें श्रेय घ्यावें, अशी प्रार्थना आहे.

(२) आयुर्वेदोपजीवी वैद्य

'राजा राजगृहासन्ने प्राणाचार्यं निवेशयेत्" म्हणजे राजानें नेहमीं वैद्याला आपल्या जवळ ठेवावें, असें व्यवहार व राजनीतितत्त्व आहे. परंतु 'मी वैद्य आहे' असें म्हणणाऱ्या वाटेल त्याला राजाश्रय मिळावा असें वैद्यशास्त्र सांगत नाहीं. "हेतौ लिंगे प्रशमने रोगाणामपुनर्भवे। ज्ञानं चतुर्विधं यस्य स राजार्हो भिषक्तमः" (च. सं.) रोग कां उत्पन्न होतो, त्याचीं निश्चित लक्षणें कोणतीं, झालेल्या रोगाचें शमन कसें करावें आणि रोग पुन्हां न व्हावा यासाठीं काय करणें इष्ट आहे, ह्या चार प्रकारचें ज्ञान ज्याला आहे तोच राजाश्रययोग्य वैद्य होय, असें स्वच्छ शास्त्रकारांनीं सांगून ठेवलें आहे. इतकेंच नव्हे तर अशा प्रकारचा वैद्य "विद्या वितर्को विज्ञानं स्मृतिस्तत्परता क्रिया। यस्यैते षड्गुणास्तस्य न साध्यमतिवर्तते" (च.सं.) म्हणजे विद्यायुक्त, तर्कवान्, इतर शास्त्रांचें ज्ञान असून आपल्या शास्त्रांतील ज्ञान अगदीं आरशासारखें स्वच्छ असलेला स्मरणशक्तिशाली व ती ती गोष्ट न कंटाळतां तत्परतेनें करणारा वैद्य चिकित्सेंत यशस्वी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झालाच पाहिजे असेंहि म्हटलें आहे. तसेंच " लंघनं बृंहणं काले रूक्षणं स्नेहनं तथा । स्वेदनं स्तंभनं चैव जानीते यः स वै भिषक् (च. सं.) म्हणजे रोग्याला लंघन केव्हां, किती, कसें द्यावें, त्याचप्रमाणें कृश रोग्यास पुष्टिकर योग केव्हां, कोणते, कसें द्यावयाचे, अतिस्निग्ध पदार्थ सेवनजन्य रोगाला रूक्ष, व रूक्षतेमुळें उत्पन्न झालेल्या रोगाला स्निग्ध उपचार कसे, केव्हां, किती प्रमाणांत करावयाचे व वाफारे देणें, स्तंभनाक्रिया यांची यथातथ्य माहिती ज्याला असेल तोच खरा वैद्य अशी ही वैद्याची पात्रता दर्शविली आहे. तसेंच नुसता पोपटपंची करणारा वैद्यहि उपयोगी नाहीं; त्याला शास्त्रीय ज्ञानाबरोबरच अनुभवज्ञानहि असावयास हवें. प्रत्यक्ष क्रियाकौशल्यहि त्याचे ठिकाणीं असलें पाहिजे; आणि तसाच नुसता क्रियाकुशल पण शास्त्र-पराङ्मुख वैद्यहि वेळेवर प्राणघातक ठरण्याचा संभव असल्यानें त्याला मृत्युदंड द्यावा असेंहि भगवान् सुश्रुताचार्यांसारख्या ऋषिश्रेष्ठांनीं सांगून ठेवलें आहे. यस्तु केवलशास्त्रज्ञः कर्मस्वपरिनिष्ठितः । स मुह्यत्यातुरं प्राप्य वथा भीरुरिवाहवम् ॥ यस्तु कर्मसु निष्णातः धाष्ट्यात् शास्त्रबहिष्कृतः । स सत्सु पूजां नाप्नोति वधं चार्हति राजतः ॥ (सुश्रुतसंहिता) या दोन सूत्रांतून हेंच सुचविलें आहे.

यावरून राजाश्रय मागणाऱ्या वैद्यांनींहि आपली पात्रता वाढविणें कसें इष्ट आहे तें विसरून चालणार नाहीं. प्रास्ताविक भाषणांत आरंभीं सांगितल्याप्रमाणें आजच्या जगांत सर्वश्रेष्ठ राजार्ह भिषक्तम व्हायचें असेल तर आयुर्वेदशास्त्राप्रमाणेंच इतर शास्त्राचेंहि तात्त्विक ज्ञान त्यांना असावयास पाहिजे याबद्दल दुमत असण्याचें कारणच नाहीं. " अन्यशास्त्रोपपन्नानां च अर्थानाम् इहोपनीतानाम् अर्थवशात् तेषां तद्विद्येभ्यः एव व्याख्यानं अनुश्रोतव्यम् कस्मात् न हि एकस्मिन् शास्त्रे शक्यः सर्वशास्त्राणामवरोधः कर्तुम् " । (सुश्रुतसंहिता) याचा अर्थ एका शास्त्रांत इतर सर्व शास्त्रांचा अंतर्भाव करणें शक्य नसलेमुळें इतर शास्त्रवेत्त्यांकडूनच त्यांतील ज्ञानाचें ग्रहण करावें. यावरून इतर शास्त्रांतील ज्ञानाची जोड आपल्या शास्त्राला असणें अवश्य आहे, हें सुश्रुताचार्यांचें मत स्पष्ट आहे. व म्हणूनच स्वतःचें आयुर्वेदशास्त्र उत्तम प्रकारें हस्तगत होईतों ॲलोपॅथी किंवा इतर कोणत्याहि वैद्यक शास्त्रांकडे छात्रांनीं वळूं नये, एवढेंच शुद्ध आयुर्वेदीय पक्षप्रतिपादकांचें म्हणणें आहे.

याशिवाय " दक्षस्तीर्थात्तशास्त्रार्थो दृष्टकर्मा शुचिर्भिषक् " (वाग्भट), वैद्य दक्ष असावा, वैद्य सद्गुरूकडून शास्त्र शिकलेला असावा, तो दृष्टकर्मा म्हणजे अनुभववृद्ध असावा, आणि आचारविचार उच्चारानें तो पवित्र असावा. असे ४ गुण वैद्याचे ठिकाणीं असावयास हवेत. यांतील १ वैद्याची दक्षता म्हणजे तत्परता ही स्वहिततत्पर तशीच शास्त्रहिततत्पर आणि वैद्यसमाजहिततत्पर अशी त्रिविध असूं शकते. वैद्याचें स्वहित हें त्यास मिळणाऱ्या चिकित्साकार्यांतील यशापयशावर अवलंबून असल्यानें त्याचेकडे असलेला प्रत्येक रोगी जितका लौकर व चांगला बरा होईल तितकें त्याचें यश वाढेल. यासाठीं त्यानें रोग्यास बरें करण्याचें बाबतींत परं प्रयत्न केले पाहिजेत हें सांगणें नकोच. ' न हि सर्वः सर्वं वेत्ति ' प्रत्येक मनुष्य सर्वज्ञ नसतो हें लक्षांत घेऊन आपणास जेव्हां रोगनिदान वा चिकित्सेच्या बाबतींत कांहीं कळलें नसेल तेव्हां त्यानें रोग्याच्या प्राणाशीं आपल्या प्रयोगाचे खेळ चालूं ठेवावयाच्या भरीस कधींच पडूं नये. अशा वेळीं रोगी किंवा त्याचे पालकाच्या संमतीनें शक्यतर आपणाहून अधिक तज्ञ अशा ज्ञानवृद्ध व अनुभववृद्ध व्यवसायबंधूचें विचारें चिकित्साकार्य करावें. अथवा रोग्यास वा पालकास आपल्या इच्छेप्रमाणें वागण्याचें स्वातंत्र्य देऊन आपण जबाबदारींतून मोकळें व्हावें; त्यांत कोणताहि कमीपणा मनास वाटूं देऊं नये. मात्र तत्संबंधीं ग्रंथावलोकन, अभ्यास, विचारविनिमय, चर्चा करून आपलें तें वैगुण्य घालविण्याचे प्रयत्न केलेच पाहिजेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आजच्या काळांत जीवनकलहाची धावपळ लक्षांत घेतां वैद्याची औषधयोजना शक्यतों कमी ...वी, कमी दगदगीची किंबहुना अनुपानादिकांचा खटाटोप नसलेली, व शीघ्रफलदायिनी असावी ही ...वी अपेक्षा चुकीची आहे म्हणतां येणार नाहीं. म्हणून आपलें औषधयोजना-कौशल्य वैद्यानें वापरण्याची ...ता घ्यावी.

आयुर्वेद हें माझें शास्त्र व मी त्याचा एकनिष्ठ सेवक ही भावना वैद्याचे हृदयाशीं सतत जागृता ...ली पाहिजे, त्या शास्त्राचे अभिवृद्धीसाठीं त्यांनें सतत झटलें पाहिजे व त्याच्या संरक्षणासाठीं तनमन-...चा त्याग करण्यास सज्ज असलें पाहिजे. तसेंच स्वतःला जेवढें ठाऊक आहे तेवढें कुणाहि जिज्ञासूला ...ांत त्यास नित्य उत्साह वाटला पाहिजे. 'जें जें आपणासि ठावें; ते तें इतरां शिकवावें' ही सम-...ची शिकवण वैद्यानें नित्य हृदयाशीं बाळगली पाहिजे. 'नव गोप्यानि कारयेत्' म्हणून गुप्त ठेवा-...च्या नऊ गोष्टींत ह्या आयुर्वेदाच्या शास्त्रीय अनुभवांचाहि समावेश करून पूर्वपिढींतील वृद्धवैद्यांनीं ...र्वेदाचें फार मोठें नुकसान केलें आहे असें माझें स्पष्ट मत आहे. या बाबतींत पाश्चात्य संशोधकांचा ...र्श आम्हीं डोळ्यांपुढें ठेवला पाहिजे.

२ तीर्थात्तशास्त्रार्थत्वः—तीर्थ म्हणजे 'गुरु' व त्यांचेकडून शास्त्राचा अर्थ म्हणजे हृद्गत-गुह्य-रहस्य ...न घेणें हें तीर्थात्तशास्त्रार्थत्व होय. "गुरवो बहवः सन्ति शिष्यवित्तापहारकाः। गुरवो विरलाः सन्ति ...चित्तापहारकाः ॥ ह्या सुभाषितांत वर्णिल्याप्रमाणें शिष्याच्या चित्ताचा ताप हरण करणारे सद्गुरु ...त्व विरल आढळतात. आयुर्वेदाला राजमान्यत्व प्राप्त होऊन एक तपाइतका काळ उलटला. पूर्वी ...केल्याप्रमाणें आयुर्वेदोद्धारार्थ बद्धपरिकर झाल्याची घोषणा करणाऱ्या आमच्या सरकारनें आपल्या ...तंत्रानुसार जी विद्यालयें स्थापन केलीं त्या विद्यालयांतून आयुर्वेदक्षितिजावर चमकणारे किती तारे उदयास ...ले आहेत हें जर पाहूं म्हटलें तर 'गुणिगणगणनारंभे न पतति कठिनी सुसंभ्रमात्' असेंच म्हणावयाची ...ती येते. उलटपक्षीं 'शिष्यचित्तापहारक' गुरूंच्या परंपरेंत रुळलेली शिष्यमंडळी तरी आजहि अशाहि ...तीत आपलें तीर्थात्तशास्त्रार्थत्व प्रकटवीत आहेत; असें आयुर्वेदभूषण गणेशशास्त्री जोशी, आयुर्वेदाचार्य ...वेणीमाधवशास्त्री जोशी, औषधीसंशोधनैकनिष्ठ आयुर्वेदभूषण श्री. घामणकरशास्त्री, आयुर्वेदवाङ्मय-...सेवक आचार्य श्रीयादवजीभाई, आयुर्वेदभास्कर पंडित शिवशर्माजी, प्रभृतींकडे अंगुलिनिर्देश करून ...णी म्हणूं शकतों. निखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठाच्या उच्च परीक्षा उत्तीर्ण झालेले अशाच ...परंपरेंत वाढलेले स्नातक आजहि आयुर्वेदक्षेत्रांत कसोटींत हिणकस ठरत नाहींत. प्राणाचार्य लागवणकर-...गुरुजींच्या शिष्यशाखेंत गुरुवर्य आयुर्वेदाचार्य नानलशास्त्री होऊन गेले. प्राणाचार्य हिर्लेकरशास्त्री, गुरुवर्य ...करशास्त्री ही सर्व महाराष्ट्रप्रांतीय मंडळी आणि अखिल भारतांत नाणावलेले आयुर्वेदक्षेत्रांतील आसेतु ...हिमाचल प्रांताप्रांतांतून प्रसिद्ध प्रतिधन्वन्तरीसारखे आयुर्वेदाचे दिग्गज, गुरुपरंपरेंतच वाढलेले आहेत व ...आयुर्वेदोन्नतीसाठीं बद्धपरिकर आहेत. परंतु कायद्यानें त्या सर्वांना अकिंचित्कर बनवून टाकलें आहे. तरी ...र्ते हें तीर्थात्तशास्त्रत्व सध्यांच्या प्रचलित विद्यालयांतून कां होईना पण केवळ आयुर्वेदाध्ययनाच्या ...नें झाल्यावांचून आयुर्वेदोद्धार कसा होणार ?

३ दृष्टकर्मत्वः—रुग्णपरीक्षण, औषधीकरण व औषधीयोजना ह्या गोष्टींतील अनुभव जितके जितके ...जितके, तितकी त्या वैद्याची चिकित्सा अधिकाधिक यशस्वी होणार हें ठरलेलें आहे. आणि हें दृष्टकर्मत्वसुद्धां ...गुरूंच्या सहचर्यांतच शिष्याला लाभणें शक्य असतें. आजच्या सरकारमान्य आयुर्वेद महाविद्यालयांतून ...आयुर्वेदीय दृष्टीनें हा लाभ शिष्यांना मुळींच होत नाहीं, असें थोडा अतिशयोक्तीचा दोष पत्करूनहि ...म्हणतां येतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४ शुचित्वः—वैद्य हा काया-वाचा-मनानें शुचि म्हणजे पवित्र असल्यावांचून यशःश्रिया त्याला माळ घालणार नाहीं. वैद्याचें शरीरसौष्ठव रोग्याचे मनावर अनुकूल प्रभाव पाडूं शकतें, परंतु त्या सौष्ठवाला पावित्र्याची म्हणजेच शुद्धतेची, स्वच्छतेची जोड असली पाहिजे. 'दर्शनात् हरते व्याधिं स्पर्शनात् पापनाशनम्' ही योग्यता, सुदृढ निरोगी शरीर, सांत्वनपर मधुर भाषण, आणि विचार-उच्चार-आचारांतील सभ्यता ज्या वैद्याजवळ आहे त्यानें इष्ट सिद्धीचा अर्धा गड जिंकला असें म्हणण्यास मुळींच अडचण पडणार नाहीं. स्वतः व्यसनांपासून अलिप्त असल्यावांचून व्यसनास बळी पडणाऱ्या रुग्णांवर वैद्य आपला प्रभाव कसा पाडूं शकणार ? जसें शरीर तसाच शरीरावरील वेशसुद्धां स्वच्छ असावयास पाहिजे. 'सुवेषः अनुल्वणः उज्वलः' हें थोडक्यांत वेशाचें वर्णन वाग्भट्टाचार्यांनीं केलें आहे. वेश भपकेदार नसावा, अगदीं स्वच्छ असावा, हें त्याचें तात्पर्य. वैद्याच्या मानसिक पावित्र्याबद्दल सांगण्याची आवश्यकताच नाहीं. बाल, युवक, प्रौढ, वृद्ध, स्त्री-पुरुष रोगी संपूर्ण विश्वासानें आपलें अनारोग्य प्रकट करीत असतात. त्यांतील कांहीं गोष्टी समाजांत उघड करण्याजोग्या नसतात, त्यासाठीं रोगी आपलें मन व तन म्हणजे शरीरहि परीक्षणासाठीं वैद्याचे स्वाधीन करीत असतो; अशा प्रसंगीं वैद्याच्या मनाचें पावित्र्य कसोटीस लागत असतें. यांत घसरणारा वैद्य हा प्रतिष्ठा, यश व कीर्ति यांना तर मुकतोच पण प्रसंगीं प्राणालाहि मुकतो.

वैद्याची शास्त्रहिततत्परता आणि समाजहिततत्परता या दोन्ही गोष्टीसंबंधीं विचार आयुर्वेदास राजमान्यता आणि लोकमान्यता या दोन मुद्यांसंबंधींचें विवेचन करतांनाच अनायासें होणार असलेमुळें आतां यापुढें त्याच मुद्यासंबंधीं विचार करूं.

(३) आयुर्वेदास राजमान्यता

देशी वैद्यक नियंत्रणासंबंधीं आपल्या सरकारनें सहानुभूतीचें धोरण पत्करून देशी वैद्यकाची सर्वांगीण उन्नति करण्यासाठीं एक स्वतंत्र कायदा केला, त्या कायद्याची अंमलबजावणी करणेंसाठीं एक देशी वैद्यक बोर्डहि नियुक्त केलें. परंतु त्या बोर्डाची रचना आणि आरंभापासून त्याचें आजपर्यंतचें झालेलें कार्य, आयुर्वेदाच्या उन्नतीचें झालें नसून आयुर्वेदास सर्वतोपरी मारक झालें आहे, ही गोष्ट जगजाहीर आहे. याचें कारणहि एका वाक्यांत सांगायचें म्हटलें तर श्रीसमर्थांनीं मायलेकराच्या प्रेमाचें वर्णन करणाऱ्या एका समासांत सांगितल्याप्रमाणें, सावत्र आईनें कितीहि चांगलें वागवूं म्हटलें तरी लेकराच्या अनुभवास येणारी 'ते पोटागी वेगळी' एवढ्या एका वाक्यानें सांगतां येईल. वैद्य आणि आयुर्वेदाच्या उन्नतीसाठीं प्रस्थापित बोर्डाचीं सर्व सूत्रें ह्या दोहोंच्या कल्याण--अकल्याणाचें सोहेरसुतक नसणाऱ्या पाश्चात्य वैद्यविद्या-विभूषितांच्या हातीं दिलीं गेल्यामुळें आणि बोर्डाची रचनाहि नेमकी लोकनियुक्त वैद्यांचें हीनमतप्रमाण ठेवल्यानें वैद्यांचें साक्षीनें आपल्या बहुमताच्या बळावर पद्धतशीर गळा घोटण्याचें कार्य आजपर्यंत तरी चालू राहिलें आहे, असें निःसंदिग्धपणें म्हणतां येतें.

प्रांतीय संमेलनाच्या गेल्या पनवेल येथील अधिवेशनांत आपल्या प्रांताचे आरोग्यमंत्री माननीय शांतिलालजी शहा यांनीं जें भाषण केलें, आयुर्वेदाविषयीं जी आत्मीयता व्यक्त केली व त्यासाठीं शक्य तें सर्व करण्याची तयारी दर्शवून आयुर्वेद क्षेत्रांतील कार्यकर्त्यांचें सहकार्य मागितलें, त्यावरून तरी आतां आपल्या प्रांतांत आयुर्वेदाचें भाग्य निश्चित उदयास येणार अशी आम्हां प्रांतीय वैद्यवर्गास आशा वाटूं लागली आहे. श्री. आरोग्यमंत्रिमहोदयांनीं सातारा वैद्यक महाविद्यालयाच्या वार्षिक संमेलनप्रसंगींहि आयुर्वेदोद्धाराविषयीं जी तळमळ आपल्या भाषणांतून व्यक्त केली व कोणत्याहि परिस्थितींत सध्यां चालू असलेल्या संस्था मी मरूं देणार नाहीं हें आश्वासन देऊन व तें कांहीं अंशीं प्रत्यक्ष कृतींत आणून दाखविलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…महाराष्ट्र प्रांतीय वैद्यवर्ग त्यांचा नितांत ऋणी आहे.

…नगर जिल्ह्यांतील बोटें येथील फिरत्या रुग्णालयांत तृष्णारोगावर पूर्ण आयुर्वेदीय पद्धतीनें उप-…करण्याची संधि देऊन माननीय आरोग्यमंत्र्यांनीं 'मनस्येकं वचस्येकं' अशी फसवी राजनीति …वळ नसल्याचें साक्षात् प्रत्यंतरच आणून दिलें आहे यांत शंका नाहीं. आणि त्याबरोबरच आयु-…तज्ज्ञांवर संपूर्णतया सोंपविलेल्या ह्या महत्वपूर्ण रोगाच्या चिकित्साकार्यांत उत्कृष्ट प्रतीचें यश लाभलें …ही गोष्टसुद्धां आयुर्वेदीयांना अत्यन्त अभिमानाची असून आयुर्वेदाच्या नांवानें खडे फोडणारांची व …र्वेदाची आणि वैद्याची निंदा करणारांची गैरसमजूत दूर करणारी आहे.

बोटें रुग्णालयांतील रुग्णांचें रोगनिदान पित्तवातात्मक रक्तधातुगतज्वर आणि त्याचा उपद्रव तृष्णा …धात्रीलोह, प्रवाळभस्म, क्षीरीवृक्षकषाय इ. उपचार केले गेले व त्यांचा अनुभवहि चांगला आला आहे. …चिकित्सेचें वैशिष्ट्य हें दिसून येतें कीं रोगाचीं केवळ चिन्हें कमी न होतां रोग्यामध्यें सर्व बाजूंनीं …णा दिसून येते व आरोग्यबळ वाढतें. अर्थातच रोग पुनश्च उलटण्याची भीति राहणार नाहीं असा …वाटतो. या रुग्णालयांतील कार्यविषयक छोटासा अहवाल म्हणण्यापेक्षां कार्याचा सारांश, ह्या कार्याची …क जबाबदारी ज्यांचेवर सोंपविली होती त्या आमच्या प्रांतांतील वैद्याध्वर्यू आचार्य वैद्य वेणीमाधव-…शास्त्रींनीं मुंबई व उपनगर वैद्य संमेलनाच्या गेल्या मार्च महिन्यांत झालेल्या अधिवेशनाच्या अध्यक्षीय …णांतून जो पुढें मांडला आहे त्यावरून रोगाचें नांव ठेवतां न आलें तरी आयुर्वेद दोषधातुदृष्टीचा तार-…तम्यानें विचार करून आपलें चिकित्सा कार्य करू शकतो, त्याच्या संशोधनाची गाडी कधींहि अडून बसत …नाहीं हें त्यांनीं उत्तम प्रकारें दाखवून दिलें आहे. आचार्य म्हणतात, "रोगाचें बाह्य कारण कळलें नाहीं तरी …अडत नाहीं, अंतःस्थ कारण कळतेंच आणि शास्त्रीय चिकित्सा सुरू करतां येते. रोगी पाहून होतांच पुढच्या …क्षणीं चिकित्सा सुरू करतां येते. अनेक 'नोबल प्रायझेस्' ओवाळून टाकण्याइतक्या योग्यतेचा हा आयुर्वेदी-…यांचा महान् शोध आहे. पण परप्रत्ययनेयबुद्धि आमचे डॉक्टरबंधु याची टिंगल करतात; हें राष्ट्राचें महान् …दैव!" आचार्यांचे हे उद्गार किती यथार्थ आहेत हें निराळें सांगणेची आवश्यकता नाहीं. अजून बोटें रुग्णा-…लयाचा अधिकृत सरकारी अहवाल प्रसिद्ध व्हावयाचा आहे, तो प्रसिद्ध झाल्यावर आयुर्वेदाचा दृक्प्रत्यय …करून दिल्याचें समाधान बोटे रुग्णालयांत जातीनें कार्य करणारांना लाभेल व माननीय आरोग्यमंत्री …शांतिलाल शहा यांनाहि आपल्या हृदयांतील आयुर्वेदनिष्ठा अनाठायीं नसून तत्प्रीत्यर्थ सरकारी प्रयत्न सफल …झाल्याचें अभिमानानें नमूद करतां येईल; आणि ह्या एका अनुभवानें यापुढें सरकारचे वतीनें चालू अस-…लेल्या व होणाऱ्या निरनिराळ्या रोगसंशोधनकार्यांचे वेळीं आयुर्वेदालाहि त्या क्षेत्रांत वाव देण्यास अधिक …उत्साह वाटल्यावांचून राहाणार नाहीं.

गेल्या १४ वर्षांपासून आम्ही वैद्यलोक आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमाची मागणी करीत आहों. परंतु …आमच्या मागण्यांना केराच्या टोपलीचें स्थान आजपर्यंत मिळत आलें. कायद्यासाठीं लोक कीं लोककल्याणा-…साठीं कायदा असें विचारण्याची पाळी आली आहे. जो कायदा लोककल्याणाच्या आड येत असेल तो …त्वरीं बदलणें हें आजच्या लोकशाही सरकारचें तरी कर्तव्य ठरतें.

"An act to regulate the qualifications and to provide for the registration of practitioners of Indian systems of medicins with a view to encourage the study and spread of such systems' असें कायद्याचें घोषणावाक्य आहे. १९३८ सालीं कायदा झाला. त्यापूर्वी ३५—४० वर्षें मिश्र शिक्षण चालू होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कायदा होऊन एक तपाहून अधिक काळ लोटला. या काळांत आयुर्वेदाचा यथार्थ अभ्यास नाहीं अॅलोपॅथीचीहि अंधुक तोंडओळख झालेले आयुर्वेदाचे शत्रूच 'आयुर्वेद विद्यालय' नांवाच्या यंत्रांतून बाहेर पाडण्यापलिकडे ह्या कायद्यानें दुसरें कांहीं केलें आहे असें म्हणतां येत नाहीं. अर्थातच आपण घोषित केलेल्या आयुर्वेदाचें उत्तेजन व प्रसाराचे धोरणास स्वतःच्या हातानेंच हरताळ फांसणारें कृत्य मुंबई सरकारनें केलें आहे असें म्हणावें लागतें. कायद्याचा हेतु सफल करण्यासाठीं जी फॅकल्टी नियुक्त झाली तिला वर वरच्या शाईवर आणणें शक्य होत नसेल तर मग सरकारनें लेखणीच्या एका फटकाऱ्यानें आयुर्वेदाला नेस्तनाबूद करून १९१२ च्या मेडिकल बोर्डाकडेच अॅलोपॅथी छाप डॉक्टर निर्माण करावेत. आयुर्वेदाचें नांव देऊन अॅलोपाथीचा प्रसार करण्यासाठीं पैशाचा खर्च व खटाटोप हवाच कशाला? ज्या लोकशाही सरकारच्या शरिराचा प्रत्येक कणनूकण व रक्ताचा थेंबन्थेंब आयुर्वेदाचा बनला आहे, त्या सरकारकडून त्याच्याच जन्मसिद्ध हक्काच्या आयुर्वेदाविषयीं होणाऱ्या अनिष्ट परिणामाची दखल घेतली जाऊं नये काय? स्वतःच्या लक्षांत येत नसेल तरीपण लक्षांत आणून देण्यासाठीं केलेल्या गाऱ्हाण्यांचे आवाजहि त्यांना ऐकूं जात नाहींत असें म्हणावें काय? अभ्यासक्रमासाठीं नेमलेल्या विषयांकडे पाहिल्यास आयुर्वेदाला अॅलोपाथीची जोड (सप्लिमेंट) देऊन कायद्याची मर्यादा सांभाळण्यापेक्षां अॅलोपाथीला आयुर्वेदाची पुस्ती जोडून आयुर्वेदाचा उपहास केला आहे, म्हणजेच आपल्याच हातानें आपल्या कायद्याचा उपहास केला आहे असें म्हणावें लागतें. आयुर्वेद-विषयक फॅकल्टींत आयुर्वेदाची कांहींच माहिती नसलेल्या पाश्चात्य वैद्यकविद्याविभूषितांची योजना कशासाठीं हें कळणेंहि दुरापास्त आहे. यानंतर तरी १९३८ च्या कायद्यान्वयें रजिस्टर्ड झालेले, आयुर्वेदीय संस्थांतील अध्यापक आणि अन्य प्रांतीय बाहेरच्या विद्वान् वैद्यांतून फॅकल्टी नेमली जावी, १/५ लोक सरकारनें विद्वान् वैद्यांतून नेमावेत व बाकीचे रजिस्टर्ड आयुर्वेदिक मेडिकल प्रॅक्टिशनर्स असावेत.

बोर्डाचेहि सर्व सभासद १९३८ च्या र. मे. प्रॅक्टिशनर्समधून निवडले जावेत व बोर्डाचा अध्यक्षहि यांचे मधूनच यांनीं निवडावा, अशी सामान्य रूपरेषा पुढें मांडतां येईल. संमेलनानें विचारपूर्वक यांत सुधारणा करून सरकारला कळवाव्यात.

शुद्ध आयुर्वेद शिक्षण

आपण कल्पना करूं या कीं आज सर्व जगाचे डोळे दिपवून सोडणारी अॅलोपॅथी म्हणजे पाश्चात्य वैद्यक गेल्या दोनशें वर्षांपूर्वी जन्माला आलेंच नाहीं, तर मग एकेकाळीं सर्व जगाचें आरोग्य रक्षण करणाऱ्या आयुर्वेदाच्या उन्नतीचे प्रयत्न करणारांना स्वातंत्र्यानें आयुर्वेदाची उन्नति करतां आलीच नसती काय!

केवळ आयुर्वेदाचें शिक्षण मिळविणें व देणें हा वैद्यसमाजाचा जन्मसिद्ध हक्क आहे. स्वतंत्र भारताच्या घटनेनेंहि मिळालेला तो हक्क आहे. जर सरकार तो हक्क आम्हाला बहाल करणार नसेल तर वैद्यबंधूंनीं संघटनेच्या बळावर तो मिळवलाच पाहिजे. सरकारनें सध्यांचा कायदा बदलून फॅकल्टीला हें शिक्षण देण्याला परवानगी देण्यास भाग पाडलें पाहिजे. नाहींतर कलम २२ प्रमाणें सरकारनें स्वतः या शिक्षणास मान्यता दिली पाहिजे, ही आम्हां वैद्यांची मागणी आहे.

बंधूनो! जर केवळ आयुर्वेदीय शिक्षणाचें स्वातंत्र्य सरकार देणार नसेल तर भारताच्या घटनेनें मिळालेल्या या बाबतींतील स्वातंत्र्य एकदां कोर्टांत जाऊन मिळवण्यासाठींहि आम्हांस तयार व्हावें लागेल ही जाणीव प्रत्येकानें असूं द्यावी. ज्यावेळीं सनदशीर हक्कांची पायमल्ली होते तेव्हां ते हक्क मिळवण्यासाठींहि सनदशीर मार्गाचें अवलंब करणें मुळींच दूषणास्पद नसून भूषणास्पद आहे. लोकशाहींतील समाजाच्या कर्तव्यजागृतीचें तें एक लक्षणच आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केवळ आयुर्वेदीय शिक्षणाचा प्रचार व प्रसार करायचा तर त्याला केवळ आजच्या विद्यालयांतील ...संख्येवर अवलंबून राहूनहि भागणें शक्य नाहीं. आयुर्वेदाच्या ग्रंथांची परिभाषा व कल्पना ...सांगणारे व त्याचा शब्दन्‌शब्द फोडून सांगणारे वैद्य फार थोडे आहेत. वयानें वृद्ध आहेत, ते सर्व ...घेऊन शिकवूं शकतील असें आज शक्य कोटींत राहिलें नाहीं. यासाठीं अशा वैद्यांनीं व्यक्तिगत विद्यार्थी ...तयार करावेत अशी सवलत मिळणें इष्ट आहे. निखिल भारतवर्षीय आयुर्वेद विद्यापीठाच्या ...ना अशा विद्यार्थ्यांना बसण्याची परवानगी असावी. या परीक्षांचा अभ्यासक्रम संपवल्याविषयीं गुरु-...प्रमाणपत्र असलें कीं विद्यार्थ्यास परीक्षेस बसूं दिलें जावें. असे विद्यार्थी तयार करूं शकतील असे ...वैद्य निवडून त्यांना सरकारनें किंवा फॅकल्टीनें अध्यापक म्हणून मान्यता द्यावी. अशा तऱ्हेच्या ...तून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनीं सहा महिनेपर्यंत कोणत्याहि आयुर्वेदीय रुग्णालयांतून प्रात्यक्षिक ...संपादन केल्यानंतरच त्यास वैद्यक व्यवसाय करण्यास सरकारमान्यता मिळावी. अशा प्रकारच्या ...तील कांहीं व्यावहारिक दोष सरकार अथवा फॅकल्टी नाहींसे करूं शकेल.

अशा प्रकारचे वैद्य ज्या ठिकाणीं अधिक संख्येनें आहेत तेथें महाविद्यालयें सुरू करून त्यांतूनहि ...मा. आयुर्वेद विद्यापीठाचा अभ्यासक्रम सुरू करावा आणि त्या शिक्षणाबरोबरच प्रात्यक्षिकाचीहि सोय ...ती. हा अभ्यासक्रम अखिल भारतवर्षांत मान्य झालेला असल्यानें, सरकारनें असें महाविद्यालय सुरू केलें ...ग्रँट देऊन चालविण्यास साहाय्य केलें तर एक आदर्शस्वरूप कार्य होईल. शिक्षणाची पद्धति, दर्जा इ. ...दृष्टीनें आयुर्वेदीय शिक्षणक्रमाचा तोल सांभाळणें सहज शक्य होईल.

आयुर्वेदीय म्हणविल्या जाणाऱ्या आजच्या महाविद्यालयांचें शिक्षण व उपचार फार महाग झाले ...त, पाश्चात्यवैद्यक विद्यालयांबद्दल तर बोलावयासच नको. आजच्या परिस्थितींत रोगी व वैद्य राहात ...लेल्या प्रदेशाच्या आसपास सहज उपलब्ध होणाऱ्या द्रव्यांच्या साहाय्यानें उपचार करणारे वैद्य निर्माण ...तर ते हवे आहेत. तेच स्वस्त व सुलभ चिकित्साकार्य करून आरोग्य रक्षण करूं शकतील. म्हणून ...वैद्यांना तयार करणारा एक कमींतकमी तीन वर्षांचा अभ्यासक्रम आंखून त्यांना खेड्यांत सहज उप-...वनस्पति, किमतीनें स्वस्त पण गुणानें उत्तम अशा द्रव्यांचे गुणधर्म आणि शीघ्र फलदायी रस--भस्म-...चें शिक्षण दिलें जावें. अल्पमोली बहुगुणी शेकडों औषधीद्रव्यें आहेत. त्यांना या शिक्षणक्रमांत गुणधर्म ...चिकित्सेच्या दृष्टीनें महत्व देऊन गरीब जनतेच्या रोगहरणाचा व स्वास्थ्यरक्षणाचा प्रश्न सोडवला पाहिजे.

सरकार व संशोधन

शिक्षणाबरोबरच सरकारचा आयुर्वेदाशीं संबंध येणारें क्षेत्र संशोधनाचें आहे. अर्थातच आयुर्वेदीय ...नाचें संशोधन हें आयुर्वेदीय पद्धतीनेंच व्हावयास हवें. मग तें वाङ्मय संशोधन असो कीं औषधी ...तर असो! कोणतेंहि शास्त्र हें विशिष्ट परिभाषेवर आधारलेलें असतें, विचारप्रतिपादनाची ग्रंथकर्त्यांची ...विशिष्ट दृष्टिकोन राखून केलेली असते ती परिभाषा वा तो दृष्टिकोन नीट समजून घेणाराच त्या ग्रंथाचें ...शास्त्राचें खरें हृद्गत जाणूं शकेल हें आरंभींसुद्धां एक वेळां सांगितलेंच आहे. त्या दृष्टीनें पाहूं जातां स्वतः ...शास्त्राचे निष्णात पदवीधर म्हणून व चिकित्सक म्हणून नांवलौकिकास चढले आहेत अशा पाश्चात्य ...विद्याविभूषितांना त्यांच्या त्या क्षेत्रांतील संशोधन कार्यासाठीं नियुक्त करायचें सोडून ज्या शास्त्राची परिभाषा ...दृष्टिकोन परिचित नाहीं अशा आयुर्वेदासारख्या शास्त्राच्या क्षेत्रांतील संशोधन कार्याचें उत्तरदायित्व त्यांचेवर ...न आयुर्वेदांतील तत्वें-विचार- औषधें सबझूट आहेत हें घोषित करण्याचा तर सरकारचा हेतू नाहीं ना? ...शंका आल्यावांचून राहात नाहीं. अशा ह्या मोठ्या लोकांना त्यांच्या शास्त्रांतील संशोधनासारखी कोणतीहि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोष्ट आतां उरली नाहीं असें तर कांहीं म्हणतां येत नाहीं. आणि दुर्दैवाची गोष्ट ही कीं आयुर्वेदाचें संशोधन करण्यासाठीं नियुक्त केले जाणारे हे अधिकारी पुरुष आपल्या स्वतः शिकलेल्या शास्त्रांत आतांपर्यंतच्या आयुष्यांत संशोधन करूं शकले असा एकहि प्रसंग ऐकण्यास, वाचण्यास वा अनुभवास मिळालेला नाहीं. तेंव्हां असे हे लोक आयुर्वेदाचें संशोधन करणार म्हणजे काय करणार हें कळणेंच दुरापास्त झालें आहे. वस्तुतः ज्या विषयाची आपणास तोंडओळखहि नाहीं त्या विषयाचें संशोधन स्वीकारणारांनीं तरी स्वीकारावें कां व कसें हेंच उमजत नाहीं.

आयुर्वेदीय संशोधन म्हणजे आहार्य व इतर द्रव्यांचे व शारीर कर्मांचे देशकालानुसार मानवी शरिरावर होणारे बरे वाईट परिणाम आयुर्वेदीय दृष्टीनें तपासून मानवी स्वास्थ्यसंवर्धनासाठीं व स्वास्थ्यसंरक्षणासाठीं व रोगनाशासाठीं त्यांचा उपयोग करून घेणें होय. प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र इ. शास्त्रांतील नवनवीन शोधांचाहि आयुर्वेदीय दृष्टीनें विचार करून त्यांची आयुर्वेदीय परिभाषेत मांडणी करणें व योग्य वाटल्यास त्यांना आयुर्वेदांत समाविष्ट करून घेणें हें खरें आयुर्वेदीय संशोधन होय. अर्थातच या कामीं आज आणि पुढेंहि उपलब्ध साधनसामुग्रीचा उपयोग करून घेण्यांत संकोच करण्याचें मुळींच कारण नाहीं.

आयुर्वेदसुद्धां प्रत्यक्षावरच आधारलेलें शास्त्र आहे. " प्रत्यक्षतो हि यत् दृष्टं शास्त्रदृष्टं च यत् भवेत्। समासतस्तदुभयं भूयो ज्ञानविवर्धनम्। हा आयुर्वेदाचा दंडक आहे. व म्हणून आयुर्वेद हा केवळ ग्रंथ-प्रामाण्य मानणारा आहे, प्रत्यक्षास तो मानीत नाहीं असा गैरसमज सुशिक्षितांनीं करून घेतला आहे, तो दूर करावा. संशोधनाची दृष्टि असणारा खरा वैद्य जगांतील प्राच्य व अर्वाचीन ज्ञानविज्ञानशास्त्रांत मुळींच भेद मानीत नाहीं. आयुर्वेदीय दृष्टिकोनांतून यच्चयावत् ज्ञानाविज्ञानशास्त्रांकडे पाहून आयुर्वेदांत शास्त्रीय वृद्धि करण्याची त्यांची नेहमीं तयारी असते.

आयुर्वेद संशोधनाचे दृष्टीनें प्रस्तुत उपलब्ध सामुग्रीवरच पूर्वतयारी करावी लागेल. आजच्या डी. ए. एस्. एफ्. विद्यार्थ्यांपैकीं आयुर्वेदीय विषयांत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या व आयुर्वेदाची आवड असलेल्या विद्यार्थ्यांना सहा महिने अवधि देऊन एखाद्या छोट्याशा मुद्यावर संशोधनात्मक निबंध लिहिण्यास सांगावा. त्याची तयारी कशी करावयाची तें त्यांस सुचवून परिशिष्ट म्हणून जोडण्यास सांगावें. अशा निबंधांचे परीक्षणांत सुयोग्य ठरणाऱ्या ५-१० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ति देऊन त्यांना संशोधन-शिक्षणक्रम २ वर्षांचा ठेवावा. आणि निरनिराळ्या विषयांतील संशोधनाचे मुद्दे सांगून व संशोधनाची दिशा दाखवून रुग्णालय, रसशाळा, प्रयोगशाळा यांत अवश्य तीं प्रात्यक्षिकाची मदत देऊन विद्यार्थ्यांना तयार करावें. अध्यापनाची कला असणारांना ती बाजू सोंपवून तयार करावें. व असे संशोधक तयार झाल्यावर प्रत्यक्ष संशोधनकार्यास आरंभ करावा. अर्थातच या कार्यासाठीं प्रथम संशोधक व अध्यापक तयार केले पाहिजेत.

संशोधन कार्य दोन प्रकारचें आपणापुढें आहे. १ पुराण संशोधन व दुसरें नवसंशोधन. पुराण-संशोधनांतहि उपलब्ध व अनुपलब्ध असें द्विविध संशोधन संभवतें. आज उपलब्ध शास्त्रांतील सिद्धांत व विधानें हीं अनेक प्रमाणें व प्रयोग यांनीं सिद्ध करून सिद्धांत व विधानें यांच्याशीं सुसंगत मेळ घालणारें वाङ्मयनिर्माण करणें हें उपलब्ध शास्त्रसंशोधन होय. आणि शास्त्रांतील न्यून गोष्टींची पूर्ति आयुर्वेदीय प्राचीन वाङ्मय आणि इतर वाङ्मयांतून ते उपयुक्त वाटतील ते भाग एकत्र करून मग उपलब्धशास्त्र संशोधनाप्रमाणें त्याची सिध्दि करावी, म्हणजे नवसंशोधन होईल. या कार्याच्या सिध्द्यर्थ विशाल ग्रंथालय, महाविद्यालय, रुग्णालय, शवच्छेदनशाळा, रसशाळा, रसायनशाळा, वाङ्मयकार्यालय, वनस्पतिप्रदर्शिनी,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उद्यान, शारीरद्रव्यप्रदर्शिनी, खनिजद्रव्यें व इतर औषधीकल्पप्रदर्शिनी इ. कितीतरी शाखोपशाखांची आवश्यकता आहे.

चरकसंहितेंत षड्विरेचनशताश्रितीय अध्यायांत जे निरनिराळे विशिष्ट गुणधर्मांचे गट वर्णिले आहेत त्यांकडे आम्ही लक्ष दिलें पाहिजे. हिरडा, निशोत्तर, बाहवा, सोनामुखी, जयपाल हीं सर्वंहि औषधें रेचक, भेदक, अनुलोमक, स्रंसन म्हणून वर्णिलीं आहेत. अवस्थापरत्वें यांचा उपयोग केव्हां कसा करावा हें आयुर्वेदांत सांगितलें आहे. चिकित्साकार्यांत रोग्याला आम्हीं जुलाबासाठीं जीं औषधें देतों त्यांत हिरडाचूर्ण, सोनामुखी, स्वादिष्ट विरेचन, अश्वकंचुकी, इच्छाभेदी इ. कल्पांचा उपयोग होत असतो, त्यांनीं तात्पुरतें कार्यंहि योग्य असें घडून येतें; परन्तु पुनश्च अवरोधाची तक्रार रोग्याकडून येतेच. हींच औषधें संशोधक दृष्टीनें विचार करून वापरलीं तर मात्र अवरोधाची तक्रार उरणार नाहीं. विरेचन विधि हा पंचकर्मांतील स्वतंत्र विधि आहे. त्याचें ठराविक तंत्र आहे. तें तें औषध योजल्यानंतर रेचन, भेदन, स्रंसन, अनुलोमन इ. अपेक्षित कार्य घडून आल्यावर रोग्यानें वागावयाचे नियम आहेत ते विचारांत घेतलेच पाहिजेत. एकंदरींत पंचकर्म चिकित्सेचा जो लोप हल्लीं झाला आहे, तिकडे लक्ष जाणें इष्ट आहे.

संशोधनाच्या दृष्टीनें आणखीहि एका गोष्टीकडे मी संशोधनैकतत्पर वैद्यश्रेष्ठांचें लक्ष वेधूं इच्छितों. दूत, स्वप्न, शकुन, रिष्ट लक्षणें इ. वरून पूर्वींचे जुने वैद्य ६।६ महिने अगोदर मरणाबद्दल सूचना देत असत. आजच्या काळीं तो एक उपहासाचा विषय झाला आहे. तथापि त्यांत कांहींतरी शास्त्रीय तत्त्व असलेंच पाहिजे. त्याशिवाय आपल्या संहितांतून अक्षर, काना-मात्रासुद्धां मोजून मापून वापरणाऱ्या संहिता-कारांनीं या गोष्टीसाठीं स्वतंत्र अध्याय खर्चीं घातले असते असें वाटत नाहीं.

आयुर्वेदास राजमान्यता मिळण्याचे दृष्टीनें महाराष्ट्रीय वैद्यमंडळींच्या एकूण अपेक्षा आहेत त्या थोडक्यांत व्यक्त करून हा मुद्दा संपवूं:—

१ आयुर्वेदीय अभ्यासक्रमांत इतर वैद्यक शिक्षणाचा समावेश नसावा.

२ आयुर्वेदाध्ययन संपवल्यानंतर इतर वैद्यक शिक्षण घेऊं इच्छिणारांसाठीं इतर वैद्यक विद्यालयांतून प्रोत्साहनपर व योग्य अशा सोयी असाव्यात.

३ निखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठाच्या अभ्यासक्रमास मान्यता मिळावी.

४ आयुर्वेदविषयक कोणतेंही कार्य त्याच शास्त्रांतील अधिकारी वैद्यांचे आधिपत्याखालीं व्हावें. इतर वैद्यक तज्ज्ञांची त्या कामीं योजना होऊं नये.

५ मुंबई प्रांतांत 'डिरेक्टर ऑफ आयुर्वेद' स्थान निर्माण करून त्या जागीं आयुर्वेदनिष्णात तज्ज्ञाची नेमणूक व्हावी.

६ कॉलरा, मलेरियासारख्या सांथींच्या प्रतिबंधक कार्यांवर जसे डॉक्टर्स नेमले जातात, तशीच वैद्यां-चीहि नेमणूक व्हावी.

७ सरकारनें आयुर्वेदीय वाङ्मय, तत्त्वज्ञान, निदान व चिकित्सा या क्षेत्रांतील संशोधन कार्य आयुर्वेदीय दृष्ट्या होण्यासाठीं तज्ज्ञ आयुर्वेदीयांचे नेतृत्वाखालीं संशोधनशाळा काढाव्यात.

८ सरकारी रुग्णालयांतून प्रविष्ट रोग्यांना त्यांच्या इच्छेनुसार व रुग्णालयाच्या लहान मोठ्या प्रमा-णास अनुसरून विशिष्ट रुग्णशय्या आयुर्वेदीय उपचारासाठीं राखून ठेवल्या जाव्यात व त्यांना तज्ज्ञ वैद्यांकडून केवळ आयुर्वेदीय उपचार मिळण्याची व्यवस्था व्हावी.

९ आयुर्वेदीय औषधीपाठचिंतामणी निश्चित करीत असतां वैयक्तिक व अनुभवसिद्ध औषधांना मुक्तद्वार ठेवून तीं आपल्या नित्यव्यवहारांत वापरण्यास वैद्यांना मोकळीक असावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१० निखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाप्रमाणें वृद्धवैद्याजवळ खाजगी रीतीनें अभ्यास करून त्या परीक्षा उत्तीर्ण होणारा पदवीधर ६ महिने प्रात्यक्षिक शिक्षण घेऊन उत्तीर्ण झाल्यावर त्याला सरकारमान्यता मिळावी.

११ केवळ आयुर्वेदीय शिक्षणक्रमाच्या संस्थांना भरीव आर्थिक मदत करावी.

१२ आयुर्वेदविषयक कोणतेंहि कार्य हातीं घेतांना त्यासंबंधीं निर्णय घाईनें न ठरवितां प्रांतीय आयुर्वेदतज्ज्ञांना व त्यांच्या संघटित संस्थेला विश्वासपूर्वक विचारांत घ्यावें.

१३ आयुर्वेद हें 'राष्ट्रवैद्यक' म्हणून मानलें जावें.

४ आयुर्वेदाचें लोकमान्यत्व

'आचार्यः सर्वचेष्टासु लोक एव हि धीमताम्' या न्यायानें लोकप्रवृत्ति, श्रद्धा, इच्छा पाहूनच कोणतेंहि सामाजिक वा राजकीय कार्य घडत असतें, हें लक्षांत घेतल्यास राजमान्यतेबरोबरच किंबहुना त्याच्याहि अगोदर आयुर्वेदाला लोकमान्यत्व प्राप्त होणें इष्ट आहे. राजशाही काळांत 'राजानें ठरविलें तें धोरण व बांधलें तें तोरण' प्रजेला मान्य करावें लागे. परन्तु आज लोकशाहीचें युग असल्यानें 'गांव करील तें राव काय करील?' अशी खरी स्थिति आहे. राष्ट्राचा बहुजन समाज खेड्यांतून राहात असून शें. ८० लोक आयुर्वेदीय उपचारांचें द्वारें आपलें आरोग्य संरक्षण करीत आहेत, असें अतिशयोक्तीचा थोडा दोष पत्करूनहि म्हणतां येतें. ग्रामीण भागांतून वैद्यकीय मदत पुरेशी मिळत नाहीं. हें सर्वमान्य सत्य आहे. पुष्कळ पैसा खर्चून शिक्षित झालेले व आजच्या आयुर्वेद विद्यालयांतून बाहेर पडलेले वैद्यहि खेड्यांत आपला व्यवसाय थाटूं इच्छित नाहींत. अशा स्थितींत आसपास उपलब्ध अशा औषधीद्रव्यांच्या साह्यानें केवळ आयुर्वेदीय उपचार करणारे वैद्य ह्या ग्रामीण भागांतून पोंचावयास हवेत, म्हणजे स्वल्प खर्चांत लोकांची आरोग्य संरक्षणाची सोय होईल. 'यस्मिन् देशे हि यो जातः तज्जं तस्यौषधं हितम्' जो ज्या ठिकाणीं जन्माला आला त्याच्या प्रकृतीला त्याच हवामानांत निर्माण होणारें औषध चटकन् सात्म्य म्हणजे हितावह होईल हें जनतेनें विसरूं नये. व वैद्यांनींहि ग्रामीण जीवनाशीं समरस होण्यांतच आपलें खरें कल्याण आहे, जनताजनार्दनाची खरी सेवाहि तेथेंच होणें शक्य आहे हें ओळखलें पाहिजे. खेड्यांत पोट भरणार नाहीं ही कल्पनाहि वैद्यांनीं करतां नये. "क्वचित् धर्मः क्वचिन्मैत्री क्वचिदर्थः क्वचिद्यशः। कर्माभ्यासः क्वचिच्चेति चिकित्सा नास्ति निष्फला॥" अशी ह्या चिकित्साकार्याची महति आहे. शहरी भाडोत्री जिवन खेड्यांत नसल्यानें माणुसकी तेथें अधिक आढळते. म्हणून आयुर्वेदाला लोकमान्यत्व मिळवणेंसाठीं वैद्यकव्यवसायाकरतां यापुढें खेड्याकडे वळा असेंच सांगतां येईल. 'शहरांत मावत नाहींत व खेडयांत मिळत नाहींत' अशी झाली आहे चिकित्सकांची स्थिति; ती नष्ट झाली पाहिजे.

सर्वसाधारण जनसमाजाची प्रवृत्ति पाहिली तर वैद्य काय औषध देतो हें पाहाण्यास रोगी तयार नसतो; फक्त लौकर बरें वाटावें व रोजी कमवण्याच्या उद्योगास जातां यावें, एवढीच त्याची अपेक्षा असते. पोटांत जाणारें औषध, देशी कीं विदेशी, रोग बरा होणार तो इंजेक्शनमुळें कीं 'छू मंतर करून' हा विचार करण्यास त्यास सवड नाहीं. तसेंच या क्षणाला माझा रोग बरा किंवा कमी होऊन मी कामावर जाऊं लागलो व पुन्हां लवकर बरा करणाऱ्या औषधाचा दुष्परिणाम भोगावा लागणार किंवा रोग तात्पुरता थांबून पुन्हां थोड्या दिवसांनीं येणार हेंहि विचारांत घेण्याची त्याची तयारी नसते. याला सर्वस्वी कारण आजचा तीव्र जीवनकलह होय! उद्यांचा विचार करण्याची फुरसत नाहीं, ही गोष्ट आयुर्वेदास लोकमान्यत्व प्राप्त झालें पाहिजे अशी अपेक्षा ठेवणाऱ्या आम्ही वैद्यवर्गानें दृष्टिआड करून चालणार नाहीं, व त्यासाठीं आम्हास आमच्या औषधांचे प्रभाव सद्यःफलदायी व्हावेत इकडे फार कटाक्षानें पाहिलें पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अश्वकंचुकी वा इच्छाभेदीसारख्या ढाळकाच्या १।२ काय पण ८।१० पर्यंत गोळ्या देऊनहि जुलाब होत नाही अशी कित्येकवेळां कारखान्यांतील औषधांची प्रचीति येते, तर प्रवाळासारखें औषध तोंड आणतें. हें पाहिलें म्हणजे औषधावर श्रद्धा बसणार कशी? त्रिभुवनकीर्ति एका कारखान्याची लालजर्द तर दुस-याची अगदीं तद्विरुद्ध असें आढळतें; हें इष्ट नाहीं. वैयक्तिक अनुभवशीर औषधांना मुक्तद्वार ठेवूनहि सर्व-साधारण नित्य व्यवहारांत वापरावयाचीं कांहीं ठराविक २०।२५ औषधें तरी अगदीं रंग, रूप, चव व गुण-धर्मांनी सारखीं राहातील अशी योजना होणें इष्ट आहे.

पौष्टिक औषधांबाबत हल्लीं फारच गौडबंगाल माजलें आहे. रोगमुक्त झाल्यावर रोगी टॉनिक मागतो व द्यावें लागतें. अशावेळीं आंत्रबल्य, हृद्य, शुक्रवर्धक, बृंहण इ. सर्व प्रकारचे योग तयार असे मिळण्यास अडचण बाजारांत वैद्यांना भासते, व मग ते विलायती औषधें लिहून देतात, असाहि अनुभव येतो. वैद्य आणि कारखानदार या दोघांनीं ह्या गोष्टीकडे लक्ष द्यावयास हवें. असे कल्प आयुर्वेदांत कितीतरी आहेत, पण ते गिऱ्हाईकाला तयार मिळत नाहींत.

लहानांपासून मोठ्यापर्यंत सर्वांना रोज सकाळीं चहासारखें कांहीं पेय हवें असतें. चहाचे दुर्गुण सर्वांना माहीत आहेत. तरी स्वस्त, उत्तेजक व शक्तिवर्धक, तृप्तिकारक, स्वादिष्ट असें पेय जर प्रचारांत आणतां आलें तर तें कितीतरी उत्तम होणार आहे. साळीच्या लाह्या, शिंगाडे, गव्हाचें सत्त्व इ. पासून टिकाऊ पेयें तयार करणें अशक्य नाहीं. साळीच्या लाह्यांचें पीठ, वंशलोचन, पिंपळी, साखर इ. द्रव्यांपासून मी एक 'बालभूक' नांवाचें औषध तयार करून पाहिलें व त्याचा उपयोगहि बरा आढळला. मोठ्या प्रमाणांत अशीं टिकाऊ अशीं औषधें आयुर्वेदीय पद्धतीचीं प्रचारांत आलीं तर बेबीज् टॉनिक, मेलिन्स फूड सदृश विदेशी औषधांना आळा घालणें अशक्य नाहीं.

लोकांचे मनांत आयुर्वेदाविषयीं कुतूहल, जिज्ञासा, सहानुभूति व आत्मीय भाव उत्पन्न होण्यासाठीं आयुर्वेदाचीं अशीं कांहीं व्यावहारिक वैशिष्ट्यें लोकांच्या डोळ्यांत भरणें जरूर आहे. तसेंच वैद्य व जनता यांचें परस्पर संघटन वाढणेंहि इष्ट आहे. वैद्यांनीं लोकसेवेच्या निरनिराळ्या क्षेत्रांत शिरून लोककल्याणाचीं सार्वजनिक कामें करण्यांत पुढाकार घेतला पाहिजे. तथापि गांवच्या पक्ष-विपक्षाच्या राजकारणापासून अलिप्त राहून 'सर्वेषां अविरोधेन' करतां येणारीं कामें निवडावींत हें विसरून चालणार नाहीं. विशेषतः सार्वजनिक आरोग्याची बाब त्यानें अत्यंत दक्षतेनें हाताळली पाहिजे. सांथीचे रोग म्हणजे पैसे कमव-ण्याचा मोसम न मानतां ती खरी जनताजनार्दनाची सेवा करण्याची संधि मानून तन-मन-धनानें अशावेळीं त्यानें झीज सोसून सेवा केली तर ती लोकांचे मनांत सदैव रुजू राहील; व व्यक्तीबरोबरच त्याच्या शास्त्राबद्दलहि सहज आदर वाढल्याविना राहाणार नाहीं.

प्राथमिक शाळांतून अगदीं आरंभापासून आयुर्वेद हा एक आवश्यक विषय ठेवला जाऊन दिनचर्या, ऋतुचर्या, नित्य आहारांतील पदार्थांचे गुणदोष, पचन, रुधिराभिसरण, मनोव्यापार इत्यादींचीं मूलतत्त्वें व आवश्यक माहिती छोटे छोटे व सोप्या भाषेंत धडे देऊन आयुर्वेदाभ्यासाची प्राथमिक तयारी घरगुती सोप्या उपचारांचे माहितीसह करून देण्याचा उपक्रम जर क्रमशः झाला तर केवळ आयुर्वेद महाविद्यालयांत प्रवेश होण्याच्या दृष्टीनें किती तरी कार्य होण्याजोगें आहे. यामुळें आयुर्वेदाविषयीं सहजच आपुलकी नवी पिढींत निर्माण करणें शक्य आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत फारच क्वचित् उपयोगी पडणारे असे जे विषय आहेत त्यांतून एखादा वगळून त्याची जागा 'व्यवहारायुर्वेद' या विषयास दिली गेल्यास हें कार्य सहज होण्याजोगें आहे. अर्थातच यासाठीं त्या विषयाचीं सोप्या भाषेंत लिहिलेलीं पुस्तकें तयार झालीं पाहिजेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रसार व प्रचार कार्य

वैद्यांनीं त्या त्या ऋतूंतील आहार-विहारविषयक ज्ञान आपण राहातों त्या गांवच्या लोकांना व्याख्यान, प्रवचन अथवा निरनिराळ्या खाजगी बैठकी-संभाषणांतून देण्याचा उपक्रम करावा. म्हणजे वैद्य केवळ औषध देऊन रोग बरा करीत नसून रोग उत्पन्नच न व्हावा या दृष्टीनेंहि कार्य करूं शकतो हा अनुभव येऊन जनता, वैद्यास व यामुळें त्याच्या आयुर्वेदशास्त्रासहि अधिक आदर व आत्मीय भावनेनें पाहूं लागेल. हा लाभ कांहीं थोडा थोडका नाहीं.

आरंभीं सांगितल्याप्रमाणें सध्यांच्या प्रचलित विद्यालयांतून शिकून पदवीधर होऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना केवळ आयुर्वेदाचे दृष्टीनें फारच अपुरें ज्ञान प्राप्त झालें असल्यामुळें त्यांची प्रत्यक्ष व्यवहारांत जी कुचंबणा होते ती नाहींशी होण्यासाठीं त्यांनीं आयुर्वेदाविषयींचे दुर्ग्रह झाले असतील तर ते दूर सारून प्रथितयश वैद्यांकडून अथवा केवळ आयुर्वेदीय विषयांचें शिक्षण देणारी सरकारी विद्यालयें निघालीं तर त्यांतून आयुर्वेदाच्या शास्त्रीय विषयांचें सोपपत्तिक ज्ञान अवश्य प्राप्त करून घ्यावें. आयुर्वेद विषयांतील त्यांचें राहिलेलें वैगुण्य दूर करण्याचें दृष्टीनें सरकारनेंहि त्यांना तशी सवलत द्यावी.

शुद्ध आणि मिश्र शिक्षणवाद्यांचा वैचारिक भूमिकेंत एकच फार मोठा मतभेद आहे तो म्हणजे आयुर्वेदशास्त्राचें यथासांग अध्ययन झाल्यावांचून ॲलोपॅथीचा अभ्यास नसावा हें शुद्ध आयुर्वेद पक्षीयांचे मत दुसऱ्या पक्षास संमत नाहीं एवढाच! फिजीशियन व सर्जन पूर्णांशानें प्रत्येक डॉक्टर असत नाहीं, हे आपण व्यवहारांत पाहातों. तथापि दोन्ही विभागाचीं मूलतत्वें दोघांनाहि माहीत असतात, शिकवलीं जातात, तशीच परिस्थिति कायचिकित्सक व शल्यचिकित्सक म्हणून वैद्यवर्गातहि संभवणें अशक्य नाहीं. म्हणून एवढ्या पुरता मतभेदाचा मुद्दा बाजूला सारून दोन्ही पक्षांनीं एकत्र येऊन आयुर्वेदोद्धाराच्या कामीं सहकार्य केल्यास किती उत्तम होणार आहे! "एकमेकां साह्य करूं । अवघे धरूं सुपंथ ॥" हें सुभाषित प्रत्यक्षांत आणतां येईल अशी खटपट व्हावी, अशी दोन्ही पक्षांना माझी नम्र प्रार्थना आहे.

वृत्तपत्रकारांना विनंति

सरकार व समाजांत कोणत्याहि विषयाबद्दल अनुकूल वा प्रतिकूल भावना निर्माण करण्याचें फार मोठें शस्त्र वृत्तपत्रकारांचे हातीं असतें. राष्ट्रीय विद्या-कला-कौशल्य व शास्त्रें ऊर्जितावस्थेस यावींत याकरितां प्रचार करणें हें इतर कार्याप्रमाणेंच वृत्तपत्रकारांचें पवित्र राष्ट्रीय कर्तव्य आहे. "न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानां कर्मसंगिनाम् ।" श्रीमद्भगवद्गीतेंतील प्रभु श्रीकृष्णाच्या आज्ञेप्रमाणें सामान्य जनतेंत आपल्या राष्ट्रीय विद्या-कला-शास्त्रांबद्दल बुद्धिभेद निर्माण न व्हावा इकडेहि वृत्तपत्रकारांनीं लक्ष द्यावें अशी त्यांना विनंति आहे. आपल्या धर्मांत कांहीं वैगुण्य वाटलें म्हणून त्याची निंदा करून दुसरा धर्म स्वीकारणें इष्ट नाहीं. "स्वधर्मे निधनं श्रेयः" हेंच खरें. आयुर्वेदशास्त्राच्याहि दृष्टीनें हीच गोष्ट वृत्तपत्रकारांच्या दृष्टिपथांत आणून द्यावीशी वाटते. सर्वांगपरिपूर्ण असें कोणतेंहि शास्त्र नाहीं. पाश्चात्य वैद्यकहि यास अपवाद नाहीं. आज नवीन म्हणून पुढें आलेले शोध उद्यां मागें पडतात, टाकाऊ ठरतात हें आपण पाहात आहों. भरपूर पैसा व राजाश्रयाचे बळावरच पाश्चात्य वैद्यक प्रगत झालेलें आपण पाहात आहों. हीच परिस्थिति आयुर्वेदाला अनुकूल असती तर त्यांतहि प्रगति झाली नसती, होऊच शकली नसती, असें म्हणणें धाष्ट्र्यांचेंच नव्हे तर काय? आज आतां राज्य आमचें झालें आहे, अशावेळीं आयुर्वेद हें राष्ट्रीय वैद्यक होणें इष्ट नाहीं असें कसें म्हणतां येईल? वर सांगितल्याप्रमाणें "श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात्" ही गोष्ट ध्यानीं घेऊन आयुर्वेदशास्त्राचा पुरस्कार होण्याचे दृष्टीनेंच वृत्तपत्रकारांनीं प्रचारार्थ आपली लेखणी कामीं लावावी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तर किती छान होणार आंहे! आयुर्वेदांत आज दिसणारे कांहीं दोष हे विशिष्ट परिस्थितीमुळेंच राहिले आहेत हें जर खरें तर मग त्या दोषांबद्दल त्याला हिणवून त्या शास्त्रावर व त्याच्या अनुयायी वैद्यवर्गावर विघातक टीका करण्यापेक्षां आयुर्वेदशास्त्रांतील चांगल्या गोष्टींचीहि प्रशंसा करून सुधारणाविषयक विधायक सूचना देण्याचें धोरण वृत्तपत्रकारांनीं ठेवणेंच हितावह होणार आहे. आयुर्वेद नष्ट व्हावा अशा इच्छेनें प्रयत्न करणारे लोक कांहीं थोडेथोडके नाहींत. पण वृत्तपत्रांनीं त्यांच्या हातांतील शस्त्र बनून विघातक कृत्य करण्यापेक्षां आयुर्वेदाला प्रोत्साहन देणारे, सहानुभूति दर्शविणारे आणि त्याचेविषयीं आत्मीय भावना निर्माण करणारे लेख लिहून त्याच्या प्रसार आणि प्रचार कार्यास शक्य तें साह्य करावें. त्यांतच राष्ट्रहित आहे.

बंधूंनो! भाषण फार लांबलें. वेळहि बराच झाला. म्हणून मी आतां आपला अधिक वेळ न घेतां ज्या महाभागांनीं गेल्या ८ वर्षांत प्रांतीय संमेलनाचें धुरीणत्व पत्करून आयुर्वेद सेवाकार्याचा गाडा रेटीत येथपर्यंत आणून सोडला त्या भूतपूर्व अध्यक्षांचे चरणीं माझें पद्यमय प्रणाम निवेदून मी हें भाषण संपवितों.

दिव्यौषधीनामतिसूक्ष्मयोगान् । रोगान् प्रहर्तुमुपयुज्य कर्मणि ।
ख्यातिं प्रयातो भिषजां समाजे । गंगाधरःशास्त्रि गुणे प्रणम्यते ॥१॥

रुग्णानां रोगमोक्षं यो धातुसारपरीक्षया ।
करोति स भिषग् श्रेष्ठो वन्द्यते वेणीमाधवः ॥२॥

प्रायेनित्यं वदान्यः श्रतिगुणसफलं आयुषो वेदमद्धा । विज्ञाने न्यायशास्त्रे अतिनिपुणमतिः वैद्यविद्याप्रवीणः ॥
बाळाऽःपुण्यभूमावधिवसति खलु श्रीभिकाजी गुरुर्नो । वैद्यो डेंगवकरोऽसौ शरदशतमितं दीर्घमायुर्लभेत ॥३॥

दक्षस्तीर्थात्तशास्त्रार्थो दृष्टकर्मा शुचिर्भिषग् ।
जोशी शास्त्री गणेशोऽसावस्माभिःस्तूयते सदा ॥४॥

पुराणिकः श्रेष्ठकुलावतंसः । श्रीधूतपापेश्वरसेवको यः ।
नानाऽथ गंगाधर वैद्यवर्यः । भिषक्कुबेरो ह्यनिशं प्रणम्यते ॥५॥

मरीचबलिहिंगुलान्, गरलपिप्पलीटंकणान् । सुवर्णभवबीजकान् सुमतिपूर्णमन्वेषते ॥
सदा हि पुरुषोत्तमो भजति शास्त्रसंशोधनम् । स धामणकरो ह्ययं प्रतिदिनं मया वन्द्यते ॥६॥

सदा यस्य चिंता तथा यस्य यत्नाः । अभूवन् भवन्ति प्रकर्षेण भाग्याः ॥
भवेच्छास्त्रमस्मत्सदा राजमान्यम् । तमभ्यंकरं शास्त्रिणं नो प्रणामाः ॥७॥

आयुर्वेदप्रचारार्थं पत्रिका संप्रकाश्यते ।
पाक्षिकी येन तं वन्दे पण्डितं बिंदुमाधवम् ॥८॥

शेवटीं प्रभुधन्वन्तरिचरणीं हेंच मागणें आहे कीं :—

सर्वेऽपि सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः ॥
सर्वे भद्राणि पश्यन्तु । न कश्चिद्दुःखमाप्नुयात् ॥

ॐ शांतिः । शांतिः । शांतिः ॥

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आचार्यांचें अभिनंदन

" आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी यांची नागपूर विश्वविद्यालयाच्या आयुर्वेदासनावर रीडर म्हणून नेमणूक झाल्याबद्दल हें मंडळ त्यांचें अभिनंदन करतें.

आयुर्वेदोन्नतीच्या दृष्टीनें संशोधन करण्याचें सरकार निरनिराळया मार्गानें निरनिराळया व्यक्तींच्या नेमणुकी करून प्रयत्न करीत आहे. परंतु हे सर्व प्रयत्न आयुर्वेदाच्या दृष्टीनें अयोग्य होत.

नागपूर विश्वविद्यालयाचें अभिनंदन

नागपूर विश्वविद्यालयानें केलेल्या ह्या नेमणूकी-बद्दल मात्र मंडळाला समाधान होत आहे. मंडळाला अशी आशा आहे कीं योग्य व्यक्तीची निवडणूक झाली आहे म्हणून आयुर्वेदाचें दृष्टीनें योग्य तें संशोधन कार्य होईल. या निवडणुकीबद्दल मंडळ नागपूर विश्वविद्यालयाचेंसुद्धां अभिनंदन करतें."

अकोला (मध्यप्रदेश) — ह. रा. पिंपळे, मंत्री, महाविदर्भ पदवीधर वैद्य मंडळ

भारतसरकारची उपेक्षावृत्ति

ही देशकल्याणाचे दृष्टीनें विघातक आहे

" आयुर्वेद त्याच्या स्वयंसिद्ध अधिकारामुळें ज्या उच्चासनावर स्थापित व्हावयास पाहिजे, ते स्थान त्यास प्राप्त करून देण्याबाबत भारत सरकारची असलेली उपेक्षावृत्ति ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे" असे उद्गार अ. भा. कॉंग्रेसचे माजी अध्यक्ष महर्षि टंडन यांनीं हरिद्वार येथें अ. भा. आयुर्वेदशास्त्र चर्चेच्या द्वितीय अधिवेशनाचे उद्घाटन प्रसंगीं काढले. हें अधिवेशन ऋषिकुल आयुर्वेद महाविद्यालयांत भरलें होतें. 'पाश्चात्य वैद्यकी शिक्षण घेतलेल्या डॉक्टरांप्रमाणेंच ही उपेक्षावृत्ती होय' असें ते म्हणाले.

तर्क व अनुभव हीच कसोटी

भेषज व चिकित्साशास्त्रांतून फक्त त्याच गोष्टी घ्या कीं ज्या तर्क व अनुभव यांच्या कसोटीस उतरतील. शास्त्र ह्याचा अर्थ, तर्क व अनुभव ह्याहून स्वतंत्र. म्हणून शास्त्रीय गोष्टी व्यवहारांत आणण्यापूर्वी त्या आपल्या तर्कास व अनुभवास पटणें अगदीं आवश्यक आहे. आपला तर्क व अनुभव हेच अंतिम निर्णय घेऊं शकतात.

टंडनजींनीं वैद्यवर्गास असा सल्ला दिला कीं पाश्चात्य सिद्धांत व औषधप्रणाली यांचा अव्हेर न करितां, त्यांचा अभ्यास व विचारविनिमय करून अखेर जो आपला स्वतःचा निर्णय व सल्ला असेल तो जनतेपुढें ठासून मांडावा.

अधिवेशनाचें अध्यक्षस्थान अ. भा. आ. कॉं. चे माजी अध्यक्ष श्री. यादवजी त्रिकमजी यांनीं मंडित केलें होतें. वैद्य रामरक्षजी पाठक यांनीं रिपोर्ट व अनेक सन्माननीय व्यक्तींकडून आलेले संदेश वाचून दाखविले.

मध्यप्रदेश सरकारची मान्यता (Recognition) असलेलें एकमेव

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती

(१) शवच्छेदन, रुग्णपरीक्षा, ड्रेसिंग, कम्पाउंडिंग, नेत्ररोग, स्त्रीरोग, ऑपरेशन्स, रक्त, थुंकी, मूत्रपरीक्षा, आदींचें व आयुर्वेदाचें सर्वांगपूर्ण प्रत्यक्षासहित शिक्षण (२) सरकारी आयुर्वेद बोर्डामार्फत परीक्षा, (३) D. A. M. S. हा डिप्लोमा देण्यांत येतो. [१] उत्तम अध्यापक वर्ग. (४) बोर्डिंगची व्यवस्था केली आहे. (५) कोर्स ४ वर्षांचा. मॅट्रिक पास विद्यार्थ्यांनाच जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत प्रवेश मिळेल. (६) महाविद्यालय २० जून-पासून सुरू होतें. माहितीपत्रक मागवा.

पं. दा. मुळे, प्रिन्सिपॉल
विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[वृं]दमाधव चिकित्सेंतील शंकास्थळें

लेखकः– वै. हरीशास्त्री ताटके

[१।४।५३ चे अंकावरून पुढें चालू]

ग्रहणी अधिकारः– चित्रकगुटिका द्वौ क्षारौ, [...]वर टीका लिहितांना लवण गणनेंत 'औद्भिदं" [...]च्या स्पष्टीकरणांत 'सांभरी लवणं नुत्कारी [...] वा' असें दिलें आहे. लवण वर्गांत कोणत्याच [...] 'नुत्कारी' हें नांव नाहीं; त्यामुळें हें लवण [...] कोणतें व तें आज आहे कीं नाहीं? टीका-[...] लेखाप्रमाणें तें असावें हें निश्चित. आज [...] हें द्रव्य विस्मृत झालें आहे. याचा [...] होणें आवश्यक वाटतें.

अर्श चिकित्सा श्लोक १४– 'स्विन्नं वार्ताक-[...]' इत्यादि या श्लोकावरील टीकेंत 'वार्ताकफलं [...]तोयेनोत्स्विन्नं' याचा अर्थ 'वांगें घोसा-[...] क्षाराच्या पाण्यांत उकडून' असा आहे. [...]चा क्षार कसा काढावयाचा? क्षार पानांत, [...] वा पंचांगांत असतो. मूळ द्रव्याच्या कितीपट [...] क्षारद्रव्य किती सांपडतें? याचें प्रात्यक्षिक [...] असल्यास प्रगट करावें, अथवा हा योग [...] केला असल्यास तसें प्रगट करावें.

अर्शचिकित्सा श्लोक १११-(कालमुष्कचा क्षार) [...] 'कालक मुष्कक' द्रव्याचा क्षार काढण्यास [...]लें आहे, हें द्रव्य कोणतें? काळा घोतरा नव्हे [...] टीकेंत विश्वामित्रानीं याचे चार प्रकार सांगितले [...]. यावर 'कृष्णपुष्पा' असा पर्याय सुचविला [...]. निघंटांत काळा घोतरा या अर्थी 'कालक-[मुष्क]' हा शब्द नाहीं. कृष्णपुष्पावरून काळा [...] अर्थ घेतला आहे असें दिसतें.

शंका अशी कीं मूळ शब्द पुल्लिंगी आहे व [...] पर्याय स्त्रीलिंगी आहे, यावरून हें द्रव्य निराळें [अस]ावें.

एक कूट श्लोक

अजीर्णाधिकार श्लोक १० वा - या श्लोकाच्या [टी]केमध्यें हरिश्चंद्राचें मत एका कूट श्लोकानें दाखविलें आहे. तो श्लोक असा 'हरीतकी हरिहरतुल्यषड्गुणा चतुर्गुणां चतुर हि विलासपिप्पली, द्विचित्रकं वरदवरैकसैंधवं रसायनं कुरु नृपवन्हिदीपनम् ॥ या श्लोकाचे पदशः स्पष्टीकरण व्हावें.

बृहदग्नि मुखचूर्णाचे पाठांत हपुषा आरग्वधं इत्यादि, यांतील आरग्वध पदावर सुवर्णालुफलं असा पर्याय दिला आहे. आरग्वधवाचक शब्द ४५ आहेत. त्यांत सुवर्णालुफल हें नाहीं. त्यामुळें हा बाहवा कीं, अन्य कोणतें द्रव्य आहे? तसेंच या पाठांत लोहकिट्टं हें पद आहे. त्याचा प्रसिद्ध अर्थ मंडूर, पण जेज्जटानें 'लोहकिट्टंपृथक् पार्थिवं द्रव्यं मंडूरं वदति' असें सांगितलें आहे. जेज्जटाच्या काळांतील मंडूर द्रव्य आज कुठें आहे काय? याचा शोध लागल्यास मोठेंच कार्य होईल.

सुधाकांड

अजीर्णाधिकारांत भास्करलवणानंतर वार्ताक गुटिकेंत 'चतुष्पलं सुधाकांडं' इत्यादि, यांत सुधाकांड हें द्रव्य निघंटूंत दिसत नाहीं. तर निश्चितपणें हें सुधाकांड कोणतें? हें सुधाकांड जाळून क्षार मिश्र करून वांग्यांच्या रसांत गोळ्या करावयाच्या आहेत. सुधाकांड हें षष्ठीतत्पुरुषात्मक पद आहे का एकपद आहे? सुधाकांड म्हणजे त्रिधारी निवडुंग घ्यावयाचा काय?

विषूचीवर नयनांजनाचा योग

अजीर्णांतर्गत विषूचीवर नयनांजनाचा योग ६० व्या श्लोकांत आहे. यावरील टीकेंत 'विषूची शब्देन विषूचीजनिताः प्रमीलिकाशिरोरोगादयो गृह्यंते।' शिरोरोगाचे १२ प्रकार निदानकारांनीं वर्णिले आहेत. त्यांत प्रमीलिका शिरोरोगाचा अंतर्भाव कोणत्या प्रकारांत बसतो? व तो बाह्य लक्षणांनीं ओळखण्याचें साधन कोणतें? प्रमीलिका नांवाची उपपत्ति कोणती? व या उपपत्तींतून कांहीं द्योतक अर्थ निर्माण होतो काय?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कंबूक पत्तूर

क्रुमीचिकित्सा श्लोक २ 'कंबूकस्य रसं वापि पत्तूरस्याथवा' इत्यादि. या श्लोकावरील टीकेंत कंबूक म्हणजे शंखपुष्पा घ्यावयाची काय? कंबूक पदाचा स्वतंत्र अर्थ दिसत नाहीं. शंखपुष्पाला कंबूक कुसुमा' असें पद निघंटूंत आहे. कंबूक नांवाचें स्वतंत्र द्रव्य तर नाहींना?

या श्लोकांत पत्तूर पद आहे. याचा अर्थ टीकेंत 'थाली' असा सामान्य दिला आहे. निघंटूंत पत्तूरपदाचा अर्थ पतंग, जलपिंपळी, पाचोंदा व रक्तचंदन इतके पदार्थ दिले आहेत. थालीवाचक पत्तूरपद निघंटांत नाहीं. यांतील ग्राह्य काय?

कंपिल्लक

क्रिमिचिकित्सा श्लोक ९ 'त्रिफला त्रिवृता' इत्यादि या श्लोकांत कंपिल्लकं पदावर गुंद्रा रोचानिका असे पर्याय टीकेंत सुचविले आहेत. गुंद्रा, गन्डला, रोचनिका, वंशलोचन असें निवंटूंत आहे. यांतून काय घ्यावे?

बन्दी उठली

उत्तर प्रदेश सरकारनें वैद्यांनीं सल्फा ड्रग्ज, स्टेप्टोमायासिन वगैरे ॲलोपॅथिक औषधें वापरण्यास बन्दी केली होती. या निर्बंधाविरुद्ध उत्तर प्रदेशांतील आयुर्वेद महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनीं तीव्र चळवळ केली होती. तिचा परिणाम होऊन उत्तर प्रदेश सरकारनें हुकुम नं. १६०३ (ता. २१ एप्रिल १९५३ चा) काढून असे जाहीर केले आहे कीं, यू पी. इंडियन मेडिकल ॲक्ट १९३९ अन्वयें रजिस्टर्ड हकीमांना तो सर्व अधिकार प्राप्त आहे कीं जे पूर्वीच्या रजिस्टर्ड ॲलोपॅथिक डॉक्टर्सना मिळालेले आहेत.

सुंठ कशी करतात?

आल्याचे चांगले मोठे गड्डे प्रथम थोडे वाळवितात व पाण्यांत भिजत घालून मऊ झाल्यावर त्याच्यावरील साल काढून टाकतात. नंतर पुनः धुवून कडक उन्हांत सर्व बाजूंनीं परतून ४।५ दिवस वाळवितात. मलबारांत आले चुन्याच्या पाण्यांत टाकून मग त्याला गंधकाची धुरी देतात यामुळें सुंठ पांढरी होते व ४।६ वर्षें टिकते.

ओली हळद व सुकी हळद

हळदीचे ओले गड्डे कढईतील पाण्यांत मऊ होईपर्यंत उकळवितात. नंतर टोपलींत ठेऊन त्यांतील पाणी निथळूं देतात. तरटावर पसरून घासल्यानी त्याची मुळें निघून जातात. वाळण्यास ८।१० दिवसाचा काल लागतो.

मडक्यांत ओल्या हळदीचे गड्डे भरून मडक्याचें तोंड मातीनें अगर शेणमातीनें लिंपतात. व ते मडकें विस्तवावर २॥-३ तास ठेवून वाफेवर शिजवितात. व मग तावडतोब बाहेर काढून वाळवितात. वाळून ती १/५ राहते.

वर पाहिजे

वधु-वैद्याची मुलगी वय १६ वर्षे. वर्ण काळासावळा, ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. अव्यंग गृहकृत्यांत दक्ष, इंग्रजी ४ इयत्ता पास. वैद्य वर मिळाल्यास उत्तम.

म्हाताऱ्या संशोधक वैद्याची काठी
म्हणजे
आजचे-तरुण-वैद्य!

रससिंदूर

५ तो. ५॥ रु., १० तो. ९॥ रु.,
२० तो. १७॥ रु., १ पौं. ३२॥ रु.
अगाऊ मनीऑर्डर आल्यास पॅ. पो. माफ.
ही सवलत फक्त ४ महिने.

धंद्याचे दृष्टीनें वैद्यांचा फायदा असून म्हातारपणीं पुढील संशोधनकार्यास मला मदत केल्यासारखे होणार आहे. अनुपानपरत्वें विकारावर स्वतंत्र वापरा किंवा हिंगुळाऐवजी खल्वी रसायनांत वापरा.

भिषग्रत्न ग. कृ. पाटणकर
पो. किन्हई, जि. उत्तर सातारा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

(पान २ वरून)

...झालेल्या सर्व गांवठी वैद्यांना सुद्धां सभा... द्यावें असें ठरलें.

डॉ. लागूंच्यासाठीं खास सोय

१९३८ च्या कायद्यान्वयें रजिस्टर्ड नसलेल्या ...कांहीं व्यक्तींना पण सन्मान्य सभासद करून ...यावें अशीहि पुस्ती त्याला जोडण्यांत आली ...असें कळतें. डॉ. लागू आदि मंडळींना आतां ...राष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनांत लुडबूड करावयास ...नाहीं म्हणून त्यांचा अंतर्भाव करण्यासाठींच ...स्वतंत्र परिषद भरविण्याचा खटाटोप महा... ...शिष्यांनीं केला आहे असें दिसतें.

...या पुढील संमेलन केव्हां व कुठें भरावयाचें ...कांहींच खुलासा परिषदेंत झाला नाहीं. मागें ...येथें झालेल्या प्रविष्टर वैद्य संमेलनाचीच ही एक ...आवृत्ति निघाली म्हणावयाची.

निबंधवाचन

...या संमेलनांत कांहीं निबंध वाचण्यांत आले ही ...गोष्ट झाली पण निबंध वाचनासाठीं स्वतंत्र

अनुक्रमणिका

वैद्यसमाजाचा जन्मसिद्ध हक्क	७५९
पुणेंकर मंडळींचे संघटनाविघातक प्रयत्न	७६०
आचार्य वेणीमाधवशास्त्री यांचा परिचय	७६१
नाशिक जिल्हा वैद्य संमेलन, निफाड	७६३
तुरुंगांत काविळीची साथ	७६६
कै. डॉ. ह. व्यं सावनूर	७६७
या औषधी भवनाचा उत्कर्ष होणारच	७६८
महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन, लातूर	७६९
आचार्यांचे अभिनन्दन	७८६
वृंदमाधव चिकित्सेंतील शंकास्थळें	७८७

संघटना उभारण्याचा आततायीपणा करण्याचे कांहींच कारण नव्हते. त्यापेक्षां प्रान्तीय संमेलनांत भाग घेऊन तद्विद्यसंभाषा परिषदा भरविण्याचा उपक्रम त्यांना करता आला असतां व त्याबद्दल सर्व वैद्यसमाजानें या चालक मंडळींना धन्यवादच दिले असते. अद्यापहि वेळ गेलेली नाहीं या परिषदेची चालक मंडळी पुढील वर्षापासून संमेलनाबरोबरच शास्त्र चर्चा परिषदेचा उपक्रम करतील अशी आम्ही आशा व्यक्त करतो.

आयुर्वेद पत्रिकेचा १४५ वा अंक

आयुर्वेद नीळकंठराव पटवर्धन (शिरसी) विशेषांक

.... प्रसिद्ध होत आहे ....

आतापर्यंत आयुर्वेदपत्रिकेचे १४४ अंक प्रसिद्ध झाले आहेत. १ जुलैपासून पत्रिकेस ...वें वर्ष सुरू होत आहे. हा वर्षारंभ अंक शिरसी (कारवार) येथील नामवंत वृद्धवैद्य श्री. नीळकंठराव पटवर्धन यांच्या वैद्यकीय कार्यासंबंधीं प्रकाशित करण्याचें योजिलें आहे.

नव्या वर्षाची वर्गणी पाठवा

पत्रिकेच्या वाचकांना पत्रिकेसंबंधीं अधिक सांगण्याची आवश्यकता नाहीं. वर्गणीदारांनीं आपली वर्गणी लौकर पाठवून पत्रिकेस उपकृत करावें. व जाहिरातदारांनींहि आपल्या जाहिराती देऊन हातभार लावावा. ज्या ग्राहकांना पत्रिकेची ६ रुपये वर्गणी आर्थिक कारणास्तव पाठविणें शक्य होत नसेल त्यांनीं ४ रुपये वर्गणी पाठविली तरी तीं स्वीकारली जाईल.

--व्यवस्थापक, आयुर्वेद पत्रिका, नाशिक

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेलिया असाणा

तथाऽसनादिसारांबु दर्भाऽम्भो माक्षिकोदकम् ।

अष्टांगहृदय चिकित्सास्थानांत प्रमेहचिकित्सेंत प्रमेही-मधुमेही माणसानें असन (असाणा) आदि वनस्पतींच्या लांकडाचें पाणी प्यावें असें सुचविलें आहे. आयुर्वेदपत्रिकेंत तेलिया असाण्याच्या पाण्याचे अनुभव नुकतेच प्रसिद्ध झाले आहेत. त्यामुळें या तेलिया असाण्याला सर्वत्र मागणी वाढली आहे.

आयुर्वेद सेवा संघानें प्रयत्नपूर्वक हा तेलिया असाणा मिळविला असून त्याचें ताजें भरड चूर्ण करून पाठविण्याची व्यवस्था केली आहे.

रोज साधारणतः दोन तोळेप्रमाणें एक महिन्यासाठीं ६० तोळे चूर्ण पुरतें.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नाशिक

अनुभव

४० वर्षांवरील **अनुभव** आणि सर्व देशभर पसरलेल्या नऊ वैद्यकीय प्रयोग शाळांतील वैद्यक शास्त्रीय पंडितांचें कार्य हा जम्मींच्या कीर्तीचा पाया होय.

* जम्मीचा आंकडेवारी-दर्शक रिपोर्ट मागवा

जम्मींचें लिव्हरक्युअर दरवर्षी हजारों मुलांचें यकृताच्या विकृतिपासून संरक्षण करून त्यांना पुनः आरोग्य प्राप्त करून देतें.

आतां सोयीस्कर आकाराच्या वड्या मिळतात

जम्मी वेंकटरमणय्या अॅन्ड सन्स

"जम्मी बिल्डिंग", मयलापूर, मद्रास ४ मुंबई शाखा: 'पारेख मॅन्शन', सॅन्डहर्स्ट रोड (पश्चिम)

संपादक व प्रकाशकः—वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक
मुद्रकः— श्री. दामोदर महादेव चन्द्रात्रे, विज्ञान प्रेस, नाशिक
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ७ वें) नाशिक, ता. १ जुलै १९५३ (अंक १ ला

नाशिक जिल्हा वैद्य संमेलनाचे अध्यक्ष

वैद्यवर्य श्री. विनायक दामोदर एकतारे

अमळनेर (पूर्वखानदेश) येथील प्रताप आयुर्वेदिक रिसर्च इन्स्टिटयूटमधील चिकित्सक श्री. विनायक दामोदर एकतारे यांचा स्वल्प परिचय वाचकांना करून देतांना आम्हांस अत्यंत आनंद वाटतो. नासिक जिल्हा संमेलनाचे अध्यक्ष या नात्यानें त्यांनीं जें भाषण केलें त्याची वाहवा सर्वत्र झाली. एम्. बी. बी. एस्. डॉक्टर मंडळींना सुद्धां त्यांचें व्याख्यान आवडलें, असें आलेल्या पत्रावरून स्पष्टपणें दिसून आलें आहे. वै. वि. दा. एकतारे हे स्वतंत्र विचाराचे गृहस्थ आहेत. महाराष्ट्र प्रांतीय मंडळाच्या गेल्या कांहीं वर्षांतील चळवळींत त्यांनीं प्रत्यक्ष असा भाग घेतलेला दिसत नाहीं. व सभा संमेलनांत पुढाकार घेण्याचा त्यांचा स्वभावहि नाहीं. असें असतां त्यांनीं निफाड येथें अध्यक्ष-पदावरून मांडलेले विचार त्यांच्या आजवरील अभ्यासू वृत्तीचे व अनुभवाचे द्योतक आहेत, हें त्यांच्या पुढील संक्षिप्त जीवन-चरित्रावरून, लक्षांत येईल.



१५ वर्षें आयुर्वेदाचें अध्यापन व चिकित्सा

वैद्य विनायकराव हे १९१८ सालीं मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. १९२० सालीं त्यांनीं इंटरमिजिएट सायंटिफिक परीक्षा दिली व ते ग्रँट मेडिकल कॉलेजच्या दुसऱ्या वर्षांत दाखल झाले. १९२१ सालीं असहकारितेच्या चळवळींत त्यांनीं मेडिकल कॉलेज सोडलें. व १९२१ ते १९२३ पर्यंत अमळनेर येथील राष्ट्रीय महाविद्यालयाच्या वैद्यक विभागांत आयांग्ल वैद्यकांचें शिक्षण घेतलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९२३ ते १९२५ अखेर अहमदनगर येथील आयुर्वेद विद्यालय संस्थेंत त्यांनीं आयुर्वेदाचा अभ्यासक्रम पु[...] केला. दरम्यान १९२४ सालीं त्यांनीं पुढाकार घेऊन आयुर्वेद सेवा संघ या संस्थेची स्थापना केली. १९[...] सालीं आयुर्वेदतीर्थ पदवी परीक्षा झाल्यापासून ते १९३५ सालापर्यंत १० वर्षें त्यांनीं अहमदनगरच्या आयुर्वे[...] महाविद्यालयांत 'अध्यापक' व त्याच संस्थेच्या दवाखान्यावर 'चिकित्सक' म्हणून काम केलें. पनवेल ये[...] भरलेल्या त्रिदोषचर्चा परिषदेंत त्यांनीं भाग घेतला होता.

ग्रँट कॉलेजमधून एम्. बी, बी. एस्. च्या परीक्षा

त्यानंतर १९३५ सालीं ते पुनः ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें गेले. १९३७ सालीं पहिली एम्. बी. बी. एस्., १९३८ सालीं दुसरी एम्. बी. बी. एस्. परीक्षा ते उत्तीर्ण झाले. १९३९ व १९४० डिसेंबरमध्यें ते एम्. बी. बी. एस्. च्या शेवटच्या परीक्षेला बसले होते. १९३५ ते १९४० डिसेंबर हीं ५॥ वर्षें त्यांनीं ॲलोपॅथीचा मनःपूर्वक अभ्यास केला. १९४१ पासून १९४४ ऑगस्ट पर्यंत त्यांनीं पुनः नगरच्या आयुर्वेद महाविद्यालयांत प्राध्यापक व आयुर्वेदीय चिकित्सामंदिरांत चीफ मेडिकल ऑफिसर म्हणून काम केलें. [...] कालांत ते आयुर्वेद सेवासंघाचे व आयुर्वेदाश्रम फार्मसीचे सेक्रेटरी आणि आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेडच्या डायरेक्टर बोर्डाचे सभासदहि होते.

आयुर्वेद सेवा संघाच आजीव सदस्यत्वाची मुदत पूर्ण झाल्यानंतर ते परत आपल्या गांवीं अमळनेर येथें गेले, तेथें त्यांनीं खाजगी वैद्यक व्यवसाय केला. १९४९ पासून आजतागायत ते अमळनेरच्या प्रताप आयुर्वेदिक रिसर्च इन्स्टिट्यूटमध्यें मॅनेजर व श्रीमती सौभाग्यवती भागीरथीबाई प्रतापशेट आयुर्वेदीय दवाखान्यावर चिकित्सक वैद्य म्हणून काम पहात आहेत.

आयुर्वेदीय संशोधन कार्यासाठीं उपयुक्त पूर्वतयारी

मुंबई राज्यांत आज निरनिराळ्या आयुर्वेद संशोधनाच्या कार्याच्या योजना पुढें येत आहेत [...] सरकार आयुर्वेदाला प्रोत्साहन देत आहे असें म्हटलें जात आहे. अशा वेळीं वैद्यराज एकतोर यांच्यासारख्या अभ्यासी उभयशास्त्रकोविदाचा उपयोग संशोधन कार्यांत करून घेण्याची बुद्धि सरकारी संशोधन समित्यांना होवो एवढेंच या प्रसंगीं आम्हीं सुचवूं इच्छितो.

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ

— कार्यालयाचे नवे पत्ते —

वैद्यराज दत्तात्रेयशास्त्री जळूकर
अध्यक्ष– म. प्रां. वैद्य मंडळ
मु. पो. नशिराबाद (पू. खा.)

आयुर्वेदाचार्य ब्रह्मदत्त शर्मा
मंत्री–म. प्रां. वैद्यमंडळ कार्यालय
C/o आयुर्वेद सेवा मंडळ, भुसावळ (पू. खा.)

वै. बिंदुमाधवशास्त्री पंडित
मंत्री–स्थिर कार्यालय, म. प्रां. वैद्य मंडळ
C/o आयुर्वेद सेवा संघ, नाशिक सिटी

वार्षिक १ रु. वर्गणी पाठवून
म. प्रां. वैद्य मंडळाचे सभासद व्हा !
व वैद्यसंघटना बळवान् करा !!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नागदमनी

लेखकः- भिषग्वर रामभाऊ रुद्रभटे
फलटण (जि. सातारा)

रविवार, तारीख १५ फेब्रुवारी १९५३ च्या, केसरीच्या अंकांत, पान ८ वर " केशर आणि केशर " या विषयावर, लेखक डॉ. म. वि. आपटे यांचा विद्वत्पूर्ण व माहितीपूर्ण लेख आलेला आहे. तो मीं २ ते ३ वेळां वाचला. तो वाचून आनंद व समाधानहि झालें; परंतु लेखकानें आपल्या विचार-संकलित लेखाच्या शेवटीं " नागदमनी आणि नागकमळ " या महत्वपूर्ण व वनस्पतींचें जें वर्णन केलें आहे, तें, आयुर्वेदीय निघंटुशास्त्रदृष्ट्या बरोबर नाहीं, असें माझें प्रामाणिक मत आहे; आणि म्हणून सर्व विचारी लोकांच्या हितार्थ, व वनस्पतिसंशोधकांसाठीं, आयुर्वेदीय निघंटांतून त्याचीं मुख्य मुख्य संस्कृत नांवें एकत्र करून, त्यांचे थोडक्यांत मराठी अर्थ देऊन खालील लेख तयार केला आहे.

नागदमनीचीं नांवें

मराठी नांवः— नागदमन किंवा नागदवण

हिंदी नांवः— नागदौना

बंगाली नांवः— नागदना

संस्कृत नांवें (आयुर्वेदीय मुख्य निघंटु ग्रंथांतील)

१ नागपत्रा	२ नागदमनी
३ नागपुष्पी	४ नागदुग्धी
५ वनकुमारी	६ वृत्तपुष्पा
७ रक्तपुष्पी	८ वृत्ता
९ विफला	१० श्रीकंदा
११ विषनाशिनी	१२ विषारी
१३ विषमर्दनी	१४ विषापहा
१५ दुःसहा	१६ मलघ्नी
१७ मदघ्नी	१८ दुर्धर्षा
१९ महायोगेश्वरी	

यांतील पहिलीं १० नांवें, या वनस्पतींच्या वर्णनात्मक असून, पुढील ९ नांवें, त्या वनस्पतीच्या होणाऱ्या कार्यांचीं वाचक अशीं आहेत.

संस्कृत नांवांचें विवरण

१ नागपत्राः- यांच्या पानांवर, मध्यभागीं, खालपासून वरपर्यंत, अजगर जातीच्या सर्पांच्या अंगावर, ज्याप्रमाणें लहान मोठे, आडवे, पांढरे पट्टे व टिपके असतात, त्याप्रमाणें, या पानांवर असतात. हीं पानें लहान असतांना नागाच्या फणीच्या आकृतीचीं हुबेहुब दिसतात. अजगर ही सापाची जात, जवळजवळ रंगानें, रूपानें, व आकारानें जशी दिसते, त्याच प्रमाणें हीं पानें दिसतात.

२ नागदमनीः— याच्या ताज्या पानांच्या दर्शनानें, अगर रसांच्या वासानें, नागांच्या कोणत्याहि प्रकारच्या हालचालीचें दमन होतें.

३ नागपुष्पीः— नागांच्या डोळयांच्या आकारासारखीं, व रंगासारखीं, यास पुष्पें येतात.

४ नागदुग्धीः— याचीं पानें कुटून रस काढून तो गाळून पांढऱ्या स्वच्छ बाटलींत ठेविला असतां, त्याचा रंग गोमूत्रासारखा दिसतो. कांहीं सर्पांच्या विषांची गरळ अशाच रंगाची असते. याच " नागदुग्धी " म्हणतात तें खरें, पण वस्तुतः हें दूध नाहीं. नागदमनीस दूध (चीक) नसतो हि.

५ वनकुमारीः— याचीं झाडें, याच्या पानावरून, कुमारी ऊर्फ कोरफडीसारखीं दिसतात हें खरें, पण त्यांत मुख्यतः फरक असा आहे कीं, कोरफडीच्या पानांत जसा पांढरा बुळबुळीत मगज असतो, व जसें कोरफडीच्या पानांच्या दोन्ही बाजूस, व टोंकास मृदु कांटे असतात, तसे यास नसतात. कोरफडीच्या पानांसारखीं याचीं पानें दळदार व मोठीं नसतात.

६ वृत्तपुष्पाः— नागदमनीच्या झाडाच्या मध्यभागांतून, १ ते १॥ फूट उंचीची १ शलाका निघते व त्याच्या अग्रभागीं गोल पुष्पांचे घोस येतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७ रक्तपुष्पी :- या झाडाच्या मध्य-भागांतून फुटणाऱ्या दांड्याच्यां अग्रभागीं, मसूरीच्या डाळीएवढीं व त्याच रंगाचीं फुलें येतात.

८ वृत्ता :- नागदवणीचीं झाडें वाढलीं असतां तीं सर्व बाजूंनीं घेरेदार दिसतात.

९ विफला:- याचीं फुलें सुकल्यावर, त्यांत बारीक बारीक बीज उत्पन्न होतें, पण यांची लागवड केली असतां, त्यांतून याचीं नवीन रोपें तयार होतच नाहींत.

१० श्रीकंदा :- याचीं पानें, याच्या कंदास, भूमींतून एकवटीनें फुटतात, व तीं क्रमानें वाढतात. याचे कंद गोल, लंबट, पांढरे, लहान उपमुळ्यांनीं युक्त असे असतात.

गुण दर्शविणारीं व कार्य-वाचक नांवें

११ व १२ विषनाशिनी व विषारी :- स्थावर व जंगम विषें नाहींशीं करणारीं.

१३ विषमर्दनी :- हिचा रस अगर मूळ, पाण्यांत उगाळून, विषारी जागेवर याचें मर्दन केलें असतां, त्या स्थानाचें विषारीकार्य जलद नाहींसें होतें व चांगला आराम मिळतो.

१४ विषापहा :- याचे सुके अगर आले कंद, पाण्यांत उगाळून, अगर घांसून, चूर्ण करून, फडक्यांत घालून, विषबाधा झालेल्या मानवास, अगर दुसऱ्या प्राण्यांस हुंगविलें असतां, विषार जलदीनें उतरण्यास उत्तम मदत होते.

१५ दुःसहा :- वृद्धांस, लहान बालकांस, गर्भिणीस, अशक्तांस, व सुकुमार लोकांस, ही दिली असतां, ती सहन होत नाहीं.

१६ मलघ्नी:- यांच्या पानांच्या सेवनानें वमन, व विरेचनद्वारां शरीरांतील मल नाहींसा होतो.

१७ मदघ्नी :- दारू पिणाऱ्या लोकांस, धुन्दी अगर बेहोषपणा आला असल्यास, याच्या पानांच्या रसांच्या सेवनानें, वमनद्वारां, त्यांची निशा जलद उतरते.

१८ दुर्धर्षा :- ही [illegible] त्याचें देण्याचें प्रमाण, जरा कमी-जास्ती झालें तर, वमन विरेचन होऊन, मनुष्य फार हैराण होतो, म्हणून जपून वापरावी.

१९ महायोगेश्वरी :- नागजातींचे विषार नाहींसें करणाऱ्या कामीं, जे श्रेष्ठ योग आहेत, त्या सर्वांत, या वनस्पतीचा योग सर्वश्रेष्ठ असून, तो मोठा प्रभावी आहे.

नागदमनी बागेंतून लावतात

नागदमन ही वनस्पति, श्रीमंत व हौशी लोक आपल्या बागांतून, जमिनींत, अगर कुंड्यांतून, लावतात. कोरफडीप्रमाणें यास पांढऱ्या रंगाच्या जाड मुळ्या असून, त्यांस उपमुळें फुटलेलीं [illegible]तात, व ही बारीक असतात. कोणी कोणी यांस कंदहि म्हणतात, या कंदापासूनच, या वनस्पतींचीं पानें, भूमींतून फुटतात, कंदास पान फुटून, तें सुमारें १॥ फूट वर आलें असतां, त्या पानांचा आकार नागाच्या फण्यासारखा दिसतो. ही वनस्पति सर्व बाजूंनीं, सुमारें १ हात उंच वाढली असतां घेरेदार दिसते. या वनस्पतीची रचना, कुमारी अगर कोरफोड यासारखी असते. याचीं पानें लांबून कोरफडीसारखीं दिसतात. नाग-दमनीचीं पानें, कोरफडीसारखीं दलदार, मोठीं, जाड, गाभा असलेलीं नसतात. याच्या पानांस कोरफडी-प्रमाणें, कडांच्या दोन्ही बाजूस व टोकांस मृदु कांटे नसतात. याचीं पानें पूर्ण वाढ झाल्यावर, सुमारें १ ते १॥ हात लांब, सर्पाकार असतात.

नागदमन अजगरासारखीं दिसते

हीं पानें मध्यभागीं ३ अंगुलें रुंद, व टोकास व तळास अरुंद असतात. पानांचा रंग हिरवट असून, त्यावर थोडी काळसर झांक असते. पानांच्या मध्य-भागीं व खालपासून वरपर्यंत, पांढरसर पट्टे असतात ते अजगर नामक सापाच्या अंगावर असतात त्याप्रमाणें, लांबून हीं झाडें पाहणारांना असें वाटतें कीं, सर्पांचा समुदाय एके ठिकाणीं बसलेला आहे कीं काय! हीं झाडें सर्व ऋतूंमध्यें जिवंत व ताजीतवानी अस-[illegible] या झाडाच्या मध्यभागीं तळांतून एक हातभर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…ग, असा दांडा निघतो, व त्याच्या अग्रभागीं …च्या डाळीप्रमाणें, त्याच रंगाचे फुलांचे गुच्छ …त, व क्वचित् प्रसंगीं तीं फुलें, पिवळट, पांढरीहि … दिसतात.

नागदमनीला फळें येत नाहींत

…यास फळें येत नाहींत. फुलें सुकल्यावर त्यांत …दीं बारीक बीज असतें, पण त्यापासून याची …उत्पत्ति होत नाहीं. याचीं पानें कुटून रस काढ…स, तो थोडा निघतो, व तो पिळून, गाळून, …च्या बाटलींत भरून ठेवल्यास, त्याचा रंग गो…प्रमाणें होतो, व दिसतो. जहरी सापाची गरळ, …प्रकारच्या रंगाची दिसते, त्याप्रकारचा याचा रस …तो. यास जरी "नागदुग्धी" असें जरी नांव …हे तरी, हें वस्तुतः दूध (चीक) नसून रस आहे, … यास दुग्ध (चीक) कधींहि नसतें. नागांच्या …ंची जशी रचना असते, व जसें तेज व रंग …तो, त्याचप्रकारचीं याचीं पुष्पें असतात.

नागदमनीचा प्रत्यक्ष अनुभव

गेलें सालीं आम्हीं पुणें येथील आयुर्वेद …विद्यालयांत पारंगत कोर्ससाठीं, अभ्यास करीत …लेले विद्वान्, तरुण, कार्यदक्ष, व कर्तबगार …राजमंडळी अनुक्रमें कवडे, नानल, दर्यापूरकर, … मित्रे इत्यादि मंडळीस त्यांच्याच प्रेमळ …ग्रहामुळें कांहीं प्रमुख व प्रभावी वनस्पती …विण्यासाठीं एंप्रेस् गार्डनमधें गेलो होतो. …वेळीं त्यांना "नागदमन" ही वनस्पति ताजी, … शास्त्रोक्त दाखविली. सायंकाळीं ५॥ चा सुमार …ता. त्याच दिवशीं बागेच्या समोर असलेल्या रेस …उंडमधील, सर्व रेसिसचे कार्यक्रम समाप्त झालेले …ते. या सर्व तरुण वैद्यराज मंडळींनीं रेस पाहणाऱ्या मंडळींमधून दोन गारुडी नागासह बोलावून आणिले … आम्ही त्या नागवाले गारुड्याची नीट समजूत …ढून सर्वांसमक्ष प्रयोग करण्याचें ठरविलें. …त्या बागेच्या मध्यभागीं, नागांवर, सुमारें अर्धा तास प्रयोग केला, व तो दोन प्रकारें केला, तो असा:—

पानें दाखवितांच फणा कमी केली

नागदमनीचीं सुमारें १॥ वीत लांब असलेलीं २ पानें तोडलीं. दोघां जवळ तीं देऊन, तीं शर्टच्या खालीं लपविण्यास सांगितलें. एका गारुड्यास १ नाग टोपलीच्या बाहेर काढण्यास सांगितलें. त्यानें तो काढून त्यास डवचून फणा काढविली. फणा काढल्यावर तो नाग त्या गारुड्यानें जमिनीवर सोडल्यावर, त्याचें समोर त्यास तीं पानें दिसतील, या बेतानें सुमारें ५ ते ७ हातावर त्यांनीं आपल्या हातांत स्पष्टपणें धरलीं. तोंच त्या नागानें मार्गें चाल करून, फणा कमी कमी करीत करीत तो त्या गारुड्या जवळ असलेल्या टोपलींत, जाण्याची (आपल्या स्वस्थानीं) जाण्याची फारच त्वरेनें गडबड करूं लागला.

नाग निपचित झाला

परंतु आमच्या सांगण्यामुळें, त्या गारुड्यानें तो नाग मोकळा ठेवला, टोपलींत जाऊं दिला नाहीं. पुन्हां त्या नागास तीं दोन पानें जवळ नेऊन दाखवितांक्षणींच, त्याच्या लाडक्या धन्यानें आमच्या बक्षिसाच्या आमिषाकरितां, नागानें पुनरपि फणा काढून ती आम्हांस दाखवावी म्हणून, १० ते १५ मिनिटें पुष्कळच प्रयत्न केला, पण त्या नागराजानें फणा तर कांहीं केल्या काढली नाहींच, पण वेटोळें घालून कांहींहि हालचाल न करितां सुप्त स्थितींतच, तो पडून राहिला. नंतर सुमारें अर्ध्या तासानें तो सावध झाला.

प्रयोग दुसरा

हें कार्य होत असतांना, शंका अशी उत्पन्न झाली कीं, नागदमन पानांचा आकार, अजगर नामक सर्पाप्रमाणें असल्यामुळें, तीं त्या नागराजास दाखविलीं असतां, कदाचित् हा आपला प्रतिस्पर्धी असावा, अशी नागराजाची खास कल्पना होऊन, त्यानें आपली सर्व क्रिया बंद ठेवून, तो भीतीनें सुंद होऊन, पडून राहिलेला असावा.

रसाचाहि तोच परिणाम

दुसरे दिवशीं पुन्हां, त्याच नागदमनीचीं पानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घेऊन, तीं दगडानें बारीक ठेचून, त्याचा मूळचा सर्व आकार बदलून, त्याचे दोन सारखे विभाग करून, ते हातांत ठेवून, दुसऱ्या नागराजानें फणा काढिल्यावर, सुमारें ३ ते ४ हातांवर बसून, त्याच्या समोर, पूर्वी दगडांनीं ठेचून बारीक केलेल्या, नाग दमनी पानांचे केलेले दोन विभाग दाखविले. ते दाखवितां क्षणींच, या नागराजानेंसुद्धां पूर्ववत् नागराजाप्रमाणेंच सर्व कांहीं केलें. सुमारें अर्ध्या तासानें, त्या उभय गारुड्यांस उचित पारितोषिक देऊन, त्या दोन जनावरांस, रात्रीं कसें जपावें, याच्या काळजीपूर्वक सर्व सूचना देऊन पाठविलें. याप्रमाणें या वनस्पतींचे हे दोन्ही प्रयोग यशस्वी झाल्यावर, आम्ही सर्व मंडळी, मोठ्या उत्साहानें घरीं परत आलो. अशा या वनस्पतींच्या शास्त्रोक्त वर्णनांवरून पटलेल्या गुणधर्मांवरून, व प्रत्यक्ष करून पाहिलेल्या स्वानुभवावरून, आमच्या तें शास्त्रोक्त नागदमनी वनस्पति, निश्चितपणें हीच ठरते.

तृणज्योतिकल्प

रात्रौ प्रज्वलते नित्यं तृणेन सदृशं भवेत् । तस्य मूलं समादाय क्षीरमध्ये निवेशयेत् ॥१॥ तत्क्षणा-जायते रक्तं तत्तु क्षीरं पिबेद्बुधः । सप्तरात्रप्रयोगेण वलिपलितवर्जितः ॥२॥ क्षीरेण नियताहारो लवणाम्लंच वर्जयेत् । द्विरष्टवर्षाकारोऽपी जीवेद्वर्षसहस्रकम् ॥३॥ तस्य मूलन्तु संगृह्य रसगंधकतत्समम् । मातुलुंगरसे नैव एकीकृत्वा तु मर्दयेत् ॥४॥ लेपयेत् शुल्बपत्राणि त्रिपुटं हेमशोभनम् । महिषीनवनीतेन तस्य मूलानि लेपयेत् । कपिलाज्यप्रदीपं च नृकपाले शिवालये । कज्जलं धारयेत् प्राज्ञः कृष्णाष्टमी चतुर्दशी ॥ पूजां कृत्वा विधानेन शुचिर्भूत्वा हि साधकः । तेनैवांजितनेत्रस्तु अदृश्यो जायते पुमान् ॥६॥

— 'औषधीकल्पलता'

हिंदी भाषेंत विवरण

यह वनस्पति रातमें प्रज्वलित होती है। अर्थात् चमकती है। और घास जैसी होती है इसीसे इसका नाम तृणज्योति पड़ा है। इसकी जड दूधमें रखनेसे दूध का रंग लाल हो जाता है। यह दूध ७ दिन पीनेसे झुरिया और सफेत बाल होना दूर हो जाता है। यह दवा सेवन करतेसमय दूधके साथ नियमित भोजन करना और खटाखारा नहीं खाना चाहिये। ऐसे करनेसे मनुष्य १६ वर्षका पठ्ठा हो जाता और १००० वर्ष जीता है। इसकी जड, पारा और गंधक समभाग लेकर बिजोरेके रसमें पीसना और तांबेके पत्रोंपर लेप करके तीन पुट देना तो तांबा सोने जैसा हो जायगा। इसकी जडपर म्हैसके मक्खनका लेप करना और कपिला गायोंके घीमें उसको रखकर शिवालयमें मनुष्यकी खोपडीमें कृष्णपक्ष अष्टमी तिथि या चतुर्दशीके दिन कज्जल बनाना (पाडना). फिर शुद्ध होकर यथाविधि पूजनकर मनुष्य उस कज्जलको आंखमे आंजे तो अदृश्य हो जायगा।

महाज्योतिष्मति कल्प

यांत दुसरा एक महाज्योतिष्मतिकल्प आहे पण त्याची जरुरी तूर्त येथें नाहीं. ही वनस्पती मला माहीत आहे. याच्या मोठ्या झाळी असतात. फुलांचे घोस व फळांचे घोस कांगोणीप्रमाणें येतात. फळें पिकल्यावर अगर फुटल्यावर अंधारांत रात्रीं रानांत झाडांवर चांदण्याप्रमाणें चमकतात हें खरें. या झाळी भाज्यांच्या लेणीजवळ, लोणावळ्याच्या डोंगरांत, वणी जवळ सप्तशृंगीच्या डोंगरांत पहा-वयास सांपडतात असा माझा स्वानुभव आहे.

—वैद्य रा. म. रुद्रभटे

बाबा कालीकंबलीवाला

निखिल भारतीय आयुर्वेद विश्वविद्यालय

इंदूर येथें भरलेल्या नि. भा. आयुर्वेद महा-संमेलनानें असा ठराव पास केला आहे कीं, ऋषिकेश येथील बाबा काली कंबलीवाला आयुर्वेद विद्यालयाला नि. भा. आयुर्वेद विद्यापीठानें आपलें विद्यालय असें जाहीर करावें. हें कार्य पूर्ण करण्यासाठीं एक समिति नेमली होती. तिनें आपला अहवाल स्थायीसमितीस सादर केला असून स्थायीसमितीनें त्याबाबत विस्तृत [illegible]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वैदिक चिकित्सा प्रकरण १३ वें—

श्वास [दमा] रोगनिदान : :

लेखक:- वृद्ध वैद्य
(मध्य प्रदेश)

अष्टांगहृदयांत व माधवनिदानांत, श्वास व उचकी या व्याधीसंबंधीं खालील वचनें आढळतात.

सर्वेऽपि रोगाः नाशाय न त्वेवं शीघ्रकारिणः।
हिध्माश्वासौ यथा तौ हि मृत्युकाले कृतालयौ॥
अ. हृ. नि. ४-३१

कामं प्राणहरा रोगा बहवो न तु ते तथा।
यथा श्वासश्च हिक्का च हरतः प्राणमाशु वै॥
मा. नि. श्वा. २७

या दोन अवतरणांवरून श्वास व उचकी हे विकार प्राणनाशक असून तो प्राणनाश यांच्याकडून फार लवकर होतो असें स्पष्ट दिसतें. कांहीं प्रकारचे श्वास, उदाहरणार्थ ऊर्ध्वश्वास, महाश्वास, हे झाले म्हणजे अंतिम काल अगदींच समीप (तास दोन तासांत) आला असें निश्चित निदान होतें. आयुर्वेद शास्त्रांत निदानांत, या श्वासांचें वर्णन हें चिकित्सेच्या दृष्टीनें केलें नसून केवळ अंतिम समय जवळ आल्याचें निदर्शक म्हणूनच केलें आहे. कारण त्यांच्यावर औषधीहि व कोणतीहि चिकित्सा सफल झाल्याचा अनुभवहि नाहीं व ऐकण्यांतहि पण नाहीं.

दमा दमहीके साथ जाता है।

इतर प्रकारचे श्वास मात्र रुग्णास पुष्कळ दिवस पर्यंत पीडा देतात, आणि अशा रुग्णास मृत्यूहि जवळजवळ वार्धक्यावस्थेंतच येतो. "दमा दमहीके साथ जाता है," अशा प्रकारची उत्तर-हिंदुस्थानांत म्हण प्रचलित असण्याचें कारणहि हेंच आहे. हा व्याधि होण्यास, वरवर अत्यन्त साधारण अशीहि कारणें दिसून येतात; परन्तु तीं इतकीं नक्की असतात कीं, त्यामुळें झालेला व्याधि कधींहि बरा होत नाहीं.

दोन्ही व्याधीस कारणीभूत होणारे स्वाभाविक आहार व विहार

आहारांत घेतलेले रूक्ष पण कफास उत्पन्न करणारे, मलाचा अवरोध करणारे, पचनास कठीण आणि दाह उत्पन्न करणारे असे पदार्थ या व्याधीस कारणीभूत होतात. उदाहरणार्थ पोहयांसारखे गुरु पदार्थ बेसनाची भजी, रावणभातासारखे तिखट पदार्थ, आणि दुधाचे मलाई, खीर, रबडी असे अभिष्यन्दी पदार्थ पुष्कळ सेवन केल्यामुळें या दोन्ही व्याधी होतात. त्याचप्रमाणें सकाळचें ठेवलेलें अन्न संध्याकाळीं खाण्याची संवय टाकल्यामुळें, उन्हांतून येऊन बर्फ मिसळलेलें थंड शरबत, किंवा गार पाण्यानें स्नान करण्याची संवय (रेल्वेच्या ॲक्टिव्ह सर्व्हिसमध्यें असणाऱ्या लोकांना जशी जडते त्याप्रमाणें) पडल्यानेंहि श्वास विकार जडतो. तात्कालिक श्वास व खोकल्यास कारण धूर, धूळ, तीव्र ऊन किंवा सोसाट्याचा वारा हींहि होतात.

रूक्ष आहार व व्यायाम

कांहीं लोकांना खाण्यास आहार भरपूर व स्निग्ध मिळत नसतांना व्यायाम मात्र पुष्कळ करण्याची हौस असते. अशांना हा श्वास विकार फार लवकर जडतो. वात-मूत्र-पुरीषादींचे वेग रोकल्यामुळेंहि तात्कालिक श्वास व खोकला होतो. त्याचप्रमाणें लंघन केल्यानें अर्थात् थोड्या प्रमाणांत अन्न कांहीं कारणामुळें घेण्याचा प्रसंग आल्यानेंहि हे विकार जडतात. कधीं-कधीं मार्गक्रमण अधिक केल्यामुळें आणि डोक्यावर वजन लादून पुष्कळ दूर चालण्यामुळेंहि श्वास, उचकी आणि कास हे तीनहि विकार होण्याचा संभव असतो.

श्वासरोग्यानें जितेंद्रिय रहावें

सबब, वर दिलेलीं साहसें, वेगावरोध आणि विशिष्ट अन्नसेवन कधींहि करूं नये. हे नियम न पाळल्यास सारा जन्म या दुष्ट रोगांनीं पीडित राहण्याचा प्रसंग येतो. म्हणून फार काळजी घ्यावी. आणि जितेंद्रियतेची संवय पाडावी. थोडें बहुत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुपथ्याचें सेवन करण्यापासून काय वाईट परिणाम होणार आहेत असे जिव्हाळयाचे मित्र व आपल्या घरांतील जिवलग नातेवाईक देखील म्हणत असतात. परंतु तो उपदेश नसून शरिरांत अस्वास्थ्य उत्पन्न करण्याचें साधन ठरणार असें पूर्णपणें लक्षांत ठेवावें. पथ्यकर आहार हा सदैव मानवी प्राण्यास हितावह आहे, हें ध्यानांत ठेवून वागणें हेंच श्रेयकर होय.

संसारांतील कार्यशक्ति नष्ट करणारा रोग

उचकी ही जशी फार थोड्या अवधींत प्राण-नाश करण्यास कारणीभूत होते, तसें श्वासाचें नाहीं. या श्वासापैकीं पुढें नवीन वर्णन केलेले तमक, क्षुद्र आणि प्रतमक श्वासांनीं पीडित असलेले रोगी पांच पंचवीस वर्षें जगतात. त्यामुळें हा तात्कालिक प्राण-घातक रोग नसून पुष्कळ दिवस रुग्णास पीडा देणारा व त्याची संसारांतील कार्यशक्ति नष्ट करणारा असा हा कष्टदायक व्याधि आहे. यानें पीडित मनुष्य कोणतेंहि नियमित कार्य करण्यास उपयोगी ठरत नाहीं. त्यामुळें कित्येकांना आपले व्यवसाय बाजूस ठेवून, जीवन कष्टमय व परावलंबी अवस्थेंत कंठावें लागतें.

कमी आहारानें सुख होतें

अशा स्थितींत कित्येक वेळ रुग्णास आपले जीवन नकोसें वाटतें. क्षयी मनुष्यास ज्याप्रमाणें मी जगेनच अशा विश्वास असतो, तसा या श्वासपीडित मनुष्यास राहत नाहीं. त्याला निद्रा पडून राहून घेतां येत नाहीं. समोर एक उंच अशा लोड ठेवून त्यावर डोकें ठेवून बसलेल्या अवस्थेंतच जी निद्रा घेतां येते तिच्यांतच त्यास समाधान मानावें लागतें. आहार कमी प्रमाणांत केला असतांना त्याला सुख होतें.

अन्नापासून कफनिर्मिति होते

या व्याधीसंबंधीं असा अनुभव आहे कीं, प्रतिदिन घेतलेल्या अन्नापासून कफनिर्मिति कमी झाली तर रुग्ण साधारणतः स्वस्थ राहातो. आणि म्हणूनच दूध, भात इत्यादि कफकर पदार्थ त्यानें वर्ज्य ठेवावयाचे अ तात. आणि अग्नि तीव्र राहावा म्हणून आसव व क्षारासारखे पदार्थ विशेष घ्यावे लागतात. उदर रोगामध्यें यकृतोदराची चिकित्सा करतांना जे जे उपाय व औषधें आपण उपयोगांत आणतो, तींच या रुग्णास देत राहिले असतांना त्याला रोगाचा त्रास होत नाहीं. म्हणून श्वास-चिकित्सेंत विशेषतः लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं, यकृत् आणि श्वास या दोन्हींची चिकित्सा एक-समयावच्छेदेंकरून चालू ठेविली पाहिजे. तसें केलें असतांना व हा व्याधी नवीन असतांना निश्चित यशःप्राप्ति होत असते. जुनाट रोगांत ती चिकित्सा फार दिवस करणें आवश्यक असते.

श्वासाचे प्रकार

हा श्वासव्याधि ांच प्रकारचा आहे:—

(१) महाश्वास

(२) ऊर्ध्वश्वास

(३) छिन्नश्वास

(४) तमकश्वास—य ाचाच एक भेद प्रतमक आहे.

(५) क्षुद्रश्वास

सांडू
टोमॅटो कम्पाउन्ड
व्हिटॅमिनयुक्त टॉनिक
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर, मुंबई.

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स—
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते—मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदांत अनेक व्याधींना महाव्याधी अशा …दिलेल्या आहेत. तसाच श्वास हाहि एक महा… आहे. यापैकीं महा आणि ऊर्ध्व हे असाध्य … होत. छिन्नहि जवळजवळ असाध्यच आहे. … तीन तमक, प्रतमक आणि क्षुद्र हे मात्र साध्य … शकतात.

श्वासाचें पूर्वरूप

…श्वास होणार असला म्हणजे प्रथम हृदयाच्या …तालच्या भागांत अर्थात् फुफ्फुसावरणांत पीडा … होते, आणि एक विलक्षण प्रकारचें दुःख त्या … वाटतें. पोटांत गडगड आवाज होतो आणि … फुगते. तोंड विरस होतें. या तीन लक्षणांमुळेंच … आणि पचनक्रिया यांचा परस्पर असलेला संबंध … वर्णन केल्याप्रमाणें असतो हा एकसारखा … लागला म्हणजे चाळे (शंख) दुखतात. हे … जास्त दिवस टिकले म्हणजे पुढें श्वासाची … दिसूं लागतात.

श्वासाची संप्राप्ति

शरीरांत स्वाभाविक अन्नपचनक्रिया चालू … क्रमशः आमाशयांत कफ, पक्वामाशयमध्यांत … आणि पक्वाशयांत वात हीं दोषसंज्ञक द्रव्यें … होतात. हें मागें वर्णन केलेलेंच आहे. प्रारंभीं … होणारा कफ हा जर शरीरास लागलेल्या थंडी… … भोजनांत घेतलेल्या थंड पदार्थांमुळें जास्त … उत्पन्न झाला, तर तो पुढें तसाच शरीरांत … होऊन शरीरातील तेराहि प्रकारच्या सूक्ष्म स्रोतसांमध्यें भरून राहतो. आणि त्यामुळें स्रोतसांचे मार्ग म्हणजे सूक्ष्म नळया या कफानें अवरुद्ध होतात अर्थातच, आवश्यक असणारा वाताचा संचार या स्रोतसांतून होत असतांना त्याला आडकाठी उत्पन्न होते.

…शास्त्रोक्त पद्धतीनें व अत्यंत परिश्रमानें तयार
केलेलीं महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसंमेलनानें
व ऑल इंडिया आयुर्वेद कॉंग्रेस
व प्रदर्शनाकडून प्रशंसित
…पुटी अभ्रक इ. भस्में व इतर औषधें
प्राइस लिस्ट मागवा.
श्री अमरेश्वर आरोग्यमंदिर
…राशी चोळ, पो. इचलकरंजी S.M.C.

घट्ट कफामुळें वातकार्यांत बाधा

कफ हें द्रव्य वात आणि पित्तापेक्षां अधिक घट्ट असल्यामुळें ती बाधा अधिक प्रमाणांत होते. अशा रीतीनें वाताच्या मूळ गतीस बाधा आली म्हणजे तो वायु वेडावांकडा शरीरांत संचार करूं लागतो. एखाद्या रबराच्या नळींत मध्येंच कांहीं वस्तु अडकून राहिली तर वरून दाबलेला वायु हा उलट परतून ज्याप्रमाणें अधिक जोराचा आघात दाबलेल्या भागावर उत्पन्न करतो, त्याचप्रमाणें हा वायूहि शरीरांतील असंख्य स्रोतसांतून संचार करतांना अवरुद्ध गतीनें फुफ्फुसाकडे आला म्हणजे श्वासाला उत्पन्न करतो. याप्रमाणें श्वास हा व्याधि कफामुळें अवरुद्ध होणाऱ्या वाताच्यां गतीचा परिणाम होय हें ठरतें. अर्थातच श्वासाची चिकित्सा करतांना ज्याप्रमाणें स्रोतसांत आडकाठी उत्पन्न करणारें कफद्रव्य पातळ करून स्रोतसांच्या बाहेर काढणें आवश्यक, त्याचप्रमाणें या वायूच्या अवरुद्ध गतीलाहि पुन्हां मार्गावर आणणें आवश्यक ठरतें.

स्रोतसांना विस्फारित करणारीं विषें

आधुनिक चिकित्सा पद्धतींत उपयोगांत आणलीं जाणारीं द्रव्यें हीं या स्रोतसांना तत्काळ विस्फारित करण्याचें काम करतात. तसें झालें म्हणजे अवरुद्ध वायूला संचार करण्यास जागा मिळून श्वास कमी होतो. परंतु ही विस्फारणक्रिया, त्या द्रव्याचा परिणाम जोपर्यंत कायम राहील तोंपर्यंतच असते. आणि तसलीं द्रव्यें हीं विषाक्त द्रव्यें असल्यामुळें जितक्या लवकर तीं आपला परिणाम करतात तितक्याच लवकर त्यांची कार्यशक्ति पण नष्ट होते. अर्थातच ती टिकाऊ कार्य करणारीं नसतात. आणि म्हणून त्याचा प्रयोग पुनः पुन्हां आणि लवकर लवकर करावा लागतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यामुळें शरीर त्या विषाक्त द्रव्यांनीं व्याप्त होतें. आणि स्वाभाविकपणें कार्य करण्यास असमर्थ होतें. असें झालें म्हणजे या द्रव्यांचाहि परिणाम शरीरावर कमी टिकाऊ असा दिसूं लागतो. आणि शेवटीं शरीराची स्वाभाविक शक्ति त्या द्रव्यामुळें क्षीण होऊन मनुष्य प्राणास मुकतो. माझ्या मामांच्या दम्यावर मार्फिन(अफू) मुळें झालेल्या दुष्परिणामाचें जें विवरण प्रत्यक्षानुभवास धरून दुसऱ्या लेखांत केलेलें आहे, तेंच तसल्या इतर द्रव्यासहि लागू होतें. आणि एकदां त्याविषयीं औषधांचा प्रयोग करून रोग रोखून ठेवण्याची प्रवृत्ति झाली म्हणजे इतर सौम्य परंतु टिकाऊ परिणाम करणाऱ्या औषधी नकोशा वाटतात. यामुळेंच हा व्याधि दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणांत असलेला दिसून येतो. तरी नवीन झालेल्या रुग्णांनीं आणि वैद्यांनींहि ही सर्व संप्राप्ति लक्षांत ठेवून या विषाक्त द्रव्यांच्या प्रयोगापासून स्वतःस दूर ठेवावें.

(१) महाश्वास

एखादा रोग झाल्यानंतर तो वाढतच जाऊन शेवटीं हा महाश्वास होत असतो. उदाहरणार्थ, वातकफज्वर (इन्फ्लूएंझा) होऊन त्यांतच श्वसनक सन्निपात (न्यूमोनिया) झाला आणि तो आटोक्यांत न आला म्हणजे शेवटीं मृत्यु येण्यापूर्वी रुग्णास हा महाश्वास लागतो.

तीव्र कफरुद्ध वात विकृति

यामध्यें वातविकृति अत्यंत तीव्रावस्थेस गेलेली असते. कारण, पूर्वी झालेल्या कफवृद्धीमुळें सर्व स्रोतसें कफाच्या सूक्ष्म अंशानीं डबडबून भरलेलीं असतात. रुग्ण दिवसरात्र एखाद्या उन्मत्त सांडाप्रमाणें मोठमोठ्यानें श्वास घेत असतो. त्या श्वासाचा ध्वनि लांबपर्यंत ऐकूं येतो. रुग्णाची सर्व ज्ञानेंद्रियें इतकी विकृतीस पोंचतात कीं, त्यास कोणत्याहि विषयाचें ज्ञान होत नाहीं. त्याच्या डोळ्यांतील बुबुळें एखाद्या पागल झालेल्या मनुष्याप्रमाणें इकडे तिकडे फिरत असतात. डोळे फाटल्याप्रमाणें विस्तृत असे दिसतात. तोंड सदैव उघडें राहून आ पसरल्या-

सारखें दिसून येतें. त्याला मळमूत्राचें विसर्जन होत नाहीं. आणि तोंडांतून तो एखादा शब्द उच्चारण्याचा प्रयत्न करूं लागलाच तर अडखळत आणि असंबद्ध असें कांहींतरी बोलतो. त्याच्या श्वासाचा आवाज कित्येक याडांवरून लांबून लोकांस ऐकूं येतो. अशी स्थिति प्राप्त झाली म्हणजे रुग्ण अगदीं हीन दीन झाल्यासारखा असहायसा वाटतो. अशा अवस्थेंत त्याला मृत्यु फारच लवकर येतो. आणि कितीही जहाल औषधें दिलीं तरी त्यांचा कांहीं परिणाम होत नाहीं. म्हणून सूज्ञ वैद्यानें त्याची चिकित्सा करण्याचा व्यर्थ प्रयत्न न करतां शास्त्रांत सांगितलेलें अंतिम गंगाजल, तुलसीपत्रादि उपाय करण्याचा उपदेश करावा. अपयशाचें व्यर्थ भागीदार होऊं नये.

(२) ऊर्ध्व श्वास

या श्वासाच्या प्रकारांत श्वास आणि उच्छ्वास या दोन क्रियांपैकीं वर घेतला जाणारा जो श्वास तो मात्र फार वेळ पर्यंत घेतला जाऊन, खालीं सोडला जाणारा फार थोड्या वेळांत सोडला जातो. हेंच याचें प्रधान लक्षण होय. सर्व स्रोत्रसें कफानें व्याप्त झालेलीं असल्यामुळें आणि तोंडांतहि पण कफद्रव्याचें प्रमाण बरेंच वाढल्यामुळें तितक्याच जोरानें वायूच्या गतीचा अवरोध होतो आणि त्यामुळें वाताच्या सर्व शरीरसंचारांत तीव्र बाधा येते. त्याचे डोळे फक्त वर लागलेले असेच दिसतात. इकडे तिकडे पाहण्याचा त्यानें प्रयत्न केलाच तर वेड्या माणसाप्रमाणें इकडून तिकडे

‘ आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार ’

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्वप्रकारचीं सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहाः—

आयुर्वेदिक औषधी भांडार

२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…ची दृष्टि जाते. हळुहळू बेशुद्धि वाढत जाते. आणि …च्या अवरोधामुळे होणाऱ्या पीडाहि पण वाढत …त, तोंड शारखे वाळत गेल्यामुळें जीभ बाहेर …न खुणेनें पाणी अधिक हवें असें तो दाखवीत …तो. आणि बेचैनी इतकी वाढते कीं, बिछान्यावर …तो इकडून तिकडे होण्याचा प्रयत्न करीत असतो.

सर्व शरीर मलमय होतें

याप्रमाणें ऊर्ध्वश्वास प्रकोपास जाऊन आणि …र्णी जाणारा श्वास अत्यन्त अवरुद्ध होऊन बेचैनी …व जाते आणि ग्लानि एकसारखी वाढत जाऊन …टी प्राणनाश होतो.

ऊर्ध्वश्वासांत बाह्यवायु जास्त प्रमाणांत फुफ्फुसांत …जातो खरा, परन्तु त्यांतील प्राणवायु (ऑक्सिजन) …होणारे रससंशोधनाचें कार्य स्रोतसांच्या …रोधामुळें न झाल्यामुळें परिणत होणारा जो कर्ब …(कार्बन डायऑक्साइड) तो मात्र शरीराबाहेर …जात नाहीं आणि अशा रीतीनें त्याचा संचय …न सर्व शरीर मलमय होतें. आणि मग प्राणनाश …असतो. हाहि असाध्य आहे.

(३) छिन्न श्वास

या श्वासाचें प्रधान लक्षण म्हणजे असें कीं, …आणि उच्छ्वास या दोनहि क्रिया मधून मधून …वेळाकरतां अजीबात बंद असतात. कांहीं वेळ …च्छ्वास क्रिया नीट चालून मध्येंच त्या क्रिया …बंद होत असल्यामुळें त्या मनुष्यास अत्यन्त …होतें. कधीं कधीं तर बराचवेळ पर्यंतहि श्वासो- …च्छ्वास क्रिया अगदीं बन्द असते. तशा स्थितींत …खाद्या बन्द खोलींत कोंडून ठेवलेल्या मनुष्याप्रमाणें …ची स्थिति होते. आणि कोठेंतरी बाहेर खुल्या …त जाऊन श्वासोच्छ्वासक्रिया सारखी चालू राहील …रावें असें वाटून तो आपल्या स्थानाहून दूर …ण्याचा प्रयत्न करतो. पोट फुगते. सर्व शरीराला दर- …दरून घाम येतो, बेशुद्ध स्थिति येते. आणि शरीरांतील …धान मर्में (हृदय, बस्ति व मस्तिष्क) हीं कोणी …त्रानें कापीत आहे अशा प्रकारची पीडा त्याला होते. बस्ति (मूत्राशय) हिच्यांत इतकी जळजळ होते कीं, मूत्रोत्सर्ग करतांना तो सारखा ओरडतच असतो. डोळे कावरेबावरे होतात. शरीर अत्यन्त क्षीण होते. डोळ्यांत अश्रू येतात.

एक डोळा दुसऱ्यापेक्षां फार जास्त लाल असलेला दिसतो. चित्त स्थिर नसतें. तोंड शारखें वाळतें. शरीराचा वर्ण बदलतो. आणि सारखी बडबड करीत असतो. याप्रमाणें छिन्न श्वासानें पीडित असलेला मनुष्यहि फार लवकर यमसदनास जातो.

याप्रमाणें असाध्य असलेल्या अशा तीन श्वासांची साधारण व भेदभाव निदर्शक लक्षणें वर्णन केलीं. आतां उरलेल्या व साध्य होणाऱ्या अशा तीन श्वासांच्या लक्षणांचें व चिकित्सेचें वर्णन पुढील अंकांत करूं.

विंचूदंशावर उपाय

एका बाटलींत स्पिरिट भरावें. बाटली मोठ्या तोंडाची असावी. त्यांत जिवंत ३।४ विंचू सोडावेत. तसेंच त्यामध्यें जिवंत पाली सोडाव्यात; व मग बाटली बूच बंद करून ठेवावी.

दंशावर बाटलीमधील या स्पिरिटचे १।२ थेंब लावावेत. तात्काळ उत्तम परिणाम होतो. व दंश झालेला माणूस हांसत जातो.

बाटलींतील स्पिरिट संपल्यावर पुनः स्पिरिट टाकावें. मजजवळ हें विंचू पाली घातलेलें औषध १४ वर्षांचे जुनें आहे.

—वै. वा. शं. देशपांडे

पांढऱ्या कोडावर

श्री. अंबाजी धोंडू मोरे पो. वाडे जि. ठाणें लिहितातः— मी पुष्कळ औषधें केलीं. पण गुण आला नाहीं. खरोखर, आपले प्रभावी औषधानें माझें मुलीचें संपूर्ण कोड नाहींसें झालें. किं. ५ रु. पोस्ट खर्च १५ आणे. माहिती मागवाः—

वैद्य के. आर. बोरकर

पोस्ट–मंगरुळपीर जि. अकोला (वऱ्हाड)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय

वार्षिक परीक्षेचा निकाल १९५३

वर्ष १ लें

प्रथम श्रेणीः- १ कु. स. मालवे २ भा. गुं. जोशी

द्वितीय श्रेणीः- १ कु. उषा ल. पोतदार २ चं. बा. गुजराथी

पास श्रेणीः- १ भो. स. झेंटे २ सु. सो. पाटील ३ वा. मो. बेलसरे ४ ह. खं. सातव ५ मो. ग. जोशी.

वर्ष २ रें

प्रथम श्रेणीः- वा. त. तनवानी

द्वितीय श्रेणीः- १ व. कृ. कुलकर्णी २ श्री. के. पोंक्षे ३ प्र. ना. कुलकर्णी ४ म. ज्ञा. कुलकर्णी ५ मा. मो. ठोंबरे ६ बा. हि. मेहेत्रे ७ रा. ना. फडके (८) रा. वि. परब (९) ए. ल. नेमाडे (१) गि. ना. चौधरी.

पास श्रेणीः- १ वि. ना. व्यास २ शा. गो. निचळे ३ व. रा. लढे.

वर्ष ३ रें

द्वितीय श्रेणीः- १ गो. सु. राजकुमार २ द. गो. भाटे. ३ कि. गो. जावळे ४ श्री. ग. गाजरे.

पास श्रेणीः- १ नि. क. नारखेडे २ र. रा. पाटील ३ श. न. जावळे ४ म. जा. महाजन ५ ना. बा. कंचर्लीवार.

वर्ष ४ थें

प्रथम श्रेणीः- १ सौ. उषा सहस्रबुद्धे २ म. शि. शुक्ला.

द्वितीय श्रेणीः- १ का. मा. गोजे २ व. भा. सावदेकर.

पास श्रेणीः- १ शं. रा. उदावन्त.

खालील विद्यार्थ्यांना कंपार्टमेंट देण्यांत आलें आहे. कंपार्टमेंटची परीक्षा ऑगष्टमध्यें घेण्यांत येईल.

वर्ष १ लें:-- १ ना. ग. देशमुख २ पां. ना. मिरजकर ३ द. रा. देव ४ अ. ह. तायडे.

वर्ष २ रें:-- १ शि. गि. चौधरी २ म. ना. आठवले ३ ह. शि. चौधरी ४ म. पां. चौधरी.

वर्ष ३ रें:-- १ म. रा. पाठक २ गो. उ. वाणी ३ रा. रा. उपाध्ये ४ द. स. महाजन ५ व. के. मानेकर ६ म. ल. नगरकर ७ पं. ना. चोपडे.

वर्ष ४ थें:-- १ रा. पुं. राजपूत २ सु. वि. इंगळे ३ ना. दा. जोशी ४ पुं. पां. पागरुत.

एक पृच्छा

पिवळा अभ्रक कोठें मिळेल ?

भिषग्रत्न ग. कृ. पाटणकर

पो. किनई, जि. उत्तर सातारा

मुरडा, जुनाट हगवण यावरील रामबाण औषध

ॲंटी डीसेंट्रॉल

हें औषध आयुर्वेदीय औषधी द्रव्यांपासून तयार केलें आहे. यांत पर्पटी, जायफळ, इंद्रजव, कुडासाल, कापूर आदि द्रव्यें आहेत. जुनाट अतिसार, मुरडा, आमांश (प्रवाहिका) व हगवण या विकारांत हीं द्रव्यें गुणकारी असल्याचें सिद्ध आहे.

कितीहि जुलाब होत असले तरी हें औषध दिलें असतां पहिल्याच दिवशीं गुण दिसूं लागतो. वैद्य डॉक्टर आदि सर्व चिकित्सापंथाचे लोक हें औषध सध्यां वापरीत आहेत. आपणहि आजच आपल्या चिकित्सा कार्यांत ॲंटीडीसेंट्रॉल वापरून यश प्राप्त करा.

किंमत २४ गोळ्यांची १ रु. व २५० गोळ्यांची ८ रु.

ऊंझा फार्मसी लि., ऊंझा (गुजराथ)

एजन्टः— जयंत ॲन्ड कंपनी, लक्ष्मीरोड, पुणें सिटी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें

लेखकः—वैद्य पु. वि. धामणकर
धूतपापेश्वर, पनवेल

३ कालकूट

"कालकूट हें धनुर्वाताचे विकारांत प्रशस्त ...ध आहे. ह्या विकारांत कफप्रधान दुष्टि असल्यास ...कूटाचा चांगला उपयोग होतो. कालकूटानें ...र्वाताचे जंतूंना प्रतिकारक परिस्थिति शरीरांत ...र्माण होते.

कफप्रधान वातसंसर्गी सन्निपातांत फार उत्तम ...न करणारें असें हें औषध आहे. ह्याचा मुख्यतः ...योग ग्रंथिक सन्निपातांत करण्यांत आला, आणि ...च्या वरील गुणांमुळें प्लेगच्या मुख्य औषधांपैकीं ...एक औषध बनलें.

हें औषध दिल्यापासून तास अर्ध्या तासांत ...तीचा वेग सपाटून वाढतो. व नाडीचे ठोके ...र मिनिटास २० ते ३० पर्यंत अधिक वाढतात."

—आ. औ. गुणधर्मशास्त्र

मुदतीचे ताप निघाल्यानंतर स्नान, अन्नसेवन ...कारणानें ते केव्हां केव्हां पुनः पुनः उलटतात. ...ां सान्निपातिक ज्वरनिवृत्तीनंतरहि कफाधिक्य ...तर प्रथम कालकूट देऊन मग स्नान, जेवण ...करावें. त्यावेळीं कालकूट हा रोगप्रतिबंधक ...तो.

कालकूटाचा संस्कृत पाठ

...विषं चैव त्रिभागः सूत एव च।
...: पंचभागः स्याच्छिला स्याद्दतुभागिका ॥
...स्म चतुर्भागमृतुभागं च टंकणम्।
...कं रत्नसंख्याकं वन्हिमूलं तथैव च ॥
...र्द्वादश ज्ञेयास्त्रिफला दशभागिका।
...श्चन्द्रभागः स्याद्वचायाश्च तथैव स ॥
...खल्वे च संस्थाप्यमार्द्रकं वन्हिमूलकम्।
...रं लशुनं चैव शाङ्गेष्टार्कस्य मूलकम् ॥
...स्वर्णमूलं च सिंधु नागदलं तथा।
...मूलानि प्रत्येकं याममात्रकम् ॥
पंचकोलकषायेण पंचमूलेन मर्दयेत्।
गुंजामात्रप्रमाणेन वटकान्कारयेत्ततः ॥
वटीमेकां प्रयुंजीत शृंगवेराम्भसा युताम्।
सर्वज्वरहरो योगः सन्निपातकुलान्तकः ॥
स्नानं कुर्यात्प्रयत्नेन श्रीखण्डालेपमाचरेत्।
दध्यन्नं दापयेत्पथ्यं खर्जुरादि फलान्यपि ॥
ताम्बूलचर्वणं कुर्यात्क्रमादेवं समाचरेत्।
कालकूटरसो नाम महेशेन प्रकाशितः ॥

—भा. भै. र. ९४९९

१ नांवः— औषधीयोगास कालकूट नांव आहे. पण ह्यांत कालकूट नामक विष नाहीं. तेव्हां हें नांव उपमात्मक ठरतें.

२ पाठनिश्चितिः— संस्कृत पाठांत रस शब्दा-ऐवजीं रत्न संख्याकं असा पाठभेद आढळतो. पण थंडीनाशक धर्म तालांतील सोमलांत आहेत. असें ग्रहित धरलें तर येथें ताल रस (६) भाग न घेतां रत्न (९) भागच घ्यायला हवा.

३ द्रव्यसंग्रहः— १२ बचनाग, ५ गंधक, ४ ताम्रभस्म, ३ पारा, ६ मनशीळ, ६ टंकण, ९ ताल, ९ चित्रक, ४ सुंठ, ४ मिरें. ४ पिंपळी, १० त्रिफळा, १ हिंग, १ वेखंड.

४ द्रव्यनिर्णयः— बचनाग-काळा, पिंपळी-जुनी लेंडी, मिरें-काळें, टंकण-उद्भिज्ज, चित्रक-काळा, ताल-वर्की पत्र्या, पारा-हिंगुलोत्थ, गंधक-अमलसार.

५ द्रव्यशोधन— पारा लसूणरस, बचनाग-गोमूत्र, गंधक-तुलसीरस, हरताल-चुन्याची निवळी, टंकण-भृष्ट, चित्रक-ताक, हिंग-भृष्ट, मनशील-अगस्ती-रस.

६ प्रक्रियाः— भावना क्रमाक्रमानें १।१ प्रहर खलणें.

७ भावनाः— १ आलें... रस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२ चित्रक ... काढा

३ अम्ललिंबू ... रस

४ लसूण ... रस

५ सागरगोटापाला ... रस

६ रुईमूळ ... काढा

७ कळलावी ... रस

८ धोला (पिवळा) मूळ, रस अथवा काढा

९ नागवेल ... रस

१० अंकोलमूळ ... काढा

११ शेवगामूळ रस ... काढा

१२ पंचकोल ... काढा

१३ पंचमूळ ... काढा

८ कालः— साधन काल – शरद् ऋतु, मर्दन–काल ४ महिने.

९ सिद्धिप्रमाणः— पारा ३ तोळे असल्यावर औषध २३२ तोळे तयार होतें.

१० परिगणनः— बचनाग इ. चें प्रमाण

११ रोगः— सर्व कफप्रधान सान्निपातिक ज्वर धनुर्वात इ. यावर

१२ मात्रा :— १ गुंज

१३ अनुपान :— आल्याचा रस + मध

१४ पथ्यापथ्यः— दहिभात, स्नान, विडासेवन, चंदनाची उटी (लेपन), खर्जूरादि फळें पथ्यकर होत.

टिप्पणीः—

तुळशीरसांत गंधकशुद्धि

द्रव्यसाधने ह्या सदरांत गंधक-शोधनाकरितां तुलसीचा रस सुचविला आहे. पण अशा तऱ्हेनें शुद्ध केलेल्या गंधकाचे कण तद्रसानें आवृत होतात. व मग ते पारदाशीं संयोग पावत नाहींत. तेव्हां ही शुद्धि आवश्यक मानली तर पारदाबाबतहि पृथग् विचार करावा लागतो. कालकूट कफवातनाशक म्हणून गंधकशुद्धीकरितां येथें तुलसी इष्ट समजली गेली तर पारदाबाबतहि हीच विचारधारा जमेस धरून येथें पारदाऐवजीं रससिंदूर घेणें प्रशस्त मानावें. म्हणजे मिश्रण ठीक जमेल. व योगहि अधिक बलवान् होईल, असें वाटतें.

ह्या शुद्धीबाबत आणखीहि एक विचार सुचतो तोहि लक्षांत घेणें जरूर आहे. उदाः- पारा-गंधक सामान्य तऱ्हेनें शुद्ध करून घेऊन त्यांची कज्जली करून ती ह्या योगांत घालणें, व वरील द्रव्यें ... योगांत घेणें. ह्या दोन प्रकारच्या योगांच्या गुणधर्मां[त] काय फरक पडेल तो प्रत्यक्षानें पाहून दोहोंचे ... निष्टत्व ठरविणें सोयीचें होईल.

कळलावी ओलीच घ्यावी

कळलावी हा कंद आहे. तो न दुखवितां वाळ-लींत भरून ठेवला तरी तो ओलाच नव्हे तर बी... राहतो. आणि मृगारंभीं त्याला धुमारे फुटतात. हा कंद ओलाच घ्यावा लागतो. कारण हा छेदून सुकवि[ला] तर तो सुकतांना त्यांतील कार्यकारी द्रव्य रूपांत[र] पावतें. व ती कळलावी निर्विष अतएव अकार्यकर ठरे[ल] म्हणून कळलावी ही ओलीच घेण्याची दक्षता घ्यावी.

स्वर्णमूल (पिवळा धोत्रा मूळ)

धोत्र्यास सोन्याचीं नांवें आहेत. त्यावरून स्व[र्ण]-मूल म्हणजे सकृद्दर्शनीं धोत्रामूळ नजरेसमोर ये[तें]. धोत्र्याचें बी व पंचांगहि औषधीयोगांत घेण्या[चा] सांगितल्याचा उल्लेख सांपडतो हें खरें, तरी ... प्रमाणें मूळाचा स्वतंत्र उपयोग सांगितलेला आढ[ळत नाहीं]

कल्याण येथें

नवीन विक्री केंद्र

कळविण्यास आनंद वाटतो कीं अनेक ग्राहकांच्या आग्रहावरून **आयुर्वेद सेवा संघ नाशिक** या संस्थेची सर्व अनुभवी व गुणकारी औषधें कल्याण येथें मिळण्याची सोय आम्हीं केली आहे, तरी ग्राहकांनीं याचा लाभ अवश्य घ्यावा व एकवेळ या विक्री केंद्रास भेट द्यावी.

'उषा औषधी एजन्सी'

राममारुती चौक, गोखले वाडा,
सिद्धेश्वर आळी, कल्याण (C. Rly)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...ही, मात्र काटेघोला स्वर्णक्षीरी मूळ स्वतंत्रतेनें ज्वरां–
...नामक योगांत घेण्यास शार्ङ्गधरानें सांगितलें आहे.
...यें येथेंहि स्वर्णमूळ ह्या संज्ञेनें काटे-पिंवळा–धोत्रा
...घ्यावें; हेंच युक्त होय.

प्रक्रिया

ह्या सदरांत प्रत्येक भावना १।१ प्रहर खलावी ...सांगितलें आहे. हें प्रमाण प्राचीनकाळीं म्हणजे ...हां रोगीपरत्वें औषधें ताजी तयार करून द्याव– ...ची प्रथा होती तेव्हां युक्त ठरत असेलहि; पण आतां ...शी औषध तयार करून ठेवून तें विविध ठिकाणीं ...र्घ वा प्रदीर्घ काल ठेवलें जातें व प्रसंगावशात् रोगी ...तेव्हां तें द्यायचें; अशी आहे स्थिति. अशा ...तीत ३ तास भावना खलणें हें मान फारच कमी ...तें, आमच्या अनुभवानें एक एक भावना २।३ ...स खलून अशा ३।३ भावना दिल्या तरच तो ...अक्षय्य कार्यक्षम ठरतो. म्हणून मर्दनकाल चार ...हे लिहिला आहे.

देशकालविचार

औषधीयोग लिहिले त्या वेळची परिस्थिति व ते ...योगांत आणावयाचे त्यावेळची परिस्थिति, देश, ...इ. लक्षांत घेऊन पाठ व प्रक्रियेंत बऱ्याकरितां ...करणें गैर ठरत नाहीं. उदा:–

...औषधोक्तो योगो बहुग्रन्थभयान्मया ।
...णां तत्समानानां तत्रात्रापो न दुष्यति ॥१३५
...भिहितो यो वा बहुदुर्लभभेषजः ॥
...सत्ति तत्रापि कार्यमेव चिकित्सितम् ॥ १३६
...कमपि यद्द्रव्यं भवेद्व्याधावयौगिकम् ॥
...द्धेयौगिकं तु प्रक्षिपेदप्यकीर्तितम् ॥ १३७

सुश्रुतचिकित्सा अध्याय १

होमिओपाथिक चिकित्सापद्धति
[किं. २॥ रु. ट. ख. निराळा]
१ वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक
२ मे. काणे बंधु, टिळक चौक–कल्याण

मध्यभारत सरकारचें धोरण

मध्यभारत आरोग्य खात्यांत काम करणारे डॉक्टर व इतर नोकरवर्ग यांना खासगी धंदा करण्यास बंदी करणारा हुकूम मध्यभारत सरकार काढणार आहे असें विश्वसनीय रीत्या समजतें.

सरकारी डॉक्टरांनीं आपले खासगी दवाखाने (प्रायव्हेट क्लिनिक्स) तीन महिन्याच्या आंत बंद करावें अशा नोटिसा येत्या कांहीं दिवसांत निघण्याचा संभव आहे.

मॅर्निटी होम्सच्या लेडी डॉक्टर्स व इतर डॉक्टर्स यांना ५० ते ७५ रुपयांपर्यंत व्यवसायबंदी (नॉनप्रॅक्टिस अलावन्स) भत्ता म्हणूनहि देण्यांत येणार आहे असें कळतें.

फार्मास्युटिकल चौकशी समिती

निरनिराळ्या कारखान्यांना भेटी आणि उत्पादक, घाऊक व्यापारी, आयातदार, व वितरक आणि किरकोळ औषधविक्रेते यांच्या प्रातिनिधिक संस्थांशीं विचारविनिमय असा आठवडाभराचा कार्यक्रम आटोपून मेजर जनरल एस्. एल्. भाटिया हे अध्यक्ष असलेल्या फार्मास्युटिकल चौकशी समितीनें आपलें मुंबईतील काम संपविलें.

तेथील मुक्कामांत या समितीनें वैद्यकीय व्यवसायी व सार्वजनिक आरोग्य खात्यांचे अधिकारी यांचेसाठीं तयार केलेल्या प्रश्नावलीवर अखेरचा हात फिरविला. व हाफकिन इन्स्टिट्यूट व इतलाव लि. या ठिकाणीं चांचणी बाबत असलेल्या सोयींची पाहाणी केली. तसेंच औषधनिर्मिती धंद्यासंबंधांत इंडियन सी कस्टम्स ॲक्टाच्या अंमलबजावणीबाबत जकात खात्याच्या अधिकाऱ्यांशींहि समितीनें विचार-विनिमय केला.

समितीच्या मुंबई येथील कामांत ड्रग कंट्रोलर व मुंबईराज्याच्या उद्योगखात्याचे प्रतिनिधींनीं भाग घेतला होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लातूरचें यशस्वी वैद्य--संमेलन

पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणें लातूर येथें म. प्रां. वैद्य संमेलनाचें ९ वें अधिवेशन जून ता. १३-१४ या तारखांस व्यवस्थित रीतीनें पार पडलें. ता. १२ रोजीं रात्रीं स्थायी समिती व कार्यकारी मंडळाची सभा तेथें झाली व गतवर्षीचे हिशेब व अहवाल मंजूर करण्यांत आले.

आयुर्वेदीय ध्वजवंदन

ता. १३ रोजीं सकाळीं आयुर्वेदीय पताका चढविणें व प्रदर्शनाचें उद्घाटन हा कार्यक्रम अध्यक्ष वैद्यराज जळूकरशास्त्री यांच्या हस्तें झाला. त्यानन्तर वैद्यराज घामणकरशास्त्री यांचें 'हारद्वार येथें झालेली द्रव्यगुणविषयक शास्त्र चर्चा' या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान झालें.

आरोग्यमंत्र्यांचें भाषण

सायंकाळीं ६ वाजतां नगरपालिकेच्या टाऊन हॉलमध्यें संमेलनाच्या अधिवेशनास प्रारंभ झाला. स्वागत-गीत झाल्यावर हैद्राबादचे आमदार वैद्य गोपाळशास्त्री देव यांचें उद्घाटकांना विनंति करणारें भाषण झालें. त्यानंतर उद्घाटक हैद्राबादचे आरोग्य-मंत्री नवाब मेहदी यारजंग म्हणाले-" या देशाच्या आरोग्याचा प्रश्न सोडविण्यासाठीं आयुर्वेद हें अत्यन्त आवश्यक व उपयुक्त शास्त्र आहे. हैद्राबाद राज्य सरकारनें आयुर्वेदाचे दवाखाने उघडून व आयुर्वेद महाविद्यालय व चिकित्सालय सुरू करून या शास्त्राला पाठिंबा देण्याचें कार्य सुरू केलें आहे. तथापि या बाबतींत आणखी काय काय करावयास पाहिजे याबाबत मार्गदर्शन आपल्याकडून आम्हांस हवें आहे. सरकार राज्यांतील कांहीं हुषार व्यक्तींना शिष्यवृत्ति देऊन आयुर्वेदाचें शिक्षण घेण्यासाठीं पाठविण्यास तयार आहे. तरी ही शिष्यवृत्ति किती द्यावी व शिकावयास कोठें पाठवावें याबाबत सूचना आम्हांस हव्या आहेत.

एक वर्षाचा कोर्स हवा

तसेंच सरकारची मोठी गरज म्हणजे लहानलहान गांवांत औषधोपचार करू शकतील असे प्रथमोपचारक निर्माण करणें ही आहे. त्यासाठीं या संमेलनानें एक वर्षाचा अभ्यासक्रम आखून द्यावा व त्यासाठीं प्रवेश कोणास द्यावा इत्यादि माहितीसुद्धां पुरवावी.

ज्याप्रमाणें इंजिनियर्स, अकौंटंट्स् इत्यादि सर्व विभागांत लहान व मोठ्या दर्जाचे असे लोक असतात व तसे शिक्षण घेण्याची सोय असते; तशीच वैद्यकशास्त्रांतहि लहान मोठे अभ्यासक्रम ठेवणें अवश्य आहे, असें माझें मत आहे. या संमेलनानें एक समिती नेमावी, तिनें हैद्राबादला यावें व आम्हांस मार्गदर्शन करावें अशी त्यांनीं शेवटीं विनंति केली. त्यांच्या विनंतीप्रमाणें संमेलनानें एक ठराव करून अशी समिति नियुक्त केली आहे.

संयुक्त महाराष्ट्रासाठीं पहिलें पाऊल

म. प्रां. वैद्य संमेलनाच्या अध्यक्षाचें भाषण ४२ मिनिटें झालें. त्यांचें भाषण सर्वांना फार समयोचित वाटलें. त्यानंतर संमेलनाच्या कार्यास ता. १४ रोजीं दुपारीं प्रारंभ झाला व सायंकाळीं ६ वाजेपर्यंत २४ ठराव होऊन संमेलनाचें कार्य समाप्त झालें. मराठवाड्यांतील ५ मराठी जिल्ह्यांतील वैद्य मंडळींनीं या संमेलनांत उत्साहानें भाग घेतला होता. महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यांतून संमेलनासाठीं प्रतिनिधि आले होते. आगामी संयुक्त महाराष्ट्राच्या योजनेनुसार आधींच टाकलेलें हें पाऊल या दृष्टीनें संमेलनाकडे सर्व लोक कौतुकपूर्ण भावनेनें पहात होते.

———

नागपूर येथें

" आयुर्वेद सेवा संघा " चीं

सर्व प्रकारचीं गुणकारी औषधें मिळण्याचें

एकमेव ठिकाण--

श्रीपरांडे बंधु

महाल रोड, नागपूर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोषचिकित्सा : :

लेखक
एक पदवीधर वैद्य

(वैद्यभूषण **गणेशशास्त्री जोशी** यांच्या व्याख्यानांतील कांहीं भाग)

लातूर येथें भरलेल्या म. प्रां. वैद्य संमेलनांत [दुसऱ्या] दिवशीं सकाळीं वै. भू. गणेशशास्त्री जोशी यांचें [दोष]चिकित्सा' या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झालें. [शास्त्री]बुवांचें व्याख्यान फारच उत्तम होतें असा माझा [अ]नुभव आहे. त्यांच्या विषयप्रतिपादनांत सुसंगति [अ]सते. महाराष्ट्रांत आयुर्वेदाचा हिरिरीनें पुरस्कार [करणारे] वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध वैद्य अशी त्यांची [ख्या]ति आहे. दोषचिकित्सा हा त्यांचा अत्यन्त [आ]वडीचा व अभिनिवेशाचा विषय आहे. हल्लीं [चि]कित्सा करतांना दोषाकडे पाहिलें जात नाहीं; लाक्षणिक [चि]कित्सा केली जाते. रोगानिदान पाश्चात्य पद्धतीचें [व] रोगचिकित्सा आयुर्वेदीय औषधांनीं करावयाची, [या]मुळें आयुर्वेदाची अपरिमित हानि झाली आहे. या [वि]षयीं त्यांनीं मांडलेली विचारसरणी उपस्थित वैद्यांना [पट]ली. उदाहरणार्थ, त्यांनीं ३।४ रुग्णांचे अनुभव [सां]गितले, ते असेः—

महात्मा गांधीजींची चिकित्सा

१९४५ सालीं गांधीजी तुरुंगांतून सुटल्यानंतर [त्यां]चे अंगावर १) थोडी सूज होती. २) थोडा [सं]ग्रहणीचा विकार होता व ३) पंडुता होती. [गां]धीजींचे कांहीं नियम होते. त्यांत ते अहिंसावादी [अ]सल्यामुळें 'यकृताचें सत्व' वगैरे घेण्यास तयार होईनात. [दि]वसांतून ४।५ द्रव्यापेक्षां (आहारासह) इतर कांहीं [घ्या]वयाचें नाहीं असाहि नियम होता. तेव्हां काय [उप]चार करावेत या विवंचनेंत वैद्य-डॉक्टर-मंडळी होती.

एका बिल्वाचें दूध

डॉ. भडकमकर हे त्यावेळीं श्री. गणेशशास्त्री [यां]चेकडे गेले व वै.भू. गणेशशास्त्री यांनीं गांधीजींची चिकित्सा केली. ती अशीः- रोज १ बिल्वाचें सिद्ध दुध गांधीजींना दिलें जात असे. डॉक्टर जीवराजभाई [मे]हता हे त्यावेळीं गांधीजींच्या समवेत होते, ते स्वतः हा प्रयोग आपल्या हातानें करून देत असत. व या एकाच औषधानें गांधीजींची वरील तीनंहि लक्षणें कमी झालीं. या गोष्टीचें जीवराजभाईंना सर्वांत ज्यास्त आश्चर्य वाटे. एकाच औषधानें सूज, पंडुता व संग्रहणी हे विकार ॲलोपथीच्या उपचार पद्धतीनें कमी होत नसत, अशी त्यावेळची परिस्थिति होती. असो

अशा रीतीनें या प्रयोगांत एवढ्या मोठ्या रुग्णाला एवढ्या मोठ्या प्रथितयश डॉक्टराचें हस्तें हा प्रयोग झाला. तरीसुद्धां शुद्ध आयुर्वेदाची गळचेपी चालू आहे, ती आहेच !

दुसरा रुग्ण– यकृतांतील पित्ताश्मरींचा

त्याची हकीगत थोडक्यांत अशी– रुग्ण बेसावध अवस्थेंत. जवळ बसलेले स्नेही डॉक्टर M. D. F. R. C. S. २महिने मार्फियाचीं इंजेक्शनें चालू, व रोगी आसन्नमरण स्थितीत पडलेला. यकृतांतील अश्मरीचें सान्निध्य असल्यामुळें चाकू लावण्यास स्नेही या नात्यानें डॉक्टर तयार होईनात, तेव्हां शास्त्रीबुवांचा सल्ला घ्यावा असें ठरलें. शास्त्रीबुवांनीं इतर सर्व उपचार बंद केल्यास आपलें औषध देतो म्हणून सांगितलें. डॉक्टरांना ते पटेना. मार्फियाशिवाय रोगी गुराढोरासारखा ओरडतो असें त्यांचें म्हणणें. अशा रीतीनें दिवसांतून २ वेळ मार्फिया द्यावा लागे व जवळ जवळ २२ तास त्यास गुंगून ठेवावा लागे– व रोगी फक्त २ तास शुद्धींत असे. शेवटीं रुग्णानेंच स्वतः इतर उपचार बंद करून शास्त्रीबुवांचे औषध घेण्याचें ठरविलें.

अफूमुळें खडे बनतात

शास्त्रीबुवांचें म्हणणें अफूमुळें स्राव आणखी कमी होतात व पित्ताचे खडे अधिक घट्ट बनतात. कफदोषाला धरून पुनर्नवा, कुटकी, बाहावा यांच्या काढ्यांतून नाराच रसाच्या २ गोळया सकाळीं ९ वाजतां दिल्या. ४ वाजेपर्यंत दुःख सहन करण्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अटीबर औषध सुरूं केलें. ४ वाजेनंतर रोग्यास त्रास राहिल्यास मार्फिया पुनः दिला जाणार होता. अशा परिस्थितींत दुपारीं १ वाजेपर्यंत रोग्यास ७।८ जुलाब झाले व २ वाजतां रोग्याचें ओरडणें थांबलें त्यानंतर तो रुग्ण हळुहळू रोगमुक्त झाला.

मला सगळ्यांत आश्चर्य हें वाटतें कीं अशा प्रकारची चिकित्सा तज्ज्ञासमोर होत असतांना आयुर्वेदाची गळचेपी कां व्हावी ?

तिसरा रुग्ण Coronary Thrombosis चा एक स्वतःच एम्. बी. बी. एस्. डॉक्टर. कित्येक दिवस अंथरुणावर पडून राहून विमनस्क स्थितींत, भ्रांत मनःस्थितींत निराश होऊन डॉक्टरीचें सर्व उपचार करून थकलेला. शेवटीं शास्त्रीबुवानीं त्यांना त्रिभुवनकीर्तीच्या ६ गोळ्या देऊन प्रथमच त्याचे अंगांतील हुडहुडी कमी केली. कफस्थानांतील दोषावर त्रिभुवनकीर्तीचा उपयोग केला. दिवसभर थंडी वाजणें, उठून बसतांच छातीतील हृदयाचे ठोके वाढणें, वगैरे लक्षणें कमी झालीं व आज तो डॉक्टर आपला व्यवसाय उत्तम रीतीनें करीत आहे.

इतक्या सर्व गोष्टी तपशीलवार लिहिण्याचा उद्देश हा कीं अशा प्रकारच्या विद्वान् वैद्यांना आपली शिष्यपरंपरा नष्ट करण्यास लावणारा कायदा कोणत्या विशेषणानें संबोधावा ?

छोट्याशा अभ्यासवर्गाचा विचार

व्याख्यानाच्या शेवटीं समारोप करतांना शास्त्रीबुवांनीं 'ज्या दिवशीं सरकार शुद्ध आयुर्वेदाला मान्यता देईल त्याच दिवशीं १० विद्यार्थी पदरखर्चानें शिकवीन' असें जाहीर केलें. तावडतोब शास्त्रीबुवांना अशी विनंति करण्यांत आली, कीं जे वैद्य आज व्यवसाय करीत आहेत व ज्यांना आपली दोषचिकित्सा समजावून घेण्याची इच्छा आहे. त्यांना आपण कांहीं शिकवावें. तेंहि त्यांनीं कबूल केलें. त्याप्रमाणें कांहीं वैद्यमंडळी अशा तऱ्हेचा एक छोटासा रिफ्रेशर कोर्स भरविण्याचा विचार करीत आहेत.

प्रौढ वधू पाहिजे

वधू—ब्राह्मण, अव्यंग, प्रौढ कुमारिका अथवा पुनर्विवाहेच्छु. वैद्यकीय वा परिचर्या शिक्षण घेतलेले असल्यास अधिक पसंति.

वर-द्विजवर, वय ३०, डी. ए. एस्. एफ्. [मुंबई] कर्तबगार, देशस्थ ब्राह्मण. पुणें जिल्ह्यांतील रहिवासी. मासिकप्राप्ति ३०० रु. चें वर शिवाय स्थावर व जंगम मिळकत आहे. स्वभाव मनमिळाऊ.

पत्रव्यवहाराचा पत्ता:—

C/o संपादक, आयुर्वेद पत्रिका, नाशिक

मध्यप्रदेश सरकारची मान्यता (Recognition) असलेलें एकमेव

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती

(१) शवच्छेदन, रुग्णपरीक्षा, ड्रेसिंग, काम्पौंडिंग, नेत्ररोग, स्त्रीरोग, ऑपरेशन्स, रक्त, थुंकी, मूत्रपरीक्षा, आदींचें व आयुर्वेदाचें सर्वांगपूर्ण प्रत्यक्षासहित शिक्षण (२) सरकारी आयुर्वेद बोर्डामार्फत परीक्षा, (३) D. A. M. S हा डिप्लोमा देण्यांत येतो. (१) उत्तम अध्यापक वर्ग. (४) बोर्डिंगची व्यवस्था केली आहे. (५) कोर्स ४ वर्षांचा. मॅट्रिक पास विद्यार्थ्यांनाच जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत प्रवेश मिळेल. (६) महाविद्यालय २० जूनपासून सुरूं होतें. माहितिपत्रक मागवा.

पं. दा. मुळे, प्रिन्सिपॉल

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार—

भावी उत्कर्षाच्या पताका

"आयुर्वेद पत्रिकेचे जून महिन्याचे अंक म्हणजे आयुर्वेदाच्या भावी उत्कर्षाच्या पताकाच वाटतात. नाशिक जिल्हा व महाराष्ट्र प्रांतिक वैद्य संमेलनाच्या अध्यक्षांचीं भाषणें विचारपरिप्लुत आहेत. त्यांत अॅलोपॅथीची अव्याप्तता व आयुर्वेदाची व्याप्तता यांचें चांगलें दर्शन होतें.

समर्पक उपमा

आधुनिक डॉक्टर हे पाश्चात्यांच्या "विटा उचल्ये मजूर" ही उपमा समर्पक आहे. त्यामुळेंच विदेशी औषधी कंपन्या प्रतिवर्षी कोट्यवधि रुपयांचा व्यापार करतात. त्यांनीं हिंदी जनतेस किती क्रूरपणें पिळून काढलें आहे हें सध्यां नुकत्याच कमी झालेल्या हार-मोन्सच्या किंमतीवरून सहज कळून येते. त्यांतल्या त्यांत आनन्दाची गोष्ट म्हणजे हल्लीं बऱ्याच विचारवंत डॉक्टरांचे डोळे उघडूं लागले आहेत. नुकतेच माझे एक डॉक्टर स्नेही मला म्हणाले कीं, या महागड्या परदेशी कंपन्या, विशेषतः अमेरिकन; लवकर बंद होतील तो सुदिन !

१५ दिवसाला १५ रुपयांचें टॉनिक

आजकाल आपल्या स्वदेशी कंपन्या प्रगतिपथावर आहेत. त्यांनीं पुढाकार घेतल्यास राष्ट्रहित व स्वाहित साधेल. पंधरा दिवसहि न पुरणारी पंधरा रुपये किंमतीचीं टॉनिक्स घेण्यापेक्षां अध्यक्षीय भाषणांत सूचित केलेली 'बाळभूक' वगैरे येथेंच तयार करावें, हें चांगलें.

कायावाचामनें पाश्चात्य

अनेक पिढ्या पारतंत्र्यांत गेल्यानें आम्ही सुशिक्षित लोक काया-वाचा-मनानें पाश्चात्य झालो आहोत हेंच खरें. नाहींतर रोगावर चौफेर हल्ला करणाऱ्या आयुर्वेदाची उपेक्षा, व एकांगी, महागड्या व केवळ रोगचिन्हांचाच उपशम करणाऱ्या ॲलोपाथीचा सन्मान या देशांत झाला नसता. राजाश्रयाभावीं आयुर्वेद एक दोन अंगांनींच सध्यां अर्धवट जीव धरून आहे. त्याचा अष्टांगी व्यवहार सुरू झाल्यास रोगनिवारणार्थ तो इतर पॅथीइतकाच किंबहुना कांकण-भर अधिकच प्रभावी ठरेल. नगर जिल्ह्यांतील बोटे येथील तृष्णारोगांवर शुद्ध आयुर्वेदिक उपचार यशस्वी झाले, ही घटना त्याचीच दर्शक आहे.

अशा प्रकारचीं शुद्ध आयुर्वेद चिकित्सामंदिरें ठिकठिकाणीं निघणें अवश्य आहे. नाशिकच्या आयुर्वेद सेवा संघानें यांत पुढाकार घ्यावा. निष्ठावन्त कार्यकर्ते तयार आहेतच. अभ्यास-मंडळें, सूतिका-गृहें, घरोघर जाऊन बाळंतपणें व बालोपचार करणें इत्यादि सूचना व्यवहार्य आहेत. त्यामुळें पुढील इमारतीचा पाया घातला जाईल.

शाळांतील पाठ्य पुस्तकांत आयुर्वेदीय दिनचर्या ऋतुचर्या इत्यादि संबंधीं उपयुक्त माहिती द्यावी म्हणजे जनतेंतील अनास्था कमी होईल. आयुर्वेदाच्या उद्धारा-बरोबर आपली पुरातन संस्कृतीहि उजळली जाईल. नाहींतर हल्लींची अर्थप्रधान भोगपरायणता समाजास कीड लावून नष्टप्राय करीतच आहे.

दोन अभ्यासक्रम हवेत

आयुर्वेदाचा अभ्यासहि दोन प्रतीचा योग्य वाटतो. एक लहान व दुसरा मोठा. तें पुरें झाल्यावर विशेष अभ्यास–पोष्ट ग्रॅजुएटच्या धर्तीवर उपयुक्त होईल. मग इतर पॅथींचा तौलनिक अभ्यास इष्ट ठरेल. मिश्र शिक्षण आयुर्वेदास तारक नाहीं, याचें प्रत्यंतर कोणत्याहि तरुण डी. ए. एफ्. एस्. 'वैद्याकडे' गेल्यास येईल. विदेशी कंपन्यांचीं इंजिक्शनें हेंच त्यांच्या व्यापाराचें मुख्य भांडवल.

संघटना बलवान् हवी

शुद्ध आयुर्वेदीय शिक्षणक्रमाची मागणी हा वैद्यवर्गाचा जन्मसिद्ध हक्क होय. सध्यांचें लोकशाही सरकार तो यथाकाल देईलच. त्यासाठीं वैद्य संघटना अधिक बळकट व कार्यक्षम झाल्या पाहिजेत. म्हणजे सरकारला योग्य मार्गदर्शन होईल व आयुर्वेद सुप्रतिष्ठ होईल. तो सुवर्णदिन लवकर येवो."

(सही) र. कृ. गर्दे, एम्. बी. बी. एस्.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद हेंच राष्ट्रीय वैद्यक

"आज रोजीं मी माझ्या कामानिमित्त नाशिक येथें आलो असतां स्वतः जाऊन आयुर्वेद सेवा संघ संस्था पाहिली. कारखाना, मासिक, वाङ्मय विभाग इ. सर्व पाहिलें. कामगारवर्गावर संस्कार होणेंसाठीं सामुदायिक प्रार्थना, शास्त्रशुद्ध पद्धतीनें औषधें तयार करण्यासाठीं घेत असलेली दक्षता, हेंहि सर्व पाहून अत्यंत समाधान वाटलें.

परंतु आज खरोखर शुद्ध आयुर्वेदाचें संशोधन ही भारतदेशाच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. स्वातंत्र्याचें काळांत सर्व शास्त्रें, भाषा इत्यादि आपआपलें राष्ट्रीयत्वाचें स्थान मिळवित आहेत. आयुर्वेद हाच आपल्या राष्ट्राचें आरोग्य सांभाळीत आला आहे. परंतु पाश्चात्यांचे गुलामगिरीचे काळांत पाश्चात्य वैद्यक हेंच वैद्यक अशी समजूत करण्याचा प्रयत्न होत आहे. पण त्याला या संस्था व त्यांतील विद्वान् वैद्य वर्ग तोंड देऊन सिद्ध करूं इच्छितात कीं, आयुर्वेद वैद्यक हेंच आपलें राष्ट्रीय वैद्यक आहे. या संस्थेची चालक मंडळी या गोष्टीचा विचार करीत आहेत; तेव्हां परमेश्वरचरणीं प्रार्थना इतकीच की आयुर्वेदाचे उद्धारासाठीं या मंडळींना उदंड आयुरारोग्य द्यावें." ता. २२।५।१९५३

लक्ष्मण गणेश कुलकर्णी

कासेगांव जि. सातारा   कासेगांवकर वैद्य

उन्हाळ्यांतील वृंदवादनाचे जलसे

ग्रीष्म ऋतूंतील तीनचार महिन्यांत मोकळ्या जागीं होणाऱ्या बँडवादनामुळें अमेरिकेंतील शेकडो गांवांत आनंदाचें वातावरण पसरतें. त्या वृंदवादनांत वादक किंवा श्रोते या नात्यानें सर्वांना भाग घेतां येतो, म्हणून शहरांत व गांवांत ते कार्यक्रम अतिशय लोकप्रिय ठरले आहेत.

हौशी वादकांचीं पथकें

लहान गांवांत बहुधा हौशी नवशिक्या वादकांचीं पथकें वृंदवादनाचा कार्यक्रम करीत असतात. इतर गांवांत, नागरिक व अधिकारी यांच्या सहकार्यानें निधि जमा होतो. आणि खुल्या जागेवरील उन्हाळी करमणुकीच्या कार्यक्रमासाठीं धंदेवाईक संगीतज्ञ बोलाविले जातात.

श्रीमंत दात्यांच्या देणग्या

मोठमोठ्या शहरांत सार्वजनिक उद्यानांत होणारीं वृंदवादनें श्रीमंत दात्यांच्या देणग्यांवर चाललेलीं असतात.

पू. खानदेश वैद्य मंडळ

१९५३-५४ चें कार्यकारी मंडळ

अध्यक्ष– वै. ज. रा. नाईक, रावेर, पू. खानदेश

उपाध्यक्ष– वै. भ. त्र्यं. वैद्य, धुळें, प. खानदेश

मंत्री– वै. चू. खं. चौधरी, फैजपूर, पू. खानदेश

उपमंत्री– वै. वि. स. काकडे, तळोदे, प. खानदेश

कोषाध्यक्ष– वै. मो. ल. ठोंबरे, चिनावल, पू. खा.

आयव्यय निरीक्षक- वै. रामविलास गुप्ता, विवरा.,,

आचार्यांचा सत्कार

आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी यांची नागपूर विद्यापीठांत नेमणूक झाल्याबद्दल इंडियन फार्मासिस्टस् असोसियेशनने त्यांचा ता. २८ रोजीं सायंकाळीं हिराबागेंत श्री. एस्.के. पाटील (अध्यक्ष मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटी) यांच्या अध्यक्षतेखालीं सत्कार केला. २ जुलैपासून आचार्य नागपूर येथें कामावर रुजू होतील असें कळतें.

अनेक ग्राहकांच्या सूचनेवरून परतवाडा येथें आयुर्वेद सेवा संघ नासिकची सर्व अनुभविक व गुणकारी औषधें मिळण्याची सोय आम्हीं केली आहे.

श्री समर्थ स्टोअर्स

परतवाडा (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय व युनानी तिब्बी परीक्षा [मुंबई राज्य]

एप्रिल १९५३ मध्यें यशस्वी झालेल्या उमेदवारांचीं नांवें

चतुर्थ परीक्षा

[illegible]ष्ठित उमेदवार १७२ उत्तीर्ण उमेदवार १२४

मुंबई केंद्र

बहेटी ल. मु. भट्ट मु खु. चितानिया म. जे. [illegible] व. कां. दांडेकर ए. ल. देवचके रा. शं. [illegible] माधु द. देसाई म. न. देसाई पन्ना शि. [illegible] पुष्पा म. गोखले सुशिला ना. गुप्ते प्रमोद य. [illegible] नि. जोगिदासानी ज. गो, कामथ दे. मु. [illegible]डेकर शं. पां. कोल्हापुरे म. रा. कुलकर्णी [illegible] लिमये य. दा. मिश्र कै. चं. मुफति [illegible] र. पळसोकर म. का. पटेल वासंत शं. [illegible] अहिल्या सि. राय कै. चं. रानडे चिं. ह. [illegible] श्री. म. शाह गु. र. शाह जि. अ. शाह शां. [illegible] वै. मो.,

पुणें केंद्र

अधिकारी कुमुद द्वा., आगरवाल के. शं., अन्न-[illegible]इंदु गो., अर्जुनवाडकर रा. श्री., आठवले भा. [illegible]मंगाळे वा. कौ., भोळे द. अ., देसाई व. म., [illegible]डे नि. वा., देशपांडे वा. ल., गांधी म. ग., [illegible] प. घ., गोडबोले सुमन रा., हकीम या. नू., [illegible] कुंदा वि., काळदाते वि. रा., कळुसकर आनंद [illegible], कानेकल प्र. रा., कालेंकर वि. गं., केळकर [illegible] वा, कुलकर्णी पां. दि., कुलकर्णी श्री. वि., [illegible] व. शि., लेले सुमन य., माळी ना. म., [illegible] ना. च., मराठे प्रभावती रा., मेहेंदळे गो. [illegible] व. श्री., नाडकर्णी अनुसूया द., नाहर [illegible] र., पाटील द. वि., पाटील ने. दे., पाटील [illegible] म., पत्की आ. शा., पेंडसे सुशिला द., राजे मा. [illegible] न. ना., ऋषीपाठक श्री. धों, शिदोरे [illegible] दा.,

सातारा केंद्र

[illegible] य. म., सुसारी व. आ., बोरमीकर वि.

वा., दातार मा. रा., गोरे कृ. वि., कुलकर्णी प्र. गो., माजगांवकर ए. का., साने श्री. द., साठे नलिनी ना.,

---

तृतीय परीक्षा

अधिष्ठित उमेदवार १६० उत्तीर्ण उमेदवार १४९

मुंबई केंद्र

आगाशे मंदाकिनी स. भातखंडे शरयू पु. दमनीया रसिका न. दवे मंजू अ. देधिया दा. पं. देसाई आशा भि. देसाई भवानीया अ. देसाई सरोज म. गांधी सुधा ल. गणेशवाडे रा. दा. जोहारपूरकर अ. सुं. जोशी कुसूम गो. जोशी नं. पु. कोकाटे विमल स. लाड शा. द. लेव्ही डायाना सॉ. महाजन ग. टि. मनकोडी धैर्यबाला भो. मेहता चं. छ. मेहता कुमूद ङ. मेहता म. म. मुकती कि. मू. मुळे दे. ग. पंड्या न. द. पनीया सू. जे. परळकर दि. आ. पारेख न. शां. पारीख व. वृ. पटेल कुसूमबेन छो. पटेल म. चा. पाटील अं. मो. पाटील श्री. मा. राऊत आ. मो. संत कुसूम म. सराफ व. र. शाह बा. रा. शाह जे. कु. शाह म. रा. शानभाग सरोज भि. शानभाग शालिनी मा. श्रॉफ कृष्णा वि. टाकळकर सुमन दे. ठाकरे नलिनी द. वैद्य प्र. प्र. बरेरकर मिरा न. व्यास प्र. ना. व्यवहारे प्र. ना.

पुणें केंद्र

आठल्ये कुसुम वा., भट कुसुम य., चांडक नं. ग., चौधरी के. रा., चौधरी श्री. मो., चितळे सुधा श्री., दळवी आशालता द., दातार पुष्पा मो., दाते कुसुम स., देशपांडे मो. शं., डोशी मालती मो., डोशी सुलभा कां., गोळे स्नेहलता यां., गोवंडे गो. कृ., गुणे र. ज., जोगळेकर रुक्मिणी गो., जोशी उषा कृ., कावेरे ना. मो. काळे शा. प्र. काणे म. द. करोडपती ब. वा. कावली श्र. म. कायंदे शा. रा. कोल्हे रा. श्रा. [illegible] कुलकर्णी ना. ज.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुलकर्णी रा. ग., कुलकर्णी सिंधु ल., कुलकर्णी व. बं., लिमये कुसुम के., म्हाळगी व. का., नानल ग. शं., पराडकर स. द., पाटील चु. रु., पेंडसे मा. गो., पुरंदरे वीणा श्री., राईलकर इंदु मो., शिंदे वि. ग., तेंडुलकर ध. शा., ठकार सुशिला भा., उपाध्ये न. प., वैद्य कुसुम ना., वर्डीकर अ. गो., वाणी अ. पि., झिरळे दे. अ.

सातारा केंद्र

अभ्यंकर श्री. मा., आफळे दि. वि., भागवत ना. श्री., भावे प्र. ग., भिसे श्री. गो., देशपांडे ना. ह., देशपांडे श्री. द., जळूकर श्री. द., खोत भा. वा., कुलकर्णी व बा., मारवाडी गोदावरी जी., पंडीत अं. ज., राजपुरोहित कु. रा., थत्ते ब. द.,

द्वितीय परीक्षा

अधिष्ठित उमेदवार ४२० उत्तीर्ण उमेदवार २०३

मुंबई केंद्र

बहेटी रा. मु., बारेटो मर्सी, भाट्या ह. वा., भावसार कु. हि., बिर्जे ह. ना., बोंडे का. भि., छाया कुमुदबाला न., दैथनकर म. द., दलाल निर्मला का., दलाल र. प्रा., देसाई अ. अ., फाळे गो. भा., गांधी का. पू., गुजराथी गो. भू., जैन ध. हि., जरिवाला कि. वि., कुलकर्णी कृष्णाकुमारी ना., लुब्री तारामति द., मालपुरे रा. गो., मांडवगणे कुसुम गो., मंगुदकर जं न., मनकोडी दे. आ., मर्जे रा. दे., मेहता दे. शि., मेहता सू. चं., मोदी दि. कुं., नानशी पुष्पावती पो., ओझा शां. ग, परांजपे स. य., पारेख दमयंती ह., पटेल चं. घो., पाठक ह. के., पाटील अ. दा., पाटील ए. ओं., पाटील ज. जी., पेटीगारा दि. ज., पेटीगारा किशोरी ज., राव भा. म., सामंत-परुळेकर वि. द., शहा अ. मो., शाह भा. छ., शाह ह. म., शाह ज. चं., शाह कि. बा., शाह लि. तो. शाह निर्मला दि. शाह उ. सो. शाह व. म. तेलंग शकुन्तला द. ठाकरे रा. चि. ठक्कर न. गो., ठक्कर प्रभा क., ठोसर द. ग., त्रिवेदी म. ओं., व्यास भा. ना., याज्ञिक सरोजिनी ह.,

पुणें केंद्र

अलगुंडगी शि. शि. बोरकर सुमन द. चौधरी का. वा. चौधरी य. मो. देशमुख श्री. द. देशपांडे चं. प्र. दीक्षित दि. य. दुगल वा. श्री. गोसावी म. रा. गुजराथी प. गो. हुकेरी शांता द. जाधव माधव ल. जोशी विमल श्री. कदु ज. अ. केळकर सुनीति अ. खांडकर श्री. रा. कोनेकर वि. दा. कोठवाडे प. दा. कुलकर्णी शां. वा. लाहोटी शि. रा. नागांवकर श्री. प. नाफडे म. के. पाध्ये जयश्री श्री. पाध्ये शं. भा. पाध्ये सूमन नि. परांजपे ज. भा. परांजपे सुधा वि. पाटणकर य. वा. पाटील शं. ना. पटवर्धन र. द. पुजारी शरयू गं. रांझेकर शकुन्तला वि. रेंघे द. म. सरदेशाई शांता शा. साठये मे. भा. शाह चि. शा. शाह कंकुबाई के. शाह सुधा मा. सिनकर म. मो. सोनवणे अं. मा. सुरळकर रा. स. वैद्य र. य. वाळे हेमंती रा. वाणी द. ता. वाटवे ज. रा. क्षिर्पे सु. म.

सातारा केंद्र

भोमज ने. दा. डांगे ना. पां. देशपांडे द. नि. धामनसकर उषा रा. एकसांबेकर रा. द. गांधी शां. कृ. गवसने ष. ए. जोशी भा. ह. कोल्हटकर ग. चि. मानूरकर चं. भी. मुंगड प्रे. के. नादपुरोहित ना. भि. पलंगे दा. पां. पंडीत विद्युल्लता मो. पाटील का. ह. पोरे ना. आ. उचगांवकर पां. व्य. वेलणकर भागिरथी रा. येलगुडकर भा. अ.

प्रथम परीक्षा

अधिष्ठित उमेदवार ४८ उत्तीर्ण उमेदवार २४

मुंबई केंद्र

चौधरी र. उ. गोलेकर वे. ग. जोशी मा. द. खेडकर श. का. कुलकर्णी प्र. शं.

पुणें केंद्र

दातार हे. म. देशमुख श्री. द. देशपांडे दी. वि. केस्तिकर व. बा. नागांवकर श्री. प. पाठक वि. मो. पाठक पुष्पावती श्री.

सातारा केंद्र

[illegible] सू. दा. धुमाळ ग. मा. जोशी भा. ह.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९ वें महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन, लातूर

अधिवेशनांत संमत झालेले ठराव

प्रस्ताव १:— गतसालांत दिवंगत झालेल्या वैद्य व आयुर्वेदप्रेमी खालीं लिहिलेल्या व्यक्तींना हें संमेलन श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

१) डॉ. सावनूर, बेळगांव. २) वै. गायधनी, नाशिक. ३) वै. लवाटे, नासिक. ४) वै. महाबळ, नाशिक. ५) वै. काकासाहेब भोगले, औरंगाबाद. ६) वै. शंकरशास्त्री काळहेकर, परभणी. ७) पंडित छलविहारीशास्त्री, हैद्राबाद.

अध्यक्षद्वारा प्रस्तावित.

प्रस्ताव २:-- बॉम्बे मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट १९३८ च्या कायद्यांत सुधारणा सुचविण्या-करितां खालील सदस्यांची एक समिति ही सभा नियोजित करीत आहे. याच कार्याकरितां इतर संमेलनांनीं नियुक्त केलेल्या समितीशीं सहकार्य करून आपला कार्यभाग पार पाडावा अशी हें संमेलन अपेक्षा ठेवित आहे.

सूचक-वै. स. भा. जोशी. अनुमोदक-वै. का. सी. भावे. सर्वसंमत

सदस्यांची नांवें —१ वै. विष्णुशास्त्री दाते २ वै. ना. ह. जोशी ३ वै. धामणकरशास्त्री ४ वै. का. सी. भावे ५ वै. गणेशशास्त्री जोशी ६ वै. देसवंडीकर ७ वै. स. भा. जोशी ८ वै. तात्यासाहेब महाजन ९ वै. रामभाऊ भोगे १० वै. बिंदुमाधव पंडित ११ वै. वि. म. गोगटे १२ वै. व्ही. डी. शिंदे १३ वै. जळूकरशास्त्री १४ वै. सातभाई १५ वै. करमरकर १६ वै. लक्ष्मीबाई बोरवणकर.

प्रस्ताव ३:- महाराष्ट्र प्रान्तीय अष्टम वैद्य संमेलनाच्या केवळ आयुर्वेदीय शिक्षणक्रम सुरू करण्या-विषयींच्या क्रमांक ५ ठरावाला सरकारकडून नं. S 28/70187H लोकलसेल्फ गव्हर्नमेंट ॲंड पब्लिक हेल्थ डिपार्टमेंटच्या सेक्रेटरीमार्फत "असा अभ्यासक्रम अनावश्यक असल्याबद्दल" उत्तर आलें आहे, तें अत्यंत असमाधानकारक आहे. (The faculty having considered all suggestions regarding the course has finalised the degree course and it has been introduced from 1952, which includes Ayurvedic subjects in a large measure with 1525 periods out of a total of 2370 periods) म्हणून हें संमेलन सरकारास पुन्हां आग्रहाची विनंति करीत आहे कीं, सरकारनें केवळ आयुर्वेदाचा अभ्यासक्रम स्वतंत्रपणें मान्य करावा.

सूचक- वै. भू. गणेशशास्त्री जोशी अनुमोदक- वै. धामणकरशास्त्री. सर्वसंमत

प्रस्ताव ४:- मुंबई राज्यामध्यें मुंबई राज्य व प्रान्तीय संमेलनें संघटित स्वरूपांत अनेक वर्षांपासून आयुर्वेदशास्त्र व वैद्यवर्गाच्या सर्वांगीण उन्नतीसाठीं झटत असतां विशिष्ट लोकांनीं तत्सदृश नांवाच्या (बाम्बे स्टेट आयुर्वेद परिषद) संस्था निर्माण करून, जनता व सरकार यांची दिशाभूल करून वैद्यसमाजांत विघटना निर्माण करण्याचा प्रयत्न करणें आयुर्वेदोन्नतीच्या दृष्टीनें अत्यन्त गर्ह्य आहे, असा ह्या सभेचा अभिप्राय आहे.

सूचक- वै भा. श्री. देसवंडीकर अनुमोदक- वै. ब्रह्मदत्त शर्मा, सर्वसंमत

प्रस्ताव ५:- हैद्राबाद राज्य सरकारनें १९५१ सालीं जे ५२ आयुर्वेदीय दवाखाने उघडले व आयुर्वेदीय महाविद्यालय, रुग्णालय व औषध-निर्माण-शाळा यांची पुनर्रचना केली, त्याबद्दल हें संमेलन त्यांस धन्यवाद देत आहे, व लोकसंख्येच्या मानानें केली गेलेली व्यवस्था अपुरी आहे हें सरकारच्या निदर्शनास आणूं इच्छिते. पंचवार्षिक योजनेंत जी अधिक रक्कम आरोग्यखात्याकडे खर्च होणार आहे, त्यांतून शक्य तितकी जास्त रक्कम या आयुर्वेद योजनेंत खर्च व्हावी अशी अपेक्षा आहे.

सूचक:- वै. विठ्ठल पंडित [illegible] अनुमोदक:- वै. शं. पो. नंदनवनकर सर्वसंमत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्ताव ६:— हैद्राबाद सरकारची आयुर्वेदोन्नतीसंबंधीं जी योजना आहे ती जास्ती यशस्वी व्हावी या हेतूनें हें संमेलन या ठरावान्वयें खालील गोष्टींची सूचना करते.

(अ) आयुर्वेदीय वैद्यांचे मतानें निवडलेलें एक बोर्ड असावें.

(ब) आयुर्वेदीय वैद्यांसाठीं सरकारी नोकरींत शक्य तितक्या लौकर गॅझेटेड पोस्ट्स् निर्माण करण्यांत याव्यात.

(क) कॉलेजमधील अभ्यासक्रम बाहेरच्या निखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठ अभ्यासक्रमासारखा बनवण्यांत यावा. यास जोडून सर्व शास्त्रीय वैद्यक ग्रंथालय असावें. रुग्णालयांत अधिक रुग्णशय्या ठेवून तें सर्व साधनांनीं उपयुक्त बनवावें.

(ड) औषधीनिर्माणशाळेच्या औषधी द्रव्यांचा निकष अत्यंत उच्च दर्जाचा असावा व वनस्पति उद्यान व संशोधन इ. सर्व बाबींसाठीं अभ्यासु वैद्यांना संपूर्ण उत्तेजन व साह्य मिळावें. गरीब होतकरू विद्यार्थ्यांना इतर शैक्षणिक क्षेत्राप्रमाणें शिष्यवृत्त्या मिळाव्या व त्यांना बाहेरच्या उत्तम विद्यालयांत शिक्षणासाठीं पाठविण्यांत यावें. इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांचा दर्जा Certified वैद्यांना मिळावा.

सूचकः- वै. पु. म. चिंचवडकर अनुमोदकः- वै. ब्रजमोहन शर्मा सर्व संमत

प्रस्ताव ७:— गेल्या वर्षी प्रांतीय अष्टम वैद्य संमेलनानें नेमलेल्या उपसमितीनें सुचवून का. का. व स्थायी समितीनें अंतिम निर्णयासाठीं शिफारस केलेल्या खालील वर्णनाचा ध्वज ही सभा संमत करीत आहे

वर्णनः— पांढऱ्याशुभ्र खादीच्या वस्त्रावर अमृत कलश व त्या कलशावर स्वस्तिक

सू:- वै. वि. मो. दाते अ.:- वै. ब्रह्मदत्त शर्मा सर्वसंमत

प्रस्ताव ८ - मुंबई राज्यांत दारूबंदीचें धोरण अमलांत आणतांना आयुर्वेदीय पद्धतीनें तयार केलेलीं आसवारिष्टें दारूऐवजीं पिऊन मद्याची आलेली तलफ भागवून घेतो अशी समजूत करून घेऊन मुंबई सरकारनें आसवारिष्टांत निर्बंधित व मुक्त असे २ भाग पाडून कांहीं आसवारिष्टांवर अयोग्य नियंत्रण घालून त्यांच्या निर्मिति, विक्री व प्रसारास आळा घातला; त्यामुळें वैद्य व रुग्ण यांची अत्यंत गैरसोय झाली. तसेंच गेल्या १४ वर्षांच्या अनुभवांत असें आढळून आलें आहे कीं, दारूची तलफ आसवारिष्टांनीं भागत नाहीं. सरकारी कडक नियंत्रणामुळें निर्बंधित आसवारिष्टांचा खप अत्यंत कमी प्रमाणावर येऊन ठेपला आहे ही गोष्ट आम्ही सरकारचें निदर्शनास आणूं इच्छितों. म्हणून हें संमेलन आसवारिष्टांवरील नियंत्रणें दूर करण्याबाबत सरकारास अत्यंत आग्रहाची विनंति करीत आहे.

सू.- वै. घामणकरशास्त्री अनु.- वै. द. बा. शेंड्ये सर्वसंमत.

प्रस्ताव ९ - मुंबई राज्य सरकारनें वैद्यनोंदणीसाठीं निर्वासित वैद्य, मुंबई राज्यांत विलीन संस्थान विभागांतील वैद्य, आणि मागच्या नोंदणींत राहिलेले वैद्य यांच्या नोंदणीबाबत विचार करणेंसाठीं नेमलेल्या ट्रिब्यूलनच्या निर्णयावर दाद मागण्याची सोय सरकारनें उपलब्ध करून द्यावी अशी या सभेची सरकारास विनंति आहे.

सू.- वै. म. द. करमरकर अनु.- वै. रामभाऊ भोगे सर्वसंमत

प्रस्ताव १० - महाराष्ट्रामधील उपनगर-नगर-तालुका-जिल्हा इ. पोट विभागी संमेलनांमधून होणारे ठराव प्रांतीय संमेलनाशीं अनुस्यूत असावेत. प्रांतीय संमेलनानें केलेल्या ठरावाबाबद उपसूचना करणें असल्यास त्या मूळ ठरावास पुष्टी देऊन करण्यांत याव्यात. आणि स्थानिक, नैमित्तिक व वैद्यकीय व्यावसायिक अडचणी बाबतचे ठराव प्रांतीय कार्यालयाकडून माहिती घेऊन नंतरच करावेत. व त्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...व्यवस्थेकरितां प्रांतीय मंडळाचें अवश्य तें साह्य घ्यावें.

सू.- ५. ना. ह. जोशी अनु.- वै. ह. भा. भिडे सर्वसंमत

प्रस्ताव ११— बाहेर देशांतून भारतांत येणाऱ्या व आयुर्वेदीय औषधीकरणास लागणाऱ्या कच्च्या ...वर केंद्रीय सरकारनें जबरदस्त आयातकर ठेवला आहे, तो रद्द व्हावा. तसेंच जीं द्रव्यें औषधीकरणास ...जात, व जीं जनतेस दैनंदिन व्यवहारांत उपयुक्त आहेत, अशीं द्रव्यें सरकारनें नियंत्रित दरानें (क्विनीन- ...) वैद्यांना व औषधीशाळांना पुरवावींत.

सू.- वै. वि. मो. दाते अ.- वै. भगवंत त्र्यंबक वैद्य सर्वसंमत

प्रस्ताव १२— महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळाच्या घटनेमधील उद्देशांत खालील उद्देशाचा अंतर्भाव ...वा; असें या सभेचें मत आहे.

"उद्देश क्रमांक ८— वरील उद्देशाच्या पूर्तीकरतां स्थावरजंगमात्मक (शेअर्स, ट्रस्ट इ. रूपानें) ...णग्या व सदस्य वर्गणी मिळवणें."

सू.- वै. वि. म. गोगटे अ.- वै. बिंदुमाधव पंडित सर्वसंमत

प्रस्ताव १२ (अ)— महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाचे भूतपूर्व वैद्य अध्यक्ष हे महाराष्ट्र प्रांतीय ...मंडळाचे कायम सदस्य गणले जावेत.

सू.- वै. वि. म. गोगटे अ.- वै. बिंदुमाधव पंडित. सर्वसंमत

प्रस्ताव १२ (ब)- महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाचे कार्यालयाचे स्थिर व चल असे २ भाग ...वेत व या कार्यालयाचें कामांची विभागणी, परिस्थिति व कार्यांच्या सोयीचे दृष्टीनें अध्यक्षांनीं करावी.

सू.- वै. वि. म. गोगटे अ.- वै. बिंदुमाधव पंडित सर्वसंमत

प्रस्ताव १३:— मुंबई प्रांतांतील सर्व सरकारी व निमसरकारी रुग्णालयांतून (सिव्हिल हॉस्पिटल) ...द्ध आयुर्वेदीय उपचारासाठीं कांहीं रुग्णशय्या राखून ठेवल्या जाव्यात अशी ह्या संमेलनाची सरकारला ...नंति आहे.

सू.- वै. म. भा. वाटवे अ.- वै. शं. बा. शंड्ड सर्वसंमत

प्रस्ताव १४:— महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनास जाऊन येणाऱ्या प्रतिनिधींना केंद्र सरकारनें ...ती कन्सेशन तिकिटें मिळण्याची व्यवस्था करावी अशी ह्या संमेलनाची केंद्र सरकारला आग्रहाची विनंति ...हे.

सू.- वै. अं. बं. जोशी अ.- वै. ज. ल. रामैया सर्वसंमत

प्रस्ताव १५:- अफू, भांग, गांजा यांना हे पदार्थ आयुर्वेदीय औषधी कल्पांत आयुर्वेदीय पद्धतीनें ...करूनच घातले जातात. तसेंच त्यांत ह्या पदार्थांबरोबर तद्दोषप्रतिकारात्मक द्रव्यें असल्यानें आणि ...नीं युक्त आयुर्वेदीय औषधीकल्प रुग्णांना उपयोगी व व्यसनी लोकांना निरुपयोगी होत असल्यानें हीं ...र्युक्त औषधीकल्पावर हीं द्रव्यें एकाकी स्थितींत असतांना असलेले सरकारी अबकारी निर्बंध ...नयेत.

अफू, भांग, गांजा, मोहाचीं फुलें इ. पदार्थांची ने आण करण्याची लयसेन्सिस अगर परवाने ...मिळविण्यांत फार विलंब होतो. व एकाचे विलंबानें दुसरा परवाना विफल होतो. सबब ह्या द्रव्यांवरील ...हतुक नियंत्रण अधिक सोयीचे करावें अशी संमेलनाची सरकारला विनंति आहे.

सू.- वै. पु. वि. घामणकर, अ.- वै. स. भा. जोशी.

प्रस्ताव १६:— नागपूर विश्वविद्यालयानें आयुर्वेदीय संशोधनाकरितां वैद्य आयुर्वेदाचार्य वेणी- ...माधवशास्त्री जोशी यांची संशोधक म्हणून नेमणूक केली, याबद्दल वैद्यराज वेणीमाधवशास्त्री जोशी यांचें ...आणि त्याचरोबर नागपूर विश्वविद्यालयाचें ही सभा हार्दिक अभिनंदन करिते. सू.- अध्यक्ष सर्वसंमत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्ताव १७— आयुर्वेदीय चिकित्साक्षेत्रांत अस्थिसंधान, संग्रहणी, पांडु, मूळव्याध, नारू इ. रोगांवर हमखास गुण देणारीं औषधें कांहीं कांहीं घराण्यांतून विद्यमान आहेत. हीं बहुमोल औषधें टिक करितां हीं औषधें देणाऱ्या लोकांना वैद्यकीय परवाने देण्यांत यावेत, अशी ह्या संमेलनाची सरकारला वि आहे. ट्रिब्यूनलनें अशा वैद्यांना नकार दिलेला आहे. हा विषय ट्रिब्यूनलच्या कक्षेतील आहे म्हणून ह्याचा फेरविचार करावा. सू.— वै. स. भा. जोशी. अ.— वै. गणपतराव गु

प्रस्ताव १८— हैद्राबाद राज्य सरकारनें आयुर्वेदाच्या उत्कर्षासाठीं जी योजना आखून कृतींत आणली आहे, ती अधिक यशस्वी व्हावी या दृष्टीनें हें संमेलन हैद्राबाद सरकारास योजनांत योग्य त्या सूचना करण्यासाठीं खालील वैद्यांची एक समिति नियुक्त करीत आहे. हैद्राबाद सरकार या स तीच्या सूचना व योजनांना मान्यता देऊन त्या प्रत्यक्ष कृतींत आणील अशी आशा हें संमेलन करीत आहे. सू.— वै. लक्ष्मीबाई बोरवणकर. अ.— वै. देसवंडीकर. सर्वसंमत

समिति सदस्य :— १) वै. गोपाळशास्त्री देव, मु. पो. जि. नांदेड (संयोजक). २) वै. ज्ञानेश्वर मोरे, मु. पो. देगलूर जि. नांदेड. ३) वै. विठ्ठल पंडित महाजन, मु. पो. पैठण जि. औरंगाबाद ४) वै. र. कृ. केसकर, रघुनाथबाग, सुलतान-बाजार, हैद्राबाद. ५) वै. चंपालाल नागोरी, मु. डाकघर पैठण. ६) वै. विंदुमाधवशास्त्री पंडित, नाशिक. शिवाय ४ सभासद त्या सभासदांनीं निवडून घ्यावेत.

प्रस्ताव १९— गोवा प्रांतांत आयुर्वेदपद्धतीप्रमाणें चिकित्सा करण्यास पूर्णपणें बंदी आहे. गोवा प्रांत बेळगांव, रत्नागिरी जिल्ह्यांना संलग्न असा महाराष्ट्राचा भाग आहे. म्हणून गोव्यांतील आयुर्वेद चिकित्साकार्यास असलेली बंदी उठवावी अशी या संमेलनाची गोवा प्रांत सरकारास विनंति आहे.

सू. वै.- विंदुमाधव पंडित अ.- वै. ना. ह. जोशी. सर्वसंमत

प्रस्ताव २०—नाशिक येथील आयुर्वेदीय पाक्षिक नियतकालिक 'आयुर्वेदपत्रिका' म. प्रां. वैद्य मंडळाच्या प्रसार व प्रचार कार्यांस बरेंच साह्य करीत असतें. म्हणून त्या पत्रास तीनशें एक (३०१) रुपये साह्य करावें अशी हें संमेलन शिफारस करीत आहे व साह्याविषयीं संपादकांकडून आलेल्या मागणीचा स्वीकार करीत आहे. सू. वै. रामभाऊ भोगे अ.- वै. का. सी. भावे सर्वसंमत

प्रस्ताव २१—सरकारनें स्वतः मोठी ग्रँट देऊन मिरज येथें मिशन हॉस्पिटलला जोडून मेडिकल कॉलेज काढण्याची तयारी केली, पण नंतर तो बेत रहित झाल्याचें कळतें. केवळ आयुर्वेदीय विद्यालय व रुग्णालय काढण्याच्या दृष्टीनें मिरज हें केंद्र सोयीचें आहे. तरी ही साधनसामुग्री सरकारनें केवळ आयुर्वेदीय विद्यालय व रुग्णालय काढण्याकरितां देऊन आयुर्वेदाचे कार्याला स्वतः प्रारंभ करावा, अशी हें संमेलन विनंति करीत आहे. सू.-वै. वेणीमाधवशास्त्री अ.-वै. स. भा. जोशी सर्वसंमत

प्रस्ताव २२— सरकारच्या ॲलोपॅथीच्या जोरदार प्रचारामुळें आयुर्वेदाचा लाभ सर्वतोपरी असा जनतेस मिळणें कठीण झालें आहे, म्हणून आयुर्वेदप्रचारार्थ ११ वैद्यांची एक मुख्य मध्यवर्ती प्रांतीय प्रचार समिति नेमावी व तिच्या नियंत्रणाखालीं जिल्हानिहाय वैद्य संघटना घडवून खालील साधनांनीं प्रचार कार्य करावें. [१] खेडोपाडीं कलापथकानिशीं व्याख्यानें. [२] जिल्ह्यांतून शुद्ध आयुर्वेदीय रुग्णालयें काढण्याविषयीं व त्याचा तुलनात्मक अहवाल (ॲलोपाथी दृष्ट्या) प्रसिद्ध करणें. [३] प्राथमिक शिक्षणक्रमांतून, तसेंच वर्तमानपत्रें, मासिकें, सिनेमा, रेडिओ इत्यादि साधनाद्वारां प्रचाराची तरतूद. [४] ग्रामपंचायती, म्युनिसिपालिट्या, लोकसभा, विधानसभा इ. मधुन आयुर्वेदतज्ञ निवडून आणण्याची योजना [५] पंचवार्षिक योजना मार्फत साजरे होणारे आरोग्य सप्ताह इ. मधून आयुर्वेद प्रचार. [६] सार्वजनिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैयक्तिक स्वास्थ्यरक्षणाचे दृष्टीनें जनतेला ज्ञान देण्याचे दृष्टीनें आयुर्वेदतज्ज्ञ व प्रभावशाली व्याख्यात्यांनी प्रांतभर हिंडून प्रयत्न करणें. सू.-वै. बी. ए. सातभाई अ.-वै. अवसेकर सर्वसंमत

प्रस्ताव २३:—पुणें वैद्यक मंडळाचे विनंतीस अनुसरून महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाचें पुढील अधिवेशन, स्थायी समिति व कार्यकारी मंडळाचे सल्ल्यानें पुणें येथें भरविण्याचें आमंत्रणाचा हें संमेलन स्वीकार करीत आहे. सू.- वै. ह. भा. भिडे, अ.- वै. गणेशशास्त्री जोशी सर्व संमत

प्रस्ताव २४:—पुढील वर्षाच्या महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाच्या कार्यासाठीं खालील सभासदांची स्थायी समिति व का. का. मंडळ हें संमेलन नियुक्त करीत आहे. खुणा असलेले सदस्य का. का. मंडळांत घेतले आहेत.

स्थायी समिति

१ रत्नागिरी जिल्हा— वै. द. का. थत्ते (चिपळूण), वै. पां. म. भिडे (रत्नागिरी), वैद्य गणपत्ये.
२ पुणें ,, — वै. ह. भा. भिडे, वैद्य द. बा. शेंड्ये, वै. पां. ह. देशपांडे.
३ कुलाबा ,, — वै. गं. वि. पुराणिक, वै. न. पु. जोशी, वै. ना. र. गांगल.
४ ठाणे ,, — नी. कृ. भावे (कल्याण), वै. द. ब. वैद्य (ठाणें), वै. शं. बा. सांडू (चेंबूर).
५ बृ. मुंबई — वै. आनंदे, वै. लक्ष्मीबाई बोरवणकर, वै. ना. ह. जोशी, वै. रामभाऊ मोगे, वै. प्रतापकुमार, वै. वामनराव दिनानाथ.
६ बेळगांव जिल्हा— वै. म. भा वाटवे, वै. अ. बा. जोशी, वै. विश्वनाथ मुजुमदार.
७ मराठवाडा ,, — वै. वि. प. महाजन, गोपाळशास्त्री देव, वैजनाथजी, ईश्वर (लातूर) (रिझर्व पांडुरंगराव वीरकर, लातूर)
८ नासिक- वै. वि. मो. दाते, ज. ल. रामय्या, वै. अनंत बं. जोशी (येवले).
९ पूर्वखानदेश- वै. का. सी. भावे, वै. ब्रह्मदत्त शर्मा, वै. मो. ल. ठोंबरे.
१० पश्चिमखानदेश- वै. भगवन्त त्र्यंबक वैद्य, वैद्य द. अ. फुलंब्रीकर, वै. करंजीकर.
११ अहमदनगर- वै. देसवंडीकर, वै. सातभाई, वै. देशपांडे.
१२ सोलापूर- वै. गणपतराव लवंगे, वै. फु. शि. दोशी, वै. द. म. तांबेकर.
१३ उ. सातारा- वै. गो. आ. फडके, वै. ग. कृ. पाटणकर, वै. केशवराव साहेबराव आनंदे.
१४ द. सातारा- वै. स. भा. जोशी, वै. ग. मो. वझे, वै. म. द. करमरकर.
१५ कोल्हापूर- वै. ग. य. गुणे, वै. नाटोलीकर, वै. बी. वी. उपाध्ये.

अध्यक्ष— वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर
मंत्री १— ,, बिंदुमाधवशास्त्री पंडित. २-- वै. ब्रम्हदत्त शर्मा.
खजिनदार— वै. म वि. पुराणिक.

गुळवेल सत्व व वाकेरी भाते ५ रु. रत्तल. उत्तम मध, दशमुळें व इतर २०० फौंडाघाटच्या वनस्पती व त्यांचीं चूर्णें मागणीप्रमाणें पुरवूं.
परुळेकर ब्रदर्स, मोंगल लेन, मुंबई १६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय शूलरहित दंतोत्पाटनकलेचें अमेरिकेंत स्वागत

गेल्या एप्रिल महिन्यांत दिल्ली येथें झालेल्या धर्मार्थ दंतयज्ञांत वैद्य पां. वि. जायदे यांचें दोन्ही हातांनीं एकाच वेळीं दोन दोन दांत शूलरहितपद्धतीनें (इंजिक्शनविना) काढण्याचें कौशल्य पाहून अमेरिकेच्या टाईम अँड लाइफ नांवाच्या वृत्तपत्राचा बातमीदार आश्चर्यचकित झाला. त्यानें उपरोक्त कलेचे अनेक फोटो घेऊन सविस्तर माहितीसह अमेरिकेंत पाठविले. लाईफ मासिकाच्या ता. २५ मे च्या अंकांत प्रसिद्ध झालेले असून, वैद्य जायदे यांच्या कला–कौशल्याबद्दल खालील माहिती प्रसिद्ध झाली आहे.

Painless Pulling—yoga Style

Ancient Body Controlling Technique to Extract teeth at assembly line speed.

"Two teeth are pulled at once by the ambidextrous * teeth-puller P. V. Jayade, who stands above his patient & prepares for a simultaneous yank with two pairs of forceps." [* सव्यसाची]

"The ambidextrous pair set a steady pace of more than 700 extractions a showing that rivals that of America's famous assembly line dentist, the late Painless Parker."

'Life' Magazine, New Yark
25 May 1953

इंग्रजी मन

भाषाविकासपरिषदेंत डॉ. रघुवीर यांनीं पुढील उद्गार काढले. 'इंग्रज गेला' पण 'येथें इंग्रजी मन मात्र राहिलें आहे' व ही अत्यंत लज्जास्पद गोष्ट आहे. काय वाटेल ती किंमत देऊन हें परिवर्तन घडवून आणलें पाहिजे." आयुर्वेदीयांनाहि हाच अनुभव येत आहे.

वृश्चिकदंशांतील विषाम्ल निष्क्रिय करणारा उपाय

आयुर्वेद पत्रिकेच्या ता. १ एप्रिल १९५३ च्या अंकांत वृश्चिक विष (फॉर्मिक ॲसिड) निर्बल करणारा उपाय वैद्य ग. कृ. पाटणकर यांनीं विचारला आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या "इंजेक्शन-चिकित्सा" ग्रंथांत पान २५७ वर खालील उपाय सुचविला आहे. "दंशस्थानाभोवतीं सोडाबाय कार्बचें २% चें मिश्रण २ सी. सी. पर्यंत टोचावें."

—डॉ. द. आ. घाटगे

द्रव्यगुणशास्त्र

झांसी आयुर्वेद विद्यापीठाच्या संशोधन विभागातर्फे आयुर्वेद वाचस्पति प्रा. भा. ना. भागवत यांनीं लिहिलेलें द्रव्यगुणशास्त्र हें पुस्तक प्रकाशित होणार आहे असें कळतें.

इंजेक्शन-चिकित्सा

पाश्चात्य इंजेक्शन चिकित्सेवरील अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिलेला अभिनव मराठी ग्रंथ. २६ प्रकरणें, ३०० वर रोगांची अद्यावत् चिकित्सा. २७० पृष्ठें, जाड बांधणी. 'सचित्र इंजेक्शन विज्ञान' प्रमाणेंच हाहि ग्रंथ लौकरच दुर्मिळ होण्याची शक्यता आहे. त्वरीत मागणी करा. किंमत ६ रु., ट. ख. निराळा.

१ सुबोध वैद्यक ग्रंथमाला
मु. पो. कागल [S.M.C.]
२ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

पवित्र नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहा:–नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माझ्या मामांचा दमा :

लेखकः-- वृद्धवैद्य
मध्य प्रदेश

माझे मामा हे या प्रांतांत प्रसिद्ध वैद्य होते. त्यांचा नियम असा असे कीं प्रातःकाळीं सूर्योदयापूर्वी स्नान केल्याखेरीज व सूर्योदयाला सूर्यास अर्घ्य दिल्याखेरीज ते त्या दिवशीं अन्नग्रहण करीत नसत. या नियमामुळें कित्येक वेळा, विशेषतः प्रवासांत, उपोषण प्रसंग येत असे.

हरिद्वारला प्रातःकालीं गंगास्नान

एकदां ते हरिद्वाराला गंगास्नान करण्याकरतां तारुण्याच्या वयांत म्हणजे २५ वर्षांचे असतांना गेले. तेथे दोन कुंडें आहेत. एकांत पाणी थंड रहात असून दुसऱ्यांत मात्र बरेंच ऊन असें असतें. सूर्योदयापूर्वी स्नानाचा नियम असल्यामुळें यांनीं प्रथम थंड कुंडामध्यें डुबकी घेतली व सूर्योदय लवकरच होणार म्हणून तावडतोब ऊन पाण्याच्या कुंडांत आणखीच डुबकी घेतली. तेथून बाहेर येतां क्षणींच त्यांना श्वास सुरूं झाला; आणि स्वतः इतके प्रसिद्ध वैद्य असून व इतरांचे कित्येकांचे श्वास बरे केले असून देखील त्यांना स्वतःला आपला रोग बरा करतां आला नाहीं. आणि तो जन्मभर म्हणजे त्यानंतर २७ वर्षे तो भोगून शेवटीं त्यांतच त्यांचा अंत झाला.

श्वासरोगावरील आधुनिक चिकित्सा निरुपयोगी

यामुळें मला या व्याधींचा अनुभव घेण्याचा प्रसंग अत्यधिक आला. आणि तो इतरांस उपयोगी व्हावा म्हणून थोडा विस्तारपूर्वकच येथें देत आहे. त्याचप्रमाणें या श्वासावर आधुनिक चिकित्साशास्त्रांतील उपाय किती निरुपयोगी ठरतात हेंहि पण—शास्त्राची निंदा करण्याच्या दृष्टीनें नव्हे परंतु लोकांस उपयोग व्हावा म्हणून—वर्णन करीत आहे.

लंघनानें कफ निघून दमा बरा

आमच्या मामाचे अत्यंत घनिष्ट एक मित्र त्यांच्याकडे आले असतांना, त्यांची ती श्वासपीडित अवस्था त्यांनीं पाहिली. या श्वासाचा घाला (attack) आला म्हणजे मामांचा नियम असा असे कीं, कडक लंघन करून दहा दिवसपर्यंत अन्न ग्रहण अजिबात करावयाचें नाहीं. तसें केलें म्हणजे दररोज बराचसा कफ निघून जाऊन श्वासाचा घाला आपोआप बरा होत असे. आणि या दहा बारा दिवसांत क्षीण झालेली शक्ति चार आठ दिवसांत अन्न सुरूं झाल्यावर भरून येत असे. आणि ते पुन्हां पूर्वीप्रमाणें ताजेतवाने दिसूं लागत. हा त्रास जवळ जवळ प्रत्येक ऋतु बदलण्याचे वेळीं म्हणजे वर्षांतून पांच सहादां येत असे. आणि त्यावर कोणतेंहि औषध न घेण्याचा असा साधारणतः नियम ते पाळीत असत.

मार्फियाचें इंजेक्शन दिलें

असा क्रम चालूं असतांना वर लिहिलेले मित्र एका घाल्याचे वेळीं आले. व त्यांनीं ती स्थिति पाहून ॲलोपॅथिक उपचार करावा असें ठरविलें व त्याकरितां आमच्या प्रांतांत त्यावेळीं (१९१८ सालीं) असलेले एक प्रसिद्ध डॉक्टर उपचाराकरितां बोलाविले गेले. डॉक्टरांनीं येतां क्षणीं श्वासाची त्यावेळीं असलेली कष्टदायक स्थिति पाहून ती तावडतोब थांबावी म्हणून त्यांना ' मार्फिया ' चें एक सूचिकाभरण (इंजेक्शन) दिलें. आमच्या दुर्भाग्यानें तेंच मामांच्या प्राणनाशास कारणीभूत झालें. तें असें—

पुनः न घेण्याबद्दल सूचना

हें इंजेक्शन देतां क्षणीं श्वास अजिबात थांबला आणि आमच्या मामांस असें वाटावयास लागलें कीं, हें औषध म्हणजे एक अमृतच आहे. आणि असें तें मिळवून दिल्याबद्दल त्यांनीं डॉक्टर मजकुरांचे फार फार आभार मानले. व आपल्या मित्रासहि धन्यवाद दिले. डॉक्टर आपली १०० रुपये फी घेऊन परगांवीं रवाना झाले. परन्तु जातांना त्यांनीं इतकें मात्र बजाविलें कीं, पुन्हां या सूचिकाभरणाचा उपयोग करूं नये.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंजेक्शनबद्दल मामांचा आग्रह

या इंजेक्शनमुळें चोवीस तास मुळींच श्वासाचा त्रास झाला नाहीं. त्यानंतर मात्र पुन्हां तसाच चालू आला. आणि तेंच औषध पुन्हां देण्याकरितां मामांचा आग्रह एकसारखा सुरू झाला. औषध उपलब्ध नाहीं, देणारे डॉक्टर मिळत नाहीत इत्यादि अनेक सबबी त्यांना सांगण्यांत आल्या. परन्तु कशाचाहि परिणाम न होऊन ते इतके हट्टास पेटले कीं, आम्हास दुसरा कांहीं उपायच उरला नाहीं. आणि पुन्हा तेंच सूचिकाभरण द्यावें लागलें.

परिणाम फक्त २० तास टिकला

त्यानंतर त्याचा परिणाम फक्त २० तास राहिला आणि पुन्हां पूर्ववत् स्थिति प्राप्त झाली. औषध, डॉक्टर उपलब्ध होत नाहींत हीं सारी सबब मुळींच न चालतां पुन्हां तेंच इंजेक्शन द्यावें लागलें. परिणाम फक्त १६ तास राहिला. याप्रमाणें चवथ्याचा १२ तास, पांचव्याचा ८ तास, सहाव्याचा ४ तास आणि ७वें इंजेक्शन दिल्यानंतर १० मिनिटांनीं तीच स्थिति आली असें ते बोलावयास लागले. आणि एकसारखी नाडी क्षीण होत चालली. शेवटीं अनेक वैद्य व डॉक्टर येऊन प्रत्येकानें हात टेकले आणि आठ तासांत त्यांचा अन्त झाला.

ह्या विषप्रयोगामुळें अपमृत्यु

आम्हांस अजूनहि असें वाटतें कीं, जर त्या दिवशीं तें पाहिलें सूचिकाभरण दिलें गेलें नसतें तर ते अनेक वर्षे टिकले असते. आणि हा त्यांचा मृत्यु खरा मृत्यु नसून विषप्रयोगामुळें आलेला अपमृत्यु होय. कारण वर वर्णन केल्याप्रमाणें श्वासपीडित मनुष्य हा अनेक वर्षे कष्ट भोगत असतांना जगतो, असा अनुभव आहे. या करितां श्वासपीडित मनुष्यानें अशा प्रकारचीं विषारी द्रव्यें उपयोगांत आणून तात्कालिक बरें वाटतें, म्हणून त्याचा उपयोग सतत करीत राहूं नये. पुढें श्वास चिकित्सेंत वर्णन केलेल्या नियमाप्रमाणें वागल्यास आणि अन्नपचनक्रिया नीट ठेवल्यास या व्याधीचे दुष्परिणाम होत नाहींत, हें लक्षांत असूं द्यावें.



बालकें
गृहसौख्य वृद्धिंगत करतात.
'बालजीवन'
बालकांची वाढ करतें.
धूतपापेश्वर
इंडस्ट्रीज् लि., पनवेल-मुंबई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रससिंदुर-मिश्रण

श्वास व कास यांवर अनुभविक उपाय

रसशिंदुर तो. ४, सुंठ, मिरे, पिंपळी, पिंपळ-मूळ, तालिसपत्र, लवंग, काकडशिंगी, कुलिंजन, ...मूळ, केशर, जायफळ, जायपत्री, अक्कलकारा–हीं वस्त्रगाळ चूर्णं प्रत्येकीं १ तोळा.

प्रक्रिया– रसशिंदूर खलांत १ तास घोटून प्रत्येक वस्त्रगाळ चूर्ण १ तोळा घालून त्याचा एक तास खल करावा. सर्व चूर्णे एकदम घालून केल्यास औषध जितकें प्रभावशाली व्हावयास ...तितकें होत नाहीं. एक एक चूर्ण घालून तास घोटून तयार केल्यास सूक्ष्म प्रमाणांत देऊनहि साधारण श्वास व कास यांवर गुणकारी होतें.

प्रमाणः— वयमानाप्रमाणें पाव ते १ गुंज ...वेळीं दिवसांतून २ वेळ देणें. खोकला फार ...असल्यास पुडीच्या मानानें त्यांत जवक्षार ...घालून द्यावें. खूप कफ पडत असेल तर पुडीच्या ...मयूरपिसाचें भस्म घालून द्यावें.

अनुपान– मध किंवा खडीसाखरेचा पाक.

पथ्य– तेलकट, आंबट वातूळ वर्ज्य. हलकें अन्न ...रात्रीं विकारी इसमास नुसती कॉफी पिण्यास ...किंवा अधणाचें फडक्यावर गाळलेलें पाणी ...द्यावें. सूचक–भिषग्रत्न ग. कृ. पाटणकर

पं. प्रियव्रत शर्मा एम्. ए.

आयुर्वेदाचार्य पं. प्रियव्रत शर्मा एम्. ए. ...ची नेमणूक बनारस हिंदु विश्वविद्यालयांत आयुर्वेद ...गांत लेक्चरर म्हणून झाली आहे असें समजतें.

स्वर्गीय पं. वामदेव शर्मा

बिहार प्रांतांतील प्रख्यात शालाक्य (नेत्र) ...चिकित्सक पं. वामदेव शर्मा आयुर्वेदाचार्य यांचा ...२५।५।५३ रोजीं वयाच्या ५४ व्या वर्षी देहांत ...झाला. हे १९२६ पासून पाटणा सरकारी आयुर्वेद ...महाविद्यालयांत अध्यापक होते. यांनीं शल्यतंत्र ...समुच्चय नांवाचें पुस्तक लिहिलें आहे.

अनुक्रमणिका

नाशिक जि. वैद्य संमेलनाचे अध्यक्ष वै. वि. दा. एकतारे	१
नागदमनी	३
तृणज्योतीकल्प	६
श्वास (दमा) रोगनिदान	७
विंचूदंशावर उपाय	११
विदर्भ आयु. महावि. वार्षिक परीक्षेचा निकाल	१२
कालकूट	१३
फार्मास्युटिकल चौकशी समिती	१५
लातूरचें यशस्वी वैद्य संमेलन	१६
दोष चिकित्सा	१७
भावी उत्कर्षाची पताका	१९
आयुर्वेद हेंच राष्ट्रीय वैद्यक	२०
आयु. व युनानी तिब्बी परीक्षा निकाल	२१
महाराष्ट्र प्रां. वैद्य संमेलन, लातूर ठराव	२३
दंतोत्पाटन कलेचें अमेरिकेंत स्वागत	२८
माझा मामांचा दमा	२९
रसशिंदुर–मिश्रण	३१

आयुर्वेदाचे सिद्धांत स्थिर आहेत

तुमसर येथें राजाराम आयुर्वेदीय धर्मार्थ औषधालयाचें उद्घाटन करतांना मध्यप्रदेश आयुर्वेद युनानी बोर्डाचे अध्यक्ष प्राणाचार्य श्री. गोवर्धन शर्मा छांगाणीजी म्हणाले, आयुर्वेदीय चिकित्सापद्धति शास्त्रीय नाहीं असें जे म्हणतात, ते भ्रमांत आहेत. आयुर्वेदाचे सिद्धात आजहि अटल आहेत. ज्याचे सिद्धांत स्थिर तेंच विज्ञान खरें. सरकारी मदती अभावीं आयुर्वेदाचें योग्य ज्ञान विद्यार्थ्यांना मिळण्याची व्यवस्था होऊ शकत नाहीं. ”

या औषधालयावर साहित्य–व्याकरण–आयुर्वेद–आचार्य वैद्य श्री. विश्वनाथ जोशी यांची योजना झाली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुक्कुटांडापासून तयार केलेलें, शुद्ध, स्वस्त आणि खात्रीचें

अंड्याचें तेल ५ तोळे किं. ७॥ रु.

औषधांचीं नांवें	तोळे	किंमत रु.	औषधांचीं नांवें	तोळे	किंमत रु.
अकीक भस्म	५ तो.	४-०-०	हरताळ (गोदन्ती) भस्म	५ तो.	१-०-०
कपर्दिक भस्म	,,	१-०-०	बेरपत्थरभस्म मुळ्यानें	,,	३-०-०
कासव (कछुवा) भस्म	,,	३-०-०	बेरपत्थरभस्म (विंचुयोगानें)	१ तो.	१-८-०
कुक्कुटांड भस्म	,,	३-८-०	अभ्रकभस्म शतपुटी (अजारक्त भावित)	,,	१०-०-०
कर्कट (खेकडा) भस्म	,,	२-८-०	अजायकृत भस्म (रक्तवर्धक)	,,	३-०-०
जहरमोहरा भस्म	,,	१-४-०	अजाफुफ्फुस भस्म (क्षयकास)	,,	३-०-०
प्रवाळ भस्म (सूर्यपुटी)	,,	४-०-०	अजाअस्थि भस्म (अशक्ततेवर)	,,	२-८-०
प्रवाळ भस्म (अग्निपुटी)	,,	४-०-०	गाण्डूळ (भूनाग) भस्म (दुग्धवर्धक)	,,	४-०-०
मंडूर भस्म (त्रिफळा गोमूत्र)	,,	१-४-०	ताम्रभस्म (वनस्पतिमारित)	,,	१-८-०
मौक्तिकशिप (शौक्तिक) भस्म	,,	१-१२-०	पोलादभस्म अपूर्व टॉनिक	,,	४-०-०
शंख भस्म (निंबु, कुमारी)	,,	१-०-०	संगेयशवभस्म (ब्रेन टॉनिक)	,,	१-८-०
गुळवेलसत्व (कडुनिंबावरील)	,,	२-०-०	त्रिफळाचूर्ण कपडछान	१ शेरास	१-०-०
सांबरशृंग भस्म	,,	१-०-०			

मिश्रा महाराष्ट्र फार्मसी [रजि.] ब्रम्हपुरी [चांदा] म. प्र.

कौटजादिशिलाजतु + जसदभस्म

अष्टांगहृदयांत पांडुरोगचिकित्सेंत " कौटज-त्रिफला-निंब-पटोल-घन-नागरैः " इत्यादि श्लोकांत एका सिद्ध शिलाजतुची योजना दिली आहे. संतर्पणजन्य पांडु, प्रमेह आदि रोगांत घेण्यास हा कल्प प्रशस्त आहे. (सर्वरोगहराः शिवाः) आयुर्वेद सेवा संघानें तो तयार करून अनुभव घेतला आहे. मधुमेही लोकांनीं रोज सकाळीं व सायंकाळीं १ ते २ मासे कौटजादि शिलाजतु + १-१ गुंज जसदभस्म हें मिश्रण मधांतून घेऊन २ तोळे तेलिया असाण्याचें पाणी प्याल्यास एक महिन्यांत त्यांना बराच फायदा झाल्याचें आढळून येईल. सबब लौकर गुण हवा असलेल्या लोकांनीं तेलिया असाण्याचें पाणी चालू ठेवून वरील मिश्रण घ्यावें अशी शिफारस आहे. शिवाय मधुमेहाचें पथ्य पाळावें.

आयुर्वेद सेवा संघ, औषधीभवन, नाशिक

संपादक व प्रकाशकः—वैद्य विद्माधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक
मुद्रकः—श्री. दामोदर महादेव चन्द्रात्रे, विज्ञान प्रेस, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ७ वें) नाशिक, ता. १६ जुलै १९५३ (अंक २ रा

द. कृ. सांडू ब्रदर्स (चेंबूर) तर्फे आचार्यांचा सत्कार

आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी यांची नेमणूक नागपूर विद्यापीठांत आयुर्वेदाचे ...सी (रीडर) या स्थानावर झाली. त्यानिमित्त त्यांचा अनेक ठिकाणीं जाहीर सत्कार झाला. ... चित्रांत चेंबूर येथें सुप्रसिद्ध आयुर्वेदीय औषधी कारखानदार द. कृ. सांडू ब्रदर्स लि. चे ...िंग डायरेक्टर श्री. गो. कृ. तथा आबासाहेब सांडू हे आचार्यांना हारतुरे अर्पण करीत आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अधिक कार्यक्षम संस्था
कशी करावी ?

श्री. मुरारजी देसाई, मुख्य मंत्री (मुंबई राज्य) यांनीं घटप्रभा येथील दोन सार्वजनिक रुग्णालयांचे संचालक मंडळींना असें सुचविलें कीं, त्यांनीं आपल्या दोन्ही संस्थांची स्थावर जंगम मिळकत एकत्र करावी व एकच पण अधिक सुसज्ज व कार्यक्षम संस्था

मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री

श्री. मुरारजी देसाई

निर्माण करून लोकास अधिक चांगला व सुखसोयपूर्ण औषधोपचार मिळावा, अशी व्यवस्था करावी; ' श्री जगद्गुरु गुरुसिद्धेश्वर सहकारी रुग्णालयाची ' कोनशिला बसवितांना त्यांनीं वरील विचार मांडले.

वरील सहकारी हॉस्पिटलला श्रीस्वामीजी 'मुरुसवीर मठ' हुबळी यांचेकडून जमीन (प्लॉट) व इमारती मिळून सुमारें एक लाख रुपयांची देणगी मिळाली आहे. हें हॉस्पिटल स्वामीजींनीं १६ वर्षांपूर्वी लहानशा दवाखान्याच्या स्वरूपांत उघडलें होतें.

सुसज्ज दवाखान्याचें एकंदर एस्टिमेट ४ लाख रुपयांचें असून, आतांपर्यंत १॥ लाख रुपये जमा झाले आहेत.

ही गोष्ट स्तुत्य नाहीं

भाषणाचे ओघांत मुख्यमंत्री म्हणाले कीं, ए मैलाच्या परिसरांत दोन सार्वजनिक रुग्णालयें असें ही गोष्ट स्तुत्य नाहीं. तुमच्या सहकारी भाव लोकहितार्थ १ मैलाच्या परिसरांत असलेल्या या दो सार्वजनिक हॉस्पिटल्सचें एकीकरण करून दाख पाहिजे.

निसर्गाचे नियम पाळा

रुग्णालयांची गरजच कमी लागावी हा रिनां लोकांनीं निसर्गाचे नियम अधिक कटाक्ष पाळावेत. पुढें त्यांनीं असेंहि सुचविलें कीं हॉस्पिटल्स्नीं आपल्या परिसरांतील लोकांम आरोग्यदायी राहणीविषयीं आत्मीयता निर्मा करावी. त्यामुळें रोगराईस आपोआपच प्रतिबं होईल.

रस्ते केव्हां झाडावेत ?

दररोज रात्रीं शहरांतील रहदारी थंडावल्यानं मास्कोच्या हमरस्त्यावरून व प्रशस्त चौकांतून र साफ करणाऱ्या गाड्या फिरूं लागतात.

हीं यंत्रें ९५ लक्ष ६८ हजार स्क्वेअर व जागा साफ करतात. ज्या संस्थेकडे रस्ते साफ करण्या काम आहे त्या संस्थेच्या ताब्यांत असलेलीं हीं यं केवळ रात्रींच नव्हे तर दिवसाहि रस्ते काळजीपूर्व झाडतात व नंतर पाण्यानें स्वच्छ धुवून काढतात.

हवेंत थंडावा आणण्यासाठीं

उष्ण हवेच्या दिवशीं पाण्याच्या टा असलेल्या गाड्या शहरांतील रस्त्यांवर पाणी शिंपडता व त्यामुळें आजूबाजूला आल्हाददायक गारवा निर्मा होतो. दर दिवशीं या गाड्या मास्कोच्या रस्त्या ३·५ दश लक्ष गॅलन पाणी शिंपडतात. ज्या दिव हवेंत विशेष उष्णता असते त्या दिवशीं रस्त्या बाजूच्या वृक्षांवर व चौकांतील हिरवळींवर पाण्य शिडकावा करण्यांत येतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…वाचकांचा पत्रव्यवहार —

ग्राम चिकित्सक निर्मितीचा कूटप्रश्न ?

…द. न. वि. वि.

खालीं सही करणारे आम्ही डॉ. व्ही. आर. …खडेकर, एम्. बी. बी. एस्. व वैद्य बी. एल्. …डी, रा. जुन्नर (जि. पुणें) आपलें ग्राम वैद्यक …व्यवसायाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधूं इच्छितो, व त्या …प्रश्नाचा आपण काळजीपूर्वक विचार करावा अशी …विनंति करतो.

ग्रामीण वैद्य-डॉक्टरांच्या अडीअडचणी

आम्ही जुन्नर गांवांत आज सुमारें वीस वर्षें …वैद्यकीय व्यवसाय करीत असून, तदनुषंगानें आमचा …अनेक वैद्यक व्यवसायींशीं संबंध येऊन त्यांच्या …अडीअडचणींचें ज्ञान व माहिती आम्हांस चांगली …झालेली आहे.

बायको नर्स, मुलगा कंपौंडर

खेड्यांत अनेक डॉक्टरांना, नर्स, कंपौंडर व …इतर शिवायच काम करावें लागतें. बहुधा व्यवसाय- …प्राप्ती जेमतेमच असते. वापरावयाच्या औषधांच्या …किंमती जास्त असल्यानें, प्रत्यक्ष औषधें विकत …घ्यावयास जितका खर्च लागतो तितकाहि देण्यास बहु- …तेक ग्रामीण जनतेस ऐपत नसते. तेव्हां डॉक्टरच्या …फीचा प्रश्न तर बाजूसच राहातो. खेड्यांतील डॉक्टरला …ड्रेसिंग, कंपौंडिंग वगैरे सर्व कामें स्वतःच करावीं लागत …असल्यास नवल नाहीं. त्याचें हाताशीं त्याचा स्वतःचा …एखादा मुलगा असेल तर तो हीं कामें करण्यास …तयार करूं शकतो व त्याची बायको त्याचे हाताखालीं …नर्स म्हणून काम करूं शकते.

मुलामुलींच्या शिक्षणाची गैरसोय

खेड्यांत शिक्षणाची सोयहि विशेष नसते व …आजूबाजूचें वातावरण तर कुटाळ व ग्राम्य असेंच …असतें, त्याच्या मुलामुलींचें माध्यामिक शिक्षण सोईच्या …अभावीं दुर्लक्षिलें जातें व त्यास उच्च शिक्षण देणें …तर दुरापास्तच होतें.

पूर्वीचा व आतांचा वैद्यकीय व्यवसाय

पूर्वीच्या काळांत, खेड्यांतील वैद्य अगर हकीम आपल्या मुलांस आपल्या वडिलार्जित वैद्यकीय धंद्याचें शिक्षण देत असे व त्या धंद्यावर त्याचा मुलगा त्याच गांवीं स्थाईक होत असे. परंतु आतां आयुर्वेदिक व युनानी रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनर्स निर्माण झाले आहेत. खेड्यांतील लोकांना एफ्. आर. सी. एस्. अगर एम्. बी. बी. एस्. डॉक्टर आणि आयुर्वेदिक अगर युनानी आर. एम्. पी. हे दोघेहि सारखेच असतात. सब घोडे बारा टक्के अशीच त्यांची मनोवृत्ति असते.

वैद्यक व्यवसायाचें खाजगी शिक्षण

डॉक्टरचा मुलगा त्याच्या जन्मजात संस्कारामुळें डॉक्टरीच्या धंद्यांतील ज्ञान लवकर ग्रहण करूं शकतो. अनेक डॉक्टर आपल्या मुलांमुलींना स्वतःचे धंद्यांतील डॉक्टरी शिक्षण देत असल्याचें मला माहित आहे. एखाद्या डॉक्टरचा मुलगा आपल्या बापाच्या हाताखालीं ५।६ वर्षें डॉक्टरी काम करीत असला तर त्यास प्रमाणित डॉक्टर म्हणून ग्राह्य मानण्यास काय हरकत आहे ?

आम्हांस असें वाटतें कीं, ज्या वैद्यक व्यवसायींचीं मुलें त्यांच्या बापाच्या हाताखालीं ५।६ वर्षें काम करीत व शिकत असतील त्यांना शिक्षणानुसार ॲलोपॅथिक, आयुर्वेदिक, अगर युनानी रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनर म्हणून अधिकृत रीत्या ग्राह्य मानावें. सध्यांच्या परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळें व अनेक इतर अडचणींमुळें चालू वैद्यक व्यवसायींच्या मुलांना आजचें वैद्यकीय उच्च शिक्षण घेणें शक्य होणार नाहीं.

या योजनेचा फायदा

हजारों ग्रामीण वैद्यक व्यवसायींची आज देशाला जरूर आहे, व आम्ही वर सुचविलेली योजना अमलांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणली गेली तर त्यापासून बराचसा कार्यभाग होण्यासारखा आहे. हल्लीच्या वैद्यक व्यवसायींनीं आपल्या मुलास ५।६ वर्षें वैद्यकीय शिक्षण देऊन नंतर त्यास त्याबाबत लायकीचें प्रमाणपत्र दिलें तर त्यास खेड्यांतून अधिकृतपणें वैद्यकीय व्यवसाय करतां यावा.

डॉक्टर आणणें परवडत नाहीं

खेड्यांतील बहुसंख्य गरीब जनतेला औषधोपचारासाठीं अतिखर्चामुळें शहरांतून डॉक्टरला आणणें परवडत नाहीं, व त्यामुळें योग्य वेळीं औषधोपचार न मिळाल्यामुळें मृत्युमुखीहि पडण्याची वेळ येते.

जीवनप्राप्तीचा प्रश्न

पदवीधर डॉक्टर खेड्यांत वास्तव्य करून धंदा करण्यास धजत नाहींत, कारण त्यांना त्यांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ झालेल्या खर्चाच्या व्याजाइतकीहि प्राप्ति होईल किंवा नाहीं याची साधार शंका असते.

वैद्यकीय मदतीचा प्रश्न निश्चित सुटेल

पण खेड्यांत वैद्यक व्यवसाय करणारांनीं आपल्या मुलांना अगर मुलींना स्वतःच्या हाताखाली खाजगी रीतीनें वैद्यकीय शिक्षण दिलें व त्यानंतर त्यांना खेड्यांतून अधिकृतपणें व्यवसाय करतां आला तर ग्रामीण जनतेचा वैद्यकीय मदतीचा प्रश्न बराचसा सुलभ रीतीनें सुटेल.

३ ते ५ वर्षांत वैद्यकीय शिक्षण

१०।१५ वर्षें वैद्यकीचा धंदा करणारा वैद्य अगर डॉक्टर आपल्या मुलांस अगर दुसऱ्या एखाद्या होतकरू तरुणास वैद्यकीय कलेचें शिक्षण ३ ते ५ वर्षांत निश्चित देऊं शकेल. इंग्लंड व इतर युरोपांतील देशांमध्यें वरील प्रमाणें शिकवून तयार केलेले डॉक्टर्स उत्तम बुद्धिमान् व संशोधक असे झालेले आहेत.

जुन्नर जि. पुणें. आपले विश्वासू
१-७-५३ डॉ व्ही. आर. भाटवडेकर.
डॉ. बी. एल्. गवळी.

कॅन्सर रुग्णालय, कलकत्ता

कलकत्ता येथें चित्तरंजन कॅन्सर रुग्णालय २ वर्षांपूर्वीं सुरूं झालें. येथें १०० बिछान्यांची सोय असून त्यांपैकीं ४० मोफत आहेत. येथें बाहेरच्या बाहेर तपासून मोफत सल्लाहि दिला जातो. या रुग्णालयांत या रोगावर संशोधनकार्य चालूं आहे. येथील डीप एक्सरे यंत्राची किंमत ३ लक्ष रुपये आहे. डॉ. सुबोध मित्र हे या रुग्णालयाचे प्रमुख आहेत.

संशोधन-शिष्यवृत्त्यांची योजना

मानव कल्याणाच्या निरनिराळ्या क्षेत्रांतील, विशेषतः या ना त्या कारणास्तव मागील काळांत पुरेसें लक्ष न दिलेल्या विषयांच्या संशोधनास चालना देण्याचे हेतूनें, भारत सरकारनें दरमहा प्रत्येकीं २०० रुपयांच्या १०० संशोधन शिष्यवृत्या ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

उमेदवार किमानपक्षीं पहिल्या वर्गांतील पदवीधर (मास्टर) अगर तत्सम पदवीधर असला पाहिजे.

नेपाळमध्यें आयुर्वेदीय डायरेक्टर

नेपाळ राज्यांतील आयुर्वेदीय संस्थेनें आयुर्वेद विभागासाठीं स्वतंत्र डायरेक्टर नेमावा अशी मागणी नेपाळराज्य सरकारकडे केली होती. त्याचा उपयोग होऊन सरदार कविराज शिवनाथशर्मा यांची डायरेक्टर म्हणून नेमणूक झाली आहे. आजवर ॲलोपॅथिक डॉक्टरच या विभागाचें काम पहात असे.

आमच्याकडे 'आयुर्वेद सेवा संघा'चीं भल्लातकासव, कंदर्पवृष्यपाक, कुमारीआसव ग्राईप मिश्चर, एरंडेल, बालशूलार्क, इ. सर्व प्रकारचीं औषधें, गुलकंद, मोरावळा, सरबतें मिळतील. मागणीप्रमाणें पुरवूं.

सोनार ब्रदर्स
पो. नरडाणे (प. खान्देश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डॉक्टरीचा अभ्यासक्रम, अल्प मुदतीचा हवा

(लेखकः— डॉ. शंकर राजाराम सबनीस)

आरोग्यमंत्री ना. शांतिलाल शाह यांनीं जळगांव वैद्यकीय व्यवसायींच्या सभेंत-डॉक्टरीचा अभ्यास अल्प मुदतीचा हवा, असें मांडलेलें मत आपल्या ...च्या हल्लींच्या परिस्थितींत अत्यन्त स्वागतार्ह ...त, सरकारनें तशा प्रकारें कांहीं निर्णय लौकर ...शिवाय खेड्यांतील लोकांस वैद्यकीय मदत ...णें शक्य होणार नाहीं.

खेड्यांतील जनतेचें अज्ञान

खेड्यांतील जनता औषधाभावीं मरत आहेच, ...त्याबरोबर त्यांच्यातील अज्ञानामुळेंहि मरत ...हे. वैद्यकीय मदतीआधीं मंत्र, तंत्र, देव-देवस्की ...तें, पिशाच्च-बाधा यांवर भरंवसा ठेवूनहि मरत ...हे. हें त्यांचें अज्ञान खेड्यांत डॉक्टर-वैद्य यांच्या ...सहवासानें नष्ट होत जाईल यांत शंका नाहीं.

अनेक कारणें

डॉक्टर लोकांनीं आपली दृष्टि खेड्याकडे ...वळवावी असा उपदेश जो तो करूं लागला आहे. ...परन्तु डॉक्टरवर्गाची दृष्टि खेड्याकडे न वळण्यास ...अनेक कारणें आहेत. आधीं आपल्या समाजांत अगदीं ...निःस्वार्थीपणानें जनतेची सेवा करणारांची संख्या ...अत्यन्त कमी आहे. खेड्यांतील जनतेस शिक्षण द्यावें, ...त्यांना साक्षर व सज्ञान करावें म्हणून किती सुशिक्षित ...लोक जात आहेत अगर जात आहेत? मग डॉक्टरांची तर ...गोष्टच नको. सर्व शिक्षणक्रमांत जर कोणतें अत्यन्त ...महागाईचें शिक्षण असेल तर तें डॉक्टरीचें !

साडेसात वर्षांचा शिक्षणक्रम

एस्. एस्. सी. पास झाल्यानंतर कोणत्याहि ...वर्षी अपयश न घरतां हा शिक्षणक्रम पुरा होण्यास ...साडेसात वर्षें लागतात. दरमहा एका विद्यार्थ्याचा ...खाणें, राहणें, फी-पुस्तकें यांचा खर्च सुमारें २५० रु. ...येतो. म्हणजे दर विद्यार्थ्यास तो डॉक्टर होईपर्यंत रु. २० ते २२ हजार रुपये खर्च येतो; शिक्षण देणारी पुरेशीं कॉलेजिस् नसल्यामुळें दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झालेल्या मुलांनाच प्रवेश व तोहि मर्यादित मिळतो. त्यामुळें आपल्या देशांत डॉक्टरांची संख्या अत्यंत कमी आहे. मेडिकल कॉलेजांत जाणारीं शेंकडा वीस टक्के मुलें श्रीमंतांचीं असून त्यांना उच्च शिक्षणाकरितां परदेशीं जाण्याची आकांक्षा असते. बाकीच्या ८० टक्के मध्यम व गरीब विद्यार्थ्यांस व त्यांच्या पालकांसहि शिक्षणासाठीं केलेल्या अफाट खर्चामुळें स्वार्थत्यागपूर्वक खेड्यांत जाण्याची शक्यता नसते.

सरकारची हीन कारवाई

पूर्वी सरकारी कॉलेजांत शिक्षण अत्यन्त महागाईचें पडतें म्हणून ज्या ज्या वेळीं राष्ट्रीय चळवळी झाल्या त्या त्या वेळीं कांहीं स्वार्थत्यागी विद्वान् डॉक्टरांनीं व नेत्यांनीं आपल्या गरीब बांधवांस औषधी मदत स्वल्पांत मिळावी म्हणून खाजगी राष्ट्रीय मेडिकल कॉलेजे काढलीं. परन्तु त्या काळच्या सरकारनें अशा कॉलेजांना मान्यता न देतां एक तर ती नष्ट केलीं अगर आपल्या कक्षेंत आणून दुय्यम दर्जाचीं बनविलीं.

एल. सी. पी. एस. चा दर्जा

इंग्रजी राजवटींत पहिल्यानें हॉस्पिटल ॲसिस्टंटचा क्लॉस काढून तालुक्याच्या दवाखान्यांत अशा लोकांना डॉक्टर म्हणून नेमण्यांत येत असे. ह्याच क्लासचें पुढें एल्. सी. पी. एस्. या कोर्समध्यें रूपांतर झालें व त्यांतून सरकारी नोकर व खाजगी डॉक्टरवर्ग निघूं लागला. युनिव्हर्सिटीचे पदवीधर व एल्. सी. पी. एस्. यांच्यांत ज्ञानाच्या दृष्टीनें फारसा फरक नसतां पदवीधर, या एल. सी. पी. एस्. डॉक्टरांना हीन भावनेनें लेखूं लागले. म्हणून एल्. सी. पी. एस्. डॉक्टरांच्या असोसिएशननें हा भेदभाव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोडावा म्हणून बरीच खटपट केली. सरकारनें शेवटीं एल्. सी. पी. एस्. चा कोर्स च बंद करून हा भेदभाव मिटविला व वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा उच्च ठेवण्याचें ठरविलें.

हें सर्व ठीक झालें. परन्तु या गरीब देशांत वर दर्शविल्याप्रमाणें महागाईचें शिक्षण घेणारा वर्ग कोठून येणार व देशांत पुरेशी डॉक्टरांची संख्या कशी वाढणार? खेड्यांत खरोखर अशा उच्च पदवी-धरांची आवश्यकता आहे असेंहि नाहीं. खेड्यांतील रोग अगदीं साधे व थोड्याच प्रकारचे असतात. त्यांजवर वेळींच उपाय झाला तर ते लौकर बरेहि होतात. अगदीं असाध्य असतील त्यांची तालुका हॉस्पिटलमध्यें व्यवस्था असली म्हणजे पुरेशी होते.

दुय्यम दर्जाच्या शिक्षणक्रमाची अत्यंत आवश्यकता

खेड्यांत सर्वसाधारणपणें उपयोगी पडेल अशा तऱ्हेचा अल्प काळांत व अल्प खर्चांत पुरा होईल असा एखादा वैद्यकीय दुय्यम दर्जाचा शिक्षणक्रम आज अत्यन्त जरूर आहे. तो निघाल्याशिवाय खेड्यांतील जनतेच्या औषधांचा व शुश्रूषेचा प्रश्न सुटणार नाहीं. असा हा दुय्यम दर्जाचा वैद्यवर्ग खेड्यांतील व्यवसायावर संतुष्ट राहील, त्यामुळें सुशिक्षितांतील बेकारी नष्ट होईल, व खेड्यांतील जनतेचीहि सोय होईल. आरोग्यमंत्र्यांसहि हें पटलें आहे. सरकार या दिशेनें कांहीं प्रयत्न करील काय? —'लोकमान्य'

सेवा संघाचीं सर्व औषधें तसेंच खात्रीची सर्व देशी काष्ठौषधी व ताजी वनस्पती आणि शिलाजीत, कस्तुरी, केशर, भीमसेनी कापूर, गोरोचन, वाकेरी भाते, वंशलोचन, नागकेशर, अनंतमूळ, जितसाया, उत्तम महाबळेश्वरी मध वगैरे औषधें मिळण्याचें ठिकाणः—

देशी सर्वौषधी संग्रहालय

पोलिस चौकीसमोर, दादर मुंबई २८

कै. पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर

अमरावती येथील भारतविख्यात वैद्य प्राणाचार्य पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर हे पुणें येथें ता. ३ जुलै रोजी परलोकवासी झाले हें वृत्त निवेदन करण्यास अत्यंत दुःख होतें. मृत्युसमयीं त्यांचे वय ६२ वर्षांचे होते. गेले कित्येक महिने ते आजारी होते व त्यांनी मुंबई, पुणें येथें राहून त्यांनीं उपचार घेतले होते.

सुशिक्षितांच्या मुलांचें शिक्षण

" प्रत्येक सुशिक्षितानें आपल्या मुलांना घरींच शिकवावें. शाळामध्यें पाठवू नये. अशिक्षित पालकांच्या मुलांना शिकविणें ही सरकारची जबाबदारी आहे. लेखन-वाचन-पठण या कार्यासाठीं विद्यार्थ्यांचे रोज फक्त ३ तास खर्च व्हावेत. दिवसाचा बाकीचा वेळ मुलांनीं आपल्या आईवडिलांच्या उद्योगधंद्यांत हातभार लावावा अगर गांवांतील वेगवेगळ्या कारागिराकडे जाऊन त्यांना मदत करावी.

शेतकरी व लहानलहान उद्योगधंदेवाल्यांना घरचे उद्योग संभाळून आपलीं मुलें शाळेंत पाठविणें आतां शक्य होईल. येत्या ५ वर्षांत २० हजार पदवीधर खेड्यांत पाठविण्यांत येणार आहेत."

वरील सर्व योजना मद्रासचे पंतप्रधान राजगोपालाचार्य यांची आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें

ले.-वैद्य पु. वि. धामणकर
धूतपापेश्वर, पनवेल

४ गंधकरसायन

दीर्घमायुः स्मृतिं मेधामारोग्यं तरुणं वयः ।
प्रभावर्णस्वरौदार्यं देहेंद्रियबलप्रदम् ॥
वाक्सिद्धिं वृषतां कांतिमवाप्नोति रसायनात् ।
लाभोपायो हि शस्तानां रसादीनां रसायनम् ॥
अ. हृ. उ. तं. अ. ३९।१-२

पुष्कळ आयुष्य, स्मरणशक्ति, धारणशक्ति, आरोग्य, तारुण्य, उत्तम तेज, चांगला वर्ण, गोड स्वर, देह व इंद्रियें (नेत्रादिक) यांस शक्ति, वाणीची सिद्धि, वृषता (शुक्रवृद्धि) व सौंदर्य हीं रसायनापासून प्राप्त होतात; कारण रसायन म्हणजे शरीरांतील रसादि धातु उत्तम रीतीचे प्राप्त होण्याचा उपाय.

रसायन शब्दाचा अर्थ

रसायन शब्दाचा मूळ अर्थ असा आहे; पण रस म्हणजे पारा आणि रसायन म्हणजे पारदयुक्त औषध असा अर्थ पुढें रूढ झाला. पारदाच्या रसकर्पूरनामक कल्पासहि रसायन शब्द लावूं लागले. रसकापूर शुद्ध असला कीं, तें 'पक्कें रसायन' अशुद्ध रसकापूर हा 'कच्चें रसायन' असें गणलें जाऊं लागलें. उपदंश, गरमी बरी होण्याकरितां कच्चा रसकापूर कणकेंतून खावयास देत, पण तो शरीरांत स्थिर रहात नाहीं. तो थेट हाडापर्यंत जातो, हाडांत शिरतो, आणि त्यांचे ठिकाणीं व्रण उत्पन्न करतो. व त्या मार्गानें बाहेर पडतो. अशा कारणांनीं रसायन शब्द उच्चारला कीं कांहीं लोकांना भीति वाटूं लागली.

महागंधक, बृहद्गंधक, लघुगंधक

पण असा कांहींहि प्रकार गंधकरसायनाबाबत नाहीं. गंधकास विशिष्ट भावना देऊन त्यास रसायन-रूप बनवितात. ह्या रसायन शब्दाचा अर्थ वर दिला आहेच. असें जरी आहे तरी कांहीं लोकांचें मनांत किंतु राहतोच. तोहि राहूं नये म्हणून गंधकरसायनास, कोणी महागंधक अथवा बृहद्गंधक अशा नांवानें संबोधतात, व व्यवहार निर्भय करतात. ह्या गंधकरसायनास भावना द्यावयाच्या द्रव्यांची फक्त १।१ भावना देऊन कोणी लघुगंधकरसायन नांवाचा एक कल्प तयार करतात. येथें महागंधकासंबंधीं टिप्पणी द्यावयाचा विचार आहे.

टिप्पणीः—

गंधकरसायनाचा संस्कृत पाठ

र. यो. सा. ४२७ (प्रथमम्)

शुद्धो बलिर्गोपयसा विभाव्य ।
स्ततश्चतुर्जातगुडूचिकाद्भिः ।
पथ्याक्षधात्र्यौषधभृङ्गराजै-
र्भाव्योऽष्टवारंपृथगार्द्रकेण ॥
सिद्धे सितां योजय तुल्यभागां
रसायनं गंधकपूर्वकं स्यात् ।
माषद्वयं सेवितमाशु कुर्या-
द्वीर्यस्य वृद्धिं दृढदेहमाग्निम् ॥
कण्डूं सपामां विषदोषमुग्रं
सपाण्डुरोगं सहमुष्कवृद्धिम् ।
जीर्णज्वरं मेहगणं च तीव्रं
वातामयांश्चैव सकृन्निहन्ति ॥
समस्तगदगुञ्जनं मृगदृशां मनोरंजनं,
सहेमरससंयुतं भजति यो नरो वत्सरम् ।
न तस्य यमराड्भयं भवति वत्सराणां शतं,
बलं भवति कामिनीप्रबलदर्पविद्राणम् ॥
एतद्रसायनवरं खलु गन्धकाख्यं,
संसेवितं सुविधिना मनुजेन नित्यम् ।
पथ्यं सखण्डमनुषष्टिकमोदनञ्च,
गव्यं घृतं सकदलीफलसैन्धवं च ॥
आम्रं सचोचं मधुमांसयुक्तं
ताम्बूलवल्लीदलपूगखादिरम् ।
एतद्रसायनवरं समखण्डमिश्रम्

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दृष्टिप्रदं क्षपयति ग्रहणीविकारान् ॥
धातुक्षयं प्रदररोगमुदग्रवेगं
सोमाभिधं गुदगदञ्च सकीलकं च।
हन्ति प्रसह्य पवनं कफपित्तयुक्तं
मेधाकरं च जठरानलवर्धनं च ॥
आमातिसारमुदरार्तिविनाशनं च
कर्षोन्मितं सकलमेहगणापहारी ।
व्यायामं मैथुनायासं गन्धसेवी सदा त्यजेत् ॥

१ नांव-- महिमा वर्णन करणारें.

२ पाठनिश्चितिः- पाठ शुद्ध आहे.

३ द्रव्यसंग्रहः- गंधक.

४ द्रव्यनिर्णयः- गंधक—आमलसार.

५ द्रव्यशोधनः- गंधक—माकारसशोधित.

६ प्रक्रियाः- क्रमाक्रमानें भावना देणें व त्या खल करून जिरविणें. व मग समभाग साखर घालून खल करून गोळ्या करणें.

७ भावनाः-

८	गाईचें दूध-	निरतें
८	दालचिनी	फांट
८	तमालपत्र	,,
८	वेलदोडा	,,
८	नागकेशर	,,
८	गुळवेल	रस
८	हिरडा	काढा
८	बेहेडा	,,
८	आंवळा	रस
८	सुंठी	काढा
८	माका	रस
८	आर्द्रक	रस

कालः- साधन काल- शरद

मर्दन काल- १ वर्ष

सिद्धिप्रमाणः- १३७ तोळे गंधकाचें १०० तोळे गंधकरसायन तयार होतें.

परिगणनः- गंधक, भावनाद्रव्य, साखर इ.

रोगः- ग्रहणी, धातुक्षय, प्रदर, सोमरोग, मूळव्याध अग्निमांद्य, अतिसार, उदरहर

दोष-वात व कफनाशक

मात्राः- माषद्वय

अनुपानः- रोगानुसार

पथ्यः- व्यायाम, परिश्रम, मैथुन वर्ज्य.

द्रव्यशोधनः— गंधकापासून तयार होणारा पदार्थ रसायन स्वरूपाचा होणार ही गोष्ट लक्षांत घेऊन त्याच्या भावना द्रव्यांपैकींच माका नामक (नीलश्वेव रसायनः-रा. नि.) रसायन पदार्थाची शोधक पदार्थ म्हणून निवड सुचविली आहे.

प्रक्रियाः— प्रक्रियेमध्यें फक्त भावनाविधि आहे. गंधकरसायनास एकूण १२ पदार्थांच्या ८/८ आणि प्रत्येक वस्तूच्या भावनानंतर आल्याच्या रसाची एक अशा दहा मिळून १२×८=९६+१० (दूध व आलें सोडून)=१०६ भावना बसतात. प्रत्येक भावनेस तीन दिवस ह्या प्रमाणें १०६ भावना बसण्यास ३१८ दिवस लागतात. म्हणजे ११महिने होतात. भावनाक्रमांत खंड झाला तर १ वर्ष पुरें लागतें.

सांडू
गोल्ड टॅब्लेटस
क्षयाच्या प्राथमिक अवस्थेवर
अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई
[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स- बी. पी. बर्वे अँड कं., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को. मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भावनावर्गांत १२ वस्तु आहेत. पैकीं आलें ...ली मिळतें, दुधाचीहि तीच गोष्ट. पण दूध ...ग्याव शरदृतु अत्यंत सोयीचा म्हणून ह्या ...साचा प्रारंभकाल तोच ठरविला आहे. तसेंच ...शावा रस फक्त मार्गशीर्ष पौषांतच म्हणजे ...त मिळतो. ह्या दृष्टीनें आम्ही भावनांच्या क्रमांत ...बदलवूं इच्छितों. तो असा:—

भावनाक्रम

१ दूध	४ आंवळा	७ वेलची	१० बेहेडा
२ माका	५ दालचिनी	८ नागकेशर	११ सुंठ
३ गुळवेल	६ तमालपत्र	९ हिरडा	१२ आलें

कांहीं विद्वानांची सूचना

...ह्यांत वनस्पतींचे हंगाम साधले आहेत. व तयार ...सुकण्याचा कालहि पुनः शरदच येतो. तीहि ...सुसंगतच होय. भावना ज्या क्रमानें दिल्या ...त्याच क्रमानें त्या शरीरांत विरतात. असा ...विवाद करून ग्रंथोक्त भावनाक्रम बदलण्यास कांहीं ...विरोध दर्शवितात. हें म्हणणेंहि संशोधनार्ह ...तरीपण तज्ञांनीं दोन्ही सूचनांचा यथायोग्य ...विचार करून निर्णय द्यावा.

साखरेनें पाणी सुटलें.

आमचे परंपरेंत प्रत्येक वस्तूच्या आठ भावना- ...आल्याच्या रसाची एक भावना देण्याची प्रथा ...तीहि येथें सूचित करीत आहे. पाठांत " सिद्धे ...योजय तुल्यभागाम् । " असा एक पाद आहे. ...प्रमाणें गंधकरसायनाच्या भावना पूर्ण झाल्यावर ...वजनाइतकीच साखर त्यांत घालून खल केला. ...त्यास पाणी सुटलें. तें खलून आटविलें. पण त्या ...गोळ्या लौकर सुकेनात. त्यांला बुरा आला. मग ...उन्हांत त्या कशातरी सुकविल्या. तरीपण आनूप ...वर्षाकालांत त्या गोळ्या सर्द व्हायच्या व पुनः ...बुरशीचा उपसर्ग व्हायचा. हा अनुभव लक्षांत घेऊन ...साखर अनुपानार्थ योजिली जावी, असें ठरवून साखर ...मिसळणें बंद केलें.

साखर अनुपानार्थ वापरावी

गंधक आणि साखर दोन्हीहि पदार्थ कल्प-संरक्षक म्हणून कार्यक्षम आहेत. गंधकरसायनाचा संरक्षक (Preservative) म्हणून साखरेची योजना झाली असेल असें नसून सर्वसामान्य अनुपान म्हणूनच तो पदार्थ येथें योजला असावासें वाटतें.

मात्रा

वजनमापांच्या कोष्टकांत, मरीचि, सर्षप, राजिका, तंडुल, माष, यव, गुंजा, कोल इ. संज्ञा तोल-मान दर्शविण्याकरितां उपयोजल्या आहेत. औषधी योगांचीं प्रमाणें सांगतांनाहि ह्या संज्ञा उपयोजिल्या आहेत. पण तेथें त्या वजनसूचक नसून आकारसूचक असाव्यात, असें वाटतें. उदा:—

१) सूच्यग्रेण प्रदातव्यम् । ३१ अग्निकुमार
२) तिलमात्रां प्रकल्पयेत् । ११८ पानीयवटिका
३) राजिकार्धमानतः । ४४९ निधीश्वर
४) दद्यात्तण्डुलसम्मितम् । १५२ राजयक्ष्महर
५) हरेणुमात्रां वटिकाम् । २८६ प्रमेहहर.
६) माषमात्रां वटीम् । ३४३ इच्छाभेदी
७) कुर्वान्माषवदाकृतिश्च वटिकां ।
११४ शीतज्वरांतक
८) मुद्गमाला वटी कार्या । २०५ ज्वरगजांकुश
९) धान्यमात्र प्रदापयेत् । २८२ ज्वरांकुश
१०) कोलमज्जाप्रमाणेन गुटिकां कारयेत् ।
२६२ ज्वरांकुश
११) कार्पासबीजसदृशीम् । ३३० क्ष.धू.ज.प्र. रसायन
१२) मारिचमाना गुटिका विधेया । १५२ छुछुरिकारस
१३) रक्तिमानां वटीम् । ५६० वृद्धिहररस
१४) चणमात्रां वटीम् । ३५० इंद्रब्रह्मवटी
१५) कलायमानान्तु वटिकान् । विषमज्वरांतकलोह
१६) कोलास्थिमाना गुटिका । १८२ जातीफलादि
१७) लघुबदर समानस्थूलगोली नराणाम् ।
२११ त्रिपुरांतक
१८) गोलिकां बदरस्थूलां । २२४ ज्वरमारीरस
१९) उदुंबरसमान् वटकान् । ४८६ मंडूरवटक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२०) जातीफलप्रमाणेम । ३४४ केशरपाक

एके ठिकाणीं तोल व दुसरें ठिकाणीं तीच संज्ञा आकारमान सूचक योजल्यानें विद्यार्थ्यांचें मनांत संभ्रम निर्माण होतो. तो होऊं नये व शंकेस जागाच राहूं नये म्हणून ह्या दृष्टीनें विचार करतां सर्वत्र तोलमानदर्शक संज्ञा वापरणें हाच निःसंदिग्ध मार्ग होय.

गंधक रसायनाची मात्रा

गंधकरसायन १।१० गुंज पासून ८ गुंजापर्यंत एक मात्रेनें वा एका दिवसांत योजणारे चिकित्सक आढळतात. ह्यांतहि योजनाकौशल्य व मात्रावश्यकत्व ह्या दोन गोष्टी उपस्थित होतातच. ह्यावरून असें दिसतें कीं, ग्रंथोक्तमात्रे म्हणजे एक दिग्दर्शन होय. योग्य प्रमाण देश, काल, वय, रोग, अवस्था इ. वेळचेवेळीं ठरविणेंच युक्त होय.

भारताच्या राष्ट्रीय प्रयोगशाळा व संशोधन संस्था

(१) राष्ट्रीय पदार्थविज्ञान प्रयोगशाळा, दिल्ली.
(२) राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणें.
(३) इंधन संशोधन संस्था, धनबाद.
(४) मध्यवर्ति कांच संशोधन संस्था, कलकत्ता.
(५) राष्ट्रीय धातुकामविषयक प्रयोगशाळा, जमशेदपूर.
(६) अन्न तंत्रक्रिया संशोधन संस्था, म्हैसूर.
(७) मध्यवर्ति औषध संशोधन संस्था, लखनौ.
(८) मध्यवर्ति रस्ते संशोधन संस्था, दिल्ली
(९) मध्यवर्ति कातडी संशोधन संस्था, मद्रास.
(१०) मध्यवर्ति विद्युत् रासायनिक संशोधन संस्था, कराईकुडी.
(११) मध्यवर्ति बांधकाम संशोधन संस्था, रुरकी.

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका), शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें आम्ही घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितो !

गुलकंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील !

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

टे. नं. ३२७९६ Telegram-AYURVED

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...र्वेदिक चिकित्सा प्रकरण १३ पुढें चालू— लेखकः—वृद्ध वैद्य

—: श्वासनिदान व चिकित्सा :—

तमक श्वास

...ागाच्या संप्राप्तीप्रमाणें या व्याधींतहि ...ांच्या सूक्ष्म नलिकांत कफाची आडकाठी ...होऊन वाताची गति उलट (प्रतिलोम) होत ...त्यामुळें तो वायु मान व डोकें यांना आव-...ून आणि कफाची वृद्धि अधिक होण्यास ...करून सर्दी (Catarrah) उत्पन्न करतो. ...ें घुंवूड वाहत असतो. आणि वायु वरील ...आणि गळयांत देखील अवरुद्ध झाल्यामुळें ...अशा आवाज गळयांतून ऐकूं येतो. असल्या ...ूच्या तीव्र गतीमुळें त्याचे पंचप्राण कासावीस ...आणि थोड्या वेळाकरतां बेशुद्ध होतो. वायूच्या ...ें संत्रस्त होतो. खोकला पुनःपुन्हां चालतो. ...श्वासाचा वेडका न पडला म्हणजे अत्यंत कष्ट ..., परंतु तेच खोकला चालून थोडाहि कफ ...पडला म्हणजे दहा पांच मिनिटें त्याला थोडें ...हेंना पण सुख प्राप्त होतें. त्याचा गळा फाटतो ...मोठ्या कष्टानें त्याला थोडा वेळ बोलतां येते.

त्याला निजून झोंप येत नाहीं

...सरळ निजून त्याला कधींहि झोंप येत नाहीं. ...दोन्हीं फुप्फुसांत वाताची वृद्धि झाल्यामुळें ...अशा स्थितींत वायु फासोळयांना आवळून धरतो ...म्हणून तो सरळ निजूं शकत नाहीं. बसला ...त्याला बरें वाटतें. आणि सदैव तो उष्ण ...ची इच्छा करीत असतो. डोळे वर लागलेले ...दिसतात. कपाळावर घाम येतो आणि अत्यंत ...अशी पीडा सर्व शरीरांत होते. तोंड सारखें ... पुनः पुन्हां श्वास चालतो आणि पुनः पुन्हां ...शरीर भात्यानें फुंकल्याप्रमाणें चळवळत असतें.

...आकाशांत ढग दिसूं लागले, पाऊस पडूं ..., थंड वारा वाहत असला, आणि पूर्वेकडील वारा चालत असला अथवा कफकारक थंड पदार्थ त्यानें घेतले म्हणजे हा वाढतो.

असला हा तमक श्वास याप्य आहे. अर्थात् योग्य तें पथ्य आणि औषधी करीत राहिलें असतांना रोगी बरा रहातो. आणि नुकताच झालेला असला तर बराहि पण होतो.

प्रतमक श्वास

वर वर्णन केलेल्या तमक श्वासाबरोबरच ज्वर येत असला आणि रुग्णास बेशुद्धि पण मधून मधून येत असली तर त्यास 'प्रतमक' असें म्हणतात.

प्रतमकाचा दुसरा भेद

कधीं कधीं धुळींत काम करण्याचा प्रसंग आला तर, किंवा पहिलें खाल्लेलें अन्न जीर्ण न होतां पुन्हां भोजन केल्यामुळें, मलमूत्रादिकांच्या वेगांचा अव-रोध केल्यामुळें, आणि पोटांत वाताची विकृति होऊन त्यामुळें वर वर ढेंकरा सारख्या येणें (उदा-वर्त) या कारणांमुळें विशेषतः वार्धक्यांत हा विकार उत्पन्न होतो. शरीरांत तमोगुण वाढला म्हणजे झोंप, आळस, संताप इत्यादि विकारांनीं तो अत्यंत वाढतो. आणि थंड उपचार केले असतांना अर्थात् डोक्यावर थंड पाणी शिंपडणें, थंड पाण्याचें स्नान, लिंबाचें शरबत वगैरे थंड पदार्थ पिणें, अशा उपचारांनीं फार लवकर थांबतो. हा चालू असतांना असें वाटतें कीं, चारहिकडे अंधःकार पसरला आहे. अशा परिस्थितींत झालेला हा जो श्वास त्यालाहि पण प्रतमक असेंच म्हणतात.

क्षुद्र श्वास

रूक्ष पदार्थ खाण्यांत आल्यामुळें किंवा प्रमाणा-पेक्षां थोडा अधिक असा व्यायाम केल्यामुळें हा क्षुद्र श्वास-हलक्या प्रकारचा म्हणून क्षुद्र-उत्पन्न होतो. हा रुग्णास विशेष कष्ट देत नाहीं. त्याच्यामुळें शरीरांचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तितकीं विकल होत नाहींत, जितकीं इतर श्वासामुळें होत असतात. त्यामुळें अन्नपानादि सेवनांत विशेष बाधा येत नाहीं. अन्नपचनादि कार्यांत अडथळा विशेष येत नाहीं. कोणत्याहि शारीरेंद्रियांना इजा होत नाहीं. आणि एकंदर त्यामुळें शरीराला विशेष कष्टहिपण होत नाहींत. असा हा श्वास बलवान् मनुष्याचा सहज साध्य असा ठरतो.

श्वासांचें साध्यासाध्यत्व

या सर्व श्वासांमध्यें क्षुद्र श्वास हा सर्वांत सहज साध्य होतो. त्यानन्तर तमक आणि प्रतमक हे बलवान् मनुष्याचे साध्य होतात. परन्तु अशक्त मनुष्याचे ते फार दिवस त्राश देत राहून शेवटीं याप्य स्थितींत पोंचतात. बाकी राहिलेले तीन म्हणजे महा, ऊर्ध्व आणि छिन्न हे असाध्य होत. आणि जवळ आलेल्या मृत्यूचें लक्षण--रूप होत.

प्रथम वमन व विरेचन

श्वास रोगावर सर्वांत प्रथम वमन आणि विरेचन द्यावें; अर्थातच मनुष्य बलवान् आहे किंवा नाहीं हें पाहूनच हीं संशोधनें द्यावींत. रोगानें पुष्कळ दिवस पीडित राहिल्यामुळें क्षीण झालेल्यास सुद्धां विरेचन देण्यास या व्याधीस हरकत नाहीं. वमन मात्र देऊं नये.

वमनासाठीं गेळफळ

(१) वमनाकरितां विशेषतः मदना (गेळफळा) चा उपयोग करावा. गेळफळांतील बिया चांगल्या वाळवून त्या चार भाग, पिंपळी १ भाग व सैंधव १ भाग अशा या मिश्रणाचें वस्त्रगाळ चूर्ण करून तें ऊन पाण्याबरोबर द्यावें. चूर्णाचें प्रमाण चार ते सहा आणे भार असावें. आणि सकाळच्या प्रहरीं द्यावें. वमन झाल्यावर तूपभात किंवा तूप मिसळलेली खिचडी द्यावी.

श्वासावर विरेचनासाठीं कपिला

(२) विरेचनाकरितां सर्वांत उत्तम विरेचन म्हणजे कबीला (कपिल्लक) उपयोगांत आणावा. याचें वस्त्रगाळ केलेलें चूर्ण एका वेळीं सहा ते दहा आणे भार सकाळच्या प्रहरीं दुधांतून द्यावें. हें फार उत्तम प्रकारचें उपलब्ध झालें, तर यापासून चार ते सहा चांगले जुलाब होतात. या विरेचनाचा श्वासावर फार परिणामकारक असा उपयोग होतो.

कपिलेचा एक अनुभव

एका प्रसंगीं शरीरानें चांगला धष्टपुष्ट असलेला एक सब्-इन्स्पेक्टर शिवनी मालवा मुक्कामी श्वासानें फार पीडित असा होता. अनेक उपाय केल्यानंतर श्वासाचें कष्ट कमी होईनात म्हणून तेथील तहशीलदारानीं तार देऊन मला बोलावलें. सराशी सकाळीं चार वाजतां तेथें पोंचतां क्षणींच रुग्णाची अत्यंत बेहाल स्थिति पाहून तावडतोब अर्धा तोळा कपिल्लक दुधांतून दिलें. त्यानंतर त्यास सकाळीं दहापर्यंत सरासरी सहा जुलाब झाले. आणि रुग्ण असें म्हणूं लागला कीं, त्याचा सरासरी ३/४ व्याधि कमी झाला. त्यानंतर एक महिना पुढें वर्णन केलेले उपाय केल्यानंतर व्याधि आजिबात बंद झाला. सबब, अत्यंत पीडितावस्थेंतसुद्धां याचा उपयोग करून कोठा शुद्धि झाली म्हणजे व्याधि तावडतोब कमी होतो, हें लक्षांत ठेवून विरेचन देण्यास कधींहि डरूं नये. अवश्य तें अवश्य द्यावें.

इंजेक्शन-चिकित्सा

पाश्चात्य इंजेक्शन चिकित्सेवरील अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिलेला अभिनव मराठी ग्रंथ. २६ प्रकरणें, ३०० वर रोगांची अद्यावत् चिकित्सा. २७० पृष्ठें, जाड बांधणी. 'सचित्र इंजेक्शन विज्ञान' प्रमाणेंच हाहि ग्रंथ लौकरच दुर्मिळ होण्याची शक्यता आहे. त्वरीत मागणी करा. किंमत ६ रु., ट. ख. निराळा.

१ सुबोध वैद्यक ग्रंथमाला
मु. पो. कागल [S.M.C.]
२ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्वासावर लाभदायक प्रयोग

(३) औषधि या नात्यानें एकाच वेळीं केलेले प्रयोग लाभदायक ठरतात.

कुमारीआसव + क्षारमिश्रण

वर सांगितलेलें विरेचन दिल्यानंतर रुग्णास ...च्या व रात्रीच्या जेवणानंतर दोन तोळे कुमारी- ...त एक ते दोन आणे-भार सर्जिकक्षार किंवा ...अलब्ध असणारे व पचन करणारे असे यवक्षार ...क्षार आदि मिसळून तें क्षारमिश्रण आसवांत, ...न द्यावें. आसव तीव्र वाटल्यास त्यांत बरोबर ...त पाणीहि मिसळावें.

सकाळीं व संध्याकाळीं भारंगमुळाचें चूर्ण एक ...आणे-भार घेऊन त्यांत "अनुभविक चिकित्सा" ...त पान १५ वर वर्णन केलेलें शृंगभस्म तीन ... मिसळून हें मिश्रण एक ते दोन चमचे ...चा रस व तितकाच मध यांत मिसळून द्यावें. ...प्रकारें चार वेळ औषधी सेवन करवावी.

रात्रीं निजतांना श्वासाचा त्रास जास्त होत ...स त्याच पुस्तकांत पा. ११ वर वर्णन केलेला ...च्याचा क्षार तयार झालेल्या विड्यांत दाबून ... एकदां निजतांना व दुसऱ्यांदां सकाळीं ...गीं विस्तऱ्यावरच याचा त्रास होतो म्हणून ...तसलाच विडा दाबून ठेवण्यास सांगावा.

दिवसां मधून मधून खोकल्याचा त्रास होत ...स त्या पुस्तकाच्या पान २८ वर वर्णन ...लवंगादिवटी गोळी किंवा इतर खोकल्यावरील ...द्यावींत. दर पंधराव्या दिवशीं विरेचन द्यावें. ...जेवणास फक्त तुरीचें वरण, पोळी, तूप व ...च फोडणीच्या व जिरे, मिरे, कच्चे मसाले ...न तयार केलेल्या दुध्या, परवर, तोंडली, गिलकी ...ज्या द्याव्या. ताजें ताक किंवा ताकाची कढीहि ...तां येते. अशा रीतीनें चिकित्सा केल्यास तीन ...त हा व्याधि बरा होतो, असा पांचपन्नास ...नीं सोडलेल्या रुग्णांवर केलेल्या प्रयोगावरून ...न आलेला आहे.

कमी खर्चाचे प्रयोग

(४) श्वासावर कित्येक प्रयोग फार कमी खर्चाचे असे सुद्धां आहेत. वर वर्णन केलेल्या प्रतमक श्वासांत देण्याकरितां उत्तम प्रयोग खाण्याच्या चुन्याचा होतो. हा चुना तयार करण्याकरतां चुनखडीचे भाजलेले दगड पाण्यांत विझवावयाचे असतात. याकरितां बहुधा घरोघर एक मातीचें गाडगें उपयोगांत आणलें जातें. आणि त्यांतच पुनः पुन्हां ते दगड विरविले जातात. या गाडग्यांत पाणी सदैव असावें आणि तो चुना वाळूं नये अशी अत्यंत काळजी घेत असावें. पाणी हें त्या चुन्याचें जीवन आहे.

चुन्याच्या चण्याएवढ्या गोळ्या

अशा या चुन्याच्या खालील घट्ट भाग काढून घेऊन त्याच्या चण्याएवढ्या गोळ्या तयार कराव्या आणि त्या वाळवून बाटलींत भरून ठेवाव्या. यापैकीं एकएक गोळी, निदान एक एक तोळा आणि जास्तीतजास्त अडीच तोळे शुद्ध गाईच्या दुधाच्या मलाईबरोबर दिवसांतून तीन वेळ म्हणजे सकाळीं शौचमुखमार्जन होतांक्षणीं, दुपारीं जेवणानन्तर दोन तासांनीं आणि रात्रीं निजतांना द्यावी. म्हणजे श्वास कमी होतो.

निवडुंगाच्या चिकाच्या गोळ्या

(५) तमक श्वासावर निवडुंगाच्या चिकाच्या वाटाण्याएवढ्या गोळ्या करून ठेवाव्यात. तीव्र वेग असतांना एक गोळी दुधाच्या मलाईबरोबर दिली असतांना श्वास कमी होतो. निवडुंगावर – तें एक प्रकारचें विष असल्यामुळें त्याला शांत करणारें जें द्रव्य त्याला इकडील भाषेत 'उतार' असें म्हणतात, सर्वच विषांचे हे उतार वैद्यानें अवश्य लक्षांत ठेवावे– दहीभात हा उतार आहे.

(६) हिक्का चिकित्सेंत वंशलोचनांत सोमल मिसळून तयार करण्याचा योग दिलेला आहे. तोहि श्वासावर उपयोगी असतो.

दुधाच्या चिकाचें चूर्ण

(७) पहिल्यानें व्यालेल्या गाईचें पहिल्या दोन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तीन दिवसाचें दूध वाळवून ठेवावें. त्याचें चूर्ण करून श्वासावर द्यावें.

नारळाच्या कवटीचा क्षार

(८) नारळीच्या कवट्या जाळून क्षार करण्याच्या पद्धतीनें क्षार तयार करावा. तो क्षार विड्यांत ठेवून क्षुद्र श्वासावर तोंडांत दाबण्यास द्यावा.

शिंगाचा धूर

(९) गाईचें शिंग तासून किंवा कुटून बारीक करून ठेवावें. आणि त्याचा धूर घ्यावा.

रिंगणीचा क्षार

(१०) रिंगणीचा क्षार विशेषतः लहान मुलांस श्वास व कासावर उपयोगी होतो.

चरसाच्या गोळ्या

(११) चरस नांवाचें एक द्रव्य असतें. हें विडी-सारखें पिण्याचा प्रघात किंवा संवय कित्येकांस जडते. हें पिण्याचे अड्डे असतात. आणि तेथें लोक जमून तें पीत असतात. त्या द्रव्याच्या गोळ्या वाटाण्याएवढ्या तयार करून त्यापैकीं १।१ गोळी नुसत्या पाण्याबरोबर जरी दिली तरी तिचा परिणाम होऊन तीव्र श्वास बंद होतो.

गोमूत्रभावित आमलकी + मीठ

(१२) साधारण श्वासाकरितां आंवळयाच्या चूर्णाला गोमूत्राच्या एकवीस पुटें द्यावीत. त्यानंतर त्यांत बरोबर प्रमाणाचें मीठ मिसळून ठेवावें आणि पाव ते अर्धा तोळा हें चूर्ण ऊन पाण्याबरोबर द्यावें.

कल्याणक्षार

(१३) सुंठ, मिरे, पिंपळी, सैंधव, काळेमीठ, बिडमीठ, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, दंतीमूळ, त्रिव्हे, चित्रक या सर्व औषधी ठेंचून तिळाचें तेल व गोमूत्र यांत कालवून मडक्यांत बंद करून त्यांवर परळ ठेवून कपडमाती करावी. आणि त्या मडक्यास अग्नि लावून आंतील द्रव्यांचा कोळसा होईपर्यंत अग्नि चालू ठेवावा. त्यानन्तर आंतील जळलेलीं द्रव्यें काढून घेऊन त्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून ठेवावें. हा क्षार तूपभाताबरोबर जेवणापूर्वी सरासरी अर्धा तोळा द्यावा, म्हणजे श्वास बरा होतो.

श्वासकुठार रस

(१४) पारा, गंधक, वत्सनाभ, मनशीळ आणि टाकणखार हीं पांच द्रव्यें एकएक भाग, सुंठ व पिंपळी हीं द्रव्यें प्रत्येकीं दोन भाग आणि मिरे दहा भाग अशी घ्यावीं. पारा व गंधक यांना प्रथम खलांत घोटावें. म्हणजे त्यांची काळ्या वर्णाची कज्जली तयार होते. नन्तर त्या कज्जलींत बाकी राहिलेल्या वरील द्रव्यांचें वस्त्रगाळ चूर्ण मिसळून ठेवावें. या रसाचा चार गुंज ते दोन आणेभार प्रयोग एकावेळीं करतां येतो. अनुपानास आल्याचा रस व मध हें उत्तम.

याप्रमाणें श्वासावर अनुभवानें निश्चित ठरलेले १४ उपाय सांगितले. हा व्याधि रुग्णास फार कष्ट देणारा असल्यामुळें आणि त्यांवर आधुनिक शास्त्रांतील अनेक रामबाण अशा पुष्कळ औषधी दररोज निर्माण होत असल्यामुळें रुग्णांची धांव प्रथम त्यांच्याकडे होते. त्यांचा परिणाम तात्कालिक होतो, असें रुग्णास अनुभवास आल्यानंतर मात्र तो आयुर्वेदीय उपचार पुष्कळ दिवसपर्यंत सारखा करण्यास तयार होतो. अशा स्थितींतच प्रारंभीं वर्णन केलेले दीर्घ काळ चालविण्यास योग्य व निश्चित परिणाम करणारे असे उपाय वैद्यांनीं करावेत.

श्वासविकाराचें पथ्यापथ्य

हिक्केवर वर्णन केलेलें धूम्रपान, हें श्वास व्याधीवरहि करतां येतें. जुने साठी तांदुळ, साळ तांदुळ, गहूं आणि यव हीं अन्नें प्रशस्त होत. मांसांत हरिणाचें मांस जास्त उपयोगी होतें. बकरीचें दूध आणि तूप, मध, आसवें परवर, लसूण, तांदुळजा, आंबटचुका या भाज्या उपयोगी ठरतात. रुग्णास सदैव ऊन व तापवलेलें पाणी द्यावें. दूध, चहा किंवा इतर कफकारक पदार्थ हे वर्ज्य असावे. तुळशीचा चहा किंवा काढा दररोज घेतला तरी उपयोगी ठरतो. पचनास कठीण असे पदार्थ कधींहि घेऊं नयेत. याप्रमाणें केलेलें पथ्य हितावह होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोह

लेखकः-श्री. मा. या. व्यवहारे
बी. एस्सी. (फार्म. केम्.)

आयुर्वेदामध्यें लोह सर्वत्र वापरलेलें आढळतें. …ना एवढा मोठा उपयोग कां केला असावा, असा …हजिकच उद्भवतो, पण तो फारच सुलभ …नें सुटलेला आहे, असें पुढील माहितीवरून …न येईल.

मानवी शरीरांत ३ मासे लोह असतें

लोह, हें शरीराचें दैनंदिन व मुख्य घटक …त्यामुळें तें इतर सर्व धातूंहून निराळें मानलें …आहे. तें, रक्तपेशी (Blood cell) रक्तकण Haemoglobin) व इतर सर्व पेशींचा [cells] …वश्यक घटक आहे, व शरीर तर रक्ताशिवाय …शकत नाहीं. म्हणून लोहाचें महत्व अधिक …त्याचें सिद्ध होतें. साधारणतः मानवी शरीरांत …वे लोहाचें अस्तित्व असतें व त्यांतील २/३ भाग …रक्तकणांतच असतो व १/३ इतर पेशींत असतो. …चें अस्तित्व मानवी शरीरांतच अत्यावश्यक आहे …नसून वनस्पतींमध्येंसुद्धां त्यांस प्राधान्य आहे …त्याशिवाय वनस्पतीमधील हरित द्रव्य Chlorophyll) याची उत्पत्ति होत नाहीं.

१/१० गुंज लोहाची दैनिक गरज

शरीरांत दररोज रक्तपेशींची ठराविक घट …असते, त्यामुळें रक्तकण सुटे होऊन ते मलमूत्रा-…बाहेर जातात. असें होत असतांना मात्र लोहा-…अंशतःच घट होते, त्यामुळें शरीरांतील लोहाचें …कमी होत नाहीं व जें थोडें फार कमी होतें त्याची …रोजच्या अन्नामधून होते. अन्नामधून अत्यल्प …णांत लोह शरीरांत शोषलें जातें. व तेंहि लहान …आंत्र्या (Small Intestines) वरच्या …तून होतें. लोहाचा शरीरांतील समतोलपणा …ण्याकरितां वरीलप्रमाणें फक्त १/२० ते १/१० गुंज …ची जरूरी असते, व ती अन्नामधून भरून निघते. निरनिराळ्या अन्नामध्यें निरनिराळ्या प्रमाणांत …असतें. उ. काळीज ०.०१५%, मांस ०.००२ ते ०.००५%, भाकरी ०.००२%, बटाटे ०.००१२% हिरव्या पालेभाज्यामध्यें बरेंच लोह असतें. उ. चुका, मेथी, पालक, मुळा इ. दुधामध्यें लोह अगदींच थोड्या प्रमाणांत असतें.

लोह केव्हां देतात ?

पांडुरोग (Anaemia) वगैरे सारखे रोग होतात त्या वेळेस रक्तपेशींत रक्तकण बऱ्याच कमी प्रमाणांत असतात व अशा वेळेस लोह व त्याचे क्षार औषधि म्हणून देतात, त्यामुळें लोहाचा शरीरांतील समतोलपणा निर्विवाद भरून येतो. पण तो एकदम न येतां हळूंहळूं भरून येतो. लोह व त्याचे क्षार या सर्वांचें कमी अधिक प्रमाणांत शोषण होतें व उपयोगहि होतो.

लोह कोणाला हवें ?

गर्भारपणांत व वाढती मुलें यांना लोहाची अधिक गरज असते, तेव्हां ती भरून काढण्याकरितां लोह व त्याचे क्षार घेण्याची जरुरी असते.

रक्तपेशींतील जीवपेशा नाहींशा झाल्यास ती रक्तपेशी रक्तकण निर्माण करूं शकत नाहीं, तर ती हाडांतील मध्यभागांत पिंजारलेल्या भागांमधूनच [Bone Marrow] नवीन रक्तपेशी तयार होऊन रक्तकण हळूंहळूं निर्माण करून वाढवितात.

आयुर्वेदांत वापरलेले लोहकल्प

आयुर्वेदामध्यें खालील लोह व त्याचे प्रकार वापरलेले आढळून येतात.

कान्तलोह, तीक्ष्णलोह, लोहभस्म, मंडूरभस्म, कासीसभस्म, अभ्रकभस्म, सुवर्णमाक्षिकभस्म इ. भस्में व हिराकस, गेरू वगैरे खनिज द्रव्यें.

लोहाचे दोन प्रकारें उपयोग केले जातात.

१ बाहेरून लावण्यास, व २ पोटांतून देण्यास.

आयुर्वेदांत हिराकस गेरू वगैरे लोहाचे प्रकार बाह्यांगीं वापरले आहेत व त्यांचा समावेश लेप, मलमें, घृतें इत्यादीमध्यें आहे. उ. ग्रंथिभेदनलेप, शोथहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेप, अग्निदग्धावरील मलम, सूर्यपाककासीसादि घृत वगैरे. हिराकस, गेरू वगैरेचा निरोगी कातडीवर विशेष परिणाम होत नाहीं, पण कातडी फांटली असल्यास, जखम झाली असल्यास अगर गळूं, सूज झाली असल्यास उपयोग होतो. हें कार्य दोन पद्धतीनें होतें. (अ) स्तंभक [Astringent] (ब) रक्तवाहिन्याचें संकोचन करून स्राव बंद करून [Haemostatic]. वरील क्रिया हिराकस, गेरू वगैरेमुळें होते व जखम गळूं, सूज वगैरे बरी करण्यास उपयोग होतो म्हणून यांचा वरील औषधींत उपयोग केला आहे.

आयुर्वेदांत कान्तलोह, इतर प्रकारचीं लोहभस्में, कासीसभस्म, अभ्रकभस्म, सुवर्णमाक्षिकभस्म, लोहपर्पटी वगैरे लोहाचे प्रकार पोटांतून देण्यास वापरतात.

पोटांत लोहाचें काय होतें ?

लोह पोटांत गेल्यावर तेथें त्याचें रासायनीय रूपांतर घडतें व फेरी क्लोराइड तयार होतें. पुढें त्याचें लहान आंतड्यांत फेरी कार्बोनेट बनतें. त्यापुढें मोठ्या आंतडींत फेरी सल्फाइड बनून जादा असलेलें लोह मलावाटें बाहेर निघून जातें व जातांना मलाचा रंग काळसर करतें.

लोहाचा शोषणक्रम

आंतड्यांत वरील क्रिया होत असतांना, आंतड्यांतून लोह शुष्क व द्रव रूपांत शोषलें जाऊन तें प्लिहामध्यें [Spleen] तेथन काळिजांत [Liver] व शेवटीं बोन मॅरो [Bone Marrow] मध्यें वाहून नेलें जातें. तसेंच मूत्रपिंडांतहि [Kidneys] कांहीं प्रमाणांत लोह आढळतें. लोहाची वाहतूक बहुतेक रक्तांतूनच होते. अशा प्रकारें अगदीं थोडें लोह शोषलें जाऊन उपयोगार्थ पडतें व बाकीचें जादा राहिलेलें लोह मुख्यतः काळीज व थोडेंफार प्लिहा आणि मज्जा [Bone Marrow] यामध्यें सांठवण होतें. शरीरांत जेव्हां लोह कमी पडतें, तेव्हां वरील लोहाचा पुरवठा होतो. जें लोह शोषलें जात नाहीं व सांठविलें जात नाहीं तें मलावाटें निघून जातें.

लोहाची अप्रत्यक्ष क्रिया

शरीराच्या सर्वसाधारण जीवनयात्रेमध्यें लोहाची प्रत्यक्ष क्रिया होत नाहीं. परंतु पांडुरोगासारखे [Anaemia] रोग बरे करीत असतांना शरीराची शक्ति, जोम, उत्साह वाढवून रक्ताच्या वाहतुकींत पुष्कळच सुधारणा होते, म्हणून लोह सर्वसाधारण शक्तिवर्धक म्हणून वापरलें जातें. लोहाबरोबर जर अत्यल्प प्रमाणांत ताम्र असेल तर तें अधिक परिणामकारक असतें, कारण रक्तकण तयार होत असतांना ताम्राची जरुरी असते, म्हणून पुष्कळ वेळां साध्या लोहभस्मापेक्षां सुवर्णमाक्षिकभस्म वापरतात. सुवर्णमाक्षिक भस्मांत ताम्र नैसर्गिक रीत्याच असतें व त्यांतील लोह-ताम्राचा योग अधिक फलदायक होतो हें सर्वश्रुतच आहे.

खालील औषधांमध्यें कोणत्यातरी एका प्रकारचें लोह वापरलेलें आहे व अशा औषधांची यादी बरीच मोठी असल्याचें आढळून येते.

लोहयुक्त औषधांची यादी

अर्शकुठार, आरोग्यवर्धिनी, उन्मादगजकेसरी, एकांगवीर, कामदुघा, क्रव्यादरस, गलत्कुष्ठारि, गंडमालाकंडन, चंद्रकला, चतुर्मुख, चन्द्रोदय, ताप्यादिलोह, त्रैलोक्यचिन्तामणी, नित्यानन्द, नवायसचूर्ण, पुष्पधन्वा, प्रतापलंकेश्वर, महावातविध्वंस, मृतसंजीवनी, मेहान्तकरसायन, योगराजलोह, महालक्ष्मीविलास, लक्ष्मीनारायण, वातगजांकुश, वातराक्षस, वडवानल, वसन्तकुसुमाकर, वातविध्वंस, वान्तिहृदय, बृहत्सुवर्णमालिनीवसन्त, हेमाभ्रकरससिंदूर, महायोगराजगुग्गुळ, बदामपाक, सर्वांगसुंदर, चंद्रप्रभा, लोहासव, कुमारी आसवनं. १ लोहपर्पटी, कामधेनु, गर्भपालरस, इ.

अत्यल्प पण अत्यावश्यक

एकंदरीत विचार करितां धातु व उपधातूंचे क्षार किंवा भस्म यांचें अस्तित्व शरीरांत अत्यल्प व अत्यावश्यक असल्याचें आढळून येतें, व त्यामुळें शरीराचा जोम व उत्साह कायम राहूं शकतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदिक औषधांचा नवा उपयोग

अहमदाबादच्चे सिव्हिल ॲण्ड मेण्टल हॉस्पिटलचे डॉ. आर. अे. हकीम यांनीं प्रयोग करून आयुर्वेदिक औषधांचा एक नवा उपयोग शोधून काढला आहे. कांहीं आयुर्वेदिक औषधें मानसोपचारासाठीं यशस्वीपणें वापरतां येतात, हें डॉ. हकीम यानीं सिद्ध करून दिलें आहे. मुंबअींतील अेका औषधी कंपनीनें या औषधाच्या सहा ग्रामच्या गोळ्या करून दिल्या. या गोळ्यामध्यें खालील आयुर्वेदिक औषधें होतीं. ब्राह्मी [Monniera Cuneifolia] किंवा [Herpestis Monniera] शंखावली [Evolvulus Alsinoides], चन्द्रिका [Rauwolfia Serpentina], जीवन्ती [Leptadenia Reticulata], उग्रगन्धा [Acorus Calamus], आणि भृंगराज [Eclipta Alba].

विजेचा धक्का व पोटांत औषध

मानसिक रोग असलेल्या विविध प्रकारच्या रोग्यांवर या औषधाचा प्रयोग करण्यांत आला. त्यांपैकीं कांहीं रोग्यांवर विजेचा धक्का देऊन उपचार करण्यांत आला. कांहींवर फक्त आयुर्वेदिक औषधि देऊन उपचार करण्यांत आला आणि कांहींवर विजेचा धक्का व आयुर्वेदिक औषधि यांचा संयुक्त उपचार करण्यांत आला.

फक्त विजेचा धक्का दिलेल्या रोग्यांचा रोग बरा होण्याचें प्रमाण ३१.११ टक्के अितकें होतें. फक्त आयुर्वेदिक औषधामुळें रोग बरा होण्याचें प्रमाण ५१.६६ टक्के अितकें होतें. उलट विजेचा धक्का व आयुर्वेदिक औषधि यांच्या संयुक्त उपचारामुळें रोग बरा होण्याचें प्रमाण ८०.४८ टक्के अितकें असल्याचें आढळून आलें.

तथापि या औषधींच्या उपचाराबद्दल निश्चित मत देण्यापूर्वी आणखी अनेक रोग्यांवर हा प्रयोग झाला पाहिजे असें डॉक्टरांचें मत आहे.

—अमेरिकन जीवन

अल्प मुदतीचा अभ्यासक्रम

"वैद्यक शास्त्राचे अभ्यासक्रम अल्पमुदतीचे व सोपे केल्याखेरीज आपल्या देशांत आपल्याला हवेत तेवढे डॉक्टर व परिचारिका मुलभरीया मिळणें शक्य नाहीं," अशा आशयाचे विचार मुंबईचे कामगार आणि आरोग्यखात्याचे मंत्री श्री. शांतिलाल शहा यांनीं जळगांव येथें ता. २७ जून रोजीं डॉक्टरांच्या सभेंत भाषण करतांना व्यक्त केले. "सध्यांच्या एम्. बी. बी. एस्. चा अभ्यासक्रम फारच लांबलचक आणि फार खर्चाचा (बर्डनसम्) आहे" असें ते म्हणाले.

सरकारचें आद्य कर्तव्य

आरोग्यमंत्री पुढें म्हणालें कीं, ग्रामीण भागांत औषधोपचाराच्या सुखसोयी निर्माण करणें हें सरकारचें आद्य कर्तव्य आहे. सरकार ग्रामीण भागांतील लोकांच्या वैद्यकीय सुखसोयींसाठीं पुष्कळच पैसा खर्च करीत आहे; त्यास जोड म्हणून वैद्यक व्यवसायींनीं खेड्यापाड्यांतून वास्तव्य करून जनतेस वैद्यकीय मदत देण्याचें त्यांचें कर्तव्य बजाविलें पाहिजे. देशकल्याणार्थ डॉक्टरांनीं व वैद्यक व्यवसायींनीं शहरांतच व्यवसाय करण्याची मनोवृत्ति बदलली पाहिजे, अशी त्यांनीं त्यांची कानउघाडणी केली.

होमिओपॅथिक रजि. ट्रिब्यूनल

होमिओपॅथिक रजिस्ट्रेशन ट्रिब्यूनलचे एक सभ्य डॉ. भजनराम चुघा हे ता. २ जून रोजीं मुंबई येथें स्वर्गवासी झाले. त्यांच्या जागीं ट्रिब्यूनलवर सुरतचे आमदार छोटाभाई सुतारिया यांची नेमणूक झाली आहे.

पुणें येथें

आयुर्वेद सेवा संघाचीं औषधें मिळण्याचें ठिकाण

किरण मेडिकल सर्व्हिस

नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जळवात (तळपायास भेगा)

सर्वसाधारण लक्षणें:- पायांस मोठमोठ्या भेगा पडणें व काळे डाग पडणें. तोंड कडू पडणें. अन्नावर अरुचि, किंचित् ताप व पायाचे भेगास पाणी लागलें असतां सणका निघून त्रास होणें.

जळवातावर उपचार

औषध साहित्य:--[१] पारोशा पिंपळाचीं बोंडें [२] खडीसाखर [३] वंशलोचन [४] गाईचें तूप (ताजें) [५] पांढऱ्या पांगाऱ्याची साल (वाळलेली)

औषधी कृति:-. पांढऱ्या पांगाऱ्याचीं साल व पारोशा पिंपळाची बोंडें यांचें वस्त्रगाळ चूर्ण प्रत्येकीं १ छटाक. वंशलोचन वस्त्रगाळ चूर्ण अर्धा तोळा. खडीसाखर चूर्ण १ छटाक. या सर्व जिनसा एकत्र करून त्यांत गाईचें तूप सर्व मिश्रण चपचपीत भिजेपर्यंत घालावें, व कल्हईचें अगर चिनीमातीचें भांड्यांत घालून त्यावर झांकण ठेवून दोन दिवस मुरूं द्यावें म्हणजे सेवनयोग्य होतें.

घेण्याचें प्रमाण:-- मोठ्यांस २ मासे, मुलांस १ मासा (सकाळीं एक वेळ फक्त).

पथ्य:-- आळणी. गाई म्हशीचें दूध, तूप. ज्वारीची भाकरी, गव्हाची चपाती.

अपथ्य:-- तिखट, मीठ, चहा, कॉफी व उष्ण पदार्थ.

मुदत:-- ७ ते १४ दिवस. शक्यतों हिवाळ्यांत सेवन करणें जास्त हितावह. —वैद्य वसन्त सागडे

लातूर येथें आचार्यांचा सन्मान

लातूर येथें ता. १४-६-५३ रोजीं दुपारीं वैद्य शिरशीकर यांच्या दवाखान्यांत आचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी यांचा नागपूर येथें नेमणूक झाल्याबद्दल सत्कार, अध्यक्ष जळूकरशास्त्री यांच्या अध्यक्षतेखालीं करण्यांत आला. त्यावेळीं वै. प्रतापकुमार, वै. रामैया, वै. दाते, वै.बिंदुमाधव, वै.गोगटे, वै. नाना जोशी, वै.वाटवे (बेळगांव) वै.महाजन इत्यादि मंडळी उपस्थित होती.

आरोग्यमंत्री यांची अंमळनेरास भेट

मजूर व आरोग्यमंत्री श्री. शांतिलालजी शहा यांनीं म. प्रां. कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष दे. भ. देवकी नंदनजी यांच्याबरोबर ता. २१।६।५३ रोजीं अंमळनेर येथील श्रीप्रताप आयुर्वेदिक रिसर्च इन्स्टिट्यूटला भेट दिली. या संस्थेची घटना, प्लॅन इ. सर्व त्यांनीं मुंबईस मागविले आहेत.

ठिकठिकाणच्या सरकारी आयुर्वेदिय दवाखान्यासाठीं लागणारीं औषधें तसेच विशेष मूल्यवान् व महत्वाचीं औषधें करणारा कारखाना अंमळनेर येथें सुरू करतां येईल कीं काय यांचा विचार चालू झाला आहे.

तसेंच अंमळनेर येथें आयुर्वेदीय चिकित्सामंदिर (रुग्णालय) व मग आयुर्वेद विद्यालयहि(?) काढावयाचें असें बोलणें झालें असें कळतें. सुप्रसिद्ध रा. ब. डॉ. मोने यांचें सहकार्य लाभण्याचा योग आहे असें म्हणतात.

श्रीमंत प्रतापशेटजींची देणगी

अंमळनेर येथील दानशूर श्रीमंत प्रतापशेटजी यांनीं जामनगर येथें सुरू व्हावयाच्या आयुर्वेदीय संशोधन कार्याला दरमहा २ हजार रुपये प्रमाणें दोन वर्षांच्या आंत ५० हजार रु. देण्याचें आश्वासन दिलें आहे असें कळतें.

विशेषांकासंबंधीं खुलासा

मुद्रणालयांत इतर छपाईकामाची गर्दी असल्यामुळें १ जुलैला 'पत्रिकेचा पटवर्धन विशेषांक' काढणें शक्य झालें नाहीं. कामाचा ताण कमी होताच विशेष अंक प्रसिद्ध होईल. —व्यवस्थापक

गृहवैद्य अथवा क्षारचिकित्सा
लेखक:-डॉ. गर्दे, आय्. एम्. एस्. (रिटायर्ड)
किंमत ३ रु., ट. ख. १० आणे
(१) वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक
(२) डॉ. गर्दे, २६ मॉगल लेन, मुंबई १

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक अत्यंत उपयोगी विष

कुचला

लेखकः— वैद्य पं. रमादत्तजी शर्मा,
महेंद्रगड (पेप्सू)

कुचल्याचें शोधन (शुद्धिकरण):- सर्व विषें उपविषें यांचा पोटांत सेवनासाठीं उपयोग करण्या- आधीं आयुर्वेदांत त्यांचा शुद्धिकरणविधि सांगितला आहे. कारण कीं, शुद्धिकरणानें केवळ त्यांच्या विषारी धर्माचीच तीव्रता कमी होते, एवढेंच नसून त्यांच्या उपयुक्त गुणधर्मांतहि वाढ होतें. म्हणून जर कुचल्याचा औषधीकामांत उपयोग करावयाचा असेल तर त्याचें शुद्धिकरण करणें अगदीं अवश्य आहे.

कुचल्याचा शोधनविधि

चांगले मोठाले कुचले (बिया) मातीच्या किंवा कांचेच्या भाड्यांत घालून गोमूत्रांत भिजत ठेवावे. गोमूत्र दररोज बदलीत जावें. सातव्या दिवशीं त्यांत (कुचल्यांत) सुई टोंचून पाहावी; जर सुई आरपार निघाली तर कुचले चांगले भिजले असें समजावें; व जर सुई आरपार निघाली नाहीं तर आणखी कांहीं दिवस कुचले भिजूं द्यावे. कुचले चांगले भिजल्यावर काढून घेऊन चाकूनें सोलून आतील जीभ काढून टाकावी. नंतर १६ पट दुधांत पुरचुंडी टाकून दोलायंत्रानें शिजवावा. दूध रबडी सारखें घट्ट झाल्यावर भांडें खालीं उतरवून घेऊन कुचले धुवून घ्यावेत.

शक्यतों कुचला ओला आहे तोंपर्यंत काढून घ्यावा, कारण कीं तो सुकल्यावर कुटण्यास फार जड जातो व त्याचें चूर्ण करणें अतिशय त्रासाचें काम होऊन बसतें. कुचल्याचा कडूपणा घालवावयाचा असेल तर तो सोलल्यानंतर प्रत्येक वेळीं १६ पट दुधांत ३।४ वेळां शिजवावयास पाहिजे. परंतु असें करण्यानें त्याचे गुणांत कमीपणा येतो.

महत्वाची सूचना

कुचला शोधनार्थ गोमूत्रांत भिजत ठेविला असतांना वरील साल नरम झाल्यावर तो अधिक दिवस गोमूत्रांत भिजत ठेवूं नये. कारण कीं, त्यायोगें त्याच्या ठिकाणीं गुणहीनत्व येण्याची भीति असते.

विशेष अनुभव

कुचला वातव्याधीची अचूक औषधि आहे. विशेषतः आमवात, कटिग्रह, गृध्रसी, पक्षाघात व अर्दित आर्दीवर फारच उत्तम कार्य करितो. मद- कारक व वातनाशक असल्यामुळें हा अनेक प्रकारच्या वेदनावर व शूलांत उपयोगिला जातो. कुचला तिक्त- रसप्रधान द्रव्य आहे, आणि म्हणून ज्वरावरहि त्याचा उपयोग केला जातो, व त्यांत तो उत्तम गुण दाखवितो. मंदाग्नीवर कुचल्यासारखी दुसरी वस्तु नाहीं असें म्हणणें अनुचित होणार नाहीं; कारण कीं, अग्निप्रदीपक, पाचनकर्ता तसाच अजीर्ण नष्ट करणारा असा आहे. अजीर्णजन्य वान्तिहि याचे प्रयोगानें शमन होते. कृमीनाशक योगांतहि कुचल्याचा उपयोग केला जातो.

कुचल्याचे बाह्य उपयोग

कुचला गोमूत्रांत उगाळून त्याचा लेप कर्णमूल, शोथ व विद्रधि यांवर केला असतां सत्वर आराम पडतो. हा तुपांत उगाळून व्रणावर लाविला असतां व्रणाच्या वेदना कमी होऊन त्यांत पूं होण्याचें थांबतें व व्रण लवकर भरून येतो. कर्णरोग व बहिरेपणा यांवर कुचला तिळाचे तेलांत शिजवून तें तेल कानांत घातलें असतां फायदा होतो. हा श्वासरोगांतहि चांगलें काम करितो असें दिसून आलें आहे, परन्तु ह्या रोगांत तो अधिक काल सेवन करावा लागतो.

प्रमेह, अतिसार

प्रमेह व्याधींत आम्ही याचा वारंवार उपयोग करून पाहिला आहे व तो नेहमीं विशेष लाभप्रद असाच सिद्ध झाला आहे. जुन्या प्रमेही रोग्यास तो अमृततुल्य हितकारी आहे. पचनशक्तीची कम- जोरी (अग्निमांद्य) ज्यांत शौचास वारंवार होतें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रोगी शौच्यास आवरूं शकत नाहीं, प्रसंग विशेषीं वस्त्रांतच शौचास होतें अशा स्थितींत कुचला ही एक अद्वितीय औषधि आहे.

हृद्रोग, अफूची संवय

हृदय व रक्तवाहिन्या यांवर या औषधाचा प्रभाव दिसून येतो. हृदयाची आंकुचन विकसनक्रिया अप्रमाणबद्ध होते, त्याचप्रमाणें हृदयाचे इतर क्रियेमध्येंहि असंबद्धता असेल तर योग्य प्रमाणांत कुचला सेवन केल्यास फायदा होतो. अफू खाणाराची अफूचीं संवय मोडण्यास ह्याचा उपयोग केला जातो. कुचला रक्तशुद्धीकरितां फारच उपयुक्त आहे. आम्हीं ह्याचा प्रयोग कांहीं वेळां करून पाहिला आहे. व त्यांत त्याचा उत्तम गुण दिसून आला आहे.

जंगम विषबाधा

कुचला स्वयं स्थावरविष असल्यानें तो जंगमविष नष्ट करितो. सर्व जहरी प्राणी व जंतूच्या विषावर ह्याचा बाह्योपयोग गुणदायी होतो. सर्पविष व अलर्कविष (पिसाळलेल्या कुत्र्याचें विष) ह्यावर कुचलासेवन परम लाभदायक आहे. कुचल्यांत पौष्टिक गुणधर्म भरपूर असल्याचें प्रसिद्धच आहे व म्हणून हा पौष्टिक औषधांतून बराच वापरला जातो.

यकृत्-विकार, स्नायूंची शिथिलता

यकृत् विकारावर कुचला सर्वश्रेष्ठ औषध आहे. ह्यांचें कांहीं दिवस सेवनानें यकृताचे सर्व विकार जसें सूज, वृद्धि वगैरे यांस आराम पडतो. अंत्रपुच्छप्रदाहांत ह्याचा प्रयोग अत्युत्तम कार्यकारी आहे. कुचला स्नायुमंडलाला उत्तेजित करणारा असल्यामुळें, स्नायूंच्या अशक्ततेमुळें व शिथिलपणामुळें उद्भवणाऱ्या रोगांवर ह्यांचें सेवनानें आराम पडतो.

कुचल्याचे कांहीं योग

कुचल्याचे मिश्रणानें बनणारे योग इतके अनेक आहेत कीं, ते सर्व लिहिल्यास एक स्वतंत्र पुस्तकच तयार होईल. म्हणून विस्तारभयास्तव येथें फक्त दीर्घकाल अनुभवित असे २।४ च योग लिहित आहे.

पीडानाशक प्रयोग

साहित्यः- कुचला चूर्ण ८ तोळे, शृंगिक चूर्ण ५ तोळे, अफू उत्तम २॥ तोळे, कापूर देशी ८ तोळे, कॅर्बॉलिक ॲसिड द्रव २ तोळे, मिथिलेटेड स्पिरिट एक बाटली व तिळाचें तेल एक बाटली. (२४ औंस)

औषध कृति

प्रथम कुचलाचूर्ण व शृंगिकचूर्ण २२ औंस स्पिरिटमध्यें घालून, बाटलींत भरून व तोंड बन्द करून १५ दिवस तसेंच ठेवावें, मात्र बाटली दररोज न विसरतां हलवित जावी. पंधरा दिवसानन्तर स्पिरिट गाळून घ्यावें व निघालेला साका टाकून द्यावा. व नन्तर २ औंस स्पिरिटमध्यें अफू चांगली घोटून ते अफुयुक्त स्पिरिट पहिल्या कुचला व शृंगिकचूर्णवाल्या स्पिरिटमध्यें चांगल्या रीतीनें मिसळावें. कॅर्बॉलिक ॲसिड व कापूर प्रथम एका बाटलींत घालून नन्तर त्यास पुरेसें स्पिरिट त्यांत घालावें व चांगलें मिसळावें. व नन्तर हें स्पिरिट पहिल्या स्पिरिटमध्यें मिसळावें. सरतेशेवटीं तिळाचें गोडेतेलहि ह्या स्पिरिटमध्यें मिसळावें. म्हणजे हा सर्व पीडा-शामक योग तयार होतो.

गुण- याचें मालिश करण्यानें कसल्याहि प्रकारचा रोग जादूसारखा त्वरित नाहींसा होतो. वातरोग व निमोनियाचा रोग यांवर हें एक अचूक औषध आहे. जखमेवरहि उत्तम गुण दिल्याचें पाहण्यांत आहे. जहरी जंतूच्या दंशावरहि हें लाविलें असतां लाभदायक झाल्याचें सिद्ध झालें आहे.

(सूचना— याच्यांत जहरीं द्रव्यें असल्यानें हें हातानें लाविल्यानंतर हात साबणानें स्वच्छ धुवून टाकावे.)

कुचला सुरासार

कृति— शुद्ध कुचल्याचें चूर्ण ५ तोळे घेऊन १ पौंड रेक्टिफाईड स्पिरिटमध्यें चांगलें मिसळून १० दिवस तसेंच राहूं द्यावें. तदनंतर गाळून घ्यावें.

प्रमाण— मोठ्या माणसास ५ ते १० थेंब, पाण्यांत मिसळून भोजनोत्तर दिवसांतून २ वेळां पिण्यास द्यावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुणधर्म

गुण— याचें सेवनानें जठराग्नि प्रदीप्त होतो, विकार दूर होतात, व तें (यकृत्) कार्यक्षम व मलावरोधाची तक्रार नष्ट होते. याचें शरीरांत नवचैतन्य निर्माण होतें. हें ज्वरांश-, पुष्टिवर्धक, बलवीर्यवर्धक व कामोद्दिपकहि है.

स्वप्नदोषघ्न वटी

कृति- शुद्ध कुचला २ तोळे, लोहभस्म १ तोळा मकरध्वज ६ मासे. या तीनहि जिनसा काढ्यांत घालून खलामध्यें चांगल्या घोटाव्या एवढाल्या गोळ्या कराव्या.

मात्रा व गुणः— १ ते २ गोळ्या सकाळ दुधाबरोबर सेवन केल्यानें स्वप्नदोष बिल-नाहींसा होतो. त्याशिवाय कमरदुखी, डोकेदुखी पोटऱ्या वळणें (दुखणें) वगैरे अशक्तपणा-होणाऱ्या व्याधि नष्ट करण्यामध्यें हा उपयोगी आहे.

हिस्टीरियानाशक वटी

कृति— शुद्ध कुचला २ तोळे, भीमसेनी कापूर, हिरा हिंग १ तोळा, या सर्व जिनसा घालून ब्राह्मीचे काढयांत चांगल्या घोटाव्या एवढ्या गोळ्या कराव्या.

मात्रा व गुणः— १ ते २ गोळ्या पाण्याबरो-सकाळ संध्याकाळ दोनवेळ घेणें. हिस्टोरियाचें दिवसांत निर्मूलन होतें.

समीरगजकेसरी

कृति— शुद्ध कुचला शुद्ध अफू व मिरी जिनस समभाग घेऊन खलांत घालून आल्याच्या चांगलें खलावें, व मुगाएवढ्या गोळ्या कराव्या.

घेण्याचें प्रमाण व गुण— एकावेळीं २ ते ४ पाण्याबरोबर दिवस व रात्र मिळून २।३वेळां. याचें सेवनानें सर्व प्रकारचे वातव्याधि, सर्दी, अतिसार अवश्य बरे होतात. त्रिषूचिकेवरहि (कॉलऱ्यावर) याचा उपयोग होतो.

मेहांतक वटी

कृतिः— शुद्ध कुचला १ तोळा, शुद्ध शिला-जित १ तोळा, वंगभस्म १ तोळा, लोहभस्म १ तोळा. या सर्व जिनसा गुडमार वनस्पतीच्या काढ्यांत खलून, मुगाएवढ्या गोळ्या कराव्या.

गुण व प्रयोगः— १ ते ४ गोळ्या दुधाबरोबर सकाळ संध्याकाळ घ्याव्या. यानें मधुमेह, बहुमूत्र, अग्निमांद्य व प्रमेहादि विकार सत्वर बरे होतात.

कुचल्याचें इंजेक्शन

ॲलोपॅथीमध्यें याच्या सत्वापासून इंजेक्शन तयार करतात. परंतु आम्ही आयुर्वेदिक इंजेक्शन खालीं दिलेल्या पद्धतीप्रमाणें तयार केलें आहे व हें उत्तम गुणकारी म्हणून सिद्ध झालें आहे.

कुचल्याचें पंचांग जाळून त्याची पांढरी रक्षा करावी. व पुन्हां क्षारविधि प्रकारानें त्याचा क्षार तयार करावा व सुरक्षित ठेवावा.

मात्रा व प्रयोगः- हा क्षार अर्ध्या तांदुळाएवढा ($\frac{1}{2}$ ग्रेन) घेऊन तो १-२ अगर ३ सी. सी. परिस्रुत जलामध्यें (distilled water) मिसळून त्याचें मांसपेशींत अगर त्वचान्तर्गत आवश्यकतेप्रमाणें सूचिभरण द्यावें. या क्षाराचें इंजेक्शन अनेक प्रका-रच्या रोगावर विशेषतः वातव्याधि, श्वास, रक्तविकार मंदाग्नि, प्रमेह व व्रण हे रोग बरे करण्यांत आश्चर्य-जनक प्रभाव दाखवितें.

सूचनाः- सर्वसाधारणतः हें इंजेक्शन आठ-वड्यांत दोन वेळ द्यावें. परंतु जर रोगपरिस्थिति विशेष असेल तर अधिक वेळां देण्यास हरकत नाहीं.

कुचला अतिसेवनानें दुष्परिणाम

बऱ्याच लोकांचें असें मत आहे कीं, कुचला सतत दीर्घकालपर्यंत सेवन करूं नये; जर अधिककाल सेवनाची जरूरच पडेल तर मध्यंतरीं थोडथोडा काल सोडून सेवन करावा. अन्यथा तो स्नायुमंडलांत विकृति उत्पन्न करून लकवा आदि आक्षेपक रोग निर्माण करितो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुचलविषाचा प्रतिकार

कुचला हा एक विषारी पदार्थ आहे म्हणून याचा दुरुपयोग झाल्यास बहुतकरून अंग ताठ होणें, वरचेवर जांभया येणें, कंप, दाह, बडबड, शिरपीडा श्वसनास कष्ट, अरुचि, मूर्च्छा वगैरे उपद्रव निर्माण होतात. आणि जर योग्य वेळांत उपचार न झाले तर रोगी २ ते १२ तासांत प्राणास मुकतो. कुचला खाल्लेल्या रोग्यांत अन्य विषदूषित रोग्यापेक्षां वातजन्य आचके अधिक येतात, हें ह्या रोगाचें मुख्य लक्षण आहे.

कुचला खाल्ल्याचें समजल्याबरोबर वमन व विरेचन (वांति व जुलाब) हे दोन्हीहि प्रयोग तावडतोब करावे. नंतर गाईचें दुधांत तूप व मध मिळवून पिण्यास द्यावें, किंवा शिरिषारिष्ट गाईचें ताकांत मिसळून पिण्यास दिलें असतांहि फायदा होतो. कर्पूरासव, कर्पूरार्क, किंवा कर्पूरजल (Camphor-water) पिण्यास दिलें असतांहि कुचल्याचें विष नष्ट होतें. कधीं कधीं जांभया फारच येतात व पोटांत औषधहि जाऊं शकत नाहीं अशा अवस्थेंत बस्तिद्वारा उपचार करावेत.

श्रीमंतांचें कर्तव्य

आर्थिक विषमता शक्य तितक्या लौकर नष्ट करण्यासाठीं गरीब वर्ग सध्यां प्रयत्न करीत आहे. त्या प्रयत्नांत श्रीमंतांनीं सरकारशीं सहकार्य करावें.

श्रीमंतांना यापुढें कितीकाळ श्रीमंत राहतां येईल ह्याची मला शंकाच वाटत आहे. श्रीमंताकडून कराच्या रूपानें अधिक रक्कम सरकारी खजिन्यांत ओढून आर्थिक समता स्थापन करण्याचा प्रयत्न सरकारनें चालविला आहे. हा मार्ग शांततेचा आहे.

समाजोन्नतीसाठीं ज्या निमसरकारी संस्था आज कार्य करीत आहेत, त्यांना आर्थिक साहाय्य करण्याचा मार्गहि श्रीमंतांनीं अनुसरावा.

आर्थिक समता प्रस्थापित करण्याचें ध्येय आपल्या घटनेंत समाविष्ट करण्यांत आलें आहे.

—अर्थमंत्री देशमुख

इंस्टिटयूट ऑफ सायन्स

मुंबईची अिन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ही देशांतील एक पहिल्या दर्जाची संशोधन संस्था होईल अशी आशा मुंबई सरकारचे कायदा आणि शिक्षण खात्याचे मंत्री श्री. दिनकरराव देसाई यांनीं ता. २१ जून रोजीं सदरहू संस्थेच्या पुनर्रचनेबाबतच्या योजनेचें उद्घाटन करतांना व्यक्त केली.

सर्टीफिकेट मिळण्याची व्यवस्था

मुंबई सरकार १९३९ च्या मुंबई वैद्यक व्यवसायींसंबंधींच्या नियमांत दुरुस्ती करणार असून त्यासंबंधींच्या हरकती किंवा सूचना ता. २३ जुलै पर्यंत स्वीकारण्यांत येतील. दुरुस्तीचा मसुदा मुंबई सरकारच्या ता. २ जुलैच्या गॅझेटमध्यें ४– ब भागांत प्रसिद्ध झाला असून त्या अन्वयें १९३८ च्या मुंबई वैद्यक व्यवसायसंबंधींच्या कायद्याखालीं ज्यांचीं नांवें नोंदविण्यांत आलीं असतील अशा वैद्यक व्यवसायींना १ रुपया फी भरून रजिस्ट्रारकडून नोंदीबाबतचें सर्टीफिकेट देण्यासंबंधींची तरतूद करण्यांत आली आहे.

हरकती किंवा सूचना मुंबई सरकारचे स्थानिक स्वराज्य खात्याचे सेक्रेटरी, सार्वजनिक आरोग्य खातें, सेक्रेटरीअेट, मुंबई, १ यांच्याकडे पाठवाव्या.

पवित्र
नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहाः- नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

पाचोरें येथील नवीन विक्रीकेंद्र
श्री गजानन स्टोअर्स, पाचोरें (पू. खा) यांचेकडे आयुर्वेद सेवा संघ, औषधीभवनांत तयार झालेलीं सर्व औषधें मिळतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोंवराची अनुभूत चिकित्सा

लेखक : वैद्य त्र्यंबक नारायण तुळपुळे, बंगाडी

गोंवर हा मसूरिकेचाच एक प्रभेद आहे. दुष्ट ...वरणामुळें सांथीच्या रूपानें फैलावणारा हा तीव्र ...गीक रोग होय. डिसेंबरपासून जूनपर्यंत गोंवराची ...अधिक अशी दरवर्षी येतेच. आमच्या गांवीं ...वर्तें १।३ दां हल्ला केला, त्यावेळीं पुढील उपायांनीं ...कित्सा करण्यांत आली.

गोंवराची सांथ प्रथम शाळेमुळेंच पसरते, असें ...शांच्या निदर्शनास आलें आहे. म्हणूनच ह्यांची ...शहरांत वेळोवेळीं पाहाण्यांत येते. दहा वर्षांच्या ...तील अर्भकें बहुतेक गोंवराच्या तोंडीं पडतात. ... महिन्यांहून लहान अर्भकांना सहसा येत नाहीं. ...हरणें मोठ्यांचीहि देतां येतील. गोंवर दोन प्रकार... आहे. (१) सौम्य व (२) तीव्र. तीव्र प्रकारांत ...तर रोगी दगावण्याची भीति असते.

...म्ललवणक्षारविरुद्धाध्यशनाशनैः ।
...निष्पावशाकाद्यैः प्रदुष्टैः पवनोदकैः ।
...ग्रहे क्षणाद्वापि देशे दोषाः समुद्धताः ।
...यान्ति शरीरेऽस्मिन् दुष्टरक्तेन संगताः ॥
...कृशोन्नातिसमा रागिण्य कफपित्तजाः ।
...रोचकसंयुक्ता रोमांत्यो ज्वरपूर्विकाः ॥ मा. नि.

गोवराचीं लक्षणें

एकदम ताप, पडसें, शिंका, कास, अश्रुपात ...रंभीं असतात, व स्वरभंग, लाल डोळे, शिरोग्रह, ...क, असुख, उजेडाकडे डोळे उघडतां व पाहतां ...णें, इत्यादि लक्षणें होतात. केव्हां केव्हां अतिसार ...गैरे सुद्धां सुरू होते. नंतर २।३ दिवसांत ताप ...होतो. ४ ते ६ व्या दिवशीं गोंवर वर निघण्यास ...होते. त्यावेळेस ताप पुनः उलटण्याचा संभव ...तो. प्रथम गोंवर कपाळ, भुंवया, पापण्या व तोंड ...येतो. नंतर सर्व शरीरभर पसरत जातो. रोमरंध्रा... वर उचललेल्या व तांबूस रंगाच्या पुरळा... पुटकुळ्या बाहेर पडतात. मग त्या पुटकुळ्या फोडल्या म्हणजे त्यांतून साधारण पांढरा, बुळबुळीत स्राव होतो. व नंतर त्या पुटकुळ्यांचा स्राव एकमेकांना लागून पुटकुळ्यांचे पुंजके बनतात.

गोंवर आल्या दिवसापासून ४ ते ६ दिवसांनीं पिडका सुकतात व मावळतात. सामान्यतः १८।२० दिवसांनीं रोगी सुधारतो. गोंवर मावळण्याच्या सुमारास अंगाला अतिशय कण्ड सुटते. हें रोगी सुधारण्याचें लक्षण म्हणून समजलें जातें. कण्डू सुटल्यावेळीं खाजवूं नये. कारण चर्म फाटून व्रण पडण्याचा संभव अधिक असतो.

केळी देण्याची प्रथा

गोंवर लवकर बाहेर पडावा अशा इच्छेनें रोग्यास केळीं वगैरे अहितकारक पदार्थ देण्याची प्रथा कांहीं वृद्ध मंडळींत आहे, पण ही घातुक आहे.

गोवरांत डोळ्यांची दक्षता विशेष घेतली पाहिजे. नाहींतर डोळे विकृत होण्याचा संभव असतो.

संसर्गजन्य कांहीं इतर कारणें:- नाकातोंडातून वाहणाऱ्या पाण्यांत व श्वासोच्छ्वास आणि कपडे वगैरेंतून रोग फैलावतो.

चयकाल – ८ ते १४ दिवस

निदान – सोपें आहे.

उपद्रव – ब्राँकोन्युमोनिया, ऐकूं न येणें, नेत्रव्रण, कर्णशूल व दाह, पक्षवध, वागिंद्रियदाह, प्रदर, योनिव्रण, योनिकंडू व शोथ वगैरे मुख्य आहेत.

दक्षता – सांथ चालू असतांना रोग्याला खुल्या मोकळ्या हवेच्या खोलींत निजवावें. वाऱ्याचा झोत अंगावर न येईल अशी व्यवस्था असावी. ग्रंथांतरीं:-

उच्चस्तमे प्रशस्ते च मसूरीरोगपीडितः ।
शुष्के गृहे वसेन्नित्यं गुरूष्णवसनावृतः ॥

रोग्याचीं वस्त्रें इतरांच्या वस्त्रांत न मिसळण्याकडे लक्ष द्यावें. १४ दिवसपर्यंत जनसमूहांत मिसळूं देऊं नये. व इतर आवश्यकतेनुसार दक्षता घ्यावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चिकित्सा-उपचार

१) मलबद्धता असल्यास – स्वादिष्टविरेचन-चूर्ण १/४ तो. + त्रिफळा चूर्ण १/८ तो. एकत्र करून ऊन पाण्यांतून द्यावें.

२) डोळ्यांत – ताप आल्या दिवसापासून म्हणजे तिसऱ्या दिवसापासून चणे पाण्यांत भिजत घालून तें पाणी डोळ्यांत सोडीत असावें.

गोंवर बाहेर पडल्यावर

गोंवर बाहेर पडल्यानंतर कडूजिऱ्यांचा काढा करून दिवसांतून दोनदां ४ औंसप्रमाणें १८ दिवसपर्यंत द्यावा. यानें गोंवर निःशेष बरा होतो असा अनुभव आहे. इतर आवश्यक वाटल्यास उपद्रवानुरूप चिकित्सा करावी.

रक्तशुद्धीसाठीं औषधें

महामंजिष्ठादिकाढा + महायोगराजगुग्गुळ मिश्रण करून द्यावें. हें मिश्रण पूर्ण गुण झाल्यावर रक्तशुद्धीसाठीं द्यावें. नंतर २१ व्या दिवशीं बळी काढावी. मग (१) कडुनिंबाचीं पानें (२) व कडूजिरें एकत्र वाटून त्याचा अंगाला लेप द्यावा. व लाल माडाची साल + बकळ्याचीं पानें + निर्गुडीचीं पानें + काजऱ्याचीं पानें + कडुनिंबाचीं पानें + कडवीचीं पानें + सरळीचीं पानें अशा सात जातीचीं पानें व साल घालून तयार केलेल्या संस्कृत पाण्यानें स्नान (अभ्यंग) घालावें.

पथ्य

कुळीथाचें सार व जुने तांदूळाचा भात खावा. कॉफी, मूग, मसूर, चणे, यव इत्यादि हितकारक पदार्थ पथ्य आहेत. व

"किञ्चिदुष्णांबुना स्वेदः रोमान्तीज्वरनाशनः"।

अपथ्य

केळीं, पापड, चहा, आंबट, खारट, तिखट पदार्थ व संभोग हे वर्ज आहेत.

शीतं वातं जलं शीतं वन्हितापं तथातपम्।
त्यजेत् कान्तां दिवास्वापं यात्रा रात्रौ च जागरम्॥
रतं खेदं श्रमं तैलं गुर्वन्नं क्रोधमातपम्।
दुष्टाम्बु दुष्टपवनं विरुद्धान्यशनानि च॥
कट्वम्लं वेगरोधश्च मसूरी (रोमांत्यो) गदवांस्त्यजेत्॥

ॲलोपॅथिक– पाश्चात्य विज्ञानशास्त्राप्रमाणें गोंवर कृमी (जन्तु)मुळेंच होतो असें मानतात पण ह्याचा कृमी अद्याप अज्ञात आहे.

बाराक्षार– क्यालीमूर किंवा पोट्याशियम् क्लोराइड नांवाचा क्षार शरीरांत कमी झाल्यास ह्या रोगाचा प्रादुर्भाव होतो असें जीवनरसायनशास्त्रज्ञांचें मत आहे.

त्रिदोषनाशक सुलभ पौष्टिक भस्म

सहापुटी अभ्रकभस्म

(याबरोबर लोह, मंडूर, माक्षिक हीं येतां येतात.)

अभ्रकभस्माचे गुण सर्व वैद्यांना माहित आहेत, इतकेच नव्हे तर सामान्य सुशिक्षित मनुष्य हें जाणतो कीं अभ्रकभस्म क्षयरोगावर वैद्य देत असतात. एखादा दौर्बल्यजन्य रोग झाल्यावर ती दुर्बलता घालविण्यासाठीं औषध घेऊन गुण येतो कीं नाहीं हें बघत बसण्यापेक्षां दरसाल कांहीं दिवस हें अभ्रकभस्म ऋतुप्रमाणें व प्रकृति-दोषानुसार तूपसाखरेंतून, तूपमधांतून अगर नुसतें तुपांत अगर मधांत घेऊन आपलें बल (रोगप्रतिकारशक्ति) टिकविणें हें अधिक श्रेयस्कर नाहीं काय ?

वैद्यांना नित्य अनेक प्रकारच्या रोग्यांच्या सान्निध्यांत वावरावें लागतें. अशा वेळीं ज्यांची प्रतिकारशक्ति कमकुवत असेल त्यांना त्या त्या रोगाला बळी पडावें लागतें असा अनुभव येतो. सेवा संघाचें ६ पुटी अभ्रकभस्म वैद्यांना स्वतः घेण्यासाठीं व रोगांतून उठलेल्या सर्वसामान्य रोग्यासाठीं उत्तम गुणकारी आहे.

किंमत ३ रु. तोळा

आयुर्वेद सेवा संघ, औषधिभवन, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नि. भा. आयुर्वेद शास्त्रचर्चा परिषद, हरिद्वार

या परिषदेमध्यें चरक- सुश्रुतांतील द्रव्याबाब- तच्या खालील सूत्रांवर विशेष चर्चा झाली.

यत्राश्रिताः कर्मगुणाः कारणं समवायि यत्
तत् द्रव्यम् । च. सं.

खादीन्यात्मा मनः कालो दिशश्च द्रव्यसंग्रहः
-च. सं.

क्रियागुणवत् समवायि कारणं तत् द्रव्यम्।
-सुश्रुत.

हीं सूत्रें आजचे कालांतहि अबाधित आहेत, याबद्दल एकमत होतें. मतभेद झाले ते द्रव्य ह्या शब्दाला इंग्रजींत प्रतिशब्द कोणता द्यावा बाबत. 'द्रव्यगुण-रसवीर्यप्रभाव' ह्या विषयावर इंग्रजींत निबंध लिहिणाऱ्या एका डॉक्टरानीं 'द्रव्य' म्हणजे 'मॅटर' असें म्हटलें आहे. परिषदमतें हा अनुवाद यथार्थ नाहीं असें ठरलें. किंबहुना वरील सर्व संज्ञांचें लेखन संस्कृतांत त्याच संज्ञेनें व्हावें असेंहि ठरलें. कारण "The Matter is that which occupies space and which has got weight." व "The matter is that which is perceived by senses"

'द्रव्य' शब्दाची व्याख्या

ह्या दोन्ही आधुनिक व्याख्या आयुर्वेदीय द्रव्याची यथार्थ कल्पना देण्यास अपुऱ्या पडत आहेत. द्रव्य शब्दाची हिंदी व्याख्या "द्रव्यगुणविज्ञान में द्रव्य शब्दसे केवल चिकित्सोपयोगी पांचभौतिक स्थूल द्रव्य अभिप्रेत है।

'गुण' संज्ञेचें विवेचन

त्यानंतर "गुण" शब्दावर विवेचन सुरूं झालें. त्याकरितां समवायि निश्चेष्टः कारणं गुणः"

च. सू. १-८८

सार्था गुर्वादयो बुद्धिः प्रयत्नांताःपरादयः। च. सं. हें वचन प्रमाण मानलें गेलें. (१) सार्थः-शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध- ५(२) गुर्वादि २० गुणः- गुरुमंद-हिमस्निग्धश्लक्ष्णसांद्रमृदुस्थिरसूक्ष्मविशदलघुतीक्ष्णउष्ण-रूक्षखरद्रवकठिनचरस्थूल-२०

(३) बुद्धि. (४) प्रयत्नांताः-इच्छा, द्वेष, सुख, दुःख, प्रयत्न -५. (५) परादि गुणाः- परा, परत्व, युक्ति, संख्या, संयोग, विभाग, पृथक्त्व, परिणाम, संस्कार, अभ्यास -१०.

अशा तऱ्हेनें आयुर्वेदानें ४१ गुण मानले. गुण शब्दाची हिंदी व्याख्या "जो समवाय-संबंधसे द्रव्य में आश्रित हो, चेष्टारूप, कर्मसे भिन्न हो-गुणरहित हो, और जीवन, बृंहण आदि कर्मके कारण हो।" ह्या संख्येंत आधुनिकांनीं ठरविलेल्या भौतिक व रासायनिक गुणांची म्हणजे तंतुक्षमता, संवाहकता, घनघातक्षमता, भारता, घनता, आभा, दृढता, द्रवता, इत्यादि गुणांचा समावेश करावा किंवा काय ह्यावर दोन्ही बाजूंनीं खूपच चर्चा झाली. पण इतक्यांतच ह्याबाबत अंतिम निर्णय न घेणें बरें असें ठरलें.

'रस' संज्ञेची व्याख्या

ह्यानंतर "रस" संज्ञेचा क्रम लागला. त्याबाबत "रसनाग्राह्यो रसः"। "रसनार्थो रसः"। हीं वचनें प्रमाण मानलीं गेलीं. "रस" शब्दाची हिंदी व्याख्याः- "वह द्रव्य का एक विशिष्ट गुण है जिसका मुख्यतः रसनेंद्रियद्वारा ज्ञान होता है।

विपाक, परिपाक, प्रपाक

रसानंतर विपाकसंज्ञा विचारांत घेतली. ह्याकरितां "जाठरेणाग्निना योगाद्यदुदेति रसांतरम्। रसानां परिणामांते स विपाक इति स्मृतः॥" हें सूत्र चर्चेला घेतलें, व तेंच प्रमाण मानलें गेलें. त्याची हिंदींतील व्याख्याः- जठराग्निद्वारा महास्रोतोमें विभिन्न स्थलोंमें परिपाक होनेके बाद जो षड्स आहार द्रव्यों का परिणामरूप रसांतर होता है उसे विपाक कहते हैं। विपाक संज्ञेवर चर्चा करतांना "विपाक" "परिपाक" "प्रपाक" अशा विविध संज्ञा पचनस्थानभेदानें होऊं शकतात असें एक मत मांडलें गेलें; पण तें परिषदेला संमत झालें नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वीर्य

"उष्णशीतगुणोत्कर्षात् तत्र वीर्यं द्विधा स्मृतम्।"

"कर्मभिः लक्ष्यते यत् कर्मलक्षणं वीर्यम्"।

"वीर्यं पुनर्वदन्त्येके गुरु स्निग्धं हिमं मृदु।

लघु रूक्षोक्ष्णतीक्ष्णं च तदेवं मतमष्टधा॥ अ. हृ.

वै. गोडबोलेशास्त्री यांचा खुलासा

झांशी निवासीत वैद्यबृहस्पति गोडबोलेशास्त्री यांनीं ह्याबाबत खुलासा केला. ते म्हणालेः—

(१) द्रव्यकर्तृत्वे कर्मण्यपि कारणभूतम्। तद्वीर्यम् सिद्धकल्पनिघंटु. (२) रसविपाकप्रभावातिरिक्तं प्रभूतं कार्यं कर्म तद्वीर्यम्।

वीर्याचे ६ प्रकार

वीर्यांचे सहा प्रकार संभवतातः- १) विपाकमात्र आधिवास, सहज, कृत्रिम, रसानुकूल, रसप्रतिकूल, उदाहरणार्थः-१) विपाकमात्र-राई. हिंगु. २) आधिवास-अर्जुन, रोहितक, तिल, तैल, भांग, माका, ३) सहजः- मदनफल (सुखवमन), त्रिवृत् (सुखविरेचन) घृत (पित्तशमन), इ., ४) कृत्रिमः- लाह्या, ऊद चरबी (मेद), इ., ५) रसानुकूलः- किराईत, मोती, दही, इ. ६) रसप्रतिकूलः- पिंपळी, दूध, जेष्ठमध, कंवठ, इ.

कोणी आचिंत्यवीर्य असाहि एक प्रकार मानतात. त्याचीं उदाहरणें-वचाघृत-मेध्य. मध्वाम्लसुवर्ण-आयुष्य-कर, लक्ष्मणामूलकल्कयोग-पुंसवनकर.

प्रभाव

प्रभावः- आचिंत्यः। ह्याबाबत वैद्यवर्य प्राणाचार्य गोडबोले म्हणाले कीं "रोगापनयने सामर्थ्य शक्तिः। म्हणजेच प्रभाव. ह्याचें ज्ञान १) जठराग्निसंयोग, २) त्वङ्मांसादिसंयोग, ३) विनोभयोग संयोग, ४) धारण वा संनिधान, ५) प्रायश्चित्त, ६) होमहवन, अशा सहा प्रकारें होतें.

रोज ६ तास चर्चा

वरील विषयावर रोज सहा तास याप्रमाणें आठ दिवस चर्चा झाली. चर्चेमध्यें आयुर्वेदाचे सिद्धांत आजहि अबाधित आहेत असें बोललें बात अस्रे. चर्चेचें स्वरूप विविध व खेळीमेळीचें होतें. या चर्चेंत वैद्य, हकीम, दार्शनिक आणि आधुनिक विज्ञानांतले तज्ज्ञ यांनीं भाग घेतला होता. चर्चा समाधानकारक झाली. गुणांच्याबाबत खनिज द्रव्यांचे भौतिक गुण लक्षांत घेणें अत्यंत जरूर होतें. कारण आजचा वैद्यकीय व्यवहार प्रामुख्यानें भस्मरसायनांदिकारावरच आधिष्ठित आहे. तेव्हां चरकाबरोबरच नागार्जुनसंप्रदायाचा हिविचार होणें आवश्यक आहे.

शास्त्राच्या जिवंत पणाचें लक्षण

अद्यावतता हें शास्त्राच्या जिवन्तपणाचें लक्षण आहे. तें साधणारीं शास्त्रें प्रगतिपर व अथवा वर्धिष्णु राहातात. ही गोष्ट लक्षांत घेऊन पुढील शास्त्रचर्चा-परिषदेंत आधुनिक विज्ञानशास्त्रांतील आयुर्वेदपोषक अशा गोष्टींचा समावेश आयुर्वेदांत करण्याकडे उपस्थित वैद्यांचा कल रहावा हेंच उचित होय. किंबहुना शास्त्रचर्चा परिषदेची खरी फलश्रुति तीच होय.

अमळनेर

येथें आयुर्वेद सेवा संघाचीं नवीन सर्व प्रकारची औषधें मिळण्याचें ठिकाण-

श्रीकृष्ण वैद्य अँड ब्रदर्स

कुंभार टेक, अमळनेर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार—

आसवें-अरिष्टें यांची गणना 'परदेशी' दारूंत ?

मुंबई सरकारच्या हुकुमान्वयें ता. १-११-५२ पासून आसवें, अरिष्टें व प्रवाही काढे आणि तमाम आयुर्वेदिक औषधें, ज्यामध्यें निसर्गतः अल्कोहोल उत्पन्न होतो, अशा सर्व औषधांची गणना "परदेशी दारू" म्हणून झालेली आहे ! व या आयुर्वेदिक औषधांना "परदेशी दारू" संबोधून सेल्स टॅक्सचा नियम लावून एक जबरदस्त विक्रीकर लादला आहे, त्याची प्रत सोबत आहे. त्यावरून मुंबईचे सेल्स टॅक्स कलेक्टरचें म्हणणें कळून येईल.

बहुधा आपल्या ध्यानाबाहेर ही गोष्ट असावी असें वाटतें. तरी आपण सर्व आयुर्वेदिक कंपन्यांशीं संपर्क सांधून विचारविनिमय करून एक प्रतिनिधि-मंडळ सरकारकडे पाठवावें, व हा भयंकर कर कमी करून घ्यावा. निदानपक्षीं या आयुर्वेदिक ऋषिप्रणालित देशी औषधांना 'परदेशी दारू' म्हणून जें सरकारनें म्हटलें आहे तें तरी दूर करून घ्यावें, व हा झालेला अन्याय दूर करणेंची खटपट करावी असें आम्हांस वाटतें.

आपला,

⊕ ⊕ ⊕

× × ×

मुंबईराज्य सेलसटॅक्स कलेक्टरचें पत्र

Bombay, 27 June 1953.

To, ____________________________

Gentlemen,

I have to refer to your letter No. S/51 dated 13th June 1953. I have to state that all liquid medicinal preparations containing self-generated alcohol prepared by a process of fermentation, whether known by the name of "Drakshasava, Asava, Arishta, Kadha" or by any other Ayurvedic appellation, are considered to be Foreign Liquors defined under clause (17) of section 2 of the Bombay prohibition Act, 1949, read with proviso thereto, and are therefore covered by entry 4 of Schedule II to the Bombay Sales Tax Act, 1953, and hence sales of the same would be subject to special tax @ 1 anna in the rupee on the first stage of the sale in addition to general tax @ 3 pies in the rupee on all stages of the same. An order under section 27 (d) of the Bombay sales Tax Act, 1953, as requested by you is therefore not considered necessary in the case.

Bank of India Bldg. 3rd Floor,
Flora Fountain, Fort, BOMBAY

Yours faithfully,
Collector of the Sales Tax
Bombay State, Bombay.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खरें साहित्य कोणतें ?

" आज साहित्याकडे आपण पहात आहों ते कला, तंत्र या दृष्टीनें. पण आपण हें लक्षांत ठेवा कीं, कला व तंत्र म्हणजे साहित्य नव्हे. साहित्याचें खरें महत्व त्याच्या आशयांत, वैचारिकतेंत असतें. पूर्वीचे साहित्यिक ह्या गोष्टीवर फार भर देत असत. गीतासुद्धां ह्या दृष्टीनेंच वाङ्मयाचें उगमस्थान आहे. गीतेचें महत्व विचारांत आहे. " आत्मौपम्य " ही गीतेची शिकवण आहे. मानवी कल्याणाचें तत्वज्ञान सांगणें हा पूर्वीचा दृष्टिकोन होता.

विष्णुशर्म्याचें पंचतंत्र

विनोबांच्या भाषेंत सांगावयाचें झाल्यास " जें समाजाचा उद्धार करतें तेंच खरें साहित्य होय. " ह्या दृष्टीनें पाहिलें तर विष्णुशर्म्याचें पंचतंत्र हें जीवनोपयोगी गोष्टींची खाण आहे. विचारांच्या दृष्टीनें आपलें प्राचीन वाङ्मय निश्चितच उच्च आहे. तुकाराम, तुलसीदास, कबीर यांची दृष्टि तर जीवन उदात्त करण्याचीच होती.

साहित्याचा उगम समाजसेवेंत असावा

ती दृष्टि त्यांना कोठून मिळाली असेल तर समाजसेवेंतूनच. साहित्याचा उगम समाजसेवेंतूनच झाला पाहिजे, हा माझा दुसरा मुद्दा आहे. साहित्य हा आजचा धंदा झाला आहे. ही वृत्ति सोडा. केवळ लेखनासाठीं लेखक होऊं नका.

लायब्ररींत बसून वाङ्मय निर्माण करणाऱ्या लेखकांची आज आमच्या राष्ट्राला गरज नाहीं. आजचें साहित्य निकामी झालें आहे याचें कारण सेवा नि साहित्य यांचीच फाळणी झाली आहे. साहित्याचा उगम नि त्याची परिणति ही सेवेंतच असली पाहिजे.

आरोग्यपूर्ण दृष्टिकोन

आजचे नवकवि म्हणे जगांत सर्वत्र वैफल्य आहे असें सांगतात. पण ह्यांच्या जवळ जीवनाकडे पाहण्याचा आरोग्यपूर्ण दृष्टिकोनच नाहीं. ज्यांनीं कोणत्याच क्षेत्रांत कार्य केलेलें नाहीं, त्यांच्या वाङ्मयापासून आपणांस कोणती दृष्टि मिळणार ?

साहित्य म्हणजे सेवा व अनुभव

माझ्या मतें साहित्यांत कल्पनेला नि स्वप्नरंजनालाहि फारसें महत्त्व नाहीं. तेथें अनुभवाला अधिक महत्व आहे, व म्हणून मी म्हणतो कीं, साहित्य म्हणजे नियमन नव्हे, तंत्र नव्हे किंवा कला नव्हे, तर साहित्य म्हणजे सेवा व अनुभव. त्यासाठीं आपल्या सेवेचें क्षेत्र प्रथम आलें. "

—आचार्य अत्रे

तंबाकूचें पीक वाढत आहे !

भारतांत १९५१–५२ सालीं ६ लक्ष ५१ हजार एकर जमीन तंबाकूच्या लागवडीखालीं होती. १९५२–५३ सालीं ती ७ लक्ष ६८ हजार एकर आहे. गतवर्षी १ लक्ष ९२ हजार टन तंबाकूचें उत्पादन होतें. चालू वर्षी तें २ लक्ष ११ हजार टन झालें असावें असा अंदाज आहे.

अद्याप कांहीं राज्यांतील उत्पादनाची माहिती यांत समाविष्ट व्हावयाची आहे.

ग्राहकांचा अभिप्राय

अमळनेरहून श्रीकृष्ण वैद्य अँड ब्रदर्स पैकीं श्रीकृष्ण शांताराम वैद्य कळवितातः– आयुर्वेद सेवा संघाचीं औषधें इतर औषधी कारखान्यांच्या औषधांपेक्षां फारच गुणकारी आहेत असा आमच्या ग्राहकांचा रिपोर्ट आहे.

अनेकांनीं प्रशंसलेलीं " आयुर्वेद सेवा संघ " नासिकचीं सर्व गुणकारी औषधें आतां

क ऱ्हा डां त

मिळूं लागलीं.

औषधी भांडार

गुरुवार पेठ, पो. कऱ्हाड (सातारा)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद पत्रिका, १६ जुलै १९५३

वैद्यकीचा कोर्स कसा असावा ?

(लेखकः- डॉ. वा. म. बाक्रे होमिओपाथ सरकारनियुक्त सभासद देशी वैद्यक बोर्ड, मुंबई.)

(आयुर्वेदीय औषधी योजना व संशोधन हे त्या शास्त्राचें तत्त्व (थिअरी) व नियम या आधारेंच झालें पाहिजे. वैद्यकी व्यवसाय करणाराला मूलभूत इंग्रजी शास्त्रीय विषयांचें ज्ञान अवश्य आहे. वैद्यकीय लहान (शॉर्ट) कोर्स असूं नये.)

रोगपरिहार व स्वास्थ्यरक्षण करण्याकरितां नाना देशांत शोध चालले असून त्यांतूनच १४।१५ वैद्य-शास्त्रें व रोग बरे करण्याच्या सुमारें २० पद्धति निघाल्या आहेत. या प्रत्येक शास्त्राचीं तत्वें निरनि-राळीं असून त्यांची सिद्धि त्याच्या तत्वांवर व अनु-भवसिद्ध विशिष्ट नियमांवर केलेली आहे; व त्यांचें संशोधनहि याच गोष्टी प्रमाणभूत धरून करावें लागतें. रोग्यांच्या गुण करण्याच्या तत्वामुळेंच हीं निरनि-राळीं वैद्यशास्त्रें ठरलीं आहेत. या शास्त्रांमध्यें ॲलो-पॅथि, होमिओपॅथि, आयुर्वेद व युनानी तिब्बी हीं चार मुख्य आहेत. इतर शास्त्रांचा धंदा कोणी कोणी कोठें कोठें केलेला आढळतो.

कोणत्या पॅथीचें औषध ?

एखादें औषध, तेंच डॉक्टरनें, वैद्यानें, होमि-ओपाथनें किंवा हकीमानें दिलें म्हणून त्या औषधाला त्या त्या पॅथीचें औषध म्हणतां येणार नाहीं. तर त्या औषधाची योजना ज्या शास्त्राच्या गुणधर्माप्रमाणें केली असेल त्या शास्त्राचें तें औषध म्हणतां येईल. जरी चारी शास्त्रांत समान अशीं कित्येक द्रव्यें असून संशोधनामध्यें सर्व शास्त्रांत सारखे गुणधर्म सिद्ध झालेले नाहींत. त्या त्या शास्त्राच्या संशोधनांत जे गुणधर्म सिद्ध झाले असतील तेवढेच त्या शास्त्रांत नमूद केले जातात व तेवढ्याच गुणधर्मांपुरतीं तीं औषधें त्या शास्त्रांत समाविष्ट होतात.

ॲलोपॅथिक औषधांचे आयुर्वेदीकरण

ॲलोपॅथिक प्रसिद्ध औषधांचें आयुर्वेदीय तत्वा-प्रमाणें संशोधन करून तीं तेवढ्या गुणधर्मांपुरती आयुर्वेदीय म्हणून वापरावीं असें बोललें जातें. एखाद्या

रामबाण औषधाचें आयुर्वेदीयकरण केल्यानंतर कोणते गुणधर्म सिद्ध होतील याचा नियम नाहीं, व तें वैद्यांना शक्य नाहीं. वैद्यांना तें औषध वापरावयाचेंच असेल तर ज्या शास्त्रांतून तें औषधें निघालें त्या शास्त्रांत सांगितलेल्या गुणधर्माप्रमाणें तें वापरणें चांगलें. ॲलोपॅथिक औषधांचें आयुर्वेदीयकरण व्याख्यानांत प्रतिपादनालाच ठीक आहे.

पाश्चात्य औषधी कारखानदार

पाश्चात्य देशांतील औषधी कारखानदार संशो-धनाकरितां आपल्या सरकारवर फारसे अवलंबून न राहतां कारखान्याच्या फायद्यापैकीं कांहीं भाग ते या कामीं खर्च करीत असतात. आपल्या देशी कारखान-दारांचें लक्षहि या गोष्टीकडे गेलें असल्याचें दिसून येतें. गेलीं कित्येक शतकें या शास्त्रांत संशोधन नसतां तें शास्त्र पूर्वीच्या आपल्या सामर्थ्यावरच अजून टिकून आहे. यापुढें हें शास्त्र जिवंत ठेवावयाचें तर त्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विशिष्ट तत्वाप्रमाणें म्हणजे दोष, धातु, मल, रस, वीर्य, विपाक, प्रभाव वगैरे, औषधी सिद्धतेला लागणाऱ्या गोष्टींची कसोटी लावून आयुर्वेदतज्ञाच्या मदतीला आधुनिक शास्त्रज्ञ देऊन त्याचें संशोधन झालें पाहिजे. डॉक्टर दमदेरे म्हणतात त्याप्रमाणें आयुर्वेदतज्ञांना सोडून केवळ डॉक्टर लोकांकडून व्हायचें हें काम नव्हें. या संशोधनाची पद्धत ॲलोपॅथीच्या संशोधनापेक्षां अगदीं भिन्न आहे.

इंग्रजी राजसत्ता असतांना

या शास्त्राला मान्यता द्यावी म्हणून इंग्रजी सत्ता असतांना फार प्रयत्न झाले पण ते साधले नाहींत. सरकारची औषधी मदत जिल्ह्याचें व फारतर तालुक्याचें ठिकाण या पलीकडे जाऊं शकली नाहीं. असें असतांहि स्थानिक-स्वराज्य-संस्थांनासुद्धां आयुर्वेदाचे दवाखाने काढण्याची परवानगी देण्यांत आली नाहीं. पण त्यांच्या राजकारणी धोरणांतील विशेष लक्षांत घेण्याजोगी गोष्ट ही कीं, आयुर्वेद हें शास्त्रच नव्हें असें मत असतांहि, सात लाख खेड्यांना सहजासहजीं मिळत असलेली ही औषधी मदत, व याचें शिक्षण देणाऱ्या संस्था बंद करण्याचा आविचार मात्र त्यांनीं केला नाहीं.

पुणें नगर सातारा

सातारा, पुणें, नगर, मुंबई, बडोदें वगैरे ठिकाणीं

तारेचा पत्ताः–Newbottle

के. के. शहा अँड कंपनी

बाटल्यांचे व्यापारी

(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)

रिकाम्या बाटल्या, बुचे, कॅपसुलस् [हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे

ठोक व किरकोळ

विक्री करणारे व्यापारी

नामांकित वैद्यांनीं स्या आयुर्वेद शिक्षण संस्था काढल्या, त्यांतून लोकांची मागणी, त्यांचा कल, ॲलो. पॅथीचा लोकांवर बसत चाललेला पगडा, आयुर्वेदावरील श्रद्धा कमी होण्याची भीति वगैरे गोष्टी लक्षांत घेऊन या शास्त्राला मूलभूत असणाऱ्या इंग्लिश विषयांचें जरुरी पुरतें शिक्षण या अभ्यासाबरोबर देण्याचें सुरु केलें; यामुळें या शिक्षित वैद्यांचा उपयोग जनतेला फार चांगलाच होऊं लागला. केव्हांहि आयुर्वेदाबरोबर आधुनिक वैद्यशास्त्राचें जरुरी पुरतें विषय समजणारा वैद्य आपलें वैद्यशास्त्र जास्त शहाणपणानें व शास्त्रीय दृष्टि ठेवून वापरील यांत शंकाच नाहीं.

केंद्र सरकारची जबाबदारी

आयुर्वेद हें शास्त्र सर्व भारत खंडाचें असल्यानें तें नेहमीं संशोधित ठेवून त्याची मदत लोकांना मिळवून देण्याची जबाबदारी केंद्र सरकारची आहे. यासंबंधीं धोरण ठरवावयाचें तें तज्ञांच्या साह्यानें सर्व प्रांतीय सरकारांनीं एक सूत्रतेनें ठरविलें पाहिजे, टाकावयाचें तें पाउल विचारपूर्वक टाकलें पाहिजे. हा विषय वारंवार धोरण बदलण्याचा नव्हे.

१९३८ च्या कायद्यानें काय झालें

मुंबई सरकारनें १९३८ सालीं देशी वैद्यकाचा कायदा करून आयुर्वेदाला मान्यता दिली ही गोष्ट फार चांगली केली. वाटेल त्यानें उठावें व वैद्य बनावें या गोष्टीला आळा बसला. या कायद्याअन्वयें प्रसिद्ध वैद्य व हकीमाचें एक बोर्ड नेमलें. त्या बोर्डानें वैद्यांचें रजिस्ट्रेशन करून शिक्षण-प्रवेशाची लायकी मॅट्रिक (संस्कृतसह) ठरवून इंग्लिश विषयांची जोड दिलेला आयुर्वेदप्रधान शिक्षणक्रम ठरविला. त्या बोर्डांत बडे आयुर्वेदाभिमानी वैद्य असूनहि त्यांना या शिक्षणाला इंग्लिश विषयांची जोड देण्याची जरुरी वाटली.

जोड शिक्षणाला विरोध

असें असतांहि जुन्या शिक्षणपद्धतीला चिकटून रहावें असें वाटणाऱ्या कित्येक वैद्यांनीं या जोड शिक्षणाला विरोध करण्याची चळवळ चालू केली. या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...शाला मदत थोडीबहुत डॉक्टर लोकांनींहि दिली. ...कारण एवढेंच कीं, हे शिक्षित वैद्यांचे आयुर्वेदाचे ...ने पाहिल्यास त्यांत इंग्लिश औषधें व रोग ...ची इंग्लिश साधनें आढळतात. गिऱ्हाइकाशीं ...संबंधीं बोलण्याची भाषा दोन्हीं शास्त्रांची दिसते. ...क्शनें भरपूर वापरतात. पेटंट औषधांच्या ...ला लिहून देतात व प्रसंगीं डॉक्टरांचा सल्लाहि ...त. यामुळें यांना "न हिंदुर्न यवनः" "धड ना ...र ना वैद्य" "आयुर्वेदाचे खुनी" वगैरे नांवें ...त येतात. हीं नांवें ठेवण्यांत डॉक्टर व वैद्य ...ची वस्तुस्थितिनिदर्शक भाषा असली तरी या ...त्यांचा हेतु मात्र अगदीं भिन्न आहे. डॉक्टरना ...तें सरकारनें आयुर्वेदशिक्षणावर पैसा खर्च करून ...ची मदत लोकांना देण्यासारखें तें शास्त्र नाहीं. ...वैद्यांचाहि निर्वाह होत नाहीं. या शास्त्रांत अनु...ची कांहीं औषधें चांगलीं असल्यास तीं ॲलो-...मध्यें समावून घ्यावींत.

या चळवळीचा परिणाम

वैद्यांना वाटतें सरकारनें शुद्ध आयुर्वेदाचें शिक्षण ...न धंदा करायला रजिस्ट्रेशन द्यावें, व या शास्त्राचें ...न करावें म्हणजे हें शास्त्र राष्ट्रीय करण्यासारखें ...म होईल. हे दोन्ही प्रकारचे लोक आयुर्वेद-...व अलोपाथि व तिचा चालू असलेला व्यवहार ...दुर्लक्ष करून बोलत आहेत. या चळवळीचा ...म असा झाला आहे कीं, १९४७-४८ सालीं, ...दहा वर्षांत आयुर्वेदानें आपला संसार कसा काय ...व या केलेल्या उपक्रमाबद्दल लोकांचीं मतें ...आहेत, याचा रिपोर्ट करण्याकरतां नेमलेल्या ...नें वैद्य, इतर आयुर्वेदप्रेमी लोक, डॉक्टर, अधि-...व कांहीं संस्थाचालक यांच्या साक्षी घेऊन ...लिहिला; व त्याप्रमाणें कायद्यांत १९५१ ...दुरुस्ती करून आयुर्वेदिक स्टेट फॅकल्टीकडे ...ची सर्व व्यवस्था सोंपविली; तिनें शिक्षण ...ची लायकी इंटर-सायन्स (संस्कृतसह) ठरवून ...विषयांची जोड दिलेला साडेचार वर्षांचा डिग्री कोर्स ठरवला व तो शिक्षणसंस्थांतून सुरूं करून डिप्लोमा कोर्स बंदहि करून टाकला. डॉक्टर ढमढेरे म्हणतात त्याप्रमाणें आतां दुसरे कोर्स नसून हाच एक कोर्स चालू आहे.

ग्रामीण भागाला वैद्यकीय मदत

मुंबई सरकारनें आयुर्वेदाच्या डिग्री कोर्सचे शिक्षण देण्यांत अग्रेसरत्व मिळवलें. ग्रामीण भागाला वैद्यकीय मदतीची असलेली जरूरी सरकार त्यांजकडून कशी भागवून घेणार हें मात्र आम्हांला समजत नाहीं. हे आयुर्वेदाचे तज्ञ खेड्यापाड्यांत आपण होऊन जातील हे शक्य दिसत नाहीं व त्यांजवर "धड ना डॉक्टर ना वैद्य" हा दोष तर येणारच आहे. आयुर्वेदाच्या तत्वांप्रमाणें यापुढें जें संशोधन होईल तेंहि ॲलोपथीचा औषधें मुळींच वापरावीं लागणार नाहींत असें आज तरी म्हणतां येणार नाहीं. यांना लोकांची गरज व मागणीप्रमाणें ॲलोपॅथीक औषधें वापरावीं लागणारच.

बलादिव नियोजितः।

याचा अर्थ मात्र असा नव्हे कीं, हे लोक अर्धवट शिकलेले आहेत किंवा हे प्रेमानें हीं औषधें वापरीत आहेत. इच्छा नसतांहि "बलादिव नियोजितः" अशी त्यांची स्थिति होते. रोगी आपल्यापुढें वावरत असलेल्या ॲलोपॅथीच्या औषधांची मागणी करीत आहे, दम धरण्यास तयार नाहीं, तर त्या वैद्यानें काय करावें; धंदा चालवावा कीं बंद करावा ? या औषधाची आपत्ति टळणार नसेल तर त्यांचें जरूरी पुरतें शिक्षण आयुर्वेदाबरोबर दिलें काय, आधीं दिलें काय किंवा नंतर दिलें काय फलश्रुति एकच.

आयुर्वेदावर निर्वाह कठिण

आपल्या देशांत आयुर्वेदाशिवाय दुसरें औषधी शास्त्रच नव्हतें म्हणून सर्व देश कित्येक शतकें या शास्त्रावर राहिला. पण यापुढें, गरजेप्रमाणें आयुर्वेद संशोधित झाल्याशिवाय लोक त्यांवर अवलंबून राहण्यास तयार नाहींत व वैद्यांना शुद्ध आयुर्वेदावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निर्वाह करणें कठीण होऊन बसलें आहे. या जोड-शिक्षणामुळें विद्यार्थ्यांचा कल इंग्लिश औषधींकडे वळतो हें म्हणणें समजत नाहीं. जे पंधरा हजार वैद्य नोंदले आहेत त्यापैकीं बऱ्याच लोकांना ॲलोपॅथीचा गंध नसतांना, इतकेंच नव्हे तर कित्येकांना औषधांचीं व इंजेक्शनचीं नांवें उच्चारतांहि येत नसतां त्यापैकीं बरेंच औषधें वापरीत आहेत. या लोकांना शुद्ध आयुर्वेदाचा धंदा करण्यास सरकारनें बन्दी केलेली नाहीं. यावरून शुद्ध आयुर्वेदाचें शिक्षण दिलें म्हणून हे लोक शुद्ध आयुर्वेदिक औषधें वापरतील हें म्हणणें पटत नाहीं.

आयुर्वेदप्रधान सरकारी औषधी मदत खेड्यापाड्यांना द्यावयाची तर त्यांना जोडशिक्षण दिल्याशिवाय ते त्यांच्या गरजा भागवूं शकणार नाहींत. सरकारनें शुद्ध आयुर्वेदाला परवानगी दिली तर ठीक होईल. पण ही परवानगी मिळत नाहीं असें ठरल्यानंतर तरी महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळानें, इंग्लिश औषधें आजन्म न वापरण्याच्या अटीवर, दरवर्षी कांहीं विद्यार्थी याच शाळांतून पाठवावे म्हणजे अशा वैद्यांचा एक वर्ग तयार होईल. वैद्य लोकांना सल्फोनामाइड पद्धतीचीं औषधें वापरतां आल्यास त्यांना जनतेची अधिक सेवा करतां येईल या उद्देशानें दिल्लीच्या एका नामांकित वैद्यानें या औषधांवर हिंदीमध्यें एक पुस्तक लिहिलें असून त्या पुस्तकाला निखिल भारत आयुर्वेदिक काँग्रेस व पंजाब प्रांतीय आयुर्वेदिक कॉन्फरन्स या संस्थानीं सुवर्णपदकें देऊन गौरविलें आहे. याचा अर्थ हाच कीं वैद्य लोकांना या औषधांचा उपयोग करावा लागणार; मग त्यांना या औषधाचें ज्ञान द्या अगर देऊं नका.

कायद्यामुळें खेड्यांची कुचंबणा

एल्. एम्. एस्. कोर्स चालू केल्यानन्तर सरकारनें कमी खर्च व कमी ज्ञान असे ॲपोथिकरी, हॉस्पिटल असिस्टन्ट सर्जन व एल्. सी. पी. एस्. या नांवानें कोर्स कांहीं काल चालवून नन्तर बन्द केले. त्यापैकीं शेवटचा एल्. सी. पी. एस्. कोर्स सरकारनें बन्द केला. कायद्यामुळें खेड्यापाड्यांची देशी औषधी मदत हळूहळू कमी होत जाणारी असल्यामुळें त्यांना कोणतीतरी औषधी मदत देणें सरकारला भाग आहे या गोष्टाचा विचार आधीं होऊन, असलेला डिप्लोमा कोर्स कांहीं वर्षे सुरू ठेवला असतां तर या डिप्लोमा-वैद्यांना हळूहळू खेड्याचा मार्ग सुधारावा लागला असता.

अल्पमुदतीचा अभ्यासक्रम

त्यांतहि सरकारनें कांहीं योजना आंखून मदत दिली असती तर हा प्रश्नच उद्भवला नसतां, व तो प्रश्न अजूनहि सुटूं शकेल. फार तर त्या कोर्समधून कांहीं इंग्लिश विषय कमी करून तो कोर्स तीन वर्षांचा (अनिर्वाह पक्ष म्हणून) करून त्या त्या बजेटच्या मानानें जरूर तेवढे कांहीं अटींवर विद्यार्थी घेतल्यास त्याला वैद्यांचा पाठिंबा मिळण्याचा संभव असून सरकारचें काम होईल. सरकारहि एक असा निराळा कोर्स काढण्याचा विचार करीत आहे असें म्हणतात.

हेतु विफल होतील

वैद्याच्या धंद्याचा संबंध जीवन-मरणाशीं येत असल्यानें अल्प मुदत व अल्प ज्ञान असा कोर्स काढून त्यांना धंद्याची परवानगी दिल्यास खेड्यांतील लोकांच्या जीविताची किंमत कमी मानल्यासारखें होऊन आयुर्वेदाचा ग्रॅज्युएट कोर्स व कायदा यांतील हेतु विफल होतील. म्हणून सरकारनें सर्व साधक बाधक गोष्टींचा विचार करून काय तें करावें अशी नम्र विनंति आहे.

———

होमिओपाथिक चिकित्सापद्धति
[किं. २॥ रु. ट. ख. निराळा]
१ वैद्यक-ग्रंथ भांडार, नासिक
२ मे. काणे बंधु, टिळक चौक-कल्याण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'वैद्य-सन्मित्र'

(...ग्रंथ-लेखक-वै. पां. वि. जायदे दंतवैद्य आयुर्वेदतीर्थ, हुबळी)

आरोग्य-मंदिराचा अभिप्राय

'वैद्य सन्मित्र या पुस्तकांत ॲलोपॅथी, ...िओपॅथी, बायोकेमिस्ट्री आणि आयुर्वेद या ...तील रोगांचे निदान आणि चिकित्सा या ...ची माहिती साररूपानें दिली असून वैद्यकां... उत्तमोत्तम औषधोपचार अगदीं सोप्या ... व सुटसुटितपणें दिले आहेत.

आकर्षक व उपयुक्त

पुस्तक परिश्रमपूर्वक लिहिलें गेलें आहे. ...ची लिहिण्याची हातोटी चांगली असल्या... पुस्तक आकर्षक व उपयुक्त झालें आहे.

...क मिळण्याचें ठिकाण:—

वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

अनुक्रमणिका

सांडू ब्रदर्स चेंबूर तर्फे आचार्यांचा सन्मान	३३
अधिक कार्यक्षम संस्था कशी करावी ?	३४
ग्राम चिकित्सक निर्मितीचा कूटप्रश्न ?	३५
डॉक्टरीचा अल्प मुदतीचा अभ्यासक्रम	३७
कै. पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर	३८
गंधकरसायन	३९
श्वासनिदान व चिकित्सा	४३
लोह	४७
आयुर्वेदिय औषधांचा नवा उपयोग	४९
जळवात	५०
कुचला	५१
गोंवराची अनुभूत चिकित्सा	५५
नि. भा. आयुर्वेद शास्त्रचर्चा परिषद	५७
खरें साहित्य कोणतें !	६०
वैद्यकीय कोर्स कसा असावा ?	६१

४० वर्षांवरील **अनुभव** आणि सर्व देशभर पसरलेल्या नऊ वैद्यकीय प्रयोग शाळांतील वैद्यक शास्त्रीय पंडितांचें कार्य हा जम्मींच्या कीर्तीचा पाया होय.



जम्मीचें लिव्हरक्युअर दरवर्षी हजारों मुलांचें यकृताच्या विकृतिपासून संरक्षण करून त्यांना पुनः आरोग्य प्राप्ति करून देतें.

आतां सोयीस्कर आकाराच्या वड्या मिळतात

जम्मी वेंकटरमणय्या ॲन्ड सन्स

"जम्मी बिल्डिंग", मयलापूर, मद्रास ४ मुंबई शाखा: 'पारेख मॅन्शन', सॅन्डहर्स्ट रोड (पश्चिम)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

आपका स्वास्थ्य

उन्नति पथ पर अग्रसर हो–इस लिये

" स्वास्थ्य "

के जन्माष्टमी अंकसे आज हि ग्राहक बनिये।

अपना नाम और पता लिखकर भेज दें।

लेख भाग २०×३० अष्टपेजी पृष्ठसंख्या ४८

वार्षिक मूल्य ३) रुपये

" स्वास्थ्य " मासिक

के जन्माष्टमी अंकमें विज्ञापन देकर लाभ उठाइये।

४००० प्रति छपगी।

साइज २०×३० अष्टपेजी

लेख भाग के ४८ पृष्ठ रहेंगे।

भारत के सब प्रांतमें ग्राहक बन चुके हैं।

प्रकाशकः–ठाकुर नाथूसिंह इस्तमरारदार

मैनेजिंग ट्रस्टीः–कृष्णगोपाल आयुर्वेदिक धर्मार्थ औषधालय

पो. कालेड़ा–कृष्णगोपाल, (जिला अजमेर), व्हाया नसिराबाद

जादुसारखा तत्काळ प्रभाव करणाऱ्या, व केंव्हाहि न बिघडणाऱ्या

गुणदायी इंजेक्शनांचा वैज्ञानिक नवा शोध, म्हणजेच

मार्तंड आयुर्वेदिक इंजेक्शन्स.

भारतांतील सर्वांत मोठी त्याचप्रमाणें आधुनिक यंत्रसामुग्रीनें सुसज्ज मार्तंड फार्मास्युटिकल् लॅबॉरेटरीमध्यें, अनुभवी व उच्च आयुर्वेदिक शिक्षण घेतलेले तज्ञ व कर्तबगार पाश्चात्य शिक्षित वैज्ञानिक तज्ञ अशा उभयतांनीं मिळून सत्वर व हमखास गुणकारी अशा नवीन आयुर्वेदिक इंजेक्शनांचा शोध लाविला असून, तीं जादुसारखीं काम करणारीं व कायम गुण देणारीं अशीं आहेत. यांची बरोबरी ॲलोपॅथिक इंजेक्शनें करूं शकत नाहींत.

संशोधनाचे मनाला पटणारे व पुष्कळच ज्ञान देणारें वाङ्मय मोफत मागवा आमच्या इंजेक्शनांवर कोणत्याहि प्रकारचा प्रतिबंध नाहीं. आमच्या विद्वान् तज्ञांनीं आमच्या इंजेक्शनांचीं उत्कृष्टता, आयुर्वेदिक शास्त्रीयता व विशुद्धता, प्रांतीय तसेंच केंद्रीय सरकारी औषधीतज्ञांचे समोर सिद्ध केली आहे. एतदर्थ ह्यावर ड्रग कंट्रोल ॲक्ट लागू नाहीं.

सर्वत्र एजंटांची जरूरी आहे.

निर्माते व संशोधकः–**मार्तंड फार्मास्युटिकल्स्** बडौत S. S. R. (उत्तर प्रदेश)

संपादक व प्रकाशकः–वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

मुद्रकः– … दामोदर महादेव … , विज्ञान प्रेस, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचे पाक्षिक वृत्तपत्र

अभिप्रायार्थ.

आयुर्वेद पत्रिका

'जिवंत निघंटु' वैद्य नीळकंठराव पटवर्धन, सिरसी

विशेषांक



१ ऑगस्ट
१९५३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

किंमत १ रु

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रास्ताविक निवेदन

आयुर्वेद पत्रिकेचा १ ऑगस्ट १९५३ चा तिसरा अंक कारवार जिल्ह्यांतील सिरसी या तालुका गांवीं गेलीं ५० वर्षें आयुर्वेदीय चिकित्सा व्यवसाय करणारे आर्यवैद्य श्री. नीळकंठराव पटवर्धन यांच्या चिकित्साविषयक व सार्वजनिक कार्याची माहिती देणारा विशेषांक रूपांत प्रसिद्ध करतांना आम्हांस अत्यंत आनंद होत आहे. आयुर्वेद पत्रिकेचे यापूर्वी चार विशेषांक प्रसिद्ध झाले. पण ते दिवंगत चिकित्सक वैद्यांच्या चिकित्सा कार्याची माहिती देणारे होते. विद्यमान् चिकित्सकाची माहिती देण्यांत अनेक फायदे आहेत असें आमचें मत आहे. कारण त्यामुळें त्या माहितीच्या आधारें त्या त्या व्यक्तीशीं अधिक विचारविनिमय करून वाचकांस आपला लाभ करून घेतां येतो व माहिती प्रसिद्ध होतांना त्यांत कांहीं दोष राहिले असले तर ते दुरुस्त होण्याचीहि शक्यता रहाते.

कल्पना कशी सुचली ?

हा विशेषांक प्रसिद्ध करण्याची कल्पना पुणें येथील स्वराज्य साप्ताहिकांत प्रसिद्ध झालेल्या एका लेखावरून सुचली. त्यानंतर म. प्रां. वैद्यमंडळाचे अध्यक्ष असतांना प्रचार दौऱ्यांत बेळगांवहून खालीं हुबळी व तेथून शिरशी येथें मुद्दाम जाऊन व दोन दिवस वैद्य पटवर्धन यांचे पाहुणे म्हणून राहून सर्व परिस्थिति समक्ष पाहिली व मगच ह्या विशेषांकाची माहिती एकत्र करून आज ती प्रसिद्ध केली आहे.

त्यांची व्यवसायनिष्ठा

उपलब्ध झालेल्या सर्व माहितीची चिकित्सा करण्याचें हें स्थळ नव्हे. तथापि कोणतीहि गोष्ट वाचतांना देशकालाचा विचार हाहि लक्षांत घेऊनच त्याचा अर्थ वाचकांनीं समजून घ्यावयाचा असतो. आयुर्वेदाच्या प्रत्यक्ष शिक्षणाचीं साधनें कांहींच उपलब्ध नसतांना स्वतःच्या बुद्धीनें व हिमतीनें वैद्य पटवर्धन यांनीं ज्ञानसंपादन केलें व तें केवळ धनार्जन करण्यासाठीं न वापरतां, त्याचा आपल्या देशबांधवांना उपयोग व्हावा असा प्रयत्न सतत चालू ठेवला, यांत त्यांची निष्ठाच व्यक्त होते.

आनूपदेशांतील चिकित्सा

सिरसी हा गांव व त्याचा आजूबाजूचा सर्व भाग हा आयुर्वेदीय विचारसरणीप्रमाणें आनूप देश होय. येथें पाऊस पुष्कळ पडतो व विहिरींना अगदी जवळ पाणी लागतें. हा देश कफोल्बण असल्यामुळें तेथें वापरावयाच्या औषधी, त्यांचीं प्रमाणें, त्या त्या रोगाचें पथ्यापथ्य हे सर्व कफदोषप्राधान्याला धरून असणार हें वाचकांनीं अवश्य लक्षांत ठेवावें. त्यांनी पाणी, दूध, ताक वगैरे द्रव्यें संस्कृत करून वापरण्याची कल्पना वैद्यांनीं तावडतोब अंमलांत आणण्यासारखी आहे. तसेंच रोग्याला पथ्याहारम्हणून पोह्याचें पाणी देण्याची सूचनाहि विचारप्रद आहे. इतरहि कितीतरी अत्यंत उपयुक्त माहिती यांत आली आहे.

एखाद्या वृत्तपत्राचा विशेषांक म्हणजे कांहीं पूर्ण ग्रंथ नव्हे; त्यांत त्रुटी या असणारच. तथापि असा उपयुक्त विशेषांक काढण्याची परवानगी वैद्य पटवर्धन यांनीं दिली याबद्दल त्यांचे, व त्यासाठीं उपयुक्त अशी माहिती भाषेची अडचण असतांहि त्यांचे चिरंजीव वैद्य गणपतरावजींनीं दिली, याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

विशेषांकासाठीं उपलब्ध झालेले सर्व लेख अगर माहिती आम्ही याअंकांत समाविष्ट करूं शकलो नाहीं याबद्दल वाचकांनीं क्षमा करावी. तथापि ती माहिती यथावकाश पुढें देण्याचें आश्वासन देऊन हें प्रास्ताविक निवेदन आटोपते घेतो.

वैद्य पटवर्धन यांचें वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा त्याग. जें अनेक आयुर्वेदीय शिक्षणसंस्थांना लाखोलाख सरकारी मदती मिळूनहि शक्य झालेलें नाहीं तें त्यांनीं एकट्याच्या हिमतीवर व प्रयत्नानें करून दाखविलें आहे. भावी पिढीनें त्यांच्यापासून स्फूर्ति घेऊन आयुर्वेदोद्धाराच्या कामाला तनमनधनानें प्रवृत्त झालें पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'जिवंत निघंटु' वैद्य नीळकंठराव पटवर्धन

— यांचा बोधक जीवन-वृत्तांत —

शिरशीचे वैद्य नीळकंठराव पटवर्धन हे दक्षिण ...राष्ट्र व कर्नाटकांतील कारवार, धारवाड, बेळगांव, ...पूर जिल्हे, तसेंच मंगळूर (दाक्षिण कन्नड) ...ड्या व म्हैसूर वगैरे सर्व ठिकाणीं प्रख्यात वैद्य ...जे जातात. त्यांचें वय आज ७३ वर्षांचें असून ...च्या २५ व्या वर्षापासून ते वैद्यकी करीत करीत ...संबंधीं संशोधन करीत आले आहेत. अनेक वर्षांच्या ...रिश्रमानें शेंकडों दुर्मिळ वनस्पतींचा संग्रह करून ...नीं शिरशी येथें एक विस्तृत बाग उभारली आहे. ...ल्या निदान व उपचार-कौशल्यानें अनेक दुःसाध्य ...बरे करून गेल्या ५० वर्षांच्या कारकीर्दींत त्यांनीं ...कांत आयुर्वेदाबद्दल दांडगा विश्वास उत्पन्न केला ...हे.

वडील प्राथमिक शाळा मुख्याध्यापक

वैद्य नीळकंठराव यांचा जन्म सन १८८१ च्या ...वारी महिन्यांत झाला. यांचे वडील रामचंद्रराव ...त्यावेळीं शिरशी तालुक्यांतील बनवासी गांवच्या ...थमिक शाळेचे मुख्याध्यापक होते. श्रीनीलकंठे-...च्या देवळांतील अग्रशाळेंत त्यांचें बिऱ्हाड होतें. ...थें जन्म झाल्यामुळें यांचें नांव 'नीलकंठ' असें ...ठेवण्यांत आलें. हे रामचंद्ररावांचे दुसरे सुपुत्र होत. ...धरपंत नांवाचे यांचे वडील बंधु व हरिपंत ...नांचे धाकटे बंधु तसेंच त्यांना आणखी दोन बहिणी ...त्या. आतां त्यांच्या या भावाबहिणींपैकीं स्वतः कोणी ...ही हयात नसून फक्त त्यांचे वंशज विद्यमान आहेत.

आजोबा धारवाडचे किल्लेदार होते

वडील रामचंद्रराव यांच्या चारित्र्याचा मोठा ...सर नीळकंठरावावर पडला आहे. रामचंद्ररावांचे ...वडील राघवेंद्रराव धारवाडचे किल्लेदार असतांना एका ...तरुण युरोपियन अधिकाऱ्याच्या हुकुमाप्रमाणें त्यांनीं ...नरगुंद संस्थानावर चाल केली होती, पुढें तें चुकीचें ठरून त्याविषयीं सरकारनें चौकशी सुरू केली. आपला हुकूम सरकारच्या हातीं लागूं नये म्हणून सदर गोऱ्या अधिकाऱ्यानें राघवेंद्ररावांच्या वाड्यालाच आग लावून दिली, व त्यांत राघवेंद्ररावाचा सबंध वाडा जळून खाक झाला. त्यानंतर राघवेंद्ररावांचा पत्ता लागला नाहीं.

वैद्य नीळकंठराव पटवर्धन

मामा नरगुंदचे दिवाण होते

रामचंद्ररावाचे मामा कृष्णाजीपंत जोशी हे नरगुंद संस्थानिकाचे दिवाण होते. आपल्या वडिलांच्या अत्यंत तापट स्वभावास भिऊन रामचंद्रराव या मामाकडेच राहात असत. दरबारीं रीतिरिवाज व दरबारीं येणाऱ्या अनेक विद्वान् कलावंत व रत्नपारखी यांच्या सहवासानें रामचंद्रराव बहुश्रुत व हरहुन्नरी बनले होते. पुढें नरगुंदच्या बंडाळीच्या वेळीं माजलेल्या अंदाधुंदींत रामचंद्ररावांना आपल्या पत्नीसह तेथून पळ काढावा लागला. बंडाचे नंतर रामचंद्रराव हल्याळांत कांहीं काळ अज्ञातवासांत राहिले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वडिलांनीं कर्की गांवीं शाळा काढली

कांहीं काळानंतर सर्वत्र शांतता प्रस्थापित झाल्यावर सरकारनें कोणावरहि कशाहि स्वरूपाचे आरोप लादले जाणार नाहींत अशा तऱ्हेचा जाहीर-नामा काढल्यानंतर रामचंद्रराव कांहींतरी पोटासाठीं धंदा पहावा म्हणून अज्ञातवासांतून बेळगांवला आले. तेथें सरकारकडून ट्रेनिंगची व्यवस्था झालेली होती. तेथें प्रवेश मिळवून ट्रेनिंग शिक्षण संपविल्यावरोबर सरकारी हुकुमान्वयें कर्की गांवीं नव्यानेंच शाळा स्थापन केली, आणि ती व्यवस्थितपणें चालविली.

वडील वैद्यकी करीत

कर्की गांवीं दोन अडीचशें हव्यक ब्राम्हण-कुटुंबें राहात होतीं. नवीनच आलेल्या रामचंद्ररावांच्या विद्वत्तेची, वैद्यकीची तसेंच सेवाभावाची तेथील लोकांवर छाप बसली, व सर्व लोक त्यांचा आदर करूं लागले. त्यांनीं तेथें एक कानडी प्राथमिक शाळा स्थापिली, व तिला सरकारी मान्यता मिळविली. ही गोष्ट सुमारें १८६६ सालची असावी. आपलें अध्यापन कार्य संभाळून ते वैद्यकी वगैरे कामेंहि करीत असत. शिवाय ते उत्तम रत्नपारखीहि होते. त्यांना वास्तु, शिल्प व ज्योतिषाचें चांगलें ज्ञान असल्यामुळें लोक प्रत्येक कामांत यांचा सल्ला घेऊं लागले. वैद्यकी-बद्दल मात्र ते लोकांकडून पैसा घेत नसत.

लहानपणीं संस्कृत पाठांतर

वडील रामचन्द्रराव यांनीं सुमारें ३७-३८ वर्षें अध्यापकाचें काम केलें. मध्यंतरीं मात्र चार वर्षें त्यांची बनवासीला बदली झाली होती. व तेव्हांच वैद्य नीलकंठरावाचा जन्म झाला. अशा सर्वश्रुत पित्याचीं अपत्यें हीं त्यांना साजेशीच निघालीं. लहानपणीं सर्व मुलांस स्तोत्रें, श्लोक वगैरे शिकवून पाठ करवून शिवाय सर्व व्यावहारिक विषयांचें क्रमशः ज्ञान करून देऊन त्यांनीं सर्व मुलांस सुसंस्कृत केलें. ते स्वतः धर्मनिष्ठ असून देवपूजा आदि नित्यनैमित्तिक धार्मिक कर्में निष्ठेनें नियमितपणें करीत व करवित असत. त्यामुळें त्यांच्या सर्व मुलांत व्यावहारिक ज्ञानावरोबरच आस्तिक्यभावना व धर्मनिष्ठा वाढत गेली.

गृहकृत्यावरोबरच शालेय शिक्षण

या गृहशिक्षणावरोबरच त्यांनीं मुलांना शालेय शिक्षणहि दिलें. गंगाधरपंत व नीलकंठराव यांचें शिक्षण कानडी मुल्कीपर्यंत झालें. गंगाधरपंतांनीं ट्रेनिंग कॉलेजमध्येंहि शिक्षण घेतलें. पण प्रथम कांहीं दिवस शिक्षकाचा पेशा पत्करून कांहीं काला नंतर त्यांनीं तलाठ्याची नोकरी पत्करली.

सेवानिवृत्ति-कालांत खेड्यांत राहिले

नीलकंठरावांना सरकारी नोकरी करावयाची नव्हती. ते वडिलांच्याकडून वैद्यकीचेंच अधिक ज्ञानार्जन करीत राहिले. सन १९०१ च्या सुमारास रामचन्द्रराव सेवानिवृत्त झाले. नंतर ते शिरसीजवळ पाळा या गांवीं पूर्वीं घेऊन ठेविलेल्या घरीं येऊन राहिले व शेतीची देखरेख करूं लागले. याप्रमाणें आपल्या सच्छील मुलांमुलींवरोबर आयुष्याचीं शेवटचीं वर्षें आनन्दांत घालवून १९०८ सालीं वडील रामचंद्रराव यांनीं इहलोकीची यात्रा संपविली.

स्वतंत्र उद्योग, विवाह

आपल्या भावंडांचा वाढता संसार पाहून आपण कांहींतरी स्वतंत्र उद्योग करावा, कुटुंबावरच आपलाहि भार घालूं नये असा विचार करून श्री. नीलकंठराव शिरसीस आले. वडील निवर्तण्याच्या अगोदर त्याचवर्षीं नीलकंठरावाचा मुंडगोड महालचे परांजपे यांच्या घराण्यांतील गोदुताईशीं त्यांचा विवाह झाला. सिर्सीस त्यांनीं लोकलबोर्डाची लहान लहान कंत्राटें घेऊन काम करण्याचा उपक्रम सुरु केला. शिवाय एक कापड दुकानहि चालविलें. पण सत्याला धरून आपलें काम चोख बजावून त्यांत किफायत म्हणण्यासारखी होत नसे. आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा, लोकांस विशेषतः गरिबांस, उपयोग करून देणें ते आपलें कर्तव्य समजत असत.

औषधांचा खर्च आंगलट येई

निरनिराळ्या औषधी वनस्पति जमवून औषधें तयार करून गरजूंची मोफत चिकित्साहि ते करीत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...त, तो निराळा खर्च आंगलट येई. त्यांच्या ...नीं त्यांना औषधोपचार मोफत देण्याचा ...ध देऊन ठेविला होता. त्यांच्या बिनचूक औषध ...यांवा व रोगपरिहाराचा लोकांत प्रसार होत ..., तसतसा रोग्यांचा लोंढा लोटतच चालला. ...अनावर झाला.

१५ हजार रुपये कर्ज

या सर्व गोष्टींमुळें यांना पंधरा हजार रुपये ...हि झालें, हा सर्व पसारा कसा सांवरून घ्यावा विवंचना पडली. नीलकंठरावाच्या वडिलांच्या ...दीपासूनच सोंदा येथील स्वर्नवल्ली व वादिराज ...च्या स्वामींशीं यांचा घरोबा होता. श्री. नीलकंठ-...हे विशींस आल्यावर त्यांना स्वर्नवल्ली स्वामींतर्फे ...वास एक घरहि देण्यांत आलें. स्वामींना नीलकंठ-...रावांच्या आर्थिक पेंचाची पूर्ण माहिती होती.

१९१२ सालीं पद्धतशीर व्यवसायास प्रारंभ

स्वर्नवल्ली मठाचे स्वामी पूज्यपाद गंगाधरेंद्र-...ती यांनीं एकदां नीलकंठरावाशीं याबद्दल चर्चा ..., व वैद्यकी हाच मुख्य धंदा करून त्यांत गरी-...ब व अस्पृश्यांस मोफत औषध देण्याचा पर्याय ...चें त्यांनीं सुचविलें. अर्थात् हा सल्ला मानून ...कंठरावांनीं १९१२ सालीं पद्धतशीर दवाखाना ...ला. दवाखान्यांत त्यांच्या बैठकीजवळच एक ...डी असावयाची. ती फक्त अस्पृश्यांसाठीं. तेथें ...येतांच त्याची विचारपूर्वक चौकशी व्हावयाची ...स आधीं औषध देऊन नंतर इतराकडे वळा-...वें, हा त्यांचा दंडक ठरला. तो त्यांचा नियम ...र अव्याहत चालू आहे.

त्यांना दलाली पसन्त नाहीं

कोणत्याहि फार्मसींतून औषधें मागवून त्याची ...दलाली करावयाची हें त्यांना पसंत नाहीं. औषधें ...शास्त्रोक्त पद्धतीनें तयार करावयाचीं, मग त्यास ...हि खर्च येवो, कितीहि कष्ट पडोत, त्याची पर्वा ...याची नाहीं. जरूर पडेल तेव्हां, वाटेल ती ...वनस्पति हाताशीं असावी, त्यासाठीं शोधाशोध करा-वयाची पाळी येऊं नये, व निदान दुसऱ्या कोणाला चटकन् वनस्पतीची ओळख करून देऊन ती तांबड-तोब मागवितां यावी म्हणून एक जिवन्त वनस्पतींची बाग तयार करण्याची कल्पना त्यांच्या मनांत आली.

त्यासाठीं त्यांनीं गांवाबाहेरील पांच एकर जमीन (माळरान) खरेदी केली. व तेथें वनस्पतींची बाग २५ वर्षें सतत परिश्रमानें उभारली. १९१५ सालीं पुण्यांत राजा रविवर्मा यांच्या अध्यक्षतेखालीं एक वैद्यसंमेलन भरलें होतें. त्यावेळीं श्री. नीळकंठराव कपिला, दंती वगैरे अस्सल वनस्पति घेऊन गेले होते. त्यांची तेथें बरीच तारीफ झाली व त्यामुळें अनेकांच्या ओळखीहि झाल्या.

रोग्यांस घरींच ठेवून घेत

एकदां त्यांचेकडे अतिसाराचा एक रोगी आला. तो दूरचा असल्यामुळें घरींच ठेवून घेणें भाग होतें. त्यास स्वतंत्र जागा दिली. नीळकंठराव बाहेर गेले होते. एकदां तो रोगी तिडीक असह्य होऊन कसातरी धडपडत घरासमोरील गटारापर्यंत गेला व तेथेंच त्यानें दीर्घशंका केली. एका तापट स्वभावाच्या शेजाऱ्यानें हें पाहिलें व एकदम त्याच्या अंगावर खेकसून त्यास अवाच्य शिवीगाळी केली, व त्या मरणोन्मुख रोग्या-कडूनच ती जागा साफ करवून घेतली.

काळजास पीळ पडला

निळकंठराव घरीं आल्यावर रोग्यानें काकुळतीनें आपली झालेली हकीकत त्यांना सांगितली. ती ऐकून नीळकंठरावाच्या काळजास पीळ पडला, व त्यांनीं गांवाबाहेर स्वतंत्रपणें घर करून राहण्याचें ठरविलें. पुढें थोड्यांच अवधींत गांवाबाहेर ५ एकर माळरान खंडणी करारावर घेऊन घर बांधण्याचें काम सुरू केलें. व साधारण घर तयार होतांच तेथें येऊन राहिले. १९२५ सालीं या ठिकाणीं राहूं लागले. आतांपर्यंत त्यांनीं एकंदर चार विहिरी खोदविल्या.

बांधकाम व बागकाम चालूंच

द्रव्याच्या अडचणीमुळें घराचें बांधकाम हळू हळू चालू राहावयाचें. पैसे मिळतील तसें त्या घोर-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

णानें जमेल तितकींच कामें करावयाचीं. आतां घराची बांधणी पूर्ण होत आली असून, तेथें औषधी करण्यासाठीं स्वतंत्र जागा, पाण्यासाठीं रहाट वगैरे व्यवस्था झाली आहे. १९२६ सालापासून आजवर अव्याहत नवनवीन वनस्पति मागविणें, रोपणें हीं कामें चालूंच आहेत.

वडिलार्जित ग्रंथसंग्रहाचा वारसा

नीळकंठराव सिरसींस येऊन राहिल्यानंतर कांहीं वर्षांनीं त्यांच्या भावंडांनीं पाळा वगैरे ठिकाणच्या इस्टेटीची वांटणी करण्याचा विचार केला. त्यांना स्वतः बोलण्याचें धैर्य होईना, म्हणून सर्वांत वडील बहिणीस मध्यस्थी करण्यास भाग पाडलें. बहीण आली व संकोचत संकोचत वांटणीची गोष्ट काढली. नीळकंठराव म्हणाले कीं, मला वडिलार्जित इस्टेटीचा हिस्सा मुळींच नको आहे. मी ती सर्व आपल्या भावंडांसच देतो. फक्त वडिलांचा ग्रंथसंग्रह मात्र संपूर्णपणें मला दिल्यास पुरें आहे. वडिलार्जित इस्टेटीचा त्यांनीं अशा तऱ्हेनें हक्क सोडून दिलेला पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें.

स्वदेशी चळवळीचे पुरस्कर्ते

नीलकंठराव पूर्वीपासून राष्ट्रप्रेमी टिळकभक्त असून स्वराज्य व स्वदेशी चळवळीस पूर्णपणें पाठिंबा देत आहेत. शक्यतों परदेशी माल त्यांनीं वापरला नाहीं. अंगास साबण कधीं लावला नाहीं. रिठा वापरीत आले आहेत. रिठ्यांत अंगमर्द कमी करण्याचा गुण असल्यानें ते इतरांना रिठाच वापरण्यास सांगतात.

रिठ्याचा पोटदुखीवर उपयोग

पोटांत जंतामुळें दुखणें तीव्र स्वरूपांत असतां किंवा कोणत्याहि कारणानें पोटाला फुगवटी असून त्रास होत असतांना, रिठ्याचा पुष्कळसा फेंस काढून पोटाला लावण्यानें तत्काळ रोग्याला बरें वाटतें. पोटांत दिलेल्या कोणत्याहि औषधापेक्षां या लेपानें लवकर आराम वाटतो. तसेंच अकारण किंवा कृमिज उलटींतहि पोटाला रिठ्याचा फेंस लावावा.

बहुगुणी रिठा

आलेला ताप कांहीं केल्या उतरत नाहीं, तापमान फार होते, अशावेळीं किंचित् प्रमाणांत रिठ्याचा फें कानशिलांत व छातीस लावण्यानें ताप फार लवकर उतरतो. असा हा रिठा बहुगुणी आहे. सर्पदंशांत पहिल्या प्रथम रिठा कोळून पाजल्यास तत्काळ उलटी होऊन गुण येतो.

मुलांना राष्ट्रीय शाळेंत घातलें

१९२०-२१ सालच्या असहकार चळवळीच्या वेळीं त्यांनीं काँग्रेस कार्यकर्त्यांना जास्तींत जास्त मदत पोंचविली आहे. काँग्रेसतर्फे येथें एक राष्ट्रीय शा चालविली जात असे. आपल्या मुलांना त्यांनीं सरकारी शाळेंतून काढून राष्ट्रीय शाळेंत पाठविलें. आपल्या खर्चानें दोनतीनशें सूत कातण्याचे रहाट, १०-१२ हातमाग बनवून ते काँग्रेस कमेटीला दिले. चळवळींत अनेकदां कार्यकर्त्यांना छपून राहाण्यास मदत केली आहे, व इतरहि अनेक तऱ्हांनीं त्यांच्या गरजा भागविल्या आहेत.

वंशपरंपरा पद्धतीमुळें कलेची वाढ

वैद्य नीळकंठराव यांना वंशपरंपरागत धंदे-वाईकपणा फार आवडतो. अशा धंद्यावरूनच जाति निर्माण झाल्या तथापि जातिभेदाकडे लक्ष न दे धंद्यांत परंपरा राखल्यानें कलेची वाढ होते. म्हणून कोणत्याहि धंद्यांतील वंशपरंपरा राखून असलेले कारागीर त्यास आवडतात. अशा लोकांस उत्तेजन देण्यासाठीं ते कधींकधीं त्यांजकडून आपणास अन-वश्यक अशीं कामेंहि करवून घेतात. एकदां ए कारागिराकडून मातीच्या झिलईदार उत्तम अ २००० दौती करवून घेतल्या व त्या विद्यार्थ्यांना वांटून दिल्या.

शाळेंतील मुलांना वस्तु वाटीत

शालेय विद्यार्थ्यांना त्यांनीं अनेक वेळां दौ पेन्सिली, बोरू, पाट्या वाटल्या आहेत. दरस विद्यार्थ्यांना उत्तम आंबे शाळेंत जाऊन वाटण्याची नियमित प्रथा त्यांनीं बरींच वर्षें ठेविली होती. अलिकडे शाळांतील अतिशिक्षित (विद्वान्) शि यांना हें त्यांचें कृत्य आवडेनासें झालें, तेव्हां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…नी आंबे वांटण्याचें बंद केलें आहे. आजूबाजूच्या …तील गरीब विद्यार्थ्यांना त्यांनीं आपल्या घरीं …ची व राहण्याची मोफत सोय करून दिली …, दरवर्षी कमींतकमी चार तरी विद्यार्थी त्यांच्या … असावयाचेच.

११ वें कर्नाटक संमेलन भरविलें

…सन १९३९ सालीं ११ वें निखिल कर्नाटक …संमेलन नीलकंठरावांनीं शिर्शीला बोलाविलें. …तील आपल्या घरीं संमेलन भरविलें. संमेलनासाठीं …मंडपवजा एक इमारत बांधविली. सर्वांना ही …दाखवावी, अनेक दुर्मिळ वनस्पतींचा इतरांना …करून द्यावा व इतरांपासून आपणहि कांहीं …भव घ्यावेत हा या संमेलनाचा मुख्य उद्देश होता.

वडिलोपार्जित खरी संपत्ति

विजापूरचे सुप्रसिद्ध वैद्यराज आद्य अनन्ताचार्य …च्या अध्यक्षतेखालीं हें संमेलन भरलें होतें. नगरचे …चानन गंगाधरशास्त्री गुणे हे प्रदर्शनाचे उद्-…क होते. शिवाय पुण्याचे सुप्रसिद्ध वैद्य श्री. …शास्त्री जोशी वगैरे प्रतिनिधि म्हणून आले होते. …प्रांतील सुमारें ३०० वैद्य या प्रसंगीं जमले होते. …कंठरावाचे जेष्ठ चिरंजीव गणपतराव हे १९३६ …नी अहमदनगरच्या आयुर्वेद महाविद्यालयाची …आयुर्वेदतीर्थ' पदवी घेऊन आले होते. श्री. गुणेशास्त्री …नी त्यावेळीं आपल्या या शिष्याबद्दल अभिमान …केला व त्यास खरी वडिलोपार्जित संपत्ति मिळत …असे उद्गार काढले. या संमेलनाच्या वेळीं …नांत १२०० जिवंत वनस्पति ठेवल्या होत्या.

ते आजहि सशक्त आहेत

आज ते ७३ वर्षांचे वृद्ध असले तरी त्यांच्या …संतच्या नियमित आहारविहारामुळें आजहि ते …मैल सहज चालूं शकतील इतके सशक्त आहेत. …च्या रोजच्या कार्यक्रमांत आजहि म्हणण्यासारखा …पडला नाहीं. रोज नियमानें साडेचार-पांचला …उठावे, आपल्याबरोबर मुलांनाहि उठवून प्रात-…र आटोपून न्हाणींतील हंडा भरून पाणी तापवा-वयाचें. मुलांकडून प्रातःस्मरण व कांहीं श्लोक, स्तोत्रें म्हणवून घ्यावयाचीं व थोडा वेळ बागेंत बागेंतील फुलें, पत्रीं देवपूजेसाठीं तोडावयाचीं. गीता, विष्णु-सहस्रनाम पारायण करून नंतर व्यावहारिक उद्योगा-कडे वळावयाचे. ११ चे सुमारास स्नानसंध्या, देवपूजा आदि आटोपून भोजन झाल्यावर संध्याकाळपर्यंत इतर आवश्यक व्यवसाय करून, पुन्हां संध्याकाळीं ठराविक आन्हिक वगैरे आटोपून ठराविक वेळीं झोंपावयाचें.

वैद्य गणपतराव पटवर्धन, आयुर्वेदतीर्थ

मुलें-सुनांना त्यांचा त्रास नाहीं

आपल्या तैनातीसाठीं मुलांना अगर सुनांना ते त्रास देत नाहींत. आतां नातवंडांना जें कांहीं योग्य असें घरगुती शिक्षण, स्तोत्रें वगैरे आवश्यक पठण, योग्य निवडक चिजा ते शिकवीत असतात. दरसाल ठरलेलीं सर्व व्रतें घरीं चालवावयाचीं. व्रतवैकल्यें चालविण्यास नीळकंठराव उत्तम पुरोहिताची निवड करतात. मंत्रांत यत्किंचितहि चूक झालेली त्यांना खपत नाहीं.

२५ वर्षांपासून एक वेळ जेवण

एकादशीचे दिवशीं तसेंच महाशिवरात्र, गो-कुळाष्टमी इत्यादि ठराविक उपवासांचे दिवशीं ते

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांहींच आहार घेत नाहींत. गेल्या २५ वर्षांपासून दुपारीं एकच जेवण घेतात. त्याशिवाय कांहीं आहार घेत नाहींत. दुपारच्या एका जेवणाशिवाय इतर कोणतेंहि कांहीं घेत नाहींत. आंबे जेवणानंतर अगर जेवणाबरोबर घ्यावेत, इतर वेळीं खाऊं नयेत असें सर्वांना सांगतात.

धार्मिक ग्रंथांचें मनन

वैद्यकी व्यासंगाबरोबरच धार्मिक ग्रंथांचें वाचन मनन करतात. नित्य व नैमित्तिक असे खरे धार्मिक आचार ते पाळतात. इतकेंच नव्हे तर ज्योतिषावरहि त्यांचा विश्वास आहे. त्यांचे वडील उत्तम तऱ्हेचे ज्योतिर्विद्वान् होते. वडिलामुळें त्यांच्या आईलाहि ज्योतिषाचें ज्ञान चांगल्यापैकीं असे. त्यामुळें नीळकंठरावांनीं त्याचा अभ्यास स्वतंत्रपणें जरी केला नसला तरी केवळ आईबापांच्या संस्कारामुळें साधारणपणें ग्रहमान जाणतात. जुनाट रोग्यांवर नव्यानें उपचार आरंभ करतांना बहुतांशीं अनुकुल मुहूर्त पाहण्याकडे त्यांची प्रवृत्ति असते. मात्र अत्यंत निकडीच्या वेळीं मुहूर्त पाहाणाऱ्याला ते मूर्खांतच गणतात. अत्यंत निकडीच्या वेळीं मुहूर्त पाहूं नये, असें त्यांचें मत आहे.

पूजेंतील पत्रपुष्पांचें शास्त्रीय महत्व

निरनिराळ्या महिन्यांतील सणवार व त्या त्या देवतांच्या पूजेचा जो विधि सांगितला आहे, त्याप्रमाणें विधिवत् त्याजकडून पूजा होत असते. व्रतें आचरितांना त्या त्या देवाच्या पूजेंत सांगितलेलीं पत्रीं-पुष्पें एकहि न सोडतां गोळा करतात. त्या त्या व्रतांत सांगितलेल्या पत्रपुष्पांना शास्त्रीय महत्व आहे असें ते मानतात.

गृहस्थाश्रम व वनस्पति

इतक्या अनेक वनस्पतींचा दैविक कार्यासाठीं आवश्यक स्वरूपांत अनायासें नित्य उपयोग होत असल्यानें प्रत्येक गृहस्थाश्रमीला या निमित्तानें या विविध वनस्पतींची माहिती व स्वरूपज्ञान मात्र चांगलें होतें. इतक्या वनस्पतींची ओळख आणि त्यांचा सामान्य उपयोग माहित असल्यास लहानसहान आजारापासून माणूस सुलभतेनें मुक्त होतो, व आजारांच्या प्रथमावस्थेंत रोग बरा झाल्यास मग मोठ्या आजाराचा संभव राहात नाहीं.

ईश्वरप्रिय वनस्पतींचे गुणधर्म

पत्रपुष्पांचा सामान्य प्रभाव असा आहे:— ईश्वराला प्रिय असलेलीं पत्रपुष्पें विशेषेण विषघ्न, सन्निपातहर (कोणत्याहि ज्वरांतील सान्निपातिक अवस्था दूर करणारी) आहेत. उन्माद व इतर कोणतेहि कफवातजन्य विकार (गर्भिणी वर्ज्य) ईश्वरप्रिय वनस्पतींनीं बरे होतात.

वनस्पति दोषजन्य शोधनाशक असतात

कफरोधानें साहजिक उत्पन्न होणाऱ्या मार्गरोधानें प्रकुपित वात या द्रव्यांनीं बरा होतो. सामान्य माणसाला समजण्याच्या दृष्टीनें कोणत्याहि विषप्राण्याचा दंश झाल्यास तुंबा, रुई, बेल, निर्गुंडी यांचा उपयोग करावा. तुंबाच्या व निर्गुंडीच्या पानांच्या रसांत रुई व बेलमूळ उगाळून दिल्यास सत्वर जादूप्रमाणें गुण येतो. ज्वरांत या चार वनस्पतींच्या पानांचा काढा करून द्यावा. मानेंत पाठींत तीव्र ताठरपणा, तीव्र कळा असतांना या चार वनस्पतींचा काढा द्यावा. संधीच्या ठिकाणीं कळयुक्त सूज असतांनाहि यांचा चांगला उपयोग होतो.

गणपतिपूजेंतील द्रव्यें

गणपतीच्या पूजेंतील द्रव्यें, रक्तोपादक, रक्तस्तंभक, गर्भोत्पादक, पित्ताचें विसत्व कमी करणारीं आहेत. कुंडलिनी संस्था अबल असल्यास या गणपतीप्रिय वनस्पतिसेवनानें कुंडलिनीसंस्था बलिष्ठ होते. या वनस्पतींच्या नित्य (अव्याहत) सेवनानें कुंडलिनी जागृत होते. अपानस्थ आवृतवात किंवा वातकुंडलिका नांवाचा रोग या वनस्पतींनीं खास बरा होतो.

विष्णुप्रिय द्रव्यांचे गुणधर्म

विष्णुप्रिय द्रव्यें कफपित्त कमी करणारीं होत. सर्दी, हिका, हृल्लासादि उत्तान व्याधिअवस्था या विष्णुप्रिय वनस्पतींनीं बऱ्या होतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्येष्ठ चिरंजीव पदवीधर वैद्य

त्यांचे जेष्ठ चिरंजीव १९३६ सालीं अहमदनगर आयुर्वेद महाविद्यालयाची पदवी परीक्षा पास होऊन त्यांचें वर सांगितलेंच आहे. त्यांचे दुसरे चिरंजीव गणपतराव हे औषधीकरण व्यवहार करितात. या दोघांनीं आपल्या वडिलांस व्यवसायांत मदत करून त्यांचा उपक्रम सुरूं केला व आतां बहुतेक सारा भार या उभयतांनीं आपल्या खांद्यावर घेतला आहे. पण त्यावेळीं वडिलांचा सल्ला त्यांना मिळतोच.

रुग्णासाठीं स्वतंत्र इमारत

१९३० सालीं नीळकंठरावांनीं परजिल्ह्यांतून येणाऱ्या रोग्यांना राहाण्यासाठीं एक स्वतंत्र मोठी इमारत बांधली आहे. गणपतरावांनीं वैद्यक व्यवसाय त्यांच्या हातीं घेतल्यावर घरचें सर्व कर्ज फेडलें गेलें.

तिसरे चिरंजीव पदवीधर डॉक्टर

गेल्या वर्षी नीलकंठरावाचे तिसरे चिरंजीव

अनंतराव हे एम्. बी. बी. एस्. परीक्षा पास झाले, व तारीख २६-४-१९५३ रोजीं त्यांनीं आपला स्वतंत्र दवाखाना श्री. गणपतरावांच्या मंदतीनें उघडला. डॉ. अनंतराव यांस पारंपारिक रीतीनें आयुर्वेदाचें ज्ञान झालेलें आहेच. शिक्षणानें ॲलोपॅथीचें ज्ञान प्राप्त झालें आहे. यांच्या ठिकाणीं दोन्ही शास्त्रांचा सुंदर मिलाफ आहे.

नीलकंठरावाचे ज्येष्ठ बंधु कै. गंगाधरराव यांचे चिरंजीव श्री. रामचन्द्रराव हे नीळकंठरावांच्याच घरीं असून सर्व व्यवहारावर देखरेख ठेवण्याचें, व्यवस्थापकाचें काम पहातात.

त्यावेळीं मदतीला दुसरे नसे

वैद्य पटवर्धन यांनीं धंदा आरंभिला तेव्हां हे एकटेच कर्ते असावयाचे, यांच्या मदतीला दुसरे कोणी नसत. त्याकाळीं (१९१२ सालीं) मोटारी नव्हत्या, टूरिंगकार मोटारी तर नव्हत्याच. त्यामुळें खेड्यावर व्हिजिटला जावयाचें तें पायीं जावें. ४ मैलपेक्षां जास्त लांबीचा पल्ला असल्यास बैलगाडींतून जावयाचें. यांचेकाळीं आरंभीं कांहीं वर्षे शिरसी येथ यांच्या शिवाय दुसरे प्रॅक्टिशनर कोणी नव्हते. म्हणून रोज एक ना दोन खेड्यांत जाण्याचा प्रसंग येई. शहरांतला धंदा सांभाळून खेड्यांतून जावें लागे. त्यामुळें फार त्रास होई. दिवसरात्र मिळून रोजच्या दोन ट्रिप्स् खेड्याच्या व्हिजिटच्या व्हावयाच्याच. त्या शिवाय शहरांतील व्हिजिट्स् सोडणें अशक्य म्हणून शहरांतहि एक, दोन, तीनपर्यंत खेरा व्हावयाच्या. शहरांतल्या व्हिजिटना फी कधीं मिळत नसे.

रात्रंदिवस व्यवसाय चालू

रात्र व दिवस असा भेदहि धंद्यापुरता त्यांनीं कधीं मानला नाहीं. अडल्या कोणत्याहि वेळीं रोग्याकडून बोलावणें येवो, ते कोणत्याहि अवस्थेंत असलें तरी नाहीं म्हणावयाचे नाहींत. नुकतेच दमून खेड्यांतून आलेले, स्नान वगैरे कांहीं न झालेले असतांहि जरूरी म्हणून जावयाचेच. बैलगाडीचा प्रवास किती त्रासाचा असतो, वेळ किती मोडतो, याची जाणीव साधारणपणें माणसांना असतेच. रात्रीच्या प्रवासामुळें नित्य जागरण व्हावयाचेंच. गाडीच्या प्रवासानें अंग नेहमीं दुखत असावयाचें. दिवसा परत ठरल्याप्रमाणें उद्योगाला लागावयाचें. यामुळें दिवसा झोंप घेण्यास मुळींच सवड व्हावयाची नाहीं.

अविश्रांत श्रमाचे दुष्परिणाम

अशा अखंड अविश्रांत श्रमानें ते अल्पवयांत फार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थकले आणि शरिरांत कडकी फार वाढून त्यांना मुतखडा झाला. त्यांनीं स्वतः खडा विरघळणाऱ्या औषधाचें सेवन केल्यानंतर तो मुतखडा सहा महिन्यांनीं पडला. याशिवाय दुसरा आजार त्यांना झाला नाहीं. ते कधीं मुतखड्याशिवाय इतर कोणत्याहि आजारानें आजारी पडले नाहींत.

त्यांचा अत्यंत नियमित आहार

याला त्यांचें आहारनियमन हेंच कारण होय. दुसऱ्या कोणाकडेहि खावयाचे नाहींत, अगर जेवावयाचे नाहींत. हें व्रत त्यांनीं कायम पाळलें. त्यामुळें इतर आजार जडले नाहींत.

गाडी उलटून पडले

बैलगाड्यांच्या प्रवासामुळें, त्यावेळचे खेड्याचे रस्ते फारच खराब असल्यामुळें शेंकडों वेळां गाडी उलटून ते पडले आहेत. त्यामुळें बऱ्याच ठिकाणीं अंगाला मार लागले आहेत. इतके मार लागून अंगांत वेदना असतांहि त्यासाठीं विश्रांतीची अपेक्षा न करतां ते नेहमीं उद्योगांत असावयाचे.

कष्टपूर्वक व्यवसाय केला

त्यावेळीं त्यांचीं मुलें लहानवयाचीं होतीं. नोकर ठेवून घेण्याची ऐपत नाहीं. अशा प्रसंगीं सर्व कांहीं त्यांना स्वतःलाच करून घ्यावें लागे. अशा सर्व अडचणी सहन करून त्यांनीं धंदा सांभाळला. कोठेंहि न्यूनता आहे असें त्यांनीं कोणाला वाटूं दिलें नाहीं.

'जिवंत निघंटु' हें विशेषण

मुलें वयाला आल्यानंतर त्यांच्या जीवाला किंचित् आराम मिळूं लागला. त्यांच्या चिकित्सा-नैपुण्याचा लाभ घेण्यास रोगी आपणहून यांचेकडे येतातच. शिवाय अनिर्णित चिकित्सेला, असाध्य, वाटलेल्या रोग्यांना डॉक्टर व वैद्यलोक नीलकंठरावांकडे रवाना करतात. यावरून यांच्या चिकित्सेबद्दल डॉक्टर-वैद्यांत किती प्रबल श्रद्धा आहे हें निदर्शनास येतें. त्यांच्या वनस्पतिज्ञानाविषयीं अनेकांनीं यांना 'जिवंत निघंटु' असें संबोधिलें आहे.

———

मुरडा, जुनाट हगवण यावरील रामबाण औषध

अँटी डीसेंट्रॉल

हें औषध आयुर्वेदीय औषधी द्रव्यांपासून तयार केलें आहे. यांत पर्पटी, जायफळ, इंद्रजव, कुडासाल, कापूर आदि द्रव्यें आहेत. जुनाट अतिसार, मुरडा, आमांश (प्रवाहिका) व हगवण या विकारांत हीं द्रव्यें गुणकारी असल्याचें सिद्ध आहे.

कितीहि जुलाब होत असले तरी हें औषध दिलें असतां पहिल्याच दिवशीं गुण दिसूं लागतो. वैद्य डॉक्टर आदि सर्व चिकित्सापंथाचे लोक हें औषध सध्यां वापरीत आहेत. आपणहि आजच आपल्या चिकित्सा कार्यांत अँटीडीसेंट्रॉल वापरून यश प्राप्त करा.

किंमत २४ गोळ्यांची १ रु.
व २५० गोळ्यांची ८ रु.

ऊंझा फार्मसी लि., ऊंझा (गुजराथ)
एजन्टः— जयंत अँड कंपनी,
लक्ष्मीरोड, पुणें सिटी.

इंजेक्शन-चिकित्सा

पाश्चात्य इंजेक्शन चिकित्सेवरील अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिलेला अभिनव मराठी ग्रंथ. २६ प्रकरणें, ३०० वर रोगांची अद्यावत् चिकित्सा. २७० पृष्ठें, जाड बांधणी. 'सचित्र इंजेक्शन विज्ञान' प्रमाणेंच हाहि ग्रंथ लौकरच दुर्मिळ होण्याची शक्यता आहे. त्वरीत मागणी करा. किंमत ६ रु., ट. ख. निराळा.

१ सुबोध वैद्यक ग्रंथमाला
पो. कागल जि. कोल्हापूर
२ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक सिटी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्य नीळकंठराव पटवर्धन यांची
निदान आणि औषधियोजना पद्धति

वैद्यराज नीळकंठराव पटवर्धन यांच्या निदान-पद्धतींतील वैशिष्ट्य असें सांगतां येईल कीं, रोग्याला तपासण्यापूर्वी रोग्याला काय होतें असें ते कधीं विचारीत नाहींत, इतकेंच नव्हे तर आपणास काय काय होतें, हें रोग्यानें सांगूं नये म्हणून बजावीत असतात. रोग्यानें आपणास काय काय होतें हें आधीं सांगितल्यास तपासणाऱ्याची दिशाभूल होते, असें त्यांचें मत आहे. रोगी तपासून प्रश्न न विचारतां त्यास अमूक रोग झाला आहे आणि त्याचीं लक्षणें अमूक असें आपणास हमखास सांगतां आलें पाहिजे, तरच योग्य निदान झालें असें ते समजतात. स्वतः रोग्यास तपासल्यानंतर जें मनःपूर्वक नक्की निदान होईल त्याला अनुसरून ते चिकित्सा ठरवितात.

रोगी पाहून निदान

रोग्याला होणारीं सर्व लक्षणें, त्याचा स्वभाव, त्याची वागणूक, त्याला पडणारीं स्वप्नें, त्याच्या खाण्या-पिण्यांतील आवडी निवडी इतकें हुबेहुब सांगतात. रोगी समोर येऊन बसतांच, अमक्याच तऱ्हेचा रोगी आहे हे सांगतात. रोग्याच्या डोळ्यांतील (दृष्टीचा) रोग रोग्याला पाहतां क्षणीं सांगतात. अक्सरेच्या साहाय्यानें जे रोग ओळखिले अगर तपासले जातात ते रोग सहज लीलेनें हे सांगतात. प्लूरिसी, न्युमोनिया वगैरे फुप्फुसांचे सर्व विकार स्टेथॉस्कोप न लावतां सांगतात.

रोग होण्यापूर्वींच निदान

यांनीं निदान केल्यानन्तर कोणी ॲलोपाथी डॉक्टरांनीं तपासलें तरी यांनीं ठरविलेलें निदान खरें ठरतें. कोणी वैद्य अगर डॉक्टर रोगस्वरूप प्राप्त झाल्यानंतर रोग अमूक असें सांगूं शकतात. तेंच हे न्युमोनिया होण्याच्या आठ दिवस अगोदर न्युमोनिया होणार असें नक्की सांगतात. वर्ष दीडवर्षांत मुतखडा होईल, अमूक वर्षांनीं अमूक रोग होईल, अमूक रोगानें त्याचा शेवट होईल इत्यादि अतिसुलभ सांगतात. ज्योतिषी जसें ग्रहमान पाहून मागें घडलेल्या गोष्टी सांगतो, तसें मागें अमूक ठराविक रोग झाले असावेत, हेंहि ते नक्की सांगतात.

निदान निश्चित असावें

निश्चित चिकित्सा लगेच देतां येईल असें निदान करावें, असें त्यांचें म्हणणें आहे. ढोबळपणें अमूक रोग आहे असें समजून, मंतर चिकित्सा नक्की ठरवितांना, औषधें निवडतांना धडपड करीत डोकें खाजवीत बसणें योग्य नाहीं. ढोबळ निदानानें चिकित्सा सुलभ होत नाहीं. किती कोणकोणत्या औषधांची जोड द्यावी, यालाहि मोजमाप रहात नाहीं. त्यामुळें गुण जितका ज्या वेगांत यावा त्या वेगांत येत नाहीं. निदान झाल्याबरोबर शरीरांत काय काय रचना-भेद झाले आहेत आणि ते कसे सुधारतील, सुधारण्याचा मार्ग कसा आंखायचा हें चटकन् ध्यानीं यावयास पाहिजे.

चिकित्सा कां चुकते ?

रोगी सांगेल त्या लक्षणांना चिकित्सेच्या दृष्टीनें महत्व देतां येत नाहीं. त्या लक्षणांवरून औषधें ठरविल्यास चिकित्सा चुकते असें यांचें ठाम मत आहे. दर्शन-स्पर्शनानें आपणांस रचना-वैशिष्ट्य काय दिसेल-कळेल त्या अनुरोधानें चिकित्सा व्यवस्थित होईल. असें करणें हीच खरी चिकित्सा असें ते समजतात; म्हणजेच चिकित्सासूचक निदान करावें, हें त्यांचें मत आहे.

सहज निदान करतात

डोकें दुखणें यावयाचें तर अमूक बाजूलाच येईल, पाय अमकाच वळेल, कधीं तर ते ताप आल्यास अमूक लक्षणेंच होतील, अमक्या कानानें कमी ऐकूं येईल,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्षाच्या ठराविक महिन्यांतच ठराविक विकारानें आजारी पडणार, पुढें ठराविक अवधींत वेड लागेल, दहावीस वर्षांपूर्वी, झाडावरून पडून आघात ठराविक ठिकाणीं झालेला आहे, इत्यादि अनेक गोष्टी ते सहज तपासतांक्षणीं सांगतात.

लहानाप्रमाणेंच मोठ्यांची परीक्षा करावी

लहान मुलांना आपणांस काय होतें हें सांगतां येत नाहीं, तरी आपण दर्शन-स्पर्शनानें त्यांची चिकित्सा करतो आणि करूं शकतो, त्याचप्रमाणें मोठ्यांचे विकार समजून घेतां आले पाहिजेत आणि जो मनुष्य तान्हे मुलांची चिकित्सा यशस्वी करूं शकतो तोच खरा वैद्य! तान्हे मुलाप्रमाणें गुरांची चिकित्साहि करतां आली पाहिजे म्हणजेच चिकित्सा-नैपुण्य. आणखी एक वैशिष्ट्य हें कीं, बाई प्रसूत झाल्यानंतर वार तपासून पुढील आयुष्यांत इतक्याच नक्की संख्येनें त्यांत बरोबर पाळीनें मुलगे अगर मुली होतील हें सांगतात.

बालरोग चिकित्सेविषयीं प्रसिद्ध

मुलांचे सर्व विकार उत्तम रीतीनें बरे करतात. मुलांच्या चिकित्सेविषयीं लोकांत विशेष प्रसिद्ध आहेत. तसेंच कोणत्याहि विकाराच्या तीव्र अवस्थेमध्यें (ॲक्यूट कंडिशनमध्यें) उत्तम चिकित्सा करतां येणें हेंच खरें चिकित्साकौशल्य. चिकित्सा बरोबर होण्यास, निदान उत्तम व्हावयास पाहिजे; तसेंच उत्तम निदान झाल्यावर गुणाला अवधि मुळींच लागत नाहीं. ॲलोपॅथिक औषधानें गुण सत्वर येतो, तसा आयुर्वेदिक औषधानें येत नाहीं, या समजुतीला ते तीव्र विरोध करतात. त्यांच्या मतें ॲलोपॅथिक औषधें जेथें लवकर गुण दाखवितात, त्या ठिकाणीं आमच्या औषधानें त्याहूनहि लवकर गुण येतो.

१५०-२०० कुटुंबांची चिकित्सा

त्यांचेकडे आज तीसचाळीस वर्षांपासून चिकित्सा घेणारे कुटुंबांची संख्या दीडदोनशेंच्या वर असेल, अशा कुटुंबांत आजवर कोणत्याहि अवस्थेंत ॲलोपॅथीचा प्रवेश झाला नाहीं. त्यामुळें इंजेक्शनचा प्रवेशहि या अशा कुटुंबांत झाला नाहीं. कोणत्यां परिस्थितींत लोकांच्या सांगण्यावरून न डगमगतां एकाच वैद्यावर हीं कुटुंबें अवलंबून राहातात, हे त्यांचें श्रेष्ठत्व आपोआप ठरवितें.

रासायनिक औषधांचा वापर कमी

चिकित्सेंत महाराष्ट्रांत प्रचलित असलेली पर्पटी-कल्पासारखीं रासायनिकें अगर मकरध्वजासारखीं मोठीं औषधें त्यांनीं कधींच वापरलीं नाहींत. जुनाट ग्रहणी, क्षय, गलत्कुष्ठ, मधुमेह इत्यादि सर्व तऱ्हेचे क्लिष्ट रोग यांनीं वनस्पतिचिकित्सेनें बरे केले आहेत.

वनस्पतींनीं वातव्याधि-चिकित्सा

वाताच्या सर्व प्रकारच्या विकारांवर यांचा हातखंडा आहे. वातविकारावर विशेषेंकरून प्राविण्य मिळविलें आहे. चरक-सुश्रुतकाळीं, पर्पटीसारख्या खनिजद्रव्यांचा उपयोग न करतां केवळ वनस्पतिबहुल चिकित्सेनेंच प्राचीन ऋषिमुनींनीं राजमान्यता मिळविली. आजहि तें शक्य आहे असें त्यांचें म्हणणें आहे.

सांइ
प्रेग-युटेरो
गर्भिणी-गर्भ-रक्षक
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांइ ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठेवणीकडे लक्ष असावें

निदान करतेवेळीं शरीराच्या ठेवणीकडे पूर्ण लक्ष पुरवायाचें. रोग्यामध्यें शरीराची ठेवण समतोल आहे का, बारकाईनें प्रत्येकानें रोग्याकडे नजर दिल्यास एक व्यक्तीला ही गोष्ट कळण्यासारखी आहे. हें खरें, तरीपण ती कला अवगत करणें फार कठीण आहे. मानेची जाडी, कानाखालीं समोरचा फार जाड असणें, तेथील स्नायु दुरून पाहा- ताना फुगीर पुष्ट दिसणें, कानामागील स्नायु उंचवट असणें, तोंडावर शेवटच्या दाढेवर बाहेरून फुगलेला दिसणें, सतेज चेहेरा, निस्तेज चेहेरा, उदास किंवा रूक्ष चेहेरा, शिवाय इतर सर्व बाबी, यांकडे वैद्य, सामान्य लक्ष पुरवितात, त्या सर्व पाहातातच.

लक्ष देण्याजोगे भाग

शरीराच्या उंचीला अनुरूप शरीराची जाडी असावी तशी नसते. कमरेच्या योग्यतेला अनु- रूप मांड्या पाय यांची वाढ नसणें, अगर फाजील वाढ असणें. विकृत वाढ, जसें मांड्यांची वाढ एका बाजूची तर पायाची त्याविरुद्ध. त्यांत पुन्हां एका बाजूचा एक स्नायु जाड तर दुसऱ्याचा त्या विरुद्ध. मांड्या ठीक, त्या मानानें ढुंगण अतिक्षीण किंवा अतिजाड, किंवा ढुंगणाचा भाग फारच आंत खेंचला गेलेला. पाठ मध्यें वांकलेली, कमर जवळ वांकलेली किंवा अंसाच्या ठिकाणीं वांकलेली. मध्यें उंच, तळपोट उंच किंवा बेंबीजवळ उंच, कोठेसा पोट उंच, छाती उंच पोट मागें पाठीला लागलेलें, अशाप्रकारें निजवून तपासतांना छाती पोट यांच्या उंचीकडे पूर्ण लक्ष द्यावें लागतें.

डोळ्यांतील बदल

या प्रत्येक बाबी चिकित्सेच्या दृष्ट्या फार मह- त्वाच्या आहेत. बसतांना बसण्याच्या ढबीवर विशेष लक्ष असावें. एकसारखें वाटणाऱ्या डोळ्यांत देखील बारकाईनें पाहिल्यास लहान मोठेपणा झालेला दिसतो. खोलगट डोळे, डोळ्याभोंवतीं वर्णविशेष, आंतील वर्णविशेष या गोष्टींकडे सर्वजण लक्ष पुरवितात. पण किंचित् प्रमाणांत झालेला आकारविशेष सहजासहजीं ध्यानीं येत नाहीं.

जिभेची जाडी व रूक्षता

जिभेची जाडी आणि रूक्षता हे महत्वाचे लक्ष्य- केंद्र होत. केव्हांहि दोन्ही हात आणि दोन्ही पाय यांची नाडी पाहतात. उजव्या पायाची डाव्या हाताची, डाव्या पायाची उजव्या हाताची अशी क्रॉस (विरुद्ध) समता पाहिजे; म्हणजे पूर्ण निरोगिता असें ते म्हण- तात. उजवा पाय डावा हात याची नाडी एकसारखी हवी. डावा पाय उजवा हात याची नाडी एकसारखी हवी. हेंच खरें आरोग्य लक्षण. असें क्रॉस (विरुद्ध) परीक्षण होतां क्षणीं नक्की अमक्याच भागांत रोग आहे, असें सांगतां येतें.

हाताच्या व पायाच्या नाडींत फरक

बऱ्याच रोग्यांमध्यें हाताच्या व पायाच्या नाडींत फार फरक दिसतो. नाडीच्या वेगांत हें महदंतर दिसतें. ज्या ज्या भागांतील नाडीवेगांत अंतर आहे, हें ओळखल्याबरोबर शरीरांतील अमक्याच नेमक्या ठिकाणीं रोग केंद्रित आहे हें आधीं समजतें.

दर्शन स्पर्शन परीक्षा

प्रथमतः दर्शनज्ञान झाल्याबरोबर चारहि नाडींतील भेद ओळखून नंतर स्पर्शानें परीक्षा करतात. स्पर्श- नानें आधीं आंतड्याची ठेवण नंतर यकृत् प्लीहादिक तसेंच आंतड्याच्या बाजूच्या स्नायूंची ठेवण, पोटावरील साहजिक उंचवटे, त्या उंचवट्यांना पाठीच्या कण्याशीं संबंध, शुक्रवह स्रोतसें इत्यादि आवश्यक सर्व बाबी तपासून नंतर पाठीच्या कण्याची रचना वगैरे मागें सांगितलेल्या सर्व बाबी समजून नंतर चिकित्सेला आरंभ करावयाचा हा त्यांचा परिपाठ आहे.

चिकित्सा-तत्त्रें

एकाच जमिनींत तऱ्हतऱ्हेचीं वनस्पतिबीजें रोंविलीं असतां, तीं तीं बीजें आपापल्यापरीनें मोडा- वून वाढून त्या त्या वनस्पतीला निर्दिष्ट रसपूरित अशी वाढ झालेली असते. उदाहरणार्थ ऊंस मधुर-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रस मात्र शोषून घेतो. मिरची तिखटरस मात्र शोषून घेते. चिंच आंबटरस शोषून घेते. निंब कडुरस शोषून घेतो. तीं सर्व एकाच जागीं जवळ जवळ रोंवलीं असतांहि परस्पर जवळ आहेत म्हणून शेजारच्या वनस्पतींचें अनुकरण न करतां आपआपला ठराविक रस तेवढाच शोषून घेतात. हें सत्य आणि प्रत्यक्ष सिद्ध आहे. एकाच जमिनींतून या विविध रसांची उत्पत्ति होते. पण आज उपलब्ध असलेल्या रसायन-ज्ञानाच्या योगें मातीचें विश्लेषण केल्यास हे विविधरस मात्र मिळूं शकत नाहींत.

मातींतून साखर कशी बनते ?

ज्या मातींतून वनस्पति-बीजांमुळें रसोत्पत्ति होते, तेंच राक्षायनिक प्रयोगानें वनस्पतीप्रमाणें रसपूरित द्रव्यनिर्मिति कां शक्य नाहीं ? तें कां ? जमिनींत वाटेल तो रस निर्माण करण्याला योग्य पोषक द्रव्यें असूनहि ऊंस गोडीखेरीज इतर कोणताहि रस शोषून घेत नाहीं, कारण इतर रस शोषून घेण्याची शक्ति त्यांत नाहीं इतकेंच.

बीजधर्माचें वैशिष्टय

एकंदर जो तो रस निर्माण करण्याला बीजधर्म विशेष पाहिजे. आणि बीजधर्म जिवंत असेल तोंवर त्यांचें कार्य अव्याहत चालू राहणार; आणि हा बीजधर्म रासायनिक प्रयोगानें कृत्रिमतः तयार करणें अशक्य आहे.

जरुरी समजून निर्मिति

शरीरांत जीं अनेक कार्यें प्रतिक्षणीं घडत असतात, तींहिपण आपापल्यापरीनें आंतील जरूरी आपण स्वतः समजून घेऊन, आंतील यंत्रें घडवीत असतात. त्याची जाणीव माणसाला मुळींच नसते. अनेक यंत्रें आंत निर्माण केलीं गेलीं आहेत. त्याच्या कार्यांत व्यत्यय येऊन म्हणजे त्यांच्याकडून घडावयाचीं कामें व्यवस्थित न झाल्यामुळें कांहीं रोग होतात.

त्रिदोषांचें श्रेष्ठत्व

अशा समजुतीनें चिकित्सेचीं तत्वें आंखून त्या-प्रमाणें चिकित्सा केल्यास, चिकित्सा सफल होत नाहीं. त्या अनेक यंत्रांचीं कामें व्यवस्थित होण्यास त्रि-दोषांचें भरपूर बल असावयास पाहिजे. त्रिदोषांचें समतोलपणा राखण्यानें सर्व यंत्रांचीं कामें बरोबर होतात. जसें माती मूळ आधारस्वरूपांत सर्व तऱ्हेच्या बीजांना आहार पुरविते, तद्वत् हे त्रिदोष सर्व कार्य-कारी यंत्रांना आहारयंत्रांतील रासायनिक द्रव्य योग्य प्रमाणांत पुरवितात.

वाताची स्थिति लक्षांत घ्यावी

निदान झाल्याबरोबर शोधनाची आवश्यकता आहे वा नाहीं तें ठरवून आवश्यकता वाटल्यास शोधन देण्याआधीं वाताची स्थिति अगोदर लक्षपूर्वक अनु-लोम आहे या प्रतिलोम आहे किंवा कुंडली स्वरूपांत मध्येंच कोठेंतरी फिरतां आहे हें पाहणें आवश्यक असतें. प्रतिलोम वायु असतां किंवा क्षुब्ध वायु असतां, वायु अनुलोम होईल, शमेल, असे उपचार आधीं करावयास पाहिजे. आंतड्यांना मळ आम-चिकट स्वरूपांत चिकटलेला आहे असें वाटल्यास चिकटा दूर होईल असे उपचार करून नंतर विरेचनासाठीं योजना करावयाची. बऱ्याच रोगांत ही प्राथमिक चिकित्साच फार करावी लागते.

प्राथमिक चिकित्सा

यकृत विकारांत विरेचनार्थ दन्ती, रेवाचिनी, शिरा, बाहवा, जेपाळयुक्त कल्प, त्रिवृत् यापैकीं एखादें द्रव्य निवडावें. सकाळचें विरेचन दिल्यावर योग्य विरेचनें होईतोंवर जिरे, बडीशेप, बाळंतशेप, सुंठ यापैकीं कोणत्या एकाचा काढा तासातासानें पीत राहावें. विरेचनें झाल्यावर लिंबाचा रस, तूप यांशीं दोन घांस भात जेवून नंतर अवश्य वाटल्यास डाळीचें सूप कढणाशीं जेवावें. जेवण झाल्यानंतर अनुलोमक पाचक मूत्रल अशीं औषधें द्यावीत. रात्रींहि हीच चिकित्सा करावी.

मलद्वाराची आग

विरेचन झाल्यानंतर मलद्वाराची आग असल्यास मळसंचय फार आहे असें समजावें. परत दुसऱ्या दिवशीं सकाळीं तपासून आंतड्याची स्थिति लक्षांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विरेचनें देणें अगर न देणें हें ठरवावें.

वैद्यानें मल स्वतः पहावा

कांहीं रोग्यास सतत आठ दिवस, कधीं पंधरा विरेचन द्यावयाची पाळी येते. आपण नित्य घेत आहे ही कल्पना आल्यास रोगी भितो.; रोग्यास त्याची भीति वाटूं नये अशी काळजी, आंतड्यांत घट्टपणा नाहीं, अन्नस्थान शुद्ध आहे, मलद्वाराची आग नाहीं, भूक बरी, झोंप येते, असें झाल्यानंतर औषधें योजा– मलमूत्रपरीक्षा वारंवार करावी लागते. मळाचा रंग, खडेदारपणा, चिकटा, बारीक धारेनें जाणें, पक्वापक्वता वगैरे लक्षपूर्वक स्वतः पाहून करून घेतात. याबाबतींत रोगी सांगेल त्यावर ठेवीत नाहींत.

वमनाशिवाय चिकित्सा व्यर्थ

कफविकारांत, गांठाळ चर्मरोगांत, गंडमाळेंत, रोगांत, स्थूलांच्या जुनाट चर्मव्याधींत, वातकफजन्य रांत, उन्माद, जिव्हाजाड्यतेंत, आकस्मित एक- शोथांत, इत्यादि अनेक अवस्थेंत वमन करावें. शिवाय चिकित्सा मुळींच लागूं पडत नाहीं. वमन नंतर रोजचे रोज विकार कमी होत जातो.

ग्रंथिविकारावर वमन

गाठ्याळ विकारांत तो कितीहि जुनाट असो, दिल्यावर अतिअल्प अवधींत १०-१५ दिवसांत दिसतो. कांहीं वातविकारांतहि वमन द्यावें लागतें.

वातविकारावर सिंहनाद गुग्गुळ

वातविकारांत विरेचनार्थ दंती, जेपाळकल्प, वगैरे देतात. वातविकारांत एकदां आरंभीं शुद्धि केल्यास पुरत नाहीं. वारंवार म्हणजे दिवस अंतरानें द्यावेंच लागतें. शिवाय दशमुळें, फळ, बला, वचा, पंचमुळें, त्रिफळा, एरंडमूळ, बडीशेप, कडुजिरे, इत्यादि द्रव्यांच्या सिद्ध बस्ति द्यावा लागतो. नियमितपणें सिंहनाद-गुग्गुळाचें विरेचन फार उत्तम परिणामकारक आहे.

बालकासाठीं वमनकल्प

मुलांना कफविकारांत विरेचनें दिल्याखेरीज इलाज करावयाचा नाहीं. तान्हे मुलांना तसेंच वयांत आलेल्या मोठ्या मुलांनाहि केळीच्या मुळ्यांच्या फुपाट्यांत शिजवून काढलेल्या रसांत जिऱ्याची पूड साखर मिसळून पाजणें. तान्हे मुलांस १ ते २ चमचे, ४ ते ६ महिन्यांत तीन चमचे, त्याहून वर्ष दीडवर्षांच्या मुलांना चार ते सहा चमचे, मोठ्यांना ५ ते ७ तोळे देणें. एकंदर लहानापासून थोरापर्यंत देण्यास हा रस योग्य आहे. यानें मुलीं त्रास न होतां उत्तम वमन अगर विरेचन तेंहि अतिसौम्य स्वभावांत होतें.

सांधीच्या रोगावर कदलीमूलरस

सांधीच्या रोगांत तर आजारी आहे असें कळतांच सुरवातीला हा कदलीमूलरस दिल्यास पुढील मोठी आपत्ति टळते. पुढील विकारानें यत्किंचितहि त्रास होत नाहीं. डबडबीत कफ असतांना 'खोकली' नांवाच्या वनस्पतीचीं वयोमानाप्रमाणें १५–३० पानें, मोहरी, लसूणकळी, मिरी याबरोबर पाण्यांत अगर तांदुळाच्या धुवणांत वाटून पाजणें. यानें चांगली उलटी होते. कांहीं बऱ्याच डबडबलेल्या कफांत कफनाशकवटीचा उत्तम उपयोग होतो. कफ स्कन्न असतां उत्क्लेश करण्यासाठीं चांगेरी समूळ, यांत जिरे, जेष्ठीमध मिसळून काढा पाजावा; त्यानें कफ लवकर पातळ होतो.

रोग्याची जीभ स्वच्छ ठेवावी

संततादि ज्वरांत तसेंच सान्निपातिक ज्वरांत रोजीं दोन वेळ औषधी चूर्णानें जीभ चोळून अगर काढ्यांच्या गुळण्या करून जीभ स्वच्छ ठेवावी. तसेंच डोळ्यांत अंजनें घालावींत.

टाळूवर मानेवर लेप

अवस्थानुसार द्रव्यांची निवड करून त्यांचा टाळूवर लेप द्यावा. ताळवेवर (टाळूवर) लेप देण्यानें रोग्यास विश्रांति मिळते. तगमग असह्य होत नाहीं. झोंप येते. मानेच्या शिरा ताठ होणार नाहींत. झाल्यावर लगेच त्यांवर शोधन लेप लावणें. या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिरा ताठ झाल्यानें ज्वरांत मेंदूचे विकार होतात. प्लीहादिक क्षोभ असतां त्यांवर मोहरी अगर इतर शोथघ्न द्रव्यांचा लेप करणें. इतकें स्वतंत्र उपचार केल्यास ज्वरी लवकर बरा होतो. पोटांतील औषधापेक्षां याचा परिणाम जास्त चांगला होतो.

व्यावहारिक गोष्टींकडे लक्ष

प्रत्यक्ष औषधी चिकित्सा करतेवेळीं कांहीं व्यावहारिक गोष्टी लक्षांत घेऊन तत्सम कार्य अपेक्षा असतांना तशीं द्रव्यें निवडतात. अम्लफळें परिपक्वावस्थेंत मधुर होतात. कोंवळेंपणीं अत्यंत तुरट असलेलीं फळें पक्वावस्थेंत अत्यंत मधुर होतात. तुरटांतून गोड झालेल्या फळांत यत्किंचितहि अम्लधर्म नसतो. अम्लफळापासून मधुरांत रूपांतरित फळांत किंचित् अम्लद्रव्य असतेंच. तेलकट पदार्थ कोंड्यानें स्वच्छ धुतले जातात. तुरीच्या डाळीच्या कढणानें तेलकटपणा स्वच्छ होतो. या अनुभवावरून तुपाच्या अगर तेलाच्या अजीर्णांत तुरडाळीचें कढण हें एक उत्तम औ... होय. ज्याला तूप जास्त खावयाचें आहे त्या... डाळीच्या कढणाशीं तूप खाल्ल्यास तितकें तूप ... होऊन अंगीं लागतें. वाळूक तवशी यांच्या वा... गव्हाचा चिकट गुण नाहींसा होतो.

प्रथम प्राण-उदान अनुलोम

बंदुकीच्या नळींत पाणी भरून उंच धरल्या... पाणी खालच्या कानांतून गळूं लागतें. तेंच नळी... हात ठेवल्यास पाणी गळणें थांबतें. नळीवरून ह... काढल्यास पुनः पाणी वाहू लागतें. हाच अनुभव ... आध्मानाच्या कोष्ठगत वाताच्या अवस्थेंत निरूह... व सरद्रव्यें दिली तरी कांहीं केल्या लघवी अगर शौ... होत नसते. अशा परिस्थितींत प्राण उदान अनुलो... आधीं कुशलतेनें करून नंतर अपानानुलोम... द्रव्याशीं सर द्रव्य मिसळून दिल्यास उत्तम गुण ये... अशा अवस्थेंतील अनेक रोगी पाश्चात्य विद्वानाक... सोडले जातात. कांहीं केल्या लघवी परसाकडे ह... नाहीं. ते तरी काय करणार ?

आमांशावर हिरडा

अत्यंत बुळबुळीतपणा हिरड्यानें मोडतो. ... कोरफडीचा बलक काढून हिरड्याची पूड ... मिसळतांच बोळ नाहींसा होऊन त्याचें पाणी ... असेंच हिरड्यानें आंव मुरडा. कोणत्याहि अव... पोटांत आंव सांचलेली आहे असें वाटल्यास ... हरीतकीचूर्णानें सत्वर बरें होतें. बुळबुळीत ... थुंकीवरून, जाड्य, स्तंभ, अग्निमांद्य इत्यादिवरून ... आंतड्यांत सांचलेली आहे असें नक्की ठर... हरीतकीचूर्णाशिवाय दुसरें औषध जरूर ना... त्रिफळेपेक्षां केवळ हरीतकी पुरते.

केळ्याच्या अजीर्णावर उंबराचा रस

असें कांहीं व्यावहारिक अनुभवहि चिकित्सेला ... करतात, असें नीळकंठराव वरचेवर सांगत अस... पक्की केळी कुसकरून उंबराची साल ठेंचून ... मिसळून चांगलें कुसकरून ठेविल्यास थोड्याच वे... त्याचा बोळ नाहींसा होऊन, स्वच्छ शुद्ध रस ...

'वैद्य-सन्मित्र'

(ग्रंथ-लेखक-वै. पां. वि. जायदे दंतवैद्य आयुर्वेदतीर्थ, हुबळी)

आरोग्य-मंदिराचा अभिप्राय

'वैद्य सन्मित्र या पुस्तकांत ॲलोपॅथी, होमिओपॅथी, बायोकेमिस्ट्री आणि आयुर्वेद या शास्त्रांतील रोगांचें निदान आणि चिकित्सा या विषयींची माहिती साररूपानें दिली असून वैद्यकांतील उत्तमोत्तम औषधोपचार अगदीं सोप्या भाषेंत व सुटसुटितपणें दिलें आहेत.

आकर्षक व उपयुक्त

पुस्तक परिश्रमपूर्वक लिहिलें गेलें आहे. लेखकाची लिहिण्याची हातोटी चांगली असल्यामुळें पुस्तक आकर्षक व उपयुक्त झालें आहे.

पुस्तक मिळण्याचें ठिकाण:—

वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…ते, त्यावरून केळ्याच्या अजीर्णावर उंबराचा …रा द्यावा.

शक्तिवर्धक औषधें देत नाहींत

…यांच्या विचाराप्रमाणें कोणासहि शक्तिवर्धक …नाहींत. साधी गोष्ट, पडसें झालें कीं, लगेच सर्वांग …, अतिशय अशक्तपणा वाटणें, कांहीं केल्या करमत …होणें असें होतें. आदल्या दिवशीं बरा, दण-… असलेला लगेच दुसऱ्या दिवशीं इतका निःशक्त …कीं, सांगतां सोय नाहीं. शरीरांतील शक्ति …एका दिवसांत नाहींसारखी कशी झाली! …उपचार करतांच, सर्दी बरी होतांच थकवा …नाहीं. हें एक सामान्य उदाहरण समजुतीसाठीं …आहे.

रानांतील गाईचें दूध

रानांतील गाई केवळ गवतावर जीवन करतात. …तील झाडपाला आणि गवत इतकेंच खाऊन धष्ट-… असतात त्या गाई. त्यांचें दूध मुबलक आणि अति …असतें. केवळ रूक्ष गवतावर राहणाऱ्या गाईचें …अति सकस आणि घट्ट. तेंच ओशट दाणे वगैरे …यास घालतो अशा शहरीं गाईच्या दुधांत कस …; हें कां?

अनवश्यक आहारामुळें शक्तिपात

आम्ही आमच्या समजुतीनें इतर जे कांहीं …ना खाऊं घालतो हें त्याला नको असतें. अशा …नवश्यक आहारामुळें दूध उत्पन्न करणाऱ्या यंत्राची …आम्ही विकृत करतो असेंच म्हणावें लागते. …ची एक गोष्ट अशी कीं, गवताचें पृथक्करण …स दुधांत जीं व्हिटॅमिन्स सांपडतात तीं कांहीं …तांत सांपडत नाहींत, तीं कां बरें सांपडूं नयेत? …गवतांत नसलेलें दुधांत कसें येऊं शकलें? गाईच्या …गेल्यानन्तर गवताचें विश्लेषण होऊन दुधा-…ला सकस पदार्थ मिळतो. ती गोष्ट रासायनिक …काला अशक्य होते.

कृत्रिम भर अनावश्यक आहे

यावरून बीजधर्म स्वभावी शारीरिक यंत्रें योग्य स्थितींत असल्यास आपलीं कामें बरोबर बजावून शरीर यंत्र चालवयास जें जें हवें, तें तें आंत निर्मिलें जातें. आम्ही उणीव भरून काढण्यासाठीं म्हणून कांहीं कृत्रिम भर घालण्याची जरूरी नाहीं. कोणत्या यंत्राचें काम कां हरकत होऊन थांबलें आहे, हें नीट समजून इलाज केल्यास नक्की अति लवकर बरें करतां येतें. टॉनिकची जरूरी राहात नाहीं. यांच्या कांहीं चिकित्सानुभवावरून कोणीहि पडताळून अनुभव घेऊन खात्री करून घेऊं शकतो.

रानगाईचें वैशिष्ट्य

घरीं जास्त खावयास मिळतें अशा गाईंना दूध कमी असतें. तेंच खेड्यांत गरीबांनीं पाळलेल्या गाई असतात, ते गरीब लोक घरीं गाईंना खाऊं घालीत नाहींत, जें कांहीं रानांत चरून येतील तितकेंच. अशा गरीबांच्या गाई फार पिळतात (दूध देतात), याचें कारणहि समजून घेणें प्रत्येक वैद्याला अत्यंत आवश्यक आहे.

कॅल्शिअम्, व्हिटॅमिन्स, लोह

अलिकडे कांहीं रोगांवर डेफिशिअन्सी डिसीझेस म्हणून कॅल्शिअम्, व्हिटॅमिन्स, लोह वगैरे द्रव्यें शरीरांत भरलीं जातात, ते यांना मान्य नाहीं. त्यांची विचारसरणी अशी कीं, शरीरांतील आवश्यक रासायनिक घटकें अंतर्गत देवनिर्मित इंद्रियांकडूनच निर्माण केलीं जातात. सदर इंद्रियांवर कांहीं कारणानें अधिक ताण पडल्यास अगर त्यांवर कशाचें तरी दडपण आल्यास त्याला स्तब्धता आलेली असते. व त्या द्रव्यांची निर्मिति कमी प्रमाणांत होऊन सदर डिफिशिअन्सीचीं लक्षणें दिसतात.

हे रोग कोणाला होतात?

शिवाय हीं लक्षणें ज्यांना भरपूर पौष्टिक अन्न मिळूं शकतें अशाच लोकांत अधिक प्रमाणांत दिसतात. गरीब मजूर व कामकरी वर्गांत तीं त्या प्रमाणांत आढळत नाहींत. त्यांच्यांतहि अलिकडे भरपूर पगार मिळून ऐदीपणा वाढला आहे. अशांत हे रोग सध्यां दिसूं लागले आहेत. याहि अनुभवानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

वरील विचारसरणीस पुष्टि मिळते. म्हणून डिफिशि-अन्सी भरून काढण्याचे वायफळ प्रयत्न न करतां, ज्या यंत्रांत कार्यकारी शक्ति कमी झाली असेल त्यावर इलाज करणें हीच खरी चिकित्सा होय.

आंबटावर कल्शियम् देणें चूक

अर्थात् ही रोगनिवारण कला असावयास दांडगी निरीक्षण शक्ति पाहिजे. शरीरांत आंबटपणा वाढला असल्याचें दिसतांच तद्विरुद्ध चुन्याचे कल्प देणें इष्ट व उपयोगी नाहीं. हें सर्व वैद्यवर्गाला अनुभवानें असतेंच. पण त्याशिवाय दुसऱ्या उपायांची माहिती नसल्यानें अखेरपर्यंत तेच उपचार चालू ठेविले जातात. ॲनिमियावरहि लिव्हर, आयर्न, स्टमक एक्स्ट्रॅक्ट इत्यादि उपयोजिलीं जातात. अशा अनेक परीनें उपाय योजना आंखूनहि रोगी लवकर बरा होत नाहीं बरा होण्यास वर्षानुवर्षें लागतात. हा सर्वांचा अनुभव आहे.

खरी गुणदायी चिकित्सा

शरीरांतील निरनिराळीं इंद्रियें एकमेकांच्या उणिवा ओळखून एकमेकांस पूरक अशा तऱ्हेनें आपापलीं कामें सुंदर रीतीनें करीत असतात. समष्टीनें सुसंबद्ध कार्यें घडविण्यास एकजुटीनें झटत असतात. कांहीं अपाय आजार संभविल्यास, त्याचा एकदेशीय परिणाम न होतां सर्वांवर सारखा ताण पडतो, व रोगावस्था प्राप्त होते. अशा वेळीं कोणत्या एकाच इंद्रियाचा तो रोग नसून सार्वदेशीय आहे असें ओळखून म्हणजेच त्रिदोषतत्वें जाणून, त्यांचें सामंजस्य (समप्रमाण) राखण्याच्या दृष्टीनें केलेली चिकित्साच खरी गुणदायी ठरते.

———

रजेचे दिवस घालविण्यासाठीं आरोग्यालयें

मास्कोजवळींल आरोग्यालयें व विश्रांतिगृहें हीं मास्कोच्या श्रमजीवी जनतेचीं अत्यंत आवडीचीं ठिकाणें आहेत. त्यांची संख्याहि सारखी वाढत आहे. ट्रेड युनियन्स व संस्था, त्याचप्रमाणें औद्योगिक कारखाने यांच्या ताब्यांतलीं २०० विश्रांतिगृहें व आरोग्यालयें हिरव्यागर्द वृक्षराईंच्या परिसरांत, तसेच नद्यांच्या व सरोवरांच्या कांठीं बांधण्यांत आलीं आहेत. अद्यावत् वैद्यकीय साधन-सामुग्रीनें सुसज्ज केलेल्या प्रयोगशाळांची व वैद्यकीय विभागांची सोय असलेलें मास्कोजवळील " पावलिश्चे व्ह. ग्रो. व्ह. " आरोग्यालय सर्वांच्या अतिशय आवडीचें आहे. लोखंड व पोलाद कामगार, त्याचप्रमाणें मास्कोंतील कापड कामगार आतां आपल्या रजेचे दिवस तेथें घालवित असतात.

मातासाठीं व मुलासाठीं आरोग्यालय

पाईन वृक्षांच्या परिसरांत असलेलें " मोनिनो " हें देशांतील उत्कृष्ट आरोग्यालयापैकीं एक असून तेथें हृदयविकारावरील व मज्जातन्तूवरील औषधोपचाराची सोय करण्यांत आली आहे. रेल्वेकामगार व खाणकामगार अनुक्रमें " खोत्कोवो " व " बोरिस दोन्स्कोइ " या विश्रांतिगृहांत आपले रजेचे दिवस घालवितात. पाव्हलोव्हो-पोसाद येथें मातांसाठीं व मुलांसाठीं एक आरोग्यालय उघडण्यांत आलें आहे.

———

" गृहवैद्य "

क्षारचिकित्सेवरील लोकप्रिय ग्रंथ. नवीन भावनाकोशासह किं. फक्त ३ रु. ट. ख. निराळा.

(१) वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

(२) डॉ. गर्दे, २६ मोंगल लेन, मुंबई १६

शास्त्रोक्त पद्धतीनें व अत्यंत परिश्रमानें तयार केलेलीं महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसंमेलनानें व ऑल इंडिया आयुर्वेद कॉंग्रेस व प्रदर्शनाकडून प्रशंसित

सहस्रपुटी अभ्रक इ. भस्में व इतर औषधें

प्राइस लिस्ट मागवा.

श्री अमरेश्वर आरोग्यमंदिर

मिरासी बोळ, पो. इचलकरंजी S.M.C.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्य नीळकंठराव पटवर्धन यांचा
निरनिराळ्या रुग्णावस्थांतील पथ्यापथ्यविचार

तापासारख्या आजारांत, ताप उत्पन्न करणारा मूळ हेतुस्वरूप मोठा भयंकर दोष, अग्निस्थान ...लेला असतो. त्यावेळीं पाचक-रसस्राव होत नसतो. ...ची पचनक्रियाच मुळीं चालत नाहीं. अशा ...पर्यंत आहार देणें अयोग्य. एतदर्थ आम कमी ...होईतोंवर आहार द्यावयाचाच नाहीं.

रोग्यांना नेहमीं संस्कृत पाणी द्यावें

...नुसत्या पाण्यावर, तेंहि संस्कृत पाण्यावर ठेवावें. ...नंतर मलमूत्रशुद्धि बरोबर झाल्याचें लक्षांत आल्या-- ...नंतर आहार देण्याचा विचार करावा. एकदोन दिवस ...तर आहार कसलाहि द्यावयाचा नाहींच. नंतर मात्र ...शरीरामध्यें किंचित् बल (टोन) येण्यापुरतें पातळ ...पाण्यासारखें असलेलें पोह्याचें पाणी द्यावें.

लाह्या पथ्यकर केव्हां असतात ?

लाह्याचें पाणी ते कधीं सहसा देत नाहींत; ...कीं, बऱ्याच रोग्यांत वायु विगुण झालेला ...असतो, लाजा शीत व वातवर्धक त्यामुळें लाह्या सर्वत्र ...कर होत नाहींत. पित्ताचें विस्रत्व, द्रवत्व जास्त ...त्यावेळीं मात्र लाजा उत्तम हितकारी होतील.

पोह्यांचा मंड हा उत्कृष्ट पथ्याहार

सर्वत्र पोह्यापासून बनविलेला मंड उत्तम हित- ...पथ्य आहार होय. मूठभर पोहे चार कप पाण्यांत ...ते पंधरा मिनिटें उकळून, गाळून निघालेलें शुद्ध ...रोग्यास पाजावें.

नुसता तांदुळ जड, भाजल्यास पथ्यकर

तांदुळांत जो पचनयोग्य हलका पदार्थ असतो, ...तांदुळांत एकजीव होऊन असतो; म्हणून तांदु- ...ळाची पेज अगर भात स्वतः पचल्यानंतर त्यांतील ...सत्वभाग अंगीं लागावयाचा; म्हणून भात अगर ...कांजी (पेज) हीं जड पडतात. भाजण्याच्या क्रियेनें ...तांदुळांत असलेलें सत्वमय रसधातुबलवर्धक द्रव्य अलग केलें जातें. जास्त भाजण्यानें भात निःसत्व बनतें म्हणून मध्यम भाजलेलें भात कांडून पोहे बनविले जातात. या पोह्यांत, पाण्यांत सत्वर विरघळेल असा सत्वमय पदार्थ भाजण्याच्या क्रियेनें अलग आंतच सुटून तयार असतो; म्हणून पोहे नुसत्या तोंडानें खाण्यास फार रुचकर असतात. ही रुचि तांदुळांत मिळत नाहीं. याचें कारण तांदुळांत तो रुचकर विद्रवणशील पदार्थ अलग झालेला नसतो. आंत मुरून तांदुळांत एकरूप झालेला असतो.

पोह्याचें पाणी ताप असेपर्यंत द्यावें

पोह्यांतील उत्तान उत्क्लिष्ट सहज विद्रवण-स्वभावी द्रव्य रससमान असून पचावयास अत्यन्त हलकें आहे. त्यामुळें आमत्व कमी होत असून, ज्वराचा अनुबन्ध असतांना रसस्थ बल राखण्याच्या दृष्टीनें आहार म्हणून पोह्याचें फार पातळ पाणी उत्तम. पूर्ण ताप सुटेतोंवर पोह्याचें पाणी द्यावें. त्यानन्तर मात्र तांदळाची पेज चालू करावी. पोह्याचें पाणी तापांत जसें उपयोगी व लवकर ताप उतरविण्यास मदत करतें, त्याप्रमाणें शूळादि वेदनायुक्त आजार जेथें असेल तेथें शरीरधारण इतकेंच घडावें, पचनयंत्रावर भार पडूं नये, अशा सर्व अवस्थेंत पोह्याचें पाणी द्यावें. तें उत्तम गुणकारी आहे.

ते बार्ली देत नाहींत

ते बार्ली कधींच देत नाहींत. बार्ली कृमीविकार करणारी तसेंच-आमवर्धक तेणेंकरून आध्मान करणारी आहे; म्हणून कोणासहि बार्लीचें पाणी देण्याचा सल्ला देत नाहींत. उलट त्यास विरोध करतात. साबुदाणा-देखील पोह्याचे मानानें अत्यंत जड आहे, असा त्यांचा अनुभव आहे.

दुधाबद्दल विलक्षण अभिप्राय

ते कोणत्याहि आजारांत गहू, दूध घेऊं देत नाहींत. दुधाबद्दल त्यांचा फार विलक्षण अभिप्राय आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शास्त्रवचन खरें असल्यास दूध हा अत्यन्त जड पदार्थ होय. 'अन्नात् अष्टगुणं पिष्टम्। पिष्टात् अष्टगुणं पयः ॥ हें वचन खरेंखोटें कोणी पडताळून पाहिलेलें दिसत नाहीं. हें कोणी पडताळून पाहिलें असतें तर दुधाविषयीं योग्य निर्बंध घातले असते, असें त्यांचें मत आहे.

दूध अन्नाच्या सोळापट जड आहे

एकंदर दूध हें पूर्णान्न असून तांदुळाच्या भाताचे सोळापट जड आहे; म्हणजेच १० तोळे दूध १६० तोळे अन्नाच्या बरोबरीनें बलवान् आहे. करितां ह्या अशा हिशेबी दृष्टीनें कागदावर तक्ता मांडून तिकडे शास्त्रीय दृष्टीनें पाहिल्यास त्यांतील तत्व प्रत्येकाच्या लक्षांत येईल.

जेवणानंतर दूध पिऊं नये

दूध कपभर प्याल्यास एक वेळचें पूर्ण जेवण झालें असें समजावें. एक कप दूध एका जेवणाबरोबरीचें असतां, जेवणानंतर दूध पिणें किती अपायकारक आहे, हें लक्षांत आणावें. रात्रीं जेवणानंतर दूध पिणारे हे कायम आजारी होत.

दुधामुळें होणार विकार

दुधामुळें ब्लडप्रेशर अगर कायमचा अंगमर्द, डोकेदुखी, तापटवृत्ति, मलबद्धता, कोठेंहि न बरा होणारा रोग, अत्यंत आळसाळू स्वभाव, सकाळीं उठल्याबरोबर उल्हासी वृत्ति नसणें, इत्यादि अनेक विकार उत्पन्न होतात असें त्यांचें मत आहे.

वैद्यासाठीं उपयुक्त ग्रंथ

ॲलोपॅथिक चिकित्सासंग्रह-सुमारें ७० रोगांवरील चिकित्सासूत्रें व ३४० प्रिस्क्रिपूशनें व इंजेक्शनें यांनीं युक्त. मराठींतील अभिनव ग्रंथ आपल्या, ॲलोपॅथिक ज्ञानांत वाढ होण्यासाठीं आजच मागवा. किं. ४॥ रु. ट. ख. निराळा

१ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

२ डॉ. मोकाशी, ठाणें

दूध पिण्याची प्रथा

आजकाल श्रीमंत लोकांत रात्रीं जेवणानं[illegible] दूध पिण्याची प्रथा पडली असून ते सर्व आज ए[illegible] वा अनेक विकारानें आजारी आहेतच, कांहीं[illegible] ज्यांना थोडाबहुत व्यायाम घडतो, अशांत [illegible] कारण नसतां प्रकृति संभाळत असूनहि, व्यायाम [illegible] असूनहि न कळत अस्वस्थता कां वाटावी [illegible] आश्चर्य वाटत असतें. पण याचें कारण दुधा[illegible] असेल, असें कधींहि त्यांचें मनाला शिवत नाहीं. [illegible] पक्षीं दूध व्यायामाला अनुसरून पुरत नसावें, म्ह[illegible] जास्त दूध पिण्याचे प्रयत्न करतात. जसजसें ज[illegible] दूध प्यावें तसतसे विकार मात्र वाढत जातात. कार[illegible] स्वरूपी दूध असेल, याची जाणीव न होतां मध्ये[illegible] कांहींतरी चिकित्सा करून एकंदर सुधारत नाहीं [illegible] खराब प्रकृति होऊन बसते.

सकाळचे वेळीं कांहीं खाऊं नये

सकाळचे वेळीं कांहीं खाऊं नये. सकाळचे वे[illegible] घेतलेलें दूध अपाय करीत नाहीं. तरी घ्यावया[illegible] केवळ दूध एकच घ्यावें. कांहीं खाऊन पिऊन [illegible] दूध पिऊं नये. कांहीं खाल्लया जेवल्यानंतर शुद्ध पा[illegible] मुबलक प्यावें, मात्र दूध पिऊं नये. जेवल्यावर दू[illegible] प्याल्यास अध्यशन दोष उत्पन्न होऊन जेवलेलें खाले[illegible] तर आंबतेंच, पण दूधंहि त्यांस आंबवितें, तेणें[illegible] सर्वकांहीं नासून खराब होऊन दुसरे दिवशीं सका[illegible] सर्वकांहीं अजीर्णाचेच विकार होतात. रात्रीं दू[illegible] पिणाऱ्यांना सतत असें नित्य अजीर्ण होत असतें[illegible] त्यावर पुन्हां सकाळीं नास्ता म्हणून कांहीं खालें [illegible] अजीर्णकोष्ठावर पुनः आहार पडल्यानंतर पचण्या[illegible] वाव रहात नाहीं. अशानें काय काय होईल [illegible] वाचकांनींच ठरवावें.

दूध बंद करून पहा

ज्यांना खात्री करून पहावयाची असेल, त्यां[illegible] वैद्यवर्य श्री. नीलकंठरावांनीं सुचविल्याप्रमाणें रात्रीं[illegible] दूध पिणें सोडून पहावें. सतत पंधरा दिवस दू[illegible]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…सोडल्यावर प्रकृतींत झालेला फरक चटकन् …तांत येईल.

तापांत दूध वर्ज

दुधासंबंधीं असा यांचा अभिप्राय असलेमुळें …सारख्या आमजन्य विकारांत ते मुळींच दूध …नाहींत. ताप कसलाहि असो, दूध द्यावयाचेंच …हीं. चहा-कॉफींत मिसळलेलें दिवसांतून एकादवेळ …मूळासारख्या विकारांत चालेल. दूध नाहीं दिल्यास …आपल्या कल्पनेपेक्षां अतिजलद बरा होतो.

५० वर्षांच्या अनुभवाच्या गोष्टी

पाश्चात्य चिकित्साकोविदाकडून महिना महिना …दोन महिने सुटत नसलेल्या तापाचे रोगी यांचे- …चिकित्सेसाठीं येतात. प्रथम त्या रोग्यांचें मोसंबी …, दूध हे बंद करवितात. आणि आमत्व पूर्ण …अशी चिकित्सा करून नंतर ज्वरघ्न औषधें …कीं, आठ दिवसांत ज्वर उतरतो. एकंदर …वर्षांच्या दांडग्या अनुभवाच्या या गोष्टी आहेत. …सर्वांना कळाव्यात, सर्वांनीं त्याचा लाभ घ्यावा, …उद्देशानें हे विचार त्यांनीं प्रगट केले आहेत.

प्रकृतीला हितकर आहार कोणता ?

प्रकृतीला नेहमीं योग्य असा आहार पुढीलप्रमाणें …असें त्यांचें मत आहे. तुरीची डाळ, तीपण …शिजविलेली; त्यांत तिखट, मीठ, आंबट, गूळ, …, जिरे, किंचित् प्रमाणांत मेथी, लवंगा, दालचिनी …पत्र वगैरे घातलेले आणि भात, जोंधळ्याची …री, पालेभाज्या, तसेंच चांगल्या इतर भाज्या …त्या वस्तु नेहेमीं हितकर समजाव्या.

जेवणाच्या प्रारंभीं तंबळी

जेवणास बसतांच आधीं ताक मिसळून तयार …ली कढी (कासमर्द, ब्राम्ही, मेथीपान, ओवा …राज, पुदिना, नरहुली, कावळी इत्यादींपासून …विलेली) भाताशीं जेवून, नंतर इतर कालवणी …, यांपैकीं एकादे वनस्पतीची कोवळीं पानें चार, …, थोडे जिरे इतके मिसळून सौम्याग्नीवर किंचित् …त भाजून नंतर बारीक वाटून ताक मिसळून रुचीप्रमाणें मीठ मिसळून तुपाची फोडणी देणें. ही झाली कढी. (याला तिकडील भाषेंत तंबळी म्हणतात)

सकाळीं न खाणें उत्तम

अशा प्रकारचा आहारनियम ठेविल्यास बहुतेक आजार संभवत नाहींत. सकाळीं कांहीं न खाणें उत्तम. कांहीं विशेष खावेंसें वाटल्यास जेवणाबरोबरच खावें. अशीच पद्धत रूढ ठेवावी. जेवणाव्यतिरिक्त वेळेस खाल्ल्यानें अध्यशन दोष व त्याचे वाईट परिणाम होतातच.

गहूं बंद करावा, वाळकाची भाजी खावी

कोणत्याहि विकारांत गव्हाचें पथ्य सांगत नाहींत. डायबेटीसच्या रोग्यांनाहि ते नुसत्या भातभाकरी-च्या पथ्यावर ठेवून बरे करतात. गहूं खाणारा रोगी आल्यास आधीं गहूं बंद करवून, गव्हाचे दोष काढ-ण्यासाठीं आधीं इलाज करून नंतर औषध सुरू कर-तात. कधीं चुकून गहूं खावेंसे वाटल्यास त्या दिवशीं वाळकाची भाजी नक्की करून खाल्ल्यास गहूं लवकर पचतो असा त्यांचा अनुभव आहे.

हगवणीवर डाळिंबाचीं पानें

टाकळा, वावडिंग, मारंग यांच्या कोंवळ्या पानांची भाजी सुरेख होते. डाळींबाचीं पानें, आवळ्याचे कोंब यांची कढी ताकांत केलेली, हगव-णीच्या रोगावर उत्तम गुणकारी आहे.

मोडशीवर उपयुक्त आहार

मोडशीवर शेवग्याची साल, आंब्याची साल, आंबाड्याची साल, फणसाची साल या चार जातीच्या साली ठेंचून मिरी, जिरे मिसळून किंचित् तुपांत पर-तून, ताकाशीं वाटून, जरूर वाटल्यास गाळून, फोडणी देऊन भाताशीं जेवणें. हें कढण फारच रुचकर होतें. मोडशी पण दोन दिवसांतच बंद होते. शिवाय कोण-त्याहि तऱ्हेच्या अग्निमांद्यजन्य विकारांत हें कढण फारच उत्तम. असेच निरनिराळ्या रोगावरहि बरेच कढणाचे प्रकार देण्यासारखे आहेत.

लहान मुलांचा आहार

लहान बाळांना दूध पाजण्याच्या बाबतींत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांचा अभिप्राय असा कीं, आईला दूध असतां, मुलांना गाईचें अगर म्हशीचें कोणतेंहि दूध पाजूं नये. दुधाविषयीं साधी कल्पना, गाईचे दूध तीन भाग आम्ही पिळून घेऊन, उरलेलें गाईच्या वासरासाठीं सोडतो. या दृष्टीनें विचार केल्यास मुलांना आईचें पूर्ण दूध देऊनहि तें कमी पडतें या समजुतीनें बाहेरचें दूध पाजणें चुकीचें नव्हे कां? कांहीं आजारामुळें स्तन्य कमी झालेलें असतें. अशा प्रसंगीं दुसरी दाई न मिळाल्यास गाईचें अगर शेळीचें दूध, तेंहि सम-भाग पाणी मिसळून चांगलें उकळून साय काढून पाजावें.

लहान मुलांना आहार व औषध

मुलांना दांत येईतोंवर धान्य देऊं नये. मुलांना वयोमानाप्रमाणें पाणी पाजावें. जिरें, बडीशेप, वावडिंग, यांचा काढा नियमित पाजावा. हा काढा मुलांना सर्व दृष्टीनें उपयोगी आहे. मुलांच्या लघवीला घाण येणें, हें मुलांचें यकृत् बिघडल्याचें आद्य चिन्ह आहे. आईचें दुधाशिवाय इतर कसलेंहि दूध द्यावयाचें नाहीं. आई नसतांना मात्र वरचें दूध पाजावें, वरचें दूध तेंहि पाणी मिसळून पातळ करून पाजावें.

एका वर्षानंतरचा आहार

एक वर्ष वय झाल्यावर चार आठ दिवसांनीं ठरलेल्या नियमित वारीं सातवीणसाल ताजी, कुड्याची साल ताजी, पहाडमूळ ताजें, ओवा, मिरी इतक्या वस्तू जमवून, वेगवेगळ्या भाजून ताकांत वाटून मीठ, हिंग मिसळून पाजणें. आठ दिवसांत एकदां सागरगोट्याचीं पानें, कडू जिरें, मिरी या जिनसाहि ताकाशीं वाटून मीठ हिंग मिसळून पाजतात. मुलें, मोठीं मुलें, वयस्क या सर्वांनाहि हें चांगलें आहे; मात्र हें सकाळीं उठल्याबरोबर पाजतात. ही दोन्ही औषधें लोखंडी पळी तांबडी लाल तापवून ताकांत बुडवून नंतर पाजलीं जातात.

लोकांत आळसाची वाढ

पूर्वी हे प्रकार सगळया ठिकाणीं विद्वानांच्या सल्ल्यानें केले जात असत. पण हल्लीं लोकांत आळस इतका वाढला आहे कीं, या विमान युगांत असलीं औषधें देणें त्यांना इष्ट वाटत नाहीं, तरीपण वैद्यांनीं प्रयत्न करून या रुढी चालविण्याचे प्रयत्न केल्यास समाज खरोखरी निरोगी होईल यांत मुळीं संशय नाहीं. जीं कांहीं घन व्याधींचीं बीजें रोविलीं जातात, तीं या वयांतल्या सुधारणेच्या कालांतील चुकीनें होत. हे नियम पाळल्यानें तसल्या रोगबीजांना मुळींसुद्धां आश्रय मिळत नाहीं. त्यामुळें मुलें निरोगीच अशीं वाढतात. निरोगी वाढ हेंच आयुष्यवृद्धीचें मुख्य लक्षण आहे.

कडू द्रव्यें रुचकर असतात

वर हे जे कल्प सांगितले ते वाचतांना वाचकांना वाटेल कीं, इतकीं कडू द्रव्यें प्यावयाचीं कशीं! हें कधीं जमणें शक्य नाहीं. पण स्वतः सर्वांनीं त्याचीं

सचित्र 'जय आयुर्वेद' का महत्वपूर्ण, विशेषांक

पथ्यापथ्य चिकित्सांक

सितंबर में प्रकाशित हो रहा है।

जिसका विशेष संपादन आयुर्वेद के उद्भट विद्वान्

आचार्य श्रीरघुवीरप्रसाद त्रिवेदी

कर रहे हैं। अत ग्राहकों, एजन्टों, तथा विज्ञापन दाताओं को निम्न पतेसे शीघ्र ही पत्रव्यवहार करना चाहिये।

'जय आयुर्वेद' कार्यालय, मोती चौक, जोधपूर (राजस्थान)

CC-0. In Public Domain: Gurukul Kangri Collection, Haridwar

…घावी. कडू कल्पनेला वाटते; पण हिंग, मीठ, …यामुळें तें अपेय असें मुळीं वाटत नाहीं. कालीं कडू …ात ना ? अशीं कडू कालीं सहज रुचकर पदार्थ …आम्ही खातोचना ! तसेंच प्रथम मुलें ते नाहीं …तर जबरीनें पायाखालीं घालून पाजावें. असें …वार वेळां पाजलें असतां, त्याची रुचि चांगली …मुलें खुषीनें पिऊं लागतात.

बाळंतिणीचें पथ्य

बाळंतिणींसाठीं मिरी काळसर भाजून पूड करून …ी. जिरे व धणे समप्रमाणांत किंचित् भाजून …पूड करून ठेवणें. मिऱ्याची काळी पूड तीन …ार चमचे, धण्याजिऱ्याची मिश्रपूड चार चमचे, …नीहि पाण्यांत एकत्र खूप उकळून त्यांत ओटांचा …साठीं), किंचित् मीठ, थोडा गूळ इतके …,तुपाची फोडणी देणें. हें झालें मिरीचें सार (कढण). …मिरीच्या साराशीं जेवावें. जेवणास बसतांच आधीं दोनचार घांस काळसर भाजलेल्या सुंठ, मिरपूड, तूप यांशीं जेवून नंतर मिरीच्या साराशीं जेवून, शेवटीं चार घांस दुधाशीं जेवावें. पहिले तीन दिवस बाळंतिणीनें एकवेळ जेवावें. त्यानंतर दोन वेळ जेवणें, तेंहि प्रकृति अनुकूल असल्यास; नसल्यास पंधरा दिवस एकच वेळ जेवावें. पंधरा दिवसानंतर नेहमींप्रमाणें सौम्य आहार सर्वकांहीं घेण्यास हरकत नाहीं. डिंकाचे लाडू अगर गहूं द्यावयाचें नाहीं. म्हणजे बाळंतिणी फार उत्तम आरोग्यसंपन्न होतात. अशा प्रकारें सामान्य पथ्यविचार झाला.

अ-लवणी पथ्याचे रोग

ज्वर, सर्दी, शूळ, तसेंच इतर आमपरिस्थितींतील व्याधि खेरीजकरून इतर व्याधींमध्यें साधी आहार-योजना पूर्वी सांगितल्याप्रमाणें ठेवावी. जलोदर, रक्तदोष, दुष्ट जुनाट व्रण यांत संपूर्ण अलवणी पथ्य सांभाळावें.

पावसाळ्यामध्यें
मुलांस होणाऱ्या थंडी, पडसें,
खोकला, अपचन इ. विकारांवर
धूतपापेश्वर
कुमारी आसव नं. ३

धूतपापेश्वर इंडस्ट्रीज लि.

पनवेल- बोध चिन्ह -मुंबई

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वै. सातभाईंचें प्रचारकार्य

म. प्रां. वै. संमेलनाच्या लातूर अधिवेशनांतील प्रस्ताव २२ ला अनुसरून श्रीरामपूर (अहमदनगर जिल्हा) येथील उत्साही कार्यकर्ते वैद्य श्री. बा. ए. सातभाई यांनीं आपल्या जिल्ह्यांत प्रचार कार्य सुरूं केलें हें त्यांस भूषणावह आहे. इतरहि जिल्ह्यांतून अशींच जिल्ह्यमंडळें स्थापून आयुर्वेदाचें प्रचारकार्य होणें इष्ट आहे.

वै. सातभाई यांनीं अहमदनगर येथें जाऊन जिल्हामंडळ स्थापन करण्याचें बाबतींत तेथील स्थानिक वैद्यांचें साह्यानें प्रयत्न केला. २७ – ६ – ५३ ला अहमदनगरचे वैद्यराज द. वा. पुणतांबेकर यांचे दवाखान्यांत वैद्यराज स. सी. उदासशास्त्री यांचे अध्यक्षतेखालीं सभा होऊन वै. सातभाई यांनीं आयुर्वेद-विषयक प्रचारकार्याचा उद्देश व मार्ग ह्यासंबंधीं अत्यंत कळकळीचें भाषण केल्यावर लागलींच कार्यकारी मंडळाची स्थापना करण्यांत आली.

नगर जिल्हा वैद्यमंडळ

१	अध्यक्ष	वै. स. वा. पुणतांबेकर	नगर
२	मंत्री	वै. बा. ए. सातभाई,	श्रीरामपूर
३	,,	वै. रा. भा. आपटे	नगर
४	खजिनदार –	वै. द. वा. पुणतांबेकर–	नगर
५	का. का. सदस्य–	वै. र. द. सुंदेचा	नगर
६	,,	वै. वी. रा. पाकळे	,,
७	,,	,, छ. र. ढोरजे	,,
८	,,	,, ह. ल. बोडके	,,
९	,,	,, लालचंदसी बचानी	,,
१०	संघटक	,, स. सी. उदासशास्त्री	,,

या सर्व कार्यक्रमांत वै. गावडे व वै. करंडी यांनीं अविश्रांत श्रम घेतले हें त्यांस भूषणावह आहे.

नाशिक वैद्यमंडळातर्फे श्रद्धांजली

ता. १२ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां नाशिक शहर वैद्यमंडळाची सर्वसाधारण सभा वैद्यरत्न विष्णुशास्त्री केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरली असतां प्राणाचार्य हिर्लेकरशास्त्री यांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली अर्पण करण्यांत आली. त्याप्रसंगीं वै. विष्णुशास्त्री दाते, वैद्य बिंदुमाधव पंडित व वैद्य वि. म. गोगटे यांची शास्त्रीबुवांच्या गौरवपर भाषणें झालीं.

'केवळ आयुर्वेदशास्त्राच्या शिक्षणाला सध्यांच्या राजवटींत मान्यता नसल्यामुळेंच प्राणाचार्य हिर्लेकर शास्त्री यांच्या सारखी विद्वद्रत्नें उपेक्षिलीं गेलीं. आयुर्वेदशास्त्राच्या उत्कर्षासाठीं त्याचा योग्य उपयोग सरकारकडून करून घेतला गेला नाहीं' असे उद्गार वैद्य बिंदुमाधव यांनीं काढलें. 'संस्कृत भाषेंत उत्तम रीतीनें आपले विचार मांडतां येतील इतका गाढ अभ्यास आयुर्वेदाचा व संस्कृत भाषेचा करणें हीच त्यांना योग्य श्रद्धांजली होय' या शब्दांत वै. गोगटे यांनीं आपला आदरभाव व्यक्त केला.

बिल्व कीं बिबा ?

"ता. १ जुलै १९५३च्या आयुर्वेद पत्रिकेंत पान १७ वर म. गांधींना १ बिल्वाचें दूध दिल्याचा उल्लेख आला आहे. माझ्या माहितीप्रमाणें १ बिब्बा दुधांत उकळून तें दिलें जात होतें असें आहे, तरी बिल्व कीं बिब्बा याचा खुलासा व्हावा." -एक वाचक

तेलिया असाण्याची परीक्षा

तेलिया असाण्याचें चूर्ण पाण्यांत टाकल्यावरोबर २।३ मिनिटांत लाल पाणी दिसूं लागतें, व त्या पाण्यावर मोबिल ऑईलच्या रंगाचा निळसर थर जमूं लागतो हीच या लांकडाची नक्की परीक्षा आहे.

हें लाकूड अत्यंत कठीण असून त्याचा इमारत कामांत तुळया व फळ्या या रीतीनें उपयोग करतात.

पवित्र नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला, हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला, तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहाः–नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्य नीळकंठराव पटवर्धन यांचीं

कांहीं नित्योपयोगी औषधें

जिव्हाशोधक चूर्ण

त्रिफळें, मिरी, मीठ यांचें समभाग चूर्ण करून लिंबाचे रसांत कालवून, जिभेला लावून लाळ गाळावी. यानें जीभ स्वच्छ होते. जिभेला घशांतील सूज कमी होते. घसा दुखत असतां ही पूड लावून धुवावें. लाळ गळून घसा कमी होतें.

तालु लेप

डोकेंदुखी, ज्वरांत तापाचा परिणाम मेंदूवर होऊं म्हणून — कचोरा, जिरे, श्वेतचन्दन, जेष्ठमध लेप दुधांत वाटून टाळूस करावा. तास दोनतास रहावें म्हणून वरचेवर त्यांवर दूध सोडीत जावें. आघातावरहि या लेपाचा उपयोग होतो. पडशा- डोकेंदुखी असतां, जिरे व मिरी दुधांत वाटून ...

फणसांबा

फणसांबा ही एक अत्यन्त विचित्र गुणदायी आहे. याचे गुणधर्म पेनिसिलिनसारखे आहेत. बरेच प्रयोग झाले पाहिजेत. यांत महत्वाचा व्रणरोपण करण्याचा आहे. तो व्रण कसलाहि असो ल्यानें बरा होतो. जिभेवरील खरेसाठीं फणसा- जिरे, श्वेतचन्दन यांचें समभाग चूर्ण, लिंबाचा साखर मिसळून चाटणें; सकाळीं एकच वेळ ते पांच दिवस. फुटीर तोंडावर नुसतें फणसा- पाण्यांत उगाळून लावणें. तसेंच कोणत्याहि याचा लेप व्रणरोपक शोधक कार्य करतो. सिलिनसारखें गुणकारी आहे असें समजल्यावर याचा उपयोग करावा.

जिरें

जिरे ही एक नित्योपयोगी, वैद्यांना हरघडी अशी वस्तु आहे. ज्वर उतरण्यास टाळूवर जिऱ्याचा लेप करावा. कोठेंहि दुखत असलें तें दुखणें कसलेंहि असो, संधिगत वात असो, दांत दुखणें असो, तेथें दुधांत अगर पाण्यांत जिरे वाटून लावणें. एकांगी सूज कारण न समजल्यावेळीं उप- शमनार्थ जिरे लावणें. अशा ठिकाणीं यानें नक्की गुण येतोच. डोळ्याची लाली, सूज, अभिष्यंद विकार यांत जिरे दुधांत वाटून, स्वच्छ फडक्यांत घालून, ती घडी डोळ्यावर ठेवून तासभर निजून रहावें. नंतर उठून लेप काढून फिरण्यास हरकत नाहीं. असें रोज दोन वेळ, नियमित तीन दिवस केल्यास अभिष्यंदादि वर उल्लेखिलेले सर्व विकार बरे होतात. शिवाय दूध वाढ- विणेचें काम अप्रतिम होतें. मूठभर जिरें दुधांत वाटून गाळून दोन चमचे तूपसाखर मिसळून एक कढ आणून निवाल्यावर पिणें. सकाळीं एक वेळ, असें सात दिवस. याशिवाय त्याचें शास्त्रोक्त इतर गुणधर्म तर आहेतच.

धणे

ज्वर सुटल्यानंतरच्या अशक्ततेवर धणे हें चांगल्या- पैकी औषध आहे. मूठभर धणे रात्रीं चांगले शिजवून, झांकून ठेवून, सकाळीं उठल्याबरोबर ते धणे त्यांतील पाण्यासकट वाटून कपड्यानें गाळून, पुन्हां किंचित् ऊन करून दूधसाखर मिसळून पिणें. सकाळीं एकवेळ असें सात पासून पंधरा दिवस घेणें.

चालवत मुळींच नाहीं, इतका तीव्र पाय वळ- णेचा विकार धण्यानें पूर्ण बरा होतो. अत्यंत फिकटपणा, त्याचबरोबर पाय वळणें, केव्हांहि अंगांत दाह, तगमग, झोंप नाहीं, शिवाय रसक्षयाचीं सर्व लक्षणें यांत मूठभर धणे, तोळा दीडतोळा दूर्वामूल किंवा समूल दूर्वा वरीलप्रमाणें रात्रीं शिजवून ठेवून सकाळीं वाटून गाळून दूधसाखर मिसळून पिणें. मुदत सात ते पंधरा दिवस; क्वचित् प्रसंगीं १।२ महिनेहि द्यावें लागतें. याचे १।२ जास्तींतजास्त ५ वनस्पती संयोगाचें औषध त्या त्या रोग्यापुरतें तयार केलेलें असावें.

शठ्यादि काढा

मोठ्या योगकाढ्यांत शठ्यादि काढा. विटाळशे- पणाच्या अत्यार्तवविकारांत नरसेल, कावळी, जिरे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुधांत वाटून सकाळ सायंकाळ चार दिवस असें दोन ते तीन विटाळशेपणीं देणें. यकृत्‌विकारी बालकांना काटेपळस, कासमर्द, नागदंती, बेलमूळ, नित्य दोन वेळ दुधांत उगाळून पाजणें. तीव्र मलबद्धता असतां यांस दंती देणें.

गरोदरपणीं देण्याचीं औषधें

मुलें उपजतांच मरणें, उपजून अनेक वर्णांचे अंगावर डाग, विशेषतः काळे निळे छापे असणें, किंचित् ऊन पाणी त्याला सहन न होणें, अशीं मुलें क्वचित् जगतात. गर्भस्राव, गर्भपात इत्यादि सर्व विकारांत गरोदरपणीं देण्याचीं औषधें — बेलमूळ, मालकांगोणीमूळ, पुत्री बी-मूळ अगर साल, देवदार, इतक्या वनस्पति, दुधांत प्रत्येकीचें पाव तोळा गंध निघेल इतकें उगाळून, नंतर सर्व एक करून चार तोळे दुधांत ढवळून पिणें. सकाळीं एकवेळ, गुरुवारीं व रविवारीं, असें आठवड्यांतून नियमित दोन वेळां बाळंत होईतोंवर देणें.

जुनाट चर्मरोग

अत्यंत जुनाट चर्मरोगावर गोमूत्रसिद्ध करंज, हरडा, बावंची, खदिर इत्यादि अत्यंत साधा वाग्भटोक्त योग फार उपयोगी आहे.

नित्य उपयोगांतलीं औषधें

आनंदभैरव, महायोगराजगुग्गुळ, स्वर्णगैरिक, तुरटी, टंकण, नवसागर, इतर सर्व लवणें, काळाबोळ, हिंग, दंती, नागदंती, काटेपळस, कासमर्द, हळद, फणसांवा, वंशलोचन, गोपीचंदन, पंचजीरक, हिंगाष्टक, अक्कलकरा, पुनर्नवा, गोखरू, शंखभस्म, प्रवाळभस्म, ताम्रभस्म, इतकीं नित्योपयोगी द्रव्यें होत.

याशिवाय इतर अनेक औषधीं वापरतात. पण एकंदर मोठे योग याहून जास्त नाहींत.

अमृतवटी

एक मोठा अनुभविक योग असा आहेः- याचें नांव 'अमृतवटी'. गंधक, पारा, बचनाग, तालकभस्म, टाकणखार, पत्रीकापूर, चित्रक, भुईरिंगणी, विडंग, सुंठ, मिरी, पिंपळी, अक्कलकरा, शेवग्याचा डिंक, अतिविष, नागरमोथा, कडुजिरे (याला कारेळे असें म्हणतात.) जिरे, श्वेतचंदन, हरडा, बेहेडा, आवळकाठी, बालहरीतकी, सुंठ, दारुहळद (यांत सुंठ दोन वेळां लिहिलेली आहे. त्रिकटुंतील सुंठ व अलग सुंठ आहे) हे सर्व दोन दोन तोळे, शुद्ध जेपाळ बीज तोळे, भृंगराजाच्या रसांत अहोरात्र क्षणभरहि न सोडतां सात दिवस खलून मिरी एवढ्या गोळ्या कराव्या.

मुहूर्त पाहून खल करीत

आश्विन कृष्णपक्षअष्टमी, गंगाष्टमी म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवशींच सकाळीं खल आरंभ करावयाचा आणि अमावास्याअखेर खलून प्रतिपदेच्या सकाळीं खलणें थांबवावयाचें. असा हा योग या मुहूर्तावर या क्रमानेंच खलल्यास गुण येतो. नाहींतर गुण येत नाहीं. या अमृतवटीचा उपयोग वातानुलोमक, शूलघ्न, यकृत्‌प्लीहास्थित मलनिस्सारक, सार्वदेहिक वातानुलोमी, विचित्रवीर्य आहे. शिशूंना, बाळंतिणींना, म्हाताऱ्याना, तरुणांना, एकंदर सर्वांना उपयोगी पडतो. याचा रेचक म्हणूनहि उत्तम उपयोग होतोच. याच्या एका विरेचनानें बरेच दिवस आरोग्य टिकतें.

नवे तसेंच जुने

देवीचे वण घालवा!

वणविशोपण तेल किं. रु. ६

मुरुमावरील लेप किं. १२ आणे

(पो. पॅकिंग खर्च वेगळा)

गांवोगांव विक्रेते पाहिजेत.

भेटा अगर लिहा :—

जनरल सप्लायर्स [हिंद]

११४ बी, जगन्नाथ चाळ,

फणसवाडी, मुंबई नं. २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिरसी येथील वैद्यसंमेलन व औषधी बाग

१९३९ डिसेंबरमध्यें अखिल कर्नाटक आयुर्वेद संमेलन वैद्य नीळकंठराव पटवर्धन यांनीं सिरशीला त्यांच्या नजरेखालीं भरविलें. आजवर झालेल्या संमेलनांपेक्षां अनेक परीनें उत्तम तऱ्हेनें हें सिर्शीचें संमेलन उद्बोधक व ज्ञानवर्धक असें झालें. आजवरहि तसें संमेलन दुसरें झालें नाहीं.

संमेलनांचा ठराविक साचा

संमेलन म्हणजे कांहीं ठराविक कालानंतर वैद्य-मंडळींनीं एकत्र जमायचें आणि ज्यांच्या त्यांच्या विद्वत्ते-प्रमाणें त्यांनीं तेथें भाषणें करायचीं आणि कांहीं ठराव मांडावयाचे. अनेक चर्चाविचर्चेनंतर कांहीं ठराव पास करून घ्यावयाचे आणि ते ठराव कागदोपत्रीं पडून रहावयाचे. यापलिकडे विशेष कार्य अशा संमेलनानें होत नाहीं.

परदेशांतील शास्त्रीय परिषदा

याकरितां आपलें संमेलन अशा तऱ्हेचें होऊं नये, वैद्यांना कांहींतरी ज्ञानलाभ व्हावा, हा त्यांचा हें संमेलन भरविण्यांतील प्रमुख हेतु होता. परदेशांत जशा मोठमोठाल्या सायन्स कॉन्ग्रेसेस् भरतात आणि त्यांच्या परिषदांतून कांहींतरी- विषयनिष्पत्तिहि होतेच. कारण कीं, तशा परिषदा भरविण्यापूर्वीं एक वर्ष अगोदर चर्चिला जाणाऱ्या विषयाचा तक्ता तयार होऊन तो त्या सर्व येऊं इच्छिणाऱ्या विद्वानांकडे पाठविला जातो. त्यामुळें विद्वान् मंडळी त्या विषयाचा पूर्ण अभ्यास करूनच परिषदेला हजर राहातात. विषयांची योग्य चर्चा होते. निर्णय देखील भरीव असे होतात.

संमेलन उपयोगी कसें करावें ?

आमच्या येथील वैद्यमंडळींत किंवा इतर विषयांतील तज्ज्ञांमध्यें एकत्र बसून समंजसपणें कोणत्याहि विषयाची चर्चा करणेची कला नाहींच, हें निर्विवाद सत्य आहे. असें असल्यावर संमेलन तर भरवावयाचें, आणि तें उपयोगी असें कसें करतां येईल? यासंबंधीं त्यांनीं विचार करून ठरविलें तें असें:—

आर्यवैद्यक ऱ्याच तऱ्हेच्या संकटांतून पार पडून आज आम्हांस दिसते त्या स्वरूपांत टिकून आहे. शास्त्र टिकून राहिलें पण पद्धति नाहींशी झाली. त्याकारणानें लक्षणांवरून रोगनिदान जरी बरोबर झालें तरी औषधें त्या निदानाला अनुसरून सत्वर परिणामकारी मिळत नाहींत. वैद्य शास्त्रोक्त औषधें शास्त्रोक्त पद्धतीनें उपयोजून चिकित्सा करतोच. पण कल्पिलेल्या अवधींत गुण माल येत नाहीं. हें कां? हा शास्त्राचा दोष आहे कां? तसें शास्त्र सदोष असल्यास आजवर हें शास्त्र टिकलें नसतें. अगदीं मोजक्या हिशेबांत निदान झाल्यासच रोगी झपाझप बरा होऊं लागतो. तसें सर्वत्र म्हणजे प्रत्येक रोगांत करतां येत नसावें, म्हणून रोग बरा करण्यास कालावधि लागतो.

अलिखित योगांचा संग्रह

तेंच उलटपक्षीं आम्ही पाहातो कीं, निदानज्ञान नाहीं, अक्षरज्ञानहि नाहीं, असे कांहीं लोक अत्यंत आश्चर्यकारक वेगानें, अत्यंत थोड्या अवधींत कांहीं रोग बरे करतात. असें म्हटल्यावर आम्ही इतके कष्ट सोसून शिकण्यांत काय अर्थ आहे ! असो. एकंदरींत हा विवाद्य विषय आहे, याचा विचार करणेंची जरूरी नाहीं. असे हे अलिखित योग वैद्यांनीं समजून घेऊन त्यांचा उपयोग करून परिणामांचा अभ्यास करतां करतां त्याची उपपत्ति लावावी, असें वैद्य पटवर्धन यांनीं ठरविलें.

याकरितां असे गुप्त योग जितके शक्य होतील तितके गोळा करून, एकत्र जोडून, पुस्तकरूपांत वैद्यांना द्यावयाचे. असे अनुभविक योग जसें खेड्यापाड्यांतील कुणब्यांकडे असतात, तसेंच कांहीं कांहीं वैद्यांकडेहि बहुत वर्षांपासून अनुभवलेले औषधीयोग असतात.

संमेलनाचा दुहेरी उद्देश

तसले गुप्त योगहि मिळविणें हा एक संमेलनांत साधणारा विषय होता. आणि हा डोंगराळभाग मुबलक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाऊस पडणारा असा असल्यामुळें, आणि स्वतः हे केवळ वनस्पतिबद्दल चिकित्सा करणारे असल्यामुळें, आपलें वनस्पतीविषयक ज्ञान इतर ठिकाणच्या सर्व वैद्यांना मिळवून द्यावें, आपणहि त्या हेतूनें नवीन असें कांहींतरी शिकूं, अशा दुहेरी अर्थ साधेल असें जिवंत वनस्पतींचें प्रदर्शन भरवावें, असे दोन उद्देश समोर ठेवून त्यांनीं संमेलनाच्या तयारीस आरंभ केला आणि तो अत्यंत यशस्वी करून दाखविला.

संमेलनप्रसंगीं जमविलेल्या अनुभविक योगांचा एक संग्रह छापून नुकताच वैद्यांच्यासमोर ठेविला आहे. हें एक कायमचें संमेलनाचें प्रतिक सर्व वैद्यांना क्षणोक्षणीं शिरसि संमेलनाची आठवण देत आहे.

मंदगतीनेंचा वनस्पति संग्रह

बहुत वर्षांपासून यांना वनस्पतींचा शोक असल्यामुळें नवनवीन वनस्पति, मिळतील त्या ठिकाणाहून, कितीहि खर्च लागला तरी, खर्चाची पर्वा न करतां, त्या मागवून आपल्या बागेंत लावीत असत. अशानें एक जिवंत वनस्पतींचा संग्रह मंदगतीनें तयार होत होताच.

१००० वनस्पती लावल्या

तेवढ्यांत कर्नाटकांतील बऱ्याच स्नेही वैद्यांच्या आग्रहानें शिरसीला संमेलन भरविण्याची जबाबदारी अंगावर घेतल्यानंतर झपाट्यानें येथें नसलेल्या वनस्पति कोणत्या त्यांची एक यादी बनवून, शक्य तितके प्रयत्न करून, शक्य तितक्या जास्त वनस्पति लावण्याचा उद्योग सुरूं केला. १९३७-३८-३९ अशीं अखंड तीन वर्षें वनस्पतींचा संग्रह करून त्यांनीं १०००ची संख्या पूर्ण केली.

आयुर्वेद सेवा संघ-नासिकचीं सर्व शास्त्रोक्त अनुभविक औषधें, तसेंच आयुर्वेद पत्रिकेचे अंक आमचेकडे मिळूं शकतील.

धातुवर्धक कंदर्प-वृष्य-पाक टकलावर भ. भृंगराज तेल शक्तिवर्धक अगस्तिप्राश हीं व अशींच नवीन नवीन औषधें वापरा. विशेष माहितीकरितां एकवेळ भेट द्या.

दि सूर्यकिरण फार्मसी लि.

१७३ गिरगांवरोड, मुंबई ४

४ भाषेंत लेबलें लावलीं

संमेलनाच्या वेळीं प्रत्येक वनस्पतीला येथील प्रचलित भाषेंत म्हणजे कन्नड-मराठी-संस्कृत आणि लॅटिन अशा चार भाषेंत नांवें लिहून त्याखालीं त्यांना अवगत असलेले गुणधर्म लिहिलेलीं लेबलें लावून ठेविलीं होतीं.

प्रत्येकाला एक नोटबुक दिलें

लिहिलेल्या माहितीपेक्षां जास्तीची माहिती नांवांत, गुणधर्मांत माहीत असल्यास वैद्यप्रतिनिधींनी लिहून द्यावी, अशी विनवणी प्रत्येक प्रतिनिधीला करून, लिहिण्याच्या साधनाची अडचण भासूं नये म्हणून प्रत्येक प्रतिनिधीला एक छापील नोटबुक दिलें होतें. माहिती कशी भरावी याबद्दल सविस्तर मार्गदर्शन प्रत्येक नोटबुकावर छापलें होतें.

पण एकहि बुक परत मिळालें नाहीं

इतकें करूनहि त्यांतून आमचे हातीं परत एकहि नोटबुक आलें नाहीं; यावरून स्पष्ट अर्थ होतो कीं, आजच्या काळांत कोणासहि श्रम करणें नको आहे. सर्व कांहीं आयतें घडावें. अशा मनस्थितीचे विद्वान् असेतोंवर संशोधन अशक्य आहे. असो.

११९४ योगांचा अनुभूत योग संग्रह

संमेलनांत गोळा केलेले तसेंच खेडोपाडी कुणबी लोकांचे मिळून ९७२ योग खास अनुभविलेले, तसेंच रा. नीळकंठरावाचे एकेरी वनस्पतींचे २२२ योग मिळून ११९४ योगांचा "अनुभूत-योग-संग्रह" नांवाचा ग्रंथ त्यांच्या चिरंजीवांनीं (आयुर्वेदतीर्थ ग. नी. पटवर्धन) छापून १९४८ मध्यें कानडीमध्यें प्रसिद्ध केला. १९३९ मध्यें संमेलन भरलें. त्यानंतर पैशाचे अभावीं तो ग्रंथ ९ वर्षेंपर्यंत छापणें शक्य झालें नाहीं.

सध्यां त्यांच्या बागेंत ४९० जिवंत वनस्पति आहेत. त्यांच्याकडे असलेल्या जिवंत वनस्पतींची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…ती व त्यांच्या जिल्ह्यांत मिळणाऱ्या वनस्पतींची …, अशा अलग अलग दोन याद्या उपलब्ध लॅटिन, …, मराठी आणि कन्नड अशा चार भाषेत लिहून …र करण्याचें काम चालूं आहे.

औषधी बागेला जागा अपुरी

…यांच्या मालकीची जागा केवळ पांचच एकर …. त्यांत घराची इमारत, दवाखाना, इतर उपयोगी …मोठ्या तीन इमारती, फुलबाग, फळबाग या …ना जागा वांटून गेल्यानंतर उरलेली जागा या …स्पतींच्या बागेस फारच अपुरी आहे. करितां कमींत …े २५ एकर जागा गांवाशेजारीं मिळाल्यास कायम …ाचें, एक मोठें, कारवार जिल्ह्यांतील एकंदर सर्व …स्पतींचें, उद्यान तयार करावें, असा त्यांचा मनोदय …नीं त्या संमेलनांत प्रगट केला.

त्यावेळीं दिवंगत प्रसिद्ध कॉंग्रेस कार्यकर्ते हण…त कौलजगी हे स्वतः इकडे येऊन बागेच्या …साठीं सरकारकडे मागणी कशी करावी, मागणी …पूर्वी कोणकोणते विचार करावे लागतात, याची …योग्य चर्चा करून अर्ज तयार करून सरकारकडे …ना केला.

बागेची सविस्तर योजना

बागेंत आधीं एक विहीर, पाणी संग्रहास टाकी, …ना राहाण्यास क्वार्टरस्, गार्डनसंबंधीं कागदपत्रें …साठीं, आलेगेलेल्यांना उठण्याबसण्यासाठीं, वन…तींचे सुकलेले नमुने राखून ठेवण्यासाठीं, ग्रंथसंग्र…हा, ऑफिसकरतां मिळून एक रावीव इमारत. …भोंवतीं कंपौंड वॉल इतक्या गोष्टी साधाऱ्या …योजना त्यांत मांडली आहे.

जागा सरकारनें मोफत द्यावी

जागा सरकारनें मोफत द्यावी आणि गार्डनचा …खर्च सरकारनेंच सोसावा. त्याकरितां प्रारंभिक …१०,००० रुपये, कायम वार्षिक खर्चासाठीं …०० रुपये असा अंदाज करून तो अंदाज …ाला अर्जासोबत कळविला. अर्जांत नमूद …बरहुकूम उद्यान करण्याचें काम रा. नीलकंठराव …करणार असल्याचेंहि कळविलें होतें.

हणमंतराव कौजलगींचें प्रयत्न

दिवंगत हणमंतराव कौलजगी यांनीं हिंदुस्थानांतील एकूणएक इंग्लिश वर्तमानपत्रांतून येथील बागेसंबंधीं उत्तम आकर्षक लेख लिहिले. नीलकंठरावाचा आणि कौलजगी यांचा यापूर्वी कोणत्याहि तऱ्हेचा स्नेहसंबंध नव्हता.

संस्था कायम टिकावी यासाठीं

जिवंत हजारों वनस्पतींनीं युक्त बाग तयार झाली आणि तीहि एका साध्या धंदेवाईक वैद्याकडून, ही गोष्ट कौलजगींना फारच आश्चर्यकारक वाटून, अशी उपकारी संस्था कायम टिकवावी आणि त्याला प्रादेशिक मालकीचें स्वरूप आणावें, या कळकळीच्या उच्च हेतूनें प्रेरित होऊन, विजापूराहून आपल्याच खर्चानें शिरसीला येऊन दोन तीन दिवस राहून स्वतः अर्ज लिहून, सरकारला रवाना केलेला पाहून गेले. जाणेयेणेंचा किंवा दुसरा कोणत्याहि तऱ्हेचा खर्च त्यांनीं वैद्य पटवर्धन यांच्याकडून घेतला नाहीं.

४ वर्षांनीं सरकारचें उत्तर आलें

अर्जाची कायदेशीर चौकशी होऊन उत्तर मिळण्यास चार वर्षे लागलीं. तेवढ्यांत रा. कौलजगी स्वर्गस्थ झाले. त्यांनीं मागितलेली जागा कांहीं कडक अटीवर विकत देऊं; अशा अर्थाचें सरकारकडून उत्तर आलें. जागा फुकटांत मिळून खर्चाला पैसे मिळाल्यास मोठ्या प्रमाणांत उद्यान शक्य आहे, जागा विकत घेऊन उद्यान करणें ही अशक्यांतली गोष्ट आहे. म्हणून त्यांनीं तो विचार सोडून दिला.

उद्यान पहाण्यास येणारी मंडळी

सध्यां असलेल्या स्वरूपांतील उद्यानास १९४० सालीं चीफ कॉन्झरव्हेटर असलेले श्री. व्यास अत्यंत प्रेमळपणानें व अभ्यासू वृत्तीनें पाहून गेले. तसेंच अनेक विद्वान् वनस्पतिज्ञ येत असतात. सरकारी मोठमोठे अधिकारी येऊन गेले. १९४२ मध्यें सरकारी पब्लिसिटीचे डायरेक्टर श्री. विश्वेश्वरकर व प्रसिद्धिखात्याचे असिस्टंट डायरेक्टर श्री. दाभोळकर हेहि पण ही बाग पाहून गेले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाडवडिल वनस्पति चिकित्सक होते

या दोघांचेहि वनस्पतीवर बालपणापासून प्रेम असल्यामुळें मुद्दाम 'कौतुकानें' पाहून गेले. कारण कीं, यांचे घरीं त्यांची वाडवडिल मंडळी केवळ वनस्पति-चिकित्सा करून नांवाजलेले चिकित्सक झाले होते. हा बालपणचा संस्कार त्यांनीं आमची बाग पाहाणेंस कारणीभूत झाला.

ॲडव्हायसर नाईट यांच्याकडे शिष्टमंडळ

१९३८ मध्यें कॉन्ग्रेस मंत्रिमंडळ स्थानापन्न होऊन पुन्हां राजिनामा दिल्यानंतर स्वतः गव्हर्नर सर्वाधिकारी पाहात असे. यावेळीं गव्हर्नरनें आपल्या हाताखालीं मदतनीस सल्लागार (ॲडव्हायसर) म्हणून सर एच्. एफ्. नाईट यांना नेमून घेतले. यांचा मुक्काम सिरसीला कांहीं सरकारी तपासणीकरितां होता. त्यावेळीं आसवारिष्टावरील निर्बंधामुळें झालेले दुष्परिणाम त्यांचेपुढें निवेदन करण्यासाठीं जिल्ह्यांतील वैद्यमंडळींचें शिष्टमंडळ न्यावयाचें ठरवून त्याप्रमाणें त्यांचा प्रोग्रॅमशीर तयार करणारा व भेटीची वेळ ठरविणारा अधिकारी जिल्हा कलेक्टर असे, त्यांचेकडे रीतसर अर्ज करून बोलण्यास वेळ मिळविला. परंतु उद्यान पाहण्यास त्यांना सवड नसल्यानें, तें मात्र शक्य नाहीं असें कलेक्टरसाहेबाकडून स्पष्ट उत्तर आलें. उद्यान नाहीं पाहिलें तरी चालेल, आमच्या तक्रारी सांगण्यास वेळ मिळाला हेंच विशेष, इतकें समजून वैद्यमंडळी तेवढ्यांतच समाधान मानून उगी होती.

आयुर्वेद सेवा संघ-नासिकचीं सर्व औषधें
मुंबईंत मिळण्याचें आणखी एक नवें केंद्र

रामकृष्ण एजन्सी

३६८ बी ३७० सुपारीबाग रोड
लालबाग, मुंबई १२

* मागणी रोज वाढत आहे. *

सर नाईट यांची उद्यानास भेट

एकदांची भेटीची ठरलेली वेळ आली, ... प्रमाणें वैद्यमंडळी सर्व भेटीस गेली व ... म्हणणें पूर्ण समजावून दिलें. शेवटीं येतेवेळी ... वैद्य नीळकंठराव पटवर्धन यांनीं बहुत परिश्रमानें ... केलेल्या उद्यानाची हकीकत वैद्यमंडळीनीं ... सांगितली आणि त्यांनीं येण्याचें कबूल केलें. ... वैद्यमंडळीच्या देखत कलेक्टरसाहेबांना बोलावून ... पाहायला आपण जाणार असून तशा प्रकारें ताब... तयारी करण्यास हुकूम दिला. आणि खरोखरच ... नीळकंठराव त्यांच्याकडे जाऊन एक तास फिरून ... चिकित्सकबुद्धीनें सर्व कांहीं, माळी किती, ... मासिक खर्च काय येतो वगैरे वगैरे गोष्टी विचा... समजून घेऊन गेले. वैद्यांच्या ऐनवेळेच्या विनं... मान देऊन, उद्यान पाहण्यास एक तास खर्च ... नाईटसाहेब आले म्हणून कलेक्टर व इतर बडे अधि... यांना मनांतून फार असूया उत्पन्न झाली. असो.

एम्. एससी. च्या निबंधासाठीं

मधूनमधून सिल्व्हिकल्चरिस्ट टू दि बॉम्बे ... नमेंट हे दर तीन महिन्यांनीं एक वेळ येऊन ... विषय समजून घेऊन जात असत. अलिकडे रसा... शास्त्रज्ञांची संख्या फार मोठी झाली असून त्यां... कोणीकोणी कोणत्या तरी एखाद्या वनस्पतीं... प्रभावी द्रव्य शोधून काढण्याचा प्रयत्न करीत आहे... हें विश्लेषणकार्य कांहीं उपयोगीं पडेल किंवा ... तज्ञांची मागणी असून, मागणीबरहुकूम हे ... आहेत असें दिसून येत नाहीं. तर बी. एस्... परीक्षा पास झालेले असतात; एम्. एससी. ... पास होण्यासाठीं एखादें नवें विश्लेषण करून परीक्ष... पुढें निबंध सादर करावा लागतो. नाहींतर त्यांना ... पद्धतशीर दोन वर्षें शिकून परीक्षा द्यावी लागते.

या बागेचा उपयोग करतात

हे लोक बहुतेक विश्लेषण (ॲनॅलिसिस्) ... करितात. आरंभीं असे लोक एखादी वनस्पति ... घेतात. तशी कोणती एखादी वनस्पति निवडण्या...

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रयोग पूर्ण होईतोंवर किती वनस्पति लागेल तेवढें प्रमाण आपणास कोठें मिळेल हें नक्की घेत नाहींत. अगर आपला प्रयोग पूर्ण होईपर्यंत आवश्यक वनस्पतींचा संग्रहहि करीत नाहींत. वनस्पति अत्यंत थोड्या प्रमाणांत घेऊन करतां करतां वनस्पतीचा तुटवडा भासूं लागला मग ती कोठें व कशी मिळेल याचा शोध जातात. असे अनेक तज्ञ या उद्यानाला भेट माहिती घेऊन कृतार्थ होऊन गेले आहेत.

फक्त परीक्षेपुरता अभ्यास करतात

अलिकडे अशांची संख्याच फार आहे. हे लोक पुरते कांहींतरी शोधून निबंध परीक्षकांसमोर हजर पण अशा परीक्षा पास झालेले, आमच्या उपयोगांतल्या एखाद्या वनस्पतीचें संशोधन त्याचा विशिष्ट संशोधनखर्च द्यावयास तयार हे रसायनतज्ञ मनावर घेत नाहींत असा अनुभव आहे.

नवीन संशोधन करीत नाहींत

अशी विशेष रसायनतज्ञता मिळविल्यानंतर आपल्या पुढील आयुष्यांत नवीन कोणत्याहि संशोधन करीत नाहींत. यावरून हे असे केवळ परीक्षेपुरतेच प्रयोग करतात, त्यानंतर मिळाल्यावर कोठें शिक्षक अगर प्रोफेसरचें करीत दिवस घालवितात. अशा प्रोफेसरांनाहि नवीन प्रयोग करण्यास विनाविल्यास विनंतीला ते मान देत नाहींत.

नोकरीवाल्यांचे उद्गार

नोकरी मिळाली यापलीकडे जाऊन उगीच कां असे हे नोकरीवाले उद्गारतात. त्यामुळें तज्ञांचेविषयीं पटवर्धन मंडळी फार नाराज आहेत. रसायनशास्त्राचें साहाय्य हवें, असें वाटल्यास पैसे कमवावेत आणि मग होतकरू रसायन- नोकरीस ठेवून घेऊन आपापल्या इच्छेप्रमाणें करून घ्यावें, हा एकच उपाय आतां शक्य

वैद्यांना संशोधन कां हवें?

औषधाचें प्रमाण अत्यल्प असल्यास रोगी तें औषध आनंदानें घेण्यास कबूल होतात. तेंच मोठें प्रमाण असल्यास अगदीं आवश्यक आपत्तीच्या वेळीं तेवढें घेतील, नित्य नियमित मोठें प्रमाण घेण्यास कबूल होत नाहींत. करितां ज्या वनस्पति तोळाभर अगर त्याहून जास्त द्यावयाच्या आहेत, अशांचें रासायनिक पृथक्करण करवून त्यांतील उपयोगी अगर कार्यकारी द्रव्य तेवढेंच अलग करून ठेविल्यास त्या प्रभावी द्रव्याचें प्रमाण अत्यंत अल्प होणार व रोग्यांना सेवन करण्यासहि त्रास होणार नाहीं. हा एक विश्लेषणाचा फायदा आहे.

उत्क्लेशकारक वनस्पति

कांहीं वनस्पति अत्यंत गुणकारी असूनहि सतत सेवनानें उत्क्लेशी स्वभावामुळें मळमळ करतात आणि रोगी बहुत काल त्या घेऊं शकत नाहीं. कांहीं द्रव्यें गुणकारी असून त्या गुणाशिवाय अत्यंत तीव्र रेचक, तीव्र स्तंभक, किंवा अत्यंत उष्ण तीक्ष्ण अशीं असतात. त्या त्या द्रव्यांतील तसला एक एक दुःस्वभाव विश्लेषणानें दूर करूं शकल्यास फार मोठें कार्य होईल.

सर्व पुस्तकांतून एकच सूर

आज प्रसिद्ध असलेल्या वनस्पतीविषयक ग्रंथा-वरून नवख्या मनुष्याला तसेंच जाणत्या मनुष्याला-देखील देशी भाषेतील नांवावरून नवी इच्छित वनस्पति तपासून काढणें अत्यंत कठीण जातें. याचें कारण कीं, आजवर जे नवीन ग्रंथ निर्माण झालेले आहेत, त्या सर्वांतून एकच सूर दिसतो. म्हणजे ते सर्व मूळ कोणत्यातरी एका पुस्तकाचें भाषांतर होत. तेहि इंग्रजी पुस्तकांचीं भाषांतरें मूळ इंग्रजींतून श्री. डॉक्टर डायमॉकनें लिहिलेले.

डीमकच्या पुस्तकांत चुका

त्यानंतर अनेकानेक इंग्रजी पुस्तकें निर्माण झालीं. त्यानंतरचे एकूणएक ग्रंथकार डायमॉकच्या आधारें लिहितात. तो डायमॉक बिचारा शुद्ध इंग्रज मनुष्य. त्याला देशी भाषेतील उच्चारांतल्या खांचाखोंचा, चुका

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कशा बरें समजतील ? म्हणून त्याच्या पुस्तकांतील देशी नांवें फार चुकीचीं आहेत. त्याच पुस्तकावर आधारून नंतरचीं देशी भाषेंतील पुस्तकें लिहिलीं गेल्यामुळें पुढील सर्व पुस्तकांतून चुकांची परंपरा अखंड चालू राहिली आहे.

कानडीभाषेचे ७ प्रकार

तशा चुका दुरुस्त करून खरीं नांवें शोधून, उत्तम खरा निघंटु तयार करावा, ह्या एकाच उच्च ध्येयानें प्रेरित होऊन वैद्य पटवर्धन यांनीं ही बाग तयार केली. अशा कामीं या बागेचा उपयोग कसा करून घ्यावयाचा ? तर ही बाग पूर्ण झाल्यानंतर, प्रथम कन्नड भाषेंतील वनस्पती-तज्ञांची सभा बोलावून प्रत्येक वनस्पतीजवळ उभें राहून नांवाबद्दल चर्चा करून नांवें निश्चित करतां येतील. कर्नाटकाचे भाषेच्या किंचित् भेदानें सात भाग त्यांनीं पाडले आहेत. या सातहि भागांत कन्नडभाषाच बोलली जाते. पण प्रत्येक वनस्पतीला सात भिन्न भिन्न नांवें आहेत. त्यामुळें ज्या नांवानें एक वनस्पति कारवार जिल्ह्यांत ओळखतात तें नांव म्हैसूरांत जाऊन उच्चारल्यास, तेथील वैद्यांना अगर साध्या कुणब्याला कारवारी नांवानें निर्दिष्ट वनस्पति ओळखली जात नाहीं. तेथें म्हैसूरी कन्नड उच्चारल्यास ते चटकन् ओळखून ती वनस्पति आणून देतील. पण कारवारी लोकांना त्यांचीं म्हैसूरी नांवें अवगत नसतात. तसेंच उलट म्हैसूरी वैद्यांना कारवारी नांवें माहीत नसतात.

त्यांचा व त्यांच्या मुलांचा विचार

हा भाषेंतील नांवभेद सर्व एकत्र करून एका वनस्पतीला जितकीं नांवें ओळखण्यास साहाय्य करणारी मिळतील तितकीं एकत्र करून पूर्ण झाल्यावर त्यासमोर प्रचलित लॅटिन व जेथें शक्य तेथें संस्कृत नांवें जोडून एक कोश करावयाचा, असा त्यांचा व त्यांच्या मुलांचा विचार आहे. त्यानंतर कधीं शक्य होईल तेव्हां सचित्र ग्रंथ निर्माण करावयाचा. हा या बागेचा मोठा हेतु त्यांनीं नांवें गोळा करतांना डोळ्यासमोर ठेवला आहे. प्रत्यक्ष जिवंत वनस्पति दाखवून त्यांचीं नांवें काय असें लोकांना केव्हां विचारावयाचे तेव्हां अशा कामीं जिवंत वनस्पतिच पाहिजेत. असो, अशाप्रकारें हें उद्यान निर्माण करण्याचा हेतु आहे. कन्नड भाषेंतील कोश पूर्ण झाल्यानंतर इतर प्रांतीयांनीं सहकार केल्यास एक निश्चित सुंदर संस्कृत वनस्पति शब्दकोश बनवित येईल.

वनस्पति कोठून मागविल्या

१९३९ च्या निखिल कर्नाटक आयुर्वेद संमेलन प्रसंगीं भरविलेलें प्रदर्शन शैक्षणिक महत्वाचें असें कसें झालें, याची ओझरती कल्पना महाराष्ट्रीय वाचकांस यावी, एतदर्थ हे चार शब्द वर नमूद केले आहेत. परप्रांतीय वनस्पती खालीं नमूद केलेल्या व्यक्तीकडून अगर संस्थेकडून मागविण्यांत आल्या. (१) गव्हर्मेंट गार्डन्स्, लालबाग, बेंगलूर. (२) चरकतीर्थ श्री. दिगंबरजी वशी, कैवल्यधाम, लोणावळा. (३) श्रीमंत भाऊसाहेब लागू, शिरहट्टी, जिल्हा धारवाड. (४) विष्णु सदाशिव कंपनी, पुणें, (५) ग्लोब नर्सरी, कलकत्ता. (६) शिवाय स्वतः ग. नी. पटवर्धन यांनीं, कारवार, धारवाड, विजापूर आणि मंगळूर या चार जिल्ह्यांत फिरून वनस्पति गोळा केल्या. याकामीं त्या त्या जिल्ह्यांतील स्थानिक वैद्यांनीं रोपें मिळविण्यास फार अमूल्य मदत केली.

सुकलेले नमुने मागविले

उद्यानाचें निकटवर्ति क्षेत्रांत ज्या ज्या वनस्पतींचीं रोपें मिळालीं नाहींत, तशांचे सुकवून दाब देऊन ठेविलेले नमुने मागविले.

'आयुर्वेद सेवा' संघ नाशिकचीं सर्व
अनुभविक गुणकारी औषधें :—
अमरावती येथें मिळण्याचें ठिकाण
मे. पारणे बंधु, बडनेरारोड
अमरावती (मध्य प्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नमुने पाठविणाऱ्यांचीं नांवें

…टॅनॉमिक बॉटनिस्ट टु दि गव्हर्नमेंट ऑफ् … यांच्या हर्बेरिअममध्यें प्रेस करून ठेविलेले … स्पेसिमेन्स आहेत. त्यापैकीं पटवर्धन यांच्याकडे … निवडक १३२ स्पेसिमेन्स मागविले होते. … श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि यांना वनस्पतीं… चित्रें काढविण्याचा नाद होता. त्यांचेकडे ११० … मिळालीं. ३) श्रीधूतपापेश्वर आर्यौषधि कार… पनवेल, यांचेकडून बरेच नमुने आले होते. … हॉर्टिकल्चरिस्ट टू दी गव्हर्नमेंट ऑफ् बडोदा, … बरीच मदत केली. (५) दी पंजाब आयुर्वेदिक … अमृतसर यांचेकडून इकडील प्रांतांत न … केवळ हिमालयांतच उपलब्ध अशा कांहीं … मागविल्या होत्या. या सर्वांशीं बरेच दिवस … व्यवहार करून त्यांनीं पाठविलेले स्पेसिमेन्स … पटवर्धन यांनीं स्वखर्चानें, स्पेसिमेन्सना … धक्का पोंचणार नाहीं असे संभाळून परत … इतकी जबाबदारी घेतल्यानंतरच हे स्पेसिमेन्स … मिळूं शकले. वैद्य पटवर्धन यांनीं त्याप्रमाणें … नंतर व्यवस्थितपणें नमुने ज्यांचे त्यांना … केले. असो.

नेपाळ सरकारशीं पत्रव्यवहार

…त्यावेळीं त्यांनीं गव्हर्नमेंट बॉटनिस्ट टू दी गव्ह… ऑफ् नेपाळ यांच्याशीं बराच पत्रव्यवहार केला … निवडक ९० वनस्पतींचीं रोपें पाठविण्यास … ५००० रुपये मागितले, म्हणून तो नाद त्यांना … लागला.

सिलोनचीं रोपें स्वस्त

…गव्हर्नमेंट बॉटनिकल् गार्डन्स्, पेरेडीनिया, सिलोन … वनस्पतींचीं रोपें मिळतात. वाटेल तितकीं … अत्यंत स्वस्त दरानें म्हणजे चार आण्यापासून … आण्यापर्यंत प्रत्येकीं किंमत आहे. त्यांचे इतका … बॉटनिकल गार्डन हिंदुस्थानांत कोठेंहि नाहीं. … वनस्पति मिळतात. त्यांचा कॅटलॉग मागविला … परंतु रोपें मागविणें मुळींच शक्य झालें नाहीं. त्याबाबत त्यांनीं फारच खटपट केली, परंतु शक्य झालें नाहीं. कारण कीं, सर्व सरकारी व्यवहार सामान्य पद्धतीचा नसतो. त्यांचे पैसे आगाऊ ट्रेझरींत ड्राफ्ट पाठवून ऑर्डर द्यावी लागते. त्यांतून सिलोनचें नाणें वेगळें असल्यामुळें त्यांनीं अगोदरच कोणा एका प्रसिद्ध सरकारमान्य, सिलोनमधें स्थायी असणाऱ्या एजंटामार्फत पैशाचा व्यवहार करा असें कळविलें होतें. तसा एजंट त्यांना भेटला नाहीं. म्हणून हिंदसरकार मार्फत सीलोनसरकारशीं व्यवहार चालूं करूं या इरायानें इंडिअन गव्हर्नमेंटशीं त्याबाबत बराच पत्रव्यवहार केला, पण दाद लागेना म्हणून ते निराश झाले. आजहि असा कोणी एजंट भेटल्यास त्यांची सीलोनहून वनस्पति मागविण्याची इच्छा आहे.

डेराडूनची फॉरेस्ट रीचर्स इन्स्टिटयूट

डेहराडूनला एकमेवाद्वितीयम् अशी एक मोठी फॉरेस्ट रीसर्च इन्स्टिटयूट आहे. त्याला जोडूनच अत्यंत मोठा गार्डन आहे, पण त्याचा वैद्यांना कांहीं उपयोग नाहीं. ते वनस्पतींचीं रोपें अगर बीं देत नाहींत. अशा सरकारी खर्चानें चालणाऱ्या उद्यानाचा जर जनतेला उपयोग होत नाहीं, तर असे गार्डन्स् असूनहि निरुपयोगीच. याबाबत सर्व वैद्यांनीं अगर त्यांच्या संस्था-चालकांनीं मिळून सरकारदरबारीं तक्रार मांडून सामान्य जनतेला रोपें व बी अशा सरकारी उद्यानांतून मिळण्याची सोय करून घ्यावी. अशा प्रकारची चळवळ वैद्यलोकांकडून व्हावयास पाहिजे.

नॅशनल प्लॅनीग कमेटीचा रिपोर्ट

सेंट्रल गव्हर्नमेंटनें जो एक नॅशनल प्लॅनिंग रिपोर्ट तयार केलेला आहे, त्यांत वैद्य नीळकंठराव पटवर्धन यांचें नांव दाखल झालेलें असून, त्यांचे प्रयत्नाबद्दल रिपोर्ट लिहिणाऱ्यांनीं धन्यवाद दिले आहेत. या रिपोर्टांत यांचें नांव दाखल झालेलें त्यांनाहि माहीत नव्हतें. तो रिपोर्ट वाचून नंतर भेटील आलेल्या लोकांकडून, तसेंच त्या आधारें आलेल्या पत्रांवरून त्यांना तें समजलें.

—S—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

॥ श्रीधन्वंतरिस्तोत्रम् ॥

धन्वंतरीची मूर्ति कशी असावी या विषयावर अनेक वाद आजवर झाले असून शेवटीं नक्की निर्णय न लागतां ज्यांनीं त्यांनीं आपआपल्या कल्पनेनुसार मूर्ति बनविल्या आहेत. तसेच आमचाहि एक प्रकार आहे. उडुपी अष्टमठापैकीं वादिराजमठ हा एक असून त्या मठाचे स्वामी आयुर्वेदप्रेमी व स्वतः काहीं धर्मार्थ चिकित्सा उत्तम रीतीनें करीत असत. त्यांनीं 'शीतांशुमंडलगत' मूर्ति असणें योग्य असें सांगून त्याप्रमाणें आमचेकडून तशी मूर्ति बनवून घेतली. त्याचा नमुना बाजूस दिला आहे. व त्याला आधार श्लोक त्यांनीं दिला आहे तो असाः—

चंद्रौघकांतिममृतात्मकरैः जगंति संजीवयंतममृतात्मसुखं परेशम्।
ज्ञानं सुधाकलशमेव च संदधानं शीतांशुमंडलगतं स्मरतात्मसंस्थम् ॥१॥
मूर्ध्नि स्थितादमुत एव सुधां स्रवंतीं भ्रूमध्यगाच्च तत एव च तालुसंस्थात्।
हार्दाच्च नाभिसदनादधरस्थिताच्च, ध्यात्वाभिपूरिततनुर्दुरितानि हन्यात् ॥२॥
अज्ञानरोगभयदुःखमहाविषाणि, योगोयमाशु विनिहंति सुखं च दद्यात्।
उन्मादविभ्रमहरः परतश्च सांद्रः स्वानंदमेव पदमापयति स्म नित्यम् ॥३॥
ध्यात्वैव हस्ततलगं स्वमृतं स्रवंतं देवं स यस्य शिरसि स्वकरं निधाय।
आवर्तयेन्मनुमिमं स च वीतरोगः पापादपैति मनसा यदि भक्तिनम्रः ॥४॥

दुग्धालय संशोधन संस्था, बंगलोर

केवळ भात व इतर धान्यें खाणाऱ्या (शाकाहारी) लोकांनीं रोज १। पावशेर दूध अवश्य प्यालें पाहिजे असा शोध बंगलोर येथील वरील संस्थेनें लावला आहे.

या संस्थेचें आवार १०७ एकराचें आहे व येथें ४५० दुभती जनावरें आहेत.

वालावल येथें सिलिका

रत्नागिरी जिल्ह्यांत वालावल येथें सिलिका दगडांचा प्रचंड (१०० वर्षें काढून संपणार नाहीं असा) सांठा आहे. याची पूड करून मुंबईस पाठविण्यांत येते. मठ येथें सिलिका रेतीपासून सोडियम सिलिकेट व हरतऱ्हेचा उत्तम साबण बनविण्याचा कारखाना आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

च्यवनप्राश कोणी घ्यावा ? व कोणी घेऊं नये ?

(लेखक:- वैद्य नीळकंठराव पटवर्धन, शिरसी)

च्यवनप्राश हें औषध केवळ म्हाताऱ्यांनाच उपयोगी आहे. हा योग म्हाताऱ्या, च्यवनऋषींसाठी तयार झाला. त्याच्या सेवनानें त्यास चांगला उपयोग झाला ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. म्हणून म्हातारपणीं होणाऱ्या अशक्ततेवर मात्र च्यवन उपयोगी आहे, इतर कोणत्याहि तऱ्हेच्या अशक्ततेवर च्यवनाचा उपयोग होत नाहीं. म्हातारपणीं ज्या तऱ्हेची झालेली असते, तशा प्रकारची झीज भरून काढण्याची शक्ति च्यवनांत आहे. असें हें म्हातारपणाची न्यूनता भरून काढणारें औषध तरुणांना मुळींच उपयोगी नाहीं. ही गोष्ट वैद्यांनीं पक्की लक्षांत ठेवावी.

तरुणांना च्यवनप्राश उपयोगी नाहीं

शिशु, बाल, तरुण, मध्यवयस्क आणि वृद्ध. यांत दोन प्रकार— तरुण, तरुणी. अशा इतक्या प्रकारांत बलवर्धक चिकित्सा ही वेगवेगळीच राहाणार. हें सत्य आहे आणि ही गोष्ट सर्व वैद्यांना मान्य आहे; त्याच दृष्टीनें पाहिल्यास म्हाताऱ्या च्यवनासाठीं केलेला योग, च्यवनप्राशावलेह, हा केवळ म्हाताऱ्यांवर प्रभाव दाखविणारा असा आहे, हा विचार व वृष्य औषधें बल्यार्थ शिशूंना उपयोजिल्यास काय होईल ? या दोन सूत्रांचा मनःपूर्वक विचार व मनन करीत गेल्यास चिकित्सेंतील नवनवीन फलदायी असे विचार सुचत जातील. याच गोष्टीचें उलट रीतीनें परीक्षण करून पाहिल्यास पटेल कीं, तरुणांना च्यवनप्राश उपयोगी नाहीं. आजवर च्यवनप्राश घेतलेल्या तरुणांचें चित्र मनांत आणा व त्यांना कितपत बल्य असें त्याचें कार्य घडलें हें समजून घ्या म्हणजे स्वतःला यांतील तत्व समजेल.

म्हाताऱ्या लोकांना च्यवनप्राश उपयुक्त

आमच्या अनुभवाप्रमाणें आवळा म्हाताऱ्यामध्यें उत्पन्न होणाऱ्या एकंदर विकारांवर उपयोगी आहे. त्या अवस्थेंतील क्षीणता त्यानें नाहींशी होते. वयोमानाप्रमाणें झालेल्या सर्व उणीवा एका आवळ्यानें भरून येतात, आणि तसें झालें म्हणजे ते तरुणवत् सर्वबलसंपन्न होतात. म्हाताऱ्यांना येणाऱ्या घेरीवर आमलकीचा जादूप्रमाणें उपयोग होतो. यांच्या अशक्ततेवर च्यवनप्राश आरंभ केल्यावर, केल्या दिवसापासून गुण अनुभवास येतो.

आमलकीनें तरुणांना बद्धकोष्ठ

आमलकी तरुणांत बद्धकोष्ठ करील तर म्हाताऱ्याश सारक होईल. इतका मोठा फरक प्रत्यक्ष अनुभवाला येण्याजोगा आहे. कोणीहि याचा अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी.

च्यवनप्राशाचें रसायनकार्य

वैद्यानें तरुणांना च्यवनप्राश घेण्यास सल्ला देऊं नये. कांहीं वैद्य आपल्या अनुभवांत च्यवनप्राशाचा गुण आलेला आहे असें सिद्ध करण्यासहि तयार असतील, पण तत्पूर्वी च्यवनप्राशांत आवळ्याशिवाय जीं इतर द्रव्यें बिल्वाग्निमंथादि आहेत, त्या द्रव्यापासून घडणारीं कार्ये मात्र झालेलीं दिसतील, शिवाय च्यवनप्राशाचें जें मुख्य रसायनकार्य आहे तेंहि दिसेल. द्रव्याच्या तशा कार्याला च्यवनोक्त कार्य म्हणतां येणार नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

च्यवनप्राशासाठीं चैत्रांतील आवळे घ्यावेत

च्यवनप्राशासाठीं आम्ही चैत्रांतले आवळे चांगले समजतो. आणि चैत्रामलकच शोधून आणून वापरतो. चैत्रांतील आवळयांत, आवळयाला आवश्यक असे सर्व गुण उतरलेले म्हणजेच पूर्ण परिपक्वावस्था येते. चैत्रांतल्या आवळयापासून सरस गुण नजरेस येतो, तेच इतर महिन्यांतल्या आवळयापासून सरस गुण येत नाहीं. हा फरक अनुभवानें सिद्ध झाला आहे. च. चि. अ. १ पहा. भेषजं द्विविधं च तत् ।
स्वस्थस्य ओजस्करं किंचित् किंचित् आर्तस्य रोगनुत् ।
स्वस्थस्य ओजस्करं यत्तु तद् वृष्यं तद्रसायनम् ।
समर्थानां अरोगाणां धीमतां नियतात्मनाम् ।
यथा स्थूलमनिर्वाह्य दोषान् शारीरमानसान् ।
रसायनगुणैः जन्तुः युज्यते न कदाचन ।
मनःशरीरशुद्धानां सिध्यंति ।

चरकसंहितेंत चिकित्सास्थानचे आरंभींच रसायनविधि सांगितलेला आहे. त्या प्रकरणांत त्यांनीं रसायनविधींचे प्रकार आणि कशा व्यक्तींनें रसायन औषधें घ्यावी याचें सविस्तर वर्णन केलेलें आहे. एकंदर औषधीजगताचे मुख्य दोन प्रकार पाडले ते असे— (१) ओजस्कर औषधें व (२) रोगनिवारक औषधें. ओजस्कर म्हणजेच रसायन औषधें. हीं निरोगावस्थांतच उपयोजावींत. निरोगी मनुष्यानेंच रसायन औषधें घ्यावींत. त्या त्या द्रव्यांतील रसायनगुण संपूर्णतः निरोगी माणसालाच शोषण करून घेण्याची योग्यता असते. निरोग्यालाच रसायन औषधें द्यावींत, इतकें निक्षून आचार्यांनें याबाबतींत सांगितलेलें आहे.

सर्वांना रसायनें देऊं नयेत

करितां उठल्यासुटल्या रसायन औषधें उपलब्ध आहेत म्हणून देऊं नयेत. चुकून दिलें गेल्यास त्याचा इष्ट परिणाम तर दिसत नाहींच, उलट इष्ट परिणाम दिसला नाहीं म्हणजे वैद्यांच्या अज्ञानामुळें शास्त्राची अवहेलना मात्र लोक करतात.

आपणाकडे अमूक आहे तमूक आहे, आपण वाटेल तें करूं शकूं, अशा अंध घमेंडींतच बहुतेक वैद्य असतात. या अंध वृत्तीनें शास्त्राचें महत्व कमी होत आहे. टीका करणारे पाश्चात्य चिकित्सकांना उलट्या बोंबा मारण्यास चांगले आधारभूत आम्ही वैद्यच होतो, हे वैद्यांनीं लक्षांत ठेवावें. आमच्या चुकीनेंच आम्ही आमच्या पायावर दगड घालून घेतो.

रसायनांचा अस्थानीं उपयोग

वैद्यलोक अशा अपक्व ज्ञानानें रसायनें अस्थानी उपयोजून त्यामुळें हमखास गुण मिळत नाहीं, तेव्हां हें असें कां झालें याचा विचार करीत नाहीत, म्हणून वैद्यामध्यें प्रगति दिसत नाहीं.

त्यांत कांहीं धाष्टर्यस्वभावी वैद्य आहेतच, ते खास आपल्यापरीनें विचार करून ठरवितात कीं आतांच्या काळांतील औषधामध्यें निःसत्वपणा आलेला आहे त्यामुळें गुण नाहीं. चरकांचे काळीं सर्व वनस्पती इष्टगुणसंपन्न असत. आतांचे काळीं चतुर्थांशहि गुण त्यांत मिळत नाहीं. म्हणून रसायनकार्य घडलेलें दिसत नसावें. अशा विचारानें या गोष्टीचा अर्थ लावून स्वस्थ बसतात. आपण योजक वैद्यच योजनेंत चुकतो, हें त्यांना मान्य नसतें. असो.

निरोगी कोण ?

एकंदर निर्णय इतकाच कीं, काळ बदलला तरी औषधी द्रव्यांतील कार्यकारीगुण मुळींच कमी झालेला नाहीं. निरोगी माणूस कोण हें पक्कें निवडून घेणें ही महत्वाची बाब आहे. निरोगी कोण हें जाणणारा आजच्या वैद्यक जगांत शेंकडोंवारी तर नाहींच, पण दहा हजार वैद्यांत एक समर्थ वैद्य असूं शकेल.

गुणांत सरस ठरलेलीं ' आयुर्वेद सेवा संघाचीं ' अनुभविक औषधें व पुस्तकें मिळण्याचें ठिकाण—

मे. पंडित बंधु
औषधांचे प्रमुख व्यापारी
पो. सटाणा (नाशिक)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांच्या अल्प प्रमाणांत अशा तज्ञांची संख्या आहे.

पूर्ण तज्ञता अंगीं आणावी.

म्हणून करितां कोणी वैद्यानें पूर्ण तज्ञता आल्याखेरीज रसायनांचा उपयोग करूं नये. तज्ञता दोन तऱ्हेची असावी, ती अशी-- 'रोगस्तु दोषवैषम्यं दोषसाम्य-मरोगता।' हें समजून घेण्याची कला शिकणें, नंतर रोग्याचें प्रकृतिमान ओळखून त्या प्रकृतीला योग्यसें रसायनद्रव्य शोधणें. कुटिप्रावेशिक रसायन सेवन करणारा निरोगी असलाच पाहिजे. करितां निरोगीपणा राखण्याची कला शिकावयास हवी.

वातातपिक रसायनें

जे कायम रोगीजन असतात, किंवा त्यांच्या सामानपरत्वें पूर्ण बलवर्धक द्रव्यें त्यांचे रोजचे आहारांत नसतात अशामुळें अशक्त झालेल्यांना अतिकामाची ओढ पडून त्यामुळें फार अशक्त झालेल्यांना अतिस्त्रीसंभोगानें, अतिवाचनानें अशक्त झालेल्यांना वातातपिक रसायनें सांगितलीं आहेत.

पहिला गट

हे लोक कसे असतात तें पहाः- या अशा लोकांत अवयवांची वाढ पूर्ण जशी व्हावी तशी झालेली असून नंतर अतिवाचन, अतिश्रम, अतिसंभोग किंवा अल्पसत्वी आहारसेवन, जागरण, रूक्ष आहारसेवन इत्यादीनें अशक्त बनलेले असतात. मूळ शरीरवृद्धि चांगली असून नंतर कालांतरानें घडलेल्या कारणानें अशक्त झाले-ल्यांचा एक गट आपण अलग केला पाहिजे. यांना वातातपिक रसायनें प्रकृतिमान पाहून प्रकृतीला इष्ट असे द्रव्यें शोधून द्यावींत.

दुसरा गट

दुसरा गटः- आईबापाच्या दोषांमुळें उपजते-वेळींच हे लोक अपूर्ण धातूचे असतात. अशांना योजलीं जाणारीं औषधें हीं स्वतंत्र आहेत. यांच्यांतील अपूर्ण वाढ हा दोष ओळखतां आला पाहिजे.

तिसरा गट

तिसरा गटः- कांहीं लोक जुनाट रोगानें पीडित होऊन तो रोगहि बरा होत नसतो व शक्ति वाढत नसते अशांचा. अशा दीर्घकालीन व्याधिपीडितासाठीं कांहीं रसायन औषधें आहेत. तीं उपयोजतांनाहि स्थूल-मानांत, रोगभाग इतर औषधानें बरे करून, इतर मिश्र-दोष नाहींत ही खात्री करून नंतरच त्या रोगाला व त्याच्या प्रकृतीला योग्य तें औषध निवडून त्या औष-धाचा दीर्घकाल उपयोग केल्यास उत्तम गुण मिळतोच.

अशा प्रकारें समजुतीनें रसायनद्रव्यांचा उपयोग करणेस शिकावें, म्हणजे निश्चित गुण मिळतो यांत शंका नाहीं.

आमच्या अनुभवाचे बोल

आतां स्थूलमानानें व्यवहारांत वापरल्या जाणाऱ्या द्रव्यांचें कार्यकारित्व किती आहे, त्यांच्या वापरांत कसकशी चूक होते याचें सामान्य दिग्दर्शन वर केलें आहे. यावरून तारतम्यता जाणून वैद्यलोक वाटेल तितकी ज्ञानवाढ करूं शकतील. सूत्रमय चार आमच्या अनुभवाचे बोल लक्षांत ठेवून व्यवहार करूं लागल्यास एकएक नवनवे विचारांना चालना मिळेल.

आयुर्वेद पत्रिकेनें प्रकाशित केलेले विशेषांक

१ प्राणाचार्य देवधर विशेषांक किं. १ रु.
२ प्राणाचार्य ऐनापुरे „ „ १ रु.
३ वै. आप्पाशास्त्री साठे „ „ १ रु.
४ वै. त्र्यंबकशास्त्री (काशी) „ „ १ रु.

हे चार विशेषांक प्रत्येक चिकित्सक वैद्यानें आपल्या संग्रहीं अवश्य ठेवावेत व व्यवसायांत हरघडी त्यांचा सल्ला घ्यावा. आपल्या संग्रहीं नसल्यास आजच ॲडव्हान्स पाठवून मागणी करा. (ट. ख. वेगळा.)

फारच थोड्या प्रति शिल्लक आहेत. मागाहून मिळणार नाहींत.

वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एका वृद्ध गृहस्थांचा मूत्राघात

(लेखकः– वैद्य ग. नी. पटवर्धन, आयुर्वेदतीर्थ)

निदान व्यवस्थित झाल्यास रोग बरा होण्यास मुळींच अवधि लागत नाहीं आणि औषधेंहि फार लागत नाहींत, असें त्यांचें मत आहे. उदाहरणार्थ त्यांच्या एका रोग्याची हकिकत येथें देत आहे.

एकाएकी लघवी बंद

रोगीः–एक म्हातारे गृहस्थ, वय ७२वर्षें, एकाएकीं त्यांची लघवी बंद झाली, त्यावर कांहीं घरगुती उपचार झाले. ते जमले नाहींत म्हणून पाश्चात्य विद्वानाकडे नेण्यांत आलें. त्यांनीं एनिमा दिला, कॅथेटर पास केला. कॅथेटर घालण्यास फार त्रास झाला. पण लघवीचा थेंबहि बाहेर येईना. लघवीची उत्पत्तिच नसावी, म्हणून त्याकरितां पोटांत औषधें व इंजेक्शनें दिलीं. कांहीं उपयोग झाला नाहीं. या परिस्थितींत त्या डॉक्टरानें आपल्या एकट्याच्यानें जमणार नाहीं म्हणून दुसऱ्या डॉक्टराची मदत घेतली. परंतु या दोघांकडूनहि जमलें नाहीं.

सरकारी दवाखान्यांत दाखल

शेवटीं त्यांना सरकारी दवाखान्यांत दाखल करण्यांत आलें. तेथें रोज दिवसांतून तीन वेळां कढत पाण्याचा एनिमा देणें, पोटांतून औषधें इत्यादि अनेक शक्य ते सर्व उपाय केले. कॅथेटर कायमचाच आंत घालून ठेविला होता. एखाद थेंब लघवी तयार झाली, तरी ती बाहेर पडावी म्हणून ही योजना होती. पण कांहीं करून लघवी होईना. अशा प्रकारें लघवी न होतां १५ दिवस उलटून गेले. त्यामुळें लघवीचें विषार आंत सांठून, सर्वांग सुजून डोळे पूर्ण झांकले गेले. शेवटीं प्रोस्टेटचें ऑपरेशन करावयाचें इतकें ठरून, तत्पूर्वीं ब्लडप्रेशर घेतलें गेलें. ते कल्पनेपेक्षां कितीतरी पटीनें वाढलेलें होतें. एतदर्थ ऑपरेशनचा विचार तहकूब करावा लागला.

आयुर्वेदीय उपचारानें ८ तासांत लघवी

शेवटीं वैद्यांचे इलाज करून पहा, असें डॉक्टरांचें म्हणणें पडलें. त्यावेळीं वैद्य पटवर्धन यांना बोलावणें आलें. वैद्य पटवर्धन यांनीं तपासून उपचारासाठीं फक्त २४ तासांचा अवधि मागितला. म्हणजे २४ तासांत याला लघवी झाली नाहीं, तर पुढें आपण प्रयत्न करणार नाहीं, इतकें सांगून इलाज केला. एक गोष्ट सांगावयाची राहिली ती ही कीं, रोजीं तीन तीन वेळां एनिमा देऊनहि शौचाला मुळींच होत नसे. वैद्य पटवर्धनांचे इलाज सुरूं केल्यावर बरोबर ८ तासांत खूप लघवीला झाली. परसाकडेहि साफ झाली. त्यानंतर आठ दिवसांत रोगी पूर्ण बरा झाला.

अम्लपित्त व विलोम वात

हा रोग लघवीचा नसून शुद्ध अम्लपित्त व तज्जन्य वाताची विलोमावस्था याचा होता. वैद्य अम्लपित्ताची चिकित्सा केली, ती अगदीं योग्य होती म्हणून केवळ आठ तासांत लघवी झाली.

चुन्याचे कल्प वापरीत नाहींत

ते अम्लपित्ताच्या रोगांत चुन्याचे कल्प कधीं वापरीत नाहींत. चुन्याचे कल्पानें लवकर व शाश्वत गुण मिळत नाहीं. त्यामुळें कामदुधा वगैरे योग कधीं करीत नाहींत.

पांढरें कोड

हजारोंचे गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेले आणि अनेक बक्षिसे मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु.

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो. असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन', मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असाध्य लिव्हर सिरोसिस [यकृद्दाल्युदर] चा रुग्ण आयुर्वेदीय चिकित्सेनें पूर्ण बरा झाला.

(लेखकः-डॉ. अनंतराव नी. पटवर्धन एम्. बी. बी. एस्.)

रोगी:- 'क्ष' जात ब्राम्हंण, वय ४८ वर्षें, शाकाहारी, धंदा पी. डब्ल्यु. डी. खात्यांत ... वरील गृहस्थानें सरकारी दवाखान्यांत औट-डोअर पेशंट म्हणून सुमारें ३ महिने ॲलोपॅथिक औषधोपचार घेतले. परंतु कांहीं गुण आला नाहीं असें ... आल्यामुळें त्यांना सदर सरकारी दवाखान्यांत इन-डोअर पेशंट म्हणून तेथील डॉक्टरानें दाखल ... घेतलें. ही गोष्ट १९४८ मधील आहे.

पुढें असाध्य जलोदर झालें

रोगनिदान यकृल्युद्दादर म्हणून झालें. शक्य ... उपचार केले गेले. परंतु कांहीं गुण न येतां ... जलोदर व्हावयास लागलें. मूत्रल औषधें ... अगर मार्साॅलिब इंजेक्शन्स् देऊनहि जलोदर ... शक्ति कायम राहण्याकरितां लिव्हर एक्स्ट्रॅक्टचीं ... 'बी' कॉंप्लेक्सचीं इंजेक्शनें दिलीं जात असत. ... दुधाचा व फळांचा होता. परंतु ही सर्व ... निष्प्रभ ठरून अखेर दवाखान्यांतील प्रमुख ... 'टॅपिंग' (पोटांतून शस्त्रकर्मानें पाणी काढणें) शिवाय अन्य मार्ग उरला नाहीं. या-... रुग्णाचें पोटांतून चार वेळां टॅपिंग करून ... काढलें. परंतु रोगी बरा होईना, सर्व उपाय ... (म्हणून असाध्य) रुग्ण (होपलेस केस) असा ... आफिसर डॉक्टरचा शिक्कामोर्तब त्यावर झाला.

...सरकारी दवाखान्यांत आयुर्वेदीय उपचार

दरम्यान रुग्णास कोणीतरी माझे वडील नीळ-... पटवर्धन यांचे सल्ल्यानुसार आयुर्वेदिक औषधोपचार करून पाहाण्यास सांगितलें. रोग्याची ... सरकारी दवाखान्यांतच डॉक्टरच्या देखरेखी-... आयुर्वेदिक औषधोपचार करून घेण्याची ... त्यास अनुसरून मेडिकल ऑफिसरची पर-वानगी मिळविण्यांत आली. मात्र एक अट घालण्यांत आली ती अशी कीं, आयुर्वेदिक प्रत्येक औषधांतील द्रव्यें (रोग्यास दिलेलीं) डॉक्टरला माहित करून दिलीं पाहिजेत. माझ्या वडिलांनींहि सदर गोष्टीस

लेखक

मान्यता देऊन आपलीं चिकित्सापत्रकें फक्त डॉक्टरला देण्याचें कबूल केलें.

आयुर्वेदीय औषधी योजना

खालीलप्रमाणें औषधी योजना करण्यांत आली व रोग्यास डॉक्टरचे देखरेखीखालींच ठेवण्यांत आलें.

देवदारु १/४ तोळा, हिरडा १/४ तोळा.

ह्या जिनसा गोमूत्रांत उगाळून नंतर ४ औंस गोमूत्रांत कालवावयाच्या.

नंतर त्यांत आरोग्यवर्धिनी ४ गुंजा मिळवून तें मिश्रण सकाळीं ७ वाजतां अनशनपोटीं घ्यावयाचें. व नंतर संध्याकाळीं ६ वाजतां तेंच मिश्रण फिरून घ्यावयाचें.

जीर्ण मलेरियाचा अनुबंध

पुनर्नवासव ३/४ औंस व महासुदर्शनचूर्ण चहाचा एक चमचा घेऊन २ औंस गोमूत्रांत मिळवून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुपारीं १२ वाजतां एकदां व रात्रीं ८ वाजतां एकदां असें दोन वेळ घ्यावयाचें. जीर्ण मलेरियाचा पूर्वानुसंबंध असल्यामुळें महासुदर्शनचूर्णाची चिकित्सेंत योजना केली होती.

पथ्यकर आहार व संस्कृत पाणी

२० औंस दूध सकाळ, दुपार व संध्याकाळ मिळून विभागून घेणें. मीठ अजिबात वर्ज्य. दिवसांतून जास्तींतजास्त २० तोळे पाणी व तेंहि जिरे घालून उकळून संस्कारित केलेलें.

पहिल्याच दिवशीं लघवी साफ झाली

औषधोपचाराच्या पाहिल्याच दिवशीं रुग्णास लघवीला साफ झाली, व शौचासहि मोकळे झालें. एक आठवड्याच्या अवधींत उदरांतील (पोटांतील) पाणी निचरून गेलें व नवीन पाण्याची उत्पत्ति झाली नाहीं. एक महिन्यांत रोगी संपूर्णतः जलोदरमुक्त झाला. परंतु रोग्यास त्यानंतरहि ६ महिनेपर्यंत औषधोपचार व पथ्यपाण्याखालीं ठेविलें होतें.

सहा महिन्यानंतर ते गृहस्थ फिरून नोकरीवर रुजू झाले, व २ वर्षें नोकरी करून नंतर त्यांनीं पेन्शन घेतलें.

कफसंसर्ग नव्हता म्हणून

या रोग्यांत कफसंसर्ग (कफानुबंध) नसल्यानें इतक्या लवकर आराम पडला, असें माझ्या वडिलांनीं आपलें मत व्यक्त केलें.

उपरिनिर्दिष्ट केसमधील वैशिष्ट्यें

(१) माझ्या वडिलांनीं रुग्णाची शरीरतः तपासणी केली नाहीं. मेडिकल ऑफिसरनीं दिलेल्या रिपोर्टावरून व रोगलक्षणांवरून त्यांनीं चिकित्सा पत्रक लिहून दिलें. ह्या गोष्टीचें मला फारच आश्चर्य वाटलें, कारण कीं, मी एकतर मेडिकल कॉलेजमधून पास होऊन आलेला नवीनच डॉक्टर होतो व कॉलेजमधील मोठमोठाले विद्वान् डॉक्टर्स असल्या केसीस तपासतांना व त्यांना औषधोपचार करतांना डोंगर खणून उंदिरहि काढूं शकत नाहींत, असा माझा अनुभव होता.

(२) मी स्वतः वरील केस तपासली होती; असाध्य रुग्ण (hopeless case) आहे अशी माझीहि पूर्ण खात्री झाली होती.

(३) माझ्या कल्पनेबाहेर रुग्ण बरा झाला हें पाहून मला किती आनंद व आश्चर्य वाटलें असेल ह्याची कल्पनाहि करणें अशक्य आहे.

अल्प खर्च व अल्पावधि

या औषधोपचारास लागलेला अल्प खर्च व गुण येण्यास लागलेला अल्पावधि ह्या गोष्टी लक्षांत घेतां कोणासहि आयुर्वेदीय औषधोपचाराच्या गुणकारित्वाविषयीं आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं.

भ्रामक श्रेष्ठत्वाची कल्पना

इतकें असतांहि आम्ही ॲलोपॅथीतज्ञ आयुर्वेदाची उपेक्षाच करितो ही गोष्ट गर्हणीय आहे. ह्याचें कारण वृथाभिमान व भ्रामक श्रेष्ठत्वाची कल्पना!

दमा, खोकला, डांग्याखोकला यावर

श्वासकासारि

रुईच्या मुळाची साल, शुद्ध धोतराबीज, प्रवाळभस्म, गुळवेलसत्व, मृगशृंग, वेलची इत्यादि द्रव्यांच्या मिश्रणानें हें औषध तयार केलें आहे. धोतराबीजाचें प्रमाण अत्यल्प (१/८) आहे बाकी सर्व समप्रमाण आहेत. लहान मुलांचा व मोठ्यांचा उबळीचा खोकला, दमा हे विकार आटोक्यांत आणण्यास या औषधाच्या योगानें बिलकूल विलंब लागत नाहीं.

मोठ्यांना १ गुंज औषध तुपांतून चाटवावें. जरूरीप्रमाणें दिवसांतून २।३ वेळ.

किंमत -।- तोळा -।।।- रु. ट. ख. निराळा.

आयुर्वेद सेवा संघ

औषधी भवन, रविवार पेठ, नाशिक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुरुवर्य नीळकंठराव पटवर्धन

(लेखकः- आयुर्वेदशास्त्री
एन्. श्रीनिवास प्रभू, मंगळूर)

१९३७ सालची गोष्ट. मी गुरुवर्य वैद्यगुरु ...ए. आर्. भट यांचेकडील माझें वैद्यकीय अध्ययन ...पूर्ण मंगळूर येथें वैद्यकीय व्यवसाय करण्यास नुकतीच ...सुरुवात केली होती. मला एका रुग्णाकडून, सिरसी ...येथील त्यांचे मेव्हणे एक ख्यातनाम वैद्य, येईपर्यंत दर-...म्यानचे कालांत औषधोपचार करण्यास बोलावणें आलें. ...सिरसीहून आलेले वैद्य दुसरे कोणी नसून ...वैद्य नीळकंठराव पटवर्धन यांचे ज्येष्ठ चिरंजीव ...श्री. गणपतराव पटवर्धन हेच होत. यांचेकडूनच मला ...श्री. नीळकंठराव यांचेबद्दल थोडीशी माहिती मिळाली. ...श्री. गणपतराव हे स्वतः अत्यंत विनयशील असल्यानें ...त्यांनीं आपल्या पित्याबद्दल कोणतीहि अतिशयोक्ति ...किंवा व्याजस्तुति केली नाहीं. फक्त त्यांनीं माझें मना-...वर इतकाच परिणाम केला कीं, मी एकदां समक्ष ...सिरसीस येऊन श्री. नीळकंठरावाचा परिचय करून ...घ्यावा.

सिरसी एक पुण्यपावन क्षेत्र

...तशी प्रथम संधि मला १९४१ सालीं लाभली, ...तेव्हांपासून मी दरसाल त्यांच्या कृपाछत्राखालीं ...सिरसी येथें कांहीं दिवस त्यांच्या वैद्यकीय ज्ञानाचा ...अधिक लाभ मिळावा या हेतूनें वास्तव्य करीत असतो. ...सिरसी मला पुण्यपावन क्षेत्रच वाटतें.

पांच एकर क्षेत्र असलेल्या एका विस्तृत भूमी-...च्या एका कोपऱ्यांत यांचें निवासगृह बांधलेलें आहे. ...त्या ५ एकर भूमीपैकीं ४॥ एकर जमीन आयु-...र्वेदिक वनस्पति लावण्याकरितां राखून ठेविली आहे.

आकर्षक पण स्थितप्रज्ञ वृत्ति

श्री. नीलकंठराव हे ७३ वर्षांचे वृद्ध गृहस्थ परंतु ...शरीर यष्टि ताठ, वर्ण साधारण गौर, चेहरा आकर्षक ...व स्थितप्रज्ञेची द्योतक असलेली त्यांची शांत व स्थिर ...दृष्टि, असें त्यांचें व्यक्तिमत्व आहे.

त्यांचे वडील चिरंजीव श्री. गणपतराव यांनीं ...प्रथम माझा परिचय त्यांच्याशीं करून दिला. स्वागत, नमस्कार वगैरे झाल्यानंतर आम्ही बोलण्यास सुरुवात केली. मी त्यांना अतिशय उत्कंठेनें प्रश्न विचारीत होतो. आणि ते त्यांचीं उत्तरें अतिशय शांतपणानें व कौशल्यपूर्ण रीतीनें देत होते.

१२ वर्षांचा परिचय

ते आपल्या व्यवसायनिवृत्त स्वरूपांत आयुष्याची कालक्रमणा करीत होते व त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. गणपतराव हे त्यांचा वैद्यकीय व्यवसाय व इतर कार्यक्षेत्र यांची व्यवस्था पाहात होते. वनस्पती-शास्त्रांतील माझी उत्सुकता व कांक्षा यांनीं वृद्ध नील-कंठरावांच्या मनाचा वेध घेतला व तेव्हांपासून आज सतत १२ वर्षें मी त्यांच्या नेतृत्वाखालीं त्यांच्या रोगनिदान व चिकित्सा पद्धतीचा, तसेंच संदिग्ध वनस्पतिनिर्णयाचा अभ्यास त्यांच्या पद्धतीनुसार करीत आहे. मी निश्चयात्मक असें म्हणूं शकेन कीं, आजच्या जगांतील सुधारणा त्यांच्यावर विजय मिळविण्यास असमर्थ ठरल्या आहेत.

त्यांची दिनचर्या

ते प्रातःकाळीं चार वाजतां उठतात व लगेच शौच, मुखमार्जन, स्नानसंध्या, जपादि कार्यक्रम आटोपून, आठ वाजतां ते आपल्या बैठकीवर येऊन बसतात. ते फक्त सात्विक आहार घेतात व जेवणहि दुपारीं एक वेळेसच घेतात. रात्रीं ते जेवत नाहींत. व विशेष गोष्ट अशी कीं, तुम्ही पांच अंक मोजीत आहांत तोंच त्यांना गाढ निद्रा लागते. ते स्वयंप्रेरणेनें फिरत असतात व त्यामुळें निद्रेचें खरें सौख्य त्यांना लाभतें.

आयुर्वेदीय बाग पाहाण्यासाठीं

आज ते निवृत्तजीवन कंठीत असले तरी त्यांचे-कडे सामान्य माणसापासून मंत्र्यापर्यंत सर्व दर्जाचे लोक कांहीं कूटप्रश्नावर चर्चा करण्यास वा त्यांची सल्लामसलत घेण्यास येत असतात. विशेषतः

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदिक वैद्य त्यांची वनस्पतीची बाग पाहाण्यास फार दूरवरूनहि येत असतात.

दुरून पाहून रोगनिदान करतात

रोग्यास नुसतें दुरून पाहूनच ते त्याचें रोग-निदान करतात. परंतु रोग्यानें विनंति केल्यास ते त्याचे जवळ जाऊन तपासतात. सर्वसाधारण त्यांची रोगी तपासण्याची पद्धत खालीलप्रमाणें आहेः- रोग्यास ते पाठीवर सरळ निजण्यास सांगतात व त्याच्या उजव्या हाताची व डाव्या पायाची नाडी प्रथम पाहातात. नंतर त्याच्या उलट म्हणजे डाव्या हाताची व उजव्या पायाची नाडी पाहातात, व रोग्यास त्याच्या दुःखाची साद्यंत हकीगत सांगतात. ते रोग्याच्या शरिरांतील रोगाचें उगमस्थान निश्चित दाखवितात. पुष्कळशा केसेसमध्यें 'क्ष' किरण फोटो घेतल्यानंतर त्यांचें निदान अचूक असल्याचें सिद्ध झालें आहे.

जुनाट रोगांची परीक्षा

ते स्वतः यकृत्वाढ, अर्दित, दमा, हृद्यविकार वगैरे जुनाट रोगांची परीक्षा करून आपले चिरंजीव गणपतराव यांना यशस्वी औषधोपचार कोणता करा-वयाचा तें सांगतात.

औषधें स्वतः बनवितात

सर्व औषधें त्यांचे स्वतःचे देखरेखीखालीं शास्त्रोक्त पद्धतीनें बनविलीं जातात. बाजारांतील औषधांवर ते विसंबत नाहींत. वनस्पति व इतर औषधीद्रव्यें आणण्याच्या काल व स्थल यांना ते विशेष महत्व देतात व तीं आणण्याकरितां ते स्वतंत्र माणसें पाठवतात.

सर्पविष चिकित्सा

मी एक माझ्यासमक्ष घडलेल्या गोष्टीचें निवेदन करतो— एक हुबळीच्या जवळचा मनुष्य, ज्यास सरपटणाऱ्या विषारी प्राण्याच्या दंश झाला होता. त्याच्या अंगाच्या उजव्या बाजूस अनेक छिद्रें पडलीं होतीं व त्यांतून मांस बाहेर आलेलें होतें (यावेळीं ॲलोपॅथीच्या राज्यांत पॅनिसिलिनचें महत्व फारच गाजलेलें होतें.) खुद्द रुग्णास गुरुवर्य नीलकंठराव आपणांस बरें करूं शकतील कीं नाहीं याबद्दल शंका वाटत होती. डॉक्टरांनीं पेनिसिलिन ट्रीटमेंट देऊन बरें करण्याचें आश्वासन रुग्णास दिलें होतें.

गुरुवर्य नीलकंठरावांनीं नुसते त्याच्या हाताकडे पाहिले व म्हणाले प्रयत्न करूं या! तीनच दिवसांत रुग्ण त्यांचें औषधानें बरा झाला व आठ दिवसांत रोगाचा मागमूसहि शिल्लक राहिला नाहीं.

दैवी विधि

त्यांच्या वैद्यकी ज्ञानाखेरीज ते वैदिक कर्मांतही फार विद्वान् आहेत, हें त्यांच्याकडे चर्चेस व विचार-विनिमयास येणाऱ्या वैदिक तज्ञांच्या आगमनावरून सिद्ध होतें.

ही खालील हकीकत वाचा व त्यांच्या ज्ञानाची कल्पना तुमचे तुम्हीच करा. सकाळीं १० वाजण्याचा सुमार. सिर्सीच्या जवळपास राहाणारा एक मनुष्य त्यांचेकडे आला व म्हणाला कीं, आज ३ दिवस झाले. माझी गाय चुकली आहे. गुरुजींनी त्यास एक नारळ व इतर कांहीं वस्तु आणण्यास सांगितलें, अर्ध्या तासांत ते सर्व घेऊन तो मनुष्य त्यांचेकडे परत आला. गुरुजी नारळ व त्या वस्तु घेऊन घरांत गेले व कांहीं दैवी विधि करून तो नारळ त्या मनुष्यास कांहीं सूचना देऊन घरांतील विशिष्ट स्थळीं नेऊन परत दिला. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, दुसेर दिवशीं तो मनुष्य परत आला व त्यानें गाय काल संध्या-काळींच घरीं परत आल्याचे सांगितलें.

आयुर्वेद पत्रिकेंतील सर्वांना पसंत पडलेली
लेखमाला
अनुभविक चिकित्सा
पहिली ६ प्रकरणें
लेखक : वृद्ध वैद्य, मध्यप्रदेश
किंमत १ रुपया
वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्य नीळकंठराव पटवर्धन यांचें

औषधीकरण व औषधियोजना

...वैद्य नीळकंठराव पटवर्धन यांची नित्य वापरा-
...औषधी पुढीलप्रमाणें होतः—
...आनंदभैरवरस, नागगुटी, महायोगराजगुग्गुळ,
...ी, सूतराज मृतप्राणदायीरस, कफनाशकवटी,
...प्रकरणांतील बृहत् लोकनाथरस.
...भस्में- अभ्रक, सुवर्ण, लोह, ताम्र, रौप्य, कर्पूर-
...कपर्दिका, शंख, अयस्कांत, प्रवाळ, सुवर्ण-
...

...खनिज द्रव्यें- हिंगुळ, रसकापूर, मुडदारशिंग,
...शंगजिरे, गोपीचंदन, टंकण, सोरा, नवसागर,

...वनस्पति- कोष्ठकोलिंजन, हिंग, वेखंड, समुद्र-
...शोमघ, रेवाचिनी, शतावरी, पाषाणभेद, हळद,
...र, गोखरू, वंशलोचन, टेंटू, नरवेल, घणसरी,
..., ईश्वरी, कुटकी, कासविंदा, काटेपळस,
..., कडुजिरे, आमलकी, हिरडा, तुंबा, निर्गुडी,
...रा, अजमोदा, कळौंजी, इत्यादि.

...काढे- शठयादि काढा, ज्वरातिसारावर काढा,
...सारावर काढा.

...घृतें,लेह- एलादिघृत, कूष्मांडलेह, च्यवनप्राश,
..., शतावरीलेह.

...अरिष्टें- जीरकाद्यरिष्ट, दशमूलारिष्ट, दंत्यरिष्ट,
...द्याद्यरिष्ट.

...तेलें- विषगर्भ तैल, व्रणरोपक तेल, निंबतैल,
...तेल.

...चूर्णें- हिंगाष्टक, तालिसादि, सितोपलादि, इतर
... चूर्णें, महासुदर्शन चूर्ण.

आनंदभैरव

"दरदं वत्सनाभं च मरिचं टंकणं कणा।"
... साधा योग. याचा सर्वत्र स्थानिक
...नाशक म्हणून उपयोग करतात. उदाहरणार्थ
दांत दुखणें. दुखत्या दांताजवळ गोळी ठेवून लाळ थुंकणें, शूळ तत्काळ बंद होतो. कान दुखत असल्यास लिंबाच्या रसांत एक गोळी उगाळून कानांत घालणें, तत्काळ शूळ बंद. गळू दुखत असल्यास, कोठें मार लागून शोथ वेदनायुक्त असल्यास इतर लेपादिक तयार नसलेवेळीं ही गोळी लावणें. याशिवाय ज्वर, कफ, कास, श्वास इत्यादिवर याचा उपयोग होतोच.

महायोगराजगुग्गुळ

याचे गुणधर्म सर्वांना विदित आहेतच. तरीपण एक गोष्ट सांगावयाची कीं योग्य अवस्था प्राप्त झाल्या- वेळीं शास्त्र प्रमाणांत दिल्यास अप्रतिम अतिजलद गुण दिसतो. आजकालचे वैद्य अति अल्प प्रमाणांत उपयोग करतात, त्यामुळें गुण अतिसावकाश येतो. देहशुद्धि बरोबर न करतां दिल्यास कांहींच गुण मिळत नाहीं. मग काय, महायोगराजहि देऊन झाला, याउपर काय द्यावें, असा साशंकपणा वैद्यांत येतो. करितां देहशुद्धीकडे जास्त द्यावें. तसेच योगराजाची अवस्था आहे कीं नाहीं ही जास्त स्पष्ट खात्री करून घ्यावी. बऱ्याच प्रसंगीं खोटें दुखणें, गृध्रसीप्रमाणें वेदना, गृध्रसीशिरेंत तीव्र वेदना, रोगी अत्यंत विव्हल स्थितींत असणें, अशा प्रसंगीं महावातविध्वंस किंवा एरंडेलयुक्त महारास्नादि आणि महायोगराज इत्यादि योग दिले जातात. वैद्याला आपण मोठी उत्तम योजना केली आहे असें वाटतें, पण रोग्याला मात्र गुण येत नाहीं. अशा प्रसंगीं चिकित्सकानें कोष्ठांतील वात निर्हरण करण्याचें आद्य कर्तव्य केल्यास रोग्यास तत्काळ आराम वाटतो. कोष्टवातप्रकोपच प्राधान्यानें या अशा विकारांत असतो.म्हणून कोष्ठवाताची चिकित्सा करणें. कोष्ठप्रांत सोडून वात दूरवर जाऊन कायमचा स्थायी झालेला असावा, अशा रोग्यामध्यें महायोगराजासारखीं औषधें तीहि ग्रंथोक्त शास्त्र प्रमाणांत द्यावी. त्याबरोबर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोष्ठवातस्थान शुद्ध मोकळें ठेवण्याची योजना आखावी ह्मणजे अति लवकर गुण येतो.

सूतराज मृतप्राणदायी रस

हा दुर्बलजनित ज्वरांत तसेंच सतत ज्वरांत फार गुणकारी आहे.

लोकनाथ (बृहत्)

अत्यंत जुनाट यकृत् प्लीहा विकारांत तसेंच क्षयाच्या पूर्वरूपांत, क्षयाच्या प्रथमावस्थेंत, माक्याच्या रसांतून देणें. थोडक्याच अवधींत उत्तम गुण येतो.

अमृतवटी

वात-कफ-विबंध जेथें जेथें असेल त्या सर्व ठिकाणीं दिवस आड अगर तीन दिवसानें एक वार देणें. यानें विरेचनें होतात, पण या विरेचनानें मुळींच अपाय होत नाहीं. उलटपक्षीं यानें अर्धी चिकित्सा होते. वयस्क माणसास दोन गोळ्या , मुलांना अर्धी ते एक गोळी देणें.

लोहभस्म तयार करण्याची पद्धत

लोहभस्म करण्याचे अनेक प्रकार आहेत, तरी, एक प्रकार येथें मुद्दाम देत आहे, तो असा:— शुद्ध लोहचूर्ण मोंगली एरंडाच्या दुधांत (त्याच्या दांड्याना किंचित् धक्का लागल्यास एकप्रकारचा द्रव स्रवतो तो) कालवून उन्हांत ठेवणें. सुकल्यानंतर पुनः ते मोंगली एरंडाचें दूध घालून ठेवणें. असें सतत दहा ते पंधरा दिवस केल्यास लोहाचें अत्यंत श्लक्ष्ण भस्म तयार होतें. यास गुणवर्धनाचें हेतूनें माक्याच्या रसाच्या व कोरफडीच्या भावना व पुटें देणें म्हणजे एका महिन्यांत हें भस्म तयार होतें.

कर्पूरशिला (गोदंती), शंख, कपर्दिक, अयस्कांत, सुवर्णमाक्षिक, अभ्रक हीं भस्में शास्त्रोक्त तयार करणें. त्यांत विधि विशेषसा नाहीं.

सोमनाथी पद्धतीनें ताम्रभस्म

ताम्रभस्म सोमनाथी पद्धतीनें तयार करून घेणें. त्यानंतर या भस्माला निष्कलंक बनविण्यास ते अनेक भावना व पुटें देतात. भावनेसाठीं कळकटपणा कमी करणाऱ्या तसेंच ताम्रकार्य जास्त वाढविणाऱ्या वनस्पतींची निवड करतात. उदा:- शरपुंखा, कासमर्द, पलाश, उतरण, निर्गुंडी, भृंगराज, यांच्या प्रत्येकी ७-८ भावना दिल्या जातात. ताम्र फार कळकट द्रव्य असलेमुळें त्याचें भस्म फार काळजीनें तयार केलें पाहिजे. तयार ताम्रभस्माची परीक्षा अशी: (१) लिंबाच्या रसांत अगर आंबट दह्यांत ताम्र कालवून ठेविल्यास हिरवा रंग येऊं नये. (२) उत्तम पिकलेलें केळें कापून त्यांत ताम्रभस्म कापलेल्या अंगाला लावून दोन तीन दिवस (भस्म लावून परत तें केळें तसेंच सालीसकट बांधून ठेवणें) ठेविल्यास चौथ्या दिवशीं उघडून पाहतां तें केळें कुजूं नये. न कुजतां तसेंच राहिलें म्हणजे तें ताम्रभस्म उत्तम झालें असें समजणें. ताम्राचें मुख्य कार्य कुजणें बंद करणें अगर कुंजू न देणें अगर कुजके पदार्थहि शुद्ध करणें. बाहेरहि प्रत्यक्षांत हा गुण अनुभवास येतो. अशा कसोटीला उतरलेलें भस्म पाचन अजीर्ण होऊन तीव्र आंबटपणा वाटल्यावेळीं छातींत जळजळून येत असतां एका सुईच्या टोंकावर राहील इतकें भस्म जिभेवर ठेवण्यास द्यावें. पाणी सुटल्यास गिळण्यास सांगावें. घड्याळ लावून दहा मिनिटांत जळजळ कमी होते, मळमळ कमी होते. आंबटपणा पार नाहींसा होतो आणि तज्जन्य कळ, पोटफुगी वगैरे कमी होतात. ताम्रभस्माचे उपयोग सर्वांना विदित आहेतच. तरी अन्न नेहमीं कुजण्याची प्रवृत्ति असणाऱ्यांना हे फार उत्तम उपयोगी आहे. बालकांच्या यकृत् विकारावर अत्युत्तम गुणकारी आहे. अत्यल्प प्रमाणांत आलेरसांत देणें. खात्रीनें गुण येतो.

आजवर रुढीप्रिय वैद्यांनीं प्रतिपादिलेल्या पारंपरिक अर्थापेक्षां निराळा असा त्रिदोषाचा अर्थ समजण्याकरितां 'A Materialist's Interpretation of Tridosh Theory' ही पुस्तिका वाचा.

पृष्ठें २६, पोस्टेजसह किं. १२ आणे.

मा. श्री. किर्लोस्कर, साधनकेरी-धारवाड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुवर्णभस्म व रौप्यभस्म

सुवर्णभस्म व रौप्यभस्म उत्तम बनत नाहींत. सुवर्णभस्म ...ह, उत्तम बनविणें शक्य नाहीं असा अभिप्राय ...ला तरी आजवर तयार झालेलीं अनेकांचीं भस्में ...र्ली पण कोणाचेंहि चांगलें तयार झालेलें नाहीं, असें ...दून आलें. किंचित् अग्नि कमी जास्त झाल्यास ...ोंनी धातु लवकर विरघळतात. किंमतीच्या ...र्ने हे फार किमतीचे पदार्थ असल्यामुळें विशेष ...न कोणी केले नसावेत. आम्हीं सर्व प्रसिद्ध ...ानदाराकडून, तसेंच खाजगी वैद्यलोकांकडून ...ल मागवून पाहिलें आहे. पण कोणाचें चांगलें झालें ...ीं असें दिसलें. कोणास या विधानानें वावगें ...लास आपापल्याकडे असलेलें भस्म त्यांनीं खालील ...नें तपासून घ्यावें. म्हणजे त्यांची खात्री होईल.

सुवर्णभस्माची परीक्षा

वजन करून ठराविक वजनाचें भस्म उत्तम खला- ...ं घालून शुद्ध पाण्यांत अर्धांतास खलून वरची ...ी (हलक्या हातानें) ओतून घेऊन परत पाणी ...न खलणें. पुनः निवळी ओतून घेणें असे चार वेळ ...न तळाशीं राहिलेलें चूर्ण तसेंच सुकूं द्यावें. सुकल्या- ...र स्थूल दृष्टीनें पाहिल्यास त्यांत सुवर्ण अगर रौप्य ...ं सूक्ष्म चूर्ण राहिलेलें दिसेल. वजन करून ...लाच वजनहि प्रयोगास घेतल्याइतकेंच वजन ...ं. स्वच्छ पाण्यांत धुतल्यानें वरील राखेचें आव- ...रलें जाऊन शुद्ध धातु तेवढाच नजरेस पडेल. ...प्रचारांत असलेलें सुवर्णभस्म हें सुवर्णाचें सूक्ष्म ...आहे इतकेंच समजावें. खरोखरी सुवर्णभस्म हें ...न व क्षयघ्न असतां सद्यःकालांत क्षयांत निर्धोक ...भस्म वापरल्यास ज्वर वाढल्याचें अनुभवास येतें. ...निरुत्थ भस्म झाल्यासच उत्तम ज्वरघ्न गुण ...स येतो. क्षयात सतत वापरल्यानें ज्वर वाढणार ...तेंच सुवर्ण भस्म भस्मरूपास उतरलें आहे ...ं समजावें.

सुवर्णाचे साक्षित्वानें कार्य

...आजकालचें भस्म सुवर्णाचे सूक्ष्म चूर्ण आहे इतकेंच म्हणावें लागतें. सुवर्ण नुसतें उगाळून देणे, वर्क रूपांत देणें या प्रथा चालू असून, यानें सुवर्ण आंत पचलें जिरलें जात नाहीं, तर केवळ सुवर्णस्पर्शानें मिळणारे गुण फक्त प्रत्ययास दिसतात. (या तऱ्हेच्या क्रियेला साक्षित्वानें होणारी क्रिया अशी संज्ञा देतां येईल.) जसे हिरड्याचा काढा करून त्यांत थोडावेळ लोखं-डाचा तुकडा टाकल्यास काळी शाई होते, शाई तयार झाल्यावर लोखंडाचा तुकडा वजन केल्यास वजन मुळींच घटलेलें नसून वजन सारखेंच असतें. या ठिकाणीं केवळ हिरड्याच्या सान्निध्यानें हें कार्य झालेलें असतें. अशा प्रकारचें सुवर्णकार्य सुवर्ण-साक्षित्वानें विषादि प्रकरणांत घडतें. सुवर्णभस्म उत्तम निरुत्थ झाल्यास त्यापासून इष्ट तें कार्य करून दाखवितां येईल. सुवर्णसेवन आरंभ केल्या घटकेपासून गुण अनुभवास येतो.

साधूनें भस्म सुवर्ण करून दिलें

सुवर्णभस्म साधत नाहीं म्हणतां, मग याचे गुण कसे बरें अनुभवास आले अशी शंका वाचकांत निर्माण होणें साहजिक आहे. त्याचें उत्तर असें कीं एकेकाळीं ४८ वर्षांपूर्वी एका साधूनें एका स्नेह्यास सोन्याचें भस्म करून दिलें. त्या भस्मापासून त्याचा रोग संपूर्ण नाहींसा झाला व तो गृहस्थ फार सुदृढ झाला. त्याकाळीं मोटारी, सायकली नव्हत्या. अशा काळीं एका साधूला एक दिवस या स्नेही रोग्यानें आपल्या बैलगाडींत बसण्यास जागा दिली व एक रात्र आपल्या घरीं राहूं दिलें. एवढ्या साह्यासाठीं उपकाराची परत फेड करण्याच्या हेतूनें त्याच्या आजारासाठीं सुवर्णभस्म करून देण्याचें ठरवून तो विचार त्या रोग्यास त्या साधूनें सांगितला. रोग्यास कसलीही अविश्वासी शंका येऊं नये म्हणून चक्क सांगितलें कीं आपण वनस्पति तुझ्या हातीं देणार. पुढील क्रिया तुझ्या हातानें तूंच करावयास पाहिजे. या अटीस रोगी कबूल झाला. त्याप्रमाणें साधूनें कसला तरी पाला शेजारच्या रानांतून आणून त्याचा लगदा तयार करून रोग्याच्या हातीं दिला. त्या रोग्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपल्या जवळ असलेलें सोन्याचें नाणें आणून लग-याच्या मध्यें ठेवून ५ शेणीचें पुट दिलें. स्वांगशीत झाल्यानंतर त्या रोग्याकडूनच पुटांतील नाणें काढ-ण्यास लावलें. काढून पाहतां त्या नाण्याची शुद्ध लाही झाली होती आणि हातांत दोन बोटानें दाब-तांच अति उत्तम पूड झाली. या औषधानें त्याचा ताप क्षय सर्व उत्तम रीत्या बरें झालें. सुवर्णभस्म आजकाल-चें अगर सुवर्ण उगाळून घेतलेलें न पचतां केवळ साक्षित्वाचें कार्य दाखवून मलांत मिसळून बाहेर शौचावाटे जातें. असें सुवर्ण सेवन करणाऱ्याच्या मलाची परीक्षा केल्यास सुवर्ण जसेंच्या तसें सांपडतें.

न गंजणारे धातु

ज्यांच्याकडे खात्रीचें सुवर्णभस्म असेल त्यांनीं वर सांगितल्याप्रमाणें परीक्षा करून पाहावी म्हणजे हें म्हणणें खरें पटेल. सुवर्ण आणि रौप्य हे दोन्ही तावड-तोब इतर धातूप्रमाणें न गंजणारे आहेत. अतिकष्ट-साधनानें भस्म होतें करितां या भस्मांची परीक्षा करतांना केवळ जलपरीक्षाच पुरते. पाण्यांत १०–१२वेळां धुतलें म्हणजे तळाशीं उत्तम श्लक्ष्ण चूर्ण ज्या त्या धातूंचें सांपडतें. ज्याला असें उत्तम भस्मीकरण साधलें असेल त्यांनीं जाहीर करावें म्हणजे वैद्यांचें कल्याण होईल.

तापाव गुणकारी हिंगूळकल्प

हिंगूळ तीन दिवस शेळीच्या दुधांत खलून नंतर शुद्ध पाण्यांत धुवून घ्यावा. पुष्कळशा पाण्यांत ढवळून दिवसभर निवळत ठेवून वरील निवळ पाणी टाकणें, असें पाण्यांत २–४ वेळां धुवूत नंतर पुनः लिंबाचे रसांत तीन दिवस खलून पूर्वीप्रमाणेंच २–४ वेळां पाण्यांत धुवून काढणें. त्यानंतर सावलींत सुक-वून ठेवणें. हा झाला शुद्ध हिंगूळ. केव्हांहि कोणत्याहि योगांत वापरतां येतो. असा शुद्ध हिंगूळ कांद्याच्या रसांत खलावा, हिंगूळाच्या वजनाचे चौपट कांद्याचा रस हिंगूळांत जिरावा, इतकें झाल्यानंतर हिंगूळाचे सहा पटीनें उत्तम गुळवेलसत्व मिसळून अंगावरच्या दुधांत एक दिवस खलून त्याच्या गुंजेएवढ्या गोळ्या करणें. सावलींत सुकवून ठेवणें, हा हिंगूळ कल्प अत्यंत अनपायी असून सौम्य आहे. लहान मुलाच्या तापावर मुजरत गुणकारी आहे. साथीचा ताप,साधा शीतपूर्वक ज्वर, सर्दीचा ताप, ताप कसलाहि असो, त्यांत या गोळ्या देणें. हटकून ताप बरा होतो. यानें थकवा न येतां ताप कल्पनेपेक्षां लवकर उतरतो.

क्षीणतेवर एलादि घृत पाक

सुंठ, मिरी, पिंपळी, हिरडा, बेहेडा, आवळकंठी, वेलची, ओंवा, बिबे, वावडिंग, चित्रक, नागरमोथे, वेखंड, तुरटी, कडूनिंब, असाणा, राळवृक्षांची साल, प्रत्येकीं ३२ तोळे ३ द्रोण पाण्यांत कढवून अष्टमांश काढा करून काढा गाळून घेऊन त्यांत तूप १२८ तोळे मंदाग्नीवर शिजवून मधाइतकें जाड झाल्यावर त्यांत २८० तोळे साकर घालून चांगला पाक येतांच खालीं उतरून वंशलोचन २४ तोळे, वेलदोडा १६ तोळे मिसळून भरून ठेवणें. नित्य त्रासदायक कोणती दृश्य लक्षणें न दिसतां क्रमाक्रमानें हलुहलु वर्ष दीड वर्षांत क्षीणता येणें यावर उपयोगी. याचें प्रमाण १ तोळा ते १। तोळा सकाळ सायंकाळीं दुधाबरोबर, क्षयाच्या प्रथमावस्थेंत, स्थौल्योद्भव अशक्ततेवर, अग्निमांद्य, रसाजीर्णावर, सुरकुत्या रोगावर, खुटलेल्या वाढीवर, रसधातु उत्तम तयार करणें, धातुस्थ मल बाहेर काढून सप्त धातु शुद्ध मलरहित करणें, हे याचे महत्वाचे गुण होत. सर्वांगांत ग्रंथी वाढून होणाऱ्या क्षयावर उपयोगी. मुख्य दोष कफ. कफ शुद्ध करणें, कफस्थान शुद्ध करणें, स्रोतोरोध नाहींसा करणें हे या घृताचे गुणधर्म होत.

दुरालभाद्यरिष्ट

हें अर्शावर फार गुणकारी आहे. अर्शाला कारणी-भूत निदानपरंपरा पूर्ण समूळ यानें बरी होते. दंत्यरिष्ट हेंहि अर्शोघ्न असून विशेषतः शूलघ्न आहे.

यकृतोदर व यकृत्जन्य अन्य विकार यानें बरे होतात. तसेच सर्व आंतडीच्या विकारावर फार उपयोगी. आंतड्याच्या स्नायूमधें येणारें दौर्बल्य हे विकार अंत नाजूक, अत्यंत धाडसी कामें करणाऱ्यांत, तीं दोन कामें अशी असावीत कीं किंचित् तोल संभाळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं तर तीं कामें बिघडत असतात, अशा मध्यें शरीरांतील सर्व वायूचें लक्ष निरत उद्योगा असतें. त्यामुळें क्रमानें सर्व वायु प्रकोप पावून अग्निमांद्य उत्पन्न झालेलें असतें. अशांना अमृताप्रमाणें गुण देते. जीरकाद्यरिष्ट हें स्त्रियां- आहे. गरोदरपणच्या खोकल्यावर अति उत्तम आहे. तसेंच बाळंत झाल्यावर १५ दिवसा- उपयोग होतो. इतर अनेक उपयोजक स्थळें तीं सर्वांना विदित असतातच.

दशमूलारिष्ट

दशमूलारिष्ट हें एक फार मोठें औषध आहे. उपयोग अनेक ठिकाणीं करतां येतो. वापरण्यास पुष्कळशीं औषधें असतांना हें मोठें औषध खर्चूं जेथें सर्व अवयवांमधील बीजधर्म कमी झालेला एकाच वेळीं सर्व अवयवांत क्षीणता आलेली अशांना या एकाच औषधानें गुण येतो. पित्ताचा स्राव करणारे अवयव, कफोत्पादक वायु उत्पन्न करणारा अवयव, यांत बीजधर्म झाला अशा अवस्थेंत कसलेंहि पाचक औषध तरी पचन न होणें, तेंच अति अल्प, तोळ्यांनीं खाल्यास उत्तम पचणें, याचा अर्थ रोज उत्पन्न स्राव अत्यंत अल्प. आहार जीर्ण होईल इत- असतो. त्यांत अल्प आहार तरी पचविण्याची असते. किंचित्‌हि जास्त खाल्लेलें पचलें जात अशा ठिकाणीं स्राव उत्पन्न करणाऱ्या अव- ज्या तत्वानें स्राव होत असतो तें तत्वच म्हणजे शोग्यता कमी असते. अशाच प्रकारें कफाचे व असते. अशांत दशमूलारिष्ट उत्तम कार्य करतें. माणसांत कोणतींहि रोगलक्षणें नसतात. आहार विहार सूक्ष्म, मानासिक श्रमहि अति अल्प त. क्षीणता फार असते. अतिक्षीणता असून लक्षणें नसतात. याचे इतर अनेक गुण सर्वांना आहेच.

तालिसादिचूर्ण, सीतोपलादिचूर्ण

तालिसादि व सितोपलादि चूर्ण साखर न घालतां तयार करतात. विनसाखरेच्या या चूर्णांचें प्रमाण ४ ते १२ गुंजा दिलें जातें. याचा विशेष उपयोग अग्निमांद्यज कफविकारांत, अग्निमांद्यज शिरःशूलादि मध्यें, दुर्जलजनित अतिसार, दुग्धाजीर्णज अतिसारांत समभाग नवसागर मिसळून दिलें जातें. महासुदर्शन- चूर्ण जुनाट मलेरिया ज्वरावर किंवा मलेरियाजन्य परिणामावर फार गुणकारी. मलेरिया ज्वरावर रुईच्या कळया ९, मिरी दाणे मोजून ७ हे दोन्ही खलून ९ गोळ्या करणें. वेळेला एक गोळी मीठ लावून गिळणें. रोज तीन वेळां. गरोदर बायकांना पारिजा- तार्ची कोवळीं पानें अजमासे पाव तोळाभर, मिरे अतिविष, दालचिनी, नागरमोथा, श्वेत चंदन, यांचें समभाग चूर्ण वयोमानाप्रमाणें ४ ते १२ गुंजा दिव- सांतून ४ ते ६ वेळा द्यावें लागतें. क्षयाच्या प्रथमा- वस्थेंत त्रिवंग हें एकटेंच उत्तम कार्य करतें.

उन्मादांत तुंबा, निगुर्डी, या पानांचा रस चमचाभर, लिंबाचा रस अर्धा चमचाभर, यांत समुद्र- फळ ४ गुंजेइतकें उगाळून नाकांत हा रस पिळणें. यानें नाकातोंडांतून तास दोन तासपर्यंत पुष्कळशी चिक्कट लाळ गळून जाते. यानें कफाचें शोधन होतें. ८ दिवसानें एक वेळ असे वारंवार तीन चार वेळ नाकांत टाकण्यानें उन्माद बरा होतो. पोटांतून उन्माद- हर बला, जटामांसी, तगर, यष्टिमधु, मंजिष्ठ, ब्राह्मी, गोखरूं यांचा काढा (एका दिवसाला ४ तोळे चूर्णाचा) देणें.

टंकण (टांकणखाराची लाही)

हें एक अत्यंत उपयुक्त द्रव्य आहे. जेथें जेथें कफवात संमिश्रानें विकार असतील तेथें सर्वत्र टंकण द्यावें. अशा वातकफावस्थेंत मलमूत्रविबंध, आध्मा- नादि कोष्ठसंबंधीं विकार नसावेत. म्हणजे टंकणाचा जलद परिणाम दृष्टोत्पत्तीस येतो. दृश्य लक्षणें विकार कसलेंहि असोत, मुख्य औषध टंकण एकच पुरतें. कफाच्या स्वभाव जाणून त्याला अनुसरून उदाहरणार्थ स्कन्न कफ असतां अभया, यष्टिमधु यांची जोड देणें. प्रत्यक्ष सर्दी असतां हरिद्रा, अक्कलकरा, यष्टिमधु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संयोग करावा लागतो. शरीरांत कोठेंहि वातकफसंयोगानें कळयुक्त ताठरपणा असो, डोकेंदुखी असो, खांदा, कमरशूळ, गुढग्यांत कळ, अशा प्रकारें दोषस्थान कोठेंहि असो, मलमूत्रविबंध नसतां केवळ वातकफ दोष इतके ठरल्यास तेथें वरीलप्रमाणें टंकण कफादि दोषांना योग्य औषधाची जोड देऊन द्यावें. तत्काळ गुण येतो. टंकण प्रमाण ४ ते १२ गुंज द्यावें लागतें.

जुनाट पोटशूळाचे रोगी व औषधें

यांचेकडे आलेल्या दीर्घकाल टिकलेल्या जुनाट शूळ रोग्यांत शेंकडा ६० रोगी जलोदर पूर्वरूपाचे असतात. त्या रोग्यांना शूलाखेरीज इतर विकार नसतात. जुनाट पोटशूळाचे अनेक रोगी चिकित्सेला येतात. अनेक उपाय देशी विदेशी दोन्ही तऱ्हेचे करून बरे न होतां आलेले असतात. १०-२०-३० वर्षांपासून शूळ अनुभविलेले येतात. हे शूळ रोग यांचेकडून बरे होऊन जातात. म्हणून यांचेकडे पेटंट शूळनाशक औषध नाहीं. शेंकडा ६० रोग्यांत उदर पूर्वरूपें असतात अशांना उदराचीच चिकित्सा करावी लागते, त्यानें रोगी बरे होतात. एकंदर औषध मोठें लागत नाहीं. रोग काय हें ठरणें हेंच महत्वाचें असतें. निदान उदर-पूर्वरूप असें ठरल्यावर त्यावरील कोणताहि योग दिल्यास चालतो. साध्यांत साधा योग वाग्भटोक्त गुळवेल, पुनर्नवा, गुगुळ, देवदार, हिरडा, गोमूत्रानुपानांतून देणें. याशीं कफसंबंध असतां शंखभस्म, ताम्रभस्म अल्पल्प प्रमाणांत मिसळून देणें. वातसंबंध असतां वचा, हिंगु,कोष्ठ; पित्तसंबंध असतां पटोल, उशीर, कर्पूर मिश्रण द्यावें, म्हणजे बरे होतात. उरलेल्या ४० टक्के रोग्यांत पाऊणपट जुनाट मलेरियाचा परिणाम म्हणून शूळ असतो. उरल्या रोग्यांत खरा वातगुल्म किंवा परिणामशूळ असतो.

विषदंशावर उपयुक्त वनस्पति

सर्व तऱ्हेच्या विषदंशावर ईश्वरी, सर्पगंधा, घणसर यांचा उपयोग उत्तम होतो. यांचा अंतर्बाह्य उपयोग होतो. लिंबाच्या रसांत उगाळून देणें. दंशस्थळींहि लावणें. सर्पदंशावर लिंबाचा रस, तुंब्याचा रस या दोन्ही रसांत उगाळून देणें. याच तीन मुळ्यांचा विसर्पावर अंतर्बाह्य उपयोग चांगला होतो. मुखपाकाचा एक प्रकार जेथे जीभ गुळगुळीत झालेली असते अशांत कुष्ठ व्याधीप्रमाणें चिकित्सा करणें. वाग्भटोक्त कुष्ठयोग कुटज, निंब, खदिर, पटोल, इंद्रयव यांचे गोमूत्र साधित हा चांगला गुणकारी आहे.

कस्तुरीनें रक्तस्राव थांबतो

कोणत्याहि विचारसरणीनें चिकित्सा करून बंद न झालेला रक्तस्राव कस्तूरीनें बंद होतो. अनेक नपुंसक रोगी बरे झाले आहेत. म्हणून यांचेकडे नपुंसकत्वहर अशीं मोठीं औषधें नाहींत. तशांची जरूरी नाहीं असें ते म्हणतात. नपुंसकांत अपान वायु स्तब्ध असतो, अगर विलोम असतो, अगर कुंडलाकृतीनें फिरता असतो. कांहीं क्वचित् प्रसंगीं समान व उदान वायु तेवढेच वाढून नाभीपर्यंत व्यापून अपान-कार्याला अडथळा आलेला असतो. ती अवस्था पाहून वायु सुव्यवस्थित ठेवण्याची चिकित्सा केल्यास पुंस्त्व प्राप्त होतें. अवधि पण फार लागत नाहीं.

पार्श्ववायूवर आनंदभैरव

पार्श्ववायू (बरगड्या दुखणें) वर आनंदभैरवाच्या गोळी आल्याचा रस कांद्यांचा रस प्रत्येकीं एक एक तोळा यांत उगाळून देणें. दिवसांतून दोन ते तीन वेळा. शोधन जरुरीप्रमाणें योग्य प्रमाणांत केलें पाहिजे. टेटू उत्तम संधिस्थ वेदनाशामक आहे. संधिस्थ शोथ, वेदना सत्वर कमी करतो. संधिवातावर स्वतंत्रपणें वापरण्याजोगी ही अेकच वनस्पति आहे. पंचजीरक मिश्रणाशीं टेटूचा उपयोग करावा.

प्रदरावर त्रिकंटकादिलेह

स्वतंत्र प्रदरावर श्वेत, रक्त कोणताहि असो, त्यांत त्रिकंटकादिलेह (मूत्रकृच्छ प्रकरणांतील) चांगला गुणकारी आहे. धातकीच्या मुळ्याहि उत्तम प्रदरघ्न होत. जुनाट आमांशावर तक्रहरीतकी फार चांगलें. हा योग योगरत्नाकरांत आहे. नवट विकारांतहि उपयोग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विवे आमांश नवट जुनाट दोहींतहि तज्जन्य
व्याधिपरंपरेवरहि गुणकारी आहेत. हिरड्याची
ओव्याची पूड मिसळून गोळ्या करून ठेवणें.

गर्भस्राव, गर्भपात यावर

गर्भस्राव व गर्भपातहि होण्याची संवय असलेल्या
ना गर्भ राहातांच बेलमूळ, पुत्रंजीवीसाल,
नीच्या मुळ्या हे तिन्ही प्रत्येकीं ६ गुंजेइतकें
दुधांत ढवळून पिणें, प्रति रविवारीं व गुरुवारीं
आठवड्यांतून दोन दिवस देणें. यानें दिवस पूर्ण
स्त्रिया वाळंत होतात. मूलहि चांगलें जन्मतें.
अनुभविक योग आहे.

लहान मुलांच्या डबारोगावर हिंग

लहान मुलांच्या डबारोगावर हिंग हें एकच
वापरतात. वयोमानाप्रमाणें एक गुंजेपासून
पर्यंत हिंग शुद्ध पाण्यांत ढवळून बरचेवर
तावडतोब गुण येतो.

लिंबाच्या पानांचा विलक्षण उपयोग

कागदी लिंबू, ईडलिंबू, महाळुंग, मोसुंबें,
ईंबर, इत्यादींच्या पानांत ताप लवकर उतर-
चा गुण फार विलक्षण आहे. त्यांतल्या त्यांत
ळुंगाच्या पानांत जास्त गुण आहे. १० ते १५
बारिक कातरून दोन कप भर उकळत्या पाण्यां-
मंदाग्नीवर अर्धातास उकळून गाळून तासा-
ताशानें एक एक औंस पिणें. यानें अंगमर्द फार
कमी होऊन तापांतील डोकेदुखी कमी होते.
येतो, रोग्यास फार बरें वाटू लागते. इन्फ्लुएंझा
यांच्या तापावर या पानांचा काढा अकटाच
दुसऱ्या औषधाची जरुरी नाहीं. इतकें हें
गुणकारी आहे.

काटेपळस

काटे पळस (कंटकपलाश) ही वनस्पति यकृता-
असंत प्रभाव दर्शविणारी वनस्पति आहे. नक्की
घेण्यासारखे याचे गुण आहेत. मूळव्याधीवर
याहि) याचें प्रभावी कार्य होतें. याच्या
दुसऱ्या द्रव्याची जरूरी नाहीं. ही वनस्पति
काळया जमिनींत होणारी आहे. अनेकांना याचा
परिचय नाहीं. काटेरी पांगाऱ्याला कंटकपलाश असे
म्हणणारे फार लोक आहेत. काटेरी पांगारा व कंटक-
पलाश ह्या दोन्ही स्वतंत्र वेगवेगळ्या वनस्पति होत.
यकृतावर तसेंच मूळव्याधीवर या मुळया पाण्यांत अगर
दुधांत उगाळून देणें. याचे दुसरे कोणतेहि टिकावू
कल्प करून वापरणेंस हरकत नाहीं.

———

सुवर्ण सूतशेखराचा एक नवा गुणकारी प्रकार

रौप्यसुवर्ण सूतशेखर

(बचनागविरहित)

सूतशेखराचा पाठ योगरत्नाकरांत अम्ल-
पित्तचिकित्सेंत आला आहे. यांत १७ औषधें
आहेत. त्यांपैकीं शुद्ध बचनाग हें एक आहे.
बचनाग स्वेदल व वातनाशक द्रव्य आहे, त्या-
ऐवजीं रौप्यभस्म घालून हा सूतशेखर तयार
करण्यांत आला आहे. त्यांत सुवर्णभस्म आहेच.
सुवर्ण, रौप्य, ताम्र, शंख हीं ४ भस्में व शुद्ध
धोतराबीज, त्रिकटु, चतुर्जात, कजली, इत्यादि
द्रव्यामुळें हें औषध वातपित्तात्मक विकारांवर
अधिक गुणकारी बनलें आहे. अम्लपित्त, छातींत
जळजळ, चक्कर येणें, मूर्छा, ओकारी व जुनाट
पोटदुखी व पित्तप्रधान सान्निपातिक रोगांत हा
रौप्यसुवर्ण सूतशेखर उत्तम गुण देतो.

अनेक आयुर्वेद-तज्ञांनीं वापरून समा-
धान व्यक्त केलें आहे. आपणहि वापरा व
अनुभव प्रसिद्ध करा.

किंमत पाव तोळा २॥ रु. टपालखर्च निराळा.

आयुर्वेद सेवा संघ

औषधी भवन, रविवार पेठ, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कै. वैद्यभूषण हिर्लेकरशास्त्री

वै. भू. हिर्लेकरशास्त्री यांना ता. ३।७।५३ ला मध्यरात्रीं यकृत्प्लीहोदर (सान्निपातिक पण अजातोदक Lukaemoea) या विकारानें मृत्यू झाला. स्मशान-यात्रेला वै. हरिशास्त्री साने, वै. पु. वा. पानसे, वै. दत्तोपंत लागवनकर, वै. अ. य. जोशी, वै. मा. ग. जोशी, वै. ह. भा. भिडे, वै. पां. ह. देशपांडे, वै. ग. वि. पुरोहित, वै. द. स. काशीकर, श्री. चिं. ग. काशीकर, व. शं. ग. नानल, वै. म. पु. नानल, वै. मा. पु. नानल, वै. भा. वि. गोखले, वै. शिराळकर, वै. बिडकर, वै. शेण्डये, वै. लेले, वै. आठवले, वै. दत्तात्रेयशास्त्री शेण्डये, डॉ. लागू, डॉ. मा. पु. जोशी, डॉ. ग. द. आपटे हीं मंडळी असून वै. गोखले, वै. जोशी, वै. आठवले, डॉ. लागू वै. साने, वै. मा. पु. नानल व. वै. देशपांडे, यांची भाषणें झाली. अन्त्य संस्कार यथाविधी शास्त्रिबुवांचे ज्येष्ठ पुत्र श्री. वै. श्रीनिवास पुरुषोत्तम हिर्लेकर, एम्. ए. आ. वि. यांनीं केला

पुणें वैद्य मंडळाचा दुखवटा

" उमरावती येथील प्रसिद्ध वैद्य वैद्यभूषण प्राणाचार्य, आयुर्वेदबृहस्पति पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर यांच्या निधनाबद्दल पुणें-वैद्यमंडळास अत्यन्त दुःख होत आहे. कै. हिर्लेकर हे आपल्या विद्वत्ताप्रचुर लेखनानें, अस्खलित व लालित्यप्रचुर वक्तृत्वानें व सौहार्दयुक्त स्वभावानें केवळ महाराष्ट्र वैद्यमंडळांतच नव्हे, तर अखिल भारतांत ख्यातनाम झालेले वैद्य होते, तरीहि पुण्यासच त्यांचें बाल्य गेल्यानें व विशेषतः येथील प्रसिद्ध वैद्य कै. प्राणाचार्य बाळशास्त्री लागवनकर यांचे ते शिष्य असल्यानें, त्यांना पुण्या-विषयीं अत्यन्त आत्मीयता होती. पुणें-वैद्यमण्डळांतहि अनेकदां व्याख्यानें देऊन त्यांनीं लोभ दाखविला होता. शास्त्रीबुवांच्या निधनानें सर्व वैद्यमंडळाला विशेषें त्यांचें कुटुंबियांना जें दुःख झालें, त्यांत पुणें वैद्यमंडळ सहभागी आहे. "

॥ वैद्य-हिर्लेकर-पद्य-श्रद्धांजलि ॥

अयि ! वैद्यसमाज ! ! ते ऽ धुना
क्षतिपूर्तिर्महतीं कथं भवेत् ।
गतवान् पुरुषोत्तमो यतो
बत हिर्लेकर वैद्यराट् चिरम् ॥ १ ॥

* * *

चिकित्सया मृत्युमुखागतानपि
स्वस्थान् व्यधात् यो यमकार्यबाधकः ।
हिर्लेकरो ऽ सौ चिरवैरवृत्तिना
नीतो दिवं शून्यदयेन मृत्युना ॥ २ ॥

* * *

इदं वैद्यकीयं चिकित्सान्तरिक्षं
भिषग्वृन्दनक्षत्रतारायुतं हा ।
इदानीं तु हिर्लेकरेन्दोर्विहीनं,
दरीदृश्यते निष्प्रभं सोपरागम् ॥ ३ ॥

* * *

व्याख्याताऽसौ स्निग्धगंभीरशब्दः
शास्त्रज्ञाता मुख्यसंपादकोऽपि ।
आयुर्वेदाध्यापको ग्रंथकारो
विद्वद्वन्द्यो वैद्यहिर्लेकरोऽभूत् ॥ ४ ॥

* * *

वातादिदोषविज्ञानं शारीरं तत्वदर्शनं ।
प्रत्युत्पन्नमतेस्तस्य कीर्तिस्तंभ इव स्थितः ॥५॥

—वैद्य ब्रह्मदत्तशर्मा शास्त्री, मुंबई

आयुर्वेद सेवा संघाचीं औषधें
मिरज
येथें मिळण्याचा पत्ताः-
वै. स. मा. जोशी
सराफकट्टा, मिरज (S. M. C.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

वैद्य नीळकंठराव पटवर्धन यांच्या शिर्शी येथील औषधिबागेंतील वनस्पति

संस्कृत	लॅटिन	मराठी
अंकोल	Alangium lamarkii	अंकोल
…टरूष	Adhatoda vasica	अडुळसा
…मार्ग	Achyranthus aspera	आघाडा
…शवल्ली	Cassytha filiformis	आकाशवेल
…मलकी	Phyllanthus embelica	आंवळा
…शोक	Saraca indica	अशोक
…संतक	Bauhinia recemosa	आपटा
…दूली, आवर्तकी	Cassia auriculata	तरवड
…बला	Abutilon indicum	मुद्रिका, पेटारी
…र्जुन (श्वेत)	Terminalia arjuna	अर्जुन
…दित्यभक्ता	Cleome viscosa	हुरहुर
…म्र	Mangifera indica	आंबा
…र्द्रक	Zingiber officinale	आलें
…गंधा, अजवला	Ocimum Canum	अजगंधा
…ग्निमंथ	Premna integrifolia	अरणी, नरवेल
…रिष्टक	Sapindus trifoliatus	रिठा
…	Ficus carica	अंजीर
…कुंडुक	Morinda citrifolia	बारतोंडी, आवुल
…लाबु	Lagenaria vulgaris	कडू भोपळा
…श्वकर्ण	Vateria indica	सफेत डामर, चंद्रुस
…श्वत्थ	Ficus religiosa	पिंपळ
…र्क	Calotropis procera	रुई
…रग्वध	Cassia fistula	बाहवा
…म्रातक	Spondias mangifera	अम्बाडा
…न, बीजक	Pterocarfus marsupium	बिबळा
…नन्ता	Hemidesmus indicus	उपलसरी
…म्रगंधी	Curcuma amada	
…र्जुन (रक्त)	Termonalia tomentosa	ऐन
…गस्त्य	Sesbania grandiflora	अगस्ता
…नन्नास	Bromelva ananas	अननस

संस्कृत	लॅटिन	मराठी
आलूक, कच्ची	Colocasia antiquorum	अळू
अरि	Acacia pennata	शेंब
अपराजिता	Clitoria ternelata	गोकर्ण
अजवला	Ocimum canum	अजगंधा
अरणी	Premna integrifolia	नरवेल
अम्बष्टा	Cissampelos Hexandra	आकनादि
आखुपर्णी	Brachyramphus Sonchifolius	उंदिरकानी
इक्षु	Saccharum officinerum	उंस
ईश्वरी	Aristolochia indica	सापसण, सापसंद
इरिवेरी जलज	Plectronanthus reylenica	
इरिमेद (विट्खदिर)		
ईश्वरलिंगी	Corallocarpus Conocarpae	शिवलिंगी
उशीर	Andropogan muricatus	वाळा
उपोदकी	Basella alba	मायाळ
एला	Elettaria cardamomum	वेलदोडा, एलची
एरंड	Ricinus Communis	एरंडी
औदुंबर, उदुंबर	Ficus glomerata	उंबर
कृष्णत्वक् असन	Terminalia Tomentioa	ऐन
करंज	Pongamia glabra	करंज
करमर्दक	Carissa Carandas	करवन्द
कर्पूरहरिद्रा	Curcuma aromatica	
कार्पास	Gossypium herebacaum	कापूस
कारवेल्ल	Momordica charantia	कारलें
काकमाची	Solanum nigrum	कामोणी
देवदारु	Pinus deodara	देवदार
काकोदुंबर	Ficus hispida	भुईउंबर
कुटज	Holarrhena antidysen terica	कुडा

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संस्कृत	लॅटिन	मराठी
कालमेघ तिक्त	Andrographis painculata	पालेकिराईत
		कासेंगवत
काश		
कुलंजन	Alpinia galangal	कोष्टकोलंजन
कुलिंजन (चीनवचा)	Alpinia officinarum	कुलिंजन
कारस्कर	Strychnos nux vomica	कुचला
कोकिलाक्ष श्वेत		
कोकिलाक्ष नील	Hygrophila spinosa	कोळसुंदा
कुंभी (कुमुदिका)	Careya arborea	कुंभा
कदली	Musa sapientum	केळ
काकमारी	Ananiurta cocculus	काकमारी
कुमारी	Aloe indica	कोरफड
कुश	Poa cynosurioides	दर्भ
कूष्मांड	Benicassa cerifera	कोहळा
कंटकारी	Solanum xantho carpum	भुइंरिंगणी
कुरबक	Barleria buscifolia	
करवीर पीत	Cerbera thevetia	पिवळी कण्हेर
कंपिल्लक	Maleotus phillippensis	कपिला
करवीर रक्त		
करवीर श्वेत	Nerium odorum	
कर्कोटकी	Momordica dioica	करटोलें
कर्चूर	Curcuma zedoria	कचोरा
केतकीश्वेत	Pandanus odoratissimus	केवडा
केतकीस्वर्ण		
काजूतक	Anacardum occidentale	काजू
काश्मरी गंभारी	Gmelina arborea	शिवण
कृष्णबीज	Ipomea hederacea	काळादाणा
शंखिनी		
कासमर्द	Cassia sophora	काळा कासविंदा
कारुक-कर्मरंग	Averrhoa carambola	करमळ
कैडर्य	Murraya kocnigii	कढीलिंब
कर्कटश्रृंगी, श्रृंगी	Rhus kakrasingi (succedania)	काकडशिंगी

संस्कृत	लॅटिन	मराठी
कर्पूर, चीनकर्पूर	Cinnamomum camphora	कापूर
किंकिरात	Acacia latiosum	देवचाफा
कोडालु		
कांडवल्ली अस्थिसंधान	Vitis quadrangularis	कांडवेल
कंटकपलाश		काटेरी पळस
कोलकंद	Urginea indica	जंगली कांदा
कपिकच्छु	Macuna pruriens	खाज कुहिली
कांचनार श्वेत,	Bauhinia varieguta	कांचन
कांचनार पीत		
कदंब	Anthrocephalus cadumba	नींव, कदंब
खदिर	Acacia catechu	खैर
गुडूची	Tinospora cordifolia	गुळवेल
गुजारक्त	Abrus precatorius	गुंज
गुंजाश्वेत		
गुंजाकृष्ण		
गंधतृण		गवती चहा, ओला चहा
गजकर्णी		काथाद
गिरिकदली		रानकेळ
गोनासा		घोणसवेल
घोलिका		
गोजिव्हा	Elephantopus scaber	
चिल्लिका	Chenopodium album	चाकवत
		चन्दनबटवा
चम्पक	Michelia champaka	चाफा
चुक	Rumex vesicarius	
चुक्रिका, चांगेरी	Oxatis corniculata	आंबटी
चित्रा		
चन्दनश्वेत	Santalum album	
चव्य	Chavica roxburgii	
चक्रमर्द	Cassia tora	टाकळा
चित्रकश्वेत	Plumbago zeylanica	चित्रक
चित्रकरक्त	Plumbago rosea	लाल चित्रक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संस्कृत	लॅटिन	मराठी	संस्कृत	लॅटिन	मराठी
	Dendrobium macraei	हरणदोडी	नीलसिंधुक	Vitex nirgundi trifolia	
		नाणेली	नारिकेल	Cocos nucifera	नारळ
	Eugenia jambolana	जांभूळ	नागबला	Sida carpinifolia	नागबला
	Myristica fragrans	जायफळ	नागदमनी	Crinum asiaticum	नागदवणा
...पुष्प,जपा	Hibiscus rosa-sinensis	जास्वंद	नदीभल्लातक		
...तिष्मती	Calastrus paniculata	मालकांगोणी	नाकुली		
	Citrus limonum	ईडलिंबू	नागचम्पा	Mesua ferria	नागचाफा
	Jasminum auriculatum	जाई	नागवल्ली	Piper betle	पानवेल
	Amaranthus spinosus	तांदुळजा	निंब	Azadirachta indica	कडूनिंब
	Amaranthus gangeticus	चौळी,माठ	नागार्जुनी	Euphorbia pillulifera	थोर दुधी
		कडू तोंडली	नाडीहिंगु	Gardenia gummifera	डिकेमाली
...तुंडी	Ocimum sanctum	तुळस	पुन्नागवृक्ष	Calophyllum inophyllum	
..., झेंडु	Calendula officinalis	झेंडु	पुन्नागक्षुद्र	Ochroearpus	
	(Tagetes erecta)		प्रियालु	Buchanania latifolia	चार
	Ailantus malabarica	हेंमर, टेंटु	पलाशी	Butea superba	पळसवेल
...कोशातकी	Luffa acutangula	कडु दोडका	पलाश	Butea frondosa	पळस
...पटोल	Trichosanthes cucumerina		प्लक्ष	Ficus infectoria	पिंपरी नांद्रुख
		कडुपडवळ	पाटला	Stereospermum suaveoleus	
	Xanthoxylum rhetsa	तिरफळ			पाडळ
	Zizyphus rugosa	तोरण	पारिभद्र	Erythrina indica	पांगारा
..., बिंबी	Cephalandra indica	तोंडलें	पूतिकरंज	Caesalpinia bonducella	घाणेराकरंज
	Cinnamomum tamala		पनस	Artocarpus integrifolia	फणस
		टेंभुरणी	पर्पट	Hedyotis biflora	पित्तपापडा
	Morus indica		परुषक	Grewia asiatica	फालसा
			पिप्पली	Piper longum	
	Croton polyandrum	दन्ती	पिंडालु	Solanum tuberosum	
	Wendlandia notoniana	रामठा	रताळे	Ipomoea batatos	रताळे
	Leucas cephalotus		पूगी	Areca catechu	
...नाळ	Lobelia nicotianaefolia	भोकनाळ	पाषाणभेद	Saxifraga ligulata	पाषाणभेद
	Cynodon dactylon	दूर्वा	पारिश	Thespasia populnea	पारोसा पिंपळ
	Punica granatum	डाळिंब	प्रसारिणी	Paederia foetida	
	Vitis vinifera	द्राक्षें	पर्णबीज	Bryophyllum kalycinum	
...श्वेत	Dhattura stramonium	धोतरा	पाठा	Cissampelos hexandra	पहाडवेल
...कृष्ण	Dhattura metal	काळा धोत्रा	पुत्रंजीवी	Putranjiva roxabmgii	

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संस्कृत	लॅटिन	मराठी
पृश्निपर्णी	Uraria picta	
पुनर्नवारक्त	Boerhavia diffusa	
पाच	Pogostemon pachouli	
पीलू	Salvadora persica	
फलकंटक	Demia extensa	उतरण
बकुल	Mimasops elengi	
ब्राह्मी	Herpestis monniera	कारिवणा
बृहती	Solanum indicum	
बला	Sida cordifolia	
बिल्व	Aegle marmelos	बेल
बिभीतक	Terminalia belleca	बेहेडा
बदरी	Zizyphus jujuba	बोर
बब्बुल	Acacia arabica	बाभूळ
बल्वज		
भद्रमुस्ता	Cyperus scariosus	
भूखर्जूरी		खर्जुरी
भल्लातक	Semecarpus anacardium	बिबा
भूम्यामलकी	Phyllanthus urinaria	भुई आवळी
भूकर्बुदार		भोकर
भार्गी	Clerodendron siphonanthus	
भृंगराजश्वेत }	Eclipta prostrata;	
भृंगराजपीत }	Wedeli calendulaceaa	
भव्य	Dillenia indica	
भृंगराजकृष्ण	Eclipta prostrata	
महाद्रोणा		
मूषाकर्णी	Ipomea reniformis	
मत्स्याक्षा		
माधवी	Jasminum augustifolium	रानमोगरा
मदन	Randia Dumetorum	गेळ
माध्यान्हिका	Mirabilis jalapa	
मुसली	Asparagus ascendens	
माड		
मंजिष्ट	Rubia cordifolia	
महानिंब	Ailanthus excelsa	

संस्कृत	लॅटिन	मराठी
मातुलुंग	Citrus medica	
मुंडी	Spheranthus mollis	
मधूक	Bassia latifolia	
मरिच	Piper nigrum	मिं[illegible]
माचीपत्र		सुरपीण, सुरं[illegible]
मुद्गपर्णी	Phaseolus trilobus	
माषपर्णी	Teramnus labialis	
मुखालु		
मुचकुन्द	Pterospermum suberifolium	
महापिंडितरु	Randia longispina	पेंढा[illegible]
बर्बर	Ocimum basilicum	सब्ज[illegible]
यज्ञवृक्ष	Flacourtic montana	अटक, बेहक[illegible]
राजादनी, खिरणी	Mimasops hexandra	
रेणुका	Vitex agnus castus	
रास्ना	Saceolabium papillosum	
रोहिषतृण	Andropogon schoenanthus	रोशेल गवत
रोहितक	Amoora rohitak	रक्तरोहि[illegible]
लवली	Phyllanthus distichus	रायआवळ[illegible]
लताकरंज	Caesalpinia bonducela	सागरगोट[illegible]
लवनी		रामफ[illegible]
लघुशणपुष्पी		खुळखुळ[illegible]
लकुच	Atrocarpus lakoocha	ओटंब[illegible]
लामज्जक	Andropogon iwarancusa	वाळ[illegible]
लांगुली	Gloriosa superba	कळलावी
लघुश्लेष्मांतक	Cordia latifolia	
	Aporosa lindleyana	
लज्जालु	Mimosa pudica	लाजाळू
वृक्षाम्ल	Garcinia indica	कोकं[illegible]
वचा	Acorus calamus	वेखंड
वनजीरिका	Vernonia anthelmintica	कडुजिरे
वंध्याककोंटक		वांझकर्टोली
वनापिप्पली	Var roxburgiana, piper long[illegible]	

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संस्कृत	लॅटिन	मराठी
गिनवेल	Capparis spinosa	
षानिया	Scoparia dulcis	
ड़ा	Leea sambucina	
नामिरी	Toddalia aculeata	
वरीक	Bocagea dalzelli	
डजांभूळ	Olea dicica	
नद्राक्षा	Vitis indica	
नजायफळ	Myristica malabarica	
त	Phogostemon patchouly	
त्रूभेंडे (कापूरभेंड)	Hibiscus abelmoschus	
क्षुंदा	Hygrophylla spinosa [Crotalaria linifolia]	
डवेल	Cosmostigma racemosa	
दंती [घणसरी]	Croton oblongifolium	
गुळ	Dalburgia sympathetica	
सी	Calycopteris floribunda	
ग	Caesalpinia suppan	
कड निंबू	Atlantia monophylla	
कम्बळ	Abroma augusta	
दे	Adena cordifolia	
जांभूळ	Ammania bacifera	
डज्जी	Fluegia lucopyrus	
के	Gardenia gummifera	
कोली	Crossandra andulaefolia	
ककडी	Urena lobata	
विकंटक	Cleridendron saphonamthus	
आणे (काळा गोंडा)	Diasporus montana	
रणोरी	Polyalthia coffeoides	
अडुळसा	Tylafore asthmatica	
दरा अडुळसा	Graptophylum hortense	
गिस्यदागिडा	Glycasmin pentaphylla	
शिरदाँ (गोच्चलु)	Odina woodier	
विकंकत	Flacourtina montana	
वेके (नर्कटी)	Caesarpenia mimosoides	

संस्कृत	लॅटिन	मराठी
नरक्या ऊद	Gironniera reticulata	
अडचरे (अंजनी)	Memocylon edule	
लूतीकायि	Capparideae moomii	
इरिवेरी	Plecronanthus zeylenica	
पानओंवा	Anisochilus carnosus	
पुनई (जंगली बदाम)	Sterculia foetida	
अच्चवरकल	Olea disica	
शेरणी	Homonia riparia	
लाकेरी	Malastoma malabathricum	
हंसपादी (रानमेथी)	Desmodium triflorum	
हंसपादी (मद्रासी)	Coldenia procumbens	
माचाळ	Bauhinia malabarica	
पेव	Costus spesiosus	
थानमोडी	Physalis indica	
ओळ्ळेकुडी	Memocylon malabaricum	
बच्चलवळ्ळी (कन्नेकुडी)	Bassela cordifolia	
कव्वळ्ळी	Dalbergia volubilis	
बार्शिंग	Polypodium guercifolium	
रानउडीद	Teramnus labialis	
काढ्ढूवेंडे	Urena lobata	
देशी आरारोट	Curcuma augustifolia	
हुळीमज्जिगेकोलु	Antidesma diandrum	आमटी
बंगाली पाठा	Cissampelos hexandra	
नरकीचा कांदा	Corallocarpus epigeae	
गुळमावू	Machilus macrantha	
गोरवाळे	Ixora parviflora	
भोवरीचे वेल	Ipomea hederaceal	
चिरमुटकलू	Pavetta indica	
मोठाजांब	Eugenia jambosium	
तग्गि	Clerodendron infortunatum	
तपसी	Holoptelia integrifolia	
तोडकलु	Calliaearpa lanata	
विषमुष्टी, अजश्रृंगी		मधुमेहारी
वाराहीकंद	Tacea aspera	

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संस्कृत	लॅटिन	मराठी
विडंग	Embelia ribes	वावडिंग
वृश्चिकाली	Tragia involucrata	कांचकुरी
वट	Ficus bengalensis	वड
वंश	Bambusa arundinacea	बांबु
वातकुंभ मधु (एरंड) कर्कटी	Carica papaya	पोपई
वनतुंडी		रानभेंडी, गोमेटी
वेतस		
वनबीजपूर	Xanthxylum ovalifolium	
वत्सादनी	Cocculus villosus	गरुडवेल
वनहरिद्रा	Curcuma aromatica	
वाताम	Prunus amygdalus	बदाम
विषमदारी, वनयूथिका	Clerodeudron inerme	
विष्णुक्रांता	Evolvulus alsinoides	
वनसूरण		
वज्रदन्ती	Epicarpus orientalis	
शणपुष्पी	Crotolaria verrucosa	
शाक, साक	Tictona grandis	सागवान
शाल्मली	Bombax malabaricum	लालसांवर
शालिपर्णी	Desmodium gangeticum	
शंखोदरी	Poinciana pulcherrima	
शृंगाटक	Trapa bispinosa	शिंगाडे
श्वेतकुटज	Tabernaemontana heyneana	
शल्लकी	Boswellia serrata	
शरपुंखा	Tephrosia purpurea	
शिरीषक	Albizzia { toodraissima lebbeck	शिरस
शाकोट, फल्गु	Ficus asperrima	खोरेती
शतावरी	Asparagus racemoses (A)	
महाशतावरी	„ Sarmentosus (B)	
शोली		
शमी	Prosopis spicigua	शमी
शिग्रु	Moringa pterygosperma	शवगा

संस्कृत	लॅटिन	मराठी
शिंशपा	Dalbergia latifolia	शिसव
स्वर्णक्षीरी	Argemone mexicana	पिवळा धोत्रा काटे चिलायत
सर्पगंधा	Rauwolfia serpentina	
सप्तपर्ण	Alstonia scholaris	सातवीण
सहचर	Barleria prionites	पिवळा कोऱ्हांट
सप्तकपि	Casearia erculenta	सप्तरंगी
सहदेवी	Vernonia cinerea	
समुद्रफल	Barrimgtonia racemosa	
सूरण	Amorphophallus camphanulatus	
सीताफल		सिताफळ
सातला	Acacia concinna	शिकेकाई
सिंधुवार	Vitex negundo	निर्गुंडी
सारिवा	Hemidesmus indicus	अनन्तमूळ
सूक्ष्म घोलिका		
सेहुंड	Euphorbia neriifolia	शेंड
सैरेयक		पांढरा कोऱ्हांट
स्नुही	Euphorbia antiquorum	
हरिद्रा	Curcuma longa	हळद
हरीतकी	Terminalia chebula	हरडा
हरशृंगार	Nyctan thes arbor-tristis	पारिजातक
हपुषा	Melostoma malabathricum	नाखेंदा
भुईशिरड	Euphorbia acaulis	
पाथरी	Lactuca sativa	
फुरगुस	Alseodaphne semicarpifolia	
मोंडेआगेरु	Uvaria narum	
तामण	Lagerstraemia flosregina	
आढुरण		
परळ	Polygonum hydropiper	
खोकली	Acalypha indica	
घामण	Grewia teliafolia	
नाण	Cedrela toona	
नरवेल	Premna integrifolia	

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संस्कृत लॅटिन मराठी

...ड Vitex altessima
...ली Crinum asiaticum
...टे Ficus callosa
...वि Ficus hispida
...ली Indigofera tinctoria
...डी (बेलुवाल) Heliotropium indicum
...ली Bruntia wallichi
...दा Indian squill (Urgenia indica)
...ली Unonia livigata
... [Indian sarsaparilla]
Smilex ovalifolia
...वी Hedyostis auricularia
...(दातूणी) Epicarpus orientalis
[Strebulus aspera]
...(कोयतेमोड) Croton reticulatus
...) कुंफळ Sapota tomentosa
[Sideroxylon tomentosa]
... Macaranga roxburghii
... Desmodium triquetrum
...नवल Piper argyrophyllum
... Justicia genderussa
... Terminalia paniculata
... Cambreta extensum
...गरी Vallaris heynii
...(गौरीचे झाड) Cyophytum sensitivum
... Sapium insigne
...गड्डे Leea macrophylla
... Vitis discolour
... Eugenia caryaphyllara कुन्नेरले
... Trema orientalis
...सरपुंखा Tephrosa purperia
...ठी Zinziber zerumbet
... Grewia microcos

झाडपाडळ Oroxylon indicum
भुई आघाडा Cyathula prostrata
घुसळमुसळी Elephantopus scaber
भुईचांफा Kaempheria rotunda
गुलाबीजांब Eugenia jambos
पित्तमारी Naregamia alata
पुरुषरत्न Ionidium suffruticosum
बच्चलवळ्ळी Convolvulus arvensis
बसवनपाद Bauhinia acuminata
बळिळतूरचे Tragia involucrata
बेक्किनतरडुबळ्ळि Cardiospermum halicacabum
बोनगारे Randia religinos
मंजीटे Adenanthera pavonica
इल्लबूरु Icnocarpus frutescan
मालेबन्द Diospyros embryopteris
मुळ्ळूगोड्डुकोच्चु Dalbergia sympathetica
मूगुतिगिड
रामतुळस Ocimum gratissimum
देशीरेवाचिन्नि Garcinia morell
कारीट Cucumis trigonus
सदापुष्पी Vinca rosea
शिवमाल्लिगे Indigofera aspalathoides
ऐताळबूरु Ventilago madraspatana
संन्यासी गड्डे Vitis indica
समुद्रशोक Argyrea speciosa
हुळिगौरी Hibiscus furcatus
होन्नेगन्ने Aternanthera sessilis
बिळेकेंदिगे Caesalpinia mimisela
चिकणी Bridelia stipularis
जम्बे Xylia dolabriformi
फुरगूस Diaspyras embryopteris
हेगलबळ्ळि Holostemnia rheedii
हाविनमोरेगड्डे Eulophia nuda

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संस्कृत	लॅटिन	मराठी
वाकेरी	Wagatea spicata	
अंडी	Carallia integerrima	
गुरिगे	Sirobilanthes perfoliatus	

किरंबेलकंडे, गोवाळी, कांटेपुवण, नेळकंचि, गुरिगे, एळेलेपुंडी, कॆंपीबेरु, जलभेदी, कूमनगड्डे, करेबाळिळ, खारदएलेगिड ,गौरीकै, शिवरढोळ, नाइतुळशी, जांतिन-हुल्लु, बिलकंबि, नीरवाट.

———

वातकात्मक प्रकृतीच्या लोकांसाठीं नवें पौष्टिक औषध

अगस्तिप्राश

(अगस्तिविहितं धन्यं इदं श्रेष्ठं रसायनम्)

आजारांतून उठल्यानंतर अगर दुर्बलता आली असतां च्यवनप्राश सेवन करण्याची प्रथा सर्वत्र आढळून येते. तथापि ज्यांना च्यवनप्राश मानवत नाहीं असे लोक बरेच आढळतात. ज्यांची प्रकृति थंड आहे, ज्यांना कफ होतो त्यांना च्यवनप्राश आवडत नाहीं व मानवत नाहीं, असा आमचा अनुभव आहे.अशा लोकां-साठीं आयुर्वेद सेवा संघानें अगस्तिप्राश हें औषध तयार केलें आहे. च्यवनप्राशांतील मुख्य द्रव्य आवळा आहे. अगस्तिप्राशांतील मुख्य द्रव्य सुरवारी हिरडा हें आहे.

अंगावर सुरकुत्या पडणें, केस पिकणें, खोकला ,क्षय, दमा उचकी, विषमज्वर, मेह, गुल्म, ग्रहणी, अर्श, हृद्रोग, अरुचि व पडसें हे विकार अगस्तिप्राशाच्या नित्य सेवनानें दूर होतात. २० तोळे २ रुपये, ४० तोळे ४ रु.

आयुर्वेद सेवा संघ

औषधी भवन, रविवार पेठ, नाशिक

अनूरजिस्टर्ड वैद्यांची गैरसमजुतीची वागणूक

इतर वर्तमानपत्रांत व आयुर्वेद पत्रिकें 'सर्टिफिकेट मिळण्याची व्यवस्था' या शीर्षकाखा एक बातमी प्रसिद्ध झाली आहे. वास्तविक ती रजिस्टर्ड वैद्यासाठीं आहे. अनूरजिस्टर्ड वैद्यांसाठीं नाहीं तथापि अनूरजिस्टर्ड लोकांनीं ती बातमी वाचून धावपळ सुरूं केली आहे असें येणाऱ्या पत्रांवरून दिसते

१९३९ च्या कायद्यांत ती दुरुस्ती येत्या असेंब्लींत होणार त्याची ती फक्त सूचना आहे अद्याप दुरुस्ती झालेली नाहीं. आधीं रजिस्टर्ड असलेल्या वैद्य हकीमांना रजिस्ट्रारकडून आपण रजिस्टर्ड आहोत असें शिफारसपत्र (लाल शिक्याचें नवें) कांहीं कामासाठीं हवें असेल तर तें १ रुपयास मागवितां येईल. सरकारी कामकाजासाठीं कांहीं लोकांना असे दाखले लागतात ते मिळण्याची सोय या दुरूस्तीनें होणार आहे.

अनूरजिस्टर्ड लोकांनी १ रुपया पाठवून असे हसे करून घेऊं नये.

———

निर्लोभवृत्तीनें काम चालू आहे

अहमदनगर येथील सुप्रसिद्ध समाजसेवक श्री पुनमचन्द दगडूराम भंडारी यांनीं ता. ४-७-५ रोजीं आयुर्वेद सेवा संघास भेट दिली. ते आपल्या अभिप्रायांत लिहितात, येथें सर्व औषधें माणसांकडून करविलीं जातात. तसेंच आजवर मिळत नसलेलीं अशीं महत्वाची पण अप्रसिध्द अशीं औषधें तयार करण्याची व चांगलीं औषधें लोकांना व वैद्यांना करून मिळण्याची व्यवस्था सेवासंघानें केली आहे.

सेवासंघाचें ध्येयाप्रमाणें आयुर्वेदाची शुद्ध सेवा करणें हा कार्यकर्त्यांचा शुद्ध हेतु आहे व त्याप्रमाणें निर्लोभवृत्तीनें येथील काम चालू आहे. ईश्वरकृपेनें या संस्थेचा उत्कर्ष होवो.

पुनमचन्द दगडूराम भंडारी
अहमदनगर

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कलेक्टर मेजर साळवी यांची
आयुर्वेद सेवा-संघास भेट

नाशिक येथील जिल्हाधिकारी (कलेक्टर) मेजर ... आय्. ए. एस्. यांनीं शनिवारीं ता. १८ ... सकाळीं १० वाजतां आयुर्वेद सेवा संघाच्या ... पेठेंतील कार्यालयास भेट दिली. यावेळीं वैद्य ... मराठे, वै वि. म. गोगटे, श्री. द. शं. पोतनीस ... गांवकरी, श्री. माधवराव लिमये, श्री. गुर्जर ... आय्.) आदि मंडळी उपस्थित होती. ...माधव पंडित यांनीं श्री. साळवी यांना फिरून ...द सेवा संघाचे सर्व विभाग दाखविले. संस्था ... श्री. साळवी हे खुष झाले. त्यानंतर संस्थेच्या ... आल्यावर वै. बिंदुमाधव यांनीं छोटेसें भाषण ... संस्थेचा पूर्व इतिहास निवेदन केला व भावी ... सांगितल्या.

उत्तरादाखल भाषण करतांना श्री साळवी ...लीं, "आपल्या प्राचीन उज्वल संस्कृतीची ...ना व संवर्धन करावयाचें असेल तर त्यासाठीं ...सारख्या आपल्या दर्शनशास्त्रांना प्रोत्साहन ...णें कर्तव्य आहे. आपल्या सारख्या संस्था- ...नीं आतां सरकारपासून दूर न राहतां आपल्या ...र्यांची माहिती वेळोवेळीं सरकारला दिली ... स्वराज्याच्या काळांत पुढें आलेला सरकारी ...री वर्ग अशा संस्थांना साहाय्यक झाल्या- ...वाहणार नाहीं. कारण अशा प्रकारचीं कामें हीं ...चा हिताचीं कामें आहेत."

...नंतर संस्थेच्या आंवारांत एक पारिजातकाचें ...पणाचा समारंभ मेजर साळवी यांच्या हस्तें ...करण्यांत आला.

मंगरूळनाथ ता. वैद्य परिषद

... शेंदुरजना तालुका मंगरूळनाथ येथें येत्या ...मध्यें मंगरूळनाथ तालुका वैद्य-संमेलन ...चें ठरले आहे. तरी ह्या संमेलनांत तालुक्यां- ...तील वैद्यांनीं उत्साहानें भाग घेऊन तें यशस्वी करावे ... व विणेलीकर यांची विनंति आहे.

अनुक्रमणिका

प्रास्ताविक निवेदन ६८
जिवंत निघंटु वैद्य पटवर्धन यांचें जीवन चरित्र ६९
वैद्य पटवर्धन यांची निदान पद्धति व औषधियोजना ७७
,, ,, यांचा निरनिराळया रुग्णावस्थांतील पथ्यापथ्य विचार ८५
वैद्य सातभाई यांचें प्रचारकार्य ९०
वैद्य पटवर्धन यांची कांहीं नित्योपगी औषधें ९१
शिरसी येथील वैद्यसंमेलन व औषधीबाग ९३
श्रीधन्वन्तरी स्तोत्रम् १००
च्यवनप्राश कोणी घ्यावा ? १०१
एका वृद्ध गृहस्थांचा मूत्राघात १०४
असाध्य लिव्हर सिरोसिसचा रुग्ण आयुर्वेदीय चिकित्सेने बरा झाला १०५
गुरुवर्य नीळकंठराव पटवर्धन १०७
औषधीकरण आणि औषधियोजना १०९
कै. वै. हिर्लेकरशास्त्री श्रद्धांजली ११६
शिर्शी येथील औषधिबागेंतील वनस्पति ११७

प्राचीन संस्कृतीची सेवा

कलेक्टर साळवी यांनीं संस्थेच्या वहींत पुढील अभिप्राय नमूद केला आहेः—

"आयुर्वेद सेवा संघास ता. १८-७-५३ रोजीं भेट दिली. या संस्थेचा इतिहास व सर्व कार्य पाहून व ऐकून फार समाधान वाटलें. सेवासंघाचें कार्य अत्यंत उत्तम रीतीनें चाललें आहे, चालकांची कार्य करण्याची इच्छा व पद्धति अत्यंत उदात्त अशी आढळून आली.

आपल्या प्राचीन संस्कृतीची अशा प्रकारें सेवा करणारी संस्था नासिक जिल्ह्यामध्यें ही एकच दिसते. ईश्वर या संस्थेचा उत्कर्ष करो हीच प्रार्थना आहे."

रा. गो. साळवी
कलेक्टर, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुक्कुटांडापासून तयार केलेलें शुद्ध, स्वस्त आणि खात्रीचें

अंड्याचें तेल ५ तोळे किं. ७॥ रु.

औषधांचीं नांवें	तोळे	किंमत रु.	औषधांचीं नांवें	तोळे	किंमत रु.
अकीक भस्म	५ तो.	४-०-०	हरताळ (गोदन्ती) भस्म	५ तो.	१-०-०
कपर्दिक भस्म	,,	१-०-०	बेरपत्थरभस्म (मुळयानें)	,,	३-०-०
कासव (कछुवा) भस्म	,,	३-०-०	बेरपत्थरभस्म (विंचुयोगानें)	१ तो.	१-८-०
कुक्कुटांड भस्म	,,	३-८-०	अभ्रकभस्म शतपुटी (अजारक्तभावित)	,,	१०-०-०
कर्कट (खेकडा) भस्म	,,	२-८-०	अजायकृत् भस्म (रक्तवर्धक)	,,	३-०-०
जहरमोहरा भस्म	,,	१-४-०	अजाफुफ्फुस भस्म (क्षयकास)	,,	३-०-०
प्रवाळ भस्म (सूर्यपुटी)	,,	४-०-०	अजाअस्थिभस्म (अशक्ततेवर)	,,	२-८-०
प्रवाळ भस्म (अग्निपुटी)	,,	४-०-०	गाण्डूळ (भूनाग)भस्म (दुग्धवर्धक)	,,	४-०-०
मंडूर भस्म (त्रिफळा गोमूत्र)	,,	१-४-०	ताम्रभस्म (वनस्पतिमारित)	,,	१-८-०
मौक्तिकशिप (शौक्तिक) भस्म	,,	१-१२-०	पोलादभस्म (अपूर्व टॉनिक)	,,	४-०-०
शंख भस्म (निंबु, कुमारी)	,,	१-०-०	संगेयशबभस्म (ब्रेन टॉनिक)	,,	१-८-०
गुळवेलसत्व (कडुनिंबावरील)	,,	२-०-०	त्रिफळाचूर्ण (कपडछान)	१ शेरास	१-०-०
सांबरशृंग भस्म	,,	१-०-०			

मिश्रा महाराष्ट्र फार्मसी [रजि.] ब्रम्हपुरी [चांदा] म. प्र.

हृद्रोगावरील महत्वाचें आयुर्वेदीय औषध

चिंतामणिरस [गोळ्या]

चिंतामणीरसाचा पाठ भैषज्यरत्नावलींत आहे. शुद्ध पारा, गंधक, अभ्रकभस्म, लोहभस्म, वंगभस्म, शिलाजतु हीं औषधें १०-१० तोळे, सुवर्णभस्म २॥ तोळे, रौप्यभस्म ५ तोळे, अंबर १० तोळे व मौक्तिकभस्म ५ तोळे या औषधांस चित्रकमूल काढा, माका रस, अर्जुनसालीचा काढा याच्या ७-७ भावना दिल्या आहेत. हृदयशूल, हृदयद्रव (छातींत धडधडणें) या विकारांत हें औषध उपयुक्त आहे.

(१ तोळा ३२ रु.) १५ गोळ्यांची किंमत ५ रु. टपाल खर्च निराळा.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

संपादक व प्रकाशक:—वैद्य विद्धुमाधव पांडत, आयुर्वेद सेवा संघ, नासिक
मुद्रक:—श्री. दामोदर महादेव चन्द्रात्रे, विज्ञान प्रेस, नासिक
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ७ वें) नाशिक, ता. १६ ऑगस्ट १९५३ (अंक ४ था

आयुर्वेद सेवा संघांत पारिजातक वृक्ष

आयुर्वेद सेवा संघाच्या नाशिक येथील कार्यालयाच्या एका अंगणांत औदुंबर वृक्ष पूर्वी-पासून आहे. दुसऱ्या प्रांगणांत १४ रत्नांपैकीं प्रसिद्ध असा पारिजातक वृक्ष लावण्याचा समारंभ शनिवार ता. १८।७।५३ रोजीं सकाळीं १० वाजता नाशिक येथील लोकप्रिय जिल्हाधिकारी मेजर गो. साळवी, आय्. ए. एस्. यांच्या हस्तें झाला. त्या प्रसंगाचे छायाचित्र

(डावीकडून उजवीकडे)—वैद्य बिंदुमाधव पंडित, श्री. दादासाहेब पोतनीस (संपादक, गांवकरी), वैद्य बा. स. मराठे व वैद्य चिं. म. गोगटे. मेजर साळवी पारिजातकाचें रोप लावीत आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्यबंधूंस विनंति

महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळाची वार्षिक १ रु. वर्गणी पाठवून सभासद व्हा व वैद्यांची संघटना मजबूत करा.

वर्गणी पाठविण्याचा पत्ता–

मंत्री, महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळ, नाशिक

वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर

अध्यक्ष

दवाखाना विकणें आहे

कल्याण येथें चौकांत भर रस्त्यावर असलेला चालू आयुर्वेदीय दवाखाना विकणें आहे. ग्राहकांनीं पत्रव्यवहार संपादक आयुर्वेद पत्रिका, नाशिक यांचेशीं करावा म्हणजे कल्याण येथें जागा दाखविणेची व्यवस्था करण्यांत येईल. असें पत्रिकेचे एक ग्राहक वैद्य कळवितात.

प्रिन्सिपॉल पाहिजे

श्री, गुलाबकुंवरबा आयुर्वेद सोसायटी जामनगर (सौराष्ट्र) तर्फे जामनगर येथें चालू असलेल्या आयुर्वेदिक कॉलेज (आयुर्वेद विद्यालय) साठीं प्रिन्सिपल नेमणें आहे, यासाठीं २० ऑगस्टपूर्वी अर्ज मागविण्यांत येत आहेत.

पगाराचें मान

रु. ५०० - २५ - ८७५ शिवाय महागाई भत्ता सौराष्ट्र सरकारच्या दराप्रमाणें. तसेंच खाजगी धंद्याच्या नुकसानीची भरपाई नियमाप्रमाणें मिळेल.

योग्यता

१० वर्षांचा व्यवस्था– अनुभव, आयुर्वेदाचा उच्च अभ्यास– १५ वर्षांचा वैद्य म्हणून व्यवसायिक अनुभव, आधुनिक वैद्यकानें ज्ञान, सर्व सामान्य सांस्कृतिक प्रगति असावी हिंदी व गुजराथी भाषेचें ज्ञान असल्यास उत्तम.

केसरींतील बातमी

आयुर्वेदाचा संक्षिप्त अभ्यासक्रम

मुंबई दि. ८- एस्. एस् सी. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना आयुर्वेदाचा संक्षिप्त अभ्यासक्रम शक्य व्हावें अशी एक योजना सरकारतर्फे आंखली जात आहे असें कळतें.

ग्रामीण भागांत डॉक्टर व वैद्य यांचा तुटवडा पडत असल्यानें ती उणीव भरून काढण्यासाठीं नवी व्यवस्था अंमलांत आणण्याचा सरकारचा विचार आहे.

———

'आयुर्वेद जगत्'चा ताजा समाचार

विश्वसनीय समाचार असा कीं एका अल्प मुदतीच्या (आयुर्वेदीय) अभ्यासक्रमाची सविस्तर योजना मुंबई सरकारनें विचारांत घेतली आहे. त्यासंबंधी जाहीर खबर सरकारतर्फे आगस्ट महिन्याच्या पहिल्या पंधरवाड्यांत होईल असा अंदाज आहे.

———

एन्‌लिस्टमेंट टेस्टिमोनियल (दाखला)

वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेल्या एका बातमीनें रजिस्टर्ड, एन्‌लिस्टेड व अन्‌रजिस्टर्ड वैद्य-हकीमांचे मनांत गोंधळ उडवून दिला आहे.

सध्यां रजिस्टर्ड वैद्य हकीमांना एक शिक्याचें रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट मिळतें. एन्‌लिस्टेड वैद्यांना तसें मिळत नाहीं. त्यांना बोर्डाकडून फक्त १ कार्ड येतें तेवढेंच. त्यामुळें त्यांची फार कुचंबणा होते. म्हणून बोर्डानें सरकारला सूचना केली होती कीं त्यांना एक दाखला देण्यांत यावा. मुंबई सरकार ती सूचना मान्य करण्याच्या विचारांत आहे. तशी दुरुस्ती तें वैद्यकीय नियमांत करणार असा त्या प्रसिद्ध झालेल्या बातमीचा अर्थ आहे.

या संबंधींचा निर्णय होतांच तो प्रसिद्ध करण्यांत येईल. वाचकांनीं या बाबत अधिक पत्रव्यवहार करू नये.

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुरुवर्य कै. वैद्यभूषण हिर्लेकरशास्त्री

(लेखकः– आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे, पुणें २)

गेल्या दिनांक २ जुलै रोजीं डोळ्यादेखत झालेलें हिर्लेकरशास्त्रीयांचें देहावसान हा माझ्या आयुष्यांतील मोठाच धक्का! चार वर्षांपूर्वीचें पितृनिधन सहन होतें न होतें तोंच गायनाचार्य श्री. गन्धर्व यांचा आठ महिन्यापूर्वीं, आणि गुरुवर्य बापू यांचा चार महिन्यापूर्वींचा अनपेक्षित व अकस्मात मृत्यु यांनीं अन्तःकरणावर कमी आघात म्हणून कीं काय, शास्त्रीबुवांच्या निधनाचा आणखी जोराचा सपाटा बसला.

वक्तृत्वाचा अतुल्य नमुना

कै. हिर्लेकरशास्त्री यांच्या वैद्यक क्षेत्रांतील अधिकाराची मी नव्यानें कशाला जाणीव करून द्यावयास पाहिजे? आयुर्वेदाचें हृद्गत ओतणारीं व रसरशित भरलेलीं त्यांचीं वक्तृत्वप्रचुर भाषणें सभासंमेलनाला उपस्थित राहणाऱ्या वैद्यबन्धूंच्या स्मरणांतून गेलीं नसतील. खण खणीत वाणीनें स्पष्ट, मुद्देसूद सडेतोड आधार प्रतिपादनानें आणि नेमक्या पण भारदस्त ठाशीव शब्दसम्पदेनें शास्त्रीय जटिल विषय त्यांच्या तोंडून बाहेर पडले कीं, श्रोत्यांचीं अन्तःकरणें हेलावून जात आणि कळत न कळत मुखकुहरेंहि उघडीं होत, 'कसें, काय' म्हणत; जणूं त्यांचा वाक्-रस पिऊनच टाकावा, असें त्यांना वाटे. मराठीप्रमाणेंच शास्त्रीबुवांचें हिन्दी आणि संस्कृत वक्तृत्वहि तेजस्वी, अस्खलित आणि प्रभावी असे. कोणत्याहि भाषेंतील व्याख्यानाची त्यांना कधींच आगाऊ तयारी करावी लागत नसे.

भाषण कधीं वाचावयाचें नाहींत

१९३५ च्या जबलपूर येथील विदर्भ–प्रांतीय वैद्यसंमेलनांतील आणि १९४४ सालांतील बेझवाडा येथील नि. भा. आ. म. संमेलनांच्या ३५ व्या अधिवेशनांतील त्रिदोष चर्चा परिषदेचे अध्यक्ष म्हणून द्यावयाचीं त्यांचीं भाषणें ३०।४० पृष्ठें संस्कृतांतून छापून आणलेलीं, शास्त्रीबुवा मराठींत काय अगर संस्कृतांत काय, छापील भाषण तसेंच कधीं वाचावयाचे नाहींत. मुद्दा अगर शक्यतों शब्दहि न सुटतां छापील भाषणाचीच पण तोंडानें काढलेली स्वतंत्र आवृत्तिच ती जणूं, असा असल्या भाषणाच्या वेळचा त्यांचा ढंग असे. १९३५ सालच्या सुरवातीलाच झालेल्या पैठण येथील निजाम प्रांतीय वैद्यसंमेलनांतील शंभर पृष्ठाच्या त्यांच्या भाषणांतहि हें अनुभवाला आलें.

गुरुवर्य कै. वैद्यभूषण हिर्लेकरशास्त्री

वर उल्लेखिलेल्या दोन्ही संमेलनांतहि तसेंच भाषण चालू झालें, पण श्रोत्यांवर अपेक्षित परिणाम दिसेना. संस्कृताची अनभिज्ञता स्पष्ट दिसूं लागली. मराठीचा तर उपयोगच नव्हता. ताबडतोब शास्त्रीबुवांनीं हिन्दींत बोलायला सुरुवात केली, आणि दीड दोन तास न अडतां न चुकतां मराठीइतकेंच तेजस्वी आणि परिणामकारक भाषण त्यांनीं हिंदींत केलें. बेझवाड्याहून येतां येतां हैद्राबाद येथें त्यांनीं केलेलें भाषण हा त्यांच्या हिन्दी भाषणाचा मला उत्कृष्ट नमुना वाटला. ऊर्दुमय हिन्दी मातृभाषा असलेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या समाजाकडून शास्त्रीबुवांच्या भाषणाचें झालेलें कौतुक मी अजून विसरलो नाहीं.

बुद्धिमत्ता चमकून उठली होती

लहानपणापासूनच शास्त्रीबुवांची बुद्धिमत्ता चमकून उठली होती. त्यांचें घराणेंच आर्षी विद्वानांचें. उपनयनापासूनच ज्योतिषव्याकरणादि शास्त्रेंच काय, किमान वैद्यकाहि पढविण्याइतका त्यांच्या घरांत संप्रदाय होता. ते आपली सही " पुरुषोत्तम सखाराम वैद्य हिर्लेकर " अशीच करीत, हें त्यांच्याशीं पत्रव्यवहार

लेखकः-वै. पां. ह. देशपांडे

असणाऱ्या चाणाक्ष मंडळींच्या लक्षांत आलें असेल. वडिलोपार्जित वळण व्युत्पन्नाचें, आणि नारायण विठ्ठल व चिंतामण विठ्ठल जोशी या उभयतां मामांचा सहवास घडलेला. कै. चिंतामण विठ्ठल जोशी हे ज्योतिषाबरोबरच वैद्यकहि पढलेले. त्यांनींच शास्त्रीबुवा आणि त्यांचे थोरले बन्धु (हल्लीं कोकणांत असणारे श्री. वै. गंगाधर सखाराम हिर्लेकर) यांची मधुकोषासह माधवनिदान व वाग्भट यांची खडखडित पाठांतरासह तयारी करून दिली. शास्त्रीबुवांचें वय त्यावेळीं अवघें पंधरा* वर्षांचें होतें. पुढें कै. गुरु. बाळशास्त्री लावगनकर यांचेजवळ थोडेंच दिवसांत ते शिक्षणासाठीं राहिले. शिकण्याचे मूळ ग्रंथच व्युत्पत्तीसह पाठ असून बैठकीवर कै. बाबांनीं दिलेले वैद्यकाचे सोपपत्तिक व वक्तृत्वप्रचुर धडे शास्त्रीबुवांच्या स्मृतिपटलावर किती उजळून उठले असतील? त्यामुळेंच कोणताहि विषय सोपपत्तिक, साधार व तेजस्वी वाणीनें वैद्यकवर्गासमोर मांडण्याची धमक त्यांचेंत आली असेल यांत शंका नाहीं.

जिवन्त वाग्भट

वरीलप्रमाणें लहानपणींचें तयारीचें पाठांतर सततच्या अभ्यासानें पुढें इतकें तयार झालें की, शास्त्रीबुवांना त्यांचे परिचित वैद्य " जिवन्त वाग्भट " म्हणत. कै. गुरुवर्य आप्पाशास्त्री यांनीं त्यांच्या संक्षिप्त चरित्राला लिहिलेल्या प्रस्तावनेंतील पुढील वाक्य या विधानाची सत्यता पटवील. " काशीचे सुप्रसिद्ध वैद्य गुरुवर्य त्र्यंबकशास्त्री मुंबईस आले असतां आम्ही हिर्लेकरांस घेऊन त्यांचेकडे गेलो. संभाषण चालू असतां काशीच्या वैद्यरत्नानीं वाग्भटाचा श्लोक म्हटला, त्यांत हिर्लेकरांनीं दुरुस्ती सुचविली. पुस्तक काढून पाहतां हिर्लेकरशास्त्रीच खरे ठरले. गुरुवर्य त्र्यंबकशास्त्रीबुवांनीं हिर्लेकरांचें कौतुक केलें व महाराष्ट्रांतहि वाग्भट वागविणारे वैद्य आहेत म्हणून त्यांची फार प्रशंसा केली. " सभासंमेलनांतून त्यांच्या तोंडून लाह्याफुटाण्यासारखीं फडाफड आधारवचनें उडत, हें सर्व वैद्यमंडळींच्या चांगलेंच परिचयाचें आहे. शास्त्रीबुवांच्या वक्तृत्वाची ही अशी पार्श्वभूमि आहे.

विवादकौशल

सभापांडित्याइतकेंच अटीतटीचें विवादकौशल्य शास्त्रीबुवांच्या रोमरोमीं भिनलें होतें. १९३४ च्या पनवेलच्या पहिल्या त्रिदोषचर्चापरिषदेंतील प्रबंधांत त्यांच्या स्वतंत्र भाषणांत दोष, हे द्रव्य कीं पदार्थ, दोष कीं धातु, स्थूल कीं सूक्ष्म, व कार्यकारी कीं स्वाभव, हेच विषय होते. बहुतेकांना ते मानवले नाहींत. दोषांना पदार्थ, कार्यकारी, सूक्ष्म इत्यादि विशेषणांनीं संबोधिलेलेंच बहुसंख्याक सभासदांना आवडलें नाहीं. बैठ्या वादविवादाचा प्रसंग आला. ' द्रव्य कीं पदार्थ ' यावर घनघोर चर्चा सुरू झाली.

* अशा कांहीं आश्चर्यकारक वाटणाऱ्या गोष्टी कै. शास्त्रिबुवांनींच स्वतः सम्मत केलेल्या, १९३५ सालीं प्रसिद्ध झालेल्या, प्रस्तुत लेखकानें लिहिलेल्या, त्यांच्या ' संक्षिप्त चरित्रावरून ' कोणालाहि पडताळून पहातां येतील. —लेखक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...र्व न्यायरत्न वाडीकरशास्त्री यांच्याशींच सामना ...झाला. हिर्लेकरशास्त्रीबुवांचा न्यायशास्त्र हा तसा ...तर आयुर्वेदाइतका जवळचा विषय नव्हता; ...अश्वीतटीला प्रकरण आल्यावर कोणत्याहि पौरस्त्य ...त्यांनीं आपल्या विषयाला परिपोषक अशी ...बारखी सूक्ष्म दृष्टि फेंकलेली असावयाची, याचा ...ते आणून द्यावयाचें, व त्या त्या शास्त्रांतीलहि ...दाखवावयाचें. " पदार्थ ही व्यापक संज्ञा असून ...सात पदार्थांतला द्रव्य हा एक पदार्थ. दोषांना ...म्हटल्यास द्रव्याबरोबरच गुण, कर्म, सामान्य, ...आणि अभाव यांतील कोणतेंहि नजरेसमोर ..., म्हणून दोषांना पदार्थ ही अतिव्याप्त ...न लावतां द्रव्य हीच योजावी, असें वाडीकर-...यांचें म्हणणें पडलें.

जात्याकृतिव्यक्तयः पदार्थः

हिर्लेकरशास्त्री यांनीं, सामान्यतः कोणताहि ...य वस्तूला पदार्थ ही संज्ञा लावण्यास न्यायशास्त्र ...देतें हें, "अभिधेयत्वं पदार्थसामान्यलक्षणम्" ...आधारें सांगितलें. तरी अभिधेयवाच्यत्वापेक्षां ...असलेल्या वायुपित्तकफांना पदार्थापेक्षां द्रव्य ...संज्ञा न्यायसंमत ठरेल, असें वाडीकरशास्त्री ...सांगितलें. हिर्लेकरशास्त्री यांच्यांतील न्याय ...झाला. आणि "देशपांडे, झटपट 'गौतमाची ...' घेऊन या," असें त्यांनीं आज्ञापिलें. ग्रंथ ...तांस तावडतोब त्यांनीं 'जात्याकृतिव्यक्तयः पदार्थः' ...ज्याला जाति, व्यक्तित्व आणि आकारमान ...तो सर्व पदार्थ) हें सूत्र काढून दाखविलें, ...वाडीकरशास्त्री यांना निरुत्तर केलें. इतका वेळ ...सभेतील खळबळ एकदम शान्त झाली, नव्हे ...च उठली.

...विपुल आणि सैद्धान्तिक पण लालित्यप्रचुर लेखन

वक्तृत्व आणि विवादकौशल्य या इतकेंच लेखन ...हिर्लेकरशास्त्री यांचा निरंतरचा उद्योग होता. ...समर पुरेसा धंदा, मध्यरात्रींपर्यंत स्नेहीमंडळींत बैठक, या गोष्टी न चुकतां झाल्यावर तेथून पुढें शास्त्रीबुवांची लहर लिहिण्याची लागे. पण अशा वेळांत त्यांनीं आजवर शेंकडों पृष्ठांचें लेखन केलें आहे. आणि तें आयुर्वेदाच्या त्रिदोष आणि द्रव्यविज्ञान यासारख्या मूळ अधिष्ठानावरचें असल्यानें रात्रीं-बेरात्रीं लिहिलेलें हें लेखनहि इतकें मौलिक, साधार, काटेकोर, मुद्देसूद आणि युक्तिवादपुरःसर लिहिलेलें आहे कीं, तें पाहून कोणालाहि त्यांच्या सर्वंकष बुद्धिमत्तेचा चमत्कार वाटावा. त्यांच्या परिणतप्रज्ञेइतकाच भाषाशैलीचा, काव्यप्रचुरतेचा आणि संस्कृतावरच्या प्रभुत्वाचा नमुना म्हणून 'शारीरं तत्वदर्शनम्' चें उदाहरण देतां येईल. यांतील "सामर्थ्येन विना कार्यं न किंचित् संभवत्यपि" । "द्रव्याधारं विना शक्तिरवस्थातुं न शक्नुयात् । नैव शक्तिर्द्रव्यहीना कदाचिदुपलभ्यते ॥ द्रव्यं शक्तिविहीनं च न किंचिदुपलभ्यते" । "नायुर्वेदविज्ञानं दोषज्ञानादृते भवेत्" ॥ "शक्तिरूपं

—:: सेवा ::—

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुणकारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते.

अशी सेवा करण्यासाठीं उत्तम व अस्सल औषधेंच वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान—

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) हेंच आहे.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शक्तियुक्तं शक्तिहीनं तथैव च। शरीररूपं त्रिविधं दोषधातुमलाव्हयम् ” ॥ “ संग्राहकः पाचकश्च तृतीय– स्तु विसर्जकः। श्लेष्मा पित्तं वायुरिति त्रयस्ते परि– कीर्तनाः ”॥ “ एवं शरीरावयवः क्रांतिरूपोऽवतिष्ठते। जीवित्वे न स्थिरत्वं स्यात्क्रान्तिरूपं हि जीवितम्॥ ” इत्यादि सूत्रें केवढा शास्त्रीयार्थ नेमक्या आणि सुट– सुटीत भाषेत दाखवितात! शास्त्रीबुवांच्या बुद्धि– वैभवाची मुळांतूनच जिज्ञासूंनीं ओळख करून घ्यावी. असो.

आयुर्वेदीय जगतावर महान् आघात

अशा अनेक आठवणी काढीत बसून पत्रिकेची किती जागा अडविणार? माझा तर आधार गेलाच, पण आयुर्वेदीय नभोमंडलांतील अत्यन्त दैदीप्यमान् तारक निखळल्यानें आधींच आपदा भोगीत अस– लेल्या आयुर्वेदजगतावर केवढा आघात झाला, हा विचार राहूनराहून मनांत येऊन मन अत्यंत व्याकुळ होतें. श्रीधन्वंतरि, त्यांच्या हयातभरच्या निष्ठेचा मोबदला म्हणून, त्यांना सद्गति देईल यांत शंका नाहीं. पण त्यांचे अभावीं आयुर्वेदाच्या या पडत्या काळांत आमची काय गति होईल, हाच आमच्या आयुर्वेदीयां- पुढचा विचार मला तरी बेचैन करतो. त्यांच्यासारखे शास्त्राचें मूलगामी अध्ययन केलेले पंडित आतां दुर्मिळ होऊं लागले आहेत. त्यांच्याच संप्रदायांत एक वैद्य– भूषण गणेशशास्त्री यांचेशिवाय दुसरा पाढिक पंडित उरला नाहीं.

एकंदरींत चालू असलेली आयुर्वेदाची दुरवस्था, पण त्याविषयींची बहुतेक वैद्यांची उदासीनता, ही लक्षांत घेतां आयुर्वेदाच्या भवितव्यांत काय आहे, हें श्रीधन्वतरीलाच माहिती !

वैद्य काकासाहेब पुराणिक, पनवेल

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचे खजिनदार व पनवेल येथें भरलेल्या प्रांतीय वैद्य संमेलनाचे स्वागता- ध्यक्ष वैद्य म. वि. तथा काकासाहेब पुराणिक हे स्वित्सर्लंडमध्यें भरणाऱ्या नैतिक प्रतिष्ठापनेच्या जाग- तिक शिबिरांत भाग घेण्यासाठीं परदेशी गेले आहेत.

वाचकांचा पत्रव्यवहार

अनुभूत योग संग्रह

“ आयुर्वेद-पत्रिकेचा पटवर्धन विशेषांक पाहून फार आनन्द झाला. त्यांचे निदान पद्धति व चिकित्सा पद्धतीबद्दल बरेच विस्तृत्व विवेचन पाहिजे. तसेंच त्यांनीं कानडींत प्रकाशित केलेला “ अनुभूत योगसंग्रह ” मराठींत प्रकाशित होण्याची शक्यता आहे किंवा नाहीं? त्याबद्दल आपण समक्ष चर्चा केली असेल. त्यांचेकडून प्रकाशित होणें नसेल तर आपण तें कार्य सेवा संघामार्फत करणें शक्य आहे कां? त्यांना वरचा खुलासा विचारला आहेच. समक्ष चर्चेंत विचार झाला असल्यास प्रकाशित करण्याचा खुलासा करावा.

बाकी आपल्या अध्यक्षकार्यास आपण हिंमत व तेंच कार्य करतांना कंटाळा न मानतां आपलें कार्य उत्कृष्टपणें पार पाडलें, याबद्दल मी आपलें अभिनंदन करतों, व धन्यवाद देतो. आपला

चिनावल वैद्य मोतीराम ल. ठोंबरे

होमिओपाथिक चिकित्सापद्धति

[किं. २॥ रु. ट. ख. निराळा]

१ वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

२ मे. काणे बंधु, टिळक चौक-कल्याण

सुप्रसिद्ध मिरज मिशन हॉस्पिटलांत पसंत करून डॉ. आरवटगी यांनीं सर्टिफिकेट दिलेलें शुद्ध वनस्पतिजन्य इसब, गजकर्ण त्वचारोगावर

“ भोसकी लोशन ”

(रजिस्टर्ड) वापरा.

पत्ताः–भोसकी लोशन फार्मसी

मु. पो. हलकर्णी (कोप) जि. बेळगांव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दंभ-चिकित्सा [डाग देण्याचा उपचार]

(लेखकः-वैद्य म. द. करमरकर, मिरज)

आमच्या घराण्यांत आज अनेक वर्षें दंभ-चिकित्सा चालूं आहे. रोग-चिकित्साकर्मांत औषधोपचार, शस्त्रप्रयोग, क्षारकर्म वगैरे प्रयोगांनीं जे रोग बरे झाले नाहींत ते ह्या अग्निकर्मानें बरे होतात. कारण अग्नीनें दग्ध झालेले रोग पुनः होत नाहींत.

अग्निकर्माकरितां उपकरणें

अग्निकर्माकरितां अनेक उपकरणें वापरतात. विशेषतः सोनें चांदी, लोह, यांच्या निरनिराळ्या आकाराच्या शलाका कराव्या लागतात. कांहीं वेळां ऊसकाठीचासुद्धां अग्निकर्मांत उपयोग होतो. कांहीं औषधी मात्रा, अग्निकर्माकरितां वापरतात. विशेषतः पोट, छाती, नेत्र ह्यांच्या रोगांकरितां पांढरी-माती, चिकणमाती, वारुळाची माती, राख इतके सर्व समप्रमाणांत घेऊन वस्त्रगाळ करावेत व पाण्यांत भिजवून मात्रा तयार करावी व ती ओली मात्रा अग्नीमध्यें भाजून चिंच्याच्या तेलामध्यें त्रिझवावी. असें निदान तीन चार वेळां तरी विझवावे लागते तेव्हां ती मात्रा तयार होते. ही मात्रा करडीच्या तेलाच्या दिव्यावर तापवून (मात्रेस तेलाचा अंश लावावा) डागावे. डाग देतांना मोठी खबरदारी घ्यावी लागते. रोग्याचें बलाबल व रोगाचें आश्रयस्थान, त्वचेचा हलकेपणा, दुःखाचें मर्म, डागाची खोली इत्यादि विचार अग्निकर्म करतांना अवश्य लक्षांत घ्यावा लागतो.

अग्निकर्मानंतर रुईचा चीक लावावा

रोग्यास त्वचेपर्यंत, रक्तापर्यंत, मांसापर्यंत, अस्थीपर्यंत डाग द्यावे लागतात. रोग्यास डागतांना त्याच्याशी उष्णता ध्यानांत घ्यावी लागते. कांहीं वेळां शलाकेचा रंग व विस्तवाचा रंग एक व्हावा लागतो. कांहीं वेळां विस्तवांतून शलाका बाहेर काढला म्हणजे काळी व्हावी लागते. चर्मच नुसतें डागावयाचें असतें त्यावेळीं डाग दिल्यानन्तर कर्कश असा आवाज होतो व त्यानन्तर डाग खोल द्यावयाचे त्यावेळीं डागांतून 'धूर, व करपट वास' येतो. तेल, तूप वगैरे पदार्थ गरम करून उकळी आणून अग्नि-कर्म करतात, परन्तु इतर कोणत्याहि अग्निकर्मापेक्षां डाग देणें हें केव्हांहि श्रेष्ठ आहे. उन्माद किंवा दीर्घ-काल असलेल्या अन्य रोगांत अग्निकर्म केल्यानन्तर त्या डागावर रुईचा चीक लावावा लागतो. त्यामुळें ते डाग वाहतात व ते डाग जितके वाहतील तितक्या लवकर रोगशांति होते. उन्मादामध्यें डाग देण्याबरोबर

मानेच्यावरील कातडें हाताच्या चिमटीनें धरून रेशीम सुईनें टोंचून ओवून घ्यावें लागतें व त्या जखमेवर रुईचा चीक घालावयाचा व रोज तें रेशीम मानेंतून पुढें मागें हलवावें लागतें. त्यामुळें उन्मादासारख्या रोगाची शान्ति फार लवकर होते.

जेवणापूर्वी कीं नंतर

स्निग्ध व पौष्टिक अन्न खाण्यास घालून अग्नि-कर्म केलें असतां रोग्यास त्रास कमी होतो; परन्तु मुत-रोग, मुतखडा वगैरे रोगांवर जेवणापूर्वी अग्निकर्म करणें फायद्याचें ठरतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रोगानें क्षीण झालेल्या मनुष्यास डाग दिल्यानें त्याचा प्राण व्याकूळ होण्याचा संभव असतो. या करितां कोणत्याहि रोगावर डाग देणें झाल्यास अनुभव घेतलेल्या वैद्यानें फार विचार करून डाग द्यावा.

अग्निकर्मानें बरे होणारे रोग

अग्निकर्म केल्यानंतर त्या रोग्यास आहाराचें पथ्य फारसें पाळावें लागत नाहीं. जसा रोगाचा ज़ोर असेल त्याप्रमाणें डाग बरे होण्यास कमी जास्त वेळ लागतो. साधारणपणें पंधरा ते वीस दिवसांत डाग बरे होतात. कांहीं रोगांत पुनः थोड्या दिवसाच्या अंतरानें डागावें लागतें. कामला, पांडुरोग, अतिसार, संग्रहणी, फुफ्फुसावरणशोथ, अपस्मार, धनुर्वात, अंडवृद्धि, उदर, उन्माद, गुल्म, शूल, हाडांतील सूज, नेत्ररोग, पान्थरी, सन्निपात, क्षय, प्रमेहावाचून होणारी कोणत्याहि प्रकारची शरीरावरील गांठ, भगंदर, घामकीळ, वगैरे रोगांवर अग्निकर्म यशस्वी होतें.

ज्यांच्यावर दंभ चिकित्सा केली आहे अशा कांहीं रुग्णांची हकीकत पुढें दिली आहे.

पार्श्वशूल

श्री. शामराव जिरगाळे, वय ३५:- २-३ वर्षें कमरेमध्यें वरचेवर दुखत असे. थोडेसें श्रमाचें काम केलें कीं हें दुखणें असह्य होई. यांवर अनेक उपचार करून पाहिले, पण कशानेंहि गुण आलेला नव्हता. रुग्ण अगदीं कंटाळून गेला होता. पुढें पुढें चालतांना, बोलतांना, खोकतांना हें दुःख असह्य होत असें. त्यामुळें निरुत्साह, झोंप कमी, जरा झोंप लागली कीं, दुःखानें दचकून जागें होत असे. जाग आल्यानन्तर झोंप येत नसे. रुग्णास आतां माझें कम्बरेंतील दुखणें कमी होत नाहीं, असें सारखें वाटत असें. मालिश चिकित्सा करून घेण्यासाठीं हा रुग्ण मजकडे आला. परन्तु ह्या जुनाट रोगांत आपण 'मसाज' ऐवजीं दंभप्रयोग करावा असा सल्ला दिला व तो त्यानें मानला.

दुःखाचे जागीं व योग्य तीं मर्में धरून अग्निकर्म केलें. अग्निकर्म पूर्ण झालें त्याच वेळीं आराम वाटला. १०-१५ दिवसांत डाग पूर्ण बरे झाले. आतां कम्बरेमध्यें कोणत्याहि प्रकारचें दुःख नाहीं. रुग्ण उत्तम स्थितींत असून सर्व तऱ्हेची शारीरिक कष्टाचीं कामें करतो.

बरगडीखालील गांठ

श्री. द. रा. परांजपे सातारा, वय ५८:- चार पांच महिन्यापूर्वीं विषमज्वर झाला. ताप सतत महिना दीडमहिना येत होता. नन्तर हळूंहळूं ताप कमी झाला. परंतु अशक्तपणा फार होता. शरीर थकल्या सारखें होत होतें. नंतर थोड्याच दिवसांत डाव्या बरगडीखालीं खारकेच्या बी सारखी लांबट गांठ उत्पन्न झाली व दिवसेंदिवस ती गांठ मोठी होत होती. त्यामुळें उठतांना, बसतांना, खालीं वाकतांना त्रास होत होता, व त्या गांठीकडे सारखें लक्ष होतें. जसजसें त्या गांठीचें दुःख वाढत गेलें तसतशी रुग्णास काळजी वाटूं लागली. मी त्यांना दंभप्रयोगाचा सल्ला दिला. त्यांनीं तात्काळ त्यास मान्यता दिली.

दुःखाचीं मर्में व डाग किती खोल द्यावयाचा याचा संपूर्ण विचार केला व अग्निकर्म केलें. १५ दिवसांत डागाच्या खपल्या पडल्या. जरी खपल्या पडल्या तरी ते डाग आंतून बरे होत असतात. तीन आठवड्यानंतर मात्र ती गांठ अजिबात जिरली व तेथील दुःख संपूर्ण बरें झालें. आतां कोणत्याहि प्रकारची तक्रार नाहीं व त्याजागीं गांठ किंवा दुःख होतें असें रुग्णास कधींहि वाटत नाहीं.

गुडघे निखळणें

श्री. प्रभाकर अनंत साठ्ये, वय २७:-(गुडघा निघाल्यामुळें होणारें दुःख व गुडघ्याची कमताकत)

हुतुतु खेळांत अत्यंत निष्णात, परंतु एक दिवस अचानक हुतुतु खेळत असतांना गुडघा सटकला. सांधा उत्तम तऱ्हेनें बसविल्यानंतर सांध्यास मोठी सूज आली. सूज वगैरे १ महिन्याभरानें कमी झाली, परंतु त्यांतील दुःख कमी झालें नव्हतें. गुडघ्यांत ताकद नाहीं असें वाटत होतें. चालतांना पुनः गुडघा सटकेल अशी सारखी भीति वाटत होती व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…वरचा विश्वास उडाला होता. पाय गुडघ्यांतून …मागें करतांना दुःख व कष्ट होत असत व …यांत अधूपणा आलेला होता. माझ्या सल्ल्या- …नें गुडघ्याच्या सर्व भागास अग्निकर्म केलें. पंधराच …वसांत डाग संपूर्ण बरे झाले. डाग वरून बरे झाल्या- …नंतर सुद्धां डाग आंतून बरे होण्यास बराच वेळ …लागतो. त्याकरितां रुग्णास ३ महिने कमींतकमी …पूर्ण विश्रांति घेण्याचा सल्ला दिला. आतां त्यांचा …पाय संपूर्ण बरा झाला असून ते हुतुतुसारखा खेळ …सुद्धां खेळूं शकतात.

नेत्रस्फुरण (पापण्या फडफडणें)

श्री. दत्तु तुकाराम लामदाडेः– जवळ जवळ …वर्षे दोन्ही डोळ्याच्या पापण्या फरफरत होत्या. …पुढें हें दुखणें इतकें झालें कीं, दुसऱ्याच्या आधारा- …शिवाय चालतां येणें कठीण होतें. उद्योगास जातां …येत नसे. आधुनिक सर्व तऱ्हेचे उपचार करून …पाहिले, परन्तु कशाचाहि उपयोग झाला नाहीं. दिवसें- …दिवस कामधंदा करणें कठीण झालें. घरची गरीबी …असल्यामुळें जीवन जगणें कठीण होतें. रुग्णाच्या …पापण्यांवर अग्निकर्म केलें.

…सर्वांनीं डोळ्यास डाग देण्यासंबंधीं रुग्णास …भीति दाखविली; परंतु रोग्यानें न घाबरतां अग्नि- …कर्म करून घेतलें. अग्निकर्म झाल्याबरोबर लगेच …पापण्यांचें फरफरणें थांबलें. कमींतकमी १ महिनाभर …विश्रांतीचा सल्ला दिला. आतां रुग्ण सर्व कामें उत्तम …रीतीनें करितो व डोळ्यास कोणत्याहि प्रकारचें व्यंग …राहिलें नाहीं.

अर्धें डोकें दुखणें

श्री. सुतार, वय ५२:- अर्धें कपाळ सारखें …दुखत होतें. त्यामुळें दृष्टीस कमीपणा आल्यासारखें …वाटत होतें. दुःखामुळें कोणतेंहि काम करण्यास रुग्ण …असमर्थ झाला होता. सारखें बेचैन वाटत होतें. दुःख …अनेक दिवसाचे असल्यामुळें तो कंटाळून गेलेला होता. …अग्निप्रयोग त्या रुग्णावर केला. अग्निकर्मानंतर त्याला …उत्तम तऱ्हेनें बरें वाटलें.

अंगठ्यांतील दुःख

श्री. भा. ल. महाबळ वय २५:- हाताच्या अंगठ्यास खेळतांना मार लागला होता. परंतु तो लागून जवळ जवळ वर्ष दीडवर्ष झालें. तरी दुःख सारखें वाटत होतें. अंगठ्यास धक्का लागला कीं, असह्य दुःख होत असे. हातानें लिहितांसुद्धा उत्तम तऱ्हेनें येत नव्हतें. हातास दंभप्रयोग केल्यानंतर १५ दिवसांनीं हात पूर्ण बरा झाला. आतां कोणत्याहि प्रकारचा त्रास होत नाहीं.

हातांच्या पंजांत दुःख व वांकडेपणा

श्री. नानासाहेब राघवेंद्र, गांठ बाहुबली वय ५२:-उजव्या हाताच्या सर्व बोटांस मार बसला होता. ८ महिने त्रास होत होता. दुःख असह्य होत होतें. सर्व तऱ्हेचे उपचार करून सुद्धां दुःख कमी झालें नाहीं. हातानें तांब्या उचलतां येत नव्हता. भोजन करतां येत नव्हतें. हातांची मूठ वळतां येत नव्हती. वेदनामुळें बेचैन होतें. उजव्या हातानें कोणतीहि गोष्ट करतां येत नव्हती. सर्व बोटांच्या पेऱ्यांना योग्य ती हाताची जागा पाहून अग्निकर्म केलें. हात आतां पूर्ण बरा झाला आहे. ते बाहुबली येथील मोठ्या संस्थेचे संचालक आहेत. हात पूर्ण बरा झाल्यानें आतां ते कोणतेंहि काम करूं शकतात.

गुडघा फिरतो

श्री. रघुनाथराव केळकर वकील, सांगली, वय २८-आज बरींच वर्षें गुडघा सरकतो व फिरतो. जिना उतरतांना चढतांना, सारखी काळजी वाटते. गुडघा सरकला म्हणजे एकादे वेळीं खालीं बसावें लागतें. नमस्कार किंवा डबलबारासारखा व्यायाम करतांना पाय शाबूत ठेवून आपण कोणतीहि गोष्ट केली पाहिजे असें वाटतें. एकदम कोणतेंहि काम करण्याचें धाडस होत नाहीं. प्रत्येक वेळीं पाय मुडपण्याची भीति वाटते. योग्य त्या ठिकाणीं अग्निकर्म केल्यानतर तो पाय उत्तम बरा झाला.

मनगटांत दुःख

श्री. गणी सुतार, वय २५:-जवळ जवळ एक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्ष होत आलें, बोजा उचलण्याचें निमित्त झालें व मनगटाला ताण आला. मनगटांतील दुःख हळूंहळूं वाढत गेलें. धंद्यानें सुतार असल्यानें हातांत कोणतेंहि हत्यार धरणें अशक्य होतें. सर्व काम बंद झाल्यानें मनुष्य निराश झालेला होता. लाइट ट्रीटमेंट घेतली परन्तु उपयोग झाला नाहीं. मनगटावर अग्निकर्म चिकित्सा केली. १५-२० दिवसानंतर ते डाग पूर्ण बरे झाले. आतां मनगटांत कोणतेंहि दुःख नसून उत्तम तऱ्हेनें सुतार काम करतो.

वातानें पाय फेंगडे पडत होते

श्री. रामभाऊ देवधर, वय २४ः- चालतांना पाय फेंगडे पडत होते. गुडघ्याला गुडघा चालतांना तटत होता. जलद चालणें, पळणें, अशक्य होतें. चालतांना रुग्ण पडेल अशी भीति वाटत होती. अग्निकर्म चिकित्सा केली. पाय उत्तम तऱ्हेनें बरे झाले.

टाचेंत दुःख

श्री. माधवराव बेडगे, वय २४ः- टांच व टांचेजवळील भागांत थोड्याशा श्रमानें भयंकर दुःख निर्माण होत असे. चालतां येत नसे, लंगडत चालावें लागे. खेळणें अशक्य होई. श्री. बेडगे चांगले खेळाडू असल्यानें त्यांना आपला हुतुतु खेळ थांबवावा लागेल अशी भीति वाटत होती. अग्निकर्मानंतर १५ दिवसांनीं पाय संपूर्ण बरा झाला. आतां ते उत्तम स्थितींत आहेत.

खांदा निखळणें

श्री. सन्मुवाले, सोलापूर, वय २८ः उजवा खांदा सारखा निखळत असे. प्रत्येक वेळीं खांदा उतरण्याची भीति वाटत होती. सारखे दुःख होई आणि कोणताहि खेळ खेळणें अशक्य होत असे. अग्निकर्मानंतर हात संपूर्ण बरा झाला.

दोन्ही गुडघे निसटले

श्री. शिवपाद बाबु एरंडोले, वय ३४ः दोन्ही गुडघे रस्त्यांत चालतांना सुद्धां निघत होते. सायकलीवर बसणें किंवा इतर अन्य कामें करणें अशक्य होतें. दोन्ही गुडघ्यांत सूज होती. गुडघा निघाला म्हणजे बसण्याचे वेळीं भयंकर दुःख होत असे. श्री. एरंडोले अगदीं कंटाळून गेलेले होते. अग्निकर्मानंतर गुडघे उत्तम बरे झाले. आतां पुनः गुडघे निघत नाहींत.

मनगटांतील दुःख

श्री. कोकाटे, वय २०ः- ४-५ वर्षे डाव्या मनगटांत दुःख होतें. अनेक उपाय करून मनगट बरें झालें नव्हतें. सर्व तऱ्हेचे उपचार करून वेदना कमी होत नव्हत्या. श्री. कोकाटे मला म्हणाले काय वाटेल तें करा पण माझें मनगट बरें होणें जरूर आहे. अग्निकर्म चिकित्सेनें मनगट संपूर्ण बरें झालें.

मनगटांतील हाड पिचल्यामुळें दुःख

श्री. वि. ज. सहस्रबुद्धे, वय. ६२ः- सहा फूट उंचीवरून श्री. सहस्रबुद्धे एका खड्यांत पडले. त्यामुळें सर्व शरीरांबरोबर मनगट दुखावलें. मनगटांतील हाड पिचल्यामुळें दुःख उत्पन्न झालें होतें. प्रथम मनगट बांधून ठेवलें. अंदाजे एक महिन्यांनंतर २आठवडे मालिश केलें. त्यानन्तर बरें होईल या कल्पनेनें ४, ५ महिने गेले; परन्तु हाड पिचलें असल्यामुळें दुःख कमी झालें नव्हतें. लिहितां येत नव्हते व हातानें कोणतेंहि काम करवत नव्हतें. अग्निकर्म चिकित्सेनंतर हात संपूर्ण बरा झाला.

आमवातामुळें गुडघा वांकडा

कु. देसाई, वय २०ः- आमवातामुळें गुडघा वांकडा झाला होता. अनेक औषधें व उपचार चालू होते, परन्तु गुडघ्यांतील दुःख कमी होत नव्हतें. दीड वर्ष दीडवर्ष उपचार चालू होते. अग्निकर्म चिकित्सा केल्यानन्तर रुग्ण चालूं लागला.

पवित्र
नेपाली कस्तुरी रु. ४४ तोळा,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोळा,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोळा,
लिहाः-नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें

लेः-वैद्य पु. वि. धामणकर
धूतपापेश्वर, पनवेल

५ चंद्रकला (४२ र. यो. सा.)

हा रस रक्तवाहिन्यांवर स्तंभक व प्रसादक आहे. ...चें मुख्य कार्य समग्र रुधिराभिसरण व रुधिर-...हिन्या यांवर शामक व प्रसादक असें होतें, त्यामुळें ...ज्यां जेव्हां रक्ताचा दाब जास्त वाढून मनुष्याच्या ...गाचा दाह आंतून व बाहेरूनहि होऊं लागतो, केव्हां ...ज्यां त्यांस चक्कर येते व तो मूर्छितहि होतो, अशा वेळीं ...चंद्रकलेचा उपयोग चांगला होतो.

सान्निपातिक ज्वरांत ज्वरोष्मा अति वाढतो, दाह ...रण होतो, अस्वस्थता अतिशय येते, डोक्यावर ...ळा बर्फ ठेवूनसुद्धां तार उतरत नाहीं, किंबहुना ...संयोगानें वातविकार होण्याची अथवा रोगी ...वण्याचाहि संभव निर्माण होतो. अशावेळीं चंद्र-...ला हें औषध अमृत ठरतें.

रक्तदाब हा विकार नवा नाहीं

आज़काल रक्ताचा दाब वाढणें व कमी होणें व ...व चक्कर, मूर्च्छा, भ्रम इ. लक्षणें होत असलेले ...रोगी पहाण्यांत येतात. सकृद्दर्शनीं असें वाटतें कीं, हा ...विकार नवा, ह्याची चिकित्सा आयुर्वेदांत असणें ...अशक्य, पण वस्तुस्थिति अगदीं भिन्न आहे. फरक ...फक्त शब्दयोजना व भाषेंत आहे. उद्रिक्त रक्तपित्त, ...मूर्च्छा इ. विकार ह्यांत बसतात. आणि ह्यांवर ...र, चंद्रकला, ताप्यादिलोह, सारिवासव, चंद्रप्रभा हीं ...औषधें उत्तम काम देतात, तर रक्तदाब कमी झाला ...असतां मकरध्वजगुटी, लक्ष्मीविलास, सुवर्णमालिनीवसंत ...हीं औषधें चांगलीं कार्यक्षम ठरतात.

चंद्रकलेचे आणखी विविध गुण आहेत. पण ...तील ज्वरोष्मा, अति रक्तदाबवाढ अशा परिस्थितींत ...खात्रीचें व हुकमी काम देणारें हें औषध असल्यानें ...अवश्य संग्राह्य ठरतें.

चंद्रकलेचा संस्कृत पाठ

प्रत्येकं तोलमादाय सूतं ताम्रं तथाभ्रकम् ।
द्विगुणं गंधकं चैव कृत्वा कज्जलिकां शुभाम् ॥
मुस्तादाडिमतोयेन केतकीमूलवारिणा ।
सहदेव्याः कुमार्याश्च पर्पटोशीरमागधीः ॥
श्रीखण्डं सारिवा चैषां समानं चूर्णकं क्षिपेत् ।
द्राक्षाफलकषायेण सप्तधा परिभावयेत् ॥
छायाशुष्कं विधायाथ वटी कार्या चणोपमा ।
महाचन्द्रकला नाम्ना रसेन्द्रोऽयं निरूपितः ॥
अम्लपित्तप्रशमनः प्रदरध्वंसकारकः ।
अन्तर्बाह्यमहादाहविध्वंसनमहाघनः ॥
ग्रीष्मकाले शरत्काले विशेषेण प्रशस्यते ।
रक्तमूर्च्छारक्तपित्तपित्तज्वरदवानलः ॥
मूत्रकृच्छ्राणि सर्वाणि प्रमेहानपि दुस्तरान् ।
हरत्येष रसो नूनं देहे चन्द्रकलाप्रदः ॥

—र. यो. सा. ४२

नांव :— चांदण्यांत बसल्यानें दाह तेव्हांच थांबतो. त्याप्रमाणें चंद्रकला सेवनानें पित्ताचा उपशम झटकन् होतो. म्हणून हें नांव उपमात्मक असें दिलें आहे.

पाठनिश्चितिः—चंद्रकला ह्या नांवानें रक्तपित्त, मूत्रकृच्छ्र, प्रमेह आणि ज्वर या रोगांचे चिकित्सेंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेक योग आले आहेत. रोगभेदानुसार पाठांतहि आवश्यक तो फरक आहेच. पित्त हा दोष, रक्त हें दूष्य आणि तज्जन्य रोगांवर चालणारा असा हा पाठ येथें उध्दृत केला आहे. पाठ शुद्ध व निःसंदिग्ध आहे.

द्रव्यसंग्रह गटः—(१) १ पारा, २ गंधक, १ ताम्रभस्म, १ अभ्रक भस्म.

(२) पित्तपापडा, वाळा, पिंपळी, चंदन, उपळसरी, १।१ भाग.

भावनाद्रव्य-गट (१) नागरमोथा, डाळिंब, केवडा, सहदेवी, कोरफड. (२) द्राक्षें.

द्रव्यनिर्णय

पारा-हिंगुलोत्थ. गंधक-आमलसार. अभ्रक-वनस्पतिमारित. ताम्र-वनस्पतिमारित. वाळा-विवळा. पिंपळी-लेंडी. चंदन-पांढरा. सारिवा-काळी.

नागरमोथा-कंद-हिम. केवडा-कणिस-पान-हिम. डाळिंब-फळांतील दाण्यांचा रस. सहदेवी-पंचांग स्वरस. कोरफड-पांढरा बलक. द्राक्षें-मनुकांचा काढा.

सांइ
डायाबेटॉल
मधुमेहावर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द.कृ.सांइ ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई.

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

द्रव्यशोधनः— शोध्य- शोधक
पारा- लसूण.
गंधक- तूप, दूध.

प्रक्रिया :— प्रथम द्रव्यसंग्रह गट नं. १ मधील पारागंधकाची कज्जली करून घेणें. मग त्यांत ताम्र व अभ्रकभस्म घालून पुनः मर्दन करणें; नंतर त्यास भावगट नं. १ च्या ७।७ भावना देणें. मग द्रव्यसंग्रह गट नं. २ त्यांत मिसळणें व शेवटीं मनुकांच्या काढ्याच्या ७ भावना देणें. व हरभऱ्याएवढ्या गोळ्या करून सावलींत अथवा चांदण्यांत वाळविणें.

काल :— साधन-शरदऋतु-मर्दन-४ महिने.

सिद्धिप्रमाण :—(१ तो. पारा) १६ तो. औषध

परिगणन :— अभ्रक व ताम्र प्रमाण मोजणें.

रोग :— अम्लपित्त, प्रदर, अंतर्दाह, बहिर्दाह, भ्रम, महादाह, रक्तजन्यमूर्च्छा, रक्तपित्त, पित्तज्वर, वणवा (वाढता अगर पसरता दाह), अग्निविसर्प, सर्व प्रकारचीं मूत्रकृच्छ्रें व कष्टसाध्य प्रमेह.

मात्रा — १।१ गोळी.

रोगपरत्वें अनुपानें-

रक्तपित्त-सुधारस.
अम्लपित्त-मोरावळा, डाळिंबपाक.
प्रदर-केळें, आंवा.
प्रमेह-जांभूळ.
अग्निविसर्प-गुलकंद.
ज्वर व दाह-द्राक्षारस, चंदनसरबत, गुलाबसरबत, वाळासरबत, सारिवासरबत.
मूत्रकृच्छ्र-धान्यपंचक.
रक्तातिसार-बेलफळ व आंवा.
भ्रम-आंवा.

विशेष— शरद व ग्रीष्मऋतूंत होणाऱ्या सान्निपातिक ज्वरांत अगर पित्तप्रधान विकारांत विशेष प्रशस्त.

टिप्पणीः— पाठभेद
(४२ र. यो. सा.) (१८८५ भा. भै. र.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केतकीमूलवारिणा	केतकीस्तनवारिणा
मागधी	माधवी
द्राक्षाफलकषायेण	द्राक्षादिककषायेण

रसयोगसागरांतला पाठ निःसंदिग्ध व स्पष्ट ... भारत भैषज्य रत्नाकरांतलासुद्धां पाठ शुद्ध आहे. ...त्यांतील कांहीं शब्दांचे अर्थ अनेक व संदिग्ध ..., तेवढे येथें स्पष्ट करीत आहे.

केतकीमूल कीं स्तन

केवड्याचे कणीसांतला भाग पाण्यांत कोळला ...त्याचा द्रव दुधासारखा घन व पांढरा होतो. दूध ...तुल्य म्हणून त्या भागाला स्तन हें नांव दिलें गेलें ... भावनेकरितां त्याचाहि उपयोग करण्यास ...स नाहीं. पण त्यापेक्षां मुळांचा हिंम व त्याहिपेक्षां ...ड्याच्या कणसाच्या पानांचा हिम अधिक दाह-...क म्हणून येथें तो घेण्यास सांगितला आहे.

केवड्याला कणीस येत. व घायपाताला एक ...दांडा येतो. व त्याचे टोंकाला फुलांचा तुरा ...लेला असतो. घायपात व केवडा यांत पानांचें ...साम्य आहे. त्यामुळें घायपातालाच केवडा सम-...त्यामधील दांडा केतकीस्तन म्हणून कांहीं लोक ...तात. पण ही समजूत चुकीची आहे. केतकीस्तन* ...म्हणजे केवड्याचें कणीस होय.

मागधी कीं माधवी ?

मगध देशांत होणारी ती मागधी. पिंपळी, ...शोप, वेलची, जिरे, जाई, जुई, जीवंती ह्या ...त्यांना मागधी संज्ञा आहे. पण येथें मागधी शब्दानें पिंपळीच घेणें इष्ट ठरतें. कारण दाहशामक शीतयोगांत एखादें पाचनद्रव्य हवेंच असतें. भा. भै. र. पाठांतहि पिंपळीबदली कुटकी घेतली आहे. तेव्हां तेथें मागधीऐवजीं माधवी शब्दयोजना केली तीहि युक्तच आहे. माधवी म्हणजे मोगरा, बडिशोप, बाळंतशोप. कुटकीच्या विरेचन कार्याला अवरोधक म्हणून असें एखादें द्रव्य तेथें हवेंच आहे.

द्राक्षाफल कीं द्राक्षादि

द्राक्षादिक म्हणजे द्राक्ष, डाळिंब, केळ, ताडगोळा, बेलफळ, आंबा, जांभूळ. द्राक्षाच्या रसाच्या सात भावना दिल्या तर तो कल्क वाळत नाहीं. त्यास बुरा येतो व तो केव्हां केव्हां आंबतोहि. त्यामुळें द्राक्षाफलरस शुष्कत्व व टिकाऊपणा इ. दृष्टीनें येथें युक्त ठरत नाहीं. जांभूळ प्रमेहांत युक्त तर मूत्रकृच्छ्रांत विरोधी. ताडगोळा स्पर्शानें शीत तर वीर्यानें उष्ण; तसाच तो गर्भपातकरहि आहे. केळ प्रदरांत उपयुक्त, तेंच ज्वरांत पचायला जड म्हणून विरोधी. द्राक्षादि वर्गांतील कांहीं पदार्थांबाबत असे दोष उपस्थित होत असल्यानें द्राक्षादिपेक्षां द्राक्षाफलकषाय हाच पाठ सोयिस्कर ठरतो. द्राक्षादि वर्गांतील पदार्थ तत्तद्रोगहर अनुपान म्हणून अवश्य योजावेत.

धान्याश्रयं कीं पोताश्रयं ?

हा एक पाचनविधिप्रकार आहे. हा विधि चतुर्मुख, चतुर्भुज इ. रसायनांबाबतहि सांगितला आहे. तोच आधार येथें मान्य करून तेथें सांगितलेला विधि चंद्रकलेबाबतहि करावा.

तो विधि असाः- रसायनाचा भावनाविधि पुरा होतांच त्याचा घट्ट गोळा एरंडाचें पानांत गुंडाळून तो कच्च्या दोऱ्यानें बांधून तो गोळा तीन दिवस धान्यराशींत पुरून ठेवावा. व तदनंतर तो बाहेर काढून त्याच्या गोळ्या कराव्यात.

पोतः- वृक्षाची ढोली, तळघर, कापड.

हेतु व विधि वर दिल्याप्रमाणेंच.

---

* ['केतकीस्तन म्हणजे केवड्याचें कणीस' ...असें विधान येथें केलेलें आहे तें सर्वांना मान्य ...होण्यासारखें नाहीं. वाई (जि. सातारा) जवळ धोम ...या गांवीं गेलो असतां तेथें नदीकाठच्या बगीच्यांत ...जवळ केतकीस्तन पहावयास मिळाले. चांगल्या ...वाढलेल्या जुन्या केतकी वृक्षाला वडाच्या पारंब्या ...प्रमाणें लोंबते पण बरयासारखे जाड असे सोठ फुट-...तात. यांना केतकीस्तन ही संज्ञा अधिक समर्पक ...होईल असें वाटतें. -संपादक]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

वाचकांचा पत्रव्यवहार—

तृणज्योतिष्मती

"तृणज्योतीसंबंधीं माझ्याकडेहि पुष्कळ पत्रें येत आहेत. सर्वांना नमुना पाठविणें शक्य नाहीं. या तृणज्योतीचें परीक्षण तज्ञांकडून केलें जात आहे. निश्चित गुणधर्मांचा पत्ता लागतांच जाहीर करण्यांत येईल.

श्री. रुद्रभटे यांनीं केलेल्या वर्णनापैकीं 'रात्रौ प्रकाशते नित्यं तृणेन सदृशं भवेत् ।' हें लक्षण आमच्या जवळच्या तृणज्योतींत आहे. ती जितकी अधिक स्वच्छ पाण्यानें धुवावी तितकी अधिक प्रकाशते. दिवसा गडप अंधकार केला तर ती दिवसाहि दिसते; पण दुधांत घातली असतां 'तत्क्षणात् जायते रक्तं' हें लक्षण मुळींच लागू नाहीं. दुधांत टाकली असतां दोनतीन तासांत दूध जमतें.

कदाचित् या दुधाचे अंगीं रक्ताचे गुणधर्म येत असतील. आणि म्हणूनच मनुष्याची जीवनम… वाढून तो 'सप्तरात्रप्रयोगेण बलीपलितवर्जि… होत असावा.

या तृणांत संकल्पसिद्धीचा अद्भुत … प्रत्ययास आला आहे.

वैद्यराज छांगाणी यांना ही ज्योति दाखवि… तेव्हां त्यांना फार आनंद झाला. ते म्हणाले "रा… प्रकाशणाऱ्या तृणाचें वर्णन मी कपोलकल्पित… समजत होतो."

श्री. ग. कृ. पाटणकरांशीं माझा पत्रव्यवहा… चालू आहे. मी लवकरच तृणज्योति घेऊन त्यां… भेटण्यासाठीं किनईस जाणार आहे. त्यावेळीं नाशका… उतरून आपली भेट घेईन. तृणज्योतीसंबंधीं आप… कांहीं शास्त्राधार अवलोकनांत आला तर कळवा.

वनवासी सेवा मंडळ
मंडला (मध्यप्रदेश)

आपला
नाना वापट



Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जंतु-चिकित्सा :

ले.:-श्री. चंद्रशेखर गणेशशास्त्री जोशी
एम्. एस्सी.

पाश्चात्य वैद्यक शास्त्रांत जंतुशास्त्र हें फार ...वावें होऊन बसलें आहे. पाश्चात्य देशांत तर ...ताहि रोग झाला तरी लगेच त्या रोग्याचे शरीरांत ...ते जंतु दिसतात हें, त्याचें मलमूत्र, थुंकी, रक्त ...परीक्षणांनीं पहाण्याचा प्रयत्न केला जातो, व ...रून रोगाचें निदान निश्चित करतात. नवीन ...नेत अतिसूक्ष्म-दर्शक यंत्रें (Ultra-micro-scope सारखीं) हाताशीं असल्यानें सूक्ष्म, सूक्ष्मतर जंतूंचाहि (कांहीं जंतू ०·५ मायक्रॉन म्हणजे एका मिलिमीटरचा २००० अंश भाग एवढ्याच आकाराचे असतात.) अभ्यास करतां येऊं लागला. चिकित्सेंत जंतुशास्त्राचा अभ्यास अटळ झाला. सर्व रोग जंतूमुळें होतात व हे जंतु मेले कीं रोग आपोआप नाहींसे होतील, हें मूळ तत्व धरून चिकित्सा केली जाते. जंतुशास्त्राची जिज्ञासा असणाऱ्या वाचकांनीं ‘ Man, Microbe & Malady ’ (मनुष्य, जंतु व रोग) हें डॉ. जॉन ड्रिग यांचें पुस्तक वाचावें.

विचारप्रवाह बदलत आहे

जंतुशास्त्राचा हा अभ्यास जसजसा वाढत आहे तसतसा तत्संबंधीं कांहींसा विचारप्रवाहहि बदलत आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ‘ सायन्स डायजेस्ट ’ मध्यें ...विषयीं थोडी उद्बोधक माहिती प्रसिद्ध झाली आहे.

तो एक बनाव असतो

जंतुशास्त्रज्ञ अगदीं स्पष्टपणें कबूल करतात कीं, ...जर जंतु मेलेले (अगर रोग नाहींसा झालेला दिसला) आढळले तरी ते खरोखरच मेले (अगर रोग नाहींसा झाला) किंवा परिस्थिति बदलतांच ते परत वाढूं लागतील कीं काय हें नक्की सांगतां येत नाहीं. ...ज्यावेळीं आपण जंतु मेले (रोग बरा झाला) असें समजतों त्यावेळीं खरें म्हणजे जंतूंनीं आपल्या संरक्षणार्थ केलेला तो एक बनाव असतो व वेळ येतांच ते ...जलदी वाढूं लागतात.

जंतूंची वाढण्याची प्रत्यक्ष क्रिया संपली कीं, ते मेले असें समजलें जातें. तथापि त्यांचें जनन व मरण हीं स्थित्यंतरें इतकीं नाजूक व सावकाश असतात कीं त्या क्रिया उलटसुलट एका विशिष्ट अवस्थेपर्यंत (कीं जी अवस्था अजून ओळखतां येत नाहीं) होऊं शकतात. कांहीं वेळां जंतूंचे वाढींत अडथळा उत्पन्न करणारें द्रव्य नाहींसें झालें तर सुप्तपणाचें ढोंग घेतलेले जंतु परत वाढीस लागतात. अगर जंतूंनीं एक जागा बदलून दुसरी जागा घेतली तरी ते वाढतात. अशीं कांहीं उदाहरणें अलिकडे एतद्देशीय व परदेशीय वैद्यकीय पत्रांतून पुष्कळच पहावयास सांपडतात. आम्हीहि त्यांतील कांहीं उदाहरणें इतरत्र प्रसिद्ध केलीं आहेत.

तज्ज्ञापुढें उत्पन्न झालेला गोंधळ

स्ट्रेप्टोमायसीन हें क्षयावर रामबाण म्हणून वापरतात. परन्तु, अगदीं ताज्या ‘ ब्रिटिश मेडिकल रिसर्च कौन्सिल ’ चे अहवालांत म्हटलें आहे कीं,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांहीं क्षयाचे जन्तु हे स्ट्रेप्टोमायसीन असलेल्या माध्यमांतच जलदी वाढतात, उलट त्याचें अभावीं ते जन्तु मरतात. फुफ्फुसजन्य क्षयांत हल्लीं रोगी बरा करण्यासाठीं शस्त्रक्रिया करून फुफ्फुस अगर क्षयजंतूंस बळी पडलेला भाग काढून टाकण्याचा प्रघात आहे. फुफ्फुसें तपासून पाहतां त्यांत अगर थुंकींतहि क्षयजंतु सांपडतात. तथापि ते जन्तु वाढविण्याचा प्रयत्न केल्यास त्यांची वाढहि होऊं शकत नाहीं. तेव्हां तज्ञांचे पुढें असा गोंधळ उत्पन्न होतो कीं, हे जन्तु खरोखरच मेले आहेत कीं विशिष्ट अवस्थेनन्तर परत वाढूं शकणारे आहेत ? जर ते मेलेले आहेत व वाढूं शकत नाहींत असें समजलें तर शस्त्रक्रिया करून रोग्यास त्रास देण्यांत काय अर्थ ?

कॅन्सरला कारणीभूत अतिसूक्ष्म जन्तु

कॅन्सरसारख्या दुष्ट विकारांतहि असेंच म्हणतां येईल. डॉ. ड्युरॅन रेनॉल्डस (सुप्रसिद्ध स्कूल ऑफ मेडिसिन, येल युनिव्हर्सिटीमधील प्राध्यापक) यांचें मतें कॅन्सरला कारणीभूत होणारे अतिसूक्ष्म जन्तु हे गर्भावस्थेंत सांपडून देखील पुढें म्हातारपणापर्यंत त्याचे दृश्य परिणाम समजत नाहींत.

जीवाणु - नाशकांचें कार्य

जीवाणुनाशकें (Antibiotics) हीं तर बहुतांशीं जन्तूंच्या वाढीस केवळ अडथळा करणारीं आहेत असें म्हणावें लागेल. जीवाणुनाशकांच्या थोड्याशा मात्रेनें रोगजंन्तूस उत्पन्न झालेला अडथळा (त्याचबरोबर, आवश्यक असलेल्या जंतूनाहि अडथळा केला जातो) जीवाणुनाशक देण्याचें बंद केल्यास नाहींसा होतो व परत जंतुवाढ संभवते. तें जादा दिलें गेलें (नेमकें किती द्यावें लागेल हें नक्की होत नसल्यामुळें) तर विषार उत्पन्न करितें.

रोग नाहींसा झाला !

सारांश जंतु मेले (रोग नाहींसा झाला) अगर नाहीं, याचा नेमका उलगडा अजून शास्त्रज्ञांस होऊं शकत नाहीं.

जादुसारखा तत्काळ प्रभाव करणाऱ्या, व केव्हांहि न बिघडणाऱ्या
गुणदायी इंजेक्शनांचा वैज्ञानिक नवा शोध, म्हणजेच

मार्तंड आयुर्वेदिक इंजेक्शन्स् !

भारतांतील सर्वांत मोठी, त्याचप्रमाणें आधुनिक यंत्रसामुग्रीनें सुसज्ज मार्तंड फार्मास्युटिकल् लॅबॉरेटरीमध्यें, अनुभवी व उच्च आयुर्वेदिक शिक्षण घेतलेले तज्ज्ञ व कर्तबगार पाश्चात्य शिक्षित वैज्ञानिक तज्ज्ञ अशा उभयतांनीं मिळून सत्वर व हमखास गुणकारी अशा नवीन आयुर्वेदिक इंजेक्शनांचा शोध लाविला असून, तीं जादुसारखीं काम करणारीं व कायम गुण देणारीं अशीं आहेत. यांची बरोबरी ॲलोपॅथिक इंजेक्शनें करूं शकत नाहींत.

संशोधनाचें, मनाला पटणारें व पुष्कळच ज्ञान देणारें वाङ्मय मोफत मागवा. आमच्या इंजेक्शनांवर कोणत्याहि प्रकारचा प्रतिबंध नाहीं. आमच्या विद्वान् तज्ज्ञांनीं आमच्या इंजेक्शनांचीं उत्कृष्टता, आयुर्वेदिक शास्त्रीयता व विशुद्धता, प्रांतीय तसेंच केंद्रीय सरकारी औषधीतज्ज्ञांचे समोर सिद्ध केली आहे. एतदर्थ ह्यावर ड्रग कंट्रोल ॲक्ट लागूं नाहीं.

सर्वत्र एजंटांची जरूरी आहे. आजच पत्र पाठवा !

निर्माते व संशोधकः- **मार्तंड फार्मास्युटिकल्स्** बडौत S. S. R. (उत्तर प्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुवर्णराजवंगेश्वराचा योग्य पाठ कोणता ?

लेखकः— श्री. मा. या. व्यवहारे बी. एस्सी. (फार्म केम्)

सुवर्णराज-वंगेश्वरांचे पाठ (fomulaes) निरनिराळ्या आयुर्वेदीय पुस्तकांत निरनिराळे दिले आहेत व त्यामध्यें योग्य पाठ कोणता हें नक्की न झाल्यामुळें कोणत्या पाठाप्रमाणें सुवर्णराज-वंगेश्वर तयार करावा हा प्रश्नच पडतो. कारण, त्यांच्या घटकांचे प्रमाणें निरनिराळीं आहेत; त्यामुळें त्या पाठांची खरोखरच इतकी आवश्यकता आहे कां? कदाचित तितकें तें नुकसानकारक आहे. म्हणून सुवर्णराजवंगश्वरांचे सर्व प्रसिद्ध (१५) पाठ एकत्र करून त्या त्या पाठप्रमाणें सुवर्णराजवंगेश्वर आयुर्वेदाश्रम फार्मसी लि. नगर या कारखान्यांत प्रयोगाद्वारे अभ्यास घेतले होते. व त्यामध्यें उत्तम पाठ कोणता कीं त्यामुळें सुवर्णराजवंगेश्वर स्वस्त, उत्तम व लवकरी तयार होऊं शकतो हें पाहण्यां आलें. त्या पाठांचे प्रमाणें पुढें दिलीं असून त्यामध्यें काय आढळून आलें तें दिलें आहे. विशेषतः किती उष्णतामानावर वंगेश्वर तयार होतो हें नमूद केलें आहे व प्रत्येक पाठाचा सुवर्णराजवंगेश्वर आयुर्वेदाश्रम फार्मसी लि. अहमदनगर येथील प्रयोगशाळेंत नमुन्यादाखल ठेवलेला आहे.

सुवर्णराज-वंगेश्वराचा पाठ १ ला

शुद्ध पारा ३ भाग, शुद्ध कथील ३ भाग

या प्रमाणांत कथील वितळून खलांतील पाऱ्यांत टाकलें व एक दिवस खल करून त्याचें पूर्ण मिश्रण (Amalgam) तयार करून मातकापड केलेल्या बाटलींत भरून ती बाटली वालुकायंत्रांत (sand bath) बसविली व अग्नि दिला. उष्णतामान २००° च्यावर गेल्यावर बाटलींत कडकड आवाज येऊं लागला. कारण कथिलाचा वितळण्याचा बिंदू (M. P.) २३५ आहे. त्यामुळें त्यांचा द्रव झाला व दोन्ही द्रव स्थितींत झाल्यामुळें आवाज येऊं लागला. ह्या ठिकाणीं दोन्ही धातु विरहित तिसरा पदार्थ पाहिजे. सुवर्णराज-वंगेश्वर हा वंग (कथील) व गंधक यांच्यापासून बनतो व त्याला इंग्रजीत Tin Sulphide म्हणतात. वरील पाठांत गंधक नसल्यामुळें असा पदार्थ कसा बनूं शकेल ? बाटली स्वांगशीत झाल्यावर ती फोडून आंतील धातूचें घनरूप मिश्रण काढून घेतलें. यालाच कोणी कोणी श्वेतवंगेश्वर म्हणतात.

पाठ २ रा

शुद्ध पारा ३ भाग, शुद्ध वंग ३ भाग,
शुद्ध गंधक १२ भाग.

नेहमींप्रमाणें पारा कथिलाचें मिश्रण करून गंधक टाकून एक दिवस खल केला व कजली करून घेतली. मातकापड केलेल्या बाटलींत ती भरून वालुकायंत्रांत बाटली बसवून अग्नि देण्यास सुरवात केली. उष्णतामान ४५०° पर्यंत गेलें. गंधकाचें प्रमाण फारच आढळून आलें त्यामुळें गंधक फार खर्च होतो. सळईस चकाकदार कण लागू लागले. ४, ४॥ तासानें अग्नि कमी केला व थंड होऊं दिला. बाटली फोडल्यावर सुवर्णराजवंगेश्वर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चांगला मिळाला नाहीं. काळसर, चकाकदार झाला. पण कजली फार मिळाली. यावरून या पाठांत गंधकाचें प्रमाण जास्त होतें हें आढळून आलें.

पाठ ३ रा

शुद्ध पारा ३ भाग, शुद्ध वंग ३ भाग
शुद्ध गंधक ३ भाग, नवसागर ३ भाग

या पाठामध्यें गंधकाचें प्रमाण कमी आहे, पण शिवाय नवसागर त्यांत टाकलेला आहे. नेहमींप्रमाणें कज्जली करून बाटलींत भरून वालुकायंत्रांत अग्नि दिला. उष्णतामान ४८० पर्यंत गेलें नंतर अग्नि वाढ न देतां तसाच दिला, व स्वांगशीत झाल्यावर बाटली फोडली, तेव्हां सुवर्णराजवंगेश्वर पांढरट चकाकदार व हलका मिळाला. या पाठांतील नवसागराचें प्रमाण जास्त होत आहे असें आढळून आलें.

पाठ ४ था

शुद्ध पारा ३ भाग, शुद्ध वंग ३ भाग
शुद्ध गंधक १ भाग, नवसागर १ भाग

नेहमींप्रमाणें कज्जली करून अग्नि दिला. उष्णतामान ४८० गेलें. वंगेश्वर सळईस लागूं लागला, पण पाऱ्याचे कणहि लागूं लागले. वास्तविक पाऱ्याचे कण लागावयास नको. कारण नवसागर व गंधकामुळें पाऱ्याचे रसकर्पूर (Mercuric Chloride) व रससिंदूर (Mercuric Sulphide) बनून तोंडाजवळ लागावयास पाहिजे. पण पारा तसाच रहात असल्यामुळें गंधक व नवसागर कमी आहे हें सिद्ध होते. थंड झाल्यावर बाटली फोडली तेव्हां वंगेश्वर कांठाकडे पिवळा, पण मध्यभागीं काळा व फुललेला मिळाला. नवसागराचें प्रमाण फुलण्यास योग्य आहे असें आढळलें, पण गंधक कमी पडलेला आढळला.

पाठ ५ वा

शु. पारा ३ भाग, शु. वंग ३ भाग, शु. गंधक ३ भाग
नवसागर ३ भाग, सोरा ७/१२ भाग

वंगेश्वर चांगला मिळाला. तो नारंगी रंगाचा हलका मृदु, अति चकाकदार मिळाला. उष्णतामान ४६०° पर्यंत होतें.

पाठ ६ वा

शु. पारा ३ भाग, शु. वंग ३ भाग
शु. गंधक ९ भाग

नेहमींप्रमाणें कज्जली करून अग्नि दिला; प… वंगेश्वर पांढरा मिळाला. पारा तसाच मिळाला.

पाठ ७ वा

शुद्ध पारा १॥ भाग, शुद्ध वंग ३ भाग
शुद्ध गंधक ९ भाग

याप्रमाणांत कज्जली करून अग्नि दिला. उष्णतामान ५३०° पर्यंत गेलें तरी गंधक सळईस लागला. यावरून गंधक फार होतो हें सिद्ध होते. वंगेश्वर पिवळसर मिळाला तो नेहमींप्रमाणें न… त्यामुळें सोरा व नवसागर ह्यांचा रंग येण्यास … फुलण्यास उपयोग होतो हें आढळून आलें.

पाठ ८ वा

शुद्ध पारा १॥ भाग, शुद्ध गंधक ४ भाग
शुद्ध वंग ३ भाग, नवसागर ३ भाग

नेहमींप्रमाणें कज्जली करून अग्नि दि… उष्णतामान ४०५ पर्यंत गेलें. वंगेश्वर सळईस… लागूं लागला. नंतर थंड झाल्यावर बाटली फोडली ते… कांहीं वंगेश्वर रससिंदूराच्या वरच्या भागाला लाग… आढळला. हा फार पिवळा चकाकदार तेजस्वी … हलका होता. खालीं वंगेश्वर नेहमींप्रमाणें प… आलेला नव्हता.

पाठ ९ वा

शुद्ध पारा १॥ भाग, शुद्ध वंग ३ भाग
शुद्ध गंधक १॥। भाग, अमोनिअम् कार्बोनेट …

या ठिकाणीं नवसागराऐवजीं अमोनि… कार्बोनेट घेऊन पाहिला. ह्यामुळें वंगेश्वर फुलतो कीं… हें पाहण्याचा उद्देश होता. वंगेश्वर फुलत तर नाही… पण सळई घातली असतां नरम न लागतां … लागतो. एकूण अमोनिअम् कार्बोनेट टाकून फ… नाहीं, वंगेश्वरहि मिळत नसून पांढरी चकती मिळा…

पाठ १० वा

शुद्ध पारा १ भाग, शुद्ध वंग १ भाग
शुद्ध गंधक ३ भाग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नेहमींप्रमाणें अग्नि दिला. उष्णतामान ४९०° गेलें, स्वांगशीत झाल्यावर बाटली फोडली. तेव्हां वंगेश्वर पिवळा चकाकदार पण जड मिळाला. गंधकाचें जड झाला व शिवाय त्यास फुलण्यास सोरा व नवसागराहि नाहीं. वंगेश्वर टेस्टट्यूबमध्यें तापविला असतां वरच्या तोंडाला काळसर चकाकदार पाऱ्याचें कण मिळालें. यावरून त्यास अग्नि कमी पडला व जड राहिला.

पाठ ११ वा

रसकापूर १ भाग, गंधक २ भाग
अपामार्गपंचांगमारित वंगचूर्ण १ भाग

अग्नि देऊन उष्णतामान ५००° मेलें. तरीसुद्धां गंधक सळईस फार लागूं लागला. गंधकाचें प्रमाण फार होतें. स्वांगशीत झाल्यावर बाटली फोडली, पण वंगेश्वर चांगला मिळाला नाहीं. तो काळसर व चकाकीयुक्त मिळाला. बाटलीच्या तोंडास गंधक फार लागला.

पाठ १२ वा

शुद्ध पारा १॥ भाग, शुद्ध वंग ३ भाग
शुद्ध गंधक २ भाग, नवसागर १॥ भाग

वंगेश्वर पिवळा चकाकदार मऊ मिळाला, पण नारंगी रंग आला नाहीं. यावरून सोऱ्यामुळें नारंगी रंग येतो हें सिद्ध होतें. वंगेश्वरावर कज्जली आली नाहीं, त्यावरून गंधकाचें प्रमाण बरोबर असावें असे अनुमान करण्यास हरकत नाहीं.

पाठ १३ वा

शुद्ध पारा १॥ भाग, शुद्ध वंग ३ भाग
शुद्ध गंधक १॥। भाग, नवसागर १॥ भाग

या प्रयोगांत गंधकाचें प्रमाण थोडें कमी केलें. वंगेश्वर वरील पाठाप्रमाणेंच मिळाला; पण कमी वजनाचा मिळाला.

पाठ १४ वा

शुद्ध पारा १॥ भाग शुद्ध वंग ३ भाग
„ गंधक २ „ नवसागर १॥ „
सोरा १/८ „

या ठिकाणीं रंग येण्याकरितां सोरा घेतला व पाठ तयार केला. उष्णतामान ४६०° पर्यंत गेलें त्यावेळेस वंगेश्वर सळईस लागूं लागला. स्वांगशीत झाल्यावर बाटली फोडली, तेव्हां वंगेश्वर नारंगी चकाकदार फुललेला हलका मऊ व नरम असा मिळाला. यावरून वरील सर्व प्रमाण योग्य प्रमाणांत आहेत हें सिद्ध होतें. ह्या पाठानें पारा ५० टक्के बचत होतो. व शिवाय वंगेश्वराचें वजनहि जास्त मिळतें. एकूण दोन्ही बाजूनें फायदा होतो. गंधकाचीहि बरीच बचत होते. ह्या पाठामुळें सर्व बाजूनें कमीत कमी पदार्थ लागून जास्तींत जास्त वंगेश्वर मिळूं शकतो. म्हणून हा पाठ योग्य प्रमाणांत बसविला गेला आहे.

पाठ १५ वा

शुद्ध पारा १॥ भाग शुद्ध वंग ३ भाग
„ गंधक २ „ नवसागर १॥ „
सोरा १/८ „

या पाठांत सोरा वरील पाठापेक्षां दुप्पट घेतला. पण वंगेश्वराचा रंग दोन्हींमुळें सारखाच नारंगी येत असल्यामुळें दुप्पट सोरा टाकून फायदा नाहीं. वंगेश्वर वरील प्रमाणेंच नारंगी रंगाचा फुललेला हलका मऊ व नरम चकाकदार मिळाला.

एकूण वंगेश्वराचे १५ पाठानें प्रयोग केले व या सर्वांमध्यें १४ व्या पाठाप्रमाणें केलेला वंगेश्वर उत्तम मिळतो व सर्व दृष्टीनें फायदेशीर पडतो. ह्यामुळें हा पाठ योग्य व फायदेशीर आहे. शिवाय वंगेश्वर नवसागरानें फुलतो तर सोऱ्यानें नारंगी रंग येतो, हेंहि सिद्ध होतें. वंगेश्वर होण्यास साधारणपणें ५ ते ७ तास पुरेसे आहेत. उष्णतामान ४५० ते ४९०° पर्यंत पुरेसें आहे असें आढळून येतें.

पाठ नं. १४ च्या वंगेश्वराचें रासायनिक पृथक्करण खालीलप्रमाणें आढळून आलें.

Water soluble salts as

NH_4Cl or $KClO_3$	नवसागर किंवा सोरा	Nil
Mercury	पारा	absent
Sulphor	गंधक	„
Stannic Sulphide		96%

सुवर्णराज – वंगेश्वराचे वरील सर्व प्रयोग ता. १-३-४३ ते १९-६-४३ च्या दरम्यान केलेले आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खेडोंपाडीं वैद्यकीय मदत

" खेडोपाडीं वैद्यकीय मदत पाहिजे असें जेव्हां म्हटलें जातें, तेव्हां त्या मागणीचे ३ भाग पडतात.

१) खेड्यांतील जनतेंत वैयक्तिक आरोग्याच्या नियमांचे शिक्षण देणें व प्रथमोपचाराची सोय करणें, हा एक भाग होय.

२) दुसरा भाग, सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीनें रोगप्रतिबंधक उपाय अमलांत आणणें

३) तिसरा भाग, तज्ञ वैद्यकीय मदत प्राप्त करून देणें.

या तीन भागांपैकीं फक्त तिसऱ्या भागासाठीं सुशिक्षित डॉक्टर अथवा वैद्य लागतो.

इतर दोन्ही महत्वाचीं कामें प्राथमिक शाळा-मास्तर अथवा इनॉक्युलेटर्स यासारख्यांच्या द्वारें थोड्या खर्चांत करून घेतां येण्यासारखीं आहेत. "

(लोकमान्य) —वै. भा. वि. गोखले

डॉ. कानिटकरांची 'आयुर्विद्या'

पुणें आयुर्वेद महाविद्यालयाचे पदवीधर डॉ. धुं. ग. कानिटकर व डॉ. मो. ग. कानिटकर (पद... दिलेल्या नाहींत) यांनीं आपलें रुग्णालय व प्रसूति-गृह भाड्याच्या इमारतींतून स्वतःच्या 'आयुर्विद्या' (१४ एल्फिन्स्टन रोड, बोपोडी, खडकी, पुणें ३) या इमारतींत आणलें आहे. या इमारतीचा उद्घाटन समारंभ त्यांनीं १ ऑगस्ट १९५३ रोजीं आमचे डॉ. बा. चिं. लागू यांच्या हस्तें केला.

फार्मास्युटिकल इन्कायरी कमेटी

या समितीचा दौरा पुढील प्रमाणें जाहीर झाला आहेः— १० ऑगस्ट रोजीं कमिटीची मुंबईत बैठक, ता. १२ व १३ रोजीं बलसाड येथील औषधी कारखान्यास भेट व ता. १४ व १५ रोजीं बडोदा.

या दौऱ्यांत ही समिति औषधी कारखानदार, वैद्यकाचे व्यवसायी, केमिस्ट व ड्रगिस्ट यांचे स्थानिक संघटनाबरोबर विचारविनिमय करीत आहे.

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका), शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें आम्ही घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितो !

गुलकंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील !

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

टे. नं. ३१७९६ Telegram-AYURVED

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पंचानन-ज्वरांकुश

लेखकः- आयुर्वेदाचार्य

पं. व्यासनारायण शुक्ल नागपूर

आयुर्वेदांत दिव्यौषधींना खास उच्चस्थान आहे. प्रायः आयुर्वेदांतील प्रत्येक औषधि तिच्या दिव्यतेसाठींच बनविली जाते.

संशोधन होणें आवश्यक आहे

आज आयुर्वेदीय औषधि—कारखान्यांतून बनविलीं जातात इतकींच औषधें केवळ आयुर्वेदांत आहेत असें नाहीं, तर त्यांत असंख्य औषधांचा संग्रह भरलेला आहे. तेव्हां अशा औषधिकार-खान्यांतून न बनविलीं जाणारीं अगर बनविलेलीं अशीं अनेक औषधें आहेत कीं, ज्यांच्यावर विचार होणें व त्यांचा प्रत्यक्ष व्यवहारांत अधिक उपयोग होणें अत्यन्त आवश्यक आहे. अशीं औषधें शोधून काढून त्यांची शास्त्रीय उपयुक्तता सिद्ध करून व त्याच्यांत आवश्यक ते फेरफार करून व्यवहारांत उपयोग करणें हें आयुर्वेद संशोधनाच्या दृष्टीनें योग्यच होईल.

आवश्यकता ही संशोधनाची जननी

पंचाननरस हें एक आयुर्वेदांतील दिव्य औषध असून तें आपल्या रामबाण गुणामुळें सुप्रसिद्ध आहे.

आवश्यकता ही संशोधनाची जननी आहे असें एके ठिकाणीं म्हटलें आहे व हीच म्हण माझ्या पंचाननरसाच्या संशोधनास कारणीभूत झाली.

पंचाननरस तयार केला

माझ्या एका मित्राची बायको ज्वरानें कित्येक दिवस आजारी होती. पुष्कळ औषधोपचार करूनहि ताप निघेना. मीहि ताप निघण्याकरितां कांहीं दिवस औषधोपचार केला, परन्तु कांहीं फायदा झाला नाहीं. एक दिवस हताश होऊन ज्वरचिकित्सेसंबंधीं आयुर्वेदांतील कांहीं ग्रंथांचें समीक्षण करीत असतां रसेंद्रसार-संग्रहांतील पंचाननरसावर माझी दृष्टि गेली. ह्या औषधीपाठाच्या शेवटीं "सिद्धोऽयं ज्वर-दन्ति-दर्प-दलनः पंचाननाख्यो रसः" हें चरण वाचून माझा ह्या औषधावरील विश्वास दृढ झाला, व मी तो (पंचानन) तयार करून घेतला.

पहिल्याच दिवशीं गुण

उपरिनिर्दिष्ट माझे मित्राच्या ज्वरपीडित पत्नीस मी हा पंचाननरस दिवसांतून ५।६ वेळ देण्यास प्रारंभ केला व त्याचा सुपरिणाम पहिल्याच दिवसांपासून दिसून ती ज्वरमुक्त झाली. आतां तर मी ज्वराच्या सर्व अवस्थेंत पंचाननाचाच प्रयोग करितो व तो संतोषकारक फलनिष्पत्ति देतो.

पंचाननाचा मूल पाठ

'रसेंद्रसारसंग्रहांत' पंचाननाचा मूल पाठ* खालीलप्रमाणें दिला आहे.

१) शुद्ध वत्सनाभ (बचनाग) २ भाग

२) काळी मिरी ४ भाग

३) शुद्ध गंधक ३ भाग

४) शुद्ध हिंगुळ १ भाग

५) ताम्रभस्म १ भाग.

रुईच्या रसांत खल

ह्या सर्व जिनसा एकत्र करून रुईच्या मुळाच्या रसांत घोटून १-२ गुंज प्रमाणांत द्यावा.

पंचाननरस तयार करतांना, त्याचा मर्दनकाल ग्रंथामध्यें निश्चित दिलेला नाहीं. आम्ही ३ दिवस खल करून त्याच्या १-२ गुंज प्रमाणांत गोळ्या करून ठेवितो.

---

*शंभोः कंठविभूषणं समरिचं दैत्येंद्ररक्तं रविः।
पक्षौ सागरलोचनं शशियुतं भागार्कसंख्यायुतम्॥
खल्वे तत्किलमर्दितं रविजलैः गुंजैकमानं भजेत्।
सिद्धोऽयं ज्वरदंतिदर्पदलनः पंचाननाख्यो रसः॥
पथ्यं च देयं दधितक्रभक्तं ..
सिंधूत्थमौद्गं सितया समेतम्।
गंधानुलेपो हिमतोयपानम्।
दुग्धं च देयं त्वथ दाडिमांभः॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चन्द्रपुटी प्रवाळभस्माची जोड

पंचाननरसाचा परिणाम अधिक उत्तम व्हावा ह्या दृष्टीनें त्यांत जरूरीपुरती प्रवालपिष्टी मिळवून उपयोग केला असतां अधिक लवकर गुण येतो.

षडानन अधिक उपयुक्त

पंचाननरसाच्या मूळ पाठांत पांचच द्रव्यें दिलीं आहेत, त्यांत प्रवालपिष्टी दिलेली नाहीं; परन्तु ज्यावेळीं त्यांत प्रवालपिष्टी समाविष्ट केली त्यावेळीं तो केवळ पंचाननच (सिंहच) राहिला नसून तो षडानन शक्तियुक्तहि झाला आहे. रोग्याचें तापमान जेव्हां १०३° पासून १०५° पर्यंत वाढत जातें, रोगी बेचैन होतो, तापाच्या उष्णतेमुळें त्यास वारंवार तहान लागते, ताप दीर्घकालपर्यंत राहातो, अशा अवस्थेमध्यें पंचानन (षडानन) औषध ४-५ वेळ, एक एक तास अन्तरानें दिल्यास तापमान कमी होतें.

अनुपान व पथ्य

पंचानन साखरेंतून द्यावा असें ग्रंथोक्त आहे. परंतु तो मधांतूनहि देण्यास कांहीं हरकत नाहीं, व त्यायोगें घेण्यासहि सुकर पडतो.

मीठ, मधयुक्त दही-भात हें पथ्य इतर ग्रंथांतून दिलें आहे, परंतु आम्ही याचा अद्याप उपयोग करून पाहिला नसल्यानें त्यासंबंधीं आम्हास विशेष अनुभव प्राप्त झालेला नाहीं.

विशेष वाढलेल्या तापास

विशेष वाढलेल्या तापास उतार पडण्याकरितां त्याचप्रमाणें सर्वसाधारण औषधोपचार करूनहि ताप उतरत नाहीं असें दिसल्यास (पाश्चात्य चिकित्सक ज्याप्रमाणें कोलन-वॉटरचा उपयोग तापमान कमी करण्याकरितां करतात त्याप्रमाणें) पंचाननरसाचा उपयोग सर्वसाधारण कोणत्याहि तापांत केल्यास समाधानकारक कार्य घडल्याचें दिसून येतें.

विशेष सूचनाः- तापमान १०३° च्या वर गेलें असल्यास एक एक तासाच्या अंतरानें पंचाननरस ४/५ वेळ द्यावा, व तापमान ९८·४ पर्यंत खालीं येई तोंवर गाईच्या अगर बकरीच्या दुधाच्या घड्या रोग्याचे कपाळावर ठेवित राहाव्या. घडी कोमट होतांच बदलून दुसरी ठेवावी. —लोकवैद्यक

मुंबई राज्यांत रोगांस पायबंद

रोगांचा प्रतिबंध करण्याच्या प्रश्नाकडे मुंबई सरकार बारकाईनें लक्ष पुरवीत आहे. या बाबतींत मलेरियाचा प्रतिबंध करण्यासंबंधींची योजना विशेष महत्वाची आहे. राज्यांतील नऊ जिल्ह्यांत व इतर कांहीं जिल्ह्यांमधील चार निवडक भागांत डी. डी. टी चा वापर करून मलेरियास प्रतिबंध करण्यांत येत आहे. या योजनेचा फायदा एकूण सुमारें एक कोटी लोकांना मिळाला असून त्यासाठीं २८ लाख रुपये खर्च झाला आहे. चालू सालीं या योजनेमुळें सदरहू भागांत मलेरियापासून कमीत कमी १५ लाख लोकांचे प्राण वांचतील असा अंदाज आहे. अशा रीतीनें मलेरियामुळें जी प्राणहानि होते त्यांत सुमारें ७५ टक्यांनीं घट येईल.

मलेरिया प्रतिबंधक योजना

पुढील सालीं भारत सरकार संबंध राज्यांत मलेरिया प्रतिबंधक योजना हातीं घेणार आहे तिच्या व्यवस्थेबाबतचा खर्च देण्याचें मुंबई सरकारनें मान्य केलें आहे. या योजनेखालीं १५ मलेरिया प्रतिबंधक पथकें राज्यांत काम करू लागतील, अशी अपेक्षा आहे. एक पथक सुमारें १० लाख लोकांचें काम पाहील. प्लेगच्या रोगाचा राज्यांत जवळजवळ नायनाट झाला आहे.

तारेचा पत्ताः-Newbottle

के. के. शहा अँड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)

रिकाम्या बाटल्या, बुचे, कॅपसुल्स् [हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे

ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय औषधी संशोधनाची आवश्यकता !

लेखकः–वैद्य पु. वि. धामणकर, धूतपापेश्वर–पनवेल

भारत स्वतंत्र झाल्याबरोबर संशोधनाची एक [...]ड लाट मोठ्यानें उसळून वर आली. अत्यंत शीघ्र [...]नें ती सर्व क्षेत्रांत पसरली. आणि जिकडे तिकडे [...] संशोधन, संशोधन, संशोधन " असा एकच एक [...]ज घुमूं लागला. ह्या निनादानें सर्व विभाग [...]न सोडले. ह्या जल्लुसांत अधिकारी-अन-[...]री, हितैषी–अहितैषी, साधक व बाधक लोक [...]त भाग घेत आहेत. कोणी विधायक कार्याचे [...]नें उल्हासित, तर कोणी विध्वंसक कार्यसंधि-[...]मुळें आनंदित झाले आहेत. कोणास सात्विक [...] कोणास राजस, तर कोणास तामस आनंद लाभला [...]. एवंच संशोधन शब्दानें सर्वांवर मोहिनी घातली [...], खऱ्या हितैषी लोकांना, वेळींच सावध होऊन [...]रल्या पद्धति व अपेक्षा सरकार व तज्ज्ञ यांचेपुढें [...] कार्यभाग पुरेपूर साधण्याचा प्रयत्न करतां [...] म्हणून हा लेख लिहित आहे.

संशोधन शब्दाचा अर्थ

संशोधन ह्या संज्ञेंत 'सं' उपसर्ग व 'शोधन' हा [...] शब्द. शोधन शब्दांतहि 'शुध्' हा धातु आहे. [...] अर्थ साफसफाई करणें असा आहे. तोच अर्थ [...] जोडल्यानें अधिक व्यापक होतो. म्हणजे [...]न ह्याचा अर्थ 'विस्मृत अथवा स्थगित गोष्टींना [...] देऊन त्या प्रगमनशील करणें' हा आहे.

संशोधनाची आवश्यकता

गेल्या तीनशें वर्षांत दोन गोष्टी अगदीं ठळक-[...]घडल्या (१) आयुर्वेदावर अनेकानेक घाले [...]. त्यांची ग्रंथसंपत्ति कांहीं जाळली गेली, तर [...] लुटली गेली. उपेक्षा व उपहास ह्यामुळें ह्याची [...] खुंटली. (२) ह्याचबरोबर ॲलोपॅथीची भरभराट [...] लागली. त्या शास्त्रोपासकांनीं जेथून मिळेल [...] तें चांगलें व सोईचें लाभेल तें संग्रहित वा [...] केलें आणि आपलें वैद्यक समृद्ध केलें. त्यामुळें आज तें वैद्यक प्रवृद्ध झालेलें दिसत आहे. असें जरी आहे तरी शास्त्रीय दृष्टया अद्याप तें बाल्यावस्थेंत आहे. अद्याप त्यांना दोष, दूष्य, प्रकृति इ. पुष्कळ गोष्टी कळावयाच्या आहेत. तरी पण आज राजाश्रयामुळें तें प्रतिष्ठावान् ठरलें आहे एवढेंच.

शास्त्र सारखें वाढत असतें

तसें पाहिलें तर कोणतेंच शास्त्र कधींच पूर्ण होत नाहीं. कालगतीबरोबर तें सारखें वाढतच असतें. नव्यानव्याची भर त्यांत संशोधनानेंच पडत असते. आणि ती पडत राहणें हेंच शास्त्राच्या जीवंतपणाचें लक्षण होय.

राजसत्ता त्याची पाठिराखी आहे

पाश्चात्य वैद्यक बाल्यावस्थेंत असलें तरी तें प्रचलित अथवा रूढ आहे. राजसत्ता याची पाठीराखी आहे. राजाश्रयाचे अभावीं स्थगित झालेलें आर्य वैद्यकहि प्रचलित आहे. पण त्यांत कांहीं गोष्टी अज्ञानामुळें रूढ झाल्या आहेत. त्या दूर करणें हें संशोधनाचें पहिलें काम आहे. मात्र त्यामुळें विशेष कांहीं बिघडलें आहे असें मात्र नाहीं. आणि तें दुरुस्त करण्यास काल, पैसा आणि परिश्रम फार लागतील असेंहि नाहीं. त्यामुळें हें प्राथमिक कार्य पुरें होईपर्यंत आयुर्वेदीयांना 'तिष्ठ' (थांबा) म्हणण्याचें प्रयोजनहि नाहीं. आहे त्या स्वरूपांत तें हातीं घेऊन काम सुरू करावें. व दुसरीकडे साफसफाई व नवनवलाईच्या गोष्टी करीत रहावें. अशा सहृदयतेनें संशोधन उपक्रम हातीं घेतला तर आयुर्वेद अद्यावत् होण्यास फारसा विलंब लागणार नाहीं.

संशोधनाचे प्रकार

द्रव्याचें ज्ञान दोन प्रकारानें करून घ्यावयाचें असतें. एक त्याचें स्वरूप व दुसरा त्याचा स्वभाव. स्वरूपज्ञानांत ह्याचें शरीर, व स्वभावज्ञानांत त्यांतील गुणदोष ह्यांचा अंतर्भाव होतो. ह्या संबंधींचीं वर्णनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विविध ग्रंथामधून विविध आहेत. तीं एकत्र घेऊन त्यांतील विरोधाभास दूर करणें, अगर त्यांतील संदेह नाहींसा करणें. ह्यानंतर प्रत्येक वनस्पतीचा अगर खनिज वा प्राणिज द्रव्याचा मूळ ग्रंथ व जन्मस्थान ह्यावरून प्रत्यक्ष परिचय करून घेणें.

सुमारें ५० संदिग्ध द्रव्यें

सामान्यतः नेहमीं ७/८शें औषधी तयार करणाऱ्या कारखानदारांस तीनशेंपर्यंत मूलद्रव्यसंग्रह लागतो. चिकित्सकांस तर फारच अल्प द्रव्यसंग्रह लागतो. पण त्यांचा सिद्धौषधींचा प्रांत मोठा असतो. मूल द्रव्यांची कल्पना मोठी आहे. पण त्यांत संदिग्ध द्रव्यें अशीं ५० चे वर निघणें कठीण आहे. तेव्हां तो प्रश्न केव्हांहि आणि सहजच सुटण्याची शक्यता आहे. मुख्य प्रश्न आहे ग्रंथोक्त वर्णन व प्रत्यक्ष दर्शन ह्यांची सांगड घालण्याचा. म्हणून संशोधनांतला हा पहिला प्रकार संभवतो.

संशोधनाचा दुसरा प्रकार

ह्यानन्तरचा दुसरा प्रकार म्हणजे द्रव्यामधील घटकावयव कळणें हा होय. पण हा भाग फारच अवघड आहे. कारण पहिल्या प्रतीचे रसायनाचार्य आज तरी भारतांत आहेत असें वाटत नाहीं. व पाश्चात्यांनीं द्रव्यविश्लेषण केलें, त्यांत भारतीय द्रव्यसंग्रह फारच थोडा आहे.

रासायनिक विश्लेषण कितपत उपकारी ?

उद्भिज्ज, प्राणिज, आणि खनिज द्रव्यांचे घटकावयव प्रत्यक्षानें पाहाणें. ह्या भागाबाबत मला जी माहिती आहे तीवरून रासायनिक विश्लेषण हें आपणांस सर्वत्र सारखें सहाय्यक ठरेलच असें नाहीं.

"गृहवैद्य"
क्षारचिकित्सेवरील लोकप्रिय ग्रंथ. नवीन भावनाकोशासह किं. फक्त २ रु. ट. ख. निराळा.
(१) वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक
(२) डॉ. गर्दे, २६ मोंगल लेन, मुंबई १६

कारण वनस्पती ओली असतांनाचे गुण तिच्या वा... लेल्या स्वरूपांत नसतात. उदा. शेवगा बीं-आर्द्र विषारी तर शुष्क-निर्विष. तीच गोष्ट कळलावीकंदाची आहे. अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. वनस्पतीं मधला दुसरा प्रकार म्हणजे फक्त ओलेपणींच गु... देणाऱ्यांचा. गुडूची कुटजो वासा कूष्मांडः च शतावरी अश्वगंधासहचरौ शतपुष्पा प्रसारिणी । प्रयोक्तव्या सदैवार्द्राः । शार्ङ्गधर.

वनस्पतींचें विश्लेषण

सूरण हाहि एक पदार्थ असाच आहे. त्यामधी... चीक सुकला कीं पुनः तो उलत नाहीं. तो सू... त्याज्यच ठरतो. सातविर्णीत सात पदार्थ आहेत ते अ... अलग काढतांहि येतात. पण त्याच्या कोणत्या संयुगानें अथवा संयोग-संघातानें सातविणीचे गुणां... प्रचीति येत नाहीं. तसेंच हें पृथक्करण घडत अस... विश्लेष्य पदार्थांमधील कांहीं घटक विक्रिया आ... विनाश पावतात. त्यामुळें वनस्पतींबाबतचें विश्ले... प्रत्यक्षतः संपूर्ण होईलसें वाटत नाहीं.

द्रव्यसंयोगजं फलम्

वनस्पतीमध्यें अनेक द्रव्यें असतात, पैकीं क... कोहल-विद्राव्य, तर कांहीं ईथर अथवा जलविद्राव्य असतात. भारतीय वैद्य शक्य तोंवर मूळ वनस्प... निज स्वरूपांतच वापरतात. त्यांचे म्हणणें असें ... "मुनिरेव विजानाति द्रव्यसंयोगजं फलम् ।" म्हणजे द्रव्यांतील विविध घटक विविध गुणदोषांचे असता... कांहीं कार्मुक तर कांहीं नियंत्रक. म्हणजे कांहींचें का... अपेक्षित असतें, पण तें निर्दोष लाभावें, अशाकरितां ह्याच वनस्पतींत असे कांहीं घटक असतात कीं दोषांचें क्षपण व गुणांचा पाठपुरवठा करतात. संयुति विश्लेषणानन्तर जमत नाहीं. म्हणून असें वा... कीं रासायनिक विश्लेषण निर्णायकाची जागा घे... शकणार नाहीं.

आज चाललेली फसवणूक

असें जरी आहे तरी आज जी उघडउघड लबाडी व फसवणूक चालली आहे तिला, तर्क...

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...मतांचे गलबल्याला, आळा घालण्यास ह्या रासा-...निक विश्लेषणाचा उपयोग होऊं शकेल. उदाहणार्थ, ...केल्या धातूचा गाळ तोच मंडूर, अजिबात लोह ...लेला मंडूर, किंवा दगडी पाषाणभेद म्हणून ...लेला रंगीत शाडु, बनावट प्रवाळकांडी, अकोनिटिन ...लेला (तोतया) वचनाग, पेपरिन नसलेली पान-...डी, अशी मूळ द्रव्यें ओळखणें व सिद्धौषधीमधील ...र्ण, मोती, मधु, कोहल, अम्ल इ. चें शतमान ...णें किंवा सिद्धौषधीबाबत पक्वापक्वतेचा निर्णय ...अशा कांहीं ठळक ठळक गोष्टीपुरतें रासायनिक ...श्लेषण उपयुक्त ठरूं शकेल.

संशोधनाचा तिसरा प्रकार

संशोधनाचा तिसरा प्रकार म्हणजे प्रक्रिया ...बर घडली आहे कीं नाहीं हें ठरविणें. ह्यांतहि ...यनिक निरीक्षण-परीक्षणाचा फार मोठा भाग ...हे. उदाहणार्थ सुवर्णमालिनीवसंतांत स्नेह किती ...टविला अगर लिंबूरस किती सांठविला ? गंधक-...यनांत भावनाद्रव्यांचा अंश किती सामावला ? ...ांत कोणकोणत्या वनस्पतीमधील कोण कोणते क्षार ...ती आले, इत्यादि बाबत रसायनशास्त्र आपणांस ...चें साहाय्य करूं शकेल.

द्रव्यनिर्णयाची आवश्यकता

रसायनशास्त्राचे मदतीनें निर्णायक नव्हे तरी ...बाबत तत्सम अभिप्राय आपण देऊं घेऊं शकतों. ...या प्रकारच्या द्रव्यनिर्णयाची चिकित्सन कार्यास ...ची आवश्यकता असते. पदार्थनिश्चितीशिवाय त्याचे ...दोष अजमावूं पहाणें म्हणजे जलाशयाचें ज्ञान न ...तां त्यांत उडी घेण्यासारखें होय. त्यांतून परिचित ...र्थांचे गुण अनुभवले आणि त्याच गुणांचा योग ...: करायचा झाला तरी रसायनशास्त्राची मदत ...श्यक ठरणारच. म्हणून रसायनशास्त्र डावलून ...णार नाहीं. साधनें अनेक असूं शकतील तीं ...युक्तहि असतील, पण त्यांचा शक्यतोंवर ...क्षेत्रांत अधिक उपयोग करून घेणें, हें संशोधनास ...कारकच ठरणार हें निश्चित होय.

गुणकर्मविज्ञानाचें साधन

पदार्थांचे शारीरज्ञानानंतर, स्वभाव म्हणजे गुणकर्म ह्यांचें विज्ञान ह्याचा क्रम लागतो. ह्याचें प्रात्यक्षिक मिळण्याचें एकमेव स्थान म्हणजे रुग्णालय. हें काम निर्णायक स्वरूपाचें होऊं शकेल. पण सर्वांत अवघड असें कोणतें काम असेल तर तें हेंच होय. ह्यांत जिवंत प्राण्याशीं, ज्याला मन आहे अशा प्राण्याच्या रोगांशीं, गांठ असते. रोगी निश्चय करून बसला कीं, ह्या औषधानें मला सुखदुःख होणार कीं तशा भावना-तशीं लक्षणें-त्याला होऊं लागतात. मग द्रव्य-स्वभाव राहतो बाजूला. कारण तें जरी सेंद्रिय असलें तरी अंतःसंज्ञ आणि मनुष्यप्राणी बहिःसंज्ञ, त्याला आपलें सुखदुःख सांगतां येतें; मनाचे सहाय्यानें सुखदुःखाशीं तो तद्रूप होऊं शकतो. तशी स्थिति अंतःसंज्ञ द्रव्यांत नसल्यानें त्यावर मनुष्यस्वभाव मात करतो. रोग्याची अनुकूलता लाभली तरी तो सत्यवान् म्हणजे धैर्यवान्, व ज्ञापक म्हणजे आपणाला होणाऱ्या लक्षणांचें सम्यक् वर्णन करणारा असावा लागतो.

औषधी मात्रा

तसेंच दोष, दूष्य, बल, काल, प्रकृति, सत्व, साम्य इ. सर्व गोष्टी साकल्यानें लक्षांत घ्याव्या लागतात. तरच औषधीमात्रा निश्चित करतां येते. व पुढचा कार्यभाग नीट साधतो. उदाहरणार्थ, आनूप देशांत शंखवटीची मात्रा ४ गुंजा लागली तर जांगल-देशांत तीच १ गुंज पुरेशी होते. समीरपन्नग थंड देशांत लहान मुलांच्या कफविकारांस रोज ।· ते ॥· गुं. मात्रेनें चालू ठेवतां येतो. तर तोच जांगल देशांत एकाच मात्रेनें कफशोषण करतो. त्यामुळें रुग्णालयांतील संशोधन हें श्रुतचरित, कर्मदक्ष, दयाळू अशा प्राज्ञ वैद्याचें काम आहे.

कार्यकर्त्यांचा संच आहे

आयुर्वेदीय औषधीसंशोधनास वनस्पती, रसायन आणि रुग्णविज्ञानशास्त्रांतील तज्ज्ञांची आवश्यकता आहे. असा तज्ज्ञ वर्ग आज तयारहि आहे. बोटॅनिस्ट, हर्बॅलिस्ट, फार्मसिस्ट आणि पॅथॉलॉजिस्ट अशी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपापल्या वा एकेका विषयांत निष्णात असलेली मंडळी आज आपणांत आहेत. पण त्याविषयाचे आंग्ल व आर्य असे दोन्ही विभाग एकत्र शिकलेली अशी मंडळी नाहींत. आंग्ल तर आंग्ल, किंवा आर्य तर आर्य विषयांत निपुण असे ते आहेत. तेव्हां आंग्ल व आर्य-शास्त्रांतील एक एक असे दोन तज्ज्ञ, द्रव्यस्वरूप स्वभाव विज्ञानाकरितां नियोजले तर संशोधनकार्याला सहज व झपाट्यानें सुरवात होऊं शकेल. पाश्चात्य व पौर्वात्य शास्त्रांचा मेळ बसणें शक्य नाहीं असें कांहीं व्यवहारी लोक म्हणतात. पण माझा अनुभव ह्याहून भिन्न व उत्तम आहे.

वरच्या पातळींतील निर्मळता

व्यवहाराचे पातळींत दिसणारा गढूळपणा, मतभेद, दुराग्रह, पूर्वग्रह, दूषितता इ. गोष्टी आपण जो जो वरचे पातळींत जावें तों तों दिसून येत नाहींत. तेथें ज्ञानलालसा, तत्वजिज्ञासा इ. शुद्ध, सात्विक व उच्चतम गोष्टी वावरत असल्यानें तेथें वैमल्यच पुष्कळसें आढळतें. ज्ञानाची देवाण-घेवाण सुगमतेनें होते. व सहकार्य, आदर आणि आनंद तेथें नेहमीं नांदलेले दिसून येतात. त्यामुळें आंग्ल व आर्य तज्ज्ञ एकत्र आल्यास काय होईल ह्याची भीति अगर शंका घेण्याचें कारणच नाहीं. निदान मला तरी वरील क्षेत्रांतील पाश्चात्य पदवीधरांपासून तों वनवासी लोकांपर्यंत सारखेंच सहकार्य मिळालें व संशोधना-बाबतचा माझा उत्साह आणि व्यासंग सारखा वाढतच राहिला आहे.

महत्वाची गोष्ट

प्रयोगः शमयेद् व्याधिं योन्यमन्यमुदीरयेत् ।
नाऽसौ विशुद्धः शुद्धस्तु शमयेत् यो न कोपयेत् ॥
च. चि. ॥

आयुर्वेदाची ही चिकित्साप्रणाली शुद्ध स्वरूपांत टिकवून धरणारी नसेंच " एष आगमसिद्धत्वात् प्रत्यक्षफलदर्शनात् । मंत्रवत् संप्रयोतव्यो न मीमांस्यः कथंचन । असे छातीठोक सांगणारी किंवा तसा दृक्-प्रत्यय आणून देणारीं माणसें दिवसानुदिवस विरळ होत चाललीं आहेत ही गोष्ट लक्षांत घेऊन गुणदोष प्रचीती-कार्यास लवकरच सुरवात व्हावी, असें मला वाटतें.

औषधी योग लक्षण

अल्पमात्रं महावेगं बहुदोषहरं सुखम् ।
लघुपाकं सुखास्वादं प्रीणनं व्याधिनाशनम् ।
अविकाराविपन्नं च नातिग्लानिकरं च यत् ।
गंधवर्णरसोपेतं विद्यान्मात्रावदौषधम् ।
च. सि. अ. १

औषधाचे योग्यायोग्यत्व वरील श्लोकांत थोड-क्यांत सांगितलें आहे. त्याचें विवरण असें:— रोग्याचे शारीरिक वा मानसिक क्लेश अथवा रोग दूर करण्याकरितां औषध द्यावयाचें असतें. हा हेतु पूर्णत्वानें साधावयाचा तर औषध, रूपानें आकर्षक, वासानें आल्हादक, स्वादानें प्रीणन, सेवनानें संतोष-कारक, मात्रेनें थोडें पण मोठें कार्य त्वरित करणारें, लवकर पचणारें, सुखानें, सोयीनें घेतां येणारें, रोग-नाशक आणि पुनः योग्य मात्रेनें दिलेलें, असे असायला पाहिजे.

औषध रूपगुणरहित (विपन्न) नसावें. त्यापासून अपाय तर होऊंच नये. पण फारसा थकवाहि येतां कामा नये.

औषधीविद्याविशारदांचें ध्येयच वरील श्लोकांत सामावलें आहे, असें म्हटल्यास वावगें होईलसें दिसत नाहीं.

—लोकमान्य प्रजासत्ताक अंक



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" ती व्यवसाय-निष्ठा " : संपूर्ण गोष्ट

लेखकः– " माणूस "

" धंदा करावयाचा असतो माणसानं पोट भरण्यासाठीं, पण केवळ; पोट भरणं एवढंच माणसाचं उद्दिष्ट नसावं; नाहींतर डॉक्टर–वैद्य होणं काय अन् कसाई होणं काय सारखंच

एक छोटासा दवाखाना थाटून काका वैद्य त्या ...तांत कसेंबसें पोट भरीत असत. पण काकांचा दावा ...होता कीं, आपण फार मोठे धन्वन्तरी आहोत. ...र्दी मृत्यूच्या दाढेंत गेलेल्या रोग्यांना आपण ...त्या वैद्यकीय ज्ञानाच्या आणि प्रभावी औषधांच्या ...तावर पुनः जीवनांत आणून सोडल्याच्या किती ...दंतकथा काकांना मुखोद्गत होत्या आणि काकांच्या ...चीवर डोळा ठेवून दवाखान्यांत कांहीं वेळ बसून ...णारास त्या दंतकथांपैकीं एक तरी ऐकावी लागे. ...त्या दंतकथा ऐकणारा तंबाखूच्या एका चिमटीच्या ...ऐनें त्या ऐकतो, त्यावर बिलकुल विश्वास ठेवीत ...ही, हें भोळ्या काकांना उमजत असे कीं नाहीं ...न वाणे; पण काकांना मात्र खात्रीनें वाटायचें, कीं ...त्या बोलण्याच्या प्रभावानें भारलेला हा इसम ...पुढें घरांत कधीं 'केस' झाली तर नक्की ...त्याकडेच घेऊन येणार.

गोरगरीबांचे वाली वैद्य

काकांना 'केसिस' मिळत नसत, असें मात्र ...ही. ज्यांच्यापाशीं दुसऱ्या चांगल्या वैद्य–डॉक्टरा-...डे जाण्यासाठीं पैसे नसत असे, गोरगरीब काकांच्या ...दवाखान्याची पायरी झिजवीत, पण या लोकांनीं ...पायरी झिजविल्यानें काकांचा हात ओला होण्याची कांहीं ...शक्यता नसे. काकांच्या बैठ्या मेजावर एका दगडाच्या ...वजनाखालीं 'केस–पेपर्स'चा भला मोठा गठ्ठा असे. ...यावरून काकांची प्रॅक्टिस कशी जोरांत चाललेली ...असेल याची कल्पना करावी. आणि काका या गठ्ठ्या-...कडे पहात मोठ्या अभिमानानें म्हणत, " या सर्व ...पेशंटकडून जर बिलें वसूल झालीं तर पडकं घर नवं ...करीन, इतकी मिळकत सांचलीय आजवर! " आणि मग उसासा टाकून म्हणत. " वसूल होईल तेव्हां होईल!— पठाणासारखं, आधीं पैसा टाक न् मग औषध घे असं नाहीं म्हणवत आपल्याला!"

पडकं घर, मोडका संसार

खरोखरच काकांचें घर पडकें होतें आणि त्यांतला संसार मोडका होता. बायको व चार मुलें इतक्या मोठ्या कुटुंबाचा गाडा रेटतां आजच्या महागाईच्या काळांत काकांची किती दमछाट होत असेल याची कल्पना केलेली बरी; पण काका त्याबद्दल कधीं कुरकुरतांना दिसत नसत. घरांत रेशन आलें म्हणजे पुरे, बाकीच्या 'चैनी' वर ते कधीं हक्क सांगत नसत, आणि ती 'चैन' मिळाली नाहीं म्हणून कधीं कुरकुर करीत नसत.

माझा डॉक्टर मित्र काकांची नेहमीं टिंगल करी. तो म्हणे, " काकांनीं या वैद्यकीचा नाद सोडून द्यावा. भिका मारवाड्याकडे वह्या लिहायला राहिले तरी पोटभर जेवतां येईल, अन् अंगभर वस्त्र मिळेल सर्वांना. पण काकांचा 'यमराज–सहोदर' म्हणून घेण्याचा हट्ट सुटेल तर ना— "

बाप सावकार म्हणून शिकलास

माझ्या मित्राचे शब्द काकांच्या कानांवर गेले म्हणजे मात्र ते चिडत. मी रस्त्यानें चाललों असलों तरी मला जोरानें हाक मारून ते दवाखान्यांत बोलवीत आणि जणुं माझ्या मित्राचा प्रतिनिधि म्हणून माझाच कान पिळीत म्हणत, " काय रे गध्द्या! बाप सावकार म्हणून कालिजांत जाऊन डिग्र्या घेऊन आलास. माज आलाय् होय रे तुला? अरे तुझ्यासारखं नुसतं पाणी बाटल्यांत भरून देऊन न् सुया टोंचून लुबाडलं लोकांना, म्हणजे धन्वंतरी झाला काय रे?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सात पिढ्याचें वाण

अरे, चारदोन वर्षांत तूं जितके रोगी मारलेस त्याच्या दशांश तरी मीं पंचवीस वर्षांत मारलेत का दाखवून दे. अन् मग मला 'यमराजसहोदर' म्हण, समजलास ?" आणि आणखी एकदां जोरानें माझा कान पिळीत काका म्हणत, "अन् गध्द्या, तुझ्यासारखा उपरा डॉक्टर नाहीं मी. केवळ पोटभरू. सात पिढ्यांत चालत आलेलं वाण आहे तें आमच्या घरांण्यांतलं, अन् अजून सात पिढ्या चाललं पाहिजे..."

काकांचा हट्टाहास

आणि हें वाण आपल्या मागें घेण्यासाठीं मुलाला तयार करण्याचा अट्टाहास काकांनीं चालविला होता. काकांचा मुलगा मराठी शाळांत परीक्षा पास झाल्यावर त्यांच्या कांहीं हितचिंतकांनीं त्याला तलाठ्याची नोकरी मिळवून द्यायचें कबूल केलें. बापाच्या अर्ध्याउघड्या संसावर पांघरूण घालण्यापुरतें तो मिळवील असा त्या हितचिंतकांचा साधा सरळ हिशेब होता.

वैद्य म्हणूनच जगलें पाहिजे

पण काका सर्वांना झाडून म्हणाले, "भलतंसलतं ऐकून घेणारा नाहीं मी! माझ्या मागं मुलानं खलांत औषध घोटून न् पुड्या बांधूनच जगायचं तर जगावं, नाहीं तर मरून जावं!—त्याला लेखणी हातीं धरायला लावून मी काय माझ्या पितरांना नरकांत लोटूं? तें होणं शक्य नाहीं. तुम्ही सांगू नाहीं, अन् आम्ही ऐकूं नाहीं..."

'आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार'

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्वप्रकारचीं सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहा:—

आयुर्वेदिक औषधी भांडार

२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

मुलगी वैद्यालाच द्यावयाची

इतकेंच नव्हें, तर मुलगी एकाद्या वैद्यालाच द्यावयाच्या अट्टाहासापायीं दोन चार चांगलीं स्थळं हातचीं गमावून काकांनीं तिला अशाच एका म्हाताऱ्या कुडबुड्या वैद्याच्या गळ्यांत बांधली. तिचें मंगळसूत्र बळकट म्हणूनच अजून तिचें भरलें कपाळ पहायला मिळत आहे.

काकांची मेख

काकांची मेख मला पुरेपुर माहित असल्यानें मी कधींमधीं त्यांच्याकडून त्रिफळा नाहीं तर हिंगाष्टक मागून घेतो. आणि काका तेवढ्याच आधावर मला आयुर्वेदाचा मोठा अभिमानी समजतात. ते म्हणतात, "अरे, सुश्रुत, चरक हीं नांवंच अशीं आहेत कीं त्यांच्यापुढें तुमची डॉक्टरकी न् जाडजाड पुस्तकं फोल आहेत. अरे, पूर्वी काय डॉक्टर होते आपल्याकडे ?–माझ्या जवळची एकेक मात्रा म्हणजे अशी आहे, तुमच्या त्या पेन्सिलीन का फेन्सिलीनच्या तोंडांत मारील!

मीं होतों म्हणून—

तुझा आजा आजारी होता—त्यावेळीं मी नुकताच कुठं वैद्यकी करायला लागलों होतों. सगळे वैद्य झाले, डॉक्टर झाले न् शेवटीं तुझा बाप मला बोलवायला आला. मी नाडी पाहिली न् महामृत्युंजय मात्रेचे चार वेढे दिले, त्यावर सहा घंटे जिवन्त होता तुझा आजा. अरे, मी होतों म्हणून त्याला शेवटच्या निरवानिरवीचं बोलणं करण्याइतकी तरी शुद्ध आली."

आब्याच्या बायकोची प्रकृति

आमच्या शेतावरचा आब्या एकदां धावत पळत रात्रींबेरात्रीं आला. त्याच्या बायकोची प्रकृति अत्यंत बिघडली होती. तो माझ्या बाबांच्या हातींपायीं पडून म्हणाला, "तुम्ही सांगा डॉक्टरना, नाहींतर एकाद्या वैद्याला, तुम्हीं सांगितलं तर येतील."

मुसळधार पाऊस

पण तेवढ्यांत एकाएकीं आभाळ भरून येऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...सुरु झाला आणि पावसाची मुसळधार ...ली. आतांतर बाबांचे ऐकूनहि कोणी वैद्य-... वार मैल लांब खेड्यावर जायला तयार ... शिवाय, वाटेंत एक ओढा होता; त्याला ... आलें असण्याचा संभव होता, अन् त्या ...च्या पाण्याला विलक्षण ओढ असते.

माझा जीव धोक्यांत घालू ?

...तर वैद्य-डॉक्टरांचे नकार घेऊन अखेर मीं ... माझ्या डॉक्टर मित्राकडे नेलें. हा माझा ... मित्र माझा इतका जिवाचा मित्र होता कीं... ...नें मला मूर्खांत काढीत म्हटलें, "भलतेंच ...री! कुणाचा जीव वांचवायसाठीं मी जीव ... घालूं! अरे हो! धंद्यांतलं कर्तव्य मला ... त्याची जाणीव नको करून द्यायला!"

माझा निष्फळ प्रयत्न

आम्ही परतलो तेव्हां आब्या अक्षरशः रडत ... आणि मी त्याची समजूत घालण्याचा निष्फळ ... करीत होतो. मी म्हणालों, "आब्या, हा ...पैशाचा प्रश्न का आहे? बाबांनीं पैसे द्यायला ...कार दिलाय? पण, करायचं काय? देवाचं नांव ...तं न्..."

अंधारांत टक्कर

आम्ही पावसांतून, अंधारांतून धडपडत घरीं ...त होतो, तों वाटेंत कुणाशीं तरी टक्कर झाली ...—'कोण रे?' या कणखर आवाजांतील ...मीं ओळखलें. मीं विचारलें, "कोण? काका? ... कोणीकडे?"

"मीच विचारतों तुला, तूं कुठं भटकतोस ... वेळीं? अन् हा कोण बरोबर?" काकांनींच ...प्रश्न केला.

...शाचा लालची आणि जिवाचा लोभी

मी सारी हकीकत सांगतांच काका चिडून ...ले, "अरे पण गध्या, इतका वणवणलास तर ...हा काका मेला होता कीं काय? अरे त्या पैशा-...च्या न् जिवाच्या लोभी पोटभरूंकडे गेलासच कशाला? हो, पण माझ्यावर विश्वास नाहीं ना? जसं कांहीं याची बायको मी मारणार न् ते जगवणार!"

"तसं नाहीं, काका-" मी म्हणालों. पण मला माहीत होतें कीं आमच्या आब्यालाहि बायकोच्या त्या गंभीर परिस्थितींत तिची केस काकांच्या स्वाधीन करावी असें वाटत नव्हतें.

बुडत्याला काडीचा आधार

मला पुढें कांहीं बोलूं न देतांच काका म्हणाले, "चल चल, आब्या, असाच दवाखान्याकडे चल. निघूंच आपण!" बुडत्याला काठीचा आधार असा विचार आब्यानें केला असावा. कारण, तो कांहींच बोलला नाहीं. मी म्हणालों "वाटेंतला ओढा, तुमचं वय--" काका चिडून म्हणाले, "ती बाई तिकडे मरू घातलीय त्याचा विचार कर आधीं, मग माझा आणि ते फणकाऱ्यानें पुढें चालूं लागले. दवाखान्यां-तला आपला बटवा खांद्यावर टाकून पुनः बाहेर येत काका म्हणाले, "तूं जा, अन् जातांना माझ्या घरीं निरोप सांग..."

माझी कातडीबचाऊ वृत्ति

मला बरोबर न येण्याची काकांनीं सूचना दिली ती माझ्या कातडीबचाऊ वृत्तीला पथ्यावरच पडल्यासारखी वाटली. पण घरीं अंथरुणावर पडल्या पडल्या मात्र

इंजेक्शन-चिकित्सा

पाश्चात्य इंजेक्शन चिकित्सेवरील अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिलेला अभिनव मराठी ग्रंथ. २६ प्रकरणें, ३०० वर रोगांची अद्यावत् चिकित्सा. २७० पृष्ठें, जाड बांधणी. 'सचित्र इंजेक्शन विज्ञान' प्रमाणेंच हाहि ग्रंथ लौकरच दुर्मिळ होण्याची शक्यता आहे. त्वरित मागणी करा. किंमत ६ रु., ट. ख. निराळा.

१ सुबोध वैद्यक ग्रंथमाला
पो. कागल जि. कोल्हापूर
२ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक सिटी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माझी सद्सद्विवेकबुद्धि मला सारखी टोचीत होती. सकाळपर्यंत मला कांहीं धड झोंप आली नाहीं.

" चार दिवस शौचाला नाहीं "

आणि मी सकाळीं उठून बाहेर आलो तेव्हां उन्ह लख्ख पडलें होते. मी तोंड धुवून चहा घेतों तोंच काका लंगडत लंगडत घरांत शिरतांना दरवाज्यां-तून दिसले. मी पुढें येऊन पाहातों तर काकांच्या कपाळावर दोनतीन ठिकाणीं टेंगळें आलेलीं होतीं. सतरंजीवर बसतांना 'आई ग!' असा उद्‌गार काकांच्या तोंडून निघाला. बाबांना दरवाजांतून बाहेर येतांना पाहून काका म्हणाले, " अहो, उगीचच घाबरला आब्या. अहो, चार दिवसांत शौचाला साफ नव्हती— "

अर्धा मैल गडगडत गेलो

बाबांनीं मध्येंच विचारलें ठीक आहे ना ? पण हें काय ? हीं कपाळावर टेंगळं ? " काका हंसत म्हणाले, " अहो, तुमचा तो ओढा ! कपाळच काय, गध्यानं सारं अंग शेकून काढलंय माझं- चांगला अर्धा मैल तरी दगडागोट्यांवरून गडगडत नेलं पाण्यानं मला— अन् तुमचा आब्या तरी किती घाबरट पहा ! मी कुठं गेलो हें पहावयाचं सोडून बेट्यानं सरळ घरचा रस्ता धरला. खूप खालीं गड-गडत गेल्यावर मीं सावरलं कसंबसं स्वतःला अन् तिथून तंगड्या तोडीत गेलों त्याच्या झोपडीवर. सुदैवानं माझा बटवा त्याच्यापाशीं होता. लगेच केले उपचार सुरू न्--"

तेवढ्यांत मधल्या दरवाजांत येऊन उभी असलेली माझी आई म्हणाली, " म्हणजे, देवानंच खैर केली कीं तुमच्यावर, भावजी ! "

दृष्टिकोनांत फरक पडला

"हो वहिनी, देवाशिवाय काय होतंय् या जगांत?" आणि मग पुढें म्हणाले, " म्हटलें, आधीं तुम्हाला वर्दी द्यावी, काळजींत असणार तुम्ही. जातों. लेपाबिप लावले पाहिजेत घरीं जाऊन. बाकी, एकदां लेप दिला कीं सहा तासांत सूज उतरलीच पाहिजे. " आईनें आग्रह केला म्हणून काकांनीं चहा घेतला. मी काकांना पोहोंचवायला निघालों. वाटेंत चालतां चालतां मी म्हणालो, "काका, एक कबुली द्यायचीय्. एका रात्रींत तुम्ही माझ्या दृष्टिकोनांत फार मोठा फरक घडवून आणला आहे!"

हें लक्षांत ठेवा

" मला तुझी ही भाषा कळत नाहीं," काका म्हणाले, " पण मी तुला नेहमीं सांगतों तें लक्षांत ठेव. धंदा करायचा असतो माणसानं पोट भरण्या-साठीं, पण केवळ पोट भरणं एवढंच धंद्याचं ध्येय नसावं. नाहींतर डॉक्टर-वैद्य होणं काय न् कसाई होणं काय सारखंच. माझ्या बाबांनीं मला शास्त्र दिलंय् तें फार थोडं आहे असं इतर म्हणतात म्हणोत बिचारे ! पण माझे बाबा भर उन्हांत दहा-दहा मैलांवर जाऊन रोगी पहात—दहा मैल चालण्याचा भाव न ठरवतां बरं कां ? त्यांचा मुलगा म्हणून ती निष्ठा टिकली हें माझं भाग्य. माझ्या मुलांतहि ती राहो ही इच्छा.... "

काका लंगडत चालत होते. मी विचार करूं लागलो : ती निष्ठा ?—छे ! पुढें विचारच करवेना मला......

—मौज १९ एप्रिल १९५३

वर पाहिजे

रजिस्टर्ड मिडवाइफ, ब्राह्मण वय वर्षे २७, १० वर्षें कायम नोकरी. स्वतंत्रपणें सूतिकागृह चालविण्याची तयारी. वर वैद्यकीय व्यवसायांतील असल्यास अधिक चांगलें. पत्रव्यवहार-C/o आयुर्वेद पत्रिका, नाशिक

सेवा संघाचीं सर्व औषधें तसेंच खालीचीं सर्व देशी काष्ठौषधी व ताजी वनस्पती आणि शिलाजीत, कस्तुरी, केशर, भीमसेनी कापूर, गोरोचन, वाकेरी भाते, वंशलोचन, नागकेशर, अनंतमूळ, जितसाया, उत्तम महाबळेश्वरी मध वगैरे औषधें मिळण्याचें ठिकाणः—

देशी सर्वौषधी संग्रहालय
पोलिस चौकीसमोर, दादर मुंबई २८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जम्मू-काश्मीरमधील

औषधी संशोधन शाला :-

जम्मू-काश्मीर येथील सरकारी औषधी संशो-
शाळेनें त्या राज्यांतील भिन्नभिन्न भागामध्यें
होणाऱ्या १३० प्रकारच्या गवतांचे (तृण) नमुने
केले आहेत. या प्रत्येक तृणांतील खाद्यगुणांचें
धन केलें जात आहे. यासाठीं १ वर्ष लागेल.
नंतर त्याचा निकाल जाहीर होईल.

उपयुक्त कार्य करीत आहे

या संशोधनशाळेची स्थापना १९४१ सालीं
आहे. सुगंधित तैलवाल्या वनस्पतींची लागवड
या वनस्पतींतून औषधें, तेलें व सत्वें इत्यादि
याचें उपयुक्त ही शाला कार्य करीत आहे. ह्या
धनशाळेचें असें मत बनलें आहे कीं काहीं
नंतर भारताला बहुतेक औषधें व प्रसाधनसामुग्री
विदेशांवर फारच थोडें अवलंबून रहावें
. गतवर्षी या संशोधनशाळेंत तयार झालेल्या
पासून ५॥ लाख रुपयांपेक्षां अधिक द्रव्य-
झाली आहे.
बेलाडोनापासून तयार केलेलीं कांहीं औषधें
केवळ ह्याच औषधी संशोधन शाळेंत तयार
जातात असें कळतें.

जम्मूमध्यें मुख्य केंद्र

संशोधन-शाळेचें मुख्य केंद्र जम्मूमध्यें असून
एक शाखा श्रीनगरमध्यें आहे. गुलमर्गाचे
चारीकाहमध्यें २५० एकरांचें एक शेत तयार
आहे. हें शेत समुद्रसपाटीपासून ७००० ट
र आहे. दुसरें एक ५०० एकरांचें औषधी
(फार्म) तयार करण्याचें काम चालूं आहे.
पामरेश्रम नांवाची एक कृमिनाशक वनस्पति
असें सिद्ध झालें आहे व ही वनस्पति काश्मीर
त विपुल प्रमाणांत उपलब्ध होते. संशोधन-
त्याच्या चारीकाह फार्ममधील वनस्पति, तसेंच
दुसऱ्या वनस्पति ज्यांत पुदीना, लव्हेंडर,
वगैरे वनस्पति यांच्यावर संशोधन चालूं आहे.

अनुक्रमणिका

आयुर्वेद सेवा संघांत पारिजातक	१२७
गु. कै. वैद्यभूषण हिर्लेकरशास्त्री	१२९
दंभ चिकित्सा (डाग देण्याचा उपचार)	१३१
चन्द्रकला	१३७
तृण ज्योतिष्मती, पत्रव्यवहार	१४०
जन्तु चिकित्सा	१४१
सुवर्णराजवंगेश्वराचा योग्य पाठ कोणता	१४३
पंचानन-ज्वरांकुश	१४७
आयुर्वेदीय संशोधनाची आवश्यकता	१४९
ती व्यवसाय निष्ठा (संपूर्ण गोष्ट)	१५३

देशी औषधांचें परीक्षण

ह्या संशोधनशाळेचें दुसरें एक महत्वपूर्ण अंग असें आहे कीं ही संशोधनशाळा भारतांतील निरनिराळ्या प्रदेशांत व भागांत तयार केल्या गेलेल्या देशी औषधांच्या नमुन्यांचें परीक्षण करितें. अशा परीक्षणानंतर आश्चर्यजनक माहिती मिळाल्यावांचून रहात नाहीं. ह्या संशोधनशाळेच्या एका अधिकृत पत्रकाद्वारें असें निदर्शनास आणून देण्यांत आलें आहे कीं, बाजारांत विकलीं जाणारीं बरीचशीं औषधें हीं शुद्ध दर्जापेक्षां बरीच खालच्या दर्जाचीं आहेत व त्यांत अनेक प्रकारच्या अयोग्य भेसळीहि करण्यांत आल्या आहेत.

ह्याहि गोष्टीचें परीक्षण केलें जातें कीं, सर्व देशी औषधांमध्यें सक्रीय पदार्थ आहेत किंवा नाहींत ? कांहींत सक्रीय पदार्थ मिळाले व काहींत कमी सक्रिय पदार्थ मिळाले. परन्तु याचा अर्थ असा नाहीं कीं, कमी सक्रिय पदार्थ असलेली औषधें अगदींच टाकाऊ आहेत.

कर्नल चोपडा व त्यांच्या बरोबर संशोधन करणारे त्यांचे सहकारी, राष्ट्रीय विज्ञान इन्स्टिट्यूटच्या प्रयोगशाळेंत मुंबई येथें तारीख ६ व ७ ऑगस्ट-पासून देशी औषधें व कृमिजनक औषधांच्या संबं-धांत होणाऱ्या चर्चेकरितां त्यांच्या संशोधनासंबंधीं लेख पाठवित आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

अमृतप्राश! च्यवनप्राश!! अगस्तिप्राश!!!

–: 'टॉनिक' औषधें देतांना त्रिदोषविचार :–

आयुर्वेदशास्त्र हें लोकांच्या प्रकृतींचा व त्यांना होणाऱ्या रोगांचा विचार त्रिदोषपद्धतीनें करतें. रोग्याचें औषध निवडतांना दोषांचा विचार केला जातो, त्याचप्रमाणें त्यांना पौष्टिक कल्प (टॉनिक) सुचवितांनाहि तो विचार आवश्यक असतो. केवळ 'सर्वरोगे वसंत' असें म्हणून भागत नाहीं.

अमरावती येथील वैद्य त्र्यं. म. गोगटे हे आपल्या रुग्णांना शक्तिवर्धक औषधें देतांना वातप्रकृतीसाठीं **अमृतप्राश**, पित्तप्रकृतीसाठीं **च्यवनप्राश**, व कफप्रकृती लोकांसाठीं **अगस्तिप्राश** सुचवितात व परिणामांची नोंद ठेवतात.

च्यवनप्राश व **अगस्तिप्राश** आतां प्रसिद्धच आहेत. **अमृतप्राश** वेळोवेळीं ताजा बनवावा लागतो व त्यासाठीं ते आयुर्वेद सेवा संघाकडे मागणी करतात. अशी शास्त्रीय दृष्टीची मागणी पुरविण्यास सेवा संघास नेहमींच आनंद वाटतो.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक.

— पावसाळा व आमांश —

पावसाळा म्हणजे आमांश (आव), हगवण, पोटदुखी इ. विकारांचा जोर होण्याचे दिवस. विकार झाल्यावर औषधें घेण्यापेक्षां हे रोग होऊ नये म्हणून आधींच उपाय करणें, अधिक सोपें व सोईचें आहे.

— कुटजारिष्ट व भल्लातकासव —

पावसाळ्यांत ज्यांचें पोट बिघडतें त्यांनीं पुढील २ औषधापैकीं एक औषध थोड्या प्रमाणांत पण अवश्य घ्यावें. आमांश, हगवण, पोटदुखी या रोगांवर **कुटजारिष्ट** व **भल्लातकासव** हीं दोन औषधें गुणकारी आहेत.

उष्ण प्रकृतीच्या व उष्णतेची (पित्ताची) बाधा असलेल्या लोकांनीं **कुटजारिष्ट** व थंड प्रकृतीच्या लोकांनीं **भल्लातकासव** घ्यावें.

— घेण्याचें प्रमाण २ चमचे औषध अर्ध्या जेवणांत समभाग पाण्याबरोबर —

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नाशिक

संपादक व प्रकाशक:— वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक
मुद्रक:— श्री. दामोदर महादेव चन्द्रात्रे, विज्ञान प्रेस, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

(वर्ष ७ वें) नाशिक, ता. १६ सप्टेंबर १९५३ (अंक ६ वा

देशी वैद्यक बोर्डाचे अध्यक्ष
डॉ. योध यांच्यावरील अविश्वासाचा ठराव

१९३९ सालीं देशी वैद्यक बोर्ड स्थापन झालें तेव्हांपासून आजवर १४ वर्षांत घडून आली नाहीं अशी घटना ता. १०।९।५३ रोजीं भरलेल्या बोर्डाच्या सभेच्या वेळीं घडून आली.



वैद्य प्रतापकुमार

वैद्य प्रतापकुमार यांनीं ठराव पाठविला

असें समजतें कीं, बोर्डाच्या सदर सभेंत मांडण्यासाठीं एक ठराव, बोर्डाचे निवडून आलेले सभासद वैद्य प्रतापकुमार पोपटभाई यांनीं बोर्डाकडे पाठविला होता. ठरावाची भाषा पुढीलप्रमाणें आहे.

" वैद्यकीय बोर्डाच्या अध्यक्षाबरोबर व त्यांच्या हाताखालीं ३ वर्षेपर्यंत काम केल्यानंतर हें बोर्ड अशा खेदप्रद निर्णयाला आलें आहे कीं, चालू बोर्डाचे अध्यक्ष डॉ. बी. बी. योध यांच्यावर या बोर्डाचा विश्वास राहिलेला नाहीं. "

हा ठराव मांडण्यास अध्यक्षांनीं परवानगी दिली होती. व त्याप्रमाणें तो कार्यक्रम पत्रिकेवर घेण्यात आला होता. तथापि निवडून आलेल्या सभासदांपैकीं हुबळीचे वैद्यराज दा. अ. हळसीकर हे कांहीं (कोर्टाच्या) कामानिमित्त सभेस हजर न राहिल्यामुळें वैद्यराज गोगटे यांनीं बोर्डाच्या सभेंत वैद्य प्रतापकुमार यांना केलेल्या विनंतीनुसार हा ठराव या सभेंत मांडण्यांत आला नाहीं.

या ठरावासंबंधीं माहिती देणारें एक विस्तृत निवेदन वैद्य प्रतापकुमार यांनीं तयार केलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रम

"ऑगस्ट महिन्याच्या पूर्वार्धांत प्रसिद्ध होणार अशी ज्या संबंधीं धारणा होती त्या अभ्यासक्रमाबाबत ऑगस्ट अखेर कांहींच समाचार वृत्तपत्रांत न आल्यामुळें बरेच वैद्य निराश झाले आहेत. तथापि अनेक विश्वसनीय ठिकाणांहून मिळालेल्या माहितीप्रमाणें असें कळतें कीं, ऑक्टोबरमध्यें नाहींतर नोव्हेंबरमध्यें तर अवश्यच या अभ्यासक्रमाची सविस्तर माहिती वैद्य जनतेला मिळेल व ती माहिती वैद्यमंडळींना आवडेल अशी असेल.

गुरुपरंपरागत शिक्षणाला मान्यता

आयुर्वेदाच्या गुरुपरंपरागत शिक्षणाला मान्यता देण्याचा निर्णय मुंबई सरकारनें केलेला आहे व त्यांच्यासाठीं योग्य असे नियम तयार करण्याचें काम चालू आहे. आयुर्वेदाच्या शिक्षणाला प्राधान्य देणारा अभ्यासक्रम या प्रांतांत पुनः सुरू होईल व त्याची व्यवस्था थोड्या खर्चाच्या व थोड्या साधन सामुग्रीच्या पाठशाळांतून केली जाईल असें सांगण्यांत येतें.

शिक्षणाची स्वतंत्र व्यवस्था

ही सर्व शिक्षणव्यवस्था सध्यांची सरकारी आयुर्वेदीय फॅकल्टी (विद्याखातें) करूं शकणार नाहीं. यासाठीं हा अभ्यासक्रम तदनुसार शिक्षण व परीक्षा यांची व्यवस्था पाहाण्यासाठीं मुंबई सरकार एक स्वतंत्र तंत्र अमलांत आणील व त्यांत सर्व वैद्यच सभासद असतील.

सर्व मुंबई राज्यांत व्यवसायास परवानगी

या नव्या परीक्षांमध्यें पास झालेल्या वैद्यांना सध्यांच्या देशी वैद्यक बोर्डाचें रजिस्ट्रेशन मिळणार नाहीं. पण मुंबई सरकार त्या कायद्याच्या कलम २ प्रमाणें मुंबई राज्यांत कोठेंहि व्यवसाय करण्यास त्यांना परवानगी देईल.

मुख्य मंत्र्यांचें धोरण

या अभ्यासक्रमाबाबत चर्चा ज्यावेळीं मुंबई सरकारच्या मंत्रीमंडळांत झाली, त्यावेळीं मुख्य मंत्री ना. मुरारजीभाई देसाई यांनीं असें सांगितलें कीं, पनवेल येथें भरलेल्या महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाच्या प्रसंगीं शुद्ध आयुर्वेदाच्या अध्ययन अध्यापन व व्यवसाय याला सरकारी पाठिंबा देण्याची



माझी नीति मी जाहीर केली होती व त्याचा अंमल करण्यास योग्य इतका समय त्यानन्तर लोटला आहे.

सध्यां यासंबंधीं सर्व कागदपत्र तयार झाले असून सरकारचें अर्थखातें या समग्र उपक्रमाचा विचार अर्थदृष्ट्या करीत आहे. व तो विचार पुरा झाला म्हणजे ही योजना जाहीर होईल, त्याप[illegible] अधिक काल लागणार नाहीं असें बोललें जात आहे.

—'आयुर्वेदजगत्' व[illegible]

वैद्यासाठीं उपयुक्त ग्रंथ

ॲलोपॅथिक चिकित्सासंग्रह–सुमारें ७०[illegible] रोगांवरील चिकित्सा व ३४० प्रिस्क्रिप्शनें व इंजेक्शनें यांनीं युक्त. मराठींतील अभिनव ग्रंथ, आपल्या ॲलोपॅथिक ज्ञानांत वाढ होण्यासाठीं आजच मागवा. किं. ४॥ रु. ट. ख. निराळा

१ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

२ डॉ. मोकाशी, ठाणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काढे टिकाऊ कसे होतील ?

वैद्य मो. ल. ठोंबरे
चिनापळ पू. खा.

काढे टिकाऊ कसे करावेत ह्या विषयावर र्वेद-पत्रिकेंत चर्चा चालू आहे. ह्या विषयाबाबत विचार व अनुभव पुढीलप्रमाणें आहेत.

टिकाऊ काढे म्हणजे आसवारिष्टें

काढे टिकाऊ करण्याची शास्त्रोक्त योजना म्हणजे त्यांचीं आसवारिष्टें करणें होय. आर्यौषधी कारखानदारांनीं कित्येक काढे पातळ टिकाऊ स्वरूपांत तयार करून ते विक्रीस ठेवले आहेत. व ते उपयोगीहि आहेत. त्यामुळें काढ्याच्या द्रव्यांची जमवाजमव व काढा करण्याचा खटाटोप जनतेला न करतां काढ्याची बाटली आणली कीं त्याचें काम भागतें. ...क्रीस निघालेले टिकाऊ काढे म्हणजेच आसवारिष्टें ... त्यांत दुसरें कांहीं नाहीं.

रेक्टि. स्पिरिट मिळणें कठीण

काढ्यांचे आसवांत रूपांतर न करतां प्रॅक्टिसला ...ी म्हणून तयार काढा टिकविण्याचा प्रचलित ... म्हणजे १५ ते २५ भाग मद्यार्क घालणें अगर ...ीय क्रियेनें त्यांत मद्यांश उत्पन्न करून घेणें. ... राजमार्ग आहे. वैद्यराज सातोसे यांच्या सूचने-... रेक्टिफाईड स्पिरिट घालणें म्हणजेच टिंक्चर ... तयार करणें होय. असें टिंक्चर वैद्यांना घरीं ... परवाना) करणें कायद्यानें हरकतीचें होईल. रेक्टि. स्पिरिट वापरलें तरी तें परवडणार नाहीं. सातोसे यांचें तयार काढ्यांतील स्पिरिटचें प्रमाण ... नाहीं. दारुबंदी कायद्यानें रे. स्पिरिट मिळविणें ... झालेलें आहे, व त्याचे भावहि अत्यंत महाग ..., सहा महिन्याला १ बाटलीपेक्षां जास्त तें रजि-... वैद्याला मिळणार नाहीं.

सरकारी धोरण अयोग्य

आसवारिष्टेंहि आतां वैद्यांनीं करूं नयेत, अशा ...े सरकारचें धोरण दिसत आहे. ३३ टक्के कर ... बसूं पहात आहे. ह्यावरून वैद्यांना भविष्यांत आसवारिष्टें करणेंहि कठीण होईल; मग काढ्यांत रेक्टि. स्पिरिट वापरण्याची परवानगी कशी मिळेल ह्याचा वैद्यवर्ग विचार करतील.

काढे टिकाऊ करण्याचा अन्य प्रकार

आतां आसवपद्धति व रे. स्पिरिट न वापरतां त्याचे गुणधर्मांत बदल न होतां व न फसफसतां (फर्मेंटेशन) टिकाऊ कसे करतां येतील ह्या प्रश्नाचा विचार करावयाचा आहे. ह्या संबंधीं दोन प्रकार संभवतात. (१) कांहीं मुदतीपावेतो टिकाऊ (२) कायम टिकाऊ. मी फक्त कांहीं मुदती पावेतोच टिकाऊ कसे राहतील, ह्याचा विचार व प्रयोग केलेले आहेत. ऋतुपरत्वें लागतील त्या प्रमाणांत ते केले म्हणजे दवाखान्याची गरज भागते. कायम टिकावू करावयाचे वेळीं त्याचें सरळ आसव करणें मी पसंत करतो.

गुणांत बदल होतो

काढे ३-४ महिने टिकाऊ झाले तरी हा प्रश्न मोठ्या प्रमाणांत सुटतो. कापूर, ओव्याचें फूल (थायमॉल), पेपरमिंट क्रिस्टल्स हे एकटे अगर त्यांचें मिश्रण वापरल्यानें काढे खरोखरच टिकाऊ होतात कां, गुणांत बदल होत नाहीं कां हे प्रश्न पुढें येतात.

माझ्या मतानें गुणांत जरूर बदल होतो. ज्या काढ्यानें नाजूक प्रकृतींत गुण येतो, तेथें वरील द्रव्यें वापरून टिकाऊ केलेला काढा वापरल्यानें शैत्य व शौचाशुद्धीच्या तक्रारी होतात. वरील द्रव्यांच्या तीव्र वासानें काढ्यांत होणारा सडण्याचा दर्प दाबला जातो. टिकाऊ गुण (प्रिझर्व्हेशन) तीव्र वास कमी झाल्यावर रहात नाहीं. ह्या प्रयोगानें काढा टिकाऊ झाला असें समजणें योग्य होणार नाहीं असें माझें मत आहे.

कांहीं मुदती पावेतों टिकाऊ

प्रथम काढा तयार करावा. काढा-द्रव्यें निवडतांना तीं ताजीं हवीं; ओलीं असल्यास फारच उत्तम, मात्र तीं स्वच्छ धुवून घ्यावीं. किडकी सडकी जुनी वन-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्पती द्रव्यें घालून टिकाऊ काढ्याचा प्रयत्न करूं नये. स्वच्छतेनें कुटलेलीं ८ पट स्वच्छ गोडे पाण्यांत रात्रभर कल्हईचें भांड्यांत भिजत ठेवून झांकून ठेवावें. मग काढा करून १/१६ शेष उरवून गाळावा. गाळतांना कपड्याच्या भांड्याच्या हाताच्या स्वच्छतेकडेस (निर्जंतुक क्रियेकडेस) फार लक्ष ठेवावें. स्वच्छ कपड्यांतून काढा गाळून घेतल्यावर पुनः तो काढा बॅग फिल्टर (गाळण्याची लोकरीची जाड स्पेशल पिशवी) मधून गाळून नंतर सदर काढा पेपर फिल्टर करावा. ह्या कामीं वापरली जाणारी बाटली, फिल्टर बॅग इ. उपकरणें कढत पाण्यांतून काढून स्टरलाइज्ड करून घ्यावी. मग त्यांत पुढील संरक्षक द्रव्याचा द्रव घालावा.

संरक्षक द्रव्य—ऊद फूल

ऊदफुलाची कृति— २ पौंड उत्तम कवड्या ऊद (सिंगापुर) घ्यावा. बाजारांतील कृत्रिम ऊद, राळ व संगजिरा असलेला बहुतांशीं मिळतो. तो ऊद फूल करण्यास निरुपयोगी समजावा. असली उदाची भरड पूड करून त्याच्या १/४ स्वच्छ वाळू त्यांत घालावी. धुतलेली कोरडी वाळू घातल्यानें ऊदाची ढेप बनत नाहीं व सर्व अणूंस उष्णता मिळते. ऊद-वाळू यांचें मिश्रण दोन मडक्याच्या आकाराच्या पितळी अगर तांब्याच्या संविलेप केलेल्या भांड्याच्या डमरू यंत्रांत घालावें. डमरू यंत्राचें ऊद घातलेल्या भांड्यापेक्षां वरचें भांडें मोठें असावें. मातीचें मडकें वापरूं नये. सदर डमरू यंत्र मोठ्या लोखंडी घमेलींत वाळू घालून ती चुलीवर ठेवून तीवर ऊद असलेलें डमरू यंत्राचें भांडें ठेवावें. वरील भांड्याचें बुडावर थंड पाण्याच्या घड्या ठेवून त्या नेहमीं थंड राहतील अशा बदलीत जाव्यात. आंच सावकाश वाढवीत जावी.

ऊदफुलांतील तेल

अशा तऱ्हेनें ८-९ तास भट्टी चालू ठेवून स्वांगशीत झाल्यावर डमरू यंत्र तिरकस धरून युक्तीनें संधि सोडवावा, म्हणजे वरच्या भांड्यांत फुलासारखा पांढरें व पिसांसारखें हलकें द्रव्य मिळतें. खालील भांड्यांत उदांत कमी उष्णतेमुळें सत्त्व राहिलें असेल तर पुनः उर्ध्वपतित करून घ्यावें. चांगल्या उदा-पासून १/५ ऊदफुल निघतें. ह्या फुलावर एकप्रकारचें तेल असतें. हें फूल ब्लॉटिंग पेपरमध्यें दाबून ठेवावें, म्हणजे तेल शोषलें जातें व कोरडें होतें. फुलास मळका रंग आला तर फुल पुनः ऊर्ध्वपातित करून घेतल्यानें स्वच्छ चमकदार पिसासारखें व अत्यन्त हलकें उत्तम सुवासिक द्रव्य मिळतें. ह्यालाच असली ऊद्फुल (ॲसिड बेन्झॉइक) म्हणतात.

ॲसिड बेन्झॉइक

ह्याचा औषधी म्हणून अनेकप्रकारें उपयोग होतो. हें फूल २०० भाग थंड पाण्यांत व २४ भाग कढत पाण्यांत विरघळतें. दारूंत व क्षारांत पुष्कळ विरघळतें. ह्याचीं लवणें पाण्यांत विरघळतात. बाजारांत केमिस्टकडे मिळणारें ऊदफूल हें कृत्रिम असतें. गाई व घोडे यांच्या मूत्रापासून काढतात; ह्यास ॲसिड बेन्झॉइक म्हणतात. त्याचा मी उपयोग केलेला नाहीं. त्याला सुवास नसतो.

संरक्षक द्रव [प्रिझरव्हेटिव]

कल्हई केलेल्या चिनी पात्रांत २५ तोळे पावसाचें अगर बाष्पजल (डिस्टिल वॉटर) घेऊन त्यांत ५ तोळे वरील ऊदफूल टाकावें व चुलीवर ठेवून उकळावें. त्यांस थोडी थोडी सुवागीच्या लाहीची पूड घालीत जावे. म्हणजे ऊदफूल पाण्यांत विरतें. द्रावण-क्रिये इतकीच लाही घालावी, जास्त घालूं नये. एकूण द्रव २५ तोळे कायम राहील इतकें गरम पाणी घालून हा द्रव पेपर फिल्टर करून ठेवावा, म्हणजे काढा टिकविणारा संरक्षक द्रव (बोरो बेन्झोईक) तयार झाला.

संरक्षक द्रवाचा उपयोग करण्याची रीत

१ पौंड गाळलेल्या काढ्यांत १ ते २ चमचे [चमचा– १ ड्राम] संरक्षक द्रव घालून बाटली हालवावी. ज्या बाटलींत काढा भरावयाचा ती बाटली अत्यन्त स्वच्छ व उकळत्या पाण्यांतून काढून घ्यावी. [स्टरलाइज्ड] बूचहि उकळत्या पाण्यांतून काढावें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...करून मेणास (हार्ड पॅराफीन) गरम करून ...बुडवून घ्यावीत. बाटलींत काढा इतका ...की ३-४ इंच जागा रिकामी ठेवून उकळत्या ...भांड्यांत बाटल्या ठेवून तें भांडें चुलीवर ...थोडा वेळ उकळावें. बाटलीतील काढा गरम ...त्याची वाफ बाटलींतून जाऊं लागतांच बूच ...वें व बाटली थंड झाल्यावर पातळ केलेल्या ...[हार्ड पॅराफीन] बाटलीचें बुचासह तोंड ...घ्यावें. म्हणजे बाटलींत रिकाम्या जागेंत हवा ...नाहीं. अशा रीतीनें टिकाऊ काढ्याच्या बाटल्या ...ठेवाव्या. ३-४ महिने हा काढा गुणांत बदल ...बुरा अगर गाळ न जमतां उत्तम स्थितींत ...३-४ महिन्यापेक्षां जादा दिवस ठेवण्याचा ...प्रसंग मिळाला नाहीं. दवाखान्यांत नेहमींच जे ...मोठ्या प्रमाणांत लागतात, ते वरील प्रमाणें ...करून ठेवणें सोयीस्कर होतें.

उदफूल उत्तम जन्तुनाशक

...गर्भे, पर्पटी, कुपिस्थ रसायनें, रस, आसवारिष्टें, ...तेज सिध्दतेलें, सिध्दघृतें, अवलेह, पाक, सरबतें ...इ संरक्षणासाठीं संरक्षक द्रव्याची व त्यांना ...पात्रांत ठेवण्याची आवश्यकता असते. त्यांत ...वापरल्यानें मूळ द्रव्याच्या गुणांत बदल होत ...तें अपायकारक मुळींच होत नाहीं. ऊदफूल ...जन्तुनाशक असून श्वास, कास व कफ- ...वर गुणदायी आहे.

...औषधी गुणधर्मात व संरक्षक म्हणून तें प्रभावी ...री आहे. सिध्द तेलांत घृतांश घातल्यानें त्यांना ...येत नाहीं. खोबरेल तेल, तिळाचें तेल यांचें ...पद्धतीनें आवळेलतेल सिद्ध करतांना उदाच्या ...फुलाच्या अनेक प्रक्रिया मी करून दरसाल ...मण तयार करण्याचा व दीर्घ काल खंवट न ...ण्याचा माझा ३० वर्षांचा अनुभव आहे. ...लें याचा संरक्षक द्रव्य म्हणून युक्तीनें ...करावा.

...णतेहि औषधी सरबत असो १ पौंड सरबतांत १ चमचा वरील संरक्षक द्रव्य सदर सरबतास कधींहि नासूं देत नाहीं. टिकाऊ करावयाचें द्रव सूक्ष्म-रीतीनें गाळलें गेलें पाहिजे.

औषधीसंरक्षण हा स्वतंत्र विषय

आजच्या रसायनशास्त्राच्या वाढत्या प्रगतींत धान्य, खाद्य पदार्थ, सरबतें, औषधी यांच्या संरक्षणा-साठीं कित्येक संरक्षक द्रव्यें जगांत निघालीं आहेत. क्लायटन कं. चे बेन्झोप्रिझर्व्हेटीव, निपा लॅबोरेटरीचें निपासोल M. हीं प्रसिद्ध कंपौंड्स् आहेत. त्यांतहि ऊदफुल, बेन्झॉइक ॲसिड, बेन्झीनचे कल्प वापरलें आहेत. औषधी-संरक्षण हा एक स्वतंत्र विषय आहे.

श्रीमत् कुवलयानंदजी

मंगळवार ता. ७ सप्टेंबर पासून कैवल्यधाम या योगसंस्थेचे संस्थापक श्रीमत् कुवलयानंदजी यांनीं ७१ व्या वर्षांत पदार्पण केलें आहे. त्यांनीं गेल्या ३० वर्षांत केलेल्या कार्याबद्दल भारतांत व पर-देशांहि त्यांची वाखाणणी होत आहे. त्यांच्या कार्या-विषयीं आदर बाळगणाऱ्या मंडळींनीं एक समिति स्थापन केली असून त्यातर्फे श्रीमत् कुवलयानंदजींच्या जाहीर सत्कार केला जाणार आहे व त्याप्रसंगीं एक थैलीहि भेट देण्याचा विचार चालू आहे.

या थैलीसाठीं रक्कम पाठवू इच्छिणाऱ्यांनीं ती पुढील पत्यावर पाठवावी.

पत्ता—माननीय मंत्री, स्वामी कुवलयानंद सत्कार समिति C/o मेसर्स शिकागो टेलिफोन ॲन्ड रेडिओ कंपनी, १२७ महात्मा गांधी रोड, मुंबई १

अमळनेर

येथें आयुर्वेद सेवा संघाचीं नवीन सर्व प्रकारचीं औषधें मिळण्याचें ठिकाण—

श्रीकृष्ण वैद्य ॲंड ब्रदर्स

कुंभार टेक, अमळनेर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काढे टिकाऊ असे करावेत.

लखकः-श्री. मा. या. व्यवहारे, बी. एससी.

आयुर्वेद पत्रिकेच्या १ सप्टेंबर ५३ च्या अंकांत वैद्य श्री. के. व्ही. देसाई यांनीं काढे टिकाऊ कसे करावेत त्याबाबत ९ प्रश्न विचारले आहेत त्यास क्रमानें उत्तरें देत आहे.

रेक्टिफाईड स्पिरिटचें प्रमाण

१) २४ औंस काढ्यामध्यें ५ ते ६ औंस रेक्टिफाईड स्पिरिट घालावें म्हणजे तो टिकाऊ होईल व त्या काढ्यामध्यें साधारणतः १५ ते २० % अल्कोहोलचें प्रमाण राहील.

२) अष्टमांश, चतुर्थांश, षष्ठांश अगर तृतियांश यापैकीं कोणच्याहि प्रकारचा काढा केला तरी वरील प्रमाणांत रेक्टिफाईड स्पिरिट घालावें लागेल. तें निरनिराळया प्रमाणांत घालण्याची आवश्यकता नाहीं. त्यानें तो टिकाऊ होईल.

कितीहि दिवस टिकूं शकेल

३) रेक्टिफाईड स्पिरिट मिसळलेला काढा टिंक्चर प्रमाणें कितीहि दिवस टिकूं शकतो. फक्त रेक्टिफाईड स्पिरिट घातल्यानंतर त्या काढ्यास ३६ तास न हलवतां ठेवावें व मग गाळून भरावें म्हणजे तो खराब होणार नाहीं, किंवा सांका वगैरे कांहीं येणार नाहीं.

४) रेक्टिफाईड स्पिरिट मिसळल्यामुळें काढ्याच्या मूळचा गुणधर्म कमी होणार नाहीं. रेक्टिफाईड स्पिरिटमुळें त्यांत टिकविण्याचा गुणधर्म निर्माण होईल. व त्याचें कार्य नेहमींच्या आसवारिष्टांप्रमाणेंच होईल.

कापूर विरण्याचें प्रमाण

५) कापूर मिसळल्यामुळें काढा टिकूं शकणार नाहीं, कारण १ भाग कापूर ७०० भाग पाण्यांत द्राव्य आहे व हें प्रमाण अत्यल्प असल्यामुळें कापरामुळें टिकाऊपणा येणार नाहीं. त्यावर बुरशी येईल.

६) कापूर मिसळल्यामुळें व तो गाळून न घेतल्यास काढ्याचे गुणधर्म बदलतील, कारण काढ्याबरोबर कापूरहि पोटांत जाईल व त्याचें कार्य शरिरावर होईल व तो ज्या प्रमाणांत जाईल त्या प्रमाणांत कार्य कमीअधिक होईल. गाळून घेतल्यास विशेष गुणधर्म बदलणार नाहींत. कारण वर दिलें आहेच.

स्पिरिट कॅंफरचा उपयोग

७) होय. कापूर वड्यापेक्षां स्पिरिट कॅंफरनें नक्की काढा टिकूं शकेल. कारण स्पिरिट कॅंफरमध्यें ९०% अल्कोहोल असतें.

८) स्पिरिट कॅंफर, २४ औंस बाटलीस, रेक्टिफाईड स्पिरिटच्याच प्रमाणांत घालावें लागेल.

९) स्वरस टिकविण्याकरितां २४ औंस बाटलीस १२ औंस रेक्टिफाईड स्पिरिट मिश्र करावें व तो २४ तास न हलवितां ठेवून गाळून घ्यावें, म्हणजे स्वरस टिकाऊ होतील.

वरीलप्रमाणें कोणासहि आपले काढे टिकाऊ करून वापरतां येतील.

नवे तसेंच जुने

देवीचे वण घालवा !

वणविरोपण तेल किं. रु. ६

सुरमावरील लेप किं. १२ आणे

(पो. पॅकिंग खर्च वेगळा)

गांवोगांव विक्रेते पाहिजेत.

भेटा अगर लिहा—

जनरल सप्लायर्स (हिंद)

११४ बी, जगन्नाथ चाळ,

फणसवाडी, मुंबई नं. २

पुणें येथें

आयुर्वेद सेवा संघाचीं औषधें मिळण्याचें ठिकाण

किरण मेडिकल सर्व्हिस

नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी यांचीं
[वाग्]भटचिकित्सेवरील उद्बोधक व्याख्यानें

(संग्राहकः– वैद्य लक्ष्मीबाई बोरवणकर, आयुर्वेदविशारद)

[या पूर्वीचा भाग आयुर्वेदपत्रिका ता. १६–३–५२ च्या अंकामध्यें प्रसिद्ध झाला आहे.]

रोगाचें दोषनिरूपण म्हणजे निदान आणि [उपचा]रनिरूपण म्हणजे चिकित्सा !

रोग बरा व्हावा म्हणून जो जो उपाय केला [जा]तो त्याला चिकित्सा असें म्हणतात. (या क्रिया ...णी सा चिकित्सा निगद्यते।)

...ळ पुड्या देणें म्हणजे चिकित्सा नव्हे

ज्या कारणांनीं रोग निर्माण झाला तीं ...वर्ज करणें (निदानपरिवर्जनम्), झालेला [रोग] बरा व्हावा म्हणून औषध, अन्न आणि विहार-..., आचरण यांचा यथायोग्य उपयोग करणें [व पु]नः तो विकार होऊं नये म्हणून खबरदारी [या] सर्व गोष्टींचा समावेश चिकित्सेंत होतो.

[वाग्]भटाचार्यांचें प्रभावी चिकित्सास्थान

सुटसुटीत आणि प्रभावी प्रयोग, रोगांच्या निर...ा अवस्था व अवस्थांतरें आणि त्यावरील ... यामुळें वाग्भटाचार्यांची चिकित्सा फार उत्तम आहे. प्रत्यक्षापासून दूर गेल्यामुळें वाग्भटा-...ं शारीरस्थान नीट वठलें नाहीं, नव्हे त्यांत ढिलाईच दिसून येते, तर प्रत्यक्ष व्यवहारामुळें [चिकित्सा]स्थान हें अत्यंत प्रभावी झालें आहे.

उपचार कसे असावेत ?

चिकित्सेंतील एका रोगावर उपचार करतांना [दुसरा] रोग निर्माण होतां कामा नये. (प्रयोगः ...र व्याधिं योन्यमन्यमुदीरयेत्) तसा रोग उत्पन्न [होत असेल त]र ती खरी चिकित्सा नव्हे.

शोधनासाठीं जवळची वाट

शोधन आणि शमन अशी दोन प्रकारची [चिकित्स]ा आहे. रोग निर्माण करणारे दोष शरीरांतून समूळ बाहेर काढून टाकणें ही शोधन चिकित्सा. यांत वमन, विरेचन, नस्य, बस्ति आणि रक्तमोक्ष असे पांच प्रकार आहेत. अत्यंत जवळच्या वाटेनें वाढलेले दोष शरीराबाहेर काढून टाकावयाचे. अशा रीतीनें रोगांचें मूळच नष्ट करावयाचें. आणि हीच खरी आयुर्वेदीय चिकित्सा होय. आजकाल खरी आयुर्वेदीय (पंचकर्म) चिकित्सा होतच नाहीं. पुड्या देणें ही आयुर्वेदीय चिकित्सा नव्हे. स्नेहनस्वेदनपूर्वक दोष शरीराबाहेर काढून टाकणें हीच खरी चिकित्सा.

दोषांचें पचन व शमन

आणि जे दोष फारसे वाढलेले नाहींत, शरीर ज्यांना पचवून घेऊं शकेल असे शरीराच्या आटोक्यांत असलेले दोष पचवून आणि शमन करून कमी करावयाचे, नाहींसे करावयाचे ही शमन चिकित्सा. शोधनानंतरहि शेष दोषांचें शमन करण्यासाठीं शमन औषधें द्यावीं लागतातच.

दोष सम करणें हा उद्देश

जें पचवण्याचा शरीरानें प्रयत्न केला, शरीराची शक्ति ज्यावर खर्च झाली आहे ते दोष पाचन व शमन औषधानें सम करून घेणेंच हितावह होय. अतिशय वाढलेले असतील तरच शोधन द्यावें.

ज्वरचिकित्सा

ज्वराचे विसर्गी आणि अविसर्गी असे दोन भेद पाडले आहेत आणि सामावस्था, पच्यमानावस्था व निरामावस्था अशा तीन अवस्था मानून चिकित्सा लिहिली आहे.

बलाकडे अवश्य लक्ष द्यावें

ज्वरावर प्रथम लंघन द्यावें. कारण आमाशयांतील सामदोष अग्नि मन्द करून ज्वर निर्माण करतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो आम नाहींसा झाला पाहिजे, म्हणून लंघन द्यावें. परन्तु लंघन देतांना रोग्याच्या शक्तीचा पुरा विचार प्रथम करावा. रोग्याला लंघन सहन झालें नाहीं, तर त्याची शक्ति नष्ट होईल आणि शक्तीवरच आरोग्य अवलंबून असतें. आणि चिकित्सा तर आरोग्या-करितांच करावयाची असते म्हणून रोग्याच्या बलाकडे विशेष लक्ष पुरवून लंघन द्यावें.

लंघनाचे गुणधर्म

लंघनानें दोष क्षीण झाले, अग्नि प्रदीप्त झाला, आणि शरीराचें जडत्व कमी होऊन शरीर हलकें झालें म्हणजे स्वास्थ्य येतें. भूक व तहान लागूं लागते, तोंडाला चव येऊन पचनक्रिया सुधारते व बल व ओज निर्माण होतात.

कफप्रधान वाढलेले दोष वमनानें काढून टाकावे. वमन दिलें किंवा न दिलें तरी ज्वरी माणसाला उपवास घातलाच पाहिजे. त्यामुळें वाढ-लेल्या दोषांचें पाचन व शमन होतें.

ज्वरांतील जलविचार

वातकफज्वरांत कोमट पाणी हितावह होतें आणि पित्तज्वरांत षडंगोदक हितकर होतें.

पित्तप्रकोप होऊं देऊं नये

उष्मा, पित्त आणि ज्वर हे परस्परावलंबी आहेत म्हणून ज्वरांत पित्तप्रकोप करणारे पदार्थ देऊं नयेत आणि विशेषतः पित्तज्वरांत तर पित्तप्रकोपक पदार्थ बिलकूल देऊं नयेत.

लंघन अपथ्य कोणाला ?

लंघन, घाम काढणें, काल जाऊं देणें, कण्हेरी आणि कडूरसाचीं औषधें हीं ज्वरांत क्रमानें दिलीं असतां अथवा अवस्थेनुरूप देण्यानें दोषांचें पाचन करतात. मात्र शुद्धवाताचा, क्षयाचा किंवा जीर्ण ज्वर यांत लंघन देऊं नये.

ज्वरघ्न पेयांची अवस्था

लंघन चांगलें झाल्याचीं लक्षणें शरीरावर दिसूं लागलीं कीं ज्वरघ्न औषधिसिद्ध पेया द्याव्या. आणि उपचार करतांना रोग्याच्या बलाकडे व दोष जोरदार होत नाहींतना याकडे पूर्ण लक्ष असावें.

तिखट व कडू रसांचा उपचार

आतांपर्यंत दोषपाचन झालें. आतां दोष पक्व झाले, अशा वेळीं ज्वरघ्न असे काढे द्यावयाचे. कषाय म्हणजे तुरट रस हा कफपित्तनाशक असूनहि ज्वरांत देऊं नये, कारण तुरट रसानें स्रोतसावरोध व स्तंभन होऊन ज्वर वाढेल म्हणून तिखट आणि कडू औषधांचा काढा द्यावा.

एकदां गेलेला ताप धातु अबल झाले कीं पुनः पुनः येतो व फार दिवस अंगांत राहतो. यावेळीं शरीरांत कफदोष क्षीण झालेला असून वातपित्ताधिक्य असतें.

अशा वेळीं तूप अमृत ठरतें

ज्वरनिर्माण करणारें तेज रूक्ष आहे यामुळें शरीरांत रौक्ष्य वाढलेलें असतें, शिवाय ज्वराच्या वमनादि उपचारांनीं वायूची वृद्धि होते, यामुळें वायु बलवान् होतो त्याच्या जोडीला पित्त असतें म्हणून यावेळीं ज्वरघ्न घृताचा उपयोग अतिशय उत्तम होतो. तूप हें स्वभावतःच वातपित्तघ्न द्रव्यांत श्रेष्ठ आहे आणि ज्या द्रव्यांचे संस्कार त्यावर करावे त्या द्रव्यांचे गुणधर्म तुपांत उतरतातच आणि तुपाचे गुणधर्म जात नाहींत यामुळें तूप हें अशा वेळीं अमृतच ठरतें.

सन्निपातचिकित्सेचें धोरण

सन्निपातज्वरांत चिकित्सा करतांना जो दोष कमी असेल तो वाढवावा, जो वाढला असेल तो त्याच्याविपरीत द्रव्यांनीं क्षीण करावा आणि तीनहि दोष सारखे असतील तर कफदोषाची (आमाशय) स्थानाला धरून चिकित्सा प्रथम करावी आणि नंतर पित्त व वाताची चिकित्सा करावी.

रक्तपित्त चिकित्सा

ऊर्ध्व अधोमार्गानें रक्त पडूं लागतें, त्यास 'रक्तपित्त' म्हणतात. हें रक्त एकदम थांबवूं नये. नाहींतर अनेक रोग निर्माण करील. परंतु रोगी फार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असेल तर बंद केलेंच पाहिजे नाहींतर रोगीच ावा. रक्तपित्त हें संतर्पणानें अगर अपतर्पणानें प्रकारें होऊं शकतें. मासें खाण्यांत आल्यानें, ाल्यानें होणारें संतर्पणजन्य व अधिक तिखट नें झालें तें अपतर्पणजन्य.

रक्तस्राव कां होतो ?

रक्तांत द्रवाचें व पित्ताचें प्रमाण वाढलें म्हणजे शिरांतून तें वाहात असतें त्या शिरा ताणल्या व ताण असह्य झाला म्हणजे फुटतात आणि मग अधोमार्गानें रक्तस्राव सुरू होतो. ब्लड्प्रेशर हें ाचें पूर्वरूप होय. मस्तकांतील शिरा ताणल्या त्या फाटतात मग तेथें रक्तसंचय होतो अर्धांग होतो. ब्लड्प्रेशर वाढल्यास शिरांतील दाब नर्व्हजवर पडून अर्धांग होतो. रक्ताचें वाढून शिरा ताणल्या जातात हीच ब्लड्- र्यें अवस्था असते.

मार्गानुसारी चिकित्सा

रक्तपित्ताची चिकित्सा मार्गाला अनुसरून आहे. ार्गो च हरणं रक्तपिते विधीयते।) उर्ध्वगामी र विरेचन द्यावें व अधोगामीं रक्तपित्तांत ावें. नंतर शमन औषधें द्यावींत.

उर्ध्वग रक्तपित्तांत कडू व तुरट हे शमन आणि अधोग रक्तपित्तांत मधुर रस हा बृंहण

शतावरी व अडुळसा

रक्तपित्त हा शिरांचा विकार असल्यानें मनु- शरीरांतील शिरा ज्या पदार्थांनीं घटित आहेत उपयोग करावा. (मेदसः स्नेहमादाय शिरा मापुयात्) शिरांच्या भिंती बलवान् करण्या- शतावरीचा उत्तम उपयोग होतो. तसेंच ा हें औषधहि रक्तपित्तांत चांगलें काम करतें.

रक्तपित्तावर क्षारांचा उपयोग

ांतून गांठळलेलें व कफयुक्त रक्त पडत असेल ळाच्या नाळाचा क्षार मधतुपांतून चाटवावा. आणि कफयुक्त रक्तपित्तावर क्षार तर दिला पाहिजे म्हणून कमळाच्या नाळाचा क्षार देण्यास सांगितलें आहे. म्हणजे क्षार असला तरी तो तितका तीव्र असणार नाहीं. रक्तपित्तांत पित्तज्वराची अंत-र्बाह्य चिकित्सा करावी.

कासचिकित्सा

कासचिकित्सेंत अनुबंध व अनुबंधी दोषांकडे लक्ष देऊन चिकित्सा केली पाहिजे. वातज कासांत कफानुबंध असेल तर तेथें वाताची चिकित्सा चालणार नाहीं, कफनाशकच चिकित्सा हवी. पित्ताचा अनुबंध असल्यास पित्तनाशक चिकित्सा हवी. त्रिदोषज कास निराळा व दुसऱ्या दोषाचा अनुबंध निराळा हें लक्षांत घेतलें पाहिजे.

कास हा रक्तधातूचा विकार

कास हा रक्तधातूचा विकार आहे. फुप्फुस हें रक्तफेनापासून बनत असल्यामुळें कासांत रक्तधातूचा विचार करावा लागतो. कासचिकित्सेंत रक्ताला विरोधी द्रव्यें असतां कामा नयेत. फुप्फुस हें वातकफदोषाचें व प्राण, उदान व व्यानाचें स्थान आहे.

आंत घेतलेला (श्वास) वायु श्वासवाहिन्यांच्या संकोचामुळें किंवा सुजेमुळें अधःप्रतिहत झाला कीं तो मुखावाटे बाहेर पडतो, यासच कास म्हणतात.

कानांत मळ सांठूनहि खोकला (अर्थात् कोरडा) होऊं शकतो.

श्वासचिकित्सा

श्वासाचें कारण स्रोतसांत ग्रथित झालेला कफ होय. म्हणून लवणतैलाक्त करून स्निग्ध पदार्थानें शेकावें. त्यानें सुलीन झालेला कफ पातळ होऊन कोठ्यांत येईल. स्वेदनानें दोष पातळ होऊन कोठ्यांत येतात, स्रोतसें मऊ होऊन वायूचें अनुलोमन होतें. अशा रीतीनें कोठ्यांत आलेला दोष वमनानें काढून टाकावा. पोटफुगी अगर मलावरोध असल्यास विरेचन द्यावें.

श्वासांत शोधनाचें महत्व

श्वासविकारांत शोधनाचें महत्व फार आहे. कारण कफानें अवरुद्ध झालेला प्राणवायु मार्ग मोकळा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिळाला नाहीं तर रोग्याचा जीव कासावीस करील. म्हणून वायूचा कफावरुद्ध मार्ग मोकळा करणें श्वास-चिकित्सेंत महत्वाचें आहे.

बृंहण शमन औषधें

श्वासावर बृंहण आणि शमन औषधें दिलीं पाहिजेत, कर्षण देऊं नयेत. कर्षणानें भयंकर अपाय होतील आणि ते बरे करणेंहि अतिशय कठीण म्हणून बृंहण आणि शमन उपाय करावे. वातकफावरचे तीक्ष्ण उपचार या विकारांत चालणार नाहींत, रोग्याची शक्ति क्षीण होईल आणि उरःस्थान व हृदय यांचा विकार असल्यानें बृंहणोपचारच करावा लागतो.

राजयक्ष्मा

हा रोग म्हणजे रोगांचा राजा म्हटला जातो. १) स्रोतेंस संकुचित झाल्यानें, २) ती सन्निरुद्ध झाल्यानें, ३) रक्तादि धातु क्षीण झाल्यानें, ४) धात्वग्नि मंद झाल्यानें धातूंचे घटक मरूं लागतात नवे निर्माण होत नाहींत व शरीर झिजूं लागतें, क्षीण होत जातें. हें या विकाराचें स्वरूप आहे.

सांडू
गोल्ड टॅब्लेटस्
क्षयाच्या प्राथमिक अवस्थेवर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई.

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स- बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को. मेनरोड, नाशिक शहर

ज्या भागांत हा विकार होईल त्याचीं चिन्हें होतात. सामान्यतः ज्वर सर्वत्र असतोच. दोष उरांत असेल तर कफ, कास; पोटांत असल्यास शूल, अतिसार; मेदांत असल्यास ग्रंथि (गंडमाळा वगैरे) निर्माण करतो.

नवे घटक कां तयार होत नाहींत ?

स्रोतसावरोधामुळें नवे घटक तयार होत नाहींत. कधीं नवे घटक निर्माण होतात, परंतु त्याहून झीज अधिक असते व रोगी क्षीण होत जातो तर कधीं झीज योग्य प्रमाणांत होत असते पण नवे घटक निर्माण होत नाहींत.

कारणांचा शोध प्रथम घ्यावा

योग्य पोषणाच्या अभावीं नवे घटक बनत नाहींत किंवा स्रोतसावरोधामुळें पोषण चांगलें होत नाहीं. यापैकीं कोणत्या कारणानें शरीरांत हा रोग निर्माण झाला आहे हें अगोदर पाहिलें पाहिजे. नंतर रोगाची अवस्था पहावी. रोगाची सुरुवात आहे कीं रोग पुढें गेला आहे? रोगी बलवान् आहे किंवा नाहीं हें पहावें; तसेंच कोणत्या दोषाचें आधिक्य आहे हें पहावें.

रोगी बलवान् असेल तर स्नेहन स्वेदन करून शोधन द्यावें, परन्तु कर्षण होणार नाहीं इकडे संपूर्ण लक्ष असावें; कारण क्षय म्हणजे झीज ही सारखी होतच असते म्हणून बृंहणविधीच करावयाचा. बृंहणानें अग्नि मंद होतो म्हणून बृंहणदीपन चिकित्सा करावी लागते. नारळाचें पाणी हें बृंहणदीपन आहे.

हृद्य पदार्थ द्यावेत

क्षयी माणसाला द्यावयाचे पदार्थ हे हृद्य असले पाहिजेत. हृदयाला हितकर हवेत आणि मनाला आनंद देणारेहि हवेत. तसेंच शरीर झिजत असल्यामुळें वायूची वृद्धि होत असते म्हणून ते वातघ्न असावेत. धान्य जुनें द्यावें कारण नवें धान्य अभिष्यंदि असल्यामुळें स्रोतसावरोध करील तर गुरु असल्यामुळें अग्निमांद्य वाढवील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रयोग उंदरावर कां ?

[आ]जचे सारे प्रयोग उंदिरावर होतात कारण [...]चे कार्य उंदिरावर व मानवी शरीरावर सारखें

मांस देण्याचा उद्देश

आयुर्वेदांत आहारावरून सामान्य ठरविलें गेलें [...]तीपेक्षां व धान्यापेक्षां मांस हें शरीराला जवळचें [...] त्यांतल्यात्यांत क्रव्यादमांस हें अधिक जवळचें [...] प्रमाण कदाचित् थोडें द्यावें लागेल पण जें मांस, [...]ल्याणानें तयार झालें आहे त्याचेपासून मांसाचे [...] अधिक लवकर तयार होतील. वनस्पतींपासून [...]टक तयार होण्यास अर्थातच अधिक वेळ लागेल. [...] मांसरसाचें महत्व यामुळेंच आहे. मात्र मांस [...] किळस येतां कामा नये, नाहीतर बृंहण दूरचें [...] उलट उलटी होऊन कर्षण मात्र होईल.

मद्य दूध तूप कशासाठीं ?

[भ]स्में अगर इतर औषधें मद्य दूध तूप यांतून [...]चीं कारण या पदार्थांची शरीराला संवय आहे. [...] शरीराला जवळचे आहेत. भस्में देखील [...] मऊ असलीं पाहिजेत. पोटाला तशाच पदा-[...] संवय असते. तसेंच चिकित्सेचा भर सात्म्य [...]वरच असला पाहिजे.

[क्ष]यचिकित्सेंत लक्ष द्यावयाच्या गोष्टी

[क्ष]यचिकित्सा करतांना खालील गोष्टींकडे लक्ष

१) स्रोतसावरोध दूर करणें, २) स्निग्ध करणें, [...] प्रदीत करणें, आणि ४) बृंहण करणें.

[श]रीर कृश असल्यास स्रोतसावरोध असतो तर [स्]थूल असल्यास स्रोतससन्निरोध असतो.

[स्रो]तसावरोध असल्यास जीर्ण मद्य द्यावें, परंतु [...]तीच्या माणसाला मद्य देतां येत नाहीं. त्यामुळें [...] रक्त पडूं लागेल.

[पार्श्व]शूल, शिरःशूल व पार्श्वशूल यांत रक्तमोक्ष [लाग]तो म्हणजे अपतर्पणहि करावें लागतें.

मल म्हणजे बल

क्षयी माणसाचा मल म्हणजेच त्याचें बल! राजाला दल व दर्दीला मल, इतकें मलाचें महत्व आहे. (सर्वधातुक्षयार्तस्य बलं तस्य हि विड्बलम्) झिज-णाऱ्या शरीरधातूंचें घटक मलांत असतात म्हणून रेचकें द्यावयाचीं नाहींत.

स्निग्धोष्ण उपचार

क्षयांतील कफप्रसेक, वांति आणि प्रतिश्याय यांवर रूक्ष उष्ण असे कफनाशक उपचार न करतां स्निग्ध उष्ण असे उपचार करावे.

अग्निमांद्यामुळें अतिसार, संग्रहणी झाल्यास त्या त्या रोगावरील उपचार करावे. अशा रीतीनें अत्यंत सावधानतेनें क्षयावर चिकित्सा करावी लागते. बारीक-सारीक गोष्टींकडेहि दुर्लक्ष झाल्यास त्याचे घोर परि-णाम रोग्याला भोगावे लागतात.

ग्रहणी चिकित्सा

ग्रहणींत पक्व-अपक्व, बद्ध-शिथिल; जीर्ण-अजीर्ण असे जुलाब होतात.

ग्रहणी म्हणजे पचन-संस्था ! आमाशयमुखा-पासून पक्वाशयापर्यंतचा भाग म्हणजे ग्रहणी!

ग्रहणी म्हणजे पित्तधरा कला व मलधरा कला होय. पित्तधरा कलेंत पाचकपित्त व त्याचें कार्य आणि समान वायु व त्याचें कार्य यांचा अंतर्भाव होतो, आणि मलधरा कलेंत मलाचें विभजन होतें.

यकृत्प्लीहेंत पित्तधरा, रक्तधरा व मलधरा-कला आहेत. पँक्रियांत फक्त पित्तधरा कला आहे.

मलधरा कलेंत यकृत्, किडनी, उंडूक यांचा समावेश होतो.

उंडूक म्हणजे मोठ्या आंतड्याच्या सुरुवाती-पासून पक्वाशयापर्यंतचा भाग. ग्रहणी रोगाची चिकित्सा अजीर्णाप्रमाणें करावी, व अतिसारोक्त विधीनें आमपाचन करावें. ज्वराप्रमाणें नव्हे. प्रत्येक व्याधीच्या आमाचें पाचन निरनिराळें आहे. ज्वराचीं पाचनें निराळीं आणि अतिसाराचीं निराळीं. अतिसारा-वरील पाचन औषधें ग्रहणींत द्यावीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ताक हें अमृतासारखें

या रोगांत ताक हें अमृतासारखें आहे. दीपन, संग्राही व हलकें असल्यामुळें हितकर आहे. मात्र तें ताजें हवें, शिळें असल्यास विदाह निर्माण करील.

या रोगांतील अग्निनिर्वापक पित्त वमनानें व रेचनानें काढून टाकून हलकें अविदाही असें अन्न द्यावें. औषधें कडू, ग्राही व दीपन असावीं.

पोटावर स्नायु कीं त्वचा ?

तेलाचा अभ्यंग करावा. पोटावर विशेष करावा. अभ्यंगाचें तेल हें त्वचेंतून कार्य करतें आणि पोटावर स्नायू नसून त्वचा आहेत म्हणून पोटावर अभ्यंग करावा.

(उदररोगांत पाणी काढतांना व्रीहिमुखशस्त्र व्रीहिप्रमाण पोटांत खुपसण्यास सांगितलें आहे. त्वचेचें प्रमाण व्रीहिच आहे. स्नायूंची गणना करतांना उदरावरील स्नायूंची गणना नाहीं. तेथें त्वचाच असल्यामुळें स्नायूंची संख्या नाहीं.)

घृतें कां द्यावींत ?

अग्नि प्रदीप्त करणें हें या विकारांतील प्रमुख कार्य. म्हणून घृतें द्यावींत. " स्नेहमेव परं विद्यात् दुर्बलानलदीपनम् " म्हणून धान्वंतर, षट्पल, भल्लातकघृत व अभयाघृत द्यावें.

सुरा, आसवें, चूर्णें व क्वाथ यांचाहि अग्नि वाढविण्यासाठीं यथायोग्य उपयोग करावा.

स्नेहयुक्त आहारानें कोष्ठस्थ अग्नि प्रदीप्त होतो आणि स्नेहानें प्रदीप्त झालेला अग्नि पुनः लवकर मंद होत नाहीं हें स्नेहाचें वैशिष्टय होय.

आहार मात्रायुक्त असावा

प्रमाणानें आहार घेणें हेंहि अग्नि प्रदीप्त करणारें आहे (मात्रा हि अग्नेः प्रदीपिका) कमी किंवा अधिक जेवण अग्निमांद्य निर्माण करतें, म्हणून आहार प्रमाणबद्ध असावा.

अत्यग्नि हा देखील एक विकारच आहे. जठराग्नि समच असला पाहिजे. नाहींतर मंदाग्नीप्रमाणें अत्यग्नीवरहि चिकित्सा करण्याची पाळी येते.

जठराग्नीचीं कर्में

जठराग्नि प्रदीप्त झाला म्हणजे आहार पचवतो, आहार पचल्यानन्तर दोष पचवतो, दोष पचले आणि तरीहि आहार घेतला गेला नाहीं तर तो अग्नि धातु पचवूं लागतो व धातु पचन होऊं लागले कीं, ते क्षीण होतात व जीवितच धोक्यांत येतें. इतकें अग्नीचें महत्व आहे. म्हणून हर प्रयत्नानें अग्नीचें रक्षण करावें. (अग्निमूलं बलं पुसां)

याप्रमाणें ग्रहणीची चिकित्सा सावधानतेनें करावी. हा विकार जुनाट झाल्यास मग संपूर्ण बरा होत नाहीं, म्हणून वेळींच उपचार करावे.

गौरव

आपण आयुर्वेदिक औषधांचा गौरव वाढविला पाहिजे. ती एक आपल्या हिताची गोष्ट आहे. आपण प्रत्येक औषधी द्रव्य अस्सलपैकीं व ताजें वापरून सिद्ध औषधें बनविलीं पाहिजेत. अशीं उत्कृष्ट औषधीं द्रव्यें मिळण्याकरितां आपण :—

दि ऑल इंडिया करीयाणा स्टोर्स
पायधुनी मुंबई नं. ३
(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात. अधिक माहितीसाठीं कॅटलाग मागवावा.

होमिओपाथिक चिकित्सापद्धति
[किं. २॥ रु. ट. ख. निराळा]
१ वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक
२ मे. काणे बंधु, टिळक चौक-कल्याण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म. प्रां. वैद्य मंडळाचें प्रचारकार्य

अध्यक्षांची फैजपुरास भेट

बुधवार ता. २६।८।५३ रोजीं सायंकाळीं म. प्रां. मंडळाध्यक्ष वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर, मंत्री वै. दत्त शर्मा आणि चाळीसगांव येथील वैद्य शंकरराव यांनीं फैजपूर येथें स्थानिक वैद्यमंडळास भेट दि. फैजपूर येथील स्थानिक वैद्यमंडळाचे व खानदेश वैद्य मंडळाचे मंत्री वै. श्री. चूडामणी राव चौधरी यांनीं या प्रसंगीं कविराज का. सी. यांचे चिकित्सालयाचे दिवाणखान्यांत फैजपूर नगरपालिकेचे माजी अध्यक्ष व गांवांतील प्रतिष्ठित नागरिक श्री. हरिभाऊ सराफ यांचे अध्यक्षतेखालीं घेऊन उपस्थित त्रिवर्गांचा जाहीर सत्कार-समारंभ घडवून आणला.

स्वदेशी औषधें घेण्याचा संकल्प

सत्कारसमारंभानंतर उत्तरादाखल आभारप्रदर्शन करतांना प्रांतीय मंडळाध्यक्ष वैद्य जळूकरशास्त्री यांनीं फैजपूर नगरपालिकेनें चालविलेल्या आयुर्वेदीय दवाखान्याची प्रशंसा करून पाश्चात्य औषधांपेक्षां आपल्याच देशांत उत्पन्न झालेलीं औषधें हीं सात्म्य असल्यानें त्यांचाच उपयोग करणाऱ्या आयुर्वेदीय दवाखान्याचा फायदा घ्यावा असें सुचविलें.

जटिल रोगांचा निर्णय

धनिकांनींहि आतां विदेशी औषधें वापरण्याचा सोडावा व आयुर्वेदीय औषधेंच घेणेंचा संकल्प करा. प्रसंगोपात्त आपल्या नित्याचे वैद्यास चिकित्सा-संबंधें बाबतींत किंवा जटिल रोगाचा निर्णय करण्यासाठीं अन्य चिकित्सकाच्या विचारांचें साह्य घ्यावें असेल तर तें अवश्य देऊन आयुर्वेदीय उपचारां-नीं शक्य तों बरें होण्याचा निश्चय करावा. आणि वैद्यांनींसुद्धां अशा प्रसंगीं मोकळ्या मनानें विचार-विनिमय करून जटिल रोगीसुद्धां आयुर्वेदीय पद्धतीनें अल्प व स्वल्प खर्चांत बरे होऊं शकतात असा विश्वास जनतेंत निर्माण करावा असें ते म्हणाले.

सूतिकागृहांत आयुर्वेदीय उपचार

नगरपालिका सुरू करणार असणाऱ्या सूतिका-गृहांतसुद्धां शस्त्रकर्मावांचून इतर सर्वहि उपचार आयुर्वेदीय तज्ञाचे देखरेखीखालींच होतील अशी योजना करावी. स्थानिक वैद्यांनीं आपली संघटना अभंग ठेवावी व आपल्या अडीअडचणी जिल्हा व प्रान्तीय मंडळाचे द्वारां निवारण करून घ्याव्यात. जनतेनेंसुद्धां स्थानिक मंडळ, जिल्हा मंडळ व प्रान्तीय वैद्यमंडळ यांच्या बाबतींत आपल्या काय अपेक्षा आहेत त्या वेळोवेळीं प्रकट करून त्या त्या मंडळा-कडून हक्कानें कामें करून घ्यावीं असें त्यांनीं सांगितलें.

रोग न होण्यासाठीं आयुर्वेद

नन्तर वै. शंकरराव गुणे यांनींहि सत्कारासंबंधीं समयोचित भाषण करून आभार मानल्यावर प्रान्तीय वैद्यमंडळमंत्री वै. शर्माजी म्हणाले:- ' इतर वैद्यक-शास्त्रांपेक्षां आयुर्वेद केवळ रोग बरा कसा करावा हेंच सांगत नसून रोग होऊंच नयेत यासाठीं प्रथम अत्याग्रहानें ' नित्यं हिताहारविहारसेवी ' इ. श्लोकाचे आधारें सूचना देत असतो हें त्याचें वैशिष्ट्य आहे.

त्रिदोषावर आधारलेली निदान चिकित्सा

आयुर्वेदशास्त्र त्रिदोषावर आधारलें असल्यानें प्रत्येक रोगाचें निदान व चिकित्सेच्या बाबतींत आध्यात्मिक व आधिभौतिक दृष्टीनें अत्यंत सखोल विचार करतो व म्हणूनच नगरजिल्ह्यांत तहानेच्या रोगाचें इतरत्र न झालेलें निदान आयुर्वेद पद्धतीनें व्यवस्थित झालें व रोगी तात्काळ बरे होऊं लागले. हें लक्षांत घेऊन तरी जनतेनें पाश्चात्य वैद्य-काच्या लखलखाटानें दिपलेली दृष्टिहि सांवरून आतां आयुर्वेदाकडे वळवावी.'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दवाखान्यास योग्य वैद्य मिळाला

शेवटीं म्युनिसिपल अध्यक्षानीं आयुर्वेदीय औषधांचे बाबतींत स्वतःची श्रद्धा व अनुभव निवेदन करून योग्य मनुष्य मिळाला म्हणूनच फैजपूरचा आयुर्वेदीय दवाखाना अगदीं आदर्श असें कार्य करीत आहे हें श्रेय कविराज भावेजी यांना आहे असा गौरवपूर्वक उल्लेख केला आणि सुरू होणाऱ्या प्रसूतिगृहांतून शस्त्रक्रियेवांचून इतर सर्व उपचार पूर्ण आयुर्वेदीयच केले जाण्यावर कटाक्ष ठेवला जाईल असें आश्वासन दिलें.

उपस्थितांचा परिचय

स्था. वै. मंडळमंत्री वै. चुडामणीजींनीं नंतर सर्व उपस्थितांचा प्रांतीय अध्यक्षांना परिचय करून दिल्यावर कविराज भावे यांनीं पाहुण्यांचे व उपस्थितांचे आभार मानले. शेवटीं दुग्ध व कॉफीपान होऊन समारंभ संपला.

वस्तुसंग्रहालयें

सोवियेत युनियनमधील प्रत्येक मोठ्या शहरांत व अनेक जिल्ह्यांच्या ठिकाणीं ऐतिहासिक, प्रादेशिक संशोधनाचें किंवा निसर्ग--विज्ञानाचें वस्तुसंग्रहालय असतेंच असतें. साऱ्या सोवियेत युनियनमध्यें एकूण एक हजाराहून अधिक वस्तुसंग्रहालयें आहेत. या संग्रहालयांना रोज हजारों प्रेक्षक भेट देऊन जातात.

पुराणवस्तुविज्ञान, खनिजविज्ञान, मानवजातिविज्ञान, विज्ञानेतिहास, तंत्रशास्त्रेतिहास या विषयांवरील विज्ञान–वस्तुसंग्रहालयें शास्त्रीय व संशोधन संस्थामार्फत व विश्वविद्यालयांमार्फत चालविलीं जातात व लोकांना तीं खुलीं असतात.

वस्तुसंग्रहालयें पाहण्यासाठीं प्रवेश-फी आकारण्यांत येत नसते. आणि ज्या ठिकाणीं आकारण्यांत येते तेथें ती केवळ नाममात्र असते. या वस्तुसंग्रहालयांत माहिती सांगण्यासाठीं तज्ज्ञ सल्लागार असतात.

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका), शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें आम्ही घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितो !

गुलकंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील !

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

टे. नं. ३१७९६ Telegram-AYURVED

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें —

ले.—वैद्य पु. वि. धामणकर
धूतपापेश्वर—पनवेल

धनुर्वातभंजनरस—३३६ र. यो. सा.

आयुर्वेदीय औषधी योगांचें भांडार समृद्ध त्यांत कांहीं अत्यंत बहुमोल व हुकमी काम योग आहेत. पण त्यांचा परिचय नसल्यानें असलेल्या माहितीवरूनच वैद्य निर्णय घेतो, युर्वेदांत ह्या रोगावर औषध नाहीं असा व्यक्त करून तो स्वतःहि अन्य वैद्यकाकडे तो. यासंबंधीं धनुर्वाताचें उदाहरण अगदीं आहे. आपलें औषधी भांडार धुंडाळलें तर अत्यंत समाधान देणारीं औषधें त्यांत असें आढळून येतें. धनुर्वातभञ्जन हें एक औषध आहे.

सर्पपित्त व मत्स्य पित्त

ह्या औषधी योगांत किंमतवान् द्रव्यें आहेत किंवा प्रक्रिया अवघड व प्रदीर्घ आहे, असांतला ळींच नाहीं. पण सर्प व मासा ह्यांचीं पित्तें ह्यांत हे पदार्थ अत्यंत दुर्मिळ, हा औषधीयोगहि लागणारा, पण तो वेळेवर हातीं नसल्यानें ना स्वीकारावी लागते. तो प्रसंग टळावा हा योग संग्रहीं असणें अत्यंत आवश्यक आहे.

धनुर्वातभंजनाचा संस्कृत पाठ

गंधकतालकं सुकुनटी ताप्यं रसं तैत्तिरं।
टंकणसंयुतं मधुफलं सर्वं समं मर्दयेत् ।
ाऽक्षप्रभवेणमायुपयसाताम्रोत्थपात्रेन्यसेत् ।
द्वारिविभिन्नरोमानिचये प्रच्छानिके निक्षिपेत् ॥
ल्येऽनिलंदष्ट्श्रृंखलपदे शंखे हिमे मारुते ।
मादे स्मृतिनाशने त्रिकगदेतन्द्राविमोहादिषु ॥

नांवः— कार्यसूचक.

पाठनिश्चितिः— ठीक.

द्रव्यसंग्रहः— मोरचूद, गंधक, ताल, मनशीळ, माक्षिक, पारा, जेपाळ बीं, बचनाग, टंकण, , सर्प आणि माशाचें पित्त— सर्व समभाग.

द्रव्यनिर्णयः— मोरचूद-भस्म, टंकण—उद्भिज्ज, बचनाग—काळा. हरताल—पत्र्या. गंधक—अमलसार.

द्रव्यशोधनः—शोध्य शोधक

शोध्य	शोधक
मोरचूद	जंबीररसभावना (लघुपुट)
हरताळ	चुन्याची निवळी
गंधक	तूप, दूध
बचनाग	गोमूत्र
पारा	लसूण
टंकण	अग्नि

प्रक्रियाः— प्रथम पारागंधकाची कज्जली करावी. नंतर त्यांत इतर द्रव्यें मिसळावींत व साप व रोहितक माशाच्या पित्तांच्या सातसात भावना द्याव्यात.

कालः—साधनकाल शरद, मर्दनकाल ४२ दिवस

सिद्धिप्रमाणः·· १५ तोळे

परिगणनः··

रोगः— धनुर्वात, पक्षवात, श्रृंखलावात, सर्वांग-शैत्य, उन्माद, अपस्मार, त्रिकग्रह, तन्द्रा, विमोह, संन्यास, शंखरोग, दंतबंध इ. रोगांवर.

मात्राः·· १ गुंज. आधानपात्र—तांब्याचें.

अनुपानः— शिरोभागीं रक्तवाहिनी छेदून तेथें रक्तांत भरणें.

मोरचूदभस्माची कृति

टिप्पणीः— ह्या औषधांत घालावयाच्या मोरचूदभस्माची कृतिः— ५।५ तोळे वजनाचे मोरचूदाचे चमकदार तुकडे घ्यावेत. प्रत्येक तुकड्यास कच्चें सूत लपेटून तो झांकून टाकावा. मग हे तुकडे मातीचें गाडग्याचे बुडाशीं ठेवावेत. व घट, न विरलेल्या चुनकळीनें भरावा. व त्यावर पाणी घालावें. तें इतकें कीं, सर्व कळी फुलून जाईल. मग मडकें फोडावें. सूतवेष्टित तुत्थ हलकेंच बाजूस काढून घ्यावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मग १।१ चेंडू म्हशीचे ताजे शेणांत पुरावा. नारळा-एवढा गोळा होईल इतकें शेण लपेटावें. मग शेण उन्हांत सुकवावें. आंतला गोळा गडगड वाजूं लागला कीं, सुकविणें विधि पुरा झाला असें समजावें. मग तो गोळा युक्तीनें फोडावा. मधला चेंडू काढून घ्यावा व त्यावरील सूत उलगडावें. नंतर एका तव्यावर तेलकट गेरु २० तोळे पसरावा. त्यावर ते खडे ठेंवावेत. पुनः २० तो. गेरु त्यावर घालावा. चांगला दाबावा. आकार शिखराप्रमाणें उंच, वर निमुळता करावा.

हें तुत्थभस्म वापरावें

तव्याच खालीं बोर अथवा शमीचा अग्नि द्यावा. अग्नि मन्द असावा. प्रहरानंतर अग्नि वाढवावा. मध्यमाग्नि २ प्रहर द्यावा. नि मग तीक्ष्णाग्नि एक प्रहर द्यावा. स्वांगशीत होऊं द्यावें. खडे अलग काढून खलून ठेवून द्यावेत. औषधी योगांत जेथें जेथें तुत्थ सेवनार्थ देण्यास सांगितला असेल तेथें तेथें हें भस्म वापरावें हा उत्तम मार्ग. (पं. हरिप्रप र. यो. सा. परिशिष्ट पहा)

८–पुष्पधन्वा– २०१ र. यो. सा.

आयुर्वेदांतील वृष्य औषधांत बरेंच अग्रगण्य आणि नेहमीं उपलब्ध असूं शकणारें असें हें औषध आहे. ह्याचा उपयोग विशेषत्वानें तरुण स्त्री-पुरुषांना अधिक चांगला होतो. जननेंद्रियांचा विकास पुरेसा न झाल्यानें अथवा त्यांत शैथिल्य अगर जाड्य आल्यानें, संगाची इच्छा असूनहि तो सहन न होणें अशा शारीर व मानसिक नपुंसकत्वांत ह्याचा विशेष उपयोग होतो. ह्या दृष्टीनेंहि ह्याची निवड ह्या वर्गांत केली आहे.

पुष्पधन्वाचा संस्कृत पाठ

हरजभुजगलोहं चाऽभ्रकंवंगभस्म,
कनकविजययष्ट्यः शाल्मलीनागवल्ल्यौ ।
घृतमधुसितदुग्धं पुष्पधन्वा रसेन्द्रौ,
रमयति शतरामा दीर्घमायुर्बलं च ।

नांवः– पुष्पं धनुर्यस्य सः पुष्पधन्वा–मदनः।
फूल हेंच धनुष्य आहे ज्याचें (व गंध हाच आहे ज्याचा बाण) असा जो तो–मदन.

फूल व त्याचा गंध हीं मदनाचीं आयुधें समजलीं जातात.

पाठनिश्चितिः– पुष्पधन्वा नामक औषधाचे आठ पाठ पाहिले. निरनिराळ्या परंपराहि पाहिल्या. त्यांत हाच पाठ अधिक रूढ व उपयुक्त दिसला. म्हणून तो येथें निवडला.

द्रव्यसंग्रहः– रससिंदूर, लोह भस्म, अभ्रक भस्म, नागभस्म वंगभस्म, धोत्र्याचीं, भांग, जेष्ठमध, पांढरी सांवरसाल, नागवेल–पान.

द्रव्यनिर्णयः– धोत्राबीं-काळ्या धोत्र्याचें.
नागवेल-बंगला पान
रससिंदूर–नाग–वंग–सुवर्णसिंदूर, अथवा पूर्णचंद्रोदय

द्रव्यशोधन– धोत्राबीं–दुधांत शिजविलेलें.
भांग–दुधांत शिजविलेली

प्रक्रिया– मूळ पाठांत हें चूर्ण सांगितलें आहे व वीर्यवर्धन व रक्षण ह्या दृष्टीनें विचार करतां ह्या द्रव्यांचा नागवेलीचे पानांचे रसांत खल करणें इष्ट ठरतें.

काल–साधनकाल -शरद. मर्दनकाल-४५ दिवस
सेवनकाल–अपानकाल.

सिद्धिप्रमाण–१ तो. मानांत घेतल्यास ११ तोळे

परिगणन– भस्माचीं मान पहाणें.

कार्य– वृष्य.

रोग– नपुंसकत्व-

मात्रा– १ ते २ गुंजा.

अनुपान– मध, तूप, दूध, खडिसाखर, विडा.

टिप्पणी पाठभेद– वंगभस्म (र. यो. सा.) ऐवजीं ' अग्निभाव्यम् ' बृ.यो. त.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

' अग्नि ' शब्दाचा अर्थ

...संस्कृत भाषेत निंब, भिलावा, चित्रक ह्यांना ...नांव आहे. पण तिन्ही द्रव्यें अत्यंत भिन्न ...र व भिन्न कार्य करणारीं आहेत. उदा:–

स्थान	कार्य
त्वचा, मूत्रेंद्रियें	कुष्ठघ्न, व्रणरोपण.
संधि, मूत्रेंद्रियें	आमपाचक, अल्पमूत्रकर
गर्भाशय, त्वचा	आकुंचक व दाहक

...ह्या कारणास्तव येथें अग्नि म्हणजे चित्रक इष्ट ...ना.

पुष्पधन्वाचे ४ पाठ

...शा.	यो. त.	बृ. यो. त.	वै. सा. सं.
...सिंदूर	—	१ रससिंदूर	१ रससिंदूर
	—	१ चित्रक	—
...त्रावीं	१ धोत्रावीं	१ धोत्रावीं	३ धोत्रावीं

हे चार पाठ थोड्या फरकानें भिन्न आहेत. ...ते येथें विवेचनाकरितां घेतले आहेत. ह्या ...तांत वंग, चित्रक आणि धोत्रापान व रससिंदूर ...र पदार्थ घेत आहे.

विचारार्ह द्रव्यें

वंग– स्त्री-पुरुषांना शुक्रवर्धक, शुक्रस्तंभक.

चित्रक– स्त्रियांना गर्भाशयशैथिल्यहर अगर गर्भाशयाचें आकुंचन करून तो सुटसुटित करणारा.

धोत्रावीं– उभयलिंगी शुक्रस्तंभक. पण प्रमाण अधिक घेण्यानें हेंच कार्य अधिक मानांत लाभतें.

हे मुद्दे लक्षांत घेतां वरील पाठांत धोत्रावींचें प्रमाण वाढवावें व वंगयुक्त पाठ स्त्रियांना चित्रकचूर्णासह किंवा चित्रककाढयाचें अनुपानांत द्यावा, असा मेळ घालावासा वाटतो.

नाग-वंग-सुवर्णसिंदूर

रससिंदूर– पाऱ्याचा कोणत्याहि धातूशीं मिलाफ करून त्यांत गंधक घालून त्याचा सिंदूर तयार करतां येतो. ह्या योगांत नाग, वंग, हे दोन धातु आहेतच. सुवर्ण हें वृष्य, बल्य श्रेष्ठ म्हणून ते विचारांत घेऊन नुसत्या रससिंदूराऐवजीं वंग, नाग, सुवर्णसिंदूरपैकीं कोणताहि एक अथवा तिन्ही प्रकार येथें घेणें अधिक श्रेयस्कर ठरतें.

भावनाविधींतील परंपरांतहि भिन्नता आढळते. कोणी केवळ नागवेलीच्या रसाच्याच तीन भावना देतात. तर कोणी ह्याशिवाय धोत्रावीं काढा, सांवरसाल फांट, भांग, जेष्ठमधाचा हिम ह्यांच्याहि तीन तीन भावना देतात. अर्थात् त्यांना अधिक समाधानकारक कार्याचा लाभ होतो. म्हणून आम्हीं वरील पाठांत मर्दनकाल १॥ महिना धरला आहे.

---

९ प्रतापलंकेश्वर–२३८ र. यो. सा.

प्रसूतिदोषावर प्रतापलंकेश्वर हें एक उत्कृष्ट ...आहे. ह्याचें सेवनानें स्त्री–जननेंद्रियें उत्तेजित ...त्यांमधील संचित घाण बाहेर निघून जाते. ...शुद्ध व स्वस्थ होतात. पण हें कार्य होण्यापूर्वी ...संचित द्रव्यें शरीरांत शोषलीं जाऊन त्यामुळें ज्वर, ...क्षय, अतिसार, संग्रहणी, उन्मादासारखे ...वा मानसरोग झाले तर त्यांतहि प्रतापलंकेश्वराचा उत्तम उपयोग होतो. प्रतापलंकेश्वरानें हीं ...जवळच्या मार्गानें बाहेर टाकलीं जाऊन ते ते अवयव शुद्ध, स्वच्छ आणि स्वस्थ होतात. वातकफदोषांचा उद्रेक नाहींसा करणें हें प्रतापलंकेश्वराचें प्रधान कार्य आहे.

अप्रतिम व हुकमी काम देणारें असें हें औषध आयुर्वेद भांडारांत असतां प्रसूतिदोषाकरितां इतर वैद्यकांकडे लाचारीनें पाहण्याचें कारणच काय! त्यापेक्षां अशीं प्रभावी औषधें परिश्रमपूर्वक उत्तम प्रतीचीं तयार करून घेऊन वेळप्रसंगीं त्यांचा उपयोग करून दाखवूनहि तोडीस तोड अशीं औषधें आयुर्वेदांत आहेत, असें सिद्ध कां करून देऊं नये! अशीं औषधें सर्व वैद्यांनीं अवश्य संग्रहीं ठेवून योग्यवेळीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांचा उपयोग करतां यावा, एतदर्थ हें औषध मी ह्या वर्गांत घेतलें आहे.

प्रतापलंकेश्वराचा संस्कृत पाठ

एकेन्दुचन्द्राऽनलवार्धिकाष्ठा-
फलैकभागैःक्रमशो विमिश्रम् ।
सूताऽभ्रगन्धोषणलोहशंख-
वन्योपलाभस्म विषं सुपिष्टम् ॥
प्रसूतिचापाऽनिलदन्तबन्ध--
मार्द्राम्बुना घोरसुसन्निपातान् ।
परामृताऽऽर्द्रत्रिफलायुतोऽयं
गुदांकुरान् वल्लमितो निहन्ति ॥
निजाऽनुपानैर्निजपथ्ययुक्त्या
सर्वाऽतिसारग्रहणीगदांश्च ।
प्रतापलंकेश्वरनामधेयः
सूतः प्रयुक्तो गिरिराजपुत्र्या ॥
२३८ र. यो. सा.

नांव- आराध्य दैवताचें नांव.

प्रतापलंकेश्वर नांवाचे १० पाठ

पाठनिश्चिति- प्रतापलंकेश्वर नांवाचे दहा पाठ पाहिले. पैकीं कांहीं सान्निपातिक ज्वरांत शिरावेध करून सूचिकाग्रानें घालावयाचे, तर कांहीं कुष्ठरोगावरचे आढळले. प्रसूतिदोषावर असा हा एकच पाठ सांपडला, तो येथें उद्‌धृत केला आहे.

द्रव्यसंग्रह- १ पारा १ गंधक १ अभ्रक ३ चित्रक ४ लोह ८ शंख. १६ रानशेणीची राख १ बचनाग.

द्रव्यनिर्णय-पारा-हिंगुलोत्थ, चित्रक-काळा, गंधक - आमलसार, बचनाग - काळा

द्रव्यशोधन- पारा-लसूण, चित्रक-चुन्याची निवळी, गंधक-तूप दूध, बचनाग-गोमूत्र.

प्रक्रिया- प्रथम पारा · गंधकाची कज्जली. व मग इतर द्रव्यें, वस्त्रगाळ करून घालावींत व माक्याचे रसांत २१ दिवस खल करावा.

काल- साधनकाल - शरद. मर्दनकाल - २१ दिवस.

सिद्धिप्रमाण- १ तो. पारा, ३६ तो. तयार औषध

परिगणन-- अभ्रक, लाह इ. मांनें

रोग-- प्रसूतिवात, दांतखिळी बसणें, धनुर्वात अर्श, सान्निपातिक ज्वर, अतिसार, संग्रहणी.

मात्रा-- १ ते ४ गुंजा.

अनुपान-(१) प्रसूतिवात, धर्नुवात, दांतखिळी बसणें, घोर सन्निपात. } आल्याचा रस

(२) मूळव्याधीवर-- शुद्ध गुग्गुळ, गुळवेल आल्याचा, रस त्रिफळा.

टिप्पणीः- हें औषध आम्ही अनेक वेळां केलें ह्या योगांत चित्रक व रानशेणीची राख ह्या दोन द्रव्यावर दृष्टि अधिक काल ठरणें आवश्यक आहे.

चित्रकाचें कार्य

" चित्रकानें प्रमाणाबाहेर रक्तस्राव होण्याची किल्येक वेळेला भीति असते, ह्यानें गर्भाशय, फलकोष अंडकोष, ह्यांच्या ठिकाणच्या रक्तवाहिन्या मोठ्या होऊन केशवाहिन्या विस्तृत होऊन रक्ताचा दाब वाढतो आणि किल्येक वेळेला केशवाहिन्या प्रमाणा बाहेर विस्फारित होऊन रक्तस्राव जास्त होऊं लागतो (औ. गु. ध. शा. भा. ३ पा. १०२)

" गर्भाशयावरील चित्रकाची क्रिया फार महत्वाची आहे. साधारण मोठ्या (२ ते ३ मासे एके वेळीं) मात्रेनें कटींतील सर्व इंद्रियांचा दाह उत्पन्न होतो. म्हणून जुलाब होऊन जुलाबाबरोबर गर्भाशयांतूनहि रक्त वाहूं लागतें व लघ्वीस थेंब थेंब होतें चित्रकानें गर्भाशयाचें इतके जोरदार संकोचन होतें कीं, प्रहर दोन प्रहरांत गर्भ पडतो. चित्रक तीव्र गर्भाशय संकोचक आहे. (औ. सं. पा. ४३८)

चित्रकाचें प्रमाण १/३६

चित्रकाचे स्वाभाविक कार्य वर उल्लेखिल्या प्रमाणें आहे. त्याची प्रचीति तो स्वतंत्र व मोठ्या प्रमाणांत दिल्यास तशी येतेहि. प्रकापलंकेश्वरांत चित्रकाचें मान १/३६ आहे. त्यामुळें चित्रकाच्या मोठ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दृक्प्रत्यय येथें येत नाहीं. तरीपण गरोदर तो उपद्रवकारक ठरतोच. प्रतापलंकेश्वरांत बरोबर लोहभस्म आहे. लोहसान्निध्यानें चित्र· आतिरेकीपणास आळा बसतो. लोह हा चित्रका· चित्रक आहे, असें म्हटलें तरी चालू शकेल.

संयुक्त कल्पांतील घटक द्रव्यांचीं कार्यें पृथग्शः– वर्णन करतां येत नाहींत. त्यांचें स्वाभाविक होतेंच पण त्यांत अन्यद्रव्यसंयोगानें फरक पडतो. नियमन होत असतें. असें जरी आहे तरी तो वगळला तर त्याची अनुपस्थिति जाणवल्या– रहात नाहीं. आणि चित्रकासारखा महपदार्थ गळूं नये म्हणून येथें चित्रकपरीक्षणाच्या खुणा सांगत आहे. चित्रकाचे चार आहेत, ते त्याचें फुलांचें रंगावरून ओळखा- असतात.

चित्रकाची परीक्षा

सर्व प्रकारांत सर्वसामान्य गुण असतात. पण त्यांत काळा चित्रक गुणश्रेष्ठ मानतात. त काळा चित्रकाऐवजीं बामळीच्या काळ्या अगर सुरु वृक्षाच्या काळ्या काड्या, तसेंच चित्रक म्हणून कसली तरी तांबडी मुळी कांहीं वेळेला मिळण्याचा संभव असतो. तेव्हां याची मुळी तेथेंच चावून बघावी. ती तिखट तर तो चित्रक जाणावा. चित्रकाच्या मुळीवर सुरकुत्या असतात, व आकार सम असतो.

चित्रकाची शुद्धि

चित्रकशुद्धि आयुर्वेदीय ग्रंथांत आढळली नाहीं. न्य ग्रंथामधून घेतली आहे. उदाः–

कचित्रकमूलं तु चूर्णतोये निमज्जयेत् ।
तो निदाघे संशुष्कं शुद्धिमायात्यनुत्तमम् ॥

—कल्याणकारक ग्रंथ

चित्रकाप्रमाणेंच रानशेणी हाहि एक महत्वाचा आहे. निरनिराळ्या पशूंच्या वा पक्ष्यांच्या औषधी योगांत वा प्रक्रियेंत उपयोजिल्या ; तरीपण सामान्यतः गायबैलाची विष्ठा पोटांत देतात. त्यांतहि रानांतील गायींचें शेण श्रेष्ठ मानतात. शेळीच्या दुधाबाबत—

अल्पांबुपानव्यायामकटुतिक्ताशनैर्लघु ।
आजं शोषज्वरश्वासरक्तपित्तातिसाराजित् ॥

(अ. हृ.) हा जसा निर्वाळा देतात, तसाच प्रकारभेद जनवासी वनवासी पशूंत केला असावा असें दिसतें.

पशूच्या शेणाचें पृथक्करण

शहर वा अरण्यवासी अनेक पशूंच्या शेणांचें विश्लेषण करून पाहिलेलें नाहीं. पण एका प्रकारच्या शेणाच्या राखेचें पृथक्करण केलें तें :—

Faintly alkaline, soluble portion extremely small.

Acid insoluble	Fe_2O_3	Al_2O_4	CaO	MgO
74·2%	10·31%		10·15%	2·63%

अनेक ठिकाणच्या गायी–बैलांच्या शेणांचें पृथक्करण करून त्यापैकीं कोणता प्रकार अगर कोणकोणते घटक किती प्रमाणांत इष्ट तें ठरवावें लागेल. तेव्हांच सर्व ठिकाणच्या प्रतापलंकेश्वराचे गुण सारखे लाभतील.

थंडगार
नेत्रांजन
डोळ्यांचे विकारावर उत्कृष्ट
कृष्णशास्त्री बिवलकर
पो. आंजर्ले. (रत्नागिरी)

पवित्र
नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहाः–नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राणिक्लेशप्रतिबंधक कायदा

श्रीमती रुक्मिणीदेवी अरुंडेल, एम. पी. यांनीं कौन्सिल ऑफ स्टेट्सूमध्यें Prevention of Cruelty to Animals Act,1953 या नांवाचें एक बिल आणलें आहे. हिंदुस्थानांत प्राणिक्लेश निवारणाच्या दृष्टीनें कांहीं कायदे अस्तित्वांत असले तरी ते व्यापक नाहींत आणि बुद्धाच्या व अशोकाच्या काळापासून म. गांधींच्या काळापर्यंत या देशांतील विचारांना व आचारांना विशिष्ट वळण देणाऱ्या अहिंसेच्या मूलतत्त्वाशीं सुसंगत नाहींत, म्हणून त्या सुसंगततेकरितां हा कायदा मांडला जात आहे.

हिन्दी संघराज्याच्या सर्व प्रदेशांना हा कायदा लागूं होईल, परन्तु एखाद्या प्रादेशिक राज्यास त्यांतील कलमांची अंमलबजावणी संघराज्याच्या अध्यक्षांच्या परवानगीनें व पुरेशीं कारणें देऊन अधिकांत अधिक दोन वर्षांपावेतों तहकूब ठेवतां येईल.

ह्या कायद्यांतील प्राणि शब्दांत रोगवाहक जंतू, किडे इत्यादिकांचा समावेश होणार नाहीं.

धार्मिक कृत्याच्या नांवानें व शिकारीच्या निमित्तानें होणाऱ्या प्राणिहत्येला हा कायदा प्रतिबंध करील.

प्राण्यांच्या संबंधींचा केवळ अभ्यास करण्याच्या हेतूनें कांहीं प्राण्यांना पिंजऱ्यांत ठेवावे लागले तर तें देखील एखाद्या मान्य संस्थेच्या देखरेखीखालींच व त्या प्राण्यांच्या सुखसोयींची तरतूद करूनच केलें पाहिजे.

मांसाहारी लोकांकरितां कत्तलखान्यांत मारले जाणारे प्राणी सदयतेनेंच मारले गेले पाहिजेत.

प्रत्येक प्रादेशिक राज्यांत प्राणि-हितरक्षक खातें असलें पाहिजे.

शास्त्रीय प्रयोगाकरितां प्राण्यांची निर्यात वा आयात करण्यास किंवा त्यांना प्रतिबंधांत ठेवण्यास हा कायदा विरोध करील.

ह्या कायद्याच्या अंमलबजावणीकरितां मध्यवर्ति सरकारांत एक प्राणिहितसंरक्षक मंत्री नेमला जाईल.

या बाबतींत लक्ष घालूं इच्छिणारांनीं माझ्याकडे पत्रव्यवहार केल्यास मला फार आनंद होईल.

डॉ. वा. वि. आठल्ये, सातारा

वैद्य व औषधी कारखाना

प्रश्न- माझा दवाखाना एका खेड्यांत आहे. लहान प्रमाणावर, गृहोद्योग स्वरूपांत एक औषधी निर्माणशाला मी काढूं शकतो कां ? व त्याच्या व्यवस्थेचें काम मी माझ्या मुलावर सोपवूं शकतो काय ?

उत्तर- फार्मसी चालूं करण्यास वा त्याच्या वैद्यकीय व्यवहाराचें संचालन-(ॲडमिनिस्ट्रेशन) करण्यास चिकित्सकास वैद्यकीय कायदा अडथळा होतो असें वाटत नाहीं. पुष्कळ जाणते वैद्य व डॉक्टर हे लिमिटेड फार्मसीचे डायरेक्टर व शेअर-होल्डर आहेत. जर असें करण्यांत कांहीं बाधा येत असती तर त्यांनीं त्या जागा स्वीकारल्या नसत्या.

आपल्या नातेवाईकांस उद्योग लावून देण्यासाठीं लहान मोठा कारखाना काढण्यास व तो वाढेल यासाठीं मदत करण्यास कायदा अगर नीतिसंहिता अडथळा करीत नाहीं असें मत आयुर्वेद जगत्‌नें दिलें आहे.

डॉ. आशानंद पंचरत्न चित्र

वरळी येथील सरकारी पोदार आयुर्वेद महाविद्यालयाचे माजी प्रमुख डॉ. आशानंद पञ्चरत्न यांचें चित्र त्या महाविद्यालयांत लावण्याचा समारंभ आरोग्यखात्याचे उपमंत्री श्री. बी. डी. जत्ती यांच्या हस्तें साजरा झाला.

सेवा संघाचीं सर्व औषधें तसेंच खालीचीं सर्व देशी काष्ठौषधी व ताजी वनस्पती आणि शिलाजीत, कस्तुरी, केशर, भीमसेनी कापूर, गोरोचन, वाकेरी भाते, वंशलोचन, नागकेशर, अनंतमूळ, जितसाया, उत्तम महाबळेश्वरी मध वगैरे औषधें मिळण्याचें ठिकाणः—

देशी सर्वौषधी संग्रहालय
पोलिस चौकीसमोर, दादर मुंबई २८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वृंदमाधव ग्रंथांतील संदिग्ध द्रव्यांचें स्पष्टीकरण

(लेखकः—वैद्य मुकुंदराव अं. गायकवाड, सोलापूर)

आयुर्वेद पत्रिकेच्या १-९-५३ चें अंकांतील पानावर वैद्यराज ताटके यांचे लेखांतील शंकांचें स्पष्टीकरण करीत आहे. खरोखरच श्री. ताटके यांचा हा उपक्रम स्तुत्य आहे. प्राचीन ग्रंथांचें तत्पूर्वक परिशीलन करण्याचें कार्य तज्ज्ञ वैद्यांनी केल्यास कितीतरी गोष्टी उजेडांत येऊन आपणापुढील अडचणी मिटतील.

सालिंच वनस्पति

या वनस्पतीचा उल्लेख रससंस्कारक्रियेंत व लोहक्रियेंत अनेक रसग्रंथांतून आलेला आहे. उदा. आयुर्वेदप्रकाश, रसेंद्रचिंतामणि, रसचिंतामणि, रसकामधेनु, लोहसर्वस्व इत्यादि.

रसकामधेनु ग्रंथांत लोहसर्वस्वांतीलच लोहमारणाचा पाठ उध्दृत केला असून त्या पाठाखालीं जी त्या द्रव्याबद्दल टिप्पणी दिली आहे, तींत ' सालिंच ' म्हणजे ' मंजिष्ठा ' असा पर्याय दिला आहे.

आयुर्वेद – प्रकाशांत एका लोहभस्मप्रकारांत हाच शब्द आलेला आहे. त्या शब्दावरचे टिप्पणींत टीकाकारानें मत्स्याक्षी म्हणजे ' शालंची ' असा स्पष्ट उल्लेख केला आहे. त्यामुळें रसकामधेनूंतील स्पष्टीकरणाला विरोध येतो.

रसपद्धति ग्रंथावर त्या ग्रंथकाराचे मुलानेंच टीका लिहिली आहे. हे दोघे महाराष्ट्रीय असावेत असें वाटतें. टीकेंत मत्स्याक्षीची नामावली अमरकोशावरून दिली आहे ती अशी, " ब्राह्मी मीना मत्स्याक्षीत्यमरः, बाम्बीति ब्रोकाः, होनगोंदा, इति " असें म्हटलें आहे. म्हणजे ब्राह्मी, मीना, मत्स्याक्षी इत्यादि अमरकोशांत नांवें असलेली वनस्पति म्हणजेच ' बाम्बी ' किंवा कांहींजण ' होनगोंदा ' म्हणतात, ती होय.

बाम्बी व होनगोंदा हीं नांवें सध्यांहि मराठी भाषेत प्रचारांत आहेत. हीं दोन नांवें असलेली वनस्पति म्हणजे बामचा पाला, बाम्बी, वाम्बी, हुनगुंदा, जलब्राह्मी, पानघोळ इत्यादि नांवें असलेली व लॅटिनमध्यें Herpestis Monniera नांव असलेली Scrophularineae नैसर्गिकवर्गांतील वनस्पति.

'शालवी' चे पर्याय

रसचिंतामणींत " शालंची " नांवासारखेंच " शालवी " हें नांव लोहभस्मक्रियेंतच आलेलें आहे. या शालवीचेहि पर्याय ग्रंथकारानें तेथेंच सुरवातीस सांगितले आहेत, ते असे—शास्त्रांत 'शालवी,' प्रचारांत ' छलहिंटिका ', गरुडीपाताळ, महौषधिहि म्हणतात ती. हिलाहि सध्यां पाताळगरुडी, घरुडपाताळ, वासनी, वासनवेल, दांगडीचा वेल, तानीचा वेल इत्यादि नांवें आहेत.

नामसादृश्यावरून शालवी, सालहंची, शालंचि, हीं नांवें एकाच वनस्पतींची असावींत असें वाटतें, पण ग्रंथकारांनींच तत्संबंधीं खुलासे दिले आहेत. शिवाय या वनस्पती लोहभस्माकरितां चांगल्याच उपयुक्तहि आहेत. हेंहि तितकेंच खरें आहे. असो, हीं नांवें वेगवेगळी धरून चालल्यास पुढीलप्रमाणें त्यांचे पर्याय आहेतः– शालवी—गरुडपाताल, वासनवेल

सालहंची—मंजिष्ठा

शालंची—मत्स्याक्षी, जलब्राह्मी

यांतील नेमका शालिंच शब्दच पाहिजे असल्यास जलब्राह्मी हाच अर्थ निश्चित आहे.

आतां पांडुरोगाचे दृष्टीनें विचार केल्यास कोणती वनस्पति जास्त उपयुक्त आहे हें पाहूं– पांडुरोगांत रक्ताल्पता, पित्तप्राधान्य, हृदयगतिवृद्धि, यकृत्‌विकृति इत्यादि असतात; त्या दृष्टीनें जलब्राम्ही जास्त उपयुक्त ठरते. कारण ही तीव्र गुणाची वनस्पति आहे. हिचे गुणधर्मवर्णन करण्याचें हें स्थळ नव्हें. डॉ. कार्तिकचंद्र बोसचा " फार्माकोपिया इंडिका " हा इंग्रजी निघंटु पहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जालिनी

जालिनी शब्द, देवदाली व कडुदोडकी या दोन्ही वनस्पतींना आहे. त्यांतून कार्याचे दृष्टीनें दोहोंचें कार्य सारखेंच होतें. शिवाय दोहोंचा नैसर्गिक वर्गहि एकच आहे. पण देवदाली श्रेष्ठ ठरते. कारण कुष्ठ, श्वित्र आदि रोगांतहि ही फार उपयुक्त आहे. रसचिंतामणी देवदालीकल्प पहा. शास्त्रांतहि "देवदाली रजो नस्यं पांडुरोगं व्यपोहति।" इत्यादि. पांडु, कामलेवर हिंचा सर्रास उपयोग केलेला आढळतो. कडुदोडकी म्हणजे भाजीमधील दोडक्यांत होणारा कडुदोडका नव्हे. कडुदोडकीस बोटभरच लांब लहान फळ येतें. तें तीव्र रेचक वामक आहे.

मेषश्रृंगी

मेषश्रृंगी लताहि आहे व मेषश्रृंगी वृक्ष पण आहे. पांडुरोगाचे दृष्टीनें मेषश्रृंगीलताग्रहणच योग्य आहे. कारण मेषश्रृंगीलता जीस गुडमारी म्हणतात, रसनेंद्रियाची मधुर-रस-ग्रहणशक्ति कांहीं काल स्तंभित करणारी, जीस वेडकीचा वेलहि कोणी कोणी म्हणतात. ही Asclepiadaceae या नैसर्गिक वर्गातील, जिम्नेमा सिल्वेस्ट्रि हें लॅटिन नांव असलेली वेल होय. ती पांडुरोगचिकित्सेंत फार उपयुक्त आहे.

मेषश्रृंगीवृक्ष पांडुचिकित्सेंत उपयोगी नाहीं. आध्मान, गुल्म, तीव्र पोटशूळ, आंत्रवृद्धी (कुरण्ड व्याधि), वायुगुल्म इत्यादि रोगांत तो उपयोगी आहे. मेषश्रृंगीवेलीला येणारें जोडफळावरून तीस वृश्चिकाली हें नांवहि शोभते.

लोहकिट्ट

लोहाराचे अड्डयावर लोखंड तापवून ठोकतांना जो लोखंडाचा भाग उडून बाजूस पडतो, तसेंच लोखंड तापवतांना जो खंगर लाकडीकोळसा व लोखंड यांचे पासून निर्माण होतो त्यांसच लोहकिट्ट म्हणतात, व प्रचारांतहि त्यास "लोहकीत" म्हणतात. मंडूर ही संज्ञा फक्त पृथ्वीवर किंवा जमिनींत पुरलेल्या अवस्थेंत कमींतकमी ६० वर्षें व जास्तींतजास्त १०० वर्षें पडून असलेल्या लोखंडापासून बनलेल्या गंजासच आहे. मात्र जुना मंडूर व खंगर दोन्ही दिसावयास सारखे दिसतात, म्हणून "मंडूरं लोहकिट्टानुकारि द्रव्यम्" असें म्हटलें आहे.

कृष्णपंकपर्पटी

कृष्णपञ्चकपर्पटी असा शब्द नसून कृष्णपंकपर्पटी हाच शब्द तेथें ग्रहीत आहे, असें वाटतें. कारण प्राचीन ग्रंथांत व रसग्रंथांतहि हा शब्द व त्याचे उपयोग आलेले आहेत. पावसाच्या पाण्यासह कसदार काळया जमिनीवरून वाहून आलेला काळया मातीचा गाळ बांधाचे पोटीनें पाणी सांचलें म्हणजे तळी बसतो व पाणी सुकतांच त्याच्या पापळ्या उन्हानें व वाऱ्यामुळें बनतात. तीच कृष्णपंकपर्पटी होय.

मुंडितिका

गोरखमुंडीस हें नांव आहे. गोरखमुंडीची पाणथळ जागीं किंवा साळवणांत सरपटत जाणारी वेल असते. बृहन्निघंटुरत्नाकरांत गुडूच्यादि वर्गांत ही वर्णिली आहे.

काकजंघा व काकनासा

या दोन्ही एकच नव्हेत, वेगवेगळ्या वनस्पति आहेत. काकजंघा म्हणजे घावकाडी, कांग, यत्मर्सी (तेलगु, कानडी), अघेडी (गुजराथी) इत्यादि

तारेचा पत्ताः– Newbottle

के. के. शहा अँड कंपनी

बाटल्यांचे व्यापारी

(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)

रिकाम्या बाटल्या, बुचे, कॅपसुल्स् [हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे

ठोक व किरकोळ

विक्री करणारे व्यापारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...असलेली वनस्पति. आघाड्याप्रमाणें पण ...र पानें असलेली क्षुप वनस्पति सर्वत्र मिळते. ...र उपयुक्त आहे. पदे यांचे वनौषधिगुणादर्शात ...नांवानें वर्णिली आहे.

काकनासा

...विंचूप्रमाणें दिसणारीं काळींफळें येणारें क्षुप हिला ...ते विंचूचें झाड, नकटी, तेलगु भाषेंत तेलकोंडी ...नांवें आहेत. कोणी काकपंखहि म्हणतात. चांभार ...वपळांमध्यें आवाज येण्याकरितां या झुडुपाचें ...या उपयोग करितात. हें धनुर्वात, पोटदुखी, वातविकार, उन्माद, फेंपरें इत्यादि रोगांत वापरतात.

वंशलोचन

फार पूर्वकालापासून व्यापारीलोक आपणांस वंशलोचन पार्थिव व उद्भिज्ज या दोन प्रकारचें देत आले आहेत. त्यास सध्याहि अनुक्रमें खोटें व खरें या नांवानें ओळखतात. म्हणजे पार्थिव वंशलोचन वाळू व सज्जीखारापासून तापवून बनवतात. व खरें वंश–लोचन चीन जपानहून येतें. बांबू-वेळूच्या कांड्यामध्यें तें आपोआप तयार होतें.

———

...माधवांतील शंकांचें समाधान :

लेखकः–वै. गोवर्धनशर्मा छांगाणी
नागपूर

आयुर्वेदपत्रिकेचे गतांकांत (ता. १।९।५३) ...वैद्य हरिशास्त्री ताटके ह्यांनीं वृंदमाधव चिकि-...त्सेंतील कांहीं शंकास्थळें प्रदर्शित केलीं आहेत. त्यांचें ...समाधानार्थ मी आपलें मत व्यक्त करीत आहे.

सालिंचचा खरा अर्थ

पांडुरोगचि. श्लोक ६च्या टीकेमध्यें "सालिंच-...दलाकार्थी दत्त्वा" येथें सालिंच हें नांव बंगाली ...तें निघंटूंत कसें सांपडणार? सालिंच करितां ...पर्यायशब्द "पत्तूर" आहे हें चक्रदत्त, सुश्रुत, ...रत्नावली आदि अनेक ग्रंथांत आलेले आहे. ...शब्दसिंधु, व भैषज्यरत्नावलीच्या संस्कृत ...स्पष्ट "पत्तूरः सालिंचशाके" असें म्हटलें आहे. ...सालिंच ही शाकवर्गांतील औषधी आहे. ...धर्मांत आंबटचुक्यासारखी आहे. पहा, भाव–...प्रकाश पूर्वखंड अ. १० शाकवर्ग "शितिवारः ...वरः" आदि श्लोकांत म्हटलें आहे कीं, ...शिरीषसदृशः पत्रैश्चतुर्दल इतीरितः। शाको जला-...देशे चतुष्पत्रीति चोच्यते ॥३०॥ हिचें हिंदी ...नांव चौपतिया, शिरियारी, शिरवालिका आदि ...आहे. पहा, सुश्रुत चि. अ. १९ श्लोक ३५ मध्यें ...पत्तूरचे डल्हनकृत अर्थ "पत्तूरः शिरवालिका"

जालिनीफल = जंगली कडु दोडकी

...कामला चि. श्लो. १३ यांत टीकाकाराचे जालिनीविषयी पीतघोषफल म्हणणें बरोबर आहे. शालिग्राम तितके विश्वस्त नाहींत. घोषालीच येथें प्रभावी आहे. ही जंगली कडु दोडकी आहे. अनेक कार्यवादी कोषकारांचे मतानें "जालिनी देवदाल्या–मपि" येथें देवडांगरीचें फल हें अधिक प्रशस्त आहे. तेंहि घेऊं शकतो.

मेषशृंगी वृक्ष नाहीं

मेषशृंगीबद्दल डॉ. देसाईंचेंच म्हणणें रास्त आहे. ही वेल असते. समोरासमोर दोन शृंगासारखे निघतात. तोडले तर दूध निघतें. वृश्चिकाली, शालिग्राम यांना मानणें इष्ट नाहीं.

मंडूरच लोहकिट्टानुकारि आहे

पुनर्नवामंडूर यांत टीकाकाराचें म्हणणें बरोबर आहे. शंका करणें हें व्यर्थ आहे, कारण कीं, पुनर्नवा· पुढें स्पष्ट मंडूराचा उलेख आहे. टीकाकाराचें स्पष्टीकरण "मंडूरं लोहकिट्टानुकारि द्रव्यम्" बरोबर आहे. किट्टरूप झालेलें लोह असाच अर्थ होऊं शकतो. दुसरें द्रव्याची कल्पना संभवत नाहीं.

कृष्णपंचकपर्पटी

कदाचित् टीकाकार श्रीकंठदत्ताच्या वेळेस बंगाल देशांत कृष्णपंचकपर्पटीचा व्यवहार असेल, परंतु आपण ह्या कुचुंबणेंत जाऊं नये. कारण कीं, ७७ वर्षांचें आमचें वयांत कृष्णपंचकपर्पटी आम्ही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहिली नाहीं. असो. परंतु " सौराष्ट्री मृत् (गोपी-चंदन) सर्वांच्या परिचयाचें असतां " हें आपलें स्पष्टीकरण मला रास्त वाटत नाहीं. आटरूषनिर्यूहाचे ह्या ९ वें श्लोकाप्रमाणें पुढें १० वें श्लोकांत सुद्धां मृत् शब्द आला आहे. टीकाकारानीं क्रमानें " मृत्तिका सौराष्ट्री मृत् " तसेंच " मृन्मृत्तिका सा च सौराष्ट्री ग्राह्या " असें स्पष्टीकरण केलें आहे. त्याचे स्पष्ट अर्थ आपण येथें 'तुरटी' 'फिटकडी' च केलें पाहिजेत. कारण कीं, सौराष्ट्री-मृत् चा अर्थ गोपीचंदन करणें ठीक नाहीं. पहा, हेमचंद्राचे अभिधानचिन्तामणि कांड ३ श्लोक १२१।२२ " सौराष्ट्री पार्वती काक्षी कालीका पर्पटी सती । आढकी तुवरी कंसोद्भवा काच्छी मृदा-ह्या ॥ १२१।२२ सारांश, येथें मृत शब्दास धरून हें पर्याय सांगितले आहेत. आपण विचार कराल अशी आशा आहे.

खनिज वंशलोचन

पुढें रक्तपित्ताचि० चे २१ वें श्लोकांत टीका-कारांचें " तुगाख्यां वंशरोचनानुकारि पार्थिवं द्रव्यम्। अन्ये वंशरोचनामाहुः " हें म्हणणें बरोबर आहे. बांबूतून निघणारें वंशलोचन तर प्रसिद्धच आहे. परंतु एक जाति पार्थिव वंशलोचनाचीहि आहे तें फारसें प्रचारांत नाहीं व आम्ही प्रत्यक्ष पाहिलेंहि नाहीं. परन्तु मद्रास प्रांतान्त कोट्टायम् येथें एक वैद्याचे 'मूस' घराणें आहे तें आयुर्वेदांत पारंगत असे आठ घरण्यां-पैकी एक आहे, त्यांचा एक लेख पार्थिव वंशलोचना-विषयीं मी कधींतरी पाहिला होता.

मुंडतिका = गोरखमुंडी

रक्तपित्ताचि० श्लोक ६६ खंडकाद्यवलेहांतली मुंडतिका लताविशेष हें बरोबर आहे तिचेंच आज प्रसिद्ध नांव मुंडी किंवा गोरखमुंडी आहे. संशय धरूं नये.

महारोग्यांची नवी वसाहत

मिरजेजवळ आंबवाडी येथें महारोग्यांची एक नवी वसाहत स्थापन करण्यांत आली आहे. ह्या वसा-हतीच्या आसपासच्या १५ मैलांच्या प्रदेशाची पाहणी करण्यांत येणार असून, महारोगाचा उपसर्ग होण्याचा संभव असणारांवर औषधोपचार करण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे.

श्री. गंगाधर दामोदर कुलकर्णी हे ह्या वसाह-तीचे संघटक आहेत. त्यांच्या कुटुंबांतील तीन जणांनी कुष्ठरोग्यांच्या सेवेस वाहून घेण्याचें व्रत अंगिकारलें आहे. ह्या वसाहतींत कुष्ठरोग्यांना विणकाम, कोंबड्या पाळणें वगैरे धंदे शिकविण्यांत येणार आहेत. चार बेड्सची व्यवस्था असलेले एक इस्पितळ सुरूं कर-ण्यांत येणार असून कुष्ठरोगानें अधिक आजारी अस-लेल्यांना तेथें ठेवण्यांत येणार आहे. खेडोंनें जमिनी मिळवून रुग्णांना लागवडीसाठीं त्या देण्यांत येतील. कुष्ठरोगपीडितांपासून त्यांची मुलें अलग ठेवण्याची व्यवस्था करण्यांत येत आहे.

कुष्ठरोगाचें निर्मूलन

वरील नांवाचें एक ६५ पानाचें छोटें पुस्तक मुंबई राज्यांतील सन्मान्य कुष्ठरोग निवारण प्रचारा-धिकारी श्री. वा. वि. तथा अण्णासाहेब दास्तानें यांनीं प्रकाशित केलें आहे. श्री. टी. ए. जगदीशन् यांनीं इंग्रजींत लिहिलेल्या 'ऑल अबाउट लेप्रसी' या लेखसंग्रहाचे विषयवार संकलन करून हा मराठी अनुवाद तयार करण्यांत आला आहे.

सर्व सामान्य जनतेच्या विचारांत कुष्ठरोगासंबंधीं क्रांतिकारक बदल घडवून आणण्याच्या दृष्टीनें हें पुस्तक लिहिलें आहे. प्रयत्न अत्यंत अभिनंदनीय आहे. किंमत ८ आणे, टपालखर्च निराळा.

अनेकांनीं प्रशंसलेलीं " आयुर्वेद सेवा संघ " नासिकचीं सर्व गुणकारी औषधें आतां

क ऱ्हा डां त

मिळूं लागलीं.

औषधी भांडार

गुरुवार पेठ, पो. कऱ्हाड (सातारा)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आंबट लिंबूफळाचें टरफल व बी

[लेखकः– मा. या. व्यवहारे, बी. एस्‌सी. (फॉर्म केम), नासिक]

(लिंबाच्या वाया जाणाऱ्या पिवळयाधमक सालींचा उपयोग करण्यासंबंधींचे दोन लेख पूर्वी र्वेद-पत्रिकेंत प्रसिद्ध झाले आहेत. लिंबाच्या सालींचें लोणचें करून तें आयुर्वेद सेवा संघानें विक्रीस आहे. यंदा सालींचें आसव करण्याचा, सेवा संघाचा विचार आहे. या लेखानें वाचकांना या उपयुक्त द्रव्याचा अधिक उपयोग घेण्याची स्फूर्ति झाल्याशिवाय राहणार नाहीं. —संपादक)

सालींचें आसव करतां येईल

आयुर्वेदीय औषधी तयार करतांना लिंबू, आलें नित्योपयोगी पदार्थांचा भावनेकरितां बऱ्याच प्रमाणांत उपयोग केला जातो. लिंबांचा रस ल्यानंतर लिंबाची साल व त्यांतील बीज निरुप- म्हणून फेकलें जातें, त्यांचा कांहींच उपयोग जात नाहीं. पण विचारान्तीं या वस्तू बहुगुणी हें लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. कारण जीवनसत्व 'सी' व यकृत् उत्तम प्रकारें ठेव- कार्य करणारीं द्रव्यें आहेत. सबब सालींचा करणांत उपयोग केल्यास बराच फायदा घेतां लिंबाच्या या सालींपासून लोणचें किंवा आसव केल्यास तें थंडी-पडसें घालवूं शकेल व यकृत् ांत ठेवून त्यांतून पित्तस्राव योग्य प्रकारें मदत करणें इत्यादि कार्य करूं शकेल. सालीचें निर्माण करणें ही गोष्ट कोणालाहि सहज- शी आहे.

आतां दुसरें, त्यांतील बी बियांचा उपयोग तर केला जात नाहीं त्याकडे जाणत्या लोकांचें अगदींच दुर्लक्ष आहे. पण या बिया हासुद्धां कार्यकारी औषधी पदार्थ आहे.

उंदिर बिया खातात

अनुभवांतीं मला असें आढळून आलें आहे कीं, बिया मोकळ्या ठेवल्या तर उंदिर त्यांतील बीगर काढून त्याचा फडशा पाडतात व वरचें टरफल ठेवतात. हें बी अतिकडू असून सुद्धां उंदिर फडशा उडवतात, तेव्हां तें उंदरांस इतकें प्रिय असण्याचें कारण काय? बियांचा त्यांच्या शरीरावर काय परिणाम होतो? या प्रश्नाचा उलगडा करण्या- करितां बियांमध्यें कोणते कार्यकारी घटक आहेत हें ठर- विलें पाहिजे, म्हणून बियांचा प्रयोग करण्यास घेतला, व प्रयोग केल्यानंतर खालील गोष्टी आढळल्या.

बियांवरील रासायनिक प्रयोग

प्रथम लिंबाच्या बिया भरडून, पाखडून घेतल्या, व टरफल वेगळें काढून बी वाटून घेतलें. तें अल्को- होल मध्यें २४ तास भिजत ठेवलें. नंतर गाळून घेतलें, तेव्हां अल्कोहोलमध्यें पिवळसर तेलकट भाग व एक नत्रयुक्त द्रव्य (alkaloid) मिळालें.

बियांचें तेल काढण्याकरितां हातघाण्यांत घातलें पण तेल निघालें नाहीं. म्हणून तें काढून त्यांत पाणी टाकून उकळून (फिल्टर केलें) गाळून घेतलें. त्यांत चुन्याची निवळी (Lime Water) टाकली तेव्हां साबणासारखी जेली तयार झाली, ती गाळून घेतली. नंतर त्या द्रवणांत पुन्हां निवळी टाकली तेव्हां एक रवेदार नत्रयुक्त द्रव्य (Alkaloid) मिळालें.

त्याच प्रमाणें बी उकळून घेतलेल्या पाण्यामध्यें हैड्रोक्लोरिक ॲसिड (Hydrochloric Acid) टाकून नंतर मेअर्स रिएंजट (Mayer's Reagent) चे थेंब टाकले, तेव्हां नत्रयुक्त द्रव्याची परीक्षा (Alkaloid test) मिळाली.

यावरून बी मधील नत्रयुक्त द्रव्य पाण्यांत विरघळणारें आहे हें सिद्ध झालें. म्हणजे तें अल्कोहोल व पाण्यांत या दोहोंमध्यें द्राव्य आहे. बियांचें तेल पिवळसर आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बींचा कडूपणा कशांत आहे?

बिया उकळल्यास त्यांचा कडूपणा कमी होतो. म्हणून उकळून गाळून घेतलेल्या द्रावणांत इथर (Ether) टाकून हलवून २४ तास ठेवलें. नंतर इथर निराळें करून घेतलें व उडूं दिलें. सर्व इथर उडाल्या-नंतर खालीं तेल मिळालें; त्याची चव कडू मिळाली. तसेंच नत्रयुक्त द्रव्य असलेल्या पाण्यास (Alkaloidal Water) कडुरुची मुळींच आढळून आली नाहीं.

फक्त तेलच कडु आहे

बियांचा कडूपणा उकळून गाळून घेतल्यानंतर कमी होतो, नत्रयुक्त द्रव्य असलेल्या पाण्यास कडूपणा नसतो पण तेल मात्र कडू असतें. यावरून फक्त तेलच कडू असल्याचें सिद्ध होतें.

नंतर इथर (Ether) उडून गेलेल्या तेला-मध्यें नत्रयुक्त द्रव्य (Alkaloid) तपासलें पण त्यांत तें आढळलें नाहीं, यावरून तें पाण्यांत द्राव्य असून वरील पद्धतीनें तेलापासून निराळें करतां येतें.

बी प्रतिकारशक्ति वाढवितें

हें झालें बियांच्या कार्यकारी घटकाबद्दल पण बियांचा उपयोग काय हें मात्र राहिलें. बरेच वनस्पती-संग्रह वगैरे पुस्तकें वाचतां वाचतां एका पुस्तकांत या बियांचा काय उपयोग आहे हें आढळलें, तें असें:-शरीरांत तें अत्यंत प्रतिकारक शक्ति (Prophy-lactic) निर्माण करते व त्यायुळें रोग न होऊं देण्यास, अगर झाल्यास त्याचा प्रतिबंध होण्यास या शक्तीचा उपयोग होतो. या गुणासाठींच इंदिर लिंबाच्या बियांचा फडशा उडवित असले पाहिजेत त्यामुळें त्यांची रोगप्रतिकारक शक्ति वाढत असली पाहिजे.

यावरून लिंबाची साल व बिया यांचा उपयोग करून घेतां आल्यास मानवाच्या शरीरांतहि वरील प्रमाणें प्रतिकारक (Prophylactic) शक्ति वाढ-वून रोगांचा प्रतिबन्ध करण्यास मदत होईल असें वाटतें.

—×—

जादुसारखा तत्काळ प्रभाव करणाऱ्या, व केंव्हांहि न बिघडणाऱ्या
गुणदायी इंजेक्शनांचा वैज्ञानिक नवा शोध, म्हणजेच

मार्तंड आयुर्वेदिक इंजेक्शन्स्!

भारतांतील सर्वांत मोठी, त्याचप्रमाणें आधुनिक यंत्रसामुग्रीनें सुसज्ज मार्तंड फार्मा-स्युटिकल् लॅबोरेटरीमध्यें, अनुभवी व उच्च आयुर्वेदिक शिक्षण घेतलेले तज्ञ व कर्तबगार पाश्चात्य शिक्षित वैज्ञानिक तज्ञ अशा उभयतांनीं मिळून सत्वर व हमखास गुणकारी अशा नवीन आयुर्वेदिक इंजेक्शनांचा शोध लाविला असून, तीं जादुसारखीं काम करणारीं व कायम गुण देणारीं अशीं आहेत. यांची बरोबरी ॲलोपॅथिक इंजेक्शनें करूं शकत नाहींत.

संशोधनाचें, मनाला पटणारें व पुष्कळच ज्ञान देणारें वाङ्मय मोफत मागवा. आमच्या इंजेक्शनांवर कोणत्याहि प्रकारचा प्रतिबंध नाहीं. आमच्या विद्वान् तज्ञांनीं आमच्या इंजे-क्शनांचीं उत्कृष्टता, आयुर्वेदिक शास्त्रीयता व विशुद्धता, प्रांतीय तसेंच केंद्रीय सरकारी औषधीतज्ञांचे समोर सिद्ध केली आहे. एतदर्थ ह्यावर ड्रग कंट्रोल ॲक्ट लागूं नाहीं.

सर्वत्र एजंटांची जरूरी आहे. आजच पत्र पाठवा!

निर्माते व संशोधकः-मार्तंड फार्मास्युटिकल्स् बड़ौत S. S. R. (उत्तर प्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोर्ड ऑफ आयुर्वेदिक अँड युनानी तिब्बी सिस्टिम्स् ऑफ मेडिसिन, मुंबई.

सन १९५२—५३ चा जमाखर्च

[जमा]	अंदाजपत्रकांतील जमेचा आंकडा	प्रत्यक्ष जमा
[ह]कीम रजिस्ट्रेशन फी	(१०००)	१७७०- ०-०
सर्टिफिकेट फी	(१००)	१७७- ०-०
इतर फी	(५००)	७२५- ३-०
...ऱ्या प्रतींची विक्री	(३००)	१००- ०-०
...करण फी (१९४९)		१०२०- ०-०
...रजिस्ट्रेशन- ...करण फी		९०४- ०-०
... मिळालेली रक्कम		१११३- ०-०
	(५००)	१२८०-११-०
...कडून जमा		६००- ०-०
...ट्रेशन ट्रिब्युनल फी		४५६-१२-०
	एकूण	८१४६-१०-०
३१।३।१९५२ अखेर शिल्लक		१४८५५१- ७-१
	एकुण	१५६६९८- १-१
	खर्च वजा	५१५०४- ७-३
३१।३।१९५३ अखेर शिल्लक		१०५१९३- ९-१०

खर्च	अंदाजपत्रकांतील खर्चाचा आंकडा	प्रत्यक्ष खर्च
कार्यालय पगार	(१३२००)	१२५४८-१०-०
बोर्ड कार्यकारी-मंडळ सभा शुल्क	(४२०)	३९०- ०-०
बोर्ड सर्वसाधारण सभाशुल्क	(४२०)	३९०- ०-०
प्रवास भत्ता	(५०००)	१५८७- ४-०
टपाल खर्च	(१२००)	६६६-१२-०
स्टेशनरी	(१०००)	४३७-१०-९
टेलिफोन	(४२०)	१४६- २-०
जागा भाडें व वीज	(१५००)	१२८२- ८-०
पुस्तकें व प्रसिद्धी	(१००)	१३- २-३
किरकोळ खर्च	(३००)	२७०-१५-९
प्रॉव्हिडंट फंड देणगी	(४५०)	७२०-१५-०
शिपयांचे कपडे	(१२०)	१११- ०-०
ग्रंथालय	(४००)	३३६- २-०
फर्निचर	(१३००)	१२५५-१५-०
कायदे विषयक स कामांची फी	(५७५)	५७५- ०-०
रजिस्ट्रेशन ट्रिब्युनल		३०७७२- ३-६
	एकूण खर्च	५१५०४- ७-३

शिलकेचा तपशीलः—

	रु.	आ.	पै
भारत सरकारच्या खजिन्यांतील ३॥ टक्के दराच्या ठेवी	३५०००	०	०
इंपिरिअल बँकेंतील स्थिर ठेवी	४००००	०	०
सेव्हिंग्ज बँक	५६२८	१२	०
इंपिरिअल बँक ऑफ इंडिया मधील चालू खातें	२४२९५	१२	१०
किरकोळ रोकड शिल्लक	१००	०	०
ऑफिसमधील रोकड शिल्लक	१६९	१	०
	१०५१९३	९	१०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोर्ड ऑफ आयुर्वेदिक अँड युनानी तिब्बी सिस्टिम्स् ऑफ मेडिसिन, मुंबई.

सन १९५४-५५ सालाचें अन्दाजपत्रक

आय	रु. आ. पै
रजिस्ट्रेशन फी	१०००—०—०
सर्टिफिकेट फी	१००—०—०
इतर फी (रजिस्ट्रेशन सर्टिफिकेटांच्या नकला, फेरनोंद रक्कम)	२५०—०—०
रजिस्टरच्या प्रतींची विक्री	१००—०—०
रिन्युअल फी	४००००—०—०
फॅकल्टीकडून भाडे वगैरे करितां मिळणारी रक्कम	६००—०—०
व्याज	१५००—०—०
एकूण	४३५५०—०—०

व्यय	रु. आ. पै
एस्टॅब्लिशमेंट (पगार)	११५००—०—०
सभासदांची फी का. स. सभा (४) रु. १५×७×४	
बोर्ड सभा (२) रु. १५×१४×२	८४०—०—०
प्रवासभत्ता	२०००—०—०
पोस्टेज	१०००—०—०
स्टेशनरी	८००—०—०
टेलिफोन	२००—०—०
जागा भाडें व वीज	१५००—०—०
पुस्तकें व प्रकाशन	१००—०—०
किरकोळ खर्च	३००—०—०
शिपायांचे कपडे	८०—०—०
प्रॉव्हिडंट फंडाची वर्गणी	५००—०—०
एकूण	१८८२०—०—०

कन्या आयुर्वेद महाविद्यालय, दिल्ली

टंडन बाबूंच्या हस्तें उद्घाटन

दिल्ली येथें रविवार ता. ३० ऑगस्ट रोजीं नागिया आर्य कन्या आयुर्वेद महाविद्यालयाचें उद्घाटन सब्जीमंडी भागांत राजर्षि टंडन यांच्या हस्तें झालें. दिल्ली राज्याच्या आरोग्य उपमंत्री कुमारी शांता वसिष्ठ यांनीं प्रास्ताविक भाषण करतांना स्त्रियांना चिकित्सा शिक्षण देण्याच्या या प्रयत्नाबद्दल प्रसन्नता प्रगट केली. ' या देशांत चिकित्सक कमी आहेत त्यामुळें चिकित्सा महाग पडत आहे. ही गरज पूर्ण करण्याच्या दृष्टीनें कन्या महाविद्यालयाचा हा प्रयत्न अत्यंत उपयुक्त आहे.'

पाश्चात्य जीवनाचा प्रभाव

'पाश्चात्य जीवनाचा आमच्या जीवनांतील प्रत्येक अंगावर प्रभाव पडला आहे. त्यांतील उपयोगी वस्तूंचें ग्रहण करण्यांत आपण संकोच करण्याचें कारण नाहीं. आपण आयुर्वेद-ॲलोपॅथी या वादांत पडूंच नये हें बरें. या कन्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या रूपानें चिकित्सा-पद्धति सामान्य जनतेपर्यंत पोहोचणार आहे व तिचा गृह-प्रवेश होत आहे, याबद्दल त्यांनीं धन्यवाद दिले.

हा समारंभ आर्यसमाज (बिरला लाइन) तर्फे करण्यांत आला होता. या आर्य समाजातर्फेच हें कन्या महाविद्यालय चालावयाचें आहे. याप्रसंगीं वैद्य श्री. नारायणदत्तजी, श्री. म्युनिसिपल कमिशनर व आर्य समाज संस्थेचे प्रमुख यांचीं भाषणें झालीं.

टेकचंद नागिया ट्रस्टचें साहाय्य

या संस्थेसाठीं टेकचंद नागिया ट्रस्ट तर्फे मासिक आर्थिक साहाय्य देण्यांत येणार आहे. व पुढें संस्थेच्या इमारतीसाठीं ५० हजार रुपयांची मदत देण्याचें ट्रस्टमंडळीनीं आश्वासन दिलें आहे.

—+—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…सक्तीचें वैद्यकीय शिक्षण

…मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या चालू अधि-…डॉ. एस. के. गालवणकर हे मुंबई राज्यां-…गरीब ग्रामीण जनतेस सत्वर औषधोपचार …मिळावा या हेतूनें, प्राथमिक ट्रेनिंग कॉलेजां-…शिक्षकांना व्यावहारिक वैद्यकीय शिक्षण …-डिस्पेंसरी) व रुग्णशुश्रुषा (नर्सिंग) या …चें शिक्षण अभ्यासक्रमांत सक्तीचें करावें असा …मांडणार आहेत.

संतति नियमन केंद्रें

…ाचप्रमाणें वाढती बेकारी व देशांतील अन्न-…ा तुटवडा ह्या गोष्टीस कांहीं प्रमाणांत आळा …म्हणून ग्रामीण भागांत ठिकठिकाणीं संतति-…केंद्र उघडून त्याबाबत जरूर तें मार्गदर्शन …करावें असाहि ठराव मांडण्याची सूचना …दिली आहे.

—×—

…औषधी कारखानदार मंडळ

…वरील मंडळाची सर्वसाधारण सभा तारीख …-१९५३ रोजीं श्रीधूतपापेश्वर प्रासाद, मुंबई ४ …होऊन खालील विषयांवर विचारविनिमय व …झाली.

१) आसवें, आरिष्टें, काढे ज्यांत तज्जन्य …होल निर्माण होतें अशा औषधांवर बॉम्बे सेल्स …ॲक्ट १९५२ प्रमाणें रुपयास १ आणा स्पेशल …व बॉम्बे सेल्स ऑफ इंटॉक्झिकंट्स् टॅक्सेशन …१९५३ प्रमाणें रुपयास ४ आणे कर.

२) डॉ. प्राणजीवन मेहता यांचेकडून जामनगर …'आयुर्वेद रिसर्च इंस्टिट्यूटला' सर्व कारखान-…ांनी व सभासदांनीं सक्रिय सहाय्य द्यावें, अशा …ी आलेलें पत्र.

३) खालील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीस अखे-…मंजुरी.

१) माजी उपाध्यक्ष श्री. जुगतराम एस्. वैद्य यांच्या जागीं श्री. गोविंद कृष्ण ऊर्फ आबासाहेब सांडू यांची उपाध्यक्ष म्हणून नियुक्ति.

२) माजी ऑ. सेक्रेटरी वैद्यराज श्री. काळे यांचे जागीं श्री. जी. एम्. पारीख यांची नियुक्ति

३) माजी ॲ. सेक्रेटरी श्री. वाकणकर यांचे जागीं श्री. वै. ना. ह. जोशी यांची नियुक्ति.

सभेंत मुंबई राज्याच्या मुख्य मंत्र्यांना भेटण्या-साठीं एक शिष्टमंडळ नियुक्त करण्यांत आलें आहे. एक आणा स्पेशल टॅक्स प्रकरणाचा विचार करण्या-बाबत एक लेखी अर्ज असोसिएशननें पूर्वीच मुख्य मंत्र्यांकडे रवाना केला आहे. तो वाचून त्यावर या सभेंत विचारविनिमय झाला. चार आणे टॅक्स-बद्दल पुन्हा स्वतंत्र अर्ज करण्यांत येणार आहे.

—✻—

गांठी झाडाचा चमत्कार

प्रकाशे (प. खानदेश) या गांवापासून ७-८ कोसावर सातपुडा डोंगर आहे. त्या पर्वताच्या कांहीं भागांत गांठीनासीचीं झाडें आहेत. त्या झाडाचीं पानें नागवेलीप्रमाणें असून, त्या पानांना करवतीप्रमाणें दाते आहेत. त्या पानांचा उपयोग आम्हीं मनुष्याच्या अंगावरील गांठ, गलंड, केसतोडा अगर कोणत्याहि जातीची गांठ, सूज, असल्यास, गांठी झाडाचें पान, तूप लावून थोडें गरम करून, सूज, किंवा गांठींवर बांधलें असतां दोन दिवसांत, गांठ, सूज बसून जाते, किंवा फुटून जाते, असा चमत्कार आहे. मनुष्याला दोन दिवसांत आराम वाटतो. तीन चार दिवस पान बांधल्यानें रोगी एकदम चांगला होतो.

गांठीनासीचें झाड

ह्या झाडाला इकडे गांठीनासीचें झाड म्हणतात. हें झाड २-३ फूट उंच असतें. याला फूल-फळ येत नाहीं. ह्या झाडाची फांदी कुंडींत लागली आहे. याचें पान देखील जमिनीवर पडल्यास आपोआप पानापासून झाड होतें. हें झाड आम्ही घरीं मोठ्या कुंडींत लावलें आहे. त्याचा उपयोग आम्ही करीत आहोंत. वैद्य वाय्. ही. पाठक, प्रकाशे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देशी औषधोपचारांची केंद्रीय संशोधन संस्था, (जामनगर)

देशी औषधोपचार केंद्रीय संस्था, जामनगर ह्या संस्थेनें आपल्या कामास सुरुवात केली आहे. निवडक रुग्णास औषधोपचाराकरितां प्रवेश देण्यास सुरुवात केली असून, त्यांचें शास्त्रीय दृष्टीनें निदान, चिकित्सा व परीक्षण केलें जात आहे. त्यापासून मिळणारे परीणाम उभय (आयुर्वेदीय व आधुनिक) पद्धतीनें विद्यार्थ्यांना योग्य रीतीनें समजतील अशा परिभाषेंत सांगण्यांत येणार आहेत.

पाण्डुरोग व तदनुषंगिक स्थित्यंतरें

सध्यां संशोधन कार्याकरितां रक्तक्षय व तदनुषंगिक स्थित्यंतरें व परिणाम हा विषय घेतला आहे.

ह्या संबंधांत मी सर्वांचें (तज्ञ व्यक्तींचें तसेंच देशांतील आयुर्वेदीय वैद्यक व्यवसायी व पदवीधर ह्यांचेंहि) संपूर्ण व हार्दिक सहकार्य मिळण्याबद्दल लक्ष या कार्याकडे वेधूं इच्छितो. कारण आपणा सर्वांच्या सहकार्याशिवाय आपल्या ह्या केंद्रीय संशोधन संस्थेचें काम पूर्ण स्वरूपांत होऊं शकणार नाहीं. वैद्यक व्यवसायी व्यक्ति आणि संस्था ह्यांचेकडून औषधें, रोग व शास्त्रीय पद्धतीनें बनविण्यांत येणाऱ्या औषधांसंबंधीं पाठ वगैरे ज्या गोष्टी ते स्वतः हाताळीत असतील त्या संबंधींची माहिती अगर सूचना त्यांनीं आमचेकडे पाठविल्यास त्यांचा साभार स्वीकार करण्यांत येईल.

अनुभविक माहिती पुरवा

तुम्ही स्वतः अगर तुमच्या संस्थेंतील किंवा कारखान्यांतील कोणीहि व्यक्तींनीं नवीन औषधें, जुन्या औषधांचे फेरफार केलेले नवीन पाठ अगर विशिष्ट पद्धति ज्या वर उल्लेख केलेल्या रोगाचे निरनिराळ्या अवस्थांत अनुभवानें यशस्वी रीत्या परिणामकारक झाल्या असतील, अशा संबंधीं माहिती पुरविल्यास मी त्यांचा अत्यंत आभारी होईन.

वरील बाबतींसंबंधीं सविस्तर व पद्धतशीर माहिती आमच्या संशोधन संस्थेस कळविल्यास त्याचेपासून जरूर तो इष्ट फायदा, आमच्या संस्थेच्या बाहेर चाललेल्या कार्यापासूनहि आम्हांस घेतां येईल, व उभयपक्षीं उपकारक संबंध जडून विचारांची देवाणघेवाणहि घडून येईल.

डॉ. पी. एम्. मेहता, डायरेक्टर

— ——

बोर्डानें खुलासा करावा

बोर्ड ऑफ आयुर्वेदिक अँड युनानी तिब्बी सिस्टिम्स् ऑफ मेडिसिन्सच्या रजिस्ट्रेशन ट्रिब्युनलची कचेरी ता. १।८।१९५३ पासून बंद करण्यांत आली आहे व सदर तारखेनंतर पत्रव्यवहारहि करण्यांत येणार नाहीं असें जाहीर करण्यांत आलें आहे. परंतु ज्यांनीं ज्यांनीं रजिस्ट्रेशनकरितां अगर एन्लिस्टमेंटकरितां अर्ज केले असतील व त्यांस जोडून कांहीं महत्वाचे व अस्सल कागदपत्र पाठविले असतील ते अर्जदारांना परत मिळण्याविषयीं रजिस्ट्रेशन ट्रिब्युनलनें काय व्यवस्था केली आहे तें जाहीर करण्यांत आलें नाहीं; तरी सदरहू संबंधीं अधिकृत खुलासा बोर्डामार्फत होणें जरूर आहे.

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाची द्विवार्षिक वर्गणी २ रु. भरून सभासद व्हा.

इंजेक्शन चिकित्सा

पाश्चात्य इंजेक्शन चिकित्सेवरील अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिलेला अभिनव मराठी ग्रंथ. २६ प्रकरणें, ३०० वर रोगांची अद्यावत् चिकित्सा. २७० पृष्ठें, जाड बांधणी. 'सचित्र इंजेक्शन विज्ञान' प्रमाणेंच हाहि ग्रंथ लौकरच दुर्मिळ होण्याची शक्यता आहे. त्वरित मागणी करा. किंमत ६ रु., ट. ख. निराळा.

१ सुबोध वैद्यक ग्रंथमाला
पो. कागल जि. कोल्हापूर
२ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक सिटी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...स्ट्रेशन ट्रिब्यूनलचें कार्य

...२७ जुलै १९५३ रोजीं ट्रिब्यूनलची शेवटची ...ली होती. १ ऑगस्टपासून ट्रिब्यूनलची ...द झाल्याचें जाहीर झालें असून इतःपर, ...कायदा कलम ३१ (सी) अन्वयें रजि-...अगर एन्लिस्टमेंट बाबत कोणताच पत्रव्यवहार ...णार नाहीं.

१७४ लोकांना रजिस्ट्रेशन

...आतांपर्यंत रजिस्ट्रेशन ट्रिब्यूनलकडे आलेले ...द देशी वैद्यक बोर्डाकडे पाठवून देण्यांत ...आहेत. ट्रिब्यूनलची स्थापना ऑगस्ट १९५० ...ली. त्याच्या रीतसर बैठकी भरण्यास १९५१ ...प्रारंभ झाला. प्रथम कार्य बोर्डाच्या कचेरींतच ...ले, पण कामाचा पसारा बराच वाढल्यामुळें ...जुलै पासून मुंबई सरकारनें ट्रिब्यूनलला स्वतंत्र ...दिली होती.

१८८७ लोकांना एन्लिस्टमेंट

...असें कळतें कीं, रजिस्ट्रेशन ट्रिब्यूनलकडे एकूण ...हार दोनशें एकेचाळीस अर्ज आले होते, त्यांपैकीं ...लोकांना रजिस्ट्रेशन व १८८७ लोकांना ...मेंट मिळालें. ७८०५ अर्ज रद्द करण्यांत आले.

बेपत्ता झालेले अर्ज

...रद्द झालेल्या अर्जांत ८०० अर्ज अशा लोकांचें ...ीं, ज्यांच्याकडून पुनःपुनः अधिक माहिती ...ी असतांहि ती आली नव्हती. १८७ अर्जदाराचे ...पालखात्यानें बेपत्ता केले होते. त्यामुळें ते मिळू ...नाहींत. ज्यांना पूर्वीच रजिस्ट्रेशन वा एन्लिस्ट-...झालेलें होतें, अशांनींहि पुनः अर्ज केले होते ...११२ अर्जदार होते.

४३ अर्जदार दिवंगत

...४३ अर्जदार ट्रिब्यूनलचा निकाल लागण्या-...दिवंगत झाले होते.

—*—

अनुक्रमणिका

डॉ. योध यांच्यावरील अविश्वासाचा ठराव	१९१
शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रम	१९२
काढे टिकाऊ कसे होतील?	१९३
काढे टिकाऊ असे करावेत	१९६
वाग्भट चिकित्सेवरील उद्बोधक व्याख्यानें	१९७
म. प्रां. वैद्यमंडळाचें प्रचारकार्य	२०३
वस्तुसंग्रहालयें	२०४
धनुर्वातभंजनरस	२०५
पुष्पधन्वा	२०६
प्रतापलंकेश्वर	२०७
वृंदमाधव संदिग्ध द्रव्यांचें स्पष्टीकरण	२११
वृंदमाधवांतील शंकांचें समाधान	२१३
आंबट लिंबूफळाचें टरफल व बी	२१५
देशी वैद्यक बोर्डाचा जमाखर्च	२१७
देशी वैद्यक बोर्डाचें अंदाजपत्रक	२१८
कन्या आयुर्वेद महाविद्यालय	२१८
सक्तीचें वैद्यकीय शिक्षण	२१९
देशी औषधी कारखानदार मंडळ	२१९
गांठीनाशी झाडाचा चमत्कार	२१९
देशी औषधाची केंद्रीय संशोधन संस्था जामनगर	२२०
बोर्डानें खुलासा करावा	२२०
रजिस्ट्रेशन ट्रिब्यूनलचें कार्य	२२१

———

पिवळा अभ्रक

अजमेरकडे पिवळा अभ्रक मिळतो असें म्हण-तात. तरी ज्यांना त्याची माहिती असेल अगर तो मिळविणें शक्य असेल त्यांनीं आपला पत्ता भिषग्रत्न पाटणकर पोस्ट किन्हई (जि. सातारा) यांना कळवावा. अशी त्यांची विनंति आहे.

—*—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय चिकित्सकांसाठीं रिफ्रेशर कोर्स

फॅकल्टी ऑफ आयुर्वेदिक अँड युनानी तिब्बी सिस्टिम्स् ऑफ मेडिसिन, मुंबई, यांचे सहकार्य आणि आश्रय याखालीं तारीख ५ ते ३१ ऑक्टोबर १९५३ पर्यंत चार आठवड्याचा रिफ्रेशर कोर्स, खालीं दर्शविलेल्या संस्थांतून व त्यापुढें लिहिलेल्या भाषेंतून चालविण्यांत येईल.

१) आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर [मराठी]
२) आयुर्वेद विद्यालय, जामनगर (सौराष्ट्र) [गुजराथी]
३) जे. एस्. एम्. जी. आयुर्वेदिक कॉलेज, नडियाद [गुजराथी]
४) आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा [मराठी]

ह्या कोर्सचें शिक्षण, सरकारी नोकरींतील वैद्य, म्युनिसिपॅलिट्या व लोकलबोर्ड संस्थांतील वैद्य व बॉम्बे मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट १९३८ अन्वयें रजिस्टर्ड झालेले अगर एन्लिस्ट झालेले वैद्य, तसेंच ज्यांस सरकारी आर्थिक मदत मिळत आहे असे वैद्यक-व्यवसायी (एस्. एम्. पी.) वैद्य, ह्यांनाच फक्त मिळूं शकेल.

एकूण ८० व्याख्यानें असलेल्या या संपूर्ण अभ्यासक्रमाची (कोर्सची) फी ३० रुपये आहे.

सदर रिफ्रेशर कोर्ससंबंधीं अधिक माहिती पाहिजे असल्यास अगर प्रवेश मिळण्यासाठीं अर्ज करणें असल्यास तो परस्पर वरील त्या त्या शिक्षण देणाऱ्या संस्थेकडे .

येत्या हिंवाळ्यांत शक्तीसाठीं सेवन करा

— पूर्णप्रमाण सुवर्ण मालिनी वसंत —

आयुर्वेदपत्रिका १६ एप्रिल १९५३ पा. नं. ६३८-३९ वर वृद्धवैद्यांनीं सुचविल्याप्रमाणें (सुवर्णभस्म न वापरतां) सुवर्ण पूर्णप्रमाणांत घातलेला सुवर्ण मालिनी वसंत सेवासंघानें तयार केला असून तो विक्रीस ठेवला आहे. १ तोळा सुवर्ण, २ तोळे मोतीचुरा, ३ तोळे हिंगूळ, ४ तोळे पांढरी मिरीं, ८ तोळे कलवापरी या प्रमाणांत हीं ५ द्रव्यें वापरलीं आहेत.

देण्याचें प्रमाण:- १ ते २ गुंजा — अनुपान:- मध-पिंपळी

वेळ:- सकाळ सायंकाळ — पथ्य:- दूध भात

किंमत पावतोळा ८ रु. ट. ख. निराळा

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

संपादक व प्रकाशक:— वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक
मुद्रक:— श्री. गं. ओक, ... प्रेस, नाशिक
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ७ वें) नाशिक, ता. १ ऑक्टोबर १९५३ (अंक ७ वा

शुद्ध आयुर्वेदाच्या गुरुपरंपरा शिक्षणपद्धतीचा
मुंबई सरकारकडून निःसंदिग्ध पुरस्कार

मुंबई सरकारनें ३॥ वर्षांचा एक "शुद्ध आयुर्वेदिक" कोर्स सुरू करण्याचें ठरविले असून तो सरकारमान्य शिक्षणसंस्थांतून अथवा सरकारमान्य गुरुजींकडून शिकविण्यांत येईल.

वैद्य वामनराव अध्यक्ष

या कोर्सची परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या इसमांना (ते २१ वर्षांहून अधिक वयाचे झाल्यावर) १९३८च्या मुंबई वैद्यक व्यवसायीसंबंधींच्या कायद्याच्या ३२व्या कलमाबाबत सूट देण्यांत येईल. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास त्यांना वैद्यक व्यवसाय आणि मिडवाइफ्रीचा (बाळंतपण) व्यवसाय करतां येईल.

सरकारतर्फे दोन परीक्षा घेण्यांत येणार

सदरहू कोर्सच्या एकूण २ परीक्षा असतील. पहिली १॥ वर्षाच्या अखेरीस व दुसरी ३॥ वर्षांच्या अखेरीस घेतली जाईल. या दोन्ही परीक्षा दर ६ महिन्यांनीं होत राहातील.

वै. मो. ह. जोशी मंत्री

प्रवेश मिळविण्याच्या बाबतींत उमेदवारास ज्या सालीं प्रवेश मिळवावयाचा असेल त्या सालच्या ३१ मार्च पूर्वी त्या १६ वर्षे पूर्ण झालीं असलीं पाहिजत. तसेंच त्यास एस्. एस्. सी. परीक्षेंत संस्कृत विषयांत ५० टक्के गुण मिळाले असले पाहिजेत; अथवा बनारस येथील सरकारी संस्कृत कॉलेजची 'प्रथमा' परीक्षा अथवा सरकारमान्य अशी सम परीक्षा तो पास झाला असला पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सदरहू कोर्सच्या परीक्षेची व्यवस्था करण्यासाठीं वै. वामनराव दीनानाथ वैद्य यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिति नेमण्यांत आली असून परीक्षक नेमणें, प्रश्नपत्रिका काढणें, परीक्षेचा कार्यक्रम ठरविणें, व परीक्षेचा निकाल जाहीर करणें इत्यादि सर्व कामें सदरहू समितीनें करावयाचीं आहेत. समितीचे इतर वै. सभासद पुढीलप्रमाणें आहेत–वै. भू. गणेशशास्त्री जोशी, पुणें; वै. लक्ष्मीशंकर रामकृष्णशास्त्री, अहमदाबाद; दत्तात्रयशास्त्री जळूकर, नशिराबाद; वै. दामोदर अनंत चोकाडे-हळशीकर, हुबळी; वै. त्रिंबकलाल देवशंकर जोशी भडोच आणि वै. नारायण हरी जोशी, मुंबई (सेक्रेटरी).

शिक्षणसंस्थांना मान्यता

पूर्वी डी. ए. एस्. एफ्. कोर्सच्या शिक्षणासाठीं ज्या पद्धतीनें शिक्षणसंस्थांना मान्यता देण्यांत येत असे त्याच पद्धतीनें सदरहू कोर्सचेहि शिक्षण देणाऱ्या संस्थांना मान्यता देण्यांत येईल, व या संस्थांना किमान साधनसामुग्री, जागा, शिक्षकांची शैक्षणिक लायकी, फीचें प्रमाण वगैरे बाबतींतील नियम पाळावे लागतील. वर उल्लेखिलेल्या समितीच्या शिफारशीवरूनच अशा शिक्षणसंस्थांना मान्यता देण्यांत येईल.

गुरुजींना सरकारमान्यता देण्याची व्यवस्था

सदरहू कोर्स शिकविण्यासाठीं ज्या गुरुजींना मान्यता देण्यात येईल, त्यांच्याकडे पुरेशी जागा असली पाहिजे व योग्य असें आऊट पेशंट खातें (दवाखाना) असलें पाहिजे. त्यासाठीं त्यांना रोज नोंद ठेवावी लागेल. तसेंच वर्ग भरविण्यासाठीं आवश्यक त्या जागेचीहि व्यवस्था त्यांना करावी लागेल. एका गुरुजींना एकावेळीं जास्तींत जास्त पांच विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची मुभा देण्यांत येईल.

– पटवर्धन विशेषांक –

पुणें दैनिक भारताचा अभिप्राय

"हा अंक वाचत असतांना एक विचार मात्र मनाला निश्चित त्रास देतो, तो हा कीं, एका सामान्य आर्थिक स्थितींतील वैद्याला, सरकारी किंवा इतर कोणत्याहि साहाय्यावांचून १००० च्या वर औषधि वनस्पतींची बाग तयार करतां येते. पण—

जेथें परदेशांतील विद्यार्थी शिकावयाला येतात असा आम्ही अभिमान बाळगतो, त्या या 'दक्षिणेंतील काशी' असलेल्या पुण्याला मात्र महाराष्ट्रांतील आयुर्वेदीय शिक्षणसंस्थांत चांगली आर्थिक स्थिति असलेलें पुण्याचें आयुर्वेद महाविद्यालय किंवा ध्येयवादी पुणें विद्यापीठ असूनहि या महत्वाच्या विषयाकडे दुर्लक्ष होतें."

अभागी आयुर्वेद !

अमली पदार्थांवरील विक्रीकर
कायद्यांत दुरुस्ती करण्यांत येणार

१९५३ च्या बॉम्बे सेल्स ऑफ मिस्टॉक्सिकन्टस् टॅक्सेशन ॲक्टांत दुरुस्ती करण्यांत येणार असून त्याबाबतचें बिल मुंबई सरकारच्या ता. १६ सप्टेंबरच्या गॅझेटांत प्रसिद्ध झालें आहे.

कोणती स्पिरिटयुक्त औषधें सदरहू कायद्यांच्या कक्षेंतून वगळवींत हें ठरविण्यास कांहीं वेळ लागण्याची शक्यता असल्यामुळें सरकार जाहीर करील अशा अमली पदार्थांना हा कायदा लागूं करतां येण्याचे अधिकार सरकारला देण्याची या बिलांत तरतूद केली आहे.

हा कायदा निरनिराळ्या अमली पदार्थांना निरनिराळ्या तारखांपासून लागूं करतां येण्याची तरतूद सध्यांच्या कायद्यांत नाहीं.

इतरहि कांहीं दुरुस्त्या करण्यांत यावयाच्या आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— मंत्रिद्वयांचें जाहीर अभिनंदन —

रविवार ता. २७।९।५३ रोजीं दुपारीं ४ वाजतां ...न मराठी विद्यालयाच्या सभागृहांत महाराष्ट्र ...यि वैद्यमंडळ, महागुजरात प्रांतीय वैद्यमंडळ, ... वैद्यक मंडळ व मुंबई वैद्य सभा या संस्थांतर्फे ...र सभा भरून मुख्यमंत्री ना. मुरारजीभाई देसाई

मुख्यमंत्री ना. मुरारजी देसाई

...आरोग्यमंत्री श्री. शहा यांचें शुद्ध आयुर्वेदास मान्यता ...ल्याबद्दल अभिनंदन करण्यांत आलें. अध्यक्षस्थानीं ...चे विश्वस्त श्री.. ज. स. करंदीकर हे होते.

सत्कार सभेसाठीं दूरदूरचे लोक

या अभिनंदन-सभेसाठीं दूरदूरचे लोक तांतडीनें ...स्थित राहिले होते. हुबळीचे वै. दा. अ. हळसीकर, ...चे वै. वामनराव दीनानाथ, वै. ना. ह. जोशी ...वै. लक्ष्मीबाई बोरवणकर, चेंबूरचे सांडूबंधु व वै. ..., पनवेलचे वै. अप्पासाहेब पुराणिक, येवल्याचे ...शं. चं. जोशी व यू. व्ही. कुलकर्णी, नासिकहून ...बिंदुमाधव पंडित व वै. विष्णुशास्त्री दाते, भुसा-...हून वै. ब्रह्मदत्त शर्मा इत्यादि परस्थ मंडळी ...य स्थानिक वैद्यराज त्र्यंबकशास्त्री आपटे, वै. पां. ह. देशपांडे, वै. मुळ्ये, वै. शं. ग. वर्तक, वै. काशीकर, वै. खरे, वै. मळेकर, वै. ह. बा. परांजपे, प्रोफेसर श्री. पी. एल्. वैद्य, आमदार रामभाऊ मंडलिक, वै. ह. भा. भिडे, वै. पं. कवडेशास्त्री, वै. भू. गणेशशास्त्री जोशी, वै. मा. ग. जोशी, वै. दत्तात्रेयशास्त्री शेंड्ये, याशिवाय पुणें आयुर्वेद महाविद्यालयांतील विद्यार्थी, आमदार पोपटलाल शहा इत्यादि मंडळी श्रोतृवर्गांत दिसत होती.

संदेशवाचन

प्रारंभीं संगीत शाळेंतील मुलींनीं ईशस्तवनाचें व मंत्रीद्वयांच्या सत्काराचें एक अशीं दोन पद्यें म्हटलीं. त्यानंतर म. प्रां. वैद्य मंडळाचे मंत्री आयुर्वेदाचार्य ब्रह्मदत्त शर्मा यांनीं स्वकृत असें

आरोग्यमंत्री ना. शांतिलाल शहा

संस्कृत काव्य वाचून दाखविलें. त्यानंतर वैद्य वामनराव दीनानाथ यांनीं निखिल भारतवर्षीय आयुर्वेद महामंडळाचे अध्यक्ष वैद्यरत्न पं. शिवशर्मा यांचें संदेश पत्र वाचून दाखविलें; व आचार्य यादवजी यांचा मौखिक संदेश सांगितला. त्यानंतर पुणें वैद्यक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मंडळाचे मंत्री वै. अनंत यज्ञेश्वर जोशी यांनीं आलेले संदेश वाचून दाखविले. त्यांत माजी राज्यपाल नामदार मा. श्री. अणे, नाशिकशहर वैद्य मंडळ, आयुर्वेद सेवा संघ नाशिक, पुणें आयुर्वेद शिक्षण मंडळ, आयुर्वेद, आयुर्मीमांसा, श्री. वाटवेशास्त्री बेळगांव, आर्योग्ल वैद्यक महाविद्यालयातर्फे वै. फडकेशास्त्री, ना. भाऊसाहेब हिरे, जळूकरशास्त्री, श्री. वै. अण्णासाहेब सांडू इत्यादि व्यक्ति व संस्था यांचे संदेश प्रमुख होते.

पुणें वैद्यक मंडळाची कामगीरी

संदेशवाचनानंतर वैद्यपंचानन कवडेशास्त्री यांनीं पुणें वैद्यक मंडळानें गेलीं ४० वर्षें पुणें येथें वेळोवेळीं केलेली आयुर्वेद क्षेत्रांतील कामगिरी निवेदन केली. शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रम मान्य झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला व मंत्रीद्वयांना दीर्घायुष्य चिंतिलें.

भावी वैद्यांचे प्रातःस्मरणीय मंत्री

त्यानंतर वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी यांचे भाषण झालें. त्यांनीं १९५३ पासून पहिल्या व दुसऱ्या मंत्रीमंडळाशीं झालेल्या वाटाघाटींचा इतिहास निवेदन केला व मंत्रीमंडळानें काढलेल्या नव्या हुकुमान्वयें नामदार मुरारजी व शांतिलालजी हे सध्यांच्या व पुढें होणाऱ्या आयुर्वेदीय वैद्यांना प्रातःस्मरणीय झाले आहेत. असें सांगितलें. पेशव्याच्या काळीं इंग्रजी डॉक्टरचें औषध घ्यावयास नाना फडणीसाची परवानगी घ्यावी लागे. याच्या उलट स्वराज्यांत शुद्ध आयुर्वेदाचें औषध घेण्याला सरकारची परवानगी हवी अशी स्थिति झाली आहे. प्राचीन वाग्भट जर आज जिवंत झाला व त्यानें सदाशिवपेठेंत दवाखाना उघडून औषध देण्याचा नुसता विचार मनांत आणला (इन्क्लिनेशन) तर त्याला १०००रु. दंड व २ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा होईल असा कायदा कालपर्यंत या मुंबई प्रांतांत होता. शिवाजीनें महाराष्ट्रांत स्वराज्यप्राप्ति करून दिली तशी या मंत्रिद्वयांनीं मुंबई राज्यांत आयुर्वेदीय स्वराज्य स्थापना केली आहे.

सर्वत्र उत्साहाचें वातावरण

इतक्या दीर्घ कालपर्यंत वैद्य मंडळींनीं जे क्लेश व उपहास सहन केली, त्याचें फळ या पत्रकामुळें वैद्यांना लाभलें आहे. कारवारमधून भुसावळपर्यंत सर्वत्र आनंदीआनंद प्रगट झाला आहे. कित्येक विद्वान् लोकांचीं आपण विद्यार्थी म्हणून भरती होऊं इच्छितो अशीं पत्रें आलीं आहेत.

२०० उत्तम वैद्य

पुढील कांहीं वर्षांत आपण २०० उत्तम शुद्ध आयुर्वेदीय वैद्य निर्माण केले तर आजची परिस्थिति पालटल्याशिवाय रहाणार नाहीं.

मी स्वतः ५ विद्यार्थी घरीं ठेवून त्यांचा सर्व भोजनादि खर्च स्वतः त्यांना करून शिकविण्याचें ठरविलें आहे व त्यासाठीं १०,००० रुपये अलग काढून ठेवले आहेत.

गुरुपरंपरा शिक्षणाचें वैशिष्टय

सेवानिवृत्त प्राध्यापक पी. एल्. वैद्य म्हणाले " ४५ वर्षांपूर्वी मी आयुर्वेद शिकलो व गुरुपरंपरेनें शिक्षण घेणें म्हणजे काय याची मला चांगली कल्पना आहे, त्याप्रकारच्या शिक्षणामुळेंच माझी भावी काळांत उत्तम प्रगति होऊ शकली. "

कर्नाटकचा ठराव

हुबळीचे हळशीकर यांनीं कर्नाटक प्रांतीय वैद्यमंडळानें तातडीनें केलेला अभिनंदनपर ठराव आपल्या भाषणांत निवेदन केला.

अध्यक्ष ज. स. करंदीकर यांनीं वक्त्यांच्या भाषणाचा अल्प समारोप करतांना आपणास कां अध्यक्ष निवडलें याची मीमांसा सांगून केसरीनें १९३७ पासून आजवर लिहिलेले वैद्यक कायद्यासंबंधींचे तीन पुढील महत्वाचे अग्रलेख उल्लेखिले.

केसरीचे तीन लेख

पहिला लेख ' सावत्र आईच्या प्रेमाचा मासला ' (३-१२-३७) दुसरा लेख ' डॉ. गिल्डर यांची झारशाहीवर ताण ' (१९-८-३८) व तिसरा लेख ' आजवरचा उपकारी वैद्य उद्यांपासून गुन्हेगार ठरणार ! '

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(१-२८). यापैकीं तिसऱ्या लेखांतील विषय ...नव्या कायद्यानें दुरुस्त केला आहे."

...अध्यक्षांच्या भाषणानंतर त्यांच्या हस्तें आरोग्यमंत्री ...मंत्री यांना हारतुरे समर्पण करण्यांत आल्यावर ...शांतिलालजी शहा भाषणासाठीं उभे राहिले.

अभिनंदनाचे मुख्य धनी

"आपण केलेल्या सत्कार समारंभाबद्दल मी ...आभारी आहे. हा प्रस्ताव करतांना प्रमुखमंत्री ...जीभाई देसाई यांची मला मदत न मिळती तर ...त्या प्रकारचा हुकुम निघाला आहे तसा तो ...शकला असतां किंवा नाहीं याबद्दल मला ...शंका वाटते. सबब या अभिनंदनाचे खरे ...ते आहेत.

कायदा आवश्यक आहे

...राज्यांत कोणी वैद्यकीय व्यवसाय करावा या- ...कायदे असणें अवश्य आहे. जनतेच्या आरो- ...जबाबदारी राज्य सरकारवर असते. चिकित्सक ...असला पाहिजे. जे आयुर्वेद अभ्यासी नसतील ...सजा झाली पाहिजे असें माझें मत आहे. ...ची कमीतकमी मर्यादा (हद्द) ठरवलीच पाहिजे.

विद्या दासी नसावी

...या कायद्यानें वैद्यांची जबाबदारी वाढली आहे. ...दिली आहे त्यापेक्षां जादा दर्जाची मान्यता ...मिळविली पाहिजे. कोणतीहि विद्या राज्य- ...दासी असतां कामा नये. मनुष्यानें जो ...व्यासंग करावयाचा असतो तो समाजाच्या ...गी पडावे या दृष्टीनें; पैसा मिळणें, मिळविणें ...गौण गोष्ट आहे.

आयुर्वेद विकासाची संधि

आज आपणास आयुर्वेदाचा विकास करण्याची ...मिळाली आहे. शेकडों वर्षांत नवे ग्रंथ आयु- ...झाले नाहींत. औषधांच्या पाठाबाबत मतभेद ... एकाच नांवाच्या औषधाचे घटक भिन्नभिन्न ...असतात. लॅन्सेट सारखीं प्रतिभावान् मासिकें नाहींत.

विकासासाठीं भावी योजना

आयुर्वेदाच्या शास्त्रीय प्रगतीसाठीं सध्यां आम्ही एक लहानसें पाऊल उचललें आहे. यापुढें मोठमोठ्या सरकारी रुग्णालयांतून आम्हाला आयुर्वेदाचे वार्ड काढावयाचे आहेत. स्टँडर्ड फार्माकोपिया (औषधी पाठचिंतामणी) प्रसिद्ध करावयाचा आहे. आजूबाजूस मिळणाऱ्या वनस्पतींचे निश्चित गुणधर्म छापून ते प्रसिद्ध करावयाचे आहेत.

फक्त अडथळे दूर होतात

आपण ही गोष्ट लक्षांत ठेवा कीं राज्याच्या मदतीनें विद्येची वृद्धि होऊं शकत नाहीं. फक्त अडथळे दूर होऊं शकतात. विद्येची वृद्धि ही विद्वान् लोकांच्या तत्परतेवर अधिष्ठित आहे. सबब आयुर्वेदाची प्रगति करणें हें काम तज्ज्ञांचें आहे, सरकारचें नाहीं. सरकारला तें शक्य नाहीं."

जबाबदारी संपूर्ण मंत्रिमंडळाकडे

यानंतर दुसरीकडे त्यांचा कार्यक्रम ठरला असल्यामुळें आरोग्यमंत्री शहा हे, पोपटलाल शहा यांच्याबरोबर गेले व पुढें सभेचें काम चालू राहिलें. पंतप्रधान मुरारजीभाई म्हणाले:- राज्यांत जे कांहीं भलेवाईट काम होतें त्याची जबाबदारी संपूर्ण मंत्रिमंडळाकडे जाते; एक दोघा व्यक्तीकडे नसते. सबब आजच्या कायद्याचें श्रेय संपूर्ण मंत्रिमंडळाला देणें उचित होईल. आपण ज्या १९३८ च्या कायद्याला दोष देत आहात त्या कायद्याच्यावेळीं मी मंत्रिमंडळांत होतो. मी त्याला त्यावेळीं संमति दिली आहे. सबब मी डॉ. गिल्डर व बाळासाहेब खेर यांच्या इतकाच दोषी आहे. ही गोष्ट खरी कीं ती रुजवात डॉ. गिल्डर यांची होती व त्याला मंत्रीमंडळानें साथ दिली; सबब जबाबदारी सर्व मंत्रीमंडळाची असते ही गोष्ट आपण विसरूं नये.

पहिलें पाऊल फार जबाबदारीनें उचलावें लागते. आतां हें दुसरें पाऊल उचललें आहे. पुढील पिढी याला सुद्धां नांवें ठेवील, त्यावेळीं तिसरें पाऊल उचलावें लागेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही गोष्ट खरी आहे कीं, प्रगतीच्या मार्गांत एखादा अडथळा निर्माण झाला असला तर तेवढा तो उचलला पाहिजे. डॉ. गिल्डर यांना जसे योग्य वाटले तसा कायदा त्यांनीं बनविला ही गोष्ट खरी आहे.

वैद्यकीय व्यवसायाचें हीनस्वरूप

आमच्या गुजराथींत एक म्हण आहे ती मराठींतहि असेल असें मला वाटतें. उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी, व यापैकीं कांहींच जमत नसेल तर वैद्यकी. अशा प्रकारची वैद्यकी समाजाला उपयुक्त होऊ शकणार नाहीं. सबब दुसऱ्याचे दोष काढण्यापेक्षां वैद्यांत दोष कसे शिरले आहेत ते दूर करण्याचा प्रयत्न करा. जे स्वतःचे दोष पहातात ते संत होत.

१९३८ सालीं आम्ही स्वतंत्र झालो नव्हतो. आतां आम्हीं स्वतंत्र आहोत. आपली संस्कृति पुनः व्यवहारांत आणण्याचा प्रयत्न आपण करूं शकतो. कांहीं गोष्टी शाश्वत आहेत. त्या आपण विसरून चालणार नाहीं. उदाहरणार्थ जन्म व मरण हे कोणीहि बंद करूं शकत नाहीं.

लग्न केलें व सुखी झाला

मला एक गोष्ट माहीत आहे. एक मनुष्य जिवाला कटाळून आत्महत्या करावयास निघाला तो विहिरींत पडला, पण बुडला नाहीं. त्यानें विष (मोरचूद) खाल्लें पण तें उलटून पडलें व तो वाचला. मग त्याचें लग्न करून दिलें व तो सुखी झाला व आज सुखानें जिवंत आहे.

पूर्वीपेक्षां आपले रिवाज, खाणें पिणें बदलले आहे. त्याप्रमाणें कालास अनुसरून आपण जरूर तो बदल केला पाहिजे. आपलें जीवन सत्याधिष्ठित पाहिजे तरच आपण जगू शकूं.

नांवें ठेवून प्रगति होत नाहीं

आपण आयुर्वेद व ॲलोपॅथी अशी तुलना करूं नका व दुसऱ्या वैद्यकांना नांवें ठेवीत बसूं नका आयुर्वेदाची प्रगति करण्याचा प्रयत्न करा. दुसऱ्याला नांवें ठेवण्यानें आपली प्रगति होत नाहीं. आपण इंग्रजी भाषा काढण्याचा प्रयत्न चालविला तशी ॲलोपॅथी घालवा हें म्हणणें बरोबर नाहीं. आपलें जे सत्य आहे तें संभाळून इतरांच्या गोष्टींचा (इंग्रजीचा) लाभ आपण घेऊ शकतो.

असा माझा विश्वास आहे

आयुवदांत पूर्वी जी समाजरक्षणाची ताकद होती ती परत आणली पाहिजे. माझा असा विश्वास आहे कीं भारतांत वैद्यकशास्त्र म्हणून आयुर्वेदच उपयुक्त ठरेल. पण याचा अर्थ असा नव्हे कीं आपण इतर शास्त्रें गटारांत फेकून द्यावींत.

नापसंत असलेल्या कांहीं गोष्टी

सध्यांच्या वैद्यांच्या कांहीं कांहीं गोष्टी मला बिलकूल नापसंत आहेत. यंत्रानें आयुर्वेदीय औषधें बनविता उपयोगी नाहींत. यंत्रानें बनविलेल्या औषधांत आयुर्वेदीय औषधी गुण उतरत नाहींत असें माझें मत आहे व पुष्कळांचा असा अनुभव आहे कीं, हल्लीं मिळणारीं आयुर्वेदीय औषधें पूर्वी वैद्यांच्या घरीं बनणाऱ्या औषधाप्रमाणें गुण देत नाहींत.

सरकारतर्फे औषधें करणार

यंत्राशीं माझा झगडा आहे असें नाहीं. जें अभ्रक-भस्म (सहस्रपुटी) होण्याला ७/८ वर्षें लागत तें आतां एका महिन्यांत करून विकलें जात आहे. जी गोष्ट कालानेंच बनत असते त्याबाबत घाई करून चालणार नाहीं. म्हणून जीं महत्वाचीं औषधें आहेत तीं सरकारतर्फे तयार करण्याचा माझा विचार आहे. पण औषधें कशीं करावींत हें मी जाणत नाहीं. सबब शुद्ध बुद्धीनें उत्कृष्ट औषधें निर्माण करणारी व्यक्ति मिळेल तरच सरकार हें काम अंगावर घेईल. वैद्य लोकच हें करतील तर ठीक होईल. त्यांनीं हें आपलें कर्तव्य मानलें पाहिजे.

वैद्यांची मुलें वैद्य न बनतां मेडिकल कॉलेजांमध्यें जाण्यासाठीं धडपडतात. ज्या वैद्यांची स्वतःच्या शास्त्रावर श्रद्धा नाहीं, त्या शास्त्रावर इतरेजनांची

(पुढें पान २५३ वर पहा)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चंद्रकलेचा पाठ :

(ले.-वैद्य मुकुन्दराव अं. गायकवाड
सोलापूर)

आयुर्वेद पत्रिकेच्या ता. १६।८।५३चे अंकांत ...ज धामणकरजींचा चंद्रकलेवरील लेख प्रसिद्ध ...आहे. ह्या लेखांतील पाठांत महत्त्वाच्या भावना- ...व नाहींत; त्यामुळें ग्रंथोक्त मूळ पाठांत फरक ...लागला म्हणून मूळ पाठ व तत्संबंधीं माझे ...र लिहून पाठवीत आहे.

...द्रकला रस (रसचिंतामणि ग्रंथांतील पाठ)

...र्क कर्षमात्रं स्यात्सूतं ताम्रं तथाभ्रकं ।
...गुणं गंधकं चैव कृत्वा कज्जलिकां शुभाम् ॥
...त्यादाडिमदूर्वोत्थैः केतकीस्तन्यवारिजैः ।
...हदेव्याः कुमार्याश्च पर्पटस्य च वारिणा ॥
...मशीतलिकातोयैः शतावर्या रसेन च ।
(...तालमूल्या रसेनापि शतावर्या रसेन च ॥ पाठभेद)
...वयित्वा प्रयत्नेन दिवसे दिवसे पृथक् ।
...क्ता गुडूचिकासत्त्वं पर्पटोशीरमाधवी ॥
...गंधसारिवा चैषां समानं सूक्ष्मचूर्णितम् ।
...द्राक्षाफलकषायेण सप्तधा परिभावयेत् ॥
...तः पोताश्रयं कृत्वा वट्यः कार्याश्चणोपमाः । इति ।

द्विगंधकज्जली ३, ताम्रभस्म १, अभ्रकभस्म १, ...त्न क्रमानें नागरमोथा काढा, दाळिंबबीजरस, ...म्हणजे हरळीचे मुळ्यांचा रस, केवडामूळरस, ...-दुग्ध, कमळपाकळीचा रस, सहदेवीचा रस, ...कडरस, पित्तपापडारस, तालमूली म्हणजे ...ळ्या मुसळीचे कंदाचा रस (ताडाच्या मुळ्या ...), शतावरीमूळरस या अकरा औषधांच्या ... भावना दिल्यानंतर कुटकी १, गुळवेलसत्त्व १, ...पापडा १, सुगंधी वाळा १, मधुमालती फुलें १, ...ता चंदन १, उपळसरी १ याप्रमाणें तोळेवार ...गालित केलेलीं औषधें मिसळून काळ्या मनुकांच्या ...च्या ७ भावना देऊन गोळा बांधून सुकल्यावर ... कोठारांत अगर पोत्यांत ३ ते ७ दिवस ठेवून ...वाळ्या गोळ्या काळ्या मनुकाकाथ साहाय्यानें ...ळ्या.

(द्विगंधकज्जली= १ पारा + २ गंधक यांची कजली).

श्री. धामणकरानीं घेतलेला पाठ रसयोगसागरांतील असून तो सुमारें १८ ग्रंथांवरून संग्रहित केला असें र.यो.सा. टिप्पणीवरून दिसतें. ते ग्रंथ चाळून पहातां बहुतेक ग्रंथांतून वर दिलेला पाठ आहे. पण धामणकरानीं दिलेला संकुचित पाठ नाहीं. दूर्वा, स्त्रीदूध, कमळ, काळी मुसळी, शतावरी हीं भावनाद्रव्यें तर महत्वाचीं असून तीं कां गाळून टाकलीं आहेत तें कळत नाहीं. याशिवाय केवडामुळें, मधुमालतीचीं फुलें हीं द्रव्यें पाठभेद स्वीकारल्यामुळें कमी झालीं तें वेगळेंच.

चन्द्रकला महाराष्ट्राचीच

आपले महाराष्ट्रांत फार प्राचीन काळापासून चन्द्रकलारस वैद्यवर्ग वापरित आलेला आहे. सध्यां देखील महाराष्ट्राइतका चन्द्रकलेचा वापर इतरत्र दिसत नाहीं. जुन्या पिढीतील वैद्य नेहमीं चन्द्रकला करीत आले आहेत. योगरत्नाकर, रसरत्नसमुच्चय, रसचिंतामणि, बसवराजीय, रसराजलक्ष्मी, रसराजशंकर इत्यादि ग्रंथ, महाराष्ट्रांत किंवा महाराष्ट्रीय राजांचे वर्चस्वाखालीं असलेल्या तत्कालीन विजयनगर, आंध्र, चालुक्य, बदामी, कर्णाटादि प्रदेशांतील राजाश्रयास असलेल्या वैद्यांनीं लिहिलेले आहेत. या ग्रंथांत चन्द्रकलेचा पाठ आढळतो. पण उत्तरेकडील रसेन्द्रसारसंग्रह, रसेन्द्रचिंतामणि, भैषज्यरत्नावली आदि ग्रंथांतून चन्द्रकलेचा पाठ आढळत नाहीं. सध्यांहि तिकडचे वैद्य चन्द्रकलेचा वापर क्वचितच करतात. म्हणून चन्द्रकला ही महाराष्ट्राचीच आहे हें सिद्ध होतें. तेव्हां चन्द्रकलेचा शुद्ध व प्रभावी पाठ बरोबर कुठें सांपडेल तर महाराष्ट्रांतील जुन्या पिढीचे परंपरागत वैद्यांजवळच हें निश्चित. म्हणून अशा वैद्यवरांचेकडे जाऊन चौकशी करितां दूर्वा, स्त्रीदुग्ध, कमळादिभावना व मधुमालतीच (पिंपळी नव्हे) त्यांचे पाठांमध्यें वापरांत आहे असें आढळलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केतकीस्तन म्हणजे काय ?

केतकीस्तन हा शब्द केतकीचें मुळांनाच निघंटु-कारांनीं लावलेला आहे. राजनिघंटु, बृहन्निघंटुरत्नाकर, निघंटशिरोमणि आदि निघंटु ग्रंथ पहा म्हणजे खात्री पटेल. केतकीस्तन म्हणजे केवड्याचें कणीस असें होत नाहीं. शिवाय श्री. धामणकरांनीं म्हटल्याप्रमाणें केव-ड्यांचीं कणसें पाण्यांत कोळून पहातां दुधासारखा घन व पांढरा असा त्याचा द्रवहि तयार होत नाहीं. केवड्याचें कणीस त्यांनीं पाण्यांत कोळून पाहिलें आहे काय ? प्रचितीकरितां मुद्दामच सध्यां केवड्यांचें कणीसांचा हंगाम असल्यामुळें मंडईतून कणीस आणलें आणि तें पाण्यांत कोळून पाहिलें तर हिरवट पिवळा असा पाण्याचा रंग झाला, व कांहीं काळ तसेंच ठेवून दिल्यावर गुळवेलसत्वाप्रमाणें पांढरा सत्वासारखा पदार्थ तळीं थोडासा दिसूं लागला. परत सर्व ढवळून ठेवलें तरी दुधासारखा द्रव झालाच नाहीं. थोड्या वेळानें पुनः तो सत्वमय पदार्थ थोडासा तळीं दिसूं लागला. आतां हा पिष्टमय पदार्थ म्हणजे कांहीं दुग्धद्रव नव्हे, हें कोणीहि करून पाहून सांगूं शकेल.

केवडा-कणिसापेक्षां मुळें श्रेष्ठ

निघंटु ग्रंथांतील केवडाकणिसाचे गुणधर्म पहातां केवड्याचीं मुळेंच गुणधर्मानें श्रेष्ठ म्हणून वर्णिलेलीं आहेत. पहा- केवडाकणीस, लघु, कटु, तिक्त, उष्ण, वातकफघ्न म्हणून सांगितलें आहे, तर केवडामुळें अतिशीतल, कटु, वात-पित्त-कफघ्न, रसायन, बल्य, देह दृढ करणारीं इत्यादि वर्णन आहे. म्हणून केवडामुळेंच भावनेकरितां घेणें इष्ट आहे.

केतकीस्तन एकच शब्द कीं केतकी स्तन्य, असे भिन्न शब्द ? कांहीं कांहीं ग्रंथांतून 'केतकीस्तन-वारिभिः' किंवा 'केतकी-स्तन-वारिणा' असे पाठ आढळतात. त्यामुळें केवळ केवड्याचें मुळांचा रस एवढाच अर्थ होतो. पण हे पाठ चुकीचे कसे आहेत तें पहा. जर मूळ पाठ बनविणाऱ्यास केवडामूळच फक्त घ्यावयाचें असतें तर त्यानें 'केतकीमूलवारिणा' असें सुटसुटीत पद्य केलें असतें व स्तन शब्दावर भर दिला नसता. पण त्यास 'स्तन्य' म्हणजे स्त्री-दुधाची भावना अभिप्रेत होती. म्हणूनच त्यानें "केतकी-स्तन्य-वारिजैः" (म्हणजे केतकीमुळें स्त्री-दुग्ध व कमळ) असा पाठ बसविला. पण पुढें ग्रंथांच्या प्रती करणाऱ्या लेखकांचा लेखनप्रमाद घडून आलेला असावा. व केतकीमूळ शब्दास स्तन-संज्ञा निघंटूंत असल्यामुळें संभ्रम होऊन पुढें 'केतकीस्तनवारिजैः' असें लिहिलें गेलें असावें आणि त्याचेंच रूपांतर पुढे पुढें "केतकीस्तन-वारिणा" किंवा 'वारिभिः' असें झालें असलें पाहिजे. त्यामुळें स्त्रीदुग्ध व कमळ भावनेंश फांटा मिळत गेला. पण परंपरेंत मात्र वैद्यांनीं या भावना देण्याची प्रथा बंद केली नसल्यामुळेंच हा उलगडा झालेला आहे. शिवाय वनस्पतीचें प्रधान अंग म्हणजे मूळ होय. आणि आपली प्रथाहि आहेच कीं, वनस्पतीचें नांवच फक्त सांगितलेलें असलें म्हणजे बहुधा आपण मुळेंच घेतो कीं नाहीं ? तेव्हां केतकी

सांड्र
प्रेग-युटेरो
गर्भिणी-गर्भ-रक्षक
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांड ब्रदर्स चेंबर लि. चेंबूर-मुंबई
[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...'मुळेंच' ग्रहण करणें, पाठ बनविणाऱ्यास मान्य ...सें ठरतें. कृष्णशास्त्री भाटवडेकरांच्या वैद्यसार-...तील चंद्रकलेच्या पाठांत दूध भावनेचा स्पष्ट ...आहे. स्त्रीदुग्धानें चंद्रकला प्रभावी बनते, हें ...ाचें गुणधर्म पहा, म्हणजे आढळेल. दूधच कां ...या बद्दलचा एक महत्वाचा पुरावा देऊन ही ...संपवितो.

...तराजलक्ष्मी नामक सुमारें हजार आठशें ...वर्षांचा महाराष्ट्रांतील वैद्यानें लिहिलेला एक ग्रंथ ...अद्याप तो कोणी छापलेला नाहीं. या ग्रंथांत ...समुद्र' नामक रसप्रयोग आलेला आहे. तो रस ...व चन्द्रकलेचें मूळरूप असावें असें मला वाटतें. ...ाचें व चन्द्रकलेचें फार साम्य आहे. त्या क्षीर-...च्या पाठांत भावना द्रव्यांमध्यें 'स्तन्य' शब्द ...ना आलेला आहे. या ग्रंथावर तत्कालीन महाराष्ट्री ...आहे. त्या टीकेंत 'थानीचें दूध' असा स्पष्ट ...आहे. सर्वांचे माहितीकरितां तो पाठच देतो ...माझें म्हणणें पटेल.

'क्षीरसमुद्र' रसाचा पाठ

तुत्थसूताभ्रकगंधकान्समा-
न्विमर्द्य निम्बुद्रवतस्त्रिवारम् ।
निवेश्य मूषां मुनिशः पुटेल्लघु,
चूर्णं पुनर्भावय भेषजक्रमात् ॥
खर्जूर-लुंगा-मधुयष्टि-केतकी,
स्तन्येक्षुजाजी-सितशर्करा-गणात् ।
गुंजाष्टकं क्षीरसमुद्रनामकः,
सर्वप्रमेहान्मुनिसप्तवासरैः ॥
...येत्सितावम्बुलपत्रनीरयुक्,
सितापयोन्नाशनभाजिनां नृणाम् ।
वल्लैकमात्रो मधुना समन्वितः,
शिशोस्तृषातापबलक्षयादिकान् ॥

...तत्कालीन महाराष्ट्री टीका—

...तुथे (तुत्थ-मोरचूद) । रस (पारा) । अभ्रक- । गंधक । हीं समभाग घेऊन । निंबरसेसी ...मर्दून । मुसेत ठेवून ७ लघुपुटे दीजे । मग रस वाटून । उतती (खजूर) । माहुलिंग । जेष्टमधु । केतकी । थानीचें दूध । ऊस । जीरें । साखर । यांची अनुक्रमें भावना दीजे । हा क्षीर-समुद्र नामक रस । प्रति दिवसी । मात्रा गुंजा ८ । साकर वाघलेल्या पानाचा रस अनुपानेसी । दिन ४९ । दिधलेया सर्व प्रमेह जिंके । पथ्य साकर दूध भात दीजे । बालांस । मधुसी वाल १ दिधलेया । ताहान । ताप । बलक्षय । इत्यादिकांते जिंके ॥ इति क्षीरसमुद्रः ॥

या क्षीरसमुद्राची व चंद्रकलेची तुलना करून पहा. या क्षीरसमुद्राचीच सुधारलेली आवृत्ति म्हणजे चंद्रकला होय हें सहज दिसून येईल.

मागधी कीं माधवी ?

येथेंहि माधवी शब्दानें वैद्यपरंपरा मधुमालतीचीं फुलें घेते. रसचिंतामणि, योगरत्नाकर, रसचंडांशु आदि ग्रंथांत माधवीच घेतली आहे. गेल्या ७५ वर्षांतील नामांकित वैद्यांपैकीं मिरजमळ्याचे बाळाचार्य

उज्वल कीर्ति

आयुर्वेदीय औषधांची उज्वल कीर्ति, बनविलेल्या सिद्ध औषधांच्या गुणावर आहे. औषधें गुण देणारीं असतील तर कीर्ति नेहमीं उज्वल राहील. तरी अशीं गुण देणारीं औषधें, अस्सल, ताजी व स्वच्छ घटक औषधी द्रव्यें खरेदी करण्यावर अवलंबून आहे. औषधी द्रव्यासाठीं आपण

दि ऑल इंडिया करीयाणा स्टोर्स

पायधुनी, मुंबई नं. ३

(फोन नं. ३१८५८) यांचेकडे मागणी करा.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात. अधिक माहितीसाठीं कॅटलाग मागवा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नामक वैद्यानें मराठींत "औषधी संग्रह" नामक आपल्या अनुभविक औषधांचें व रोगनिदानादि माहितीचें पुस्तक लिहिलें आहे. हें छापलेलें आहे. त्यांतहि चंद्रकलेच्या पाठांत मधुमालतीचीं फुलेंच घेतलीं आहेत. चंद्रकलेच्या सारख्या शीतल कल्पास पिंपळीपेक्षां मधुमालतीचीं फुलें घेणेंच जास्त पोषक आहे. कैलासवासी वै. पं. गुणेशास्त्र्यांनीं देखील मधुमालतीचीं फुलेंच घेण्यास सांगितलें आहे. (आ. औ. गु. शास्त्र 'चंद्रकलारस' पहा.) मधुमालती फुलें-कटु, तिक्त, कषाय, पित्तघ्न, कासघ्न, व्रणरोपण, दाह-नाशक, शोषघ्न, कुष्ठघ्न आहेत. ही सुवासिक फुलांची वेल बागांतून लावलेली असते. 'Malpighiaceae' या नैसर्गिक वर्गातील 'हिप्टेज मेडेब्लोटा' या लॅटिन नांवाची ही वेल आहे. मराठींत 'वीरवंती' असेंहि कोणी नांव देतात. हिला वसंतारंभीं फुलें येतात म्हणून हीस संस्कृत कवींनीं 'वसन्तदूती' म्हटलें आहे.

रामशीतलिका

ही संदिग्ध वनस्पति आहे. निघंटशिरोमणींत करवीरादि वर्गात ही उल्लेखिली आहे. पण वर्णनाभावीं ही ओळखतां येत नाहीं. म्हणून सध्यां वैद्यवर्ग तिचे ऐवजीं 'तालमूली' म्हणजे काळी मुसळी जी डोंग-राळ वा माळरानांत सर्व ठिकाणीं मिळते ती घेतात. ही Amaryllidaceae या नैसर्गिक वर्गातील क्षुप-वनस्पति आहे. ही मधुर, वृष्य, वीर्योष्ण, बृंहण, रसायन, तिक्त, पुष्टिबलप्रद, पित्तदाहश्रमहर, अर्शोघ्न, वातघ्न आहे. ही चंद्रकलेंत वापरल्यानें ती प्रभावी बनेल यांत काय शंका!

कोणी कोणी रामशीतलिका शब्दानें 'मरवा' 'सब्जा', रामफळाचीं पानें घ्यावीं म्हणतात. पण काळ्या मुसळीइतकीं हीं द्रव्यें (चन्द्रकलेचे दृष्टीनें) गुणवान् ठरत नाहींत.

'बसवराजीमम्' नामक ग्रंथांतील चन्द्रकलेच्या पाठांत कमळाचा स्पष्ट उल्लेख आहे. म्हणूनच "वारिजैः" शब्दानें कमळपाकळीरसभावना चन्द्रकलेस देणें इष्ट आहे.

दूर्वा व शतावरी त्या संबंधीं लिहिणें नकोच. तीं प्रसिद्धच आहेत.

महत्वाचीं भावना द्रव्यें

अशा रीतीनें दूर्वा, केवडामूळ, स्त्रीदुग्ध, कमळ, तालमूली, शतावरी, मधुमालती हीं द्रव्यें चन्द्रकलेच्या दृष्टीनें महत्वाचीं कशीं आहेत हें आपणांस दिसून आलेंच असेल. ज्वरघ्न, दाहशोषनाशक, मेहघ्न, रक्तस्रावी रोगनाशक, यकृत्, पित्ताशय, वृक्क, गविनी, मूत्रग्रंथि, मूत्राशयादि मूत्रेंद्रियांवर व जननेंद्रियांवर जोरदार कार्य करणारीं, बल्य, रसायन अशीं हीं द्रव्यें आहेत. तेव्हां हीं वगळून उपयोग काय?

या पाठाची चन्द्रकला, पाठांतील भावना-द्रव्यांची एकएकच भावना देऊन बनविली तर सव्वा दोन महिने लागतात. व सात सात भावना दिल्या पंधरा सोळा महिने लागतात. एवढा खटाटोप करतां ११ भावना देऊनच हिचा प्रभाव एकदां पहा तर खरा. तिचे गुणधर्मांत वर्णिल्याप्रमाणें खरे-खर कार्य दिसून येतें. ज्वरवेग, रक्तस्रावी रोग, प्रमेह, मूत्रेंद्रियविकार, बलक्षयादि विकारांत ही फार आश्चर्यफलदायी आहे.

इंजेक्शन चिकित्सा

पाश्चात्य इंजेक्शन चिकित्सेवरील अभिनव मराठी ग्रंथ. किं. ६ रु., ट. ख. निराळा.
वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक शहर
सुबोध वैद्यक ग्रंथमाला, पो. कागल (कोल्हापूर)

सुप्रसिद्ध मिरज वानलेस दवाखान्यांत पसंत करून
सर्टिफिकेट मिळालेलें देशी औषध. इसब,
गजकर्ण नायटे वगैरे त्वचारोगावर
(रजिस्टर्ड)
"मोसकी लोशन" वापरा
मोसकी लोशन फार्मसी, मु. हलकर्णी
व्हाया संकेश्वर (जि. बेळगांव)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूळव्याध:-

* (नासिक शहर वैद्य मंडळाच्या अभ्यास-मंडळांतील प्रश्नोत्तररूप चर्चेचा निष्कर्ष) *

१) मूळव्याधीला नांवें काय काय आहेत ?

उत्तर- अर्श, गुदज, गुदकीलक, गुदांकुर, [...]नाम, पायुरुह, Haemorrhoids, Piles.

२) मूळव्याधीचें स्वरूप काय ?

उत्तर- मूळव्याध गुद व गुदकांडाच्या शेव[टच्या] [...] इंच दोन इंच भागांतील उभ्या अशुद्ध रक्त-[वाहिन्]यांची फुगवटी.

३ ही फुगवटी कशामुळें येते ?

उत्तर - कुंथणें, बसून राहणें, बराच वेळ उकिडवे [...]गार व कठीण अशा जागेवर बसणें, तसेंच [...]तील अशुद्ध रक्तवाहिन्यांच्या प्रवाहांत वरील [...] अडथळा येणें, या कारणांनीं आजूबाजूस विशेष [आधा]र नसलेल्या गुदांतील या शिरांत हळूहळू रक्त-[...] होत राहून फुगवटी येत जाते. या शिरांना पडदे [...]ानें त्यांच्यांत रक्तसंचय सहज होऊं शकतो.

४) ह्या फुगवटीस विशेष कारण कोणतें ?

उत्तर- असा कोणताहि आहार, विहार, मद्या-[...]न किंवा आणखी आजुबाजूच्या अवयवांची [...] कीं ज्यामुळें यकृत् वाढून त्याचा परिणाम [...]त किंवा साक्षात् अन्नरसवाहिकेवर (Portal [...]) येणारा दाब हें याचें विशेष कारण होय.

५) मूळव्याधींत रक्त कोणत्या अवस्थेंत पडतें ?

उत्तर:- साधारणपणें मूळव्याध हा रोग उत्पन्न [होऊं] लागतो त्यावेळीं कांहीं दिवस रक्त पडतें, नंतर [...]या अवस्थेंत कांहीं काल रक्त बंद होतें. पण मूळ-[व्याध] मात्र नाहींशी झालेली नसते. पुन्हां तिसऱ्या वा [...] अवस्थेंत रक्त पडूं लागतें. कुंथणें व कठीण [...]ें घर्षण हीं रक्त पडण्यास कारणीभूत होतात.

६) गुदांत मूळव्याधींची संख्या किती असते ?

उत्तर:- मूळव्याध म्हणजे गुदांतील फुगलेल्या [...] तेव्हां त्या ठिकाणीं जेवढ्या शिरा फुगणें शक्य [...]तेवढ्या मूळव्याधींची शक्यता असते. ही संख्या साधारणपणें आठ पर्यंत असते. गुदांत असणाऱ्या आठ गुदस्तंभागणिक एक एक अर्श आठ मूळ-व्याधी जास्तींत जास्त होऊं शकतात.

७) ह्यांचा आकार लहान मोठा कां असतो ?

उत्तर- याला कारण मुख्य शिरा मोठ्या असतात व त्यांच्या शाखा लहान असतात म्हणून. पैकीं मोठ्या शिरांच्या योगें तीन मोठ्या आकाराच्या मुख्य (Primary) मूळव्याधी व बाकीच्या पांच लहान आकाराच्या उपमूळव्याधी (Secondary) असतात.

८) मूळव्याधींची तपासणी कशी करावी ?

उत्तर- मूळव्याध ही स्पर्शापेक्षां दृष्टीनें अधिक चांगली समजते. रोग्यानें डाव्या कुशीवर पडून राहाण्यापेक्षां उजव्या कुशीवर पडून दोन्ही मांड्या पोटाजवळ घेऊन पडणें ही अवस्था अर्शोदर्शना-करितां अधिक चांगली असते.

९) तपासणीकरतां कोणत्या साधनांचा उपयोग करतात ?

उत्तर- गुदरोगाच्या परीक्षणाकरितां अर्शो यंत्राचा [Proctoscope] उपयोग करतात. याचा उपयोग करण्यापूर्वी गुद स्निग्ध करावें लागतें, अर्शो-यंत्राचें मुखहि स्निग्ध करावें लागतें व गुदमुखांत चिरण्या (Fissure) नाहींत हें पाहावें लागतें. अर्शो-यंत्र घातल्यावर रोग्यानें कुंथल्यास अर्श अधिक चांगले व्यक्त होतात.

१०) मूळव्याधीवरील शस्त्रकर्म करून घेत--ल्यावर पुन्हां मूळव्याध होऊं शकते हें खरें कां ?

उत्तर:-- म्हटलें तर खरें व म्हटलें तर खोटें. कारण असें कीं, वाढलेल्या मूळव्याधीचा कोंब कापून काढल्यानंतर तो पुन्हां वाढत नाहीं हें खरें, परंतु बाकीच्या शिरा फुगून पुन्हां दुसरी मूळव्याध होऊं शकते, व रोग्यास वाटतें कीं, शस्त्रकर्म करून घेतलें तरी पुन्हां तीच मूळव्याध झाली हें खोटें, कारणें चालू राहिल्यास बाकीच्या शिरा फुगून आणखी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नवी मूळव्याध उत्पन्न होऊं शकते.

११) अंतर्रर्श व्हावयास लागले हें कसें ओळखावें?

उत्तरः— ह्यांतहि रक्त पडतेंच, पण तें नसतांहि गुदांत जडपणा वाटावयास लागला, गुद नेहमीं भारावल्यासारखें वाटावयास लागलें व मधूनमधून तेथें दुखावयास लागलें कीं अंतर्रर्श होऊं लागले असें समजावयास हरकत नाहीं.

१२) मूळव्याधींत त्रास व धोका कोणता?

उत्तर— अर्श, ठणकतात, दुखतात, अस्वस्थता उत्पन्न होते, इतरहि अनेक स्थानिक त्रास आहेत; पण या त्रासापेक्षांहि त्यांतून होणाऱ्या रक्तस्रावामुळें होणारा रक्तक्षय हा फार मोठा धोका आहे. साक्षात् मूळव्याधीनें रोगी मरण्यापेक्षां ह्या रक्तक्षयानें मूळव्याधीचा रोगी दगावतो.

१३) असें जर आहे तर मूळव्याधींतून केव्हांच रक्त वाहूं देणें इष्ट नाहीं कां?

उत्तर— मूळव्याधींत अशी एक अवस्था येतें कीं, ज्यावेळीं गुदमुखाच्या स्नायूचा दाब पडून अर्श आंत स्वस्थानीं जाणें शक्य नसतें, अशा वेळीं त्यांतून शस्त्रानें अगर जळवा लावून रक्त जाऊं द्यावें लागतें. त्याशिवाय इलाज नसतो. रक्त दुष्ट असल्यासहि जाऊं देणें इष्ट आहे. यकृत्-दाल्युदर, यकृत्-वृध्दि यांच्या परिणामामुळें अन्नरसवाहिनीवर बराच दाब आला असेल तर अशा वेळीं मूळव्याधींतून रक्त जाऊं देणें कांहीं वेळेस हितावह होते. निसर्गच तो उपचार करीत असतो.

१४ मूळव्याधीवरील शस्त्रकर्माकरितां शक्ति येण्याची वाट पाहात राहाणें इष्ट कीं अनिष्ट?

उत्तरः— कोणत्याहि शस्त्रकर्माकरितां शरीरबळाची व मनोबलाची आवश्यकता आहेच. परंतु मूळव्याधींत एक दुष्टचक्र निर्माण होतें. तें असें कीं, मूळव्याधींतून होणाऱ्या रक्तस्रावामुळें रक्तक्षय होऊन अशक्तपणा येत राहातो. अशक्तपणामुळें शस्त्रकर्म रहित केलें कीं रक्तस्राव चालू राहातो व पुन्हां अशक्तपणा अधिकच वाढत जातो व बुडत्याचा पाय अधिक खोलांत जातो. अशा वेळीं तात्पुरत्या शक्तिवर्धक उपचारांनीं शक्ति मिळवून किंवा रक्तदानासारखे उपचार करून रक्तक्षयाचें साक्षात् कारण जें अर्श त्यावरील शस्त्रकर्म करून घेणेंच शहाणपणाचें ठरतें.

१५) मूळव्याध होऊंनये याकरितां किंवा सुरुवात झाली असतां वाढूं नये या करितां कोणतें सूत्र पाळावयास पाहिजे.

उत्तरः— पचनसंस्थेची, अग्नीची शक्ति वाढेल व ती कायम राहील, यकृताची व रक्तवाहिन्यांची स्थिति प्राकृतिक राहील अशी योजना व्हावयास पाहिजे. शौचास न कुंथतां साफ व्हावयास पाहिजे. गुदांत संचय होणार नाहीं याची काळजी घ्यावयास पाहिजे. उकिडवे बसणें, कठीण आसनावर बसणें, काळाचोळासारखीं द्रव्य असलेलीं तीव्र रेचकें न घेणें, सर्वांगासन, शीर्षासन यासारखीं रक्तसंचय न होऊं देणारीं आसनें करणें, मद्यपान न करणें, अतिथंड किंवा अतिशय तिखट आदि रसांचें सेवन करणें, हा उपाय मूळव्याध होऊं नये याकरितां, व होऊं घातल्यास वाढूं नये म्हणून करतां येण्यासारखा आहे. गुदहि नेहमीं स्वच्छ राहील याची काळजी घ्यावयास पाहिजे.

१६) केवळ औषधी लावून मूळव्याधी काढतात तें काय आहे?

उत्तर— कोणतेंहि तीव्र औषध लावल्याशिवाय मूळव्याध निघणें शक्य नाहीं व त्यानें त्रास होतोच. शस्त्रकर्माला भिणारे लोक ह्या वेदना सहन करतात, मोड काढल्याचेंहि दाखवितात व रोग्यांचा त्रासहि कमी होतो. हे उपचार करणारे लोक मद्रासकडील आहेत. मिळालेल्या माहितीप्रमाणें मीठ न लावतां टिकविलेली २ वर्षांची जुनी चिंच हें या मूळव्याधी कमी त्रासानें काढण्याचें औषध आहे असें समजतें. तरीपण हे मोड काढणें व त्यावरील औषध हें अद्याप गूढच आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

-: सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें :-

१० लक्ष्मीनारायण रस (६३३२ भा. भै. र.)

(लेखकः—वैद्य पु. वि. धामणकर, धूतपापेश्वर—पनवल)

आंत्रिक सन्निपात हें टायफाइड ज्वराला दिलेलें कृत नांव होय. ह्या आजारांत प्रथमपासून अखेर तं आयुर्वेदीय चिकित्सा करतां येते. वैद्यानें या रावें इंग्रजी नांव सांगितलें नाहीं तरच तो रोगी कडे टिकतो. अल्पश्रमांत, अल्पखर्चांत आरामहि तो. पण रोगाचें इंग्रजी नांव प्रकट झालें कीं, रोग्याचे त घाबरतात, आणि लागलीच डॉक्टरला बोलावून हरण त्याचें स्वाधीन करतात. वस्तुतः ही भीति ाठायीं आहे. लक्ष्मीनारायण व सूतशेखर हीं न औषधें, उत्तम प्रतीचीं जवळ असलीं तर ाचें कांहींहि कारण नसतें. प्रथमपासून दोषवृद्धि अवस्थांतरें लक्षांत घेऊन बेताबेतानें चिकित्सा ीत राहिलें तर अगदीं धांवपळ अथवा हायहुय करतांहि रोगी उत्तम प्रकारें बरा होतो, हें मीं ेक वेळां पाहिलें आहे, अनुभवलेंहि आहे. आणि चकरितां ह्या औषधाचा समावेश ह्या यादींत ा आहे.

आंत्रिक-विषशांत्यर्थ लक्ष्मीनारायण

"आंत्रिक सन्निपाताच्या अगदीं प्रारंभापासून ज्वर नाहींसा होईपर्यंत लक्ष्मीनारायणरस ज्वरघ्न ून व आंत्रिक-विष-शांत्यर्थ देतां येतो. आंत्रिकांत ुवनकीर्ति किंवा तत्सदृश इतर तीव्र ज्वरघ्न षधांपेक्षां लक्ष्मीनारायणाचा फार चांगला उपयोग तो. आंत्रिकांत आंत्रस्थ सेंद्रिय विष नाहींसें ारें औषध पाहिजे असतें. लक्ष्मीनारायण हें ले औषध होय. आंत्रिकाच्या प्रारंभीं ज्वर तीव्र तो, परंतु तो सारखा टिकून राहिलेला असतो. ह्या र्यंत लक्ष्मीनारायण ज्वरपाचन म्हणून देतां येतो. े पुढें दुसऱ्या, तिसऱ्या व क्वचित् त्याहिपेक्षां जास्त स टिकून असणाऱ्या तीव्र ज्वरांत १०४°-१०५° पर्यंत तापमान असतांहि लक्ष्मीनारायणाचा उपयोग झालेला आहे. आंत्रिकांत अनेक रोगसंकर किंवा लक्षणें होतात. त्या अनुरोधें इतर औषधें द्यावीं लागतात. पण तीं देत असतां लक्ष्मीनारायण अवश्यमेव सुरू ठेवावा. हा देत असतां ज्वर फारसा आवाक्याबाहेर वाढत नाहीं. तीव्र ज्वरापासून उत्पन्न होणारा त्रास यानें होत नाहीं. आणि विशेष म्हणजे हा अहृद्य नसल्यानें ज्वरघ्न औषधांचा हृदयावर होणारा दुष्परिणाम यानें होत नाहीं. मात्र असल्या ज्वरांत ह्या औषधांचें प्रमाण कमी द्यावें."

—औ. गु. शा. भा. ४था पा. ३०

लक्ष्मीनारायणाचा संस्कृत पाठ

शुद्धगन्धकमेतच्च टंकणं विषहिंगुलम् ।
रोहिण्यतिविषा कृष्णा वत्सकाऽभ्रकसैन्धवम् ॥
एतानि समभागानि खल्वमध्ये विनिक्षिपेत् ।
दन्तीद्रावैः फलद्रावैर्मर्दयेच्च दिनत्रयम् ॥
वल्लद्वयां वटीं कृत्वा ह्यार्द्रकस्य जलैर्ददेत् ।
दोषज्वरे सन्निपाते विषूच्यां विषमज्वरे ॥
अतिसारे ग्रहण्यां च रक्तामे मेहशूलजित् ।
सूतिकावातदोषघ्नो लंकेशमिव राघवः ॥
इष्टान्नं भोजयेत्पथ्यमभ्यंगं स्नानमाचरेत् ।
कर्पूरमिश्रताम्बूलं प्रसूनं हरिचन्दनम् ॥
नारिकेलोदकं पीत्वा नारीणां संगमेव च ।
लक्ष्मीनारायणो नाम रसानामुत्तमो रसः ॥

नांवः- हें नांव उपमात्मक होय. "औषधं जान्हवीतोयं वैद्यो नारायणो हरिः।" सर्वश्रेष्ठ वैद्य कोण तें ह्या चरणांत सांगितलें आहे. लक्ष्मीनारायण—रसहि तितकाच कार्यक्षम आहे, असा भाव हें नांव देऊन ध्वनित केला असावासें वाटतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठनिश्चितिः-(१) "दोषज्वरे"-भा. भै. र., भै. र.

(२) "दुष्टज्वरे"-र. यो. सा.

(३) "रोहिण्यतिविषा।" भा. भै. र., र. यो. सा., भै. र.,

(४) "रोहिण्यावतिविषा।" आ. औ. गु. शा.

पहिल्या दोन पाठभेदांमुळें अर्थात् फारसा बदल होत नाहीं. पण दुसरे दोन मात्र चिंतनीय होत. नं. ३ मध्यें फक्त हिरडाच आहे. तर नं. ४ मध्यें कुटकी व हिरडा अशीं दोन द्रव्यें "रोहिण्यौ" पदानें येतात.

कुटकीचें कार्य

कुटकीनें पित्ताचें रेचन, अग्नीचें दीपन, आमाचें पाचन आणि दोषांचें भेदन होतें. त्यामुळें लक्ष्मीनारायणास ही जोड उपायकारक ठरते, असें त्यांचें मत आहे.

द्रव्यसंग्रहः- हिंगूळ, गंधक, टंकण, अभ्रक, सैंधव, अतिविष, कुडा, बचनाग, पिंपळी, हिरडा, कुटकी.

द्रव्यनिर्णयः- हिंगूळ-खड्या, टंकण-उद्भिज्ज, गंधक-आमलसार, कुटकी-काळी, नवी. हिरडा-सुरवारी, बचनाग-काळा. पिंपळी-लेंडी, जुनी. कुडा-काळाकुडासाल ताजी.

द्रव्यशोधन

शोध्य	शोधक.
हिंगूळ	आलें.
गंधक	माका.
टंकण	अग्नि.
पिंपळी	चित्रक.
बचनाग	गोमूत्र.
टंकण	अग्नि

प्रक्रियाः- दांतीमूळ व त्रिफळा काढा-भावना तीन तीन द्याव्यात.

सिद्धिप्रमाणः-हिंगूळ १ तोळा घेतला तर तयार औषध १४ तोळे.

कालः-साधनकाल-ग्रीष्म. मर्दन-१ महिना.

परिगणनः- अभ्रक, बचनाग इ. चें.

रोगः-एक दोषिक, सान्निपातिक व विषमज्वर, आंवरक्त, अतिसार, संग्रहणी, विषूचिका, मेह, शूल व सूतिकारोग.

मात्रा- ग्रंथोक्त ४ गुं. (वृद्धवैद्य ।।- ते २ गुं.)

अनुपान- आल्याचा रस.

वत्सक शब्दाची व्युत्पत्ति

टिप्पणी-- वत्सक म्हणजे "वदतीति वत्सः। स एव वत्सकः"। ह्या विग्रहाचा प्रत्यय केव्हां नि कसा येतो, हा एक संशोधनाचा विषय मात्र झाला खरा. वत्सक म्हणजे कुडासाल व इंद्रजव. भा. भै. र. व र. यो. सा. ह्या ग्रंथांत भाषाटीकाकारांनीं वत्सक म्हणजे इंद्रजव घेतलें आहे. पण आमचे परंपरेंत वत्सक म्हणजे काळ्याकुडामुळाची ओली साल घेतात. निघंटुमध्यें नि. र. वत्सक=कुडासाल-कषाय कटु-तिक्तोष्ण, रूक्ष, ग्राही, दीपनी, आमघ्नी म्हटलें आहे. तर इंद्रजव-कटु, तिक्त, शीतल, ग्राही असें म्हटलें आहे. आधुनिक विद्वानांचे मतें दोघांचे गुण सारखे गणले गेले आहेत.

लक्ष्मीनारायणाची मात्रा

मात्रा- ग्रंथोक्त मात्रा बरीच मोठी वाटते. पण ती सूतिकावात, विषूचिका या सारख्या जोरदार आजारांत अगर स्निग्धान्नभोजी, स्वस्थ, धष्टपुष्ट मनुष्यास वाजीकर म्हणून ती योग्यहि ठरण्याचा संभव आहे. आंत्रसन्निपातांत मात्र हें औषध बेतानेंच वापरलें जाणें बरें. रोग, रोगी ह्यांचें बला-बलत्व पाहून योग्य मात्रा ठरवावी.

या औषधाचें सामर्थ्य

रामानें रावणास नेस्तनाबूद केलें. तसें हा सूतिकावातावर काम करतो, असें ह्याच्या सामर्थ्याचें वर्णन आहे. त्याकडे अवश्य लक्ष जावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११-१२-१३ लक्ष्मीविलास (० गुटी, महा०, सिद्ध०)

आमच्या परंपरेंत लक्ष्मीविलासाचे तीन पाठ आहेत. व्यवहाराचे सोयीकरितां त्यांचें नांवांत थोडाथोडा फरक केला आहे. तो असा— (गुटी); (महा) ल. वि.; (सिद्ध) ल. वि.

ही औषधें अत्यंत मूल्यवान्, गुणदायक आणि प्रसंगीं बहारीचें काम देणारीं अशीं आहेत. ह्यांचे गुणधर्म मुळांतच वांचणें श्रेयस्कर. येथें फक्त त्यांच्या गुणांचें दिग्दर्शन करीत आहे.

११ लक्ष्मीविलास (गुटी)

"लक्ष्मीविलासगुटी ही उत्तम हृद्य अर्थात् हृदयास देणारी व हृदयोत्तेजक आहे. तीव्र विकारांत उत्तेजक, आणि जुनाट विकारांत हृदयास बलदायक, हें अमूल्य औषध आहे. ह्याचें उत्तेजनाची क्रिया फारशी दृष्टीस येत नाहीं. ब्रँडीसारखें दिल्यानंतर नाडी सुधारते, हृदयास उत्तेजन मिळते, परन्तु कांहीं वेळानें हा प्रकार नाहींसा होऊन नाडी व हृदय पूर्वस्थळावर किंबहुना पहिल्या-पेक्षां वाईट स्थितींत येतें. ल. वि. गुटीनें असें होत नाहीं. नाडी सुधारल्यानंतर ती सुधारलेलीच पुष्कळ काळपर्यंत राहते. ह्या औषधाचा परिणाम हृदयावर व हृत्सन्निध शुद्धाशुद्ध रक्तवाहिन्यांवर होतो. रक्तवाहिन्या विस्फारित होतात. हृदयास आकुंचन-विकास क्रिया चांगली झाल्यानें विश्रांति मिळते. त्याची धडधड बेतावर येते."

(औ. गु. ध. शा.)

ल. वि. गुटीचा संस्कृत पाठ

कृष्णाभ्रचूर्णस्य तदर्धौ रसगन्धकौ ।
तदर्धं चन्द्रसंज्ञस्य जातीकोषफले तथा ॥
वृद्धदारकबीजं च बीजं धुस्तुरकस्य च ।
त्रैलोक्याविजयाबीजं विदारीमूलमेव च ॥
नारायणी तथा नागबला चातिबला तथा ।
बीजं गोक्षुरकस्यापि नैचुलं बीजमेव च ॥
एषां कार्षिकं चूर्णं पूर्णपत्ररसैः पुनः ।
निष्पिष्य वटिका कार्या त्रिगुञ्जाफलमानतः ॥
निहन्ति सन्निपातोत्थान् गदान् घोरान् चतुर्विधान् ।
वातोत्थान् पैत्तिकांश्चैव नास्त्यत्र नियमः क्वचित् ॥
कुष्ठमष्टादशाख्यं च प्रमेहान् विंशतिं तथा ।
नाडीव्रणं व्रणं घोरं गुदामयभगन्दरम् ॥
श्लीपदं कफवातोत्थं रक्तमांसाश्रितं च यत् ।
मेदोगतं धातुगतं चिरजं कुलसंभवम् ॥
गलशोथमन्त्रवृद्धिमतिसारं सुदारुणम् ।
आमवातं सर्वरूपं जिव्हास्तम्भं गलग्रहम् ॥
उदरं कर्णनाशाक्षिमुखवैकृत्यमेव च ।
कासपीनसयक्ष्मार्शस्थौल्यदौर्गन्ध्यनाशनः ॥
सर्वशूलं शिरःशूलं स्त्रीणां गदनिषूदनम् ।
वटिकां प्रातरेकैकां खादेन्नित्यं यथाबलम् ॥
वारितक्रसुरासीधुसेवनात्कामरूपधृक् ।
वृद्धोऽपि तरुणस्पर्धी नच शुक्रस्य संक्षयः ॥
नच लिंगस्य शैथिल्यं न केशा यान्ति पक्वताम् ।
नित्यं स्त्रीणां शतं गच्छेन्मत्तवारणविक्रमः ॥
द्विलक्षयोजनी दृष्टिर्जायते पौष्टिकः परः ।
प्रोक्तः प्रयोगराजोऽयं नारदेन महात्मना ॥
रसो लक्ष्मीविलासस्तु वासुदेवे जगत्पतौ ।
अभ्यासाद् यस्य भगवान् लक्ष्मनारीषु वल्लभः ॥

भा. भै. र. ६३३३

तारुण्यलक्ष्मी-प्रतिबोधनाय

नांवः– लक्ष्मी शब्दाचे शोभा, कांति, तेज, कल्याण, सुदैव, सद्भाग्य, ऊर्जितावस्था, वृद्धि असे अनेक अर्थ आहेत. महालक्ष्मीविलासाचें गुणवर्णनांत " तारुण्यलक्ष्मीप्रतिबोधनाय । लक्ष्मीविलासो रसराज एषः । " असा उल्लेख आहे. तोच अर्थ या रसासहि लागू असल्यानें येथें लक्ष्मी म्हणजे तारुण्यलक्ष्मी आणि तिचा विलास म्हणजे सौंदर्य, आरोग्य, उत्साह साहस आणि कांति ही खरी तारुण्य-लक्ष्मी. तिचा मनमुराद उपभोग प्राप्त करून देणारा असा हा वर्ग असल्यानें ह्याला लक्ष्मीविलास हें नांव साजून दिसतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठनिश्चिति– रसचंडांशुमध्यें ह्याच नांवानें दोन पाठ आहेत. पैकीं एकांतला द्रव्यवर्ग हाच आहे. पण 'पर्णपत्र' ह्या ठिकाणीं त्यांनीं 'स्वर्णपत्र' असा फरक केला आहे. हा पाठ मूळचा भैषज्य रत्नावलींतला. मूळ पाठांत 'पर्णपत्र' असाच पाठ आहे आणि टीकेंतहि 'ताम्बूलरसैः' । असा स्पष्ट उल्लेख आहे. भा. म. र. अगर र. यो. सा. ह्यांतील मूळ पाठांत 'पर्णपत्र' व टीकेंत 'पान के रस में' । असा उल्लेख आहे. आम्ही पुढच्या तिन्ही ग्रंथकारांशीं सहमत आहोत.

नागवेलीला संस्कृतमध्यें नागवल्ली, तांबूलवल्ली, पर्णवल्ली, पर्ण आणि पत्र अशीं नांवें आहेत. त्यामुळें पर्णपत्र ह्याचा अर्थ नागवेलीचें पान, असा करणें सयुक्तिक ठरतें.

द्रव्यसंग्रहः– २ पारा, ४ अभ्रक, १ जायफळ, १ नागबला-मूळ, १ भुईकोहळा-कंद, २ गंधक, १ कापूर, १ जायपत्री, १ अतिबलामूळ, १ शतावरी-मूळ, १ समुद्रशोक-बीं, १ भांग-बीं, १ धोत्रा-बीं, १ जलवेतस-बीं, १ गोखरू-काटे

द्रव्यनिर्णयः– पारा– हिंगुलोत्थ
गंधक - आमलसार
धोत्रा-बीं (काळ्याधोत्र्याचें बीं)

द्रव्यप्रतिनिधि

मूळपदार्थ	प्रतिनिधि
(सं.) अतिबला (म.) पेटारी, मुद्रिका.	चिकणामूळ.
(सं.) नागबला(म.)गांगेरुकी, तुपकडी.	आस्कंदमूळ
(सं.) वृद्धदारक (म.) वरधारा, समुद्रशोक.	तालीमखाना बी.
(सं.) निचुल (म.) जलवेत, वेत.	खसखस बीं व अतिविष.

(जलवेत बीं हरिद्वारला मिळूं शकतें)

भावनाद्रव्यः– नागवेल पानांचा रस.

द्रव्यशोधन

धोत्रा बीं-गोमूत्रशुद्ध	गंधक-घृतदुग्धशुद्ध
शतावरी-सोललेलीं	कापूर-दुग्धशुद्ध
भुईकोहळाकंद-तक्रशुद्ध	पारा-नागवेलपानरसशुद्ध

प्रक्रिया– प्रथम पारागंधकाची कजली करून तींत इतर पदार्थांचें एकजीव मिश्रण मिळवावें व नागवेल पानांच्या रसाच्या भावना द्याव्यात.

काल– प्रारंभ-शरद मर्दन– ७ते२१ दिवस.

सिद्धिप्रमाणः– २ तोळे पारा तर २० तोळे

परिगणनः– भस्म इ.चें

रोगः– सान्निपातिक व वातिक अथवा पैत्तिक ज्वर, कुष्ठ, प्रमेह, दुष्टव्रण, नाडीव्रण, मुळव्याध, भगंदर, श्लीपद, गलशोथ, उदर, अन्त्रवृद्धि, अतिसार, आमवात, जीभ जखडणें, घसा धरणें; नाक, कान, डोळे, तोंड यांचे रोग; खोकला, पडसें, क्षय, स्थौल्य, दुर्गंधी, शूल, स्त्रीरोग, ध्वजभंग.

मात्राः– ३ गुंजेची १।१ गोळी.

ल. वि. गुटीचीं अनुपानें

अनुपानः– हा रस मांसरसमिश्रित दूध अगर त्याचें दहीं, भक्ताधिवासितपाणी, द्राक्षे अगर उसाची दारू, ह्या अगर अशा कामोद्दीपक पेयांबरोबर घेतलें असतां कोणत्याहि प्रकारचें नपुंसकत्व नष्ट तर होतेंच, पण सामान्य म्हाताऱ्या माणसासहि तारुण्यलक्ष्मी प्राप्त होऊन तो तरुणांशींहि स्पर्धा करूं लागतो. तसेंच ह्या रसाचें सेवन मध अगर दुधाबरोबर सतत चालू ठेवल्यास लिंग शिथिल होत नाहीं, केस पिकत नाहींत, दृष्टि सतेज होते व मनुष्य नेहमीं हृष्ट व पुष्ट राहतो.

टिप्पणीः– वरधारा आणि निचुल ह्या ऐवजीं बाजारांत केव्हां केव्हां निवळी व साग ह्यांचें बीं अनुक्रमें देतात. पण हे प्रतिनिधि योग्य नाहींत. मूळ पदार्थ मिळविण्याची कोशीस करणें जरूर आहे. साधारणतः दसऱ्याचे सुमारास हें बीं मिळूं शकतें. बाजारला वनस्पती पाठविणारे मूळ वैद्य ह्यांचेकडून मागवून घेणें बरें.

श्रेष्ठ वनस्पति कोठली ?

वनस्पति ज्या भागांत अगदीं प्रथम उत्पन्न झाली त्या भागांतलीच तीं वनस्पति श्रेष्ठ जाणावी. आज नागवेल सर्वत्र उपलब्ध आहे. पण हवा, पाणी आणि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रांमधील फरकानुसार तिचे प्रकारांतहि स्थानपरत्वें र आढळतें. त्यांतल्यात्यांत बंगलापान, रस व गांनीं सध्यां श्रेष्ठ ठरलें आहे. ह्याचा आकार ां, रंग गर्द हिरवा, रस उत्कट तिखट असतो. तलीव हृद्य व उत्तेजक आहेत.

नागवेलीला नवी पालवी फुटते, तिला नवतीचीं म्हणतात. तीं कोणी फारशी पसंत करीत नाहींत. त्या प्रकारांत नागवेलीचें गुणधर्म पूर्णत्वानें त नाहींत.

नागवेलीच्या जून पानांत तेल

नागवेलीच्या जून पानांत एक प्रकारचें उडशील तेल असतें. त्यांत फिनेल व टर्पिन असतात. पिकलेल्या पानांत टर्पिनपेक्षां फिनेल अधिक सांपडतें. फिनेल उत्तम आंत्रविशोधक आहे. टर्पिनचें अल्पत्वामुळें घसा सोलण्याचा धर्महि त्या मानानें पिकल्या पानांत कमी राहतो. म्हणूनच पान खाणारे लोक पिकलें पान खाण्यास प्रशस्त मानीत असावेत.

नागवेल तीक्ष्ण, उष्ण, तिखट, कफघ्न, वातनाशक, पचनशक्ति वाढविणारी, आंतड्यांतील घाण नाहींशी करणारी आणि पुनः हृदयास बल व उत्तेजन देऊन त्याचे व्यापार नियमित करणारी अशी आहे. हिचें सेवनानें ज्वराचेंहि नियमन होतें.

१२ (महा)लक्ष्मीविलास

हृदयाच्या अशक्ततेमुळें रुधिराभिसरणाचें कार्य न होऊन सर्वांगास अशक्तता प्राप्त झाल्यासहि क्ष्मीविलासाचा उत्तम उपयोग होतो.

यकृताच्या अशक्ततेमुळें यकृतामधून उत्पन्न पित्तस्राव चांगल्या प्रकारें उत्पन्न न झाल्यानें शयांत अन्नांचें पचन व संशोषण नीट होत , त्यामुळें रस व रक्त हे दोन्ही धातु सकस नाहींत. आणि त्याचमुळें एक प्रकारची सर्व स पांडुता प्राप्त होते. ह्या प्रकारच्या पांडुतेंत फुगणें, अपचन, किंचित् खाल्लें तरी पोट जड ें, आंतड्यांत कुरकुरणें, गुडगुडणें, हीं लक्षणें न असतात. मुख्यतः अग्निमांद्य असतें. असल्या त महालक्ष्मीविलास उत्तम कार्य करतो.

शरीरास कोणत्याहि कारणांनीं अशक्तता प्राप्त ल्यास सर्वेंद्रियांना व अवयवांना योग्य प्रमाणांत क द्रव्यें प्राप्त करून देऊन शक्ति देणारें हें त मूल्यवान् औषध आहे. त्यामुळें शरीरक्षयकर अनेक विकारांत यांचा उपयोग होतो.

महालक्ष्मीविलासाचा संस्कृत पाठः—

सुवर्णताराभ्रकताम्रवंग-
त्रिलोहनागामृतमौक्तिकानि ।
एतत्समं योज्य रसस्य भस्म
खल्वे कृतं स्यात्कृतकज्जलीकम् ॥
सुमर्दयेन्माक्षिकसम्प्रयुक्तं
तच्छोषयेद्द्वि त्रिदिनं च घर्मे ।
तत्कल्कमूषोदरमध्यगामि
यत्नात्कृतं तार्क्ष्यपुटेन पक्वम् ॥
यामाष्टकं पावकमर्दितं च
लक्ष्मीविलासो रसराज एषः ।
क्षये त्रिदोषप्रभवे च पाण्डौ
सकामला सर्वसमीरणेषु ॥
शोफप्रतिश्यायप्रनष्टवीर्ये
मूलामयं चैव सशूलकुष्ठम् ।
हत्वाग्निमांद्यं क्षयसन्निपातं
श्वासं च कासं च हरेत्प्रयुक्तम् ॥
तारुण्यलक्ष्मीप्रतिबोधनाय
श्रीमद्विलासो रसराज एषः ॥

६३३५ भा. भै. र.

नांवः— तारुण्यलक्ष्मीचा उपभोगदर्शक

पाठनिश्चिति

त्रिलोहः— मुंडं कांतं तथा तीक्ष्णं त्रिप्रकारमयः स्मृतम् । (र.र.स.) त्रिलोह ह्या संज्ञेनें मुंड,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांत, व तीक्ष्ण हे तीन लोहप्रकार ग्राह्य समजले जातात. पण वै. सा. सं. त मुंडाऐवजीं मंडूर घेतलें आहे. मंडूर हा लोहाचा गंज आहे. तो प्रत्येक लोहास येतो. त्यांत इतर मलहि असतात, म्हणून तो स्वतंत्र लोह गणत नाहींत. त्याचा समावेश उपलोहांत करतात. तेव्हां मुंड म्हणजे मुंडलोह घ्यावें, मंडूर नव्हे. वै. सा. सं. त 'नागामृतमौक्तिकं च' याचें भाषांतरांत नाग व मौक्तिक आलें आहे. पण अमृत-बचनाग हा पदार्थ राहून गेलेला दिसतो. इतर मराठी हिंदी भाषांतरांतून अगर संस्कृत टीकेंतून अमृत ह्या शब्दाचा अर्थ बचनाग दिला आहे. म. ल. वि. मध्यें बचनाग घातला नाहीं, तर तो म. ल. वि. घेऊं लागतांच क्षयी रुग्णाचे ज्वरोष्म्यांत वाढ झालेली आढळते. बचनागयुक्त महा ल. वि. बाबत ह्या उलट अनुभव येतो, असें चिकित्सकांचें म्हणणें आहे. स्रोतसें शुद्ध करून भस्मांचा मार्ग मोकळा करणारा बचनाग तेथें आवश्यक आहे, शिवाय बच-नाग विष आहे. तत्संयोगानें म. ल. वि. चें कार्य अत्यंत सूक्ष्म स्रोतसांपर्यंत त्वरित जाऊन पोहोंचतें. इतकेंच नव्हे तर विषस्वभावानुसार म. ल. वि. च्या परिणामाचे विवर्त वरचेवर घेत राहिल्यानें त्याचें कार्य हळुंहळूं पण सतत होत राहतें. गुणलाभ छान होतो, असेंहि कांहीं चिकित्सकांचें म्हणणें आहे.

द्रव्यसंग्रहः- १ सुवर्णभस्म, १ मुंडलोह, १ रौप्यभस्म, १ कांतलोह, १ अभ्रकभस्म, १ तीक्ष्ण-लोह, १ नागभस्म, १ बचनाग, १ मौक्तिकभस्म, १ वंगभस्म, १ ताम्रभस्म, ११ रससिंदूर.

द्रव्यनिर्णयः- सुवर्णभस्म (रक्त)

बचनाग- काळा, चित्रक- काळा,

द्रव्यशोधनः- बचनाग - गोदुग्धस्वेदित.

प्रक्रियाः- मध थोडा थोडा घालून जिरवून मधाची भावना द्यावी, एकदम जास्त घालूं नये. २२ तो. मिश्रणास २/२॥ तो. मध पुरतो. द्रव्याची वडी चिनीमातीचे बशींत ठेवून (उन्हांत) सुकवावी. ती वडी एका लहान परळांत ठेवून त्यांवर दुसरें परळ ठेवून संधिबंध मातकापड करून एकवितें लांब रुंद खळेग्यांत दोन गोवऱ्यांचें पुट द्यावें. नन्तर स्वांगशीत झाल्यावर औषध काढावें व चित्रकाच्या काढ्यांत खलावें.

कालः- वर्षाऋतु वर्ज्य; मर्दन-- ७ दिवस

सिद्धिप्रमाणः--१ तो. सुवर्ण तर २२तो. औषध

परिगणनः-- भस्मांचें.

रोगः- धातुक्षय, पांडु, कावीळ, वातरोग, सूज, पडसें, शुक्रक्षय, मूळव्याधि, कुष्ठ, शूळ, अग्नि-मांद्य, सन्निपात, श्वास, कास, ओजःक्षय.

मात्राः- ।° ते १ गुंज.

अनुपानः-- लोणी, मध, खडीसाखर.

टिप्पणीः-- बचनाग प्रथम घातल्यास तो अग्नि-संस्कारांत जळून जातो, व मग त्याचे गुण लाभत नाहींत. म्हणून तो अग्निसंस्कारानंतर घालणें इष्ट ठरतें.

पावक म्हणजे काय ?

पावक=अग्नि, चित्रक इ. र.=.चं.=मध्यें पावक याचा अर्थ अग्नि असा करून म. ल. वि. चा खल तीन दिवस अग्नीवर तप्त खलांत करावयाला सांगि-तला आहे. पण असें केलें म्हणजे त्यामधील रससिंदूर उडतो व वजन घटतें.

रससिंदूर उडणें ही गोष्ट इष्ट नाहीं. आणि अभिप्रेतहि नाहीं. येथें पावक म्हणजे चित्रक हाच अर्थ घ्यायला पाहिजे. चित्रकसुद्धां शीघ्र व सूक्ष्म-स्रोतोगामी आहे.

चित्रक परीक्षा

चित्रकांत बाभळीच्या मुळ्या, सुरूच्या काड्या इत्यादींची भेसळ करतात. ती सहजासहजीं ओळखता येत नाहीं. तेव्हां चित्रक पाण्यांत उगाळून त्वचेवर लावून बघावा. थोड्याच वेळांत तेथें चुणचुण, आग होते, लाली येते. तो चित्रक खरा जाणावा. नंतर लेप धुवून तेथें तूप लावलें कीं, सर्व वेदना शांत होतात. विवर्णता जाते; व त्वचेस कांहीं इजा पोहोंचत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रक्रिया

प्रथम प्रत्येक पदार्थ नादरहित झाला असल्याची, तो खलून, खात्री करून घ्यावी. नंतर …र व सुवर्ण यांचें एकजीव मिश्रण करावें. इतर औषधें एकत्र करून त्यांचें मिश्रण एकरूप …. आणि मग दोन्हीं मिश्रणें पुनः एकत्र करून …ति. सर्व मिश्रण एकवर्ण झालें कीं, खल योग्य असें जाणावें.

मधुभावन

शुद्ध मध वजन करून घ्यावा. त्यांतून अगदीं थोडा मध घालीत मर्दन सुरूं करावें. मर्दन-उष्णतेनें मध पातळ होतो. तो अधिकाधिक …मिळवीत जातो. मध अदृश्य झाला कीं, तें …बरयानें हळूंहळूं ठेंचावें म्हणजे पुन्हां तो चमकूं …. अशा तऱ्हेनें युक्तीनें मध मिळवावा. व …वि. मिश्रणाची वडी तयार करावी. ती वडी …तीचे बर्शीत घालून उन्हांत ठेवून सुकवावी.

मधुमान

मध योग्य प्रमाणांत पडला असला तर वडी ठेवल्यानें ती रेळत नाहीं, किंवा बर्शीत डकत …ती वरचेवर जरा चिकट होते, व चटकन् सुकते. …त्र प्रखर पाहिजे. वडी वाळली कीं मोडन …शुष्क पदार्थ कट्कन् मोडतो.

मध जास्त प्रमाणांत पडला तर त्यांत पुनः …वि. मिश्रण मिळवून मधुमान माफक करावें. …र्मितीच्या मानानें खप नसला तर मात्र हा …रखोयीचा आणि महागहि पडतो. तेव्हां अशा-…ा मार्ग अवलंबिणें श्रेयस्कर नाहीं.

मध जास्त पडला ही गोष्ट खलतांनाच, नाहीं-…वितांना तरी लक्षांत येते. असें झालें कीं, ती …ओल्या फडक्यांत गुंडाळून ठेवावी. मध हळूं-…प्यार्शी मिसळतो व पुष्कळसा कमी होतो, …ा वडीचा खल पाण्यांत करावा. खल स्थिर …वावा. सर्व औषधीमिश्रण तळाशीं बसतें. सर्व …ण्यांत विरघळतो. ती वरची निवळी हळूच पिचकारीनें ओढून घ्यावी व खल सावलींत सुकवावा. मग पुन्हां मधुभावनविधि जरा अधिक दक्षतेनें करावा म्हणजे सर्व पुन्हां ठीक जमतें.

अग्निसंस्कार

म. ल. वि. मध्यें मध घालतात तो सर्व औषधांस सारखा लागावा म्हणून. मर्दनजन्य उष्णतेनें तो पातळ करून त्यांत औषध खलतात. नंतर त्या मधांतील आर्द्रता दूर व्हावी म्हणून मर्दनाचे ऐवजीं आतप संस्कार सांगितला आहे. पण उन्हानेंहि पूर्ण काम भागत नाहीं. आर्द्रताशोषक धर्म मधांत शिल्लक उरलेलाच असतो. तोहि निःशेष व्हावा म्हणून मर्दन व आतपापेक्षां जरा वरचा असा तार्क्ष्यपुटाचा अग्निसंस्कार करतात. ह्यानें सर्व काम छान साधतें.

बाष्प-शोषणीचा उपयोग

मधाचें प्रमाण जसें नक्की ठरवितां आलें तसें पदार्थ व उष्णतामान व तिचा काल हींहि निश्चित सांगतां यायला हवींत. ही गोष्ट कदाचित् (steam-oven) बाष्प-शोषणीनें साधेलसें वाटतें.

हें औषध फारसें वापरत नाहीं.

लावक, कपोत, कुक्कुट, तार्क्ष्य इ. (लावा, कबुतर, कोंबडा, गरुड,) अशीं निरनिराळ्या पक्ष्यांचीं नांवें अग्निपुटास दिलीं आहेत. येथें तार्क्ष्यपुट विहित आहे. परंतु औषधी कल्काचें मान सांगितलेलें नाहीं. यामुळें परंपरेचा आश्रय करणें जरूर पडतें.

तार्क्ष्यपुटाचा विधि

दोन छोटीं परळें घ्यावींत. त्यांत शुष्क चकती ठेवावी. दोन्हीं परळें एकमेकांवर संमुख ठेवून संधीस गोपीचंदनानें लपेटलेली कापडाची पट्टी घट्ट गुंडाळावी. व हा लेप सावलींत सुकवावा. नंतर एक वीत लांब रुंद खोल खळगा खणून त्यांत दोन गोवऱ्यांचे लहान तुकडे पेटवावेत. धूर व ज्वाळा निघून गेल्यावर ते गोवरीचे तुकडे सारून त्यांत वरील संपुट ठेवावें. संपुट खालून वरून तापलें कीं, हातांनीं उचलून घ्यावें. निवांत प्रदेशीं ठेवावें. तेथेंच तें थंड होऊं द्यावें. नंतर संपुट खोलून वडी बाहेर काढून घ्यावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अग्निमान

याग	रंग	रूप	स्पर्श	भार	भंग
हीन	लाल	तकतकीत	गुळगुळीत	जास्त	चिक्कण
सम्यक्	,,	रूक्ष	खरखरीत	योग्य	कठीण
अति	काळा	धूसर	खडबडीत	कमी	भंगूर

हीनयोग झाला तरः- तापलेल्या परळांत वडी हातानें खालींवर करून शेकावी. वडी हातांत धरतां येईल इतकी ती गरम हवी.

अतियोग झाला तरः- बचनाग जळतो व रससिंदूरहि उडतो. म्हणून वजन घटतें. तेव्हां प्रथम पूर्व वजनाइतका बचनाग घालावा. आणि मग राहिलेलें वजन र. सिं. नें भरून काढावें. म्हणजे सर्व द्रव्यें पूर्ववत् आणि अपेक्षित प्रमाणांत होतात.

मर्दन

प्रथम वडी कोरडीच खलावी. चूर्णाच्या घड्या पडूं लागल्या म्हणजे त्यांत चित्रकमुळाचा काढा घालावा. खल ७ दिवस करावा. नंतर ६।६ गुंजेच्या गोळ्या करून त्या उन्हांत सुकवाव्यात.

१३ (सिद्ध) लक्ष्मीविलास

प्रास्ताविकः-हा सौम्य पौष्टिककल्प आहे. शुष्क कास व थोडा बहुत दमा असतां, तसेंच पित्तप्रकृतीच्या रोग्यांना क्षयांत चांगला मानवतो. बाल, तरुण, वृद्ध, गर्भिणींना चांगला उपयुक्त ठरतो.

सिद्धलक्ष्मीविलासाचा संस्कृत पाठ

हेमभस्म च भागैकं रौप्यभस्म द्विभागिकम् ।
शुल्बभस्म त्रिभागञ्च कान्तभस्म चतुर्गुणम् ॥
पंचभागं च तीक्ष्णं स्यान्मण्डूरं षाड्भागिकम् ।
निश्चन्द्रं व्योमकं चैव भस्म स्यात्सप्तभागिकम् ॥
अष्टभागञ्च वङ्गं स्यान्नागं स्यान्नवभागिकम् ।
दशैकादशभागे च प्रवालमौक्तिके मृते ॥
खल्वमध्ये निधायाऽथ तत्तुल्यं सूतभस्मकम् ।
मर्दयेत्प्लावितं द्रव्यैर्भावयेज्जातिपत्रकैः ॥
त्रिकटु-त्रिफला-चातुर्जात-द्रावैश्च कौंकुमैः ॥
मृगनाभिरसैश्चैव मुनिवारान् पृथक् पृथक् ॥
गुंजामात्रां लिहेत्सम्यक् सिता २२ ज्यमधुसंयुतम् ।
राजरोगं निहन्त्याशु पाण्डुरोगविनाशनम् ॥
द्वंद्वजं छर्दिरोगञ्च श्वासं कासञ्च कामलाम् ।
दीर्घवातं पंचगुल्मान् सर्वशूलं विनाशयेत् ॥
उन्मादं च मतिभ्रंशमष्टोदरमहागदान् ।
मेहानां विंशतिं चैव षण्ढत्वं च क्षयं नयेत् ॥
अरोचकमग्निमान्द्यं ग्रहणीदोषनाशनम् ।
वलीपलितविध्वंसि नाशयेत्कुम्भकामलाम् ॥
दृष्टिपुष्टिकरं बल्यं कम्पवातश्च नाशयेत् ।
असाध्यरोगनाशाय साध्यो लक्ष्मीविलासकः ॥

२४० र. यो. सा.

नांवः- लक्ष्मीविलास नं. १ प्रमाणें.

पाठनिश्चितिः- रसायन, बल्य, व हृद्य, दृष्टि पुष्टिकर म्हणून उध्दृत केला.

द्रव्यसंग्रहः- १ सुवर्णभस्म, २ रौप्यभस्म, ३ ताम्रभस्म, ४ कांतभस्म, ५ तीक्ष्णलोह, ६ मंडूर भस्म, ७ अभ्रकभस्म, ८ वंगभस्म, ९ नागभस्म, १० प्रवाळभस्म (चं. पु.) ११ मौक्तिकभस्म (चं.पु.) ६६ रससिंदूर.

भावनाद्रव्यः- १) हिरडा-फोल-क्वाथ
२) बेहेडा-फोल-क्वाथ ३) आवळकंठी-फोल-क्वाथ
४) सुंठ-कंद-फांट ५) मिरें-फल-फांट
६) पिंपळी-फल-फांट ७) जायफळ-फल-फांट
८) वेलची-फल-फांट ९) नागकेशर-फल-फांट
१०) तमालपत्र-पान-फांट ११) दालचिनी-साल-फांट
१२) केशर-हिम १३) कस्तूरी-हिम.

प्रत्येकीं ७।७ भावना देणें.

द्रव्यनिर्णयः- सुवर्णभस्म (रक्त)
प्रवाळभस्म (चं. पु.) मौक्तिकभस्म (चं. पु.)

द्रव्यशोधन

प्रक्रियाः- द्रव्यसंग्रह एकत्र खलून तो एक जिन्नसी झाल्यावर त्यास भावनाद्रव्यांच्या ७।७ भावना वर लिहिलेल्या क्रमानें देणें.

कालः- प्रारंभ-शरद; मर्दन काल-१ वर्ष.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सिद्धिप्रमाणः- १ तोळा सुवर्णभस्म घेतलें तर ,, तोळे औषध तयार होतें.

परिगणनः- भस्मांचें.

रोगः- क्षय, पांडु, कावीळ, खोकला, दमा, ..., गुल्म, शूल, उन्माद, मतिभ्रंश, महारोग, मेह, ...कत्व, अरोचक, अग्निमांद्य, ग्रहणी, कंपवात, ...लित, कुंभकामला.

मात्राः- १ गुंज

अनुपानः- तूप, मध, खडीसाखर

नागकेशर व काश्मीरी केशर

टिप्पणीः-काळे आणि तांबडे असे नागकेशराचे ... प्रकार बाजारांत मिळतात. वस्तुतः "के जले शीर्यत ..." पाण्यांत विरतें तें केशर. आणि असा पदार्थ ...ांस केशर ह्या शब्दानें पाहिजे आहे. बाजारांत ...णारे दोन्ही प्रकार असे नसतात. नागचाफ्याच्या ...चें केशर तें खरें नागकेशर. हें सहसा बाजारांत ...त नाहीं. अगदीं खात्रीचे वैद्यास सांगून ठेवून ...णवावें लागतें. कर्नाटकांत हें मिळूं शकतें. तें ...त्यावें. दुसरें काश्मिरी केशर. ह्याचीहि खूण हीच ... तें जिभेवर टाकलें अगर चिमटींत पाण्याबरोबर ...लें तर तें सर्व विरलें पाहिजे. खालीं कांहींहि ... राहतां कामा नये. केशर आणि कस्तूरी हे ... पदार्थ पाण्यांत विरवून त्या पाण्याचा भावना म्हणून उपयोग करावा. सामान्यतः १३२ तोळे ...यास सात सात भावनांकरितां केशर व कस्तूरी ...यें पाव पाव तोळा प्रमाणांत लागतात.

भावना पूर्ण होण्यास १ वर्ष

११ भावना देण्यास कमींतकमी एक वर्ष ...ें. कालमानानुसार मजुरीहि वाढते. ही मजुरी ... अगर ४० तोळयास सारखीच पडते. परंतु ह्या ...चा खप फार नसतो. तेव्हां अशीं प्रदीर्घ काल ... व भांडवल आणि पदार्थ अडकविणारीं औषधें ...री पद्धतीनें करावींत; म्हणजे महौषध उत्तम ...ें, ताजें मिळतें आणि पुनः खात्रीचें असतें.

वैद्यास औषधाबद्दल खात्री हवी

रोग्यास वैद्याबद्दल विश्वास वाटावा लागतो. औषधाबाबतहि वैद्यास खात्री यावी लागते. त्यांतून स्वतः केलेलें औषध किफायतशीर भावांत पडल्यानें वैद्याची प्रवृत्ति अशीं महान् औषधें वापरण्याकडे सहज होते. अर्थात् रोगीहि चांगल्या तऱ्हेनें बरे होतात.

" गृहवैद्य "

क्षारचिकित्सेवरील लोकप्रिय ग्रंथ. नवीन भावनाकोशासह किं. फक्त ३ रु. ट. ख. निराळा.

(१) वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

(२) डॉ. गर्दे, २६ मोंगल लेन, मुंबई १६

मुरडा, जुनाट हगवण यावरील रामबाण औषध

अँटी डीसेंट्रॉल

हें औषध आयुर्वेदीय औषधी द्रव्यांपासून तयार केलें आहे. यांत पर्पटी, जायफळ, इंद्रजव, कुडासाल, कापूर आदि द्रव्यें आहेत, जुनाट अतिसार, मुरडा, आमांश (प्रवाहिका) व हगवण या विकारांत हीं द्रव्यें गुणकारी असल्याचें सिद्ध आहे.

कितीहि जुलाब होत असले तरी हें औषध दिलें असतां पहिल्याच दिवशीं गुण दिसूं लागतो. वैद्य डॉक्टर आदि सर्व चिकित्सापंथाचे लोक हें औषध सध्यां वापरीत आहेत. आपणहि आजच आपल्या चिकित्सा कार्यांत अँटीडीसेंट्रॉल वापरून यश प्राप्त करा.

किंमत २४ गोळयांची १ रु.

व २५० गोळयांची ८ रु.

ऊंझा फार्मसी लि., ऊंझा (गुजराथ)

एजन्टः— जयंत अँड कंपनी, लक्ष्मीरोड, पुणें सिटी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तृणज्योतिष्मती

---x---

(श्री. नाना बापट यांचें श्री. छांगाणीजी यांना पत्र)

आयुर्वेदबृहस्पति आदरणीय छांगाणीजी,

आपला 'भवितव्य' (नागपूर) मध्यें प्रकाशित झालेला संस्कृत लेख मी वाचला. वाङ्मय आणि विज्ञान या उभय दृष्टींनीं तृणज्योतीवरील हा लेख अत्यंत आकर्षक असा लिहिला गेला आहे. मला जी वस्तु उपलब्ध झाली ती गुणग्राहक तज्ञांकडे पोहोंचविण्यास निमित्तमात्र मीं कारण आहे. मला धन्यवाद देऊन आपण जो माझा गौरव केला त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे.

मी मंडळाच्या कांहीं कामाकरितां दिल्ली व जयपूर येथें गेलो होतो. तेथेंहि मी तृणज्योति वनस्पति, विद्वान् व तज्ञ लोकांपुढें ठेविली, व तिची योग्य छाननी करून जर ती औषधीदृष्टया उपयुक्त वस्तु असेल तर तिचा औषधीकरणाचें कामीं उपयोग केला जावा, अशी माझी स्वतःची इच्छा मी प्रदर्शित केली.

विद्वान् पंडितांनीं तृणज्योति वनस्पतीचें तेज अनुपम असल्याचें मान्य केलें, परन्तु अद्याप पावेतों तिच्या खऱ्या गुणधर्माबद्दल शोध लागलेला नाहीं असें ते म्हणाले.

माझ्याजवळ असलेल्या तृणज्योतीच्या मुळ्यांच्या कांहीं विशेष गुणधर्मांचें वर्णन मी आपणास सादर करीत आहे.

१) मुळ्या दुधांत कुसकरल्या असतां दुधाचा रंग लाल होत नाहीं.

२) मुळी जुन्या वाळलेल्या तृणाची घ्यावी. मातीसकट मुळी उपटावी. मातीसकट ती असेतोंपर्यंत तिचें तेज कायम व स्थिर असतें.

३) माती धुतली असतां तृणासकट मुळी दीप्तिमान् दिसते. कालांतरानें मुळीवर पातळसा थर जमतो. परंतु तो पुन्हां पाण्यानें धुतला असतां मुळी पुन्हां प्रकाशित होते.

४) १०-१५ दिवस वारंवार मुळी धुतल्यानंतर त्या तृणाचें तेज नष्ट होतें.

५) ह्या तृणाच्या नवीनच उगवलेल्या कोंवळ्या झाडांना तेज नसतें.

६) ह्या तृणाच्या मुळ्यांचा प्रकाश शुभ्र हिऱ्याच्या प्रकाशाप्रमाणें असतो.

७) प्रकाश तृणाच्या कणाकणांतून असतो. माझ्याजवळ मुळ्यांच्या मातीनें भरलेलें एक पात्र होतें व त्यांत असंख्य तृणकण होते. एक दिवस रात्रीं तें भांडें जमिनीवर पडून त्यांतील माती जमिनीवर पसरली, तेव्हां आकाश जसें असंख्य ताऱ्यांनीं दीप्तिमान् दिसतें तशी तृणज्योति वनस्पतीच्या कणांनीं युक्त असलेली माती घरांतील ज्या जमिनीवर पसरली गेली ती जमीन दीप्तिमान् दिसूं लागली. तें दृश्य अनुपम होतें.

डिंडोरी येथील दोन गृहस्थ तृणज्योतीच्या सेवनाचा प्रयोग करून पाहात आहेत. त्यापैकीं एक गृहस्थ ६० वर्षांहून अधिक वृद्ध असून त्यांचे दाढी, मिशा व डोक्याचे केसहि पांढरे झालेले आहेत. त्यांना तृणज्योतीचें सेवन करण्यास सुमारें २५ दिवस होऊन गेले व ह्या कालांत त्यांचे केस थोडथोडे काळसर व्हवयास लागले आहेत. दुसरे गृहस्थ ४० वर्षांचे असून त्यांच्या आवाजांत सुधारणा झाली असून त्यांना स्वतःस अधिक जोम आल्याचा अनुभव येत आहे.

तिसरा एक अनुभव असा आहे कीं, तृणज्योति वनस्पति जवळ बाळगल्यास मनुष्याची कामना सिद्ध होते. परंतु हा व्यक्तीच्या मनोभावनेचा खेळ आहे असेंहि असूं शकेल.

तृणज्योति दुधांत कुसकरून तें रसयुक्त दूध प्रातःकालीं सेवन करावें. हा याचा सेवनविधि आहे.

अपथ्य– खारट, आंबट पदार्थ वर्ज्य आहेत.

पथ्यः– दूधभात व ब्रह्मचर्य पालन करावें. गाईचें दूध विशेष उपयुक्त आहे.

वनवासी सेवा मंडळ, मंडला (म. प्र.)

(सही) नाना बापट
सहमंत्री

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही बिकट समस्या आयुर्वेदानेंच सुटेल !

राष्ट्रशक्ति [नागपूर] चा अग्रलेख

दिल्ली येथें लवकरच आरोग्य विभागांतील अधिकाऱ्यांच्या शिक्षणासंबंधीं चर्चा करण्यासाठीं एक बैठक होणार असून त्या बैठकींत भाग घेण्यासाठीं मध्यप्रदेशाचे स्वास्थ्यमंत्री ना. कन्नमवार यांना प्रांतिक सरकारनें पाठविलेलें आहे. भारतीय समाजाची आजची आरोग्यविषयक अवस्था, जगांतील कोणत्याहि समाजाच्या तुलनेनें अत्यंत निकृष्ट असून बालमृत्यु, प्रसूतिमृत्यु, क्षय, महामारी यांसारख्या नरसंहारक रोगांचें प्रमाण भारतांत इतर देशांच्या तुलनेनें फारच अवाढव्य आहे. व या भयंकर संकटांतून समाजाचें रक्षण करण्यासाठीं आरोग्यशास्त्रज्ञ लोकांची जेवढी मोठी संख्या असणें आवश्यक आहे तेवढी आज दुर्दैवानें नाहीं. सध्यां संपूर्ण भारतांत डॉक्टरांची संख्या ...०० इतकी आहे. वास्तविक ही संख्या कमींत कमी १ लक्ष ८५ हजार इतकी असावयास हवी. आज ज्या क्रमानें आयुर्विद्येचा प्रचार देशांत होत आहे, त्या गतीनें पाहतां ती संख्या जेमतेम पुरी होण्यास ४० वर्षें लागतील. (तेवढ्या कालावधींत हयात असलेले डॉक्टर सुखरूप राहिले तरच !).

स्वास्थ्यनिरीक्षकांची आवश्यकता

आज भारतांत ७ लक्ष ४० हजार परिचारिकांची आवश्यकता आहे. पण प्रत्यक्षांत ही संख्या मात्र १२ ... इतकी कमी आहे. डॉक्टर व परिचारिका यांचें प्रमाण सरासरी १'६ असें पडतें. वास्तविक हें प्रमाण याहि अधिक मोठें असावें असें तज्ज्ञांचें मत आहे. परिचारिकांची ही संख्या पूर्ण होण्यासाठीं सरासरी ... वर्षें लागतील. स्वास्थ्य-निरीक्षकांची संख्या ...०० इतकी असणें वास्तविक आवश्यक आहे. प्रत्यक्षांत ती फक्त १००० इतकीच आहे. ही संख्या पूर्ण होण्यासाठीं निदान ४० वर्षांचा कालावधि आवश्यक आहे. सुइणींची संख्या सरासरी ९ लक्ष २६ हजार हवी. पण सध्यां ती फक्त १२ हजार इतकीच आहे. अपेक्षित संख्या पूर्ण होण्यास निदान १५ वर्षें तरी लागतील. तात्पर्य, भारताचें आरोग्य सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीनें तज्ज्ञांची जी कमींत कमी संख्या आवश्यक आहे ती आजच्या तरुण पिढीला आपल्या आयुष्यांत तरी पूर्ण झालेली पाहावयास मिळणार नाहीं, अशी वस्तुस्थिति आहे.

दोन समस्यांचा विचार

देशामध्यें एकीकडे अशा प्रकारें लक्ष लक्ष आरोग्यतज्ज्ञांची भयंकर उणीव भासत असतांना लक्ष लक्ष सुशिक्षितांच्या बेकारीचा प्रश्न आ वासून उभा आहे. तो लवकर न सोडविला तर भयंकर स्वरूपाची अनपेक्षित परिस्थिति निर्माण होण्याची भीति पुढाऱ्यांना ग्रासत आहे. आरोग्यतज्ज्ञांची उणीव व सुशिक्षितांची बेकारी या दोन समस्यांचा एकसमयावच्छेदेंकरून विचार केला तर दोन्ही समस्यांचा उलगडा झाल्यावांचून राहत नाहीं. समाजाला ज्या प्रकारचें शिक्षण घेऊन तयार झालेले सुशिक्षित हवेत त्याप्रकारचें शिक्षण देण्यांत येत नसल्यानें सुशिक्षित समजले जाणारे लोक बेकार राहतात, व बेकारीची संख्या इतकी मोठी असून विशिष्ट क्षेत्रांतील तज्ज्ञांची उणीव तशीच कायम राहते या दृष्टीनें आधुनिक शिक्षणपद्धतींत तातडतोब क्रांतिकारक परिवर्तन होणें नितान्त आवश्यक आहे.

माणसाचा कारकून बनविणारें शिक्षण

माणसाचा कारकून (व तोहि अपात्र) करणारें शिक्षण तातडतोब बन्द होऊन त्याऐवजीं देशाला आज ज्या प्रकारच्या तज्ज्ञांची आवश्यकता आहे असे तज्ज्ञ निर्माण करणारें राष्ट्रहितोपयोगी शिक्षण तातडतोब सुरू झालेंच पाहिजे. आयुर्विद्या-तज्ज्ञांची उणीव आजच्या योजनेनुसार कमींत कमी ३० वर्षांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जेमतेम भरून निघेल. एवढ्या काळांत आजच्या शिक्षणपद्धतींतून आजच्या बेकारांच्या संख्येंत भर घालणारे कोट्यावधि बेकार निर्माण होतील. तात्पर्य, या सर्व समस्यांचा विचार केल्यास त्यांतून देशाची सुटका होणें फारच कठीण आहे असें दिसून येतें.

नवीन उद्भवणाऱ्या समस्या

देशाची आरोग्यसमस्या सोडविण्यासाठीं जें पाश्चात्य पद्धतीचें शिक्षण आज देण्यांत येत आहे, त्यामुळें तज्ज्ञांच्या संख्येची समस्या कदाचित् सुटली तरीहि केवळ या परकीय विद्येमुळें आणखी निराळ्याच स्वरूपाच्या समस्या उद्भवण्याची शक्यता आहे. याचें कारण आज पाश्चात्य पद्धतीच्या आरोग्य-विद्यालयांतून देण्यांत येणारें शिक्षण सर्वस्वी पराधीन व परावलंबी आहे. आजचा प्रत्येक डॉक्टर हा युरोपियन किंवा अमेरिकन औषधांच्या कारखान्याचा फार मोठा एजंट आहे. परकीय उद्योगधंद्याचे एजंट एवढ्या मोठ्या प्रमाणांत वाढविणें म्हणजे आपला देश हा परक्यांची बाजारपेठ करणेंच नव्हे काय?

नागरिकांची आर्थिक परिस्थिति

हिंदुस्थानच्या सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक परिस्थिति व सेग्यांकडून वारेमाप पैसे उकळण्याची डॉक्टरांची (विदेशी औषधांच्या एजंटाची) बकासुरी पद्धति यांचा विचार केला म्हणजे हा रक्षणाच्या नांवानें शोषण करणारा भयंकर वर्ग जितक्या लवकर कमी करतां येईल तितकें योग्य असें म्हणण्यावांचून गत्यंतर नाहीं. आजचा सर्व सामान्य डॉक्टर फीच्या नांवानें भयंकर शोषण करीत असल्यानें दवाखान्याच्या भोवतालीं राहणारे गरीबगुरीब अगदीं शेवटच्या घटकेपर्यंत त्या दवाखान्याचा उंबरठा ओलांडण्याचें धाडस करीत नाहींत. कारण त्यांना अशी भीति वाटते कीं, डॉक्टरची गोळी कदाचित् चुकून लागू पडली तर रोगी जगूनहि केवळ डॉक्टरच्या देण्यापायीं अर्धमेला झाल्याशिवाय राहणार नाहीं; औषधानें जगला तर फीच्या काळजीनें झुरून मेल्याशिवाय राहणार नाहीं.

विदेशी औषधांचा काळाबाजार

विदेशी औषधांच्या तयार बाटल्यांतून औषधांच्या नांवानें आज काय काय विकण्यांत येत आहे ? व विदेशी औषधांचा काळा बाजार हा सर्वत्र कसा माजला आहे ? याची माहिती प्रत्यक्ष आमचें सरकारच बोलपटांच्या द्वारा जनतेला पुरवीत आहे. अशा परिस्थितींत देशाचें आरोग्य रक्षण करण्याच्या दृष्टीनें प्रचलित परकीय आयुर्विद्या मुळींच हितकर होणार नाहीं.

राक्षसी मेडिकल कॉलेज

अद्यावत् पाश्चात्य पद्धतीचें 'मेडिकल-कॉलेज' उभारणें हें किती प्रचंड खर्चाचें आहे याची कल्पना नागपूरच्या राक्षसी मेडिकल कॉलेजकडे पाहून कोणालाहि येऊं शकेल; व एवढें महाग शिक्षण घेऊन तयार होणारीं श्रीमंतांचीं पोरें, गरिबांच्या सेवेकरतां खेड्यापाड्यांत जावयास सिद्ध न झाल्यानें खेड्यांतील आरोग्य आहे त्याच अवस्थेंत राहील.

आयुर्वेदाचा प्रचार आवश्यक

अशा परिस्थितींत समाजाच्या सर्वांगीण हिताचा विचार करून आजपर्यंत उपेक्षिल्या गेलेल्या, पण आजपर्यंत शतकानुशतकें जिनें समाजाचें प्राणरक्षण केलें अशा भारताच्या परंपरागत आयुर्वेदविद्येचा कसोशीनें जास्तींत जास्त प्रचार होणें हें अत्यंत आवश्यक आहे. निरनिराळ्या वैद्यकीय पद्धतींचे मतभेद शतकानुशतकें चालत आलेले आहेत व ते शेवटपर्यंत कदाचित् संपणारहि नाहींत.

दोष सर्वत्र आहेत

ॲलोपॅथीचे पुरस्कर्ते आयुर्वेदांतील व होमिओपॅथींतील दोष दर्शवितात, तसे इतर पद्धतींचे पुरस्कर्ते ॲलोपॅथींतील दोषहि स्पष्टपणें दर्शवूं शकतात. इंग्रजांनीं भारतांत ॲलोपॅथीचा जास्त पुरस्कार केला याचें कारण ती पद्धति अधिक श्रेष्ठ आहे हें नसून तिच्या प्रचारामुळें त्यांचें डबलढ पांढरें होणार होतें हें आहे. इंग्रजांनीं भारतांत प्रचलित केलेली प्रत्येक गोष्ट त्यांच्या व्यापारी धोरणास अनुसरून होती ही गोष्ट उघड आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विकट समस्येंतून मार्ग

…शा परिस्थितींत आज ज्याप्रमाणें इंग्रजांच्या …न मुक्त होण्यासाठीं इंग्रजी भाषेचें भूत गाडून …ला आम्ही चंग बांधला आहे त्याच उत्साहानें आवेशानें इंग्रजांनीं भारतांत आणलेली प्रत्येक … मुळापासून. उलटून फेकणें नितान्त आवश्यक भारताची आयुर्विद्याविषयक समस्या सोड- …ा विचार करतांना भारतीय आयुर्वेदविद्येचें व तिचें राष्ट्रीय महत्व पूर्णपणें लक्षांत घेऊनच शासनकर्ते या विकट समस्येंतून मार्ग काढतील

—२५ सप्टेंबर १९५३

रात्रीं दूध प्यावें काय ?

(" रात्रीं दूध पिऊं नये ! " या शीर्षकाखालीं …चे वैद्य श्री. नीलकंठराव पटवर्धन यांचें अभि- …वार दि. ९ ऑगस्टच्या 'केसरी'त सातव्या … प्रसिद्ध झाल्यानंतर त्यासंबंधींची अधिक … विचारणारीं, त्या मतास पुष्टि देणारीं व त्यावर …देणारीं अनेक पत्रें केसरीकडे आलीं. त्यांपैकीं पुढें दिलीं आहेत. —संपादक केसरी)

(१)

… ऑगस्ट १९५३ च्या रविवारच्या अंकांत …चे वैद्य श्री. नीलकंठराव पटवर्धन यांचें रात्रीं … पिण्यासंबंधींचें मत प्रसिद्ध झालें आहे त्यावर …म्हणजे—

"…भोजनान्ते पिबेत् तक्रं वासरान्ते पिबेत् पयः ।
…शान्ते च पिबेत् वारि तस्य रोगो न जायते ॥ "

असें जें म्हटलें जातें त्याची वाट काय ?

—कृ. ह. मनोहर

(२)

…वाचकांची जिज्ञासातृप्ति करण्याची रविवारच्या …री 'त आपण व्यवस्था केलीत व आरोग्यविषयक …ची माहिती देण्याचा पायंडा पाडलात याबद्दल … अभिनंदन.

परंतु 'रात्रीं दूध पिऊं नका' या ९ ऑगस्टच्या …तील उताऱ्यामधील अपसिद्धान्त चव्हाट्यावर आणतां येईल असें वाटतें. त्या लिखाणांतील विधानांचा आधार स्पष्ट व्हावा ही विनंति.

कामशेत —डॉ. भारद्वाज

३

आयुर्वेदीय वचनांशीं विसंगत

रविवार दिनांक ९ ऑगस्टच्या केसरी मध्यें 'रात्रीं दूध पिऊं नका !' या मथळ्याखालीं वैद्य श्री. नीलकंठराव पटवर्धन यांचा जो मजकूर प्रसिद्ध झाला आहे तो आयुर्वेदीय वचनांशीं विसंगत आहे.

अध्यशन कशास म्हणतात ?

" रात्रीं जेवणानंतर दूध पिऊं नये, प्याल्यास अध्यशन होऊन जेवलेलें व खाल्लेलें आंवतें " हें म्हणणें बरोबर नाहीं. 'अजीर्णे भुज्यते यत्तु तदध्यशन- मुच्यते' व 'विद्याद्ध्यशनं भूयो भुक्तस्योपरि भोजनम् ।' अजीर्ण झालें असतां जेवणें व जेवण झाल्याबरोबर जेवणें याला अध्यशन म्हणतात. जेवल्याबरोबर दूध पिण्यांत अजीर्णाचा संबंध येतो कोठें ? आणि केवळ दूध कांहीं भोजन होत नाहीं. अगोदर जड अन्न किंवा प्रमाणापेक्षां अधिक अन्न घेतलें असेल तर वरती आणखी दूध घेतल्यास अजीर्ण होण्याचा संभव आहे इतकेंच.

१ कप दूध = एक जेवण !

कपभर दूध प्यायल्यास तें एक वेळच्या पूर्ण जेवणाचें काम करतें ' असें श्री. नीलकंठराव पटवर्धन म्हणतात. त्यांना आजच्या कपाचें प्रमाण अभिप्रेत असेल तर त्यांचें हें म्हणणेंहि व्यवहारांत टिकणार नाहीं ! कारण आजचा प्रचारांतील कप म्हणजे चहाचा प्याला, ४ ते ६ औंसाचा असतो व तेवढें दूध एक वेळची भूक भागविण्यास खास समर्थ नाहीं ! आजच्या रेशनिंगच्या काळांत असा कांहीं चमत्कार होणार असेल तर भारताचा अन्नप्रश्न व आर्थिक समस्या लवकर सुटेल ! एक वर्षाच्या आंतील लहान बालकालाहि दिवसभर पाऊणशेर ते सव्वाशेर दूध लागतें (शेर ३२ औंस). मग मोठ्या माणसाला ४ ते ६ औंस दूध एकवेळच्या जेवणाबद्दल कसें पुरेल ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मंद अग्नि, कफाधिक्य

ज्याचा अग्नि मन्द असेल, कफाधिक्य विकृति असेल, अगोदरच्या जेवणाचें अजीर्ण झालें असेल, जड पदार्थ भक्षण केले असतील, त्यानें अजीर्ण होण्याची शक्यता असल्यामुळें दूध घेऊं नये, असें म्हणणें सयुक्तिक होईल. जेवणानन्तर तीन तासपर्यंत रसाची उत्पत्ति होत असल्यामुळें त्या रसोत्पत्तीला अडथळा होईल म्हणून 'जेवणानन्तर दूध पिऊं नका' हें म्हणणें इष्ट ठरेल. "याममध्ये न भोक्तव्यम्, यामयुग्मं न लंघयेत्। याममध्ये रसोत्पत्तिः यामयुग्मात् बलक्षयः॥" जेवणानन्तर पहिल्या तीन तासांत रसोत्पत्ति होत असते म्हणून पुनः जेवूं नये; व सहा तासानन्तर न जेवल्यास बलक्षय होतो. अर्थात् हें प्रमाणहि अन्न जिरलें न जिरलें हें पाहूनच भोजनकाल ठरविण्याचें आहे.

दोन प्रकारचे लोक

आज दूध पिणारे लोक दोन प्रकारचे आहेत. शेवटीं दूध घेऊन जेवण संपविणारे व जेवणानन्तर झोंपण्यापूर्वी रात्रीं दूध पिणारे; त्यांना अजीर्णाची शंका नसल्यास दूध पिण्यास मुळींच हरकत नाहीं.

रात्रीं दूध कोणी प्यावें ?

"विदाहीन्यन्नपानानि दिवा भुंक्ते हि यन्नरः।
तद्विदाहशान्त्यर्थं रात्रौ क्षीरं सदा पिबेत्"
"बाले वृद्धिकरं, क्षयक्षयकरम् वृद्धेषु रेतोवहं, रात्रौ पथ्यमनेकदोषशमनं क्षीरं सदा सेव्यते॥"

या दोन्ही सूत्रांत रात्रीं दूध प्यावें असें स्पष्ट सांगितलें आहे व त्याचे गुणहि सांगितले आहेत.

मुंबई — वैद्य कृ. के. कानिटकर, आयुर्वेदभिषक्

आचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी
यांचा नवा पत्ताः—
द्वारा—आयुर्वेद संशोधन कार्यालय
एल्. आय्. टी., नागपूर (म. प्र.)

वाचकांचा पत्रव्यवहार—

एक पारद-प्रयोग

अग्नीमध्यें न जळणाऱ्या (कंटकवेधी) धातूचें अग्नीशिवाय भस्मः— सिगारटच्या पेटीमध्यें पांढरा चकचकीत पातळ कागदासारखा धातूचा पत्रा असतो. तो पारद्यांत थोडावेळ (सुमारें ४।५ मिनिटें) बुडवावा. नंतर बाहेर काढून हातामध्यें तसाच धरावा किंवा त्याची गोळी करावी. थोड्याच वेळांत सदर पत्र्याचें जो अग्नीमध्यें कितीहि वेळ धरला तरी ज्याचें भस्म होत नाहीं— भस्म होऊं लागतें. सदर धातु भस्माचे गुणधर्म इत्यादि कोणास माहित असल्यास कळवावें.

पारदगुटिका भस्म

काळा माका किंवा त्रिधारी कांडवेल यांच्या रसांत पारदगुटिकाभस्म होतें, असें ऐकिवांत आहे. तरी कोणास अनुभव किंवा जास्त माहिती असल्यास कळवावी.

वैद्य- बा. वि. नलावडे
मु. पो. सांगवी, जि. पुणें

वैद्य जोग यांची नेमणूक

भुसावळ नगरपालिकेनें वैद्यराज गो. स. जोग आयुर्वेदतीर्थ यांची ॲसिस्टन्ट मेडिकल ऑफिसर (कॉलरा ड्यूटी) म्हणून एक महिन्यासाठीं नेमणूक केली आहे. भुसावळ येथें वैद्यांना या जागेवर नमण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे.

'आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार'
शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्वप्रकारचीं सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.
सविस्तर माहितीकरितां लिहाः—
आयुर्वेदिक औषधी भांडार
२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूळव्याधीची अनुभविक चिकित्सा

लेखकः—भिषग्रत्न ग. कृ. प णकर, किन्हई

द्रव्यसंग्रहः- बकाणनिंबाचीं फळें पावशेर, आंबे-हळदचूर्ण तोळे ५, शुद्ध मेण तोळे ५.

भावना-द्रव्येंः- कुकरोन्धा, (कुकंदर), अति-विष व तांबडा पुनर्नवा यांचा स्वरस.

प्रक्रियाः- अर्धाशेर गार पाण्यांत वरील फळें रात्रभर भिजत ठेवावी. (भांडें एनॅमलचें किंवा मातीचें घ्यावें). सकाळीं तीं फळें पाण्यासकट हातानें चांगली कुस्करून तें पाणी गाळून घ्यावें. तें चुलीवर ठेवून वरील चूर्ण व मेण त्यांत घालून उलथण्यानें एकसारखे करून लगेच चुलीवरून खालीं उतरतां येईल असा त्यांत दाटपणा येतांच चूर्ण व मेण त्यांत टाकून चुलीवरून खालीं उतरावें. त्याचा गोळा करून खलांत घालावा. वरील प्रत्येक वनस्पतीच्या स्वरसाच्या तीन तीन दिवस भावना द्याव्या.

गुटिका-प्रमाण

कांहीं गोळ्या वटाण्याएवढ्या व कांहीं त्याचे दुप्पट मोठ्या कराव्या.

देण्याचें प्रमाण व अनुपान

वयोमान व विकाराचा जोर या मानानें सकाळीं १ गोळी व संध्याकाळीं १ गोळी गार पाण्याबरोबर द्यावी.

पथ्यः- वातुळ व उष्ण पदार्थ सर्व वर्ज्य करावे.

मुदतः- विकाराचा उपशम २-३ दिवसांत होऊं लागून विकाराचे नवीन अथवा जुनेपणा प्रमाणें विकार पूर्ण बरा होण्यास कोणास महिना व कोणास दोन महिने लागतात. कोणत्याहि तऱ्हेची मूळव्याध या गोळ्यांनीं बरी होते.

गुणाधिक्य- अधिक लवकर गुण यावा अशी इच्छा असल्यास पहिले १५ दिवस सुवर्णराजवंगेश्वर गुंजभर एक पुडी २ तोळे लोणी व खडीसाखरेची पूड यांच्या मिश्रणांत दुपारी घ्यावी.

पथ्याची पाळणूक

स्वतःचा प्रकृतिधर्म लक्षांत घेऊन पूर्ण बरें वाटलें तरी वरील पथ्याची पाळणूक ठेवणें हितावह आहे. विकाराचा शेष न कळत राहिला असल्यास विकार पुनः उद्भवण्याचा संभव असूं शकतो.

दुसरें औषध

द्रव्यसंग्रह- वाहव्याची ताजीं पानें ५, काळी मिरी ७, व थोडा गूळ. (जुना मिळाल्यास उत्तम)

क्रियाः- वाहाव्याची ताजी ५ पानें + ७ काळीमिरी, २ सुपारीएवढा गूळ हें सर्व स्वच्छ पाट्यावर थोडें पाणी घालून वाटावें व नंतर एक पावशेर पाण्यांत घालून चांगलें एकजीव करून फडक्या-वर गाळून सर्व मिश्रण सकाळीं एकवेळ शक्य तितकें लवकर घ्यावें. विकाराचा जोर असल्यास दुवक्ता घ्यावें. विकारमानानें १५ दिवस ते १ महिना हे घेत रहावें. विकाराचा जोर कमी होतांच दिवसांतून एकवेळ अगदीं प्रभातकाळीं घ्यावें. गुणाचा अनुभव २ दिवसांत पटेल व रक्त पडण्याचें मान अतिशय कमी होऊन त्या मानानें त्रासाचा उपशम होईल.

मूळव्याधीचे मोड

वासनवेल वाळवून त्याची भरडपूड करून निर्धूम अग्नीवर ही भरडपूड टाकून त्याची धुरी मोडांना १५ दिवस द्यावी, मोड निर्बल होऊन गळून पडतील.

सूचना- बकाण निंबोळ्या प्रयोग गुटिका या सेवा संघासारख्या प्रयत्नवादी (नवीन औषधीकरण) संस्थेनें रुग्ण जनतेस पुरविणें जरूर असून - प्रयोग नं. २ हा ज्यांचे रुग्णाचे गांवीं वहाव्याचीं झाडें आहेत त्यांनीं स्वतः करणें सारखा आहे.

—×—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पं. जगन्नाथप्रसादजी शुक्ल
हीरक जयंति

प्रयाग येथील सुप्रसिद्ध वैद्य व संमेलन कार्यकर्ते आयुर्वेदबृहस्पति पं. जगन्नाथप्रसादजी शुक्ल यांना ७५ वें वर्ष सुरू झालें याबद्दल सर्वत्र आनंद व्यक्त करण्यांत येत आहे. नागपूर येथें वैद्यराज प्राणाचार्य गोवर्धनजी छांगाणीजी यांच्या अध्यक्षतेखालीं शुक्लजींची हीरक जयन्ति साजरी करण्यांत आली. त्याप्रसंगीं अध्यक्ष व अनेक वैद्यवक्ते यांचीं भाषणें झालीं.

सागर येथें जिल्हा वैद्यसभेतर्फे हीरक जयंति सभा झाली.

हार्दिक-विनंति

वैद्यराज विनाय वामन देशपांडे

मु. आंबवणें- पो. नसरापूर यांसी-

सुवर्णतंत्र- या हस्तलिखित ग्रंथाची प्रत आपणाकडे आहे. त्यांतील तृणज्योतिष्मति व रुद्रवंती या वनस्पतींची असेल तशी माहिती आपण 'आयुर्वेद पत्रिका' मु. पो. नाशिक यांजकडे पाठवून संशोधक कार्यकर्त्यांना उपकृत कराल अशी आशा आहे.

आयुर्वेद-सेवक
भिषग्रत्न ग. कृ. पाटणकर
पो. किनई जि. उत्तर सातारा

पुणें वैद्यक मंडळाच्या कार्यकारी मंडळाची सभा

पुणें वैद्यक मंडळाच्या कार्यकारी मंडळाची सभा ता. १० सप्टेंबर रोजीं वै. कृष्णशास्त्री कवडे यांचे अध्यक्षतेखालीं भरून खालील ठराव संमत केला.

" परदेशी मद्याप्रमाणेंच आयुर्वेदीय आसवारिष्टांवर रुपयास चार आणे याप्रमाणें अधिक करांची मागणी सरकारी अधिकाऱ्यांकडून कारखानदारांकडे करण्यांत आली आहे असें समजतें. आयुर्वेदीय आसवारिष्टें हा आयुर्वेदीय चिकित्सेंतील एक मुख्य कल्प आहे व तो अत्यंत उपयुक्त आहे. हीं आसवारिष्टें परदेशी मद्यांच्या कक्षेंत गणणें न्यायाचें होणार नाहीं. म्हणून पुणें वैद्यक मंडळ, मुंबई सरकारच्या या मागणीचा व धोरणाचा तीव्र निषेध करीत आहे व सरकारच्या मागणीमुळें आणि धोरणामुळें या प्रान्तांतील जनतेच्या व विशेषतः गरीब जनतेच्या आरोग्यरक्षणाचें अतिशय नुकसान होणार आहे. म्हणून सरकारनें या गोष्टीचा विचार करून ही आकारणी रद्द करावी अशी पुणें वैद्यक मंडळाची सरकारला आग्रहाची विनंति आहे. "

दि सह्याद्रि अिन्शुरन्स कंपनी लि. नासिक
प्रशंसनीय प्रगति

ता. १२-९-५३ रोजीं भागीदारांच्या भरलेल्या सभेमध्यें १९५२ सालचें ताळेबंद व अहवाल यांस मंजुरी देण्यांत आली. १९५२सालीं रु. ४७,११,२५०चें काम आलें व रु. ३९,०६,२२५ चें काम पूर्ण झालें. १९५१ सालपेक्षां १९५२ सालीं रु. ११ लाखानीं काम वाढलें. हिशोबाचे सालीं एकंदर प्रिमियम् उत्पन्न रु. ८,१८,९९९ जमा झालें. व्याजाचा सरासरी दर शेंकडा ३·५१ पडला आहे. हा व्याजाचा दर सरकारनें ठरविलेल्या बँकेच्या दरापेक्षां अधिक असा सह्याद्रीला सदैवच मिळत गेला आहे. लाईफ फंड रु. ३०८३३२९ झाला आहे. सालोसाल संस्थेची प्रगति होत आहे, हें नमूद करण्यास आनंद वाटतो.

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेलें आणि अनेक बक्षिसे मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु.

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो. असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन' मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...वा पत्रव्यवहार—

ॲलोपॅथी-ॲलोपाथ

...लोपॅथी ह्या शब्दाची खरी व्युत्पत्ति लक्षांत न ...मराठी भाषेत व नेहमींच्या लेखनांत हा शब्द ...वैद्यकाला किंवा आधुनिक वैद्यकाला लाव- ...तेतो; परंतु तें चुकीचें आहे. आयुर्वेद हा सुद्धां ...पद्धतीचा आहे. ॲलोपथी हा शब्द ग्रीक ...तून झालेला आहे ह्याची व्युत्पत्ति अशी आहे ...(Allos)=विरुद्ध, दुसरा व पॅथिआ ...theia)= भावना, दुःख.

पाश्चात्य किंवा आधुनिक वैद्यकशास्त्र हें जसें ...विरुद्ध थंड इलाज करतें, उदाहरणार्थः-- उष्ण ...विरुद्ध थंड इलाज, दुःखाविरुद्ध शामक इलाज, ...माणें आयुर्वेदशास्त्र करीत असतें. दोन्ही ...अन्तर्गत कल्पना एकच आहे.

...ह्या तत्वाच्या अगदीं उलट होमीओपॅथी आहे. ...त्यांत दुःखानें दुःख काढणें म्हणजे साम्य ...चा अवलंब करतात. होमिऑस (Homoios=) ...ज्या औषधानें रोगाची विशिष्ट लक्षणें उत्पन्न ...तें औषध त्या रोगांवर अतिसूक्ष्म प्रमाणांत ...होमिओपॅथीचें तत्त्व आहे.

...ॲलोपॅथी किंवा ॲलोपाथ हे परकीय शब्द न ...आधुनिक वैद्यक शास्त्र किंवा आधुनिक वैद्य ...र) हे शब्द रूढ केल्यास शास्त्राच्या दृष्टीने ...य ठरेल असें मला वाटतें.

...इन्डिअन मेडिकल असोसिएशननें ह्या विषया ...नें मुद्दाम एक ठराव मंजूर केलेला आहे. ...श्चात्य वैद्यक शास्त्र" असा उल्लेख न करतां ...धुनिक वैद्यक शास्त्र" असा शब्द प्रयोग ...असा असा त्या ठरावाचा आदेश आहे.

...शिक —प्र. शं. गुप्ते

[ॲलोपथींस ' आधुनिक वैद्यक शास्त्र ' असा ...प्रयोग करणें युक्त होणार नाहीं, कारण त्यामुळें ...वेद, होमिओपॅथी हीं वैद्यकें आधुनिक नाहींत, असा ध्वन्यर्थ निघेल. आयुर्वेद हा ॲलोपॅथी आहे हें विधानहि सुसंगत नाहीं. आयुर्वेदाचें वैशिष्टय म्हणजे शरीरांत उत्पन्न होणारी दोषांची वृद्धि अगर क्षय हे प्रत्येक रोगाचें कारण आहे व ते दोष-वैषम्य दूर करून दोषसाम्य प्रस्थापित करणें हीच आयुर्वेदीय रोगचिकित्सा होय. —संपादक]

संयुक्त खान्देश वैद्यमंडळ

संयुक्त खान्देश वैद्यमंडळाची त्रैमासिक कार्यकारिणी सभा दि. २०।९।५३ रविवार रोजीं धुळें येथें वैद्यराज. ज. रा. नाईक यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. या सभेंत पुढील ठराव झाले.

विसंगत कर

(१) मुंबई सरकारनें आयुर्वेदीय पद्धतीनें तयार केलेलीं आसवें, अरिष्टें, तबार काढें इत्यादि नित्याच्या चिकित्सेस अत्यावश्यक आणि सर्वपरी अपाय न करणाऱ्या व दारूचे दुष्परिणाम न करणाऱ्या औषधांस विलायती दारूचें पंक्तीस बसवून जो कर आकारला आहे (फॉरिन लिकर्स) तो अत्यंत अकारण व सरकारच्या पूर्वनिर्णयास विसंगत असल्यानें ह्या प्रश्नाचा पुन्हां एकदां विचार करून निर्णय करणें अवश्य आहे, तरी याबाबतींत म. प्रां. वैद्यमंडळानें वेळींच लक्ष घालून हा प्रश्न धसास लावण्याची योग्य त्या मार्गानें त्वरित खटपट करावी अशी विनंति आहे.

वैद्य भगवंत त्र्यंबक अभिनंदन

(२) सं. खा. वैद्यमंडळाचे उपाध्यक्ष वैद्य भगवंत त्र्यंबक वैद्य हे धुळे (प. खा.) म्युनिसिपल स्कूलबोर्डमध्यें अधिक मतानें निवडून आले त्यांबद्दल ही सभा त्यांचें अभिनंदन करिते.

पवित्र नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहाः—नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रवाळावरील जकात उठली

नासिक शहर वैद्यमंडळाच्या प्रयत्नास यश

श्री. एम्. ए. रंगास्वामी अंडर सेक्रेटरी भारत सरकार यांचें नाशिक शहर वैद्यमंडळाकडे पुढील अर्थाचें पत्र आलें आहे. पत्राचा नंबर ३८ (१५) कस्टम १/५३ अर्थ सचिवालय, (रेव्हेन्यु विभाग) नवी दिल्ली, २१ सप्टेंबर १९५३ असा आहे.

"आयुर्वेदीय औषधीकरणास आवश्यक असलेल्या व परदेशांतून येणाऱ्या औषधी द्रव्यावरील जकात उठविण्याबाबत आपणाकडून भारताच्या अर्थमंत्र्याकडे आलेल्या पत्रास उत्तर म्हणून मला असें कळविण्याची आज्ञा झाली आहे कीं एकंदर परिस्थितीचा साधक बाधक विचार करून प्रवाळपिष्टी (Powdered Coral) वरील सर्व प्रकारची जकात (कस्टम) घेण्याचे भारत सरकारनें रहित केलें आहे.

पारा व गंधक यावर सध्यां जकात नाहीं. इतर औषधी द्रव्यावरील जकात कमी करतां येत नाहीं याबद्दल वाईट वाटतें."

आसवारिष्टावरील जादा विक्रीकर

भारतीय औषधी कारखानदार संघाचे मंत्री श्री. जी. एम्. पारेख व श्रीमंत नानासाहेब पुराणिक हे श्री. पी. एन. डामरी, कलेक्टर ऑफ सेल्स-टॅक्स, मुंबई राज्य, मुंबई, यांना ता. २३।९।५३ रोजीं स्वयंनिर्मित अल्कोहोलयुक्त आसवें अरिष्टें आणि काढे, ज्यांवर दर रुपयास १ आणा स्पेशल सेल्स-टॅक्स बसविला आहे, त्याबाबत चर्चा व पृच्छा करण्याकरितां भेटले होते. श्री. डामरी यांनीं त्यांना असें सांगितल्याचें समजतें कीं संघांतील ज्या कारखानदारांवर असा स्पेशल सेल्स-टॅक्स आकारला गेला असेल त्यांनीं तो आपल्या हक्कांस व हितसंबंधास बाध न आणतां (under protest) भरून टाकावा; व त्याचवेळीं त्या त्या वैय्यक्तिक कारखानदारांनीं ज्या विशिष्ट परिस्थितीच्या कारणां-मुळें त्यांनीं तो ग्राहकांकडून वसूल केला नाहीं तें कारण दाखवून तो सरकारकडून मार्फीत परत मागावा. नंतर कलेक्टर ऑफ सेल्स-टॅक्स हे सरकारकडे अशा प्रकारें सेल्स-टॅक्स ऑफिसरांनीं वसूल केलेला कर मार्फीत घालून परत करण्याविषयीं सरकारकडे शिफारस करतील."

भारतीय औषधी कारखानदार संघाचा नवा पत्ता-
द्वारा:-झंडु फार्मास्युटिकल वर्क्स लिमिटेड
पोस्ट बॉक्स नं. ७०१५
गोखलेरोड (दक्षिण) मुंबई २८.

'सुदर्शन' मलमाचे उत्पादक

वैद्य ग. ना. टीकेकर दिवंगत झाले

सुप्रसिद्ध सुदर्शन मलमाचे निर्माते व प्रसारक श्री. वैद्य अनंत नारायण टीकेकर हे ता. ९-८-५३ रोजी पुणें येथें कैलासवासी झाले. मृत्युसमयीं त्यांचें वय ७४ वर्षांचें होतें.

अनेक आपत्तींना तोंड देऊन त्यांनीं आपल्या वयाच्या ३५ व्या वर्षी सातारच्या आर्यांग्ल वैद्यक विद्यालयांत प्रवेश केला व स्वकष्टानें पैसे मिळवून शिक्षण घेतलें होतें.

आपल्या जवळील ज्ञान गुप्त न ठेवतां तें मासिकाद्वारें वैद्यवर्गांना देऊन ठेवण्याचा अनुकरणीय उपक्रम वैद्यराजांनीं केला याबद्दल वैद्यवर्ग त्यांचा निरंतर ऋणी राहील.

वर पाहिजे

वधू:-वय वर्षे २६ बालविधवा (१० वर्षे). हिंदी ६ वी पास. अंगापिंडानें मजबूत. उंची ५ फूट ४ इंच, वर्णानें उजळ, नाकीं डोळीं नीट. काबाडकष्टास मागें न हटणारी व निरोगी.

वर—वयानें ३५ पावेतो (जास्त नको). प्रकृतीनें निकोप, समाजांत प्रतिष्ठित, स्वतः मिळवता व स्वावलंबी. प्रथम संबंधाची संतति असली तरी आडकाठी नाहीं.

विज्ञापना नं. ३ C/o आयुर्वेद पत्रिका, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(पान २२८ वरून पुढें चालू)

द्धा कशी बसणार? वैद्यांच्या मुलांची आपल्या वडिल्या ज्ञानावर श्रद्धा नाहीं अशी स्थिति आहे.

मी निसर्गोपचारावर विश्वास असलेला मनुष्य आहे. आयुर्वेदीय उपचार हे निसर्गोपचाराच्या जवळपास आहेत. लोक निसर्गाचे नियम पाळत नाहींत म्हणून त्यांनीं दुःख भोगत रहावें हें योग्य नाहे. दुःखी मनुष्याला मदत करणें, त्याचें दुःख र करणें हें मनुष्याचें, राज्यसरकारचें कर्तव्य आहे. सरसुद्धां क्षमा करणारा आहे असें आपण मानतो.

चांगली वैद्यकीय मदत जनतेला मिळवून देणें जसें राज्य सरकारचें कर्तव्य आहे तसें तें वैद्याचेंहि आहे. दोघांनीं आपापला धर्म पाळला तरच लोकशाही यशस्वी होईल. लोकशाहींत सर्वांचें एकमत होईलच असें नाहीं तथापि दुसऱ्याच्या मताविषयीं सद्भावना असली पाहिजे. दुसऱ्याची कोठें चूक होत असली तर त्यांत आनंद मानतां कामा नये. आयुर्वेदाची प्रगति म्हणजे ॲलोपॅथीची दुष्मनी नव्हे. दुष्मनी हें एक पाप आहे.

आयुर्वेदीय रोगपरीक्षा स्वस्त आहे

अलोपॅथीच्या पद्धतीची शुश्रूषा व रोगनिदान करण्यासाठीं शेंकडो रुपये खर्च येतो, तो या गरीब देशांतील नागरिकांना परवडणारा नाहीं. त्यापेक्षां आयुर्वेदीय पद्धतीनें होणारी रोगपरीक्षा व शुश्रूषा अधिक स्वस्त आहे.

हिंदुस्थानासारख्या गरीब व विशाल देशांत आयुर्वेदाशिवाय दुसरें कोणतेंहि वैद्यक देशाची गरज भागवूं शकणार नाहीं. आयुर्वेदांत पथ्याला विशेष महत्व आहे व हें पथ्य म्हणजेच निसर्गोपचार होत.

आयुर्वेदाच्या अभ्यासामुळें संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास वाढणार आहे व त्यामुळें आपल्या संस्कृतीचें उज्ज्वल स्वरूप प्रगट होणार आहे. आयुर्वेदाचें ज्ञानभांडार संस्कृतामध्यें आहे. आपण आपली प्रगति करण्यासाठीं रोमन लिपी घेऊन आपली प्रगति होणार नाहीं. तिचे दोष मात्र येतील. सर्वत्र आपलें कोणतेंहि कार्य उभारतांना गाभा (मुख्य भाग) आपला पाहिजे. मनुष्य माणूस राहील, कुत्रा बनणार नाहीं याची काळजी आपण घेतली पाहिजे.

ज्या पद्धतीनें ईश्वरप्राप्ति होते त्याच पद्धतीनें आयुर्वेदाचें ज्ञान आपल्या प्राचीनांनीं प्रयत्नपूर्वक मिळविलें आहे. श्रद्धेनें मिळविलें आहे. आयुर्वेदीय औषधें तयार करतांना तीच पद्धति, तीच श्रद्धा, आपल्या ठिकाणीं असली पाहिजे. तेथें धंदादारी उपयोगी नाहीं. ती श्रद्धा आपल्या ठिकाणीं नाहीं म्हणून आपली औषधें तितकीं गुणकारी होत नाहींत.

डॉक्टर आयुर्वेद शिकवूं शकत नाहीं व वैद्य डॉक्टरी शिकवूं शकणार नाहीं. एकाच माणसाला एकाच वेळीं दोन शास्त्रें शिकवून वर्णसंकर मी करूं इच्छित नाहीं. त्यामुळें कोणतीच विद्या शुद्ध रहात नाहीं. आपल्या व्यवहारांत--भावनेंत--साधनांत शुद्धता हवी.

आपणाला मागील कोर्स, मागील बोर्ड पसंत नव्हतें पण जो तो त्या बोर्डांत जाण्यासाठीं धडपडत होता. मी त्यावेळींच मजकडे येणाऱ्यांना सांगितलें होतें कीं, तुम्हाला हें पसंत नाहींना मग स्पष्ट शब्दांत त्याला नकार द्या, पण तें कोणीच ऐकलें नाहीं.

न मागितलेली गोष्ट दिली

आज आम्ही गुरुपरंपरा शिक्षणपद्धतीला मान्यता दिली आहे. हें काम आम्हीं शुद्ध बुद्धीनें केलें आहे. गुरुपेक्षां शिष्य सवाई झाला पाहिजे. पण अनुभव असा येतो कीं, गुरुपेक्षां शिष्य थोडेथोडे कमी दर्जाचेच निघतात. तरी असें न होईल याची काळजी आपण घेतली पाहिजे.

आपण मागितली नव्हती अशी ही गोष्ट आपणास दिली आहे. कारण माझी अशी श्रद्धा आहे आपल्या देशांत गुरुपरंपरेनेंच विद्येची जोपासना झाली आहे. ज्ञानाच्या प्रत्येक शाखेंत असें आहे. पण त्यासाठीं गुरु संपूर्ण असला पाहिजे. त्यानें संपूर्ण होण्यांचा प्रयत्न सतत चालू ठेवला पाहिजे."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नामदार देसाई यांच्या भाषणानंतर अध्यक्ष ज. स. करंदीकर यांचें अनुभवपूर्ण असें पाऊण तास भाषण झालें. शेवटीं आभारप्रदर्शन व पं. विनायकबुवा पटवर्धन यांनीं 'वंदेमातरम्' गीत म्हटल्यावर सभा समाप्त झाली.

म. प्रां. संघटना बलिष्ठ करा

आभार मानतांना महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचे मंत्री वैद्य बिंदुमाधव पंडित यांनीं ज्या संघटनेच्या जोरावर आपण आज हें यश प्राप्त केलें आहे ती वैद्य-संघटना १।१ रुपया सभासद वर्गणी भरून मजबूत करण्याविषयीं व मंडळाच्या कार्याला हरतऱ्हेनें मदत करण्याची मनोवृत्ति ठेवण्याविषयीं विनंति केली.

पुणें येथील वैद्यांना सुलभ व्हावें म्हणून-

म. प्रां. वैद्य मंडळाच्या सभासदत्वाची पावती पुस्तकें (१) वै. दत्तात्रेयशास्त्री शेंड्ये, २८ शुक्रवार पुणें २ व (२) श्री. राजपाठक, किरण मेडिकल सर्व्हिस, नगरकर, तालिमचौक, लक्ष्मीपथ, पुणें २ येथें ठेवलीं आहेत. २ रुपये वर्गणी भरून १९५३ व १९५४ या दोन सालचे सभासद व्हावें, अशी विनंति आहे.

नाशिक. — मंत्री म. प्रां. वैद्यमंडळ

माधान येथें व्याख्यानें

ता. १९ ते २२ आक्टोबर या चार दिवस माधान (अमरावती) येथें भरणाऱ्या कस्तुरबा सेविका शिबिरांत ' स्त्रिया व मुलें यांचे स्वास्थ्य ' या विषयावर वैद्य बिंदुमाधवशास्त्री पंडित यांची रोज २ तास याप्रमाणें ४ व्याख्यानें होणार आहेत.

वैद्यासाठीं उपयुक्त ग्रंथ

ॲलोपॅथिक चिकित्सासंग्रह-दुसरें ७०

रोगांवरील चिकित्सासूत्रें व ३४० प्रिस्क्रिप्शनें व इंजेक्शनें यांनीं युक्त. मराठींतील आभिनव ग्रंथ, आपल्या ॲलोपॅथिक ज्ञानांत वाढ होण्यासाठीं आजच मागवा. किं. ४॥ रु. ट. ख. निराळा

१ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

२ डॉ. भोकरी, ठाणें

आयुर्वेद अवैज्ञानिक नाहीं

दिल्ली येथील तिब्बी कॉलेजच्या आवारांत वृक्षारोपण समारंभ रेल्वेमंत्री श्री. लालबहादुरशास्त्री यांच्या हस्तें झाला. त्यावेळीं भाषण करतांना ते म्हणाले कीं " आयुर्वेद अवैज्ञानिक आहे व त्याचा काल मागें पडला आहे असें समजणें चुकीचें आहे. आयुर्वेदाला प्रोत्साहन देणें सरकारचें कर्तव्य आहे. "

सामुदायिक औषधीकरण

वैद्यांना औषधें स्वस्त किंमतींत मिळावीत या उद्देशानें आयुर्वेद सेवा संघानें सामुदायिक औषधीकरणाची योजना पूर्वीच सुरू केली आहे हें पत्रिकेच्या वाचकांना विदित आहेच. वैद्यराज पु. वि. धामणकर शास्त्री यांच्या, सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें, या लेखमालेंतील वा अन्य महत्वाचीं औषधें यांची, वैद्यवर्गानीं मागणी केल्यास त्यांना ती सवलतीनें अवश्य मिळूं शकतील. त्यांनीं त्याबाबत व्यवस्थापकाशीं पत्रव्यवहार करावा.

बंद झालेली रजिस्ट्रेशन ट्रिब्युनल

बन्द झालेल्या रजिस्ट्रेशन ट्रिब्युनलचे कचेरींतील सर्व कागदपत्र व अर्जदारांचे अर्ज वैद्यक बोर्डाचे कचेरीकडे पाठविण्यांत आले आहेत. तरी ज्या अर्जदारांना आपले अस्सल व महत्वाचे कागदपत्र परत मागविणें असतील, अशांनीं १२ आण्याच्या पोस्टेज तिकिटासह खालील पत्त्यावर अर्ज करावेत म्हणजे ते त्यांना यथावकाश परत मिळूं शकतील. रजिस्ट्रेशन ट्रिब्युनल कचेरीमधील कागदपत्रांची माहिती असलेले मुख्य कारकून हे सध्या रजेवर असल्यानें तूर्त सर्व काम स्थगित आहे. परन्तु ते पुन्हां आपल्या कामावर रुजू होतांच अर्जदारांचे कागदपत्र परत करण्यास सुरवात होईल. तरी वरील हकीगत लक्षांत घेऊन अर्जदारांनीं धीर सोडूं नये.

पत्रव्यवहाराचा पत्ताः- रजिस्ट्रार, आयुर्वेदिक आणि युनानी बोर्ड, १४४ महात्मा गांधी रोड, मुंबई नं. १

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नोव्हेंबरपासून शिक्षणास प्रारंभ

मुंबई सरकारनें पत्रक काढून शुद्ध आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमास व गुरुपरंपरा शिक्षणपद्धतीस मान्यता दिल्यापासून मुंबई राज्यांत सर्वत्र उत्साहाचें वातावरण निर्माण झालें आहे. टाइम्सपासून सर्व वृत्तपत्रांनीं सरकारच्या धोरणाचें स्वागत केलें असून ठिकठिकाणीं वैद्य मंडळी पुढील उद्योगाला उत्साहानें लागली आहेत. अहमदनगर व सातारा येथील आयुर्वेदाच्या शिक्षणसंस्था हा अभ्यासक्रम आनंदानें स्वीकारतील असें सांगितलें जात आहे.

अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय पुणें

पुणें येथील अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय १ नोव्हेंबर पासून सुरूं करण्याची खटपट वै. ह. बा. जपे यांनीं अत्यन्त उत्साहानें चालविली आहे. भूषण गणेशशास्त्री जोशी पुणें, वैद्यराज हळसीकर वगैरे, ही मंडळी आपापले उत्तम शिष्य तयार करतील हें जाहीरच आहे.

नासिक येथील हालचाली

नाशिक येथील शहर वैद्य मंडळ, विद्यालय सुरू करण्याच्या खटपटींत आहे असें कळतें. वैद्यराज शंकरशास्त्री दाते व वैद्यराज विष्णुशास्त्री केळकर ही मंडळी या कामीं सर्वतोपरी साहाय्य करणार आहेत. नाशिकच्या आयुर्वेद सेवा संघाचीहि या कामीं त्यांना मदत होण्यासारखी आहे.

कुर्ला येथें शारदोत्सवांत व्याख्यान

ता. १४ आक्टोबर रोजीं रात्रीं ९ वाजतां कुर्ला येथील भगिनी-मंडळातर्फे टिळक स्मारक मंदिरांत वैद्य बिंदुमाधवशास्त्री पंडित यांचें "स्त्रिया व त्यांचें आरोग्य" या विषयावर शारदोत्सवांत व्याख्यान होणार आहे.

ता. १९ सप्टेंबर रोजीं दुपारीं १॥ वाजतां कुर्ला येथील हायस्कूलमध्यें 'स्वास्थ्यासाठीं आयुर्वेद' या विषयावर व्याख्यान व नंतर प्रश्नोत्तरें झाली होती.

अनुक्रमणिका

गुरुपरंपरा शिक्षणपद्धतीचा पुरस्कार	२२३
अमली पदार्थावरील विक्रीकर कायद्यांत दुरुस्ती	२२४
मंत्रीद्वयांचें जाहीर अभिनंदन	२२५
चंद्रकळेचा पाठ	२२९
मूळव्याध (प्रश्नोत्तरें)	२३३
लक्ष्मीनारायणरस	२३५
लक्ष्मीविलास	२३७
महालक्ष्मीविलास	२३९
सिद्धलक्ष्मीविलास	२४२
तृणज्योतिष्मती	२४४
ही बिकट समस्या आयुर्वेदानेंच सुटेल	२४५
रात्रीं दूध प्यावें काय ?	२४७
एक पारद-प्रयोग	२४८
मूळव्याधीची अनुभविक चिकित्सा	२४९
ॲलोपॅथी-ॲलोपाथ	२५१
संयुक्त खान्देश वैद्य मंडळ	२५१
प्रवाळावरील जकात उठली	२५२
आसवारिष्टावरील जादा विक्रीकर	२५२

चुकीची दुरुस्ती

आयुर्वेद पत्रिकेच्या ता. १-९-५३ च्या अंकांत सुवर्णभस्माचा पाठ दोनदां आला आहे. त्यांत पान १७३ वर मौक्तिकाचें प्रमाण ३ गुंजा लिहिलें आहे तें बरोबर आहे.

पान १८२ वर मौक्तिक १ गुंज म्हटलें आहे. तें बरोबर नाहीं. तरी तें सुधरून घ्यावें.

—पु. वि. धामणकर

विशारद आणि आचार्य परीक्षेकरितां 'वैद्यसन्मित्र'

मे. डेप्युटी डायरेक्टर ऑफ मेडिकल ॲंड हेल्थ सर्व्हिसेस्, आयुर्वेद, (यू. पी.) यांनीं आयुर्वेद-विशारद व आयुर्वेद आचार्य परीक्षांकरितां, विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तक म्हणून वैद्य पां. वि. जायदे (आ. ती.) हुबळी, यांच्या 'वैद्यसन्मित्र' (हिंदी) या पुस्तकाची शिफारस केली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खास दीपावली-निमित्त

आयुर्वेद सेवासंघाच्या औषधी भवनांत तयार झालेलें

- सुगंधी अभ्यंग तेल नं. १ -

अवश्य वापरा.

गरीब व मध्यम वर्गीय जनता-जनार्दनाच्या सोयीसाठीं लहान प्रमाणांतहि अभ्यंग तेल मिळण्याची व्यवस्था यंदापासून केली आहे.

किंमत:- २॥ तोळे ५ आणे, ५ तोळे १० आणे, १० तोळे १। रु.

आयुर्वेद सेवा संघांत मिळणारीं विशेष औषधें

वैद्यराज **अनंत नारायण टीकेकर** यांचें

भाजलेल्या जखमा व जुनाट जखमा यावरील रामबाण

{१} सुदर्शन मलम

किंमत :- २ तोळे बाटली १ रु.

(विशेष माहितीसाठीं आयुर्वेद पत्रिका १६ मार्च १९५१ चा अंक पहावा.)

{२} प्रवाळ भस्म [लिंबूरस-भावित]

(उत्तम पाचक व पौष्टिक कल्प)

किंमत १ तोळा ४ रु.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन नासिक

संपादक व प्रकाशक:— वैद्य विंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, मेनरोड नाशिक.
मुद्रक:— श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, ... नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक मुखपत्र

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद पत्रिका

कांगडी

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ७ वें) नाशिक, ता. १६ ऑक्टोबर १९५३ (अंक ८ वा

—अभिनंदनीय उपक्रम—

गुरुवर्य वेणीमाधव जोशी पारितोषिक

अमरावती येथील चिकित्सक श्री. त्र्यं. म. गोगटे, आयुर्वेदतीर्थ यांनीं तेथील विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठीं वरील नांवाचें पारितोषिक जाहीर केलें आहे.

पारितोषिकाचा विषय

अष्टांगहृदयांतील सूत्रस्थान (३० अध्याय) पाठ म्हणून दाखविणें हा पारितोषिकाचा विषय आहे.

पारितोषिकाचे २ भाग

या पारितोषिकाचे दोन भाग करण्यांत आले आहेत. पहिला भाग (१ ते १५ अध्याय). दुसरा भाग (१६ ते ३० अध्याय).



गु. वेणीमाधवशास्त्री जोशी

तूर्त पहिल्या भागाची पारितोषिक योजना जाहीर झाली आहे, ती अशी-एकुण बक्षिसाची रक्कम रुपये ७५. पहिला क्रमांक ३५ रु., दुसरा क्रमांक २५ रु., तिसरा क्रमांक १५ रु.

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयांतील प्रथम ते चतुर्थ वर्षा-पर्यंतच्या कोणत्याहि विद्यार्थ्यांस यांत भाग घेतां येईल.

येती मकरसंक्रांत हा पहिल्या बक्षिस समारंभाचा दिवस निश्चित केला आहे. तत्पूर्वी परीक्षा होईल.

वै. त्र्यं. म. गोगटे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धन्वन्तरी जयंति सप्ताह साजरा करा !

उत्तर प्रदेश राज्य सरकारच्या चिकित्सा एवं स्वास्थ्य (आयुर्वेद) या विभागाचे उपसंचालक (डेप्युटी डायरेक्टर) श्री. द. अ. कुलकर्णी यांनी आगामी धन्वन्तरी महोत्सवानिमित्त पुढील पत्रक प्रसिद्ध केलें आहे.:—

" उत्तर प्रदेश राज्य सरकार द्वारा दीपावली स्वच्छता सप्ताह साजरा करण्याचे ठरविण्यांत आलें आहे. याच सप्ताहांत ता. ४।११।५३ रोजीं धन्वन्तरी त्रयोदशी येत आहे. ही तिथि वैद्य व हकीम यांना एकाद्या पुण्य पर्वणीप्रमाणें आहे. जनतेंत आयुर्वेदाचा प्रचार करण्याच्या दृष्टीनें या धन्वन्तरी जयंतीचा सप्ताह साजरा करावा. अशी योजना आयुर्वेद-विभाग उत्तर प्रदेश द्वारा केली जात आहे.

या कार्यासाठीं 'सरकारी चिकित्सालय' हें केंद्र समजून कार्यक्रमाची आंखणी केली पाहिजे. या सप्ताहांत कोणकोणते कार्यक्रम ठेवावेत हें सुचविण्यासाठीं पुढील योजना दिली आहे. स्थानिक अनुकूलते-नुसार त्यांत सुधारणा करण्यास हरकत नाहीं.

सोमवार ता. २ —गांवच्या प्रमुखांच्या सक्रिय सहयोगानें सार्वजनिक विहिरींच्या आजुबाजूचा भाग,केराचे ढीग मोरी आदि ठिकाणची सफाई करावी.

मंगळवार ता. ३ —गांवच्या प्रमुखाच्या सक्रिय सहयोगानें घरें व अंगणें यांची सफाई करावी.

बुधवार ता. —सायंकाळीं धन्वन्तरी पूजन व आयुर्वेदासंबंधीं व्याख्यान.

गुरुवार ता. ५—ग्रामपंचायतीच्या सहयोगानें स्वच्छता व आरोग्य या संबंधीं व्याख्यान.

शुक्रवार ता. ६—त्या गांवीं उपलब्ध होणाऱ्या औषधी वनस्पती एकत्रित करणें.

शनिवार ता.७ —गांवच्या लोकांना जमविलेल्या सामान्य वनस्पतींची ओळख व त्यांच्या गुणधर्मांची माहिती देणें. रोगावरील प्रयोग सांगणें.

रविवार ता. ८—गावच्या लोकांना घरगुती उपचारांची माहिती देणें.

गांवांत आमदार, खासदार, जिल्हा लोकल बोर्ड सभासद व जिल्हा स्वास्थ्यविभागाचे अधिकारी यापैकीं व अशापैकीं ज्याचा,त्याचा सहयोग लाभू शकेल तो अवश्य प्राप्त करावा.'

श्री. द. अ. कुलकर्णी

उत्तर प्रदेशाच्या सरकारच्या आयुर्वेद विभागाची धन्वन्तरी उत्सवाबाबतची वरील सूचना आपणास मुंबई राज्यांतहि अनुकरण करण्यासारखी आहे. मुंबई राज्यांत ज्यावेळीं आयुर्वेदाचा विभाग कार्यक्षम रीतीनें सुरू होईल त्यावेळीं आपणास अशा सूचना सरकारी खात्या-कडून मिळत जातील. व मग आजच्या गांधी जयंति व वनमहोत्सवाप्रमाणेंच सरकारी अधिकारी व प्रमुख पुढारी धन्वन्तरी उत्सवाच्या कार्यक्रमांत अहमहमिकेनें भाग घेतांना दिसतील. तो दिवस लौकर येण्यासाठीं आयुर्वेदप्रेमी कार्यकर्त्यांनीं स्वयंस्फूर्तीनें आपआपल्या गांवीं धन्वन्तरी उत्सव साजरा केला पाहिजे.

आचार्य वेणीमाधव सत्कार, अकोला

ता. १८।१०।१९५३ रविवार रोजीं रात्रौ आठ वाजतां नागपुर युनिव्हर्सिटीमधील आयुर्वेदीय संशोधन विभागावरील प्रमुख आचार्य वेणीमाधव शास्त्री जोशी यांचा अकोला येथें डॉ. एल्. टी. शाह आयुर्वेदतीर्थ यांचे नवीन बंगल्यांत " महाविदर्भ पदवीधर वैद्य मंडळातर्फे सत्कार समारंभ व त्यानंतर आचार्यांचें भाषण होणार आहे. तरी सर्व वैद्य, डॉक्टर आणि इतर बन्धुभगिनींनीं उपस्थित राहण्याची कृपा करावी.

वै. ह. रा. पिंपळे मंत्री
महाविदर्भ पदवीधर वैद्य मंडळ अकोला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्ध आयुर्वेदिक अभ्यासक्रम

.... सरकारी नियम व कानू ....

प्रवेश पात्रताः– विद्यार्थ्यास ज्या वर्षी प्रवेश पाहिजे असेल त्या वर्षाच्या तारीख ३१ मार्च पूर्वी त्याचें वय १६ वर्षें पूर्ण असलें पाहिजे व (१) तो एस्. एस्. सी. परिक्षेस बसला असून त्याच परीक्षेंत संस्कृत विषयांत त्यास शेंकडा ५० टक्के अगर अधिक गुण मिळाले असले पाहिजेत; याचा अर्थ (इतर विषयांत नापास असलेला विद्यार्थी चालू शकेल) किंवा

२) तो बनारस संस्कृत कॉलेजची ' प्रथमा ' परीक्षा पास झाला असला पाहिजे; किंवा

३) वरील लायकीच्या समान एखादी अन्य परीक्षा जी सरकार प्रवेशाबाबत तत्समान मानील ती तो पास असला पाहिजे.

एकंदर दोन परीक्षा घेण्यांत येतील. एक शैक्षणिक दीड वर्षाच्या अखेर व दुसरी शैक्षणिक साडेतीन वर्षाच्या (पहिले १॥ वर्ष धरून) अखेर घेण्यांत येईल.

या अभ्यासक्रमाचा तपशील खालीलप्रमाणें आहे.

प्रथम परीक्षा

(शैक्षणिक दीड वर्षाच्या अखेर होणारी)

१) ही परीक्षा दर सहा महिन्यांनीं घेण्यांत येईल, व हींत उत्तीर्ण होण्याकरितां उमेदवारास लेखी परीक्षेंतील प्रत्येक विषयांत शेंकडा ४० अगर अधिक गुण मिळाले पाहिजेत व प्रात्यक्षिक परीक्षेंत शेंकडा ४० अगर अधिक गुण स्वतंत्ररीत्या मिळाले पाहिजेत.

(२) उमेदवार ज्या विषयांत पास झाला असेल त्या विषयाची त्यास पुनःपरीक्षेची माफी मिळेल, परंतु तो प्रथम परीक्षेंतील सर्व विषयांत पास झाल्याशिवाय तो प्रथम परीक्षेंत पास झाल्याचें जाहीर करण्यांत येणार नाहीं अगर त्यास द्वितीय परीक्षेचा अभ्यास करतां येणार नाहीं.

(३) उमेदवारानें मान्यवर संस्थेंत अगर गुरुकडे दीड वर्ष शिक्षण घेतलें असलें पाहिजे व प्रत्येक विषयाचें शिक्षणास तो ठरलेल्या तासांपैकीं शेंकडा ७५ टक्के तास हजर असला पाहिजे.

(४) विषय, शिक्षणाचा कमींतकमी कालखंड (Periods) व परीक्षेंतील त्या त्या विषयास ठेविलेले पूर्ण गुण खालीलप्रमाणें आहेत.:–

विषय, अध्ययन–कालखंड Periods, परीक्षागुण

विषय	व्याख्यानें	प्रात्यक्षिक	लेखी	प्रात्यक्षिक
शारीर	१५०	५०	१००	५०
दोष-धातु-मलविज्ञान	१५०	३०	१००	२५
वनस्पति परिचय आणि द्रव्यगुण	२००	७५	१००	५०
रसशास्त्र	१५०	७५	१००	५०
स्वस्थवृत्त, रोगानुत्पादन आणि जनपदोध्वंस-प्रतिकार	१००	--	१००	--
संस्कृत	१००	--	१००	--
अष्टांगहृदय (पूर्वार्ध)	२००	—	१००	—

द्वितीय व अखेरची परीक्षा

(शैक्षणिक ३॥ वर्षाअखेर (पहिलें १॥ वर्ष धरून))

(१) सदर परीक्षा दर सहा महिन्यांनीं घेण्यांत येईल, व हींत पास होण्याकरितां लेखी परीक्षेंतील प्रत्येक विषयांत शेंकडा ४० अगर अधिक गुण व तसेंच प्रात्यक्षिक परीक्षेंत शेंकडा ४० अगर अधिक गुण स्वतंत्र रीत्या, उमेदवारास मिळाले पाहिजेत.

(२) उमेदवार ज्या विषयांत पास झाला असेल त्या विषयांत त्यास पुनः परीक्षेस बसण्याची माफी मिळेल, परन्तु तो परीक्षेंतील सर्व विषयांत पास झाल्याखेरीज त्यास पास म्हणून जाहीर करण्यांत येणार नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(३) उमेदवार मान्यवर संस्थेंत अगर मान्यवर गुरुजवळ पहिली परीक्षा उत्तीर्ण झाल्यानन्तर दोन वर्षें अध्ययन केलेला असला पाहिजे, व प्रत्येक विषयास नमूद केलेल्या कालखंडांपैकीं (periods) शेंकडा ७५ टक्के कालखंड (periods) तो हजर असला पाहिजे. शिवाय त्यानें एखाद्या मान्यवर रुग्णालयाच्या (हॉस्पिटलच्या) औषधी विभागांत तीन कालखंडपर्यंत (३ टर्म्स्) शैक्षणिक उपस्थिति ठेवली पाहिजे आणि ४ महिने पर्यंत बहिर् रुग्णांस औषधोपचार करणाऱ्या दवाखान्यांत किंवा त्याच्या गुरुच्या दवाखान्यांत दररोज ३ तास प्रमाणें ३५० दिवस शैक्षणिक उपस्थिति ठेवली पाहिजे.

(४) दुसऱ्या परीक्षचे विषय, शैक्षणिक कालखंड (periods) वँ पूर्ण गुण खालील प्रमाणें आहेत.:--

विषय	(कालखंड periods)		गुण	
	व्याख्यानें	प्रात्यक्षिक	लेखी	प्रात्यक्षिक
निदानपंचकम्, सर्वरोगसंप्राप्तिविज्ञानम्	१००	--	१००	५०
रोगविज्ञान व कायचिकित्सा	५००	३टर्म्स वॉर्ड ४ महिने-बाह्य रुग्ण	१००	१००
			१००	१००
शल्य शालाक्य तंत्र	१००	--	१००	--
प्रसूति तंत्र	१००	—	१००	—
विष तंत्र	२५	—	१०० (विष तंत्र व औषध निर्माण-विज्ञानम् मिळून)	५०
औषध निर्माण-विज्ञानम्	७५	२५		
अष्टांगहृदय (उत्तरार्ध)	१०९	—	१००	—
एकूण	१०००	१०८१	७००	३००

गुरु-गृहीं शिक्षण घेतलें असल्यास, गुरुच्या दवाखान्यांत रोज ३ तास प्रमाणें ३५० दिवस शैक्षणिक उपस्थिति असल्याबद्दल गुरुचें प्रमाणपत्र हजर केलें पाहिजे.

१ टर्म ४ महिन्यांची; महिन्यांत २२ कार्यकारी दिवस व दररोज ३ तास प्रात्याक्षिक म्हणजे २२ × ४ × ३ = २६४ तास (प्रत्येकीं टर्मचे) अधिक ४ महिने बहिः रुग्ण शैक्षणिक प्रात्याक्षिक

म्हणजे ७९२ + २६४ = १०५६ तास

-सरकारी हॉस्पिटलमध्यें-
आयुर्वेदीय विभाग

अहमदाबाद येथें पाऊण कोट रुपये खर्च करून एक फार मोठें सरकारी हॉस्पिटल बांधण्यांत येत आहे. सदर हॉस्पिटलमध्यें १००० रुग्णशय्यांची सोय होणार असून त्यापैकीं २५ रुग्णशय्या खास आयुर्वेदीय विभाग म्हणून स्वतंत्र राखण्यांत येतील. या योजनेनें सरकारी इस्पितळामध्येंहि आयुर्वेदीय विभाग योजनेस स्वतंत्र स्थान प्राप्त झालें आहे.

पुणें येथेंहि अशी व्यवस्था करण्यांत येणार आहे. मात्र दोन्ही ठिकाणची ही व्यवस्था कोण पाहणार याबाबत अद्याप सरकारी खुलासा प्रसिद्ध झालेला नाहीं.

आयुर्वेद विकास योजना

राजस्थानमधील ग्रामीण जनतेला आवश्यक अशी चिकित्सा व्यवस्था निर्माण करण्यासाठीं व भारतीय चिकित्सा प्रणालीला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीनें राजस्थान सरकारनें एक पंचवार्षिक योजना तयार केली आहे. त्यांत चिकित्सालयांची संख्या वाढविणें व स्थानिक वनौषधींचे संशोधनासाठीं संशोधनशाला सुरू करणें इ. गोष्टी आहेत.

सध्यां राजस्थानांत ३५० आयुर्वेदीय चिकित्सालयें सरकारतर्फे चालू असून त्यांत १ लक्ष ५७ हजार रुपये केवळ औषधांवर खर्च होत आहे.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्ध आयुर्वेद अभ्यासक्रम समिति

.... सदस्यांचा अल्प परिचय ....

मुंबई सरकारनें नुकत्याच नेमलेल्या शुद्ध आयुर्वेद अभ्यासक्रम समितींत ७ सभासद आहेत. त्यांचा परिचय पुढें दिला आहेः—

वैद्य वामनराव दीनानाथ वैद्य, मुंबई



हे मुंबई येथें भुलेश्वर भागांत खाजगी चिकित्सा व्यवसायी आहेत. दुसऱ्या देशी वैद्यक बोर्डाचे ते निवडून आलेले सभासद होते. त्यावेळीं एक अशाच प्रकारचा अभ्यासक्रम बोर्डासमोर मांडून त्यांनीं तो मान्य करून घेतला होता. पण त्याला त्यावेळच्या मंत्रिमंडळानें मान्यता दिली नाहीं. नवीन मुरारजीभाई-मोतीलालजी मंत्रिमंडळ आल्यानंतर ज्यांनीं या कामीं ज्यांनें प्रयत्न केले त्यांत वैद्य वामनराव अग्रणी होते. वैद्य वामनराव हे महागुजरात प्रांतीय वैद्य मंडळाचे अध्यक्ष आहेत.

वैद्य भूषण गणेशशास्त्री जोशी (पुणें)

जुन्या पिढींतील वैद्य लागवणकर यांचे शिष्य. ...र येथें भरलेल्या म. प्रां. वैद्य संमेलनाचे अध्यक्ष. महाराष्ट्रांतील गुरुपरंपरेनें आयुर्वेदाध्यन केलेली प्रथित-यश मंडळी फारच थोडी शिल्लक आहेत त्यांपैकीं ते एक आहेत. महाराष्ट्र प्रां. कॉंग्रेसमध्यें त्यांनीं बरीच काम केलें आहे.

वैद्यराज दामोदर अनंत बोकाडे हळसीकर

आयुर्वेद पत्रिकेच्या प्रथम पासूनच्या वाचकांस वैद्यराज हळसीकरांचा चांगला परिचय आहे. सध्यांच्या देशी वैद्यक बोर्डाचे ते वैद्य-निर्वाचित सदस्य आहेत. कर्नाटक प्रांतीय वैद्य संमेलनाच्या बेळगांव येथें भरलेल्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. महागुजरात महाराष्ट्र व कर्नाटक या तीनहि प्रांतीय वैद्य संमेलनांचे अध्यक्ष या समितींत असल्यामुळें मुंबई राज्यांतील सर्व विभागांना त्यांत स्थान प्राप्त झालें आहे.

वैद्यराज दत्तात्रेयशास्त्री जळूकर

लातूर येथें नुकत्याच भरलेल्या ९ व्या म. प्रां. वैद्य हे संमेलनाचे अध्यक्ष आहेत. गेलीं १०–१५ वर्षे संयुक्त खानदेशांत वैद्यमंडळींत जी जागृति निर्माण झाली आहे त्याला त्यांचेहि परिश्रम कारणीभूत आहेत. वै. भू. गणेशशास्त्री जोशी व वैद्यराज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जळूकरशास्त्री यांची समितीवर नेमणूक करून पर्यायानें म. प्रां. वैद्य मंडळाच्या चालू प्रयत्नास सरकारनें आपला पाठिंबा व्यक्त केला आहे. 'केवळ आयुर्वेदाचें शिक्षण व व्यवसाय हा वैद्य समाजाचा जन्मसिद्ध हक्क आहे' अशी घोषणा वैद्यराज जळूकरशास्त्री यांनीं अध्यक्षस्थानावरून केली व ती मुंबई सरकारनें मान्य करून त्यांना समितीवर नेमलें ही समाधानाची गोष्ट आहे.

वैद्य नारायण हरी जोशी, आयुर्वेदविशारद



हे समितीचे सर्वांत तरुण व उत्साही सभासद आहेत. म. प्रां. वैद्य मंडळाचे चेंबूर संमेलनापासून गत वर्षापर्यंतचे मंत्री व नासिक जिल्हा वैद्य संमेलनाचे गतवर्षीचे अध्यक्ष होते. शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रम मंजूर करून घेण्यांत यांनीं बरेच परिश्रम घेतले आहेत. व तो अंमलांत आणण्यासाठीं नेमलेल्या समितीचे मंत्री होऊन पुढील जबाबदारीची धुरा त्यांनीं आपल्या शिरावर घेतली आहे हें अभिनंदनीय आहे.

वैद्य लक्ष्मीशंकर रामकृष्णशास्त्री, अहमदाबाद

पाटण (गुजरात) येथील उमसजी पितांबरदास आयुर्वेदविद्यालयाचे ट्रस्टी व माजी प्रिन्सिपॉल.

वैद्य त्रिंबकलाल देवशंकर जोशी, भडोच

पाटण (गुजरात) येथील आयुर्वेदविद्यालयाचे जुने स्नातक.

नेपाळ आयुर्वेद छात्रसंघ

नेपाळची राजधानी कठमांडू येथील सरकारी आयुर्वेद विद्यालयाच्या इमारतींत आयुर्वेद विद्यार्थ्यांची एक सभा भरून वरील संघाची स्थापना करण्यांत आली आहे.

आयुर्वेद विद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या भावी जीवनांत सुधारणा घडवून आणणें हा या संघाचा उद्देश आहे. संघाच्या अध्यक्षस्थानीं श्री. दामोदर शर्मा यांची योजना झाली असून धे मंत्रीस्थान श्री. चंद्रकांत उपाध्याय यांनीं स्वीकारलें आहे. या शिवाय कोषाध्यक्ष, प्रचारमंत्री, संगठनमंत्री यांचीहि नियुक्ति करण्यांत आली आहे.

नेपाळ येथील आयुर्वेदविषयक गोष्टींची माहिती मिळविण्यासाठीं या संघाकडे आयुर्वेद विद्यालयाच्या पत्त्यावर पत्रव्यवहार करतां येईल.

शास्त्रोक्त पद्धतीनें व अत्यंत परिश्रमानें तयार केलेलीं महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसंमेलनानें व ऑल इंडिया आयुर्वेद काँग्रेस व प्रदर्शनाकडून प्रशंसित

सहस्रपुटी अभ्रक इ. भस्में व इतर औषधें

प्राइस लिस्ट मागवा.

श्री अमरेश्वर आरोग्यमंदिर

मिराशी बोळ, पो. इचलकरंजी S.M.C.

आयुर्वेद सेवा संघ–नासिकचीं सर्व शास्त्रोक्त अनुभविक औषधें, तसेंच आयुर्वेद पत्रिकेचे अंक आमचेकडे मिळूं शकतील.

धातुवर्धक कंदर्प–वृष्य–पाक, टकलावर भ. भृंगराज तेल, शक्तिवर्धक अगस्तिप्राश हीं व अशींच नवीन नवीन औषधें वापरा. विशेष माहितीकरितां एकवेळ भेट द्या.

दि सूर्यकिरण फार्मसी लि.

१७३ गिरगांवरोड, मुंबई ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें —

लेखक–वैद्य पु. वि. धामणकर
धूतपापेश्वर–पनवेल

संतकल्प : : :

१ लघुमालिनी, २ मधुमालिनी, ३ सुवर्ण-ली आणि ४ बृहत्सुवर्णमालिनी ह्या चार ांचा समावेश ह्यांत होतो. 'मालतीवसंत" वसंत ती' आणि 'मालिनीवसंत' असे ह्या नांवाचे पर्याय त. मालती म्हणजे जाई, जुई, चमेली, रात्र, रिका, तरुणी, चांदणें. मालिनी म्हणजे माळ्याची त्री, माळीण, दुर्गा, सात वर्षांची मुलगी. तूनां कुसुमाकरः" म्हणजे वसंतऋतु. लघु म्हणजे न, बृहत् म्हणजे मोठा, ज्यांत सुवर्ण आहे अगर मधुर पदार्थ आहे, अशा पाठांवरून तें तें द त्या त्या नांवामागें लावलें गेलें आहे.

सर्व वसंत (१)बल(२)शुक्र(३) ओज वाढविणारे त. पण नांवावरून त्यांचा विशेष परिचय करून येईलसें दिसत नाहीं. एवढी गोष्ट खरी कीं, हे अतिशय प्रभावी आहेत. लघुमालिनी व मधु-नी हे कल्प बाल व गर्भिणींना चांगले मानवतात; सुवर्णमालिनी व बृहत्–सुवर्णमालिनी हे तरुण द्ध पुरुषांना बरें काम देतात. ह्या कल्पांचा असा विशेष आहे कीं, हे जितके जुने तितके ते सौम्य, व सूक्ष्मस्रोतोगामी बनतात. त्यामुळें हे कल्प ल वृद्ध स्त्री-पुरुषांना विविध कारणाकरितां सदैव युक्त ठरतात. अर्थात् हे कल्प संग्रहीं असणें आवश्यक ठरतें हें उघड आहे.

१४ लघुमालिनीवसंत

लघुमालिनी वसंताचा उपयोग लहान मुलें व णी यांना फार उत्तम होतो. ह्याचे गुण पाठांत र्भपोषण उत्तमः", व " सर्वरोगहरः शिशोः । " ह्यांचें वर्णन केलें आहे तें अगदीं यथार्थ आहे ोहि ह्याचा दृक् प्रत्यय घ्यावा. अशी त्यांच्या कार्य-ाची ग्वाही देतां येते.

लघुमालिनीवसंताचा संस्कृत पाठ

रसकयुगुलभागं वल्लिजं भागमेकं ।
द्वितयमथ सुलल्वे मर्दयेन्मृक्षणेन ।
भवति घृतविमुक्तो निम्बुनीरेण यावत् ।
ज्वरहरमधुकुल्या मालिनीप्राग्वसन्तः ॥
जीर्णज्वरे धातुगतेऽतिसारे ।
रक्तान्विते रक्तभवे विकारे ॥
घोरव्यथे पित्तभवे च दोषे ।
वल्लद्वयं दुग्धयुतं च पथ्यम् ॥
प्रदरं नाशयत्याशु तथा दुर्नामशोणितम् ।
विषमं नेत्ररोगं च गजेन्द्रमिव केसरी ॥
वसंतो मालिनीपूर्वः सर्वरोगहरः शिशोः ।
गर्भिण्यै तत्र देयो वै जयन्त्याः पुष्पकैःसह ।
सर्वज्वरहरः श्रेष्ठो गर्भपोषण उत्तमः ॥

— औ. गु. ध. शा. भा. ४।२५

नांवः— १ प्राग्मालिनीवसंत
२ लघुमालिनी वसंत

१ ज्या वसंत नामक योगांच्या नांवा-पूर्वी मालिनी अगर मालती शब्द आहे असा.

२ ज्याचा द्रव्यसंग्रह छोटा आहे असा.

पाठनिश्चितिः— ... ...

द्रव्यसंग्रहः— कलखापरी, मिरें लोणी, लिंबू.

द्रव्यनिर्णयः— मिरें-पांढरें, लोणी–गाईचें. कलखापरी—तांबडी. लिंबू-कागदी.

द्रव्यशोधनः— कलखापरी–गोमूत्रशुद्ध.

प्रक्रियाः– १) प्रथम मिरें व कलखापरी यांचीं सूक्ष्म चूर्णे करावींत. तीं पृथक्शः खलावींत.

२) तीं अत्यंत मऊ अथवा सूक्ष्म झालीं कीं पुनः सर्व एकत्र खलावींत. त्यांचें मिश्रण एकजीव वा ऐनजिनसी करावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३) त्यांत लोणी थोडें थोडें घालून खल करावा.

४) सर्व लोणी घातल्यानंतर तें त्यांत पूर्णपणें जिरेपर्यंत मर्दन चालू ठेवावें.

५) स्नेहाक्त मिश्रणास लिंबूरस भावना द्यावी.

काल:- प्रारंभकाल-शरद अथवा ग्रीष्म.

मर्दनकाल- १ ते २ महिने

सिद्धिप्रमाणः- २ तो. कलखापरी तर तयार-प्रमाण ७ तोळे.

परिगणनः- कलखापरी, स्नेह, अम्ल.

रोगः- गर्भ व गर्भिणी आणि लहान मुलें ह्यांचे सर्व रोग. शिवाय रक्तविकार, रक्तार्श, जीर्णज्वर, धातुगतज्वर, प्रदर नेत्ररोग, पित्तरोग, गलरोग.

मात्राः- २ गुंजा.

अनुपानः- मध, पिंपळी.

———×———

१५ मधुमालिनीवसंत

प्रास्ताविकः- शुद्ध हिंगुळाला डाळिंबाच्या रसाच्या व अंड्यांतील (पांढऱ्या व पिंवळ्या) बलकाच्या भावना दिलेल्या आहेत. डाळिंब हें आम्ल असून पित्तविरोधी आहे व रक्तसमान द्रव्य आहे. अंड्यांतील (पांढरा) बलक रससमान असून ओजो--वृद्धिकर आहे. तसेंच तो आमगर्भ असल्याकारणानें गर्भाच्या पोषणास मदत होते व स्नेहन, बृंहण, हीं कार्येंहि होतात. वरील द्रव्यांशीं मिऱ्यांचा संयोग केल्यानें मिऱ्यांच्या तीक्ष्णतेमुळें या कल्पाचें सूक्ष्म स्रोतसांत स्नेहनकार्य होतें. व बलकरूप स्नेहाच्या पचनासाठींहि मदत होते. ह्यांतील गव्हाला, कचोरा इत्यादि द्रव्यें वरील द्रव्यांच्या कार्यास उपकारक होतात. अशा-प्रकारची ह्या वसंतकल्पाची मांडणी असल्याकारणानें ह्याचें कार्य बृंहण, बल्य, ओजोवृद्धिकर, सूक्ष्म स्रोत-सांत स्नेहन करणें अशा प्रकारचें होतें.

बलमांसविहीनत्व असतां उपयुक्त

" कोणत्याहि पुष्कळ दिवस टिकून राहिलेल्या आजारानंतर त्या रोगाचा परिणाम होऊन बलमांस-विहीनत्व प्राप्त झाल्यास मधुमालिनी वसंताचा उपयोग अवश्य करावा. एकंदरींत हा वसंतकल्प नाजूक प्रकृतीच्या माणसांना, बाल, गर्भिणी व कृशत्व प्राप्त झालें आहे अशांना, शक्तिदायक, मांसवृद्धि करणारा असल्यानें अग्निबल पाहून तत्तत्विकारनाशक अनुपानें योजून उपयोगांत आणावा. "

— आ. औ. गु. ध. शा

पाठः— दरदमथ सुखल्वे भावयेत्सप्तवारम् ।
कुचफलभवतोयैश्छायया शोषयेद्वै ॥
तदनु मृदुकृशानौ धारयेल्लोहपात्रे ।
दरदापिचुकयाबत्तावतःकुक्कुटांडात् ।
जनितसकलतोयं ढालयेत्तस्य चोद्ध्र्वम् ।
असकृदयसदव्यां घर्षयेत्सावकाशम् ॥
गुलिकगमनमात्रं शुष्कता च प्रयातम् ।
भवति तु यत्प्रमाणं कर्चुरं स्यात्तदर्धम् ॥
मरिचनिभमथैवं गौरवल्लीजचूर्णम् ।
लकुचजनिततोयैर्भावयेत्सप्तवारम् ॥
कृतमरिचसमानं दापयेदाज्यखण्डे ।
हरति शिशिरतायं जीर्णज्वर्तिं समीरम् ॥
मधुमालिनिनामायं वसंतो वैद्यपूजितः ।
अनुपानविशेषेण बलपुष्टिप्रदायकः ।
गर्भवृद्धिकरश्चासौ गर्भिणीनां सुखावहः ॥
रोगनाशात्परं दद्याद्बलमांसाग्निवर्धनः ॥ र.

— औ. गु. शा. भा. ४:५

नांवः- ह्या वसंताची प्रक्रिया मधुररससंयोगा होते. म्हणून ह्यास मधुमालिनी म्हणतात.

पाठनिश्चिति

ओळ	मूळपाठ	पाठभेद	ग्रंथाधार
१	" सुखल्वे "	" खगवै "	र.यो.
२ व १०	" कुचफल "	" लकुचफल "	"
९	" मरिच्चमणि "	" मरिचनिभं "	"

वसंताच्या सर्व प्रकारांत मिरें आहेत; त्याप्रमाणें कलखापरीहि आहे, असावी, असा आग्रह धरून यो. रा.त भाषाटीकाकारांनीं खग=कलखापरी (खपरिया) असा अर्थ दिला आहे. पण खग=कलखापरी अ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोणत्याच निघंटूंत अगर कोशांत सांपडत नाहीं. =हिराकस असा अर्थ मिळतो. पण तो ह्या गांत अपेक्षित नाहीं. तसेंच हा पाठ अगदीं अलि-त्वा आणि तोहि वै. बोरकर ह्यांचें घराण्यांतला. तः बोरकरांनीं तो संस्कृत भाषेंत पद्यांत बसविला. त्यांनींच संग्रहित केलेल्या रसचंडांशुनामक ग्रंथांत विला. त्या ग्रंथांत सुखल्वे असाच पाठ आहे.

लकुच कीं कुचफल ?

फलानामवरं तत्र लकुचं सर्वं दोषकृत्। अ. हृ. ह्याचें वर्णन आहे. तेव्हां हें फल अशा सुन्दर योगांत अभिप्रेत असेल असें वाटत नाहीं. शिवाय मूळ पाठ "कुचफल" असाच आहे. कुच=स्तन. स्तना-सारखें दिसणारें फल. डाळिंबाचा अर्धाभाग साग्र-स्तनासारखा दिसतो. प्राचीनकाळीं पुरुष नटांना स्त्रीवेष देतांना हा भाग स्तनावर बांधला जात असावा म्हणूनहि त्याला कुचफल हें नांव पडलें असावें, गुणांच्या दृष्टीनें पाहतांहि डाळिंब--त्रिदोष्न, हृद्य, दीपन, ग्राही, लघु, शीतल, श्रमघ्न आणि ज्वरहराहि आहे. (नि. शि.) म्हणून सर्व दृष्टीनें मूळ पाठच युक्त होय.

मरिचनिभं किं मारिचमणि ?

मरिचनिभ हा पाठभेद युक्त नाहीं. कारण मिऱ्यासारखें काय ? ह्याचा अर्थबोध होत नाहीं. त्या-ऐवजीं मारिचमणि शब्दानें मिरें असाच निःसंदिग्ध अर्थ होतो. मूळपाठहि असाच आहे.

द्रव्यसंग्रहः– हिंगूळ, गहुला, मिरें, कचोरा, कोंबडीचें अंडें, डाळिंब.

द्रव्यानिर्णयः– हिंगूळ खनिज; मिरें पांढरें
गहुला-- ताजा; कचोरा ताजा,
डाळिंब– मधुर,

द्रव्यशोधनः– हिंगूळ— आलेंरसशोधित.

मधुमालिनी वसंताची प्रक्रिया

प्रथम हिंगुळास डाळिंबाचे रसाच्या सात भावना द्याव्यात. ह्या भावना सावलींत सुकवाव्यात. हा हिंगूळ पूर्ण शुष्क होत नाहीं. तो चिकट रहातो. त्याचा गोळा करावा. त्याचें वजन करावें. तोळ्यांचा संख्येइतकीं अंडीं घ्यावींत.

मंद विस्तवावर पसरट रुंद व मोठा तवा ठेवावा. त्यावर हिंगूळ व अंड्यामधील पांढरा व पिंवळा असे दोन्ही बलक ठेवावेत. प्रथम उलथण्यानें हे पदार्थ सारखे हलवावेत म्हणजे ते करपत नाहींत. पदार्थ सुकूं लागतो तशा त्याच्या राजगिन्याचे लाह्या-प्रमाणें गोळ्या होऊं लागतात. व तो पदार्थ फुगत जातो. गोळ्या झाल्या कीं त्या पळीनें घोंटून फोडा-व्यात. व चूर्ण तयार करावें. मग दुसऱ्या अंड्यामधील बलक त्यांत घालावेत. पुनः पूर्ववत् उलथणें, घोंटणें, चूर्ण करणें ह्या क्रिया कराव्यात. अशा क्रमानें सर्व अंडीं संपवावींत.

अंडीं मिळविण्यानें हिंगूळाचें वजन साधारणतः दीडपट होतें. हें मिश्रण ३ तो. भरलें तर पुढची औषधें खालीलप्रमाणें घ्यावींत.

मिश्रण ३ तो., कचोरा १॥ तो., मिरीं १॥ तो. गहुला १॥- तो. हीं द्रव्यें प्रथम शुष्कस्थितींतच खलांत मर्दन करून एकजीव करून घ्यावींत. मग त्यांत डाळिंबाचा अगर लिंबाचा रस घालावा.

सप्तवारम् = सात दिवस

सप्तवारम्। याचे सात वेळ किंवा सात दिवस असे दोन्ही अर्थ संभवतात. सातवेळ रस घालून खल केला तर हा पदार्थ चिकट होतो, ओलाच राहतो व कालांतरानें आंबूसहि होतो; ही अवस्था अपेक्षित नाहीं. त्यामुळें फक्त सात दिवस डाळिंबाचे रसांत ह्याचा खल करणें इष्ट ठरतें.

खल चांगला झाल्यानंतर १ (चटकी) गुंज-मानाच्या गोळ्या करून त्या सावलींत सुकवाव्यात. म्हणजे म. मा. वसंत छान तयार होतो.

कालः– हिंगुळास भावना – हेमंत
मर्दन– शिशिर ऋतु – दिनमान ७ दि.

सिद्धिप्रमाणः– २ तो. हिंगुळ ८ तो. औषध

परिगणनः– मधु – हिंगूळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रोगः– जीर्णज्वर, शीतज्वर, वातरोग, गर्भिणी, गर्भ, बालक यांचे विकार. अग्निदीपक, बल्य, मांसवर्धक

मात्राः– १ ते ३ गुंजा

अनुपानः– दूध, मध, डाळिंबरस, सुधारस.

१६ सुवर्णमालिनीवसंत

प्रास्ताविकः– रुग्ण एखाद्या मोठ्या त्रासदायक आजारांतून उठला असें म्हटलें म्हणजे त्याचा अर्थ इतकाच कीं, त्या आजाराचीं मुख्य त्रासदायक लक्षणें नाहींशीं झालीं किंवा कमी झालीं. परंतु त्या आजाराबरोबर झगडतां झगडतां सर्व शरीरज धातु क्षीण झालेले असतात, बलहि क्षीण झालेलें असतें. अग्निमांद्य आल्यामुळें अन्नाचें चांगलें पचनहि होत नाहीं. ह्या प्रकारच्या अवस्थेमध्यें सुवर्णमालिनी वसंत देण्याची वृद्ध वैद्यांची वहिवाट आहे. आणि "सर्वरोगे वसंतः" हें वचन अशा प्रकारें सत्य आहे. वसंतानें पाचक रसांचें उदीरण चांगल्या प्रकारें होतें. धात्वंतर्गत अग्नीलाहि सक्षमपणा येतो. त्यामुळें अन्नपचन नीट होतें. रसादि धातु नीट बनतात. नंतर पुढचे पुढचे रक्तादि प्रतिमूल धातुहि परिपुष्ट होतात. ओज वाढतें, तेज येतें, वर्ण सुधरतो.

जीर्णज्वर, प्लीहावृद्धि, अग्निमांद्य

जीर्णज्वर, ह्यांत प्लीहावृद्धि व अग्निमांद्य हीं विशेष लक्षणें असतात. त्यांत क्षयाचा कांहींसुद्धां संबंध नसतो. पुष्कळ दिवस शीतपूर्वक ज्वर, आंत्रिकादि सन्निपातज्वर येऊन गेल्यानंतर जीर्णज्वर राहतो. या प्रकारच्या जीर्णज्वरांत सुवर्णमालिनी वसंत फार उत्तम कार्य करतो. आ. औ. गु. शा.

सुवर्णमालिनीवसंताचा संस्कृत पाठ

स्वर्णं मुक्ता दरदमरिचं भागवृध्द्या प्रदेयम् ।
खर्पर्यष्टौ प्रथममखिलं मर्दयेन्म्रक्षणेन ॥
यावत्स्नेहो व्रजति विलयं निंबुनीरेण तावत् ।
गुंजाद्वंद्वं मधुकणयुता सर्वरोगे वसन्तः ॥ यो. र.
मालतीप्राग्वसन्तः ॥ र. यो. सा. ४२८

नांवः– योगारंभीं सुवर्ण हें पद आहे.

मालती= जाई, चमेली, पुष्पलताविशेष, वनस्पतीविशेष, पहाडमूळ, गजरगोटी, तरुण स्त्री, चांदणें, रात्रि.

मालिनी = पार्वती, उमा, दुर्गा, धमासा, लताविशेष, माळ्याची बायको. मालती शब्दाचा विग्रह "मां लक्ष्मीं लसतीति ।" लक्ष्मी तें खेळविते जी, असा आहे. मालती शब्दाचा मिरें असा अर्थ सांपडतां तर फार बरें झालें असतें. कारण तें सर्व वसंत प्रकारांत प्राधान्यानें आहे. पण मिरें असा अर्थ सांपडत नसल्यानें दुसरे अर्थ लक्षांत घेणें क्रमप्राप्त आहे. मालती म्हणजे (तारुण्य) लक्ष्मी शरीरांत संचरविणारी असा अर्थ येथें बराचसा जवळचा वाटतो. वसंत हें मदनाचें नांव आहे. वसंत ह्याचा अर्थ "वसंति अस्मिन् सुखेन इति ।" वास करताहेत सुखानें ज्याचे ठायीं. तेव्हां सुवर्ण=कनक (मुलगा), मालती=तरुणी, वसंत=तरुण. ही तिन्ही उत्तमांत उत्तम लाभतात ज्याचें सेवनानें तो सुवर्णमालतीवसंत (ह्या तिघांना मानवणारा असा जो तो.) किंवा सुवर्ण आरंभाचें पद, मालती हें दैवताचें नांव व वसंत (ऋतु) हा औषध तयार करण्याचा योग काल, ह्या त्रिविध हेतूनेंहि हें नांव संयोजिलें असावें.

पाठनिश्चितिः– ठीक आहे.

द्रव्यसंग्रहः– १ सुवर्ण, २ मोती, ३ हिंगूळ, ४ मिरें ८ कलखापरी. लोणी, लिंबू.

द्रव्यनिर्णयः– सुवर्ण–भस्म (रक्त) मिरें–पांढरें, मुक्ता–भस्म चं. पु. लोणी–गाईचें. हिंगुळ–खनिज. लिंबू–कागदी.

द्रव्यशोधनः– हिंगुळ–लिंबूरस शुद्ध.

सुवर्णमालिनीवसंताची प्रक्रिया

द्रव्यसंग्रहानंतर प्रक्रियेला सुरवात होते. द्रव्यांप्रमाणेंच प्रक्रियेलाहि फार महत्व असतें. तीमध्यें फरक झाल्यानें औषधीमध्येंहि गुणांतर होतें. म्हणून द्रव्यवर्गाप्रमाणेंच प्रक्रियाहि निश्चित झालेलीच असावयास पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७ अवस्थांतरें

सुवर्णमालिनीवसंताच्या प्रक्रियेचीं सात अवस्थां- होतात:—

...क औषध निःशब्द करणें (सूक्ष्मकरणम्)
...षधांचें मिश्रण योग्य तऱ्हेनें करणें (संमिश्रणम्)
...रस झालेल्या मिश्रणास
स्नेहाची भावना देणें (स्नेहमर्दनम्)
...हाक्त मिश्रणांत अम्ल जिरविणें (लिंबूरस भावनं)
...ताच्या गोळ्या करणें–सुकविणें (गुटिकरणं शोषणं)
...त्व परीक्षण व संग्रहण
...द्धौषधी परीक्षण

आतां आपण ह्या अवस्थांचा तपशील पाहूं.

सूक्ष्मकरणम्

सुवर्णभस्म, मुक्ताभस्म आणि हिंगूळ हीं पृथक्शः पुन्हां खलावींत व तीं निःशब्द झालीं अस– ...ी खात्री करून घ्यावी. पांढरें मिऱ्याचें चूर्ण ...ळ करावें. व मग पुन्हां खलांत घालून त्याच्या ...पडेपर्यंत तें खलावें. तीच तऱ्हा कलखापरीची.

सूक्ष्मतम झाल्याची खूण, रेखापूरण

औषधाचा खल सुरूं होतांच खरखर असा ...ऐकूं येऊं लागतो. तदनंतर तो बंद होतो. ...खलतां खलांतील औषधाच्या घड्या पडूं लाग- ...किंवा तें उधळूं लागतें. ही अवस्था औषध ...म झाल्याची खूण आहे. ती प्रथम उरकून घ्यावी. हें चूर्ण चिमटींत भरलें तर त्याची चिपटी होते. ...तर स्पर्श मऊ, गुळगुळीत लागतो. आणि तें ...बोटांचे रेषेंत जाऊन बसतें. हें लक्षण चूर्णास ...ुरा झाल्याचें आहे.

आधुनिक पद्धतीनें चाळणीचा नंबर दिला कीं, ...अगर ही मर्यादा निश्चित शब्दांत सांगतां येते.

संमिश्रणम्

प्रथम हिंगूळ व सुवर्णभस्म खलावींत. हीं दोन ...एकरूप झालीं कीं, त्यांत मुक्ताभस्म घालून खल करावा. ह्या तिघांचा एकजीव झाला कीं, मिरेंचूर्ण त्यांत मिसळावें. तेंहि पूर्णपणें मिसळलें व मिश्रणास एकच रंग आला कीं शेवटीं कलखापरी-चूर्ण पूर्वमिश्रणांत घालून सर्वांचा खल एकत्र असा पुन्हां करावा.

मर्दनं गुणवर्धनम् ।

आयुर्वेदीय औषधी प्रकरणांत मर्दनावर फार भिस्त आहे. हें जितकें अधिक होईल तितकें चांगलें असा आमचा समज आहे. म्हणून प्रत्येक संयोगानंतर पुनः पुनः खल करावयास सांगितला आहे. सर्व मिश्रण संपूर्णतया खललें गेलें म्हणजे सर्व औषधें सारख्या प्रमाणांत सर्वदूर एकत्र होतात. व मग मिश्रणाचा रंग, रस आणि रूप हीं एकचएक प्रतीत होतात. हें कार्य शुष्क स्थितींतच चांगलें साधतें.

स्नेहमर्दनम्

सु. मा. वसंत बृंहण, पौष्टिक आणि बल्य आहे. ह्या दृष्टीनें ह्याला स्नेहाची जोड दिलेली आहे. स्नेहांतहि प्राणिज स्नेहच निवडला आहे. ह्या स्नेहांतहि साय, लोणी, व तूप असे तीन प्रकार आहेत. पैकीं पचन–शोषणसुलभ, पुनः अधिक कार्यक्षम म्हणून येथें लोणीच नियुक्त केलें आहे.

आठ प्राण्यांचें लोणी

मानुषी, गाय, म्हैस, मेंढी, उंटीण, हत्तीण, घोडी आणि शेळी अशा आठ प्राण्यांचें लोणी औषधी युगांत इष्ट मानलें आहे. प्रत्येक प्रकारास विशिष्ट गुण कर्म आहे. आणि त्यांचें कार्यक्षेत्रहि भिन्न आहे. वसंतास लोणी घालतात. त्याच्या गाय, म्हैस व मेंढी अनुसार तीन परंपरा रूढ आहेत.

लोण्यांतील गुणभेद

गाय, म्हैस, मेंढी ह्यांतील भेद उत्तरोत्तर प्रमाणानें अधिक गुरु, बल्य, पौष्टिक असा आहे. पण बुद्धि, स्मृति इ. बाबत सूक्ष्म स्रोतोगामित्व, शीघ्र कार्यकारित्व ह्यांमध्यें गाईचें लोण्याचा नंबर पहिला लागतो; म्हणून वसंतास गाईचें लोणी घालणाऱ्यांचा वर्ग फार मोठा झाला आहे.

नवनीत, हैयंगवीनं

दूध तापवून त्याचें दही व ताक करून लोणी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काढतात. त्याला नवनीत म्हणतात. तसें निरसें दूध घुसळूनहि लोणी काढतात त्याला हैयंगवीन म्हणतात. नवनीतापेक्षां हैयंगवीन अधिक बल्य व श्रेष्ठ गणलें गेलें आहे. तेंहि कांहीं लोक उपयोजितात.

मर्दनांत कसूर होऊं नये

गाय, म्हैस, मेंढी ह्यांचे लोण्यांत मेदाचें प्रमाण चढतें असल्यानें मर्दनाचें मानहि त्या मानानें चढत्या श्रेणीचें ठेवावें लागतें. सम्यक् मर्दनानें स्नेहविलयन छान साधतें. मर्दन योग्यतया न झालें तर काल अधिक लागूनहि वसंताचा रंग विटण्याचा संभव निर्माण होतो. म्हणून मर्दनांत कसूर होऊं देऊं नये.

२॥ ते ४॥ तोळे लोणी

वसंताचे पाठांत स्नेहाचें प्रमाण सांगितलेलें नाहीं. पण साधारणमानतः १८ तो. वसंतचूर्णास २॥ ते ४॥ तोळे लोणी जिरवितात, असें आढळतें. लोणी अधिक जिरविणें चांगलें कारण मग वसंत उष्ण पडत नाहीं.

स्नेहविलयनम्

लोण्यांत दोन प्रकारचें पाणी असतें. एक सामान्य जल व दुसरें द्रवत्व राखणारें जल. पहिल्या प्रकारचें पाणी लोणी पातळ करण्यानें उडतें. दुसऱ्या प्रकारासच फार वेळ लागतो. आणि खरी मेहनत त्याकरितांच घ्यावयाची असते.

प्रत्येक कणास ताजी मोकळी हवा

चूर्णास स्नेह घातला कीं, चूर्ण प्रथम सामान्य जल शोषून घेतें व मिश्रण दमट होतें. खलून खलून प्रत्येक चूर्णकणास स्नेह भिडवायचा व मिश्रण चाळवून चाळवून प्रत्येक कणास ताजी मोकळी हवा लागूं द्यायची. ह्या क्रियामुळें स्नेहविलयन चांगलें जमतें.

उभयविध उष्णतामान हवें

ह्याकरितां मर्दनजन्य उष्णता व वातावरणांतील उष्णता अशें उभयविध उष्णतामान जरूर असतें. तें उन्हाळ्यांत योग्यतया लाभतें व कार्यभागहि उत्कृष्ट साधतो.

स्नेहविलयन, टीपकागदाची परीक्षा

स्नेहाक्त मिश्रण सुरवातीस दमसर होतें. टीप कागदांत दाबलें तर तो भिजतो. पण जसजसें मिश्रण अधिकाधिक खललें जातें तसतसें स्नेहजल उडून जातें स्नेह निगूढ होतो. मिश्रण मोकळें होतें तें भगरा दिसूं लागतें. पण त्यावर एक प्रकारचें तेज चमकतें व मग हें मिश्रण टीपकागदांत दाबलें तर टीपकागदा डागसुद्धां पडत नाहीं. मर्दनानें स्नेह जिरतो. सुक तोहि ह्यालाच स्नेहविलयन म्हणतात.

नंतर लिंबूरस भावना

स्नेहविलयनाचें कार्य केवळ स्नेह खलण्या उत्तम साधतें. तें पूर्णपणें झालें असल्याची खू पटवून देतां घेतां येतें. तसें स्नेहाबरोबरच लिंबूर घातल्यानें जमत नाहीं. किंबहुना स्नेहद्रावण, प्रसार इ. कार्यास लिंबूरसानें प्रतिबंधच होतो. त्यापेक्ष स्नेहविलयनानंतर लिंबूरसभावना हें कार्य अधि साहाय्यक ठरतें. म्हणून स्नेहविलयन प्रथम करून घ्यावें. तें पूर्ण झाल्याची खात्री पक्की करून घ्यावी आणि मग लिंबाचा रस त्यांत घालावा.

महत्वाची सूचना

स्नेहविलयन नीट झालें नाहीं तर तो वसंत कालांतरानें खंवट होतो. त्याला कुजट घाण येऊं लागते.

लिंबूरस-विभावनम्

वसंत दीपनपाचन व्हावा, वसंतांत घातलेल्या स्नेह सहज सम्यक् पचावा, एवढेंच नव्हे तर त्या- बरोबर अवांतर दुधातुपाचें व पौष्टिक पदार्थांचेंहि पाचन उत्तम व्हावें, बल व पुष्टि हीं दोन्हीं लाभा- वींत; शरीर चटकन् व बळकट प्रतिकारक्षम व्हावें एतदर्थ सर्वश्रेष्ठ अम्ल अशा कागदी लिंबाच्या रसाचें संस्करण ह्यावर करून मोठ्या युक्तीनें आम्लत्वाची जोड ह्यास दिलेली आहे. तीहि प्रभूत प्रमाणांत आहे. हें लक्षांत घेऊन लिंबाची व कालाची निवड होणें जरूर आहे.

कागदी लिंबू पावसाळ्यांत मिळतें. हिंवाळ्यांत मिळतें, आणि उन्हाळ्यांतहि मिळतें. पैकीं पावसाळी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लिंबू जलाधिक, अल्पाम्ल व विनाटिकाऊ असतें. म्हणून तें वर्ज्य. हिंवाळी लिंबू असतें उत्तम, पण उन्हाळ्यांतल्या लिंबातलें आम्ल अधिक संहत आलेलें असतें व वसंत करण्यास कालहि उन्हाळाच (वसंत) योग्य सांगितला असल्यानें त्यास उन्हाळ्यांतलें लिंबू इष्ट मानलें आहे.

लिंबूरस कसा घ्यावा ?

हें लिंबू झाडावरच परिपक्व झालेलें असावें. त्यांतलें अनवश्यकी जल झाडावर असतांनाच उडालेलें असावें. त्यास इतर जलाचा संपर्क झालेला नसावा. अशा लिंबाचा रस प्रसन्न असाच निघतो. तो जाड फडक्यानें गाळून १ प्रहर निवळत ठेवावा. व वरची निवळ जेव्हांचे तेव्हांच खलांत घालावी. ती शिळी होऊं देऊं नये. ती जसजशी अधिक काळ राहील तसतशी ती आंबत जाते. व असा आंबलेला रस वसंतास घातल्यास त्यानें खोकला होतो किंवा तो वाढतोहि.

वसंतांत लिंबाचा रस किती जिरवावा हें सांगितलें नाहीं. स्नेह जिरेपर्यंत लिंबूरसांत खल करावा असें सांगितलें आहे. पण हें मान फार मोघम होतें. त्यांत नैश्चिय आणणें जरूर आहे. साधारणमानतः वसंताचा खल लिंबूरसांत ४२ दिवस करण्याची प्रथा रूढ आहे. बरी आहे ही परंपरा.

गुटिकाकरण —शोषण

वसंताच्या गोळ्या २।२ गुंजेच्या कराव्यात. गोळी करणें ही एक प्रकारची सुरक्षितता आहे. चूर्णापेक्षां गोळी जास्त दिवस टिकते.

ह्या गोळ्या उन्हांत वाळविल्यास उलतात, ठिसूळ होतात. कल्हईच्या ताटांत ओल्या गोळ्या वाळविल्यास तास व गोळीस काळा डाग पडतो; पण हें कांहींहि इष्ट नाहीं. तेव्हां त्या गोळ्या कांचपात्र, मृत्तिकाशराव अगर काष्ठतबकांत ठेवून त्यावर एक पातळ वस्त्र घालून सांवलींत वाळवाव्यात. म्हणजे त्या उत्तम सुकतात.

वसंत सुकविण्याचें काम पावसाळी हवा सुरू होण्यापूर्वी पुरें व्हावें लागतें. तें पुरें झालें नसल्यास त्याला हवेची बाधा होते. तो सर्दावतो व त्याला बुरा येतो आणि शरद् ऋतु पर्यंत तो तसाच राहातो, सुकत नाहीं. त्यामुळें रंग आणि रस ह्यांची हानि होते. तो वसंत मातकट लागतो. तेव्हां ही आपत्ति न येईल अशी दक्षता घ्यावी.

शुष्कत्व परीक्षण– टण आवाज

सुकलेली गोळी ताटांत टाकून पहावी. ती पूर्ण सुकली असल्यास टण् आवाज येतो. नंतर ती खलांत खलावी. शुष्क गुटिकेचें छान मोकळें चूर्ण होतें. खल अगर बत्यास कांहींहि चिकटत नाही. ती गोळी संशुष्क झाली असें समजावें. गोळी पोटांत ओली राहिल्यास तिला आंतून बुरा येतो. ही गोष्ट इष्ट नसते.

गुटिका संग्रहण- खालींवर कापूस

उत्तम वाळलेला वसंत कांचपात्रांत खालींवर कापूस घालून ओलीं हवा लागणार नाहीं अशा कोरड्या जागीं ठेवावा. म्हणजे तो पुष्कळ काळ टिकतो.

कालः– साधनकाल– वसंत, ग्रीष्म,
मर्दनकाल–२ महिने.

सिद्धिप्रमाणः— १ तो. सुवर्ण तरं २८ तो. औषध

परिगणनः— सुवर्ण, मेद, अम्ल, सिकता.

रोगः— सर्व रोगांत अथवा तदनंतर हृद्य, बल्य.

मात्राः— -।- ते १ गुंज.

अपुपानः— मध-पिंपळी, लोणी, मध, खडिसाखर.

१७ बृहत् सुवर्णशालिनीवसंत

संस्कृत पाठः– स्वर्णं प्रवालं दरदं मरीचं
कस्तूरीगोरोचननागभस्म ।
वंगाऽभ्रकं कुंकुममौक्तिकानां
स्यात्पिप्पलीखर्परशमरामैः॥
बाणाद्रिभूचंद्रकरा ऽ भ्रिरामै–
र्धरा ऽ ब्धिभूरुद्रयुतैश्च भागैः।
एकत्र संचूर्णं कृतं तदेव
कर्षत्रयं गोनवनीतकं च ॥
निम्बूत्थतोयेन विमर्दनीयं
घृतेन मुक्तो भवतीह यावत् ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुंजाद्वयं क्षौद्रकमागधीभ्यां
जीर्णज्वरे देयमिदं प्रशस्तम् ॥
रक्तप्रमेहं बहुमेढ्रशूलं
पाण्डामयं कामलखर्वशूलम् ।
श्वासं कासं बहुमूत्रकृच्छ्रं
मूत्राश्मरी हन्ति रुजं क्षयं च ॥
सर्वाऽतिसारं ग्रहणीविकार—
मर्शोविकारं प्रविनष्टवीर्यम् ।
घोरव्यथे पित्तभवे विकारे
बालग्रहे गर्भयुतासु शस्तः ॥
योनीषु शूलं प्रदरातिसारौ
ससूतिका सोमगदं निहन्ति ।
असौ बृहन्मालिनिकावसन्तः
सुवर्णपूर्वः कथितो मुनींद्रैः ॥
वसन्ते ऋतौ स्वर्णमालीवसन्तः
प्रशस्तो हितः सज्वरे मानवानाम् ।
प्रभाते दिनान्ते कणासाह्ययुक्तो
द्विगुंजोऽश्वगन्धाऽभिधेनैव सेव्यः ॥

— र. यो. सा. ४३५

नांवः— द्रव्यसंग्रह मोठा म्हणून बृहत्.

पाठनिश्चितिः-ठीक.

द्रव्यसंग्रहः- अग्नि=३, अब्धि=७, आर्द्र =७, कर=१, चंद्र = १, धरा = १, बाण = ५, भू = १, राम = १, रुद्र = ११ ह्या पद्धतीनें वरील पाठांतील द्रव्यें घेतली असतां द्रव्यांचीं प्रमाणें पुढीलप्रमाणें बसतात.

५ सुवर्ण, ७ प्रवाळ, १ हिंगूळ, १ मिरें, १ कस्तूरी, ३ गोरोचन, १ नागभस्म, १ वंगभस्म, ७ अभ्रकभस्म, ११ मौक्तिकभस्म, १ पिंपळी, १ कलखापरी, ३ गाईचें लोणी, लिंबूरस जरूरीपुरता.

द्रव्यनिर्णयः—मिरें—पांढरी, पिंपळी-जुनी लेंडी.

द्रव्यशोधनः-पिंपळी-चित्रक,
कलखापरी-गोमूत्रांत.

प्रक्रियाः- सुवर्णमालिनीवसंताप्रमाणें.

कालः— साधनकाल-वसंत, ग्रीष्म;
मर्दनकाल-२ महिने.

सिद्धिप्रमाणः-१ तो.कस्तूरी, तर ६२ तो.औषध.

परिगणनः- भस्म, मेद, अम्ल इ. चें

रोगः— जीर्णज्वर, रक्तप्रमेह, मेहनशूल, कावीळ, पांडुरोग, श्वास, कास, मूत्रकृच्छ्र, मूत्राश्मरी, क्षय, अतिसार, संग्रहणी, मूळव्याध, षंढता, बालग्रह, योनिशूळ, प्रदर, सोमरोग, बाळंतरोग.

मात्राः= ·॥- ते २ गुंजा

अनुपानः- मध-पिंपळी, आस्कंद दूध

टिप्पणीः- हिंगुळाचे ऐवजीं मकरध्वज-सिंदूर घेण्याचीहि कोठें कोठें प्रथा आहे.

४।४ तासांनीं नवा गडी

समारोप- वसंतकल्पांत हमखास काम देणारे पदार्थ आहेत. ते तयार करण्यास बरेच दिवस लागतात त्यामुळें खर्चहि अधिक येतो. तेव्हां ह्याचें प्रमाण मोठें घालावें म्हणजे खर्चविभागणी बेतशीर होते व वसंत किफा- यतशीर किंमतींत तयार होतो. वसंतमिश्रण किमान पक्षीं ३६ ते ४० तो. खलांत घालावें, म्हणजे सिद्ध औषध ६०।६२ तो. तयार होतें. एवढा खल १ गडी (माणूस) करूं शकतो आणि तो होतोहि चांगला. रोज आठ तास तरी खल व्हावा. चार चार तासांनीं नव्या दमाचा गडी मर्दनास बसवावा. मर्दन हेंच कार्य यांत विशेष महत्वाचें आहे. ही मेहनत घ्यावी तेवढी थोडीच पडते आणि अशा औषधांवर ती घ्यावीहि. त्यानें आपलेंच कल्याण अधिक होतें.

शस्त्र, अग्नि, औषध यांची उपमा एकमेकांस देतात. ही गोष्ट लक्षांत घेऊन औषध अगदीं उत्तम कार्यतत्पर तयार करण्याचें धोरण औषधीकरणांत ठेवावें म्हणजे साधेंच औषध महौषध होतें. त्याला सिद्धमंत्र व रत्नाचीहि योग्यता येते. तेव्हां वसंत-कल्पास महौषधत्व प्राप्त करून द्यावें आणि महौषधी म्हणूनहि तो सतत जवळ बाळगावा.

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कडुनिंबाचीं पानें नेत्ररोगहारक आहेत

(लेखकः—वैद्यराज मोतीलाल कमलनयन पाराशर, आयुर्वेदरत्न)

भारतवर्षांत कडुनिंबाचीं पानें, कृमिनाशक, ..., कडु तसेंच रक्त व वीर्यशोधक अतएव शरीर- ...दायक मानलीं जातात. शरीरस्वास्थ्याचे दृष्टीनें ...ला अग्रस्थान प्राप्त झालेलें आहे. ज्या घरांत ... मोहल्यांत कडुनिंबाचें झाड आहे त्या घरांतील ... मोहल्यांतील बहुतेक लोक आरोग्यसंपन्न होऊं ...तात. निंबाचीं पानें बहुतेक सर्व ऋतूंत सहज प्राप्त ...ऊं शकतात. तीं गुणानें अद्वितीय तसेंच रामबाणहि ...त. त्यांपासून हानि यत्किंचितहि होत नाहीं. ...च्या ह्या अमृततुल्य गुणांमुळें लेखकास हा लेख ...ण्याची स्फूर्ति झाली आहे.

या लेखांत पुढें जे योग आले आहेत ते १०० ...गुणकारी आहेत. व केवळ परमार्थ भावनेनें ...ही माहिती येथें दिली आहे.

कोणत्याहि व्रणावर लुगदी

१) निंब-पल्लवांत नेत्ररोगनाशक गुण विशेष ...त आहेत. आमचे शेतकरी--बंधु कोणत्याहि ...र कडूनिंबाच्या पानांची लुगदी करून बांधतात. ...ते ताजी वडी करून बांधावी लागते. ह्याच्या ...नें व्रण पसरत नाहीं, दुखत नाहीं व थोड्याच ...ळांत व्रण भरून येऊन पूर्ण बरा होतो. व्रण बरा ...ल्यानंतर त्यांवर खोबरेल तेलाची अगर शुद्ध ...ची पट्टी बांधावी म्हणजे पूर्ण आराम पडेल. ...उपचारामुळें अत्यंत असाध्य असा दुष्ट व्रणहि ...होऊन जातो.

नारूवर बाह्योपचार

२) नारूवर निंबाचीं ताजीं पानें आगींत अर्धवट ...ून नारूमुखावर बांधावी म्हणजे नारू भरून ... ही क्रिया दररोज सकाळीं करावी. परंतु पानें ...ण्यापूर्वीं नारूची जखम निंबाचीं पानें घालून ...ळलेल्या ऊन पाण्यानें धुवून काढावी. असें साधारण एक आठवडा केलें असतां नारू बरा होतो. हा योग अनुभावित आहे.

नाडीव्रणावर मलम

३) शंभर वेळां धुतलेल्या (गाईचें) तुपांत निंबपानांचा रस मिळवून घृतपाक विधीनें घृत तयार करून त्याचा मलम करावा. हा मलम नाडीव्रण व व्रण यांवर आश्चर्यकारक गुण येतो.

काळी राख + खोबरेलतेल

४) निंबपत्ती जाळून त्याची काळी राख खोबरेल तेलांत अगर तुपांत मिश्रित करून त्याचा लेप लावण्यानेंहि व्रण भरून येतो.

निंबजलस्नान व कोष्टशुद्धि

५) निंबपत्ती पाण्यांत उकळून त्या पाण्यानें व्रण धुतल्यास व्रणवृद्धि होत नाहीं. ह्या पाण्यानें कंडु व खरूज असलेल्या इसमानें तीनचार दिवस स्नान केल्यास त्याची कंडु व खरूज नाहींशी होते. परंतु हा प्रयोग करण्यापूर्वीं रुग्णास कोष्टशुध्द्यर्थ एखादा सौम्य जुलाब देणें आवश्यक आहे. असें करण्यानें निश्चया--त्मक गुण येतो.

तीव्र गुणकारी निंबतेल

६) निंबाचीं पानें, काळे मिरे व मोरचूद हीं द्रव्यें बारीक वाटून त्याची लुगदी तयार करावी. शुद्ध खोबरेल अगर सरसूचे तेल कढईंत घालून त्या मध्यें ती लुगदी ठेवावी. व त्यांत पांच कुचलेहि पण टाकावेत. नंतर ती कढई चुलीवर ठेवून आंतील सर्व द्रव्यें तेलांत चांगली काळी होईपर्यंत अग्नि द्यावा. नंतर तें तेल थंड झाल्यावर नासूर, व्रण, खरूज वगैरेवर लावावें म्हणजे गुण येतो. पेरे (काळी फुली) रोग जो करंगळी अगर आंगठ्याच्या पेरांस होतो व ज्यांत इतकी आग होते कीं, रुग्णास मरण आलें तर बरें असें वाटूं लागतें. ह्या रोगाची उपेक्षा केल्यास ज्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोटास तो झाला असेल तें झडून जातें. वरील योग हा या व्याधीवर रामबाण उपाय आहे.

पेरे रोगानें बन्धु आजारी

आमच्या घरीं एक महात्मा आला होता व त्यावेळीं आमचे एक बंधु ह्या पेराच्या व्याधीनें आजारी असून ते खरोखरीच त्याच्या दुःखानें मुलां-प्रमाणें रडत होते. सदर महात्म्यानें वरील तेल तयार करून तें त्यांच्या पेरांस लाविलें व त्या तेलांत भिजवून ती वात व्रणांत ठेवली ह्या उपायानें आमचे बंधु रोगमुक्त झालें. म्हणून मी वरील तैल-कृति सदर महात्म्याजवळ शिकलो व ती आतां वाचकांच्या फायद्याकरितां प्रसिद्ध करीत आहे. हें औषध कमींतकमी एक आठवडा तरी वापरलें पाहिजे.

केसासाठीं उपयुक्त तेल

७) हें औषधी तेल डोक्यांस लावित गेल्यानें ऊंवा व लिखा केसांत होण्याचें बंद होतें. व केसहि नरम होतात.

८) साप, विंचू, गोम यांच्या विषप्रतिकारांत व तसेंच नारू, उन्हाळी ताप (उष्माघात) व कांहीं संसर्गजन्य रोगाचे बाबतींत निंबपाल्याच्या झाडणीचा प्रयोगहि करितात. हें सर्वांस माहित आहेच.

चांगलें दंतमंजन

९) निंबपत्ती जाळून त्याच्या भुकटींत थोडें मीठ मिसळलें असतां चांगल्यापैकीं दंतमंजन तयार होतें. हें दांतांस लावल्यानें दांत स्वच्छ व मजबूत होतात.

रक्तशुद्धीसाठीं कडुनिंब

१०) रक्तशुद्धीकरितां निंबाचीं पानें व काळी मिरे एकत्र वाटून पाण्यांत मिळवून तें पाणी सकाळीं अनशनपोटीं पिण्याचा प्रघात आमच्याकडे फार प्राचीन आहे. बहुतेक वृद्ध लोक चैत्र महिन्यांत उदर-शुद्धि केल्यानतर निंबपत्तीचा कल्प घेण्यास प्रारंभ करतात. ह्याच्या योगानें रक्तशुद्धि, धातुशुद्धि, बलवृद्धि तसेंच बवेज शक्तीची वृद्धि होऊन नवजीवन प्राप्त होतें. चेहऱ्यावर लाली येते व शरीर पुष्ट होतें. हा कल्प साधारणपणें एक महिनापर्यंत चालू असतो. ह्या कालांत तेलकट, आंबट पदार्थ तसेंच स्त्री-सेवन वर्ज्य करावें. ह्याचें पेय उन्हाळ्यांत घेतल्यास शरीरशांति-दायक आहे. खरूज, फोड, पुळी, कामला व कुष्ठादि व्याधीहि ह्या पेय-पानानें नष्ट होतात व मनुष्यास नवजीवन प्राप्त होतें.

कडुनिंबाचा मदस्राव

११) कांहीं निंब-वृक्षांतून उन्हाळ्यांत मद (रस) स्राव होतो. हा रस लोक बाटल्यांतून वा मडक्यांत भरून ठेवतात. तीव्र उदरशूलांत हा रस थोडासा प्राशन केला असतां शूल व वेदना थांबतात. तसेंच हा रस प्रमेहनाशकहि आहे.

निंबपत्तीचें काजळ कसें धरावें ?

१२) निंबपत्ती अगदीं बारीक वाटून त्याचा लेप कापसाचे वातीवर दाट करावा व ती वात सावलींत वाळवावी. नंतर सरसूचें तेलांत अगर गाईचें ताज्या तुपांत थोडा कापूर मिश्र करून त्यांत ती वात घालून त्याचा दीप लावावा. मग त्या ज्योतीवर खापराचा तुकडा त्याचा खोलगट भाग खालीं जमिनीकडे करून अशा व्यवस्थित रीतीनें ठेवावा कीं, ज्योतीचें वरचें टोक नेमकें त्या खापराच्या आंतील अंगास लागेल. नंतर खापरास जें काजळ जमा होईल तें नीट सावध-गिरीनें धरून डबींत ठेवावें. हें काजळ, सुरमा अगर ममीरा ह्यांच्या पेक्षांहि जास्त गुणदायक आहे. अनेक माता आपल्या तान्ह्या मुलांचे नेत्ररक्षणाकरितां ह्या काजळाचा दररोज उपयोग करतात. डोळे आले असल्यास ह्या काजळाच्या उपयोगानें लवकर बरे होतात. व डोळ्यांस थंडावा येतो. आमच्या देशांत अनेक माता हें शांतिदायक काजळ तयार करतात. व तेणेंकरून वैद्यकीय क्षेत्रांतील एक जरूरीची गोष्ट ह्या उत्तम रीतीनें भागवितात.

माताच श्रेष्ठ चिकित्सक

वस्तुतः माताच लहान मुलांचे बाबतींत श्रेष्ठ चिकित्सा होऊं शकतात. आम्हांला आनंद व गौरव वाटला पाहिजे कीं एक समय असा होता कीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वेळीं आयुर्वेदाचा गुणगौरव घरोघर गायिला ...असे, व त्याच्या गुणाची थोरवी व प्रभाव इतका ...त व दृढमूल झाला होता कीं नुकतीच संपलेली ...गिरीची राजवट व विदेशी औषधांचा झालेला ... प्रसार व त्यायोगें जनतेस भ्रष्ट करण्याचा ...यांत आलेला प्रयत्न या सर्व गोष्टीस न जुमानतां ...हि आमचे आयुर्वेद-साहित्य, प्राचीन आयुर्वेद ..., सर्वत्र जिवंत असल्याचें दिसून येत आहे.

निंबपत्री-काजळापासून फायदे

हें काजळ यथाविधि तयार करून त्याचा ...ग १५ दिवस करून पाहा म्हणजे त्यापासून ...ी फायदा होतो हें समजून येईल. प्रयोगकालांत ...ा वापरूं नये व दररोज सकाळ संध्याकाळ ...न १ मैल तरी मोकळया हवेंत फिरण्यास जावें. ...ताग्नि व शरीरशुद्धि ह्या दोन गोष्टी प्रामुख्यानें ...त घ्याव्या म्हणजे तुम्हांस असें दिसून येईल कीं, ...०० रुपये खर्च करूनहि जो फायदा क्वचितच ...शकेल तो त्यानें सहज होऊं शकतो. ह्या काजळानें ...यांची लाली, दिनांध्य, रातआंधळें, फूल, भुरी ...व दृष्टीचा कमीपणा या सर्व नेत्रविकारांवर अवश्य ...दा होतो. ज्या बंधूंच्या अगर मातांच्या घरीं ...न मुलांच्या नेत्र-रक्षणाची खबरदारी घेतली ..., त्यांनीं तर ह्याचा जरूर उपयोग करावा.

शिरोवेदनानाशक प्रयोग

१३) उष्णतेमुळें जर शिरोवेदना होत असतील ...२१ निंबाचीं पानें व ५ मिऱ्याचे दाणे एकत्र ...ळे वाटून पाण्याशीं घ्यावें म्हणजे तिसऱ्या दिवशीं ...ना नाहींशा होतील. तेलकट, आंबट, खाणें अति-...यास, मलमूत्रावरोध, तसेंच वातूळ पदार्थ ह्यांचेंपासून ...अलिप्त असावें. बौद्धिक कामें करूं नयेत. थंड ...ानें स्नान करावें. सकाळ, संध्याकाळ रोज ...कळ्या हवेंत फिरावयास जावें म्हणजे शिरोवेदना ...न दिवसांत किंवा जास्तींतजास्त सात दिवसांत ...शा होतील.

कडुनिंबाची तपकीर

१४) निंबपानें २१ व काळे मिरे २१ ह्यांचें नस्य (तपकीर) तयार करून तें सकाळीं ओढून शिंका आणाव्यात म्हणजे ह्यानें शिरःशूल शांत होतो.

कडुनिंबाचा धूप

१५) निंबाचीं पानें, गुग्गुळ, लोहबान, आवळ-सार-गंधक, तुळशीचीं पानें हीं सर्व द्रव्यें एकत्र करून ह्याचा बंद घरांत धूप दिला असतां ढेकूण व डांस मरतात आणि आसमंतांतील हवा शुद्ध होते.

निंबाच्या झाडांखालीं व्यायाम

१६) व्यायाम करणारे लोक जर निंबवृक्षाच्या खालीं व्यायाम करतील तर त्यांना अनायासें शुद्ध हवा मिळून व्यायामजन्य शांति व समाधान प्राप्त होईल.

निंबपत्री काजळाचा दैवी प्रयोग

ज्यांना शौचविधीसाठींहि बाहेर जाण्यास दिसत नाहीं अगर उन्हाखेरीज ज्यांच्या डोळयांना दुसरें कांहीं भासमान होत नाहीं, अशा अंध लोकांना पुष्कळसे भगत (दैवी उपचार करणारे) लोक उपरोक्त निंबकपत्तीकाजळाचा दैवी उपचार म्हणून सतत कांहीं काल प्रयोग करून त्यांना दृष्टिलाभ करून देतात. रोग्याच्या श्रद्धेकरितां थोडीशी विभुति मात्र त्या काजळांत घालतात. आठवे दिवशीं चौकी (देवतेला कांहींतरी देणगी) रोग्याकडून दिली जाते. अशा ५।७ चौक्या (आठवडे) कज्जली- प्रयोग केल्यानन्तर रुग्ण स्वतःच (स्वतःचे दृष्टीनें) देवतेची पूजा करण्याकरितां मंदिरांत जाऊं शकतो. आत्मविश्वासपूर्वक हा काजळ-प्रयोग केल्यास, मी निश्चयात्मक असें सांगूं शकतो कीं, दृष्टिलाभ हा त्या भोप्याचा अगर देवतेचा प्रभाव नसून तो प्रामुख्यानें अमृतवृक्ष 'निंब' ह्याच्या पल्लवाचाच असतो. म्हणून मी निंबाला नेत्ररोग-नाशक एक स्वस्त व आरोग्य देवतेची बहुमोल देणगीच मानतो. विचारवंत वाचकहि या माझ्या मताशीं सहमत होतील अशी मला आशा आहे.

—आयुर्वेद संमेलन पत्रिका

—×—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विंचूदंशावर स्त्री-दुग्ध प्रयोग :

वै. ग. कृ. पाटणकर
भिषग्रत्न, किन्हई

१ सोमलाची शुद्धि तांदुळजाचे रसांत करण्याविषयीं 'उपदंशसूर्य' या औषधाची माहिती प्रसिद्ध करितांना वैद्यराज घामणकर यांनीं कळविलें आहे. त्याचप्रमाणें तीच शुद्धि स्त्री-दुग्धांत करण्यासंबंधीं एका पोथींत माझे वाचनांत आलें आहे. तांदुळज्यांत ज्याप्रमाणें विषहर धर्म आहे, तसाच स्त्री--दुग्धांत असला पाहिजे एवढीच कल्पना होऊन कुपिश्थ रसायनें तयार करितांना २-३ वेळ वरीलप्रमाणें सोमलाची शुद्धि करून तो मी वापरला. सदर रसायनांचा उपयोग करितांना स्त्री-दुग्धाचे विषहर धर्माविषयीं माझी खात्री पटली.

कष्टसाध्य विषविकारावर स्त्री-दुग्ध

२ डेस्टिनेशन (जर्मन डॉक्टरनें लिहिलेलें पुस्तक) पुस्तक वाचीत असतां क्षय, नपूंसकत्व, महारोग, सर्पदंश वगैरे कष्टविकारावर सदर दुग्धाचा उपयोग करून या केसीस कशा बऱ्या झाल्या याचें वर्णन वाचनांत आलें आहे. [जर्मनींत जरूर तेवढ्या आया, धात्री (वेटनार्सेस) मिळतात.] निव्वळ हें दुग्ध व फळें विकारी लोकांस देऊन त्यानें क्षय, नपूंसकत्व, महारोग दुरस्त केल्याची त्या पुस्तकांत माहिती असून फक्त ३ कप स्त्री-दुग्ध पंधरा-पंधरा मिनिटांनें देऊन त्यानें अस्सल विषारी नागदंशाच्या केसीस बऱ्या केल्याची त्यांत माहिती आहे.

विंचू चावलेलें मूल

३ एके दिवशीं (किनई) येथील मिलिटरी जमादार बाळासाहेब भुइटे हें आपलें कुटुंबाजवळ ५-६ महिन्यांचें मूल देऊन रात्रीं १० चे सुमारास आलें. मूल सारखें किंचाळत होतें, हातपाय झाडीत होते. मुलाला विंचू चावला असून, ते आतां जगत नाहीं, व आमचे सर्व उपाय थकले असें ते म्हणाले. सदर मूल आईनें मांडीवर घेतलें त्यावेळीं तें किंचाळत असून डोळे फिरवूं लागलें होतें. तें पायाकडे सारखा हात नेई. पाय तपासतां पोटरीजवळ दंश झालेली जागा दिसली. त्या मुलांचे आईला अंगावरील दूध मागितलें. तशाहि स्थितींत तिनें तें दिलें. आधीं त्याचे गुदद्वारासचे आंत थोडें तूप लावून मांडीपासून खालीं त्या दंश जागेपर्यंत तें दूध २-३ वेळ लावित असतां आईला तें मूल अंगावर घेण्यास सांगितलें. दंशाच्या वेदना नाहींशा होऊन मूल आईच्या अंगावर पितांना झोपीं गेलें. संदर मिलिटरी जमादार आज ६० वर्षांचे असून विंचूदंश झालेला मुलगा ३० वर्षांचा आहे. मराठवाड्यांतील मुलांना विंचूदंश झाला असतां जमादार साहेब याच मार्गाचा यशस्वी रीतीनें उपयोग करीत असतात.

स्त्री-दुधाच्या अँप्यूल्स मिळाव्या

४ इकडे वेटनार्सेस मिळणार नाहींत-याकरितां स्त्रीदुग्धाच्या इंजेक्शन ॲम्प्युलल्स १० सी. सी. च्या तयार करवून, त्यांच्या मदतीनें तसेंच रोग लक्षणें लक्षांत घेऊन योग्य आहार व नियमबद्ध वागणें, रोग्यांना ठेविल्यास क्षय, नपुंसकत्व व महारोग असल्या दुःसाध्य विकारांचा उपशम झाल्याचें आढळून येईल.

स्त्री-दुधाची बँक काढावी

५ कोणत्याहि रक्तांतील फॉरिन मॅटरला निर्विष करून विकारांचा उपशम करण्यांत स्त्रीदुग्ध अनुभवांतीं अग्रेसर ठरेल. आपल्या समर्थ हातानें हा प्रयोग करण्याचें सामर्थ्य प्रांतिक सरकारनें संशोधक, आयुर्वेद संस्था व कारखाने यांना दिल्यास कष्टसाध्य विकारांचा उपशम होण्याची खात्री पटल्यास ब्लडबँकप्रमाणें या दुग्धाचीहि जरूर ती व्यवस्था रुग्णपरिहाराकरितां करितां येणें शक्य आहे.

पवित्र
नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहा:-नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होमिओपॅथी अर्थात् रोगांची समान गुणधर्मांच्या औषधांनीं चिकित्सा

(लेखक:—डॉ. वा. म. बाक्रे, सभासद, देशी वैद्यक बोर्ड, मुंबई)

मुंबई सरकार होमिओपॅथीला मान्यता देण्याचा बिल असेंब्लीमध्यें आणणार आहे अशी बातमी येतांच कित्येक गृहस्थ होमिओपॅथ व केमिस्ट ड्रगिस्ट होण्याच्या तयारीला लागले.

सोपें व बिनधोक अशी समज

त्यांची समज अशी आहे कीं, धंदा करायला कमी खर्चाचें, धोका नसलेलें, चूक कधीं न होणारें, अभ्यास न करतां साधणारें, औषधें कधीं न संपणारें, तीं न संपणारें, व कोणतें औषध दिलें याचा पत्ता न लागणारें, असें हें एक शास्त्र आहे. म्हणून रजिस्ट्रेशन मिळविण्याची संधि न गमावतां मिळा-लेलें रजिस्ट्रेशन घेऊन उद्योग सुरू करावा या हेतूनें अर्ज वगैरे देऊन सर्व तयारी केली आहे.

होमिओपॅथीला रजिस्ट्रेशन

सरकारकडे जे अर्ज आले आहेत त्यावरून येवढे होमिओपॅथिक धंदेवाले मुंबई इलाखयांत असतील अशी माझी कल्पना नव्हती. पण या संख्येवरून होमिओपॅथीला रजिस्ट्रेशन मिळालें ही एक चांगलीच गोष्ट झाली असें मला वाटतें.

ॲलोपॅथीच्या मूलभूत तत्वांचें ज्ञान

हल्लीं मुंबई प्रांतांत जे लोक या औषधांचा व्यवसाय करीत आहेत त्यांत शिक्षणसंस्थांतून पद्धतशीर शिक्षण घेतलेले फारच थोडे आहेत. होमिओपॅथीचें शिक्षण समजलेल्या प्राध्यापकांकडून ज्यांनीं हें शालेय शिक्षण घेतलेलें असेल त्यांनाच हें शास्त्र चांगल्या रीतीनें अवगत होईल. या शिक्षणाला इंग्लिश वैद्यकीच्या मूलभूत (ॲलोपॅथीला) लागणाऱ्या विषयांची तयारी पाहिजेच आहे. ती तयारी असलेले असे एम. बी. बी. एस्. डॉक्टर लोक या औषधांच्या गुण-धर्मांचा अभ्यास करून चांगले तयार होतील. त्याचप्रमाणें इंग्लिश मूलभूत विषयांचें शिक्षण घेऊन जे वैद्य तयार झाले आहेत त्यांनीं प्रयत्न केल्यास तेहि तयार होतील.

पुस्तक वाचून धंदा

पण अशी तयारी नसतां या वैद्यशास्त्राचें केवळ गुणधर्मशास्त्र (मटीरिआ मेडिका) वाचून औषधांची निवड करणें फार कठीण आहे; पण स्वतः पुस्तक वाचून धंदा करणारे लोकच फार आहेत.

डॉ. वा. म. बाक्रे

सरकारनें मान्यता दिली असली तरी सरकार होमिओपॅथीची शिक्षण-संस्था काढील असें वाटत नाहीं. एखाद्या अन्य प्रांतीय अशा शिक्षणसंस्थेला तिचा शिक्षणक्रम पाहून योग्य वाटल्यास मान्यता देईल असें वाटतें. या वेळीं हें शिक्षण देणारी एखादी संस्था पुढें आल्यास तिला मान्यता मिळून सरकार ग्रँटहि देईल. या शास्त्रासंबंधीं थोडक्यांत महत्वाची माहिती वाचकां-करितां पुढें देत आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डॉक्टर हानिमान

या शास्त्राचें संशोधन व प्रयोग अठरावें शतकाच्या सुमाराला एका हानिमान नांवाच्या जर्मन अॅलोपॅथिक डॉक्टरनें करून तें प्रसिद्ध केलें. यापूर्वी हिपॉक्रेटस्, परसेलसस वगैरे डॉक्टरांनीं खटपट करून पाहिली व तेवढ्यावरच सोडली. तें काम हानिमाननें पुरें केलें. अनुभव असा येतो कीं, एकाच औषधी पद्धतीनें सर्व रोगी बरे होतील असें नाहीं. तशांत सरळ एका रोगापेक्षां अनेक रोगांचें मिश्रण असलेले रोगीच फार आढळतात. एक एक रोगी कित्येक डॉक्टर-वैद्यांना आश्रय देतो. शिवाय कांहीं सोयीची व कमी खर्चाची अशी एखादी रोगपरिहारक पद्धति निघाल्यास ती लोकांना पाहिजेच आहे. म्हणून लोकनिंदेची व थट्टेची पर्वा न करितां त्यानें हें शास्त्र सिद्ध केलें.

समः समं शमयति

या शास्त्राची रचना “ समः समं शमयति ” (Similia Similibus Curantur) या नैसर्गिक नियमावर केली आहे. या नियमाचें स्पष्टीकरण असें आहे कीं, एखादें द्रव्य निरोगी मनुष्यांच्या शरीरामध्यें जीं रोगलक्षणें उत्पन्न करितें तें द्रव्य आजारी मनुष्याच्या ठिकाणीं तशीं दिसणारीं लक्षणें नाहींशीं करून रोगपरिहार करतें. अशी कांहीं औषधें सिद्ध होतांच त्यानें या शास्त्रावर “मॅटिरिया मेडिका प्यूरा” “आर्ग्यानन” “क्रॉनिक डिसिझस्” “लेसर रायटिंग्स” वगैरे ग्रंथ लिहिले. आज या शास्त्रावर विद्वानांनीं मोठें ग्रंथभांडार तयार केलें आहे.

या शास्त्राचीं मूलभूत तत्वें

१) लक्षणांवरुन रोग ओळखणें. (२) औषधी द्रव्यांचें ज्ञान निरोगी मनुष्याच्या शरीरावर प्रयोग करून मिळवणें (३) बरें करण्याचें नातें या दोन्हींतील सारखेपणाच्या नियमामुळेंच असणें. (४) योजना केलेलें औषध एकटेंच देणें, दुसऱ्याशीं मिश्र करूं नये म्हणून एक एका वनस्पतींचें ज्ञान असणें. (५) औषधाचें अत्यंत लहान प्रमाण, गुणाला उपयोगी, म्हणून लहान डोझ. हीं या शास्त्राचीं मूलभूत तत्वें आहेत.

औषधयोजनेंतील मुख्य गोष्टी

(१) समतत्वाप्रमाणें औषध-योजना (२) सर्वांत लहान डोझ. (३) स्पष्ट गुण दिसतांच औषधाच्या खेपा कमी करणें. (४) विशेषेंकरून जुनाट रोगामध्यें फार वेळानें औषध देणें. (५) रोगी सांगतो तीं, शुश्रुषा करणारे सांगतात तीं व परीक्षेनें निघतात तीं सर्व लक्षणें लक्षांत घेणें. (६) सामान्य नव्हे अशीं लक्षणें, औषधाचीं मुख्य लक्षणें, रोगाचीं मुख्य लक्षणें, मानसिक लक्षणें यांचा औषधाच्या लक्षणाशीं अगदीं निकटचा संबंध जुळवणें. (७) सामान्य लक्षणें हीं बहुतेक रोगांना व बहुतेक ड्रगला असतात म्हणून त्यांजकडे कमी लक्ष देणें. (८) औषध सुरू केल्यानंतर क्वचित् स्थळीं रोगलक्षणें (समचिकित्सेमुळें) थोडा वेळ जास्त वाटल्यास तसें होणें उपकारक समजून औषध थांबवावें म्हणजे गुण येऊं लागेल. नंतर पुढें औषध चालूं करावें.

बाह्योपचारांना महत्व नाहीं

औषधें पोटांत देऊन हें शास्त्र सिद्ध केलें असल्यानें तत्वनिष्ठ होमिओपाथ बाह्योपचाराला महत्व देत नाहींत; हे उपचार औषधी गुणांना हरकत करतात. परंतु रोग्याला उपचार करीत असतां केव्हां केव्हां असें आढळतें कीं सौम्य औषधाचे बाह्योपचार मदतीस म्हणून उपयोगी पडतात.

औषधांचीं एकमेकांशीं नातीं

१) दुसऱ्याचा गुण कमी करणारीं अथवा गुणाला विरोध करणारीं (२) एकमेकांना साह्य करणारीं (३) एकमेकांचें शत्रुत्व करणारीं (४) एकानें सुरूं केलेला गुण पुरा करणारीं (५) औषधें निराळीं पण मूळ एकच असणारीं (६) रोगाच्या वाढीला हरकत करणारीं अशीं औषधें असतात. तत्वनिष्ठ शास्त्रज्ञ हीं औषधें आलटूनपालटून देण्याच्या पद्धतीला दोष देतात. या औषधांचीं हीं नातीं बरोबर कळतां आलटूनपालटून औषधें दिल्यास गुण बरोबर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहींत. हें शास्त्र निरुपद्रवी वाटलें तरी त्यापासून ...ध्यावयाचा तर त्याचा फार अभ्यास करावा ...ती. औषधाची निवड बरोबर होण्यासाठीं रोग्याची ...तपासणी करून व शुश्रुषा करणारांकडून अभ्यास-... माहिती घ्यावी लागते.

प्राणिज-खनिज-उद्भिज्ज

हीं औषधें प्राणिज, खनिज, व उद्भिज्ज अशा ...हीं द्रव्यांचीं असून तीं पातळ, गोळ्या व चूर्णे या ...रूपांत मिळतात, हीं मूळ औषधें वापरावयाचीं नसून ...त्या शक्ति (पोटेन्सीज) वापरतात. ही शक्ति मूळ ...औषधाच्या दशपटीनें (डेसिमल स्केल) व शतपटीनें ...(सेन्टिसिमल स्केल) अशी वापरावयाच्या पोटेन्सीपर्यंत ...वाढविली जाते.

या प्रत्येक पोटेन्सीचे गुणधर्म ठरवणें शक्य ...ही. त्यांचे टप्पे टप्पे करून गुणधर्म ठरवले आहेत. ...नेहमीं वापरण्यांत ३X, १२X ३०X, २००X, ... पोटन्सी येतात. पोटेन्सी लिहून औषधें न ...मागविल्यास नेहमीं वापरण्यांत येणारी खालची ...(लोअर) पोटेन्सी पाठवितात.

कमालीचा स्वच्छपणा, दुसऱ्या पद्धतीच्या औष-...धांचें सांनिध्य नसणें, कोऱ्या बाटल्या, कोरीं बुचें (औषध ...घातलेली बाटली व बूच) यांत हयगय मुळींच ...उपयोगी नाहीं. गोळ्या अगर पूड देण्यास कोरी ...बाटली किंवा कागदाची एक बाजू कोरी असावी.

आयुर्वेदांत होमिओपॅथीच्या समान चिकित्सेचें तत्व

समानतेचें तत्व हें जरी नैसर्गिक आहे तरी ...त्याचा प्रयोग रोगपरिहाराकडे करून दीडशें वर्षे ...झालीं. पण रोगोपशमाला या तत्वाचीं औषधें द्यावीं ...असें दोन हजार पूर्वीच्या ग्रंथकर्त्या आयुर्वेदाचार्यांनीं ...सांगितलें असून अशीं उदाहरणें देऊन तें सांगणें ...स्पष्ट केलें आहे. त्याच तत्वाचा पुरस्कार करून निराळें ...औषधीशास्त्र मात्र त्यांनीं तयार केलें नाहीं. अष्टांग-...हृदयामध्यें वाग्भटाचार्यांनीं व्याधींचा उपशय ...सांगतांना हेतुव्याधि—विपर्यस्ताविपर्यस्तार्थकारिणाम्।

औषधान्नविहाराणामुपयोगं सुखावहम्।
विद्यादुपशयम्।

हेतुव्याधिविपर्यस्तः निदानरोगयोर्विपरीताः ये औषधान्नविहाराः यथा व्याध्युपशमं कुर्वन्ति कुतः प्रतिपक्षत्वात् नाम विरुद्धत्वात् (Contraria Contraries Curantur) तथा हेतुव्याध्योः अविपर्यस्ताः अपि हेतुरूपा व्याधिरूपा इव भासमानाः औषधान्नविहाराः व्याध्युपशमं कुर्वन्ति कुतः समानत्वात् [Similia Similibus curantur] यथा छर्दिव्याधौ तदर्थकार्यौषधम् मदनादि, यथा अतिसारे विरेचनम्। वमनेन विरेचनेन च छर्द्यतीसारयोर्वृद्धिरेव कर्तुं युक्ता॥ ज्याप्रमाणें हेतुव्याधिविपरीत औषधान्नविहारांनीं व्याधींचा उपशम होतो, त्याप्रमाणें हेतुव्याधिविपर्यस्तार्थकारी म्हणजे समान धर्मांच्या औषधादिकांनीं उपशम होतो. मात्राशीतीये व्याख्यातमेव, एवमन्यानपि व्याधीन् स्वनिदानविपर्ययात्। चिकित्सेदनुबंधे तु सति हेतुविपर्ययम्। त्यक्त्वा यथायथं वैद्यो युंजव्याधिविपर्ययम्। तदर्थकारि वा। हेतुव्याधिविपरीत औषधादिकांनीं व्याधींचा उपशम न झाल्यास तदर्थकारी म्हणजे समान गुणधर्मांचें औषध द्यावें.

या ठिकाणीं हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं होमिओपॅथिक शास्त्राची रचना इंग्लिश शास्त्राच्या पद्धतीप्रमाणें प्रत्येक औषधीचे रोगकारक गुणधर्म मिळवून त्या औषधांमध्यें रोगहारक समान तत्व आहे कीं नाहीं हें ठरविलें आहे.

आयुर्वेदांतील औषधांचे प्रयोग करा

आयुर्वेदांतील समान तत्वाचीं औषधें ठरविणें झाल्यास त्यांचे प्रयोग आयुर्वेदाप्रमाणें करून ठरविणें जरूर आहे. रोगकारक शक्ती असणाऱ्या प्रत्येक द्रव्यामध्यें समान तत्वांची रोगमारक शक्ति असतेच असें नाहीं. आपल्या विद्यमान आयुर्वेदाचार्यांनीं कांहीं थोड्या औषधी द्रव्यांचे प्रयोग करून ही निराळी पद्धत सिद्ध केल्यास त्यांचे हानिमान प्रमाणें रोग्यांवर उपकार होतील. त्यांच्या प्रयत्नाला आहे ही होमिओ-पॅथी मार्गदर्शक होईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होमिओपॅथीसंबंधीं गैरसमजुती

राजकीय सभांतून बोलतांना केव्हां केव्हां वक्ते अशी भाषा वापरतात कीं, "आतां आम्हांला होमिओपॅथिक डोस उपयोगी पडणार नाहीं, त्यानें आमचें दुखणें बरें होणार नाहीं." हें विधान शास्त्रासंबंधीं कांहीं माहिती नसतां केवळ औषधांच्या लहान प्रमाणावर केलें जातें. लहान प्रमाण म्हणजे होमिओपॅथी नव्हे. या औषधांचीं मोठीं प्रमाणें दिल्यास तीं रोगमारक न होतां रोग जास्त करतील; त्या प्रमाणांत त्यांच्या ठिकाणीं रोगपरिहार करण्याची शक्ति नसते. ती शक्ति येण्याला तें औषध कमी प्रमाणांत जरूर असते. अशीं प्रमाणें कोणतीं तें शास्त्रकर्त्यांनीं अनुभवानें सांगितलें आहे.

जुनाट रोगावर कमी प्रमाण

जुनाट रोगांमध्यें तर औषधांचें प्रमाण (आकार नव्हे तर त्या औषधाची पोटेन्सी) फारच कमी द्यावें लागतें. या प्रमाणाचीं औषधें जुन्या रोगांकरितांच कडक (strong) समजलीं जातात. यांचे डोसिस् वारंवार द्यावे लागत नाहींत. चार आठ दिवसांनीं एखादा दुसरा डोझ द्यावा लागतो. कांहीं औषधांच्या उच्च शक्तीमध्यें कमी शक्तीच्या औषधांच्या गुणाच्या उलट गुणधर्म आढळतात, तर कांहींमध्यें गुणच आढळत नाहींत. म्हणून प्रत्येक औषधाची उच्च शक्ति देऊन उपयोग होत नाहीं. औषधी गुणधर्मांच्या पुस्तकांतून यासंबंधीं माहिती दिलेली असते.

पुष्कळांची चुकीची समजूत

होमिओपॅथिक औषधांचें हें लहान प्रमाण लहान मुलांनाच उपयोगी, आमच्या सारख्याला त्याचा काय उपयोग, अशी पुष्कळांची समजूत आहे. लहान मूल व लहान प्रमाण याचा असा संबंध लावतात. पण त्यांना असें समजत नाहीं कीं औषधीशास्त्राचे प्रयोग मोठ्यावर करून त्याचे गुणधर्म ठरवतात. लहान मुलांना कांहीं सांगतां येणार नाहीं; त्यांना कांहीं समजत नाहीं. अशा मुलांवर प्रयोग करून शास्त्र तयार करीत नाहींत.

ही होमिओपॅथी नव्हे

कांहीं वैद्य कुपिस्थ रसायनें, मात्रा व भस्में त्यामध्यें दुधाची साखर अगर दुसरें एखादें निरुपद्रवी द्रव्य मिळवून कमी प्रमाणांत देतात व तीं औषधें होमिओपॅथिक तत्वाप्रमाणें देतो असें सांगतात. औषधाचें कमी प्रमाण म्हणजे होमिओपॅथी असें ते समजतात. अशा कमी प्रमाणांत दिलेल्या औषधांनीं गुणहि येत असेल, पण तो गुण, होमिओपॅथिक तत्वानें नसून आयुर्वेदानें सांगितलेल्या प्रमाणापेक्षां कमी प्रमाणानें येतो असें म्हणतां येईल. कारण हीं औषधें होमिओपॅथिक तत्वाप्रमाणें सिद्ध केलेलीं नाहींत. या औषधांचें कमी प्रमाण (शक्ति = पोटेन्सी) प्रमाणबद्ध ठरवून व त्याचे अनुभव घेऊन ते प्रसिद्ध केल्यास वैद्यवर्गाला मार्गदर्शक होतील.

लक्षणभेदानें औषध बदलतें

होमिओपॅथीमध्यें लक्षणावरून चिकित्सा केली जात असल्यानें लक्षणभेदाप्रमाणें औषध बदलतें. रोगाचें नांव घेऊन औषधयोजना होत नाहीं म्हणून या शास्त्रांत पेटन्ट औषधें नाहींत.

पण अलीकडे अशीं औषधें मिळूं लागलीं आहेत. मिश्र औषधें नंबर घालून त्याच्या गुणधर्मांच्या पत्रकासह विक्रीला आहेत. इंजेक्शनें सुरू झालीं आहेत, वर लावण्याचीं औषधेंहि विक्रीला आहेत. औषधांच्या शक्ति पोटेन्सीज वाटतील त्या वाटतील त्यावेळीं मिळतात. त्यांची शक्ति वाढविण्याला मर्यादाच राहिलेली नाहीं. औषधें घेणारांनीं चिकित्सकाची निवड काळजीपूर्वक करावी.

———

"गृहवैद्य"

क्षारचिकित्सेवरील लोकप्रिय ग्रंथ. नवीन भावनाकोशासह किं. फक्त ३ रु. ट. ख. निराळा.

(१) वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

(२) डॉ. गर्दे, २६ मोंगल लेन, मुंबई १६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोटें येथील तृषणारोग

पुणें संगमनेर मार्गावर बोटे येथें तृष्णारोगाचें रुग्णालय मुंबई सरकारनें गतवर्षी सुरू केलें व कालानन्तर त्यांत आयुर्वेदीय उपचार करण्याची व्यवस्था केली. तेव्हांपासून तेथील कार्याचा अहवाल प्रसिद्ध करण्यासंबंधीं अनेकांचीं पत्रें पत्रिकेकडे आलीं. आम्ही स्वतः २ वेळ बोटे येथें जाऊन उपचारांचें निरीक्षण केलें. तथापि बोटे रुग्णालयांत चाललेल्या प्रयोगाविषयीं कांहींच प्रसिद्ध न करण्याचें बंधन सरकारतर्फें घालण्यांत आल्यामुळें आम्हांस गप्प राहणें भाग पडलें. त्यानन्तर सरकारतर्फे अधिकृत अहवाल प्रसिध्द होणार असें सांगण्यांत आलें होतें, तथापि तोहि अहवाल अद्याप प्रसिद्ध झालेला दिसत नाहीं.

मध्यन्तरीं वृत्तपत्रांतून बोटे येथील यशस्वी आयुर्वेदीय उपचाराबद्दलचें वृत्त प्रसिद्ध झालें होतें, पण डॉक्टरमंडळी या प्रयोगाला फारशी अनुकूल नसल्यामुळें अधिकृत अहवाल आजवर बाहेर येऊं शकला नाहीं असें दिसतें.

मुंबई राज्याच्या सार्वजनिक आरोग्य खात्याचे डायरेक्टर डॉ. विश्वनाथन् यांनीं बोटे येथील रोगासंबंधीं कलकत्याच्या इंडियन मेडिकल गॅझेटकडे पाठविलेला विस्तृत लेख आमच्या हातीं आला आहे व त्यांत डॉक्टरांच्या व सरकारच्या दृष्टिकोनांतून या रोगाच्या चिकित्सेचा संक्षिप्त गोषवारा पुढें देत आहोत.

उदक मेहाची सांथ

या लेखास लेखकानें 'उदक मेहाची सांथ' [An epidemic of Diabetes Insipidus] असें नांव दिलें आहे. या रोगाच्या एकूण १०८२ रोग्यांची तपासणी करण्यांत आली व त्यांना उपचार करण्यांत आले असें त्यांत म्हटलें आहे.

एका नमुनेदार रुग्णाची हकीकत

त्यांत एका नमुनेदार रुग्णाची हकीकत दिली आहे ती अशीः– आक्टोबर १९५२ मध्यें एक शिक्षक, वय वर्षें ३९, अर्ध्या रात्रीं उठला; त्याला घशाशीं चिटकल्यासारखें व सुकल्यासारखें वाटलें व पाणी पिण्याची इच्छा झाली. तो पाणी प्याला व जाऊन झोपला. दुसरे दिवशीं रात्रीं तोंच अनुभव त्याच वेळीं आला. तिसरे दिवशीं त्याला दिवसासुद्धां तहान लागली व रात्रीं २।३ वेळां लघवीस जावें लागलें. संध्याकाळीं अंग गरम झाल्यासारखें वाटे, पण टेंपरेचर पहाण्यांत आलें नाहीं. ३।४ दिवस सर्व अंग दुखलें. त्याची तहान व घवी फार वाढली व अशक्तपणा वाटूं लागला. १ महिनाभर (अंथरुणांत पडून) विश्रांति (व दुसरा कांहीं उपचार न करतां) घेण्यानें तो बराच सुधारला; त्याची तहान व लघवी हीं दोन्ही लक्षणें कमी झालीं. अद्याप थोडी अशक्तता मात्र आहे. त्याच्या आधीं आठ दिवस त्याच्या बायकोला अशींच लक्षणें झालीं, पण तीं सौम्य होतीं. घरांतील इतर घटकांनाहि पुढें हा उपद्रव झाला.

तृष्णा, प्रमेह, शौचास खडे, थकवा, बारीक ताप (तोंडांत ९९) हीं लक्षणें होतीं. बहुतेक रुग्ण शेतकरी होते. शिक्षक, सुतार, लोहार, कारकून, व्यापारी, स्वयंपाकी व घरगडी हे सर्व प्रकार लागण झालेल्यांत होते. सुखवस्तु व श्रमजीवी दोन्ही प्रकारच्या लोकांना या प्रकारच्या रोगाची बाधा झाली. या भागांतील मुख्य खाद्य धान्य बाजरी हें आहे.

नोव्हेंबर डिसेंबरांत रोगाचा जोर

संगमनेर, अकोला, जुन्नर व आंबेगांव या पुणें-नगर जिल्ह्यांतील ४ तालुक्यांतील एकूण ५४ गांवांत या रोगाचा प्रसार होता. यापैकीं नदीनाल्याजवळ असलेली गांवें निम्म्याच्यावर होतीं. नोव्हेंबर व डिसेंबरांत रोग्यांची संख्या सर्वांत जास्त होती (व एप्रिल मे मध्यें सर्वांत कमी). रोगाचा जोर थंडींत जास्त व कोरड्या हवेंत कमी होता. घरांत या रोगाचा एकच रुग्ण असलेलीं कुटुंबें २८२ होतीं तर घरांत ६ अगर अधिक या रोगाचे रोगी असलेलीं कुटुंबें ४९ होतीं. एकूण ४७३ कुटुंबांत १०८२ रोगी आढळले. त्या भागांत असलेल्या एकूण कुटुंबापैकीं ६ टक्के कुटुंबांतही लागण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आढळली. ज्या कुटुंबांत जास्त माणसें असत त्या घरांत रोगाची लागण विशेष आढळून आली.

तपासणी— कहान टेस्ट ३० पैकीं २ अनुकूल.

सेरेब्रोस्पायनल द्रव— २५ केसेस तपासल्या नार्मल. सेलकाउन्ट, क्लोराइड्स् व साखर.

कोल्ड ॲग्लूटिनेशन— ५ केसेस, सर्व प्रतिकूल.

लघवी— (२१२ दवाखान्यांतील रुग्ण) साखर नाहीं, अल्ब्युमेन नाहीं. स्पे. ग्रॅ. १००१ ते १०१०. प्रारंभीं १००२ ते १००५ सूक्ष्मदर्शक यंत्रानें विशेष कांहीं आढळलें नाहीं. कल्चर निगेटिव्ह. जास्तींत जास्त प्रमाण २०० ते ५०० औंस. पाणी पिण्याचें प्रमाण त्यापेक्षां थोडें जास्तच.

रक्त— यूरिया प्राकृत (१६ रुग्णांत) रक्त-श्वेत-कण प्राकृत. डिफरेंशियल कौंट-कांहीं फरक नाहीं. रक्ताचे रासायनिक घटक स्वाभाविक.

शौच— ४० रोग्यांत अंडी सांपडलीं नाहींत. नॉनलॅक्टोज फर्मेंट सांपडत नाहीं (२९) एनिमा देऊन येणाऱ्या म्यूकसचीं कल्चर केलीं. पण कांहीं सांपडलें नाहीं. अशांना केलेल्या इनाक्युलेशन्सचा कांहीं परिणाम दिसला नाहीं.

पिण्याचें पाणीः- तपासले दोष रासायनिक वा प्राणिज आढळला नाहीं.

केलेले विविध उपचार

९ निरनिराळ्या उपचारपद्धति उपयोगांत आणल्या गेल्या. पुढें मुंबई सरकारच्या सूचनेवरून कांहीं रुग्णांना आयुर्वेदीय पद्धतीवर उपचार दिले. बऱ्याच रुग्णांना खाटेवर विश्रांति व रुग्णालयीन अन्न एवढेंच देऊन पाहिलें. आयुर्वेदीय उपचारांत आयुर्वेदीय दोषपद्धतीनुसार अन्न पाणी देण्यांत आलें. सोईसाठीं रोग्याचे ३ वर्ग पाडले होते—

तीव्र- २०० अगर अधिक औंस लघवी होणारे

मध्यम- १५० ते २०० " "

मंद- १५० औंसापेक्षां कमी लघवी होणारे.

रोगी आल कीं त्याला आठवडाभर कांहींच उपचार देण्यांत येत नसे. फक्त त्याचें निरीक्षण करण्यांत येई. पुढें ३ आठवडे उपचार होत. लघवीचें प्रमाण (व पिण्याच्या पाण्याचें प्रमाण), मूत्राचें विशिष्ट गुरुत्व तीव्राला १०० च्या आंत, मध्यमाला ७५ च्या आंत व मंदाला ५० च्या आंत लघवी, १०१० च्यावर विशिष्टगुरुत्व आलें कीं रोगी सुधारला असें समजण्यांत येई.

ॲलोपॅथिक पद्धतीने एकूण ८ प्रकारचे उपचार केले.

	उपचारित	सुधारले
१) नुसती विश्रांति व रुग्णालयांतील अन्न	३२	१६
२) रोग्याच्या घरची बाजरी	४	१
ब) इतर जिल्ह्यातील बाजरी	४	२
३) व्हिटॅमिन बी काम्प्लेक्स रोज २ इंजेक्शनें २c.c. ७दि.	५	
थायामिन इं.७ दिवस	५	१
४) B.A.L. इं. ७ दिवस	८	३
५) सल्फाट्रायड ७ दिवस ४|४ तासानीं ६|६ तासानीं ८|८ तासानीं	४०	२५
६) क्लोरोमायसेटिन ७ दिवस	३९	३०
७) B.A.L. + सल्फाट्रायड (प्रयोग ४ व ५ एकत्र)	१२	१०
८) B.A.L. + क्लोरोमायसेटिन (प्रयोग ४ व ६ एकत्र)	२२	१८

या लेखांत आयुर्वेदीय उपचाराबाबत असेंच ८ वर्ग पाडण्यांत आलेले दाखविले आहेत पण औषधें काय दिलीं तीं दिलेलीं नाहींत. पथ्यपाणी कांहींच दर्शविलेलें नाहीं. प्रयोगासाठीं एकूण दिलेल्या रुग्णांची संख्या ४४ आहे. त्यांत १८ तीव्र, त्यापैकीं १० बरे झाले. मध्यम ११ त्यापैकीं ७ बरे झाले. मंद १५ त्यापैकी ८ बरे झाले असें म्हटलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शेवटीं दिलेली चर्चा

आंकडेवारी परिणाम पहातां, केलेले कोणतेच र (मग ते आयुर्वेदिक असोत व ॲलोपॅथिक) निश्चयात्मक रीतीनें लागू पडले असें म्हणतां नाहीं. क्लोरोमायसिटिन खेरीज केलेल्या इतर थिक उपचाराचे परिणाम उत्साहवर्धक नाहींत रोग्यामागें लागणारी क्लोरोमायसिटिनची किंमत घेतां साध्या विश्रांतीनें बरे वाटत असलेल्या या वर क्लोरोमायसिटीन हा या रोगावरील उपचार शिफारस करतां येत नाहीं असें म्हटलें आहे.

दोन प्रयोगामुळें उत्तम फल

आयुर्वेदीय पद्धतीचे उपचारानें आलेला गुण के आहे. शेवटच्या दोन उपचारामुळें उत्तम दिसून आलें. पण एकूण त्या उपचारितांची संख्या ११ अशी लहान असल्यामुळें त्यासंबंधीं निश्च- बोलतां येत नाहीं (असें लेखक म्हणतात). या निजवून ठेवून विश्रांति देणें या रोगांत आव- आहे, असें आयुर्वेदीय चिकित्सकांचेंहि मत आयुर्वेदीय उपचारपद्धतीबाबत अधिक कांहीं हें या लेखाच्या व लेखकाच्या मर्यादेबाहेर मण करण्यासारखें आहे. आयुर्वेदीय चिकित्स- कोणतीं औषधें वापरलीं त्यांचीं नांवें मुद्दाम त आलीं आहेत. या औषधासंबंधीं त्या दीय चिकित्सकांना स्वतंत्र लेख लिहितां येईल.

दोन्ही पद्धति सारख्याच

दोनहि चिकित्सापद्धतीनें बऱ्या झालेल्या व लेल्या रुग्णावर पुढें नजर ठेवण्यांत आली व लोकांचा रोग उलटला, कितींचा बरा राहिला नोंद घेतली. दोनहि पद्धतींत बऱ्या राहिल्याच्या ल्याच्या केसेस आढळल्या, त्यामुळें दोन्ही त अमूक चांगली असें ठरविणें शक्य नाहीं.

या लेखाचे शेवटीं लेखकानें तात्पर्य काढलें तें , हा रोग कशानें होतो तें समजलें नाहीं व दीय व ॲलोपॅथिक औषधोपचारानें ५० ट. अधिक जोरदार गुण दिसला नाहीं व ५० टक्के गुण केवळ रुग्णालयीन विश्रांति व रुग्णालयीन आहार यांनींहि मिळतो.

पित्तकफज्वराची चिकित्सा

आमच्या माहितिप्रमाणें आयुर्वेदीय चिकित्स- कांनीं या रोगाचें निदान ज्वर असें केलें होतें. व पित्तकफज्वराची चिकित्सा करण्यांत आली होती. तृष्णा व प्रमेह हीं दुय्यम लक्षणें मानण्यांत आलीं होतीं. वास्तविक पहातां आयुर्वेदीय उपचारानें फारच चांगला गुण वाटला होता, परन्तु अनुपशय पहाण्यासाठीं कांहीं रोग्यांना उलट गुणाचीं त्रिभुवनकीर्तीसारखीं औषधें दिलीं होतीं; अर्थात् त्यांनीं रोग लक्षणें वाढणें साहा- जिकच होते, पण शेंकडेवारी काढतांना डॉक्टरांनीं तेहि रुग्ण यांतच धरले त्यामुळें एकूण फल कमी दिसलें.

आयुर्वेदीय उपचार उजवे

आयुर्वेदिक उपचाराचें फल निश्चित उजवें झालें आहे असा आयुर्वेदीय चिकित्सकांचा दावा आहे. ॲलोपॅथिक उपचारांपेक्षां खर्चाला अत्यंत कमी व गुणाला श्रेष्ठ आयुर्वेदीय उपचार होते यांत तिळमात्र शंका नाहीं. तेथें काम करणाऱ्या डॉक्टर व नर्स यांच्याहि साक्षी याबाबत नोंदणें इष्ट होईल.

इंजेक्शन चिकित्सा

पाश्चात्य इंजेक्शन चिकित्सेवरील अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिलेला अभिनव मराठी ग्रंथ. २६ प्रकरणें, ३०० वर रोगांची अद्यावत् चिकित्सा. २७० पृष्ठें, जाड बांधणी. 'सचित्र इंजेक्शन विज्ञान' प्रमाणेंच हाहि ग्रंथ लौकरच दुर्मिळ होण्याची शक्यता आहे. त्वरित मागणी करा. किंमत ६ रु., ट. ख. निराळा.

१ सुबोध वैद्यक ग्रंथमाला
पो. कागल जि. कोल्हापूर
२ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक सिटी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खाद्य पदार्थांत भेसळ

"सध्यां खाण्याच्या तेलांत भलतींच तेलें मिसळून तीं ग्राहकांना विकलीं गेल्याचें व परिणामी अनर्थ घडून आल्याचे अनेक प्रकार उघडकीस येत आहेत. व्यापाऱ्यांच्या या समाजहितविरोधी कारवायांबाबत काय उपाययोजना करावी याचा सरकार गंभीरपणें विचार करीत आहे" असें उत्तर आरोग्यमंत्री श्री. शान्तिलाल शाह यांनीं अहमदाबाद शहर काँग्रेसतर्फे या बाबतींत भेटावयास आलेल्या शिष्टमंडळास दिलें.

कडक उपाय योजना

"खाद्यपदार्थ व खाण्याचीं तेलें यामध्यें भेसळ करणाऱ्याविरुद्ध कडक उपाय योजना करावी" अशी मागणी, अहमदाबाद शहर काँग्रेसतर्फे एक विनंति अर्ज सादर करण्यांत येऊन करण्यांत आली. भेसळीचे भयजनक प्रकार रोज उजेडांत यत असून समाजकंटक व्यापारी अमर्याद झाले आहेत असें खलित्यांत म्हटलें होतें.

खुनापेक्षांहि नीच कृत्य

या संबंधांत एल्. एम्. कॉलेजांत बोलत असतां श्री. शान्तिलाल शाह म्हणाले, "एखादा खून करण्यापेक्षांहि अशी भेसळ करणें हें जास्त गुन्हेगारीचें कृत्य होय. खुनी माणूस एकाद्याच इसमाचा खून करतो पण भेसळ करणारा व्यापारी आपल्या कृत्यानें अनेक जीव घेतो. खुनी इसमापेक्षांहि तो अधिक नीच होय."

परदेशी औषधींना पायबंद

"परदेशांतून भारतांत औषधांची होणारी आयात बंद झाली पाहिजे" असें मत स्वास्थ्यमंत्री श्री. शान्तिलाल शाह यांनीं येथील फार्मसीच्या एल्. एम्. कॉलेजच्या वार्षिक दिनानिमित्त भाषण करतांना व्यक्त केलें. देशाला आवश्यक, तीं सर्व औषधें देशांतील औषधि-निर्मात्यांनीं बनविलीं पाहिजेत एवढेंच नव्हे तर तीं स्वस्त व गुणकारी अशीं बनविलीं पहि-जेत असेंहि ते म्हणाले.

औषधांचा दर्जा

'औषधांचा दर्जा कमी न होऊं देतां देशी औषध निर्माते ही गरज पुरी करण्याची जबाबदारी घेतील तर कोट्यावधी रुपयांची बचत होईल. नकली अथवा हिणकस औषधें तयार करणाऱ्या औषध निर्मात्यांना या धंद्यांतून उठवून लाविलें पाहिजे कारण धंद्याच्या दृष्टीनें तेंच हिताचें आहे' असें त्यांनीं सांगितलें.

गोळ्या फेकून दिल्या

रस्त्यानें एक लहान ३ वर्षांचा मुलगा येत होता त्याच्या हातांत वाटी होती. त्याला सहज विचारलें 'वाटींतून काय आणलें?' त्या मुलाबरोबर मोलकरीण होती. ती म्हणाली "या मुलाच्या आईनें या मुलाला खाण्यासाठीं साखरेच्या (पेपरमिंटच्या) गोळ्या दिल्या होत्या. त्या त्यानें चिंचेच्या झाडाखालीं ओतून टाकल्या. व कोवळ्या चिंचा वाटींतून आणल्या आहेत." पहा, नैसर्गिक आंबट फळांचा प्रभाव!

सांड
डायाबेटॉल
मधुमेहावर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांड ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोटें रुग्णालयांतील आयुर्वेद विभाग

.... प्रगतीचा पाक्षिक अहवाल ....

पुणें संगमनेर रस्त्यावर बोटे गांवीं उभारण्यांत [आले]ल्या राहुटी रुग्णालयांत अतितृष्णा–अतिमूत्र उप[द्र]युक्त विकारांनीं पीडलेल्या रोग्यावर जे आयुर्वेदीय [उपचा]र चालू आहेत * त्यासंबंधीं अधिक माहितीं [मिळवि]ण्याची उत्सुकता पत्रिकेच्या वाचकांना होणें [स्वा]भाविक आहे. सबब ता. ८ जानेवारी ५३ ते [२२] जानेवारी ५३ या पंधरवड्याचा अहवाल आम्हीं [वाच]कांसमोर ठेवित आहोत.

रोगांचीं सामान्य लक्षणें

या रुग्णालयांत प्रविष्ट केलेल्या रोग्यांत आढ[ळून ये]णारीं सामान्य लक्षणें पुढीलप्रमाणें होतीं:— निद्रानाश, मलाचे खडे होणें व शौचास न [होणें], भूक कमी लागणें, न लागणें, अति तहान, वांति, दुर्बलता, भ्रम, डोकें दुखणें, लघवी [अधिक] होणें, पांडुता (नखनेत्र–पांडुता), छातींत [दाह], जिभेवर बुरशी, तोंडांत चिकटपणा.

नाडी — पित्त भूयिष्ट.

लक्षणांचा कमी अधिकपणा

ज्वर– दुपारीं येतो, रोगाच्या प्रारंभींच्या [काळीं] अवश्य आला होता. कांहीं रुग्णांत तो थंडी [वाजू]न आला. पित्तकालीं (दुपारीं १० ते ११ व [रात्रीं] १० ते १२ यावेळीं) ९८.४ ते १०२

तहान– दिवसा जास्त तहान लागते. थंडथंड [पाण्या]ची इच्छा, ताप अधिक असल्यास तहान [अधि]क.

लघवी– दिसण्यास अगदीं पाण्याप्रमाणेंच, [व] जास्त प्रमाणांत होई.

भूक– भूक क्रमानें कमी कमी होत जाते.

विष्ठा– बद्धविट्कता (शौचास खडा) मलाच्या [काळ]सर पिवळट रंगाच्या गाठी. दोन तीन दिवसांनीं [एकदां] मलप्रवृत्ति.

झोप– रात्रीं जास्तवेळ लघवीस उठावे लागल्या-मुळें झोपमोड.

दुर्बलता– सार्वदेहिक पडून रहावें, बसून राहावें असें वाटे.

दाह– छातींत आग, पोटांत आग, अंगाची आग.

वांति– केवल पाण्याप्रमाणेंच द्रव उलटून पडे.

चक्कर– फिरल्यासारखें वाटे, उन्हांत गेल्यास जास्त चक्कर.

रोगाचीं कारणें व दोष

रोगास प्रारंभ– सर्व रोग्यांना हा रोग होतांना प्रथम ज्वर आलेला होता. नंतर कंठशोष, तहानेस प्रारंभ.

ऋतुविपर्यय–पाऊस कमी पडला व आहारांत बाजरी सारखें उष्ण रूक्ष तीक्ष्ण धान्य येई.

रोगाचे दोष– पित्त (वातानुबंधी), कफपित्त.

रोगाचें स्थान– रक्तधातु– मज्जाधातु

चिकित्सा– शोधन, विरेचन १ कफनाशकगुटिका
२ रामबाणरस (गोळ्या)

शमन चिकित्सा–रोग्याचे तीन गट पाडून केली.

पहिला गट—क्षीरीवृक्षकषाय + थोडी हळद.

दुसरा गट—धात्रीलोह + प्रवाळभस्म (चंद्रपुटी)

तिसरा गट—चंदनासव + लोहासव व सुवर्णसूतशेखर

पिण्याचें औषधी पाणी

पिण्यासाठीं सर्व गटांतील लोकांना षडंगोदक (धणे घालून) दिलें जाई.

आहार— मीठ, आंबट व तिखट रस सेवन वर्ज होतें. दूध, तांदूळ, गहू यांचें अन्न दिलें जाई.

चिकित्सेचा दृश्य परिणाम

वरील ३ गटापैकीं पहिल्या गटांतील रुग्णांना औषध सुरु केल्यापासून एक दोन दिवसांत पुढील

---

* हा लेख मार्च १९५३ मध्यें लिहिलेला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फरक दिसून आलाः—

मलप्रवृत्ति— पातळ व रोज एकदां झाली.

झोप— स्वाभाविकपणें येण्यास प्रारंभ झाला.

भूक— वाटू लागली.

तहान-- चालूच होती.

लघवी— जरा कमी.

या गटाचा १५ दिवसानन्तरचा फरक पुढील-प्रमाणें होताः--

मलप्रवृत्ति- स्वाभाविकपणें होऊं लागली.

झोप- ,, येऊ लागली.

भूक- चांगली वाढली.

लघवी- रात्रीं कमी होऊं लागली.

तहान- ,, ,, ,, ,,

गट २ रा चिकित्साफल

या रोग्यांना धात्री-लोहाच्या वयोमानाप्रमाणें १ ते ५ पर्यंत गोळ्या रोज देण्यांत येत. शिवाय त्याजबरोबर प्रवाळभस्म (चन्द्रपुटी) १ ते ४ गुंजा दिलें. या योजनेचा तात्कालिक फरक असाः —

मलप्रवृत्ति— मध्यम

निद्रा— नाहीं

क्षुधा— मध्यम

मूत्रप्रवृत्ति— तशीच

तृष्णा — रात्रीं कमी

शोष— कमी

पंधरा दिवसानन्तर

१५ दिवसांत माल फारच उत्तम प्रकारें फरक या योजनेनें घडून आला. रोग्यांना स्वाभाविक मल-प्रवृत्ति होऊं लागली, स्वाभाविक झोप येऊ लागली, भूक वाढली, मूत्रप्रवृत्ति फारच कमी झाली, रात्रीं तहान लागणें अजिबात बन्द झालें. दिवसा फक्त एक वेळेस तहान लागे. शोष नाहींसा झाला.

बोर्टे अस्थायी रुग्णालयांतील आयुर्वेदीय विभाग

ता. ८ ते २३ जानेवारी १९५३

५ रुग्णांचें दैनिक द्रवपान, मूत्रप्रवृत्ति व मूत्राचें विशिष्ट गुरुत्व यांचा निदर्शक तक्ता

रुग्णाचें नांव		ता. ८	ता. १०	ता. १३	ता. १८	ता. २३
द्रौपदी	द्रवपान	२२२ औ.	२०८ औ.	११८ औ.	८० औ.	७९ औ.
	मूत्रप्रवृत्ति	१५४ ,,	१९० ,,	१३८ ,,	८० ,,	१०० ,,
	मू. वि. गुरुत्व	—	—	—	१००६ वि.गु.	१००६ वि.गु.
धोंडी	द्रवपान	—	१६८ औ.	१४८ औ.	१४२ औ.	९० औ.
	मूत्रप्रवृत्ति	—	१७४ ,,	१३८ औ.	९० ,,	८० औ.
	मू. वि. गुरुत्व	—	—	—	१००५ वि.गु.	१००९ वि.गु
मुरलीधर	द्रवपान	—	२०८ औ.	२३८ औ.	१८५ औ.	१५६ औ.
	मूत्रप्रवृत्ति	—	२२२ ,,	१८६ ,,	११२ औ.	९४ औ.
	वि. गुरुत्व	—	—	—	१००७ वि.गु.	१०१० वि.गु
लक्ष्मण	द्रवपान	२३२ औ.	१६८ औ.	१६८ औ.	१४३ औ.	११४ औ.
	मूत्रप्रवृत्ति	२३० ,,	१६० ,,	१३२ औ.	११८ औ.	९८ औ.
	वि. गुरुत्व	—	१००४ वि.गु.	—	१००८ वि.गु.	१०१० वि.गु
काशीबा	द्रवपान	४३८ औ.	२१८ औ.	१६२ औ.	१०२ औ.	९२ औ.
	मूत्रप्रवृत्ति	३६० औ.	२९० औ.	१६१ औ.	१०२ औ.	२८ औ.
	वि. गुरुत्व	—	१००४ वि.गु.	—	१००९ वि.गु.	१०१२ वि.गु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गट ३ रा चिकित्साफल

या गटांतील रोग्यांना $\frac{1}{2}$ तोळा चंदनासव व [द्रा]क्षा लोहासव असें मिश्रण ४ वेळ रोज देण्यांत [व] १ गुंज सुवर्णसूतशेखर २ वेळेस दूधसाखरेंत [अशी] योजना चालू होती. या औषधानें तात्कालिक [फरक] दिसून आला तो असा- मलप्रवृत्ति मध्यम, [ज्व]र जरा कमी, मूत्रप्रवृत्ति कमी, निद्रा मध्यम, भूक [कंठ]शोष बराच प्रमाणांत कमी झाला.

१५ दिवसानंतर मलप्रवृत्ति प्राकृत होऊ लागली. [ज्वर] कमी झाली, मूत्रप्रकृति फारच कमी, निद्रा [स्वा]भाविकपणें येऊ लागली. भूक वाढली. कंठशोष [कमी] झाला, ज्वर- गेला. रात्रीं तहान बिलकूल लागत [नसे]. दिवसा एक दोन ग्लास पाणी रोगी घेई.

या रुग्णालयांत ॲलोपॅथीप्रमाणें उपचार गेले [म]हिने चालू आहेत, त्या पद्धतीनुसार दिलेल्या [त्य]ा औषधामुळें रोग बरा होण्यास २ महिने [तरी] लागे व रोग्याचा रक्त धातु इतका क्षीण होई [की त्य]ासाठीं त्याला दुसरीं रक्तवर्धक औषधें द्यावीं [लाग]त.

आयुर्वेदीय उपचारानें रोगी रोगमुक्त तर [झाले]च पण त्यांचा रक्तधातूहि सुधारला. रक्तधातुची [पूर्व]ी स्थिति व नंतरची स्थिति याचा अधुनिक [दृष्टी]नें तुलनात्मक अभ्यास करण्यांत येणार आहे.

———×———

ग्राहकांस खूष खबर

महाराष्ट्र, उत्तर प्रदेश याप्रमाणेंच मध्य-[प्र]देशांतहि 'आयुर्वेद सेवा संघ, नाशिक' या [संस्थ]ेच्या औषधांचा बोलबाला झाला असून [श]ातां खेडोपाड्यांतूनहि या औषधांना मागणी [येत] आहे. म्हणून आम्ही वऱ्हाडांत हें नवीन [औ]षधी विक्री-केंद्र सुरू करीत आहोत.

[वै]. एन्. एम्. लोंधे " लोंधे औषधालय "

मु. पो. पिंपळोद (अमरावती)

[आ]मच्याकडे आयुर्वेद सेवा संघाचीं सर्व प्रकारचीं [गुण]कारी औषधें मिळतील. एकवेळ अनुभव घ्या.

तृणज्योतिष्मति

" माझा विचार जगत् महाराज यांना घेऊन नाशिक येथें आपल्याकडे येण्याचा आहे. तृणज्योतिष्मति बरोबर आणूच. तूर्त या मुळयांचें वस्त्रगाळ चूर्ण करून दुधाबरोबर सेवन करणें व करविणें हा प्रयोग चालू आहे. दुधांत चूर्ण वाटलें असतां दूध लाल होत नाहीं. पण त्याला गुलाबी तांबूस वर्ण येतो हें मात्र खरें. जगत् महाराज व आणखी एक मित्र यांनीं स्वतःवर प्रयोग चालविला आहे. त्यांची दृष्टि स्वच्छ झाली असून चष्म्यावांचून त्यांना वाचतां येऊ लागलें आहे. वय ६० वर्षांचें आहे, केसांचा वर्णहि बदलला आहे.

या मुळयांचा अर्क काढून त्या अर्कांचा औषधी परिणाम काय होतो, हेंहि पहावयाचें आहे. आयुर्वेद-सेवासंघातर्फे प्रयोग करून पाहाण्यासाठीं औषधी पुरविण्याची व्यवस्था करतां येईल.

तृणज्योतिष्मति दुर्मिळ आहे. रात्रीं जंगलांत शोधतांना त्रासहि बराच पडतो."

नाना बापट, मंडला

[आयुर्वेदानें वाग्भटांत अन्नस्वरूप विज्ञानीय या सूत्रस्थानांतील सहाव्या अध्यायांत तृणपंचमूळांचा समावेश केला आहे व तेणेंकरून माणसानें नित्याच्या आहारांत तृणमूलांचा समावेश करून आरोग्यसंपन्न व्हावें हें सुचविलें आहे.

तृणाख्यं पित्तजित् दर्भ-काश-इक्षु-शर-शालिभिः।

या अर्धश्लोकांत तृणमूळ हें पित्तदोष कमी करणारें आहे असें सांगितलें आहे. डोळे, केस इत्यादि शरीरस्थ अवयवावर पित्तदोषाचे परिणाम झाले असतील तर ते घालविण्यास तृणमुळें उपयोगी पडतील. तृण-ज्योतिष्मतीचें कार्यहि त्याच जातीचें पण विशेष स्वरूपाचें राहील.

आजच्या युगांत आपण तांदुळ ऊंस खातों पण त्यांच्या मुळांचा चुकूनसुद्धां उपयोग करीत नाहीं. तो केला पाहिजे. तृणज्योतिष्मती मिळेल तेव्हां ती वापरावी पण तत्पूर्वी सहज उपलब्ध होणारी तृणमुळें वापरून त्यांचा लाभ या शरदृतूंत तरी अवश्य घ्यावा.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मालिश व निसर्गोपचार

मुंबई राज्याच्या सन १९३८ च्या वैद्यक-व्यवसाय कायद्यानुसार रजिस्टर अथवा लिस्टामध्यें नांव असल्याशिवाय कोणाहि व्यक्तीला वैद्यक व्यवसाय करण्यास कायद्यानें प्रतिबंध आहे. असें करणारांस दंडाची व कारावासाची शिक्षा ठेवण्यांत आली आहे. असें असलें तरी 'निसर्गोपचार' (Naturopathy अथवा 'मॉलिश' (Massage) चा व्यवसाय करण्यास रजिस्टर अथवा लिस्टमध्यें नांव नसलें तरी हा व्यवसाय करतां येतो अशी कांहींची समजूत आहे. या दोन पद्धतीनें रोग बरे करण्यास कायदेशीर आडकाठी आहे कां? असा अनेकांकडून मला प्रश्न विचारण्यांत आल्यामुळें मी या बाबतींत सरकारशीं पत्रव्यवहार केला. त्याला सरकारकडून आलेलें उत्तर जनतेचें माहितीसाठीं पुढें देत आहे.

एम्. बी. गोडबोले. पुणें

नंबर ५८१।३३।७०१९९- एच

लोकल सेल्फ गव्हर्नमेंट अँड पब्लिक हेल्थ डिपार्टमेंट

बॉंबे कॅसल् ता. ५ जानेवारी १९५३

विषयः- मुंबई राज्य वैद्यक व्यवसायी बाबत कायदा, १९३८ नोंदणी बाबत

महाशय,

मे. रजिस्ट्रार बोर्ड ऑफ् आयुर्वेदिक अँड युनानी तिब्बी सिस्टिम्स् ऑफ् मेडिशिन, मुंबई, यांना. तुम्ही लिहिलेलें तारीख १६ जुलै १९५२ चे पत्राबाबत मला तुम्हास असें कळविण्याबद्दल आदेश देण्यांत आला आहे कीं कोणताहि उपचार ज्यास रोगनिदानाची आवश्यकता आहे मग तो 'मालिश' चा असो अगर 'निसर्गोपचारा' चा असो, तो वैद्यकीय क्षेत्रांतला आहे आणि म्हणून तो 'बॉंबे मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट, १९३८' च्या कलम ३२ च्या कक्षेमध्यें येतो.

आर्. पाइस

डे. सेक्रेटरी टू गव्हर्नमेंट ऑफ् बॉंबे,

लोकल सेल्फ गव्हर्नमेंट अँड पब्लिक डिपार्टमेंट

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेले आणि अनेक बक्षिसे मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु.

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो. असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन' मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

उज्वल कीर्ति

आयुर्वेदीय औषधांची उज्वल कीर्ति, बनविलेल्या सिद्ध औषधांच्या गुणावर आहे. औषधें गुण देणारीं असतील तर कीर्ति नेहमीं उज्वल राहील. तरी अशीं गुण देणारीं औषधें, अस्सल ताजी व स्वच्छ घटक औषधी द्रव्यें खरेदी करण्यावर अवलंबून आहे. औषधी द्रव्यासाठीं आपण

दि ऑल इंडिया करीयाणा स्टोर्स

पायधुनी, मुंबई नं. ३

फोन नं.(३१८५८) यांचेकडे मागणी करा.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात. अधिक माहितीसाठीं कॅटलाग मागवा.

जोड कार्ड पाठवा

ज्यांना तृणज्योतिष्मती पहावयाची असेल त्यांनीं आपला पत्ता जोडकार्डावर लिहून आयुर्वेद पत्रिकेकडे पाठवून ठेवावा. म्हणजे श्री. नाना बापट आल्यास पत्रानें त्यांना कळवितां येईल. --संपादक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[आ]युर्वेदीय गुरुजनांना विनंति

[मुं]बई सरकारनें सरकारी हुकुम काढून आयु-[र्वेदी]य गुरुपरंपरा शिक्षणाला प्रोत्साहन दिलें आहे. [त्या]चा लाभ घेऊन जे आयुर्वेदतज्ञ लोक [हें] कार्य करू इच्छित असतील त्यांनीं आपली [नां]व पत्ता शुद्ध आयुर्वेद अभ्यासक्रम समितीचे [वै]द्य ना. ह. जोशी (२५५ गिरगांवरोड [मुंबई ४]) यांना देणें इष्ट होईल. योग्यवेळीं त्या [त्या]चा त्यांना उपयोग होऊ शकेल.

[मुं]बई राज्यांत या शिक्षणपद्धतीचीं विद्यालयें [होती]ल तेव्हां त्यांनाहि अशा अध्यापकांची गरज [लागण]ार आहे.

---

[८]वें महागुजरात प्रां. वै. संमेलन

[म]हागुजरात (काठेवाड कच्छ) प्रांतीय वैद्य [संमेलना]चें १३ वें अधिवेशन लोद्रा मुक्कामीं ता. [२२-१]०-५३ ते २३-१०-५३ पर्यंत भरणार आहे. [वै]द्य वामनराव हे दुसऱ्या वेळीं अध्यक्षपदावर [निवडू]न आले आहेत गतवर्षीच्या संमेलनाचे तेच [अध्यक्ष] होते.

[लो]द्रा येथें जाण्याचा मार्ग अमदावाद कलोल [असा] आहे.

[तारे]चा पत्ताः-Newbottle

[के]. के. शहा अँड कंपनी

बाटल्याचे व्यापारी

(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)

[रि]काम्या बाटल्या, बुचे, कॅपसुल्स्
[हे]अर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी
[व]गैरेंच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर
[व] आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे

ठोक व किरकोळ

विक्री करणारे व्यापारी

अनुक्रमणिका

गुरुवर्य वेणीमाधव जोशी पारितोषिक	२५७
धन्वन्तरी जयंति सप्ताह साजरा करा	२५८
शुद्ध आयुर्वेदिक अभ्यासक्रम नियम व कानू	२५९
सरकारी हॉस्पिटलमध्यें आयुर्वेद विभाग	२६०
समिती सदस्यांचा अल्प परिचय	२६१
नेपाळ आयुर्वेद छात्रसंघ	२६२
वसंतकल्प-लघुमालिनी वसंत	२६३
मधुमालिनी वसंत	२६४
सुवर्णमालिनी वसंत	२६६
बृहत् सुवर्णमालिनी वसंत	२६९
कडुनिंबाचीं पानें नेत्ररोगहारक आहेत	२७१
विंचूदंशावर स्त्री-दुग्ध-प्रयोग	२७४
होमिओपॅथी	२७५
बोर्टे येथील तृष्णारोग	२७९
खाद्य पदार्थांत भेसळ	२८२
बोर्टे रुग्णालयांतील आयुर्वेद विभाग	२८३
तृणज्योतिष्मति	२८५
मालिश व निसर्गोपचार	२८६

शुद्ध आयुर्वेद अभ्यासक्रम समिति सभासदांचे पत्ते

अध्यक्ष- वैद्य वामनराव दीनानाथ बऱ्हाणपूरकर
४५ कॅथेड्रल स्ट्रीट मुंबई २

मंत्री- वैद्य नारायण हरी जोशी
२५५ गिरगांवरोड मुगभाटनाका मुंबई ४

सभासद- वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी
२८ शुक्रवार, पुणें २

„ वैद्यप्रवर दत्तात्रेयशास्त्री जळूकर
नशिराबाद (पू. खानदेश)

„ वैद्यगुरु दामोदर अनंत बोकाडे हळसीकर
आत्रेयसदन, हुबळी (कर्नाटक)

„ वैद्य ाज लक्ष्मीशंकर रामकृष्णशास्त्री
नागरवाडो, अहमदाबाद

„ वैद्यराज त्रिंबकलाल देवशंकर जोशी
जुना बाजार, खादीभांडारसमोर, भडोच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जादुसारखा तत्काळ प्रभाव करणाऱ्या, व केव्हांहि न बिघडणाऱ्या
गुणदायी इंजेक्शनांचा वैज्ञानिक नवा शोध, म्हणजेच

मार्तंड आयुर्वेदिक इंजेक्शन्स् !

भारतांतील सर्वांत मोठी, त्याचप्रमाणें आधुनिक यंत्रसामुग्रीनें सुसज्ज मार्तंड फार्मास्युटिकल् लॅबोरेटरीमध्यें, अनुभवी व उच्च आयुर्वेदिक शिक्षण घेतलेले तज्ञ व कर्तबगार पाश्चात्य शिक्षित वैज्ञानिक तज्ञ अशा उभयतांनीं मिळून सत्वर व हमखास गुणकारी अशा नवीन आयुर्वेदिक इंजेक्शनांचा शोध लाविला असून, तीं जादुसारखीं काम करणारीं व कायम गुण देणारीं अशीं आहेत. यांची बरोबरी ॲलोपॅथिक इंजेक्शनें करूं शकत नाहींत.

संशोधनाचें, मनाला पटणारें व पुष्कळच ज्ञान देणारें वाङ्मय मोफत मागवा. आमच्या इंजेक्शनांवर कोणत्याहि प्रकारचा प्रतिबंध नाहीं. आमच्या विद्वान् तज्ञांनीं आमच्या इंजेक्शनांचीं उत्कृष्टता, आयुर्वेदिक शास्त्रीयता व विशुद्धता, प्रांतीय तसेंच केंद्रीय सरकारी औषधीतज्ञांचे समोर सिद्ध केली आहे. एतदर्थ ह्यावर ड्रग कंट्रोल ॲक्ट लागूं नाहीं.

सर्वत्र एजंटांची जरूरी आहे. आजच पत्र पाठवा !

निर्माते व संशोधकः—**मार्तंड फार्मास्युटिकल्स्** बडौत S. S. R. (उत्तर प्रदेश)

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारचीं काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर, मौक्तिक (मोती खाका), शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें आम्ही घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितो !

गुलकंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील !

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

टे. नं. ३२०७९ Telegram-AYURVED

संपादक व प्रकाशकः— वैद्य विंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, मेनरोड, नासिक
मुद्रकः— श्री. चिं. ओक, सकल प्रेस, आग्रारोड, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ७ वें) नाशिक, ता. १ नोव्हेंबर १९५३ (अंक ९ वा

गुरुकुल कांगड़ी

नागपूर विद्यापीठांत आयुर्वेदीय संशोधन

नागपूर विद्यापीठाच्या आयुर्वेदीय संशोधन बोर्डाची पहिली बैठक ता. १४ ऑक्टो. रोजीं नागपूर येथें होऊन पारा व लोह याबाबत संशोधनकार्य प्रथम सुरू करण्याचें ठरलें आहे असें कळतें. पारदावरील अठरा संस्कार, पाऱ्याचे निरनिराळ्या प्राणिज, खनिज व उद्भिज्ज द्रव्यांशीं संयोग व संस्कृत पाऱ्याचे औषधी उपयोग याबाबत हें संशोधन होणार आहे. लोहाचे प्रकार त्यांचीं भस्में, व त्याचे औषधी उपयोग याबाबतचे संशोधनकार्यहि या विद्यापीठांत होईल.



आचार्य वेणीमाधवशास्त्री

संशोधन कार्याची रूपरेषा

आयुर्वेदाच्या उपलब्ध निरनिराळ्या ग्रंथांतून पारद व लोह यांच्या औषधीकरणाबाबतच्या ज्या प्रक्रिया सुचविण्यांत आलेल्या आहेत त्यांचा अवलंब करून त्यामुळें त्या धातूंचे मूळ स्वभाव वैद्यकीय दृष्ट्या कितपत व कसकसे बदलत जातात यांचा शोध करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

आयुर्वेदीय वाङ्मयाची वृद्धि, आयुर्वेदीय ग्रंथालयाची स्थापना व भारतांत ठिकठिकाणीं चालू असलेल्या आयुर्वेदीय संशोधनाचें निरीक्षण यांचाहि अंतर्भाव येथील संशोधन कार्यांत केला जाणार आहे असें कळतें.

मध्यप्रदेशांत नुकत्याच उपलब्ध झालेल्या 'तृणज्योतिष्मति' या अंधारांत चमकणाऱ्या वनस्पतीविषयींहि संशोधन करण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. या वनस्पतींत गंधक, फॉस्फरस, कॅल्शियम् व नायट्रेट्स् आहेत असें आजवरील शोधान्तीं आढळून आलेलें आहे असें कळतें.

आयुर्वेदाचार्य वै. वेणीमाधवशास्त्री जोशी यांची नागपूर विद्यापीठांत आयुर्वेदीय संशोधन विभागाचे प्रमुख म्हणून नेमणूक झाल्यानंतर या विभागाची ही पहिलीच बैठक आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्ध आयुर्वेदीय अभ्यासक्रमासंबंधीं लोकमत

आयुर्वेदाला उत्तेजन

" मुंबई सरकारनें शुद्ध आयुर्वेदास उत्तेजन देण्याच्या हेतूनें, सरकारमान्य शिक्षणसंस्थांतून किंवा वैद्यांकडून साडेतीन वर्षांचा शुद्ध आयुर्वेदिक अभ्यासक्रम सुरू करण्याचें ठरविलें आहे. शुद्ध आयुर्वेदास सरकारी उत्तेजन मिळत नाहीं, ही वैद्यवर्गाची अनेक दिवसाची तक्रार सरकारच्या या उपक्रमानें अशतः तरी दूर होईल. पण शुद्ध आयुर्वेदाभिमान्यांनीं सरकारी उत्तेजनापेक्षांहि जनतेच्या उत्तेजनाचीच आकांक्षा अधिक बाळगावी. जनतेंत आयुर्वेदाविषयींचें असलेलें अज्ञान दूर करण्यासाठीं त्यांनीं पद्धतशीर प्रयत्न प्रथम करावेत. ठिकठिकाणीं मिळणाऱ्या स्थानिक वनस्पतींचे संग्रह व संशोधन करून, दैनिक जीवनांत व आहारांत त्यांचा उपयोग करून आरोग्य कसें टिकवितां वाढवितां येईल, याचें शिक्षण जनतेस द्यावें म्हणजे सरकारी उत्तेजन न मिळालें तरी जनतेंत आयुर्वेद सुप्रतिष्ठित होईल. आयुर्वेद चिरंजीव करण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. " मौज २७।९।५३

हिंमतपूर्ण पदार्पण

शुद्धायुर्वेदाच्या अभ्यासक्रमाचा पुरस्कार करण्यांत मुंबई-राज्य सरकारनें एक धाष्टर्यपूर्ण व प्रशंसनीय पदार्पण केलें आहे. शुध्दायुर्वेदाला मान्यता देण्याचा सरकारी निर्णय ही एक क्रांतिकारक घटना असून, ती स्थायी होण्याची आशा वाटत आहे व या योजनेचा परिणाम भारतांतील इतर प्रांतांतहि होण्याची बरीच शक्यता आहे. सरकारकडे अधिक व सुसज आयुर्वेदीय पाठशालांची मागणी ही बाब निश्चयात्मक स्वरूपाची असल्यामुळें, सरकारनें गुरुकुल शिक्षणपद्धतीस मान्यता देऊन तिचें पुनरुज्जीवन केलें ही एक दूरदर्शीपणाचीच गोष्ट केली आहे.

अभ्यासक्रमाच्या सध्यांच्या नियमाप्रमाणें विद्यार्थ्यांस संस्कृत भाषेचें विशिष्ट ज्ञान असल्याशिवाय त्यास प्रवेश मिळूं शकणार नाहीं व ही गोष्ट तूर्त इष्टहि आहे. कारण आयुर्वेदाचे मूळ ग्रंथ संस्कृत भाषेंत आहेत; परन्तु ही उणीव, पाठ्य-पुस्तकें निरनिराळ्या प्रादेशिक भाषेंतून छापलीं जाऊन त्यांचें शिक्षण त्या त्या प्रादेशिक भाषेंतूनच दिलें जाणें इष्ट आहे, व हें कार्य शक्य तितक्या लवकर व्हावयास पाहिजे. परन्तु अभ्यासक्रमांतील ही उणीव लवकर भरून काढण्याचें, शुद्ध आयुर्वेदाचे पुरस्कर्ते व धुरीण त्यांना मिळालेल्या विजयानन्दाचे भरांत विसरून जाण्याचा विशेष संभव आहे. --टाइम्स ऑफ इंडिया २६।९।५३

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत नवा प्रवाह

" आयुर्वेदाचें शिक्षण शुद्ध स्वरूपांत द्यावें की ॲलोपॅथीच्या बहारदार वृक्षावर आयुर्वेदाचें कलम करून द्यावें, हें वादंग गेलीं कांहीं वर्षें चालू होतें. त्यांत मिश्र शिक्षण पद्धतीच्या पुरस्कर्त्यांचा विजय होऊन त्याप्रमाणें महागडा शिक्षणक्रमहि सुरू झाला होता. शुद्ध आयुर्वेदाभिमानी मंडळी खट्टु झाली होती पण त्यांनीं प्रयत्न सोडला नव्हता. अखेर त्यांच्या प्रयत्नास यश येऊन एका बाजूला मिश्र पण महाग शिक्षण आणि दुसऱ्या बाजूला शुद्ध पण स्वस्त शिक्षण असा देखावा आयुर्वेदीय शिक्षणाच्या क्षेत्रांत आता दिसूं लागणार आहे.

सामान्य जनतेच्या दृष्टीनें हे शुद्ध अगर मिश्र या संबंधींचे वाद निरर्थक आहेत. स्वस्त शिक्षण मिळालें कीं वैद्य मंडळी लगेच पडशा खांद्यावर टाकून खेड्यांत वैद्यकी करावयास जातील आणि सध्यां शिक्षण महाग मिळतें म्हणूनच ती मंडळी शहरांत ठाणं मांडतात हाहि विश्वास लटका आहे. हुषार पण गरीब विद्यार्थ्यांना वैद्यक व्यवसाय निवडणें आतां सुलभ होईल. व गुरुगृहीं राहूनहि शिक्षण घेण्याची सवलत नव्या अभ्यासक्रमानें मिळणार असल्यामुळें आयुर्वेदाची परंपरा विशुद्ध व अखंडित राहील हाच काय तो या नव्या पद्धतीचा विशेष ! "

—'साधना' २६।९।५३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

-: महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मण्डळ :-

कार्यकारिणी व स्थायी समितीची सभा

दिनांक २४।१०।५३ शनिवारी दुपारीं मुंबा--वळ येथें नवशक्ति आयुर्वेदालयाचे जागेंत महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळाची चालू वर्षाची प्रथम कार्यकारिणी व स्थायी समितीची सभा प्रांतीय वैद्यमंडळाध्यक्ष वैद्यप्रवर दत्तात्रेयशास्त्री जळूकर यांचे अध्यक्षतेखालीं झाली. या सभेंत प्रामुख्यानें शुद्ध आयुर्वेदीय शिक्षण-क्रमविषयक विचार व्हावयाचा असल्यानें विचार-दिग्दर्शनासाठीं प्रांतीय अधिकारी वैद्यांनाहि स्वतंत्र आग्रहाचीं निमंत्रणें गेलीं होतीं. सभेच्या कार्यास दुपारीं ठीक ३॥ वाजतां प्रारंभ झाला.

चर्चिलेले विषय व संमत प्रस्ताव

(१) दुःखप्रदर्शन प्रस्ताव- प्राणाचार्य वै. भू. पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर, धुळ्याच्या वैद्यविदुषी श्रीमती चंद्रभागाबाई कुंटे आणि चेंबूरचे वै. दादा--साहेब सांडू यांचे निधनामुळें आयुर्वेदाची फार मोठी हानि झाली आहे याबद्दल सभेनें दुःख व्यक्त करून मिनिटें उभें राहून श्रद्धांजली समर्पण केली.

(२) म. प्रा. वै. मं.चे मंत्रिमहोदयांनीं गतसभा-वृत्त आणि आजपर्यंतचे प्रांतीय मंडळाचे कार्याचा अहवाल निवेदन केला. तो संमत करण्यांत आला.

शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमविषयक आरंभा-पासूनची सर्व माहिती व नियुक्त समितीचें कार्य, सदस्यवर्गांवरील जबाबदारी, अभ्यासक्रमाचें स्वरूप, गुरुपरंपरेचें महत्व या दृष्टीनें सर्व निवेदन करण्या-विषयीं अध्यक्षांनीं सूचना केल्यावरून शुद्ध आयुर्वेद शिक्षणक्रम समितीचे मंत्री वै. ना. ह. जोशी यांनीं पूर्ण माहिती सांगून येत्या २९।१०।५३ ला मुंबई * येथें भरणाऱ्या शुद्ध आ. समितीच्या सभेला शक्य असेल त्यांनीं अवश्य यावें असें सांगितलें.

त्यानंतर म. प्रांतीय मंडळाकडून या प्रांतांतील व अन्य प्रांतांतीलहि कांहीं तज्ञ वैद्यांशीं पत्रव्यवहार द्वारा शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमाच्या दृष्टीनें विचार मागविले होते. त्याप्रमाणें ज्याचेकडून विचार दिग्द-र्शन झालें त्यांचीं पत्रें सभेपुढें वांचून दाखविण्यांत आलीं. त्यांत जबलपूरचे वैद्यवर भि. वि. डेग्वेकर-शास्त्री, नागपूरहून आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री, नगरचे वैद्य श्री. का. शं. करंदीकरशास्त्री व आयुर्वेद-तीर्थ वि.दा. एकतारेशास्त्री, मुंबईचे आयुर्वेदाचार्य वैद्य तांबेकरशास्त्री, पुण्याचे वैद्य पांडुरंगशास्त्री देशपांडे आयुर्वेदाचार्य, सातारा येथून आयुर्वेदरत्न गो. आ. फडकेशास्त्री, आणि धुळे स्थानिक वैद्यमंडळाच्या सभेनें प्रस्ताव करून सभेतर्फे अध्यक्ष आयुर्वेदाचार्य नारायणशास्त्री भगरे यांचीं पत्रें उल्लेखनीय होतीं.

नंतर सभेंत उपस्थित सदस्यांतून वै. पार्थ लोटू चौधरी, वै. मो. ल. ठोंबरे, वै. द. ब. कुळकर्णी यांनीं विचारलेल्या शंकारूप प्रश्नांना पाठ्यक्रम समितीचे सदस्य वै. ना. ह. जोशी आणि वै. वि. म. गोगटे यांनीं समर्पक उत्तरें देऊन प्रांतीय मंड-ळाच्या कित्येक वर्षांच्या तपश्चर्येस आलेलें हें फळ पचनीं पाडण्याचे दृष्टीनें तात्त्विक व वैयक्तिक मतभेद बाजूस सारून व प्रसंगीं कांहीं अडचणी सोसूनहि शक्य तें सर्व साध्य करण्याचा हा काळ आहे, हें कळ-कळीनें निवेदन केलें.

वै. वि. श्री. पाठकशास्त्री यांनीं गुरुपरंपरेच्या दृष्टीनें कांहीं शंका विचारल्या; त्यांचेंहि वै. ना. ह. जोशी यांनीं निराकरण केलें; त्यांत प्रामुख्यानें गुरु-परंपरेचा हेतु प्रतिगुरु निर्माण करणें हा आहे. तेव्हां अशा पात्रतेचे गुरु असतील तेच हा हेतु सफल करूं शकतील. गुरुंची पात्रता ठरविण्याच्या बाबतींत कितीतरी गोष्टींचा विचार करून फार खबरदारी घ्यावी लागणार आहे. तशी न घेतल्यास कार्याची सफलता दुरावणार आहे असें समजावून सांगितलें.

* बौद्ध भवन, औटॅरमरोड, मुंबई १

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वीकृत प्रस्ताव

(३) मुंबई सरकारनें शुद्ध आयुर्वेदीय अभ्यासक्रमाला मान्यता दिली आणि त्याच्या संचालनासाठीं सुयोग्य वैद्यांची एक समितीहि नियुक्त केली आहे ही गोष्ट आयुर्वेदोन्नतीच्या दृष्टीनें अभिनंदनीय आहे. याबद्दल ही सभा मुंबई सरकारचें आणि नियुक्त समितीचें हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक– वै. रामभाऊ भोगे
अनुमोदक– वै. का. सी. भावे

(४) आयुर्वेदीय औषधीकरणासाठीं लागणारी औषधी द्रव्यें नियंत्रित दरांत वैद्य व औषधी निर्माणशाळांना मिळण्याचे दृष्टीनें लातूर संमेलनानें केलेल्या प्रस्तावास सरकारनें सहानुभूति दर्शवून अशा द्रव्यांची माहिती मागविली आहे. त्या औषधांची यादी तयार करून त्यांचे १९३९ सालचे भाव काय होते व आजचे भाव आहेत यासंबंधीं पत्रक तयार करून सरकारकडे पाठवण्यांत यावेत.

सूचक– वै. अ. बं. जोशी
अनुमोदन– वै. श्री. रा. करंजीकर

(५) शुद्ध आयुर्वेदीय शिक्षणक्रमास मुंबई सरकारनें मान्यता देऊन त्याचे खिध्यर्थ सुयोग्य वैद्यांची एक समितीहि नियुक्त केली आहे. याकामीं गेलीं १५ वर्षे म. प्रां. वै. मंडळाप्रमाणेंच महागुजराथ व कर्नाटक प्रांतीय वैद्य मंडळ या दोन्ही संस्थांनीं खांद्याशीं खांदा भिडवून हें कार्य यशस्वीपणें घडवून आणलें याबद्दल या दोन्ही प्रांतीय वैद्यमंडळास म. प्रां. वै. मंडळाची ही सभा धन्यवाद देत आहे.

अध्यक्षद्वारा प्रस्तावित

अज्ञानमूलक व अन्याय्य

(६) आयुर्वेदीय पद्धतीनें तयार केलेल्या आसवारिष्टांना, बेहोष करणाऱ्या द्रव्यांच्या सदरांत घालून त्यांवर विशेष विक्रीकर बसविला आहे ही गोष्ट संपूर्णतया अज्ञानमूलक व अन्याय्य आहे असें या संस्थेचें मत आहे. तरी सरकारनें या द्रव्यांवरील आरोप दूर करून आकारलेला विक्रीकर रद्द करावा अशी मुंबई सरकारास या सभेची आग्रहाची विनंति आहे.

सू.– वै. ब्रह्मदत्त शर्मा
अ.– वै. ना. ह. जोशी

(७) आजच्या म. प्रां. वै. मं. च्या सभेसाठीं उपस्थित होणाऱ्या व संयुक्त खानदेश वैद्यमंडळाच्याहि का. का. सभेस आलेल्या सदस्यांचें आतिथ्य करण्याचें भुसावळचे वृद्धवैद्य नारायणलालजी इंदूरकर यांनीं स्वयंस्फूर्तीनें अंगावर घेऊन तें अत्युत्कृष्टपणें पार पाडलें याबद्दल आजची प्रांतीय मंडळाची सभा त्यांना हार्दिक धन्यवाद देत आहे.

सू.– वै. ब्रह्मदत्त शर्मा
अ.– कविराज का. सी. भावे

याप्रमाणें प्रस्ताव कार्य संपल्यावर अध्यक्ष वै. जळूकरशास्त्री यांनीं उपस्थित वैद्यांचे आभार मानून या सभेच्या कार्याचें अवलोकन करण्यासाठीं मुद्दाम आपल्या प्रतिनिधींना पाठवणाऱ्या, नासिक शहर वैद्यमंडळ, गंगाराम छबिलदास धर्मार्थ आयुर्वेद संस्था

नूतन वर्षाभिनंदनानिमित्त आमची
— प्रार्थना —

आम्हीं आमच्या प्रत्येक ग्राहकांकरितां प्रार्थना करीत आहो कीं, त्यांस या नवीन वर्षांत ऋद्धिसिद्धी लाभो, त्यांची प्रत्येक मनोकामना परिपूर्ण होवो व त्यांस हें वर्ष सुखदायक जावो. ईश्वराच्या कृपेसाठीं आपल्यामध्यें जनतेच्या कल्याणाची भावना असली पाहिजे.

यासाठीं आपण आजच निश्चय करा कीं, जें जें औषध आपण जनतेस देऊ, तें तें अस्सल घटकद्रव्यांनीं युक्त व गुणकारी असावयास पाहिजे. अशा द्रव्यांच्या खरेदीसाठीं आपण—

दि ऑल इंडिया करीयाणा स्टोर्स
पायधुनी, मुंबई नं. ३
यांचेकडे विचारणा करावी. आपलें समाधान होईल अशी द्रव्यें आपणास तेथें मिळतील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येवलें, आणि धुळेंशहर स्थानिक वैद्य मंडळ या संस्थानाहि धन्यवाद दिले आणि आपापल्या क्षेत्रांत शुद्ध आयुर्वेदीय शिक्षणक्रम संस्था प्रत्यक्ष सुरू करण्याचे दृष्टीनें या प्रतिनिधींनीं आपल्या संस्थांना आमची हार्दिक विनंति प्रविष्ट करावी अशी कळकळीची विनंति करून सभा कार्य समाप्त झाल्याचें सांगितलें.

या सभेसाठीं उपस्थिति

कार्यकारी व स्थायी समितीच्या सभा संयुक्त स्वरूपांतच झाल्या. वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर, वै. ब्रह्मदत्तशर्मा, वै. बिंदुमाधवशास्त्री पंडित, वै. द. अ. फुलंब्रीकर, वै. श्री. रा. करंजीकर, वै. मो. ल. ठोंबरे, वै. लक्ष्मीबाई बोरवणकर, वै. विष्णुशास्त्री दाते, वै. अनंतशास्त्री जोशी, वै. ना. ह. जोशी, कविराज का. शी. भावे, वै. रामभाऊ भोगे हे कार्यकारी व स्थायी समितीचे सदस्य, वै. वि. म. गोगटे निमंत्रित, आणि वै. वि. श्री. पाठक, वै. ज. रा. नाईक, वै. रामविलास गुप्ता, वै. चूडामणी खंडेराव चौधरी, वै. दे. वि. राणे, वै. पार्थ लोटू चौधरी, वै. द. ब. कुलकर्णी वै. सुभानराव पाटील, वै. ह. रा. बऱ्हाटे, वै. सौ. गिरजाबाई झोपे, वै. मो. स. तळेले, वै. नारायणलालजी इंदूरकर, वै. आसराज सुरजमल, वै. द्वारकादास बऱ्हाणपूरकर, वै. श्री. कृ. करमरकर, वै. भि. श्री. कुलकर्णी हे संयुक्त खानदेश वैद्य मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

सभेला संमतिपत्र प्रेषक

वै. गं. वि. पुराणिक पनवेल, वै. शं. वा. सांडू चेंबूर, वै. वामन दीनानाथ, वै. प्रतापकुमार पोप्टभाई मुंबई, वै. द. ब. वैद्य ठाणे, वै. नाटोलीकर (कागल), वै. पां. ह. देशपांडे पुणें, वै. त्र्यंबकशास्त्री दाते नाशिक, वै. शेंडेशास्त्री पुणें, वै. म. द. करमरकर मिरज, वै. म. भा. वाटवे बेळगांव, वै. फूलचंद दोशी माढें, वै. भगवंत त्र्यंबक वैद्य धुळें, वै. ए. बी. जोशी बेळगांव.

शुद्ध आयुर्वेदाच्या शिक्षणाच्या दृष्टीनें चर्चेसाठीं निमंत्रित पुढील वैद्य उपस्थित होते.

वै. वि म. गोगटे नाशिक, वै. श्री. कृ. करमरकर भादली, वै. भि. श्री. कुळकर्णी नशिराबाद, वै. वि. श्री. पाठकशास्त्री धुळें, वै. ठोंबरे चिनावल, वै. पार्थ फैजपूर, वै. सुभानराव पाटील भादली, वै. ज. रा. नाईक, रावेर.

— संयुक्त खानदेश वैद्य मंडळ —
कार्यकारी मंडळाची सभा

म. प्रां. वै. मंडळाच्या का. का. सभेपूर्वी दुपारीं १ ते ३ वाजेतो याच जागेंत संयुक्त खानदेश वैद्य मंडळाचे अध्यक्ष वैद्य ज. रा. नाईक यांचे नेतृत्वाखालीं संयुक्त खानदेश वैद्य मंडळाच्या का. का. मं.ची सभा झाली. या सभेंत प्रामुख्यानें शुद्ध आयुर्वेद शिक्षणक्रम विषयक चर्चा होऊन उभय खानदेशांतून निदान एक तरी विद्यालय सुरू करण्याबद्दल प्रयत्न करण्याचा विचार ठरला. तसेंच चिकित्सक मासिकाचें स्थगित प्रकाशन पुन्हां सुरूं करण्याबद्दल मंडळाध्यक्ष व संपादक मंडळानें मुंबईचे वैद्य रामभाऊ भोगे यांचेशीं विचारविनिमय करून त्यांच्या आरोग्यमित्र मासिकाबरोबर चिकित्सकाचें प्रकाशनाच्या शक्याशक्यतेचा विचार करावा असें ठरलें. याशिवाय उभय खानदेशांतून गुरुपरंपरेच्या शिक्षणाचे दृष्टीनें सुयोग्य व्यक्तींची माहिती मंडळानें संकलित करून ती योग्य वेळीं शुद्ध आयुर्वेद शिक्षण समितीकडे पाठवावी असें ठरलें.

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेलें आणि अनेक बक्षिसे मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु.

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो. असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन' मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कै. दादासाहेब सांडू, चेंबूर

चेंबूर येथील सुप्रसिद्ध आयुर्वेदिक कारखानदार, दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स, चेंबूर लिमिटेड या संस्थेचे डायरेक्टर, श्री. श्रीकृष्ण रघुनाथ ऊर्फ दादा-साहेब सांडू हे बुधवार दि. ७ ऑक्टोबर १९५३ ला चेंबूर येथील आपल्या निवासस्थानीं दुपारीं एक वाजतां निधन पावले. गेले जवळजवळ वर्षभर ते क्षयरोगानें आजारी होते.

सांडू ब्रदर्स लि. या संस्थेच्या वाढीला श्री. दादासाहेब यांची बहुमोल मदत झालेली आहे. ते ते वयाच्या विसाव्या वर्षापासून संस्थेच्या कामांत भाग घेऊं लागले. आद्य संस्थापकांप्रमाणेंच त्यांनींहि आपलें तन-मन-धन संस्थेच्या सेवेला वाहिलें होतें. मरणसमयीं त्यांचें वय ५३ वर्षांचें होतें.

ते कंपनीचे आजीव डायरेक्टर व 'मार्केटिंग ऑफिसर' होते. त्यांचा मितभाषी व निगर्वी स्वभाव वक्तशीरपणा, प्रामाणिकपणा आणि निर्भीडपणा यां-मुळें कंपनीला त्यांचा मोठाच आधार होता. त्यांच्या निधनामुळें सांडू ब्रदर्स यांचें भरून न येणारें नुकसान झालें आहे.

———

म. प्रां. वैद्यमंडळाचे सभासद होऊन संघटना बलवान् करा.

यशस्वी चिकित्सक होण्याचा मार्ग

एकदां एका दवाखान्यांत गुरुवर्य नानलशास्त्री आले होते. आयुर्वेदाध्ययन पूर्ण करून त्या वैद्यानें दवाखाना नुकताच सुरू केला होता. "रोगी असो नसो वैद्यानें ठराविक काल दवाखान्यांत बसलेंच पाहिजे. हाच यशस्वी होण्याचा मुख्य मार्ग आहे; हें मी अनुभवानें सांगतो. वैद्य भेटेल कीं नाहीं असा संशय रोग्याच्या मनांत उपजता कामा नये." असा त्यांनीं उपदेश केला होता.

वैद्य को आसनबद्ध होना चाहिये।

प्रयाग येथील वृद्धवैद्य पं. जगन्नाथप्रसादजी शुक्ल यांनीं सुधानिधीतील 'मेरी असफलता' शीर्षक लेखांत हाच मुद्दा विशद केला आहे.

"वैद्य के लिये सफलता देनेवाला एक मार्ग है। जिसे पूर्ण न कर सकने के कारण मेरी सफलता अधूरी रही। वैद्य को आसनबद्ध होना चाहिये। उसे अपनी गद्दीमें नियमित समयपर पहुंचकर आसनाधीन होना चाहिये। उसके प्रति चिकित्सा करानेवालोंका यह विश्वास रहना चाहिये की हम जब जायंगे तब वैद्य-जी हमारी बात सुननेके लिये उपस्थित मिलेंगे।

इस प्रकारका निश्चित विश्वास, वैद्यकी ओर जनताका विश्वास आकर्षित करता है। मैं इस संबंध में फेल रहा।"

नवीन चिकित्सकांनीं हा उपदेश नित्य स्मर-णांत ठेवावा.

अनेक ग्राहकांच्या सूचनेवरून
परतवाडा येथें आयुर्वेद सेवा संघ नासिकचीं
सर्व अनुभविक व गुणकारी औषधें
मिळण्याची सोय आम्हीं केली आहे.
श्री समर्थ स्टोअर्स
परतवाडा (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें —

वातविध्वंसनरस :

लेखकः- वैद्य पु. वि. धामणकर
धूतपापेश्वर, पनवेल

४४३ एकांगवीर व ४६६ वातविध्वंसन रस यो. सा.) हीं दोन्हीं औषधें वातविकारावरच लतात. पण एक आहे उत्तेजक तर दुसरें आहे मक. एकांगवीरांतील द्रव्यांपेक्षां ४॥ भाग बचनाग, सुंठ, १ टंकण, १ पिंपळी हीं द्रव्यें वातविध्वंसांत धिक आहेत. तसाच भावनाद्रव्यांतहि फरक आहे. घांच्या सामान्य भावना सोडल्या तर एकांगवीरास डनेल, शेवगा आणि कुचला ह्यांच्या, तर वातध्वंसास लिंबू, माका, व अक्कलकरा ह्यांच्या भावना शेष आहेत. तसेंच एकांगवीर व वातविध्वंस च्या भावनाद्रव्यांत अनुक्रमें आलें व आंवळारस नदोनदां आले आहेत. म्हणजे इतरांपेक्षां ह्यांच्या वना दुप्पट आहेत.

वातविध्वंसनाचे ८ पाठ

वातविध्वंसन नामक आठ पाठ पाहिले. पैकीं न येथें उद्धृत केले आहेत. ६९९६, ६९९७, ९९८ (भा. भै. र.). पैकीं तिसरा पाठ र.यो.सा.मध्यें हीं. व रसयोगसागरांत ४६६, ४६७ या क्रमांकानें लेले पाठ भा. भै. रत्नाकरांत ६९९७, ६९९६ ध्येनें आले आहेत. प्रत्येक संग्रहांत दोन दोन पाठ गर्दी स्वतंत्र आहेत. दोन्ही ग्रंथ मिळून वातविध्वंनाचे एकूण आठ पाठ आहेत. ह्या पाठांची निवड च्या त्यांच्या गुणवैशिष्ट्याकरितां केली आहे. ९९७ हा पाठ वाताचा उद्रेक अथवा क्षोभ शमविा आहे. सान्निपातिक ज्वर अगर इतर आजारांत तप्रकोप होतो तेव्हां हा देतां येतो; म्हणजे 'आत्यके गदे' किंवा अत्यंत आणिबाणीचे प्रसंग विशेषीं परण्याचें असें हें एक हुकमी औषध आहे. ६९९६ तविध्वंसन हा योग वातव्याधिचिकित्सेंत सांगिलेला आहे. ह्याचा विशेष म्हणजे एखादा अवयव गर सांधा जखडला गेला तर तेथें हा रस उत्तम काम देतो. ६९९८ हा केवळ वातशूलहर म्हणून आहे. विशेषतः सगळया अंगांत ठुसठुस अगर वेदना सुरू असतात, तेव्हां हा द्यायचा असतो.

हे तिन्ही रस वातदोषावरच काम देतात. पण ६९९७ हा सान्निपातिक तीव्रावस्थेंत, ६९९६ हा जीर्णावस्थेंत, तर ६९९८ हा सामान्य अवस्थेंत असा त्यांत फरक आहे. हीं तिन्हीं औषधें आहेत मात्र अगदीं हुकमी.

१८ वातविध्वंसनरस

संस्कृत पाठ

रसं गन्धकं नागवंगं च लौहं ।
तथा ताम्रजं व्योम निश्चंद्रकं च ।
कणा टंकणं त्र्यूषणं नागरं वै
पृथग्भागमेकं विमर्द्यैकयामम् ॥
ततो वत्सनाभं चतुः सार्धं भागं
दृढं मर्दयेद्भावना व्योषघा (जा) त्रिः ।
वराचित्रकैर्मार्कवैः कुष्ठजैस्त्री-
त्रिभिर्भावयेन्निर्गुंडीभानुदुग्धैः ॥
महाधात्रिजैश्चार्द्रकैर्निम्बुनीरैः
समं भावयेद्वातविध्वंसनोऽयं ।
समीरे च शूले महाश्लेष्मरोगे
ग्रहण्यां तथा सन्निपाते च मौढ्ये ॥
स्त्रियः सूतिकावातरोगेषु दद्या-
न्निषेवेत गुंजाद्वयं सूतमेनम् ॥

६९९७ भा. भै. र.

नांवः- कार्यबोधक.

पाठनिश्चितिः- ठीक आहे.

द्रव्यसंग्रहः- १ पारा, १ नाग, १ ताम्र, १ लोह, १ गंधक, १ अभ्रक, ४॥ बचनाग, ३ त्रिकटु, १ वंग, १ सुंठ, १ टंकण, १ पिंपळी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भावनाद्रव्यः– १ सुंठफांट २ मिरेफांट ३ पिंपळी-फांट, ४ आंवळारस, ५ हिरडाकाढा, ६ बेहेडा-काढा, ७ आंवळा- काढा, ८ चित्रक–काढा. ९ माका-रस, १० कोष्ठकाढा, ११ निर्गुंडीरस, १२ रुईचा चीक, १३ आंवळा, १४ लिंबूरस, १५ आर्द्रकरस, १६ अक्कलकारा.

द्रव्यनिर्णयः– पारा– हिंगुलोत्थ. टंकण– उद्भिज्ज
गंधक– आमलसार. पिंपळी– जुनी, लेंडी
बचनाग– काळा. मिरें– काळी.

द्रव्यशोधनः– शोध्य — शोधक
पारा — लसूण
गंधक — तूप-दूध
बचनाग — गोमूत्र
पिंपळी — चित्रक
टंकण — अग्नि

प्रक्रियाः– खालीं दिलेल्या क्रमानें भावना देणें

१ रुई– क्षीर	९ पिंपळी– फल–काढा
२ निर्गुंडी– पत्ररस	१० हिरडा– फल–काढा
३ आलें– कंदरस	११ बेहेडा– फल–काढा
४ माका– पंचांग-रस	१२ आवळकंठी- फल-काढा
५ आंवळा– फल–रस	१३ आंवळा– फल–रस
६ लिंबू– फल–रस	१४ अक्कलकारा– काढा
७ सुंठ–कंद– फांट	१५ कोष्ठ– मूळ–काढा
८ मिरीं– फल– फांट	१६ चित्रक– मूळ–काढा

कालः– प्रारंभकाल– शरद्
मर्दनकाल– सहा महिने

सिद्धिप्रमाणः– १ तोळा पारा घेतला तर २९ तोळे औषध तयार होतें.

पारिगणनः– बचनाग व भस्मांचें

रोगः– सान्निपातिकज्वर, संग्रहणी, सूतिकारोग, मूढवात, शूल, वातप्रधान कफरोग.

मात्राः– २ गुंजा

अनुपानः– माकारस + मध. आलेंरस + मध

टिप्पणीः– हा पाठ भा. भै. रत्नाकर व र. यो. सागर यामध्यें आहे. दोघांत फरक फक्त भावनाद्रव्यांचा आहे. र. यो. सा. मध्यें रुईचे चिकाची भावना सांगितलेली नाहीं. पण करहाट म्हणजे अक्कलकाऱ्याची आहे. करहाट वातकफनाशक म्हणून त्याचाहि अंतर्भाव भावनावर्गांत केला आहे.

भा. भै. र. त. व्योषजात्रिः । असा पाठ आहे येथें व्योषधात्रिः । असा पारंपरिक पाठ स्वीकारून त्रिदोषनाशक अशा आंवळारसाच्या भावना सहा देण्यास सुचविलें आहे.

धात्री, महाधात्री म्हणजे आंवळा आणि मनोधात्रिक म्हणजे मनशीळ. ह्यालाच हृद्धात्री असेंहि एक नांव आहे. आणि त्या नांवानें तो पदार्थ दुसऱ्या एका वातविध्वंसन रसांत आलाहि आहे. पण तो पाठ धनुर्वातावर काम देणारा असें त्याचें गुणवर्णन आहे. मनाचा विशेष संबंध असतां मनशीळ त्या योगांत घेणें अधिक इष्ट ठरतें. र. यो. सा. तील पाठांत महाधात्रिजैः । ऐवजीं मनोधात्रिकैः । असें म्हटलें आहे. पण भावनावर्गांत उद्भिज्ज व प्राणिज वर्गांचाच उल्लेख होत असल्यानें व भा. भै. र. चे पाठांत महाधात्रिजैः । हाच पाठ असल्यानें आंवळा हाच अर्थ येथें श्रेयस्कर मानला आहे.

मात्रा टणक बनणें, कार्य त्वरित होणें, सर्व ऋतूंत ती कार्यक्षम ठरणें, ह्या दृष्टीनेंहि आंवळाच घेणें इष्ट ठरतें.

---

१९ महावातविध्वंसरस

संस्कृत पाठ

रसं गन्धं विषं चैव ताम्रं लोहं समाक्षिकम् ।
एतत्सर्वं समं योज्यं त्रिषं च द्विगुणं भवेत् ।
जैपालं तालकं चैव रसेन सह योजयेत् ।
त्र्यूषणं च समं योज्यं सर्वमेकत्र कारयेत् ।
निर्गुण्डी–सूरण–द्रावैर्भानोश्च पयसस्तथा ।
तर्कारी भृंगराजश्च तथोन्मत्तरसस्य च ॥
भावना खलु दातव्या सप्त सप्त क्रमादितः ।
द्विगुंजं भक्षयेत्प्रातर्मरिचैश्च समन्वितम् ॥
जानुजंघाकटीस्थूणपादगुल्फौष्ठशीर्षकम् ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मन्यास्तम्भं हनुस्तंम्भं त्रिकस्तम्भं च शुष्कककम् ॥
जिह्वास्तम्भं बाहुभवं त्रिकस्तम्भं च पादजम् ।
अधोभागे च ये वाताः सर्वांगे विचरन्ति ये ॥
सर्वान्वातान् जयेदाशु दैन्यं नारायणो यथा ॥
भा. भै. र. ६९९६

नांवः– कार्यबोधक

पाठनिश्चितिः– पाठ ठीक आहे.

द्रव्यसंग्रहः– १ पारा, १ गंधक; २ बचनाग, ताम्रभस्म, लोहभस्म, १ माक्षिक भस्म, १ जेपाळ, हरताल, १ त्रिकटु.

भावनाद्रव्यः– ७ निर्गुंडीपानरस, ७ सूरणकंद-रस, ७ अर्कक्षीर, ७ एरणमूळकाढा, ७ माकापंचांग-रस, ७ धोत्रापानरस.

द्रव्यनिर्णयः– पारा-सामान्य, गंधक-आमलसार, बचनाग-काळा.

द्रव्यशोधनः– पारा--रसोन, गंधक--घृतदुग्ध,
बचनाग-गोमूत्र, ताल--चूर्णोदक.
जेपाळ-सूर्यतापी, लिंबूरस--भावित.

प्रक्रियाः– प्रत्येक वनस्पतींच्या ७।७ भावना द्याव्यात.

कालः– प्रारंभकाल शरत्काल.
दिनकाल--सहा महिने सेवनकाल-सकाळ.

सिद्धिप्रमाणः– १ तोळा पारा तर १८ तोळे तयार औषध.

परिगणनः– बचनाग व भस्में

रोगः– मान, कंबर, आणि घोंटा येथील त्रिक--संधी, हनुवटी, जीभ, दंड, हे अवयव जखडणें-ताठणें, तसेंच डोकें, ओंठ, मान, पाठ, कमर, मांडी, गुडघा, पोटरी, घोंटा, पाऊल इ. अवयवांत शूल होणें ह्यांवर हा चालतो. सर्वांगवातावर चालतो. त्यांतले त्यांत अधोभागगतवात आणि स्तंभवात यांत विशेष काम देतो.

मात्राः– २ गुंजा

अनुपानः– मिरे + तूप

टिप्पणीः– पारागंधकाऐवजीं रससिंदूर घेणें अधिक प्रशस्त.

२० लघुवातविध्वंसनरस

संस्कृत पाठ

प्रक्षिप्य गन्धं रसतुल्यभागं
कलाप्रमाणं च विषं समस्तात् ।
कृशानुतोयेन च भावयित्वा
वल्लं ददीतास्य मरुत्प्रशान्त्यै ॥
अपस्मारे तथोन्मादे सर्वाङ्गव्यथने ऽपि च ।
देयो ऽयं वल्लमात्रस्तु सर्ववातनिवृत्तये ॥
भा. भै. र. ६९९८ (लघु)

नांवः– कार्यबोधक

पाठनिश्चितिः– ठीक आहे.

द्रव्यसंग्रहः– १ पारा, १ गंधक, १६ बचनाग.

भावनाः– चित्रक

द्रव्यनिर्णयः– पारा सामान्य, गंधक-आमलसार, बचनाग-काळा, चित्रक-काळा.

द्रव्यशोधनः– शोध्य- शोधक
पारा– रसोन
गंधक– घृतदुग्ध
बचनाग– गोमूत्र
चित्रक– चुनानिवळी

प्रक्रियाः– चित्रकाचे काढ्यांत खल २१ दिवस

सिध्दिप्रमाणः– १ ते १८ तो. तयार औषध

परिगणनः– बचनाग

रोगः– अपस्मार, उन्माद, सर्वांगशूल

मात्राः– २ गुंजा

अनुपानः– आलेंरस, तूप, मध

रसाचें पचन लौकर व्हावें व परिणाम लौकर व अधिक घडावा म्हणून येथें चित्रकाची योजना दिसते. म्हणून खल २१ दिवस करण्यास सांगितला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२१ वडवानलरस

संस्कृत पाठ

सूतहाटकवज्रार्ककान्तभस्म सामाक्षिकम् ।
तालं नीलांजनं तुत्थमब्धिफेनं समांशकम् ॥
पंचानां लवणानां तु भागैकैकं विमर्दयेत् ।
वज्रीक्षीरैर्दिनैकं तु रुध्वा तं भूधरे पुटेत् ॥
माषैकं चार्द्रकद्रावैर्लेहयेद्वडवानलम् ।
पिप्पलीमूलजं क्वाथं सपिप्पल्यनुपाययेत् ॥
धनुर्वातं दण्डवातं श्रृंखलाकम्पवातनुत् ॥

नांवः- उपमात्मक. वडवानल = समुद्रांतला अग्नि.

पाठनिश्चितिः- वडवानलाचे एकूण ३० पाठ पाहण्यांत आहेत. प्रत्येक योगाचा द्रव्यसंग्रह त्याची प्रक्रिया त्याचे गुणवर्णन पृथक् आहे. पण नांव एक आहे. त्याचें कारण हें नांव त्या त्या पाठसंयोजकाला योग्य वाटलें. ह्या सर्व पाठांतील हीरकयुक्त एक पाठ येथें देत आहे. (हीरक— हिरा)

द्रव्यसंग्रहः— १ रससिंदूर, १ माक्षिकभस्म, १ सुवर्णभस्म, १ हरताल, १ हीरकभस्म, १ सुरमा, १ ताम्रभस्म, १ मोरचूद, १ कांतभस्म १ समुद्रफेस, ५ पंचलवण.

भावनाद्रव्यः— निवडुंग चीक

द्रव्यनिर्णयः— सुरमा-काळा. ताल-वर्खी. मोरचुदाऐवजी (त्यांचेंच) तुत्थभस्म.

द्रव्यशोधनः— सुरमा-त्रिफला, ताल-चूर्णोदक. पंचलवण-पाणी, समुद्रफेस-लिंबूरस.

प्रक्रियाः— (१) सर्व पदार्थांचीं सूक्ष्म चूर्णें एकत्र खलावींत. (२) त्यांचें एक जिन्नसी मिश्रण झाल्यावर त्यांत निवडुंगाचा चीक घालून एक दिवस खल करावा. (३) नंतर तो कल्क परळ संपुटांत घालून त्यास संधिलेप द्यावा. (४) लेप सुकल्यावर तें संपुट भूधर-यंत्रांत ठेवून त्यास अग्नि द्यावा. (५) अग्नि स्वतः शांत झाल्यावर संपुट खोलून वडवानलरस काढून घ्यावा.

सिद्धिप्रमाणः- १ रससिंदूर तर १५ तो. तयार औषध.

परिगणनः- वज्र, सुवर्ण, पारद, ताम्र, इ.

रोगः- धनुर्वात, दण्डवात, श्रृंखलावात, कंपवात.

मात्राः- उडीदाएवढी.

अनुपानः- आल्याचें रसांत चाटवून त्यावर पिंपळीचूर्ण घातलेला पिंपळमूळाचा काढा पिण्यास द्यावा.

टिप्पणीः-

१ धनुर्वात- शरीरावर कोठेंतरी जखम होते. तेथून दोषदुष्टीला प्रारंभ होतो. ह्यांत दांतखिळी प्रथम बसते. व मग शरीर धनुष्याकार वाकडें ताठतें.

२ श्रृंखलावात-

पांडुता शुष्कता देहे निद्रानाशः शिरोव्यथा।
वान्तिर्हिक्का च विस्फोटः श्रृंखलावातलक्षणम् ॥
वसवराजीयम्।

शरीर पांढरें फटफटीत पडणें, कोरडे ठणठणीत म्हणजे शुष्क रूक्ष होणें, झोंप उडणें, डोकें दुखणें, वांति होणें, उचकी लागणें व अंगावर फोड उठणें, ह्या लक्षणांनीं युक्त अशा रोगास श्रृंखलावातरोग म्हणतात.

दंडवातः- ह्या रोगांत सर्व शरीर सरळ दांड्याप्रमाणें ताठतें.

४ कंपवातः- हात, पाय, मान इ. एक वा अनेक शरीरावयव थरथरणें ह्या रोगाला कंपवात म्हणतात.

वैद्यासाठीं उपयुक्त ग्रंथ

ॲलोपॅथिक चिकित्सासंग्रह-सुमारें ७० रोगांवरील चिकित्सासूत्रें व २४० प्रिस्क्रिप्शनें व इंजेक्शनें यांनीं युक्त. मराठींतील अभिनव ग्रंथ, आपल्या ॲलोपॅथिक ज्ञानांत वाढ होण्यासाठीं आजच मागवा. किं. ४॥ रु. ट. ख. निराळा

१ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक
२ डॉ. भोकारी, ठाणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(१२) शंखवटी (लघु) र. यो. सा. २।३३

(१) दग्धशंखस्य चूर्णं स्यात्तथा लवणपंचकम् ।
तिन्तिडीक्षारकं चैव कटुकत्रयमेव च ॥
तथैव हिंगुकं ग्राह्यं विषं पारदगंधकौ ।
अपामार्गस्य वन्हेश्च क्वाथैर्निम्बुकजैर्द्रवैः ॥
भावयेत्सर्वचूर्णं तदम्लवर्गैर्विशेषतः ।
यावत्तदम्लतां याति गुटिकाऽमृतरूपिणी ॥
सद्यो वन्हिकरी चैव भस्मकं नाशयेत्खलु ।
भुक्त्वाऽऽकण्ठं तु तस्यान्ते खादेच्च
गुटिकामिमाम् ॥
तत्क्षणाज्जारयत्याशु पुनर्भोजनमिच्छति ।
हन्ति वातं तथा पित्तं कुष्ठानि विषमज्वरम् ॥
गुल्माख्यं पांडुरोगं च निद्राऽऽलस्यमरोचकम् ।
शूलं च परिणामोत्थं प्रमेहं च प्रवाहिकाम् ॥
वक्त्रस्रावं च शोथं च दुर्नामानि विशेषतः ॥

(१३) शंखवटी (बृहत्) र. यो. सा. २।४१

(१) स्नुह्यर्कचिंचाऽपामार्गरम्भातिलपलाशजान् ।
क्षारांश्च भिषगादद्यात्प्रत्येकं कर्षमात्रया ॥
लवणानि पृथक् पंच ग्राह्याणि पलमात्रया ।
स्वर्जिका च यवक्षारं टंकणत्रितयं पलम् ॥
सर्वमेतत्समादाय सूक्ष्मचूर्णं विधाय च ।
निम्बूफलरसे प्रस्थसम्मिते तत्परिक्षिपेत् ॥
तत्र शंखस्य शकलं पलं वन्हौ प्रताप्य तु ।
वारान्निर्वापयेत्सप्त सर्वं द्रवति तद्यथा ॥
नागरं त्रिपलं ग्राह्यं मरिचं च पलद्वयम् ।
पिप्पली पलमाना स्यात्पलार्द्धं भृष्टहिंगुकम् ॥
ग्रन्थिकं चित्रकं चाऽपि यवानी जीरकं तथा ।
जातीफलं लवंगंच पृथक्कर्षद्वयोन्मितम् ॥
रसो गन्धो विषं चाऽपि टंकणं च मनःशिला ।
एतानि कर्षमात्राणि सर्वं संचूर्ण्य मिश्रयेत् ॥
शरावार्ध्देन चुक्रेण सन्नीय वटिकां चरेत् ।
माषप्रमाणा सा वैद्यैर्बृहच्छंखवटी स्मृता ॥
सर्वाजीर्णप्रशमनी सर्वशूलनिवारिणी ।
विसूच्यलसकादीनां सद्यो भवति नाशिनी ॥

नांवः– शंख द्रव्य प्रधान आहे हें सूचक.

पाठनिश्चितिः– रसयोगसागरांत शंखवटीचे अकरा पाठ आहेत. लघुशंखवटीचा द्रव्यसंग्रह सर्वसामान्य आहे. इतरांत कांहीं द्रव्यें अधिक आहेत तर कांहात द्रव्यप्रमाणांत विभिन्नता आहे. प्रक्रिया व गुणधर्म ह्यांतहि थोडा थोडा फरक आहे. इतकें असूनहि सर्व योगांना नांव एकच. म्हणून त्यांचा विचार साकल्यानें करावयाचा आहे. र. यो सा. त नसलेला असाहि एक पाठ अधिक आहे. पण लघुशंखवटीचा व त्याचा द्रव्यवर्ग एकच असून पारा, गंधक, बचनागाच्या प्रमाणांबाबत निष्क संज्ञा वापरल्यानें तो एक अधिक पाठभेद झाला, एवढेंच.

निष्क शब्द सहसा वैद्यकांत येत नाहीं. सराफी व्यवहार व धार्मिक वाङ्मयांत त्याचा उल्लेख पुष्कळ येतो. काल अगर देशमानानुसार त्याच्या अर्थांतहि फरक पडलेला आढळतो. उदाः–

निष्कः– (१) सोन्याचा १ तोळा. (२) सोन्याचें चार तोळ्याचें एक वजन. (३) चार माषांचें एक वजन. (४) पांच गुंजांचा एक मासा ह्या मानानें चौसष्ट माषांचें रुप्याचें एक वजन. (५) ८० गुंजांचा एक तोळा ह्या मानानें १०८ किंवा १५० तोळ्यांचें एक वजन. (६) एक पल. निष्क शब्दाचे असे विविध अर्थ शब्दरत्नाकरांत दिलेले आहेत. वैद्यकांतहि एक पल हा ह्याचा अर्थ मान्य केला तर यो. र. उक्त व लघुशंखवटीचे द्रव्यसंग्रहांत व त्यांचे मानांत कांहीं फरक उरत नाहीं. सर्व पाठ शुद्ध व उपयुक्त आहेत. पैकीं लघुशंखवटीचा प्रचार बहुत आहे. पण बृहत् शंखवटीचा योगहि बलवान् असल्यानें असे तीक्ष्ण शस्त्र संग्रहीं असणें योग्य ठरतें.

द्रव्यसंग्रह

भाव्य द्रव्यः—

	औषधी	लघु	बृहत्		औषधी	लघु	बृहत्
१	पारा	१	१	४	बचनाग	१	१
२	गंधक	१	१	५	हिंग	१	२
३	शंख	१	४	६	सुंठ	१	१२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द्रव्य	लघु	बृहत्		द्रव्य	बृहत्
७ मिरें	१	८	२०	पळसक्षार	१
८ पिंपळी	१	४	२१	सज्जीक्षार	४
९ सैंधव	१	४	२२	यवक्षार	४
१० चिंचाक्षार	१	१	२३	टंकणक्षार	५
११ संचल	१	४	२४	पिंपळमूळ	२
१२ सामुद्र	१	४	२५	चित्रक	२
१३ काच	१	४	२६	ओवा	२
१४ औद्भिद्र	१	४	२७	चोरओवा	२
१५ आघाडाक्षार	"	१	२८	जिरें	२
१६ रुईक्षार	"	१	२९	जायफळ	२
१७ तिलक्षार	१	१	३०	लवंग	२
१८ केळक्षार	१	१	३१	मनशीळ	१
१९ स्नुहीक्षार	१	१	३२	....	

कज्जली विरहित असा ३९ वा तर चिंचाक्षार रहित असे ३४ व ४२ वा मिळून तीन पाठ विशेष आढळले.

भावनाद्रव्यः– लघु-अम्लवर्ग, बृहत् चुक्रद्रव.

अम्लवर्गः- १ अम्लवेतस, २अमसूल, ३आंवळा ४ ईडनिंबू, ५ करवन्द, ६ कागदीलिंबू, ७ चणकाम्ल, ८ चुका, ९ चिंचफळ, १० चिंचपान, ११ डाळिंब, १२ नारंग, १३ बोर, १४ महाळुंग, १५ लकुच.

द्रव्यनिर्णय

पारा– हिंगुलोत्थ, बचनाग– काळा– कन्दमय. गंधक- अमलसार, सुंठ- कंद- पिष्टमय. टंकण- उद्भिज्ज जिरें- गोडें, चिलक– काळा, पिंपळी– जुनी लेंडी.

शंखभूति–पाठसंख्या ३९, दग्धशंख-पा. सं. ३३,३४ शंखभस्म- पाठसंख्या ३८. भृष्टशंख पा. सं. ३७. शंखनिर्वापण पाठसंख्या ३२, ३५, ४०, ४१. शंखचूर्ण– पाठसंख्या ३६, ४२. शंखाबाबत असे निरनिराळे उल्लेख आहेत. सर्वसामान्य अर्थ भाजलेल्या शंखांचें चूर्ण असा दिसतो. विधींत फक्त फरक. ह्याचप्रमाणें चिंचेबाबतहि भिन्न भिन्न प्रकारचे उल्लेख सांपडतात. उदाः– चिंचाभस्म ३७, चिंचावल्कलभूति-- ३५, चिंचाक्षार- ३२, ३३, ३६, ३८, ३९, ४०, ४१. चिंचेच्या टरफलांची (काळी) राख. औ. गु. ध. शास्त्र.

सामान्यतः वृक्षांच्या सालीचा किंवा क्षुपांच्या पंचांगाचा क्षार करण्याची पद्धत आहे. आणि ही गोष्ट लक्षांत घेतां भस्म, भूति, क्षार हे पदार्थ चिंचवृक्षाच्या सालीपासून तयार झालेले असा समज होतो. पण कांहीं वैद्य चिंचफळाच्या टरफलाची राख आणि तीहि काळी म्हणजे कोळसा वापरतात. क्षार, भूति, कोकिल हीं उत्तरोत्तर सौम्य होत. टरफलें अत्यंत कमी क्षारवान् आणि त्यांतूनहि त्यांचा कोळसा घ्यायचा म्हणजे त्यांत क्षाराचें प्रमाण अत्यल्प येणार. पण जशी ज्याची श्रद्धा. तीच गोष्ट परंपरा व गुणांबाबत. तेव्हां हेंच म्हणणें इष्ट कीं, द्रव्यपरत्वें त्याचे गुण.

चुक्रः– चुका किंवा एक आंबट द्रव. उदा. विनष्टमम्लतां यातं मद्यं वा मधुरद्रवम् । विनष्टः संधितो यस्तु तच्चुक्रमभिधीयते । शा.) येथें द्रव पदार्थ घ्यावा असा अर्थ स्पष्ट आहे.

द्रव्यशोधन

पारा-- कांजिका - धौत,	पिंपळी-- चिलक
गंधक-- लिंबूरस	टंकण - घृतभृष्ट
बचनाग-- गोमूत्र	मनशीळ-- चुन्याची निवळी.
हिंग-- भृष्ट	चित्रक-- चुन्याची निवळी

क्षार व लवणें शंखवटींत आहेत. पैकीं जे वनस्पतीपासून काढलेले आहेत त्यांच्या शुद्धतेबाबत प्रश्न नाहीं. पण सज्जीखार हा खनिज आहे. त्यांत क्षाराबरोबर मातीहि असते. हीच गोष्ट पंचलवणाबाबत. सज्जीक्षार व पंचलवणें ह्यांतील माती औषधीयोगांत आवश्यक आहे, असें वाटत नाहीं. म्हणून त्याकरितां एक शुद्धिप्रकार सुचवीत आहे.

लवण व क्षार शोधनविधि

हे पदार्थ पाण्यांत विरघळणारे असतात. तेव्हां चौपट पाण्यांत ते घालून खूप मंथन करावें व रात्रभर पाणी निवळूं द्यावें, म्हणजे क्षार व लवणें वरील पाण्यांत येतात. तें पाणी हलकेंच बाजूस काढून उन्हांत अगर अग्नीवर सुकवावें व ते क्षार अथवा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लवणें औषधी योगांत घालावींत.

प्रक्रियाः–

शंखः– क्रमांक ३३ दग्धशंखचूर्ण

" " ४१ शंखाचे तुकडे तापवून लिंबूरसांत बुझवून विरविणें.

भावनाः– शंखवटी क्रमांक ३३

सामान्यतः अमसूल, अम्लवेतस, ईडलिंबू, चणकाम्ल, चिंच, चुका, डाळिंब, महाळुंग, लिंबू, संत्रें, ह्या द्रव्यांच्या द्रवांच्या भावना देता येतात. सर्व सामान्यतः हा वर्ग दीपन, पाचन, रोचन, स्तंभन, ..., रक्तपित्तप्रशमन, शोणितास्थापन असा आहे. ... लिंबू–मूत्रजनन, चुका–शोथघ्न, डाळिंब– रक्त-... अमसूल–मलवातानुलोमन, चिंच, लिंबू, संत्रें फळें तृष्णाशमन गणलीं आहेत, हें तारतम्य लक्षांत ठेऊन भावनाद्रव्याची निवड करावी.

शंखवटी क्रमांक ४१ चुक्रद्रव- १६ तोळे.

सिद्धि– भावना जिरलेल्या मानानें.

काल— साधन–वर्षाऋतू वर्ज्य

मर्दन यावत्तदम्लतां याति। ३३

सेवनविशेष–आकंठ भोजनानंतर ३३

भक्षयेत्प्रातः। ३९

सामान्य – भोजनोत्तर

परिगणनः– लक्षण, क्षार, विष इ.

रोगः– सामान्य– अग्निमांद्य, अजीर्ण, आम, आनाह, आध्मान.

विशेष– अलस, अतिसार, संग्रहणी, शोथ, गुल्म, उदावर्त, उदर, विषूचिका.

क्रमांक ३३– अर्श, अरुचि, आलस्य, कुष्ठ, ...म, निद्रा, पांडु, परिणामशूल, पित्त, प्रमेह ...हिका, वक्त्रस्राव, वात, विषमज्वर, शोथ.

क्रमांक ४१– अजीर्ण, शूल, विषूचिका, ...स इ.

मात्रा–चदरास्थिमाना। ३२, ३३, ३५, ३८, ..., ४२

माषमात्रम्। ४१

गुंजामात्रा। ३६, ३७

शंखवटींचीं अनुपानें

क्रमांक ३३, ४१ उष्णोदक

क्रमांक- ३८ तक्र-ग्राही (वृद्ध वैद्य) लिंबू-मूत्रजनन

मस्तु-वातानुलोमन	चिंच-पेटके निवारकः
सुरा-दीपन	अमसूल-मलवातानुलोमन
सीधु-दीपन	संत्रें-तृष्णानिग्रहण
कांजिक-दीपक	चणकाम्ल-पेटके निवारण
मांसरस-बृंहण	अम्लवेतस-मांसपाचन
उष्णोदक-अनुलोमन	डाळिंब-रोचन
	बाहवा-मलवातानुलोमन

विषूचिकेंत शंखवटी द्यावयाची असेल तेव्हां लिंबू, चिंच, आणि चणकाम्ल ह्यांचा उपयोग विशेषत्वानें करावा.

पथ्यः– क्रमांक ३९– गुल्माविकार-तैलाम्ल वर्ज्य. (ग्राही औषधान्न वर्ज्य वृ. वै.)

महत्वाची सूचना

शंखवटींत क्षार व तीक्ष्ण अम्ल आहेत. क्षारांमुळें हिरड्या सोलतात व अम्लस्पर्शानें दांत शिवशिवतात, ते हलकेंहि होतात सबब शंखवटी केव्हांहि तोंडांत धरूं नये. ती लागोलग द्रवाबरोबर गिळावी.

वाकेरी भाते

अत्यंत खात्रीचें व ताजे मिळते. १ पौंड २ रु. ट. ख. निराळा.

श्रीपाद फार्मसी, पो पेण (कुलाबा)

सेवा संघाचीं सर्व औषधें तसेंच खालीची सर्व देशी काष्ठौषधी व ताजी वनस्पती आणि शिलाजीत, कस्तुरी, केशर, भीमसेनी कापूर, गोरोचन, वाकेरी भाते, वंशलोचन, नागकेशर, अनंतमूळ, जितसाया, उत्तम महाबळेश्वरी मध वगैरे औषधें मिळण्याचें ठिकाणः—

देशी सर्वौषधी संग्रहालय

पोलिस चौकीसमोर, दादर मुंबई २८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२४ सिंदूरभूषण (र. यो. सा. ३९४)

संस्कृत पाठ

वैक्रान्तं जातरूपं च वज्रविद्रुममौक्तिकम् ।
भुजंगमभ्रकं कान्तं रसशिन्दूरकं क्रमात् ॥
पंच चैकैकभागाः स्युश्चतुर्भागास्तथा ऽ परे ।
जातीपुष्परसैःरक्तागस्त्यपुष्पेक्षुवालकैः ॥
वरीलामज्जवाराहीहिमशाल्मलीवारिभिः ।
प्रत्येकैश्च दिनं मर्द्यं माषमात्रं तु सेवयेत् ॥
इष्टमुष्णादिकं योज्यं कुष्ठाऽष्टादश कामलाः ।
विंशतिं श्लेष्मिकान्रोगांश्चत्वारिंशच्च पैत्तिकान् ॥
अशीतिं वातजान्रोगान् हन्ति शूलशतत्रयम् ।
प्रमेहार्शो महाव्याधीन्सन्निपातांस्त्रयोदश ॥
अतिसारभवान्रोगांश्छ्लेष्मपाण्डुज्वरान् जयेत् ।
द्वंद्वोत्थं च त्रिदोषोत्थं राजरोगभयंकरम् ॥
वन्ध्यापि लभते पुत्रं षण्ढोऽपि पुरुषायते ।
प्रदरं सर्वग्रन्थींश्च नाशयेद्गलरोगकम् ॥
बालवृद्धादिभिः सेव्यः गर्भिणीभिर्विशेषतः ।
तत्तद्रोगानुपानं च हितं पथ्यं च दीयते ॥
सिन्दूरभूषणो नाम रेवणासिद्धभाषितः ॥

नांवः—

पाठनिश्चितिः- चार पाठ आहेत. पैकीं हाच अनुभवानें उत्तम ठरलेला आहे.

द्रव्यसंग्रहः- वैक्रांत, सुवर्ण, हिरा, प्रवाळ, मोती एक एक भाग, अभ्रक, नाग, कांत, रससिंदूर ४।४ भाग.

द्रव्यानिर्णयः- सर्वांचीं भस्में घेणें.

द्रव्यशोधनः—

प्रक्रियाः- १) सर्व भस्मांचा खल करावा. २) एकजिनसी मिश्रण झाल्यावर त्याचा जाईचें फूल, तांबडा अगस्तिफूल, ऊंस, वाळा, शतावरी, तगरगठोना, डुकरकंद, चंदन, कांटेसांवर, ह्यांच्या रसांत ७।७ दिवस क्रमाक्रमानें खल करावा. व उडिदाएवढी गोळी बांधून तो सांवलींत सुकवावा.

सिद्धिप्रमाणः- १ वैक्रांत = २५ भाग.

परिगणनः- भस्मांचें

रोगः- १८ कुष्ठ, कावीळ, २० कफरोग, ३०० शूल, प्रमेह, ४० पित्तरोग, ८० वातरोग, व्याध, सान्निपात, अतिसार, पांडुरोग, क्षय, वंध्यत्व, नपूंसकत्व, सर्व प्रकारचे ग्रंथी, गलरोग, प्रदर. हा रस बाल, स्थाविर, वृद्ध व गर्भिणीना विशेष उपयुक्त आहे.

मात्राः-- १।१ गोळी

अनुपानः-- गरमपाणी अथवा इष्ट तें.

महालुंगी, शेलाट

Reveacuneata [wright]

हें झाड समुद्रसपाटीपासून २ हजार फुटावर वाढते. पुणें, पर्वती, विठ्ठलवाडी, खडकवासला, सिंहगड, व महाबळेश्वर येथें विपुल प्रमाणांत सांपडते.

हें झाड कंबरेइतकें झुडुपाप्रमाणें वाढतें व पुढें वेलीसारखें वाढून पसरते. झाडाला काटे नसतात, पानें समोरासमोर नसतात. शेळ्या वगैरे जनावरें हिचा पाला खातात. लहान मुलें या झाडाला येणारी गोडसर फळें खातात. ह्या झाड चीं पानें मधुमेहावर उपयुक्त आहेत. यासंबंधीं अधिक माहिती हवी आहे.

— एक मधुमेही

आंतरराष्ट्रीय महारोगी परिषद

या परिषदेचें ६ वें अधिवेशन माद्रिद (स्पेन) येथें तेथील राष्ट्रपतींच्या अध्यक्षतेखालीं ता. ३ते१० आक्टोबर भरलें होतें, महारोगाचें निदान, चिकित्सा व निर्मूलन या विषयावर विचारविनिमय झाला. सोबत महारोगासंबंधीं भव्य प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें.

म. प्रां. वैद्य मंडळ, कार्यालय नासिक

मुंबई येथें सभासद होण्याचीं स्थानें

१ वै. पं. ग. म. अभ्यंकर
२५९ गिरगांवरोड मुंबई ४

२) वै आ. बा. देव्हारे, पोलिसचौकी मारुतीजवळ
दादर २८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजमान्य शुद्धायुर्वेदीय पाठ्यक्रम

(लेखकः—आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे, पुणें २)

नुकतीच राजशासनानुरोधानें शुद्ध आयुर्वेदाच्या वाराला मान्यता देण्यांत आली असून त्या अनुधानें १७-९-५३ च्या क्रमांक ए. डी. आर्. १९५३ आज्ञापत्रकहि बाहेर पडलें आहे. त्यांत थोडक्यांत ाठ्यक्रम, त्याच्या अध्यापनाची पद्धति, समयमर्यादा विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या अटीहि प्रसिद्ध झाल्या ाहेत. सात भिषग्वरांची याच शासनानुरोधानें ियुक्ती झाली असून त्यांनीं या पाठ्यक्रमाचा तपशील रवावयाचा आहे. समितींतील वैद्यराज अनुभवी द्वान् असल्यानें ते तो ठरवितांना योग्य ती काळजी तलीच. पण क्वचित् एखाद्या तपशीलाकडे दुर्लक्ष्य ऊं नये म्हणून कोणी सूचना केल्यास ते त्या चारांत घेतील, असा विश्वास बाळगून मीं कांहीं वना करीत आहे.

तर्कसंग्रह-सांख्यकारिकेची उणीव

प्रथमच नजरेंत भरणारी गोष्ट म्हणजे विषयाच्या दींत कोठेंच तर्कसंग्रह-सांख्यकारिका या विषयाचा देश नाहीं.* माझें मतें या पाठ्यक्रमांतील ही ठी उणीव आहे. आयुर्वेदाभ्यासीयाला न्यायसांाची पदोपदीं आवश्यकता आहे. द्रवगुणविज्ञानाचे ीं येणारे शीत, उष्ण, द्रव, गुरु, लघु, स्निग्ध, इत्यादि गुण, न्यायाच्या परिभाषेंत समजून घेतास त्यावरचा आयुर्वेदीय वापर नीट समजण्यास त होते. गुरु म्हणजे पचनास गुरु व तें मात्रादिानें कसें शरीरावर परिणाम करतें, हें आयुर्वेदांत शीलवार सांगितलें असलें व त्याचीच खरी आवकता असली तरी उंचावरून पडलेलें द्रव्य मनीवर अनेक पात घेत घेत येतें तें गुरु व हें गुरुत्व ी व आप् या महाभूतांवर राहतें. [आद्यपतनासमवायि कारणं गुरुत्वम् । पृथिवि-जलवृत्ति । (त. सं.). द्वितीयादि पतनस्य वेगासमवायिकारणत्वादाद्यपतनत्वम् । (त. दी.)] हें न्यायांतील वर्णन आधीं माहिती असल्यास "अधोगामि च भूयिष्ठं भूमितोयगुणाधिकम्" हें अधोगामि अर्थात् गुरु द्रव्याचें आयुर्वेदीय वर्णन समजण्यास अधिक मदत होते. गुरु द्रव्य पचनेंद्रियांत दाबीत दडपीत येतें, हें पतनाच्या अनेक आवृत्त्यांच्या न्यायोदिष्ट वर्णनानें स्पष्ट समजतें. आयुर्वेदांतील गुण, कारण, कार्य यांच्या व्याख्या निराळ्या, शक्तीची कल्पना स्वतंत्र, गुर्वादि विशिष्ट महत्वाचे गुण कीं ज्यांना 'वीर्य' ही संज्ञा दिली, तें वीर्य हीच आयुर्वेदीयांची शक्ति, इत्यादि विशेष बरेच असले तरी या सर्वांच्या मूळ न्यायोक्त व्याख्या आधीं समजून घ्यावयास हव्यात. एरव्हीं त्यांचे आयुर्वेदीय विशेष नीट ध्यानीं येणार नाहींत. आयु-पंडितांशीं — दार्शनिकांशीं तर बोलतांच येणार नाहीं. एवंच न्यायाचें संक्षिप्त ज्ञान (तर्कसंग्रह दीपिका--मुक्तावली -पुरतें तरी) आयुर्वेदीय विद्यार्थ्याला असावयास हवें व हा विषय या पाठ्यक्रमांत अन्तर्भूत व्हावयास हवा असें मला वाटतें.

लेखक

सांख्यविज्ञानहि आवश्यक

हीच स्थिति सांख्यशास्त्राची. सांख्यकारिका हा सांख्यशास्त्रावरचा छोटा ग्रंथ तरी आयुर्वेदीय विद्यार्थ्यांनें अभ्यासावयास हवाच. बहुतेक सांख्यविज्ञान चरकसुश्रुतानें प्रमाण धरलें आहे. फक्त सांख्याचा पुरुष (जो 'न प्रकृतिर्न विकृतिः' असा आहे) आयुर्वेदानें निराळा मानला आहे. त्यानें पंचमहाभूतें —

*[पहिल्या १॥ वर्षांतील 'संस्कृत' या षयांतच 'तर्कसंग्रह' व 'सांख्य कारिका' यांचा र्भाव आहे. —संपादक]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व शरीरी अश पुरुष मानला असून त्यालाच कर्म-पुरुष (च. सू. १।१६-१७) मानला आहे. पण सांख्यांची मूळ भूमिका समजून घेऊन हे विशेष समजून घेण्यानें अधिक व चांगला बोध होतो. चरक ग्रंथाचे मूळ प्रणेते आत्रेय महर्षी सांख्यतत्वज्ञानाचे मोठे शौकिन होते. त्यांचा आयुर्वेदाबाहेरचा फावला वेळ सांख्यांच्या सहवासांतच जात असे, इतका त्यांना या शास्त्राचा नाद होता [सांख्यैः संख्यातसंख्येयैः सहासीनं पुनर्वसुम्। जगद्धितार्थं पप्रच्छ वान्हिवेशः स्वसंशयम्। (च. सू. १३।३) सांख्यैः सहावस्था-दर्शनमात्रेयस्य कर्तव्यप्रश्नानुगुणमनःसमाधानोपदर्श-नार्थम्। (चक्रः)] तर्कसंग्रह सांख्यकारिकेला फक्त पन्नास तास हवेत व ते याच साडेतीन वर्षांचे मुदतींत काढतां येतील. (त्याचा विचार पुढें करूं.)

अष्टांगसंग्रह अधिक अभ्यसनीय *

दुसरी गोष्ट, अष्टांगहृदय हा ग्रंथ समग्र ठेवला आहे. त्याबाबत एखादी संहिता समग्र ठेवावयाची की, जिनें चरकसुश्रुताचें समग्र संकलित सार समजेल, अशी ती असावयास हवी. त्यासाठीं अष्टांगहृदया-पेक्षां अष्टांगसंग्रहच विद्यार्थ्यांनें अभ्यासावयास हवा. चरक आणि सुश्रुतांतील अवास्तव विस्तार वगळून पण कोणताहि विषयांश न सोडतां संकलन केलेला हा अष्टांगसंग्रह ग्रन्थ अष्टांगहृदयापेक्षां खरोखरच जास्त अभ्यसनीय आहे. अष्टांगहृदयांत अतिसंक्षेप आहे. हृदयकर्त्याची प्रतिज्ञाच मुळीं "तेभ्योऽतिविप्रकीर्णेभ्यः प्रायः सारतरोच्चयः। क्रियतेऽष्टांगहृदयं नातिसंक्षेप-विस्तरम्॥" अशी असून त्यानें चरक-सुश्रुतांतील विषयांच्या 'सारांतीलहि सार' आणि त्याचा 'सार-तरोच्चय' त्यांत घेतला आहे. अर्थात् पुष्कळशा विषयाला कलाटणी दिली आहे, हें उघड आहे. उलट संग्रहांत "अस्थानविस्ताराक्षेपपुनरुक्तादिवर्जितः" असें म्हणून त्याच्या कर्त्यानें चरकसुश्रुतांतील सर्व विषयांश दिलेला आहे. एवढेंच नव्हें तर, त्यांतील पुष्कळसे विषय त्यानें उकलून दाखविले आहेत. [विनीगूढार्थ-तत्वानां प्रदेशानां प्रकाशकः" (अ. सं. सू. १।१५-१६)] अतिसंक्षेपामुळें हृदयांतील शारीर अपुरें आहे. अर्थात् अशा अपुऱ्या अष्टांगहृदयापेक्षां समृद्ध असा अष्टांगसंग्रहच विद्यार्थ्यांना शिकविणें जास्त योग्य, अशी माझी सूचना आहे.

अधिक समयाचा विचार

अष्टांगसंग्रह हा ग्रन्थ हृदयापेक्षां थोडा मोठा असल्यानें साडेतीन वर्षांचे अवधींत तो पुरा होणार नाहीं, ही यावर शंका येणारी आहे. प्रस्तुत पाठ्यक्रमांत एकूण ३०० तास हृदयाप्रीत्यर्थ ठेवले आहेत. एवढ्यांत जर हृदय पूर्ण होऊं शकणार असेल तर आणखी शंभर तास मिळाल्यास संग्रहहि पुरा होऊं शकेल.

१०० तास तरी अधिक हवेत खरे

संग्रहाप्रीत्यर्थ आणखी शंभर तास कोठून काढावयाचे? शिवाय तर्कसंग्रह--सांख्यकारिकेप्रीत्यर्थ (वर

* [संग्रहाच्या अध्ययनाची पद्धति आज रूढ नाहीं. प्रारंभींच्या अध्ययनाला हृदय पुरेसें आहे व अभ्यासास सोईचें आहे. अध्यापक, संग्रहांतील व चरक-सुश्रुतांतील भाग स्पष्टीकरणार्थ सांगूं शकतील. संपादक]

सांडु
टोमॅटो कम्पाउन्ड
• व्हिटॅमिनयुक्त टॉनिक
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द कृ. सांडु ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. फी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…ल्याप्रमाणें) ५० तास असे एकूण १५० तास …धिक कोठून आणावयाचे हा प्रश्न विचारणीय आहे …रा.

प्रस्तुत पाठ्यक्रमाची तासवारी

यासाठीं आधीं दिलेल्या एकूण व्याख्यानांचाच …सवारीनें विचार करणें अवश्य आहे. त्यांतच या …श्नाचें उत्तर मिळेल. प्रस्तुत पाठ्यक्रमांतः—

…रीर	१५०	रसशास्त्र	१५०
…धातुमलविज्ञान	१५०	स्वस्थवृत्त— जनपदोध्वंसनीय	१००
…गुणविज्ञान	१५०	संस्कृत	१००
…दान, सर्वरोग संप्राप्तिविज्ञान	१००	प्रसूतितन्त्र	१००
…विज्ञान व कायाचिकित्सा	५००	विषतन्त्र व औषधिनिर्माण	१००
…यशालाक्य	१००		

अशी अष्टांगहृदयाशिवाय तासांची वर्गवारी …हे.

निदानाचा विषय दोनदां

यांतील निदानचिकित्सेंत आलेला निदानाचा …य दोनदां आला असून त्याप्रीत्यर्थ १००+५०० …१ ६०० तास आले आहेत. यांतील १०० तास …र्नी कमी करतां येतील. २५०।२५० तास प्रत्येकीं …विज्ञान व कायाचिकित्सा या विषयांना पुरेसे …हेत. तसेंच शल्यशालाक्यतन्त्रांतून २५ व प्रसूति- …तंत्रांतून ५० असे ७५ तास कमी करतां येतील. हीं …हीं तात्त्विकच शिकवावयाचीं असल्यामुळें त्यांना …क्रमें ७५ व ५० तास पुरेसे आहेत. प्रसूति- …तन्त्रान्तर्गत (काश्यपसंहिता जमेस धरूनहि) कौमार- …च्या बव्हंशीं मोठ्यांच्या रोगविज्ञान व चिकित्सेचें …ज्ञानाव्यतिरिक्त थोडेंच बाकी राहतें, आणि खास …तितन्त्र अगदींच संक्षिप्तांत आहे. या दोन्हीं विष- …ना १००।१०० तास भरून कसे काढावयाचे असाच …ध्यापकापुढें प्रश्न पडेल. उगाच इतर विषय सांगून …भरून काढावयाचा, त्यापेक्षां त्यांचे तासच कमी केलेले …काय वाईट ?

शल्य-शालाक्याला प्रात्यक्षिक कां नको ?

वस्तुतः शल्यतन्त्र व शालाक्य यांना प्रात्यक्षिक हवें आहे. त्याची योजना त्या विषयांपुढें नाहीं, ती अवश्य करावी, अशीच मला सूचना करावयाची आहे. आयुर्वेदीय पद्धतीप्रमाणें दुय्यम शस्त्रक्रिया व शालाक्य आज प्रात्यक्षिकाचें स्वरूपांत मिळण्याची अगदीं सोय नाहीं असें नाहीं. मग या विषयांना प्रात्यक्षिक ठेवावयास काय हरकत आहे? सर्वच संस्कार या पाठ्यक्रमांत निव्वळ आयुर्वेदाचे लागणार असल्यानें यांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांला मिळणारें थोडेंहि शल्यशालाक्याचें प्रात्यक्षिक ज्ञान, त्याला चिकित्सेसाठीं तर उपयोगीं पडेलच; पण त्याचे, जोरावर हेच विषय त्याला हळूहळूं वाढवितांहि येतील व यांच्या संक्षेपाची उणीव कमी होत जाईल.

संस्कृताच्या अध्यापनांत वेळ !

संस्कृताबाबतहि मला सुचवावयाचें आहे. ५० टक्के प्रवेशपरीक्षेंत गुण मिळविलेला वा तत्सदृश विद्यार्थी घेऊन त्याला पुन्हां संस्कृत शिकविण्यांत वेळ घालविण्यापेक्षां जरा अधिक संस्कृत शिकलेल्या विद्यार्थ्यांलाच प्रवेश देणें बरें नव्हे कां? वेदशास्त्रोत्तेजक सभेची व्युत्पत्ति वा टिळक म. वि. ची तिसरी-चवथी परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांना प्रवेश दिल्यास पुन्हां संस्कृत शिकविण्याचा खटाटोप व वेळ अवश्य वांचेल, व त्याचे १०० तास हवे तर निदानचिकित्सेला अगर संग्रहासारख्या विषयाला देतां येतील.

एका वेळेला पांचच विद्यार्थी

गुरुपरंपरेनें अथवा वर्गातून असा जो या पाठ्य-क्रमाचें अध्यापनांत विकल्प ठेवला आहे त्याबाबत एकेका अध्यापकाला जास्तींत जास्त पांच विद्यार्थी घ्यावयाचे म्हणजे कसे याचा खुलासा व्हावयास हवा. गुरूजवळ पांचच विद्यार्थी एका वेळेस राहावयाचे असतील तर ३॥ वर्षें पुरी झाल्याशिवाय एका गुरूला दुसऱ्या विद्यार्थ्यांना घेतां येणार नाहीं. वर्ग अगर शाळेंत शिकविण्यासाठीं एका वेळीं पांचांचीच अट आहे काय हेंहि समजत नाहीं. पण नसला तरी शाळा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरकारमान्य व्हावयाच्या तर त्यांच्या चालू नियमाप्रमाणें तीन विद्यार्थ्यांमागें चार खाटा असलेलें रुग्णालय अवश्य लागेल आणि तेंहि उपलब्ध झालें तरी या नियमाप्रमाणें थोड्याच विद्यार्थ्यांची शाळा चालणार. या व अशा प्रश्नांचा खुलासा समितीनें करून घ्यावयास हवा.

इतरत्र झालेला पाठ्यक्रमाचा विचार

पाठ्यक्रमाचा तपशील ठरवितांना विषय क्रमवार पण समृद्ध शिकविला जाईल असा तो ठरवावयास हवा. केवळ नि. भा. आयुर्वेदविद्यापीठाचा वा मुंबईबोर्डाचा क्रम धरून भागणार नाहीं. याबाबत (१९४६।४७सालीं) अकोला, एलिचपूर व औरंगाबाद येथें जमलेल्या वैद्यांनीं जो पाठ्यक्रमाचा मागें विचार केला होता तो अवश्य मार्गदर्शक होईल असें वाटतें.

वैध मान्यता अवश्य हवी

अजून प्रस्तुत आज्ञापत्राला वैध मान्यता मिळावयास हवी. या पाठ्यक्रमांतून बाहेर पडणाऱ्यांना केवळ धंद्याची सवलत मिळणार कीं त्यांना नोंदणी-चाहि अधिकार लाभणार हें निश्चित नाहीं. * सरकारनें याबाबत स्पष्ट उपसूचना आणून १९३८ च्या वैद्यनियंत्रण कायद्याच्या ३२ व्या कलमांत (कीं ज्यांत नोंदणीयोग्य लायकी निर्दिष्ट केली आहे) या नव्या पाठ्यक्रमाचा अन्तर्भाव करावयास हवा. तो लवकरच होईल असें खाजगी चौकशीवरून समजतें. पण तो झाल्याविना प्रविविक्षु विद्यार्थ्यांना आश्वासन मिळणार नसल्यानें अशी सुधारणा त्वरित घडवून आणण्याचें काम या समितीनें पार पाडावयास हवें असें वाटतें.

अध्यापकांची योग्यता

अजून या पाठ्यक्रमाचें अध्यापन करणाऱ्यांची म्हणजे अध्यापकांची योग्यता निश्चित व्हावयाची आहे. अध्यापनाचें काम व्यवस्थित पाडणारा वैद्य केवळ एखादी परीक्षा पास झालेला असून भागणार नाहीं. अथवा त्याचा धंदा बरा चाललेला आहे एवढ्यावरहि त्याची अध्यापनाची लायकी ठरविली जाऊं नये. या दोन्ही गोष्टी तर असाव्यातच, पण शिकविणारा हा आयुर्वेदाचा व्यासंगी असून त्याचा सर्वच दृष्टिकोन आयुर्वेदीय असावयास हवा. ज्यानें दहा वर्षे निव्वळ आयुर्वेदीय व्यवसाय करून कांहीं विद्यार्थी पढवले व त्यांतील परीक्षेंत निदान पांच तरी उत्तीर्ण झाले असा सामान्यतः अध्यापकाचा अधिकार गणला जावा, पण त्याचबरोबर त्यानें सार्वजनिक स्वरूपांत लेख, भाषण, ग्रन्थ या स्वरूपांत आपला आयुर्वेदीय दृष्टिकोन मांडलेला असावा.

अस्थिर मताचे अध्यापक

निव्वळ आयुर्वेदीय म्हणविणारे, विशारद—आचार्यासारखी पदवी मिळविलेलेहि कित्येक वैद्य, परीक्षकांची अपेक्षा पुरविण्यापुरता आयुर्वेद वाचलेले पण व्यवसायांत, व्यवहारांत अस्थिर मताचे सांपडतात. अध्यापकाला प्रात्यक्षिक द्यावें लागेल, घरीं औषधें करण्याचा ज्याचा प्रघात असेल असाच वैद्य औषधांचें प्रात्यक्षिक विद्यार्थ्याला देऊं शकेल. एतावता अध्यापकाची योग्यता फार काळजीपूर्वक ठरविली जाणें अगत्याचें आहे. नाहींपेक्षां पहिल्याच प्रयोगांतीं कसला तरी आयुर्वेदाच्या नांवावर छाप मारून बाहेर पडलेला वैद्य हास्यास्पद होण्याचा धोका आहे अशी सूचना द्यावीशी वाटते.

* [आज केवळ व्यवसाय करण्याची सवलत मिळणार हें आज्ञापत्रांत स्पष्ट आहे. —संपादक]

* [हें काम त्वरित होण्यासारखें नाहीं. असें वाटतें कार्य सुरू होऊन कांहीं काल गेल्यानंतर विद्यार्थ्यांची पहिली तुकडी बाहेर पडण्याच्या सुमारास हें होऊ शकेल. —संपादक

अमळनेर
येथें आयुर्वेद सेवा संघाचीं नवीन सर्व प्रकारचीं औषधें मिळण्याचें ठिकाण—
श्रीकृष्ण वैद्य अँड ब्रदर्स
कुंमार टेक, अमळनेर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चुन्याची निवळी [एक घरगुती उपाय]

(लेखकः--कविराज सुरथकुमार सरकार)

भारतांत अनेक कुटुंबांत नागवेलींचें पान (विडा) खाण्याची पद्धति रूढ आहे, व अशा कुटुंबांतील लहान मुलासहि चुन्याची निवळी म्हणजे काय हें माहित असतें. परंतु हें पाणी चुना सुकून न जाऊं नये म्हणून चुन्याच्या मडक्यांत अगर पात्रांत घालून ठेविलेलें असतें, ह्यापेक्षां अधिक माहिती त्यांना त्याविषयीं नसते. चुना सुकल्यास त्याची विरी (वीर्य) जाऊन त्यांचें खडूंत रूपांतर होतें आणि म्हणून चुनापात्रांत असें वरचेवर पाणी घालून ठेविलेलें असतें.

चुन्याच्या ह्या निवळीची (चुन्यावरील स्वच्छ पाण्याची) औषधी उपयुक्तता काय व किती आहे याची माहिती फारच थोड्या लोकांना असते. भारतांतील वृद्ध स्त्रिया लहान मुलांना चमचाभर चुन्याची निवळी अनशापोटीं कृमिनाशक म्हणून देतात, व कांहीं प्रौढ लोकहि पाचक म्हणून तिचा लहानसा डोस घेतात.

दंतोद्भव विकार टळतात

याशिवाय आणखीहि पुष्कळशा रोगांवर चुन्याची निवळी उपयोगी पडते. चुन्याची निवळी कृमिनाशक तर आहेच. त्याशिवाय ती सौम्य मलावरोधक व लहान मुलांच्या पोटाच्या अनेक विकारावर उपयोगी आहे. दांत उगवण्याच्या वेळीं लहान मुलांना हगवणीचा विशेष उपद्रव होतो, त्यावेळीं चमचाभर चुन्याच्या निवळींत ·।।· ते १ गुंज कापूर घालून ती निवळी कपभर दुधांतून मुलांस पिण्यास दिली असतां हगवणीचा त्रास कमी होऊन मलाचा बांधहि नित्याप्रमाणें होतो. दांत उगवत असतांना प्रत्यहीं चुन्याची निवळी दुधांतून देत राहिल्यास दांत विनाकष्ट बाहेर पडतात.

मुडदूस (रिकेट्स्)

चमचाभर चुन्याची निवळी व ·।।· ते १ गुंज सुंठीची पूड एकत्र करून लहान मुलास दररोज सकाळीं इष्ट काल दिल्यास त्याचें कृमिविकारापासून संरक्षण होऊन त्यांचीं हाडें मजबूत होतात. त्याच--प्रमाणें हें औषध मुलांच्या मुडदुसावरहि (रिकेट्स्) उपयुक्त आहे. मुडदुसावर (रिकेट्स्) याचें मात्राप्रमाण वयाच्या २ वर्षापर्यंत १ चमचा, ३ ते ४ वर्षापर्यंत २ चमचे, ५ ते ७ वर्षापर्यंत ३ चमचे व ८ ते १० वर्षापर्यंत ४ चमचे. याप्रमाणें दिवसांतून २ ते ४ वेळां दिलें पाहिजे.

उत्तम पाचक

चुन्याच्या निवळींत किंचित् अस्मानतारा (मेंथाल) कण टाकून सेवन केल्यास त्याचा उत्तम पाचन म्हणून उपयोग होतो.

अम्लपित्तावर सौम्य सारक

चुन्याची निवळी अल्कली (क्षारीय) असल्यानें ती अम्लाचा उपद्रव थांबविते. मोठ्या माणसास याची २।। तोळ्याची मात्रा दर अर्ध्या तासानें अम्लाचा उपद्रव नाहींसा होईपर्यंत द्यावी. थोडासा कापूर मिश्र करून चुन्याची निवळी पोटांत घेतल्यास त्याचा सौम्य सारक म्हणून उपयोग होतो.

कोष्ठगत वायु, पोटदुखी

सर्दी-गारठ्यापासून पोटांत कळा होणें, आंतड्यांत वायु अडकून (कोष्ठगत वायु) पोट दुखणें, यांवर चुन्याची निवळी, ·।।· गुंज कापूर व ·।।· गुंज अस्मानतारा (मेंथॉल कण) मिश्र करून पोटांत घ्यावी म्हणजे तत्काळ आराम वाटतो.

भाजल्यावर मिश्रण

चुन्याची निवळी व खोबरेल तेल समभाग घेऊन तें एका बाटलींत घालून, बाटली बुचानें बंद करावी व नंतर थोडावेळ चांगली हलवावी म्हणजे त्यांचें फेंसयुक्त मिश्रण तयार होईल. हें मिश्रण भाजल्यावर फार उपयुक्त आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जखमेवर ओला चुना

नुसता ओला चुना कापलेल्या अगर जखम झालेल्या भागावर लाविला असतां रक्त येण्याचें ताबडतोब थांबतें. टिंचर आयोडिन व बेंझॉईन यापासून मिळणारा गुण, ओला चुना लाविला असतां मिळतो.

पुत्रप्राप्तीसाठीं प्रयोग

कांहीं जर्मन डॉक्टरांचें असें मत आहे कीं, चुन्याची निवळी नियमित सेवन करीत गेल्यास शरीरांतील रसधातु अल्कली स्वभावाचा राहतो. व ह्या गुणामुळें जर एखाद्या स्त्रीनें गर्भधारणेपूर्वीपासून तो गर्भधारणेनंतर सात महिनेपर्यंत चुन्याच्या निवळीचें सेवन केलें तर तीस पुत्रप्राप्तीच (मुलगी न होतां मुलगाच) होईल.

— ' आयुर्वेद ' कलकत्ता

विंचूदंशावर कानांत मीठपाणी

शरीराचे दोन भाग आहेत, एक डावा व दुसरा उजवा. यापैकीं ज्या भागांत विंचूदंश झाला असेल त्याच्या उलट भागांत हा प्रयोग करावयाचा आहे.

खाण्याचें मीठ (समुद्रमीठ) पाण्यांत उत्तम रीतीनें विरघळवावें; इतकें कीं आतां अधिक मीठ विरघळणें शक्य नाहीं. अशा पूर्णलवण मीठपाण्याचे (Saturated Solution) पांचसहा थेंब कानांत टाकावेत. दोन मिनिटांनीं पुनः ५।६ थेंब टाकावेत. कांहीं लोक हे डोळ्यांत सोडतात.

डाव्या बाजूस विंचूदंश झाला असेल तर उजव्या कानांत अगर उजव्या डोळ्यांत ह्या पूर्णलवण मीठपाण्याचे थेंब सोडवावयाचे असतात.

दंशाच्या वेदना तत्काल थांबतात. व रोगी घरीं जातो. आम्ही याचा अनुभव कित्येक वर्षें घेत हांसत आहोत. उपाय खात्रीचा आहे.

ज्यांची भावना मंत्रानें विंचू उतरतो अशी असेल त्यांनीं हा प्रयोग करीत असतांना एखादा श्लोक (मंत्र) हळू अगर मोठ्यानें म्हणावा.

मुंबई — वै. चं. गो. ठक्कर

त्रयोदशगुणी तांबूल

नागवेलीच्या पानांचा विडा खाणें हा भारतीयांचा फार पूर्वीपासूनचा शौक आहे. देवपूजेंतसुद्धां ' तांबूलं समर्पयामि ' हें वचन आहे. मराठी शाहिरांच्या लावण्यांत व पोवाड्यांत ' रंगलेल्या विड्या ' चें वर्णन पुष्कळदां ऐकावयास मिळतें. उत्तम पिवळी धमक पानें, चांगला कळीचा चुना, खास जर्दा इत्यादि साहित्यानें सदैव सिद्ध असलेले पानांचे डबे अगर चंच्या आजकाल मागच्या पिढी इतक्या कोणाजवळ आढळत नाहींत. विशेषतः नागपूर वऱ्हाडकडील मंडळींनीं अजून त्यांतली रसिकता बरीचशी कायम ठेवली आहे. या ' त्रयोदश गुणी ' विड्यांत कुठल्या वस्तू घालतात व त्या कां घालतात हें अनेकांना माहित नसतें.

विड्यांतील १३ जिन्नस

त्रयोदशगुणी विड्यांत खालील तेरा जिन्नस येतातः—(१) नागवेलीचें पान (२) चुना (३) कात (४) सुपारी (५) कापूर (६) वेलदोडा (७) लवंग (८) खसखस (९) खोबरें (१०) बडीशोप (११) जायपत्री (१२) ओवा (१३) गुंजपत्ती.

कफप्रकृतीच्या लोकांनीं सकाळीं व दोन्ही जेवणानंतर एकदां असा त्रयोदशगुणी विडा अवश्य खावा असें वैद्यक शास्त्रांत सांगितलें आहे. मिष्टान्न भोजनानंतर विडा खाण्याची चाल आपल्याकडे फार प्राचीन काळापासून रूढ आहे. —मौज

आयुर्वेद सेवा संघ–नासिकचीं सर्व औषधें
मुंबईंत मिळण्याचें आणखी एक नवें केंद्र
रामकृष्ण एजन्सी
३६८ बी ३।७० सुपारीबाग रोड
लालबाग, मुंबई १२
* मागणी रोज वाढत आहे. *

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठ*, दिल्ली

.... सन १९५४ च्या वार्षिक परीक्षेसंबंधीं सूचना ....

(१) परीक्षेस प्रारंभ तारीख २९ मार्च १९५४ पासून होईल.

(२) (क) परीक्षा फी (प्रतिखंड)—
आयुर्वेदाचार्य अथवा वैद्याचार्य, रुपये १५ प्रत्येकीं.
आयुर्वेदविशारद अथवा वैद्यविशारद रुपये १० प्रत्येकीं.
आयुर्वेदभिषक् रुपये ७ प्रत्येकीं.

(ख) सन १९५४ पासून "प्रजावैद्य" परीक्षा घेण्यास सुरवात केली जाईल. ह्या परीक्षेच्या चार प्रश्नपत्रिका असतील. प्रत्येक प्रश्नपत्रिकेची परीक्षा–फी २ रुपये आहे. परंतु जो परीक्षार्थी एकाच वेळीं चारीहि प्रश्नपत्रिकेची परीक्षा देऊं इच्छित असेल त्यास एकंदर परीक्षा-फी ६ रुपये पडेल. वरील परीक्षेबाबत पाठ्यक्रम वगैरे संपूर्ण सूचना व माहिती 'आयुर्वेद महासंमेलन पत्रिकेच्या' मे १९५३ च्या अंकांत पृष्ठ ३०२ व ३०३, ३०४ वर छापली आहे ती पहावी.

(ग) सन १९५४ पासून प्रत्येक परीक्षार्थ्यास परीक्षेच्या फी व्यतिरिक्त २ रुपये रजिस्ट्रेशन फी एकदांच द्यावी लागेल. प्रत्येक परीक्षार्थ्यास कार्यालयातर्फे एक स्थायी रजिस्टर्ड क्रमांक दिला जाईल व त्याच्या शिक्षणासंबंधींची माहिती विद्यापीठाच्या कार्यालयांत कायम दप्तरीं ठेविली जाईल.

(३) परीक्षेच्या अर्जाचा फॉर्म मिळण्याकरितां परीक्षा फी नि. भा. आ. विद्यापीठाच्या मुख्य कार्यालयाकडे पाठविली पाहिजे. त्याचप्रमाणें परीक्षा फी मनीऑर्डरनें पाठवितांना ती रक्कम कशाकरितां पाठविली आहे त्याचा खुलासा व पाठविणाराचा पूर्ण पत्ता मनीऑर्डरचे कूपनवर स्पष्टपणें लिहिला असला पाहिजे, म्हणजे त्या पत्त्यावरून परीक्षार्थ्यास परीक्षेच्या अर्जाचा फॉर्म पाठविला जाईल. अधिक फॉर्म लागल्यास प्रत्येक फॉर्मची किंमत २ आणे घेऊन पाठविले जातील.

(४) परीक्षा फी मिळाल्याबद्दल कार्यालयाच्या पावतीचा नंबर मनीऑर्डरच्या परत पावतीवर लिहिला जाईल व तोच नंबर परीक्षेच्या अर्जाच्या पाठविण्यांत येणाऱ्या फॉर्मवरहि लिहिला जाईल. मनीऑर्डरची कार्यालयाची पावती जपून ठेवावी व पुढें पत्रव्यवहार करणें झाल्यास त्या पावतीवरील कार्यालयाच्या नम्बराचा उल्लेख जरूर करीत जावा.

(५) परीक्षेची फी स्वीकारण्याची मुदत तारीख १५ डिसेंबर १९५३ पर्यंत आहे, त्यानन्तर तारीख ३१ डिसेंबर १९५३ पर्यंत १ रुपया जादा व ता. १५ जानेवारी १९५४ पर्यंत २ रुपये जादा विलंब-शुल्क (लेट फी) घेऊन परीक्षा फीचा स्वीकार करण्यांत येईल.

(६) परीक्षेचे अर्ज कार्यालयांत स्वीकारण्याची मुदत तारीख ३१ डिसेंबर १९५३ पयत राहील, त्यानन्तर तारीख २५ जानेवारी १९५४ पर्यंत १ रुपया दंड फी घेऊन परीक्षेच्या अर्जांचा स्वीकार केला जाईल.

(७) (क) विद्यापीठाशीं संबद्ध संस्था त्याचप्रमाणें स्वीकृत अध्यापक यांनीं अनुक्रमें आपापली संबद्धता फी रुपये १५ संस्थांनीं व रुपये ५ मान्य अध्यापकांनीं तारीख ३१ डिसेंबर १९५३ पर्यंत विद्यापीठाकडे जरूर पाठवून द्यावी.

(ख) संबध्द संस्थेनीं अगर अध्यापकांनीं त्यांचे मार्फत पाठविलेला प्रत्येक परीक्षार्थ्यांचा परीक्षेबाबतचा अर्ज नीट तपासून त्याचेवर स्वाक्षरी केली पाहिजे; कारण अर्जांतील चुकीमुळें जर परीक्षार्थ्यांचें कांहीं नुकसान झालें तर त्याची जबाबदारी सर्वस्वी तपासणाऱ्यावर राहील.

(सही) श्रीदत्त शर्मा
आयुर्वेदमार्तंड, रायबहादूर
विद्यापीठ–मंत्री

* पत्ता–महालक्ष्मी मार्केट, चांदणी चौक, दिल्ली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६० वर्षांचे जुने, सुप्रसिद्ध व विश्वसनीय औषधी-निर्माते

उंझा फार्मसी लिमिटेड

कांहीं लोकप्रिय औषधें

सर्वांकरितां— ' नवरत्न-रस ' — * स्त्रिया, पुरुष, बालक या सर्वांकरितां ही महौषधी आहे. रस-रक्तादि सप्त धातूंची शुद्धि, वृद्धि व पोषण करणें हें ' नवरत्न-रसाचें ' विशेष कार्य आहे. निरोगी लोकांस रसायन व रुग्णांना उत्तम औषध आहे. किं. २८ गोळयाचे ५ रु.

स्त्रियांसाठीं-- 'सुंदरी संजीवनी' — * स्त्रियांचे प्रदर, ऋतु-दोष, गर्भाशयविकार, वंध्यत्व आदि नष्ट करून शक्ति येते. स्त्री-रोगावर हें अमृततुल्य औषध आहे. किं. ४ औंस २ रु.

मलेरियावर ' एलूस्टो पिल्स ' — * ह्या गोळया सप्तपर्ण, कालमेघ, कुटकी आदि वनस्पतींच्या घन सत्वापासून बनविल्या आहेत. ह्या गोळया मलेरिया, शीतज्वर ह्या तापांवर अत्यंत गुणकारी असल्याचें सिद्ध झालें आहे. किं. ५०० गोळया (१० तो.) ३॥ रु.

आंव व मुरड्यावर- ' अँटि-डिसेंट्रॉल ' — * ही पर्पटी इंद्रजव, कुटजत्वक्घन, बिल्व, कापूर, अफू ह्या औषधी द्रव्यांच्या संयोगापासून बनविली आहे. ही जुनाट आव, मुरडा, संग्रहणी ह्यावर अतिशय गुणकारी आहे. पहिल्याच दिवशीं गुण दिसूं लागतो. १ बा. १ रु.

लहान मुलांकरितां- ' शिशु संजीवनी ' — * लहान मुलांचा ताप हगवण, दूध न पचणें, खोकला वगैरेवर उत्तम औषध. मुलांना नियमित दिल्यानें मुलें बाळसेदार व घष्टपुष्ट होतात. १ बा. ॥ रु.

सायरप- ' शंख-पुष्पी ' — * स्मरणशक्तिवर्धक व ज्ञानतंतूंना बलदायक असें हें उत्तम ब्रेन-टॉनिक आहे. विद्यार्थी, कारकून, वकील, प्रोफेसर, अधिकारी वगैरे मेंदूचीं कामें करणाऱ्या लोकांना हें अत्युत्तम औषध आहे. १ बा. १। रु.

' अष्टावक्र-रस ' — * वलिपलितनाशक, बलवर्धक, पौष्टिक, आरोग्यरक्षक व बुद्धि आणि कांति-वर्धक असें आयुर्वेदीय अनुपान औषध आहे. किंमत १ तो. ४० रु.

' बृहत्कस्तूरीभैरव ' (स्वर्णयुक्त) — * सन्निपात, आंत्रिकज्वर, वात-ज्वर, कफ-ज्वर, आणि वातकफ-ज्वर ह्या तापांत उत्तम उपयोगी आहे. तसेंच मंथरज्वर व न्युमोनिया यांतहि हा योग सत्वर गुण देतो. किंमत १ तो. १८ रु.

' बृहत्-वातचिंतामणी ' — * आयुर्वेदांतील वातरोगांवर हें एक दिव्य औषध आहे. हृदयाला व मेंदूला बल देणारें आहे. मेंदूच्या ज्ञानतंतूंच्या विकृतीमुळें उद्भवणाऱ्या सर्व विकारांवर उत्तम गुणदायी आहे. मेंदूची क्षीणता, रक्तदाब, हिस्टेरिया वगैरेवरहि लाभदायक आहे. किं. १ तो. ३५ रु.

उंझा फार्मसी लि. [उ. गुजरात]

महाराष्ट्र एजन्टः- **जयंत अँड कंपनी**, लक्ष्मीरोड, पुणें सिटी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्बा-भिलावा [भल्लातक] :

लेखक-वैद्य खेमराज शर्मा छांगाणी
आर्वी (म. प्र.)

विविध भाषेतील नांवें

संस्कृतः- भल्लातक, अरुष्क, अरुष्कर, अग्निक, मुखी, भल्ली, वीरवृक्ष, शोफकृत्, कृमिघ्न, हिता, अंतःसत्वा, अनल, भल्लिका, भूतनाशना.
हिंदीः- भिलावा, भिलामा, भिलाट.
बंगालीः- भेला, भेलातुकी, व्हेलामा.
गुजराथीः- भीलामुं.
मराठीः- बिब्बी, बिबवा, बिभा, बिबू.
पंजाबीः- भेला, भिलावा.
नेपाळीः- भेलाएं.
आसामीः- भीलागुटी.
तामिळीः- इरुमुगी.
तेलगुः- भल्लातकी.
उर्दूः- भिलावा.
इंग्रजीः- मार्किंग नट (Marking Nut)
लॅटिनः- सेमेकार्पस् अनाकार्डिअम्.
(Semecarpus-Anacardium)

वर्णनः- भिलाव्याचें झाड साधारणतः आंब्याचें एवढें मोठें असून त्याचीं पानें चिरोंजी अगर वृक्षाचें पानांसारखीं असतात. भिलाव्याचे स काजूचें झाड प्रमाणें फळें येतात व तीं साधा- ग्रीष्म-ऋतूमध्यें येतात. फळें पिकल्यावर बहुत- मुकवून लोक तीं खातात. भिलाव्यांतील बींला डिंबी" अशी संज्ञा आहे, व ती सुक्या मेव्या- खातातहि. अखिल भारतांत भिलावा ही एक धि मानली जाते. भिलावा विषारी असूनहि धीकरणांत त्याचा निरनिराळ्या प्रकारें उपयोग जातो.

भिलावा तेलाचा विशेष गुण

भिलाव्याचें फळ खाण्यापासून कांहीं अपाय होत , परंतु फल-तेल पोटांत सेवन केल्यास रक्त सतेज व पोटांतील कृमि नाश पावतात. ह्या गुणांत हें अद्वितीय गुणकारी आहे.

भिलाव्याचे गुणधर्मः- कडु, तिखट, तुरट, मधुर, उष्ण व शुक्रवर्धक. कफवातनाशक, अर्श (मूळव्याध) पोटफुगी, मेह, कृमि, ग्रहणी, कुष्ठ, गुल्म, व्रणविकार, रक्तदोष, ज्वर, अग्निमांद्य इत्यादि विकारांना नष्ट करणारा आहे.

फळाचे गुणः- तुरट, मधुर, वृष्य, धातुवर्धक, बलप्रद, उष्ण, पाचक, अग्निवर्धक, खोकला, श्वास, कफ, आनाह, बद्धकोष्ठ, कृमि, उदररोग, अर्श, कुष्ठ, ग्रहणी तसेंच कफवातात्मक रक्तपित्त व्याधींवर लाभकारक आहे.

बीज (गोडंबी):- मधुर, बृंहण, वृष्य आहे. तसेंच अरुचि, दाह, पित्त व वायु नाशक आहे. पौष्टिक असून दातांस मजबूत करतें.

भिलावा संशोधन

(१) प्रथम भिलावे पाण्यांत टाकून पाहावे व जे पाण्यांत बुडतील असे भिलावे घ्यावेत. नंतर ते विटेच्या चूर्णानें चांगले घांसून घ्यावेत म्हणजे शुद्ध होतात. असे भिलावे पाक, अव- लेह वगैरे औषधांत वापरतात.

दोलायंत्रानें शुद्धि

(२) भिलावे फडक्यांत ठेवून त्याची पोटली बांधावी. नंतर एका भांड्यांत शेणांत चौपट पाणी घालून त्यांत भिलाव्याची पोटली टाकावी. व तें पात्र मंदाग्नीवर ठेवून १२ तासपर्यंत दोलायंत्र पद्धतीप्रमाणें उकळावें. नंतर गोमूत्रांत आणि गोदुग्धांत ते भिलावे वरीलप्रमाणें उकळावे. त्यानंतर नारळाच्या पाण्यांतहि वरीलप्रमाणें १२ तास उकळावे म्हणजे ते उत्तम रीतीनें शुद्ध होऊन चूर्ण वगैरेंतहि मिसळ- ण्यास योग्य असे होतात.

रोगांमध्यें भिलाव्यांचे उपयोग

(१) अर्धशिशीवर-सुईसारखी बारीक लोखंडाची सळई घेऊन तिनें नाकाजवळ असलेल्या डोळ्यांतील —

--.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लाल भागावर थोडेसें भिलाव्याचें तेल लावावें. तेल लावल्यावर डोळ्याची थोडी चुरचूर (आग) होईल व डोळ्यांतून पाणी बाहेर निघून जाईल. ह्या पाण्याबरोबर भिलाव्याच्या तेलाचाहि थोडासा अंश बाहेर गालावर येईल व त्या तेलांशाच्या स्पर्शानें गाल वगैरे सुजण्याची शक्यता राहील. म्हणून सळईनें डोळ्यांत तेल घालण्यापूर्वी तोंडास थोडेंसें तूप लावावें म्हणजे सूज वगैरे येणार नाहीं. ही क्रिया दररोज सकाळीं ३ दिवस करावी म्हणजे अर्धशिशी थांबेल. 'वनौषधि गुणादर्श' ह्या ग्रंथाचे लेखक श्री. पदेशास्त्री यानींहि ह्या क्रियेपासून अर्धशिशीच्या दुःखाचें शमन होतें असें सांगितलें आहे. (हा प्रयोग जाणत्यांनींच करावा.)

पडजीभ लोंबली असतां

(२) पडजीभ लोंबली असतां खोकला येतो. अशा वेळीं पावशेर शिळ्या (शीतल) दुधांत भिलाव्याचे कांहीं थेंब टाकून तें दूध प्यावें म्हणजे आराम वाटेल.

(३) गंडमाळावरः– कासीस (हिराकस) व भिलावा रुईचे चिकांत उगाळून त्याचा लेप गंडमाळेवर करावा म्हणजे गंडमाळा नष्ट होतील.

(४) मंदाग्नि, मलावरोध व पचनशक्तीवर

एक तोळा साखरेंत भिलाव्याच्या तेलाचे पांच थेंब टाकून तें सेवन करावें व त्यावर थोडें कोमट पाणी प्यावें.

(५) अतिसार, आंव व मुरडा यांवरः– ६ मासे बडिशेप चूर्णांत ५ थेंब भिलाव्याचें तेल घालून खावें; अथवा ताज्या ताकांत अगर दह्यांत भिलाव्याचें तेल ५ थेंब टाकून व त्यांत थोडी साखर घालून प्यावें. फायदा होतो.

(६) फोड, फिसकें, विद्रधि यांवरः– भिलाव्याचें तेल लावावें. साबणाचे फेसांत भिलाव्याचें तेल मिसळून तें फोड, ग्रंथि, फिसकें यांवर चोळावें म्हणजे त्यांचें पिकण्याचें कार्य उत्तम होतें.

(७) सुजेवरः– भिलावा पाण्यांत उगाळून लावावा.

(८) उदरकृमीवरः– कृमि व जंत यांवर भिलाव्याचें तेल दुधांत टाकून तें प्राशन करावें. चिंच दह्याबरोबर भिलावा सेवन करावा. किंवा भिलाव्याचा तुकडा दुधांत उकळून तें दूध प्यावें. लहान मुलांनाहि हें औषध उत्तम गुण देतें.

(९) वायु व कफप्रधान रोगांवर

भिलाव्याचें तेल गुळांत मिसळून सेवन करावें.

(१०) कर्णस्रावः– एक मासा तुपांत भिलाव्याच्या तेलाचे कांहीं थेंब टाकावे व तें तूप कापसाच्या बोळ्यानें कानांत घालावें व नंतर तो बोळा कानांत बसवावा. असें ७ दिवस केल्यास कर्णस्राव बंद होतो.

(११) जिभेवर काळे डाग पडले असल्यासः– लोण्यांत भिलावा तळून चांगला पक्व करून सेवन करावा.

(१२) शेंदूर खाण्यांत येऊन घसा बसल्यासः– विड्याच्या पानांत भिलाव्याचा चौथा भाग घालून त्याचा विडा करून खावा. फायदा होतो.

(१३) मुरगळणें, इसब यांवरः– भिलावा व राळ तेलांत शिजवून लावावी.

धन्वन्तरीचा महिमा

आपण धन्वन्तरीचा महिमा कां मानतो ? कारण त्यांनीं ज्या ज्या औषधी दुनियेसाठीं उत्पन्न केल्या आहेत, त्यांतील प्रत्येक औषधि रोग्याच्या रोगनिवारणार्थ व आयुष्यवर्धनार्थ उत्पन्न केली आहे व त्या औषधीचा उपयोग जनकल्याणाकरितां करण्याचा आदेश त्यांनीं दिला आहे.

म्हणून आपण नेहमीं अस्सल औषधीद्रव्यें वापरण्याचा निश्चय करा. व यासाठीं

ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी, मुंबई नं. ३

यांचेकडे औषधीखरेदीचा व्यवहार करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(१४) गजकर्ण दद्रु यांवरः- भिलावा तेलांत ...वून लावणें.

(१५) डोळे आल्यास:- (अ) अर्धशिशीच्या ...गांत सांगितल्याप्रमाणें उपचार करावा.

(ब) भिलावा तुपांत उगाळून त्याचें अंजन ...वें. डोळ्याचे बाह्य त्वचेस तूप लावावें, म्हणजे ...त्वचेवर भिलावा उभरणार नाहीं.

(१६) केस गळणें, टक्कल * यांवरः- भिलावा ...न करणें विशेष लाभदायक आहे.

भिलाव्याचे पानांचे रसांत मध मिसळून कांहीं ...वसपर्यंत त्याचा टक्कलावर लेप करावा.

(१७) मूर्च्छाः- तळ पायाच्या मध्यभागीं ...ावा गरम करून चिटकवावा. यानें फायदा न ...यास मानेवर भिलाव्याचें तेल चोळावें.

(१८) अंडवृद्धीवरः- भिलावा व हळद यांचा ...ावर लेप द्यावा व थोडें शेकावें.

रक्तस्रावी मूळव्याधीवर

(१९) भयंकर रक्तस्राव होणाऱ्या मूळव्याधीवर ...ील प्रयोग फारच गुणकारी आहे. एक मासा ...ऱ्या तुपांत भिलाव्याचे आंतील बी उगाळली जाणार ...ी इतकेंपर्यंत भिलावा उगाळावा व त्याचा लेप ...व्याधीच्या मोडांवर आंतून बाहेरून करावा.आणि ...शेकावें ह्यावेळीं वृषणकोशावर वस्त्र लपटावें म्हणजे ...ास औषध अगर शेक लागणार नाहीं. ह्या प्रयो- ...ी शौच्याच्या वेळीं अतिशय रक्तस्राव होणाऱ्या ...व्याधींत आश्चर्यजनक फायदा होतो. ह्यानें वेदना ...ी होऊन झोपहि चांगली लागते. ‡

(२०) कालमांजरीवर- कार्डीनें ग्रंथीवर भिला- ...च्या तेलाची फुली द्यावी व त्यावर खोबरेलतेल ...ावें.

(२१) बदावर- या गुप्त व्याधीवर भिलावा ...ी उपकारक आहे. चुना व भिलावा एकत्र वाटून ...चा लेप बदावर करावा अगर त्याची पट्टी बांधावी.

[* आयुर्वेद सेवा संघानें टक्कलासाठीं भला- ...-भृंगराज तेल तयार केलें आहे. —संपादक]

(२२) प्लीहावृद्धीवर- प्लीहेच्या सुजलेल्या भागा-वर बाहेरून भिलाव्याच्या तेलाची फुली × द्यावी. व नंतर त्यावर थंड पाण्याचे शिपके देऊन विड्याचे पानास तूप लावून तें पान त्यावर बांधावें. कांहीं तासानंतर फुली केलेल्या भागांतून पाणी निचरूं लागेल व हलकें हलकें रोगशमन होईल.

(२३) सर्दीजन्य शारीरिक स्थानिक वेदनांवर- भिलाव्याचें तेल लावून नंतर त्यावर चुना लावावा.

(२४) जिव्हास्तंभ (मेदोवृद्धि व मूकत्व) यांवर एका भिलाव्याचा चतुर्थांश काढा करून त्यांत तूप मिश्रित दूध व काळया मिऱ्याचें चूर्ण [१ते३ मासेपर्यंत] घालून तें सेवन करावें.

(२५) मुलांच्या ब्राँको न्युमोनियावर- बेंबी-पासून तीन बोटें वर व बेंबीच्या दोहोंबाजूस २॥ बोटावर भिलाव्याच्या तेलानें भिलाव्याच्या आकाराचीं चिन्हें व केळीच्या पानास गोडेतेल लावून तें पान त्या चिन्हांवर बांधावें म्हणजे रोगाचा उपशम होतो. मुलांच्या डब्बा रोगांवर (धांप लागणें) व कफप्रको-पावरहि याचा चांगला फायदा होतो.

(२६) शरीरावर जखम झाल्यास अगर शरीरांत एखाद्या ठिकाणीं वातजन्य वेदना होत असल्यास त्यावर भिलावा कुटून लावावा म्हणजे दुःख कमी होते.

भिलाव्याचे दोष

भिलावा हा गुणाच्या दृष्टीनें अति प्रभावशाली औषधी वस्तु असूनहि याच्या बाह्य उपयोगानें कांहीं कांहीं व्यक्तींना उपद्रव निर्माण होतात, जसें:- उष्णता, कंडु, आंतरिक शोथ, बेचैनी वगैरे. पोटांत अधिक मात्रेंत सेवन केला असतां कांहीं लोकांच्या आंतील अवयवांना फापरे पडणें, सूज येणें वगैरे उपद्रव निर्माण होतात. हे उपद्रव शमण्याकरितां खालील प्रयोग सत्वर गुणदायी होतात.

१ जेष्ठमध व तीळ कुटून यामध्यें लोणी मिसळून लेप करावा. २ अर्जुनसाल व त्याचीं पानें एकत्र कुटून त्याचा लेप करावा.

‡ [हा प्रयोग जाणत्या लोकांनींच करावा.—संपादक]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३ जेष्ठमध, नागरमोथा व कपित्थ वृक्षाचीं पानें एकत्र कुटून लेप करावा.

४ अरणीच्या पानांचा रस लावावा.

५ कोथिंबिरीच्या पानांचा रस लावावा.

६ तीळ बारीक वाटून त्यांत काळी माती मिश्र करून त्याचा लेप लावावा.

७ लोणी व तीळ एकत्र करून अगर दूध व तीळ एकत्र वाटून त्याचा लेप करावा.

८ बेहेड्याच्या बींतील मगज वाटून त्याचा लेप करावा.

९ नारळ अगर बदाम वाटून त्याचा लेप करावा.

१० चुना व लोणी एकत्र करून त्याचा लेप करवा.

११ बकरीचें दूध, भिलावा उभारलेल्या जागेवर लावावें.

१२ दुधाची साय लावावी.

१३ रानतुळशीच्या पानांचा लेप लावावा.

वरील द्रव्यांचा उपयोग केवळ बाह्योपचारासाठीं सांगितला आहे. परंतु पोटांत घेण्याकरितां गाईचें दूध, बकरीचें दूध, मलई, लोणी यापैकीं एखादें साखर मिश्र करून सेवन करावें. आहार स्निग्ध पदार्थांचा घ्यावा. सर्व विषांच्या शमनार्थ तुपाचा उत्तम उपयोग पुढीलप्रमाणें सांगितला आहे.

सर्वेषु सर्वावस्थासु विषेषु न घृतोपमम् ।
विद्यते भेषजं किंचिद्विशेषात् प्रचलेऽनिले ॥

वरील वचनाप्रमाणें तूप हें विषासंबंधीं सर्व उपद्रवांत एक महान् औषधी म्हणून सिद्ध झालें आहे; म्हणून भिलाव्याचें विषांत तुपाचा उपयोग अधिक मात्रेमध्यें करणें हें अधिक श्रेयस्कर आहे.

भिलाव्याचे उपद्रव

पोटांत भिलावा घेण्यानें उत्पन्न होणारे उपद्रव वर सांगितलेच आहेत. बाह्य त्वचेवर भिलावा लावण्यानें तोंड, नाक, डोळे, गुह्येंद्रिय व गुदभाग ह्यांवर सूज येते व कंडू सुटते. ज्या जागेवर भिलाव्याचें तेल लाविलें असेल तेथें थोडी चुरचुर होऊन सूज येते व तो शरीराचा भाग काळसर पडतो. कधीं कधीं दारुण क्षतहि होतें. शरीराच्या नाजुक भागावर ह्या तेलापासून अधिक त्रास होतो.

प्लेगाच्या गाठीवर भिलावा

पूज्यपाद श्री. छांगाणीजी यांनीं शेंकडों वेळा अनुभविलेला 'प्लेग' वरील भिलाव्याचा प्रयोगः-

गोवरीच्या निर्धूम अग्नीवर सुईनें टोंचलेला एक वजनदार भिलावा ठेवावा. सुईनें टोंचलेल्या जागीं लवकरच तेल निघूं लागेल. हें तेल सुईच्या टोंकावर घेऊन त्या टोंकानें प्लेगच्या गांठीभोंवतीं तेलाचें वर्तुळ काढावें. तसेंच भिलाव्याच्या तेलाच्या दोन अडव्या रेघा त्या प्लेगच्या गांठीवर काढाव्या. तेलाच्या वर्तुळा बाहेर ओल्या कळीच्या चुन्यानें दुसरें वर्तुळ काढावें. प्लेगची गांठ आली असें समजतांच ही क्रिया केली तर दुसऱ्या दिवशीं ज्वर व गांठीच्या वेदना कमी होतात, गांठ बसूं लागते व रोगी प्लेगपासून बचावतो.

कॉलऱ्यावर भिलावा

कॉलऱ्यावरील भिलाव्याच्या तेलाचा प्रयोग शिकून व वेळप्रसंगीं त्याचा उपयोग करून यश मिळवावें. एखाद्यास कॉलरा झाल्याबरोबर त्यास भिलाव्याच्या तेलाचे २ ते ५ थेंब ३ मासे साखरेंतून खाण्यास द्यावे. खातांना तोंड बन्द करून खाण्यास

म्हाताऱ्या संशोधक वैद्याची काठी
म्हणजे आजचे तरुण वैद्य
"रससिंदूर"
किं. ५ तोळे ५॥ रु., १० तोळे ९॥ रु.
२० तोळे १७॥ रु., १ पौंड ३२॥ रु.
अगाऊ म. ऑ. आल्यास पॅ. पोस्टेज माफ.
ही सवलत फक्त ४ महिने. धंद्याचे दृष्टीनें वैद्यांचा फायदा असून म्हातारपणीं पुढील संशोधन कार्यास मला मदत केल्यासारखें होणार आहे. अनुपानपरत्वें विकारावर स्वतंत्र वापरा किंवा हिंगुळाऐवजीं खल्वी रसायनांत वापरा.
भिषग्रत्न ग. कृ. पाटणकर
पो. किन्हई, जि. उ. सातारा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सांगावे. अशा प्रकारें हें औषध एक एक तास अंतरानें रोगी बरा होईपर्यंत द्यावें. कॉलऱ्यानें पछाडलेला रोगी इश्वरेच्छेनें पूर्ण बरा होईल.

कॉलरा प्रतिबंधक उपाय

कॉलऱ्याच्या सांथींत निरोगी माणसानें दररोज भिलाव्याच्या तेलाचे एक दोन थेंब साखरेंतून सेवन केल्यास त्यास कॉलऱ्याची बाधा होत नाहीं. कारण कीं, आधुनिक मतानुसार भिलाव्यामुळें कृमिविकारघ्न उदरकृमिघ्न हे गुण प्राप्त होऊं शकतात. आणि म्हणून कृमिनाशक या दृष्टीनें भिलाव्यास उच्च स्थान प्राप्त झालें आहे.

मानवजातीस अद्वितीय देणगी

आयुर्वेदांतील महान् औषधि 'संजीवनी वटी' मध्यें भिलावा विद्यमान आहे. विषूचिकेवरील औषध 'विंचा-भल्लातकवटी' यामध्येंहि भिलावा प्रमुख औषध आहे. अशा प्रकारचे भल्लातक-निर्मित कांहीं योग आयुर्वेदीय ग्रंथांतून पहावयास मिळतात. पशु-चिकित्सेमध्येंहि भिलावा हीं एक प्रभावशाली महौषधि असल्याचें सिद्ध झालें आहे. आजहि महामारी वगैरे अनेक रोगांवर ग्रामीण लोक भिलाव्याचा उपयोग करून पुष्कळ फायदा करून घेतात. भिलावा ही निसर्गाची मानवजातीस एक अद्वितीय देणगी आहे.

—आयुर्वेद, नागपूर

आयुर्वेद सेवा संघानें तयार केलेलीं
भिलाव्याचीं औषधें

भिलावा (बिब्बा) या औषधी द्रव्याचे वैशिष्ट्य जाणून आयुर्वेद सेवा, संघ, नाशिक या संस्थेनें भल्लातकाचे विविध कल्प तयार करून ते विक्रीस काढले आहेत. त्यापैकीं भल्लातकासव व भल्लातक-भृंगराज तेल हीं दोन औषधें वैद्य व जनता यांच्या पसंतीस पडलीं आहेत.

भल्लातकासवांत बिब्याचें प्रमाण काय आहे तें समजावें म्हणून उमरावतीचे वै. त्र्यं. म. गोगटे यांनीं विचारणा केली तेव्हां १० तोळे भल्लातकासवांत १ बिब्याचा अर्क येतो असें हिशेब करून कळविण्यांत आलें. एका तोळयांत हे ३ बिब्बे बसतात. यावरून भल्लातकासव हे १ महिन्याच्या आंतील मुलालाहि देतां येण्यासारखा सौम्य कल्प आहे हें सिद्ध झालें आहे.

भिलाव्याचें तेल मिळण्याची व्यवस्था आयुर्वेद सेवा संघानें केली आहे.

—व्यवस्थापक

आयुर्वेद शिक्षण मंडळ, नासिक

दिनांक १७।१०।५३ विजयादशमीचे सुमुहूर्तावर नासिक शहर वैद्य मंडळाची सभा वै. दातार यांच्या दवाखान्यांत भरून आयुर्वेद विद्यालय काढावें व तत्प्रीत्यर्थ मंडळ स्थापन करून निधीस सुरवात करावी असें ठरलें. त्याप्रमाणें प्रत्येकीं १०१ रुपये देऊन पुढील मंडळी सभासद झाली आहेत.

१	वै. वि. ग. केळकर			रोख रु.	१०१
२	वै. चिंदुमाधव पंडित			,,	१०१
३	वै. वि. म. गोगटे	रु. १०१	आश्वासनपैकीं	,,	२५
४	वै. सौ. यमुताई गोगटे	१०१	,,	,,	२५
५	वै. विष्णुशास्त्री दाते	१०१	,,	,,	११
६	वै. ज. ल. रामैय्या	१०१	,,	,,	११
७	वै. व. ना. रानडे	,,	,,	,,	२५
८	वै. के. वि. मुळे	,,	,,	,,	२६
९	वै. रं. गो. भानोशे	,,	,,	,,	११
१०	वै. त्र्यंबकशास्त्री दाते	,,	,,	,,	२५

'आयुर्वेद शिक्षण मंडळ' असें या संस्थेचें नांव असावें असें ठरलें आहे. त्याप्रमाणें संस्था रजिस्टर करून काम सुरू करण्यांत येणार आहे. सरकारच्या शुद्धायुर्वेदीय समितीच्या बैठकी भरून मार्गदर्शन होईल, त्याप्रमाणें येथील कार्यास चालना मिळेल.

इंजेक्शन चिकित्सा

पाश्चात्य इंजेक्शन चिकित्सेवरील अभिनव मराठी ग्रंथ. किं. ६ रु., ट. ख. निराळा.

वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक शहर

सुबोध वैद्यक ग्रंथमाला, पो. कागल (कोल्हापूर)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रा. ब. डॉ. आर. व्ही. मोने
एफ्. आर. सी. एस्. (इं.) एल्. आर. सी. पी. (लं.)
डी. टी. एम्. (लिव्ह्), एल्. एम्. (डन्)
एफ्. सी. पी. एस्. (मुं.)
रिटायर्ड सिव्हिल सर्जन व चीफ मेडिकल ऑफिसर

प्रताप हॉस्पिटल,
अंमळनेर.
दि. १०-९-५३

दोन वर्षांतील उत्कृष्ट प्रगति.

आयुर्वेद सेवा संघाचें औषधीभवन पुन्हां पाहण्याचा सुयोग आज आला. वैद्य श्री. गोगटे, श्री. मराठे व श्री. शामराव कुळकर्णी यांनीं मोठ्या आस्थेनें औषधी तयार करण्याचे निरनिराळे विभाग, चूर्णें करण्याचीं जातीं, रसायनें वटिका गुटिका वगैरेचा खल-विभाग व भट्या, आसवें अरिष्टें यांचीं पिपें, सर्व प्रकारचीं तयार औषधें तैलें घृतें यांचे संग्रह, त्याचप्रमाणें ताज्या वनस्पतींचे साठे वगैरे सर्व विभाग दाखविले. सर्वत्र स्वच्छता व टापटीप पाहून अत्यन्त समाधान वाटलें. त्याचप्रमाणें औषधांच्या बाटल्या भरून त्यास लेबलें लावणें, सील करणें वगैरे कार्य पाश्चात्य देशांतील कारखान्याप्रमाणें व्यवस्थित व सुबक रीतीनें चाललें होतें.

संघाचें वाढतें कार्यास आणखी मोठ्या जागेची अत्यन्त जरूर आहे. तरीपण उत्तरेकडील थोडी जागा गेल्या वर्षी मिळाल्यामुळें ती अडचण आज कमी प्रमाणांत भासत आहे. गेल्या दोन वर्षांतील संघाची उत्कृष्ट प्रगति पाहून त्याचें स्थैर्य व प्रगमनशील कार्याबद्दल पूर्ण खात्री वाटते.

संघानें आयुर्वेदाचें शिक्षण, संशोधन व वैद्यक वाङ्मय-प्रकाशन हें काम त्याचे अनुभविक आस्थेवाईक निष्णात जीवसदस्य श्री. वैद्य बिंदुमाधव पंडित व श्री. वैद्य मराठे यांनीं सभासदांचें मदतीनें उत्कृष्ट रीतीनें चालविलें आहे; व आपल्या लोकप्रिय पाक्षिक आयुर्वेद पत्रिकेद्वारा आयुर्वेदाच्या शास्त्रीय व राजकीय प्रगतीची प्रसिद्धि करण्याचें कार्यहि संघ मोठ्या उत्साहानें करित आहे. संघाची लायब्ररीहि बरीच विस्तृत असून आयुर्वेदाचें संशोधन व प्रचार करण्याकडेच सर्व फायदा खर्च करण्याची चालकांची कल्पना उत्कृष्ट, अभिनव व अनुकरणीय आहे.

संघास व त्याचे उत्साही कार्यकर्त्यांस मी सुयश इच्छितो व उत्तरोत्तर त्यांची भरभराट होवो अशी जगन्नि परमेश्वराची नम्र प्रार्थना करतो.

आर्. व्ही. मोने

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— मध्यप्रदेशांत आयुर्वेदाचा प्रचार —

पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणें ता. १४ रोजीं कुर्ला थील भगिनी मंडळातर्फे झालेल्या शारदोत्सवांत वैद्य ुमाधव पंडित यांचें "स्त्रिया व मुलें यांचें आरोग्य णि आयुर्वेदांतील प्रकृतिविचार" या विषयावर ीं ९॥ ते १०॥ पर्यंत व्याख्यान झालें. सभेस -पुरुष मुलें-मुली असा मिश्रसमाज उपस्थित होता. गिनींना विषय-विवेचन उपयुक्त वाटलें व त्यांनीं वेळीं मुंबईस कामानिमित्त येणें होईल त्यावेळीं ामीं पत्र पाठवून आणखी कांहीं व्याख्यानें देण्याची त्यांना विनंति केली.

ता. १७ रोजीं वैद्य पंडित हे वर्ध्यास थांबून गपुरास गेले. तेथें त्यांनीं 'तेलिया असाणा' या वन-तीचा मधुमेहावर उपयोग करणारें कोठीवान कुटुंब ची भेट घेतली. व परांडे बंधूंशीं विचारविनिमय . ता. १८ रोजीं सकाळीं अमरावतीजवळील ा कुष्ठनिवास पाहिला. या निवासाचे संचालक . शिवाजीराव पटवर्धन व सौ. पार्वतीबाई पटवर्धन नीं हें आपलें निवासस्थानच केलें आहे.

उत्कृष्ट पंचगव्याचा उपयोग

तपोवनांत या कुष्ठनिवासाजवळच त्या संस्थेची म गोशाळा आहे. कुष्ठी लोकांना पंचगव्य देऊन चे सप्तधातु शुद्ध व स्वस्थ करण्याची सूचना वै. डित यांनीं डॉ. पटवर्धन यांना केली. श्रावणींतील त्वगस्थिगतं पापं देहे तिष्ठति मामके। प्राशनात् पंच-व्यस्य दहति अग्निरिव इंधनम्। हा श्लोक सुप्रसिद्ध ाहे, व तो वैद्यकशास्त्र संमत आहे.

माधान येथें मराठी मध्यप्रदेशांतील कस्तुरबा स्टचें शिक्षणकेंद्र आहे. या ट्रस्टतर्फे शिक्षण घेऊन ाठ जिल्ह्यांतील खेड्यांतून मिड्वाइफ, बालशिक्षिका, व द्योगशिक्षिका इत्यादि भूमिकेंत महिला कार्य करीत ाहेत. अशा सुमारें ६० कार्यकर्त्या महिलांचें शिबिर धान (जि. अमरावती) येथें ता. १९ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबरपर्यंत ट्रस्टतर्फे घेण्यांत आलें आहे.

माधान येथील अध्यापन-कार्य

ता. १८ रोजीं रात्रीं वैद्य पंडित माधान येथें पोहोचले. तेथील कस्तुरबा ग्रामसेविका शिबिरांत ता. २१ सकाळपर्यंत त्यांचीं ६ व्याख्यानें झालीं. आयुर्वेदांतील षड्रसद्रव्यविचार, सप्तधातु, त्रिदोष, त्रिमल, व वीसगुण या संबंधीं सामान्य माहिती त्यांनीं सांगितली. तसेंच त्या खेड्यांच्या भोवतीं कार्यकर्त्या-समवेत हिंडून स्थानिक वनस्पतींचा परिचय करून दिला. दुसऱ्या एका तासांत त्यांनीं नाशिकहून बरोबर आणलेल्या नित्योपयोगी अशा ३० वनस्पति व प्राणिज द्रव्यें दाखविलीं व त्यांच्या उपयोगाची माहिती दिली. ज्वर, अतिसार, खोकला इत्यादि सर्वसामान्य रोगावर प्रथमोपचार म्हणून वापरावयाच्या औषधांची माहिती दिली. प्रसूतिसंबंधीं उपयुक्त अशा औषधांचाहि त्यांत समावेश होता.

रोग न होण्यासाठीं उपचार

सर्वांत विशेष म्हणजे हा कीं रोग झाल्यावर उपचार करण्यापेक्षां रोग न होण्यासाठीं षड्रस द्रव्यांचा उपयोग कसा करावा व ६ रसांचीं पेय औषधें रोज दवाखान्यांत तयार करून त्यांचीं मिश्रणें रोग न होण्यासाठीं व रोग झाल्यावरहि प्रथमोपचार म्हणून कशी वापरावीत यांची सुबोध माहिती सांगण्यांत आली. रोग न होण्यासाठीं व स्वास्थ्य-संवर्धनासाठीं बालकांना गुटी व मोठ्या स्त्री-पुरुषांना प्रकृतिभेदानें रसायन-चूर्णें देण्याची योजना त्यांनीं समजावून सांगितली.

वैद्य-डॉक्टर मंडळींशीं चर्चा

ता २२ रोजीं दुपारीं परतवाडा येथें श्री. वा. भ. खुळे यांच्या निवासस्थानीं वैद्य--डॉक्टराची सभा झाली. सभेंत वैद्य पंडित यांनीं आयुर्वेदसेवासंघ व म.प्रां. वैद्य संमेलन या संस्थांच्या आजवरच्या कार्यांचा परि-चय करून दिला व मुंबई सरकारनें नुकत्याच मान्यता

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिलेल्या ३॥ वर्षांच्या अभ्यासक्रमाची माहिती सांगितली. नंतर कांहीं प्रश्नोत्तरें झालीं. मराठी मध्यप्रदेशांतील वैद्यांना म. प्रां. वैद्य मंडळाचे सभासद करून घेण्यांत यावें अशी विनंति कांहीं वैद्यमंडळींनीं यावेळीं केली, तेंव्हां आजहि अमरावती, अकोला, नागपूर येथील कांहीं वैद्य मंडळी या मंडळाची सभासद असल्याचें मंत्री वैद्य पंडित यांनीं सांगितलें. यावेळीं कांहीं वैद्य वर्गणी भरून लगेच सभासदहि झाले. या सभेस पुढील वैद्य-डॉक्टर मंडळी उपस्थित होती. वैद्य गो. कृ. केतकर शास्त्री, वै. लक्ष्मणप्रसाद पांडेय, वै. म. बा. धर्माधिकारी, वै. दा. द. पट्टलवार आयुर्वेदतीर्थ, वै. ना. रा. शास्त्री आयुर्वेदतीर्थ, वै. शं. शि. महाजन ए. एम्. एस्. (बनारस), वै. ग. ल. अडोणी ए. एम्. एम्., वै. पां. म. धर्माधिकारी ए. एम्. एस्, वैद्य सत्यदेव त्रिपाठी, वै. मोहनलाल, वै. वा. य. देशमुख आयुर्वेदभिषक्, वै. श्री. वा. जोशी, डॉ. ना. रा. देशपांडे, डॉ. वा. द. पट्टलवार, डॉ. वा. गं. पाठक इत्यादि.

परतवाडा येथें व्याख्यान

सायंकाळीं परतवाडा येथील सार्वजनिक वाचनालयांत चर्चामंडळातर्फे सुप्रसिद्ध इतिहास संशोधक श्री. य. खु. देशपांडे यांच्या उपस्थितींत 'जनतेच्या आरोग्याचा प्रश्न' या विषयावर व्याख्यान झालें. रात्रीं एलिचपूर येथील राधाबाई देशमुख दवाखाना पाहिला व वैद्य एस्. एस्. महाजन ए. एम्. एस्. यांच्या निवासस्थानीं "बनारस आयुर्वेद महाविद्यालयाच्या पदवीधरांच्या अडचणी" यासंबंधीं महत्वाची चर्चा झाली. आयुर्वेद पत्रिकेसाठीं लेख-रूपानें ती माहिती देण्याची सूचना करण्यांत आली आहे.

हेल्थ गार्ड्सची आवश्यकता

ता. २३ रोजीं वै. विंदुमाधव हे अकोला येथें गेले व तेथें त्यांनीं वैद्य एल्. टी. शहा आयुर्वेदतीर्थ यांची भेट घेऊन विदर्भ पदवीधर वैद्य मंडळाच्या कार्याची माहिती घेतली. सहकारी पद्धतीनें करावयाच्या औषधीकरणाचाहि चर्चा झाली. तिसऱ्या प्रहरीं टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिरमध्यें अस्थिभंग विकारानें आजारी असलेले श्री. आबासाहेब कुलकर्णी यांची भेट घेतली व रात्रीं ८॥ वाजतां त्या संस्थेतील २०० विद्यार्थी शिक्षक यांच्या समोर व्याख्यान देऊन स्वातंत्र्यकाली होमगार्ड्स् प्रमाणेंच हेल्थ गार्ड्स् निर्माण करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. ज्यांना वैद्यकीय अभ्यासक्रम आवडत असेल त्यांनीं नवीन ३॥ वर्षांचा अभ्यासक्रम घ्यावा व इतरांनीं रोज १ तास समाजाची आरोग्यविषयक सेवा [सफाई, प्रकृतिभेदानें रसायन चूर्णे देणें, बाळगुटी इ.] करण्याचें अंगिकारावें असें सुचविलें.

प्रांतीय वैद्य मंडळाची सभा

ता. २४ रोजीं सकाळीं वैद्य पंडित भुसावळ येथे म. प्रां. वैद्य-मंडळाच्या स्थायी व कार्यकारी मंडळाच्या सभेसाठीं गेले. तेथें त्यांनीं वै. वि. श्री. पाठक, सौ. गिरिजाबाई झोपे, वै. करमरकर, वै. सुभानराव पाटील, वैद्य चौधरी आदि मंडळीशीं व प्रांतीय अध्यक्ष मंत्री यांच्याशीं विविध प्रश्नावर विचारविनिमय केला.

अशा रीतीनें हा १० दिवसाचा दौरा आयुर्वेद प्रचाराच्या दृष्टीनें यशस्वी रीत्या पार पडला.

पवित्र
नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहाः-नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

" गृहवैद्य "
क्षारचिकित्सेवरील लोकप्रिय ग्रंथ. नवीन भावनाकोशासह किं. फक्त ३ रु. ट. ख. निराळा.
(१) वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक
(२) डॉ. गर्दे, २६ मोंगल लेन, मुंबई १६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्ध आयुर्वेद समितीची पहिली बैठक

मुंबई सरकारनें नेमलेल्या शुद्ध आयुर्वेद समितीची पहिली सभा गुरवार ता. २९ आक्टोबर रोजीं दुपारीं २ वाजतां बौद्ध भवन, औटॅरमरोड मुंबई १ येथें भरली होती. सभेस पुढील सभासद हजर होते:- वैद्य वामनराव दीनानाथ (अध्यक्ष), वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी पुणें, वै. दा. अ. हळदीकर हुबळी, वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर नशिराबाद, वैद्य लक्ष्मीशंकरशास्त्री अहमदाबाद, वै. त्र्यंबकलाल दे. जोशी भडोच, व वै. ना. ह. जोशी [मंत्री].

सभासदांचा परिचय

सभेचे सुरवातीस नामदार आरोग्यमंत्री शांतीलालजी शहा यांना, समितीचे अध्यक्ष वैद्यराज वामनराव दीनानाथ यांनीं समितीचे सभासदांचा परिचय करून दिला व या समितीला मार्गदर्शनपर चार शब्द सांगण्याची नामदार आरोग्यमंत्री यांना विनंति केली.

सर्व मंत्रीमंडळाचा पाठिंबा

शुद्ध आयुर्वेदास प्रोत्साहन देण्यासाठीं हा जो सरकारी हुकूम निघाला व समिति नेमली गेली हे सर्व वै. वामनरावजी दीनानाथ, समितीचे सेक्रेटरी ना. ह. जोशी व वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी यांच्या प्रयत्नाचें फळ आहे. त्याचप्रमाणें नामदार मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनीं आग्रह धरल्यामुळेंहि हें कार्य होऊं शकलें. मंत्रीमंडळांतील सर्व मंत्र्यांच्या एकमतानें ही गोष्ट झालेली आहे.

प्रगतीसाठीं पहिलें पाऊल

मी स्वतः कोणत्याही शास्त्राचा पक्षपाती नाहीं. जनतेला जें रोगाचें दुःख होत आहे, तें दुःख नाहींसें करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. रोग नाहींसा करण्याचे जे अनेक मार्ग आहेत त्यापैकीं आयुर्वेद हा एक आहे. गेलीं १५० वर्षें या शास्त्राकडे दुर्लक्ष झालें होतें, त्याची हेळसांड झाली होती. त्याचे प्रगतीस वाव मिळाला नव्हता; या दृष्टीनें सरकारनें हें पहिलें पाऊल टाकलें आहे.

गुरुपरंपरेमुळें उत्तम संस्कार

विद्यालयामध्यें अनेक विद्यार्थी एका वर्गांत असतात. प्राध्यापक येतात, त्यांना जें शिकवावयाचें तें शिकवतात व निघून जातात. परंतु त्यामुळें विद्यार्थ्यांचे मनावर उत्तम संस्कार होऊं शकत नाहींत. परंतु गुरुपरंपरेनें शिकलेल्या विद्यार्थ्यांचे मनावर चांगले संस्कार होऊन त्यांचे मध्यें इतर ठिकाणीं जी माणुसकी गेलेली आढळते तशी न आढळतां ती या गुरुपरंपरेनें वाढीस लागेल असें वाटते. विद्यार्थी या अभ्यासक्रमाला भरपूर व चांगले मिळतील.

टीका ऐकण्याची संवय

समितीनें गुरूंना मान्यता देण्याचें काम सरकारवर सोपवावें हें चांगलें. यामध्यें आपला अधिकार काढून घेतला असें समजू नये. यामुळें कमेटीमध्यें आपआपसांत मतभेद होण्याचा संभव असतो. शिवाय सुरवातीसच जनतेची तीव्र टीका ऐकण्याची पाळी येते व त्यामुळें कार्यांत विघ्न येण्याचा संभव अधिक. सरकारला टीका ऐकण्याची संवय झालेली आहे.

परीक्षा घेतांना काळजी घ्या

परीक्षा घेणें, त्यांची व्यवस्था, निकाल यांची जास्तीत जास्त काळजी घेण्याचा प्रयत्न करावा, त्यामुळें हल्लीं चहुंकडे घोटाळे ऐकू येतात, ते एकूं येणार नाहींत.

माहितगार कारकून नेमावा

सरकारनें नेमलेल्या कोणत्याहि समितीचा व सरकारचा संबंध त्या खात्याच्या प्रमुख अधिकाऱ्यामार्फत असतो. सरळ मंत्र्याशीं नसतो. या समितीचे खर्चास मंजुरी देण्याचें काम सर्जनजनरलचें असतें व यादृष्टीनें सरकारी कायदेकानू माहीत असलेला कार-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करून समितीचे मदतीला अवश्य पाहिजे. समितीचे सभासदांना कायदेकानू, सरकारी यंत्रणा याची माहिती नसल्यामुळे ही आवश्यकता जास्त आहे. तशी सूचना सर्जनजनरलना आम्ही केली आहे.

मंजूर झालेली रक्कम बरीचशी अपुरी पडेल असें वाटते. अर्थखातें फार बारकाईनें वागत असते. तरी पण वाजवी खर्चाचे बाबतींत योग्य अंदाजपत्रक करून त्याची मागणी केली पाहिजे. पुढें ६ महिन्यांनीं काय खर्च करावा लागणार आहे याचें अंदाजपत्रक अगोदर करावयास पाहिजे. कोणतेंही कार्य सरकारी सर्व यंत्रांतून येण्यास बराच कालावधि लागत असल्यामुळे सभासदांनीं शान्तिपूर्वक धैर्याचा अवलंब करून नियंत्रणाचें परिपालन केलें पाहिजे.

समितीनें एखाद्या गोष्टीचा निर्णय घेतल्यानंतर सभासदांनीं त्याला विरोधी असें मतप्रदर्शन बाहेर करूं नये. इंग्लडचे कॅबिनेटची सभा संपल्यावर सभेत घेतलेल्या निर्णयाखेरीज इतर सर्व कागद तेथेंच जाळून टाकले जातात. सर्वांनीं प्रेसला काय बातमी द्यावयाची ते ठरवून ती द्यावी.

आयुर्वेदीय गुरुजनांना विनंति

शेवटीं गुरुंना माझें सांगणें आहे कीं गुरुजनांनीं आपलें हृदय शिष्याला अर्पण करून विद्यादान करावें व 'शिष्यात् इच्छेत् पराजयम्' अशा दर्जाचे विद्यार्थी निर्माण करण्याची दक्षता घ्यावी म्हणजे या समितीचे कार्य सफल झालें असें समजतां येईल.

यानंतर समितीचे अध्यक्षासह सर्व सभासदांचा नामदार मंत्र्याचे समोर शपथविधि झाला.

वै. वामनराव दीनानाथ यांनीं ना. मंत्र्याचे आभार मानल्यावर मंत्रिमहाशय निघून गेले व अध्यक्षांचे अध्यक्षतेखालीं सभेच्या पुढील ठरावाचें काम झालें.

ठराव १] आयुर्वेदतज्ज्ञ व आयुर्वेदीय संस्था यांचेकडून सरकारनें सुचविलेल्या नियमानुसार अभ्यासक्रम यशस्वी करण्याकरितां गुरु व आयुर्वेदीय पाठशाला यांची पात्रता काय असावी याबद्दलचे विचार मागवावे. १५ डिसेंबरपर्यंत आलेल्या सूचना विचारांत घेतल्या जाव्यात. सूचक- गणेशशास्त्री जोशी

अनुमोदक- वै. लक्ष्मीशंकरशास्त्री

ठराव २]- सरकारनें मंजूर केलेला पाठ्यक्रम संपूर्णपणें यशस्वी होण्याकरितां कोणत्या ग्रंथांचे साहाय्यानें शिक्षण द्यावें याबद्दल तज्ञांनीं अभिप्राय कळवावेत. सूचक- वै. लक्ष्मीशंकरशास्त्री

अनुमोदक- वै. गणेशशास्त्री जोशी

ठराव नं. ३ आजची ही सभा खालील सभासदांची एक उपसमिति निवडित आहे. त्या समितीनें आलेल्या सूचनांचा विचार करून तो पुढील सभेपुढें मांडावा. समितीचे सभासद (१) अध्यक्ष, (२) सेक्रेटरी, (३) वै. भू. गणेशशास्त्री जोशी

सूचकः- वै. लक्ष्मीशंकरशास्त्री

अनुमोदकः- वै. दा. भ. हळशीकरशास्त्री

४) सरकारनें प्रवेशाकरितां बनारस संस्कृत महाविद्यालयाची प्रथमा परीक्षा व तत्सम इतर परीक्षोत्तीर्णांना प्रवेशयोग्य ठरविलें आहे. तरी या परीक्षेच्या तोडीच्या भारतांतील संस्कृत शिक्षणसंस्था ज्या परीक्षा, व परीक्षासंस्था असतील त्यांची संपूर्ण माहिती माहिती-पत्रकासह कळवावी. १५ डिसेंबरपर्यंत आलेल्या सूचनाचा विचार होईल.

सूचकः- वै. जळूकरशास्त्री

अनुमोदनः- वै. हळशीकरशास्त्री

वैद्यांचा कोजागिरी कार्यक्रम

दिनांक २२।१०।५३ रोजीं रात्रीं नाशिकशहर वैद्य मंडळाचे सदस्यांनीं कोजागिरीनिमित्त वैद्यराज गोगटे ह्यांचे निवासस्थानाजवळील मोकळ्या जागेंत जमून दुग्धपान केलें. खालील वैद्यमंडळी उपस्थित होती. वै. गोगटे, लेले, देशपांडे, तर्टे, सौ. यमुताई गोगटे, लोखंडे, मराठे, शामराव कुलकर्णी, मो. दा. पाटणकर, स. वा. दातार, त्र्यंबकशास्त्री दाते, भानोशे, दाणी, वा. ना. आंबर्डेकर, मु. ना. हडपे, के. एन. कुलकर्णी. यावेळींहि नाशिक येथें आयुर्वेद विद्यालय काढण्याच्या बाबतींत उत्साहपूर्वक चर्चा झाली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार—

प्रतापलंकेश्वरांत मिरें

आयुर्वेद पत्रिकेच्या १६ सप्टेंबर १९५३ च्या अंकांत वैद्यराज धामणकरशास्त्री यांचा सहकारी पद्धतीने तयार करण्याचीं औषधें या सदराखालीं प्रतापलंकेश्वर औषधाची माहिती आली आहे, त्याबद्दल थोडा खुलासा करीत आहे.

प्रतापलंकेश्वराचे पाठांत 'ऊषण' शब्द आहे त्याचा वै. धामणकर यांनीं चित्रक असा केला आहे. त्याप्रमाणें अर्थ वै. गुणेशास्त्री यांच्या औषधीगुणधर्मशास्त्र या पुस्तकांतहि केला आहे. सदर शब्दाचा 'मिरें' असा करणेची आमची परंपरा आहे. औषधीगुणधर्म-शास्त्र, मधील 'चित्रक' असा अर्थ पाहून मी गुरुवर्य हणमंतशास्त्री पाध्ये यांस समक्ष विचारलें. त्यांनींहि 'मिरें' असाच अर्थ केला पाहिजे व आमचीहि तीच पद्धत आहे, कारण 'मिरे' वातनाशक आहे व या ठिकाणीं वातनाशकच क्रिया पाहिजे आहे असें सांगितलें. पुढें मी, वै. गणेशशास्त्री जोशी पुणें यांचेकडेहि विचारणा केली होती. त्यांनींहि आपला परिपाठ मिरे घेणेचा आहे असें कळविलें त्या गोष्टीला १०-१२ वर्षे झालीं.

मल्लसिंदूर + प्रतापलंकेश्वर मिश्रण

मींहि गेलें ३०।३५ वर्षे मिरे घेऊनच हें औषध तयार करीत असतो व त्यानें उत्तम प्रकारचा व लवकरच गुण येतो असा अनुभव आहे. इतकेंच नव्हे तर कोणालाहि विषारी जखमेपासून ताप सुरू झाला असतां हें औषध पोटांत देऊन ताप खात्रीनें जातो असा अनुभव आहे. मागें पुण्यास 'वैद्यक पत्रिका' पत्र निघत होतें, त्या वेळीं 'धनुर्वात' यावरील लेखांत संपादकानें त्यावरील चिकित्सेंत मल्लसिंदूर + प्रतापलंकेश्वर मिश्रण देण्याची पद्धत असलेचा उल्लेख केला आहे. तरी या दृष्टीनें विचार व्हावा असें मला वाटतें, म्हणून मुद्दाम आपणांस कळविलें आहे. आपणांस सदर माहिती उपयुक्त वाटल्यास आयुर्वेद पत्रिकेंत प्रसिद्ध करावी.

नागपूर

—वैद्य नारायण जयराम पाध्ये

अनुक्रमणिका

नागपूर विद्यापीठांत आयुर्वेदीय संशोधन	२८९
आयुर्वेदीय अभ्यासक्रमासंबंधीं लोकमत	२९०
महाराष्ट्र प्रान्तीय वैद्य मंडळ, सभावृत्त	२९१
संयुक्त खानदेश वैद्य मंडळ, सभावृत्त	२९३
यशस्वी चिकित्सक होण्याचा मार्ग	२९४
वातविध्वंसरस	२९५
महावातविध्वंसरस	२९६
लघुवातविध्वंसरस	२९७
वडवानलरस	२९८
शंखवटी (लघु) (बृहत्)	२९९
सिंदूरभूषण	३०१
राज्यमान्य शुध्दायुर्वेदीय पाठ्यक्रम	३०१
चुन्याची निवळी	३०७
विंचूदंशावर मीठ पाणी	३०८
त्रयोदशगुणी तांबूल	३०८
निखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठ, दिल्ली	३०९
बिब्बा—भिलावा	३११
आयुर्वेद शिक्षण मंडळ, नाशिक	३१५
मध्यप्रदेशांत आयुर्वेदाचा प्रचार	३१७
शुद्ध आयुर्वेद समितीची पहिली बैठक	३१९

धन्वन्तरी उत्सव, नाशिक

नाशिक शहर वैद्य मंडळातर्फे सालाबादप्रमाणें धन्वन्तरी उत्सव साजरा करण्यांत येणार आहे. तत्प्रीत्यर्थ दिनांक १ पासून पुढीलप्रमाणें व्याख्यानें ठेवली आहेत.

स्थळः– वैद्य दातारशास्त्री यांचा दवाखाना, सरकारवाड्याजवळ. वेळ दुपारीं ४ वाजतां.

वक्तेः– दिनांक १ वै. वा. स. मराठे, दि. २ वै. गो. गं. तरटे, दि. ३ वै. त्र्यंबकशास्त्री दाते, दि. ४ वै. बिंदुमाधवशास्त्री पंडित.

ता. ४ चा कार्यक्रम

४ ते ४॥ 'श्रीं' ची पूजा, ४॥ ते ५॥ वैद्य बिंदुमाधवशास्त्री यांचें 'आयुर्वेदीय उदक विचार' या विषयावर व्याख्यान व नन्तर प्रसाद.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुमच्या दवाखान्याची भरभराट ५०% खात्रीनें वाढेल.

एकवेळ हीं प्राणिज औषधें वापरून जरूर खात्री करा !

अभ्रकभस्म १००पुटी अजारक्तभावित १ तो. १० रु.	अकीकभस्म (हृदयास शक्ति देणारें) ५ तो. ४ रु.
अजायकृत्भस्म (रक्तवर्धक) ,, ४ ,,	कपर्दिकभस्म ,, १।।।
अजाफुप्फुसभस्म (क्षय, कास) ,, ४ ,,	कासव (कछुवा) भस्म ,, ४
अजा-अस्थिभस्म ,, ३ ,,	कर्कट (खेकडा) भस्म ,, ३
गांडूळ(भूनाग)भस्म (बाळंतिणींस उपयोगी ,, ४ ,,	जहरमोहराभस्म (गुलाबांत) ,, २।।
ताम्रभस्म (अनेक वनस्पतियोगानें बनविलेलें),, २ ,,	कुक्कुटांडभस्म ,, ३।।
पोलादभस्म (अपूर्व टॉनिक, रक्तवृद्धि) १ तो. ४ ,,	प्रवाळभस्म (सूर्यपुटी) ,, ३।।
संगे यशब (मेंदूस, हृदयास शक्ति देणारें),, २ ,,	प्रवाळभस्म (चंद्रपुटी) ,, ३।।
मिश्रशक्तिसागर (चमत्कारिक टॉनिक) १ बा. २ ,,	मंडूरभस्म (त्रिफळागोमूत्रांत) ,, १।।।
युनानीतिळा(रजि.)(चोळण्याचें इंद्रियोत्तेजक),,२।।,,	मौक्तिकशीप (शौक्तिक) भस्म ,, १।।।
त्रिफळाचूर्ण (वस्त्रगाळ) १ शेरास १ ,,	शंखभस्म (निंबू कुमारीरस) ,, १।
गुळवेलसत्व (असली कडुनिंबावरील) ५ तो. २ ,,	हरताळ गोदंतीभस्म ,, १
सांबरशृंगभस्म (न्युमोनिया) ,, १। ,,	वेरपत्थर भस्म (मूत्ररोगावर) ,, ३

मिश्रा महाराष्ट्र फार्मसी (रजि.) ब्रह्मपुरी (चांदा) म. प्र.

खोकला म्हणजे त्रासच !

कास्फोच्या मदतीनें तो आपण सहज दूर करूं शकतां.

★ कास्फो हा खोकला, सर्दी, घशाची खवखव, ब्रान्कायटिस इ० विकारांवर खात्रीशीर उपाय आहे.

★ कास्फो वड्या चवदार असून गुणकारी आहेत.

★ १२ गोळयांच्या टयूबला ७ आणे, ३५ गोळया १ रु., ६५ गोळया १।। रु. ह्या भावानें सर्व केमिस्टांकडे कास्फो मिळूं शकतो.

कास्फो

आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड (आफालि) अहमदनगर.

EVEREST

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

संपादक व प्रकाशकः— वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, मेनरोड, नाशिक
मुद्रकः— श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, आग्रारोड, नाशिक

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु.   सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

(वर्ष ७ वें)   नाशिक, ता. १६ नोव्हेंबर १९५३   (अंक १० वा

आयुर्वेद संशोधनाबाबत मुंबई सरकारचें आश्वासन !

" आयुर्वेद संशोधनाचें काम आयुर्वेदतज्ज्ञाकडेच सोपविलें जाईल "

" आयुर्वेद ही भारताची प्राचीन उपचारपद्धति आहे. जगांत वैद्यकीच्या निरनिराळ्या [प]द्धति रूढ आहेत. प्रत्येक पद्धतीस आपला उत्कर्ष साधण्याची योग्य संधि मिळावयास पाहिजे. [प]ण कोणत्या चिकित्सापद्धतीचा स्वीकार करावयाचा हें जनतेनेंच ठरविलें पाहिजे.

आयुर्वेद ही आपल्या रक्तामांसांत भिनलेली चिकित्सा-पद्धति आहे. आयुर्वेदाचें पुनरुज्जीवन करण्याचा आपण शक्य तो प्रयत्न केला पाहिजे. तसेंच आयुर्वेद चिकित्सापद्धतीची शुद्धता राखण्याचाहि आंपण प्रयत्न केला पाहिजे.

अ. भा. आयुर्वेद कॉंग्रेसची सूचना

" आयुर्वेदांत निष्णात असलेल्या लोकांनींच आयुर्वेदाच्या संशोधनाचें कार्य हातीं घ्यावें; इतरांनीं त्यांत गोंधळ माजवू नये असें अखिल भारतीय आयुर्वेद महामंडळानें सरकारला सुचविलें आहे. त्यांच्या या सूचनेच्या अंमलबजावणीकडे मुंबई सरकार योग्य तें लक्ष पुरवील असें मी आश्वासन देतो. " असे उद्गार मुंबई राज्याचे प्रधानमंत्री नामदार मुरारजी देसाई यांनीं मुंबई येथें लॅमिंग्टन रोडवर युनिव्हर्सल हेल्थ इन्स्टि-[ट्यूट]तर्फे सुरूं करण्यांत आलेल्या हॉस्पिटलचें उद्घाटन करतांना काढले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या हॉस्पिटलचें उद्घाटन करण्याची विनंति करतांना अ. भा. आयुर्वेदिक काँग्रेसचे अध्यक्ष प. शिवशर्मा म्हणाले कीं आयुर्वेद संशोधनाचें कार्य आज मुंबई सरकारनें व भारत सरकारनें ॲलोपॅथी चिकित्सापद्धतीच्या अनुयायांच्या (डॉक्टरांच्या) कडेच सोपविलेलें आहे. डॉक्टरमंडळीं आयुर्वेदाकडे उपेक्षेच्या भावनेनेंच बघतात. ॲलोपॅथीला सरकारनें मदत करू नये असें आमचें म्हणणें नाहीं. मात्र आमच्या प्राचीन चिकित्सापद्धतीकडेहि सरकारनें आपुलकीनें लक्ष पुरवावें अशी आमची मागणी आहे.

मध्यप्रदेशचे माजी राज्यपाल श्री. मंगळदास पक्वासा म्हणाले:—" आयुर्वेदास प्राचीन वैभव प्राप्त करून देण्याची हीच वेळ आहे. या शास्त्राचा जनतेंत अधिक प्रचार व्हावयास पाहिजे. जनतेच्या आजच्या वैद्यकीय गरजा पुरविण्याकडे फारच कमी लक्ष देण्यांत आहे. गुणकारी अशी आयुर्वेदीय औषध आम जनतेस स्वस्त किंमतींत कशी मिळतील इकडे सरकार व वैद्य यांनीं लक्ष पुरविलें पाहिजे."

शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समिति, बम्बई राज्य

माननीय महोदय ! सादर प्रणाम !

आपको विदित है कि बम्बई सरकारने शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम विद्यालयोंद्वारा तथा गुरुपरंपरा पद्धतीसे पढानेके लिये सम्मति प्रदान कर सकी सिद्धताके लिये एक समिति भी नियुक्त की है। समितीका यह कार्य सुचारु रूप सिद्ध होनेके लिये आपका सहयोग अपेक्षित है। और समितीको विश्वास है कि आपकी सुयोग्य सूचनाऐं भेजकर आप समितीको उपकृत करेंगे और कार्य सिद्धीमें हाथ बटायेंगे।

सूचनाओंके अपेक्षित विषय

१) शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम पढाईके लिये अध्यापक (गुरु) पात्रता।
२) शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम पढाईके लिये शिक्षण-संस्थाओंकी पात्रता।
३) पाठ्यक्रम नियुक्त विषयोंके शेयांश और ग्रंथांश (नियुक्त विषयोंका परिचय-पत्रक इस पत्रके साथ संलग्न है।)
४) छात्रोंकी प्रवेश पात्रताके लिये बनारस संस्कृत कॉलेजकी प्रथमा परीक्षाके समकक्ष अन्य संस्कृत परीक्षायें (संपूर्ण अभ्यासक्रम परिचय तथा मुद्रित परिचय पत्रकके समेत) १५ डिसेंबर १९५३ तक समितिके कार्यालयमें अपनी उपयुक्त सूचनाऐं भेजनेकी कृपा करें। कष्टके लिये क्षमा—

अस्थायी कार्यालय:—
४५ कॅथेड्रल स्ट्रीट
भुलेश्वर, मुंबई २

भवदीय
वामनराव दीनानाथ वैद्य, अध्यक्ष
ना. ह. जोशी वैद्य, मंत्री

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

– प्रकट निमंत्रण –

आयुर्वेद तज्ज्ञांची विद्वत् परिषद, मुंबई

मुंबई सरकारनें शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम व गुरुपरंपरा पद्धतीस मुंबई प्रांतांत प्रचलित करण्यास ान्यता देऊन एक फार मोठें कार्य केलें आहे. आतां सरकारची ही मान्यता सफल करण्याची फार मोठी ाबाबदारी शुद्ध आयुर्वेद पक्षपाती वैद्यवर्गावर आलेली आहे. यासाठीं शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम शिकवणा णारीं विद्यालयें मुंबई प्रांतांत निघणें अत्यावश्य आहे. त्याबरोबरच विद्यालयांतून कार्य करूं न शकणारे न्तु आयुर्वेदाचें यथार्थ ज्ञान शिष्यास देऊन आपणासारखे शिष्य तयार करण्याची योग्यता असणाऱ्या ंनाहि लाभ व्हावयास हवा. तसेच हा पाठ्यक्रम कसा यशस्वी करतां येईल याविषयीं आणखीहि याच प्रश्नांचा उलगडा होऊन निर्णय घेतला गेला पाहिजे व नंतरच प्रत्यक्ष कार्यारंभ होणें इष्ट आहे.

असा विचार करून महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ, महागुजरात प्रांतीय वैद्य मंडळ, मुंबई उपनगर द्य मंडळ आणि अखिल कर्नाटक प्रांतीय वैद्य मंडळाचे वतीनें येत्या दिनांक २८ व २९ नोव्हेंबर १९५३ निवार--रविवारीं मुंबई येथें आयुर्वेद तज्ज्ञांची एक विद्वत् परिषद घेण्याचें ठरविलें आहे.

तरी शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमाभिमानी वृद्ध वैद्य व अध्यापक भिषग् वृंदांस विनंति आहे कीं त्यांनीं या सभेस अवश्य उपस्थित राहून शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम सर्वपरी कसा यशस्वी करतां येईल याविषयीं मार्गदर्शन करावें. त्यापूर्वीं आपापल्या विचारांचें दिग्दर्शन खालील पत्त्यावर पत्रद्वारां करावें. म्हणजे येणाऱ्या सर्व विचारांचा संकलित परामर्श प्रत्यक्ष परिषदेंत घेणें सोयीचें होईल. आपण निश्चित येणार असल्याचेंहि अगोदरच शक्यतों लौकर सूचित करावें. येणें अशक्य असेल त्यांनींहि आपले विचार पत्रद्वारें कळवावेत.

या सभेचें नेतृत्व जबलपूरचे विद्वद्वर भिषगाचार्य श्री. भिकाजी विनायक डेग्वेकरशास्त्री एम्. ए., एम्. एस्सी. एल्एल् बी. हे करणार असून मुंबई व अन्य प्रांतीय तज्ज्ञांनाहि निमंत्रण केलें आहे. तथापि नजरचुकीनें कोणास निमंत्रणपत्रिका पाठविली गेली नाहीं ोहि हें आपलें कार्य आहे या भावनेनें हें प्रकट निमंत्रण स्वीकारून उपस्थित राहून ही परिषद शस्वी करावी अशी सर्व आयुर्वेद तज्ज्ञांस नम्र प्रार्थना आहे.

आपले नम्र

वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर.	**वैद्य वामनराव दीनानाथ व्यास**
अध्यक्ष, महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळ.	अध्यक्ष, महागुजरात प्रां. वै. मंडळ.
वैद्य न. सरुलाराध्यशास्त्री	**वैद्य वेणीमाधवशास्त्री जोशी**
अध्यक्ष, अखिल कर्नाटक प्रां. वै. मंडळ	अध्यक्ष, मुंबई उपनगर वै. मंडळ.

पत्रव्यवहाराचा पत्ताः– अध्यक्ष, महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ, कार्यालय मु. पो. भुसावळ (पू. खा.)

(संमेलनाची मुंबईतील जागा मागाहून वृत्तपत्रद्वारें जाहीर होईल. मुंबईस समक्ष भेटू इच्छिणाऱ्यांनीं ॰ कॅथेड्रल स्ट्रीट, भुलेश्वर मुंबई २ या पत्यावर वैद्य वामनराव दीनानाथ यांना भेटावें.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्रीधन्वन्तरी उत्सव, दादर

दादर येथें वैद्य रघुनाथशास्त्री तांबवेकर यांच्या महाराष्ट्र आयुर्वेद विद्यार्थी संघांत धन्वंतरी उत्सव साजरा झाला.

सभेचे अध्यक्ष स. का. पाटील यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें कीं सर्व वैद्यांनीं सरकारजवळ मागणी मागण्यापेक्षां जनतेचीं मनें आपणांकडे आकर्षित करून घ्यावीत व जनतेकडून अशी एकमुखी जोरांची मागणी झाल्यास सरकारला अवश्य सत्वरतनें तें सर्व करावें लागेल. सध्या व गेलेल्या कांहीं काळांत लोकांच्या मनांवर जो परिणाम झालेला आहे त्यामुळें असेंच चहूकडे पाहावयास मिळतें कीं लोक डॉक्टर-कडेच आपलें आरोग्य सोंपवितात. तरी सर्व वैद्यांनीं आपल्या प्रभावी वर्तनानें व भाषणानें लोकमनावर आयुर्वेदीय चिकित्सेची आकर्षकता वाढवावी.

वैद्यांनीं जनतेचीं मनें जिंकावींत

प्रत्येक वैद्यानें पूर्णतः अध्ययन करून साधी गोष्ट देखील लोकांच्या मनावर चांगल्या प्रकारें बिंब-वण्याचा प्रयत्न करावा. सध्यां मुंबईंत असलेले पंडित शिवशर्मा आपल्या पूर्ण विद्वत्तेनें व गोड भाषणानें लोकांच्या मनावर फार चांगला परिणाम करित आहेत. असेंच सर्व वैद्याकडून होत गेल्यास आपणांस आयुर्वेदाची निराळी परिस्थिति पहावयास मिळेल."

आम्ही वैद्यहि नाहीं व डॉक्टरहि नाहीं

आरोग्यउपमंत्री श्री. जत्ती म्हणालेः- कित्येक वैद्य व इतर लोक सरकारनें प्रसिद्ध न केलेल्या गोष्टी कल्पित करून त्या सरकारनें ठरविल्या आहेत असें समजून त्यावर आपले योग्ययोग्य विचार कळवीत असतात. आम्ही वैद्यही नाहीं व डॉक्टर नाहीं. आम्हीं लोकांच्या मागणीप्रमाणें वागणारे आहोंत. तरी सध्याचें सरकार जनतेच्या हितासाठीं योग्य ते करणारें आहे असें सर्वांनीं समजावें.

या सभेसाठीं चेंबूरचे श्रीमंत आबासाहेब सांडू वगैरे मंडळी उपस्थित होती.

श्रीधन्वन्तरी उत्सव, नशिराबाद

अश्विन व॥ १३ दिनांक ४-११-५३ बुध-वारीं वैद्यप्रवर दत्तात्रेयशास्त्री जळूकर यांचे चिकित्सा-गृहांत आयुर्वेदतीर्थ श्री. भि. श्री. कुळकर्णी यांचे अध्यक्षतेखालीं प्रतिवर्षानुसार श्रीधन्वन्तरीउत्सव साजरा झाला. समारंभास स्थानिक वैद्य व गांवांतील कांहीं निमंत्रित सभ्यगृहस्थ उपस्थित होते. समारंभा निमित्त आयुर्वेदाचार्य श्रीरामकृष्ण करमरकरशास्त्री यांचे "शुद्ध आयुर्वेदीय चिकित्सापद्धति" या उपयुक्त विषयावर अत्यंत विचार परिप्लुत व मार्गदर्शक व्याख्यान झालें. नंतर वैद्य अ. वा. नाईक, वैद्य जळूकरशास्त्री व त्यांचे चिरंजीव भावी वैद्य श्रीनिवास जळूकर यांचीं समयोचित भाषणें झाल्यावर अध्यक्ष वै. कुळकर्णी यांनीं योग्य समारोप केला. शेवटीं प्रभु धन्वन्तरींची आरती, मंत्रपुष्प व प्रसादवितरण झालें.

सल्ला मोफत

सर्व औषधें तयार करणाऱ्या लोकांना आमचा असा आग्रहाचा सल्ला आहे कीं, औषध तयार करण्यापूर्वीं त्यांतील द्रव्यें स्वच्छ व शुद्ध आहेत किंवा नाहीं याची खात्री करा. तरच तुमचें औषध चांगलें तयार होईल.

अशा ताज्या व स्वच्छ औषधी द्रव्यांच्या खरेदीसाठीं आपण

ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी, मुंबई ३

यांजकडे चौकशी करा. अधिक माहितीसाठीं आमचा कॅटलाग मोफत मागवा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय औषधीप्रयोगाचा नवीन शोध

सूक्ष्म पेय औषधें :

(लेखकः-आयुर्वेदरत्न सुंदरराव भास्करराव वैद्य
अल्. अम्. अी. २३ भाअी जीवनजी गल्ली, मुंबई २)

आयुर्वेदरत्न ही माझी पदवी आहे. मी फुकट औषधें देतों म्हणून मी रजिस्टर्ड वैद्य नाहीं. मी ॲलोपथी, ॲलोपथी, बाराक्षार, होमिओपथी, इलेक्ट्रो-होमिओपॅथी, आयुर्वेदीय काढे, संजीवनचिकित्सापद्धति वगैरे पथींचा अनुभव घेतला आहे. क्रोमोपथींत निरनिराळ्या रंगांच्या बाटल्या घेऊन त्यांत पाणी भरून उन्हांत ठेवतात व तें पाणी निरनिराळ्या रंगांच्या किरणांचें म्हणून ओळखलें जातें. खेड्यांत रहात असतां आम्हीं निळ्या रंगाच्या बाटलींत पाणी तयार करीत होतों. एका रात्रीं मला एक विंचू चावला तेव्हां निळें पाणी पिण्यास घेतलें. विंचवाचें विष वर न चढतां त्याच जागीं ठुसठुस करीत राहिलें. होमिओपथी इलेक्ट्रोहोमिओपथी व संजीवनचिकित्सापद्धति ह्यांत सूक्ष्म औषधांचा उपयोग करीत असतात.

डॉक्टरी औषधानें गुण न येतां यकृत् वाढलें

सन १८९६ मध्यें मला ताप आला. डॉक्टरांचें औषध चालू केलें त्यावेळीं यकृत् वाढलें. एम. अे. एम. डी. अशा अेका मोठ्या ओळखीच्या डॉक्टरांचें औषध चालू केलें. तीन महिने औषध चालू होतें. गुण न येतां यकृत वाढत चाललें व नीट चालतां येअीना. शेवटीं डॉक्टरनें माझ्या वडील बंधूंस सांगितलें कीं, यकृत् बरें व्हावयाचें नाहीं. तुमच्या गांवीं बाहेरगांवीं नेऊन लासऽ देऊन पहा.

मोहरीएवढी गोळी + शिसाभर पाणी

नंतर माझ्या बंधूंनीं मला प्रसिद्ध थिऑसफिस्ट बारामतात्या यांजकडे औषधासाठीं नेलें. ते मुंबई-तील कोटांत होमिओपॅथीचीं व अिलेक्ट्रो-होमिओ-पॅथीचीं औषधें फुकट देत असत. त्यांनीं पहिल्याच वेळीं बरें करितों म्हणून आश्वासन दिलें. त्यांनीं अिलेक्ट्रो-होमिओपॅथीचें अेक औषध (अेफ् १) दिलें. त्याची मोहरीएवढी अेक गोळी मोठा शिसा पाण्यानें भरून त्यांत घालण्यास सांगितलें. हें औषध थोडें थोडें पांच किंवा दहा मिनिटांनीं घ्यावयास सांगितलें. अशा रीतीनें औषधें घेऊन मोठें झालेलें

यकृत् पार बरें झालें. त्यानंतर आज ५७ वर्षें झालीं त्यापासून मला मुळींच त्रास झालेला नाहीं. तेव्हांपासून आम्हीं सूक्ष्म औषधें वापरू लागलो. होमिओपॅथींत स्पिरिट वापरावें लागतें म्हणून आम्ही तिच्याकडे ओढले गेलों नाहीं.

आयुर्वेदीय उपचार फार खटपटीचें काम

पुढें अण्णासाहेब पटवर्धन यांचें काढ्यांचें पुस्तक मिळाल्यावर देशी व स्वस्त म्हणून काढे वापरून अनुभव घेऊन पाहिला. ह्यांत अनुपान मुळींच नाहीं; परंतु निरनिराळीं औषधें विकत आणून तोलून त्याचा काढा करणें फार खटपटीचें काम होऊं लागलें. पुढें संजीवन चिकित्सापद्धतीचीं औषधें वापरूं लागलों व त्यांनीं गुणहि येतो याचा अनुभव घेऊन पाहिला.

मेथीचे २ दाणे + थंड पाणी

पुढें हीहि पद्धत सोडून आयुर्वेदीय पद्धतीची-

ऽ लाथ म्हणजे डाग देणें (भाजणें), खेडेगावांत हे उपाय करतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साधी वनस्पतींचीं औषधें वापरूं लागलो व तीहि थंड पाण्यांत सूक्ष्म प्रमाणांत देऊन गुण येऊ लागला. त्याचा अनुभव असा:- आमच्या गांवीं अेक अिसम १५ दिवस तापानें आजारी होता. कोणतेंहि औषध घेत नव्हता. त्यास माहिती विचारून मी औषध देऊं काय म्हणून विचारलें. त्यानें होय म्हणतांच त्यास एक मोठी बटली थंड व स्वच्छ पाण्यानें भरून आणण्यास सांगितलें. त्याच्या बाटलींत मेथीचे दोन दाणे वाटून टाकले व औषध थोडें थोडें दिवसभर घेण्यास सांगितलें. सकाळीं प्रकृति पहाण्यास गेलों तेव्हां त्याच्या पत्नीनें सांगितलें, ताप रात्रींच गेला व ते आतां बाहेर गेले आहत.

१ मिरा वाटून + ६ औंस पाणी

दुसऱ्या दोघांस मलेरियाचा ताप होता म्हणून सहा औंसाच्या बाटलींत अेकेक काळया मिऱ्याचा दाणा वांटून टाकला. दोघांचाहि ताप एका दिवसांत गेला. असा मी कित्येक महिने आयुर्वेदीय सूक्ष्म औषधें अनुपानाशिवाय देऊन अनुभव घेऊन पहात आहे. हा अनुभव चांगला येत आहे.

सर्व आयुर्वेदीयांस नम्र विनंति

आतां माझी सर्व आयुर्वेदीय वैद्यांस विनंति आहे कीं, ह्या नवीन शोधाचा उपयोग करण्यास त्यांनीं प्रवृत्त व्हावें. रोगावर मुख्य अेकच औषध कानकोरण्यांत राहील इतकें, सहा किंवा आठ औंस पाणी राहील अशा बाटल्यांत घालून द्यावें व तें वारंवार घेण्यास सांगावें. बाटली अर्धी झाली म्हणजे ती थंड पाण्यानें पूर्ण भरावी. असें कानकोरणभर औषध तीन दिवस घेण्यास सांगावें. आयुर्वेदीय वैद्यांनीं अशीं सूक्ष्म औषधें वापरून मला जर अनुभव कळविले तर फार उपकार होतील.

पुस्तक लिहिण्याचा विचार

माझा विचार ह्याचें एक पुस्तक लिहिण्याचा आहे. त्या पुस्तकांत जे वैद्य आपला अनुभव कळवितील त्यांनीं नांवें व कोणत्या रोगांवर कोणतें औषध वरील पद्धतीनें देऊन गुण आला हें प्रसिद्ध करण्यांत येईल. हें पुस्तक वाचून खेड्यापाड्यांतील शिक्षकांना किंवा दुसऱ्या कोणालाहि वैद्य होतां येईल. खेड्यापाड्यांत वनस्पति दाराशीं असतांना त्यांचा उपयोग लोकांना माहित नसतो. पावसाळ्यांत अनेक लोक हिंवतापानें आजारी पडतात. त्यांना जर ठाऊक झालें कीं, काळया मिऱ्याच्या एका दाण्यानें हिंवताप जातो तर त्याचें किती कल्याण होईल !

४ दिवसास १ आण्याचें औषध

अशी औषधें प्रसिद्ध करून मी गोळ्याहि करणार आहे. ह्या गोळया अगदीं स्वस्त मिळतील. खेड्यांत धंदा करणारांनीं एका गोळीचा एक आणा घ्यावा. एक आण्याचें औषध जरूर तर चार दिवस वापरतां येईल.

अनपायी रंगाचा प्रयोग करावा

आज माझें वय ८१ वर्षांचें आहे. जर देवाच्या मनांत असेल तर मी खेड्यापाड्यांतून आयुर्वेदीय वनस्पतींच्या सूक्ष्म, स्वस्त व गुणकारी औषधांचा प्रसार करीन. हा प्रसार माझ्यावरच अवलंबून न राहता साऱ्या वैद्यांनीं व सुशिक्षित लोकांनीं त्याचा प्रसार करण्यास हातभार लावावा आणि आपलें व लोकांचें कल्याण करण्यास निमित्त व्हावें. साध्या पाण्यांत दिलेलें औषध घेणारास नापसंत असेल तर पाण्यांत अपाय न करणारा असा साधा रंग औषधाच्या जोडीला घालावा.

श्रीधन्वन्तरी उत्सव भोपाळ

भोपाळचे आरोग्यमंत्री मौलाना तांझी मश्रकी भोपाळ येथ धन्वन्तरीउत्सवप्रसंगीं भाषण करतांना म्हणाले कीं आयुर्वेद हीच आपल्या राष्ट्रास अत्यंत उपयुक्त चिकित्सापद्धति असून तिच्या पुनरुज्जीवनाकडे आपण अधिक लक्ष द्यावयास पाहिजे. ही पद्धति अत्यंत स्वस्त आहे.

आयुर्वेद चिकित्सापद्धतींत आपली संस्कृति प्रतिबिंबित झाली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें —

५ सूतशेखर (भा. भै. र. ८२६१) :

लेखक-वै. पु. वि. धामणकर
धूतपापेश्वर-पनवेल

" सूतशेखर शामक असल्यानें हृद्यहि आहे. ...शेखराचा परिणाम वातवाहिन्यांवर शामक असा ...तो. रक्तवाहिन्यांवरहि ह्याच्या शामक गुणाचा ...णाम होतो. त्यांचें किंचित् आकुंचन होतें. अर्थ ... म्हणजे हृदयास काम थोडें कमी पडून त्याला ...वत् विश्रांति मिळते. असल्या प्रकारचें हें शामक औषध आहे.

रक्त निर्दोष करणारें औषध

सान्निपातिक ज्वरांत-विशेषतः आंत्रिकांत सूत-...राचा महत्वाचा उपयोग म्हणजे ह्या किंवा असल्या ...रांतील निमित्तकारण जे जंतु त्यांचा प्रतिकार. ...तील जंतुज विषारांमुळें, दोषांमुळें, अभिसरणाचा ...वाढतो, म्हणून नाडीचा वेग वाढतो. नाडीचे ...हि वाढतात. अशा वेळीं केवळ हृद्य औषधांनीं ...भागत नाहीं. त्याबरोबर रक्त निर्दोष करणारें, ...र्विष करणारें औषध द्यावें लागतें. सूतशेखरानें ...कार्य घडून येतें. आणि ह्यामुळेंच सान्निपातिक ...त सूतशेखराचा उपयोग होतो.

मेंदू व वातवाहिन्यावर शामक कार्य

सूतशेखराचें कार्य सहस्रार (मेंदू) व वात-...न्या यांवर शामक असें होतें. त्यांतलें त्यांत हृदय, ...ठें, पोट व आंतडीं ह्यावर ताबा ठेवणाऱ्या वात-...न्यांवर विशेष कार्य होतें." (औ. गु. भा. ५)

सूतशेखराचा संस्कृत पाठ

शुद्धं सूतं मृतं स्वर्णं टंकणं वत्सनागकम्।
व्योषमुन्मत्तबीजं च गंधकं ताम्रभस्मकम्॥
चातुर्जातं शंखभस्म बिल्वमज्जा कचोरकम्।
सर्वं समं क्षिपेत्खल्वे मर्द्यं भृंगरसैर्दिनम्॥
गुंजामात्रां वटीं कृत्वा द्वे गुंजे मधुसर्पिषा।
भक्षयेदम्लपित्तघ्नो वान्तिशूलामयापहः॥
पंचगुल्मान्पंचकासान् ग्रहण्यामयनाशनः।
त्रिदोषोत्थातिसारघ्नः श्वासमन्दाग्निनाशनः॥
उग्रहिक्कामुदावर्तं देहयाप्यगदापहः।
मण्डलान्नात्र सन्देहः सर्वरोगहरः परः॥
राजयक्ष्माहरः साक्षाद्रसोऽयं सूतशेखरः॥

नांवः- सूत-पारा. शेखर म्हणजे शिखर, वरचें टोंक. पारा आहे पाठाच्या शिखरीं म्हणजे सुरवातीला ज्याच्या प्रथमारंभीं असलेल्या पदार्थावरून दिलेलें असें हें नांव आहे.

पाठनिश्चितिः- सूतशेखर नांवाचे तीन पाठ आहेत. पैकीं दोन लाल रंगाचे व एक काळ्या रंगाचा. हे तिन्ही पाठ स्वतंत्र आहेत. पैकीं दोन आहेत अम्लपित्तावर, तर एक आहे कफरोगावर. वरच्या पाठांतहि सुवर्ण व ताम्र इ. बाबत फरक असलेले अनेक पाठ प्रचलित आहेत. त्या परंपरा अशाः-

१ सुवर्णभस्मयुक्त	४ बचनागाऐवजीं रौप्यभस्मयुक्त
२ सुवर्णवर्ख्ययुक्त	५ सुवर्णाऐवजीं सुवर्णमाक्षिकयुक्त
३ सुवर्णविरहित	६ सोमनाथी ताम्रभस्मयुक्त

द्रव्यसंग्रहः-पारा, गंधक, सुवर्ण ताम्र, शंखभस्म, बचनाग, टंकण, धोतराबी, सुंठ, मिरे, पिंपळी, दालचिनी, तमालपत्र, वेलची, नागकेशर, बेल मगज, कचोरा.

द्रव्यनिर्णयः-

पारा-हिंगुलोत्थ,	पिंपळी-नवी लेंडी
गंधक-आमलसार	मिरें-काळें
धोतरा-काळा	बचनाग-काळा
वेलची-छोटी	बेलमगज-कोंवळा
नागकेशर-तांबडें (असली)	टंक -उद्भिज

द्रव्यशोधनः-

शोध्य - शोधक	शोध्य - शोधक
पारा - लसूण	गंधक - तूप, दूध
धोत्राबी - गोमूत्र	बचनाग - गोमूत्र
टंकण - अग्नि	

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रक्रियाः- प्रथम पारा व सुवर्ण ह्यांचा एकत्र खल करावा. नंतर त्यांत गंधक मिसळावा. नंतर विषें व मग भस्में आणि शेवटीं उद्भिज्ज पदार्थ क्रमाक्रमानें मिसळून खलून सर्वांचें एकजिन्नसी मिश्रण करावें. व माक्याचा रस घालून खलावें.

कालः- साधन-शरद. मर्दन-२१ दिवस.

सिद्धिप्रमाणः- १ तो. पारद तर २० तो. तयार औषध.

परिगणनः- सुवर्ण, ताम्र, विषें इ. चें.

रोगः- अम्लपित्त, वांति, शूल, गुल्म, खोकला, ग्रहणी, त्रिदोष अतिसार, दमा, अग्निमांद्य, जोरदार उचकी, उदावर्त, राजयक्ष्मा.

मात्राः- २ गुंजा

अनुपानः-आल्याचा रस मध, तूप मध, दूध-खडीसाखर.

टिप्पणीः- पाठांत खल किती दिवस करावा हें सांगितलेलें नाहीं. पण सर्व दूर भारतभर हा खल २१ दिवस करण्याची एकच प्रथा आहे. माझें मतें हें दिनमान ४० ते ५० तोळ्यांकरितां आहे. ह्यापेक्षां अधिक मानानें खलांत औषधें घातलीं तर खल अधिक काल करणें अत्यंतावश्यक आहे. " यावच्चिकणतां यातम्।" हें खल झाल्याचें लक्षण पाहून मर्दन-काल-मर्यादा ठरवावी.

सुवर्णरज, सुवर्णवर्ख, सुवर्णभस्म (कृष्ण वा रक्त) इतक्या तऱ्हेनें ह्यांत सोनें घालतां येतें. सर्वांत उत्तम म्हणजे सुवर्णभस्म घालणें हें होय. सोन्याचा चुरा अगर वर्ख घालायचाच तर तो प्रथम पाऱ्याशीं मिश्रण करणें उत्तम.

---

२६ सूतशेखर (तांबडा) नं. २

(र. यो. सा. ५०८)

पारा गंधकाचें मिश्रणानें तयार केलेला सूतशेखर काळा होतो म्हणून त्यास कृष्णसूतशेखर म्हणतात. ह्या पा ठांत कज्जलीऐवजीं सिंदूर आहे. त्याचप्रमाणें अभ्रक, लोह, केशर इ. लाल रंगाचीं औषधें ह्यांत असल्यानें ह्या सूतशेखराचा रंग तांबडा होतो. दोघांचें नांव एक एवढेंच. बाकी रंग निराळा. द्रव्यसंग्रह निराळा, गुणपाठ निराळा, सर्व कांहीं निराळेंच. कृष्णसूतशेखर मुख्यत्वेंकरून अम्लपित्तावर तर हा कफोद्रेकावर चालणारा. पण दोन्ही अत्यंत उपयुक्त असल्यानें दोघांचाहि समावेश ह्यांत केला आहे.

तांबडा सूतशेखर (संस्कृत पाठ)

अभ्रकं रससिंदूरं सुवर्णं शुल्बमुत्तमम्।
लोहं कम्बुजभूतिं च विषं कनकबीजकम्॥
चातुर्जातं टंकणं च शुण्ठीं व्योषं च केशरम्।
सर्वं समं तु कस्तूर्यास्तुर्यांशं प्रक्षिपेत्सुधीः॥
आर्द्रद्रवेण संमर्द्य मार्कवस्य रसैर्दिनम्।
सूतशेखरनामाऽयं तरुणारुणसन्निभः॥
गुंजामानेन मध्वक्तो मध्वार्द्रकरसेन वा।
जयेद्वातकफोद्रेकं तथा खण्डार्द्रयोगतः॥
वातपित्तामयं हन्यात्तथा रास्नाकषायतः।
वातं गुडूचीसत्वेन मधुना सर्वमेहनुत्॥
गोदुग्धखण्डयोगेन पित्तोद्रेकं जयेद् ध्रुवम्।
क्षयं पाण्डुं मेहरुजं जीर्णज्वरमथारुचिम्॥
प्रदरं हन्ति मान्द्यं च सोमरोगं शिरोग्रहम्।
अनुपानविशेषेण तत्तद्रोगहरो भवेत्॥

नांवः- बरोबर बोध होत नाहीं.

पाठनिश्चितिः- ठीक आहे.

द्रव्यसंग्रहः- १ अभ्रक, १ रससिंदूर, १ सुवर्ण १ ताम्र, १ लोह, १ शंख, १ बचनाग, १ धोत्राबीं, १ दालचिनी, १ वेलची, १ नागकेशर, १ तमालपत्र, १ टंकण, १ सुंठ, १ मिरें, १ पिंपळी, १ सुंठ, १ केशर, १/४ कस्तूरी.

भावना द्रव्यसंग्रहः- आलेरस, माकारस.

द्रव्यनिर्णयः- बचनाग - कंद, काळा
धोत्रा - बीं, काळ्याधोत्र्याचें
वेलची - छोटी, दाणा
नागकेशर - असली, पिंवळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टंकण — उद्भिज्ज
मिरें — काळें
पिंपळी — लेंडी, जुनी

द्रव्यशोधनः— शोध्य शोधक
बचनाग — गोमूत्र
धोत्राबीं — गोमूत्र
टंकण — अग्नि.

प्रक्रियाः— प्रथम सर्व औषधांचा खल एकत्र नंतर आल्याच्या व माक्याच्या रसाच्या सात भावना देणें.

शेवटीं कस्तूरी पाण्यांत खलून औषधांत मिसळणें. सावलींत सुकविणें.

कालः— साधन— शरदादि (फक्त वर्षाऋतु वर्ज्य)
मर्दन—४२ दिवस.

सिद्धिप्रमाणः—१ तो. अभ्रक तर २० तोळे तयार औषध.

परिगणनः— भस्मादिकांचें.

रोगः— क्षय, पाण्डु, मेह, जीर्णज्वर, अरुचि, अग्निमांद्य, सोमरोग, शिरोग्रह.

मात्राः— १ गुंज.

अनुपानें:-वातकफोद्रेक—मध अगर आलेंरस मध.
कफपित्तावर—आलें खडीसाखर
वात—गुळवेलसत्व
मेह—मध.
पित्तोद्रेक—गाईचें दूध खडीसाखर.

२७ लघु सूतशेखर

पित्तदोषांतील तीक्ष्णत्व व अम्लता वाढून भ्रम, शिरःशूल, निद्रानाश, डोक्याला व घाम, घामाला एकप्रकारची घाण, हीं लक्षणें लघुसूतशेखर घ्यावा. पित्तप्रधान अम्लपित्तांत शिरींतहि ह्याचा उपयोग होतो.

लघु सूतशेखराचा संस्कृत पाठ

सुवर्णगैरिकं शुद्धं द्वौ भागौ विश्वभेषजम् ।
भागैकं मेलयित्वा तत्सुखल्वे भावयेत्सुधीः ॥
नागवल्या रसेनैव जायते शेखरो लघुः ।
गुंजाद्वयमितं दद्यात् पित्तदोषप्रशान्तये ॥
—अलिखितायुर्वेदसंहिता

नांवः— र. यो. सा. ५०७ मधील पाठांत ह्या योगाचे सुरवातीस पारा आहे.

पाठनिश्चितिः-रसं विश्वं च कर्षार्द्धं चतुःकर्षं च गैरिकम् ।
मर्दयेद्देदयामं तु ताम्बूलीदलवारिणा ॥
रक्तिकाप्रमितं योज्यं सितया मधुनाऽथवा ।
अम्लपित्तं भ्रमं मूत्रकृच्छ्रं च हरति ध्रुवम् ॥
— र. यो. सा. ५०७

द्रव्यसंग्रहः— प्रकार १—
१ सुंठ, २ गेरू, भावनानागवेलपानरस.
प्रकार २—
१ पारा, १ सुंठ ८ गेरु भा. नागवेलपानरस.

द्रव्यनिर्णयः— पारा--हिंगुलोत्थ.
सुंठ--पिष्टप्रधानकंद.
गेरु--गडद तांबडा, मऊ.

द्रव्यशोधनः— पारा--लसूणरस
गेरु-- तुपावर परतलेला.

प्रक्रियाः— प्रकार १--तीन दिवस खल.
प्रकार २--प्रथम थोडा गेरु व पारा एकत्र खलावा. पारा अदृश्य झाला कीं, बाकीचा गेरु व सुंठ घालून खल करावा. नंतर रसाची भावना द्यावी. खल एक प्रहर करावा.

कालः-साधन-फक्त वर्षाऋतु वर्ज्य.
मर्दन—३ दिवस.

सिद्धिप्रमाणः— प्रकार १ — ३ तोळे.
प्रकार २ — १० तोळे.

परिगणनः— पारद

रोगः— अम्लपित्त, भ्रम, मूत्रकृच्छ्र.

मात्राः— १ गुंज.

अनुपानः दूध, बत्तासा अगर खडीसाखर, मध,

संग्रहणः— घट्ट बुचाचे बाटलींत भरून काळोखांत अगर प्रकाशप्रतिबंधक पात्रांत थंड जागीं ठेवावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रसग्रंथांत कोठें कोठें पारदाचें मिश्रण वनस्पति, विष, उपविष, रस, उपरस, उपधातु इ. ह्यीं करा-वयास सांगितलें आहे. हें मिश्रण त्यांतला पारा अदृश्य होईपर्यंत खलावें असेंहि सांगितलेलें असतें. मीं ह्या गोष्टींत फार परिश्रम घेतले. त्यांत मला असें दिसून आलें कीं, पाऱ्याचे कण अत्यंत सूक्ष्म होतात, ते सर्वतः पसरले जातात व सामान्य दृष्टीला ते दिसूंहि शकत नाहींत. पण महिमा-कांचेंतून (Magnifying Glass)तें अंधुक दिसतात. तर सूक्ष्मदर्शिकेंत चांग-लेच स्पष्ट दिसतात. आणि त्या मिश्रणांत द्रवपदार्थ घातला कीं लागलीच ते एकत्र येऊन मिश्रणाच्या तळाशीं जातात. ह्या अनुभवावरून पारदाचा हा संयोग अगदींच ढिसूळ किंबहुना तो संयोगच नव्हे असें वाटूं लागतें. अशा तऱ्हेचे योग मी पोटांत देऊन पाहिले नाहींत. पण B. P. मध्यें अशाच तऱ्हेचें एक मिश्रण आहे. त्याबाबतची माहिती खालीं देत आहे. तीवरून यथायोग्य बोध वाचक घेतील, अशी मी अपेक्षा ठेवतो.

Mercury with chalk N. F., B. P.
Hydragerum Cum Creta,
[Gray Powder]

Mercury with chalk contains not less than 35 per cent and not more then 40 percent of Hg. N.F. the B.P. recognises mercury with chalk as containing 35 percent of mercury (limits 31 to 35).

The B.P. product is made by tri-turating together in a porcelain morter, 33 parts of mercury and 67 parts of chalk until metalic globules are no longer visible under a lens magnifying four diameters.

Docter E. R. Squibb suggested the present official method of mixing mercury with chalk. The process is termed "Succussion" When mercury is triturated with certain dry and pulveratent substance such as chalk or magnesia, it gradually looses its fluidity and metalic luster and be-comes a dark gray powder. A simi-lar change takes place when it is rubbed with vicid or greasy sub-stances, such as Honey or Lard. The globules are so reduced in size that in some instances, they are not vi-sible even to a lens and the mercury is said to be "Estinguished". In this finally divided state the mer-cury is supposed to be capable of acting on the system with greater energy.

Many modifications of the earlier processes suggested for the manu-facture of the important preparation have appeared from time to time but the present official process is satisfactory.

Uses:- Mercury with chalk was used both as laxative and as an anti-syphilitic. Its laxative actions are very similar to those of blue mass or calomel, but in some cases it was believed that the antacid effect of chalk was advantageous. As an antisyphilitic it was ranked as one of the most efficient ways to exibit mercury by mouth etc.

U. S. D. 24th.

लघुसूतशेखरांत गेरू तर ग्रे पावडरमध्यें खडू वापरला आहे. द्रव्यभिन्नत्वामुळें गुणाभिन्नत्व हा सामान्य नियम; पण गंधक अगर सुवर्णादि-धातु-संयोगविरहित पारद अशा तऱ्हेनें वापरतां येतो हें दोन्ही तज्ञांनीं संमत केलेलें दिसतें. कोणी कोणाची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…त्सना घेतली हा विषय इतिहाससंशोधकांचा. आपण फक्त एवढेंच बघायचें कीं, धातु व गंधक यांचे साहाय्याखेरीज पारद पोटांत देतां येतो. इतकेंच नव्हे तर तो उत्तम कार्यकरहि होतो, हें उभयपक्षीयांनीं मान्य केलें आहे.

पारा मधांत खलावा

म्हणून र. यो. सा. च्या पाठाची प्रक्रिया मी अशी सुचवितो कीं, प्रथम सुंठ आणि गेरु यांना नागवेलीच्या रसाच्या भावना देऊन घ्याव्यात, तें मिश्रण वाळवून पुनः सूक्ष्म करावें. मग पारा मधांत खलून तो त्याशीं एकजीव करावा. व नंतर हीं दोन्हीं मिश्रणें एकत्र करून त्याच्या टिकड्या पाडाव्यात म्हणजे हा कल्प बिनघोक होईल.

फार्मास्युटिकल कोडेक्स फॉर इंडिया

शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधकमंडळानें भारतीय औषधीविषयक संग्रहग्रंथ (फार्मास्युटिकल कोडेक्स) नुकताच प्रसिद्ध केला आहे.

हा ग्रंथ मुख्यतः १९४७ च्या भारतीय औषध-संग्रह सूचीग्रंथास, पुरवणी खंड या दृष्टीनें रचण्यांत आला आहे. देशी औषधीबाबतच्या आधुनिक संशोधनानें असें सिद्ध झालें आहे कीं, अनेक देशी औषधी वनस्पती उपयोग करण्याजोग्या आहेत. म्हणून वरील औषधीविषयक संग्रहग्रंथांत वनस्पतींची दिलेली यादी त्यांच्या वैद्यकीयदृष्ट्या उपयुक्ततेसंबंधींच्या उपलब्ध पुराव्याचा काळजीपूर्वक विचार करून तयार केली आहे.

या ग्रंथाचे दोन भाग आहेत. पहिल्या भागांत नैसर्गिक औषधी पदार्थ, व वनस्पती व प्राणिज औषधी यांचें सर्वसामान्य वर्णन दिलें आहे. दुसऱ्या भागांत या औषधांच्या पाठांची (फॉर्म्युले) जंत्री देण्यांत आली आहे.

या ग्रंथाची पृष्ठसंख्या ४३२ असून दर किंमत प्रतीस १२ रुपये आहे. तो पब्लीकेशन डिव्हिजन, सी. एस्. आय्. आर. ओल्डमिंट रोड, नवी दिल्ली २ यांचेकडे मिळूं शकेल.

जादुसारखा तत्काळ प्रभाव करणाऱ्या, व केव्हांहि न बिघडणाऱ्या
गुणदायी इंजेक्शनांचा वैज्ञानिक नवा शोध, म्हणजेच

मार्तंड आयुर्वेदिक इंजेक्शन्स् !

भारतांतील सर्वांत मोठी, त्याचप्रमाणें आधुनिक यंत्रसामुग्रीनें सुसज्ज मार्तंड फार्मास्युटिकल् लॅबॉरेटरीमध्यें, अनुभवी व उच्च आयुर्वेदिक शिक्षण घेतलेले तज्ञ व कर्तबगार पाश्चात्य शिक्षित वैज्ञानिक तज्ञ अशा उभयतांनीं मिळून सत्वर व हमखास गुणकारी अशा नवीन आयुर्वेदिक इंजेक्शनांचा शोध लाविला असून, तीं जादुसारखीं काम करणारीं व कायम गुण देणारीं अशीं आहेत. यांची बरोबरी ॲलोपॅथिक इंजेक्शनें करूं शकत नाहींत.

संशोधनाचें, मनाला पटणारे व पुष्कळच ज्ञान देणारें वाङ्मय मोफत मागवा. आमच्या इंजेक्शनांवर कोणत्याहि प्रकारचा प्रतिबंध नाहीं. आमच्या विद्वान् तज्ञांनीं आमच्या इंजेक्शनांचीं उत्कृष्टता, आयुर्वेदिक शास्त्रीयता व विशुद्धता, प्रांतीय तसेंच केंद्रीय सरकारी औषधीतज्ञांचे समोर सिद्ध केली आहे. एतदर्थ ह्यावर ड्रग कंट्रोल ॲक्ट लागूं नाहीं.

सर्वत्र एजंटांची जरूरी आहे. आजच पत्र पाठवा !

निर्माते व संशोधकः- **मार्तंड फार्मास्युटिकल्स्** बडौत S. S. R. (उत्तर प्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म. प्रांतीय वैद्य-मंडळ, नासिक

१९५४ सालची वर्गणी पाठवा

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचें वर्ष १ जानेवारी ते ३१ डिसेंबर असें आहे. बरीच मंडळी १९५३ चे सभासद झाली आहेत. तथापि १९५४ साल उजाडण्याचे वेळीं मंडळाचे पटावर सदस्यसंख्या भरपूर असावी या उद्देशानें आतांपासूनच ५४ सालचे सभासद नोंदणीचें काम सुरू केलें आहे.

मंडळाची वार्षिक वर्गणी १ रुपया आहे. ज्यांनीं १९५३ सालची वर्गणी भरली असेल त्यांनीं १ रु. व भरलेली नसेल त्यांनीं १९५३ चा एक व १९५४ एक असे दोन रुपये मनिऑर्डरनें पुढील पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

पत्ताः-वैद्य बिंदुमाधव पंडित मंत्री. म. प्रां. वैद्य मंडळ, स्थायी कार्यालय, नाशिक.

ज्याच्याकडून १९५४ सालची वर्गणी जमा झाली आहे अशा सभासदांचीं नांवें क्रमानें आयुर्वेद-पत्रिकेंत प्रसिद्ध करण्यांत येणार आहेत. त्यामुळें पोस्टानें स्वतंत्र पावत्या पाठविण्याचा खर्च वांचणार आहे. (पावती पाठविण्यास सध्यां २ आणे खर्च येतो.)

वैद्यराज का. सी. भावे, फैजपूर यांची (१९५४-५५-५६) ची वर्गणी आली आहे.

वै. बी. बी. वैद्य उत्रण पू. खा., वै. गोकुळदास शिवरामदास वैष्णव कशुंबे जि. धुळे, वै. कृष्णा सिताराम शिंदे नायडोंगरी (नाशिक), वै. अण्णाजी बळवन्त बोकील, ता. पुरंदर जि. पुणें, वै. वि. रा. इंगळे सोलापूर, वै. आर. डी. क्षीरसागर कोल्हार (नगर), वै. प्र. ल. समुद्र अकोला, वै. रामय्या चिनय्या येरवडा पुणें, वै. शेख महंमद घोरपडीबाजार जि. पुणें, वै. जी. डी. वैद्य निमगांव, वै. सदाशिव गोविंद वैद्य पुणें, वै. राघो शिवराम बारी भुसावळ, वै. गंगाधर विठ्ठल वैद्य आहिरवाडी (पू. खा.), वै. रामप्रसाद नारायण किराड ३८८ पुणें, वै. शंकर प्रवणु बोंडे राक्षोडे पू. खा., वै. शंकरलाल लक्ष्मीचन्द वैद्य बारामती, वै. हणमंताचार्य पद्मनाभाचार्य पुणें, वै. शं. भा. गाडगीळ ३४ बुधवार पुणें, वै. श्रीधर गोपाळ कुळकर्णी धुळे, रामचंद्र बापु फिरके, फैजपूर (पू. खा.)

मुंबई—वै. ग. म. अभ्यंकर, वै. सौ. लक्ष्मीबाई परांजपे, वै. ना. ह. जोशी, वै. र. गो. कुलकर्णी, वै. आ. बा. देव्हारे, वै. वि. म. पारकर, वै. र. वि. पारकर, वै. श्री. कृ. चऱ्हाटकर, वै. एन्. टी. पराडकर, वै केदारनाथ जोशी, वै. रामभाऊ भोगे, वै. यादवजी लल्लुभाई.

बिंदुमाधव पंडित, मंत्री

तृणज्योतिष्मतीची व्यर्थ लूट थांबवा

" तृणज्योतिष्मतीसंबंधीं माझ्याकडे लहानथोरांचीं अनेक पत्रें रोज येत आहेत. आतां पावेतों ज्या ज्या ठिकाणीं तृणज्योतिष्मतीचीं प्रदर्शनें झालीं त्या त्या ठिकाणीं सोनें लुटावें तशी तृणज्योतिष्मती लुटली गेली. त्यांत २॥३ शेर तृणज्योतिष्मती खर्च झाली. ४।५ शेर तृणज्योतिष्मती संशोधनासाठीं दिली गेली.

संशोधकांना दिलेली कांहीं तृणज्योतिष्मतीसुद्धां त्यांचीं मुलेंबाळें व गडीमाणसें यांनीं गंमत म्हणून पाहण्यांत खर्च केली. या दिव्य वनस्पतीचा चालू असलेला हा खिलवाड पाहून मनास बरें वाटत नाहीं. व आपलें कोठें तरी चुकत आहे असें वाटू लागलें आहे.

म्हणून इतःपर स्वतः सेवन करण्याची तयारी असलेल्या जराव्याधि-ग्रस्तांना त्यांच्या जबाबदारीवरच (व ती प्राप्त करण्यास लागणारा खर्च घेऊन) तृणज्योतिष्मती पुरविण्याचें ठरविले आहे. श्रद्धावान्, शुचिर्भूत, संयमी असा ग्राहकच ती घेऊ शकेल.

तृणज्योतिष्मती उष्णवीर्य आहे

शे-पाचशे माणसांनीं स्वतः प्रयोग केल्याखेरीज तृणज्योष्मतीचे खरे गुण कळणार नाहींत. ही वनस्पती उष्णवीर्य असल्यानें प्रारंभीं तिचा प्रतिकूल परिणाम सोसावा लागतो व लेचापेचा मनुष्य घाबरुन जातो."

मंडला — नाना बापट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्धायुर्वेदाला विद्वानांचे शिव्याशाप

(लेखकः– एक स्वदेशाभिमानी वैद्य)

इंग्रज गेले आणि स्वराज्य आलें, म्हणून इंग्रजी प्रभुत्व गेलें आणि स्व–भाषेला महत्व प्राप्त ही गोष्ट स्वराज्याला साजेशीच झाली. यांत ाभिमानी अशा सर्व व्यक्तींना आनंदच वाटला. इंग्रजांचें आणि इंग्रजीचें अनेक वर्षांच्या साहचर्या- ांना प्रेम निर्माण झालें आहे अशा कांहीं इंग्रजा- नी लोकांनीं, या घटनेनें नाराज होऊन राष्ट्र- ्या पुरस्कर्त्यांना आणि राज्यकर्त्यांना नांवें ठेवून करण्याचा आपला धंदा अद्याप चालू ठेवला . तोच प्रकार आतां वैद्यक शास्त्राचे अभ्यास- ताहि सुरू झाला आहे, यांत आश्चर्य वाटण्यासारखें च नाहीं.

स्वतंत्र राष्ट्राचें आद्य कर्तव्य

मुंबई सरकारनें वैद्यकीय अभ्यासक्रमांत पाश्चात्य ति व देशी पद्धति यांचे संमिश्र शिक्षणाऐवजीं आयुर्वेदीय पद्धतीनें वैद्यक शास्त्राचें अध्ययन ाला आणि त्या शास्त्रानुसार चिकित्सा करण्याला ां परवानगी दिली आहे. स्वभाषेप्रमाणें स्व- ाबद्दलचा अभिमान असणें व त्याच्या उन्नती- ां संपूर्ण वाव देऊन साहाय्य करणें हें स्वदेशा- ानाचें द्योतक आहे व स्वतंत्र झालेल्या प्रत्येक ाचें तें एक आद्य कर्तव्य मुंबई सरकारनें अमलांत ालें याबद्दल देशांतील सर्व विचारी लोक सरकारला ्यवादच देत आहेत.

धन्यवादापेक्षां शिव्याशाप अधिक

परंतु राज्यकर्त्यांना नेहेमीं धन्यवादापेक्षां ्याशापच अधिक खावे लागतात. हे शिव्याशाप ानी जनतेनें दिले तर ते क्षम्य होऊं शकतात. परंतु ्द्वान् माणसें जेव्हां द्वेषाग्नीनें पेटून विरोधाचे ्गीत हातीं घेतात तेव्हां त्यांचे विषारी फूत्कार ाधिक तापदायक भासतात.

"आयुर्विद्या" मासिकाच्या विद्वान् संपादकांनीं शुद्धायुर्वेदाच्या सरकारमान्य अभ्यासक्रमाला विरोध करतांना काढलेले उद्गार म्हणूनच अत्यन्त हीन मनोवृत्तीचे व संतापजनक वाटतात.

अभ्यासक्रमाला विरोध करतांना विषयाऐवजीं हेतूबद्दल प्रथम त्यांनीं आपला प्रहार केला आहे. ते म्हणतातः–

" गुरुपरंपरेंत व शुद्धायुर्वेदांत तयार झाले– त्यांचा धंदा चालत नाहीं म्हणून मिश्र अभ्यास– क्रमाला त्यांचा विरोध आहे. "

हीन मनोवृत्तीचें प्रदर्शन

ज्यांचा व्यवसाय चालत नाहीं अशा वैद्यांनीं मलिदा चारून, फंड जमवून शुद्धायुर्वेदाची मागणी करणाऱ्या पुढारी वैद्यांना पाठिंबा दिला व त्यांच्या पाठिंब्यावर आणि मिळालेल्या मदतीवर शुद्धायुर्वेदाच्या मागणीची ही चळवळ उभारली गेली असें कां या विद्वानांना म्हणावयाचें आहे? अथवा वैद्यकीचा धंदा न चालणारे सर्व वैद्य शुद्धायुर्वेदाची मागणी करणाऱ्या पुढाऱ्यांचे नातेवाईक सगे-सोयरे आहेत व त्यांच्या निर्वाहासाठीं त्यांनीं ही सोय लावून घेतली आहे असें याचें म्हणणें आहे? किती हीन वृत्तीचा हा आरोप आहे हें आरोप करणारे विद्वानच जाणोत.

४ वर्षांत २ शास्त्रें

वास्तविक पाहतां चार वर्षांत दोन शास्त्रांचें अध्ययन पूर्ण होणें शक्य नाहीं; तेव्हां विद्यार्थ्यानें एका शास्त्राचें अध्ययन पूर्ण करावें व नंतर वाटल्यास हवें तेवढें इतर ज्ञान घ्यावें, हा ज्याचा त्याच्या ज्ञान- लालसेचा व मगदुराचा प्रश्न राहील.

चिकित्सा–बंदी असूं नये

परन्तु त्यासाठीं एका शास्त्राचें अध्ययन केलेल्या माणसाला त्या शास्त्राप्रमाणें चिकित्सा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करायला बंदी असूं नये, हा ह्यांतील विशुद्ध दृष्टिकोण आहे. यांत कोणताहि शास्त्राला कमी अधिक लेखण्य चा प्रश्न नसून प्रत्येक शास्त्राच्या विकासाला पूर्ण वाव असावा एवढाच यांतील शुद्ध हेतु आहे. पण ज्याची दृष्टि विकृत आहे त्याला सारे विपरीतच भासणार !

अनाहूत आशीर्वाद

शुद्धायुर्वेदाचें शिक्षणानें भलें होणार नाहीं अशा निर्वाळा शिक्षणक्रमास सुरवात करण्यापूर्वीच या विद्वानांनीं अनाहूत आशीर्वाद म्हणून देऊन टाकला आहे.

ऐतिहासिक ज्ञानाचा दाखला

वेळोवेळीं मागील इतिहासाचे दाखले देणाऱ्या या विद्वान् मजकुरांना आम्ही असें विचारू इच्छितो कीं, पूर्वी शुद्धायुर्वेद शिकून व्यवसाय करीत असतांना बहुजन समाजाचें काय अकल्याण आपल्या पूर्वजांनीं केलें तें त्यांनीं आपल्या ऐतिहासिक ज्ञानानें जाहीर करावें. तसेंच ज्या पाश्चात्य ज्ञानानें त्यांचे डोळे दिपले आहेत त्या पाश्चात्य वैद्यकांतील तथाकथित अद्यावत् शोधांनीं केलेली व करीत असलेली प्राणहानि प्रामाणिकपणें जाहीर करावी. समूळ ग्रंथ पाहिल्याविण। उगाच ठेवी जो दूषण। तो दुरात्मा दुरभिमान। अविवेकी॥ या रामदासांच्या वचनाची यावेळीं त्यांनीं आठवण ठेवावी.

तुच्छतापूर्वक उल्लेख

शिक्षणामध्यें पुड्या बांधणें, खल घोटणें, या गोष्टींचा तुच्छतापूर्वक उल्लेख केलेला पाहून आश्चर्य वाटतें. या विद्वानांच्या मतानें बाजारांतील औषधांच्या त्या आणून व्यापारी भावापेक्षां दसपट किंमत आकारून फुटकळ पद्धतीनें समाजाला पुरवण्यासाठीं कंपौंडर ठेवून टेबल खुर्चीवर बसणारा विद्वान् चिकित्सक, हाच एकमेव जनतेच्या आरोग्याचा ठेकेदार आहे. घरीं आपल्या देखरेखीखालीं औषधें तयार करून त्याच्या आपल्या हातानें पुड्या बांधून आपुलकीनें समाजाला देणारा वैद्यक व्यवसायी हा हलकट आहे. त्याच्याकडे जनतेच्या आरोग्याचा आपला मक्ता जाऊं नये, अशी कां विद्वान् संपादक मजकुरांची सात्विक सदिच्छा आहे.

कावळ्यांचा शाप

"देवा ! शुद्धायुर्वेदाला मान्यता मिळू नये म्हणून पुण्याला परिषद भरवून अपशकुनाचें पुण्याहवाचन केलें; परन्तु कावळ्याच्या शापानें गाई मेल्या नाहींत. आतां नवीन अभ्यासक्रमाला मान्यता मिळाली, गल्लोगल्लीं गुरु होतील, घरोघरीं वैद्य जातील, मग आम्हां आयाँग्ल वैद्यांचें काय होणार ?" असें भयंकर चित्र डोळ्यासमोर आणून या विद्वान् मजकुरांनीं अरण्यरुदन सुरूं केलें आहे. पण डॉन किक्झोडप्रमाणें हवेतील नसलेल्या शत्रूवर चालविलेली ही स्वप्नांतील लढाई पाहून या विद्वानांच्या विद्वत्तेची कीव येते.

विद्वान् सर्वत्र पूज्यते ।

परन्तु आम्हीं त्यांना न पणें सुचवूं इच्छितो कीं, विद्वान् सर्वत्र पूज्यते । या उक्तीवर विश्वास ठेवा. खऱ्या विद्वानाला समाज सुप्रतिष्ठित ठेवील त्यानें आपली विद्वत्ता मात्र व्यवहाराच्या निकषाव

सांडु
गोल्ड टॅब्लेटस्
क्षयाच्या प्राथमिक अवस्थेवर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द सांडु ब्रदर्स प्रॅ. लि. चेंबूर-मुंबई
[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...तपुसून नीट ठेविली पाहिजे. इतरांना घाबरावयाचें ...ानाला काय प्रयोजन आहे !

विद्वानांकडून मार्गदर्शनाची अपेक्षा

सरकारनें सुरू केलेला प्रयोग अयशस्वीच होणार ...े अशी अभद्र-वाणी उच्चारण्यापेक्षां तो यशस्वी ...ा होईल याचें मार्गदर्शन केलें असतें तर तें ...विक स्वागतार्ह ठरलें असतें. विद्वानाकडून निंदा ...र शिव्याशापाऐवजीं मार्गदर्शनाची अपेक्षा समाज ...त असतो; पण दुर्दैवानें मत्सराग्नीनें प्रेरित झालेले ...ान ज्ञानगंगेचा प्रवाह सोडण्याऐवजीं द्वेषाचे गरळ ...कित सुटतात हें पाहिलें म्हणजे वाटतें, परमेश्वरा, ...norance is Bliss !! ज्ञानानें अभिमान ...ण्याऐवजीं अज्ञानानें नम्रता प्राप्त झाली तरच ...मच्या विकासाला कांहीं आशा आहे.

तारेचा पत्ता:-Newbottle

के. के. शहा अँड कंपनी

बाटल्यांचे व्यापारी

(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)

रिकाम्या बाटल्या, बुचे, कॅपसुल्स् [हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे

ठोक व किरकोळ

विक्री करणारे व्यापारी

हेतूवर दुष्ट आरोप करूं नका

शेवटीं स्पष्ट शब्दांत आम्हीं सांगू इच्छितो कीं, शुद्धायुर्वेदाचा पुरस्कार करणारे आणि त्याला मान्यता देणारे सर्व लोक देशहिताभिमानी आहेत. संकुचित स्वार्थ अगर जनतेच्या अहिताची वृत्ति त्यांच्या हृदयांत एक रेषभरसुद्धां नाहीं, हें त्रिवार सत्य आहे; म्हणून त्यांच्या हेतूवर कृपा करून हल्ला करूं नका !

हा प्रयोग फसला तर–

शुद्धायुर्वेदाचा प्रयोग फसला तर शुद्धायुर्वेदाचें ज्ञान असलेले विद्वान् देशांत कमी आहे असा त्याचा अर्थ होईल. आयुर्वेदाला त्यामुळें कांहींहि कमीपणा येणार नाहीं. आयुर्वेदाची थोरवी ही तें शास्त्र आज हजारो वर्षें टिकून राहिलें आहे, यांतच उघड दिसणारी आहे; तसेंच त्याचा अभ्यास आजहि सर्व देशांतले ज्ञानपिपासू लोक करीत आहेत. तेव्हां त्या शास्त्राला कांहींहि कमीपणा हा प्रयोग फसल्यानें येणार नाहीं ही गोष्ट तितकीच स्पष्ट आहे. शुद्धायुर्वेदाचें शिक्षण घेण्याची संधि आतां सर्वांना मिळाली आहे त्याचा सर्वांनीं यथायोग्य उपयोग घ्यावा.

विरोधकांचा जळफळाट

श्रीकृष्णांनीं "स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परां गतिम्" हा जेव्हां पुकार केला,

ज्ञानेश्वरांनीं "माझा मराठाचाचि बोल कवतुकें। परी अमृतातेंहि पैजा जिंके॥ ही जेव्हां गर्जना केली,

तुकारामांनीं "वेदाचा तो अर्थ आम्हांसचि ठावा। इतरांनीं वहावा। भार माथा॥ ही अभंग वाणी जेव्हां सांगितली,

शहाणपणाचा माग

तेव्हां विरोधकांनीं असाच जळफळाट केला होता. आजहि पाश्चात्य भाषा व पाश्चात्य विद्या यांनीं पर--प्रत्ययनेय बनलेले पंडित स्वशास्त्राच्या विकासाला विरोध करीत आहेत. पण हें जगरहाटीस धरूनच आहे. त्याला उपेक्षेनें सोडून द्यावें व आपलें कर्तव्य करीत रहावें यांतच शहाणपण आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोधक चुटका—

चिंच व कडुनिंब संस्कार

मनुष्याला होणारे रोग हे शरीरांत गोड पदार्थ आंबल्यामुळें अगर खाल्लेले आंबट पदार्थ न मानवल्यामुळें होतात हें पुढील गोष्टीवरून लक्षांत येईल.

एका वृद्ध वैद्यराजांनीं दुसऱ्या तरुण वैद्यराजांची परीक्षा घेण्यासाठीं एक रोगी पाठविला. त्या रोग्यास कांहीं औषधें खाण्यासाठीं देऊन पुढील पथ्य सांगितलें. ज्वारीची भाकरी चिंचेच्या लाकडाच्या अग्नीवर भाजून खावी व रात्रीं चिंचेच्या झाडाखालीं झोपावें. स्नानासाठीं व पिण्यासाठीं चिंचेचीं पानें टाकून उकळलेलें पाणी वापरावें असें ते पथ्य होतें.

अपथ्यामुळें रोग वाढला

या पथ्यामुळें त्या रोग्याचा रोग इतका वाढला कीं त्याला दोन पाऊलें उचलणें कठीण झालें. तथापि तो त्या दुसऱ्या वैद्याकडे गेला व त्यानें आपण केलेलें सर्व पथ्य (अपथ्य) त्याला सांगितलें. या रोग्याचें दुखणें कोणत्या औषधामुळें व कोणत्या अपथ्यामुळें वाढलें तें त्या वैद्याच्या चटकन् लक्षांत आलें.

त्या तरुण वैद्यानें त्या रोग्यास दुसऱ्या पुड्या देऊन असें सांगितलें कीं या पुड्या खात खात पहिल्या वैद्याकडे जा; मात्र जातांना वाटेंत गव्हाची पोळी कडुनिंबाच्या लाकडावर भाजून खा, निंबाच्या काडीनें दांत घास, निंबाचा पाला पाण्यांत उकळून त्या पाण्यानें स्नान कर व रात्रीं मुक्काम निंबाच्या झाडाखालींच करीत जा.

त्या रोग्यानें हेंहि पथ्य बरोबर पाळलें व पहिल्या वैद्यापाशीं पोहोचला तोंवर त्याचा रोग पूर्ण बरा झालेला त्यास आढळला. त्यामुळें रोग्यास फारच समाधान वाटलें.

कोणत्या उपायानीं रोग वाढतो ?

मनुष्यास झालेले रोग पूर्ण वाढ झालेले नसतात त्यावेळीं ते चांगले लक्षांत येत नाहींत. पहिल्या वैद्यानें रोगाचीं लक्षणें वढितील असे उपाय सुचवून रोग्याचा रोग वाढविला. रोग कोणत्या उपायांनीं वाढतो हें दुसऱ्या वैद्याच्या लक्षांत त्यामुळें सहज रीत्या आलें व त्यानें त्यावर योग्य उपाय ताबडतोब केले.

चिंच कडुनिंब उपलक्षणात्मक आहे

येथें चिंच ही उपलक्षणात्मक आहे. मनुष्य जे जे आंबट पदार्थ खातो त्याचा परिणाम ते न मानवल्यास रोगकारक (ज्वर-कास-अतिसारकारक) होतो. गोड पदार्थहि शरीरांत आंबून आंबट पदार्थाप्रमाणेंच रोगकारक होतात. चहांतून नित्य शरीरांत जाणारी साखर शरीरांत आंबते वं त्यामुळें अम्लपित्त, मळमळ, कफ, पडसें आदि रोग होतात. त्यावर वरील गोड आंबट पदार्थ न खाणें अगर ते कडु संस्कारयुक्त खाणें हाच उपाय आहे व तोच, कडुनिंबाच्या जाळावर रोटी शेकणें, कडुनिंबाच्या पाल्याच्या संस्काराचें पाणी स्नानासाठीं वापरणें, कडुनिंबाच्या सावलींत झोपणें या उपचारांनीं येथें दिग्दर्शित केला आहे.

'बुंदेल खंडी लोकसाहित्य' —आयुर्वेद, नागपूर (थोडा फरक करून)

पुणें येथें
आयुर्वेद सेवा संघाचीं औषधें मिळण्याचें ठिकाण
किरण मेडिकल सर्व्हिस
नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें २

आयुर्वेद सेवा संघ-नासिकचीं सर्व शास्त्रोक्त अनुभविक औषधें, तसेंच आयुर्वेद पत्रिकेचे अंक आमचेकडे मिळूं शकतील.
धातुवर्धक कंदर्प-वृष्य-पाक, टकलावर भ. भृंगराज तेल, शक्तिवर्धक अगस्तिप्राश हीं व अशींच नवीन नवीन औषधें वापरा. विशेष माहितीकरितां एकवेळ भेट द्या.
दि सूर्यकिरण फार्मसी लि.
१७३ गिरगांवरोड, मुंबई ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभविक चिकित्सा प्रकरण १४ वें—

स्वरभेद निदान--चिकित्सा

लेखक : वृद्ध वैद्य (मध्यप्रदेश)

स्रोतो-विकृति व दोष-विकृति यांचा विचार

स्वरयंत्र- हें श्वासनलिकेवर बसविलेलें मुकुटासारख्या आकाराचें आणि दोन्हीकडून म्हणजे वर व खालीं उघडें असलेलें असें यंत्र आहे. फुप्फुसांतून निघालेला वायु याचे यंत्रामधून मुखावाटे बाहेर पडतो व बाहेरील वायु पण यांतूनच फफ्फुसांत जातो. याचा आकार एका मोठ्या सुपारीएवढा आहे. याच्यांत स्वर उत्पन्न करण्यास कार्यक्षम असणाऱ्या अशा चार उभ्या, स्नायू (Muscle) च्या बनलेल्या लांबदोरीसारख्या कांड्या आहेत. यांच्यामधील पोकळ जागा त्रिकोणाकार आहे. त्याला तंत्रीद्वार (Glottis) असें म्हणतात. या पोकळींतील वायूच्या विविध प्रकाराच्या संचालनामुळें स्वरनिष्पत्ति होत असते. हें संचालनकार्य या कांड्या करवीत असतात.

एखाद्या बांसरींत आंत संचार करणाऱ्या वायूच्या स्तंभा (Column) ची लांची बांसरीतील छिद्रांवर ठेविलेल्या बोटांमुळें ज्याप्रमाणें कमी जास्त होते आणि त्यामुळें स्वर जसा उच्च किंवा हलका होतो त्याचप्रमाणें या दोरीवजा स्नायूंना इतर सभोवतालीं असलेल्या स्नायूंद्वारा लांब किंवा आखुड करून स्वर-निष्पत्ति केली जाते. सतारीची तार ज्याप्रमाणें कमी अधिक ताणली म्हणजे स्वर जसा उच्च (High) आणि निंच (Low) होतो त्याचप्रमाणें याहि कांड्यांना इतर स्नायूंच्या मदतीनें कमी अधिक ताण देऊन उंच निंच स्वर काढले जातात. एखादा गवई उंच स्वर काढूं लागला असतांना त्याच्या गळ्याकडे जर आपण अवलोकन कराल तर कांहीं स्नायूंवर फार ताण पडलेला आपल्याला स्पष्ट दिसून येतो. त्यामुळें या स्वरोत्पादक कांड्याहि ताणल्या जातात, तेव्हांच तो उच्च स्वर निघतो.

स्वरयंत्रांतील कांड्यांचा संकोच

उलट खालचा खर्जस्वर काढावयाचा असल्यास त्याच कांड्या जितक्या संकुचित (व त्यामुळें लांबींत लहान) होऊं शकतात तितक्या कराव्या लागतात म्हणून गवयाची मुद्रा उच्च स्वर काढत्या वेळच्या मुद्रेपेक्षां अगदीं उलट अशी होते. उच्च स्वराच्या-वेळीं त्याचा हात सारखा वर जात जातो तर निंचा-च्यावेळीं तो खालीं जातो. हें वास्तविक त्या आंतील तंत्रीच्या ताण व ढिलेपणाचें निदर्शक असतें. यावरून स्वरतंत्रीच स्वराला उत्पन्न करितात आणि त्यांच्या ओढाताणीवर स्वराचा उच्चनीचपणा अवलंबून आहे हें ठरतें. असो.

मूर्तिमान् भावविशेष

स्वरभेदाची संप्राप्तिः— चरकाचार्य म्हणतात (च. वि. ५-३) ' यावतः पुरुषे मूर्तिमन्तो भाव-विशेषाः तावन्त एव अस्मिन् स्रोतसां प्रकारविशेषाः '।

आपल्या शरीरांत जितके उत्पन्न होणारे भाव-विशेष असतील त्या प्रत्येकाला उत्पन्न करणारीं शरी-रांत निरनिराळीं स्रोतसें आहेत. ' भवन्ति सत्वमनु-भवंतीति भावाः ' अस्तित्वांत असणारें जें जें कांहीं असेल ते सर्व भाव होत, अर्थात् तें द्रव्यच असले पाहिजे असें नाहीं. तर ज्या ज्या विषयासंबंधीं आपण आपल्या मनांत नुसती कल्पना करूं शकतों आणि विचारानें त्याचें अस्तित्व सिद्ध करूं शकतो, ते सर्वच भाव होत. उदाहरणार्थ आत्मा, ईश्वर, मन, संकल्प, विचारणा इत्यादि सर्व यच्चयावत् प्रत्यक्ष किंवा कल्पना-द्वारा निश्चित होणारें जें जें कांहीं असेल (आणि त्यांत अभावाचाहि अंतर्भाव होतो) ते सर्वच भाव होत.

असर्वगतद्रव्यपरिणामवन्तः

परन्तु चरकाचार्यांच्या वरील उद्धृत सूत्रांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'मूर्तिमंतो भावविशेषाः' असें म्हटलें आहे. अर्थात् ज्या ज्या भावांना मूर्ति, आकार, कांहीं विशिष्ट स्थान, व्याप्त करून रहाण्याचा धर्म असेल ते विशेषभावच येथें विवक्षित आहेत. मूर्तिमंतः शब्दाची व्याख्या 'असर्वगत-द्रव्यपरिणामवन्तः' अशी केली जाते. ईश्वर, ब्रह्म, आकाश इत्यादि पदार्थ हे सर्वगतद्रव्य-परिणार्थवान् आहेत. कारण ते नाहींत असें स्थानच मुळीं अवगत नाहीं. परन्तु प्राण, उदक, अन्न, रस-रक्तादि धातु हे शरीरांत किंवा शरीराच्या एखाद्या अंगांत, भागांत रहातात म्हणून त्यांना मूर्तिमंत भाव-विशेष असें म्हणतात.

भावाला उत्पन्न करणारे सूक्ष्म अवयव

या प्रत्येक भावविशेषाला उत्पन्न करणारे जर अवयव आपल्या शरीरांत नसतील तर ते उत्पन्न कसे होत असावे अशी येते शंका आणि म्हणूनच या प्रत्येक मूर्तिमंत भावविशेषाला उत्पन्न करणारे परन्तु इंद्रियास अगोचर असे जे सूक्ष्म अवयव त्यांनाच 'स्रोतस्' अशी संज्ञा दिलेली आहे.

शिरा व स्रोतस् यांतील भेद

'धमानात् धमन्यः, स्रवणात् स्रोतांसि, सरणात् सिराः' ज्या अवयवांच्या किंवा नलिकांच्या भिंतींतून द्रव पदार्थ झिरपतो अशा नलिकांनाच 'स्रोतस्' संज्ञा दिली जाते आणि ज्यांच्या पोकळींतून द्रव पदार्थ वहातो त्यांना 'शिरा' म्हणतात. शुद्धाशुद्ध रक्ताचें वहन करणाऱ्या, किंवा अन्नरस वाहणाऱ्या शिरा होत. परंतु अन्नापासून जो अन्नरस तयार होतो तो तयार करणारे अवयव (हे स्थूल नसून सूक्ष्म आहेत) किंवा अन्न-रसाचें स्थूल परिणमन रक्तोत्पादकरसांत झाल्यावर त्याचे रक्तधातूंत परिणमन करणारे अवयव हेहि सूक्ष्म आहेत, ते अनुमानगम्य आहेत, त्यांनाच रक्तवह (म्हणजे रक्ताला वाहून नेणारें नसून, रक्ताला उत्पन्न करणारें) स्रोतस् म्हणतात.

'अभिवह.' शब्दाचा अर्थ

'स्रोतांसि खलु परिणाममापद्यमानानां धातूनां अभिवाहीनि भवन्त्ययनार्थेन। 'अभिवह' शब्दाचा अर्थ 'अभिनिवर्तक किंवा परिणत करणें असा आहे. अर्थात् या स्रोतसांतून (उदाहरणार्थ, मांसवह स्रोत-तसांतून) रक्त फिरू लागलें म्हणजे त्यांच्या भिंतींतून मांस धातु [हा प्रारंभीं द्रवरूप आहे] झिरपतो.

स्त्रोतसें हे सूक्ष्म अवयव आहेत

याप्रमाणें स्रोतसें हीं फार सूक्ष्म असे अवयव असून त्यांचा धर्म तत्तद्विशिष्ट मूर्तिमंत भावविशेष तयार करणें हा आहे.

स्वरवह स्रोतसें

प्रस्तुत लेखांत आम्हांस स्वरवह स्रोतसांचा विचार करावयाचा आहे.

स्वर हा देखील एक मूर्तिमंत भावविशेष असल्या-मुळें त्याला उत्पन्न करणारीं स्रोतसें असलींच पाहिजेत. स्वरयंत्र हें त्या स्वरवह (म्हणजे स्वराभिनिवर्तक अथवा स्वरोत्पादक) स्रोतसांना आधारभूत असलेला अवयव होय.

स्रोतस् दुष्टीचीं कारणें

हीं स्रोतसें दुष्ट होण्याकरितां कारणीभूत आहार-विहार कोणत्या प्रकारचा असतो तें खालील श्लोकांत वर्णन केलें आहे.

आहारश्च विहारश्च यः स्याद्दोषगुणैः समः।
धातुभिर्विगुणश्चापि स्रोतसां स प्रदूषकः॥

च. वि. ६-२३

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेले आणि अनेक बक्षिसे मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु.

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो. असें हे प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन' मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जो आहार व विहार [१] दोषांच्या गुणासारखा
तन [२] धातूंच्या गुणांच्या विपरीत गुणांचा असेल
त्या त्या स्रोतसांच्या दुष्टीला कारणीभूत होतो.

१ दोषांच्या गुणांशीं समान गुणी असणारा
हार दोषांना दूषित करतो, अर्थात् दोष हे त्या
मान गुणी आहारामुळें 'वृद्धिः समानैः सर्वेषां'
नियमानुसार स्वयंवृद्ध होतात. आणि प्रमाणानें
द्ध झालेले दोष रोगास कारणीभूत होतात.

वातपित्तश्लेष्मणां पुनः सर्वशरीरचराणां
र्णाणि स्रोतांस्ययनभूतानि । च. वि. ५-५. दोष हे
शरीरचर (सर्व शरीरांत - अर्थात् शरीरातील
मातिसूक्ष्म अवयवांत संचार करूं शकणारे)
सल्यामुळें ते वृद्ध दोष या स्रोतसांतून संचार करूं
गले म्हणजे त्या स्रोतसांस दूषित करितात.

२ धातूंच्या गुणांशीं विपरीत गुणी असलेला
हार आणि विहार हा त्या धातूंस क्षीण करितो
णि धातुक्षय झाला म्हणजे वातवृद्धि होते. आश्र-
श्रयीभावाचें विवरण (अ. हृ. सू. ११-२६ते२८)
रीत असतांना 'अस्थिमारुतयोर्नैवं' या वाक्या--
तील टीकेंत धातुक्षयामुळें वातवृद्धि कां होते, यांचें
वरण केलेलें आहे, ते नीटपणें समजलें असलें म्हणजे
तूंच्या गुणांशीं विपरीत गुणी असलेला आहार, धातु,
य व त्यामुळें स्रोतसांना कसा दूषित करतो ती
परा ध्यानांत येईल.

रोगोत्पत्ति कशी होते ?

कुपितानां हि दोषाणां शरीरे परिधावताम् ।
यत्र संगः खवैगुण्यात् व्याधिस्तत्रोपजायते

सु. सू. २१—

रोग होण्याकरितां खवैगुण्य अर्थात् स्रोतसांची
कृति असलीच पाहिजे. स्वरभेद व्याधींत ही स्रोतो-
कृति स्वरवह स्रोतसांत व तीं स्रोतसें मिथ्या आहार-
हारांमुळें विकृत होतात असली तरच व्याधि होईल
वे स्रोतो-विकृति आणि दोष-विकृति ही व्याधींचीं
थान पूर्वांग होत हा विषय या स्वरभेद निदानाच्या
निमित्तान या लेखांत स्पष्ट केला आहे. प्रत्येक व्याधी-
मध्यें जरी ही स्रोतोविकृति असतेच, तरीपण दोष-
विकृतींतच तिचा अन्तर्भाव करून

'नास्ति रोगो विना दोषैः'

या एकाच सूत्रांत स्रोतोविकृतीचा (खवैगुण्याचा) हि
अंतर्भाव केला जातो. परन्तु रोगाची शास्त्रीय संप्राप्ति
समजण्याकरितां स्रोतोविकृतिही प्रत्येक य
कारणीभूत होतें हें विसरतां कामा नये. —अपूर्ण

कडूनिंबाचें पाणी

कडूनिंबाचें झाडांतून गळतें तें पाणी टिकवि-
ण्यासाठीं काय करावें ? त्या पाण्याचा उपयोग कोण-
कोणत्या आजारावर होतो ? आमच्याकडे या वर्षी
कडुनिंबाचीं झाडें फार पाझरलीं व पुष्कळांनीं तें पाणी
धरून ठेवले आहे.

—वै. बागरेचा

तळेगांव (पूर्व खानदेश) ता. जामनेर

उत्तरः— हे पाणी टिकविण्यासाठीं कांहीं करावें
लागत नाहीं. अपचनाच्या, पोटदुखीच्या व जीर्ण-
ज्वराच्या विकारावर तें पाणी उपयुक्त आहे.

पवित्र नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहाः-नेपाल हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

नागपूर येथें
"आयुर्वेद सेवा संघा" चीं
सर्व प्रकारचीं गुणकारी औषधें मिळण्याचें
एकमेव ठिकाण—
श्रीपरांडे बंधु
महाल रोड, नागपूर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राकृतिकोपचार —

जमिनीवर झोंपणें

लेखिका:—श्रीमती शैलजा घोष

" दोन वर्षांपूर्वींची एक हकिगत. मला दमा झाला होता. श्वास पूर्ण घेणें कठीण जात होतें. हृदयाच्या आसपास दुःख वाटत होतें व पाठींत कमजोरी वाटत होती. त्या योगानें खुर्चीवर सरळ बसणेंहि कठीण जात होतें, व कधीं कधीं फिरणेंहि दुःसह वाटत होतें. शिवाय असें वाटत होतें कीं माझा डावा पाय वर खेचला जात असून तें पाऊल बारीक होत चाललें आहे.

निदान व उपचार

माझे पति डॉक्टर आहेत. सुरुवातीला त्यांनीं मला त्यांचेच औषधोपचार चालू केले. नंतर कांहीं दिवसांनीं त्यांनीं मला दुसऱ्या अधिक जाणत्या डॉक्टरांना दाखविलें. कोणी दमा आहे म्हणून सांगितलें, कोणी हृदय विकार आहे म्हणून सांगितलें, तर कोणी पाठीचा एक्स्-रे (X-Ray) फोटो पाहून अस्थिक्षय आहे म्हणून सांगितलें. सर्वांनीं आपापल्यापरी त्या रोगांची चिकित्सा केली, परंतु कोणाचेंहि औषधोपचारापासून गुण आला नाहीं. या सर्व भानगडींत सुमारें एक वर्ष निघून गेलें. ह्या सुमारास माझ्या यजमानांचे एक डॉक्टरस्नेही इंग्लंडहून हिंदुस्थानांत परत आले होते. कलकत्त्याला आल्यावर ते माझ्या पतिराजाना भेटावयास आले, त्यांच्या त्या बैठकींत माझ्या आजाराविषयीं चर्चा निघाली. जेव्हां ते दोघे माझा आजार व त्यावर केलेल्या उपचारासंबंधीं विचार करूं लागले तेव्हां मला असें समजून आलें कीं, रोगावर औषध देणाऱ्या अगर ऑपरेशन करणाऱ्या डॉक्टरांहून भिन्न स्वरूपाचे ते डॉक्टर आहेत. त्यांनीं माझ्या आजाराची सर्व हकिगत ऐकून घेतल्यानंतर मला माझें वय किती आहे म्हणून विचारलें. त्यावर मी माझें वय ४२ वर्षांचें असल्याचें त्यांना सांगितलें.

आहारविहाराची माहिती घेतली

त्यांनीं माझ्या रोगाची तपासणी करण्याकरितां जें उपकरण मागविलें होतें तें बाजूला ठेवून त्यांनीं त्यांची खुर्ची थोडीशी माझ्याजवळ आणली व ते माझ्याशीं मोकळेपणानें गोष्टी करूं लागले. विशेष घाई न करतां शांतपणें ते माझ्याशीं एक तासभर बोलत राहिले व त्याचबरोबर ते माझ्या आहारविहारांची माहिती घेत राहिले. एकाग्र चित्तानें बोलण्याची त्यांची ती ढब पाहून माझी कांहींशी श्रद्धा त्यांच्यावर बसली. सर्व गोष्टी त्यांनीं ऐकून घेतल्यावर त्यांनीं मला सांगितलें कीं, तुमच्या हृदयाच्या मांसपेशींत थोडीशी सूज आली आहे, हेंच तुमच्या हृदयविकाराचें कारण आहे. तुमच्या मणक्यांचीं कांहीं हाडें थोडीशीं वक्र झालीं आहेत. नीट कसें बसावें व कसें झोपावें हें न समजल्यामुळें तुमच्या खांद्याच्या हाडांची वाढ योग्य तऱ्हेनें झालेली नाहीं. तुम्हांस गृध्रसी (सायटिका) विकाराचाहि प्रारंभ झाला आहे.

जसजसें वय वाढत जातें तसतशी मणक्यावरील चर्बी कमी होऊं लागते व ह्या कारणानें मणक्याजवळील स्नायूंचा आश्रय कमी होऊं लागतो व ते खुले राहावयास लागतात. तुमच्यांत ही स्थिति अद्याप फार वाढलेली नाहीं, परन्तु जर तिकडे वेळींच लक्ष दिलें नाहीं तर ही अवस्था वाढत जाईल.

गृध्रसी कां होते?

" बहुतेक वृद्ध माणसांना गृध्रसीचा विकार वरील कारणामुळें होतो. जसजसें वय अधिक होत जातें तसतशी त्यांची अधिक मऊ गादीवर निजण्याची प्रवृत्ति वाढत जाते. कांहीं वृद्धलोक तर भारी किंमतीच्या लवचिक स्प्रिंगच्या खाटेवर अगदीं मऊ मऊ गाद्या घालून निजतात. मी तर अशा खाटेची किंमत २ रुपयेहि देणार नाहीं, कारण मला पूर्ण जाणीव आहे कीं, अशा खाटेच्या उपयोगापासून मला दरसाल हजारों रुपये माझा रोग व दुःखनिवारण करण्यासाठीं खर्च करावे लागतील. "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मला त्यांचें बोलणें पटत होतें व अखेर मी त्यांना विचारलें कीं, तुम्ही मला कोणता उपचार सांगूं शकतां ?

फारच स्वस्त उपचार

' उपचार फार स्वस्त आहे. तुम्ही जमिनीवर निजण्यास सुरुवात करा. जर जमिनीवर निजण्यापासून तुम्हांस श्वास दमा, वगैरे कांहीं अधिक वाटल्यास तुम्ही सपाट तक्त्यावर निजण्यास सुरुवात करा, परंतु जमिनीवर निजणें अधिक हितावह आहे. जमीन हें मनुष्याच्या निजण्याचें स्वाभाविक स्थान आहे. याहिपेक्षां उघड्यावर आकाशाखालीं निजल्यास अधिक हितावह आहे, कारण त्यायोगें मुबलक व मोकळी हवा मिळूं शकेल.

सपाट जमिनीवर निजल्यामुळें हृदयाजवळील मांसपेशी एकत्र गोळा न होतां आपापल्या जागीं राहतात व त्यामुळें त्यांचा हृदयावर दाब पडत नाहीं.

जमिनीवर निजण्यापासून फायदे

जमिनीवर निजण्यानें तुमच्या कण्याचीं हाडें (मणके) मजबूत होतील व त्यास त्यांचा स्वाभाविक आकार प्राप्त होईल. ह्यापासून तुमच्या खांद्याच्या हाडांस व मांसपेशींसहि फायदा होईल. मी आपणांस असें दाखवूं शकेन कीं हजारों वृद्ध लोक जे गृध्रसी, कंबरदुखी वगैरे सारख्या विकारांपासून दुःख भोगीत असतात, ते जर जमिनीवर निजूं लागले तर त्या व्याधींपासून जरूर मुक्त होतील.

शय्या भूमितलं, दिशोऽपि वसनं

डॉक्टर महाशय हंसून म्हणाले कीं, जमिनीवर झोंपणें व आकाश पांघरणें (' शय्या भूमितलं दिशोऽपि वसनम् ') हेंच तुमचें औषध आहे. यापेक्षां अधिक चिकित्सेची तुम्हास जरूरी नाहीं. परन्तु तुमची तब्येत सुधारल्यावर तुम्ही सात्विक व पथ्यकर भोजन करीत जावें व दररोज २ मैल फिरण्यास जात

— आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारी —

आयुर्वेदिक व युनानी वनौषधि

तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण !

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शौक्तिक, कपर्दिक, शंख, प्रवाळ, आवळसार, गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राम्ही, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारच्या वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्टय! विशेष माहितीसाठीं आमचें साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६ टेलिग्रॅम-'आयुर्वेद'

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जावें. आरंभाला तुम्हांस फिरण्यापासून कष्ट होतील, परन्तु त्याची पर्वा न करतां फिरणें चालूच ठेवावें.

तीन महिन्यानंतर

हा प्रश्न तर तुम्हीं तीन महिने जमिनीवर निजल्यानंतरचा आहे परन्तु मी तुम्हांस असें सांगतो कीं, तुमचा विकार व त्रास तीन महिन्यांतच पार नाहींसा झालेला आहे. असें तुम्हांस आढळून येईल.

त्यांच्या आत्मविश्वासपूर्ण व प्रभावशाली बोलण्यानें मी स्तंभित झालें; परन्तु माझ्या मनांत हा विचार आला कीं, आज वर्षापासून मी आजारी आहे व औषधाच्या मदतीशिवाय केवळ जमिनीवर निजण्यानें माझा आजार बरा कसा होऊं शकेल!

धाब्यावर झोंपण्यास प्रारंभ

असो. मी जमिनीवर निजणें सुरू केलें. दिवस उन्हाळ्याचे होते. मी घराचे धाब्यावर एक चटई व त्यावर पातळ गादी टाकून व उशास एक तक्या घेऊन निजत असे. पहाटे अगर केव्हां थंडी वजूं लागल्यास एक चादर पांघरण्यास घेत असें. पहिल्या दिवशीं तर मला ती शिक्षाच वाटली. अंगांतील हाडें ठिकठिकाणीं ठेंचल्यासारखीं वाटत होतीं. दुसऱ्या दिवशीं थोडी कमी तकलीफ झाली. तिसऱ्या दिवशीं मला थोडी झोंप लागली व सकाळीं उठल्यावर अशी प्रसन्नता वाटली कीं, जी मागील कित्येक दिवसांमध्यें वाटली नव्हती. नंतर पुढें हलकें हलकें मला माझा नवीन बिछाना अधिकाधिक आराम देऊं लागला.

वीस दिवसानंतर दुःख कमी झालें

वीस दिवसानंतर मला माझ्या पाठीचें दुःख बरेंच कमी वाटूं लागलें. हाडें स्वाभाविक स्थितींत येत असल्याचें जाणवूं लागलें व नाडीवर त्यांचा दाब कमी पडूं लागला. हळूंहळूं पाठींतील उरलेलें दुःख नाहींसें झालें. मला खांदे सरळ ठेवतां येऊं लागले. छातींतील दुःख व जडत्वहि कमी झालें. दोन महिन्यानंतर तर तें दुःख सर्वस्वी नष्ट झालें.

समाधानकारक शय्या

पावसाळ्यांत पाऊस नसेल त्यावेळीं मी धाब्यावर निजत असें व पाऊस असल्यास खोलींत तक्त्यावर निजत असे. हिंवाळ्यांत तर मी खोलीमध्यें गादीवर निजावयास लागलें परंतु गादीवर निजणें इतकें सुखकर वाटत नसें कीं जितकें जमिनीवर आकाशाखालीं निजणें समाधानकारक वाटत असें.

आज तीन वर्षे होऊन गेलीं, मी उपरोक्त रोगापासून पूर्णतया मुक्त झालें आहे. माझ्याप्रमाणें जे कोणी दुःखी मला भेटतील त्यांना मी सपाट जमिनीवर निजण्याची शिफारस करितें. ह्या प्रयोगापासून अनेकांना लाभ झालेला आहे. "'आयुर्वेद,' नागपूर

(हा लेख येथें देण्याचा उद्देश असा कीं आजच्या फरशीच्या व सीमेंटच्या लादीच्या युगांत शेणानें सारविलेल्या साध्या जमिनीवर झोपण्याचेंहि महत्व वाचकाच्या लक्षांत यावें. स्प्रिंगच्या खाटेवर झोपल्यानें खालच्या बाजूस वायूचें अस्तित्व निर्माण होतें व तें वातविकार उत्पन्न करण्यास कारणीभूत होतें. भूमि, जल, तेज, वायु या महाभूतांचे आपल्या जीवनावर काय काय परिणाम घडत आहेत इकडे चिकित्सकाचें लक्ष सतत असलें पाहिजे. —संपादक)

श्री धन्वन्तरी उत्सव, उगवा

उगवा (जि. अकोला) येथें वैद्य रतनलाल पटेल यांच्या औषधालयांत ता. ४।११।५३ रोजी अकोल्याचे वैद्य एल्. टी. शहा यांच्या अध्यक्षतेखालीं धन्वन्तरी जयंति उत्साहानें पार पडली. सदर प्रसंगीं डॉ. नानोटी, वैद्य घोंडसे व डॉ. सराफ यांची आयुर्वेदाचा उत्कर्ष कसा होईल? या विषयावर भाषणें झालीं.

अनेकांनीं प्रशंसलेलीं "आयुर्वेद सेवा संघ" नासिकचीं सर्व गुणकारी औषधें आतां

क ऱ्हा डां त

मिळूं लागलीं.

औषधी भांडार

गुरुवार पेठ, पो. कऱ्हाड (सातारा)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद के पाठ्यक्रम में तर्क-सांख्यका स्थान

(ले.— वै. रणजितराय, उपप्रमुख आ. महाविद्यालय, सुरत.)

मुंबई राज्य में शुद्धायुर्वेदीय पाठ्यक्रमका स्वीकार आयुर्वेदके प्रेमियोंके लिए अत्यंत आनंदका विषय है। जानते है,* इसके प्रचारक इस पाठ्यक्रममें यत्किंचित् अंश आधुनिक शास्त्रोंका भी रखना चाहते थे। परंतु सरकारने यह मिश्रण पसंद नही किया। कारण यह बताया जाता है कि 'सरकार चहाती है कि आयुर्वेदके विद्यार्थियों को केवल आयुर्वेद सिखाया जायगा तभी कठिनाई उपस्थित होनेपर उसके सुलझानेके लिए आयुर्वेदसे ही प्रेरणा प्राप्त करनेका प्रयत्न करेंगे।

यह तर्क वास्तवमें सत्य, प्रशंसनीय और आयुर्वेदकी उन्नतिके लिए अत्यंत उपयुक्त है।

आयुर्वेदिक फॅकल्टीके सभ्योंका भी मन्तव्य आयुर्वेदके अध्यापनके विषय में यही है, ऐसा सुना जाता है। आयुर्वेदिक रिसर्च बोर्ड जो पाठ्य-पुस्तकें लिखवाना चाहता है उसमें भी यही दृष्टि रखी गई है।

तर्क-संग्रह और सांख्यकारिका

यहाँ जो कहना है वह यह है की, अन्य विषयों के लिए आयुर्वेदकी विशुद्धिकी यह दृष्टि रखते हुए भी एकमात्र 'पदार्थ-विज्ञान' विषयको इस शुद्ध दृष्टिसे मुक्त रखा जाता है। फॅकल्टीने तो अपने कोर्समें पदार्थविज्ञान विषयका आधार प्रायः तर्कसंग्रह-सांख्यकारिकाको रखा ही है। शुद्धयुर्वेदिक समिति भी, सुना जाता है, 'संस्कृत' सिखानेके लिए पाठ्य-पुस्तक-तया तर्कसंग्रह तथा सांख्यकारिका ही को निर्धारित करना चाहती है।

सरकारको धन्यवाद

इस विषयमें मुझे कुछ बातें कहनी हैं। प्रथम तो, मैं सरकारको धन्यवाद देना चाहता हूँ कि उसने शुद्ध कोर्समें पदार्थविज्ञान विषयही नहीं रखा। कारण स्पष्ट है। साडेतीन वर्षकी अल्प अवधिमें विद्यार्थीका शक्य इतना समय आयुर्वेदके कर्मसे साक्षात् संबंध रखनेवाले विषयोंसे ही होना चाहिए। पदार्थविज्ञान विषयका उतना निकट संबंध रोग और चिकित्सासे नही है। यह विषय साढेतीन वर्षके पश्चात् कोई उच्चतर परीक्षा रखी जाय उसके लिये रखा जाना ही सर्वथा उचित है।

आयुर्वेदीय ग्रंथोंसे पदार्थविज्ञान

दूसरी बात पदार्थविज्ञान पढना ही हो तो वह भी आयुर्वेदीय ग्रंथोंसे ही सिखाना चाहिए। यह निवेदन मैं फॅकल्टीके पाठ्यक्रम निर्माताओं से भी करना चाहता हूँ। आयुर्वेदकी शुद्धिका ध्यान रखते हुए पदार्थ विज्ञान विषय को भी शुद्ध आयुर्वेदीय स्वरूप देनेका प्रयत्न अवश्य होना चाहिए। आयुर्वेदके अपने पदार्थ हैं, अपना पदार्थविज्ञान है, अपना दर्शन है, उनका अध्ययन-अध्यापन आयुर्वेदकी संहिताओंसे ही होना चाहिए। इस पद्धतिका एक लाभ यह भी होगा कि विद्यार्थीका अनायास प्रवेश आयुर्वेदके अन्य सभी विषयों में भी हो जाएगा।

भिन्न शास्त्रोंका संबंध नही चाहिये

फिर विनति कर दूँ, मैं स्वयं तो इसी मतका हूँ कि, आयुर्वेदके अध्यापनका समय आजके युगमें इतना न्यून है कि, आयुर्वेदसे भिन्न शास्त्रोंका संबंध आयुर्वेदसे हो तो भी उनका अध्यापन शुद्धायुर्वेदके नवनिर्मित पाठ्यक्रममें अथवा फॅकल्टीद्वारा निर्धारित डिग्री कोर्समें नही होना चाहिए। ये विषय किसी उच्चतर परीक्षाके लिए ही रखे जाने चाहिए, जिनमें शास्त्रोंके समन्वयकी दृष्टि विकसित करना भी अध्यापनमें अभीष्ट होता है।

* [यह बात सच नही है। सरकार-मान्यता प्राप्त करने के लिये, पहिले सरकार के आग्रहसे ही जबरदस्ती उसमें कुछ अंश इनॉक्युलेशन वगैरेका जोड दिया गया था। तो भी आरोग्यमंत्री डॉ. गिल्डर सरकारने उसको मान्यता नही दी। —संपादक.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'संस्कृत' वैदीय ग्रंथोंसे सिखाओ

शुद्धायुर्वेदीय पाठ्यक्रममें यों तो मैं समझता हूँ 'संस्कृत' जुदा विषय रखनेकी आवश्यकता ही नहीं है। कारण, संस्कृत विषय इस लिए रखा जाना उचित समझा जाता है कि इससे विद्यार्थी स्वयं आयुर्वेदके मूल ग्रंथोंको समझनेमें समर्थ हो सके। परन्तु वह प्रयोजन तो पाठ्यक्रममें रखे विषय 'अष्टांगहृदय' से ही संपन्न हो जाता है। अतः पृथक् संस्कृत विषय रखकर विद्यार्थीकी बुद्धिपर बोझा डालना उचित नहीं है।

आयुर्वेदीय ग्रंथोंसे वचन-संग्रह

परन्तु कहा जाता है, पाठयक्रमके विषय सरकारनें निश्चित कर लिए हैं। कानून के अनुसार उनमें अब परिवर्तन नहीं किया जा सकता। विस्तृत पाठयक्रम निर्माण करते हुए ही इस दिशामें उचित सुधार किया जा सकता है। ऐसी स्थितिमें मेरा प्रस्ताव है कि 'संस्कृत' विषय 'तर्क-संग्रह, सांख्यकारिका' या किसी काव्यग्रंथके द्वारा न पढाया जाए। इसके लिये सबसे अच्छा मार्ग यह है कि, आयुर्वेदके ग्रंथोंसे ही दोहन करके एक संग्रह-ग्रंथ बनाया जाए, जिससे विद्यार्थीका संस्कृतका ज्ञान भी बढे, साथ ही आयुर्वेदके इतिहास, आयुर्वेदके नीतिशास्त्र, आयुर्वेदके मूल सिद्धांत इत्यादिके साथ भी उसका परिचय हो जाए। मैं समझता हूँ, फॅकल्टीभी डिग्री-कोर्सकी प्रथम परीक्षामें ऐसा संग्रह-ग्रंथ रखना पसंद करेगी।

'जीवानंदनम्' नामका काव्यग्रंथ

तथापि जबतक ऐसा ग्रंथ न बने तबतक 'जीवानन्दनम्' नामक काव्यग्रंथ रखा जा सकता है। इसमें पात्र सब दोष, रोग आदि ही है। इसके अध्यापनसे विद्यार्थीका कुछ संबंध निश्चित ही आयुर्वेदके साथ रहेगा। पूर्वोक्त प्रकारका संग्रह ग्रंथ बननेपर उसे 'जीवानन्दनम्' का स्थान दिया जा सकता है।

आशा है समितिके विद्वान् सभ्य इस नम्र प्रस्तावपर विचार कर योग्य निर्णय करेंगे।

———

गुजराथ विद्यापीठांत आयुर्वेदासाठीं अध्यासन

"एकदां दाता पुढें येऊन त्यानें देणगी दिली तर मुंबई सरकार गुजराथ विद्यापीठाला आयुर्वेदासाठीं एक 'अध्यासन' (चेअर) निर्माण करण्याची विनंति करूं शकेल" अशा आशयाचे सूचक उद्गार आरोग्यमंत्री श्री. शांतिलाल शहा यांनीं अहमदाबाद येथें ता. २ नोव्हेंबर रोजीं सिव्हिल हॉस्पिटल आणि बी. जे. मेडिकल कॉलेजच्या नव्या इमारतींचें उद्घाटन करण्याविषयीं मध्यवर्ती सरकारच्या आरोग्यमंत्री राजकुमारी अमृतकौर यांना विनंति करतांना काढले.

"तसेंच आर्थिकदृष्ट्या शक्य झालें तर सिव्हिल हॉस्पिटलमध्यें आयुर्वेदिक औषधोपचाराचा एक स्वतंत्र वॉर्ड ठेवण्याचाहि सरकारचा विचार आहे." असेंहि ते म्हणाले.

वैद्यकीय पदवीधरांचा उल्लेख करून ते म्हणाले "आपण वैद्यकीय शिक्षण देऊन जे विद्यार्थी तयार करतो ते देशाच्या गरजेच्या मानानें फारच कमी आहेत. शिवाय असे शिकून तयार झालेले विद्यार्थी शहरभागांतच गर्दी करतात, आणि त्यामुळें ग्रामीण भागांत वैद्यकीय मदत मिळण्याची पंचाइत पडते.

वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शहरी वातावरणाचा व सुखसोयींचा सराव झालेला असतो व त्यामुळें छोट्या शहरांतून राहावयास ते फारसे उत्सुक नसतात. वैद्यकीय, शस्त्रक्रियेबाबत आणि प्रसूतिगृहाविषयींची खेड्यांतील गरज तर वाढती आहे.

रोगावर उपचार करून तो बरा करण्याऐवजीं मुळांतच त्याला प्रतिबंध करणें हें राष्ट्राच्या व सरकारच्या दृष्टीनें अधिक फायदेशीर असतें."

ना. अमृत कौर यांचें भाषण

"देशांतील डॉक्टरी शिक्षणाचा दर्जा आणखी खालावूं नये यासाठीं तावडतोब उपाययोजना करण्याची वेळ आली आहे, कॉलेजांतील दर्जा खालावण्याचा दोष शिक्षकांकडे नाहीं" असें आरोग्यमंत्री

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठ दिल्ली

'प्रजावैद्य' परीक्षा

खालीं दिलेल्या नियमानुसार सन १९५४ इ. सून 'प्रजावैद्य' परीक्षा घेण्यास प्रारंभ करण्यांत येत हे.

१ अ. भा. आ. महासंमेलनाच्या स्थायी–समि- त्या अधिवेशनांत 'प्रजा वैद्य' परीक्षेकरितां खालील यासक्रम विचारपूर्वक निश्चित केला असून तो कृत केला आहे. व तत्प्रीत्यर्थ जादा लागणाऱ्या र्चासहि मंजुरी देण्यांत आली आहे.

२ नि. भा. आयुर्वेद विद्यापीठ इतर परीक्षांची प्रमाणें व्यवस्था करितें, त्याप्रमाणेंच ह्या परीक्षेची वस्था करण्यांत येईल.

कुमारी अमृत कौर यांनीं अहमदाबाद येथें व्हिल हॉस्पिटल आणि बी. जे. मेडिकल कॉलेज च्या नव्या इमारतींचें उद्घाटन करतांना प्रतिपादन ले.

८०० खाटांचें रुग्णालय

सिव्हिल हॉस्पिटल व बी. जे. मेडिकल कॉलेज च्या या नव्या इमारती बांधण्यास एक कोटी रुपये र्च आला असून भारतांत उत्कृष्ट साधनसामुग्रीनीं क अशापैकीं हें हॉस्पिटल व कॉलेज झालें आहे. स्पिटलांत ८०० बिछाने व सर्व आधुनिक सुख– यी आहेत.

प्राध्यापकांची संख्या व पगार

आपल्या वैद्यकीय कॉलेजांत शिक्षक फार कमी हेत. अमेरिकेंतल्या मेडिकल कॉलेजांतल्या शिक्ष– ना जेवढें काम पडतें, त्याच्या दसपट काम आपल्या ांतल्या मेडिकल प्राध्यापकांवर पडतें. त्यांना संशो– नाकडे लक्ष देण्यास हवी तेवढी फुरसत मिळत हीं. जेव्हां आपल्याकडील मेडिकल कॉलेजांतल्या ध्यापकांची संख्या वाढविण्याचा विचार आपण रपणानें केला पाहिजे. आणि लायख प्राध्यापक ण्यासाठीं त्यांना चांगले पगार द्यायला हवेत."

---

३ सदर परीक्षेकरितां खालीं दिलेल्या प्रश्न– पत्रिका निश्चित करण्यांत आल्या आहेतः—

१) प्रथम प्रश्नपत्रिका— शुद्धायुर्वेद पद्धती- प्रमाणें निदान सहित चिकित्सा.

२) दुसरी प्रश्नपत्रिका— स्वस्थवृत्त व व्याधि- प्रतिकार.

३) तिसरी प्रश्नपत्रिका— प्रसूतितंत्र व कौमार- भृत्य (शिशुसंगोपन).

४) चवथी प्रश्नपत्रिका–प्राथमिक चिकित्सा व सुलभ शस्त्रचिकित्सा.

(प्रत्येक परीक्षा तोंडी व लेखी होईल.)

प्रजावैद्य परीक्षेचा अभ्यासक्रम

४ (१) पंचलक्षणनिदानपूर्वक ज्ञान.

(संचय, प्रकोप, प्रसर, स्थानसंश्रय, व्यक्ति व भेद या पांच लक्षणांनीं जो दोष जाणतो तो वैद्य.)

(२) शार्ङ्गधर पद्धतीनुसार औषधयोजनेचें ज्ञान.

(३) निदानांतील लक्षणें व चिकित्सा, आणि ज्वर, अतिसारादि माधवनिदानोक्त.

रोगांसंबंधीं पाठ्य पुस्तकें

शार्ङ्गधरसंहिता, माधवनिदान, भावप्रकाश, बसवराजीय इत्यादि ग्रथांकडे ग्रंथप्राधान्याच्या दृष्टीनें पहावें. शार्ङ्गधरोक्त औषधिक्रिया ग्राह्य मानाव्या. प्रयो- जित केलेल्या अभ्यासक्रमाचीं पुस्तकें विशेषेंकरून हिंदींतून व इंग्रजींतून छापून प्रसिद्ध झालीं आहेत. प्रश्नपत्रिका हिंदींतून छापल्या जातील, परंतु साधारण- पणें तीन वर्षेपर्यंत फक्त इंग्रजीभाषाच जाणणाऱ्या परीक्षार्थ्यांकरितां ते ज्या केंद्रांत परीक्षेस बसले अस- तील त्या केंद्रांत फक्त त्यांच्याचसाठीं इंग्रजींतून प्रश्न- पत्रिका छापल्या जातील.

परीक्षा केंद्रें

खालील परीक्षा केंद्रें राहतील, शक्यतेप्रमाणें विद्यापीठानें स्वीकृत केलेल्या केंद्रांत परीक्षा घेण्यांत येईल. ज्या ठिकाणीं दहा अगर अधिक परीक्षार्थी मिळूं शकतील, त्या ठिकाणीं जादा परीक्षा–केंद्रेंहि उघडण्यांत येतील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५ दरसाल दोन वेळां परीक्षाहि घेण्यांत येईल. पहिली मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत विद्यापीठाच्या इतर परीक्षा बरोबर घेण्यांत येईल; व दुसरी सप्टेंबर महिन्यांत पुरवणीपरीक्षा म्हणून घेण्यांत येईल.

६ प्रतिखंडाची (प्रत्येक प्रश्नपत्रिकेची) परीक्षा-फी २ रुपये आहे. परन्तु जो परीक्षार्थी एकाच वेळीं चारीहि खंडास (प्रश्न पत्रिकेस) बसेल त्यास ६ रुपये परीक्षाफी पडेल.

७ प्रश्नांचीं उत्तरें प्रादेशिक लिपींतून लिहिली असतां चालतील.

८ प्रत्येक प्रश्न-पत्रिकेंत सहा प्रश्न असतील प्रत्येक प्रश्न-पत्रिका १०० गुणांची (मार्कांची) असेल, व तीन तासांचा कालावधि राहील.

आयुर्वेद विषयांत दर १०० गुणांपैकीं ४० गुण मिळाल्यास त्या विषयांत उत्तीर्ण झाल्याचें समजण्यांत येईल. इतर प्रश्न-पत्रिकेंत शेंकडा ३३ गुण मिळाले असतां त्या विषयांत उत्तीर्ण झाल्याचें समजण्यांत येईल. एखादा परीक्षार्थी एखाद्या विषयांत आवश्यक त्या गुणाऐवजीं दहा अगर कमी गुणांनीं नापास झाला असेल तर त्यास त्या विषयांत जास्तींतजास्त दहापर्यंत कृपागुणांक (grace marks) देऊन उत्तीर्ण करून घेण्यांत येईल. परन्तु अशावेळीं त्यास संपूर्ण परीक्षेस असलेल्या गुणांपैकीं शेंकडा ३५ गुण मिळाले असले पाहिजेत.

९ विद्यापीठानें स्वीकृत केलेल्या अध्यापका-जवळ ज्यावेळीं परीक्षार्थी सहा महिन्यापेक्षां कमी काल शिक्षण घेतलेला असेल त्यावेळीं त्यास त्याच्या अध्या-पकाकडून प्रात्यक्षिक शिक्षण व शास्त्रीय शिक्षण अशा उभयविध शिक्षणांचें ज्ञानपूर्णतासूचक प्रमाणपत्र, प्रत्येकप्रश्नपत्रिकेच्या परीक्षा- प्रवेशाबाबत आवश्यक आहे.

१० पहिली परीक्षा इ. सन १९५४ च्या मार्च महिन्याच्या शेवटल्या आठवड्यांत सुरू होईल.

—आयुर्वेद महासंमेलन पत्रिका, १ मे ५३

प्रकृति (आरोग्य) ही अनिर्वेदनीय आहे

“प्रकृति (आरोग्य) हें भावात्मक आहे व विकृति (रोगी अवस्था) म्हणजे त्याचा अभाव (निषेधार्थी) आहे असा लौकिकांत समज आहे. पण तो बरोबर नाहीं. ज्याक्षणीं आपणास प्रकृतीची जाणीव होऊ लागते त्याक्षणापासूनच विकृतीस प्रारंभ झाला असें समजावें.

आरोग्य ही द्वंद्वातीत स्थिति आहे. शून्यावस्था (झीरो स्टेट) आहे.”

नागपूर —राज्यपाल डॉ. पट्टाभी

(केशवसुताच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे हर्ष खेद ते मावळले, हास्य निमाले, अश्रु पळाले, कंटक शल्यें बोथटली, मखमलीची लव वठली, कांहीं न कळे दिसेना, प्रकाश गेला, तिमिर हरपला, काय म्हणावें या स्थितीला झपूर्झा गडे झपूर्झा)

दंन्तोत्पादनाचें प्रात्यक्षिक

ऑल इंडया मेडिकल लायसेन्शिएट्स् असो. तर्फे पुणें येथें नूतन मराठी विद्यालयांत ता. ३१-१०-५३ रोजीं भरलेल्या ६ व्या मुंबई प्रांतीय मेडिकल परिषदेमध्यें वैद्य माधव गणेश शेंड्ये (मंत्री अ. भा. आयुर्वेदिक डेंटल मिशन, पुणें शाखा) यांनीं आयुर्वेदीय पद्धतीनें विना संमोहन (इंजेक्शन स्प्रे वगैरे न देतां) दंतोत्पाटन (Firm Right Lower molar tooth दक्षिण अधोतृतीय हानव्य दंत) करून दाखवलें. हें प्रात्यक्षिक पाहून जमलेल्या सर्व डॉक्टर मंडळींना अत्यन्त आश्चर्य वाटलें. अॅलोपॅथिक डॉक्टर मंडळींच्या परिषदेमध्यें प्रात्यक्षिक देण्याची संधि आयुर्वेदीय वैद्यास मिळालेली असें हें पहिलेंच उदाहरण आहे.

“ गृहवैद्य ”

क्षारचिकित्सेवरील लोकप्रिय ग्रंथ. नवीन भावनाकोशासह किं. फक्त ३ रु. ट. ख. निराळा.

(१) वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

(२) डॉ. गर्दे, २६ मोंगल लेन, मुंबई १६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

.... रामनाम हें दिव्यौषध आहे ....

(लेखकः—प्रो. श्रीरामचरणजी महेंद्र, एम्. ए.)

अच्युतानंतगोविंदनामोच्चारणभेषजात् । नश्यन्ति सकला रोगा सत्यं सत्यं वदाम्यहम् ॥ —धन्वतरि

परमेश्वराचें नांव श्रद्धेनें व निष्ठापूर्वक अहर्निश राहिल्यास समस्त रोगांचा नाश होतो हें वचन अनेकवार ऐकिलें. परंतु त्यांवर माझा विश्वास मात्र ना. दैववशात् एक घटना मी समक्ष पाहिल्यानें झा भ्रमनिरास होऊन 'राम-नाम' ही एक यंत प्रभावी रोगनिवारक शक्ति आहे, ह्याची मला यता पटली.

मद्यपान व सिगारेटचें व्यसन

माझे एक सुमारें ५० वर्षांचे प्रोफेसर मित्र हेत. परिस्थितीच्या अनुकूलतेमुळें मद्यपानाचें व गारेट ओढण्याचें मनस्वी व्यसन त्यांना जडलें. ह्या सनांमुळें दहा वर्षांत शरिराचें स्वास्थ्य संपूर्ण ढांस- त, शरिराचा अस्थिपंजर स्पष्टपणें दिसूं लागला. ांत विकृति उत्पन्न होऊन ती अतिशयच वाढली. क्टरी उपाय सर्व हरले. ऑपरेशन करूनहि कांहीं यदा झाला नाहीं. पचनशक्ति आजिबात नष्ट झाली. ांतील त्याची बायको, मुलें व इतर सर्वजण चिंतातुर ाले.

पिण्यासाठीं पाण्यांतून विभूति

परन्तु दैवगति अगम्य आहे. घटना अशी डली कीं, एके दिवशीं अचानकपणें एक साधु हात्मा माझ्या त्या प्रोफेसर मित्राच्या घरीं आला, ानें त्याजला आलेल्या आपत्तीचा सर्व वृत्तांत सांगि- ला. त्यानें लेखारंभीं लिहिलेला श्लोक म्हटला, व ांहीं उपदेशाच्या गोष्टी सांगितल्या. नंतर त्या महा- त्यानें थोडी विभूति पाण्यांत टाकून तें पाणी माझ्या ोफेसर मित्रास पिण्यास दिलें व निश्चयपूर्वक रुग्णास सा दिलासा दिला कीं, कोणत्याहि देवांचा नामजप ओषध समजून श्रद्धेनें व निष्ठापूर्वक सातत्यानें करीत ाहिल्यास त्याचा व्याधि निःसंशय नष्ट होईल.

रोज २ तास भजन पूजन

त्या उपदेशाप्रमाणें दररोज सकाळ संध्याकाळ २ तास नामजप, भजन-पूजन वगैरे ईशसेवा करण्यास त्यानें प्रारंभ केला व इतर सर्व उपाय सोडून दिले. पहिल्याच सप्ताहामध्यें थोडासा फायदा मिळाला. पोटांतील विकृति थोडीशी कमी झाली व भूक लागूं लागली. रुग्णानें प्रतिज्ञा केली कीं, अतःपर मद्य व सिगारेट पान कधींहि करणार नाहीं. 'राम-नाम' जप व भजन-पूजन--ध्यानादि चिकित्सेस ६ महिने झाले व रुग्णाची प्रकृति सुधारत असल्याचें पाहून सर्वांस आश्चर्य वाटूं लागलें. रुग्णाचें शारीरिक व मानसिक स्वास्थ्य हें त्याच्या आत्मभावनेवर अवलंबून असतें त्याची प्रचीति रुग्णास अन्तर्यामी येऊं लागली.

एक वर्षानंतरचा फरक

आतां एक वर्ष झालें. मी माझ्या प्रोफेसर मित्राकडे गेलो तेव्हां त्याची प्रकृति चांगली सुधारलेली असल्याचें दिसून आलें. त्यांना भूक चांगली पूर्ववत् लागत असून त्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्नताहि दिसून आली. त्यांची दिनचर्या ऐकली तेव्हां त्यांच्या स्वास्थ्याचें रहस्य कशांत संचित झालें होतें तें स्पष्ट-पणें समजून आलें. त्यांची दिनचर्या त्यांनीं खालील-प्रमाणें निवेदन केली.

त्यांची दिनचर्या

'प्रातःकालीं शौचमुखमार्जन झाल्यानंतर स्नान करून उपासनेस आरंभ करतो. समोर गुरुची तसबीर ठेवून 'हरे कृष्ण' या नामाचा कांहींवेळ नामजप करतो. नन्तर १॥ तास ईश्वराचें भजन-पूजन करतो मनामध्यें ईश्वरप्रेरित स्वास्थ्याची भावना जागृत ठेवतो. अन्नपाणी ईश्वरप्रसाद समजूनच ग्रहण करतो. अशाप्रकारें भोजनांत आत्मशक्तीचा प्रादुर्भाव केल्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तें मला कल्याणकारक व लाभप्रद होतें. सायंकाळीं पुन्हां ६ ते ८ पर्यंत प्रार्थना, पूजा वगैरे उपासना करून मनांमध्यें सदविचारांची जागृत ठेवितों. परमेश्वराचें नांव हेंच एकमेव औषध समजतो. अशा या उपासनेनें व आध्यात्मिक विचारजागृतीनें माझी आत्मशक्ति क्रमशः वृद्धिंगत होत आहे व त्यायोगें शान्तीच्या सुमधुर फलाचा आस्वाद मी अनुभवित आहे.''

'राम नाम' औषध कां होऊं शकतें?

परमेश्वराचें नांव औषध कां होऊं शकतें याचा आपण कधीं विचार केला आहे काय? काय कारण आहे कीं, जेथें औषध काम करूं शकत नाहीं तेथें भगवन्नाम आपला चमत्कार दाखवूं शकतें! शरीर म्हणजे मनुष्य नसून आत्मा हें त्याचें खरें स्वरूप आहे. आपलें स्वास्थ्य केवळ आहार व व्यायामावर स्थिर नसून तें आत्मबलावर अवलंबित आहे. उपासना व आत्मचिंतन ह्यांच्या योगानें मनुष्याची आत्मिक शक्ति केंद्रित होऊन त्यास तिच्या सामर्थ्याची जाणीव होऊं लागते. अनादिकालापासून मानव जातीनें ह्या साधनाच्या द्वारां आपलें आत्मीय दिव्य सामर्थ्य प्रगट करून दाखविलें आहे.

रोगविनाशकारी भावना

दररोज सकाळ संध्याकाळ थोडा वेळ स्वस्थ आसनावर बसून व मन शांत, निर्विकार व एकाग्र करून, आरोग्य, आनंद, सुख व शांति ह्या भावनांचा विचार-प्रवाह मनांमध्यें चालू ठेवावा. मी रोगी आहे असा विचार मनांतून अजिबात काढून टाकावा. ह्या अभ्यासाचे योगानें मनुष्याची रोगप्रतिकारक शक्ति स्वभावतःच वाढून त्यास स्वास्थ्य-प्राप्ति निश्चित होईल. — "कल्याण" गोरखपूर

म. प्रां. वैद्य मंडळाची

वार्षिक वर्गणी १ रु. पाठवून सभासद होणें व प्रांतीय वैद्य संघटना मजबूत करणें.

हें तुमचें कर्तव्य आहे.

लताज्योतिष्मती-तैल-प्रभावाचा प्राचीन पुरावा

(तेलंगी भाषेतील नांवः- वेक्कुडुनोगे)

१६ व्या शतकांतील प्राणाचार्य इलेश्वरोपाध्याय यांचा जन्म तेलंगणांतील इलेश्वर नगरांत झाला. हें एका राजधानीचें शहर होतें. पित्याजवळ अध्यात्मशास्त्र व वेदांत याचें अध्ययन झाल्यावर म्हैसूर व काशी येथें जाऊन आयुर्वेदांत त्यांनीं पारंगतता मिळविली. इलेश्वर येथील राजाश्रित आयुर्वेद महाविद्यालयांत कुलगुरु या नात्यानें ते कार्य करीत होते. विद्यालयांत ५०० विद्यार्थी विद्यार्जन करीत होते.

या विद्यालयांतील शिक्षणक्रमाचा लौकिक सर्वत्र पसरून प्रांतांतील व बाहेरचे विद्यार्थी ज्ञानार्जनाकरितां येत असत. इलेश्वरोपाध्याय यांचे विद्यालयांत कांहीं मंदबुद्ध विद्यार्थी होते. तशा प्रकारच्या विद्यार्थ्यांवर बुद्धिवर्धनाकरितां ते निरनिराळ्या औषधी-पाठांचा उपयोग करीत असत. विद्यार्थ्यांच्या मंदबुद्धीच्या प्रमाणांत त्यांचे बुद्धींत कमी जास्त प्रमाणांत त्या औषधांचा उपयोग होत असे. त्यांचा स्वतःचा नातू त्यांचे हाताखालीं शिक्षण घेण्यास आला, शिक्षणाचा क्रम सुरूं झाला. इतर विद्यार्थ्यांचे मानानें तो फारच मंदबुद्ध आहे असें त्यांना आढळून आलें. अनेक गुरुबंधूंना तसेच निरनिराळ्या परिचित आयुर्वेद-बृहस्पतींना याबंधीं आपआपले अनुभव कळविण्यास त्यांनीं विनंतिपत्रें पाठविलीं. निराश न होता, अनेक आयुर्वेदीय हस्तलिखित ग्रंथांचें वाचन व मनन करून त्यांतील ४-५ औषधी पाठाप्रमाणें त्यांनीं औषधें तयार केलीं. स्वतःचा नातु व इतर ३ शिष्य यांना वमन, विरेचन, स्नेहन, स्वेदन या क्रिया करवून त्या प्रत्येकास निरनिराळें औषध देण्यास सुरवात केली. नातवाला—

गुडूचिका अपामार्ग-विडंगं शंखपुष्पिका ॥
विष्णुक्रांता वचा पथ्या नागरं च शतावरी ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चूर्ण घृतेन संमिश्रं लिहेत् प्रज्ञा प्रवर्धते ॥
त्रिभिर्दिनैः सहस्रैकं श्लोकानामवधारयेत् ॥

या पाठाप्रमाणें गुटिका व सारस्वतादिचूर्ण यार करून तें देण्यास सुरवात केली. त्या चौघांत ना, बुद्धि, स्मृति यांत ३ महिन्याचे शेवटीं थोडा-- र फरक झाला पण त्यांच्या मनाचें समाधान झालें हीं. त्यांचे एका स्नेहानें इंद्रजाल नांवाचा हस्त-- खित ग्रंथ त्यांना दिला. त्यांत तृण, लता, वृक्ष या रूपांत ज्योतिष्मतीच्या गुणधर्मांची माहिती वाचीत सतां लताज्योतिष्मतीच्या बियांचे तेलांचा प्रभावशाली धर्म व त्याचे प्रमाणबद्ध उपयोगाची क्रिया त्यांचे नांत आली. लतेचा ठावठिकाणा व बी मिळ-- चा काळ अनंत खटपटीनें त्याना कळला. बी मिळ- च, त्याचें तेल तयार करणें वगैरे सर्व क्रिया सशास्त्र द्धतीनें त्यांनीं केल्या. वमनविरेचनहि क्रिया न रवितांच नातू व ३ विद्यार्थी यांना निरनिराळया माणांत हें तेल देण्यांत आलें. ४-५ दिवसांत सर्वांना ह सुरूं झाले. त्यांचे डोळे, हात, पाय, लघ्वी ची जळजळ सुरूं झाली. सर्वांचें औषध बंद करून ं ४ दिवसांनीं त्यांचेकडून वमन, विरेचन वगैरे या करवून प्रत्येकास दिलेल्या प्रमाणाचे निम्मे षध देण्याचें प्रमाण ठरवून, पूर्वीच्या तितकाच ल पण दुप्पट-दूध व दुपारीं १ वेळ ४ तोळे लोणी ं पथ्याकरितां देण्यास सुरवात केली. सुमारें ८ वसांत सर्व दोषांचा उपशम झाला. चौघांची मेधा, द्धि, स्मृति, जोम, नेत्रदृष्टी यांत कल्पनेबाहेर सुधा-- णा झाली. राहिलेला अध्ययनाचा भाग ६ महिन्यांत रा करून २ विद्यार्थी गुरूचा आशीर्वाद घेऊन ले. नातवानें विद्याध्ययनाचा ४ वर्षांचा क्रम १ र्षांत पुरा केला. काशीस जाऊन अनेक विद्वानांना कित केलें. ही बातमी प्रसृत होऊन म्हैसूर, रांची, जावर, काशी येथील विद्यालयांतील मंदबुद्धि विद्या- र्थ्यांकरितां या तेलाचा उपयोग करण्यांत येऊं लागला.

इश्वरोपाध्याय यांची मुलगी नाची ही बाल- धवा होती. हिनें वडिलास न कळत वमन, विरेचन करून या तेलाची मोठी मात्रा एकदम प्राशन केली. अंगाची असह्य आग होऊं लागल्यामुळें जवळच्या विहिरींत तिनें उडी घेतली. विद्यार्थी व वैद्यराज यांना कळतांच ते धावत गेले. त्यांनीं विद्यार्थ्यांना त्या मुलीस गळया इतक्या पाण्यांत अंगाची आग थांबेतों उभे करण्यास सांगितलें. आग थांबल्यावर तिला बाहेर काढण्यांत येऊन अन्नपाणी या नात्यानें गाईचें दूध, भात हें सुरूं करून दुपारीं २-४ तोळे लोणी (हें देहांतील उष्णतेच्या मानानें) देण्यास सुरुवात केली. पुढें तिला या तेलाचा योग्य प्रमाणांत उपयोग करण्यांत आला. कांहीं काळ वडिलाजवळ अध्ययन केल्यावर ती प्रख्यात कवयित्री म्हणून प्रसिद्ध झाली.

हयात असणाऱ्या जुन्या वैद्यवर्यांची, आयुर्वेद विद्यार्जन करीत असलेल्या तरुण पिढीची तसेंच आधुनिक (राष्ट्र व आयुर्वेदप्रेमी) रसायनज्ञ अशा सर्वांची वरील माहितीमुळें खात्री पटून श्रीभवानी स्वरूपांत स्वतेजानें देदीप्यमान् होणाऱ्या या दिव्य वनस्पतीच्या गुणधर्मांचे संपूर्ण प्रयोग करण्याकडे सर्वांचें लक्ष जाऊन अखेर भारतीय जनतेला अनुरारोग्य, विकारांचा उपशम व अर्थोत्पत्ति याचा लाभ होऊन (दृष्टीआड व मातीआड झालेल्या) आयुर्वेद महर्षींच्या दिव्य शोधांचा, व ज्ञानज्योतीचा प्रकाश सर्व जगतावर पडून भारतास शांति व सुख याचा झालेला लाभ पाहण्यास मिळावा अशी या प्रथम केसरींत प्रसिद्धि दिलेल्या वृद्धवैद्याची इच्छा आहे.

(६) ज्या ज्या वर्तमानपत्र व मासिक संपादकांनीं या दिव्य वनस्पतीच्या प्रसिद्धीस आश्रय दिला त्या सर्वांचा तसेच वैद्यराज छांगाणी, श्री जगत् महाराज व नानासाहेब बापट, वै. रुद्रभटे यांचा शतशः आभारी आहे.

तेजः तेजस्विनां अहम् ।

पो. किनई — आयुर्वेद- सेवक
जि. उत्तर सातारा — भिषग्रत्न ग. कृ. पाटणकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फॅकल्टी ऑफ आयुर्वेदिक अँड युनानी तिब्बि सिस्टिम्स ऑफ मेडिसिन, [मुंबई राज्य]

ऑक्टोबर १९५३ च्या डी. ए. एस्. एफ्. चतुर्थ परीक्षेचा निकाल

परीक्षेस बसलेले उमेदवार १५६

उत्तीर्ण उमेदवार ७९

उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचीं नांवें व नंबर

मुंबई केन्द्र

(१) आचार्य रु. जा. (२) आहाले मा. सु. (४) भट्ट घ. के. (६) दलाल माधुरी हि. (९) गोखले वि. र. (१०) गुजर कां. गु. (१२) इघाटे सो. का. (१३) इनामदार सुमन इं. (१४) जमादार कोकिळा ना. (१५) जोशी अं. कृ. (१६) कोठारे विनता मा. (१८) महाले वि. श्री. (२०) मालपुरे गं. बे. (२१) मालपुरवाला बा. क. (२४) मटकर वि. शं. (२५) पाडळकर विमल ना. (२६) पाध्ये दा. ना. (२८) पारेख न. शां. (२९) पाटील क. गो. (३२) शाह बसंतिका सुं. (३४) शाह दि. ज. (३५) शाह कुसूम न. (३७) तळवडेकर वासंति गु. (३९) उपाध्ये म. दि. (४१) वैष्णव ज. ना. (४३) झवेरी अनिला ना.

जामनगर केंद्र

(४६) भट्ट निर्मला वि. (४८) देसाई ज. ना. (५०) दिव्येश्वर क. का. (५१) गोरादिया हंसा ना. (५४) झाला र. त. (५७) जोशी सु. त्र्यं. (६२) पटेल ग. वे. (६३) पटेल गो. धु. (६४) पटेल कां. मु. (६६) पिपालिया जया जा. (६९) राजपुरीया म. ज. (७५) शाह न. प. (७७) सिंघाई चन्द्रमणि छो. (७८) सोनी मं. सं. (८०) वैद्य हि. र. (८१) वैद्य त्रि. ब.

पुणें केंद्र

(८३) आढाव बा. पां. (८४) अनगळ वि. द. (८७) भाटे श्री. द. (८८) भावे ना. गो. (९२) डाहाळे ज. ने. (९७) दोशी मो. मा. (१०२) जोशी गो. स. (१०२) जोशी प. न. (१०४) जोशी प्रभा पु. (१११) कुलकर्णी कुसुम ग. (११२) कुलकर्णी श्री. न. (११८) पाटील द. वि. (१२०) पुरम गुलाब शं. (१२१) रेडे कमल ना. (१२५) शित्रे व. द. (१२६) तांबे मु. कृ. (१२८) वांबुरकर सुशिला ना. (१२९) झवर लीला का.

सातारा केंद्र

(१३०) बारटक्के म. के. (१३४) नेने मा. रा. (१३५) पेठे भा. त्र्यं.

सुरत केंद्र

[१३९] दारु तरुला ग. [१४०] देसाई दि. ब. [१४१] देसाई शांता हि [१४२] देसाई तारा प. [१४३] गांधी कृ. छ. [१४५] मेहता मंजुला मो. [१४८] पटेल भा. ना. [१४९] पटेल कि. ज. [१५०] सांगले म. र. [१५१] शाह चंदनबेन हि. [१५३] शाह वि. ह. [१५४] शेठ न. वे. [१५६] त्रिवेदी रमा कां. [१५८] वैद्य वि. ह. [१५९] व्यास चं. न. [१६१] व्यास वि. म.

शुद्ध केशर, कस्तुरी, अंबर, मोती, प्रवाळ आणि शिलाजीत वगैरेसाठीं

— पुढील पत्यावर संपर्क साधा —

गणेशलाल जीवराज

२१४ सेम्युअल स्ट्रीट,

चौथा मजला, मुंबई ३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[न]ाशिकजवळ अडगांवांत अतितृष्णा रोगाची सांथ

तृणज्योतिष्मतीचें दर्शन

नागपूर विद्यापीठांतील आयुर्वेदीय संशोधन [क]र्ते आचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी मुंबईहून बुध- [वार] दि. ११-११-५३ रोजीं रात्रीं नाशिक येथें आले. [ब]िन्दुमाधव पण्डित यांचेकडे त्यांचा मुक्काम होता.

वैद्य मंडळीशीं वैयक्तिक चर्चा

येथील मुक्कामांत त्यांनीं येथील वैद्यमंडळींशी [ज्य]ोतिष्मती, बोटे येथील तृष्णारोग, महाराष्ट्र[ा]त आयुर्वेदीय कार्य, नागपूर येथें त्यांनीं हातीं [घेत]लें काम, नवीन शुद्ध आयुर्वेदीय अभ्यासक्रमा-- [व]द्यार्थ्यांचें शिक्षण व परीक्षा इ. विविध विषया- [वर च]र्चा केली.

आंडगांवास वैद्य मंडळाची भेट

गुरुवारीं दुपारीं नाशिकशहर वैद्यमंडळ व [आयुर्]वेद सेवा संघांतील कार्यकर्ते यांच्यासमवेत येथून [जवळ]च ६ मैलांवर असलेल्या अडगांवास त्यांनीं भेट [दिल]ी व तेथें अतितृष्णेनें पीडित असलेल्या ६०।७५ [पै]कीं ६ रुग्णाचें निदान चिकित्सेच्या दृष्टीनें [त्य]ां परीक्षण केलें.

आचार्यांचा सत्कार

रात्रीं ९ वाजतां नाशिकशहर वैद्यमडळातर्फे [त्य]ां, 'त्यांची नागपूर येथें संशोधक म्हणून [नेम]णूक झाल्याबद्दल' सत्कार करण्यांत आला.

त्यानंतर आचार्यांनीं मध्यप्रदेशांत सांपडलेली [नील]ज्योतिष्मती' सगळ्यांना दाखविली. अंधारांत [दी]पाप्रमाणें 'नीलशुभ्र' प्रकाश देणारी ही वनस्पती [पाहू]न सर्वांस आनंद वाटला. हिचा 'रसायन' [म्हणू]न अनुभव येत असल्याचें सांगून तिच्या गुण-- [धर्मा]चें थोडक्यांत स्पष्टपणें विवेचन केलें.

[ज्य]ोतिष्मतीचे प्रकार, नील ज्योतिष्मती

अंधारांत प्रकाशणाऱ्या या वनस्पतीचे तिच्या [बाह्य]ा स्वरूपावरून व 'वेली, कंद, वृक्ष' इ. प्रकारां-[मध्ये] निरनिराळे प्रकार असल्याचें आचार्यांनी सांगितलें. व दाखविलेली वनस्पती 'नीलज्योतिष्मती' असल्याचा खुलासा केला.

अडगांव रुग्णासंबंधीं चर्चा

दुपारीं अडगांव येथें परीक्षण केलेले अतितृष्णा-पीडित रुग्ण हे सामान्यतः बोटे येथील रुग्णाप्रमाणेंच सर्व लक्षणांनींयुक्त आहेत असें ते म्हणाले.

बोटे येथील आयुर्वेदविभागानें केलेली त्या विकाराची चिकित्सा निःसंशय यशस्वी व आयुर्वेदीय चिकित्सेचें वैशिष्ट्य प्रस्थापित कर[णारी] झालेली अस-ल्याचें स्पष्ट व निःसंदिग्ध स्पष्टीकरण आचार्यांनीं या सभेंत केलें.

या सभेसाठीं, धुळें, सिन्नर, कोठुरें, त्र्यंबकेश्वर वगैरे परगांवाहून बरीच मंडळी मुद्दाम आली होती.

अनुक्रमणिका

आयुर्वेद संशोधनाबाबत मुंबई सरकारचें आश्वासन	३२३
शुद्ध आयुर्वेद पाठयक्रम समिति, बम्बई राज्य	३२४
आयुर्वेद तज्ज्ञांची विद्वत परिषद, मुंबई	३२५
धन्वन्तरी उत्सव	३२६
सूक्ष्म पेय औषधें	३२७
सूतशेखर	३२९
सूतशेखर (तांबडा) न. २	३३०
लघु सूतशेखर	३३१
म. प्रां. वैद्य मंडळ, नाशिक	३३४
तृणज्योतिष्मतीची लूट थांबवा	३३४
शुद्धायुर्वेदाला विद्वानांचे शिव्याशाप	३३५
चिंच व कडूनिंब संस्कार	३३८
स्वरभेद निदान-चिकित्सा	३३९
कडुनिंबाचें पाणी	३४१
जमिनीवर झोंपणें एक निसर्गोपचार	३४२
आयुर्वेद के पाठ्यक्रम में तर्क सांख्यका स्थान	३४५
गुजराथ विद्यापीठांत आयुर्वेद अध्यासन	३४६
' प्रजावैद्य ' परीक्षा	३४७
रामनाम हें दिव्यौषध आहे	३४९
लताज्योतिष्मती-तेल प्रभावाचा प्राचीन पुरावा	३५०
डी. ए. एस. एफ. चतुर्थ परीक्षेचा निकाल	३५२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मधुमेही लोकांकडून तेलिया असाण्यासाठीं

मागणी वाढत आहे

"तेलिया असाणा" भरड चूर्ण गरम पाण्यांत टाकून तें पाणी पिणाऱ्या मधुमेही लोकांकडून असाणा भरडीसाठीं वाढती मागणी येत असून ती पुरी करणें कठीण जात आहे. असाण्याचे अनेक प्रकार आहेत. साध्या असाण्यापासून लाल पाणी निघते पण तेलिया असाण्यापासून निघणाऱ्या पाण्याचा रंग अगदीं मोबिलऑइल सारखा तेलकट (लालसर निळा) असतो. सबब असाणा खेरदी करणाऱ्यानीं परीक्षा करूनच तो वापरावा.

आयुर्वेद सेवा संघानें प्रयत्नपूर्वक ताजा तेलिया असाणा मिळण्याची व्यवस्था केली आहे.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

नवीन नवीन औषधें निर्माण करण्याचें

– प्रशंसनीय कार्य –

"आजरोजीं आयुर्वेद सेवा संघाच्या औषधीभवनास पूर्वसूचना न देतां भेट दिली. वैद्य × × यांनीं सर्व कारखाना बरोबर समक्ष हिंडून दाखविला. आयुर्वेदीय औषधें शास्त्रीय पाठाप्रमाणें तयार करण्याचें काय व्यवस्थित चाललेलें पाहून अत्यंत समाधान वाटलें.

त्याचप्रमाणें जुन्या औषधाबरोबरच भल्लातकासव, अपामार्गासव, रौप्यसूतशेखर, अगस्तिप्राश, चिंतामणीरस, कंदर्पवृष्यवटी, जीवनसर्पि इत्यादि नवीन नवीन औषधी कल्प तयार करण्याचें कार्य सेवा संघानें सुरू केलें आहे. त्यामुळें वैद्यवर्गास त्याच त्या औषधीपेक्षां नवीन नवीन औषधी वापरून पाहाणें सोईचें झालें आहे.

या कारखान्यानें अत्यंत थोड्या मुदतींत केलेली प्रगति निःसंशय अभिनंदनीय आहे मी आयुर्वेद सेवा संघानें चालविलेल्या या लोकसेवेच्या कार्यांत सुयश चिंतितो."

अहमदनगर

वैद्य श्री. गं. देशमूख
३०।१०।१९५३

संपादक व प्रकाशक:— वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, मेनरोड, नाशिक
मुद्रक: पी. पी. ओक, … प्रेस, आग्रारोड, नाशिक
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ७ वें) नाशिक, ता. १ डिसेंबर १९५३ (अंक ११ वा

वैद्यांना व्यवसायास परवानगी कोणी द्यावी?

— राज्यपाल डॉ. पट्टाभि यांचें मार्गदर्शन —

बिलासपूर येथें भरलेल्या ५०व्या मध्यप्रदेश प्रांतीय मेडिकल कॉन्फरन्सचें उद्घाटन करतांना राज्यपाल डॉ. बी. पट्टाभि सीतारामय्या म्हणाले "सध्यां सर्व प्रदेश राज्यांतून आयुर्वेदाच्या पुनरुज्जीवनाविषयीं चर्चा चालू आहे व आयुर्वेदीय दवाखाने, रुग्णालयें यांना सरकारतर्फे आर्थिक मदत दिली जात आहे. याचा परिणाम म्हणून पुन्हा, आयुर्वेद हा शुद्ध स्वरूपाला व कार्यक्षम शास्त्र या दर्जाला लवकरच पोहोंचेल अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

"आयुर्वेदीय वैद्यांना पदव्या कोणी द्याव्यात, व व्यवसायाची परवानगी कोणी द्यावी" याबद्दल वारंवार प्रश्न विचारले जातात. याला उत्तर म्हणून इंग्लंडमधील गेल्या कांहीं शतकांचा इतिहास लक्षांत आणण्यासारखा आहे. आठव्या हेन्रीनें चिकित्सा व्यवसाय करण्यास परवानगी देण्याचा हा अधिकार धर्मगुरू (बिशप) कडे सोपविला होता व १८व्या शतकापर्यंत तो त्यांच्याकडेच होता.

धर्मगुरूंनीं रक्तमोक्ष करणाऱ्या नापितांनाहि वैद्यकीय व्यवसायास परवानगी दिली होती व १५४०मध्यें नापितमंडळी व शस्त्रवैद्य यांची एक संघटना राजा हेन्री यानें बनविली. ती १७४५ पर्यंत चालू होती. त्यानंतर एम्. आर. सी. एस्. व एल्. आर. सी. पी. अशा दोन स्वतंत्र शिक्षण-संस्था निर्माण झाल्या. आज त्या दोन संघटनांनीं संघटित होऊन श्रेष्ठ दर्जाचें वैद्यकीय शिक्षण व प्रमाणपत्रें देण्याचें काम सुरू ठेवलें आहे.

जर धर्मगुरु व न्हावी यांची संघटना निर्माण होऊन त्यांतून पुढें आजच्या जगांतील वैद्यकीचा उच्च दर्जा इंग्लंडमध्यें निर्माण होऊं शकला तर, हिंदुस्थानांतहि चालू गोंधळांतून मार्ग काढण्याचा अधिकार, आज असलेल्या आयुर्वेदीय चिकित्सकमंडळीकडे सोंपविण्यास काय प्रत्यवाय आहे?

आज असलेल्या वैद्यांकडेच नव्या वैद्यांना व्यवसाय करण्याची परवानगी देण्याचा अधिकार दिला तर त्यांतून श्रेष्ठ ज्ञानाचे व [illegible] निर्माण होतील व पाश्चात्य वैद्यकाच्या संस्था इतकीच ही वैद्यांची संघटना श्रेष्ठ दर्जाची होऊं शकेल."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विद्यार्थ्यांना उपयुक्त श्रमांचें शिक्षण

'प्रत्येक दिवशीं शाळेच्या वेळांत कमीत कमी ४५ मिनिटें आम्हीं सांगू तें श्रमाचें काम केलेंच पाहिजे तरच आमच्या शाळा-कॉलेजांतून प्रवेश मिळेल अशी अट कर्मवीर भाऊराव पाटील यांनीं सातारा जिल्ह्यांत स्थापन केलेल्या संस्थांत आहे' असें प्रा. मुखटणकर यांनीं मिरज येथें सांगितलें. अष्टे येथील शाळेच्या इमारतीसाठीं लागणारा सर्व दगड विद्यार्थ्यांनीं आणला. चिखल करणें, त्यासाठीं पाणी आणणें हीं कामें शाळेतील मुलींनीं केलीं. (१८०० रु. चे पाणी आणलें). ६५००० रु. किंमतीच्या तयार झालेल्या-इमारतीस १२००० रु. किंमतीचें श्रमदान विद्यार्थी विद्यार्थिनींनीं केलें. विटा विद्यार्थ्यांनींच भाजल्या.

———

सर्पविष कोठें मिळेल?

सर्पविषापासून कांहीं सिद्धौषधें (रस) बनविण्याचा माझा विचार आहे. तरी सर्पविष कोठें मिळेल?

—देवदत्त वैद्य, पठाणकोट

शाळा-कॉलेजाकरितां वैद्यसन्मित्र

वैद्य पां. वि. जायदे, आयुर्वेदतीर्थ यांनीं लिहून प्रसिद्ध केलेल्या वैद्य-सन्मित्र या पुस्तकास एज्युकेशनल इन्स्पेक्टर धारवाड यांनीं सेकंडरी स्कूल्स व ट्रेनिंग कॉलेजिस् करितां सप्लिमेंटरी रीडर म्हणून मान्यता दिली आहे.

इंजेक्शन चिकित्सा

पाश्चात्य इंजेक्शन चिकित्सेवरील अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिलेला अभिनव मराठी ग्रंथ. २६ प्रकरणें, ३०० वर रोगांची अद्यावत् चिकित्सा. २७० पृष्ठें, जाड बांधणी. 'सचित्र इंजेक्शन विज्ञान' प्रमाणेंच हाहि ग्रंथ लौकरच दुर्मिळ होण्याची शक्यता आहे. त्वरित मागणी करा. किंमत ६ रु., ट. ख. निराळा.

१ सुबोध वैद्यक ग्रंथमाला

पो. कागल, जि. कोल्हापूर

२ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक सिटी

वातकफात्मक प्रकृतींच्या लोकांसाठीं नवें पौष्टिक औषध

अगस्तिप्राश

(अगस्तिविहितं धन्यं इदं श्रेष्ठं रसायनम्)

आजारांतून उठल्यानंतर अगर दुर्बलता आली असतां च्यवनप्राश सेवन करण्याची प्रथा सर्वत्र आढळून येते. तथापि ज्यांना च्यवनप्राश मानवत नाहीं असे लोक बरेच आढळतात. ज्यांची प्रकृति थंड आहे, ज्यांना कफ होतो त्यांना च्यवनप्राश आवडत नाहीं व मानवत नाहीं, असा आमचा अनुभव आहे. अशा लोकांसाठीं आयुर्वेद सेवा संघानें अगस्तिप्राश हें औषध तयार केलें आहे. च्यवनप्राशांतील मुख्य द्रव्य 'आवळा' आहे. अगस्तिप्राशांतील मुख्य द्रव्य 'सुरवारी हिरडा' आहे.

अंगावर सुरकुत्या पडणें, केस पिकणें, खोकला, क्षय, दमा, उचकी, विषमज्वर, मेह, गुल्म, ग्रहणी, अर्श, हृद्रोग, अरुचि व पडसें, हे विकार अगस्तिप्राशाच्या नित्य सेवनानें दूर होतात. २० तोळे २ रुपये, ४० तोळे ४ रुपये.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्री धन्वन्तरी महोत्सव, पुणें—

अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय, पुणें
३॥ वर्षांचा शुद्ध आयुर्वेदीय अभ्यासक्रम सुरूं करणार

गुरुवार दिनांक ५-११-१९५३ रोजीं सायं-काळीं ५।३० वाजतां पुणें येथें आयुर्वेद शिक्षण मंडळाचे मंडळाचे इमारतींत मुंबईसरकारच्या आरोग्य-खात्याचे उपमंत्री माननीय श्री. बी. डी. जत्ती, बी. ए. एल्‌एल्. बी. यांच्या अध्यक्षतेखालीं श्री धन्वन्तरी महोत्सव साजरा करण्यांत आला. यावेळीं वै. पं. अण्णाशास्त्री कवडे, वै. भू. गणेशशास्त्री जोशी, श्री. बाळासाहेब करंदीकर, श्री. नानासाहेब दातार, श्री. भाऊराव अभ्यंकर, वै. शर्मा, वै. नाना जोशी, वै. परांजपे, वै. मुळे, तांबेशास्त्री, लोंढेशास्त्री, वै. पुराणिक वगैरे बरेच सुप्रसिद्ध वैद्य व नागरिक उपस्थित होते. मंडळाचे व्हाइस-चेअरमन श्री. नानासाहेब दातार यांनीं अध्यक्षांचें स्वागत केल्यानंतर मंडळाचे सेक्रेटरी वै. हरिभाऊ परांजपे यांनीं थोडक्यांत मंडळाचें आजपर्यंतच्या १६ वर्षांच्या कार्याचें सिंहावलोकन केलें व सरकारनें मान्य केलेला प्रस्तुत शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रम 'अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय' या शिक्षण-संस्थेंत लौकरच सुरूं करण्याचा आपला संकल्प जाहीर केला. यानंतर पुणें वैद्यक मंडळाचें अध्यक्ष कवडेशास्त्री यांनीं शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रम सरकारमान्य होण्याकरितां कोणत्या दिशेनें प्रयत्न करण्यांत आले, याचें मार्मिक वर्णन केलें.

समितीच्या सभासदांचा सत्कार

नन्तर अध्यक्षांनीं 'सरकारी आयुर्वेदीय समितीचे सभासद ' वै. भू. गणेशशास्त्री जोशी (पुणें) व वै. ना. ह. जोशी (मुंबई) यांचा सत्कार केला.

मनुष्याला मनुष्य म्हणण्यासारखें आहे

सत्काराला उत्तर देतांना वै. भू. गणेशशास्त्री जोशी म्हणाले, "सरकारनें शुद्ध आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमाला आज जी मान्यता दिली आहे त्यामुळें वैद्यांनीं फार हुरळून जाण्याचें कारण नाहीं. हजारों वर्षांपासून जो आयुर्वेद या देशांत गौरवास्पद झालेला आहे त्याला आज मान्यता मिळत आहे म्हणजे 'मनुष्याला मनुष्य ' म्हणण्यासारखें आहे. नागपूर संमेलनापासून भारतांतील सर्व वैद्य-संमेलनें, वैद्य-सभा आणि जनता यांनीं कायचिकित्सकांच्या वर्गाला सरकारनें संमति द्यावी, अशा अर्थाचे केलेले ठराव लक्षांत घेऊन सरकारनें योग्य तेंच केलें आहे.

डॉक्टरांना प्रथम आयुर्वेद शिकवावा

माझ्या मतें भारतामध्यें कोणत्याहि प्रकारच्या वैद्यकीचा धंदा करणाऱ्याला प्रथम आयुर्वेदाचें ज्ञान असलें पाहिजे. कारण येथील बहुजन समाजाला आयुर्वेदाची भाषा कळते. येथील मिलिटरीतील काम करणाऱ्या डॉक्टरांना 'एखाद्या रोग्यानें मला पित्त झालें आहे, पोट जातें आहे, असें म्हटलें तर त्यांना रोग्याला काय झालें आहे हें कळत नाहीं. म्हणून त्या डॉक्टरांना हे जनतेचे रोगवाचक शब्द कळावेत म्हणून एका वैद्याला ते शिकविण्याकरितां ठेवलें आहे. यावरून लक्षांत येईल कीं, आयुर्वेदाचें प्राथमिक शिक्षण तरी वैद्यकाचा धंदा करणाऱ्या सर्व लोकांनीं घेतलें पाहिजे.

मिश्र-शिक्षणवाल्यांची तीक्ष्ण नजर

शुद्ध आयुर्वेदाचा शिक्षणक्रम अमलांत आणणाऱ्या लोकांवर डॉक्टर व मिश्र शिक्षणवाले या दोघांचीहि तीक्ष्ण नजर आहे. हा अभ्यासक्रम अमलांत आणणाऱ्या,विशेषत: गुरुगृहांवर, एव्हांपासूनच खोट्या अनुमानावर आधारलेली टीका करण्यास आयुर्विद्येसारख्या मिश्र आयुर्वेदाच्या अभिमान्यांनीं लेखमाला लिहिण्यास सुरुवात केली आहे. तरी या सर्व टीकाकारांच्या टीकेला कोठेंहि वाव राहणार नाहीं अशा रीतीनें या अभ्यासक्रमाच्या शाळा चालविणाऱ्या संस्था व गुरू यांनीं वागलें पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फॅकल्टीनें सूचना झिडकारली

वास्तविक हल्लींच्या अनुभवी फॅकल्टीनें हा शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रम घडवावा व अमलांत आणावा अशी आम्ही सरकारला विनंति केली होती. व सरकार नेंहि फॅकल्टीला हा अभ्यासक्रम चालू करण्याबद्दल कळविलें होतें. परन्तु फॅकल्टीनें ती सूचना अमान्य केल्यामुळे ही आमची नवी कमिटी सरकारला करावी लागली. यावरून मिश्र शिक्षणवाल्यांचा विरोध किती आहे हें कळून येईल. या संस्थेचे चालक वै. हरिभाऊ परांजपे हे अतिशय मेहनती व संस्था चालविण्याचा अनुभव असलेले गृहस्थ आहेत. त्यांना पुण्यांतील वैद्यांचें साहाय्य मिळाल्यास शुद्ध आयुर्वेदाच्या शिक्षणाचें हें 'अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय' सर्व भारतांत आदर्श विद्यालय होईल अशी मी आशा करतो.

समिति सर्वांच्या सहकार्यानें चालेल

नंतर सेक्रेटरी वै. ना. ह. जोशी म्हणाले:- "शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रम सर्व दृष्टीनें विचार करूनच ठरविलेला आहे. या समितीचें काम वैद्य, जनता व सरकार यांचें पूर्ण सहकार्यानेंच चालेल. गुरुपरंपरेला या कायद्यानें मान्यता मिळाली आहे. हा नवीनच उपक्रम असून सर्व ठिकाणांहून त्याचें स्वागत करण्यांत आलें आहे. पुणें वैद्यक मंडळानें पुरस्कार केलेली 'ही अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय संस्था' या प्रांतांत शुद्ध आयुर्वेदाची अति उत्कृष्ट अशी संस्था होणार आहे याबद्दल आम्हांस संशय नाहीं."

ॲलोपथीचा बोलबाला सरकारीमदतीमुळेंच

वैद्यराज भाऊसाहेब पुराणिक व लेंढेशास्त्री यांचीं संस्थेच्या गौरवपर व आयुर्वेदाची महति वर्णन करणारीं भाषणें झाल्यानंतर समारंभाचे अध्यक्ष माननीय श्री. [illegible]जी म्हणाले:-"मी वैद्य अगर डॉक्टर नाहीं, तरीपण लोक ज्याला चांगलें म्हणतील त्याला सरकारनें मदत करणें जरूर आहे. आयुर्वेदाच्या दोन शाखा, एक अश्विनीकुमार कायाचिकित्सकांची...व दुसरी धन्वन्तरी...शस्त्रक्रिया-चिकित्सकांची...धन्वन्तरीचा उत्सव यामुळेंच अखंड चालत आलेला आहे. पुण्य तील विद्वान् वैद्यांकडून आयुर्वेदाचे सिद्धांत श्र करावयास मिळतील म्हणून मी येथें आलो. वैद्यां समितीतील सभासदांचा सत्कार समक्षच केल्यामु सरकारनें केलेली निवडणूक योग्य आहे हें सिद्ध झा गेलीं १५० वर्षें सरकारनें ॲलोपॅथीला उत्तेजन कोट्यवधी रुपयांची मदत दिली. त्यामुळें डॉक्टरां जाणें बरें असा सर्वत्र प्रचार झाला आहे. उलट आ वेंदाला या काळांत कोणत्याहि प्रकारची सरका मदत नाहीं तरीहि तो आज चांगल्या प्रकारें टिकून आहे. आयुर्वेदशास्त्र गुरुपरंपरागत आलें असून परंपरेनेंच टिकवून धरलें आहे.

डी. ए. एस्. एफ्. कोर्स नापसंत झाला

१०-१२ वर्षांपूर्वी आयुर्वेदाकरितां डी. ए. एस्. एफ्. कोर्स करण्यांत आला. पण तो चांगल नाहीं म्हणून त्याऐवजीं डिग्री कोर्स संमत करण्यां

....सेवा....

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुणकारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते.

अशी सेवा करण्यासाठा उत्तम व अस्सल औषधेंच वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान-

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) हेंच आहे.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आला. पूर्वी प्रवेशाला मॅट्रिकची पात्रता होती ती आतां इंटरसायन्सची करण्यांत आली. आयुर्वेद व ॲलोपॅथी असा संमिश्र कोर्स करण्याचा हेतु दोन्ही शास्त्रांची तुलना करण्याची संधि द्यावी हा होता. ज्या रोग्यांना एक शास्त्रांत औषध मिळत नसेल त्यांनीं अशा वेळीं दुसऱ्या शास्त्रांतील औषध घ्यावें. डिग्री कोर्सनें डॉक्टरांच्या बरोबरीची योग्यता मिश्र पदवीधरांना मिळणार आहे. या कोर्सनंतरहि आयुर्वेदांत पारंगत होण्याकरतां एक कोर्स करावयास पाहिजे.

'तिसरा अभ्यासक्रम पाहिजे' ही मागणी

अशा रीतीनें केवळ ॲलोपॅथिक व मिश्रवादी यांचा वर्ग सोडला तर समाजांत फार मोठा वर्ग असें मानणारा आहे कीं, प्रांतांत शुद्ध आयुर्वेदाचाच आणखी एक अभ्यासक्रम असला पाहिजे. त्याचप्रमाणें गुरुपरंपरेनें चालत आलेली विद्याहि जिवंत राहिली पाहिजे. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें सदर अभ्यासक्रमाला व गुरुपरंपरेला सरकारनें नुकतीच मान्यता दिली आहे.

उत्तम संस्कृत आलें पाहिजे

आयुर्वेदाचे ग्रंथ संस्कृतांत असल्यामुळें या कोर्सकरितां प्रवेश मिळण्यास संस्कृत उत्तम पाहिजे असें ठरविण्यांत आलें आहे. शुद्ध आयुर्वेदाकरितां ज्यांनीं अतिशय परिश्रम केले त्यांचीच समिति नेमणें युक्तीला धरून आहे. या समितीनें प्रथम शिफारस करावी व नंतर सरकारनें त्यास संमति द्यावी असें सामान्यतः आहे. पण क्वचित् प्रसंगीं कांहीं प्रसंगच उत्पन्न झाल्यास सरकारनें शेवटचा अधिकार आपल्या हातीं ठेवला आहे. गुरूंच्या बाबतींत, गुरूंचा एक दवाखाना तसेंच त्यांतील रोग्यांचें रेकॉर्ड व विद्यार्थ्यांची जास्तींतजास्त पांच ही संख्या या गोष्टी आवश्यक आहेत. परीक्षा मात्र शिक्षणसंस्थेंतील व गुरुकडील विद्यार्थ्यांची एकच आहे. पहिली परीक्षा दीड वर्षाचे अखेरीस व दुसरी त्यांनतर दोन वर्षांनीं व्हावयाची आहे. शेवटच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना वैद्यक व्यवसाय करण्यास परवानगी आहे.

विधायक टीकाकारांचा उपयोग

टीकाकार विधायक असले म्हणजे आपणांस चूक कळते व ती दुरुस्त करतां येते. टीकेला न भितां शास्त्राची योग्यता ठरविली पाहिजे. शास्त्राचा चांगलेपणा रोग्यांनीं ठरवला पाहिजे. आयुर्वेदाच्या चांगलेपणाचा प्रचारहि केला पाहिजे व लोकांना तें पटविलें पाहिजे."

वैद्यकीय शाळांची जागतिक सूची

जागतिक आरोग्य संघटनेनें [वर्ल्ड हेल्थ आर्गनिझेशन] वैद्यकीय शिक्षणाची तरतूद असलेल्या शिक्षण संस्थांची पहिलीच अशी जागतिक स्वरूपाची यादी नुकतीच प्रसिद्ध केली आहे. सध्यां ८४ राष्ट्रांत आढळणाऱ्या अशा वैद्यकीय शिक्षणसंस्थांची यादी बनविण्यांत आली आहे.

या यादीवरून असें दिसून येतें कीं, सर्वांत जास्त [७०] वैद्यकीय शिक्षणसंस्था एकट्या अमेरिकेंत आहेत.

वाकेरी भाते

अत्यंत खात्रीचें व ताजें मिळतें. १ पौंड २ रु. ट. ख. निराळा.

श्रीपाद फार्मसी, पो. पेण (कुलाबा)

नवीन मराठी वैद्यक मराठी मासिक

: महाराष्ट्र वैद्यक परिचय :

औषधें, इंजेक्शनें, रोगनिदान, रुग्णपरीक्षा, नवीन शोध वगैरे पाश्चात्य वैद्यकांतील ज्ञान सोप्या मराठी भाषेंतून देणारें एकमेव मासिक " महाराष्ट्र वैद्यक परिचय " 'वैद्यकीय पेशातील बहुमोल सहाय्यक' आजच वर्गणीदार व्हा ! वार्षिक वर्गणी ५ रु. (किरकोळ अंकासाठीं आठ आण्याची तिकीटें पाठवावीत.)

पत्ताः- संपादक, वैद्य ज. वा. मोकाशी-ठाणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६० वर्षांचें जुने, सुप्रसिद्ध व विश्वसनीय औषधी-निर्माते

उंझा फार्मसी लिमिटेड

— कांहीं लोकप्रिय औषधें —

सर्वांकरितां— 'नवरत्न-रस'

* स्त्रिया, पुरुष, बालक या सर्वांकरितां ही महौषधी आहे. रस-रक्तादि सप्त धातूंची शुद्धि, वृद्धि व पोषण करणें हें 'नवरत्न रसाचें' विशेष कार्य आहे. निरोगी लोकांस रसायन व रुग्णांना उत्तम औषध आहे. किं. २८ गोळ्याचे ५ रु.

स्त्रियांसाठीं— 'सुंदरी संजीवनी'

* स्त्रियांचे प्रदर, ऋतु-दोष, गर्भाशयविकार, वंध्यत्व आदि नष्ट करून शक्ति येते. स्त्री-रोगावर हें अमृततुल्य औषध आहे. किं. ४ औंस २ रु.

मलेरियावर 'एल्स्टो पिल्स'

* ह्या गोळ्या सप्तपर्ण, कालमेघ, कुटकी आदि वनस्पतींच्या घन सत्वापासून बनविल्या आहेत. ह्या गोळ्या मलेरिया, शीतज्वर ह्या तापांवर अत्यंत गुणकारी असल्याचें सिद्ध झालें आहे. किं. ५०० गोळ्या (१० तो.) ३॥ रु.

आंव व मुरड्यावर— 'अँटि-डिसेंट्रॉल'

* ही पर्पटी इंद्रजव, कुटजत्वक्घन, बिल्व, कापूर, अफू ह्या औषधी द्रव्यांच्या संयोगापासून बनविली आहे. ही जुनाट आव, मुरडा, संग्रहणी ह्यावर अतिशय गुणकारी आहे. पहिल्याच दिवशीं गुण दिसूं लागतो. १ बा. १ रु.

लहान मुलांकरितां— 'शिशु संजीवनी'

* लहान मुलांचा ताप, हगवण, दूध न पचणें, खोकला वगैरेवर उत्तम औषध, मुलांना नियमित दिल्यानें मुलें बाळसेदार व धुष्टपुष्ट होतात. १ बा. ॥ रु.

सायरप- 'शंख-पुष्पी'

* स्मरणशक्तिवर्धक व ज्ञानतंतूंना बलदायक असें हें उत्तम ब्रेन-टॉनिक आहे. विद्यार्थी, कारकून, वकील, प्रोफेसर अधिकारी वगैरे मेंदूची कामें करणाऱ्या लोकांना हें अत्युत्तम औषध आहे. १ बा. १। रु

'अष्टावक्र-रस'

* वलिपलितनाशक, बलवर्धक, पौष्टिक, आरोग्यरक्षक व बुद्धि आणि कांति-वर्धक असें आयुर्वेदीय औषध आहे. किं. १ तो. ४० रु.

'बृहत्कस्तूरीभैरव' (स्वर्णयुक्त)

* सन्निपात, आंत्रिकज्वर, वात-ज्वर, कफ ज्वर आणि वातकफ-ज्वर ह्या तापांत उत्तम उपयोगी आहे. तसेंच मंथरज्वर व न्युमोनिया यांतहि हा योग सत्वर गुण देतो. किं. १ तो. १८ रु.

'बृहत्- वातचिंतामणी'

* आयुर्वेदांतील वातरोगांवर हें एक दिव्य औषध आहे. हृदयाला व मेंदूला बल देणारें आहे. मेंदूच्या ज्ञानतंतूंच्या विकृतीमुळें उद्भवणाऱ्या सर्व विकारावर उत्तम गुणदायी आहे. मेंदूची क्षीणता, रक्तदाब, हिस्टेरिया वगैरेवरहि लाभदायक आहे. किं. १ तो. ३५ रु.

उंझा फार्मसी लि. [उ. गुजरात]

महाराष्ट्र एजन्टः- **जयंत अँड कंपनी, लक्ष्मीरोड, पुणें सिटी.**

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें— ले.-वैद्य पु. वि. धामणकर, धूतपापेश्वर, पनवेल

२८ सूतिकाभरण नं.१ (भा. भै. र. ८२६७, र. यो. सा. ५१७)

" सूतिकाज्वर व त्यांत होणारा धनुर्वात ह्यांत उत्तम प्रकारें कार्य करणारें व अशाच प्रकारच्या इतर विकारांतहि उपयोगी असें हें औषध आहे.

सूतिकाज्वराचें कारण सूतिकाविष होय. प्रसूतिकाळीं जितकी स्वच्छता ठेवणें आवश्यक तितकी पाळली न गेल्यानें घाणेरडे कपडे, घाणेरडे हात, घाणेरड्या वस्तु ह्यांच्या संपर्कानें बाहेरचीं सेंद्रिय विषारें योनिमार्गानें शरीरांत प्रवेश करतात.

प्रसूतिकालीन वेदना, प्रसूतीमुळें योनी व गर्भाशयमुख ह्यांत झालेले व्रण, वार पडून गेल्यानें गर्भाशयाच्या आंतील पिच्छा त्वचेचा झालेला क्षोभ, शोथ, व्रण ह्यांत बाह्य वातावरणांतलि विष वा जंतु ह्यांचा प्रवेश होतो. प्रकुपित दोषांच्या साहाय्यानें ते सर्व शरीरभर पसरतात व सूतिकेला ताप येतो.

ज्वराप्रमाणेंच केंव्हां केंव्हां बाळंतिणींना धनुर्वातहि होतो. सूतिका-विषाचा व त्यामुळें होणाऱ्या वातप्रकोपाचा परिणाम वातवाहिन्या व स्नायु ह्यांवर विशेषतः शरीराच्या बाह्य भागांतील बाह्यस्नायुप्रतानावर घडून धनुर्वाताचा झटका येतो. वातवहनाळांतील सुषुम्नाग्राच्या भागांत, त्रिकास्थीच्या अंतर्भागांत असलेल्या जलांत दोषदुष्टि अधिक होते. आणि प्रथम हनुग्रह होतो, जबडा जूखडतो. हनुग्रह हें धनुरायामाचें प्रथम व स्पष्ट लक्षण होय. तें झाल्यानंतर पुढें पुढें सर्वांगास झटके येऊं लागतात. सर्व शरीर धनुष्याप्रमाणेंच वांकल्यासारखें होतें. ह्याप्रमाणें धनुर्वात सूतिकांना होतो. " (आ. औ. गु. धा.भा.५)

सूतिकाभरणाचा संस्कृत पाठ

सुवर्णं रजतं ताम्रं प्रवालं पारदं समम् ।
गन्धकं चाभ्रकं तालं शिला त्रिकटु रोहिणी ॥
एतानि समभागानि रविक्षीरेण मर्दयेत् ।
चित्रमूलकषायेण पुनर्नवरसेन च ॥
दिनं गजपुटे पाच्यं मूषायां धारयेत्पृथक् ।
अनुपानविशेषेण देयं गुंजार्द्धकं च तत् ॥
सूतिकारोगमतुलं धनुर्वातं विशेषतः ।
त्रिदोषोत्थान्हरेद्व्याधीनिच्छापथ्यं प्रदापयेत् ॥
सूतिकाभरणं नाम सर्वरोगहरं परम् ॥

नांव- सूतिका=बाळंतीण, आभरण=दागिना, भूषण. हें औषध बाळंतिणींच्या सर्व विकारावर उत्कृष्ट काम देणारें असल्यानें ह्याला त्यांच्या सुंदर दागिन्याची उपमा दिली आहे.

पाठनिश्चिति- सूतिकाभरणरसाचे दोन पाठ दिले आहेत. दोन्ही उत्तम आहेत. पैकीं एक प्रतिबंधक. तर दुसरा प्रतिकारक असे उपयोजतां येण्यासारखे असल्यानें दोन्ही येथें उद्धृत केले आहेत.

द्रव्यसंग्रह- सुवर्ण, रजत, ताम्र, शिला, पारद, गंधक, अभ्रक, प्रवाळ, सुंठ, मिरें, पिंपळी कुटकी.

द्रव्यनिर्णयः- ताल-पत्रीहरताळ. मिरें-काळी
पारद-हिंगुलोत्थ. कुटकी-काळी
गंधक-आमलसार. पिंपळी-जुनी, लेंडी

द्रव्यशोधनः- शोध्य शोधक शोध्य शोधक
पारद-लसूण. गंधक- घृत, दुग्ध
मनशील- अगस्तिपत्र पिंपळी- चित्रक
ताल-चुन्याची निवळी

प्रक्रियाः- सर्व औषधांचीं चूर्णे पृथक्शः वजन करून घेऊन ती प्रथम सर्व एकत्रित खलावीत. त्यांचें एकजिनसी मिश्रण झालें कीं प्रथम त्याचा खल रुईचे चिकांत करावा. नंतर त्यांत चित्रकाचा व पांढऱ्या वसूचा काढा क्रमाक्रमानें घालून सात-सात दिवस खल करावा. नंतर त्याचा गोळा करून तो उन्हांत सुकवावा. व मग तो गोळा शरावसंपुटांत घालून त्यास लहानसें गजपुट द्यावें, म्हणजे सूतिकाभरण तयार होतो. हा खलून कुपींत भरून ठेवावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालः- साधन-शरदऋतु, मर्दन-२१ दिवस.

सिद्धिप्रमाणः- १ तो पारा घेतला तर तयार औषध १३ तोळे होतें.

परिगणनः- पारा, अभ्रक, सुवर्ण इ.

रोगः- बाळंतिणीचे ज्वर, धनुर्वात आदि सर्व.

मात्राः- अर्धा गुंज

अनुपानः- आल्याचा रस व मध.

---

२९ सूतिकाभरण नं.२ (५१६ र.यो.सा.)

संस्कृत पाठ

लोहभस्म च मंडूरं ताम्रं गन्धं पृथक् पलम्।
मरीचं वत्सनाभं च पृथगेषां पलद्वयम्॥
पारदं टंकणं चैव प्रत्येकं कर्षमात्रकम्।
सर्वं खल्वे विनिक्षिप्य शीततोयेन मर्दयेत्॥
त्रिफलोग्रस्य कोलस्य रसैर्भाव्यं पृथक् पृथक्।
क्रमेण त्रिदिनं मर्द्यं चतुर्गुंजाप्रमाणकम्॥
अनुपानविशेषेण सर्वरोगहरं परम्।
सूतिकावातमत्युग्रं सूतिकाभरणो रसः॥

नांव—सूतिकाभरण १ प्रमाणें.

पाठनिश्चिति—ठीक आहे.

द्रव्यसंग्रहः—४ लोह, ४ मंडूर, ४ ताम्र, ४ गंधक,
१ पारा, १ टंकण, ८ बचनाग, ८ मिरीं.

द्रव्यनिर्णयः-पारा- हिंगुलोत्थ. टंकण- उद्भिज.
गंधक- आमलसार. बचनाग-काळा.

द्रव्यशोधनः—पारा-लसूण, टंकण-अग्नि
गंधक-तूपदूध, बचनाग-गोमूत्र

प्रक्रियाः—मूळ ग्रंथांत थंड पाण्यांत खल करावा असें सांगितलें आहे. पण त्यापेक्षां माक्याचे रसांत खल केल्यास बरें असें वाटतें.

कालः—साधनकाल-शरद, मर्दन-७ दिवस.

सिद्धिप्रमाण —१ तो. पारा ३५ तो. औषध तयार.

परिगणनः —भस्में, बचनाग इ.

रोगः—अत्युग्र सूतिकावात इ. सूतिकेचे सर्व रोग.

मात्राः—४ गुंजा.

अनुपान—यथावस्था-दोष, विकार.

---

३० स्मृतिसागर (भा. भै. र. ८३१३)

स्मृतिसागर हें सहस्रार व वातवाहिन्यांवर शामक कार्य करणारें विशेषतः आज्ञावाहिन्यांचा क्षोभ झाला असतां चांगलें कार्य करणारें असें वातशामक औषध आहे. उन्माद, गर्भाशयोन्माद, तारुण्योन्माद, बालग्रह, संन्यास, सन्निपात, व पक्षवात अथवा तज्जन स्मृतिभ्रंश इ. विकारांत ह्याचा उपयोग चांगला होतो.

ह्या रसांतील मुख्य द्रव्यें तीक्ष्ण, उष्ण व व्यवायी परंतु योगवाही बनविलेलीं आहेत ह्या सर्व खनिज द्रव्यावर शुद्धि व संस्करण केलें जातें, त्यामुळें द्रव्यांतील गुणवीर्यांचा उत्कर्ष होतो. व त्यासच उद्भिज्ज पदार्थांची जोड दिल्यानें तीं द्रव्यें प्राणिशरिरांत सहज शोषलीं जातात. अर्थात् त्यांचें कार्य त्वरित लाभतें.

स्मृतिसागराचा संस्कृत पाठ

रसगन्धकतालानां सशिला ताप्यभास्वताम्।
सिद्धानां मूर्च्छितानां च चूर्णं भाव्यं वचाश्रृतैः।
एकविंशतिधा पश्चाद् ब्राह्मी वारास्तथैव च।
कटभीबीजतैलेन भावयेदेकवारकम्॥
स्मृतिसागरनामाऽयं रसोऽपस्मारनाशनः।
सर्पिषा माषमात्रोऽयं भुक्तो हन्यादपस्मृतिम्।
उन्मादोक्तो विधिः सर्वो ह्यपस्मारे प्रयुज्यते॥

८३१३ भा. भै. र.

नांवः- सागराप्रमाणें विशाल अशी स्मरणशक्ति प्राप्त करून देणारा रस. नांव उपमात्मक आहे.

पाठनिश्चितिः- "ताम्रभस्मनाम्" र. यो. सा., ताप्यभास्वताम्ः। भा. भै. र., एका पाठांत सुवर्णमाक्षिक भस्म नाहीं. तर तें दुसऱ्यांत आहे. आमचे दृष्टीनें सुवर्णमाक्षिकासारखें अत्यंत सौम्य व शामक द्रव्य ह्या योगांत अत्यंत आवश्यक आहे. म्हणून आम्ही तो पाठ स्वीकारला.

द्रव्यसंग्रहः- पारा, गंधक, हरताल, मनशीळ, सुवर्णमाक्षिक, ताम्रभस्म.

भावनाद्रव्यसंग्रहः- मालकांगणी तेल, वेखंड, ब्राह्मी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द्रव्यनिर्णयः– पारा–हिंगुलोत्थ गंधक–आमलसार
ताल–वर्की ब्राह्मी–शारदीय

द्रव्यशोधनः– पारा–लसूण, गंधक–तूप, दूध. ...–चुनानिवळी, मनशीळ–अगस्तिपत्ररस.

प्रक्रियाः– (१) "शुद्धानां मूर्च्छितानां च" । विशेषणें त्या योगांतील खनिज द्रव्यांना उद्देशून ...लीं आहेत. ह्याकडे वैद्यवर्गाचें लक्ष विशेषत्वानें ...ूं इच्छितों.

तेलाची भावना केव्हां द्यावी ?

(२) पाठांतल्या क्रमानें तैलाची भावना शेवटीं ... पण पाण्यावर तेल ठरत नाहीं. तैलावृत्त आर्द्र ...र्थ न सुकतां बुरसतो, हें सिद्ध असल्यानें तो क्रम ...णें अनिवार्य आहे. तेव्हां सर्व द्रव्यांचें मिश्रणास ...म तैलसंस्करण करून तो स्नेह जिरला, अदृष्ट ...यावर त्यास वेखंड-हिम, व ब्राह्मीरस ह्यांच्या ...ना द्याव्यात, हें युक्त होय. ६० तोळे मिश्रणांत ...ान्यतः एक तोळा तैल चांगलें जिरतें. वसंतांतल्या ...यापेक्षां हें तैल जिरविण्यास फार मेहनत घ्यावी ...ते व हें स्नेहभावनकार्य अत्यंत आवश्यक आहे. ...यानीं घेऊन तें यथास्थित करवावें व मग इतर ...वना २१।२१ द्याव्यात.

कालः– स्नेहमर्दन -शरद, वसंत वा ग्रीष्म.
भावनाकाल–शरदादि ग्रीष्मांत.
मर्दनकाल–६ महिने.

सिद्धिप्रमाणः– १० तो. पारा, ७० तोळे.

परिगणनः– तैल-भस्मांचें

रोगः– अपस्मार, उन्माद.

मात्राः– उडीदाएवढी १।१ गोळी.

अनुपानः– तूप.

---

३१ हेमगर्भ (र. यो. सा. ६३२)

"हेमगर्भाचा उपयोग सान्निपातिक ज्वराच्या ...टच्या अवस्थेंत फारच चांगला होतो. आंत्रिक, ...सनक, श्लेष्मक या सन्निपातांच्या शेवटीं शेवटीं ...र एकदम उतरू लागतो, नाडी अगदीं बारीक, छिन्न म्हणजे मधून मधून ठोके बन्द पडत असलेली, अंगाला, विशेषतः डोक्याला, कपाळाला, गारवा–गार घाम सुटणें, छातीची घरघर, तन्द्रा, सर्वांगास हात–पायास गार घाम सुटलेला, अगर नुसताच गारवा येणें, या अवस्थेंत हेमगर्भ अत्यन्त उपयुक्त औषध होय. ही अवस्था असून ज्वरहि उतरलेला म्हणजे नेहमींपेक्षां ज्वरोष्मा अतिशयच कमी झालेला असल्यास याचें कार्य फार उत्तम होते.

कालातिसार किंवा पटकी (जंतुजन्य विषूचिका)

या विकारांत शेवटीं शेवटीं खूप जुलाब होऊन नाडी, हृदय क्षीण होतें, डोळे खोल जातात, गालफडें बसतात, आवाज क्षीण होतो, उमटतच नाहीं, क्षीणते-मुळें पडल्या पडल्याहि श्वास लागतो, पोट खपाटी जाते, अंगाची भयंकर तलखी होते, हात, पाय, सर्वांग अगदीं काल्यासारखें गारगार पडतें, तृषा भयंकर लागते, नाडी अगदीं मन्द दोरीसारखी छिन्न अशी असते. कित्येकवेळां नाडी हातास लागण्याचीहि पंचाईत पडते. ह्या स्थितींत हेमगर्भरस अत्यन्त उप–युक्त होय. हेमगर्भ आल्याच्या रसांत उगाळून त्यांत थोडासा मध टाकून थोडें थोडें चाटण करावें. जस–जसें चाटण शरीरांत शोषलें जातें तसतसा याचा उपयोग होऊं लागतो.

प्रसूतिवाताच्या विकारांत हेमगर्भ अत्यंत उपयुक्त होय. प्रसूतिकालीं वेणा कमी होऊन नाडी क्षीण होऊं लागल्यास हेमगर्भ द्यावा. (औ. गु. शा. भा. ५वा)

हेमगर्भाचा संस्कृत पाठ

शुद्धं सूतं चतुर्भागं द्विभागं गंधकस्य च ।
भागमेकं सुवर्णं च त्रिभागं शुल्वभस्म च ॥
कुमारीरससंयुक्तं सप्ताहं मर्दयेद्दृढम् ।
गुटिकां कारयेत्तान्तु बध्नीयात्खरकर्पटे ॥
वस्त्रे किंचिद्बलिं दत्वा तत्र गोलं निधाय च ।
बध्नीयात्पोट्टलीं गाढां पश्चाद्दरूरेण वेष्टयेत् ॥
सर्वभागसमं गन्धं दत्त्वा मृण्मयभाजने ।
तन्मध्ये पोट्टलीं न्यस्य मुखे मुद्रां च कारयेत् ॥
विधाय छिद्रं मुद्रास्थं द्रावं दृष्ट्वा शलाकया ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाचयेत्सिकतायन्त्रे रसोऽयं मृदुवह्निना ॥
यामार्द्धेन सुसंजातं स्वाङ्गशीतं समुद्धरेत् ।
कासे श्वासे क्षये वाते कफे ग्रहणिकागदे ।
सर्वरोगेषु दातव्या हेमगर्भाख्यपोट्टली ॥

नांवः-ज्यांत सुवर्ण आहे अशा विशिष्टद्रव्य बोधक कल्प.

द्रव्यसंग्रहः—४ भाग पारा, ३ भाग ताम्र, २ भाग गंधक, १ भाग सोनें, ।।॰ भाग समीरपन्नग. भावनाद्रव्य-कोरफडरस

द्रव्यनिर्णयः—पारा-हिंगुलोत्थ. गंधक-आमलसार. सुवर्ण-चुरा.

द्रव्यशोधन—पारा-रसोन, गंधक-घृतदुग्ध

हेमगर्भ मात्रा प्रक्रिया प्रकार १ ला

प्रक्रियाः—प्रथम पारा व सोनें एकत्र करावीत. तदनंतर त्यांत गंधक, ताम्र, समीरपन्नग यांची सूक्ष्म चूर्णें क्रमाक्रमानें मिसळून दरवेळीं स्वतन्त्र खल करावा. शेवटीं पुनः एकवार खल करून मग त्यांत कोरफडीचा रस घालून खल करून भावना जिरवावी.

नंतर त्याची गोळी करून ती थोडा गंधक घालून खरखरीत फडक्यांत घट्ट गुंडाळावी. चांगली घट्ट पोटली कापडानें गुंडाळून आवळून बांधावी. मातीच्या परळांत वरील सर्व औषधांच्या समभाग गंधक टाकून तो परळ वालुकायंत्रांत घालून अग्नीवर ठेवावा. परळास मुद्रा देतां येईल अशा प्रकारचा तो बनविलेला असावा. वारंवार गुडदी (मुद्रा) काढून गंधकाचा द्रव पहावा. शलाकेनें तो ढवळावा व पोट्टली त्या गंधकद्रवांत तळल्यासारखी होते कीं काय हें वारंवार पहावें. वालुकायंत्राखालीं मृदु अग्नि द्यावा. ह्याप्रमाणें दोन तासपर्यंत पोटली गंधकद्रवांत वालुकायंत्रांत पचन झाली म्हणजे स्वांगशीत झाल्यावर काढून घ्यावी. (औ. गु. शा. भा.).

सिद्धिप्रमाणः- ४ तो. पारा=१२ तोळे औषध.

परिगणनः- सोनें-पारा, इ. चॅ

रोगः- वात, कफ, कास, श्वास, संग्रहणी इ. सर्व.

मात्राः-१/८ ते १ गुंज.

अनुपानः- आल्याचा रस व मध.

हेमगर्भमात्रा प्रक्रिया, प्रकार २ रा

भावना पुरी झाल्यावर कोनाकार मात्रा करा-व्यात. त्या सावलींत वाळवाव्यांत, मग प्रत्येक मात्रेवर पृथक्‌शः रेशमीवस्त्र रेशमी दोऱ्यानें पुरचुंडीवजा बांधावें.

शेगडीवर तवा ठेवावा. त्यावर बारीक वाळूचा १॥ इंच जाडीचा सारखा थर द्यावा. त्यावर एक छोटीशी लोखंडी परात रोवून बसवावी. तींत गंधक पातळ करून त्यांत, तुपांत करंज्या तळतात त्याप्रमाणें मात्रा तळाव्यांत. मात्रांतून बुडबुडे येणें बंद झाले कीं तळण पुरेसें झालें असें समजावें. व मात्रा बाहेर काढून स्वांगशीत होऊं द्याव्यात. मग त्यावरील फडके सुरीनें खरडून काढून मात्रा घासून पुसून स्वच्छ करून ठेवाव्यात.

पोट्टली करण्याचें महत्त्व

हा एक पारदाचा बंध आहे. ह्या स्थितींत पारद अधिक कार्यक्षम होतो. मात्रेंतील द्रव्यांचें कार्य पृथक्‌शः अगर मिश्रणापेक्षां पोट्टली विधीनें अधिक वाढतें. मात्रा तिच्या घटकावयापेक्षां संहतिकरणामुळें अधिक टणक होते. आत्ययिक अथवा प्राणांतिक अवस्थेंत ती उगाळून चाटवितांच तिचें कार्य दिसूं लागतें. अगदीं थोड्या वेळांत अल्पतर मात्रेनें, मोठ्या कार्याची प्रचीति आणून देते. मात्रेला शारीरिक पाचकाग्नीच्या साहाय्याची वा संस्करणाची आवश्यकता उरत नाहीं. अशा हा अत्यंत उपयुक्त प्रकार आहे.

महत्वाच्या आयुर्वेदीय मात्रा

प्राचीन काळीं वैद्याजवळ रससिंदूर, सूतशेखर, सूतिकाभरण, समीरपन्नग, वातविध्वंस, त्रैलोक्यचिंतामणी, हेमगर्भ अशा आणिबाणीच्या प्रसंगीं बाजू सावरून धरणाऱ्या मात्राची एक स्वतंत्र छोटीशी सदैव खिशांत वा बटव्यांत असायचीच. आणि रोग्याकडे जातांना ती बरोबर आहे ना ह्याची खात्री करून घेत असत. कांहीं कांहीं घराण्यांतूनहि अशा मात्रा सिद्ध मंत्राप्रमाणें महौषधी म्हणून संग्रहीं ठेवीत असत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभविक चिकित्सा प्रकरण १४ वें (पुढें चालू)— लेखकः—वृद्ध वैद्य (म. प्र.)

स्वरभेद निदान व चिकित्सा

स्वरभेदास (१) अत्युच्च भाषण (२) अत्युच्च अध्ययन (३) विष व (४) अभिघात हीं चार कारणें माधवानें दिलीं आहेत.

अत्युच्च भाषणजन्य स्वरभेद

१) अत्युच्च भाषणामुळें स्वरयंत्रांतील चारहि तंत्रींवर एकसारखा पुष्कळवेळपर्यंत ताण पडतो आणि त्यामुळें त्यांच्यांत असलेला स्थितिस्थापक धर्म कमी होऊन त्या निरनिराळे स्वर उत्पन्न करण्यास असमर्थ होतात.

विषजन्य स्वरभेद

२) विषाचा परिणाम सूक्ष्म अवयवावर अधिक होतो. कारण त्या अवयवांत प्रतिकारशक्ति ही कमी असते. जितका अवयव स्थूल तितकी त्यांची प्रतिकार शक्ति अधिक, तृणांच्या समुदायानें हत्तीहि बांधले जातात म्हणून थोड्याहि विषाचा परिणाम या स्वरयंत्रावर होतो आणि तो तात्काळ कळतोहि. घसा बसणे हें एखाद्या साध्याविषानेंहि होतें. अशुद्ध अशा वत्सनाभ किंवा कुचल्याचा परिणाम गळ्यावर ताबडतोब होतो. गळा खवखवणें ही एक विषाची परीक्षाच ठरली आहे.

३) अत्युच्च अध्ययनाचे परिणाम अत्युच्चभाषणाप्रमाणेंच होतात.

अभिघातज स्वरभेद

४) अभिघात हा स्वरयंत्रास किंवा त्याच्या सभोवतालच्या कोणत्याहि भागास झाला तर स्वरयंत्रावर परिणाम होऊन स्वरतंत्री आपलें कार्य करूं शकत नाहींत.

स्वरभेद हा प्रधानतः वातव्याधीच

या चारहि कारणांचा परिणाम प्रधानतया वातविकृतीतच होतो. आणि म्हणून स्वरभेद हा व्याधी प्रधानतः वातजच आहे, असें अनेक तत्पीडित रुग्ण पाहिल्यानंतर आढळून येतें. राजयक्ष्म्याचा स्वरभेद हा एक प्रधानलक्षणरूप व्याधि आहे. षड्रूप व एकादशरूप राजयक्ष्यांच्या लक्षणांत तो अंतर्भूत केलेला प्रत्येक निदान ग्रंथांत सांपडून येईल. कारण राजयक्ष्म्यांत धातुक्षय हें मुख्य लक्षण आहे आणि जेथें जेथें धातुक्षय असेल तेथें वातवृद्धि असणारच, हें आश्रयाश्रयीभावावरून सिद्ध आहे.

स्वरभेदाची संप्राप्ति

स्वरभेदाची संप्राप्ति विस्तारपूर्वक मागें सांगितलीच आहे. दुष्ट अर्थात् वृद्ध वातादि तीनहि दोष शरीरांत संचार करीत असतांना स्वरवह स्रोतसांत जेव्हां त्यांच्या गतीस बाधा उत्पन्न होते, अर्थातच ती बाधा या स्रोतसांच्या अभिघातोच्चभाषणविषप्रयोगादि कारणामुळें होते, तेव्हां स्वरभेद हा व्याधि स्पष्ट होतो.

संख्यारूपसंप्राप्ति– स्वरभेदाचे सहा प्रकार असतात (१) वातज, (२) पैत्तिक, (३) कफज, (४) सान्निपातिक (५) मेदोज व (६) क्षयज.

वातज स्वरभेदाचीं लक्षणें

वातज स्वरभेदांत प्रधानतया वातविकृतिच अधिक असल्यामुळें सर्वच वाताचीं लक्षणें होतात.

(१) वात हा दोष जरी स्वयंवर्णरहित (अमूर्त–अदृश्य) असला तरी पण शरीरावर त्याचा परिणाम काळावर्ण उत्पन्न करण्याचा असतो. थंडीच्या ऋतूंत गौरवर्ण मनुष्यांचा चेहराहि काळसर झालेला दिसतो. याला कारण शीत वायूचा संसर्गच होय. वायु स्वयंवर्णरहित असतांना देखील त्याचें प्रभावजन्य कार्य त्याच्याशीं संसर्ग झालेल्या वस्तुमात्रास कृष्णवर्ण आणणें हें आहे. त्यामुळें वातज स्वरभेदानें पीडित मनुष्याचे १) डोळे २) चेहरा ३) मूत्र आणि ४) शकृत् हे चारहि पदार्थ काळसर झालेले दिसतात. ज्याप्रमाणें चीर पडलेल्या भांड्यांतून स्वर निघता,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तसाच या मनुष्याचा आवाजहि होतो, त्याला एकसारखें बोलवत नाहीं आणि त्याचा गाढवाच्या आवाजाप्रमाणें कर्कश स्वर होतो.

पैत्तिक स्वरभेद

(२) पित्त हें द्रव्य पिवळ्या वर्णाचें असल्यामुळें त्या पित्ताची शरीरांत प्रमाणवृद्धि झाली म्हणजे प्रथम मूत्र, नंतर डोळे, शकृत् व चेहरा हे पिवळया वर्णाचे दिसूं लागतात आणि बोलतांना गळ्यांत, –त्याच वृद्ध पित्तांत उष्णतेचेंहि प्रमाण वाढल्यामुळें—जळजळ व दाह हीं लक्षणें होतात.

कफज स्वरभेद

(३) कफ हें द्रव्य चिकट असल्यामुळें पित्तापेक्षां कांहींसें अधिक घट्ट आहे आणि त्याची प्रमाणांत वृद्धि झाली म्हणजे तें अधिकच चिकट व घट्ट होतें. अशा प्रकारचें तें द्रव्य स्वरयंत्रांतील अन्तस्त्वचेच्या आवरणांत वाढलें म्हणजे त्यामुळें गळा व स्वरयंत्रांतील पोकळी अवरुद्ध होते आणि म्हणून स्वर हा पाहिजे तसा न निघतां दाटलेला, घोगरा असा निघतो. त्यामुळें रोगी कमी बोलूं शकतो आणि म्हणूनच हळूहळू बोलतो. दिवसां उन्हाच्या उष्णतेमुळें शरीराभोंवतालीं असलेला वायु गरम असतो त्यामुळें गळा तापून त्यांतील हें कफद्रव्य पातळ होतें. त्यामुळें स्वरयंत्रांतील पोकळी बरीच मोकळी होते. म्हणून त्या कफज स्वरभेदी मनुष्यास दिवसां अधिक बोलतां येतें.

सान्निपातिक स्वरभेद असाध्य कां ?

(४) सान्निपातिक स्वरभेदांत (अ) स्वरयंत्रांतील तंत्रींना आवश्यक असणारी संकोच-विस्फाराची शक्ति धमनी (Nerves) विकृतीमुळें क्षीण झालेली (ब) पित्तवृद्धीमुळें गळ्यांत जळजळ आणि (क) कफवृद्धीमुळें गळा दाटलेला अशा सर्व लक्षणांचा संयोग होऊन हा विकार असाध्यावस्थेस प्राप्त होतो. उष्ण उपचार केला तर पित्तदोष वाढेल व शीत केला तर कफदोष वाढेल म्हणून कोणतीच चिकित्सा सफल होत नाहीं.

ओजःक्षयामुळें स्वरभेद

(५) क्षयजन्य स्वरभेदांत, क्षयामुळें सर्वच धातु (रसापासून शुक्रापर्यंत) क्षीण व सारहित झाल्यामुळें सर्व धातूंचें जें तेज, ज्याला ओज म्हणतात तेंच क्षीण झालेलें असतें. त्यामुळें स्वरयंत्र जरी तितकेंसें विकृत नसलें तरी त्याला कार्यप्रवृत्त करणारी मूलशक्ति जीवनशक्ति (Vital energy) च अत्यंत क्षीण झालेली असते. यामुळें आवाज बसलेला व कष्टानें निघणारा असा होतो. रुग्णास गळा अवरुद्ध झालेला व धुरानें भरल्याप्रमाणें भासतो. आणि म्हणून बोलण्याची शक्ति व इच्छाहि पण रहात नाहीं. हा देखील सान्निपातिक स्वरभेदाप्रमाणेंच असाध्य आहे.

मेदोवृद्धीमुळें स्वरभेद

६) मेदोज स्वरभेद हा मेदस्वी मनुष्यासच होतो. चपळ व रोडकर मनुष्यास कधींहि होत नाहीं. मेदवृद्धीमुळें गळ्याच्या सभोवतालचा मांसल भाग विशेष पुष्ट होऊन त्याचा दाब स्वरयंत्रावर सारखा पडत असतो. आणि मेद आणि कफ हीं दोनहि द्रव्यें स्निग्ध, गुरु, मंद, श्लक्ष्ण आणि स्थिर गुणांनीं युक्त असल्यामुळें परस्पर समानगुणभूयिष्ठ आहेत त्यामुळें एकाच्या वाढीमुळें दुसऱ्याचीहि वाढ होते. यामुळें मेदस्वी मनुष्याचा स्वर घोगरा (कफव्याप्त असा) सदैवच असतो. कफद्रव्य जरी सदैव बाहेर पडत नसलें तरी रक्तांत तें अधिक प्रमाणांत मिश्रित होत असतें व त्याचा परिणाम होऊन गळा कफानें व्याप्त असा असतो, त्यामुळें आवाज खोल गेलेलासा होऊन उच्चारलेलीं वाक्यें ऐकणारास नीट ऐकू येत नाहींत. त्याचा गळा दाटल्यामुळें व स्वरमार्गांत अवरोध उत्पन्न झाल्यामुळें तो मोकळा व्हावा म्हणून याला तहान जास्त लागते. कफज स्वरभेदाशीं याचें विशेष साम्य असतें.

कोणते स्वरभेद असाध्य ?

जन्मापासूनच ज्याच्या गळ्यांत दोष असल्यामुळें झालेला स्वरभेद कधींहि बरा होत नाहीं. कारण ती विकृति स्वरयंत्रांत स्वभावतःच असते. शस्त्रक्रियादिकर्में या यंत्रावर करणें अति धोक्याचें असल्यामुळें तसले प्रयत्न करण्यांत अर्थ नसतो. त्याच-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

र्णे दुसऱ्या व्याधीमुळें क्षीण झालेल्या व शरीरानें झालेल्या मनुष्यास व म्हातारपणीं झालेला हा धि कधींच बरा होत नाहीं. सान्निपातिक स्वरभेद साध्य आहे. तसेंच मेदवृद्धीमुळें ज्याचा गळा लठ्ठ लेला असतो त्याचाहि स्वरभेद साध्य होत नाहीं.

दोषानुरूप स्वरभेद चिकित्सा

(१) वातज्वरभेदावर जेवणानन्तर मिऱ्यांचें णी मिसळलेलें तूप चाटण्यास द्यावें. (२) कासविंदा वा भृंगराजाच्या स्वरसांत शिजविलेलें तूपहि या रभेदावर लाभदायक असतें.

(३) जटामांसी, वावडिंग, लोध्र, अगर, तगर विला, रास्ना, बाळहिरडे व वंशलोचन समभाग ऊन त्यांचें वस्त्रगाळ चूर्ण मधाबरोबर चाटवावें. वा या मधमिश्रित चूर्णाच्या गोळ्या करून ाव्या व त्या तूपमधाच्या विषमप्रमाणांतील-मिश्र- त खलून चाटवाव्या म्हणजे सर्व प्रकारचे स्वरभेद होतात.

पैत्तिक स्वरभेदावर शतावरी ज्येष्ठमध

४) पैत्तिक स्वरभेदावर शतावरी चूर्ण मधांत तुपांत मिसळून चाटवावें.

५) ज्येष्ठमधाचें चूर्ण तूप व खडीसाखरेंत सळून चाटवावें.

कफज स्वरभेदावर पंचकोल + मध

६) कफज स्वरभेदांत पंचकोलाचें चूर्ण मधा- बरोबर चाटवावें.

७) सान्निपातिक स्वरभेदांत चित्रक, यवक्षार, आंवळा, हळद व ओंवा यांचें चूर्ण तूपमधांतून चाटवावें.

८) क्षयज स्वरभेदांत क्षय-चिकित्सा करावी.

मेदोज स्वरभेदावर प्रयोग

९) मेदोज स्वरभेदांत कटु,तिक्त,कषाय द्रव्यांचा प्रयोग करावा. चव्य, अम्लवेतस, सुंठ, मिरें, पिंपळी व जुनी चिंच, तालीसपत्र, जिरें, वंशलोचन व चित्रक यांचें चूर्ण गुळांत मिसळून गोळ्या कराव्या व त्या तोंडांत धराव्या.

स्वरभेदांत तांबूल सदैव औषधीरूप आहे

पथ्यापथ्य:—स्वरभेदाकरितां विडा (ताम्बूल) हा उष्णवीर्य असल्यामुळें सदैवच पथ्यकर आहे. फक्त क्षयज स्वरभेदांत त्याचा फार नियमित उपयोग करावा. इतर नुकत्याच झालेल्या स्वरभेदांत तो औषधीरूप असतो. दोन चार दिवस विडा सारखा तोंडांत धरिल्यास तो औषधीप्रमाणेंच कार्य करितो.

सदैव पथ्यकर गोष्टी

मिरें, लसूण, आलें, महाळुंग, मनुका, खडी- साखर, हिरडा व तूप हे पदार्थ सर्व प्रकारच्या स्वर- भेदांत पथ्यकर आहेत.

गळ्यावर ऊन-ऊन शिरा बांधावा

स्वरभेद हा विकार गायनकलापटु व्यक्तींना विशेषेंकरून होण्याचा संभव असतो. कारण स्वर- यंत्रावर फार ताण, व तोहि सारखा पुष्कळवेळपर्यंत, त्या कलेच्या व्यवसायिकांना पाडावा लागतो. त्याचा दुष्परिणाम न व्हावा म्हणून गळ्याभोंवतालच्या सभोंवार प्रदेशावर (मानेवर) ऊन-ऊन शिरा तयार करून जुने गवई बांधत असत. त्याचा फार चांगला परिणाम होत असे. तो प्रयोग वातज स्वरभंगावर विशेष प्रभावी होतो. कारण गाण्याच्या क्रियेनें (ती क्रिया चलस्वभावी वायूचीच विकृति अधिक करिते म्हणून) वाताची विकृति होते. वातावर स्निग्ध व उष्णगुणी शिऱ्याचा परिणाम होऊन वाताचा नाश होतो.

आयुर्वेद सेवा संघ-नासिकचीं सर्व औषधें
मुंबईत मिळण्याचें आणखी एक नवें केंद्र

रामकृष्ण एजन्सी

३६८ बी ३।७० सुपारीबाग रोड
लालबाग, मुंबई १२

* मागणी रोज वाढत आहे. *

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

<u>बोधक चुटका</u>—

आरोग्यदायक लिंबू ?

एक हुषार वैद्य आपल्या शिष्याबरोबर गांवों-गांवीं औषधोपचार (मोबाइल डिस्पेंसरी) करीत हिंडत होते. एका गांवाजळ येतांच त्यांना तेथें आंबट लिंबाचीं खूपच झाडें दिसलीं. तीं झाडें पाहतांच वैद्यराज म्हणाले, 'चला, आपण तेथें मुक्काम न करतां पुढील गांवीं जाऊं' म्हणून ते त्या गांवांत न जातां पुढच्या गांवाच्या रस्त्याला लागले.

तें पाहून शिष्याला आश्चर्य वाटलें. त्यानें विचारलें 'गुरुजी आपण हें गांव कां वगळलें ? –'

त्यावर गुरुजी जोरानें ओरडून म्हणालेः— 'आंधळ्या, दिसत नाहीं, या गावांत घरोघर आंबट लिंबाचीं झाडें आहेत. व त्यावर खूप सुन्दर फळें लागलेलीं आहेत. इतकीं सुन्दर लिंबें खाणाऱ्या लोकांना रोग होण्याची काय बिशाद आहे !'

त्यावर शिष्यानें भीत भीत विचारलें 'गुरूजी, जो हीं सुंदर लिंबें खाईल त्याला रोग स्पर्श करणार नाहीं, हें मला मान्य आहे. पण असे पुष्कळच हरीचे लाल सांपडतील कीं जे फक्त लिंबाच्या आंतील आंबट रस भातावर भाजीवर पिळून खात असतील, लिंबाच्या रसांत साखर घालून सुधारस, सरबत करून पिणारे-हि कांहीं कमी सांपडणार नाहींत; लिंबाचा रस नुसता अगर साखर घालून घेणारे हे लोक पित्त-कफ-दोष-जन्य रोगानें पीडित झाल्याशिवाय कसे राहतील !

खूप रोगी मिळाले—चांगली प्राप्ति झाली

गुरुजींना त्या शिष्याचें म्हणणें पटलें. त्यांनीं लगेच आपला बेत बदलला व त्या लिंबांच्या गांवींच मुक्काम केला. योगायोग असा कीं त्या गांवीं त्यांना खूपच रोगी मिळाले व प्राप्ति चांगलीच झाली !

'आंबट लिंबाचा रस काढून न सेवन करतां सबंध लिंबाचें गोड अगर खारे लोणचें करावें' ही गोष्ट त्या वैद्यानें त्या गांवचे लोकांना शिकविली. तेव्हांपासून ते गांव पूर्ण निरोगी व सुखी झालें. ज्यांना लिंबाचा आंबट रस आवडत नव्हता, त्यांनाहि लिंबाचा रस काढून राहिलेल्या सालीचें लोणचें वापरण्याचा मार्ग त्यांनीं दाखवून दिला- त्यामुळें आंबट आवडत नसल्यामुळें आपल्या दारांतील लिंबाचीं झाडें तोडून टाकू इच्छिणारे लोकहि त्या आरोग्य-दायी झाडांची काळजीपूर्वक व्यवस्था ठेवू लागले.

''बुंदेलखंडी लोकसाहित्य'' —आयुर्वेद, नागपूर

(थोडा फरक करून)

—————

वाकचवड्यावर गरम शेण

"माझ्या परिवारांतील एका व्यक्तीच्या तळ-हातास एक फोड (वाघचवडा) झाला. तो डॉक्टरकडे गेला. यावर शस्त्रकर्माशिवाय दुसरा उपाय नाहीं असें डॉक्टरनें सांगितलें. बाह्य उपचार उपयोगी नाहींत, हा त्रास १५-२० दिवस चालेल, नंतर ऑपरेशन करूं असें ते म्हणाले. रोग्यास अत्यंत वेदना होत होत्या, रात्रंदिवस झोंप नव्हती, फोडांत ठणका फार होता, हातांत कोणी खिळा ठोकत आहे असें वाटत होतें.

दरम्यान एक जाणता मनुष्य भेटला. त्यानें म्हशीचें शेण गरम करून त्या फोडावर बांधण्यास सांगितलें. त्याप्रमाणें गरम शेण बांधतांच एक दिव-सांत त्याचा ठणका कमी झाला व झोंप लागली.

पुढील ८ दिवसांत फोड दबून जाऊन हात चांगला झाला." —अखंडानंद

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेले आणि अनेक बक्षिसे मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु.

मलेरिया शत्रू

पहिल्याच पाळींत मलेरिया नष्ट होतो. असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन' मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

.... ही नीलज्योति आहे ! ....

(लेखक:—आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी
आयुर्वेद संशोधन कार्यालय C/o एल्. आय्. टी. नागपूर)

आतांपर्यंत नागपूर प्रांतांत मंडला जिल्ह्यांत सांपडलेल्या रात्रीं अंधारांत चमकणाऱ्या वनस्पतीची म्हणून जी माहिती निरनिराळया वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली, ती माहिती सांपडलेल्या वनस्पतीची नाहीं. सांपडलेल्या वनस्पतींची फारच थोडी माहिती उपलब्ध झाली आहे, होऊ शकते.

तृणज्योतीचा स्वभाव काय ?

तृणज्योतीसंबंधानें जी माहिती ग्रंथांत आहे, त्यांत ती वनस्पति तृणासारखी (गवतासारखी) असून ती रात्रीं प्रकाशते असा उल्लेख केलेला आहे. याचप्रमाणें ती संबंध वनस्पति रात्रीं चमकते आणि पर्वतहि प्रकाशित दिसतात. यावरून या वनस्पतीचे तृण, पर्ण, पुष्प इ. जमिनीच्या वरचे अवयव प्रकाशतात असें दिसतें.

रात्रौ प्रज्वलते नित्यं तृणेन सदृशं भवेत् ।
तृणतैजसमेकं तु विद्यते विबुधेश्वरी ।
तृणज्योतिरिति ख्यातां श्रृणु दिव्यौषधिं प्रिये ।
निशासु प्रज्वलते नित्यं नाह्नि ज्वलति पर्वते ।
ज्योतिर्नाम्नि त्रिधा प्रोक्ता वृक्षकन्दतृणात्मिका ॥
गिरौ ज्वलति सा रात्रौ ॥
ज्वलन्ति पर्वतास्तु तैः ॥

सांपडलेल्या (प्रसिद्ध झालेल्या) वनस्पतीचे तृण, पर्ण, पुष्प इ. अवयव प्रकाशित दिसत नाहींत. तिचें मूळ फक्त प्रकाशित दिसते. यावरून प्रसिद्ध झालेली माहिती उपलब्ध वनस्पतीची ही गोष्ट स्पष्ट होते.

दोघांच्या प्रकाशांत भिन्नता

तृणज्योतीचा प्रकाश आपल्या नित्य परिचयाच्या ज्वलनोत्पन्न प्रकाशासारखा सांगितला आहे. तिचा प्रकाश ज्योतीसारखा आहे. म्हणून तिला ज्योतिरूपा म्हटलें आहे.

तृणकन्दवतीर्ज्योतिर्ज्योतिरूपा निशामुखे ।

नित्य परिचयाच्या ज्वलनाच्या ज्योतीच्या प्रकाशांत लाल रंगाच्या मिश्रणाचा पिवळा रंग व्यक्त होत असतो. याला ' नारिंगी रंग ' असें म्हणतां येईल. सुवर्णाचा रंग असाच असतो. एके ठिकाणीं ग्रंथांत हें तृण सोन्यासारखें चमकतें असें म्हटलें आहे.

रात्रौ प्रज्वलते तत्तु हिरण्यसदृशं भवेत् ।

यावरून 'तृणज्योतीचा' प्रकाश आरक्तपीत असा असतो हें सिद्ध होतें.

शुभ्र प्रकाशांत निळ्या रंगाची छटा

मंडला जिल्ह्यांत उपलब्ध झालेल्या या वनस्पतीच्या मुळयांचा प्रकाश यापेक्षां अगदीं भिन्न असतो. तिच्या शुभ्र प्रकाशांत निळ्या रंगाची छटा असते. ताज्या वनस्पतीचा प्रकाश तृणज्योतीच्या प्रकाशासारखा आरक्तपीत वर्णाचा तैजस नसून चंद्रासारखा सौम्य आल्हाददायक असा असतो. ह्या मुळ्या चांगल्या जातीच्या कांचेच्या ग्लासांत अगर कपांत ठेवल्या तर तो ग्लास किंवा कप हिऱ्यासारखा किंवा स्फटिकासारखा तेजोवह असा दिसत असतो. यावरून प्रसिद्ध झालेली माहिती उपलब्ध वनस्पतीची नसून दुसऱ्या अन्य वनस्पतीची आहे हें निश्चित. उपलब्ध वनस्पतीस ' नीलज्योति ' असें नांव आहे.

पारदाचें बन्धन करणाऱ्या ज्या दिव्य वनस्पती सांगितलेल्या आहेत, त्यामध्यें ह्या दोन्ही वनस्पतींचा क्रमानें शेजारीं शेजारीं उल्लेख आला आहे. उपलब्ध वनस्पतीला तिच्या निळ्या शुभ्र प्रकाशावरून ' नीलज्योति ' असें नांव दिलेलें आहे.

नीलज्योतिस्तृणज्योतिरुर्वरा हेमवल्लिका ।

—'रसकामधेनु'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रात्रीं अंधारांत प्रकाशणाऱ्या वनस्पतींचे प्रकार

रात्रीं अंधारांत प्रकाशणारी वनस्पती तीन प्रकारची असते.

ज्योति
- वृक्ष
- तृण
  - (उपलब्ध) नीलज्योति — (नीलशुभ्रप्रकाश)
  - तृणज्योति — (आरक्तपीतप्रकाश)
- कन्द

ज्योतिर्नाम्नी त्रिधा प्रोक्ता वृक्ष-कन्द-तृणात्मिका।
ज्योतिस्तृणो, ज्योतिर्वृक्षः, ज्योतिकंदश्च ते त्रयः।

दोन्ही वनस्पती जरी भिन्न प्रकारच्या असल्या तरी 'तृण' या वर्गांतच त्यांचा समावेश होतो.

१) 'आरक्तपित' वर्णाची तृणज्योति नगर जिल्ह्यांत एका वनस्पतिज्ञाला पुष्कळ दिवसांपासून माहीत असल्याचें समजलें आहे. तिचे जमिनीवरचे भाग प्रकाशतात; मुळें प्रकाशतात अशी याबद्दल माहिती नाहीं.

२) वृक्षजातीच्या ज्योति वनस्पतीचें लाकूड एका नदींत वहात येऊन कांहींना मिळाल्याचें वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेलें ऐकिवांत आहे.

३) * कन्दजातीच्या वनस्पतीबद्दल कुठें सुगावा लागलेला नाहीं.

उपलब्ध वनस्पतींचीं गुणकर्मे

वर उल्लेख केल्याप्रमाणें ही वनस्पती तृणवर्गांतील आहे. त्यामुळें तृणवर्गाचीं सामान्य गुणकर्में या उपलब्ध वनस्पतींचीं असू शकतील.

रसः– या वनस्पतीला व्यक्त असा रस नाहीं. अत्यन्त अल्प प्रमाणांत कळेना कळे असा कडू रस भासतो.

विपाकः– हिचा विपाक 'मधुर' आहे ही गोष्ट स्पष्ट झाली आहे. नीलज्योतीच्या सेवनानें 'विट्प्रवृत्ति' अधिक होते, व 'शुक्रवृद्धि' होते, यावरून मधुर विपाक असावा अशी कल्पना गृहीत धरण्यास हरकत नाहीं. मधुरः सृष्टविण्मूत्रो विपाकः कफशुक्रलः। चरक सू. अ. २६ श्लो. ५८

नीलज्योति दुधांत घेतली असतांना विरेचक होत नाहीं, पण पाण्यांत घेतली असतांना विरेचक होते अशा अनुभवाची नोंद करण्यास हरकत नाहीं. ह्या वनस्पतीचा उपयोग करणाऱ्या वृद्ध गृहस्थांचा तसा अनुभव आहे.

नीलज्योति उष्णवीर्य आहे काय ?

वीर्यः– ही वनस्पति 'उष्ण' वा 'शीत' आहे याबद्दल स्पष्ट निर्णय अजून झाला नाहीं. लेखकानें, 'या वनस्पतीनें होणारे रेच गरम असतात काय' असा अनुभव विचारला असतां नकारार्थी उत्तर मिळालें, त्याचप्रमाणें वनस्पतीचें सेवन करीत असतांना

[* नाशिक येथें शहर वैद्य मंडळांत नीलज्योतीच्या मुळ्या पाहिल्या. त्यां लहान नागरमोथ्याप्रमाणें कंदरूप आहेत असें जमलेल्या वैद्यांचें मत झालें. —संपादक]

सांडू
प्रेग-युटेरो
गर्भिणी-गर्भ-रक्षक
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई.
[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स– बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते–मे. पेंढारकर अँड को. मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'उष्मा' हें चिन्ह निर्माण झाल्याचें कळून आलेलें नाहीं.

नीलज्योति तृण वर्गांतली असल्यामुळें 'लघु' हा गुण (वीर्य) स्पष्ट होतो.

नीलज्योतीचा प्रभाव व इतर कर्में

हिचें रसायन कार्य कोणत्या गुणकर्मांनीं होतें हें अजून स्पष्ट झालेलें नाहीं. ही दिव्यौषधी, रसायन आहे. पारदसंस्कारांत तिचा अत्यन्त मोठा उपयोग आहे. हिचा उल्लेख 'रसबंधन' करणाऱ्या वनस्पती-मध्यें आलेला आहे.

नीलज्योतीचें रसायन (धातुस्थ) कार्य

नीलज्योतीचा औषधि म्हणून उपयोग केला लेला आहे. रसायन औषधें ज्या रसायनविधीनें तलीं जातात, त्या विधीनें ही औषधि सेवन केली ली. तृणज्योतीच्या उपयोगांमध्यें जो आहार नि जें य सांगितलें त्याचें पालन त्या व्यक्तींनीं केलें.

एका व्यक्तीचें वय ६० वर्षांचें आहे. औषध ण्यापूर्वी ह्या व्यक्तीचें परीक्षण केलें गेलें नाहीं. पण क महिना औषध घेतलें गेल्यावर परीक्षण केलें, हां पुढीलप्रमाणें परिणाम झालेला आढळून आला. या व्यक्तीचा वर्ण पूर्वी साधारण होता. पण तो आतां पुष्कळ आरक्तवर्ण आहे. यावरून रक्तधातूची वृद्धि चांगलीच झाली असल्याचें प्रत्ययाला येते.

मांस, स्नायु, संधि

पूर्वी या व्यक्तीचें बल कमी होतें. वयोमानानें आलेली अशक्तता नाहींशी होऊन पुष्कळसे श्रम त्यानंतरहि थकवा येत नाहीं, असें त्या व्यक्तीचें बोलण्यांत आलें. यावरून मांस हा धातू व स्नायु हा उपधातु संधि, हा अवयव यांच्यावर इष्ट परिणाम झाल्याचें दिसून येते. पूर्वीपेक्षां पुष्टी झालेली आहे.

पूर्वी वजन घेतलें गेलें नाहीं. पण वजनांत वाढ झालेली दिसते. तसेंच केसांना कृष्णवर्णहि येत आहे. यावरून 'अस्थि' धातुचें पचन सुधारत असावें.

दृष्टीवर सुपरिणाम

या व्यक्तीला चष्मा लागत असे. हल्लीं चष्मा लागत नाहीं. म्हणून मज्जाधातूस बल प्राप्त होऊन दृष्टीवर सुपरिणाम झाल्याचें दिसून येतें.

औषधि घेण्यापूर्वी विषयवासना अगदींच कमी म्हणजे जवळजवळ नव्हतीच. पण आतां विषयवासने-च्या बाबतींत घरीं जाणें धोक्याचें आहे, असें वाक्य त्या व्यक्तीच्या तोंडातून बाहेर पडलें. यावरून शुक्र-धातूवर चांगलाच परिणाम झाल्याचें दृग्गोचर झालें.

पडसें, अंग दुखणें कमी झालें

वरील सुधारणांच्या पूर्वीची स्थिति बरोबर असल्याचें दुसऱ्या व्यक्तीनें मान्य केलें आहे. दुसऱ्या व्यक्तीनें या औषधांचा प्रयोग सुरू केला होता. पण तो प्रवासामुळें तडकूब केला होता. ती व्यक्ति अस्थिसार पण मांस असार होती. मांस असार असल्याचें योगानें नेहमीं पडसें येत असे. आणि पिंडिकोद्वेष्टन (पिंढऱ्या दुखणें) व अंगमर्दन (अंग दुखणें) हीं चिन्हें नित्याचींच होतीं. 'नीलज्योति' सुरू केल्यापासून पावसाळ्याचे दिवस असूनहि पडशाचा व अंगमर्द इ. चा त्रास झाला नाहीं. यावरून मांसधातूंतील पचन सुधारून त्याचें पोषण व्यवस्थित सुरू झाल्याचें स्पष्ट झालें.

नीलज्योति रसायनी आहे

सारांश, नीलज्योति ही तृणज्योतीच्याच वर्गांतली असून तिच्यासारखीच रसायनीहि आहे.

तृणज्योतीसंबंधानें नव्हे पण या नीलज्योती-संबंधानें अधिक संशोधन सुरू झाल्यावर जे जे मुद्दे निश्चित होतील ते ते वैद्यवर्गापुढें मांडण्याचा लेख-काचा विचार आहेच. तृणज्योतिसंबंधानेंहि अधिक माहिती उपलब्ध झाल्यावर ती वैद्यबंधूपुढें मांडीन.

———

पवित्र नेपाली कस्तुरी रु. ४४ तोळा,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोळा,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोळा,
लिहाः–नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहारः—

दुष्ट कॅन्सरवर दुग्धाहार

दि. १-११-५३ च्या रविवारच्या सकाळमध्यें राजरत्न वा. वि. जोशी यांचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत "बडोद्याचे श्री. शिवलाल मिस्त्री यांना कांहीं वर्षांपूर्वी कॅन्सर रोग झाला होता, त्यांनीं आपली प्रकृति त्यावेळीं मुंबईच्या टाटा मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलमध्यें दाखविली होती व हा कॅन्सर बरा होऊं शकणार नाहीं असा तेथील निर्णय मिळाला होता. ते तेथून ते निराश होऊन बडोद्यास परत आले व एका जाणत्या वैद्यांच्या मार्गदर्शनानुसार त्यांनीं केवळ दुग्धाहार व ईश्वर नामस्मरण या उपायाचा अवलंब केला. या उपायानें त्यांचा तो रोग १ वर्षांत बरा झाला." असें विधान केलें आहे.

हा लेख वाचून धुळयाचे वैद्यवर्य के. कृ. मानेकर यांनीं श्री. शिवलाल मिस्त्री यांच्याशीं पत्रव्यवहार केला होता. वैद्य मानेकर यांना आलेल्या गुजराती उत्तराचें मराठी भाषांतर पुढें दिलें आहे. —संपादक

श्री. मिस्त्री यांचें पत्र

श्री. मानेकर यांसी—

"तुमचें पत्र मिळालें. मला कॅन्सर झाला होता व तो दुधाच्या प्रयोगानें संपूर्ण बरा झाला आहे. इतर सर्व औषधें बंद करून फक्त दुधावर एक वर्षपर्यंत राहिल्यानें आराम झाला.

'आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार'

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्वप्रकारचीं सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापध्नक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहाः—

आयुर्वेदिक औषधी भांडार

२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

दूध चावून चावून घ्यावें

— गरम केलेलें दूध, साखर न घालतां, पचेल तेवढेंच घ्यावें. थोडें थोडें दूध, अन्न खातो त्याप्रमाणें चावून चावून प्यावें. एकदम पिऊं नये. गाईचें दूध चांगलें मिळेल तर खूपच फायदा होईल.

केवळ दूध घेतल्यानें बद्धकोष्ठ होईल तर त्रिफळा चूर्ण (हिरडाफोल, बेहेडाफोल व आवळकंठी समप्रमाण) रात्रीं झोपेच्या वेळीं अर्धा तोळा प्रमाण पाण्याबरोबर घेण्यानें सकाळीं एक वेळ शौचास होईल.

अशाप्रमाणें दुधावर राहण्यानें एक वर्षांत संपूर्ण आराम होईल, यांत शंका नाहीं. मी हा असा दुधावर एक वर्ष राहिलो व त्यामुळें मला संपूर्ण आराम वाटला आहे. कळावें

हाथीपोळ, बडोदा —शिवलाल जादवजी मिस्त्री

कर्णविकारावर मोराचा पाय

एका व्यक्तीचा कान दुखत होता. त्यानें तो परदेशांतून नाककान डोळ्याच्या विकाराचा तज्ज्ञ होऊन आलेल्या डॉक्टरला दाखविला. त्यानें यंत्राच्या साह्यानें २ तास तपासणी केली. व सांगितलें कीं कानांत पू होत आहे, व आतलें हाड सडत आहे. तें कापावें लागेल. नाहींतर तें सडून जाईल. महिन्याच्या आंत शस्त्रकर्म केलें पाहिजे.

शस्त्रकर्माचें नांव ऐकतांच रोगी व त्याचे नातेवाईक घाबरून गेले. व त्यांनीं आयुर्वेदीय इलाज करण्याचें ठरविलें. त्यांना असें कळलें कीं या विकारावर मोराचा पाय उपयोगी पडतो म्हणून त्यांनीं शहरापासून दूर रहाणाऱ्या नातेवाईकांना पत्रें पाठवून मोराचा पाय मागविला. एका गोंडानें आठ आणे घेऊन मोराचा पाय आणून दिला. सरसूच्या तेलांत तो उकळून तें तेल दुखऱ्या कानांत टाकण्याचा प्रारंभ केला. आश्चर्य असें कीं पंधरा दिवसांत कानाचें सर्व दुःख नाहींसें झालें. या गोष्टीला आतां ७ वर्षें लोटलीं, तें दुखणें पुनः उमटलें नाहीं. —अखंडानन्द

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारतांतील औषधी-नियंत्रण-यंत्रणेसाठीं

भारत सरकार कायदा करणार !

इतिहासांतील ३ टप्पे

१) श्रद्धेचा उपयोग करून, २) औषधें देऊन आणि ३) आरोग्यदायी आचरण करून रोग बरे करणें हे वैद्यक शास्त्राच्या इतिहासाचे तीन टप्पे दिसून येतात. १) श्रद्धेच्या उपयोग करून रोग बरे करण्याच्या पद्धतींतील कांहीं गोष्टी आतां मानसो-पचारांत अन्तर्भूत करण्यांत आल्या असल्या तरी भोळ्या लोकांचें तें वैशिष्ट्यपूर्ण उपचार-साधन आहे. ३) सुधारणेची वरची पातळी म्हणून मानवी शरीराची प्रतिकारक्षमता व प्रकृति आपोआप सुधारण्याची शक्ति या मान्य करण्यांत आल्या असून, औषधांची अगदीं अवश्य तेवढी मदत घ्यावी लागली तरी आरोग्यदायी आचरणालाच विशेष महत्व आहे.

दुर्मिळ पदार्थ = औषध

२ औषधांनीं रोग बरे करण्याची पद्धति पहिल्यानें अस्तित्वांत आली त्यावेळीं ती तितकीशी शास्त्रशुद्ध नव्हती. नवीन, नेहमींपेक्षां थोडा निराळा आणि मिळण्यास कठीण अशा जवळजवळ प्रत्येक पदार्थास आतांपर्यंत रोग बरा करण्याचे गुणधर्म चिकटविण्यांत आलेले आहेत. बटाटा युरोपांत पहिल्यांदा वापरांत आला त्याकाळीं ती अेक नव-लाईची गोष्ट होती व तो फार महागहि असे. कारण त्याचा त्यावेळीं खाद्यपदार्थ म्हणून नव्हे तर एक औषध म्हणून वापर होई. सोळाव्या शतकांत सोनें, मोती, कस्तुरी, तैलस्फटिक, (अंबर) या औषधांचा युरोपांत, विशेषः धनिकवर्गांत विशेषः खप असे.

औषधी नियंत्रणाचा परिणाम

एकोणिसाव्या शतकांत औषधांच्या मूल्य-निष्ठ्या तपासणीच्या पद्धति वाढत्या प्रमाणावर लागू करण्यांत आल्या तेव्हांपासून, प्रचारांत असलेलीं अनेक औषधें बाजारांतून नाहींशीं झालीं. सध्यां प्रत्येक सुसंस्कृत देशांत औषध-नियंत्रणाच्या व्यापक -उपाय योजना ठरविलेल्या असून, त्यांत औषधांच्या तपासणीवर व त्यांचें उत्पादन व विक्री यांचेवर देखरेख ठेवण्याची तरतूद असते.

ड्रग कंट्रोलरचें काम

आयात औषधांच्या दर्जावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी मध्यवर्ती सरकारची असून, प्रत्येक औषध ठरवून दिलेल्या प्रमाणकाबरहुकूम असलेंच पाहिजे. कांहीं विशिष्ट प्राणिज औषधें व खास औषधी प्रकार यांच्या आयातीसाठीं परवाना घ्यावा लागतो, तर इतर साधी औषधी विनापरवाना आयात करतां येतात. भारतांत औषधांच्या आयाती-करतां लागणारा परवाना देण्याकरतां भारत सरकारनें ड्रग कन्ट्रोलरची नेमणूक केली आहे.

चार बंदरांतूनच औषधी आयात

औषधांची आयात केवळ मुंबई, कलकत्ता, मद्रास व कोचीन याच बंदरांतून करतां येते. पहिल्या तीन बंदरांचे ठिकाणीं औषध-नियंत्रण-यंत्रणेचे अधिकारी असून, कोचीन येथेंहि असा अधिकारी, नेमण्याची व्यवस्था होत आहे. आयात झालेल्या औषधांना देशांत प्रवेश देण्यापूर्वी त्यापैकीं कांहीं नमुने घेऊन ठरविलेल्या प्रयोगशाळांत तीं तपासून घेणें हीं त्यांचीं कामें आहेत. तपासणी पुरी होईतों-पर्यंतच्या काळांत आयात झालेलीं औषधें उन्हांत पडून राहू नयेत किंवा खराब हवामानांत राहू नयेत म्हणून, करारनामा लिहून घेऊन गुदामांत सांठविण्या-करतां आयातदारांच्या तीं हवालीं करण्यांत येतात. विक्री करण्यासंबंधींचे हुकूम मिळेपर्यंत त्यांना तीं औषधें गुदामांतच ठेवावीं लागतात. प्रमाणाबरहुकुम नसलेलीं व नियमांच्या इतर तरतुदी पूर्ण न होणाऱ्या औषधांचे बाबतींत, शक्य असल्यास हे दोष काढून टाकण्याची आयातदारांस संधि देण्यांत येते, ते शक्य नसल्यास, तो औषधांचा सांठा, आयात केलेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देशाकडे परत पाठवून द्यावा लागतो.

नव्या औषधाबाबतची पद्धति

ज्या औषधांना तीं तयार झालेल्या देशांतच खुल्या विक्रीची परवानगी नसते अशीं औषधें आयात करूं देण्यांत येत नाहींत हें औषधी प्रमाणक नियंत्रणाचें महत्वाचें वैशिष्ट्य आहे. औषधाचें प्रमाणक वैद्यकीय दृष्ट्या केलेल्या त्यांच्या तपासणीचे निष्कर्ष आणि तो आणलेल्या देशांतील खुल्या विक्रीचें प्रशस्तिपत्रक याबंबंधांत आयातदारानें परवानाधिकाऱ्याची खात्री पटवून दिली पाहिजे अशी नव्या औषधांच्या बाबतची पद्धति आहे. तपासणी, परीक्षा, पृथक्करण यासाठीं परवानाधिकाऱ्यानें मान्यता दिलेल्या अटीवर लहान प्रमाणांत औषधांची आयात करण्यास ड्रग्ज अॅक्टान्वयें परवानगी आहे.

मध्यवर्ती औषधी प्रयोगशाळा, कलकत्ता

१९४० च्या औषधविषयक कायद्यांत असलेल्या तरतुदीनुसार भारत सरकारनें कलकत्ता येथें एका मध्यवर्ती औषधी प्रयोग-शाळेची स्थापना केली आहे. जकात अधिकारी आणि कोर्टाच्या खटल्यासंबंधांत न्यायाधीशांनीं पाठविलेल्या नमुन्यांची तपासणी करणें व पेटन्ट्स् आणि ज्या औषधांचे पाठ बाहीर केलेले नाहींत अशा खाजगी मालकी असणाऱ्या औषधांना नोंद दाखले देणें वगैरे या प्रयोगशाळेचीं कामें आहेत. तपासणी आणि दर्जा याबाबतच्या तंट्यांत मध्यवर्ती औषधी प्रयोगशाळेचा निर्णय अंतिम समजला जातो. लस आणि इतर कांहीं औषधें याबाबतची या प्रयोगशाळेचीं कांहीं कामें कसौली येथील मध्यवर्ती संशोधन संस्थेकडे सोपविण्यांत आलीं आहेत.

उत्पादन आणि विक्रीवर नियंत्रण

औषध विषयक कायद्यान्वयें, औषधांचें उत्पादन, विक्री आणि वांटप यांची जबाबदारी राज्य सरकारांवर आहे. भारतांतील सर्व राज्यांना हा कायदा लागू करण्यांत आला आहे. तपासनीस आणि परवाना आधिकारी मिळून ही यंत्रणा बनली आहे.

तपासणीसांचे अधिकार

राज्यांत औषधविषयक कायद्याची अंमलबजावणी करणें आणि उत्पादन व विक्री करणाऱ्या कारखान्यांना परवाने देणें हें परवाना अधिकाऱ्यांचें काम आहे. औषधें आणि त्यांची विक्री याबाबत तपास करून औषधविषयक कायदा आणि त्यासंबंधींचे नियम यांस बाध येत असेल तर गुन्हेगारांवर खटले भरण्याचा अधिकार तपासणीदारांस देण्यांत आला आहे. प्राणिज पदार्थांचें जेथें उत्पादन होतें अशा विभागाची तपासणी करण्यासाठीं खास शैक्षणिक पात्रता असलेल्या तपासणासांची नेमणूक करण्यांत आली आहे. औषधांचें उत्पादन अगर विक्री होत असलेल्या विभागांत पूर्वसूचना न देतां प्रवेश करण्यास तसेंच औषधाचा नमुना घेण्याचा अधिकार त्यांना देण्यांत आला आहे.

आणखी उपाययोजना

कांहीं विशिष्ट रोग खात्रीनें बरे होतात असें सांगण्यांत येणाऱ्या औषधाची आयात, उत्पादन किंवा विक्री करण्यास औषधविषयक कायद्यान्वयें तयार केलेल्या नियमांनुसार बंदी करण्यांत आली आहे. तरीसुद्धां आक्षेपार्ह अशा जाहिरातींना पायबंद घालण्यास ही तरतूद अपुरी पडते असें दृष्टोत्पत्तीस आलें आहे. एक म्हणजे अदृश्य दैवीशक्तीनें रोग बरे करणाऱ्या कवच, ताईतांसारख्या औषधेतर पदार्थांबाबतच्या जाहिराती त्यांच्या कक्षेंत येत नाहींत. दुसरें म्हणजे, देशी पद्धतिनें तयार केलीं आहेत असें मानण्यांत येणाऱ्या औषधांच्या जाहिरातींचा प्रश्नहि त्या कायद्यांत समाविष्ट नाहीं. आणि शेवटीं म्हणजे वर्तमानपत्रें, मासिकें, परिपत्रकें पत्रकें आणि भित्तीपत्रकें यांत येणाऱ्या जाहिरातींना हें नियम लागू नसून ते फक्त औषधांवर चिकटविलेल्या लेबलांपुरतेच आहेत.

या सर्व उणीवा भरून काढील आणि समाजद्रोही लोकांकडून होणाऱ्या औषधांच्या दुरुपयोगापासून जनतेचें संरक्षण करील असा कायदा करण्याचा भारत सरकारचा विचार आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राचीन भारतांतील रुग्णालयाचें स्वरूप ?

[सुप्रसिद्ध वाङ्मयसंशोधक श्री. रा. ग. हर्षे डी. लिट् यांनीं इंग्रजींत लिहिलेला एक लेख 'आयुर्विद्या' …िकांत प्रसिद्ध झाला आहे. इसवी सन ११६२ ते ११९० दरम्यान इंडोचायनांत सातवे जयवर्मा या …ानें आयुर्वेदीय रुग्णालयाची प्रथम स्थापना केली असें त्यांत म्हटलें आहे. लेखाच्या पूर्वभागाचा अनुवाद …ं दिला आहे. —संपादक]

प्राचीन आयुर्वेद पद्धतींत रुग्णालयांना स्थान …तें किंवा नव्हतें, हा एक अन्दाजनीय विषय आहे. …वेदांतील (अ. १०) अति प्राचीन संदर्भावरून …ं दिसून येतें कीं, राजवैद्य हा लढाईचे वेळीं …जाबरोबर आपलीं सर्व औषधें व साहित्यसामुग्री यासह …ांगणावर जखमी झालेल्या लोकांना त्वरीत औषध …पचार करण्याकरितां जात असे. लष्करी तळांत हा …, त्याचे मदतनीस, त्याचीं औषधें व इतर रुग्णो… …गी साधनसामुग्री ह्यांच्याकरितां एखाद्या स्वतंत्र …ीव जागेची व्यवस्था असली पाहिजे. शिवाय …शीहि कल्पना संभवते कीं, जखमी झालेल्या …िकांना व आजारी असलेल्या लोकांना औषधोपचार …ण्याकरितां स्वतंत्र भवनाची व्यवस्था असली …हिजे. परन्तु ह्या भवनास प्रचलित अभिप्रेत अस…त्या अर्थव्याप्तीनें 'हॉस्पिटल' या शब्दानें संबोधतां …ल कीं नाहीं याबद्दल शंका वाटते.

रुग्णालय-संस्था, परकीय कल्पना

वरकरणीं विचार केल्यास रुग्णालय—संस्था हिंदुसमाजास परकीय दिसते. हिंदुसमाजघटना अनन्त कालापासून एकत्र कुटुंब स्वरूपाची आहे त्यामुळें मोठ्या कुटुंबास राहाण्याची जागाहि …ठीच लागे, व त्याचा दुहेरी लाभ होई. बाळंतिणी…रितां एक खोली, अतिथिअभ्यागताकरितां एक …ोली, कुटुंबांतील आजारी माणसाकरितां एक खोली, …शा व्यापक स्वरूपाची जागा लागत असे. सर्व…ाधारण किरकोळ दुखण्यास घरांतील वृद्ध व अनुभवी …त्रया अनुभवसिद्ध औषध देऊन बरें करीत; फक्त …ोठ्या अगर कष्टसाध्य दुखण्याकरितां वैद्यास बोला…ेत असत. वैद्य रुग्णास तपासून औषधयोजना ठरवून औषध देत असे, व घरांतील माणसें रुग्णास औषधपाणी देत व त्याची सेवाशुश्रूषा करीत. अशा ह्या एकत्र कुटुंबव्यवस्थेमुळें स्वतंत्र रुग्णालयाची गरज भासत नसे. याउलट ज्या देशांत एकल कुटुंबपद्धत नव्हती, व त्यामुळें वृद्ध, पंगु, जखमी व आजारी एकाकी पडत, अशा समाजास वरील माणसांकरितां सार्वजनिक स्वरूपाची कांहींतरी व्यवस्था करणें जरूर पडत असे. ही गोष्ट रुग्णालय-संस्थेचा उगम व वाढ ह्यांची कारणमीमांसा दर्शविते. उपरी निर्दिष्ट कारणामुळें रुग्णालय-संस्था (Institution of hospitals) यूरोपांत व पाश्चात्य संस्कृतीचें आधिपत्य असलेल्या देशांत प्रथम उगम पावून नंतर ती इतरत्र प्रसृत झाली.

वैद्यानें रोग्याच्या घरीं जावें

सुश्रुताचार्य, ज्यांनीं शल्य-शालाक्य-तंत्रावर विशेष लिहिलें आहे, त्यांनींच आपल्या सुश्रुतसंहितेंत (सूत्र-स्थान अ. १० क्रमांक ४) असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, शस्त्र-कर्म करणाऱ्या वैद्यानें कोणत्याहि प्रकारचें शस्त्रकर्म रुग्णावर करावयाचें असल्यास रोग्याच्या घरीं जावें. सुश्रुताचार्यांचे वेळीं खाजगी अथवा सार्वजनिक स्वरूपाचीं रुग्णालयें अस्तित्वांत होतीं अशाबद्दल प्रत्यक्ष पुरावा उपलब्ध नाहीं. गिरनार येथें अशोककालीन एका शिला-लेखांत रुग्णालयाचा संदर्भ मिळतो असें म्हटलें जातें, परन्तु सदर शिलालेखाचा मननपूर्वक अर्थ लाविल्यास तो इतकाच होऊं शकतो कीं, राजा अशोकानें माणसांच्या तसेंच पशूंच्या रोगनिदानाची व चिकित्सेची व्यवस्था केली असून त्यांचेसाठीं औषधें पोहोंचविण्याची अगर औषधी वनस्पती ठिकठिकाणीं लावण्याची व्यवस्था

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केली होती. त्याचा बऱ्हंशीं अर्थ असा आहे कीं, राजा अशोकानें ग्रीस देशांतील पद्धतीप्रमाणें फिरत्या वैद्यांची नेमणूक केली असेल, अगर ठिकठिकाणीं दवाखाने उघडून जनतेची सोय केली असेल.

३ शब्दांच्या अर्थाचा अंतर्भाव

यूरोपमध्यें 'हॉस्पिटल' या शब्दाचा अर्थ तीन अन्तर्भूत शब्दमिळून व त्यांच्या अर्थासहित बनलेला आहे-(१) हॉस्पिस (Hospice) प्रवाशांचें विश्रामधाम. (२) होस्टेल (Hostel) विद्यार्थ्यांचें वसतिगृह. (३) हॉस्पिटल (Hospital) रुग्णांकरितां शुश्रुषा स्थान. मूळारंभीं हॉस्पिटल या शब्दाचा अर्थ सुखसोयींनीं व करमणुकीच्या साधनांनीं युक्त असलेलें अतिथिगृह असा होता. खिस्त्यांनीं मुसलमानाकडून पॅलेस्टाईन परत जिंकण्याकरितां (Crusades) मध्ययुगीनं जे हल्ले केले त्या कालांत (इ. स. १३००) हॉस्पिटलचा उपयोग प्रवासी, यात्रेकरू वगैरे लोकांच्या करमणुकीकरतां व निवासाकरितां केला जात असे, ऋुसेड्स् (धर्मयुद्ध) नंतर हॉस्पिटलसचा उपयोग धार्मिक स्वरूपांत गरजु लोकांना तसेंच अनाथ, पंगु व वृद्ध लोकांना राहण्याकरितां धर्मशाळेप्रमाणें केला जात असे. (इ. स. १४००)

'हॉस्पिटल' शब्दाचा इतिहास

त्यानंतर म्हणजे १५ व्या शतकांत 'हॉस्पिटल' या शब्दाचा उपयोग विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांचें सामुहिक निवासस्थान या अर्थानें केला जात असे, व त्यानंतर हॉस्पिटल या शब्दाचा उपयोग प्रचलित भावार्थानें होऊं लागला; तो म्हणजे आजारी, जखमी वगैरे ज्या लोकांना औषधोपचाराची व शुश्रूषेची जरूरी आहे अशा लोकांकरितां निवासस्थान. अगदीं अलिकडील कालापर्यंत ही हॉस्पिटल--संस्था विशेषशी लोकप्रिय झालेली नव्हती. वस्तुतः ज्यावेळीं रुग्ण निराश होई त्यावेळीं तो केवळ ईश्वरेच्छेवरच आपण जगणार ह्या भावनेनेंच हॉस्पिटलमध्यें जाई. हा थोडक्यांत 'हॉस्पिटल' या शब्दाचा युरोपांतील इतिहास आहे.

तथापि ह्या 'हॉस्पिटल' शब्दाच्या पूर्ण भावार्थात प्राचीन मानवेतिहासांत तात्पुरत्या निर्माण केलेल्या हॉस्पिटलवजा रुग्णाळयाचा विशेषतः युद्धकाळीं रणभूमीवर तयार केलेल्या रुग्णालयांचा समावेश करता येत नाहीं; कारण कीं, अशीं हीं संबोधिलीं जाणारी प्राचीन रुग्णालयें आजच्या हॉस्पिटल् या शब्दाच्या व्यापक अर्थानें यथार्थ होऊं शकतील कीं नाहीं याबद्दल साधार शंका आहे. अगदीं अलिकडे म्हणजे १८ व्या शतकाच्या अखेरीपासून आपणांस यथार्थतेनें हॉस्पिटल्स् पहावयास मिळूं लागलीं.

आवश्यकता केव्हां भासली ?

भारतवर्षांत ज्या वेळीं बौद्धधर्म प्रधान होता त्यावेळीं अशा रुग्णालय-संस्थेची आवश्यकता भासली असली पाहिजे; कारण कीं, बौद्धधर्मप्रचारक (भिक्षु व भिक्षुणीसह) जे स्वतःच्या कुटुंब-संस्थेपासून अलग झालेले असत व मोठ्या संख्येनें त्यांच्यासाठीं स्वतंत्र बांधलेल्या विहारांत राहात असत, त्यांना त्यांच्या आजारीपणांत सेवा--शुश्रुषेकरितां व औषधोपचाराकरितां स्वतंत्र रीत्या एखाद्या रुग्णालयांत ठेवावें लागत असे. वर विदित केलेंच आहे कीं, सम्राट् अशोकानें आपल्या कारकीर्दींत आजाऱ्यांस औषधें पोहोचविण्याची व फिरत्या वैद्यांकडून फिरत्या दवाखान्यांची सोय आपल्या प्रजेसाठीं केली होती. आजची रुग्णालय-संस्था ही उपरोक्त व्यवस्थेचें अधिक व्यापक व परिणत स्वरूप आहे. (अपूर्ण)

सेवा संघाचीं सर्व औषधें तसेंच खात्रीचीं सर्व देशी काष्ठौषधी व ताजी वनस्पती आणि शिलाजीत, कस्तुरी, केशर, भीमसेनी कापूर, गोरोचन, वाकेरी भाते, वंशलोचन, नागकेशर, अनंतमूळ, जितसाया, उत्तम महाबळेश्वरी मध वगैरे औषधें मिळण्याचें ठिकाणः—

देशी सर्वौषधी संग्रहालय

पोलिस चौकीसमोर, दादर मुंबई २८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फॅकल्टी ऑफ् आयुर्वेदिक अँड युनानी तिब्बि सिस्टिम्स् ऑफ् मेडिसिन, मुंबई राज्य

ऑक्टोबर १९५२ मधील परीक्षांचा निकाल

जी. एफ्. ए. एम्. प्रथम परीक्षा

सर्व केंद्रांतून बसलेले उमेदवार १९१

सर्व केंद्रांतून उत्तीर्ण झालेले उमेदवार ३१

उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची नांवें व नंबर

मुंबई केंद्रः– (२) बक्षी मु. खे. (११) डोंगरे हंसा वि. (१२) गानु धों. दि. (१३) गुडे र. का. (१८) जोशी कुमुद रा. (२०) खरे गोदावरी गं. (२१) खिस्ति द. मा. (२७) मोदी बा. चि. (३१) नागराळ सं. इ. (३६) परळकर कस्तूर ज. (३७) परांजपे व. पां. (५७) शिवजियानी ते. मा.

पुणें केंद्रः– (९३) खेर सुलभा ना. (९४) कुलकर्णी म. श्री. (१०७) निमकेर व. पु. (१२१) शाह गो. दा.

सातारा केंद्र— (१३८) ओक अ. म. (१३९) पाटील शं. बा.

डी. ए. एस. एफ. प्रथम परीक्षा

सर्व केंद्रांतून बसलेले उमेदवार २२

सर्व केंद्रांतून उत्तीर्ण झालेले उमेदवार १७

मुंबई केंद्र— (१) काळे मा. प्र. (२) पंडित क. ग. (४) सुराणा राजकुवर मो. (५) वैद्य म. रा.

पुणें केंद्रः– (११) काकडे व. वि. (१२) खरे निर्मला रा. (१३) शास्त्री ग. ग. (१४) उपाध्ये ने. ब्र.

सातारा केंद्रः– (१५) केळकर लीला दा. (१७) पटवर्धन दि. म.

डी. ए. एस्. एफ्. द्वितीय परीक्षा

सर्व केंद्रांतून बसलेले उमेदवार २०९

सर्व केंद्रांतून उत्तीर्ण झालेले उमेदवार १६३

मुंबई केंद्रः– (२) आशर मीनाक्षी म. (३) भागवत प्र. पं. (४) बारोळे रा. अ. (५) ब्रम्हे चं. द. (६) चंगाडे द. म. (८) दळवी साधना व. (९) दलवडी ना. नं. (१०) देव द्वारका गो. (११) दबुवाला ई. म. (१३) गोळेकर वे. ग. (१४) गुगळे चां. सा. (१५) जैन फु. प्रे. (१७) जोशी मा. ल. (१९) काळे म. रा. (२०) काळे मा. प्र. (२१) कुलकर्णी प्र. श. (२२) लिमये कमला श्री. (२३) लिमडी का. चं. (२४) मेहता शां. द. (२५) मुधोळकर म. गं. (२६) मुळे कुं. सि. (२७) मुनी बि. मू. (२९) नंदोला प्र. ह. (३१) पारेख र. गु. (३३) पाठक मा. सु. (३५) सप्तर्षि द. ना. (३६) शाह र. हिं. (३८) शेनोय पुं. मं. (३९) शुक्ल धि. अं. (४१) थोबराणी श. के. (४२) थोरात मु. का. (४४) वैद्य न. क. (४७) विखारे म. रा.

पुणें केंद्रः– (१०३) आपटे जान्हवी वि. (१०४) आठल्ये ह. भा. (१०५) अथणीकर म. मो. (१०६) बर्वे श. म. (१०७) बोकील शशिकला ल. (१०९) चितळे वा. ना. (११०) दातार हे. म. (१११) देवधर वा. रा. (११३) घोग्रे व. पां. (११४) गोखले कुसुम त्रि. (११५) जावदें सीमंतिनि ल. (११६) जोशी गो. कृ. (११८) जोशी उषा ब. (१२०) कालेले कमल के. (१२३) कुलकर्णी द. व्यं. (१२४) कुलकर्णी पां. वा. (१२५) नातू के. पां. (१२७) पारपित्यदार अ. न. (१२९) पाटील च. दे. (१३०) पाठक म. द. (१३२) पोळ वि. द. (१३३) रामवाल श्री. गो. (१३४) रणदिवे सुधा गो. (१३५) रायते श. दि. (१३६) सरदार सरला बा. (१३७) शाह कां. छ. (१३८) सिधये वि. ब. (१३९) तेली रा. ध. (१४०) ठोंबरे कमल रा. (१४१) उंट पां. मा. (१४३) वैद्य म. वि. (१४४) वैद्य श्री. जिं. (१४५) झोपे मा. गं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सातारा केंद्रः–[१४६] अष्टेकर अ. रा. [१४७] बेडे र. वा. [१४८] बापट त्रि. व्यं. [१४९] बारगळे भू. दा. [१५०] भोसले कमला कृ. [१५२] चौगुले भ. म. [१५३] देशपांडे द. रा. [१५४] धुमाळ ग. मा. [१५७] गोडबोले शकुन्तला चिं. [१५९] हर्षे बा, स. [१६०] जैन मों. ब. १६२ कानडे व. गो. [१६३] कांचनकोटी कृ. बा. [१६५] कुलकर्णी मालती व. [१६७] मेहता रा. द. [१६८] मेहता हि. के. [१६९] ओझर्डे म. शि. [१७२] फडके अ. बा. [१७३] फडके म. वि. [१७४] रानडे श. वा. [१७५] रणभेरे पां. गं. [१८०] वनारसे तु. रा.

डी. ए. एस्. एफ्. तृतीय परीक्षा

सर्व केंद्रांतून बसलेले उमेदवार १३४

सर्व केंद्रांतून उत्तीर्ण झालेले उमेदवार १२८

मुंबई केंद्रः– (१) अहेर दा. ग. (२) आहिरराव शि. पु. (३) अलमौला स. न. (४) भट्ट अ. चं. (५) डाके बा. गो. (६) देसाई रा. श्री. (७) देसाई रसिकमणि धि. (८) देवचके गो. मा. (९) खोकले चं. द. (१०) मेहता कुमुद र. (११) पारीख पुष्पा म. (१२) पटेल कुमुद मं. (१३) पटेल मो. मं. (१५) राव मृदुला म. (१६) सामंत मु. स. (१७) शाह दा. वा. (१८) शर्मा दे. प्या. (२०) वैद्य नी. म. (२१) व्यास वा. वि. (२२) वाघाणी वि. ह.

पुणे केंद्र— (६८) भागवत वा. वि. (६९) मावसार घ. मं. (७०) भिडे उषा भि. (७२) छत्रे शकुन्तला गो. (७३) डबीर गो. के. (७४) दातार प्रमिला द. (७५) दाते शशिकला ना. (७६) देशपांडे मा. अ. (७८) गर्गे रा. ना. (७९) गुणे गो. र. (८०) जाधव वि. मा. [८१] जोशी क. पं. [८२] काळे उषा रा. [८३] कासुर्डे स. बा. [८४] केसकर मु. ग. [८६] कुलकर्णी प्र. बा. [८७] मारवाडी कि. रा. [८८] मुंगीड रा. ज. [८९] नेहते ब. पो. [९१] पेठे र. ना. [९२] फुले ज. सि. [९३] पुरोहित शांता ग. [९४] रवडे वि. ग. [९५] राछा ना. सि. [९६] शाह मधुकांता श. [९७] शेट्टी भू. रु. [९८] शिंगवी ह. मो. [९९] शिराळकर श्री. ल. [१००] सोनार वा. त्रि. [१०१] ठाकोर ज. ना. [१०२] वैद्य अ. प. [१०३] वैद्य वा. मा.

सातारा केंद्रः– (१०४) चौगुले अ. प. (१०५) चौगुले स. रा. (१०६) गुरव भू. ना. (१०७) जोगळेकर व. शि. (१०८) कानडे मो. गो. (१०९) खुटाळे पू. बा. [१११] पाठक रा. भा. [११२] पाटील शा. बा. [११३] साठये प. य. [११४] शाह मा. न. [११५] शेकदार शांता भा. [११६] शेंडे ना. शं. (११७) वाघ रा. म. (११८) झाड रा. वा.

(डी. ए. एस्. एफ्. चतुर्थ परीक्षेचा निकाल ता. १६–११–५३ च्या अंकांत छापला आहे. ह्या अंकांत जामनगर व सुरत केंद्रांचा निकाल स्थलाभावीं देता आला नाहीं. —संपादक)

वाचकांचा पत्रव्यवहार—

वैद्य मंडळींसाठीं उतरण्याची सोय

" नाशिक सारख्या मध्यवर्ति ठिकाणीं आयुर्वेद सेवा संघानें वैद्यमंडळींसाठीं उतरण्याची व झोपण्याची सोय ठेवलेली आहे हें पाहून मनास फारच आनंद झाला. प्रत्येक ठिकाणची वैद्यमंडळी जर अशा तऱ्हेनें वैद्यहितार्थ प्रयत्न करतील तर आपणास भाग्याचे दिवस फार दूर नाहींत. " –वैद्य भा. ग. शेंड्ये, पुणें

तारुण्य कायम टिकविण्यासाठीं
शक्तिवर्धक व धातुपौष्टिक खाद्य
कंदर्प–वृष्य–पाक
तसेंच स्त्रियांचा मासिक धर्म बरोबर व
बिनतक्रार चालू रहाणेसाठीं
पुष्पवटी इ.
आयुर्वेद सेवा संघाचीं सर्व अनुभविक
गुणकारी औषधें हैद्राबादेंत मिळण्याचें ठिकाणः–
*** आयुर्धाम मेडिकल हॉल ***
सुलतान बझार, कोठी बसस्टँड समोर हैद्राबाद [द.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वातविध्वंसनांतील 'मनोधात्री'

(लेखक– वैद्य मुकुन्दराव अं. गायकवाड, सोलापूर)

आयुर्वेद पत्रिकेच्या दि. १-११-५२ चे अंकांत वैद्यवर्य श्री. धामणकर यांनीं वातविध्वंसनावर लिहिलेल्या लेखांत पान २९६ वर मनोधात्रिक म्हणजे मनशीळ असा अर्थ दिला आहे. पण मनोधात्रीचा मनशीळ हा अर्थ पूर्वाचार्यांनीं दिलेला कोठेंहि आढळत नाहीं. निघंटुकारांनींहि हा अर्थ दिलेला नाहीं. केवळ नामसादृश्यावरून * रसयोगसागरकारांनीं विशेष खोल न जातां मनोधात्री म्हणजे मनशीळ हा अर्थ देऊन टाकलेला दिसतो आणि वै. धामणकर यांनींहि त्यावरूनच हा अर्थ मानलेला दिसतो. पण भावनाद्रव्यांत खानिजद्रव्य येत नसल्यामुळें त्यांनीं त्याचा "आवळा" हा अर्थ निश्चित केला आहे. पण हे दोन्हीहि पर्याय चुकीचे ठरतात हें पुढील विवेचनावरून दिसून येईल.

मनोधात्री म्हणजे स्वर्णक्षीरी

मनोधात्री म्हणजे पिवळा धोतरा ज्यास 'स्वर्णक्षीरी' हें नांव निघंटूंत आहे ती वनस्पति होय. ता. १६ जून १९४९ चे आयुर्वेद पत्रिकेंत (वर्ष २ रें) पान ७२९ वर मी 'पिवळा धोतरा' या लेखांत हृद्धात्री म्हणजेच स्वर्णक्षीरी हें सप्रमाण सिद्ध केलें आहे. तो लेख एकवार वाचकांनीं जरूर पहावा. हृद्धात्रीस मनोधात्री हा पर्याय रसशास्त्राचें ग्रंथकारांनीं दिलेला आहे. ही वनस्पति पारदकल्पांत, रसरसायनांत पूर्वींच्या वैद्यांनीं मोठ्या प्रमाणांत वापरलेली दिसते. कारण हिची नामावली बरीच मोठी आहे, या नामावलींतच हें नांव आलेलें आहे.

पिवळ्या धोत्र्याचे उल्लेख

बिन्दु पंडितानें लिहिलेल्या 'रसपद्धति' नामक रसग्रंथावर त्याचेच मुलानें (महादेव पंडितानें) उत्कृष्ट टीका लिहिली आहे. या ग्रंथांत ठिकठिकाणीं पिवळ्या धोत्र्याचे उल्लेख त्याचे पर्यायासह आलेले आहेत. उदा. नवज्वरमुरारि नामक रसकल्पामध्यें हृद्धात्री शब्द आलेला आहे. त्यावर टीकाकार, "हृद्धात्री = मनोधात्री (म्हणजेच) ह्यावली" असा खुलासा देतो. त्यानन्तर नव्यचंद्र नामक रसकल्पांतहि आलेल्या हृद्धात्री शब्दावर तो "हृद्धात्री 'चोक' इति लोके" असें म्हणतो. यापुढें विद्याधरी गुटिका नामक कल्पांत आलेल्या 'हेमाव्हा' शब्दाचा, "हेमाह्वा, स्वर्णक्षीरी, 'चोक' इति लोके" असा उल्लेख करितो. यावरून हृद्धात्री, मनोधात्री, हेमाव्हा, ह्यावली, चोक, स्वर्णक्षीरी हे सर्व पर्याय पिवळे धोतऱ्याचेच आहेत हें कोणीहि मान्य करील. कारण सध्यांहि "चोकमूळ" नांवानें पिवळे धोतऱ्याची मुळें वैद्यगण वापरतो.

आणखी कांहीं पुरावे

आतां मनोधात्री म्हणजेच पिवळा धोतरा आहे याबद्दल आणखी पुरावे देतो. शार्ङ्गधरसंहितेंतहि या वनस्पतीचा दोन ठिकाणीं उपयोग केलेला आहे. महाज्वरांकुशाचे पाठांत स्वर्णक्षीरी नामक व सुप्तिकुष्ठघ्न रसौषधांत, 'हेमाव्हा' शब्दानेंच तो उल्लेख आला आहे. त्यावर टीकाकारांनीं, "पिसोरा" किंवा "पिसोळा" हे लोकप्रचारांतील नांव असलेली वनस्पति, असें लिहिलें आहे. सध्यां पिवळे धोतऱ्यास 'पिसोळा' नांवानेंहि ओळखतात, हें सर्वश्रुत आहेच.

रसग्रंथांतील योगांतून पिवळा-धोत्रा

विष्णुदेव किंवा विठ्ठल पंडित नामक वैद्यानें रससिंधु, हितोपदेश आणि रसराजलक्ष्मी असे तीन ग्रन्थ लिहिले आहेत. त्यांतून या स्वर्णक्षीरीचे उल्लेख ठिकठिकाणीं अनेक पाठांतून, निरनिराळ्या नांवांनीं आलेले आहेत. रसराजलक्ष्मीतील पारदसंस्कारक्रियेंत पारदसंदीपनगणांत, 'चिंची' हा शब्द आला आहे. त्यास रसराजलक्ष्मीचे टीकाकारानें, 'कटुसरा' व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुसरे एके ठिकाणीं, 'कडसरा' असे प्रतिशब्द दिले आहेत. पुढें व्याधीपंचानन नामक औषधाचे पाठांतील, 'रैदुग्ध' या शब्दालाहि 'कटुसरा' हाच पर्याय दिला आहे. रै म्हणजे सुवर्ण व दुग्धा म्हणजे दूध, क्षीर यावरून स्वर्णक्षीरी हा शब्द विष्णुपंडितानें रैदुग्ध नांवानें मोठ्या खुबीनें वापरला आहे. असो. असे पुष्कळ उल्लेख इतर रसग्रंथांतून दाखवतां येतील, पण विस्तारभयास्तव देत नाहीं. कटुसरा, कटुपर्णी हीं नांवें निघंटुकारांनीं स्वर्णक्षीरीसच दिलेली आहेत व जुन्या मराठी हस्तलिखित वैद्यकीय लिखाणांतून (बाडांतून) हे कडसरा, कटुसरा शब्द पिसोळ्यास म्हणजेच पिवळे धोतऱ्यास दिलेले आहेत. अस्तु.

गुणधर्मांच्या दृष्टीनें विचार

गुणधर्मांचे दृष्टीनें विचार करितां ही वनस्पति रसायन गुणात्मक असून आक्षेपक, लहान मुलांची आंकडी, धनुर्वात, हिस्टेरिया, अर्दित, गृध्रसी, फिरंगव्याधीजन्य संधिवातादि चिरकारी वातविकार, सूतिकावात, ज्वरवेग वाढून होणारी बडबड, ऊठपळ करणें, शरीर लांकडाप्रमाणें ताठ होणें, मन्यास्तंभ, मस्तिष्कदाह (मिनेंजायटिस्) इत्यादि वातक्षोभी लक्षणें वगैरे तीव्र व्याधींत प्रभावी कार्यकारी आहे. वातविकारावर शामक क्रियाकारी आहे. तेव्हां अशा उपयुक्त वनस्पतीची भावना वातविध्वंसनरसास देण्यास प्राचीनांनीं उगीच सांगितलेलें नाहीं. पण अशा अमोलिक औषधीचा देखील आपणांस आज केवळ अज्ञानामुळें व शास्त्रपराङ्मुखेतेमुळें विसर पडला आहे. केवळ वातविकारांचे दृष्टीनेंच मी येथें हे गुणधर्म सांगितले आहेत. इतर बऱ्याच व्याधींत ही अशोष फायदेशीर आहे.

मनोधात्रीचा उल्लेख

मनोधात्रीचा म्हणजेच पिवळे धोतऱ्याचा उल्लेख असलेले ग्रंथ–रसपद्धति, रसराजलक्ष्मी, वैद्यकसारसमुच्चय, रससिंधु, वैद्यकसारसंग्रह–हितोपदेश, शार्ङ्गधर-संहिता, रसराजशंकर, योगरत्नाकर, रसहृदयतंत्र, चरकसंहिता, निघण्ट-रत्नाकर, निघण्ट शिरोमणि इ.

मनोधात्रीची नामावली

मनोधात्री, हृद्धात्री, स्वर्णक्षीरी,' कांचनी, कनकक्षीरी, रैदुग्धां, ह्यावली, चेतोधात्री, हियावली, चोक, पिसोरा-पिसोळा, कडसरा, कटुसरा, हेमाह्वा, कटुपर्णी, सत्यानाशी इत्यादि ४० नांवें आहेत.

मध्यप्रदेशांतील

वैद्य हकीमांचें रजिस्ट्रेशन

रजिस्ट्रेशनची मुदत वाढली

नागपूरच्या एका दैनिक वृत्तपत्रांत खालील वृत्त प्रसिद्ध झालें आहे. "मध्यप्रदेश आयुर्वेद व युनानी चिकित्सक-बोर्डाच्या रजिस्ट्रारनें एक अधिकृत नोट प्रसिद्ध करून असें सूचित केलें आहे कीं, वैद्य व हकीम यांच्या रजिस्ट्रेशनची मुदत वाढवून ती तारीख ३१ मार्च १९५४ पर्यंत करण्यांत आली आहे. वस्तुतः प्रथम जाहीर केलेली मुदत संपून गेली आहे. परंतु वैद्य-हकीमांना आणखी एकवेळ रजिस्ट्रेशनची संधि मिळावी ह्या हेतूनें ही मुदत तारीख ३१।३।१९५४ पर्यंत वाढविण्यांत आली आहे.

[ज्या चिकित्सक व्यवसायी वैद्यांचें अगर हकीमांचें रजिस्ट्रेशन अद्याप व्हावयाचें राहिलें असेल त्यांनीं मध्यप्रदेश बोर्डाकडे १ आण्याचें पोस्टाचें तिकीट पाठवून रजिस्ट्रेशन फॉर्म मागावून घ्यावा. व वाढविलेल्या मुदतींत न विसरतां फॉर्म योग्य रीतीनें भरून पाठवावा.

पत्ताः– दि बोर्ड आफ् आयुर्वेदिक अँड युनानी तिब्बी सिस्टिम्स ऑफ मेडिसिन, नागपूर]

श्री धन्वन्तरी उत्सव, सोलापूर

सोलापूर येथील चरक आयुर्वेद मंडळातर्फे श्री. चरक क्षयरोग चिकित्सालयांत धन्वंतरी महोत्सव साजरा झाला. सदर प्रसंगीं 'धन्वंतरी' या विषयावर पं. रामकृष्ण शर्मा यांचें भाषण झालें. त्यानंतर कार्यदर्शी वैद्य डी. बी. गलगली यांचेंहि भाषण झालें. शेवटीं चेअरमन वैद्य आर. सी. धोत्रीकर यांनीं आलेल्या सर्व पाहुण्यांचे आभार मानले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्ध आयुर्वेद समितीनें काढलेल्या प्रश्नावलीबाबत माझे विचार

(लेखकः—. एक वैद्य)

शुद्धायुर्वेद अभ्यासक्रम समितीनें तयार लेली प्रश्नावली गेल्या आठवड्यांत तद्विद्यांकडे ाना झाली. तशीच ती आयुर्वेदपत्रिकेंतहि सिद्ध झाली.

परिषद घेण्याचा उद्देश

एखाद्या विद्वद्वैद्य परिषदेंत ह्या प्रश्नपत्रिकेवर ांगोपांग चर्चा झाली तर ह्या प्रश्नांचीं उत्तरें लिहि- ाचें काम सोपें होईल, व मग उत्तरांमध्यें बराचसा रखेपणा येईल, व त्यामुळें आलेल्या उत्तरांचें वर्गी- रण करून सार काढण्याचें काम सोपें होईल म्हणून हेंबर अखेर एक विद्वद्वैद्य परिषद मुंबईस बोलाव- ाचें ठरलें व त्याप्रमाणें तो संकल्प गेल्याच आयुर्वेद- त्रिकेंत प्रसिद्धहि झाला. पण आतां असें समजतें कीं परिषद कांहीं कारणानें डिसेंबरचे दुसऱ्या आठव- यांत घेण्याचें घाटत आहे. एवंच, आतां ह्या परिषदे- ल चर्चेचा उपयोग ह्या प्रश्नावलीचीं उत्तर लिहि- ारांस व्हावयाचा नाहीं. हें लक्षांत घेऊन माझे चार मी तद्विद्यांपुढें मांडीत आहे.

काय करावयास हवें व तें कसें ?

ब्रिटिशांच्या आमदानींत आयुर्वेद उपेक्षित ता. वसाहतींचे स्वराज्यांत तो मिश्र स्वरूपी झाला. आतांच्या स्वतंत्र सरकारनें आयुर्वेदाच्या शुद्ध पवा निर्भेळ स्वरूपाला मान्यता दिली आहे. तेव्हां काय झालें आहे" "तें कशानें झालें व कसें" गोष्टींचा उलगडा होऊन आतां "काय करायला आणि तें कसें" ह्याचा उमज पाडणारें ज्ञान सलेले व तें समपर्कतेनें जनतेला व अन्य व्यवसाय यूंना समजावून देतां येण्यास समर्थ असलेले असे तिष्ठावान् वैद्य आपणांस निर्माण करावयाचे आहेत. गोष्ट लक्षांत घेऊन प्रश्नांचीं उत्तरें लिहावींत व मितीला मार्गदर्शन करावें.

आचार्य कसा असावा ?

प्रश्नः— आचार्य कसा असावा? ह्याबाबत रसेंद्र- चूडामणी, रसरत्नसमुच्चय ह्यांत व्यवस्थित वर्णन दिलेलें आहे. पण आजच्या कालांत त्या सर्व कसो- ट्यांना पुरेपूर उतरेल असा गुरुजी मिळणें फार कठीण. मिळालाच तर तोहि फार विरळ. पण अशा अपवादा- त्मक व्यक्तीवरून सर्वसामान्याचा नियम करतां येत नाहीं, म्हणून आजचा आयुर्वेद-आचार्य हा आयु- र्वेदाबरोबरच सांख्य, न्याय, मीमांसा, वैशेषिक इ. आयुर्वेदसाहाय्यक शास्त्रांचेंहि अध्ययन केलेला असावा. कारण आयुर्वेदाचे मूळ ग्रन्थ लिहिले गेले त्या कालांत ह्या शास्त्रांचा प्रचार पुष्कळ झाला होता. इतकेंच नव्हे तर तीं त्याकाळीं प्रचलितहि होतीं. त्यां- तील विचारसरणीनें तत्कालीन विद्वद्वर्गाचे मनावर चांगलीच पकड घेतली होती. व ते विद्वान्, ग्रंथ लिहि- तांना प्रचलित पारिभाषिक संज्ञांचा उपयोग करीत. तो प्रकार आयुर्वेदशास्त्राबाबतहि झाला आहे. पण आयुर्वेदीयांनीं इतरांचे पारिभाषिक शब्द स्वीकार- तांना त्यांचा आयुर्वेदाचे क्षेत्रांत अर्थ काय हें स्पष्ट केलेलें आहे.

गुरूला मीमांसाशास्त्र अवगत हवें

उदा. सुश्रुतानें सांख्यांची प्रक्रिया मान्य केली, पण आयुर्वेदांतला पुरुष ह्याचा अर्थ "पंचमहाभूतशरीरि- समवायः पुरुषः।" असा निश्चित केला. तसेंच "शरीरेंद्रियसत्वात्मसंयोगो धारि जीवितम्। नित्यग- श्चानुबंधश्च॰ पर्यायैरायुरुच्यते।" च. उं. "सत्व- मात्मा शरीरं च त्रयमेतत्त्रिदंडवत्। लोकास्तिष्ठति संयोगात्तत्र सर्वं प्रतिष्ठितम्। स पुमान् चेतनं तच्च तच्चाधिकरणं मतम्। वेदस्यास्य, तदर्थं हि वेदोऽयं संप्रकाशितः।" च. सं. नैय्यायिकांचा द्रव्यसंग्रह जसाचे तसाच चरकानें घेतला व द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समवाय, अभाव ह्यांच्या व्याख्याहि बहुशः त्यांच्याच स्वीकारल्या आहेत. मीमांसकांकडून ग्रंथरचना व अर्थसंगति ह्या शिकतां येण्या सारख्या आहेत. म्हणून गुरुला ह्या शास्त्रांचें ज्ञान चांगल्या प्रकारचें असणें आवश्यक आहे. तसेंच हे विषय मूळांतून शिकण्याची इच्छा विद्यार्थ्यांचे ठिकाणीं असल्यास तिची पूर्ति होण्याची सोय ह्या गुरुकडे अगर त्या गांवांत तरी निदान असावी.

गुरुकुलांना मान्यता द्यावी

गुरुपरंपरेचा मागचा इतिहास लक्षांत घेतां अध्यापक हा उत्तम व्यवसायी असतोच असें नाहीं, असें दिसून येतें. एकहि रोगी पहायला मिळत नसे अशींहि कांहीं अध्यापकांचीं उदाहरणें देतां येतील, तर अगदीं उत्तम प्रथितयश चिकित्सकाकडे एकहि शिष्य नाहीं, असलाच तर तो शास्त्रविहीन असा, अशीहि स्थिति असल्याचीं उदाहरणें देतां येतील.

आपणांस तर ("यस्तूभयज्ञो मतिमान् स समर्थोऽर्थसाधने। आहवे कर्मनिर्वोढुं द्विचक्रः स्यन्दनो यथा।") सुशास्त्र आणि कला ह्यांत निपुण असा वैद्य तयार करावयाचा आहे. तेव्हां असा हा उपक्रम एकाच व्यक्तीकडून पुरा होण्यासारखा नसल्यास अनेक विद्वानांनीं एकत्र येऊन ही कामगिरी अंगीकृत करावी. असा संच तयार असल्यास त्यासहि 'गुरुकुल' म्हणून मान्यता देण्यास हरकत असूं नये. एवंच आगम आणि प्रत्यक्ष ह्यांच्या अधिकांत अधिक सोयी उपलभ्य असतील तेथें त्या व्यक्तीस, संघास अगर संस्थेस, शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रम शिकविण्यास, अधिकार देण्यास हरकत नाहीं.

ग्रंथप्रधान पाठ्यक्रम अधिक हिताचा

• पाठ्यक्रमाबाबत दोन मतप्रवाद प्रचलित आहेत. एक ग्रंथप्रधान व दुसरा विषयप्रधान. पहिल्या पक्षाचें म्हणणें असें कीं आयुर्वेदाचे ग्रंथांत अनेक विषय असले तरी ते त्या ग्रंथकारानें एका विशिष्ट पद्धतीनें मांडलेले असतात, त्या रचनेंत मागचा पुढचा हवाला दिलेला असतो, त्यामुळें विद्यार्थ्यांस सर्व विषयांचा अन्योन्यसंबंध सहजीं समजण्याच्या दृष्टीनें एक तरी ग्रंथ पुरेपूर शिकविणें अत्यावश्यक आहे. सामान्यतः ५० वर्षांपूर्वीच्या कालांत केवळ वाग्भटच परिपूर्णतेनें शिकविला जात असे. अभ्यासु वा ज्ञानपिपासु विद्यार्थी चरक, सुश्रुत हे ग्रंथज्ञानलालसेनें आपण स्वतःच, अथवा अन्य आचार्यांकडे जाऊन त्यांचें अध्ययन करी. पण केवळ वाग्भट-वाचनानेंसुद्धां, तो वैद्य स्वकार्यकुशल अथवा चिकित्सा-व्यवसायक्षम होत असे. अशीं उदाहरणें कितीतरी दाखवितां येतील.

वाग्भटाचें सूत्रस्थान

वाग्भटाचें सूत्रस्थान म्हणजे सर्व शास्त्रसिद्धांतांची वा नियमांची एक संहिताच [कोड] आहे. इतर तंत्रांतहि अशीच व्यवस्था असते, म्हणून "शास्त्रे शास्त्रे नयगुणविधौ सत्प्रमाणे पुराणे। सांख्ये सान्ते वितरणगुणे धूरिगण्यः सुपुण्यः। वक्ति व्यक्तं रसपरिकरं वैद्यविद्याविनोदी। श्रीमान्सोमः पुरवर-महावीर-वंशावतंसः। असा हा रसेंद्रचूडामणीचा विद्वन् कर्ता म्हणतो कीं:—

> सूत्रस्थानमिदं वेत्ति पाठतश्चार्थतोऽपि यः।
> नासौ संदिह्यते वैद्यः सर्वस्मिन् रसकर्मणि।
> सूत्रस्थाने परिज्ञाते गुर्वपेक्षा न विद्यते।
> लभते स रसाचार्यपदं विशदकीर्तितम्। र. चू.

वाग्भटानेंहि सूत्रस्थानाच्या शेवटच्या अध्यायांतः– "अत्रार्थाः सूत्रिताः सर्वे प्रतन्यंते हि सर्वतः।" असें म्हटलें आहे.

एक तरी ग्रंथ पूर्ण अभ्यासावा

वाग्भटाच्या सूत्रस्थानांत त्या त्या वेगावरोधानें

आयुर्वेद पत्रिकेंतील सर्वांना पसंत पडलेली
लेखमाला
अनुभविक चिकित्सा
पहिलीं ६ प्रकरणें
लेखक : वृद्ध वैद्य, मध्यप्रदेश
किंमत १ रुपया
वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

न होणाऱ्या रोगांची यादी दिली आहे. ती पुढें त्या रोगांचें निदान, संप्राप्ति, चिकित्सा सांगतांना उपयोगी पडते. व ग्रंथकारानें सर्वत्र सुसंगति राखली आहे, मागचा पुढचा विचार किती आहे, हें समप्रमाण दाखवितां येतें. हा गुण बाणण्याचें दृष्टीनें व आरण एक तरी ग्रंथ शानें वाचला, तो आपणास समजला, व आपण विशिष्ट ग्रंथाचें आधारें आपला विषय व्यवस्थित शकतों, हें समाधान विद्यार्थ्यास लाभण्याचें नेंहि ग्रंथप्रधान अध्यापन हें उपयुक्त ठरतें.

अष्टांगहृदय संपूर्ण शिकवावें

तेव्हां इतर विषय कितीहि शिकविले तरी गहृदय हा ग्रंथ संपूर्ण आणि चांगला शिकवावा. र्थ्याचें मनांत तो चांगल्या प्रकारें ठसेल, रुजेल प्रयत्न होणें अत्यंत आवश्यक आहे. आज क अथवा इतर विद्यालयांतून विषयप्रधान णपद्धति प्रचलित आहे. अनेक विषय तेहि त्रोटक, ळें विद्यार्थ्यास ज्ञान अगर तज्ज्ञत्व यापैकीं कांहींच त नाहीं. त्यामुळें तो असहाय पंगु असा राहतो. यप्रधान शिक्षणपद्धतींत अनेक विषयांचा अन्योन्य काय हें विद्यार्थ्यांना कळत नाहीं. असें जरी तरी विद्यमान शिक्षणपद्धति व विचारप्रणाली त घेतां विषयवार शिक्षण आंखण्यास संमति येईल. पण त्यांत ही सावधानीची सूचना देणें त आवश्यक वाटते.

रसशास्त्रासाठीं रसेंद्रचूडामणी

एवंच जो विषय शिकवायचा त्याचा एकतरी कृत ग्रंथ त्या त्या विद्यार्थ्यास पूर्णपणें अवगत , अशी व्यवस्था ह्या अभ्यासक्रमांत असणें जरूर . उदा:- रसशास्त्रासाठीं १ रसेंद्रचूडामणी हा जुना, वा स्वतंत्र ग्रंथ. २ अद्यावत् ज्ञान संकलित असा ायुर्वेदीय औषधीकरण ' हा नवा संकलित ग्रंथ. हे ी ग्रंथ अभ्यासक्रमांत संपूर्ण असे ठेवावेत. जेच त्या त्या विषयाचें सांगोपांग न भरीवज्ञान त्या विद्यार्थ्यास प्राप्त होऊन त्याचें तें एक व्यवसायांतील मोठें भांडवल होऊ शकेल.

प्रवेश-पात्रता

ह्यांत पुण्याच्या वेदशास्त्रोत्तेजक सभेचाहि अंतर्भाव व्हावा. आपणांस अपेक्षित अशा विषयांचा गुच्छ त्यांचेकडे नसेल तर तो तसा करण्याबाबत त्या सभेला विनंति करून प्रवेशपात्रता सुलभतेनें लाभण्याचें नजीकचें स्थान निर्माण करून द्यावें.

ह्या सूचना एका व्यक्तीच्या आहेत. त्याबाबत मतभेद असणें अत्यंत स्वाभाविक आहे. पण ह्या विचारांचा परामर्ष प्रश्नावलींचीं उत्तरें देतांना घेतला जावा; म्हणूनच हे येथें प्रगटपणें मांडले आहेत.

वै. भ. त्र्यं. वैद्य यांचें अभिनंदन

धुळें येथील सुप्रसिद्ध वै. भगवंत त्र्यंबक वैद्य हे धुळे म्युनिसिपल स्कूल बोर्डाचे व्हाइस चेअरमन म्हणून निवडून आले आहेत. याबद्दल पत्रिका त्यांचें अभिनंदन करीत आहे.

आयुर्वेद विद्वत् परिषद

ता. १२।१३ रोजीं भरणाऱ्या आयुर्वेद विद्वत् संमेलनानिमित्त वैद्य बिंदुमाधव पंडित हे मुंबईस जाणार असून ता. १५ पर्यंत त्यांचा मुक्काम तेथें राहील.

पत्ता:- वै. ग. म. अभ्यंकर
२५९ गिरगांवरोड मुंबई ४

ग्राहकांस खुष खबर

महाराष्ट्र, उत्तर प्रदेश याप्रमाणेंच मध्यप्रदेशांतहि ' आयुर्वेद सेवा संघ, नाशिक ' या संस्थेच्या औषधांचा बोलबाला झाला असून आतां खेडोपाड्यांतूनहि या औषधांना मागणी येत आहे. म्हणून आम्ही वऱ्हाडांत हें नवीन औषधी विक्री-केंद्र सुरू करीत आहोत.

वै. एन्. एम्. लोंधे " लोंधे औषधालय "
मु. पो. पिंपळोद (अमरावती)

आमच्याकडे आयुर्वेद सेवा संघाचीं सर्व प्रकारचीं गुणकारी औषधें मिळतील. एकवेळ अनुभव घ्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आचार्यांचें इंदुरास आगमन

आदरणीय श्री. वेणीमाधवशास्त्री (दि रीडर, आयुर्वेदिक संशोधन विभाग, नागपूर युनिव्हर्सिटी) ह्यांचें दि. ३० ऑक्टोबर १९५३ ला इंदुरास आकस्मिक आगमन झालें. ता. ३१ रोजीं त्यांनीं येथील प्रमुख वैद्य ख्यालीरामजीशास्त्री व आचार्य प्रतापसिंहजी प्रमुख रा. सिं. आयु. कॉलेज इन्दूर त्यांची भेट घेऊन "तृणज्योतिष्मति" आदि विषयीं अल्पशी चर्चा केली. आचार्यांनीं समयाभावीं त्याच दिवशीं रात्रींच्या गाडीनें मुंबईस प्रयाण केलें. स्टेशनवर त्यांनीं आयुर्वेदाविषयीं रोचक मार्गदर्शन केलें व सर्वांचा हार्दिक निरोप घेतला. त्यांच्याकडून मिळालेली "तृणज्योतिष्मति" बऱ्याचशा वैद्य, डॉक्टर व अन्य प्रमुखांनीं बघितली असून कुतूहल व्यक्त केलें व करीत आहेत.

आयुर्वेदीय 'संस्कृत' व 'पदार्थविज्ञान'

वाचकांना पुढील वृत्त वाचून आनंद वाटेल. सुरत आयुर्वेद महाविद्यालयाचे उपाचार्य वैद्य रणजितराय हे आयुर्वेदीय ग्रंथांतून उत्कृष्ट संस्कृतवाङ्मयीन उतारे निवडून त्या उताऱ्याचें 'संस्कृत' भाषेचें एक अभ्यसनीय पुस्तक तयार करीत आहेत. या पुस्तकाची छपाई चालू आहे. याच पद्धतीचें आयुर्वेदीय पदार्थविज्ञान त्यांनीं लिहिलें असून त्याची द्वितीयावृत्ति छापली जात आहे. असें समजतें.

वाचकांचा पत्रव्यवहार—

तृणज्योतिष्मति

मु. सांगवी (फलटणभाग) येथील वैद्य नलवडे ह्यांनीं मंडला जिल्ह्यांत दिंडोरी येथें जाऊन तृणज्योतिष्मति घेऊन आले असून सातारा जिल्ह्यात ती कोठें मिळू शकते कां याचा शोध घेत आहेत असें कळतें.

भिषग्रत्न ग. कृ. पाटणकर यांनीं १९२० सालीं सातारा वाचनालयांत तृणज्योतिष्मतीवर पहिलें व्याख्यान दिलें.

औंध येथें संस्थानच्या हत्ती-घोड्यासाठीं खरेदी केलेल्या गवतांत एकदां रात्रीं प्रकाशणारें थोडें गवत आलें होतें अशी माहिती मिळते.

कर्नल कीर्तिकर व मेजर बसू यांच्या इंडियन मेडिकल प्लँट्स या ग्रंथांत ज्योतिष्मती विषयीं जी माहिती आहे, ती कानफुटीसंबंधींची आहे तृणज्योतिष्मतिसंबंधींची नव्हे.

हृद्रोगावरील महत्वाचें आयुर्वेदीय औषध

चिंतामणिरस (गोळ्या)

चिंतामणीरसाचा पाठ भैषज्यरत्नावलींत आहे. शुद्ध पारा, गंधक, अभ्रकभस्म, लोहभस्म, वंगभस्म, शिलाजंतु हीं औषधें १०-१० तोळे, सुवर्णभस्म २॥ तोळे, रौप्यभस्म ५ तोळे, अंबर १० तोळे व मौक्तिकभस्म ५ तोळे या औषधांस चित्रकमूळ काढा, माका रस, अर्जुनसालीचा काढा याच्या ७-७ भावना दिल्या आहेत. हृदयशूल, हृदयद्रव (छातींत धडधडणें) या विकारांत हें औषध उपयुक्त आहे.

(१ तोळा ३२ रु.) १५ गोळ्यांची किंमत ५ रु. टपाल खर्च निराळा.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चकांचा पत्रव्यवहार—

लेक्ट्रो होमिओपॅथीचें एफ् १ औषध

प्रश्न– ता. १ नोव्हेंबरच्या आयुर्वेद पत्रिकेंत ३२७ वर एफ् १ नांवाचें औषधाचा उल्लेख , हें औषध कोणतें ?

उत्तर– इटलीतील काउंट मॅटी नामक गृहस्थांनीं क्ट्रो-होमिओपॅथीचीं औषधें तयार केलीं आहेत. ल फेब्रिफ्यूजो (Febrifugo=F 1) हें एक वरील औषध आहे. होमिओपॅथिक औषधी विक्रे- डे हें विकत मिळतें. लहान बाटलीची किं. २ रु.

वृश्चिक दंशावर अनुभविक योग
कानांत कांद्याचा रस

शरिराचे दोन भागापैकीं एक भाग उजवा व डावा. यापैकीं ज्या भागांत वृश्चिकदंश झाला त्याच्या उलट भागांत हा प्रयोग करावयाचा

कांद्याच्या दोन जाती आहेत. तांबडा व पांढरा. ा कांद्याचे गुण जास्त. तो नच मिळाला तर ा चालेल. कांदा किसणीवर चटकन किसून पिळून रस काढावा. व कानाचें छिद्र पूर्ण भरे- रस टाकावा. शिलक चोथा दंशस्थानीं बांधावा, त् वेदना थांबतात. वरील प्रयोग होताच गरम- पेयें दूध, चहा, कॉफी आवडीप्रमाणें पिण्यास उत्तम गुण येतो.

ठे (प. खा.) वैद्य का. स. जोशी

श्रीधन्वन्तरी उत्सव, दारव्हा

बुधवार ता. ४।११।५२ रोजीं सायंकाळीं ५ ते नसेवा आयुर्वेदीय औषधालयांत डॉ. जी. डी. मुंबई) यांच्या अध्यक्षतेखालीं श्रीधन्वन्तरी उत्सव ा झाला. त्यानिमित्त वै. आ. वा. कोंडोलीकर, चव्हाण यांचीं भाषणें झालीं. याच उत्सवांत ा वैद्य सभा झाली. त्यांत तालुका आयुर्वेद वैद्य न १ महिन्यांत घ्यावें असें ठरविण्यांत आलें.

अनुक्रमणिका

वैद्यांना व्यवसायास परवानगी कोणी द्यावी ?	३५५
श्री धन्वन्तरी महोत्सव पुणें	३५७
सूतिकाभरण	३६१
स्मृतिसागर	३६२
हेमगर्भ	३६३
स्वरभेद निदान व चिकित्सा	३६५
आरोग्यदायक लिंबू	३६८
ही नीलज्योति आहे !	३६९
दुष्ट कॅन्सरवर दुग्धाहार	३७२
भारतांतील औषधी नियंत्रण-यंत्रणेसाठीं कायदा	३७३
प्राचीन भारतांतील रुग्णालयाचें स्वरूप	३७५
फॅकल्टी परीक्षांचा निकाल	३७७
वातविध्वंसनांतील मनोबात्री	३७९
मध्यप्रदेशांतील वैद्य हकीमांचें रजिस्ट्रेशन	३८०
शुद्ध आयुर्वेद समितीनें काढलेल्या प्रश्नावलीबाबत माझे विचार	३८१

सर्व वैद्य-बंधूंस जाहीर विनंति

सरकारनें मान्य केलेल्या शुद्ध आयुर्वेद अभ्यास-क्रमाचा विस्तारपूर्वक विचार करणेसाठीं महाराष्ट्र प्रान्तीय वैद्य संमेलन, महागुजरात प्रां. वैद्य संमेलन, अखिल कर्नाटक वैद्य संमेलन व मुंबई उपनगर वैद्य संमेलन, या चारहि संस्थांचे अध्यक्षांनीं मुंबई राज्यांतील व सर्व भारतांतील विद्वानांची एक परिषद ता. १२ व १३ डिसेंबर रोजीं मुंबईमध्यें भरविणेचें ठरविलें आहे. मुंबईतील सर्व वैद्यांनीं त्यांचें यथा-योग्य स्वागत करणेचें ठरविलें आहे. तरी सर्व वैद्य-बंधूंनीं व आयुर्वेदप्रेमी नतेनें या कार्यास मुक्त हातानें साहाय्य करावें अशी विनंति आहे.

वैद्य अनन्ताचार्य घळसासी
संयोजक, स्वागतसमिति
आयुर्वेद विद्वत् परिषद, मुंबई

वर्गणी पाठविण्याचा पत्ता:-वैद्य अनंताचार्य घळसासी
११२ भुलेश्वर, कबुतरखाना, मुंबई नं. २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निरोगी व रोगी या दोघांनाहि उपयुक्त
बुद्धि व स्मरणशक्ति वाढविणारें पौष्टिक खाद्य
अश्विनी-प्राश

उरःसंधानजननं मेधास्मृतिबलप्रदम् ।
अश्विभ्यां विहितं हृद्यं कूष्मांडकरसायनम् । —वाग्भट

"आम्हांला कोणताहि रोग नाहीं. आमची प्रकृति चांगली आहे. आमची प्रकृति व बुद्धि अशीच दीर्घकालपर्यंत बळवान् रहावी असा कांहीं उपाय असल्यास तो आम्हांस हवा आहे." अशी मागणी अनेक जण करीत असतात. अशा लोकांसाठींच सेवा संघानें मुद्दाम अश्विनी-प्राश हा अनुभविक कल्प तयार केला आहे.

हृदय, फुप्फुसें व मेंदू यांना शक्तिवर्धक खाद्य

पूर्वी दरसाल घरोघरीं कोहळ्याचा पाक (वड्या) करून खाण्याची पद्धति रूढ होती. विद्यार्थी, कारकून, बौद्धिक श्रम करणारी मंडळी यांना कोहळ्यापासून पासून बनविलेला हा प्राश विशेष उपयोगी आहे. हृदय, फुप्फुसें व मेंदू यांना शक्ति देणारें हें खाद्य आहे. उष्णतेचे (पित्तदोषाचे) कोणतेहि विकार होऊ नयेत अशी इच्छा करणाऱ्या प्रत्येकानें हें पौष्टिक खाद्य अवश्य सेवन करावें.

बस्तिशुद्धिकर, धातुपौष्टिक औषध

वेलाला लागणाऱ्या फळांत कूष्मांड हें श्रेष्ठ फळ आहे. तें वातपित्तदोषहारक, मूत्रमार्गानें शरीरांतील दोष काढून टाकणारें व धातुपौष्टिक फळ आहे, असे यांचे गुण वाग्भटानें सांगितले आहेत.

क्षयाचा खोकला, छातींत क्षत (कॅव्हिटी) होणें, कफाबरोबर रक्त पडणें, घुणा फुटणें, गरम विटाळ जास्त प्रमाणांत जाणें, मूत्रव्याधींतून रक्त पडणें, इत्यादि विकार असलेल्या लोकांनाहि यानें फायदा होतो। किंमत २० तोळे २ रु.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

संपादक व प्रकाशकः— वैद्य विंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, मेनरोड, नाशिक

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद गुरुकुल ... प्रकाशन

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ७ वें) नाशिक, ता. १६ डिसेंबर १९५३ (अंक १२ वा

॥ श्रीधन्वंतरये नमः ॥

- आयुर्वेद विद्वत् परिषद्, बम्बई -

माननीय वैद्यराजजी, सादर प्रणाम—

सेवामें निवेदन है कि आगामी ता. १९, २० दिसंबर १९५३ (शनि.–रविवार) को बम्बईमें आयुर्वेदज्ञ विद्वानके परिषद्की योजना की गयी है, जिसमें बम्बई सरकार-सम्मत शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम की पढाई के विषयमें:—



विद्वद्वर वैद्य डेंग्वेकरशास्त्री

१ विद्यालय, गुरु और छात्रोंकी पात्रता,
२ पाठ्यक्रम के लिये ग्रंथांश तथा ज्ञेयांश,
३ गुरुपरंपरा अध्ययन--अध्यापन पद्धतिमें प्रात्यक्षिक ज्ञानकी सुविधा, आदि विषयोंपर चर्चा होगी।

परिषद्का अध्यक्षपद जबलपुरके विद्वद्वर वैद्य श्री. भिकाजी विनायक डेंग्वेकरशास्त्री M. A. M. Sc, LL. B. भूषित करेंगे।

इस कार्यमें अखिल भारतीय मान्यतर भिषग्श्रेष्ठोंकी सहायता अत्यन्त अपेक्षित है, अतः आपसे साग्रह प्रार्थना है कि परिषद्में अपनी उपस्थिति द्वारा मार्गदर्शन करनेकी अवश्य कृपा करें।

कृपया आपका शुभागमन पहलेसे सूचित करें ताकि व्यवस्था करनेमें सुविधा हो, और यदि कार्यवश न आ सकें तो अपने सुयोग्य विचार लिखित रूपमें शीघ्र भेजनेकी कृपा करें। कष्ट के लिये क्षमा।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवास और परिषद् का स्थानः-नेमाणीजी की वाडी, ठाकुरद्वार रोड, फणसवाडी नाका, बम्बई २

कार्यालयः- ४५ कॅथेड्रल स्ट्रीट, भुलेश्वर, बम्बई २.

भवदीय नम्रः- **पंडित शिवशर्मा** स्वागताध्यक्ष,

मंत्रीः-वैद्य **सोमेश्वर मयाशंकर भट्ट,** वैद्य **अनंताचार्य घलसासी,**

वैद्य **श्रीराम शर्मा,** वैद्य **लक्ष्मीबाई बोरवणकर**

—ः परिषद् का कार्यक्रम ः—

शनिवार मध्यान्ह १ बजेसे ४ बजे तक स्वागताध्यक्ष का भाषण, परिषद् के अध्यक्ष का भाषण एवं विषय चर्चा

रात्रि ९ से ११ तकः-विषयचर्चा

रविवार प्रातः ९ से १२ और सायं ३ से ६ तकः- विषय चर्चा और उपसंहार

विशेष सूचनाः- परिषद्में पधारनेवाले महानुभावोंके **भोजनका प्रबंध** स्वागत समितिकी ओरसे किया जायगा।

---

२९ वें अ. भा. आयुर्वेद महासंमेलन

येतें निखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन दक्षिण मलबार प्रांतांत कोट्टाकल नामक गांवीं ता. ५-६-७-८ जानेवारी रोजीं होणार आहे.

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाची वार्षिक वर्गणी १ रु. भरून सभासद व्हा व

वैद्य संघटना बलवान् करा.

वैद्य-बंधूनो—

आपली मिळकत वाढवा

विना भांडवल, विना परिश्रम व कोणताहि खर्च न करतां आपली मिळकत आपण वाढवूं इच्छित असाल तर आमच्याशीं पत्रव्यवहार करा.

आमचा कारखाना सर्व भारतांत ठोक प्रमाणांत स्वस्त व उत्तम सर्व प्रकारचीं आयुर्वेदीय औषधें पुरविण्यांत प्रसिद्ध आहे.

कित्येक प्रांताचीं सरकारें (गव्हर्मेंटें) आमचीं ग्राहक आहेत.

काश्मीर आयुर्वेदिक वर्क्स, अमृतसर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असल केशर कसें ओळखावें?

(लेखक: — श्री. नंदकिशोर गणेशीलाल वर्मा, मुंबई ३)

केशर हें एका विशिष्ट प्रकारच्या फुलाच्या पुष्प-दल-कोशामध्यें असणारें केसर (तन्तु) होत. केशराचें झाड हें रोपटेंवजा असून तें साधारणतः गुडघ्यापासून कमरेइतक्या उंचीचें असतें. सर्व जगांत केशराचीं झाडें फक्त स्पेन, इराण, व काश्मीर ह्या तीन देशांतच उगवतात. परमेश्वरानें ह्या तीन प्रदेशांतील भूमि, जल व हवा ह्यामध्येंच फक्त केशराचें झाड वाढ-ण्यास उपयुक्त असा प्रभाव निर्माण केला आहे. या तीन देशांखेरीज केशराचीं झाडें इतरत्र होत नाहींत.

केशराच्या जुड्या बांधण्यांत येतात

मजुरांकडून केशराच्या बागेंत ह्या फुलांतील केशर (तंतु) खुडविले जातात. मजूर एक एक तंतु खुडून आपल्या तळ हातावर ठेवितो व पुरेसे तंतु खुडून झाल्यावर त्यांची आपण ज्याप्रमाणें दुर्वांची जुडी बांधतो त्याप्रमाणें-दोऱ्यानें जुडी बांधतो. अशा प्रकारें केशराच्या जुड्या बांधून तयार करण्यांत येतात. व्यापारी लोक ह्या जुड्यांस गुच्छ (गुच्छी) म्हणतात. ह्या स्थितींत केशराचें शुद्ध स्वरूप, त्याची लांबी, त्याचें (केशराच्या तंतूंचें) पिवळया व तांबड्या भागांचें प्रमाण वगैरे गोष्टी पहावयास मिळतात. ह्या सर्व गोष्टी व्यापारी लोक पाहातात व त्या त्या मालाच्या मगदुरा-प्रमाणें त्याची खरेदी करतात.

जर्दा व असली केशर

व्यापाऱ्यांनीं अशा प्रकारें हे केशरांचे गुच्छ खरेदी केल्यावर, मजूरांकडून केशराच्या तंतूच्या बुंधाकडील पिवळा भाग व टोंकाकडील तांबडा भाग हे अलग अलग कापून घेतात. बुंध्याकडील पिवळया भागास व्यापारी लोक 'जर्दा' असें म्हणतात व तंतूच्या शेंड्याकडील तांबड्याभुरंग भागास 'असली केशर' असें म्हणतात. नंतर हे असली केशर व्यापारी आपापल्या ट्रेडमार्कच्या लहान मोठ्या टिनच्या डब्यांत भरून पॅक करितात. कांहीं वस्ताद व्यापारी बुंध्याकडील निघा-लेल्या पिवळया केशरास (जर्दास) तांबडा रंग देऊन रंगीत बनवितात व तें असली केशरांत मिश्रित कर-तात. परन्तु ही भेसळीची क्रिया इष्ट नाहीं.



रंगविलेला जर्दा मिसळतात

व्यापारी लोक अशा तऱ्हेनें रंगविलेलें केशर अगर निव्वळ बनावट केशर चुन्याच्या रूपांत असली केशराच्या चुन्यांत मिसळतात. पिवळया केशराचें बनविलेलें तांबडें केशर स्वादानें मधुर--कडवट व उग्र असें असतें. अशा प्रकारें केलेली चुन्याची भेसळ ओळखणेंहि फार कठिण असतें. ह्याकरितां स्वस्त भावाच्या लालसेनें चुन्याचें केशर वापरावयाचें असेल तर तें एखाद्या प्रयोगशाळेंतून नीटपणें पारखून घ्यावें व नंतरच कामांत आणावें.

स्पेन, इराण, काश्मीर

स्पेन, इराण व काश्मीर या तीन देशांतील केशरांमध्यें स्पेन देशांतील केशर सर्व गुणांनीं अधिक श्रेष्ठ आहे. त्याचप्रमाणें स्पेनमध्यें केशराची निपजहि इराण व काश्मिरमध्यें होणाऱ्या केशराच्या निपजीपेक्षां अधिक प्रमाणांत आहे. निपजीबाबद इराणचा दुसरा व काश्मीरचा तिसरा नंबर लागतो. स्पेनच्या केशराचा सुगंध तसेंच गुणकारित्व (प्रभाव) इराणी अगर काश्मिरी केशरापेक्षां अधिक काल टिकूं शकतें. इराणी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अगर काश्मिरी केशराचा रंग व स्वाद हे स्पेनच्या केशरापेक्षां लवकर कमी होतात व त्याचप्रमाणें त्यांचे गुणहि स्पेनच्या केशरापेक्षां लवकर कमी होतात.

ही निंदा नव्हे

हें सांगण्यांत मी इराणी अगर काश्मिरी केशराची निंदा करतो असें नाहीं. आयुर्वेदीय अगर युनानी औषधी-करणांत आदरतापूर्वक स्पेनच्या केशराचा पहिला नंबर, इराणी केशराचा दुसरा नंबर व काश्मिरी केशराचा तिसरा नंबर मानणें कर्तव्य-प्राप्त आहे. काश्मिरी केशर स्वदेशी असल्यानें आपण त्यास विशेष मानतो हें उचित आहे, औषधी कामांत तें उत्तम गुण दाखवितें हेंहि खरें आहे, परन्तु तें ताजें असेंच उपयोगांत आणावें म्हणजे अचूक गुण दर्शवितें. शिवाय काश्मिरी केशराची निपज इतकी विशेष नाहीं कीं जी सर्व भारतवर्षास पुरूं शकेल.

गंध, विडा, मिठाईसाठीं केशर

केशर आपल्या देशांत केवळ औषधी-करणांतच उपयोगांत आणलें जातें असें नाहीं तर तें धार्मिक कार्यांत, गंधांत, विड्यांत, मिठाईंत वगैरे अनेक प्रकारच्या कामांत उपयोगांत आणलें जातें. धार्मिक कार्यांत केशरास विशेष महत्व प्राप्त होण्याचें कारण असें आहे कीं, तें फुलापासून निपजतें व त्यांचा मनोहर सुगंध आणि रंग हे आल्हादकारक असतात.

शैत्यनाशक व उष्णताजनक

केशरांत केवळ आल्हाददायक रंग व सुवासच आहे असें नाहीं तर त्यांत याहिपेक्षां प्रशंसनीय असा शैत्यनाशक व उष्णताजनक औषधी गुणधर्म आहे कीं जो अनेक आयुर्वेदीय तथा युनानी वैद्यक-ग्रंथांतून वर्णिला आहे. केशराचा शैत्यनाशक व उष्णताजनक गुणाचा प्रभाव तें सेवन केल्यानंतर अल्प काळांतच म्हणजे कांहीं मिनिटांतच दिसूं लागतो. व ह्याच त्याच्या अंगच्या गुणप्रभावामुळें त्यास औषधी क्षेत्रांत फार महत्वाचें स्थान प्राप्त झालें आहे.

पवित्र नेपाली कस्तुरी रु. ४४ तोळा,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोळा,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोळा,
लिहाः—नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

नकली केशर बनविणारे कारखाने

परंतु खेदाची गोष्ट अशी आहे कीं, आमच्या देशांत पंजाब प्रांतामध्यें बनावट केशर तयार करणारे कारखाने निघाले असून त्या कारखान्यांत नकली केशर इतकें बेमालूम करण्यांत येतें कीं, खरें व खोटें केशर कोणतें हें वैद्य अगर हकीमांनाहि ओळखतां येणें कठीण होऊन बसलें आहे. व ह्या कारणामुळेंच कांहीं वैद्यांकडून अगर हकीमांकडून त्यांच्या औषधांमध्यें खऱ्या केशराऐवजीं बनावट केशर वापरलें जातें. तुम्हीच स्वतःशीं विचार करा कीं, असलें हें नकली केशर रोग्याच्या पोटांत दिल्यास तें काय फायदा करील? उलटपक्षीं कांहीं अपाय न झाला तर समाधानाचीच गोष्ट समजावयाची. असो.

मला आशा आहे कीं, माझा हा लेख वाचलेला प्रत्येक वैद्य आणि हकीम खऱ्या व खोट्या केशरांतील फरक निश्चित जाणूं शकेल. आणि ह्या हेतूनेंच प्रेरित होऊन मी हा माझा लेख 'आयुर्वेद पत्रिकेस' प्रसिद्धीसाठीं सादर करीत आहे. हेतु हा कीं, नकली केशराचा उपयोग करून कोणीहि वैद्यानें आयुर्वेदाच्या इभ्रतीस धक्का पोहोंचवूं नये.

नकली केशराचें बेमालूम मिश्रण

केशराचे व्यापारी आपणांस सर्वच केशर बनावट देत नाहींत, तर ते असली व बनावट केशरांचें मिश्रण करून आपणास देत असतात. पाहणारास त्यांत बनावट केशर मिश्र केलें आहे ह्याची कल्पनासुद्धां येऊं शकत नाहीं. प्रायः गिऱ्हाईक अगर वैद्य-लोक नांवाजलेल्या कंपनीच्या लेबलावर व ट्रेडमार्कवर विश्वास ठेवूनच केशराची खरेदी करतात, स्वतःच्या चिकित्साबुद्धीचा क्वचितच उपयोग करतात.

ही व्यापाऱ्यांची आदिनीति आहे

आणि ही तर व्यापाऱ्यांची आदि-नीतिच आहे कीं, प्रथम प्रथम चांगला व शुद्ध माल गिऱ्हाईकांस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देऊन विश्वास उत्पन्न करावयाचा व नंतर प्रथितयश झाल्यावर हळूंहळूं बनावट मालाची भेसळ करून नफेबाजी करावयाची. सर्वच व्यापारी अगर कंपन्या असें करतात असें नाहीं. परंतु वैद्यानें प्रत्येक वेळीं केशर खरेदी करतांना तें नीट पाहून तावून सुला-खून घेणें हें उचित आहे. व असल्या परीक्षापूर्वक खरेदी केलेल्या केशरापासूनच खरेखुरे औषधी गुणधर्म मिळूं शकतात व रोग्यास तद्युक्त दिलेल्या औषधा-पासून अचूक गुणप्राप्ति होते. अशा करण्यानें वैद्य स्वतः च्या व त्याजबरोबर आयुर्वेदाच्या उज्वल कीर्तींत भर घालीत असतो.

असली केशराची पारख करण्याकरितां आवश्यक अशा कांहीं गोष्टी खालीं देत आहे, त्या मननपूर्वक वाचून लक्षांत ठेविल्यास हितप्रद होतील.

खऱ्या केशराच्या ८ परीक्षा

(१) पाण्यांत टाकिलें असतां खरें केशर पाण्या-वर तरंगतें, पाण्यांत बुडत नाहीं.

(२) खऱ्या केशराचा स्वाद घेतला असतां तो थोडासा कडवट असा लागतो.

(३) खरें केशर अम्लांत (ॲसिडांत) टाकलें असतां त्यांचा मूळ रंग बदलत नाहीं.

(४) खऱ्या केशराच्या मुख्य तंतूच्या बुडाकडील पिवळ्या भागांतून ३।३, ४।४ तंतु-पत्तींचा एकत्रित झुबका येत असतो.

(५) प्रत्येक केशर पत्तीच्या माथ्याकडील भागा-वर करवतीप्रमाणें दांते असतात.

खऱ्या केशराची मुख्य परीक्षा

(६) लहानांत लहान केशर--पत्तींतहि आंतील भागांत पोकळी असते. विशेष सुकल्यामुळें व केशर--पत्ती मुडपल्यामुळें सहजासहजीं ही पोकळी डोळ्यांस दिसून येत नाहीं. परंतु जर बारकाईनें व लक्षपूर्वक पाहिलें तर ही केशर--पत्तींतील पोकळी दिसूं शकते.

(७) केशर-पत्तीच्या माथ्यावर करवतीप्रमाणें असलेल्या दांत्यांच्या कडेवर गर्द पिवळा रंग नसून तांबूस छटा मात्र असते.

(८) केशर -- पत्तींतील पोकळीचें मुख पत्तीवर करवतीप्रमाणें असलेल्या दांत्याकडून पाहिलें असतां दिसूं शकतें, व हें मुख आकारानें गोल असतें.

नकली केशराच्या ८ परीक्षा

(१) नकली केशर पाण्यांत टाकलें असतां बुडतें.

(२) खोटें केशर अम्लांत (ॲसिडांत) टाकलें असतां त्याचा रंग जांभळा होतो.

(३) बुडाकडून झुबकेदार येत नाहीं. परंतु एका नकली केशरांचा प्रकार असाहि आहे कीं, जो बुडा-कडून ३।३ पत्तींच्या झुबक्यानें मिळूं शकतो. परंतु त्यास असली केशरांतील कसोटी नंबर १।३।५।६।७।८ ह्या लाविल्या असतां त्याचा नकलीपणा सिद्ध होतो.

(४) नकली केशर मशीनमधून कांपलें जातें व म्हणून त्याची वरची कडा एकसारखी कांपलेली दिसते.

(५) नकली केशराची वरची कडा खऱ्या केशराप्रमाणें करवतीसारखी दांत्याप्रमाणें दिसत नाहीं, व त्याच्या मुखावर पिवळी छयाहि दिसत नाहीं.

(६) नकली केशर मशीनमधून कापून काढल्या-कारणानें तें बोरूच्या लेखणीप्रमाणें टोंकास तिरपें अगर सरळ कापलें जातें.

(७) नकली केशराच्या पत्तींत खऱ्या केशरा-प्रमाणें पोकळी असत नाहीं.

(८) नकली केशराच्या पत्तींच्या मुखावर गोला-कार आकृति असत नाहीं.

या नकली केशरास* केशराचे व्यापारी 'घास' या नांवानें संबोधितात व त्याचप्रमाणें तीन-पत्ती नकली केशरास 'तीन--पत्ती' या नांवानें संबोधितात.

हा लेख माझ्या जीवनांतील पहिलेंच लिखाण असून तो मी आपल्या सेवेस सादर करीत आहे. मला आशा आहे कीं, तो आपणास मनोवेधक तसाच उद्बो-धकहि होऊन पसंत पडेल.

[*नकली केशराचे अनेक प्रकार मिळतात. कांहीं लांकडापासून तर कांहीं कागदापासून करतात. व तें ५ ते २० रुपये रत्तल या भावानें विकत मिळतें असें कळतें. पानपट्टीच्या विड्यांत हें घालतात. -संपादक]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वांचकांचा पत्रव्यवहार

संतति नियमनाकरितां औषध

"आयुर्वेदामध्यें संततिनियमनाकरितां औषध आहे काय ? विचारण्याचें कारण म्हणजे हल्लीं हीं चळवळ फार चालू आहे. हीं साधनें विकत घेण्यासाठीं हजारों रुपये आज परदेशीं जात आहेत. अशा वेळीं आपल्या वैद्यांनीं जर असें कांहीं औषध शोधून काढलें तर हा पैशाचा ओघ थोडातरी थांबवतां येईल असें वाटतें.

साधनें वापरणें जमत नाहीं

दुसरें, लोक इतके अज्ञानी आहेत कीं साधनें वापरणें हें त्यांना जमत नाहीं, किंबहुना तें आपल्याला जमणार नाहीं असें, केवळ अशिक्षितच नव्हे तर चांगल्या सुशिक्षित लोकांनासुद्धां वाटतें. ती कल्पना त्यांना पटत नाहीं. परन्तु पोटांत औषध घेतां येण्याजोगें असेल तर ह्याला आज फार मोठ्या प्रमाणांत मागणी आहे.

सरकारचें इकडे लक्ष आहे

आपल्या मासिकांतून अशीं कांहीं औषधें जर प्रसिद्ध होऊं शकलीं तर कित्येक वैद्य-डॉक्टर तीं उपयोगांत आणून परदेशीं जो पैसा जातो त्याचा ओघ थोडा तरी थांबवूं शकतील असें वाटतें. ह्या प्रश्नाकडे आज सरकारचेंहि लक्ष आहे. असलें औषध निघालें तर सरकारी मान्यताहि कदाचित् आज उद्यां मिळेल. तर केवढें तरी क्षेत्र ह्यासाठीं खुलें होईल.

प्रमाण दिलेलें नाहीं

"चिकित्साप्रभाकर" किंवा "योगरत्नाकर" ह्या पुस्तकांत कांहीं पाठ दिले आहेत, पण त्यांत दोष असा आहे कीं प्रमाण मुळींच लिहिलेलें नाहीं. नुसतें समभाग घ्यावें, पण औषध किती दिलें पाहिजे ह्याचा खुलासा नाहीं. आणि एकदा औषध घेतल्यावर त्याचा परिणाम किती दिवस टिकतो? तीं औषधें कांहीं ठराविक वर्षें घ्यावयाचीं, कीं कायम दर महिन्याला घेत राहायचें ह्याचा कांहींच खुलासा नाहीं. तसेंच तीं अनुभविक आहेत किंवा नाहींत ह्याचा कांहींच खुलासा तेथें केलेला नाहीं.

अनुभविक औषधें सुचवावीत

अेका वैद्यराजांनीं तागाचें बीं गुळांतून पाव तोळा दर दिवशीं असें ३ दिवसांत द्यावयास सांगितलें आहे. ३ महिनेपर्यंत दिलें तर १ वर्ष त्याचा परिणाम टिकतो असें त्यांचें म्हणणें आहे. हा उपाय चांगला आहे काय? अितर कांहीं अनुभविक औषधें असतील तर तीं कळवावींत." -एक डॉक्टर वर्गणीदार

मुंबई सरकारचें अभिनंदन

अकोला वैद्यमंडळाची सभा ता. १८।१०।५३ रोजीं भिषगाचार्य हरिशास्त्री पराडकर वैद्य अकोला यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. त्यावेळीं श्री. रा. वेणीमाधवशास्त्री जोशी, आयुर्वेदाचार्य, यांची नेमणूक नागपूर विश्वविद्यालयानें आयुर्वेदसंशोधक म्हणून केली याबद्दल त्यांचें अभिनंदन व सत्कार करण्यांत आला.

त्याचवेळीं आयुर्वेदाचे उन्नतीकरितां मुंबई सरकारनें जो शुद्ध आयुर्वेदीय अभ्यासक्रम ठरविण्याचें योजलें त्याबद्दल मुंबई सरकारचें अभिनंदन करण्यांत आलें व तसा ठरावहि त्या सभेंत मंजूर झाला.

तो ठराव मुंबई सरकारकडे पाठविला आहे.

सेक्रेटरी-आकोला वैद्यमंडळ

कल्याणी कॉंग्रेसमधील प्रदर्शनांत आयुर्वेद विभाग

जानेवारी १९५४ मध्यें कल्याणी (कलकत्त्याजवळ) येथें राष्ट्रीय महासभेचें अधिवेशन भरणार आहे. त्या सोबत भरणाऱ्या प्रदर्शनांत आयुर्वेद विभाग ठेवण्याचें निश्चित झालें आहे. त्यासाठीं आयुर्वेदाचें वैशिष्टय व श्रेष्ठतासूचक अशा गोष्टी एकत्रित करणें अवश्य झालें आहे. तरी पत्रिकेच्या वाचकवर्गास विनंति आहे कीं आपण प्रदर्शनासाठीं एखादी गोष्ट पाठवूं शकत असाल तर तत्संबंधीं पत्रव्यवहार पुढील पत्यावर करावा. विशेष वस्तूंचे नमुने, आलेख, मॉडेलें आकडे वगैरे गोष्टी यासाठीं उपयुक्त होतील.

पत्रव्यवहाराचा पत्ताः- श्री. रघुनाथ माइति, मंत्री आयुर्वेद सेवक संघ, डाकघर- कॉंथी जि. मिदनापूर पश्चिम बंगाल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

.... अष्टधातूंचा औषधींत समावेश ....

(लेखकः—वैद्य पु. वि. धामणकर, धूतपापेश्वर-पनवेल)

सर्व प्राणिमात्रांच्या जीविताचें साफल्य मोक्ष-प्राप्तींत* आहे. आणि तो मोक्ष अध्यात्मज्ञानानें लाभतो.† ह्या ज्ञानाच्या अभ्यासास निरोगी सुदृढ व दीर्घायु शरीराची आवश्यकता‡ असते.

ब्रह्मोपासनेस युक्त काल

बालपणीं शरीर कोवळें असतें. तेव्हां मनाची वाढ व बुद्धीचा विकास पुरेसा झालेला नसतो. ज्ञानाचा सांठा फारच अल्प असतो. तोहि पुन: अपरिपक्व असा. तारुण्यांत शरीर रसरशीत असतें, मन मुसमुसत असतें, पण विषयासक्ति विलक्षण. वृद्धापकालीं शरीर जीर्ण व मन विशीर्ण झालेलें असतें. ज्ञानसंग्रह असतो पण तो चिंताग्रस्त मनामुळें निकामी ठरतो. असें विकल शरीर अगर मन, कैवल्य-प्राप्तीच प्रयत्नांत टिकाव धरित नाहीं. उपासनाच घडत नाहीं, तर लाभ कसचा होणार! त्यामुळें आयु-ष्याच्या ह्या तिन्ही अवस्थांत परमार्थ-साधन जमत नाहीं. राहतां राहिला स्थावीर्याचा काल. प्रपंचाची ओढ फारशी नसेल तर ह्या वयांत मोक्षप्राप्तीचा प्रयत्न थोडाबहुत होऊं शकतो. कारण जीवनांतलें नाविन्य बहुतेक संपलेलें असतें. स्वतः अगर आश्रितांबद्दल विवेक होऊं लागलेला असतो. विषयाकडची धांव ओसंडून मन स्थिरावत चाललेलें असतें. शरीराहि कार्यक्षम असल्यानें हा काल ब्रह्मोपासनेस युक्त ठरतो.

नैसर्गिक राहणीवर भर

देहाचें स्वास्थ्य बिघडूं न देणें व त्यांतूनहि तें बिघडलेंच तर पुनः त्याचा लाभ करून देण्याबाबत मनुस्मृतींत आदेश व आयुर्वेदांतहि असे धडे दिलेले आहेत. पण मनुस्मृतींत रोगप्रतिबंधन व रोगप्रतिकार ह्यांबाबत नैसर्गिक राहणी व आहारविहारांत फरक ह्यांवर विशेष भर दिला गेला आहे, तर आयुर्वेदानें ह्याच जोडींत द्रव्य-चिकित्सेचीहि भर घातली आहे.

काल परिवर्तनशील आहे

निसर्ग निश्चित आहे.तो नियमानें बांधलेला आहे. पण काल परिवर्तनशील आहे. त्यामुळें निसर्गनियम कसोशीनें पाळूनहि कालपरिणामानें स्वास्थ्य बिघड-ण्याचा संभव उद्भवतो. अशा वेळीं "आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः।" हें सूत्र मानावें लागतें.

रसायन-चिकित्सेचा उद्देश

सर्वसामान्य जीवन जगण्यास लागणारें तन, मन सुस्थितींत राखण्यास आयुर्वेद साहाय्य तर करतोच, पण जीर्ण शरीर अथवा विशीर्ण मन पुनः तार्जे-तवानें अथवा तरुण करण्यासहि आयुर्वेद हात देतो. ह्या चिकित्सेला रसायनचिकित्सा म्हणतात. रसायन शब्दाच्या व्याख्याः—

"लाभोपायो हि शस्तानां रसादीनां रसायनम्।
च. चि. अ. १ पा. १।८

रसायनं तु तज्ज्ञेयं यज्जराव्याधिनाशनम्। भा.प्र.

रसायनतन्त्रं नाम वयस्थापनमायुर्मेधाबलकरं रोगापहरणसमर्थं च। सुश्रुत सू. अ. १।७"

निरनिराळ्या ग्रंथकारांनीं अशा दिल्या आहेत. पण त्या सर्वांचा भावार्थ एकच आहे.

रसायन सेवनाचें फल

अशा तऱ्हेचा रसायन-कल्प घेतल्यानें तन व मनादि ज्ञिनेंद्रियें उत्तम बलवान् होतात. स्मृति व

---

* एतद्धि जन्मसाफल्यं ब्राह्मणस्य विशेषतः।
प्राप्यै तत्कृतकृत्यो हि द्विजो भवति नान्यथा।
मनु स्मृति १२।९३.

† सर्वेषामपि चैतेषामात्मज्ञानं परं स्मृतम्।
तद् हि अग्र्यं सर्वविद्यानां प्राप्यते ह्यमृतं ततः॥
म. स्मृ. १२।८५

‡ मुक्तौ सा च ज्ञानात्तच्चाभ्यासात्स च स्थिरे देहे।
र. हृदय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बुद्धि तरतरीत होतात. प्रभा आणि कांति ह्यांचें तेज वाढतें. वर्ण व. स्वर ह्यांत प्रसन्नता येते. औदार्य आणि विनयशीलता अंगीं बाणतात. तसेंच वाक्सिद्धि, आरोग्य आणि दीर्घायु ह्यांचा चिरंतन लाभ § होतो. विधिपूर्वक रसायन सेवन केल्यानन्तर त्याला रोग होत नाहीं, तो दुर्बल होत नाहीं, त्याला म्हातारपण येत नाहीं, मरणसुद्धां त्याच्या वाटेस जाऊं शकत नाहीं. तो हजार वर्षे जगूं ‖ शकतो. तो ह्याच जन्मीं, ह्याच भूतलावर प्रदीर्घकाल आयुरारोग्यसंपन्न स्थितींत जगतो व भोग भोगतो. इतकेंच नव्हे तर देवदेवता व ऋषिमुनींनीं प्राप्त करून घेतलेली परम गति जी जीवन्मुक्ति तीहि ह्याला मिळते. तो अक्षरब्रह्मस्वरूपीं विलीन होतो व मोक्षपदीं स्थिर ‡ होतो. देवांना अमर करणारें जसें अमृत अथवा नागांना चिरंतन करणारी जशी सुधा त्याप्रमाणें हा रसायनकल्प पृथ्वीतलावरील ऋषिमहर्षींना तारक ¶ आहे.

खनिजांचें आकर्षण

निसर्गनियमांचें परिपूर्ण परिपालन व सामान्य अथवा विशेष आहारविहारांचें यथाविधि सेवन करूनहि आयुरारोग्य हीं प्रदीर्घ व निर्वेध मिळूं शकत नाहींत हें लक्षांत आल्यावर दृढदेही अशा वृक्षांच्या जीवनाचा अभ्यास बहुधा त्यांनीं केला असावा. संशोधनांतीं त्यांच्या जीवन रहस्याचा उलगडा झाल्यावर नैसर्गिक राहणीबरोबरच खनिज संपदेचें सेवन हेंहि आवश्यक आहे, किंबहुना देहदार्ढ्य हें त्यांनीच लाभतें, हें त्यांना पटलें असावें. आणि म्हणूनच खनिजांपैकीं अधिकांत अधिक स्थिर असे जे अष्टधातु ह्यांचें सेवन करण्याची कल्पना निश्चित केली असावी.

§ दीर्घमायुः स्मृतिं मेधां आरोग्यं तरुणं वयः ।
प्रभावर्णस्वरौदार्यं देहेंद्रियबलं परम् ॥
वाक्सिद्धिं प्रणतिं कांतिं लभते ना रसायनात् ।
च. चि.

‖ न जरां न च दौर्बल्यं नातुर्यं निधनं न च ।
जग्मुर्वर्षसहस्राणि रसायनपराः पुरा ॥ च. चि.

‡ न केवलं दीर्घमिहायुरश्नुते
रसायनं यो विधिवन्निषेवते ॥
गतिं स देवर्षि निषेवितां शुभाम् ।
प्रपद्यते ब्रह्म तथेति चाक्षरम् ॥ च. चि.

¶ यथाऽमराणाममृतं यथा भोगवतां सुधा ।
तथाऽभवन्महर्षीणां रसायनविधिः पुरा । च. चि.

प्रयोगांचें स्वरूप

विशिष्ट उद्दिष्ट सिद्धीकरितां विविक्षित दिशेनें वा पद्धतीनें प्रयत्न अथवा प्रयोग केले जातात, त्यालाच संशोधन म्हणतात. प्राचीनकालीन संशोधन-पद्धतींची माहिती अद्याप कोठें उपलब्ध झाल्याचें ऐकिवांत नाहीं. पण प्रचलित पद्धतीवरून त्यांचेकडे दृष्टिक्षेप केल्यास त्यांचें कार्याची कल्पना करतां येण्यास हरकत नाहीं.

उद्भिज्जांमार्फत मिळणारीं खनिजें

वडाचा चीक ....वंग
आवळा, जांभूळ, कवठ......लोह
चुका, घोळ ....ताम्र
जंबूनामक वनस्पति.........सुवर्ण

आफ्रिकेंतहि अशी एक वनस्पति आहे. तिचें पानांत सुवर्ण सांपडतें, असें मागें उद्यम मासिकांत प्रसिद्ध झालें होतें.

ह्याबाबत अद्याप रासायनिक विश्लेषणात्मक परीक्षण बरेचसें व्हावयाचें आहे. पण झालेल कार्य, ग्रंथसंदर्भ आणि रुग्णवैज्ञानिक अनुभव ह्यावरून ही यादी तयार केली आहे.

प्राणिजांमार्फत मिळणारीं खनिजें

शेळी – सुधा	कोंबडी-सुधा
गंडूपद – ताम्र	ससा – लोह
मोरपंख – ताम्र	

विशिष्ट परिपोषणक्रम

खनिजांस	प्राणिज	खनिजांस	उद्भिज्ज
अभ्रक	– बोकडाचें रक्त	लोह	– त्रिफला
मंडूर	– गोमूत्र	ताम्र	– पुनर्नवा
लोह	– सशाचें रक्त	ताम्र	– चुका

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जास प्राणिज	खनिजास प्राणिज
क – गाईचें दूध	ताम्र – तिळवण
– शेळीचें दूध	वंग – वडाचा चीक
– यकृत्	नाग – अफू
क – हृदय	अभ्रक – वटक्षीर
	लोह – कोरफड

भिज्जास प्राणिज	प्राणिजांस उद्भिज्ज
णी – घूस	गाय – शतावरी
गड – मासे	म्हैस – सरकी
त्र –आर्तव	शेळी– विवाक्षित वनस्पति

सुवर्णादि धातूंचा उत्क्रम

सुरवातीला सोन्याचा परिचय झाला. त्याचे वावरून त्याला लोह संज्ञा दिली. पुढें लाल ं तांबें सांपडलें त्यालाहि हीच संज्ञा दिली. अशा सुवर्णाच्या स्वाभाविक गुणाचे अन्य धातु डले. त्यांनाहि लोहच नांव पडलें. पण सामान्यानें याचा बोध होईना. तेव्हां तद्विशिष्ट गुणांवरून या धातूला विशिष्ट नांव देण्यांत आलें. कांहीं त्यांचे उपयोगांवरूनहि दिलीं. उदा:—

न अर्वाचीन संस्कृत– मराठी	प्राचीन आर्वाचीन संस्कृत– मराठी
लोह – ताम्र– तांबे	चंद्रलोह– रौप्य– रुपें
,, –पित्तल– पितळ	त्रपु ,,– वंग – कथलि
,, – तीक्ष्ण– तिखें [वज्र]	वस ,,– रस – पारा
,, – मुंड -- मुंड	रुक्म,,– सुवर्ण-- सोनें
,, – नाग – शिसें	वन्हि,,– कांस्य-- कांसें
,,–तीक्ष्ण–तिखें(भंगूर)	शस्त्र,,– तीक्ष्ण- पोलाद
,, – जसद– जस्त	स्वयमाग्निलोह कडार-बीड

सांकेतिक संज्ञा

लोह– सोनें, रुपे इ.। मिश्रलोह–कांसें, पितळ इ.
रणलोह– तांबे, पोलाद
लोह- माक्षिक, मोरचूद इ.। पूतिलोह- नाग, वंग, जस्त [रसार्णव]

लोहांची संख्या वाढत गेली तशा तशा त्यांच्या संख्यावाचक संज्ञाहि बदलत गेल्या. त्या संक्षेपानें योजणें सोयीचें असल्यानें त्यांचा कांहीं कांहीं ठिकाणीं उपयोग केलेला आढळतो. त्या संज्ञा अशा:-

लोह =सुवर्ण
द्विलोह = ,, रौप्य
त्रिलोह = ,, ,, ताम्र
चतुर्लोह = ,, ,, ,, लोह
पंचलोह = ,, ,, ,, ,, नाग
षड्लोह = ,, ,, ,, ,, ,, वंग
सप्तलोह = ,, ,, ,, ,, ,, ,, जसद
अष्टलोह = ,, ,, ,, ,, ,, ,, ,, पारद

कांहीं ठिकाणीं त्रिलोह–संज्ञेनें मुंड, कांत, तीक्ष्ण व त्रिवंग म्हणजे नाग, वंग, जसद घेतात.

अग्रपूजेचा मान चरकमहर्षींना

खनिजांचा शोध व ती मिळविण्याचे मार्ग उपलब्ध झाल्यानंतर तीं प्राणीशरीरांत देण्याचे प्रयोग सुरू झाले असावेत. आणि ह्यांत अग्रपूजेचा मान श्रीमच्चरकमहर्षींना, तर अग्र्यमान श्रीमान् नागार्जुनांना असें दृश्य दिसतें खरें. आतां आपण ह्यांचे दरम्यानचे काळांतील प्रगतीकडे पाहूं.

अग्निवेशसंहिता केव्हां लिहिली गेली, हें अद्याप निश्चित सांगतां येत नाहीं. पण कालगणकांचें मतें, अग्निवेशसंहितेचा प्रतिसंस्कर्ता श्रीचरक हा मात्र इ. स. पूर्वी २००० वर्षें होऊन गेला असें ठरतें. आज अग्निवेशसंहिता उपलब्ध आहे. ती चरकानें प्रति संस्कृत केलेली अशी. तींत लोहादि धातूंचे उपयोग सामान्य अवस्थांतलेच आढळतात. ह्यावरून लोहांची उपयोग-प्रथा प्रथम चरकानें सुरू केली, असें म्हटल्यास वावगें होईलसें दिसत नाहीं.

लोहविशिष्ट संज्ञांचे अर्थ

किट्टम् – केटति इति । त्रास करितो जो तो.
मलः- मलयति इति ! धारण करणारा जो तो.
मंडूरम् – मंडते इति । दीप्तिमत् अथवा शोभायमान करितें जे तें.
रजः– रंजयति इति ।
गंजा – गंजति गंजन्त्यस्याम् इति वा। शब्द

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करते किंवा °कलकल शब्द करितात जिचें ठायीं. क्षार (विग्रहकोश)

लोहकिट्टम् – मंडूर, लोखंडाचें कीट्ट
लोहमल – लोखंडाचें कीत
लोहचूर्णम् – मंडूर, लोखंडाचें चूर्ण- भुकी
लोहनिर्यास – किट्ट
लोह विश् – लोखंडाचें कीत (शब्दरत्नाकर)

१) लोहपत्र – अग्नीवर भात्यानें फुंकून लाल करून ऐरणीवर घणानें ठोकून पातळ करकरून तयार केलेले तीळ, माशाचे पंख, पोहा अगर मांड्यासारखे पातळ व लहान तुकडे.

पत्राणि । चतुरंगुलदीर्घाणि तिलोत्सेधसमानि च ।
ज्ञात्वा तान्यंजनाभानि सूक्ष्मचूर्णानि कारयेत् । च.चि.
तनूनि तीक्ष्णलोहस्य पत्राणि । –लोहारिष्ट (सुश्रुत)
तनूनि सूक्ष्मपत्राणि तिलोत्सेधसमानि च ।
– रसायनारिष्ट (च. द.)

२) लोहकिट्ट– पत्रे कुटून केलेलें चूर्ण
(ध्मायमानमयो वन्हौ परित्यजति यन्मलम् ।
लभते किट्टसंज्ञां हि तदनेकविधं मतम् । आ. प्र.)
किट्टम्-स्याल्लोहकिट्टं च तुलाप्रमाणम् । लोहासव (ग.नि.)
लोहकिट्टम् । मंडूरवटक (र. दी.)
मलः– अयोमलः । -ताप्यादिलोह (च. चि.)

३) लोहतंतु–चाकावर घांसून काढलेला कीस अगर ठोकून ओढून काढलेली तार.

४) लोहरज–कानशीनें घांसून तयार केलेली भुकणी.
रजः-अयोरजः स्यात्पलयुग्ममानम् । लोहासव(ग.नि.)
लोहचूर्णं त्रिकटुकम् । -लोहासव (शा.)
लोहरजो गिरिजारजः ।-कस्तूरीरस (र.यो.सा.)
अयोरजः । –नवायसचूर्ण (च. चि.)
अयोरजः । –लौहादिरसायन (च. चि.)
लोहस्य रजः । –योगराज (च. चि.)
लोहस्य रजः । –ताप्यादिलोह (च. चि.)

५) लोहगंज–१लोखंड पाण्यांत बुडवून ठेवून कषाय-द्रव्यांचे साहाय्यानें तयार झालेलें लोहाचें तांबडें चूर्ण २) भूपृष्ठावर हवा, पाणी, ऊन, व भूसंसर्ग ह्यांचे साहाय्यानें तयार झालेलें लोहाचें तांबडें चूर्ण.

६) मंडूर–भूगर्भांतील रासायनिक परिभवनानें तयार झालेलें लोहाचें ढाल चूर्ण. हें मृदु, सूक्ष्म व ल[...] असतें.

मंडूरं द्विगुणम् । मंडूरवटक च. चि.
पुनर्नवामंडूर– च. चि.
मंडूरस्य च शुद्धस्य तुलार्धम् । ग. नि.
मंडूरं चांजनानिभम् । • अष्टांगहृदय

७) लोहभस्म–वनस्पती, गंधक, क्षार अगर पारदा[...] साहाय्यानें लोहाचा तयार केलेला संयुक्त कल्प[...]

मंडूरं पुराणं लोहकिट्टम् ।

रज, मल, पत्र, मंडूर ह्या संज्ञा चरकानें वापरल्य[ा] आहेत. संज्ञा भिन्न दिसतात. पण त्या एकाच पद[ा]र्थाच्या बोधक आहेत. त्यामुळें ते पर्याय शब्द ठरतात[.] कारण लोहाचें चूर्ण करण्याची प्रक्रिया चरकानें एक[च] दिली आहे. चक्रदत्तानें "मंडूरं पुराणं लोहकिट्टम्" (च. पांडु चि. ।) असा किट्ट व मंडूर या मधला फर[क] दाखविला आहे. त्याचप्रमाणें आजचें विज्ञान ज[मे] धरून त्या सातहि संज्ञांचे अर्थ निश्चित करणें काल[-]क्रमानें प्राप्त झालें आहे. आणि तसें झालें तर व्यवह[ार] फार सुकर होईलसें वाटतें.

वैज्ञानिक दृष्टिकोनांतून ५ वर्ग

वरील सात प्रकारांचे, स्थूल मानानें पांच [वर्ग] पडतात. उदाः— १) रज, तंतु, कीस, २) प[त्र,] किट्ट, मल, ३) गंज, ४) मंडूर ५) भस्म.

१) हा पदार्थ तयार करतांना त्याला फ[क्त] घर्षण संस्कार व तज्जन्य अग्निसंयोग होतो व लोहा[चें] स्थूलत्व जाऊन त्याला सूक्ष्मत्व येतें. म्हणजे फ[क्त] आकारमानांत बदल होतो एवढाच काय तो फरक.

२) हें स्वरूप देण्यास अग्नितपन, आघात [व] द्रवनिर्वापण हे तीन संस्कार करावे लागतात. पहिल[्या] प्रकारापेक्षां ह्यांत अग्निसंस्कार बऱ्याच मोठया प्रमा[]णांत होतो. त्यामुळें प्राणवायु जारणा (ऑक्सडायझेशन[)] होते. व ह्याचा रंग काळा असतो. त्यावरून ह्या[...]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[Black oxide of Iron] म्हणतां येईलसें वाटतें. गुणांच्या दृष्ठीनें विचार करतां अग्निगुण भूयिष्ठ अथवा आग्नेय स्वरूपाचें व तत्तद् व विशिष्ट गुणांचें हें द्रव्य तयार होतें.

३) ह्यांतील पहिला प्रकार आपगुणभूयिष्ठ अथवा आप्यगुणात्मक तर दुसरा हवा, पाणी, अग्नि, भू ह्यांच्या संसर्गानें होत असल्यानें तद्गुणात्मक पदार्थ तयार होतो, तरीहि तो आप्यच. मात्र ह्याला अग्नि-संस्कार स्वतंत्रपणें पुनः केला तर तो आग्नेय होईल. ह्याचा रंग लाल असतो व ह्यांत प्राणवायुपूरणहि झालेलें असतें. तेव्हां ह्याला Red oxide of iron म्हणण्यास हरकत पडूं नयेसें वाटतें.

४) भूगर्भांतील राप्तायनिक परिभवनानें लोह निर्माण होतें. पण तें एकाकी वा अच्छ असत नाहीं. तसें करण्यास त्याला भट्टी दाखवावी लागते. तदनंतर त्याला अच्छ स्वरूप प्राप्त होतें. हें ह्याच स्वरूपांत सेवन करतां येत नाहीं; त्याचें जारण करावें लागतें. त्याला जीर्णलोह अथवा भस्म म्हणतां येईल.

मंडुरास गंजापेक्षां अधिक काल

मंडूर तयार होण्यास गंजापेक्षां अधिक काल लागतो. "मंडूर पुराणं लोहकिट्टम्।" चक्रदत्त. कारण ह्या लोहावर भूगर्भांतील उष्णता, पाणी आणि अनेक वायू ह्यांचें संस्करण वातावरणापेक्षां अधिक दाबाखालीं होतें, व तेथें त्याला प्राणवायूचा पुरवठा भूपृष्ठाचे मानानें कमी होतो. भूपृष्ठ आणि भूगर्भ ह्यांतील फरक लक्षांत घेतां मंडूर हा पदार्थ शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, मलावष्टंभन, रक्तवर्धन इ. बाबतींत गंजाहून अन्य तऱ्हेचा संभवत असल्यानें गंजावरील संस्करणें मंडूराबाबत करणें आवश्यक पडत नाहींत. गंज शरी-रांत शूलरूप होऊं नये म्हणून त्यावर विविध संस्कार करावे लागतात. तर मंडूर बेहड्याचे अग्नीवर तापवून गोमूत्र अगर त्रिफळ्याचे काढ्यांत सातवेळ बुझाविला अगर त्या पदार्थांच्या त्यास सात भावना दिल्या कीं सेवनार्ह ठरतो ह्याचा अर्थच असा कीं त्याचें जारण भूमींगतच झालेलें असतें. आधुनिक विज्ञान दृष्ट्या ह्याला Red oxide of Iron असें म्हणतां येऊन ह्याचें सांकेतिक चिन्ह [Fe_2O_3] असें रहावेसें वाटतें.

मंडुराच्या ३ प्रति

लोहाचा मंडूर तयार होण्यास लागणारा काल, लोहाची जात, त्याचें स्थूलत्व वा सूक्ष्मत्व, जमिनीची प्रत व लोह ठेवण्याच्या स्थानाची खोली इ. वर अव-लंबून राहील. लोह जसजसें जीर्ण होत जाईल तसतशा त्याला हीन, मध्यम, उत्तम अवस्था लाभत जातील. ही गोष्ट लक्षांत घेऊनच—

"शतोर्ध्वमुत्तमं किट्टं मध्यं चाशीतिवर्षकम्।
अधमं षष्टिवर्षीयं ततो हीनं विषोपमम्॥" आ. प्र.

ही व्याख्या रचली गेली असावी. लोह पुरून ठेवण्यांत तें भूगर्भांत बत्ताशाप्रमाणें फुलावें, असा हेतु असतो. तो साध्य होण्यास कालावधिहि बराच लागतो. ही कालगणना ऐतिहासिक पुरावे व भौतिक आणि रासायनिक परीक्षणें ह्यांवरून करतां येणें शक्य असली तरी तीपेक्षां लोहाचें रूपांतराला अधिक महत्व असल्यानें अपेक्षित स्वरूप प्राप्त झालें असल्यास काल-गणनेचा प्रश्न गौण ठरून तो विषय विवाद्यहि होऊं शकणार नाहीं.

उत्तम मंडूराचें लक्षण

श्री. चरकाचार्यांनीं सांगितेलल्या विधीनें केलेलें लोहाचें चूर्ण काळ्या रंगाचें होतें हें त्यांनाहि ज्ञात होतें. त्यालाच त्यांनीं मंडूर म्हटलें आहे. वाग्भ-टानें तर "मंडूरं चांजननिभम्" असा स्पष्टच उल्लेख केला आहे. पण 'मंडूरं पुराणं लोहकिट्टम्।' चक्रदत्त. 'श्लक्ष्णं चूर्णं च मंडूरम्।' र. र. 'मंडूरोऽयं समाख्यातश्चूर्ण श्लक्ष्णं नियोजयेत्।' र.र.स. तसेंच लोह-किट्टं तु संतप्तं यावज्जीर्णंति तत्स्वयम्। तच्चूर्णं जायते पेय्यं मंडूरोऽयं प्रयोजयेत्। र र.स. ह्या वाक्यांवरून चरक, सुश्रुत, वाग्भट व इतर ग्रंथकार ह्यांचें मंडूर निरनिराळे असावेत असें वाटतें. आणि मंडूराचा काल-परिणाम लक्षांत घेतला तर तो शब्द, रस आणि गंध रहित असावा. त्याचा स्पर्श ठिसूळ, मऊ, गुळ-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुंळीत, त्याचा रंग लाल, त्यांचें रूप फुगीर व रूक्ष व तो वजनानें हलका असावा. तसेंच तो त्रिफळा-कषाय-संसर्गानें काळा व लिंबूरसानें हिरवा पडूं नये आणि पाण्यांत सहजीं विरला पाहिजे.

उत्तम मंडूर व कांतलोह

उत्तम मंडूर अधिक काल तशाच स्थितींत राहिला तर त्याचें पचन होत होत तो पुनः संहत होत जाऊन त्याला कांतलोहाचें स्वरूप येण्याची शक्यता संभवेल असेंहि वाटतें. कारण अच्छ लोहा-पासून मंडूर तयार होतो. आणि कांतलोहहि जवळ जवळ अच्छच पण संहत असतो. लोह खनिजापेक्षां कांतलोह पुष्कळच निर्मळ असतो. ह्यावरून असें वाटतें कीं, मंडूर व कांतलोह ही अच्छ लोहाचीं अंतिम व प्रारंभिक स्वरूपें म्हणतां येतील.

(५) भस्मः- हेंहि एक लोहाचें जीर्ण स्वरूप आहे. पण वनस्पतींचे रस, त्यांचे क्षार अथवा नव-सागर, सोरा ह्यांच्यासारखे खनिज क्षार, गंधक किंवा हरताल, मनशीळ आणि पारद ह्यांचें सहाय्यानें जीवनीय असा तयार केलेला तो एक संयुक्त कल्प आहे.

विविध संप्रदाय

१ लौहादिरसायनः- पोलादाचे (तीक्ष्णलोहाचे) चार अंगुळें लांब व तिळाएवढ्या जाडीचे तुकडे करून ते तापवून लाल करावेत आणि अनुक्रमें त्रिफळ्याचा काढा, गोमूत्र, लवणक्षार, हिंगणबेटाचा क्षार, व पळसाचा क्षार यांत बुडवावेत. याप्रमाणें करून त्यांना अंजनासारखा काळा रंग आला म्हणजे त्यांचें बारीक चूर्ण करावें. तें चूर्ण मध व आंवळ्याच्या रसांत मिळवून अवलेहाप्रमाणें जाड करून तुपानें रावलेल्या मडक्यांत भरून तें मडकें एक वर्षपर्यंत जवांच्या राशींत पुरून ठेवावें. दर महिन्यास मडकें बाहेर काढून आंतील औषधें चांगलीं ढवळावींत. एक वर्षानंतर त्या अवलेहाचें दररोज सकाळीं आपल्या शक्तीच्या मानानें मध व तुपावरोबर सेवन करावें.

"एष एव च लौहानां प्रयोगः संप्रकीर्तितः।"

"अनेनैव विधानेन हेम्नश्च रजतस्य च।

आयुःप्रकर्षकृत्सिद्धः प्रयोगः सर्वरोगनुत्॥"

(च. चि. अ. १ पा. ३)

२ त्रिफलारसायन- त्रिफळ्याचा कल्क करून तो लोखंडाच्या एका नव्या भांड्यास लेपावा. २४ तासानंतर तो लेप मध पाण्यांतून घ्यावा. (च. चि. अ. १ पा. ३।४३)

सुश्रुतोक्त अयस्कृति

३ अयस्कृति- पोलादाचे अतिशय पातळ पत्रे करून त्याला लवण वर्गातील औषधांचा लेप करून ते पत्रे गाईच्या शेणीच्या अग्नीमध्यें तापवून त्रिफळा व शालसारादिगणांतील औषधें यांच्या काढ्यामध्यें सोळा वेळ बुडवावे. नंतर खैराच्या निखाऱ्यामध्यें लाल करून तसेंच निवूं द्यावें. नंतर त्यांचें बारीक चूर्ण करून तें वस्त्रगाळ करून घ्यावें. नंतर त्यांतून शक्तिमानाप्रमाणें तूप मधांतून तें योजावें.

"एतेन लौहेष्वयस्कृतयो व्याख्याताः॥"

(सु. चि. अ. १० श्लो. ११

लोहाचे अरिष्ट करण्याची पद्धति

४ लौहारिष्ट- शालसारादिगणांतील औषधांच आठपट पाण्यामध्यें चतुर्थांश काढा करावा. नंतर त गाळून घेऊन थंड झाल्यावर त्यांत चारशें तोळे म व तितकेंच मध्वासव त्यांमध्यें घालावें. (कित्ये केवळ मधच घालतात.) त्याचप्रमाणें उत्तम प्रकारच काकवी चारशें तोळे घालावी आणि पिप्पल्यादि गणांतील औषधांचें केलेलें वस्त्रगाळ चूर्ण शंभ तोळे घालून तें सर्व मिश्रण एका स्निग्ध मातीच घागरीला आंतून पिंपळीचें चूर्ण लिंपून त्यांत भरावे नंतर त्यांत पोलादाचे पातळ केलेले पत्रे शंभर तो खैराच्या निखाऱ्यामध्यें तापवून लाल करून त्य टाकावे. नंतर तोंड बंद करून जवसाच्या राशी तीन किंवा चार महिने अथवा त्यांतील लोहाचे विरघळेपर्यंत ठेवावे. तें उत्तम प्रकारें तयार झाल्या काढून रोज प्रातःकाळीं शक्तिमाना-प्रमाणें देऊ त्याजवर दोषानुरूप पथ्य करावयास सांगावें. ह्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोहारिष्ट म्हणतात. (सु. चि. अ. १२ पा. ४४७)
" मासांस्त्रींश्चतुरो वापि यावदालोहसंक्षयात् "।

—लोहारिष्ट सुश्रुत

ह्या ओळीवरून लोह पाण्यांत विरविण्याचा सुश्रुताचा हेतु स्पष्ट होतो. आणि ह्याच धर्तीवर-
मंडूरारिष्ट (र. का. धे.) सारस्वतारिष्ट [भै. र.]
लोहासव (ग. नि.) कुमारीआसव (यो. र.)
लोहासव (भै. र., शा.) रसायनारिष्ट (ग. नि.)
अशा योगांचें पाठसंयोजन झालेलें असावेंसें वाटतें.

वृंदमाधवांची कल्पना

५) चरक-सुश्रुतोक्त विधीनें लोहाचें बारीक चूर्ण तयार करून घेऊन नंतर मग त्यास पुनः त्रिफळा दिंडा, शिवणी इ. वनस्पतींचे द्रवांत भिजत घालून तें उन्हांत ठेवायचें. सुकल्यावर त्याला अग्निपुट द्यायचें आणि खलांत तें खलायचें. अशा क्रमानें अपेक्षित स्वरूपाचें व गुणांचें लोहचूर्ण बनविण्याची कल्पना वृंदमाधवानें बसविली. हीच पुढें वनस्पतिमारित भस्म म्हणून रूढ झाली.

६ वनस्पतिमारित लोहः- लोहाचे गंजास पुनर्नव्याचे रसांत खलून यथाविधि अग्निपुट द्यावें. अशीं बारा पुटें दिलीं असतां लोहाचें भस्म होतें.

(र. प्र. सु.)

७) नवसागरमारित लोहः-(अनग्निकृत)

१ लोहाचा गंज व १ नवसागर एकत्र करून त्यावर गरम पाणी थोडेसें घालून तें चांगलें मळावें व फडक्यांत बांधून ठेवावें. तीन तासानंतर ती पुरचुंडी थोडें थोडें पाणी घालीत सारखी चोळावी म्हणजे पुरचुंडीमधील लोह बाहेर येईल. तें पाण्यावर तरंगणारें असें बनतें. तें सर्व रोगांत वापरावें. (यो. र.)

सिंदूरप्रमाणें लाल भस्म

८) सोरामारित लोहः- ४ तो. लोहगंज ४ तो. सोरा, ४ तो. गंधक हीं तिन्ही प्रथम एकत्र खलावीत. नन्तर त्यांत कोरफडीचा रस घालून एक दिवस खल करावा. नन्तर तो गोळा एरंडाचें पानांत गुंडाळून त्यावर मातीचा जाड लेप देऊन त्याला गजपुट द्यावें. भट्टी व गोळा आपोआप थंड झाल्यावर लोहभस्म काढून घ्यावें. हें सिंदूराप्रमाणें लाल व वारितर होतें. व सर्व विकारांत देतां येतें. (आयुर्वेदप्रकाश) '

९) गंधकमारितलोह (अनग्निकृत):—

लोहाचा गंज व गंधक समभाग घेऊन त्यांचा खल कोरफडीच्या रसांत करावा. व तो गोळा लोखंडाचें पात्रांत घालून तें भांडें कांहीं काल सावलींत तसेंच ठेवावें. म्हणजे लोहाचें निरुत्थ असें भस्म होतें.(रसेंद्रचूडामणि.)

१०) गंधकमारित ताम्र (सोमनाथी ताम्र):—

एका परळांत प्रथम गंधकाचा पातळ थर द्यावा. नंतर त्यावर तांब्याचा पातळ पत्रा ठेवावा. त्यावर पुनः गंधकाचा एक थर द्यावा. अशी एक गंजी त्या परळांत रचावी. शेवटीं तीवर गंधक घालून त्यावर एक परळ पालथें घालून त्यास संधिलेप देऊन तें संपुट वालुकायंत्रांत ठेवून त्यास तीन तास अग्नि द्यावा म्हणजे ताम्राचें भस्म होतें. (चक्रपाणि)

बारापुटांत लोहभस्म

११ मनशीळमारित लोहः- रुईच्या चिकाचा लेप लोहाच्या पत्र्यास द्यावा. तो सुकल्यावर त्यास पुट द्यावें. नंतर ते पत्रे मनशीळ व गंधकाचें मिश्रणांत खलावेत व त्याच्या टिकड्या, वटक बनवाव्यात. त्या सुकल्यावर त्या शरावसंपुटांत घालून त्यास संधिलेप करून तो सुकल्यावर त्यास अग्निपुट द्यावें. म्हणजे बारा पुटांत लोहाचें भस्म होतें.

ह्याच विधीनें इतरहि धातूंचें भस्म होतें. (शा.)

१२ कज्जलीमारित ताम्रः-- पारा, गंधक लिंबाच्या रसांत खलून त्याचा लेप ताम्रपत्रास देऊन ते शरावसंपुटांत घालून यथाविधि गजपुट द्यावें. तीन पुटांत भस्म होतें. [र. र. स.]

१३) कज्जलीमारित लोह- (अनग्निकृत)

(सोमामृतलोह) १ शुद्ध पारद, २ शुद्ध गंधक, ४ तो. लोहगंज ह्याचा प्रथम एकत्र खल करावा. नंतर त्यांत कोरफडीचा रस घालून पुनः सहा तास. खल करून त्याचा गोळा एरंडाचें पानांत गुंडाळावा. त्यावरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

•दोरा गुंडाळून तो गोळा तांब्याचें संपुटांत ठेवावा. संपुटास संधिलेप देऊन तो सुकल्यावर तें संपुट तीन दिवस धान्यराशींत पुरून ठेवावें. तदनंतर तो गोळा सुकवून वस्त्रगाळ करावा. र. र. स.

१४ हिंगुळमारित लोहः:- १२ लोहगंज, १ हिंगूळ ह्यांचें मिश्रण कोरफडीचे रसांत सहा तास खलावें. गोळा सुकल्यानंतर यथाविधि गजपुट द्यावें. अशीं सात पुटें दिल्यानें लोहाचें वारितर भस्म होतें. (र. मं.)

१५ रसमारित भस्मः- महाळुंगाच्या रसांत पारद-भस्म खलून त्या कल्काचा लेप सोन्याच्या कंटकवेधी पत्र्यांस द्यावा. तो सुकल्यावर त्यांस विधिपूर्वक संपु--टांत घालून अग्नि द्यावा. असें दहा वेळ केलें असतां सोन्याचें भस्म होतें. र. चूडामणि

पारदभस्म लक्षणः—

अतेजा अगुरुः शुभ्रो लोहहाऽचंचलो रसः ।
यद् अनावर्तयेत् वह्नौ नोर्ध्वं गच्छेत्तदा मृतः ॥

रसराजशंकर

लोहादिरसायनांत श्री. चरकानें केवळ लोहचूर्ण आमलकाशीं कांहीं काल संलग्न ठेवून वापरलें. नवायस चूर्ण, योगराज, व ताप्यादि लोहांत तें तसेंच वापरलें. तेंच पुनर्नवामंडूर व मंडूरवटक ह्यांत मंडूर ह्या संज्ञेनें वापरलें. त्रिफलादि रसायनांत लोहाचा कल्कांत विरलेला अंश वापरला. सुश्रुतानें हीच कल्पना सुधा--रून लोहारिष्ट हा पाठ संयोजिला. वृंदमाधवानें चरक-सुश्रुताचा लोहचूर्णनविधि जमेस धरून भावना, ५०, आणि खल ह्यांची जोड त्यास देऊन लोह पचन व शोषण-सुलभ अधिक करून त्याची कार्यक्षमताहि वाढविली. आणि अपेक्षित गुणाचें लोह तयार कर-ण्याची प्रक्रिया रूढ केली: एथवर वनस्पतिमारित लोहभस्माचा विधि संपूर्ण झाला.

श्रीवाग्भटाला पारा, गंधक ज्ञात होते. त्याचा त्यान औषधीयोगांत बाह्योपचारार्थ उपयोगहि केला. उदा- पारा—रसेंद्र अ. हृ. उ. अ. १३।३१
गंधक-गंधकपाषाण अ. हृ. उ. अ. १३।३६

कज्जलीचा शोध कोणी लावला ?

पण पारा गंधक संयोग त्याला ज्ञात झाला नव्हता. तसेंच धातूंच्या भस्मविधींत त्यानें गंधकाचा उपयोगहि सुचविला नाहीं. पारा गंधकाच्या संयोगानें कज्जली नामक पदार्थ तयार होतो. तो पोटांतीं देतां येतो. किंबहुना त्याच्या रसांत भस्म मिश्रण करून एक औषधी योग निर्माण होऊं शकतो. हा शोध वृंदानें लावला. उदा. ताम्र-पर्पटी. तर गंधकाचा उपयोग धातु मारणाकडेहि होतो, ही गोष्ट चक्रपाणीनें निद-र्शनास आणली. तदनंतर मनशीळ, हरताळ ह्या गंधकाच्या उपकल्पांचाहि उपयोग धातुमारणाकडे करूं लागले. संशोधनाचें कार्य सारखें प्रगत होत होतें. त्यांतच क्षारांचें सहाय्यानेंहि धातूंचें मारण होतें हें समजलें. आणि ह्या प्रक्रियेंतील उच्च शिखर म्हणजे पारदानें धातुमारण, तें नागार्जुनानें गांठलें.

संशोधन आयुर्वेदास वावडें नाहीं

लोह जीवनीय अथवा पचन-शोषण-सुलभ कर-ण्यांतली प्रगति वरचे परिच्छेदांतून स्पष्ट होत आहे. त्यावरून हें उघड होतें कीं, संशोधन आयुर्वेदास वावडें नाहीं. इतकेंच नव्हें तर तें जोंवर प्रगत होत होतें तोंवर आयुर्वेद वर्धिष्णु व तेजस्वी होता, असें म्हटल्यास त्यांत कांहीं वावगें होईल असें नाहीं.

———

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेले आणि अनेक बक्षिसे मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु.

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो. असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन'
मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राचीन भारतांतील रुग्णालयाचें स्वरूप (उत्तरार्ध)

आयुर्वेदीय रुग्णालयासंबंधीं निर्विवाद्य पुरावा

(लेखकः- श्री. रा. ग. हर्षे, डी. लिट्. पुणें)

आपणास रुग्णालयें अगर तत्सदृश व्यवस्थे-संबंधीं जे संदर्भ आयुर्वेदीय ग्रंथांतून अगर शिलालेख, ताम्रपट वगैरेतून आढळतात ते सर्व बुद्धकालानंतरचे आहेत. यावरून हें स्पष्ट होतें कीं, भारतवर्षांतील रुग्णालय-संस्थेची स्थापना ही पाश्चात्य देशांतील रुग्णालय-संस्थेच्या स्थापनेपेक्षां अधिक प्राचीन स्वरूपाची आहे. आम्हाला आयुर्वेदीय रुग्णालय-संस्थेसंबंधीं निर्विवाद्य पुरावा बुद्धांच्या इंडो-चायना देशांमध्यें सांपडला आहे. इ. सन १९०१ मध्यें एम्. जॉर्जिस् मॅस्पेरो यांना स्यायफोंग (लेऑस) येथें सुस्थित असलेला एक शिला--लेख आढळला. सदरचा शिलालेख आयुर्वेदीय रुग्णालयाच्या (आयु-र्वेदिक हॉस्पिटल) गण--संख्येवर, पदाधिकाऱ्यांवर व रुग्णालयांतील एकंदर अंतर्व्यवस्थेवर चांगलाच प्रकाश पाडतो.

शिलालेखाचा संदर्भ

प्रोफेसर लुईस फिनॉट यांनीं ह्या शिलालेखाचा सर्व संदर्भ लाविला व तो एका फ्रेंच प्रसिद्धि-पत्रि-केंत इ. सन १९०३मध्यें छापून प्रसिद्ध केला. सदर पत्रिकेंत पान नं. ४६० ते ४६६ वर संशोधक एम्. ऑगस्टी बर्थ यांचा अभिप्राय असून शिवाय पान नं. ४६६ वर डॉ. पाल्मर कॉरडिअर यांचाहि अभिप्राय प्रसिद्ध झाला आहे. सदरहू शिलालेख कँबोडियाचे राजे ७ वे जयवर्मा (इ. स. ११६२ ते ११९०) यांना उद्देशून असून त्यांत त्यांनीं लेऑस प्रांत पूर्णतया जिंकल्यावर आपल्या प्रजेच्या सुखसोयीसाठीं जिंकलेल्या सर्व प्रांतांत ठिकठिकाणीं एकाच धर्तीवर रुग्णालयें (हॉस्पिटल्स) बांधलीं. उपरोक्त शिलालेखाखेरीज आणखी सात तत्सदृश शिलालेख कमीजास्त प्रमाणांत भग्न स्थितींत खालील ठिकाणीं सांपडले आहेतः—

(१) चीनचुम् (२) टा के पॉंग (३) चायफौम (४) नोम् वन (५) टा मीन टाऊच (६) खोनबौरी (७) बनकीन.

३ वृत्तांतील ४८ पद्यें

ह्या सर्व भग्न शिलालेखांचा उपयोग, वर वर्णन केलेल्या मुख्य शिलालेखांतील अस्पष्ट, दुर्बोध अगर खंडित असलेला भाग नीटपणें जुळवून घेण्यांत झाला. सदरहू शिलालेख कँबोडिअन धर्तीवर संस्कृतमध्यें लिहिला असून त्याचीं श्लोक, उपजाति व स्रग्धरा ह्या तीन वृत्तांमध्यें ४८ पद्यें आहेत. हीं सर्व पद्यें एका काळ्या चौकोनी शिलेवर चारी बाजूंस कोरलीं आहेत. पहिल्या तीन बाजूंवर प्रत्येकीं २४ ओळी आहेत व चवथ्या बाजूवर फक्त २० ओळी आहेत.

शिलालेखाचे ३ भाग

ह्या लेखाचे तीन भाग आहेत. पहिल्या भागांत राजे ७ वे जयवर्मा ह्यांची प्रशस्ति असून दुसऱ्या भागांत रुग्णालयांतील सेवकवर्गाचे नियम व रुग्णा-लयास साहित्यसामुग्री पुरविण्याबद्दलचे नियम आहेत; व तिसऱ्या भागांत भावी राजांना उद्देशून सदरहू रुग्णालय-संस्था तशीच पुढें चालू ठेवण्याबद्दल व तिची योग्य जोपासना व सुस्थिति कायम राखण्य-संबंधीं आदेश आहेत.

फ्रेंच भाषेत अनुवाद

ह्या शिलालेखाचा गोषवारा फ्रेंच भाषेंतून छापला असून शिवाय त्याचें भाषांतरहि फ्रेंच भाषेंतून प्रसिद्ध झालें आहे. ह्या प्रकाशनांत एम्. बर्थ व डॉ. कॉरडिअर यांचे अभिप्राय असून आयुर्वेदिक औषधी-गुणादर्शासंबंधीं कांहीं शास्त्रीय परिभाषेचें स्पष्टीकरणहि देण्यांत आलें आहे. ह्या मुख्य शिलालेखांतील कांहीं तत्कालीन स्थानिक संज्ञांचा अर्थबोध होत नाहीं; तसेंच त्यांतील सेवक-जनांची बेरीज चुकीची दिसते. व इतर जे सात तत्सम भग्न शिलालेख सांपडले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहेत, त्यांतील कांहीं वस्तूंच्या बजनांत व परिमाणांत थोडथोडा फरक असल्याचें दिसून येतें. हा थोडासा शब्दांतील फरक सोडल्यास एकंदर शिलालेखांतील वर्णन हें सुबुद्ध माणसाच्या ऐतिहासिक ज्ञानाची जिज्ञासा प्रज्वलित केल्याशिवाय राहात नाहीं. ह्या महत्वाच्या संशोधनास आज ५० वर्षे होऊन गेलीं तरी सुजाण व सुशिक्षित लोकांचें लक्ष ह्या गोष्टीकडे अद्याप वळलें नाहीं ही आश्चर्यजनक गोष्ट आहे.

" आरोग्य-शाला " नांवानें उल्लेख

ह्या शिलालेखांत रुग्णालयास ' आरोग्यशाला ' ह्या नांवानें संबोधिलें असून हें रुग्णालय बुद्ध-मंदिराच्या सभोंवार बांधण्यांत आलें आहे. ह्या रुग्णालयांत भैषज्यगुरु वैदूर्यप्रभराज व त्यांचे दोन पट्ट शिष्य अशा ह्या रोगहरण करणाऱ्या देवता-त्रयींचें पूजन केलें जातें. बौद्ध धर्मीयांत विशेषतः चीन, जपान, व तिबेट ह्या देशांत या देवता-त्रयींस रोगहर देवता मानून पूजिलें जातें. कदाचित् भारतवर्षांतहि ज्या वेळीं बौद्ध धर्माचा पगडा प्रभावशाली होता त्या वेळीं (९ व्या शतकापर्यंत) ही देवता-त्रयी लोकाचारांत असावी असें वाटतें. बौद्धधर्मी ह्या रुग्णालय-संस्थेस शुद्ध धार्मिक संस्था मानतात. ह्या धार्मिक संस्थेच्या सेवकजनांत दोन याजक (याजकौ), दोन उप-याजक (यज्ञहारिणौ), व एक ज्योतिषी (गणक) असे धर्मसेवक असून त्यांच्याकडे देवतेची पूजा व होम-हवन अशीं कामें असत. शिलालेखांत असेंहि नमूद केलें आहे कीं, उरलेलें हविर्द्रव्य रुग्णालय-संस्थेतील रुग्णास व इतर सेवकजनांस वाटून द्यावें.

आरोग्यशालेंतील वैद्यमंडळी

हें रुग्णालय चारीहि वर्णांस खुलें होतें. रुग्णालयांत दोन मुख्य वैद्य (भिषजौ) असून त्यांना मदतनीस म्हणून एक दुय्यम वैद्य व दोन दुय्यम वैद्या असत. ह्यांपैकीं एक दुय्यम वैद्य व एक दुय्यम वैद्या यांनीं रुग्णालयांतच वास्तव्य करावयाचें असे. दोन संग्राहकांनीं औषधें वांटावयाचीं असून, तांदूळ व इंधन (सरपण) यांची खरेदी करावयाची असे. दोन पाककारांनीं अन्न शिजविणें व स्वच्छ पाणी ह्यांची व्यवस्था करावयाची असे; शिवाय त्यांनीं देवाकरितां फुलें व हवनाकरितां दर्भ आणावयाचें असून मंदिरहि धुवून स्वच्छ करण्याचें काम त्यांच्याकडे असे. दोन उप-याजकांनीं हवनास व देवपूजेस लागणारीं पल्लवें व समिधा यांचा पुरवठा करून शिवाय देवाच्या नैवेद्याची व्यवस्था करावयाची असे.

आरोग्यशालेचा परिचारकवर्ग

रुग्णमंदिरास चौदा रक्षक असत. रुग्णालयांत स्त्री-पुरुष मिळून एकंदर बावीस जणांचा परिचारक-वर्ग असून त्यांनीं रुग्णांस नियमित वेळीं औषध वगैरे द्यावयाचें असे. पाणी तापवण्याकरितां, काढे वगैरे उकळण्याकरितां व औषधी द्रव्यें खलण्याकरितां सहा बायांची नेमणूक केलेली असे. तांदूळ कांडण्याकरितां व निवडण्याकरितां दोन स्वतंत्र बायांची नेमणूक केलेली असे. ह्या दोन बायांपैकीं एक बाई रुग्णालयांत वास्तव्यास असे. अशाप्रकारें दोन मुख्य वैद्य व तीन त्यांचे मदतनीस वैद्य सोडून रुग्ण-मंदिरांत कायम वास्तव्य करणाऱ्या परिचारकांची संख्या बत्तीस असे व वास्तव्य न करणाऱ्या सेवक-जनांचीं संख्या सहासष्ट असे.

रोज मिळणारें अन्नधान्यादि साहित्य

रुग्ण-मंदिरांत वास्तव्य करणाऱ्या सेवकजनांस दररोज प्रत्येक व्यक्तीस खालीं दर्शविल्याप्रमाणें अन्न-धान्य व इतर साहित्य मिळत असेः—

१) तांदूळ— दररोज १ द्रोण. पूजेस व हवनांस ह्याच प्रमाणांत. हवनांतील उरलेला भात रुग्णां वाटून देण्यांत येत असे.

२) * कपडे— एक झालर लावलेली भगव कफनी व ६ शुभ्र कपडे.

३) * गोभिक्षा (?) — दोन.

४) टक्क (?) — तक्र (?) — ५ पल.

५) कृष्णा — ५ पल.

६) ५ पल वजनाची एक व १ पल वजनाचे

* ही खूण केलेल्या वस्तु बहुतेक प्रतिवार्षिक असाव्यात

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक अशा दोन मेणवत्त्या.

७) मधु (अगर मद्य)— ४ प्रस्थ.
८) तीळ— ३ प्रस्थ
९) घृत— १ प्रस्थ
१०) पिप्पली, रेणु व दीप्यक यांचें चूर्ण—२पाद
११) पुन्नाग— २ पाद
१२) जातिफल— ३
१३) हिंगु—क्षार— १ पाद
१४) कोत्थजीर्ण (?) — १ पाद
१५) कापूर — ५ बिंब
१६) साखर— २ पल
१७) 'दंडस' नांवाचे जलचर प्राणी—५
१८-२१) श्रीवास, चंदन, धणे आणि शतपुष्पा प्रत्येकीं १ पल.
२२-२५) एला, नागर, कंकोळ व मरिच—२ पल.
२६--२७) प्राचीवाल आणि सर्षप—प्रत्येकीं १ प्रस्थ.
२८) त्वक् (दालचिनी)—१॥ मुष्टी.
२९) पथ्या (हरितकी)—४०.
३०) दोन प्रकारची दार्वी— प्रत्येकीं १॥ पल
३१--३५) कंद हलाय (?), जन्स्य (?), देवदारु, आणि चव्य — प्रत्येकीं १॥ पल.
३६) मिश्र-देव (अर्जुन) १। पल.
३७--३८) मधु आणि गुड—प्रत्येकीं ३ कुडव
३९) सौवीर-नीरा— १ प्रस्थ.

नेमणुका करण्याची व्यवस्था

राजविहाराच्या मुख्य अर्ध्वयुकडून रुग्ण-मंदिरांतील २ याजक व १ ज्योतिषी यांची नेमणूक होत असे. दरवर्षी त्यांना खालील प्रमाणें साहित्य-सामुग्री मिळत असेः—

३ कफन्या (बृहती), १२ हात लांबीचीं दोन वस्त्रें, व १० हात लांबीचीं २ वस्त्रें, ९ हात लांबीचीं २ वस्त्रें, १० हात लांबीचें १ वस्त्र, ३ पंचा, ३ पितळेचीं भांडीं, १२ खारी तांदूळ, ३ पल सिक्थ आणि तक्र व ६ पल कृष्णा (पिंपळी).

वर्षांतून ३ वेळा पुरवठा

रुग्ण-मंदिरांतील साहित्यसाठे वर्षांतून तीन वेळां राज-भांडारांतून साहित्य पुरवून पूर्ण केले जात असत.

रुग्णालयासंबंधीं सर्वसाधारण कल्पना

वरील साहित्य वर्णनावरून रुग्ण-मंदिरांतील सर्व सेवकजनांस व त्यांतील रुग्णांस प्रत्येकीं किती प्रमाणांत अन्न देत असत हें निश्चित करणें कठीण आहे. त्याचप्रमाणें रुग्ण-विभागाची व्यवस्था कशी ठेवीत, औषधोपचारांची व्यवस्था कशी असे वगैरे संबंधीं खुलासा मिळत नाहीं.

तथापि ह्या शिलालेखावरून आयुर्वेदीय रुग्ण-संस्थेसंबंधीं बरीच माहिती उपलब्ध होत असून आयुर्वेदिक रुग्णालयासंबंधीं सर्वसाधारण कल्पना निश्चित येऊं शकते. —'आयुर्विद्या'

सांडू
डायाबेटॉल
मधुमेहावर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई
[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स—
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोधक चुटका—

वैद्य-डॉक्टरांची श्रीमंती

एका गांवांत एक अभ्यासी वैद्य रहात होते. त्यांचा वैद्यकीय व्यवसाय विशेष जोरांत चालत नव्हता. कारण, त्या गांवांतील बहुतेक लोक आरोग्याचे नियम जाणत होते व पाळीतहि होते.

या वैद्यांच्या घरचा रोजचा खर्च तर व्यवसायावर भागत होताच; पण त्यांच्या बायकोची इच्छा सोन्याच्या बांगड्या करण्याची होती. बरीच वर्षे ती ते पूर्ण करूं शकले नाहींत.

या वैद्यांच्या शेजारींच एक श्रीमंत शेटजी रहात असत. एके दिवशीं रात्रीं श्रीमंत शेटजींना दही खाण्याची इच्छा झाली. शेठाणी दही आणण्यासाठीं हलवायाच्या दुकानावर गेली. हें पहातांच वैद्यराज आपल्या पत्नीला म्हणाले "तुला आतां सोन्याच्या बांगड्या खास मिळणार!" तें ऐकून वैद्यपत्नीला आनंदाच्या गुदगुल्या होऊं लागल्या.

वेळ रात्रीची आहे

इतक्यांत शेटजी म्हणाले 'वेळ रात्रींची आहे, दह्यावरोबर साखर खाणें ठीक नाहीं, सबब त्यांत थोडें मीठ घालून आण पाहूं.'

बांगड्या मिळणार पण

शेठजीचें हें वाक्य ऐकतांच वैद्यराज आपल्या पत्नीला म्हणाले 'तुला बांगड्या मिळणार तर खऱ्याच पण त्या सोन्याच्या नव्हेत, चांदीच्या (सोन्याच्या गिलिटच्या).'

थोड्या वेळानें वैद्यराजांच्या कानीं शेठजींचे पुढील शब्द आले. 'तसेंच त्या दह्यांत भाजलेल्या जिऱ्याची थोडी पूड टाक हो!'

जिऱ्याचें नाव ऐकतांच वैद्यराज थंडे पडले. त्यांनीं उदास होऊन सांगितलें:- "आतां मात्र तुला कांचेच्या (अगर पितळेच्या) बांगड्यावरच समाधान मानणें भाग आहे."

आयुर्वेदीय सिद्धांत

'रात्रीं दहीं खाऊ नये व खाणें झाल्यास त्यावर संस्कार करून तें खावें' हा आयुर्वेदीय अनुभव वरील गोष्टींत ग्रथित केला आहे.

त्याजबरोबर वैद्य-डॉक्टरांच्या घरांत संपात्ति वाढणें याचा अर्थ जनतेंत आरोग्यविषयक नियमांचें अज्ञान वा जाणून अपरिपालन होय. ज्या गांवांतील वैद्य- डॉक्टर गरीब, तें गांव आरोग्यसंपन्न असें समजण्यास हरकत नाहीं.

दह्याचे गुणधर्म

दह्यासंबंधीं अष्टांगहृदय ग्रंथांत पुढील माहिती आढळते. दही हें अम्लरसाचें आहे. त्याचा परिणामहि आंबट रसाप्रमाणेंच आहे. तें पचावयास जड व उष्ण आहे (तें वातप्रकृतीस चांगलें). कफ, पित्त, रक्त व सूज करणारें आहे. तें रुचिकर, हिंवताप, पडसें व थोडी लघवी होणें हे विकार दूर करणारें आहे. कफज संग्रहणी रोग्यांनीं साय काढलेल्या दुधाचें दही खावें.

दही कोणाला बाधतें?

रात्रीस दही कधींहि खाऊं नये. वसंत ऋतु (फाल्गुन चैत्र), ग्रीष्म ऋतु (वैशाख जेष्ठ), व शरद् ऋतु [भाद्रपद आश्विन] या सहा महिन्यांत दिवसा सुद्धां सर्वसामान्य प्रकृतीच्या माणसानें नुसतें दही खाऊं नये. ऊन करून दही कधींहि खाऊ नये.

दह्याबरोबर सेवन करण्याचे पदार्थ

दही खाणाऱ्या माणसानें आपल्या जेवणांत त्या दिवशीं मुगाचें वरण, मध, तूप, खडीसाखर, आवळकाठी, यासारख्या कफपित्तनाशक वस्तूंचा उपयोग केला पाहिजे. दह्याचें नित्य सेवन करू नये. चांगलें घट्ट विरजले न गेलेलें दहीं खाऊं नये.

ज्या लोकाकडून हे दहीं खाण्यासंबंधीचे नियम पाळले जात नाहींत, ते पुढीलपैकीं एकाद्या रोगाला बळी पडतात. कफपित्तज्वर, रक्त पडणें, घावरे, गजकर्ण, इसब इत्यादि लहान मोठे त्वचारोग, पांडु (अनिमिया), रक्तदाब (भ्रम--चक्कर येणें).

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भल्लातक-भृंगराज तेलाच्या सूचिकाभरणान राजूची प्रकृति सुधारली !

(लेखक: डॉ. के. जी. कुळकर्णी L. D. Sc. नासिक)

‘राजू.’ एका जोडप्यानें तो ७ दिवसाचा अस-ापासून मुलाप्रमाणें वाढविलेला २ वर्षांचा कुत्रा. या ाळांत त्याला कोणताच आजार झाला नव्हता. तीन हिन्यापूर्वी त्याला ताप आला, तो १०४ पासून १०७ शापर्यंत चढत गेला. जनावराचे दवाखान्यांत त्यावर पचार केले गेले. डिस्टेंपर हें त्या रोगाचें नांव सांग-ांत आलें. पेनिसिलिन, एमिटिन वगैरे इन्जेक्शनें लीं गेलीं. त्यामुळें प्रकृति सुधरत आहे असें वाटलें. ा एके दिवशीं मागील पाय व कंबर त्याला उचलत हीं असें दिसून आलें. डॉक्टरांनीं कमरेपासून खालीं ांग झाल्याचें सांगितलें. त्यावर त्यांनीं १५ दिवस क्शनें व चोळणें वगैरे उपचार केले, पण उपयोग ला नाहीं. कुत्र्याला होणाऱ्या या डिस्टेंपर विकाराचें रण ‘व्हायरस’ आहे. त्याची बाधा होण्याचे ५ कार आहेत. (१) हातापायांची शक्ति जाणें, (२) चेवर फोड येणें (३) न्युमोनिया होणें (४) आमांश णें. (५) वाऱ्या होणें. यावर दीर्घ काल उपचार ावे लागतात. त्यानंतरहि कुत्रा सुधारेलच अशी त्री सांगतां येत नाहीं असें जनावराच्या डॉक्टरांनीं गितलें.

आमच्या पुढील प्रश्न

राजूच्या पाठीवर, शेपटीवर व जांघेंत सूज व ड आले होते. ते फुटून वहात होते. त्यांतून घाण व येत होता. कुत्रा जोरानें कण्हत असे, विव्हळत े. त्याचीं हीं लक्षणें सारखी वाढत होतीं. व त्यावर उपाय करावा हा प्रश्न आमच्यापुढें होता. जखमा , औषधें लावणें वगैरे कार्यक्रम कुत्र्याच्या मालका-न व्यवस्थित चालू होते.

भ. भृंगराजाचें इंजेक्शन सुरूं केलें

विघ्ना व माका या वनौषधी रक्त शुद्ध करणाऱ्या व वातव्याधिहारक आहेत हें माझ्या लक्षांत आलें. म्हणून मी भल्लातक-भृंगराज तेलाची एक ५ तोळ्याची बाटली ‘आयुर्वेद सेवा संघ’ औषधी भवनांतून आणण्यास कुत्र्याच्या मालकास सांगितलें व त्यापैकीं २॥ तोळे तेल निराळें काढून रोज १॥ सी. सी. तेल त्या कुत्र्याच्या कुल्यावरील मांसांत टोचण्यास प्रारंभ केला.

अभ्यंगासाठीं मिश्रण, व एकांगवीर

बाकी राहिलेलें २॥ तोळे भल्लातक-भृंगराज तेल + २० तोळे सरसूचें तेल व ५ तोळे कापूर हे सर्व एकत्र मिश्र करून त्या तेलानें त्या कुत्र्याची रोज मालिश करविली. याचवेळीं पोटांतून एकांगवीर अर्धागुंज २ वेळ दुधांतून देण्याची व्यवस्था केली.

२० मिनिटांत झोप लागली

पहिलें इंजेक्शन दुपारीं १॥ वाजतां दिलें. त्या वेळीं सर्व वेदना चालू होत्या, त्या १५-२० मिनिटांत थांबून त्यास झोंप लागली. इंजेक्शनचा त्वरित झालेला वेदनाहारक परिणाम पाहून कुत्र्याच्या मालकिणीला ‘हा कुत्रा मेला’ असेंच वाटलें. माझाहि मेंदू सर्द झाला. आम्हीं कुत्र्यास मोठ्यानें हाक मारली, तरी तो हूं का चूं करीना. मात्र त्याची नाडी व हृदय उत्तम ठोके देत होते.

रात्रीं अभ्यंगस्नान व झोप

संध्याकाळीं ७ वाजतां तो कुत्रा उठण्याचा प्रयत्न करीत आहे असें दिसलें. मात्र तो कण्हत विव्हळत नव्हता. त्यावेळीं त्याला भूक लागली आहे असें समजून ·।· गुंज एकांगवीर पावशेर दुधांत दिला. पुनः रात्रीं तें औषध ·।· गुंज, पावशेर दुधांत दिलें व पूर्वी तयार केलेलें तैलमिश्रण अंगास चोळण्यास सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं केलें. अभ्यंगा-नंतर १ तासानें सोसेल इतक्या ऊन पाण्यानें स्नान घातलें व गरम पांघरूण घालून झोंपविलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एकूण २० इंजेक्शनें दिलीं

दुसरे दिवशीं सकाळीं कुत्रें झोकांड्या देत १०–१५ पावलें चालूं शकलें. व रात्रीं त्याला उत्तम झोप लागली. असा कार्यक्रम ३ दिवस चालला. यानंतर एक दिवस आड एक याप्रमाणें २॥ औंस भल्लातक–भृंगराज तेलाची १॥–१॥ सी. सी. ची २० इंजेक्शनें दिलीं. मध्यंतरीं त्याला कमी दिसतें कीं काय असें वाटूं लागलें होतें, पण तें पुढें शक्ति आली तसें नाहींसें झालें.

प्रकृति चांगलीच सुधारली

आतां त्या कुत्र्याची प्रकृति चांगली सुधारली असून निसर्गाचे सर्व विधि तो व्यवस्थित पार पाडीत आहे. आहार भाकरी दूध पोळीचा चालूं आहे. सर्व घरभर तो कुत्रा व्यवस्थित हिंडत आहे. अंगावरील सर्व जखमा बऱ्या झाल्या असून त्वचेला उत्तम तजेला आला आहे. शरीरावरील कांहीं भाग पूर्वी भुरकट काळा होता तो आतां चांगला काळाभोर झाला आहे. हा भ. भृंगराजाचा विशेष परिणाम आहे.

भल्लातक–भृंगराज–तेलाचीं इंजेक्शनें वातकफात्मक विकारी स्त्री–पुरुषांना हि देण्यांत आलीं आहेत. हीं देतांना वेदना मुळींच होत नाहींत. व परिणामहि हितावह होतो असा अनुभव आहे. तो स्वतंत्र लेखांत देण्यांत येईल.

शृंगार
नेत्रांजन
डोळ्यांचे विकारावर उत्कृष्ट
कृष्णशास्त्री बिवलकर
पो. आंजर्ले. (रत्नागिरी)

— आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारी —

आयुर्वेदिक व युनानी वनौषधि

तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण!

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण–वर्ख, रौप्य–वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राम्ही, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य! विशेष माहितीसाठीं आमचें साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६ टेलिग्रॅम–'आयुर्वेद'

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अग्निहोत्र मंदिरांतील शारदीय ज्ञानसत्र, पुणें

(ता. १७-१०-५२ ते १७-११-५२) (लेखकः- एक श्रोता)

शास्त्रीयत्वाची कसोटी

दरवर्षाप्रमाणें यंदाहि कै. श्रीमान् आहिताग्नि राजवाडे ह्यांचें अग्निहोत्रमंदिरांत उपर्युक्त ज्ञानसत्र यथासांग पार पडलें. व्याख्यानाचा विषय 'वैद्यक-शास्त्र' हा ठेवलेला होता. वैद्यकामध्यें अनेक पंथ आणि उपपंथ आहेत. त्यापैकीं प्रत्येक पंथ आपली पद्धति हें शास्त्र आहे असें सांगत आहे. परंतु खरोखर कोणताहि ज्ञानखंड 'शास्त्र' ह्या पदवीला पोहोंचा-याचा असला तर त्यानें कमींत कमी कोणत्या मर्यादा पाळल्या पाहिजेत, ह्याचा प्रथम निवाडा व्हावयास पाहिजे, म्हणजे त्या मर्यादेच्या अपेक्षेनें सर्व पंथांचें परीक्षण करून शास्त्रीयत्व ठरविणें शक्य होईल. हा हेतु मनांत धरून ह्या वर्षीं संचालकांनीं, व्याख्यात्यांना विनंतिपत्र काढलें होतें, त्यामध्यें 'व्याख्यात्यांनीं शास्त्रीयत्वाचीं लक्षणें सांगून तीं आपापल्या शास्त्राला लावून दाखवावींत' अशा विनंति केली होती.

३२ व्याख्यानांची वर्गवारी

ह्या सत्रामध्यें एकंदर वेगवेगळ्या व्याख्यात्यांची अठ्ठावीस आणि उपसंहाराचीं चार अशीं ३२ व्याख्यानें झालीं. त्यांची वर्गवारी पुढीलप्रमाणें :— आयुर्वेद ९, ॲलोपॅथी ९, होमिओपॅथी २, योगशास्त्र २, मानसोपचार १, जलोपचार १, मंत्रशास्त्र १, संगीत १, ज्योतिष १, संकीर्ण १, आणि उपसंहार ४.

चालकांच्या विनंतीचा परिणाम !

चालकांनीं शास्त्रीयत्वाची कसोटी आपआपल्या शास्त्राला लावून दाखवावी अशी जी विनंति केली होती, त्या विनंतीच्या दृष्टीनें विचार करतां असें दिसून आलें कीं, फक्त आयुर्वेदीय पंडितांनीं त्या विनंतीला मान देण्याचा प्रयत्न केला; इतरांपैकीं कोणीहि तशा तऱ्हेचा प्रयत्नच केला नाहीं. ॲलोपॅथीच्या अनुयायांची तर अशी भावना दिसून आली कीं आपला पंथ हेंच शास्त्र आहे ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट असतांना, चालक अशी विनंति कां करतात ? डॉ. वा. चिं. लागू ह्यांनीं आयुर्वेद हें शास्त्र कां म्हणावें ह्यांची पद्धतशीर मीमांसा केली; परन्तु त्याबरोबरच पद्धतशीर कसोट्या लावून ॲलोपॅथी हें शास्त्र ठरतें किंवा नाहीं हें त्यांना सहज दाखवितां आलें असतें. परन्तु त्या दिशेला कांहीं ते वळले नाहींत. त्या विषयावरील इतर वक्त्यांनीं तर ॲलोपॅथी हें शास्त्रांचे सर्व नियम पाळणारें शास्त्र आहे असें हमखास गृहीत धरून इतर मामुली आणि किरकोळ विषयांची चर्चा केली. 'प्रगति' हा शब्द कोठें लावतां येईल त्याचा बरोबर आराखडा न सांगतां प्रगति कशी कशी होत गेली ह्याचा कांहींनीं (डॉ. ढमढेरे व डॉ. सोहोनी यांनीं) आढावा घेतला. असें म्हणण्याचें कारण असें कीं पाश्चिमात्य वैद्यकांत प्रगति करणारे जे आचार्य (पाश्चर, लिस्टर, कॉच, रॉंटजेन) त्यांनीं जें कार्य केलें तें म्हणजे मानवजातीला एक शाप आहे असें पाश्चिमात्य शास्त्रज्ञच लिहितांना आढळून येतात.(See-Human fertility a modern dialemma-Cook). त्याचा अर्थ श्रोते इतकाच समजले कीं ह्या पद्धतींत सुपरिणामाबरोबरच बरेच दुष्परिणाम देखील होत असले पाहिजेत !

दोष कां उत्पन्न होतात ?

हें शास्त्रच आहे आणि तें हितकारकहि आहे; दोष उत्पन्न होत असल्यास ते वैद्य, रोगी आणि दोघांचें वर्तन यामुळें उत्पन्न होतात; असें गृहित धरून तीन (डॉ. नामजोशी, डॉ. मा. पु. जोशी, आणि सर्जन दातार) वक्त्यांनीं मीमांसा केली. डॉक्टर नामजोशी ह्यांनी वैद्यलोकांकडून जे कांहीं निरीक्षण-दोष होतात अगर होऊं शकतात त्यांचें मार्मिक विवेचन केलें, तर उलट रोग्याच्या वृत्तीमुळें कसे घोटाळे उत्पन्न होतात ह्याचें विवेचन श्री. डॉ. मा. पु. जोशी ह्यांनीं चांगल्या रीतीनें केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अत्यन्त पवित्र धंदा

डॉ. दातार ह्यांनीं हा अत्यन्त पवित्र धंदा असला पाहिजे, म्हणून वैद्यक वर्गाची नैतिक पातळी वाढली पाहिजे असा निर्णय दिला. 'जें जें अर्थोत्पादक तें तें नैतिक' हा आधुनिक काळांतील दंडक मानला तर मानव उन्नत होणार नाहीं असा त्यांचा आशय होता.

रोग बरा होईल तो उपचार

दोन वक्त्यांनीं [डॉ. वाय्. व्ही. फाटक व डॉ. रा. ना. दातार] ज्या उपचारानें रोगी बरा होत असेल तो कोणताहि उपचार करावा अशी अत्यंत सोज्वळ भूमिका घेतली होती! परंतु ह्या भूमिकेंत व्यवहारतः दोन दोष उत्पन्न होतात. एक म्हणजे अशी व्यवस्था असावयाची तर राजसत्तेनें अधिकाराच्या जोरावर उपचाराच्या बाबतींत ढवळाढवळ करतां कामा नये. आणि दुसरें म्हणजे शास्त्रीयत्व-अशास्त्रीयत्व ह्याचा कांहींच निवाडा अशानें होत नाहीं. आपल्या राजसत्तेनें तर एका पंथाचा कैवार घेऊन त्यांतील कांहीं अंगें दुसऱ्या शास्त्रावर लादण्याचा अट्टाहास मांडलेला आहे; आणि शिवाय तिला संशोधनहि करावयाचें आहे. 'संशोधन' ही काय चीज आहे, त्याचा स्वतंत्र विचार करावा लागेल.

मनोवृत्तींचा परिणाम

रुग्ण आणि स्वस्थ स्थितीवर मनोवृत्तींचा परिणाम (डॉ. श्री. ना. रानडे) ह्या व्याख्यानाच्या सुरवातीला, श्री. गो. म. जोशी ह्यांनीं, मन हा शब्द समान असला तरी पौर्वात्य आणि पाश्चिमात्य तत्त्वज्ञानांत त्याचें स्वरूप आणि प्रक्रिया अत्यंत भिन्न आहेत आणि म्हणून पाश्चिमात्य मानसिक उपचाराच्या पद्धति घेतांना फारच काळजी घ्यावयास पाहिजे, ही गोष्ट श्रोत्यांच्या नजरेस आणून दिली. डॉ. रानडे ह्यांनीं मुख्यतः डॉ. फ्रायड ह्याच्या मनोविश्लेषण शास्त्राच्या आधारें चर्चा केली. त्यावर डॉ. व्ही. बी. गोखले ह्यांनीं सांगितलें कीं, फ्रायड हा 'रोगी मनाचाच' अभ्यासक आहे. डॉ. व्ही. बी. गोखले, हे ज्ञानवृद्ध आणि वयोवृद्ध गृहस्थ पाश्चात्य वैद्यक आणि शल्यतंत्र ह्यांत अत्यंत निष्णात आहेत. तथापि त्यांच्या व्याख्यानाचा मुख्य भर मात्र 'प्रसन्नात्मेंद्रियमनाः स्वस्थ इति अभिधीयते।' ह्या आयुर्वेदीय सूत्रावर होता. त्यांनीं आधुनिक काळांतील शेंकडो उतारे देऊन युरोपांत देखील 'सबंध मनुष्याचा' (whole man) अभ्यास झाला पाहिजे अशी प्रवृत्ति वाढत चालली आहे असें दाखविलें. योगांतील कुंभकाचें हितकारकत्व त्यांनीं आधुनिक इंद्रियविज्ञान-शास्त्राच्या आधारें समर्थित केलें.

होमिओपॅथीवर २ व्याख्यानें

होमिओपथीवर डॉ. गोखले व डॉ. परांजपे या दोघांचीं व्याख्यानें झालीं. हा पंथ ॲलोपथी ह्या पंथांतूनच उत्पन्न झाला असल्या कारणानें तत्पंथीय वक्त्यांनीं आपली चिकित्सापद्धति मूळ पद्धतीपेक्षां कशी सरस आहे तें दाखविलें. त्यामध्यें शास्त्रीयत्वावर भर असण्यापेक्षां ॲलोपॅथीचे दोष दाखविण्याकडेच प्रवृत्ति दिसून आली. ॲलोपथी पक्षाचे एक अनुयायी उपवक्ते म्हणून संचालकांची परवानगी घेऊन बोलले. आणि हा मुद्दा ह्यांनीं तेथेंच स्पष्ट केला. अशा तऱ्हेनें थोडक्यांत पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचे अनुयायी म्हणून जे वक्ते आले होते, त्यांच्या वक्तव्याची रूपरेषा आहे.

मंत्रशास्त्र व ज्योतिष

उलट पौर्वात्य तत्त्वज्ञानामध्यें 'अचिंत्यो हि

तारेचा पत्ता:-Newbottle
के. के. शहा ॲंड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)
रिकाम्या बाटल्या, बुचे, कॅपसुल्स् [हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे
ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मणि--मंत्र--औषधी--प्रभावः ' ' दैवं चैवात्र पंचमम् ' इत्यादि ज्या कल्पना दिसून येतात, त्या लक्षांत घेऊन चालकांनीं ' मंत्रशास्त्र ' ' ज्योतिष ' इत्यादि विषयावर देखील व्याख्यानें ठेवलीं होतीं. मंत्रशास्त्र आणि ज्योतिष ह्या विषयावरील व्याख्यानें (श्री. लेंढे शास्त्री व ज्यो. गोरे) खरोखरच चांगलीं झालीं. पंडित देसाई ह्यांचें ' संगिताचे शारीर आणि मानस परिणाम ' ह्या विषयावरील व्याख्यान अत्यंत बोधप्रद झालें. व आभार मानतांना वै. देशपांडे यांनीं तो विषय अधिक विशद केला. ह्या तीनहि पंथांनीं जे उपचार केले जातात त्यांनीं जर आरोग्यरक्षण होत असेल तर समाजानें त्याचा परिग्रह करण्याला मुळींच हरकत नसावी. मनुष्याला पंचेंद्रियें आहेत आणि त्या इंद्रियांचें संतर्पण हें दुय्यम का असेना मनःप्रसन्नतेचें एक साधन आहे, असें पौर्वात्य तत्त्वज्ञान मानतें. यामुळें ह्या तत्त्वज्ञानांत आरोग्याच्या दृष्टीनें इंद्रियांच्या सर्व विषयांना महत्व आहे.

आयुर्वेदीयांचीं व्याख्यानें

आयुर्वेद देखील मानवाचें साध्य, धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे चारहि पुरुषार्थ मानीत असल्याकारणानें आणि आपल्या विषयाला शास्त्रीयत्व असलें पाहिजे अशी त्याला जाणीव असल्याकारणानें आयुर्वेदीय पंडितांनीं मात्र या व्याख्यानमालेमध्यें आपला विषय प्रमाण--प्रमेय पद्धतींनीं अगदीं काटेकोरपणानें मांडून दाखविला. ' आयुर्वेदीय चिकित्सेचीं मूलतत्वें ' (वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी), ' आयुर्वेदाचें शास्त्रीयत्व ' (वैद्यराज त्र्यंबकशास्त्री आपटे, आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे), आयुर्वेदाची भूमिका (वैद्यराज शंकरशास्त्री वर्तक) इत्यादि विषयवारीच असें दाखवितें कीं ज्ञानखंडाला उपयोगित्व असलें तरी देखील, त्याच्या शास्त्रीयत्वाचें परीक्षण व्हावयास पाहिजे, अशी जाणीव सर्व आयुर्वेदीय व्याख्यात्यांनीं बाळगली होती.

व्यक्तीनें आचार कसा ठेवावा ?

रोग झाल्यानंतर रोगनिवारण करण्यापेक्षां रोगोत्पत्ति होऊंच न देण्याच्या दृष्टीनें, ' व्यक्तीनें आचार कसा ठेवावा ' ह्यासंबंधीं सुंदर चर्चा वैद्य ग. वि. पुरोहित ह्यांनीं केली. खरोखर ' ' आहारशयना-ब्रह्मचर्यैर्युक्त्या प्रयोजितैः । शरीरं धार्यते नित्यमागारमिव धारणैः । ह्या सूत्राच्या आधारें त्यांनीं जी चर्चा केली त्याचा बरोबर बोध झाल्यास रोगोत्पत्तीचें कांहींच कारण नाहीं असें कोणीहि म्हणेल.

स्त्रीरोगावर दोन व्याख्यानें झालीं. एक आयुर्वेदीय, वैद्य मुळे ह्यांचें, आणि दुसरें डॉ. चपलाबाई खाडिलकर ह्यांचें. ह्या दोन व्याख्यानांचे विषयविभाग पाहिल्याबरोबर कोणत्या पद्धतींत शास्त्रीयत्व आहे आणि कोणत्या पद्धतींत नाहीं ह्याचा स्पष्ट चित्रपट श्रोत्यांच्या पुढें उभा राहिला.

सर्व सृष्टि पांचभौतिक आहे

वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी त्यांनीं, सर्व सृष्टि ही पांचभौतिक आहे. मनुष्य हा सृष्टींतच आहे,

सेवा

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुणकारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते.

अशी सेवा करण्यासाठीं उत्तम व अस्सल औषधेंच वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान--

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३.

(टेलिफोन नं. ३१८५८) हेंच आहे.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणून मनुष्य हा पांचभौतिक सृष्टि आणि समवायी पुरुष असा आहे. पांचभौतिक सृष्टीसंबंधीं साधारण नियम 'सर्वदा सर्वभावानां सामान्यं वृद्धिकारणं। ऱ्हासहेतुर्विशेषश्च।' हा पाया धरून अगदीं पद्धतशीर न्यायपद्धतीनें आपल्या विषयाची मांडणी केली, ती फारच निर्दोष होती. वैद्य त्र्यंबकशास्त्री आपटे ह्यांनीं 'दोषधातुमलमूलं हि शरीरम्' ह्या सूत्राच्या आधारें त्रिदोष पद्धतीचें उपबृंहण केलें, परंतु तेवढेंच सांगितल्यानें संपूर्ण मानवाची व्यवस्था लागत नाहीं हें लक्षांत ठेवून 'प्रसन्नात्मेंद्रियमनाः स्वस्थ इत्यभिधीयते' 'शरीरेंद्रियसत्त्वात्मसंयोगः पुरुषः' ह्या तत्वाच्या आधारें मनुष्यामध्यें इंद्रियाला अगोचर असा बुद्धि-ग्राह्य विभाग रहातो असें दाखविलें.

चार प्रमाणांचा सोपपत्तिक विचार

हाच पाया धरून आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे ह्यांनीं मीमांसा करुन आयुर्वेदाचें शास्त्रीयत्व प्रस्थापित केलें. त्यांनीं प्रत्यक्ष अनुमान, आप्त व युक्ति या चारी चरकोक्त प्रमाणांचा सोपपत्तिक विचार करून या चारींनीं होणारें तें खरें ज्ञान व तें आयुर्वेदानें सांगितलें असल्याचें प्रतिपादन केलें. आणखी एका व्याख्यानांत वै. देशपांडे यांनीं आयुर्वेदाचीं अनेक वैशिष्ट्यें उदाहरणासह सांगून आधुनिक वैद्यकाला तीं सर्वथा नवीन आहेत हें दाखविलें.

सांख्य तत्वज्ञान जास्त बुद्धिनिष्ठ

वैद्य शंकरशास्त्री वर्तक ह्यांनीं जगदुत्पत्ति आणि जगताची व्यवस्था सांख्य तत्त्वज्ञानाच्या आधारें केलेली आहे व आयुर्वेदाचे सिद्धांत कसे शाश्वत आहेत हें सांगितलें. पुढें वैद्य ग. वि. पुरोहित यांनीं जगदुत्पत्ति सांगणाऱ्या सर्वतत्त्वज्ञानामध्यें सांख्य तत्वज्ञान हें जास्त बुद्धिनिष्ठ आहे असें सांगणारें प्रमाण, डॉ. राधाकृष्णन् ह्यांच्या "हिंदु तत्त्वज्ञानाचा इतिहास' ह्या ग्रंथांतून उद्धृत केलें, व पुढें आपली प्रमाण-पद्धति सांगितली. शेवटीं ज्या वनस्पतींचा आयुर्वेद उपयोग करतो त्या वनस्पतीचे गुणधर्म बदलण्याबद्दल कांहींच पुरावा सृष्टींत सांपडत नसल्याकारणानें आयुर्वेदीय निगमनें शाश्वत आहेत, असा त्यांनीं निष्कर्ष काढला आणि खरोखरच मानवी पिंड आणि त्याच्या प्राक्रिया ह्यांच्यामध्यें बदल झालेला नाहीं, वनस्पतींच्या गुणांत बदल झालेला नाहीं, त्या दोहोंच्या संयोगांत पूर्वी जे गुण दृष्टोत्पत्तीस आले त्यामध्यें फरक कां पडावा तें एक परमेश्वर जाणें असें म्हटलें.

श्री. गो. म. जोशी यांचीं व्याख्यानें

उपसंहाराच्या व्याख्यानांत श्री. गो. म. जोशी ह्यांनीं शास्त्रीयत्वाच्या दृष्टीनें किती मर्यादा पाळाव्या लागतात हें स्पष्ट सांगून पुढें आलेल्या पद्धतींपैकीं फक्त आयुर्वेदानेंच त्या मर्यादा पाळल्या आहेत ही गोष्ट स्पष्ट केली. त्यांनीं परीक्षण करण्याचें दृष्टीनें पांच टप्पे सांगितले आणि तुलनात्मक दृष्टीनें पौर्वात्य आणि पाश्चिमात्य तत्वज्ञानें कशीं दिसतात हें श्रोत्यांना विशद केलें. (१) विषयविभाग-वर्ण्य विषयाचा अंतर्भाव साकल्यानें झालेला आहे अगर एकदेशीयच आहे? (२) ज्ञानग्रहणपद्धति-ज्ञानाच्या सर्व मार्गांचा उपयोग केलेला आहे किंवा फक्त एकादाच मार्ग प्रमाण मानून इतर मार्ग बहिष्कृत केलेले आहेत? (३) अनुमानपद्धति-अनुगमनात्मक (Inductive) आणि निगमनात्मक (Deductive) ह्या पद्धतींचा यथायोग्य उपयोग केला आहे किंवा नाहीं? त्याबरोबर आपण घेतलेला विषयांत विभाग आणि पद्धति ह्यांच्या बाहेरील ज्ञानें उगीचच घुसडून दिलीं गेलीं आहेत काय? (४) सिद्धांत-सिद्धांत सोपाधिक आहेत कीं निरुपाधिक आहेत? सोपाधिक असल्यास उपाधि स्पष्ट केल्या आहेत काय? (५) उपयुक्तता-ह्या टप्प्याचें परीक्षण करतांना मात्र अतिशय अडचणी येऊं लागतात. कारण येथें शास्त्राची मर्यादा संपून मूल्यपद्धति सुरू होते, आणि शास्त्रपद्धति (अस्ति) आणि मूल्यपद्धति (अस्तु) ह्यांचा सर्वसाधारण व्यक्तीकडून हमखास घोटाळा केला जातो ही. मूल्य पद्धतीच समाजाच्या धारण-पोषणाचें आदिकारण असतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

079515

पहिल्या विभागांत रोगी, रोग व आहार या संबंधी आयुर्वेद व पाश्चात्य वैद्यक यामधील तत्वज्ञानांत पुढीलप्रमाणें फरक आढळतो.

आयुर्वेदीय तत्वज्ञान	पाश्चिमात्य तत्वज्ञान
रोग्याच्या शरीराची व्याख्या	
शरीरेंद्रियसत्वात्मसंयोगः प्रसन्नात्मेंद्रियमनाः	फक्त शरीर आणि तेंहि रासायनिक द्रव्यांचा संघात
रोगाची व्याख्या	
शरीर दोष (वातादि) व अजीर्णानें त्यांची विकृति व मानस दोष (रजतम)	रासायनिकामध्यें विसंगति
आहार विचार	
लघु, गुरु, सात्विक, राजस, तामस, आणि त्यांची विभागणी द्रव्याधिष्ठित; रस हा संबंध वस्तूचा गुण इ.	पार्थिव शरीराचीं घटक-द्रव्यें म्हणून विभागणी रासायनिक. रासायनिक द्रव्यांचे गुण म्हणजे वस्तूचे नव्हेत तर त्या वस्तूंच्या घटकांचे गुण.

त्यांनीं ह्या खात्यांत आणखी पुष्कळच तुलना करून दाखविल्या. ह्या पहिल्याच विभागावरून असें दिसून येईल कीं आज पुष्कळ बोलबाला झालेला असला तरीहि पाश्चिमात्य वैद्यक कधींहि शास्त्र ह्या पदवीला जाऊं शकणार नाहीं.

दुसरें खातें म्हणजे ज्ञानग्रहणपद्धति.

आयुर्वेदीय	पाश्चिमात्य
प्रत्यक्ष–अनुमान–आप्त वाक्य	प्रत्यक्ष – पण फक्त चाक्षुष प्रत्यक्ष– त्यामुळें इतर इंद्रियांचा उपयोग नाहीं. फक्त डोळ्यांची शक्ति वाढविणारीं उपकरणें

तिसरें खातें – अनुमान

ह्या खात्यांत पाहिले तर लुई, पाश्चर आणि कॉच वगैरेंचीं उदाहरणें देऊन व्याख्यात्यांनीं दाखविलें कीं ह्या शाखांत संशोधन करणारे लोक ह्या खात्यांशीं अपरिचित असतात. प्रगति म्हणजे काय हें न ठरवितांच प्रगति झाली असें म्हणणें बरोबर नाहीं. अशो, उपयुक्ततेच्या दृष्टीनें व्याख्यात्यांनीं पुष्कळ तुलना केली.

सर्वशरीर व एकदेशीय उपचार

उपचारांच्या दृष्टीनें पाहिलें तर त्यांचा सर्व-शरीरभर अगर एकदेशीय परिणाम असूं शकेल. त्या दृष्टीनें सर्वशरीर उपचार हा एकदेशीय उपचारा-पेक्षां श्रेष्ठ. एकदेशीय उपचारामध्यें गुण आणि दोष, अगर लाभ आणि हानि ही एकच द्रव्यापासून होऊं शकते; म्हणून एकदेशीय उपचार अयोग्य होत. ह्यांचीं उदाहरणें म्हणून वक्त्यांनीं रासायनिक द्रव्यांचे आंशिक परिणाम आणि विद्युत् किरणांचे शरीर परिणाम ह्यांचीं दिलेलीं होतीं. त्यांत दिलेले परिणाम होत असल्यास त्या दोनहि वस्तूंचा रोगपरि-हाराकरितां उपयोग केला जावा, असें कोणीहि सहृदय मनुष्य म्हणणार नाहीं.

मधुमक्षिकापालन शिक्षण

महाबळेश्वर येथें १ जानेवारीपासून ३ महि-न्याचा मधुमक्षिकापालन शिक्षणक्रम सुरू होत आहे. मासिक शिष्यवृत्ति ३० रु. मराठी ७ वी पास अस-लेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येणार आहे.

शास्त्रोक्त पद्धतीनें व अत्यंत परिश्रमानें तयार
केलेलीं महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसंमेलनानें
व ऑल इंडिया आयुर्वेद कॉंग्रेस
व प्रदर्शनाकडून प्रशंसित
सहस्रपुटी अभ्रक इ. भस्में व इतर औषधें
प्राइस लिस्ट मागवा.
श्री अमरेश्वर आरोग्यमंदिर
मिराशी बोळ, पो. इचलकरंजी S.M.C.

शुद्ध केशर, कस्तुरी, अंबर, मोती, प्रवाळ
आणि शिलाजीत वगैरेसाठीं
— पुढील पत्त्यावर संपर्क साधा —
गणेशीलाल जीवराज
२१४ सेम्युअल स्ट्रीट, चौथा मजला मुंबई ३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद आणि युनानी पद्धतीचा अभ्यास व संशोधन

"आयुर्वेद व युनानी या दोन्ही भारतीय वैद्यकीय पद्धतीचा सखोल अभ्यास व सूक्ष्म संशोधन करणें अत्यंत आवश्यक आहे" असें आरोग्य व मजूर खात्यांचे मंत्री श्री. शांतिलाल शहा यांनीं ता. ५-१२-५३ रोजीं ताजमहाल हॉटेलमध्यें बॉंबे मेडिकल कॉंग्रेसच्या अकराव्या अधिवेशनाचें उद्घाटन करतांना सांगितलें.

ते पुढें म्हणाले:- आपल्या वैद्यकशास्त्राच्या जुन्या ग्रंथांत जें ज्ञानभांडार आहे त्याचा पुरेपूर उपयोग करून आपण जनतेला कमी किंमतीचीं औषधें उपलब्ध करून दिलीं पाहिजेत. आयुर्वेद हें शास्त्र नाहीं असें पुष्कळ डॉक्टर लोक मानतात. मी स्वतः या विषयांत तज्ज्ञ नसल्यामुळें कांहींच निश्चित मत मांडू शकणार नाहीं. परंतु सर्व डॉक्टरांनीं आयुर्वेद, युनानी व इतर देशी पद्धतींचा अभ्यास मनःपूर्वक सुरू करावा अशी मी आपणास विनंति करतों. आयुर्वेद व युनानी पद्धति आधुनिक वैद्यक शास्त्राच्या कसोटीस उतरतील किंवा काय हें मी सांगू शकत नाहीं. पण आयुर्वेदाचें शास्त्रीय संशोधन करण्यास डॉक्टरांची आडकाठी नसावी असें मला वाटतें.

सर्व वैद्यकशास्त्रांचें एकीकरण करावें अशी सूचना या कॉंग्रेसचे अध्यक्ष डॉ. एम. बी. मोदी यांनीं आपल्या भाषणांतून केली.

ताडगुळासाठीं ५ लाख रुपये

ताडगूळ विकासाच्या योजनांसाठीं १९५३-५४ मध्यें मदत म्हणून निरनिराळ्या राज्यांना देण्यासाठीं भारत सरकारनें 'अधिक धान्य पिकवा' मोहिमेच्या निधींतून ५,००,००० रु. बाजूला काढले आहेत.

१९५२-५३ सालीं १ लाख मण ताड-गूळ तयार करण्यांत आला. ७००० लोकांना ८५० शिक्षण केंद्रांत शिक्षण देण्यांत आलें.

महारोगावर आयुर्वेदीय उपचार

आयुर्वेदीयांना संधि

म. गांधी राष्ट्रीय स्मारक निधीच्या लेप्रसी विभागाची सभा दिल्ली येथें ना. ग. वा. मावळणकर यांच्या अध्यक्षतेखालीं होऊन भारतांत ७ ठिकाणी कुष्ठरोग नियंत्रण केंद्रें काढावयाचें ठरलें. त्यापैकं महाराष्ट्रांतील केंद्र खानदेशांत निघणार आहे.

कुष्ठरोगावर आयुर्वेदीय चिकित्सकांना शास्त्रीय उपचार करण्यास संधि मिळावी म्हणून दोन वैद्यांची नेमणूक करण्यासाठीं तीन आयुर्वेदीय वैद्यांची एक समिति नेमण्यांत आली आहे.

सध्यांचें डॉक्टरी शिक्षण

सध्यांच्या डॉक्टरी शिक्षणाक्रमाची मुदत वर्षानें कमी करावी व एक वर्षभर ग्रामीण भागांत डॉक्टरी व्यवसाय केल्याशिवाय नोकरी अगर खाजगी डॉक्टरी व्यवसाय करतां येणार नाहीं असें बंधन घालण्यांत यावें अशी दुरुस्ती डॉक्टरी शिक्षणा-संबंधींच्या चालू नियमांत घालण्यांत येणार आ[हे] असें प्रसिद्ध झालें आहे.

लोखंड मिळण्याचें ठिकाण

लोखंड मिळण्याचें अेक साधन म्हणून जांभ्या दगडाचा वापर करावा आणि या दगडाचा रस काढण्याचा परंपरागत व्यवसाय असलेल्या आगरिया टोळीची आर्थिक परिस्थिति सुधारावी अशी सूचना जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ अिंडियानें, मध्यप्रदेशांतील मंडला जंगल विभागाची पाहणी करून त्यावरील आपल्या अहवालांत केली आहे.

नीलज्योतिष्मती शीतवीर्य आहे

नीलज्योतिष्मतीच्या मुळाचे प्रमाणाबाहेर सेवन झाल्यामुळें व सेवनकाल संपल्यावर पुढेंहि पथ्याहार विहार चालू न ठेवल्यामुळें आपल्या शरीरांत कफ दोष व ज्वरव्याधि निर्माण झाल्याचें एका गृहस्थांनीं पत्र पाठवून पत्रिकेस कळविलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तात्विक मार्गदर्शन हवें!

[ले. वै. न. पु. जोशी, आयुर्वेदतीर्थ]

आयुर्वेद पत्रिकेच्या . १६।११।५३ च्या अंकांत श्री. सुंदरराव भास्करराव वैद्य यांचा "आयुर्वेदीय औषधीप्रयोगाचा नवीन शोध" या नांवाचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत त्यांनीं ज्या ज्या पॅथींचा अनुभव घेतला त्यापैकीं ॲलोपॅथीशिवाय इतर सर्व पॅथींचा त्यांना चांगला अनुभव आला. वास्तविक स्वतःला झालेल्या एका मोठ्या व असाध्य ठरलेल्या व्याधींतून ज्या होमिओपॅथीनें त्यास गॅरंटीनें वाचविलें, तो सोडून दुसऱ्या पॅथीचा प्रयोग त्यांना कां करावासा वाटला, हें समजणें कठीण आहे. पण केवळ संशोधनाकरितां किंवा परोपकाराकरितां त्यांनीं इतर प्रयोग केले असें मी मानतो.

लेखांत तत्व सांपडत नाहीं

त्यांच्या संशोधनांत काय तत्व त्यांनीं शोधून काढलें हें मात्र सांपडत नाहीं. उदाहरण म्हणून त्यांनीं एका गृहस्थास १५ दिवस ताप येत होता त्यास मेथीचे दोन दाणे वाटून पाण्यांत टाकून दिले व दुसऱ्या दिवशीं त्याचा ताप गेला एवढेंच नव्हे तर तो कामासहि निघून गेला, असें म्हटलें आहे. ज्या अर्थी वैद्यराज ताप गेल्याचा निर्वाळा देतात त्याअर्थी तो गेलाच असला पाहिजे असें मी गृहीत धरतो. पण तो कां गेला हें मात्र त्यांच्या विवेचनावरून कळत नाहीं.

मेथीचे दाणेच कां ?

१५ दिवस येत असलेला ताप कोणत्या प्रकारचा होता याचा मुळींच उल्लेख नाहीं. त्या रोग्याची कांहीं शास्त्रोक्त परीक्षा (निदान) केली कीं नाहीं व त्यास मेथीचे दाणेच कां निवडले याचें कारण कांहीं सांपडत नाहीं. मेथीचे दाणे तापावर उपयोगी पडत असतील तर कोणत्या प्रकारच्या तापावर व कोणत्या अवस्थेंत उपयोगी पडतात याचें विवेचन जरूर व्हावयास हवें होतें.

त्याचप्रमाणें दुसरा मलेरियाचा रोगी मिऱ्याचे एका दाण्यानें बरा झाला असें म्हटलें आहे. मलेरियाचे बरेच प्रकार दिसतात. या रोग्यास कोणत्या प्रकारचा मलेरिया होता म्हणून त्यास मिऱ्याचा उपयोग झाला? कीं सर्व प्रकारच्या मलेरियांत व कोणत्याहि अवस्थेंत मिऱ्यांचा उपयोग करावयाचा, याचा उलगडा होत नाहीं.

तत्व असें आहे

सूक्ष्म औषधें वापरणें ज्या अर्थानें लेखकानें म्हटलें आहे त्या अर्थी तीं आयुर्वेदांत आहेत असें म्हणणें धाष्टर्याचें ठरेल. होमिओपॅथीमध्यें ज्या एखाद्या द्रव्याच्या मोठ्या मात्रेच्या सेवनानें जीं लक्षणें मनुष्य शरीरावर दिसतात, तींच लक्षणें रोग म्हणून झालीं तर तेंच द्रव्य औषध म्हणून अतिसूक्ष्म प्रमाणांत द्यावें असें तत्व आहे. या तत्वावर आयुर्वेदीय चिकित्सा आधारलेली नाहीं. विपरीतार्थकारी याचा अर्थ वरीलप्रमाणें कदाचित् कांहीं लोक करीत असतील, पण तसा तो अर्थ नाहीं.

मिऱ्यानें मलेरिया होतो काय ?

आयुर्वेदीय चिकित्सेचें मार्गदर्शक सूत्र 'हेतु-व्याधि-विपर्यस्त-विपर्यस्तार्थकारिणाम् । औषधान्न-विहाराणां उपयोगं सुखावहम्'। हें मानलें तर वरील औषध [मिरे] कोणत्या तत्वानें मलेरियाचें औषध होऊं शकतें हें सोपपत्तिक रीत्या सांगितलें पाहिजे. होमिओपॅथीचे दृष्टीनें याचा वापर केला म्हणावें तर मिऱ्यांचें मोठ्या प्रमाणाचें सेवनानें मलेरिया होतो असें मानावें लागेल. व आयुर्वेदीय दृष्ट्या [मलेरिया या ॲलोपॅथिक संज्ञेप्रमाणें त्यास कारण जंतू] मिरे हे हेतुविपरीत म्हणजे मलेरियाचे जंतु मारणारे असले पाहिजेत. पण मग तें सूक्ष्म प्रमाणांत कां? ॲलोपॅथीतील मलेरिया जंतुनाशक औषध किनीन सूक्ष्म देऊन भागत नाहीं. गूण येत नाहींतर मोठ्याच प्रमाणांत द्यावें लागतें. तर मग हें औषध कोणत्या प्रकारचें व येथें कां लागू पडलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याची चिकित्सा करावयास पाहिजे. लेखकानें हेंच कां योजलें याची त्यांच्या मनांतील विचारसरणी स्पष्ट झाली नाहीं व ती नसल्यामुळें हें सर्व थोतांड या सदरांत जाण्याचा संभव आहे. यस्य कस्य तरोर्मूलं येन केनापि मिश्रितम्। याच प्रकारचें हें औषध होईल. दैवयोगानें कोणाला तरी बरें वाटेल, तेवढ्यानें हें औषध सिद्ध झालें असें मानतां येणार नाहीं.

कोणत्या तत्वानें वापरावयाचें

लेखकानें वैद्यवर्गास अशा प्रकारचीं औषधें वापरून पहायचें आवाहन केलें आहे. तें कोणत्या तत्वानें वापरावयाचें याचें तात्त्विक मार्गदर्शन नसेल तर इतर लोक कसें वापरून पहाणार व कसा प्रयोग करणार ? गुण येत असेल तर काकतालीय न्यायानें कधीं काळीं आला, असेंच लोक म्हणतील.

नीट मार्गदर्शन करावें

वैद्यकीय मासिकांतून (नियतकालिकांतून) अशाप्रकारचे लेख तात्त्विक दृष्ट्या उकलून दाखविले नाहींत तर त्याला कांहीं अर्थच राहणार नाहीं. केवळ करमणूक म्हणून हे लेख वाचले जातील व विसरले जातील. लेखकाची खरोखरच सर्व वैद्यांना याचा उपयोग व्हावा अशी इच्छा असेल तर त्यांनीं वर वर्णन केलेल्या तत्वानुसार त्यांचा सांगोपांग उहापोह करून नीट मार्गदर्शन करावें; तरच इतर लोक प्रयोग करूं शकतील व प्रयोगाचें क्षेत्रहि वाढेल.

बालकांसाठीं महारोग आश्रम

" अमेरिकन लेप्रसी मिशन्स इन्कॉर्पोरेशन " या संस्थेचे कार्यकारी चिटणीस रेमंड पी. कूरियर यांनीं उत्तर भारतांत फैजाबाद येथें बालकासाठीं अेक महारोग आश्रम नुकताच उघडला आहे. "अमेरिकन लेप्रसी मिशन" ही एक खाजगी संस्था असून जगभर ठिकठिकाणच्या महारोग आश्रमांना त्या संस्थेकडून आर्थिक व वैद्यकीय साधनांची मदत मिळते. फैजाबाद येथें उघडलेल्या महारोग आश्रमांत १२० महारोगी बालकांच्या वैद्यकीय उपचाराची व व्यावसायिक शिक्षणाची व्यवस्था आहे.

हस्तलिखितांतील एक उतारा

(लेखकः— भिषग्रत्न ग. कृ. पाटणकर)

नित्यनाथाचे रसायन-खंड याचे पांच भाग आहेत. पैकीं त्याचा रसरत्नाकर यांत रसखंड व रसेंद्र-खंड असे दोन भाग छापलेले आहेत. रसेंद्रखंडांत आपण वापरतो त्यांतील बहुतेक रसायनें आहेत. बादि-खंड, रसायन-खंड, मंत्र-खंड हे छापलेले नाहींत.

८ व्या रसायन-खंडाच्या अध्यायांत एक प्रकरण आहे. त्यांत मद्रास इलाख्यांतील प्रसिद्ध देवस्थान श्रीशैलमल्लिकार्जुन याचे आसपास असलेल्या वृक्षांचा, मातीचा, कंदाचा, पाण्याचा, दगडाचा, काया व माया—सिद्धीकडे उपयोग कसा होतो याचा तपशील आहे. त्यांतील एक उतारा मजजवळ आहे. तो प्रसिद्ध होऊन संशोधकांचे तिकडे लक्ष जाऊन त्यांनीं त्या देवस्थानाजवळील माहिती मिळवून संशोधन करावें या उद्देशानें कळवित आहे.

मल्लिकार्जुनदेवस्य पुरतो गजसंनिभा ।
शिला तिष्ठति या, रात्रौ स्रवते गुग्गुलं सदा ॥
पलाशचाटुना ग्राह्यं क्षिपेदलाबुपात्रके ।
तद्गुग्गुलुसमं गंधं निष्कैकं भक्षयेत्सदा ॥
मासान्मृत्युजरां हंति जीवेदाचंद्रतारकम् ।
तद्गुग्गुलुं द्रुते ताम्रे कोटिभागेन योजयेत् ॥
तद्भवेत् कनकं दिव्यं जांबुनदसमप्रभम् ।

प्रयत्नः— जरूर ती माहिती मिळवून, नतर समक्ष जाऊन संशोधनास जरूर तो जिन्नस मिळवावा. पूर्वकालांतील गुरुमुख आतां मिळणें शक्य नाहीं. पूर्वकालीन व आधुनिक शास्त्राच्या दृष्टीनें चिकाटीनें प्रयोग व चुकांची ज्ञानबद्ध पद्धतीनें दुरुस्ती करीत न कंटाळतां यशसिद्धीपर्यंत मार्ग आक्रमण करणें क्रमप्राप्त आहे. जेवढें यश पदरांत पडेल तेवढें आत्मसात् करावें.

जे अनेक प्रयत्नांनीं साधणार नाहीं त्याचें गूढ उलगडत नाहीं, असें समजावें.

मद्रासकडील वैद्यांनीं यांतील प्रत्यक्ष पाहून जी माहिती मिळेल ती कृपा करून आयुर्वेद पत्रिकेकडे रवाना करावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आरोग्य-लवण

(लेखकः– भिषग्रत्न ग. कृ. पाटणकर)

चालू प्रथेचीं उपयुक्त औषधें तयार करून जनतेला व वैद्यांना पुरवित असतां आज उपलब्ध नसणारीं महत्वाचीं आयुर्वेदीय औषधें तयार करून जनतेला पुरविणें हेंहि औषधी-कारखान्याचें एक कर्तव्यच आहे. खालील क्षार वज्रक्षारापेक्षां अधिक प्रभावी असून तो अनुपानपरत्वें अनेक विकारावर कार्य करणारा आहे. गद्गनिग्रहग्रंथांत हा पाठ संस्कृतांत आहे. खालील माहिती हा त्याचा अनुवाद आहे.

आरोग्य-लवणाचीं घटक द्रव्यें

अजमोदा तोळे २, ओवा तो. २, कडुवृन्दावन-फळें किंवा मुळया तो. ४०, कोरफडपट्टा तो. ८, करंजसाल तो. ८ करंज घाणेरागानें ४०० गुग्गुळ तो. ६४, चित्रक तो. ३२, जिरे दोन्ही मिळून तो. ४, त्रिधारी निवडुंग कांडे तोळे ८०, त्रिकटु एकत्र तो. २०, पादेलोण तो. १२, बांगडखार तो. ८, बिडलोण तो. ४, वचनाग तो. १६, मीठ तो. ४०, मोहऱ्या तो. १६, रिंगणीफळें ४००, रुईपानें ४००, लसूण तो. २०, सैंधव तो. २०, हिंग तोळे ४.

हीं सर्व औषधें एकत्र करून उखळांत कुटावी. कुटून सर्व एकजीव झाल्यावर एनॅमलच्या बशींत अगर एनॅमलच्या बाटलींत किंवा कल्हई असलेल्या परातींत तें ठेवावें. नंतर त्यावर ३२ तो. रुईचा चीक ३२ तो. सरसूचें तेल घालून तो गोळा त्यांत मळावा. नंतर हें सर्व चांगलें मावेल असें मडकें घेऊन त्यांत हें सर्व घालावें (हा सर्व औषधी भाग मडक्यांत घालीत असतांना हातानें दाबू नये.)

नंतर त्या मडक्याच्या तोंडाचे आंत बसेल असें परळ नीट चोहों बाजूनें पाहून बसवावें. परळ व मडके यांचे संधीस सात मातकापडें लावावीं. नंतर तो संधि-लेप पूर्ण वाळल्यावर मडक्याचे आजूबाजूस जागा राहील असा जमिनींत खड्डा काढून त्यांत हें मडकें ठेवून भोंवतीं राहिलेली जागा रानशेणीनें भरावी. नंतर संध्याकाळीं अग्नि लावून स्वांगशीत होईपर्यंत राहूं द्यावें. नंतर मडकें बाहेर काढून फडक्यानें स्वच्छ झाडून मातकापडें काढून परळ काढावें. कांहीं वेळ तसेंच ठेवून आंतील सर्व भाग जळल्याचें पहावें.

जो भाग जळून कोळसा झाला नसेल त्या भागाचे जिन्नसाची पुनः भट्टी लावावी लागेल. सर्व जळून कोळसा बनला असेल तर तें खलून बाटलींत भरून ठेवावें. ताज्या ताकाच्या निवळींतून किंवा लिंबाचे रसांतून याचा खालील विकारावर ४ गुंजा ते १ माशा पर्यंत प्रमाणांत याचा उपयोग करावा.

आरोग्य लवणाचा २ रा प्रकार

वरील कोळसा झालेली पूड कल्हईच्या मोठ्या भांड्यांत घालून त्यांत त्या पुडीच्या मानानें ४ शेर अगर ६ शेर पाणी घालावें. हातानें तें सर्व एकत्र करून पातेलें झांकून ठेवावें. सकाळीं खालील भाग हलूं न देतां वासुदेव प्याला [सायफन] पद्धतीनें वरील पाणी काढून घेऊन चुलीवर ठेवून तें आटवावें. पांढरा स्वच्छ क्षार मिळेल. याचा ताकांतून किंवा लिंबाचे रसांतून वयमानाप्रमाणें प्रतिवेळीं १ ते ४ गुंजापर्यंत उपयोग करतां येईल.

पावसाळ्यांत या क्षारास पाणी सुटतें म्हणून बाटलीचे तोंडावर कापूस घालून बूच घट्ट बसवावें.

आरोग्यलवणानें बरे होणारे विकार

अरुचि, अजीर्ण, अष्ठीला, आमदोष, उर्ध्ववात, खोकला, गुल्म, ग्रहणी, नीरक्तता, पोटफुगी, पडसें, पानथरी, मूत्रग्रंथी, मुळव्याध, मुतखडा, वातश्लेष्म-युक्त विकार, विषूचिका, शूल, श्वास, हृद्रोग इ. सर्व विकारावर हा क्षार अत्यंत प्रभावी आहे.

माझ्या सोलापूरच्या वैद्यकीय व्यवसायांतील ७ वर्षें व किनईच्या राहण्यांतील ३६ वर्षें या मुदतींत हा क्षार मीं ३ वेळ केला. वरील सर्व विकारावर मी या क्षाराचा प्रभावशाली अनुभव घेतला. प्रयत्नवादी औषधी कारखान्यांनीं कोळसा व क्षार रूपांत दोन्ही तऱ्हेनें हा क्षार केल्यास जाणते व गुणग्राही वैद्य याचाच प्रामुख्यानें उपयोग करतील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लायक माणसांची कमतरता

" रोग झाल्यावर त्यावर उपचार करण्यापेक्षां त्यास आधींच प्रतिबंध करणें अधिक चांगलें असल्यामुळें, सरकार शक्य ते सर्व रोगप्रतिबंधक उपाय योजित आहे. " असे उद्‌गार मुंबई सरकारचे सार्वजनिक आरोग्य खात्याचे मंत्री श्री. शान्तिलाल शहा यांनीं बनासकांठा जिल्ह्यांत हरसोल येथें एका सार्वजनिक अस्पितळाचें उद्घाटन करतांना काढले.

अशुद्ध पाण्यामुळें रोग

अशुद्ध पाण्यामुळें पुष्कळ रोगांची उत्पत्ति होत असल्यामुळें सरकार, राज्यांतील पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठीं दरसाल २॥ कोटी रुपये खर्च करीत असल्याचें सांगून ते पुढें म्हणाले कीं, मलेरियाचें निवारण करण्यासाठीं राज्यांत सर्वत्र मोठ्या प्रमाणावर डी. डी. टी. फवारण्यांत येते. मलेरिया व कॉलऱ्यास मेहनतपूर्वक प्रतिबंध करण्यांत येत आहे.

वैद्यकीय पदवीधर शहरांतच

श्री. शहा पुढें म्हणाले कीं, सर्वसाधारणपणें वैद्यकीय पदवीधर शहरांतच धंदा करणें पसंत करीत असल्यामुळें ग्रामीण भागांत आरोग्य योजनांची अंमलबजावणी करण्यासाठीं लायक माणसांची कमतरता भासत आहे.

खेडेगांवासाठीं योजना

ग्रामीण भागांतील लोकांना औषधी मदत मिळावी म्हणून योग्य असें वैद्यकीय तज्ञ तयार करण्याची एक तात्पुरती योजना भारत सरकारनें तयार केली असून ती निरनिराळया राज्य सरकारकडे अभिप्रायासाठीं पाठविली आहे. अशी माहिती भारतीय लोकसभेंत आरोग्यखात्याच्या उपमंत्री श्रीमती एम्. चंद्रशेखर यांनीं सांगितली.

या योजनेंत वैद्यांचाहि समावेश करण्यांत येईल असें त्या प्रश्नोत्तराच्या वेळीं म्हणाल्या.

गोव्यांतील वैद्यकीय व्यव[स...]

एक वैद्य लिहितातः-यंदा १९५३ ... पासून गोवा राज्यांत ॲलोपाथी-इतर वैद्य... सायिकावर कडक निर्बंध घातले गेले आहेत. ... डॉक्टरांच्या बरोबरीनें चिकित्सा व्यवसाय... असा माझ्याविषयीं बोलबाला असल्यामुळें स... मेडिकल खात्यांत व मिलिटरी सी. अ... खात्यांत माझें नांव गेलें आहे. त्यामुळें मला म... कीय व्यवसाय अगदीं गुप्त रीतीनें करावा ला...

जवळचा मिलिटरी कमांडरच मा... असल्यामुळें त्यानेंच मला सावधगिरीची... दिली आहे. त्यानें मला सरकारी हुकूमसुद्धा... विला. माझ्याप्रमाणें गोवा भागांतील सर्व... वैदीयांची स्थिति आहे.

लहान थोर सर्वांना पसंत प...

कोहळ्याचा गुणकारी पौष्टिक

पित्तनाशक कल्प

' अश्विनीप्राश '

या नवीन पौष्टिक कल्पाची रुची (च... मुळें व स्त्रिया वगर सर्वांना आवड... आपणहि सेवन करून अनुभव घ्या.

किं. २० तोळे २ रु.

.... आयुर्वेद सेवा संघ

औषधी भवन, नासिक

इंजेक्शन चिकित्सा

पाश्चात्य इंजेक्शन चिकित्सेवरील ...

मराठी ग्रंथ. किं. ६ रु. ट. ख. नि...

वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक शहर

सुबोध वैद्यक ग्रंथमाला, पो. का...

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Compiled
1999-2000

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar